28 JUN 1977


29

# अर्थी


तृतिय वर्ष वर्धापन विशेषांक

एप्रिल - मे १९७७. मूल्य ६ रुपये

Vol. 3 , 1977-78



## गांधीजींच्या आर्थिक कार्यक्रमाचा नव्याने विचार ★ ★ ★



# गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचाराचे मर्म

**प्रा. देवदत्त दाभोलकर**
कुलगुरु, पुणे विद्यापीठ

---

नुकताच जनता पक्ष सत्तारूढ झाला. त्या पक्षाच्या मंत्र्यांनी राजघाटावर महात्मा गांधींच्या समाधीला वंदन करून जनसेवेची प्रतिज्ञा घेतल्यानंतरच अधिकार ग्रहण केले. गेल्या महिन्यात पक्षाचे अर्थशास्त्रीय धोरण स्पष्ट करताना, गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचारांचा आदर्श मानून ह्यापुढचे आर्थिक निर्णय व व्यवहार होतील अशी, मुख्य मंत्र्यांपासून तो व्यापार मंत्र्यापर्यंत सर्व जबाबदार मंत्र्यांनी ग्वाही दिली आहे. भालोद, जनसंघ, समाजवादी व संघटना कॉंग्रेस हे पूर्वीचे पक्ष आताच्या जनता पक्षाचे प्रमुख घटक पक्ष असून ते गांधीवादाचा पुरस्कार, नव्या बदलत्या परिस्थितीत, अधिक हिरिरीने करीत आहेत. गांधीवाद स्वीकारल्यास कारखानदारी, रोजगार आणि वैज्ञानिक प्रगती ह्यांवर प्रतिकूल परिणाम होईल अशीही प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागली आहे. तर एकीकडे जयप्रकाश नारायण हे संपूर्ण क्रांतीचा ( Total revolution ) विचार आवर्जून मांडत आहेत. त्या विचाराचा मूळ धागा गांधीवादी विचारातच सामावला आहे. म्हणूनच गांधीवादी अर्थशास्त्रीय विचाराच्या अभ्यासाचे महत्त्व आता अधिक आहे. गांधीवादी अर्थशास्त्रावर भाष्य करण्यासारख्या प्रा. दाभोलकर ह्यांच्यासारख्या व्यक्ती मोजक्याच आहेत. अर्थच्या तृतीय वर्धापन विशेषांकाचे वैशिष्टच म्हणून ह्या खास महत्त्वाच्या विषयावर प्रा. दाभोलकर ह्यांचे चिकित्सक स्पष्टीकरण मुलाखतीच्या स्वरूपात सादर करीत आहोत.

---

**गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचाराच्या अभ्यासाची सद्य परिस्थितीत प्रकर्षाने गरज भासत आहे काय ?**

☐ स्वातंत्र्य मिळाल्यापासून गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचारांना, कार्यक्रमाला वेगळे वळण लागत गेले. वास्तविक गांधींच्या विचाराचे महत्त्व यापूर्वीही जाणले गेले असते तर बरे झाले असते. गेल्या तीस वर्षांच्या काळात भारतामध्ये सर्वसाधारणपणे गांधीजींविषयीच्या पूज्यभावाचे प्रदर्शन भरपूर होऊनही प्रत्यक्षात मात्र गांधीजींच्या विचारापासून बरीच फारकत घेतली गेली कारण गांधीजींचे सर्वच विचार पचवणे व आचरणात आणणे हे वाटते तितके सोपे नाही. आजच्या बदलत्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचाराचे महत्त्व ठळकपणे उठून दिसत असले तरी

गांधीजींच्या विचारांचा मागोवा आपण नेकीने व सातत्याने करणार आहोत काय ह्याचा अंतर्मुखपणे निर्वाळा देणे जरुरीचे आहे.

**गेली ३० वर्षे गांधीजींना राष्ट्रपिता व वंदनीय नेते मानणाऱ्या व्यक्तीच सरकारमध्ये होत्या. २५ वर्षांच्या नियोजनामध्येही समाजविकास, खादी, ग्रामोद्योग, लघुउद्योग, कुटिरोद्योग, साधी व स्वस्थ राहाणी, स्वदेशी व स्वावलंबन, सत्ता विकेंद्रीकरण, विश्वस्त व्यवस्था, स्वयंपूर्ण ग्राम, ग्रामराज्य इत्यादी गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचारांना अनुसरून काही निश्चित स्वरूपाचे कार्य झाले काय? खास गांधीप्रणीत ग्रामोद्योग, खादी इत्यादी योजना व्यवहार्य रीतीने राबविल्या गेल्या काय?**

☐ स्पष्टच सांगायचे झाले तर गांधीजींच्या मूळ कल्पनेशी सुसंगत अशा पद्धतीने कोणत्याच योजना राबवल्या गेल्या नाहीत. खादी, ग्रामोद्योग, मधमाशीपालन, कुटिरोद्योग, स्वदेशी, हातमाग इत्यादींबाबत जे शासकीय पातळीवर प्रयत्न झाले ते काही प्रमाणात गांधीजींच्या स्मृतीला एक प्रकारची आदरांजली अर्पण करावयाची ह्या भावनेने झाले. त्यामुळेच त्या प्रत्येक ध्येयाप्रत झालेले कार्य मर्यादितच राहिले. मला वाटते गांधीजींच्या विविध प्रतीकात्मक कार्यक्रमाचे दर्शनी महत्त्व आपण वाढविले पण त्यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा जो मूलभूत गाभा आहे, ज्याला आपण सर्वोदय असे नाव देतो... तोच आपण नीट समजून घेतला नाही. त्यामुळे आपली पावले मूळ रस्त्यावरून बाजूला पडत गेली. म्हणूनच आपण ह्या चर्चेत गांधीजींच्या मूळ वैचारिक अधिष्ठानाचा जास्त चिकित्सक अभ्यास करण्यावर भर देऊ या. सर्वोदय हा शब्द गांधीजींनी प्रचारात आणला नाही. त्यांना मान्य असलेला व अभिप्रेत असलेला विचार म्हणजे 'अंत्योदय'. समाजातल्या कनिष्ठ पातळीवर असलेल्या दीन, दुर्बल, उपेक्षितांना न्याय मिळाला पाहिजे हा त्यातला प्रमुख आग्रह. अर्थशास्त्रीय आणि राजकीय विचार वा व्यवस्थांनी जर अंत्योदयाचे कार्य पार पडले तर ते गांधीजींच्या मार्गाला अनुसरून झालेले कार्य अशी व्याख्या करता येईल.

ह्या अंत्योदयाच्या तत्त्वज्ञानाचा उगम शोधणे उद्बोधक होईल. अंत्योदय हा शब्द गांधीजींना सुचला तो म्हणजे रस्किनच्या 'Unto the Last' ह्या पुस्तकामुळे. रस्किनच्या पुस्तकाला त्याने हेच शीर्षक का दिले त्याचा शोध घेतल्यास त्याची मूळ प्रेरणा बायबलमधल्या एका प्रभावी गोष्टीतच सापडते. ह्या Unto the Last पुस्तकाचे आचार्य जावडेकर ह्यांनी भाषांतर केले आहे. गांधीजींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानावर फार मोठा प्रभाव ह्याच पुस्तकाचा आहे. त्याबाबतीतील एक आठवण अशी आहे की गांधीजींना हे पुस्तक एका मित्राने प्रवासात वाचण्यासाठी दिले. त्यांनी ते हातात घेतले आणि त्या प्रवासात वाचून संपवले. गांधीजींनी असे नमूद केले आहे की, हे पुस्तक संपवून येथे ज्या क्षणी मी गाडीतून खाली उतरलो, त्या क्षणी मी एक 'वेगळा माणूस' म्हणूनच खाली उतरलो अशी जाणीव झाली. ह्या पुस्तकात सामाजिक न्याय व सामाजिक कर्तव्ये ह्यांवर रस्किनने फार चांगले विचार दिले आहेत. समाजातल्या खालच्या वर्गाकडे दान संक्रमण करणे ही त्यातली मध्यवर्ती कल्पना आहे. विनोबा म्हणतात 'दानम् संविभाग' दानही वाटून घ्यावयाचे. दान म्हणजे दया, करुणा, उपकार नव्हे तर घेणाऱ्याच्या दृष्टीने त्याचा तो नैसर्गिक हक्क आहे. तो त्याला लाभला म्हणजे न्याय मिळाला. हे संपत्तीच्या वितरणाचे सूत्र रस्किनला बायबलमधूनच मिळाले.

बायबलमध्ये अशी गोष्ट आहे: एक जमीनदार होता. त्याच्या खळ्यात काम निघाले. त्याने आपल्या मुनिमाला बोलावून सांगितले की गावात जेवढे मजूर काम करण्यास तयार असतील त्यांना घेऊन ये. त्यांना दिवसाला एक गिनी हा मजुरी दर सांग. त्याप्रमाणे मुनीम सकाळी ६ वाजता अड्डयावर गेला व त्याने ही घोषणा केली. त्या वेळी जे हजर होते व गरजू होते ते कामावर आले. मजूर कमीच असल्याकारणाने व काम जास्त असल्याकारणाने मालकाने पुन्हा सकाळी ८ वाजता त्याला अड्डयावर पाठवले. पुन्हा काही मजूर मिळाले. ह्या क्रमाने दुपारी १२ वाजता, २ वाजता व ४ वाजता त्याने मजूर मिळवले. संध्याकाळ झाली. मालकाने मजुरी देण्याकरता आपली थैली उघडली. प्रत्येकाला दिवसाची भूक भागवण्याकरता १ गिनी मजुरी सरसकट द्यायला सुरवात केली. अर्थात सकाळी सहा वाजल्यापासून जे आले होते त्यांनी तक्रार केली. सकाळपासून येऊन आमच्या हातात एक गिनी आणि संध्याकाळी ४ वाजता आलेल्यांनाही एक गिनी हा अन्याय आहे. त्यावर मालकाने उत्तर दिले की, "तुम्हाला मी ज्या वेळी ज्या कामासाठी घेतले, त्या वेळी जी मजुरी मी ठरवली होती तीच देतो आहे ना? काही कमी नाही ना? जर ठरल्यापेक्षा कमी दिली असती तर अन्याय झाला असता. दुपारी येणाऱ्यांना मी १ गिनीच ठरविली होती. तो दिली. तुमचा सगळा राग आहे तो दुसऱ्या मजुरांनाही समान मजुरी मिळाली ह्याकरता आहे." I will give unto this last a[illegible]

unto you ". ह्या गोष्टीतले तात्पर्य मार्मिक आहे. माणसाचे सुख सापेक्ष आहे. त्याने त्याच्यापुरताच सुखदुःखाचा विचार स्वतंत्रपणे केल्यास त्याला आत्मतुष्टी लाभेल. पण त्याची सारी धडपड दुसऱ्याच्या सुखदुःखाशी तुलना करण्याची असते. आई-वडील आपल्या लेकरांवर असेच समान प्रेम करतात. एकाला अधिक व दुसऱ्याला कमी असे वाटप करीत नाहीत. घरात एकादा कमी काम करीत असला तरीही त्याच्या वाटचाला तेच जेवण मिळते. सामाजिक न्याय देताना ह्या प्रकाराची दृष्टी अव्यवहार्य वाटली तरी आवश्यक आहे. हे अर्थशास्त्र संपूर्ण वेगळे अर्थशास्त्र आहे. सर्वांना समान वेतन वा रोजगार मिळावा त्यापाठीमागचे सूत्र असे आहे की समाजातील प्रत्येक घटक व्यक्तीचा सामाजिक संपत्तीवर सारखा हक्क आहे. ह्याचा अर्थ असाही होतो की एखाद्या उद्योगसंस्थेच्या संचालकाचे, वा बुद्धिवंताचे तसेच सर्वसामान्य कामगाराच्या उत्पन्नात फारसा भेद असण्याचे काही कारण नाही. इंजिनिअरला मिळणारा पगार व सफाई करणारा श्रमिक ह्या दोहोत समानता असायला काय हरकत आहे, हा गांधीजींचा समाजाला न पटलेला एक विचार आहे. उदा. समजा दोन व्यक्ती बरोबरीने, सारख्या गुणवत्तेने इंजिनिअर झाल्या. पण त्यातल्या एकाला चांगली नोकरी मिळाली. दुसऱ्याला बेकारी अनुभवावी लागली. ज्याला नोकरी मिळाली नाही त्याचा दोष काय, तर नोकऱ्या अगदी थोड्या होत्या. देशात मंदी होती. ज्याला मिळाली त्याचं सद्‌भाग्य तर दुसऱ्याचे केवळ दुर्भाग्य. ह्यात त्याचा काय दोष ? अर्थ-व्यवस्थेकडून काम करण्यास तयार असणाऱ्या श्रमिकांना रोजगार देण्याची क्षमता असली पाहिजे. म्हणजे हा दैव-गतीचा भाग नाहीसा होईल. दुसरे उदाहरण घेऊ. बरोबरीने शिकणारे दोन मित्र. एक एस एस. सी. झाल्यावर मेडिकल किंवा इंजिनिअरिंगकडे जाऊ शकला त्याच्या घरची तशी ऐपत होती. अंगी बुद्धिमत्ता व अभ्यासू वृत्ती होती. तो इंजिनिअर झाला व त्याला पगार १५०० रु. मिळू लागला. दुसरा तितकाच बुद्धिमान. पण घरच्या जबाबदाऱ्यांमुळे व अडचणी-मुळे कॉलेजात जाऊ शकला नाही साधा लिपिक झाला. पगार दरमहा सुमारे ४०० रुपये. ह्या दोघात अंतर पडले ते उच्च शिक्षणाच्या संधीमुळे. समाजात सर्वांनाच जर शिक्षणाच्या समान संधी मिळाल्या तर दोन विद्यार्थ्यांमधल्या वैयक्तिक बुद्धिमत्तेमुळे व चिकाटीमुळे त्यांच्या यशात पडलेला फरक हा न्याय्य होईल. मग त्या दोहोत वेतनाची तफावत असली तरी ती क्षम्य होईल. पण गांधीजी ह्याही पलिकडचा विचार करतात. ते म्हणतात ज्याला अधिक बुद्धिमत्ता आहे त्याला कमी बुद्धिमत्ता असलेल्या व्यक्तीपेक्षा अधिक मोबदला कशाकरता हवा ? बुद्धिमत्ता ही त्याला कुठून मिळाली ? त्याचे उत्तर ती त्या व्यक्तीपुरती नैसर्गिक देणगी लाभली म्हणून. त्यावर गांधीजी म्हणतात 'निसर्गाच्या देणगीचे भांडवल करण्याचा अधिकार उचित आहे का ? कोणत्याही नैसर्गिक देणगीवर (सूर्यप्रकाश, हवा, पाणी इ.) जसा खासगी हक्क सांगणे सुसंस्कृतपणाचे नाही त्याचप्रमाणे बुद्धिमत्ता, कौशल्य इत्यादी गोष्टींवर खासगी हक्क सांगून समाजाकडून अधिक फायदा उचलण्याचेही काही कारण नाही. एखाद्या बुद्धिवंताने आपल्याला भाग्यवान जरुर मानावे, पण त्याकरता अधिक मोबदला मागू नये. गांधीजींचे अर्थशास्त्र हे इतके पुढे जाणारे आहे. समाजातल्या साऱ्या कष्टकरी घटक व्यक्तींना समान वेतन मिळावे हा त्यांचा विचार आहे आपण गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचाराने केवळ प्रभावित होतो. पण जोपर्यंत आपल्याला नेमके काय करावयाचे हे स्पष्ट होत नाहीत तोपर्यंत त्या बाबतीत भडक बोलण्यात हशील नाही. गाधीजींचा हा मूलभूत विचार व्यवहारात आणावयाचा असेल तर किमान एक साधी गोष्ट जमली पाहिजे ती म्हणजे समाजातील कनिष्ठातील कनिष्ठ माणसाला किमान जीवनमान आणि ते केवळ नुसते दान भीक सहाय्य म्हणून नव्हे तर, श्रमणाऱ्या व्यक्तीला त्याचा हक्काचा मोबदला म्हणून उपलब्ध करून देणे हे ते कार्य होय. गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचाराचा हा खराखुरा मागोवा (following) होईल.

**आपल्या देशाचे दारिद्र्य नष्ट करण्याकरता गांधीजींच्या विचाराप्रमाणे कोणते उपाय तत्काळ योजले पाहिजेत ?**

☐ ताबडतोबीच्या उपायांमध्ये साहजिकच सुसम संपत्ती विभाजनावर भर दिला पाहिजे. आपल्या समाजात सध्या ६ वर्ग अधिक भाग्यवान आहेत. त्यांना धक्का देण्याची जरुरी आहे. त्याखेरीज ह्या देशातल्या गरीबांना न्याय मिळणार नाही. ते सहा वर्ग म्हणजे : १) भारतातले राजेरजवाडे व सरंजामदार; २) मोठे जमीनदार; ३) मोठे भांडवलदार, सावकार व कारखानदार; ४) संघटित श्रमिक; ५) मासिक हजार रुपयापेक्षा जास्त उत्पन्न असलेला वरिष्ठ मध्यमवर्ग; ६) विद्यापीठीय उच्चशिक्षण मिळविलेला वर्ग.

ह्या सहा वर्गातील लोकांनी त्याग केल्याखेरीज भारतातील गरिबी नष्ट होणे कठीण. आतापर्यंत त्यातल्या त्यात संस्थानिकांना धक्का लावला गेला. पण भांडवलदार, बडे

जमीनदार ह्यांना फारशी झळ बसली नाही. पहिल्या तीन गटांना तातडीने धक्का देणे जरूर आहे. पण त्याबरोबरच संघटित श्रमिक, बुद्धिवंत व बडे पगारदार ह्यांनीही त्याग करण्याची तयारी ठेवावी. क्रांतीत पहिले तीन वर्ग निस्तेज झाले म्हणजे समाधान मानणे उचित नाही. संपूर्ण क्रांतीत उरलेले तीन गटही बदलले पाहिजेत. ह्या सर्व गटांना ज्या वेळी झळ पोहोचेल त्या वेळी कनिष्ठ वर्गाच्या आर्थिक, सामाजिक उन्नतीचा मार्ग मोकळा होईल. क्रांती सामान्य माणसापर्यंत पोहोचावयाची असेल तर ह्या वर्गातल्या लोकांनी स्वेच्छेने समंजसपणा दाखविण्याची जरुरी आहे हीच गांधीजींच्या मनातली अंत्योदयाची कल्पना आहे.

**पण मग अशा प्रकारच्या क्रांतीत पुढाकार (Initiative) कोणी घ्यावयाचा? वरिष्ठ वर्गाने की कनिष्ठ वर्गाने? वरिष्ठ वर्ग अशा क्रांतीस सुखासुखी तयार होईल काय?**

☐ गांधीजींच्या दृष्टीने पुढाकार दोन्ही बाजूने घेतला जावा. कनिष्ठ लोकांनी अन्याय सहन करता कामा नये आणि वरिष्ठांनी अन्याय करता कामा नये. केल्यास त्यांना सद्सद्विवेक बुद्धीची टोचणी असावी व त्याचे पश्चात्तापाने परिमार्जन व्हावे. दोन वर्गात लढाच झाला पाहिजे अशी जरुरी नाही. परस्पर सामंजस्य हवे.

**हे सामंजस्य अपेक्षिणे कठीण. विशेषत: कनिष्ठ वर्गाची मुस्कटदाबी व शोषण होण्याचा धोका अटळ असतो, तो टाळण्याचा मार्ग कोणता?**

☐ गांधीजींनी एकमेव मार्ग सुचविला आहे तो म्हणजे अहिंसात्मक सत्याग्रहाचा. कनिष्ठ वर्गाला आपली हिंमत व ताकत वाढविण्याचा हाच एक मार्ग आहे व तो त्यांनी जरूर अनुसरला पाहिजे.

**गांधीजींच्या मृत्यूनंतर पं. जवाहरलाल नेहरू यांनी आर्थिक नियोजनात आधुनिकीकरण व विज्ञान ह्यावर भर दिला, त्यामुळे गांधीवादी विचार मागे पडला काय?**

☐ प्रथमत: हे लक्षात घेतले पाहिजे की गांधीजींचा आधुनिकीकरण, यंत्रशक्ती व वैज्ञानिक प्रगती ह्यांना कधीच विरोध नव्हता. त्यांचा विरोध होता तो ह्या गोष्टींच्या आहारी जाऊन मानवाचे शोषण व गळचेपी होते त्याला. यंत्रांमुळे बेकारी झाली व नीरसता आली, माणूस दुय्यम महत्त्वाचा झाला त्यामुळे जी माणसाची पिळवणूक होते त्यावर गांधीजींचा मुख्य आक्षेप आहे. "Man must remain master of machine" माणूस हा यंत्राचा गुलाम होता कामा नये हे गांधीवादाचे सूत्र होय. माणूस संवेदनाशील विवेकशील आहे तो गुण यांत्रिकीकरणात वा आधुनिकीकरणाच्या प्रक्रियात लोपू नये ही त्यांना सदैव वाटणारी काळजी होय. जे यांत्रिकीकरण माणसाचे उन्नयन करतो ते ते त्यांना संमत होते. पं. नेहरूंचा उल्लेख झाल्यामुळे एक आठवण सांगतो. गांधीजींच्या मृत्युनंतर वर्धाला गांधीवादी कार्यकर्ते जमले होते. या कार्यक्रमास पंडितजीही होते. त्या वेळी त्या सभेत जवाहरलालजी यांना लोकांनी सांगितले की देशातील अर्थव्यवस्था गांधीजींच्या मार्गानेच पुढे गेली पाहिजे. भारतीय कृषि व श्रमिक ह्यांचे प्रश्न आदर्श ग्राम व आर्थिक स्वयपूर्ण ग्राम ह्या पद्धतीने सोडवावेत. नियोजनात यंत्र, तंत्र, विज्ञान ह्यांवर भर देऊ नये. त्यावेळी नेहरूंनी सांगितले की मी ह्या सर्व गोष्टी करायला तयार आहे. परंतु देशाच्या संरक्षणार्थ जबाबदारी तुम्ही माझ्यावर ठेवू नका. अहिंसा म्हणजे दुर्बलता नव्हे. त्याचप्रमाणे साधी रहाणी म्हणजेही दारिद्र्य नव्हे. आपल्या नियोजनात विज्ञान व आधुनिकीकरण ह्यांना महत्त्व देण्यात काहीच गैर झालेले नाही. फक्त समाजातील संपत्ती कनिष्ठ वर्गाकडे वितरण होऊ शकली नाही.

**गांधीजी 'स्वयंपूर्ण खेडे' ही कल्पना नेहमी आवर्जून मांडत आपल्या भारतातली अर्थव्यवस्था प्रामुख्याने ग्रामीण अर्थ व्यवस्था आहे. गरीबीचे प्रमाणही खेड्यातच अधिक आहे आजची परिस्थिती लक्षात घेता खेड्यात रोजगार नाही कामधंदा नाही, लघुउद्योग-कुटिरोद्योग नाहीत, जमीन नाही आसरा नाही. लक्षावधी भडीन बेकार शेतमजुरांचा प्रश्न सोडविण्यासाठी 'ग्रामीण अर्थव्यवस्थेवर' भर द्यावा असे आपल्याला वाटते काय? ही ग्रामीण गरीबी हटविण्याचे उपाय कोणते?**

☐ माझ्याजवळ ह्या प्रश्नाचे उत्तर नाही. आणि ह्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडे असेल असेही दिसत नाही. हा प्रश्न सोडविण्याकरिता कोणत्याही उपायाचे स्वागतच होईल गांधीजींनी विशिष्ट उपायांचा आग्रह धरला असेही मला वाटत नाही. अन्य उपायांनी जर ग्रामीण गरिबी नाहीशी होत असेल तर गांधीच्या सच्च्या अनुयायाकडून त्याला विरोध होणार नाही. सारांश गांधीजींनी दिशा दाखवली आहे. मार्ग ज्याचा त्याने शोधायचा आहे.

**गांधीजींच्या अर्थशास्त्रावर नीतीशास्त्राचा (Ethics) पगडा आहे. त्यांनी सामाजिकतेवर भर दिला आहे की व्यक्तीवर? त्यांच्या विचाराचे प्रमुख साध्य कोणते?**

☐ गांधीजींच्या साऱ्या विचाराचा रोख व्यक्ती सुधारण्यावर आहे. प्रत्येक व्यक्ती अधिक आत्मनिर्भर, आत्मसंतुष्ट आणि आत्मविश्वासू व्हावी हे प्रमुख साध्य आहे. स्वतःच्या आनंदाबरोबर दुसऱ्यांना आनंद देण्याची जबाबदारी व्यक्तीने स्वीकारली म्हणजे समाज व व्यक्ती ह्यांचे साहचर्य ठीक होते. म्हणजेच व्यक्ती व समाज ह्या दोन्ही सुधारण्याची प्रक्रिया एकाचवेळी सुरू होते. व्यक्तिगत सुखाची ही कल्पना एकदा समजली म्हणजे त्यात स्वातंत्र्य अभिप्रेत होते. एखाद्या व्यक्तीला नव्या वैज्ञानिक शोधामुळे बटन दाबले की प्रत्येक गोष्ट गरजेप्रमाणे मिळू लागली की आनंद होईल. तर दुसऱ्या व्यक्तीला अशा वस्तु आपोआप मिळाल्या तर ते कंटाळवाणे आणि नीरस वाटेल. कारण त्या व्यक्तीला उत्पादन निर्मितीच्या कार्यातला आनंद व त्याकरता घेतलेले श्रम हे सुखदायक असतील. कोणी जगप्रवास करील, निरनिराळी सौंदर्यस्थळे हिंडून पाहील आणि आनंद मिळवील तर थोरोसारखा तत्त्वज्ञ म्हणतो, " I have travelled much in my garden " मी माझ्या बागेत खूप सफरी केल्या आहेत. सारांश प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व किती समृद्ध झाले, संपन्न झाले त्यावर त्याची आत्मतुष्टी अवलंबून असते. म्हणूनच गांधीजी व्यक्तिगत आनंदाला महत्त्व देतात व आपली विचारांची जबरी इतरांवर करू इच्छित नाहीत.

**रोमला झालेल्या अर्थशास्त्रज्ञांच्या परिषदेने जगातील साधनसामग्री संपुष्टात येत असण्याचा धोका दाखवून गरजा कमी करण्याचा सल्ला दिला आहे. ह्यामुळे गांधीजींच्या गरजाविषयींच्या विचारांचा विजय मानावा काय ? गांधीजी साध्या रहाणीला अर्थशास्त्रीयदृष्टया महत्त्व देत असत काय?**

☐ रोमच्या परिषदेतील मुद्दा वेगळा आहे. संपन्न व प्रगत देशांच्या साधनसामग्रीविषयक चिंता हा त्या चर्चेचा प्रमुख रोख आहे. ह्याचा अर्थ कोटयधीश व्यक्तीने आपल्या काही गरजा कमी करणे असा होईल. भारतातील आपला प्रश्न वेगळा आहे गरजा साध्या व आवश्यक असाव्या ह्यातला आग्रह पुन्हा वैयक्तिक आवडीचा आहे त्याचप्रमाणे सामाजिक जाणिवेचाही.

**गांधीजी साधेपणाने राहत ते लोकांना उदाहरण दाखवावे, आचरणाने शिकवावे ह्याकरता काय ?**

☐ लोकांना शिकविण्यासाठी खादी वापरण्यात बुद्धिपुरस्सर डावपेच वा दंभ आहे. गांधीजी खादी किंवा साधे कपडे वापरत ह्याचं कारण ते त्यांना आवडत असत. मनाची संपन्नता मिळवल्यानंतर अशा आवडी बदलणे शक्य आहे. ह्याच पद्धतीने ह्या तत्त्वांचा प्रसार होणे जरूरीचे आहे.

**आर्थिक कार्यक्रमामध्ये वा धोरणामध्ये आपल्या देशाने कोणत्या गोष्टींना अग्रक्रम (Priorities) देणे आवश्यक आहे?**

☐ जोपर्यंत आपल्या देशातील अद्ययावत व्यक्तीच्या अन्नधान्य व किमान मूलभूत गरजा भागू शकत नाहीत तोपर्यंत द्राक्षे उत्पादन करणे व त्यांची दारू करणे हे आपल्यासारख्या गरीब देशाला परवडण्यासारखे नाही ह्यातच आपला अग्रक्रम कसा असला पाहिजे हे निश्चित होते.

**खाजगी मालमत्तेचे दुष्परिणाम कमी करण्याकरता गांधीजींनी विश्वस्त कल्पनेचा पुरस्कार केला आहे, त्याचा व्यापारी वर्गाच्या सदसद्विवेकबुद्धीवर विश्वास होता, खुला बाजार हा भाववाढीला तोडगा आहे असे ते मानत. सध्याच्या जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईबाबत व्यापाऱ्यांच्या हृदयपरिवर्तनाचा मार्ग उचित होईल काय ?**

☐ महात्माजींचा एकूण दृष्टिकोण मानवतावादाचा होता. धनिक, व्यापारी ह्या वर्गाने आपली जबाबदारी ओळखावी. तसेच दुसऱ्या बाजूने भाववाढीला प्रतिबंध करावयाचा असेल तर ग्राहकांना सत्याग्रहाचे शस्त्र उपलब्ध आहेच.

**गांधीजींचा स्वदेशीबद्दलच आग्रह सर्वश्रुत आहे. ह्यापुढे आयात धोरणात बदल करावा काय ?**

☐ सर्वच देश स्वदेशी उद्योगांना सरक्षण देण्याचे तत्त्व मान्य करतात. त्यात नवीन काही नाही. आयात ज्या ज्या वेळी ज्या कारणाकरता केली जाते त्यावर आयात योग्य की अयोग्य हे ठरवले जाते. म्हणूनच ह्यात सध्याच्या धोरणात काही आमूलाग्र बदल करावा लागेल अशी परिस्थिती नाही.

**आर्थिक प्रगतीकरता सत्तेचे विकेंद्रीकरण हा गांधीजींचा विचार कितपत उपयुक्त होईल ?**

☐ ह्या प्रश्नाचे उत्तर विस्ताराने द्यावे लागेल. ह्याकरता आपण पुन्हा एकदा स्वतंत्र चर्चा करू.

**प्रचलित आर्थिक नियोजनपद्धतीत काही सुधारणा सुचवाल काय ?**

☐ त्याविषयीही मी आता काहीच सांगत नाही.

**नव्या सत्तारूढ पक्षाने ' स्वच्छ प्रशासन ' (Clean Adhuiaistration) आणि भ्रष्टाचारनिर्मूलन ह्यांची हमी दिली आहे. त्यात गांधीवादी विचारसरणीचाच प्रभाव आहे काय ?**

प्रशासकाचे सार्वजनिक चारित्र्य निष्कलंक असावे हा सार्वकालिक संकेत आहे. सर्व देशात तो महत्त्वाचा असतो, नव्हे

प्रत्येक शासनाचे हे अनिवार्य कर्तव्य आहे. त्यात काही विशेष करतो असे नाही. भ्रष्टाकार केलाच तर ते विशेष. शासन जर निष्कलंक असेल तर प्रजेला विश्वास वाटतो. मात्र सदाचारी शासनाने आर्थिक समस्या भराभर सुटतील असेही नाही.

**शिक्षणपद्धतीतही आजच्या परिस्थितीत गांधीजींना आदर्शवत वाटणारे परिवर्तन कसे घडवता येईल ?**

प्रथमत: गांधीजींचे हे विविध विचार अलग अलग समजावून घेण्यापेक्षा गांधीजींच्या विचाराचा मूळ स्रोत (Focus)काय आहे ते लक्षात घेतले पाहिजे. गांधीजींच्या विचाराचा गाभा म्हणजे 'अंत्योदय'. सर्वात अधिकात अधिक दीन दलित माणसाला आपल्याकडून काही सुख देता आले काय ह्या प्रश्नाचे उत्तर 'होय' असल्यास आपण गांधींच्या विचारसरणीचा मार्ग अनुसरला असे होईल. गांधीजींनी स्वत:करता ज्या इतर गोष्टी स्वीकारल्या होत्या उदाहरणार्थ पंचा, टकळी, शाकाहार इत्यादी ह्यांची सर्वांना जरुरी नाही. त्या त्यांच्या व्यक्तिगत आवडी होत. आपण त्यांचा विचार-अंत्योदयाचा विचार आचरणात आणला पाहिजे. तो जमला म्हणजे आपल्याला कोणत्या वेळी काय करावयाचे हे सहज समजेल. गांधीजी म्हणत, "I will give you a talisman"; मी तुम्हाला असा एक जादूचा ताईत देतो की तुम्हाला त्यामुळे सर्व प्रश्नांची उत्तरे आपोआप मिळत जातील. तो ताईत आहे: 'अंत्योदयाचा विचार.'

शिक्षण पद्धतीतील परिवर्तनात आपण त्याच विचाराचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. आजच्या शिक्षणातूनही सामाजिक जाणीव असलेला मनुष्य तयार होत नसेल तर नव्या पद्धतीचा विचार आणि प्रयोग केले पाहिजेत. साऱ्या जगात हे कार्य चालू आहे. मध्यंतरी जागतिक ख्यातीचे मेक्सिकन शिक्षणतज्ञ आयव्हानिलविच पुणें विद्यापीठात आले होते त्यांच्या खोलीवर सहज मी गेलो त्या वेळी विश्रांतीच्या वेळी ते एक पुस्तक वाचत होते. ते पुस्तक म्हणजे विनोबांचे शिक्षणविषयक विचार. त्या पुस्तकावरचा अभिप्राय विचारल्यावर ते म्हणाले हे विनोबा म्हणजे अजब गृहस्थ आहेत. मला जें आता सुचतय ते ह्यांनी अनेक वर्षे आधी सांगून ठेवलंय त्यांना सर्व समस्यांची उत्तरे सापडली आहेत. "विनोबांना गांधीजींचा Point of Focus समजला आहे; म्हणून हे शक्य झाले सारांश गांधीजींच्या अंत्योदयाचा विचार आपण लक्षात घेतला तर देशापुढच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक अशा अनेक समस्या आपण सोडवू शकू. आता जर गांधीवादी विचार आम्ही स्वीकारला आहे असे म्हणत असलो तर हा 'फोकस' आपण खरोखर स्वीकारला आहे का ह्याचा अदमास अंतर्मनौलाक विचारून सतत घेत राहिले पाहिजे.

● ● ●



# आशियाई बँकांच्या कार्यपद्धतीत सांस्कृतिक परिवर्तन


**वा. मा. भिडे**

अध्यक्ष व कार्यकारी संचालक

महाराष्ट्र बँक, पुणे.


इंडियन बँकर्स असोसिएशनचे अध्यक्ष ह्या नात्याने भारतीय बँक व्यवसायाचे प्रमुख प्रतिनिधी म्हणून पाकिस्तानमध्ये नुकत्याच साजऱ्या झालेल्या पाकिस्तानी बँकांच्या रौप्य महोत्सवास श्री. भिडे हे उपस्थित राहिले होते. आशियात नव्याने स्वतंत्र झालेल्या विकसनशील राष्ट्रांचे आर्थिक प्रश्न जवळजवळ सारखेच आहेत. सध्याच्या नियोजन कालात, विशेषतः संघटित बँक व्यवसाय, विकास कार्यात जो महत्त्वाचा वाटा उचलत आहे त्या बाबतीत विविध देशातील बँकर्सच्या अनुभवधन, विचारतंत्र, कार्य-पद्धती ह्यात देवाणघेवाण होणे जरुरीचे झाले आहे. विकसनशील आशियाई राष्ट्रांमध्ये भारतातील बँक व्यवसायाने बरीच प्रगती केली आहे. साहजिकच इतर देशातील समव्यवसायी मंडळींना भारतीय बँक व्यवसायाकडून मार्गदर्शन व्हावे असे वाटते. त्या दृष्टीने श्री. भिडे ह्यांनी व्यक्त केलेले विचार ह्या लेखात आहेत.

---

पाकिस्तानच्या इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स ह्या संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त ह्या आनंदाच्या क्षणी सहभागी होण्याचा मला लाभ मिळाला ह्यामुळे धन्यता वाटते. ह्याच प्रसंगी माझ्या वतीने तसेच भारतातील सर्व बँकर्सच्या वतीने मी पाकिस्तानी बँकर्सना आमच्या शुभेच्छा प्रदान करतो. पाकिस्तानी बँकांचे राष्ट्रीयीकरण डिसेंबर १९७३ मध्ये झाल्या-पासून त्या देशातील बँक उद्योगाची प्रगती लक्षणीय झाली आहे. पाकिस्तानी बँका आर्थिक विकसनाकरिता तसेच सर्व-सामान्य नागरी कल्याण कार्यासाठी प्रभावी कामगिरी पार पाडतील अशी आमची सर्वांची अपेक्षा आहे.

भारत पाक ह्यांच्या सन्निध दोन्ही अंगाला, नव्याने आकार घेत असलेले अनेक लहान विकसनशील देश आहेत. पश्चिमेस कुवेत, अफगाणिस्तान, इराण, अरब राष्ट्रे; तर पूर्वेस ब्रह्मदेश, थायलंड, व्हिएटनाम, कंबोडिया, इंडोनेशिया, सिंगापूर, कोरिया इत्यादि प्रमुख राष्ट्रे आपल्या बरोबरीने विकासाची वाटचाल करीत आहेत. १९७१ च्या मध्याला घेतलेल्या जनगणनेनुसार ह्या सलग भूभागात जगातील एकूण लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक प्रजा राहाते. पण त्याचबरोबर ह्याच भागात दारिद्र्य रेषेच्या आसपास असलेले लोकसंख्येचे प्रमाणही बरेच जास्त आहे.

ह्या सर्व राष्ट्रातील बँकात ठेवीच्या रूपाने पैसा बचत करू शकणाऱ्या लोकांचे प्रमाण अत्यल्प आहे. म्हणूनच बँकिंगचा इतिहास लक्षात घेता ह्या देशातील बँका देशातील सधन, बडया प्रतिष्ठित लोकांना सेवा देण्याकरताच प्राधान्य देत राहिल्या. बँकांचा ग्राहकवर्ग (Customers) ज्या प्रकारचा त्याला अनुरूप बँकांच्या कार्याचे स्वरूप राहाणे हे स्वाभाविक होते. पण

त्याचबरोबर स्वातंत्र्यपूर्व काळात ह्या देशांच्या अर्थव्यवस्थेत असलेल्या रचनेमुळे बँकांनी अप्रत्यक्षरित्या श्रमिक व सामान्य माणसांच्या आर्थिक शोषणालाच हातभार लावला असे दिसते. सामान्य माणसांच्या तसेच ग्रामीण लोकांच्या बचतीतून जे भांडवल तयार झाले ते शहरी औद्योगिकरणाकरिता तसेच धनिक वर्गाकडे उत्पन्न अधिक प्रमाणावर संक्रमण करण्याकरता वापरले गेले. ह्या साऱ्या देशात सर्वसाधारणपणे एक गोष्ट आढळते ती ही की बहुसंख्य लोकांना बँकेकडून मिळणारे कर्ज वा इतर साहाय्य दुर्लभ आहे. परिणामी ह्या गरीब सामान्य लोकांना कर्जपुरवठा करणाऱ्या इतर संस्थांकडे धाव घेण्याखेरीज इलाज नसतो. सावकार, खेड्यातले व्यापारी, दलाल, गहाणावर धंदा करणारे अशा अनेक लोकांकडून ह्या राष्ट्रातील शेतकरी, ग्रामीण आणि शहरी मध्यमवर्गाचे प्रचंड प्रमाणावर शोषण होत राहिले आहे.

गेल्या २०–३० वर्षात ह्या देशात स्वातंत्र्य आले, लोकसत्ताक राज्ये आली, वसाहतींवरील असलेले राजकीय व आर्थिक वर्चस्व संपले समाजवाद विकास व आर्थिक कल्याण ह्या सामाजिक उद्दिष्टांचे महत्त्व वाढले ह्या कारणांनी व्यापारी बँकांचा देशाच्या विकसन कार्यात अधिक चांगला उपयोग करून घ्यावा ह्या विचाराला चालना मिळाली. सामाजिक न्यायानुसार आतापर्यंत उपेक्षित असलेल्या लोकांना आणि प्रदेशांना आर्थिकदृष्टया समर्थ करण्याकरता बँकांचे माध्यम वापरणे इष्ट वाटू लागले. परंपरागत बँकांच्या कार्यपद्धतीत क्रांतिकारक बदल घडविणे अपरिहार्य झाले. बडे व्यापारी, कारखानदारी समूह व धनिक जमीनदार कुटुंबे इत्यादी मूठभर निवडक हितसंबंधी लोकांपुरता बँकिंगच्या सेवांचा व्याप मर्यादित राहिला नसून बँकांचा देशविकासाच्या कार्यात उपयोग करावा हे निकडीने वाटू लागले आहे

ह्या सर्व देशात चलनवाढ, भाववाढ, साठेबाजी, काळाबाजार, मक्तेदारी, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण, आजारी उद्योग तसेच बेकारी ह्या समस्या उग्र झाल्याकारणाने व्यापारी बँकांचे नियमन करणारे कायदे अधिक प्रमाणावर करूनही फारशी समाधानकारक स्थिती न झाल्यामुळे बँकांवरील सामाजिक नियंत्रण वा राष्ट्रीयीकरण हे पर्याय जरुरीचे झाले. ह्याचे प्रमुख कारण म्हणजे बँकांमधील वित्तीय अनुशासनाचा अभाव.

ग्रामीण भागात बँक कार्यालयांचे जाळे विणणे, बँकांच्या कार्याचा प्रसार, सेवेचा दर्जा सुधारणे, प्रादेशिक विषमता नष्ट करणे, उपेक्षित क्षेत्रांना अर्थसहाय्य करून त्यांची उन्नती करणे, शेती, लघुउद्योग इत्यादी क्षेत्रांना विकासाला गती देण्याच्या दृष्टीने अग्रक्रम देणे, भांडवलाची उत्पादक कार्यात गुंतवणूक करणे, नाणेबाजार व भांडवली बाजाराचे आधुनिकीकरण करणे आणि ह्या व तत्सम सर्व उपायांनी आर्थिक प्रगतीला वेग देणे ह्या उद्दिष्टांना बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यावर महत्त्व देणे उचितच होते.

राष्ट्रीयीकरण, तसेच सामाजिक नियंत्रण ह्या तत्त्वांमुळे बँकिंग क्षेत्रात फार मोठी क्रांती होऊ लागली आहे हे निश्चित. आधुनिक काळातल्या बँका सुरक्षिततेच्या आधारे कर्ज देणाऱ्या पतसंस्था नसून सामाजिक आवश्यकतेनुसार साहाय्य करणाऱ्या मार्गदर्शक मित्रसंस्था आहेत. त्या केवळ व्याज व मुद्दल वसूल करणाऱ्या सावकारी संस्था नसून, लघुउद्योगात वा व्यापारात समान जबाबदारी उचलणाऱ्या भागीदार (Partners) आहेत. त्या कर्ज देणाऱ्या संस्था नसून कर्जाचा विनियोग योग्य प्रकारे कसा करावा ह्याचे तांत्रिक मार्गदर्शन करणाऱ्या सल्लागार संस्था झाल्या आहेत. त्या कारणाने, बँकर्स वर्गाची जबाबदारी अधिक अवघड झाली आहे. बँकरला ह्या काळात अष्टावधान हवे व अष्टपैलुत्वही हवे. ज्या परिसरात ता कार्य करतो त्या ठिकाणीची नैसर्गिक परिस्थिती, पीकपाणी, सुप्त संपत्ती, साधनसामग्री लोकजीवन इत्यादी गोष्टींचे त्यास यथार्थ ज्ञान हवे. त्याचा ग्राहकवर्गही आता विभिन्न स्वरूपाचा आहे. त्यात सुप्रतिष्ठित कारखानदार, व्यापारी, व्यावसायिक, जमीनदार हे तर आहेतच पण त्यांच्या बरोबरीने बुद्धिवंत, तरुण तंत्रज्ञ, प्रयोगशील लघुउद्योजक, सुशिक्षित बेकार, किरकोळ दुकानदार तसेच भूहीन शेतकरी इत्यादीही समाविष्ट झाले आहेत. नव्या बँकरला जमाखर्च, हिशोब, ताळेबंद, बँकांची सुरक्षितता, लाभदायकता ह्या गोष्टींबरोबरच नव्याने रुजणाऱ्या उद्योगधंदे व्यवसाय ह्यांचे अचूक ज्ञान असणे आवश्यक आहे. उत्पन्न, रोजगार व उत्पादन वाढविणाऱ्या प्रकल्पांना योग्य वेळी व योग्य तितके साहाय्य केल्यास बँकर देशाचे दारिद्र्य हटवू शकतो व पर्यायाने बँकेमधील ठेवी वाढवू शकतो. म्हणूनच त्याला अतिशय उच्च दर्जाची व्यवस्थापकीय कार्यक्षमता असणे अगत्याचे झाले आहे. आपल्या हाताखालच्या सहकाऱ्यांना योग्य तो चेतना देऊन त्यांचेकडून बँकेविषयी आपुलकी निर्माण करणे हेही कौशल्य त्यास हवे. प्रगत देशातील बँकरपेक्षाही आशियातील आपल्यासारख्या विकसनशील देशातील बँकर्सचे कार्य अधिक गुंतागुंतीचे व अवघड आहे.

आपण साऱ्यांनी हे आव्हान स्वीकारले पाहिजे. गेल्या ३–४ वर्षांत बँकांच्या कार्याचा विस्तार आपल्या देशात प्रचंड प्रमाणावर वाढतो आहे. भारतातील राष्ट्रीकृत वा सरकारी बँक कार्यालयांची संख्या राष्ट्रीयीकरण झालें त्या वेळी ६,६३३ होती. ती संख्या मार्च १९७६ मध्ये १६,४९९ वर गेली आहे. बँक कर्मचाऱ्यांच्या संख्येत पावणेदोन लाखावरून पावणेचार लाखापर्यंत वाढ झाली. ह्या सुमारे चार लाखांमध्ये अधिकारी वर्गाची संख्या ६७,००० आहे. ह्या साऱ्यांना अल्प काळात प्रशिक्षित करण्याचे कार्य कठीण आहे. तूर्तास आमच्या देशात १६ प्रशिक्षण महाविद्यालये आणि ११० शिक्षण केंद्रे आहेत. त्यात २३,००० अधिकारी आणि ३३,००० कर्मचारी ह्यांना प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देता येणे शक्य आहे. राष्ट्रीयीकरणानंतर ह्या कार्याचे महत्त्व अधिक आहे. पाकिस्तानमध्येही राष्ट्रीकृत बँकांच्या कार्यालयांची संख्या सुमारे ५,००० झाली आहे. आपणा सर्वांना प्रशिक्षण केंद्रांची पुनर्रचना करणें आवश्यक आहे.

नव्या स्वरूपाचा ग्राहकवर्ग असल्यामुळे बँकिंग कार्यपद्धतीतही आवश्यक ते बदल करणे जरुरीचे आहे. ह्याकरता मध्यवर्ती बँका, वित्त मंत्रालय ते देशातील कायदेकानू व शासकीय रूढ रिवाज ह्यांच्या निर्बंधात जरूर ते फेरफार करावे लागतील. आधुनिक गरजा लक्षात घेऊन विशेषीकरणावर भर देणाऱ्या बँकांची निर्मिती झाली पाहिजे. उदाहरणार्थ इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँका, अॅग्रिकल्चर डेव्हलपमेंट बँका, फायनान्स कॉर्पोरेशन्स, क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन इत्यादी. त्याचबरोबर डोंगरी, अशिक्षित, निराधार, भटके, छोटे छोटे कामधंदे करणारे लोक ह्या सर्वसामान्यांना सहाय्य करण्याकरता विविध प्रकारच्या कार्यशाखा सुरू करणेही आवश्यक झाले आहे.

आपल्यासारख्या विकसनशील देशांचे आर्थिक प्रश्न समान आहेत. सहाजिकच आपल्या बँकांची उद्दिष्टेही समान असावीत. तथापि आपल्या उद्दिष्टांनुसार आपण योजलेल्या कार्यपद्धतीत देशपरत्वे भिन्नता असू शकेल. आपले सर्वांचे प्रयोगशील प्रकल्प आणि जमवलेले अनुभवधन ह्यांची आपण देवाणघेवाण करणे आपल्याला लाभदायक होईल. इतरांनी केलेल्या यशस्वी योजनांचे अनुकरण आपल्या विकासाचा मार्ग ठरविण्याकरिता उपकारक होईल. अर्थात् त्या योजनांमध्ये देशातील परिस्थितीनुसार सुसंगत असे फेरबदल करणेही उचित होईल. आशियाई विकसनशील देशातील बँकर्सनी अशा प्रकारचे सहकार्य निर्माण करण्यात पुढाकार घेतला पाहिजे.

●●●

# सेमिस्टर पद्धत :

## ( अमेरिकन आणि भारतीय )

प्रा. डॉ. बी. के. काळे
गणित व संख्याशास्त्र विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे ७.

अमेरिकेत बरीच वर्षे स्थायिक झालेले सुविख्यात संख्याशास्त्रज्ञ डॉ. बी. के. काळे हे कॅनेडियन विद्यापीठातून पुणे विद्यापीठात काही काळ प्राध्यापक विनिमय योजनेनुसार ( Teacher Exchange Programme ) पुण्यात नुकतेच आले आहेत. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्रातल्या विद्यापीठात व संलग्न कॉलेजात सेमिस्टर पद्धत सुरू होत आहे. त्या दृष्टीने या पद्धतीचा काळजीपूर्वक विचार होणे अगत्याचे आहे. ह्या पद्धतीमुळे आर्थिक ताण प्रामुख्याने जास्त प्रमाणावर सोसावा लागेल. वेळीच त्या दृष्टीने विद्यापीठांनी तरतूद करणे आवश्यक आहे. अन्यथा ते केवळ एक ' सोंग ' होईल.

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पातळीवर 'अध्यापनसत्र पद्धती' ( semester system ) गेल्या २–४ वर्षांपासून सुरू झाली आहे. पदवी देणाऱ्या महाविद्यालयात, तसेच पदवीपूर्व उच्च माध्यमिक प्रशालांमध्ये आणि कालांतराने माध्यमिक शाळांमध्येही ही पद्धति चालू करावी अशी सध्याची 'हवा' आहे. पदवी परीक्षेचे अभ्यासक्रम सत्रपद्धतीने येत्याच शैक्षणिक वर्षापासून म्हणजे जुलै १९७७ पासून पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात सुरू होत आहेत. एम. ए. विभाग १ ला ह्या वर्षाकरिता ही पद्धती तसेच प्रश्न बँकेची पद्धत १९७६–७७ ह्या वर्षी राबविली गेली आहे. प्रत्येक आठवड्याला एक अंतर्गत चाचणी ( internal test ) घेतली असून अशा दहा चाचण्यांचे मार्क विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेच्या मार्कात मिळविले जात आहेत. एम्. ए. ला सुरू केलेली ही सत्र पद्धत म्हणजे पूर्वी पदवीपूर्व वर्गाला असलेल्या अंतर्गत चाचणी, स्वाध्याय ह्यांच्या पद्धतीचीच नवी आवृत्ती आहे. सध्या राबविण्यात येत असलेली सत्रपद्धत ही संकरित ( hybrid ) आहे. पूर्वीची परीक्षा पद्धत पूर्णपणे हद्दपार झालेली नाही. ती प्रत्येक परंपरेप्रमाणे आमच्या शिक्षणपद्धतीशी एकजीव झाली आहे. परीक्षापद्धतीला विराम द्यावा असे धैर्य सहजासहजी होत नाही. त्याचबरोबर सत्रपद्धतही पाश्चिमात्य विधीप्रमाणे षोडषोपचाराने सुरू झाली आहे.

ह्या पार्श्वभूमीवर पश्चिमी देशात ही पद्धत कशा प्रकारे राबविली जाते त्याचा खोल अभ्यास शिक्षण क्षेत्रातील लोकांनी करणे अगत्याचे आहे. ह्या दृष्टीने प्रस्तुत लेखकाने उत्तर अमेरिकन विद्यापिठातील आपल्या अनुभवावर आधारलेले परीक्षण देण्याचे ठरविले आहे.

आपल्या विद्यापीठांनी कोणते निश्चित धोरण ठरवावे हे समजून घेण्यासाठी काही प्रत्यक्ष उदाहरणांचा मदत घेता येईल. भारतातल्या विद्यापीठांना सत्रपद्धत सर्वार्थाने खरीखुरी राबवायची असल्यास बऱ्याच व्यावहारिक अडचणी आणि आर्थिक मर्यादा भासतील हे सर्वप्रथम लक्षात घेणे जरुरीचे आहे.

समजा आपल्याकडील ज्या विद्यापीठात आर्टस व सायन्स विद्याशाखांबरोबरच इंजिनिअरिंग, कॉमर्स, अॅग्रिकल्चर, मेडिसिन, आर्किटेक्चर इत्यादी व्यावसायिक विद्याशाखांचे विविध अभ्यासक्रम आहेत. ह्या सर्व ठिकाणी मॅथेमेटिक्स वा अर्थशास्त्र ह्यासारखे सर्व विद्याशाखांना आवश्यक वाटणारे विषय शिकवायचे असतील तर ह्या विषयांचे मूलभूत माहितीचे ( foundation courses ) अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक आहे. अर्थशास्त्र आर्टसला आहे, कॉमर्सला आहे, मॅनेजमेंटला आहे, अकौंटसीला आहे, इंजिनिअरिंगला आहे, होम सायन्सला आहे, अलिकडे सायन्स फॅकल्टीनेही सुरू केले

आहे. मात्र प्रत्येक विद्याशाखेच्या वेगवेगळ्या वर्षाकरता नेमलेला अर्थशास्त्राचा अभ्यासक्रम भिन्न आहे. अमेरिकन विद्यापीठात अशा प्रकारची विविधता कमी करून फाउंडेशन कोर्सनंतर ज्याला अर्थशास्त्रातच विशेषीकरण करावयाचे आहे त्याला, पुढील उच्च स्तराचे अभ्यासक्रम दिले जातात. ह्याचा अर्थ बऱ्याच विद्याशाखांमध्ये शिकविला जाणारा अर्थशास्त्राचा वा गणिताचा सुरवातीचा अभ्यासक्रम हा एकच ठेवला जातो.

अमेरिकन विद्यापीठात सत्रपद्धत कशी चालते ते जास्त तपशीलवार समजून घेऊ. शैक्षणिक वर्ष सप्टेंबरमध्ये सुरू होऊन मे मध्ये संपते. त्याचे दोन भाग केलेलें असतात. त्या प्रत्येक भागाला एक शैक्षणिक सत्र (semester) म्हणतात. प्रत्येक सेमिस्टर १५ आठवड्यांचे असते. प्रत्येक अभ्यासक्रमावर एका आठवड्यात तीन तासांची व्याख्याने असतात. म्हणजेच एका अभ्यासक्रमाला एका सत्राकरता ४५ तास उपलब्ध होतात. एका सत्रात ५ अभ्यासक्रम विद्यार्थ्यास पूर्ण करावयाचे असतात. ह्याचा अर्थ विद्यार्थ्याला ५ विषयांचा एका सहामाहीत अभ्यास पुरा करावयाचा असतो व त्याकरता आठवड्यात प्रत्येक विषयाला १ ह्याप्रमाणे ५ अभ्यासक्रमांच्या १५ व्याख्यानांची उपस्थिती आवश्यक असते. वर्षात एकूण ९० व्याख्याने असतात. बी. ए. अथवा बी. एस्. सी. ह्या दोन्ही पदव्या अमेरिकेत सर्वसामान्य (General) गणल्या जातात. ह्या पदव्यांना व्यावसायिक पदवी अथवा विशेष प्राविण्याच्या पदवीचा दर्जा दिला जात नाही. बी. ए. पर्यंत एखाद्या विद्यार्थ्याचा प्रमुख विषय असला तरी त्याला अर्थतज्ज्ञ मानले जात नाही. व्यावसायिक अर्थतज्ञ (Professional. Economist) म्हणून प्राविण्य मिळविण्याकरिता बी. ए नंतरचे उच्च शिक्षण व त्यानंतरचे पदव्युत्तर संशोधन आणि प्रशिक्षण ह्या पायऱ्या पार कराव्या लागतात. त्या दृष्टीनेच बी. ए. पर्यंतचे अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम ठरविले जातात. पदवीपूर्व वर्गातील विद्यार्थ्यांपैकी सर्वसाधारणपणे १०।२० टक्केच विद्यार्थी एम्. ए. व एम्. एस्सी. पर्यंत जातात. त्या दृष्टीने अर्थशास्त्राचा वा गणिताचा वा विज्ञानाचा पदवीपूर्व अभ्यासक्रम हा उगीच बोजड केला जात नाही. ज्याला अर्थशास्त्रज्ञ व्हायचेच नाही त्या विद्यार्थ्यावर अवाजवी जुलूम नको असा विचार केला जातो.

अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांकरिता वा अन्य कोणत्याही विषयात विशेषीकरण (Specialization) करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या विषयांचे स्वतंत्र सखोल अभ्यासक्रम पदवी पातळीवर शिकविले जातात. त्या दृष्टीने ४ सेमिस्टरचा कार्यक्रम असतो. पहिल्या दोन सेमिस्टरमध्ये संकल्पना व सिद्धांत व उरलेल्या दोन सेमिस्टरमध्ये सौक्ष्मिक आणि सांकलिक अर्थशास्त्रीय सिद्धांतन या विषयांचे दोन पेपर्स नियुक्त केलेले असतात. ह्या ४ पेपर्सना कोअर कोर्स (core course) समजले जाते. ह्याचप्रमाणे गणितशास्त्राच्या ४ सेमिस्टरची आखणी असते. त्यात दोन कॅल्क्युलसची आणि उरलेली दोन लिनिअर अल्जिब्रा अशी ४ सेमिस्टर मिळून एक कोअर कोर्स होतो. गणिताला ऐच्छिक विषय म्हणून भूमिती, नंबर थिअरी, प्रॉबेबिलिटी इत्यादि विषय दिले जातात. ह्या पाठीमागची दृष्टि अशी आहे की, प्रत्येक विभागाने आपल्या विषयाची व्याप्ती आणि त्याला अनुषंगिक अभ्यासक्रम निश्चित अशा रीतीने करावा की जे कोअर कोर्सेस इतर विषयाच्या विद्यार्थ्यांनाही आवश्यक आहेत. त्या विद्यार्थ्यांसमवेत सर्वांनाच एकाच वेळी त्या अभ्यासक्रमाचा लाभ व्हावा. कॅनडातील विद्यापीठात मॅथेमॅटिक्स शिकविले जाताना ते गणिताच्या विद्यार्थ्यांबरोबरच फिजिक्स, केमिस्ट्री, सोशल सायन्सेस, कॉमर्स, इंजिनिअरिंग, अॅग्रिकल्चर ह्या विविध विषय आणि विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांनाही शिकता येते. ह्या सर्व शास्त्रांना जेवढी गणिताची मदत आवश्यक असते तितके गणित 'फाऊंडेशन कोर्सेस' मधून करून घेतले जाते. ह्या साऱ्यांना उपयुक्त होईल असा एकच कोर्स तयार करणे हे काम गणित विभागाच्या प्राध्यापकांना करावे लागते. त्यामुळे त्यांना आंतरविभागीय (inter departmental) सहकार आवश्यक वाटतो. कोर्सेस तीन प्रकारचे असतात. मेजर (प्रधान), मायनर (गौण) आणि सर्व्हिस (सेवाभावी) ह्या प्रत्येक प्रकारच्या कोर्सच्या सेमिस्टरमध्ये मात्र समान म्हणजे ४० व्याख्याने (एक तासाचे पिरिअडस) असतात.

पूर्ण वेळच्या विद्यार्थ्याला दर आठवड्यातील १५ अध्यापनाच्या तासांना उपस्थिती आवश्यक असते. शिवाय १ किंवा २ तास घरचा स्वाध्याय व अभ्यास. ह्याचा अर्थ दर आठवड्याला ४०–५० तास विषयाचे अध्यापन करावे लागते. सेमिस्टर पद्धतीचा मूळ जोर जो आहे तो प्रत्यक्ष नियमितपणे अभ्यास करून घेण्यावर. विद्यार्थ्याची प्रगती मोजताना त्याने घरून करून आणण्याचे स्वाध्याय (Take Home Assignments) वर्गातील उपस्थिती, वर्गातील सेमिनार इत्यादीत भाग घेणे, वर्गात घेतलेल्या चाचण्या, सत्राच्या शेवटी लिहावयाचा एक पेपर (प्रबंध), एखादा स्वतंत्र प्रकल्प (Project) आणि अंतिम लेखी परीक्षा, त्या परीक्षेनंतरही एक मौखिक

(Vivo voce) ह्या साऱ्या गोष्टींचा विचार केला जातो. जो शिक्षक सेमिस्टर कोर्स घेतो त्यालाच परीक्षा घेण्याचा व सत्रातील कामाचे मूल्यमापन करण्याचा संपूर्ण अधिकार असतो. ४० टक्के गुण सत्रातील कामाला आणि ६० टक्के गुण अंतिम परीक्षेकरता असा भर दिला जातो. सर्व अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्न विचारायचे हा जो आपल्या परीक्षापद्धतीत भर असतो तसा सेमिस्टरमध्ये नाही. फायनल परीक्षेचा पेपर म्हणूनच फक्त दोन तासाचा असतो आणि त्याकरता अभ्यासक्रमातला काहीच भाग अध्यापकाच्या इच्छेनुसार घेतला जातो. सत्र चालू असताना पुस्तके उघडून पेपर लिहिण्याची स्वाध्याय पद्धत काही वेळा वापरली जाते. तसेच प्राध्यापक अभ्यासक्रमावरील टिपणेही (Notes) देतात. दर व्याख्यानाच्या अगोदर व्याख्यानसारांश दिले जातात. ह्या साऱ्या गोष्टी काटेकोरपणे राबविल्या गेल्या तरच सत्र पद्धतीचे लाभ मिळू शकतात.

अभ्यासक्रमावरील प्रश्नपत्रिका देताना विद्यार्थ्याला नियुक्त अभ्यासविषय समजला आहे की नाही ह्यावर, तसेच त्याला अनुषंगून एखाद्या प्रश्नाचे स्वतंत्रपणे उत्तर शोधता येते की नाही (Problem Solving) ह्या गोष्टीवर प्रामुख्याने भर दिला जातो पुस्तक पाठ करणे, लेक्चर नोटस जशाच्या तशा उतरवून काढणे ह्याना उत्तेजन दिले जात नाही. स्वतंत्रपणे स्वतःचा विचार करण्याची कुवत निर्माण करून देण्याच्या दृष्टीने ह्या शिक्षणपद्धतीत अध्यापक व विद्यार्थी ह्यांच्यात वैयक्तिक जवळिक वाढवावी लागते त्या दृष्टीने दर २०–२५ विद्यार्थ्यांच्या तुकडीला एक अध्यापक असे प्रमाण ठेवले जाते. स्वाध्याय, चाचण्या, टिपणे इत्यादी कामे विद्यार्थ्यांकडून करून घेण्याकरता प्राध्यापकाला सहाय्यक (Tutors) घेता येतात. सामान्यत: पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांकडे हे काम सोपविले जाते. ह्या तरुण विद्यार्थ्यांची नियुक्ति अंडरग्रॅज्युएट व पोस्टग्रॅज्युएट पातळण्याचा सुसंवाद साधणारा तसेच प्राध्यापक व नवशिके विद्यार्थी ह्यांना एकत्र आणणारा दुवा ठरतो. भारतातल्या अनेक हुशार विद्यार्थ्यांना ह्या स्वरूपाची संधी मिळाल्याकारणाने अनेक विद्यार्थ्यांना उत्तर अमेरिकेतील विद्यापीठात त्यांचे पदव्युत्तर शिक्षण व संशोधन पुरे करता आले आहे.

सेमिस्टर कोर्सच्या शेवटी विद्यार्थ्याला ग्रेड (श्रेणी) दिली जाते A उत्तम, B चांगला, C म्हणजे पास, D काठावरचे काम तर F म्हणजे नापास. विद्यार्थ्याला सी किंवा त्यापेक्षा चांगली श्रेणी मिळाली तर सारे काही सुरळीत चालते. ज्या विषयात डी मिळतो त्या विषयाचे पुढचे (Advance) कोर्सेस करावयास मात्र अनुमती मिळत नाही. उदाहरणार्थ एखाद्या विद्यार्थ्याला मायक्रो/मॅक्रो इकॉनॉमिक्स मध्ये डी मिळाल्यास त्याला नॅशनल इकॉनॉमी, मॉनेटरी थिअरी इत्यादी पुढचे कोर्सेस घेता येत नाहीत. त्याच प्रमाणे कॅलक्युलसमध्ये डी मिळाल्यास स्टॅटिस्टिकल थिअरी, मेकॅनिक्स, मॅथेमेटिकल इकॉनॉमिक्स घेता येत नाही. बरेच डी किंवा एफ् मिळाल्यास त्या विषयांचे कोर्सेस सोडून द्यावे लागतात एखाद्या सत्रात एका विषयात एफ् मिळाल्यास दुसऱ्या सत्रात पास होणे आवश्यक असते. डी वा सी मिळेतो पर्यंत त्या विषयाची पदवी दिली जात नाही. आपल्याकडे एका सत्रात विषय राहिल्यास तो पुढच्या सत्रात चालू ठेवता येतो. त्यामुळे नियमितपणे काम करून घेण्याचा मूळ हेतु पराभूत होतो. काही चतुर विद्यार्थी पुढच्या सत्रातल्या १ महिन्याच्या अभ्यासातच राहिलेला पेपर पास होऊ शकतात. ह्याचा अर्थ संबंध वर्षभर दोन्ही सत्रात नियमितपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला अप्रत्यक्षरित्या निरुत्साही केले जाते. त्या दृष्टीने एका सत्रात पूर्ण पास झाल्याखेरीज पुढच्या सत्राला बसू देण्याची अनुमती देणे ही सेमिस्टर पद्धतीच्या दृष्टीने गंभीर गोष्ट आहे. थोडक्यात म्हणजे अमेरिकन सेमिस्टर पद्धतीत ATKT (Allowed to keep terms) नाही.

पण कच्च्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये ह्या दृष्टीने कोअर कोर्सेस संबंध वर्षभर चालूच राहतात. उदाहरण द्यायचेच तर कॅलक्युलस विषयाचे चार कोर्सेस म्हणजे M 121, M 122, M 221 व M 222 हे गणितप्रधान विषय (Major) घेणाऱ्यांकरता आहेत. फिजिक्स प्रधान घेतलेल्या विद्यार्थ्याला M 121 व M 122 हे फाउंडेशन कोर्स म्हणून जरुरीचे असतात. ते व कोर्स इंजिनिअरिंग विद्याशाखेला सर्व्हिस कोर्स म्हणून उपयुक्त आहेत. M 121 हा फर्स्ट कॅलक्युलस कोर्स M 122 च्या अगोदर आवश्यक असतो. ऑक्टोबरमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या M 121 ह्या कोर्सच्या विद्यार्थ्याला हिवाळ्यातील विशेष (Special) सेमिस्टरमध्ये तो पास करून घेता येईल. M 121 व M 122 झाल्याखेरीज M 221 व 222 करता येत नाहीत. म्हणूनच उन्हाळी सुटीत ह्या विषयांचे कोर्सेस चालूच ठेवण्यात येतात. ह्याचा अर्थ कॅलक्युलस पहिला कोर्स वर्षातून तीनदा किंवा चारदा चालू ठेवण्याकरता मॅथेमेटिक्स विभागाला तरतूद करावी लागते. उन्हाळी सुटीतली सत्रे (Summer Schools) हा अमेरिकन विद्यापीठातल्या सेमिस्टर पद्धतीचा स्थायी भाव झाला आहे.

ह्या सत्रांचा उपयोग शाळांतल्या शिक्षकांनाही करून घेता येतो. अर्ध वेळ (नोकरी करून शिकणाऱ्या) विद्यार्थ्यांनाही ह्या सत्रांचा लाभ होतो. हे सत्र जून ते ऑगस्ट भरवले जाते. त्याचे दोन भाग प्रत्येकी ६ आठवड्यांचे असतात. आठवड्याला अध्यापनाचे ७॥ तास आणि घरचे १०–१२ तास असे १५ तासांचे काम दिले जाते. मात्र ४ कोर्सेसपैकी फक्त २ च घेता येतात.


एम्. ए., एम्. एस्सी. ह्या उच्च अभ्यासक्रमाकरिता हीच पद्धत असते. एका सत्रात ३६ तास व त्यानंतर एक लेखी परीक्षा असते. त्याला पर्याय म्हणजे २४ व्याख्यानांची उपस्थिती व सत्राला एक प्रबंध लिहून देणे. परीक्षेचा एक अभिनव प्रकार म्हणजे १ पेपर अभ्यासक्रमावरचा तर एक पेपर अभ्यासक्रमाच्या कक्षेबाहेरचा असतो. परीक्षेच्या प्रश्नात ऐच्छिक प्रश्नांचे प्रमाण अगदी कमी असते. (Option) त्यामुळे परीक्षेची कसून तयारी करणे जरुरीचे असते. डॉक्टरेटच्या प्रबंधातही गडबडगुंडा करण्यास वाव नसतो. लिहिलेला विषय कितपत समजून लिहिला आहे हे मूल्यमापन करण्याकरता तज्ज्ञांशी मौखिक परीक्षेत चर्चा करावी लागते

सेमिस्टर पद्धतीची अध्यापन बाजू लक्षात घेऊ प्राध्यापकाला वाजवीच काम दिले जाते. दर आठवड्याला ६ ते ९ व्याख्याने, शिवाय संशोधन, वाचन आणि प्रशासन ही कामे असतातच. उन्हाळी सत्रात शिकवावे लागले तर वेगळे वेतन दिले जाते. स्वाध्याय, टर्म वर्क इत्यादी करून घेण्यासाठी भरपूर सहाय्यक असतात. अशा रीतीने सेमिस्टर पद्धत भारतातल्या विद्यापीठात राबवायची असल्यास प्राध्यापक, सहाय्यक, ट्यूटर्स हे तर नेमावे लागतीलच पण टिपणे, व्याख्यानसारांश, विविध चाचण्या, परिसंवाद, प्रवास अशा अनेक प्रकल्पांमुळे शिक्षण संस्थांचा खर्च जबरदस्त वाढेल. १ प्राध्यापक २० विद्यार्थी हे प्रमाण साधण्याकरता प्राध्यापकांची संख्या प्रचंड लागेल. आपल्याकडे लिबरल एज्युकेशनमुळे ग्रामीण भागातही कॉलेजांचा झालेला प्रसार ह्या कारणाने विद्यार्थ्यांची संख्या वाढती आहे. आपल्याकडे संख्यात्मक शिक्षणाचे महत्त्व आहे. सर्वांनाच विश्वविद्यालयीन पदवी नोकरी व प्रतिष्ठेकरता हवी आहे. पदवी आणि पदवीनंतरची मास्टर पदवी ह्या किमान आवश्यक सामाजिक गरजा झाल्यामुळे गुणवत्तेचा आग्रह गौण होतो. ह्या उलट अमेरिकन विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी विद्येच्या वा विषयाच्या आवडीनेच अभ्यासक्रम निवडतात. पदवी गुणवत्तेच्या आधारे द्यावी हा आग्रह असतो. त्यामुळेच कॉपी करणे, परीक्षेत येनकेन प्रकारे यश मिळविणे ह्याला विद्यार्थी जगतात प्रतिष्ठा नाही. अमेरिकन समाजात असलेल्या आर्थिक समृद्धीमुळे नोकरी व चांगला पगार मिळविणे ही विद्येशिवाय मिळू शकणारी गोष्ट आहे. म्हणून शिक्षण क्षेत्रात खरा रस असलेले व्यासंगी (Serious) विद्यार्थी आपले जीवनव्यवसाय निवडण्यासाठी विद्यापीठात येतात. पेपर फुटणे, वशिलेबाजी, लाच घेऊन ग्रेड देणे इत्यादी गोष्टींना तेथील सधन प्राध्यापक सहसा मोहवश होत नाही. आर्थिक सुबत्तेमुळे विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके, संदर्भ पुस्तके, स्वतःचे ग्रंथालय, अभ्यासिका, वाहन चांगला आहार, राहाणीमान व विश्रांती मिळू शकते. झेरॉक्सिंग (नकला करण्याचे यंत्र) स्वस्त असल्यामुळे त्याला टिपण काढणे व संदर्भ उतरविणे सोपे जाते. ह्याशिवाय टेप इत्यादी साधने आहेतच. कॉलेजांची ग्रंथालये सकाळी ७ वाजलेपासून उघडी असतात. ओपन स्टॅक पद्धती असल्यामुळे कोणतेही पुस्तक निवडायला संधी मिळते. सायक्लोस्टाइल टिपणे व्याख्यानापूर्वी मिळतातच.

हा परिस्थितीशी तुलना करताना सेमिस्टर पद्धती भारतात सुरू करताना बऱ्याच अडचणी येतील असे दिसते सध्या जी पद्धती आपण स्वीकारली आहे ती पाश्चात्य शिक्षण पद्धतीच्या बाह्य अनुकरणाची आहे. त्या पद्धतीची जाणीव ठेवली पाहिजे. सेमिस्टर पद्धत सुरू करताना बाकीची साधनसामुग्री व परिस्थिती बदलता आली तरच त्या पद्धतीचा लाभ आपल्याला मिळू शकेल. नाही तर सध्या पूर्वीचे शैक्षणिक वर्षात जशा दोन टर्म्स होत्या त्यांना फक्त सेमिस्टर असे आपण संबोधल्याने सेमिस्टर पद्धत रूढ झाली असा आत्मसंतुष्टपणा वाढत जाईल. अंतर्गत गुण (Internal Test) देण्याची पद्धत आपल्याकडे विकृत मार्गाकडे वळली असा अनुभव आहे. सेमिस्टर पद्धतीत अध्यापकांवर फार महत्त्वाची जबाबदारी येते.

सेमिस्टर पद्धतीचे कलम भारतीय भूमीत रुजवावयाचे तर भारतीय पद्धतीत तग धरेल असे बीज आपण निवडले पाहिजे. कृषीतज्ञ सुधारित बियाणांची निवड करताना भारतीय हवामान, जमीन, आर्द्रता, पाणीपुरवठा यांचा विचार करून संकर करतात. त्याप्रमाणे सेमिस्टर पद्धतीचा संकर आपल्याकडील परिस्थितीशी सुसंगत असावा. अन्यथा परीक्षा पद्धत, शैक्षणिक वर्ष पद्धत आणि स्मरणशक्तीवर आधारलेली परीक्षापद्धति ह्या दोहोंचे दुहेरी दुष्परिणाम अधिक चिंताजनक होतील.

● ● ●



उद्योग व्यवस्थापन

# विसाव्या शतकाच्या अखेरीस भारताची आर्थिक परिस्थिती कशी असेल ?

**डॉ. राज निगम**

लेखांक दुसरा

**हे शतक पुरे व्हायला फक्त २३ वर्षेच राहिलेली आहेत. इ. स. २००० मध्ये भारताची आर्थिक परिस्थिती कशी असेल ह्याबद्दलचे भविष्य (Forecast) सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. राज निगम ह्यांनी वर्तविले आहे. मागील अंकात म्हणजे मार्च ७७ च्या अंकात ह्या लेखाचा पूर्वार्ध दिला आहे.**

क्रोमाइट, कॅनाइट, मँगनीज इत्यादी महत्त्वाच्या धातूंचा माहिती असलेला साठा या शतकाअखेर पुष्कळसा कमी होईल याची नियोजन मंडळाने दखल घेतलेली आहे. तांबे, झिंक यांसारख्या लोहेतर धातूंचा साठा किती आहे याबद्दलसुद्धा अंदाज बांधलेला आहे. ॲल्युमिनियम धातूचे साठेसुद्धा येत्या काही वर्षात कमी होत जातील अशी भीती आहे. त्याकरिता खनिज धातूंचे उत्पादन व उत्खनन आणि त्यांच्या विकासाकडे लक्ष देण्याची जरुरी आहे. गेल्या दशकात पोलाद उत्पादनात फारसा बदल झालेला नाही. गेल्या दोन वर्षात मात्र त्यात बरीच सुधारणा झालेली आहे आणि पोलाद कारखान्यांची उत्पादकता आणि उत्पादनक्षमतेचा वापर जास्तीत जास्त वाढलेला आहे. कोळसा व पोलाद यांना सध्या कमी मागणी आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचे हे दोन मूलभूत घटक आहेत. त्या क्षेत्राच्या विकासाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या शतकाच्या अखेर पोलादाचे उत्पन्न साडेसात कोटी टनावर नेण्याची योजना स्टील ॲथॉरिटीने आखलेली आहे. देशाच्या आर्थिक विकासाचा दर्जा उंचावयाचा असेल तर हे ध्येय गाठले पाहिजे.

## जलद गती

औद्योगीकरणाच्या बाबत देशाने फार मोठी आघाडी मारलेली आहे आणि विकसनशील देशांमध्ये भारत हे एक औद्योगिक राष्ट्र समजले जाते. मशीन्स व इतर तयार माल भारतातून आता निर्यात होतो. डिझाईन तयार करणे व तंत्रज्ञान या बाबतीत आपली क्षमता भारताने वाढवलेली आहे. आपल्या मध्यम व हलक्या प्रकारच्या उत्पादनाकरिता आणि ज्या वस्तूंच्या उत्पादनात मजुरी जास्त लागते अशा वस्तूंच्या उत्पादनाकरिता परदेशी बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न करायला हवा. त्याचबरोबर आयात मशिनरी आणि उपकरणे यावर अवलंबून राहाण्याचे कमी केले पाहिजे. आपल्या अमर्याद सागरी किनाऱ्याचा फायदा मासे वगैरे वस्तूंची निर्यात वाढविण्याकरिता करून घेतला पाहिजे. भारतीय तंत्रज्ञानाची इतर देशांना निर्यात करणे हाही एक मार्ग आहे.

शेती सुधारणा, छोटया उद्योगधंद्यांचा विकास आणि खेड्यातील इतर बांधकाम योजना यायोगे देशातील सर्वसामान्य गरीब जनतेचे जीवनमान उंचावणे हे जे विकासाचे धोरण आहे त्यामध्ये बदल करावयाला हवा. ग्रामीण भागातील जीवनमान उंचावयाचे म्हणजे त्याकरिता विणकाम व कापड उत्पादन वाढले पाहिजे आणि प्रोटीनयुक्त समतोल आहार गरीबांना मिळाला पाहिजे. खेड्यातून शहराकडे येणारा लोंढा थोपवण्याचा हा एकमेव मार्ग आहे. लोकसंख्या ८५ कोटीवर गेल्यावर जवळजवळ ३० कोटी लोकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा लागेल. मोठ्या प्रमाणावर घरबांधणीचा कार्यक्रम सातत्याने चालू ठेवला नाही तर इ. स. २००० साली मोठ्या प्रमाणावर घरांची कमतरता भासेल. हा कार्यक्रम हातात घेतल्यावर मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल व सिमेंट, पोलाद

आणि इतर बांधकामाच्या साहित्याची मागणी वाढेल. हे साहित्य तयार करणाऱ्या कारखान्यांना मोठी चालना मिळेल. देशातील सर्वात मोठ्या चार शहरांची विकास योजना हाती घ्यायला हवी. कारण त्या शहरांची लोकसंख्या पुढील २५ वर्षांत सहज दुप्पट होईल.

## उज्ज्वल भवितव्य

अशा तऱ्हेने भारत या शतकाअखेर आर्थिकदृष्टया प्रबळ राष्ट्र होण्याची बरीच शक्यता आहे. आर्थिक प्रगतीचा पाया नीट विचारपूर्वक घातला गेला असल्यामुळे लोकांच्या मूलभूत गरजा भागविल्या जाण्याची शक्यता चांगलीच आहे. देशातील साधनसामुग्रीची उपलब्धता व मागणी यांचा नीट अंदाज करून देशाच्या मध्यम मुदतीच्या व दीर्घ मुदतीच्या योजना आखणे हे योजनाकारांचे, शास्त्रज्ञांचे, अर्थशास्त्रज्ञांचे व तंत्रज्ञांचे कर्तव्य आहे. अर्थात त्याकरिता प्रबळ व स्थिर सरकारने राजकीय निर्णय घेतल्याखेरीज हे साध्य होणार नाही. त्याकरिता सामाजिक व सार्वजनिक संस्थांच्या यंत्रणेत मोठाच बदल करणे आवश्यक आहे. आपल्या स्थानिक परिस्थितीप्रमाणे खेड्यांच्या विकासाचा आराखडा आखला पाहिजे. उच्च वर्गांना लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादन करण्याच्या योजनात बदल करायला हवा. सरकारी गुंतवणूक आणि जनतेने उत्पादनामध्ये व इतर मूलभूत सोयी निर्माण करण्यामध्ये जास्त हातभार लावला तरच उत्पन्नाचे वाटप जास्त समाधानकारक होऊ शकेल व त्यायोगे शहरी व ग्रामीण परिस्थितीतील तफावत कमी होत जाईल.

## भावी दृश्य

अशा तऱ्हेने भविष्यकाळातील चित्र स्पष्ट दिसते. देशाची लोकसंख्या जवळजवळ दुप्पट होण्याची शक्यता आहे म्हणून लोकसंख्यावाढीचा वेग कमी करण्याचे प्रयत्न करायला हवेत. लोकांची अन्नधान्याची गरज भागविण्याकरिता शेतीक्षेत्रात क्रांतीकारक बदल करायला हवे. इतर पूरक अन्नपदार्थ शोधून काढायला हवे. वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देऊन आणि निसर्गाचे व वनस्पतींचे संरक्षण करून लोकांचे आरोग्य चांगले राहील याची काळजी घ्यायला हवी. याकरिता जंगलवाढ करण्याची जरुरी आहे व मोठ्या प्रमाणावर हा कार्यक्रम हाती घ्यायला हवा म्हणजे नद्यांचे पाणी दूषित होणार नाही. या सर्व गोष्टींकरिता बराच मोठा सरकारी खर्च करावा लागणार आहे. सरकारचे यासंबंधीचे धोरण सर्वांना माहित आहेच. यापुढे सरकार या निरनिराळ्या क्षेत्रावर होणारा खर्च वाढवीत जाईल आणि लोकांच्या व देशाच्या भरभराटीकरता इतर सार्वजनिक संस्था किंवा उद्योगधंद्यांचा उपयोग याकरिता करून घेतला जाईल.

●●●

# भारताच्या आर्थिक इतिहासावरील साहित्याची सटीप संदर्भ सूची

प्रा. शरद कुलकर्णी

गोखले अर्थशास्थ संस्था आणि कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, दिल्ली ह्यांच्या सहकार्याने नुकत्याच प्रकाशित झालेल्या अर्थशास्त्रीय संदर्भकोशाचे मुखपृष्ठ अर्थच्या जानेवारी १९७७ च्या अंकातील पहिल्या पानावर आम्ही छापून अर्थशास्त्राच्या अभ्यासकांच्या वतीने ह्या अनमोल कोशाने स्वागत केले होते. त्या ग्रंथाचा परिचय देणारा लेख ह्या अंकात सादर करीत आहोत.

प्रा. शरद कुलकर्णी ह्यांचा ह्या कोशानिर्मितीच्या कार्यात फार निकटचा संबंध असल्यामुळे अध्ययनसंदर्भ म्हणून असलेले ह्या सूचीचे असाधारण महत्त्व त्यांच्या लेखाने समर्थपणे स्पष्ट होत आहे.

भारताच्या आतापर्यंतच्या इतिहासात प्रामुख्याने राजकीय इतिहासाचाच विचार केला जात असे. परंतु गेल्या काही वर्षात परिस्थिती बदलत असून अनेक भारतीय व परदेशी संशोधक भारताच्या सामाजिक व आर्थिक इतिहासाचा सखोल अभ्यास करू लागले आहेत. भारतातील वेगवेगळ्या शहरांचा व इतर भागांचा विकास कसा झाला, वेगवेगळ्या भागातील जमीन महसूल पद्धती, रेल्वेचे आर्थिक विकासावर होणारे परिणाम वगैरे अनेक गोष्टींचा अभ्यास होत आहे. डॉक्टरेट संशोधनासाठी आर्थिक इतिहास अभ्यासणाऱ्या संशोधकांची संख्या वाढत आहे.

आर्थिक विकासाच्या अभ्यासात आर्थिक इतिहासाचे महत्त्व वाढते आहे. भारताच्या अनेक आर्थिक समस्यांच्या मागे काही ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे व या समस्या सोडविण्यासाठी ही पार्श्वभूमी समजावून घेतली पाहिजे असे संशोधकांना वाटू लागले आहे. या दृष्टीने आर्थिक विकासाच्या अभ्यासात आर्थिक इतिहासाचा अभ्यास अंतर्भूत केला जात आहे.

कोणत्याही संशोधनात व विशेषतः सामाजिक शास्त्राच्या संशोधनात पहिली अडचण येते ती म्हणजे त्या विषयावरील ग्रंथांची यादी करणे ही होय. आतापर्यंत झालेले लिखाण अभ्यासल्याशिवाय संशोधकाला पुढे जाता येत नाही. संशोधक ही अडचण दोन प्रकारांनी सोडवतात. एक मार्ग म्हणजे त्या विषयावरील ग्रंथ प्रथम वाचणे व त्यातील संदर्भ निवडून आपली ग्रंथसूची तयार करणे. दुसरा मार्ग म्हणजे या विषयावरील एखाद्या तज्ज्ञाला विचारून प्रथम एक सूची तयार करणे व वाचनातील संदर्भांचा वापर करून ती वाढवीत जाणे. या दोन्ही प्रकारात दोन दोष निर्माण होतात. एक तर सूची वाढवीत जाण्यात वेळ जातो व शिवाय आपण अंतर्भूत करीत असलेला संदर्भ ग्रंथ निश्चितपणे उपयोगी आहे की नाही हे तो ग्रंथ पाहिल्याशिवाय कळत नाही. कित्येकदा अशा प्रकारे अनेक संदर्भ नंतर काढून टाकावे लागतात. त्याशिवाय अनेकदा एखादा महत्त्वाचा संदर्भ आपल्या पाहाण्यात यावयाचा राहून जातो. ऐतिहासिक संशोधन मुख्यत्वेकरून इतर लिखाणावर आधारलेले असते आणि एखादा महत्त्वाचा ग्रंथ वाचायचा राहिल्यास सर्व संशोधनातच एक प्रकारची उणीव राहून जाते.

या दृष्टीने भारताच्या आर्थिक इतिहासाचे संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना वरदान ठरेल अशी एक सटीप संदर्भ-सूची (अॅनोटेटेड बिब्लिऑग्राफी) गोखले अर्थशास्त्र संस्था व इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च यांच्या सहकार्यातून प्रसिद्ध झाली आहे. याची माहिती मराठी जाणणाऱ्या

संशोधकांना व्हावी म्हणूनच या लेखाचा खटाटोप करण्यात आला आहे.

या सटीप संदर्भसूचीचे तीन ग्रंथ प्रसिद्ध होणार आहेत. त्यापैकी दोन ग्रंथ फेब्रुवारीत प्रसिद्ध झाले असून ते संशोधकांना तावडतोब उपयोगात आणता येतील. तिसरा ग्रंथ येत्या चार पाच महिन्यात प्रसिद्ध होईल अशी अपेक्षा आहे.

या संदर्भसूचीचे एकूण अकरा विभाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या विभागात सिलेक्शन फ्रॉम गव्हर्नमेंट रेकॉर्डसचा समावेश आहे. ब्रिटिश राज्यकर्ते भारतीय परिस्थिती फारशी माहीत नसलेले होते. त्याशिवाय अनेक गोष्टी सविस्तर लिहून ठेवण्याची त्यांची पद्धत होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर पार्लमेंटचे नियंत्रण होते व त्यासाठी पार्लमेंटच्या सभासदांना देखील भारताच्या राज्यकारभारासंबंधी व आर्थिक सामाजिक घटनासंबंधी माहिती देणे आवश्यक होते. या सर्व कारणांमुळे भारत सरकारने व त्या वेळच्या प्रांत सरकारांनी काही सरकारी कागदपत्रे प्रसिद्ध केली. भारताच्या आर्थिक इतिहासाच्या अभ्यासकांना या कागदपत्रांवरून बरीच माहिती मिळू शकते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देखील अशा स्वरूपाची काही कागदपत्रे विश्वविद्यालयांनी, खासगी व्यक्तींनी व संस्थांनी प्रसिद्ध केली आहेत. ज्याप्रमाणे पेशवे दफतरातील कागदपत्रे हा संशोधकांचा फार मोठा मदतनीस ठरला आहे, त्याप्रमाणे ही सर्व कागदपत्रेही संशोधनाला फार उपयुक्त आहेत. आर्थिक बाबींशी संबंध असणाऱ्या सर्व सिलेक्शन्सचा समावेश या भागात करण्यात आला आहे. विविध विभागांच्या आर्थिक विकासाशी संबंधित असणाऱ्या बाबींचा अभ्यास करणाऱ्यांना ही सिलेक्शन्स अतिशय उपयोगी आहेत. संदर्भ सूचीच्या या भागात ६०० सिलेक्शन्सचा समावेश करण्यात आला आहे.

दुसऱ्या विभागात सर्व्हे अँड सेटलमेंट रिपोर्टस्‌चा समावेश आहे. ब्रिटिशांनी भारताच्या विविध भागात जमीन महसूलाची वेगवेगळी पद्धत स्वीकारली. काही भागात जमीनदारी तर काही विभागात जमीनदारी पद्धतीच्या स्वरूपाची मालगुजारी वगैरे पद्धती अस्तित्वात आल्या. मात्र देशाच्या बऱ्याच भागात, विशेषतः दक्षिणेत शेतकऱ्यांकडून सरकार प्रत्यक्ष जमीन महसूल वसूल करू लागले. अर्थात ही पद्धत ब्रिटिश अंमल सुरू होण्यापूर्वीही अस्तित्वात होती. महाराष्ट्रात ही पद्धत मलीक अंबरने सुरू केली या पद्धतीत सरकार जमीन महसुलाचे दर २०–२५ वर्षांसाठी ठरवून देते नंतर २०–२५ वर्षांनी पाहणी करून हे दर पुन्हा ठरविले जातात. ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्रात पहिली पहाणी १८३० च्या सुमारास झाली. त्यानंतर त्या २०–२५ वर्षांनी होत राहिल्या. या पाहण्यांचे अहवाल आर्थिक संशोधनासाठी अतिशय उपयुक्त आहेत. या अहवालात त्या त्या भागातील आर्थिक परिस्थिती वर्णन करण्यात आली आहे. या वर्णनावरून त्या भागातील पिके, विविध पिकांखालील जमिनींचे प्रमाण, धान्यांच्या किंमती, जमिनींचे खरेदी–विक्री व्यवहार व त्यांच्या किंमती वगैरे अनेक गोष्टींसंबंधी माहिती मिळते. कित्येक पाहणी अहवाल अतिशय माहितीपूर्ण असून त्यांचा पुरेपूर वापर आर्थिक इतिहास लिहिणाऱ्यांनी केला आहे. वेगवेगळ्या विभागाच्या आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांना या अहवालांचा उपयोग झाला आहे व यापुढेही होत राहील. असे २१०१ सर्व्हे अँड सेटलमेंट रिपोर्टस्‌ या विभागात समाविष्ट करण्यात आले आहेत.

तिसऱ्या विभागात गॅझेटिअर्सचा समावेश आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांना भारतातील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती माहीत नव्हती. राज्यकारभाराच्या दृष्टीने ही माहिती असणे आवश्यक होते त्यामुळे खास अधिकारी नेमून अशा माहितीचे विभागवार संग्रह प्रसिद्ध करण्यात आले. त्यातील बरेचसे संग्रह विश्वकोषासारखे सर्वव्यापी आहेत. यात त्या त्या विभागातील वृक्ष, प्राणी, पिके यांची माहिती आहे. विविध जाती जमातीतील सामाजिक रूढी, परंपरा यांची वर्णने आहेत. ही गॅझेटिअर्स वेगवेगळ्या वेळी प्रसिद्ध करण्यात आल्यामुळे त्या विभागातील आर्थिक व सामाजिक बदलांचा देखील अभ्यास करणे शक्य होते. या विभागात एकूण १३३२ ग्रंथांचा समावेश करण्यात आला आहे. गॅझेटिअर्स म्हणून प्रसिद्ध न झालेले पण जवळपास तसेच स्वरूप असणारे ग्रंथदेखील या विभागात समाविष्ट करण्यात आले आहेत.

चौथ्या विभागात आर्थिक बाबींशी संबंधित असणाऱ्या कायदेकानूंची सटीप सूची देण्यात आली आहे. ब्रिटिश अमल सुरू होण्यापूर्वी भारतात अनेक छोटी मोठी राज्ये होती. काही राजे हिन्दू तर काही मुसलमान होते. सर्वसाधारणपणे धर्मग्रंथात सांगितलेले कायदे त्या त्या धर्माच्या नागरिकांना लावले जात. मात्र कित्येकदा गुन्हेगारी कायदे राजा ज्या धर्माचा असे त्या धर्मात सांगितल्याप्रमाणे असत. धर्मग्रंथात सांगितलेल्या नियमांच्या जोडीला त्या धर्माच्या अनुयायात पाळल्या जाणाऱ्या रूढी विचारात घेतल्या जात आणि एक प्रकारचा रूढी कायदा (कस्टमरी लॉ) अस्तित्वात असे. सविस्तर आणि सूत्रबद्ध कायदे करण्याची पद्धत नसे. न्याय व्यवस्था देखील खूप लवचिक असे. हिंदु कायद्यासंबंधीचे निर्णय हिंदु पंडीत देत तर मुस्लीम कायद्यासंबंधीचे निर्णय काझी देत

असत. कित्येकदा राजा हेच अखेरचे कोर्ट असे. ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर हळूहळू एक स्वतंत्र न्यायपद्धती विकसित होत गेली. त्याच्या जोडीला सूत्रबद्ध व सुस्पष्ट (कोडीफाइड) कायदे करण्यात आले. ब्रिटिश अंमलात वाहतूक व दळणवळण व्यवस्था सुधारली. रेल्वे सुरू झाल्या. पोस्ट व तारखाते निर्माण झाले. बँका सुरू झाल्या. विसाव्या शतकाच्या सुरवातीला जॉइंट स्टॉक कंपन्या निर्माण झाल्या. जमीन महसूल वसुलीत सुधारणा झाल्या. कारखाने सुरू झाल्यावर कामगार भरती, त्यांच्या कामाचे तास, सुट्या, कामगार संघटना व त्यांचे नियंत्रण या समस्या निर्माण झाल्या. या सर्व आर्थिक व्यवहारांशी निगडित गोष्टींसंबंधी कायदे करण्यात आले. यातील काही कायदे केंद्र किंवा मध्यवर्ती सरकार म्हणजे भारत सरकारने केले तर काही प्रांत सरकारांनी केले. भारतातील सरकार ब्रिटिश पार्लमेंटच्या नियंत्रणाखाली होते. तसेच भारतीय प्रदेशावर प्रथम ताबा मिळविणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीवर पार्लमेंटचे नियंत्रण होते त्यामुळे भारतातील आर्थिक घडामोडींशी संबधित अनेक कायदे ब्रिटिश पार्लमेंटनेही केले आहेत. या सर्व सरकारांनी केलेल्या व आर्थिक घडामोडींशी संबंध असणाऱ्या महत्त्वाच्या अशा २६५१ कायद्यांचा समावेश या भागात करण्यात आला आहे. कायद्याविषयीच्या माहितीत कायद्याचे संपूर्ण शीर्षक, कायदा क्रमांक व वर्ष, कायदा लागू असलेला विभाग, कायद्याने रद्द केलेले इतर कायदे, सदर कायदा रद्द झाला असल्यास ज्या कायद्यान्वये रद्द झाला त्याचा क्रमांक, कायद्यात तरतूद केलेले प्रमुख विषय, कायदा कोणत्या ग्रंथातून घेतला त्याचे नाव या गोष्टींचा समावेश आहे. या सर्व माहितीचा उपयोग संशोधकांना मोठ्या प्रमाणावर करता येईल.

संदर्भसूचीच्या पहिल्या ग्रंथात वर सांगितलेले चार विभाग आहेत, तर दुसऱ्या ग्रंथात पार्लमेंटरी पेपर्स व कमिटी अँड कमिशन रिपोर्टस् यांचा समावेश आहे.

ब्रिटिश पार्लमेंट राज्य कारभारविषयक चर्चेला उपयुक्त असे वेगवेगळे कागदपत्र प्रसिद्ध करते. आजवर अशा स्वरूपाचे कागदपत्रांचे शेकडो संग्रह प्रसिद्ध करण्यात आले आहेत. भारताच्या आर्थिक इतिहासाच्या संदर्भ सूचीतील ५ व्या विभागात भारताच्या आर्थिक प्रश्नांशी संबंधित अशा पेपर्सची सटीप माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. या कागदपत्रात भारताचा परराष्ट्रीय व्यापार, सोने चांदी यांची आयात निर्यात, कर योजना, रेल्वे, टपाल खाते व इतर विकासाच्या योजना यासारख्या विविध विषयांवर विपुल माहिती आहे. या माहितीचा वापर संशोधकांना अनेक प्रकारे करता येण्यासारखा आहे. या विभागात अशा १३२९ पार्लमेंटरी पेपर्सचा समावेश करण्यात आला आहे.

सहाव्या विभागात वेगवेगळ्या सरकारी खात्यांनी तसेच निमसरकारी व बिनसरकारी संस्थांनी नेमलेल्या समित्या व आयोगांच्या अहवालांचा समावेश आहे. कोणताही प्रश्न गुंतागुंतीचा असल्यामुळे त्यावर निर्णय घेणे अवघड असेल तर त्या प्रश्नाच्या सांगोपांग अभ्यासासाठी एखादी कमिटी किंवा कमिशन नेमण्याची ब्रिटिशांची पद्धत होती. ही पद्धत पार्लमेंट अवलंबित असे. त्याप्रमाणे केंद्र सरकार, प्रांत सरकार एवढेच काय महापालिका, नगरपालिका यादेखील अवलंबित असत. अर्थात कित्येकदा कमिटी नेमण्याचा उद्देश प्रश्न समजावून घेण्यापेक्षा तो सोडविण्याचा काल लांबविणे किंवा प्रश्न सोडविणेच टाळणे असा असतो ही गोष्ट वेगळी. पण काहीही असले तरी या कमिट्या व कमिशने खूप माहिती गोळा करतात हे मात्र खरे. या सूचीत एकूण २०५७ कमिट्या व कमिशने यांच्या अहवालांचा समावेश करण्यात आला आहे. यापैकी कित्येक अहवाल आर्थिक माहितीच्या दृष्टीने अपूर्व आहेत. या अहवालात ब्रिटिश पार्लमेंटने नेमलेल्या अनेक कमिट्यांचे अहवाल आहेत. भारत सरकारने नेमलेल्या स्थायी स्वरूपाच्या टॅरिफ बोर्डचे वेगवेगळ्या उद्योगधंद्याविषयीचे अहवाल आहेत. तसेच वेगवेगळ्या प्रांतिक सरकारांनी नेमलेल्या कमिट्या व कमिशने, उद्योगधंदा विषयीचे अहवाल आहेत. भारताच्या आर्थिक प्रश्नांची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी या अहवालांचा फार मोठा उपयोग होऊ शकेल.

वर वर्णन करण्यात आलेले संदर्भसूचीचे सहा विभाग दोन ग्रंथात प्रसिद्ध झाले आहेत, तर तिसरा ग्रंथ लवकरच प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर आहे. या तिसऱ्या ग्रंथात सूचीचा सातवा व आठवा विभाग समाविष्ट करण्यात येणार आहे. सातव्या विभागात विविध प्रकारच्या सीरीयल्सचा समावेश आहे. सीरीयल म्हणजे विशिष्ट कालानुक्रमाने प्रसिद्ध होणारे प्रकाशन. त्यात अंदाजपत्रके, वेगवेगळ्या खात्यांचे वार्षिक अहवाल, काही खात्यांतर्फे प्रकाशित होणारे मासिक, त्रैमासिक वा षण्मासिक अहवाल येतात. या सीरीयल्समध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक आकडेवारी देण्यात येते. आजकाल आर्थिक इतिहासाच्या संशोधनात सांख्यिकी माहितीवर खूप भर देण्यात येतो. त्यासाठी आवश्यक ती विविध प्रकारची आकडेवारी सीरीयल्समधून मिळू शकते. संदर्भसूचीत अशा १२०० सीरीयल्सची सटीप माहिती देण्यात आली आहे. त्याशिवाय

संदर्भासाठी मिळू शकल्या नाहीत अशा १२०० सीरीयल्स-संबंधी नोंदी देण्यात आल्या आहेत. त्यापैकी बऱ्याच सीरीयल्सची माहिती संशोधकांना नाही, कारण त्यापैकी काही पूर्वीच बंद पडल्या आहेत. त्यामुळे संदर्भसूचीच्या सर्व विभागात सीरीयल्सचा विभाग संशोधकांना सर्वात महत्त्वाचा व उपयोगी ठरेल असे वाटते.

इ. स. १८७२ साली सरकारने भारतातील काही भागात शिरगणना सुरू केली. १८८१ पासून तिची व्याप्ती वाढून देशाच्या सर्वच भागात दशवार्षिक शिरगणना सुरू झाली. १८७२ पूर्वीदेखील काही छोटया छोटया भागात शिरगणना घेण्यात आल्या होत्या. शिरगणना आर्थिक माहितीचे भांडारच आहे. या माहितीत लोकसंख्या, तिचे वयानुसार विभाजन, व्यवसायानुसार विभाजन, काम न करणाऱ्या लोकांचे विविध गटात विभाजन, वैवाहिक दर्जा यासारख्या अनेक गोष्टी येतात. १९३१ पर्यंत लोकांची जातीनुसार संख्याही दिली जात असे. शिरगणना खात्यातर्फे वेळोवेळी अतिशय उपयुक्त असे स्वतंत्र अभ्यास प्रसिद्ध करण्यात आले आहेत. सामाजिक व आर्थिक प्रश्नांच्या अभ्यासासाठी ही सर्व माहिती मिळविणे अत्यंत आवश्यक आहे. या विभागात १५०० शिरगणना ग्रंथ समाविष्ट करण्यात आले आहेत.

अशा रीतीने आतापर्यंत या संदर्भसूचीचे प्रसिद्ध झालेले व होऊ घातलेले वर वर्णन केलेले आठ विभाग भारताच्या आर्थिक इतिहासाच्या संशोधकांना बहुमोल मदत करणारे आहेत. संशोधकांना त्यांचा सुलभ रीतीने वापर करता यावा यासाठी काही खास गोष्टी करण्यात आल्या आहेत. पहिले म्हणजे संदर्भवाढीसाठी एक खास वर्गीकरण तक्ता बनवून त्यानुसार त्यांची आखणी करण्यात आली आहे. हा तक्ता पाहून आपल्याला आवश्यक तेवढे संदर्भ संशोधकाला निवडून घेता येतील. ही संदर्भ सूची सटीप आहे. म्हणजे त्यातील अहवालाचा, कायद्याचा किंवा इतर कोणत्याही बाबीचा संदर्भ देताना त्यात कोणत्या प्रमुख गोष्टींविषयी माहिती आहे, ही माहिती कोणत्या वर्षासाठी आहे, कोणत्या विभागासाठी आहे हे नमूद करण्यात आले आहे. सांख्यिकी माहिती स्वतंत्रपणे नमूद करण्यात आली असून त्यात कोणती माहिती कोणत्या विभागाकरिता व कोणत्या कामाकरिता हे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे एखादा संदर्भग्रंथ मुळात न पाहता तो आपल्या कामासाठी उपयुक्त आहे किंवा नाही हे संशोधकाला ठरवता येईल व त्याचा वेळ वाया जाणार नाही. या सर्व विभागांना विस्तृत अशा सूची (indexes) जोडण्यात आल्या आहेत. त्याचाही उपयोग आवश्यक ते संदर्भ अचूक व त्वरित निवडून काढण्यासाठी होईल. प्रत्येक विभागाला सविस्तर प्रस्तावना जोडण्यात आली आहे.

या संदर्भसूचीत इंग्रजीत प्रसिद्ध झालेल्या बाबींचाच समावेश करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या संदर्भसूची भारतीय भाषांतील साहित्यासाठी करता येतील मात्र हे काम वेगवेगळ्या संस्थांना स्वतंत्रपणे करावे लागेल. संदर्भसूचीचा काल इ. स. १५०० ते १९४७ हा आहे. या काळातील आर्थिक घडामोडींशी संबंधित अशा बाबींचा समावेश या संदर्भसूचीत करण्यात आला आहे. अर्थात ह्या कालाविषयीच इंग्रजीत जास्त माहिती उपलब्ध आहे आणि भारताच्या आर्थिक इतिहासात हा काळ बराच महत्त्वाचा आहे. संदर्भसूचीतील भारत याचा अर्थ १९४७ साली फाळणीपूर्वीचा प्रदेश असा करण्यात आला आहे. त्यामुळे ही सर्व माहिती आजचा पाकिस्तान, बांगला देश व भारत या देशाविषयीच आहे. अर्थात या प्रदेशात विलीन झालेल्या पूर्वीच्या संस्थानांचा समावेश त्यात आहे.

या संदर्भसूचीतील आणखी काही भाग पुढे प्रसिद्ध होणार आहे. त्यात पुस्तके, निवडक नियतकालिकातील लेख व भारतीय व परदेशी विद्यापीठात सादर झालेले प्रबंध यांचा समावेश होणार आहे. सूचीचा हा चौथा नियोजित भाग प्रसिद्ध होण्यास काही काळ लागेल.

ही संदर्भ सूची करण्याचे काम १९७२ च्या एप्रिल महिन्यात सुरू झाले. फेब्रुवारी १९७७ मध्ये तिचे दोन ग्रंथ प्रसिद्ध झाले व तिसरा या वर्षात कधीतरी प्रसिद्ध होईल. चौथा बहुतेक १९७८ साली प्रसिद्ध व्हावा अशी अपेक्षा आहे.

या संदर्भ सूचीतील सर्व माहिती कोणत्याही एका वाचनालयात असणे शक्यच नव्हते त्यामुळे अनेक वाचनालयातील माहितीचा वापर करावा लागला. त्यापैकी गोखले अर्थशास्त्र संस्थेचे वाचनालय, कलकत्ता येथील नॅशनल लायब्ररी, लंडन मधील ब्रिटिश म्युझियम व इंडिया ऑफिस वाचनालय, दिल्ली येथील सेंट्रल सेक्रेटरीयट लायब्ररी, नॅशनल अर्काइव्ह व विविध राज्यांची अर्काइव्हज्, मुंबई हायकोर्टाचे वाचनालय ही प्रमुख म्हणून सांगता येतील. या प्रकल्पाच्या कामात सुमारे २० संशोधकांनी भाग घेतला. गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या नेतृत्वाखाली हा प्रकल्प पार पाडण्यात आला व त्याचा आर्थिक भार इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च या संस्थेने उचलला.

या संदर्भ सूचीमुळे भारताच्या आर्थिक इतिहासाच्या संशोधनाला चालना मिळेल. त्याचप्रमाणे इतर प्रकारचे सामाजिक, राजकीय व ऐतिहासिक प्रश्नांचे संशोधन करणाऱ्यांनाही त्याचा उपयोग करता येईल. संशोधकांना संदर्भ शोधण्यासाठी बराच वेळ वाचून त्यांना अनेक प्रकारची माहिती कोठे मिळेल याचे दिग्दर्शन होईल. अशा प्रकारचे व्यापक कार्य संशोधकांना एक वरदानच ठरेल असे म्हणता येईल. ● ● ●

# लोक ठेवी

## (अलिकडील घडामोडींचा एक अभ्यास)

**प्रा. रमेश पानसे**
प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई

**कंपन्यांना भांडवल उभे करताना शेअर बाजार, बँका, भांडवल बाजार ह्याबरोबरच कंपन्या लोकांकडून डिपॉझिट्स घेणे सर्रास पसंत करीत. ह्या लोक ठेवींना बँकांपेक्षाही अधिक आकर्षक व्याज दर त्या देऊ करतात. ह्यामुळे बँका व नाणे बाजारात एक नवी समस्या उद्‌भवली आहे. प्रा. पानसे ह्यांनी भांडवलदार कंपन्यांची मक्तेदारी व भांडवल केंद्रीकरण ह्या संदर्भात ह्या प्रश्नाचा चिकित्सक व बारकाईने अभ्यास केला आहे.**

भारतीय उद्योगधंद्यातील विकासाच्या सुरुवातीच्या काळात औद्योगिक कंपन्या ( विशेषत: मुंबई व अहमदाबाद येथील सुती कापडाच्या गिरण्या ) आपल्या उद्योगास चालू भांडवल मिळविण्यासाठी लोकठेवींवर अवलंबून होत्या. पैसा उभा करण्याचा तो एक स्वस्त मार्ग होता व व्याज म्हणून चार ते सहा टक्के रक्कम त्यांना द्यावी लागे. त्या वेळी कंपन्यांना लागणारे भांडवल फार मर्यादित असे आणि लोकठेवीमधून भांडवलाच्या चाळीस टक्के किंवा त्याहूनही अधिक प्रमाणात पैसा कंपन्यांना मिळू शकत असे.

लोक ठेवींच्या रकमेतून कंपन्यांचा खर्च चालविण्याच्या या पद्धतीचे त्या काळी असलेले महत्त्व समजू शकते, कारण तेव्हा आधुनिक बँकांच्या सवलती प्रचलित नव्हत्या आणि संघटित स्वरूपाचे भांडवल पुरविण्याची साधनेही उपलब्ध नव्हती. परंतु आता परिस्थिती बदलली आहे. भांडवल पुरवण्याच्या सोयी आता खूपच संघटित झालेल्या असून जवळ-जवळ पूर्णपणे विकसित झालेल्या आहेत. व्यापारी आणि सहकारी बँकांची संख्या वाढली असून त्यांनी आपल्या शाखांचा पसाराही बराच वाढविलेला आहे. त्यांच्याकरवी त्या खाजगी व सार्वजनिक कंपन्यांना अल्पकालीन कर्जपुरवठा करतात. दीर्घकालीन कर्ज पुरविणाऱ्या अनेक संस्थाही सरकारी आणि परकीय संस्थांच्या सहकार्याने उघडण्यात आल्या आहेत. त्या औद्योगिक संस्थांच्या दीर्घकालीन कर्जांची गरज भागवितात. आयुर्विमा महामंडळ आणि युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया या संस्था देखील या बाबतीत महत्त्वाच्या आहेत. कारण त्याही उद्योगधंद्यास लागणाऱ्या मोठमोठ्या रकमा पुरवितात. कंपन्यांच्या मागण्यांना शेअरबाजार चांगलाच प्रतिसाद देतो. अशा सर्व सोयी उपलब्ध असताना जेव्हा एकाएकी कंपन्या लोकठेवीतून भांडवल मिळविण्याच्या जुन्या पद्धतीचा अवलंब करतात तेव्हा नियोजन आणि आर्थिक धोरणाच्या दृष्टिकोनातून तो एक मोठ्या चिंतेचा विषय ठरतो.

अलिकडच्या काळात लोकठेवींच्या स्वरूपात भांडवल मिळविण्यासाठी खूपच मागणी निर्माण झाली आहे असे कंपन्यांनी जनतेकडून, भागधारकांकडून किंवा कर्मचाऱ्यांकडून ठेवी स्वरूपाचे भांडवल मिळविण्यासाठी वृत्तपत्रांतून दिलेल्या जाहिरातींवरून दिसून येते. १३४ संयुक्त भांडवली संस्थांची, त्यांनी वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलेल्या जाहिरातींच्या आधारावर केलेली छाननी खूपच बोधप्रद असून ती त्या कंपन्यांच्या अर्थव्यवहारांवर चांगलीच प्रकाश टाकणारी आहे. कंपन्यांनी कायम स्वरूपाच्या ठेवी जनतेकडून मिळविण्याचे ठरविले ही बाब एकीकडे त्यांच्या अर्थव्यवहाराच्या दृष्टिकोनातून व दुसरीकडे देशाच्या आर्थिक दृष्टिकोनातून हितावह ठरेल की नाही ते पहाण्याच्या उद्देशाने ही पाहणी करण्यात आली होती.

या पाहणीत ११६ सार्वजनिक कंपन्यांचा आणि १८ खाजगी कंपन्यांचा समावेश केलेला होता. आकारमानानुसार या १३४ कंपन्यांचे पृथकरण क्रमांक १ च्या कोष्टकात दिले आहे. त्यावरून दिसून येईल की प्रत्येकी १०० लक्ष रुपयापर्यंत भांडवल

असलेल्या ७४ लहान कंपन्या असून त्यात १६ खाजगी कंपन्यांचा समावेश आहे. ५६ मध्यम आकाराच्या कंपन्या आहेत आणि त्यांनी मिळविलेले भांडवल १०० लाख रुपये ते १००० लाख रुपये यादरम्यान आहे. मोठ्या कंपन्या फक्त चार आहेत आणि त्यांचे भांडवल १००० लाख रुपयांवर आहे.

कोष्टक क्रमांक १

आकारानुसार १३४ संयुक्त भांडवली संस्थांचे पृथकरण

| मिळविलेल्या भांडवलाचा आकडा | कंपन्यांचा आकडा |
|---|---|
| १. १०० लक्ष रुपयाहून कमी विक्री-प्राप्त भांडवल असणाऱ्या लहान कंपन्या | ७४ |
| (अ) खाजगी कंपन्या १८ | |
| (ब) सार्वजनिक कंपन्या ५६ | |
| २. १०० लक्ष ते १००० लक्ष भांडवल असणाऱ्या मध्यम आकाराच्या कंपन्या | ५६ |
| ३. १००० लक्ष रुपयांवर भांडवल असणाऱ्या मोठ्या कंपन्या | ४ |
| एकूण | १३४ |

वरील कोष्टकावरून दिसून येईल की सर्वच म्हणजे लहान, मध्यम आणि मोठ्या आकारमानाच्या कंपन्या लोकठेवी मिळविण्यास उत्सुक असून त्या दृष्टीने प्रयत्नशील आहेत

उद्योगधंद्यानुसार या १३४ कंपन्यांचे पृथक्करण असे दाखविते की (कोष्टक क्रमांक २) बहुतेक सर्व प्रकारच्या कंपन्यांनी लोकठेवीतून भांडवल मिळविण्याच्या या स्पर्धेत भाग घेतला आहे ३१ इंजिनियरिंग कंपन्या, २४ रंग व रसायन, औषधे व औषधी द्रव्ये बनविणाऱ्या कंपन्या, २२ पोलाद व पोलादी वस्तू बनविणाऱ्या व इतर धातूंच्या कंपन्या, ७ व्यापारी कंपन्या आणि दुसऱ्या २६ कागद, कागदी पुठ्ठे, सिमेन्ट, ट्रॅक्टर, रबर, टायर्स या सारख्या कायम स्वरूपाच्या मालाच्या कंपन्या, शिवाय हॉटेले आणि पैसा गुंतवणूक कंपन्या यांचा यांमध्ये समावेश आहे.

१९७५ च्या कंपन्यांनी ठेवींच्या रकमा स्वीकारण्याबद्दल च्या नियमानुसार वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या आणि कंपन्यांच्या आर्थिक स्थितीबद्दल सामान्य माहिती देणाऱ्या वैयक्तिक जाहिराती असे दाखवितात की गेल्या तीन वर्षात कोठलीही रक्कम लाभांश म्हणून आपल्या भागधारकांना न देणाऱ्या कंपन्यानीही ठेवी मागविल्या आहेत. याहीपेक्षा आश्चर्याची गोष्ट अशी की तोटयात निघालेल्या काही कंपन्याही ठेवींच्या मार्गाने पैसा उभारण्याचा प्रयत्न करीत आहेत.

कोष्टक क्रमांक २

उद्योगानुसार १३४ संयुक्त भांडवली संस्थांचे पृथकरण

| कंपन्यांचा प्रकार | कंपन्यांची संख्या |
|---|---|
| १. इंजिनियरिंग | ३१ |
| २. रंग, रसायन, गोळ्या, औषधे | २४ |
| ३. पोलाद, पोलादी वस्तू आणि दुसरे धातू | २२ |
| ४. कापड | १७ |
| ५. वीजपुरवठा | ७ |
| ६. व्यापार | ७ |
| ७. इतर अन्य प्रकारच्या कंपन्या | २६ |
| एकूण | १३४ |

ज्यांची पाहणी केली गेली त्या कंपन्या जरी प्रामुख्याने मुंबईमधल्या व महाराष्ट्राच्या इतर काही भागातल्या असल्या तरी देशातील सर्वच भागातील कंपन्या लोकठेवी मागवीत आहेत असे आढळून आलेले आहे.

मोठ्या संख्येने प्रकाशित होणाऱ्या जाहिराती, आणि त्यांनी देऊ केलेला व्याजाचा भारी दर ( ९ ते १७ टक्के ) आणि ठेवी मिळविण्याच्या बाबतीत त्यांची एकमेकांशी चालू असलेली स्पर्धा यावरून दिसून येते की सामान्यपणे सर्वच कंपन्यांना चालू भांडवल मिळविण्यासाठी पैशांची अतिशय आवश्यकता आहे.

या परिस्थितीची कारणे अनेक संभवतात. पहिले म्हणजे अलिकडे बँकांच्या कर्जावर घातलेले बंधन. या बंधनामुळे

बँकांकडून कर्ज मिळणे कठीण होऊन बसते व ते महागदेखील पडते. बँकाकडून पुरेसे कर्ज मिळत नाही ही गोष्ट यावरून सिद्ध होते की जुलै–डिसेंबर १९७४ मध्ये बँकांचे कर्ज फक्त २५६ कोटींनी वाढले पण तेच १९७३ मध्ये त्याच काळात ६५४ कोटी रुपयांनी वाढलेले होते. दुसरे म्हणजे काही विशिष्ट कंपन्यांनाच कर्ज देण्याच्या बंधनामुळे इतर कंपन्यांना चालू भांडवल मिळविण्याबद्दल प्रयत्न करावा लागत आहे.

तिसरे म्हणजे देशात सामान्यपणे दिसून येणारी चलनाभिवृद्धीची परिस्थिती ही लोकांची बचतशक्ति कमी करून भांडवल पुरवठ्यास उपलब्ध रकमा कमी करते. या सर्व कारणांमुळे संयुक्त भांडवली संस्थांना आपला व्यवसाय चालू ठेवण्यासाठी जुन्या आणि निश्चितपणे मिळण्यासारख्या लोकठेवींकडेच पुन्हा वळावेसे वाटले असावे.

उपरोक्त अभ्यासातून असेही आढळून आले आहे की कंपन्यांना समाजाकडून ठेवी मिळविण्यासाठी व्याजाचा दर जास्त द्यावा लागत आहे. शिवाय जनतेकडून लोकठेवी आकर्षित करण्यासाठी काही आकर्षक पद्धतींचाही अवलंब करावा लागत आहे. त्यातही मोठ्या कंपन्यांना ठेवी मिळविण्यासाठी लहान कंपन्यांच्या तुलनेने कमी पैसा खर्च करावा लागत आहे. पैसा गुंतविणाऱ्या लोकांची मनोवृत्ती अशा प्रकारची असते की संचालक मंडळावर सुप्रसिद्ध व्यक्तींची नावे असणाऱ्या आणि आर्थिक दृष्ट्या भक्कम असणाऱ्या कंपन्यांची आपल्या ठेवी ठेवण्यासाठी त्यांना निवड करावीशी वाटते.

म्हणून अशा प्रकारच्या मोठ्या आणि उत्तम आर्थिक स्थिती असणाऱ्या कंपन्यांना तुलनात्मक दृष्टीने ठेवी मिळविणे अधिक सुलभ होते व त्यांना व्याजाचा दरही जास्त द्यावा लागत नाही उलटपक्षी औद्योगिक क्षेत्रात मोठे नाव न मिळविलेल्या लहान कंपन्यांना भांडवल मिळविण्यासाठी व्याजाचा दर जास्त द्यावा लागतो.आणि पैसा गुंतविणारादेखील व्याजरूपाने अधिक पैसे मिळविण्यासाठी त्यांच्याकडे पैसे गुंतविण्यामधील धोका पत्करण्यास तयार असतो. या पहाणीने असेही दाखवून दिले आहे की कंपन्यांचा आकार व त्या देतात तो व्याजदर याचा एक विशिष्ट संबंध आहे. कंपन्यांचा आकार जर ठेवी मिळविण्याचा सूचक मानला तर या तपासणीवरून असे दिसून येईल की कंपनी जितकी मोठी (ढोबळ मानाने सुरक्षित असणारी) तितका तिला व्याजाचा दर कमी द्यावा लागतो. आणि कंपनी जितकी लहान (कमी सुरक्षितता असणारी) तितका तिला व्याजाचा दर अधिक द्यावा लागतो. पुढील कोष्टके (क्रमांक ३ व ४) पैसे गुंतविणारे जितक्या प्रमाणात अधिक धोका पत्करतात तितक्या प्रमाणात त्यांना व्याजाचा दर अधिक मिळतो असे दाखवितात.

**कोष्टक क्रमांक ३**

**एका वर्षाला ठेवीच्या रकमेवर देण्यात येणारा व्याजाचा दर**

| कंपन्या | व्याजाचा दर | | |
|---|---|---|---|
| | कमीत कमी | जास्तीत जास्त | भागीदार व कर्मचारी यांसाठी जास्तीत जास्त |
| १. लहान खाजगी कंपन्या | १० | १५ | १८·८ |
| २. लहान सार्वजनिक कंपन्या | १० | १५ | १६ |
| ३. मध्यम सार्वजनिक कंपन्या | ८·५ | १३ | १३ |
| ४. मोठ्या सार्वजनिक कंपन्या | ८ | ११ | ११·३ |

कोष्टक क्रमांक ३ असे दाखविते की कंपनी जितकी मोठी तितका तिला द्यावा लागणारा व्याजाचा दर कमी· लहान खाजगी आणि सार्वजनिक कंपन्यांनी कमीत कमी व्याजाचा दर १०% दिलेला आहे व मध्यम आणि मोठ्या कंपन्यांनी अनुक्रमे ८·५% आणि ९% व्याजाचा दर दिला आहे. वेगवेगळ्या आकाराच्या कंपन्यानी दिलेल्या व्याजाच्या जास्तीत जास्त दराबद्दलही हेच प्रमाण खरे ठरेल. लहान, मध्यम व मोठ्या कंपन्यांनी दिलेला जास्तीत जास्त व्याजाचा दर अनुक्रमे १५%, १३% व ११% इतका राहील.

**कोष्टक क्रमांक ४**

**३ ते ५ वर्षे ठेवीच्या रकमेवर दिलेल्या व्याजाचा दर**

| कंपन्या | व्याजाचा दर | | |
|---|---|---|---|
| | कमीत कमी | जास्तीत जास्त | भागीदार व कर्मचाऱ्यांना जास्ती जास्त |
| १. लहान खाजगी कंपन्या | १२·५ | १७ | १८ |
| २. लहान सार्वजनिक कंपन्या | १२ | १७ | १८ |
| ३. मध्यम सार्वजनिक कंपन्या | १० | १६ | १६ |
| ४. मोठ्या सार्वजनिक कंपन्या | ११ | १४ | १४·५ |

जसे कंपनी जितकी मोठी तितका तिला द्यावा लागणारा व्याजाचा दर कमी, तसेच अधिक वर्षासाठी म्हणजे तीन ते पाच वर्षासाठी ठेवलेल्या रकमाबद्दलही व्याजाचे प्रमाण व्यस्त आढळते. (कोष्टक क्रमांक ४) लहान खाजगी आणि सार्वजनिक कंपन्यांनी दिलेला कमीत कमी व्याजाचा दर अनुक्रमे ११½% व १२% आहे. मध्यम आणि मोठ्या कंपन्यांच्या बाबतीत हाच दर १०% व ११% इतका खाली आलेला आढळतो. या वेगवेगळ्या आकाराच्या कंपन्यांनी दिलेला जास्तीत जास्त दर देखील १७% (लहान) १६% (मध्यम) व १४% ( मोठ्या कंपन्या ) इतका कमी झालेला आढळतो.

कोष्टक क्रमांक ३ व ४ असे दाखवतात की सर्व कंपन्यांनी आपल्या भागीदारांना व कर्मचाऱ्यांना दिलेला व्याजाचा दर इतरांना दिलेल्या व्याजाच्या दरापेक्षा ½% ते १% ने अधिक आहे. त्याचप्रमाणे हे दर एका वर्षाच्या ठेवींच्या रकमेवर १६.८%पासून ११.५%आणि ३ ते ५ वर्षांच्या रकमेवर १८% पासून १४½% इतके कंपन्यांच्या वाढत्या आकारानुसार उतरत जातात.

या कंपन्यांनी सामान्यपणे दिलेला अधिक व्याजाचा दर असेही दाखवितो की या कंपन्यांची, जनतेचा पैसा अधिक व्याजाच्या दराने घेण्याची तयारी आहे. याचे कारण असे की पूर्वी अर्थव्यवस्थेत चलनाभिवृद्धीची परिस्थिती निर्माण झाल्याने कंपन्यांनी फायदा मिळवला होता. आणि त्या फायद्यातून आता अधिक पैसा खर्च करण्याची त्यांची तयारी दिसते.

लहान कंपन्यांना लोकठेवी मिळविण्यासाठी अधिक पैसा खर्च करावा लागतो असे ठेवींच्या रकमांच्या या सर्व व्यवहारावरून दिसून येते हा महत्त्वाचा मुद्दा आहे आणि या सर्व कंपन्या पैसा उभा करण्यासाठी लोकठेवीवर विसंबून असतात ही गोष्ट कोष्टक क्रमांक ५ मधील भाग भांडवल व ठेवी यांच्या परस्पर प्रमाणावरून दिसून येते. हे प्रमाण कंपन्यांनी ठेवीच्या रूपाने मिळविलेल्या पैशाचे कंपन्यांच्या निव्वळ उत्पन्नाशी असणारे गुणोत्तर स्पष्ट करते (म्हणजेच विक्रीप्राप्त भांडवल + राखीव निधी – तोटा ).

**कोष्टक क्रमांक ५**

**संयुक्त भांडवल संस्थांच्या निव्वळ उत्पन्नाचे त्यांच्या ठेवीशी गुणोत्तर**

| कंपन्या | प्रमाण टक्केवारीने |
|---|---|
| १. खाजगी कंपन्या | १९.५ |
| २. सार्वजनिक कंपन्या | १५.३ |
| ३. सर्व कंपन्या | १५.४ |

कोष्टक क्रमांक ५ वरून असे दिसून येईल की सर्व कंपन्यांजवळ असणाऱ्या ठेवी त्यांच्या निव्वळ उत्पन्नाच्या १५.४ टक्के आहेत. परंतु त्यांची दोन गटात विभागणी केली असता सार्वजनिक व खाजगी कंपन्यांच्या ठेवींची रक्कम त्यांच्या निव्वळ उत्पन्नाच्या १५.३ टक्के व १९.५ टक्के इतकी आहे. खाजगी कंपन्या या ठेवींवर सार्वजनिक कंपन्यांच्या मानाने अधिक विसंबून असतात. ही गोष्ट असे दाखविते की त्याना कदाचित व्यापारी बँकांसारख्या संघटित संस्थांकडून कर्ज मिळविणे फार कठीण जात असावे.

आपल्यापुढील प्रश्न असा आहे की खाजगी कंपन्यांनी अशा प्रकारे आपल्या चालू भांडवलासाठी लोकठेवींवर अवलंबून रहाणे हितावह आहे का ?

कंपन्यांची त्यांनी घेतलेले कर्ज (ठेवी + तारणाचा पाठिंबा असलेले कर्ज + तारणाचा पाठिंबा नसलेले कर्ज ) परत करण्याबद्दलची भागधारकांच्या निव्वळ उत्पन्नाशी (विक्रीप्राप्त भांडवल + राखीव निधी + कर्ज [असल्यास] ) संबंधित असलेली जबाबदारी लक्षात घेतल्यास असे आढळून आले आहे की सर्व सार्वजनिक व खाजगी कंपन्यांवर आपल्या निव्वळ उत्पन्नाच्या ९०.२ टक्के एवढा कर्जाचा बोजा आहे. हे शेकडा प्रमाण खाजगी कंपन्यांच्या बाबतीत ( १३५.३% ) म्हणजे सार्वजनिक कंपन्यांपेक्षा ( ८६.२% ) अधिक पडते. इतकेच नव्हे तर ते त्यांच्या निव्वळ उत्पन्नापेक्षा ३५.२% ने जास्त आहे. अधिक संघटित असणाऱ्या सार्वजनिक कंपन्यांच्या तुलनेने खाजगी कंपन्यांची कर्जविषयक जबाबदारी अधिक असते. यांतील अधिक महत्त्वाचा मुद्दा असा की सध्याच्या कर्जाचा मोठा बोजा डोक्यावर असतानाही या खाजगी कंपन्या जनतेकडून अधिक ठेवी गोळा करून आपल्या आधीच्या कर्जात वाढ करीत आहेत असे कोष्टक क्रमांक ६ वरून दिसून येते

**कोष्टक क्रमांक ६**

**कंपन्यांच्या त्यांच्या निव्वळ उत्पन्नाच्या तुलनेने द्यावयाचे कर्ज**

| कंपन्या | निव्वळ उत्पन्नाच्या प्रतिशत कर्ज |
|---|---|
| १. खाजगी कंपन्या | १३५·३ |
| २. सार्वजनिक कंपन्या | ८६·३ |
| ३. सर्व कंपन्या | ९०·२ |

कोणत्याही कंपनीला स्वतःची आर्थिक स्थिती भक्कम ठेवायची असल्यास १ : १ भागभांडवल व ठेवी यांच्या परस्पर प्रमाणापुढे जाता कामा नये. सध्याची तपासणी असे दाखवते की (कोष्टक क्रमांक ७) जवळजवळ ४५·५ टक्के कंपन्यांचे (एकूण १३४ पैकी ६१ कंपन्या) भागभांडवल व ठेवी यांचे प्रमाण या आदर्श समजले जाणाऱ्या प्रमाणापलीकडे गेलेले आहे.

**कोष्टक क्रमांक ७**

**भाग भांडवल : १३४ कंपन्यांच्या कर्जाचे प्रमाण**

| कंपन्या | प्रमाण (इ) | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रमाण १ पेक्षा कमी | प्रमाण १ | प्रमाण १ पेक्षा जास्त | एकूण कंपन्या |
| १. खाजगी कंपन्या | ६ | २ | १० | १८ |
| २. सार्वजनिक कंपन्या ज्यांचे | | | | |
| (अ) विक्रीप्राप्त भांडवल ५० लक्षाहून कमी आहे | ११ | — | २० | ३१ |
| (ब) विक्रीप्राप्त भांडवल ५० ते १०० लक्ष आहे | ११ | १ | १३ | २५ |
| (क) विक्रीप्राप्त भांडवल १०० ते १००० लक्ष आहे | ३९ | — | १७ | ५६ |
| (ड) विक्रीप्राप्त भांडवल १००० लक्षाहून अधिक आहे | ३ | — | १ | ४ |
| एकूण | ७० | ३ | ६१ | १३४ |

अधिक सूक्ष्म दृष्टीने कोष्टक क्रमांक ७ चा अभ्यास केल्यावर असे दिसते की खाजगी कंपन्या जमेस धरून ४७ कंपन्यांचे विक्रीप्राप्त भांडवल ५० लाखाहून कमी आहे. याचाच अर्थ असा की या लहान कंपन्यांच्या शिरावर तुलनात्मक दृष्टीने पाहिल्यास कर्ज फेडण्याची जबाबदारी मोठी आहे. पुढे कोष्टक क्रमांक आठ वरून वेगवेगळ्या आकारांच्या कंपन्यांचे भाग भांडवल व ठेवी यांचे प्रमाण सर्वात अधिक आहे असे दिसून येते.

ही पाहणी असेही दाखवते की ज्यांचे विक्रीप्राप्त भांडवल ५० लाखाहून कमी आहे त्यांचे गुणोत्तर इतर कंपन्यांच्या मानाने अधिक आहे. (खाजगी कंपन्यांचे ४·०२ व सार्वजनिक कंपन्यांचे ५·२०). ५० लक्षाहून अधिक आणि १०० लक्षाहून कमी (२·६१) विक्रीप्राप्त भांडवल असणाऱ्या मोठ्या कंपन्यांच्या मानाने हे गुणोत्तर अधिक आहे. तसेच १०० लक्ष ते १००० लक्ष (२·८९) विक्रीप्राप्त भांडवल असणाऱ्या आणि विक्रीप्राप्त भांडवल १००० लक्षाहून अधिक (१·६१) असणाऱ्या सर्वात मोठ्या कंपन्यांच्या गुणोत्तरापेक्षाही ते अधिकच आहे असे आढळते.

वरील पाहणीत दिसून आलेले लहान कंपन्यांच्या भांडवलाचे स्वरूप लक्षात घेता एका विशिष्ट परिस्थितीत त्यांना लोकठेवींच्या रूपाने अधिक पैसा उभा करू देणे कधीही श्रेयस्कर ठरणार नाही. याचे कारण असे की या कंपन्यांना लोकठेवींवर अधिक व्याजाचा दर द्यावा लागणार आणि त्यांना या वर्षी लोकठेवीवरील व्याजाच्या रकमेच्या २५ टक्के रक्कम कररूपाने भरावी लागणार. ही कररूपाने भरावी लागणारी रक्कम कंपन्यांच्या खर्चाचा एक भाग म्हणून सरकार मान्य करणार नाही. ठेवी मिळवून पैसा वाढविण्यात कंपन्या यशस्वी ठरल्या तर त्यांच्यावरील खर्च वाढून आधीच असणारा कंपन्यांच्या ठेवी म्हणून घेतलेल्या पैशावरील खर्चाचा बोजा वाढणार. शिवाय या कंपन्यांना भविष्यात मिळणारा फायदा अनिश्चित आहे. आपल्या फायद्याची पातळी चलनातिरेकाच्या काळात जितकी उंच होती तितकी ती नेहमीच उंच असेल अशी अपेक्षा या कंपन्यांना करता येणार नाही.

**कोष्टक क्रमांक ८**

**जास्तीत जास्त भागभांडवल : कंपन्यांच्या कर्जाचे प्रमाण**

| कंपन्या | प्रमाण |
|---|---|
| १. खाजगी | ४·०२ |
| २. सार्वजनिक, ज्यांचे विक्रीप्राप्त भांडवल | |
| (अ) ५० लक्षाहून कमी आहे | ५·२० |
| (ब) ५० लक्ष ते १०० लक्ष आहे | २·६१ |
| (क) १०० ते १००० लक्ष आहे | २·८९ |
| (ड) १००० लक्षाहून अधिक आहे | १.६१ |

देशातील सर्व कंपन्यांनी मिळविलेल्या ठेवींचे आकडे, त्या रकमांवर त्यांना द्यावे लागणाऱ्या व्याजाचे स्वरूप व त्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम समजण्यासारखा नाही. या बाबतीतील नेमक्या माहितीच्या अभावामुळे कंपन्यांच्या अल्पकालीन गरजासाठी पैसा जमा करण्याचे जे मार्ग आहेत त्यांच्या संदर्भात लोकठेवींच्या रूपाने कंपन्या जो पैसा उभा करतात त्यांच्या परिणामाची निश्चित कल्पना येणे कठीण आहे. रिझर्व बँकेने १९७५ च्या एप्रिल महिन्यातील ३१ मार्च १९७२ पर्यंत संयुक्त भांडवली संस्थांकडे असणाऱ्या लोकठेवीची माहिती प्रसिद्ध केली होती. परंतु ही माहिती त्यावेळी अस्तित्वात असणाऱ्या एकूण कंपन्यांपैकी फक्त २० टक्के कंपन्यापुरतीच मर्यादित होती. त्यामुळे त्या कंपन्यांच्या ठेवीबद्दलच्या आजच्या व्यवहारांची आपणास काहीच माहिती मिळत नाही.

कंपन्यांच्या, ठेवी स्वीकारून पैसे मिळविण्याच्या प्रयत्नांचे आजच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतील याचा सूक्ष्म दृष्टीने अभ्यास होणे आवश्यक आहे. शक्यता फार आहे की पैसे गुंतविणारे लोक अधिक व्याजाच्या दराने आकर्षित झाले तर पैसा बँकांकडून निघून दुसऱ्या क्षेत्रात अधिकाधिक जात राहील. या शक्यतेला दोन घटनांचा आधार मिळतो. पहिली म्हणजे रिझर्व बँक ऑफ इंडियाने केलेल्या पाहणीत असे दिसते की १९७१–७२ साली बँकांचे कार्य न करणाऱ्या कंपन्यांची लोकठेवी वाढण्याची गती बँकांच्या ठेवी वाढण्याच्या गतीपेक्षा अधिक होती. दुसरी घटना म्हणजे व्यापारी बँकांनी मिळविलेल्या ठेवींच्या रकमासंबंधीची होय.

१९७४ च्या शेवटच्या तीन महिन्यात व्यापारी बँकांनी मिळविलेल्या ठेवी १९७३ च्या त्याच महिन्यात मिळविलेल्या ठेवींपेक्षा १०० कोटींनी कमी आहेत. हा काळ व वृत्तपत्रात लोकठेवी मिळविण्यासाठी मोठ्या संख्येने प्रसिद्ध होत असणाऱ्या जाहिरातींचा काळ एकच आहे. बँकांकडून पैशाचा ओघ अशा तऱ्हेने जर औद्योगिक क्षेत्रात वाहत राहिला व तो मोठ्या प्रमाणात असला तर पतवाटपाच्या निश्चित केलेल्या धोरणाला नक्कीच बाधा पोचेल.

या देशात प्रभावी पतनियोजनासाठी पैशाचा ओघ खूप विचारपूर्वक आणि ठरविलेल्या अग्रक्रमानुसार वहाणे आवश्यक आहे. शिवाय चलनातिरेकाच्या परिस्थितीत सार्वजनिक पैशाचा लोकांकडे जाणारा अनियंत्रित असा हा ओघ देशाचे आर्थिक धोरण निरर्थक करून टाकील. विशिष्ट उद्देशसाफल्यासाठी असणारे आणि दर्जेदार अशा दोन्ही प्रकारचे पतनियंत्रण याच कारणासाठी यशस्वी होणार नाही. पतनियोजनाबद्दलचा लक्षात घेण्याजोगा व बराच काळ प्रत्ययास येणारा दोष हा आहे की पतपैसा हा उद्योगधंदे चालतात त्या भागात प्रामुख्याने केंद्रित झालेला आढळतो. आज मागासलेल्या भागात अधिक पैसा वळविण्याचे धोरण सरकारने आखलेले आहे. अलिकडे मागासलेल्या भागांच्या बाबतीत सरकारच्या धोरणात हाच एक प्रकारचा स्वागतार्ह बदल झालेला दिसतो. परंतु लोकठेवींच्या मार्गाने पैशाचा उपयोग व साधनसामग्रीचा वापर फक्त जागृत उद्योगधंदे असणाऱ्या भागात झाला तर ते धोरणही यशस्वी होणार नाही.

भारतात गेली काही वर्षे चलनातिरेकाची परिस्थिती निर्माण झालेली होती. बऱ्याचशा कंपन्यांनी त्या काळात चांगले दिवस पाहिले आहेत. काहींनी तर अफाट फायदा मिळवून पुष्कळ पैसा जमविला आहे आणि आता अधिक फायदा मिळविण्याच्या विचाराने लहान लहान रकमा ठेवीच्या रूपाने गुंतवणाऱ्या लोकांना या कंपन्या अधिक व्याजाचा दर द्यावयास तयार झाल्या आहेत. परंतु कंपन्या देत असणारी ही वचने मंदीच्या काळात त्या प्रत्यक्षात उतरवतील की नाही हा एक प्रश्न आहे. कारण या ठेवी व्यवसायवृद्धीत गुंतविणे त्यांना कठीण जाणार आहे कंपन्यानी ठेवीरूपाने लोकांकडून घेतलेला पैसा त्यांना योग्य वेळी परत द्यायला भाग पाडील असे कायद्याचे कोठलेच सरक्षण लहान लहान रकमा गुंतविणाऱ्या लोकांना मिळालेले नाही.

**सरकारजवळ किंवा रिझर्व्ह बँकेजवळ कंपन्या स्वीकारीत असलेल्या ठेवींच्या पैशावर ताबा ठेवण्याचे कोठलेच साधन नाही.**

सर्वोच्च अधिकार असणारी रिझर्व बँकेसारखी संस्था या बाबतीत कंपन्यांवर कडक बंधने घालू शकेल अशीही फारशी अपेक्षा करता येत नाही. कारण रिझर्व बँकेचे धोरणही या प्रकारात ठेवी स्वीकारणाऱ्या कंपन्यांना परावृत्त करणारे आहे असे दिसत नाही. (ही गोष्ट यावरून दिसून येते की जानेवारी १९७५ पासून ४०% बाहेरील रकमावर व्याज द्यावे लागत असणाऱ्या २८ कंपन्यांना रिझर्व बँकेने लोकठेवी स्वीकारण्याची परवानगी दिली.)


चांगल्या आर्थिक व्यवहारासाठी एकीकडे कंपन्यांच्या हिताचे व दुसरीकडे ठेवी गुंतवणाऱ्या लोकांच्या हिताचे ठरावे म्हणून या ठेवीवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. थोडीशी बंधने त्यावर आहेत; उदाहरणार्थ सरकारने कंपन्यांना ठेवींवर मिळविलेल्या पैशांचा हिशोब सादर करावयास सांगून बंधन घातले आहे. १९७५–७६ च्या अंदाज पत्रकातील प्रस्तावात एका कलमाचा समावेश करून या (बँकांचे व्यवहार न करणाऱ्या व पैसा पुरवठा न करणाऱ्या) कंपन्यांवर ठेवी स्वीकारण्यास अप्रत्यक्ष रीतीने बंधन घातले आहे. त्यानुसार आता कंपन्यांनी लोकठेवीवर दिलेली ८५ टक्के व्याजाची रक्कमच त्यांचा खर्च म्हणून मंजूर केली जाईल. अलिकडे रिझर्व बँकेने कोणत्याही संस्थेने तिच्या भांडवलाच्या रकमेच्या ५० टक्के ठेवी मिळविण्याची सवलत काढून घेऊन त्या जागी ४० टक्के ठेवी घेण्याचीच परवानगी दिली आहे. कंपन्यांनी (व बँकांनीही) असले नियम मोडल्यास त्यांच्याकडून अधिक दंड घेण्याची व्यवस्था कायद्याने करण्यात आली आहे. कंपन्यांच्या ठेवी स्वीकारण्याच्या व्यवहारावर ३ फेब्रुवारी १९७५ रोजी (कंपन्यांचे ठेवी स्वीकारण्याचे) नियम करून नियंत्रण घातले आहे. परंतु ही सर्व विस्कळीतपणे लादलेली बंधने ठेवी मागवण्यापासून कंपन्यांना थांबवू शकणार नाहीत. ही सर्व अप्रत्यक्ष बंधने आहेत. कंपन्यांना ठेवी स्वीकारण्यात व लोकांना कंपन्यांना पैसा देण्यात विशेष अडचणी ही बंधने आणू शकणार नाहीत. ही बंधने कदाचित ठेवींच्या व्यवहारावर काही काळ परिणाम करू शकतील परंतु ती लोकांकडून कंपन्यांकडे वहाणारा पैशाचा ओघ थांबवू शकणार नाहीत.

आजची नियोजनबद्ध अर्थव्यवस्था चांगल्या प्रकारे चालवावयाची असल्यास संघटित अशा भांडवलाच्या बाजारामार्फत पैशावर नियंत्रण घालावयास पाहिजे. या दृष्टिकोनातून पाहिल्यास पैसा सरळ सरळ लोकठेवीतूनच पुरविण्याची ही पद्धत अयोग्य आहे. म्हणून कंपन्यांची ठेवी स्वीकारण्याची ही पद्धत नाहीशी केली तरी कोठल्याही प्रकारची स्फोटक परिस्थिती निर्माण होणार नाही. कंपन्यांचा ठेवी स्वीकारून वाढलेला पैसा लक्षात घेतला तर असे दिसते की लहान लहान रकमा गुंतवणारांना पैसा देण्याची पात्रता त्यांच्या शिलकीमधून आलेली असते. त्यांची हीच शिल्लक बँकांकडे सोपवावी असे त्यांना वाटण्यासाठी बँकांना त्यांना व्याजाचा अधिक दर द्यावयास पाहिजे.

बँकाना देखील अशा पैशाची गरज असणाऱ्या कंपन्याना नियोजित अग्रक्रमानुसार पैसा पुरवता येईल या बाबतची नको असलेली बंधने काढून टाकावयास हवीत. लोकठेवींचे चांगल्या प्रकारे नियंत्रण होईपर्यंत निदान व्यापारी बँकांनी कंपन्यांना कर्ज देताना त्यांनी ठेवींच्या मार्गाने मिळविलेल्या पैशाचे प्रमाण पाहूनच कर्ज द्यावे.

**या बाबतीत अशा प्रकारचे शिस्तबद्ध असे पतनियंत्रण अमलात आणल्यास भारताचे आर्थिक धोरण यशस्वी बनून अधिक परिणामकारक होईल.**

● ● ●

चलन वित्त बँका  विकास नियोजन

# नाणेबाजार व शेअरबाजार

**प्रा. स. अ. रानडे**

**प्रा. स. अ. रानडे ह्यांनी वाणिज्य शास्त्रावर व नाणे व्यवहारावर विपुल लेखन केले आहे. ख्यातनाम वृत्तपत्रात देखील शेअरबाजार व नाणेबाजारातील घडामोडींवर प्रकाश टाकणारी सदरे त्यांनी लिहिली आहेत. आता सेवानिवृत्त असल्यामुळे त्यांचे लेखनाचे प्रमाण कमी झाले आहे. अर्थच्या वाचकांना त्यांच्या लेखनाचा लाभ देण्याच्या दृष्टीने 'शेअर बाजार' ह्या गूढरम्य विषयाचा परिचय ह्या लेखाद्वारे करून देत आहोत.**

## १. नाणेबाजार

या बाजाराला नाणे बाजार म्हणतात पण अर्थात् तेथे होणारा व्यवहार हा हुंड्या, ड्राफ्ट वगैरेंचाच असतो. या बाजाराच्या स्थितीचा नेहमी इतर बाजारांवर परिणाम होतो.

व्यापाऱ्यांना बँकांकडून नेहमी कर्ज घ्यावे लागते. याची मुदत एक दिवस, सात दिवस, एक महिना अथवा तीन महिने अशी असू शकते. अशी लहान मुदतीची कर्जे यांना Short term loans असे म्हणतात. बँकांकडे चालू खाते Current Account यात पुष्कळ रक्कम असते पण ती मागताच मिळण्यासारखी (payable on demand) अशी हवी. तेव्हा बँका आपला पैसा तयार (liquid) रहावा व व्याज मिळावे यासाठी अशी कर्जे देतात.

बँकांशिवाय इतर लोकही अशी कर्जे देतातच. त्यांच्या व्याजाचा दर बँकांपेक्षा साधारणतः अधिक असतो. यालाच बाजाराचा व्याजाचा दर (Market rate) असे म्हणतात.

रिझर्व्ह बँक पहिल्या प्रतीचे तारण 1st rate securities घेऊन जास्तीत जास्त तीन महिन्यासाठी पैसे देते व जो दर ठरविते त्याला Bank rate म्हणतात. नाण्याची सूट असेल तेव्हा हा कमी असतो व तसाच काही कारणाशिवाय तो फिरत नाही. इंग्लंडात बँक ऑफ इंग्लंड आठवड्यात एकदा तो ठरविते. बँका याप्रमाणे या दराने रिझर्व्ह बँकेशी व्यवहार करतात.

सरकारलाही थोड्या मुदतीसाठी पैशाची जरुरी पडते व त्यासाठी सामान्यतः तीन महिन्याच्या मुदतीची बिले (treasury bills) सरकार विकते. यात व्याज नसते पण वटाव कापूनच किंमत धरावयाची असते (discount). उदा. ट्रेझरी बिले तीन महिन्यांची ९९ रु. ८ आ. ला विकली याचा अर्थ तीन महिन्यांना १०० रु. सरकार परत देणार म्हणजे ९९ रु. ८ आ. वर व्याज तीन महिन्यास आठ आणे झाले. म्हणजे व्याजाचा दर दरसाल दरशेकडा सुमारे दोन टक्के झाला.

व्याजाचा दर हा अर्थात नेहमीच दरसाल दरशेकडा टक्के (per annum) मोजला जातो. सरकार सामान्यतः आठवड्यातून एकदा ट्रेझरी बिल्स् विक्रीस काढते, पण कित्येकदा दोन तीनदा पण काढतात. कित्येकदा ती सहा महिने अथवा नऊ महिन्यांची पण असतात. ट्रेझरी बिल्स्‌वरून नाणे विपुल आहे अथवा स्वस्त आहे की त्याची टंचाई आहे अथवा ते महाग आहे याचा बोध होतो. स्वस्त पैसा (Cheap Money) याचा अर्थ पैसा भरपूर आहे व त्या प्रमाणात मागणी नाही. म्हणजे कमी व्याजाने पैसे मिळतात; व्याजाचा दर कमी होतो. उलट पैशाचा पुरवठा कमी व मागणी जास्त असली म्हणजे व्याजाचे दरही कडाडतात.

सरकार जी जादा ट्रेझरी बिले काढते ती ज्या दराने वटविली जातात त्या दरास tap rate असे म्हणतात.

वर जी एक दिवसाची कर्जे सांगितली त्यांना call money असेही म्हणतात. सात दिवसांचे कर्ज म्हणजे

seven day's loan, अर्थात एका दिवसापेक्षा यांचा व्याजाचा दर थोडा जास्त असतो.

## परदेशाशी व्यवहार

(Bill of exchange) परराष्ट्रीय हुंडी:– परदेशात माल पाठविताना पैसे पुढे मिळावयाचे असतात व त्यामुळे माल पाठविणारा व्यापारी (Exporter) माल घेणाऱ्या व्यापाऱ्यावर (Importer) किंमती हुंडी काढतो व ती त्याने स्वीकारल्यावर देशातील हुंडीप्रमाणेच बँका व इतर लोक त्यांचे व्यवहार करतात. ही हुंडी सामान्यत: तीन महिन्यांची असते. अशा खाजगी हुंड्यांना Traders' bills असे म्हणतात व बँकांच्या अशा हुंड्यांना Bankers' bills असे म्हणतात.

अशा रीतीने जे पैसे भरावयाचे ते बँकेमार्फत भरता येतात व बँक असा चेक पोस्टाने पाठविते. यालाच Mail transfer असे म्हणतात. पण असेच पैसे जर तारेने पाठविले तर त्याला Telegraphic transfer असे म्हणतात.

परदेशातील देणे चुकते करण्याचा तिसरा मार्ग म्हणजे सोने पाठविणे अर्थात या मार्गाचा अवलंब क्वचित होतो, कारण सोने पाठवून तेथे मिळणारे पैसे, वजा पाठविण्याचा खर्च यापेक्षा एक्सचेंजचा दर सामान्यत: जास्त असूच शकत नाही.

ज्या तऱ्हेने पैसे पाठवावयाचे त्याप्रमाणे खर्च कमी जास्त येतो. तारेने पैसे पाठविणे हा सगळ्यात खर्चाचा मार्ग. त्यानंतर दर्शनी हुंड्या (Payable on sight) यात हुंडी दुसऱ्या देशात पोचेपर्यंतच्या दिवसाचे व्याज बँकेला मिळते, तेव्हा हा दर पहिल्यापेक्षा स्वस्त असतो. काही बिले यापेक्षा अधिक १० दिवसातच पिकतात (Mature), ती दर्शनी हुंड्यांपेक्षा थोडी जास्त स्वस्त असतात.

या नंतरचा प्रकार म्हणजे तीन महिन्यांच्या हुंड्या या अर्थात विशेष स्वस्त असतात.

बँका परदेशाच्या हुंड्या घेताना (Buying rate) व विकताना (Selling rate) एकच दर देत नाहीत हे उघडच आहे. या दोन दरातील फरक हा बँकेचा नफा होय. या धंद्यातही भविष्याविषयी सूक्ष्म विचार करून धंदेवाईक दृष्टीने खरेदी विक्री करणारे लोक असतातच व या फरकांचा सर्व बाजारावर हटकून परिणाम होतो अर्थात हा फरक सामान्यत: होतच नाही हेही तितकेच खरे.

एका देशात दुसऱ्या दोन देशातील एक्सचेंजचा भाव घेतला म्हणजे तो क्रॉस रेट (Cross rate) झाला. उदा० ४.५ डॉलर= १ पौंड हा लंडनचा भाव आपल्या दृष्टीने क्रॉस रेट आहे

अशा रीतीने निरनिराळ्या बाजारात निरनिराळे दर असले तर त्यांचा सूक्ष्म अभ्यास करून निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे व्यवहार करून फायदा मिळविता येतो. त्याला Stranding असे म्हणतात. कल्पना करा का लंडनला ४.५ डॉलर्स = १ पौंड, न्यूयॉर्कला १ डॉलर = ३ रु. व मुंबईला १ पौंड = १३$\frac{1}{3}$ रु. असा भाव आहे. तर लंडनला काही पौंडांचे डॉलर्स घेऊन न्यूयॉर्कला त्यांचे रुपये घेतले व मुंबईला पुन्हा त्याचे तेवढेच पौंड घेतले तर १३$\frac{1}{2}$–१३$\frac{1}{3}$=$\frac{1}{6}$ रु. पौंडामागे नक्की नफा आहे.

## २. शेअर बाजार

शेअर बाजारात दोन प्रकारचे शेअर्स असतात. (१) Forward list वायद्यातील शेअर्स व (२) Cash list रोकड शेअर्स.

वायद्यातील शेअर्स याचा अर्थ त्यांची डिलिव्हरी ज्या दिवशी सौदा होतो त्याच दिवशी द्यावी अथवा घ्यावी लागत नाही, तर ठरलेल्या दिवशीच डिलिव्हरी घेता येते अथवा देता येते. ज्या दिवशी हे होते त्यास Settlement day असे म्हणतात. प्रत्यक्ष ज्यांना डिलिव्हरी घेणे अगर देणे आहे त्यांना ती त्याच दिवशी देता येते. सामान्यत: या वायद्याची मुदत एक महिना असते. परंतु चालू वायद्यातील सौदे पुढील वायद्यातही नेता येतात.

यालाच बदला करणे (Carry forward) असे म्हणतात. उदा० अ ने १४ जानेवारी १९७६ ला वायद्यात एक बांधे डाइंग घेतला. तो ब ने विकलेला आहे. २८ जानेवारीला Settlement day आहे. अ ला मालाची डिलिव्हरी घ्यावयाची नाही. व ब ला द्यावयाची नाही. तर दोघांनाही पुढील वायद्यात आपले सौदे नेता येतात. याबद्दल कोणास तरी बदला (Carry forward charges) द्यावा लागतो. डिलिव्हरीत पुष्कळ माल असेल व घेणारे कमी असतील तर तो बदला अ ला द्यावा लागेल. अशा वेळी बदला तेजीवाल्यांच्या विरुद्ध आहे (Against the bulls) असे म्हणतात.

या उलट घेणारे पुष्कळ व माल थोडा असेल तर विकणारांना म्हणजे मंदीवाल्यांना बदला द्यावा लागेल. अशा वेळी बदला Against the bears आहे असे म्हणतात.

तेजीवाले (Bulls) म्हणजेच विकत घेणारे असतात (Buyers) हे उघडच आहे. त्यांना भाव वाढेल असे वाटते म्हणूनच ते शेअर्स घेतात. या उलट माल विकणारे भाव

घटेल या आशेनेच विकतात. तेव्हा मंदीवाले म्हणजे विकणारे (Sellers) असेही म्हटले तरी चालेल.

या सर्व बाजारात खोटी विक्री व खोटी खरेदी होतेच. म्हणजे विकणाऱ्याजवळ माल नसतो अथवा असला तरी त्याची डिलिव्हरी देण्याची इच्छा नसते. या उलट घेणाऱ्यांचे जवळही पैसा नसतो अथवा असला तरी डिलिव्हरी घेण्याची इच्छा नसते. अशा लोकांच्या सौद्यासाठीच बदला महत्त्वाचा असतो.

कंपनीचे शेअर्स अ ने ब ला विकले म्हणजे ते ब च्या नावावर चढवावे लागतात. यालाच Transfer असे म्हणतात. कोणत्याही कंपनीची वार्षिक सभा असली म्हणजे आधी रिपोर्ट प्रसिद्ध होतो व वार्षिक सभेपूर्वी १५।२० दिवस Transfer Books बंद असतात. अशा वेळीही बाजारात सौदे होतात तें ( cum dividend ) डिव्हिडंड अथवा हक्कासह होतात. म्हणजे जाहीर झालेले डिव्हिडंड शेअर्स घेणारांना मिळते. उदा. अ ने एक टाटा डिफर्ड २० जुलैला ब ला २४४५ ला विकला व तेव्हा डिव्हिडंड १२५ जाहीर झालेला आहे. पण कंपनीचे ट्रान्सफर बुक बंद आहे. तेव्हा तो शेअर घेणेस आज २४२५ – १२५ = २३०० रु. च द्यावे लागतील. कारण शेअर ( cum dividend) विकलेला आहे. पण ३ ऑगस्टला जर ट्रान्सफर बुके पुनः उघडत असतील तर त्यादिवशी व नंतर होणारे सौदे ( ex–dividend ) डिव्हिडंड शिवाय समजले जातात. उदा. ३ ऑगस्टला २४०० रु. स वरील सौदा झाला तर घेणाराला डिव्हिडंड मिळत नाही.

याप्रमाणेच कित्येकदा जुन्या कंपन्या नवीन शेअर्स काढतात व ते काही अटीवर जुन्या भागीदारांना ( Share holders) देतात. त्याचीही तारीख ठरलेली असते. असे समजा की कोहिनूर मिलने जुन्या शेअर होल्डरांना दरेक शेअर मागे एक नवीन शेअर देणेचे ठरविले व १५ मार्च ही त्याची तारीख आहे. म्हणजे १५ मार्चला ज्यांचीं नावे शेअर होल्डर म्हणून आहेत त्यांनाच नवीन शेअरचा लाभ मिळेल. तेव्हा १५ मार्च पर्यंत होणार सौदे हक्कासह ( Cum rights ) होतील व नंतरचे हक्क बाद ( Ex–rights ) होतील. अशा वेळी प्रथम "हक्कासह" असताना भाव जास्त असतो व पुढे तो कमी होतो.

## बाजारातील चढउतार

हा चढउतार रोजच्या रोज होतच असतो व तो दररोजचा, आठ दिवसांचा अथवा महिन्याचाही दर्शविता येतो. उदा. एक दिवस टाटा डिफर्डच्या भावात खालील प्रमाणे फेरफार झाले तर तो असा दाखविण्यात येईल. टाटा डिफर्ड :– (२७५०) २८००, २८२७, २८५०, २९००, २८८०, २८७०.

ह्यात कंसातील भाव त्याचे आदले दिवशीचा बंद भाव आहे ( २७५० ). सुरवातीचा भाव २८०० आहे ( opening rate ) व शेवटचा भाव ( २८७० ) बंद भाव ( Closing rate ) आहे. मधील भाव त्या दिवशीचे मधले भाव आहेत. आदल्या दिवशीच्या बंद भावापेक्षा जास्त भाव उघडताना असला म्हणजे "बाजार मजबूत उघडला" ( opened strong ) व कमी असला म्हणजे "बाजार नरम उघडला" ( opened weak ) असे म्हटले जाते. दैनिक चढघट जेव्हा होते अथवा दैनिकात जेव्हा असले मथळे आपण वाचतो तेव्हा त्यांचा संदर्भ फक्त कालच्या भावाशीच असतो हे ध्यानात ठेवले पाहिजे. उदाहरणार्थ, परवा डिफर्ड २७०० वरून २४०० बंद राहिला. काल २५०० उघडत २६०० झाला; तरीही आजच्या दैनिकात shares opened strong "शेअर बाजारात मजबूत उघडला" असेच येणार.

बाजार मजबूत उघडून पुढे घटला, बंद भाव उघडत्या भावापेक्षा कमी राहिला तर "बंद बाजारचे धोरण नरम होते" ( Closed weak ) असे म्हटले जाते.

या सर्व बाजारांचे कामाचे तास ( working hours ) ठरलेले असतात. त्यानंतर दरेक बाजार नियमपूर्वक अधिकृत रीतीने (Officially) बंदच असतो. म्हणजे ठराविक वेळेसच दरेक बाजाराची सौद्याची जागा ( Ring ) उघडी असते व ती वेळ संपली म्हणजे तेथे सौदे (Transaction) होत नाहीत. पण सट्टेबाजारात नियमच लागू नसतात. तेव्हा ते इतरत्र बाजाराच्या बाहेर वाटेल तेथे सौदे करतात. हे सौदे नियमबाह्यच असतात. आणि कोणताही बाजार ते मान्य राखीत नाही. पण सट्टेबाजार हे कायदेशीरपणापेक्षाही एकमेकांच्या विश्वासावरच चालतात. युद्ध कालात अशा सौद्यांचे प्रमाण फारच वाढले. यांना खाजगी सौदे ( Private transactions) असे म्हणतात. यामुळे बाजार बंद झाल्यानंतरचे भाव "खाजगीत भाव मजबूत होता." अथवा "खाजगीत भाव नरम होते" असे म्हटले जाते. ( In private, the market was strong अथवा weak).

बाजारात तेजीवाले (Bulls) आणि मन्दीवाले (Bears) हे दोन पक्ष असतात. हे वर आलेच. अर्थात् हे पक्ष कायमचे नसतात. कारण घेणारा केव्हा तरी माल विकतोच व विकणारा केव्हा तरी घेतोच. अशा रीतीने खरेदी विकून टाकली अथवा

विकलेला माल खरेदी केला म्हणजे " सौदा सारखा झाला " असे म्हणतात. म्हणजे त्या धंद्यापुरती आपली जबाबदारी संपते; अर्थात् त्यामधील नफा आपणास मिळतो, अथवा नुकसान असले तर भरून द्यावे लागते

अशा रीतीने तेजीवाले जेव्हा माल विकतात, तेव्हा " तेजीवाल्यांची विक्री ' होते. (Unloading by the bulls). ही विक्री खूप असली तरी " विक्रीचा मारा " ( Selling pressure) होतो. या उलट " विक्रीवाल्याची खरेदी " झाली म्हणजे Covering by the bears असे म्हटले जाते यात कोणत्याही भावात सौदा करण्याचे धोरण असले तर nervous हे विशेषण लावण्यात येते (Nervous unloading of the bulls) = तेजीवाल्यांची घबराटपूर्वक विक्री, (Nervous covering of the bears) = मंदीवाल्याची घबराटपूर्वक खरेदी

अर्थात् बाजारात नेहमी वधघट होतेच असे नाही. कित्येकदा अगदीच सामान्य फेरफार होतात डिफर्डसारख्या शेअरमध्ये ५-१० रु. कमी जास्त होणे म्हणजे काहीच नाही. अशा वेळी बाजार पडून आहे ( Market is dull ) असे म्हणतात. बाजारात धंद्याचे प्रमाण कमी असले तर the Business is restricted असे म्हणतात

एखाद्या वेळी बाजारात भयंकर वधघट अथवा तोफानी वधघट अथवा कारमी वधघट होते (Very great Fluctuations . अशा वेळी एका दिवसातही भाव पुष्कळ वाढतात, कमी होतात, पुन: वाढतात अथवा या उलटही होते म्हणजे तेजी समजून घेणारे अथवा मंदी समजून विकणारे यांना दोन्हीकडून नुकसान येते. हे नुकसान विशेषत: तारवणी वाल्यांनाच (Jobbers) जास्त येते.

रोजच्या रोज सौदे सारखे करणे याचे नाव तारवणी (Jobbing) बाजार उंच उघडला तेव्हा तेजीच्या आशेने ते घेतात व १०।२० रु. नफा मिळाला की लागलीच विकतातही. बाजारात तारवणी स्वरूपाचा धंदा करणाऱ्यांची संख्या खूप वाढली व खरे खरेदी विक्री करणारे अगदीच थोडे असले तर बाजारात वधघट थोडीच होते, पण तो झडपी (Fast) होते. कारण तेजीत तारणवाले एकदम (In a body) घ्यावयास येतात व एकदमच मंदीत विकणेसही येतात.

असली तारवणी सामान्यत: दलाल (Brokers) अथवा उप-दलाल (Sub-brokers) * करतात. कारण त्यांना दलाली द्यावी लागत नाही अथवा फारच थोडी (Nominal) द्यावी लागते. बाहेरच्या माणसाला ती द्यावी लागते. त्यामुळे त्याला तारवणी फारशी लाभकारक होत नाही

शेअर्सच्या धंद्यात पैसा प्रत्यक्ष गुंतविणारे (Investors) आणि सट्टा करणारे 'Speculators) असे दोन प्रकार पडतात. पैसे गुंतविणारा जेव्हा शेअर्स घेतो अथवा विकतो तेव्हा तो डिव्हिडंड, (Dividend) कंपनी शेअरवर जो नफा देते तो, खाण्याच्या आशेने घेतो अथवा पुढे भाव खूप घटतील अशा आशेनेच विकतो. तात्कालिक नफा-नुकसानीचा तो विचार करीत नाही. यामुळे तो दूरवरचा विचार ( Long term factors ) करतो आणि नजीकच्या फेरफारांचा विचार करीत नाही. या उलट सट्टेबाजाला नजीकच्या भविष्याचा (Short term factors ) विचार करावा लागतो. पैसा गुंतविणाऱ्याजवळ स्वत:च्या व्यापाराइतका पैसा अथवा माल असतो; पण सट्टेखोराजवळचे भांडवल तसे नसते अथवा असले तरी त्याची दृष्टी नसते. अर्थात हेही काही अगदी निराळे विभाग नव्हेत. काही शेअर्समध्ये तुम्ही सट्टेबाज असाल तर इतर काही शेअर्समध्ये तुम्ही पैसे गुंतविणारेही असाल.

## शेअर्स, डिबेंचर्स डिपॉझिटे वगैरे

कंपनी निघते तेव्हा ती अनेक प्रकारचे शेअर्स काढते. त्याची पुरी माहिती असणे आवश्यक आहे.

( Prefetence shares ) प्रेफरन्स म्हणजे अग्रहक्काचे शेअर्स. सामान्यत: यांचे व्याज नक्कीच असते. पण त्यात पुन: Cumulative = एकदर व्याज मिळणारे, non-Cumulative = ज्या वर्षी नफा होईल त्याच वर्षी देणारे, Cumulative participating = निश्चित व्याज मिळून पुढे जादा नफा देणारे, non-Cumulative participating = नफा होईल त्याच वर्षी निश्चित व्याज देऊन शिवाय जादा नफा देणारे, non-redeemable = परत मुद्दल न देणारे, redeemable = परत भरपाई होणारे, Taxable = करपात्र, non-taxable = कर मुक्त, असे अनेक प्रकार आहेत. खालील कल्पित उदाहरणावरून हे स्पष्ट होईल.

वेस्ट कॉटन कं. चे १० लाखांचे एकूण शेअर्स आहेत; पैकी एक हजार शेअर्स ५ टक्के चे करमुक्त ( tax free ) क्युम्युलेटिव्ह, १९७० मध्ये मूळ किंमत परत देण्याच्या बोलीचे ( Redeemable at par in 1970 ) दरेक १०० रु. चा असे आहेत म्हणजे त्यावर ५ टक्के व्याज मिळेल व ते करमुक्त असेल म्हणजे त्यावरील प्राप्तीवरील कर भागीदारांच्या वतीने कंपनी सरकारात भरील व नंतर भागीदारांस योग्य ती रक्कम सरकारकडून परत मिळू शकेल. कंपनीस चार वर्षे नफा झाला नाही तरी पाचव्या वर्षी जो नफा

होईल त्यातून ४ + १ = पांच वर्षाचे व्याज-वीस रुपये करमुक्त, भागीदारांना प्रथम मिळेल. अशा शेअर्सची किंमत १००० × १०० = एक लाख रु. होते. १९७० मध्ये कंपनी मूळ किंमतही परत देईल व शेअर्स रद्द होतील.

याशिवाय १०० चा एक असे हजार ( Non Cumulative ) ६ टक्के ( tax free participating ) शेअर्स आहेत असे समजा.

यात ज्या वर्षी नफा होईल त्याच वर्षी ६ टक्के व्याज नक्की मिळणार म्हणजे व्याज ( अनेक वर्षांचे ) साचू शकत नाही. ( नॉनक्युम्युलेटिव्ह ); पण ते पुढेही नफ्यात भाग घेणारे ( Participating ) आहेत म्हणजे त्यानंतर ऑर्डिनरी शेअर्सना अमुक टक्के ( उदा. आणखी ४ टक्के ) त्यांना मिळतो हा भाग किती टक्के व काय अटीवर मिळतो हे दरेक कंपनी निरनिराळ्या रीतीने ठरविते.

याशिवाय ५॥ टक्के करमुक्त १०० चा एक असे क्युम्यु. प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकी १०० चा असे १००० आहेत. पहिले शेअर्स व हे यात एकच फरक आहे. त्यांचे मुद्दल कधीच परत होणार नाही, व्याज नेहमी मिळत राहील.

हेच शेअर्स करपात्र असतील तर त्यावरील प्राप्तीवरील कर कापून व्याज हातात पडते एवढाच फरक आहे.

ऑर्डिनरी ( Ordinary ) शेअर्स = सामान्य शेअर्स,. हा शेअर्सचा नेहमीचा प्रकार आहे. यात इतर देणी वगैरे पुरी झाली म्हणजे सर्व नफा त्यांनाच मिळतो. अर्थात वाईट दिवसात नुकसानीचा परिणाम त्यांनाच सोसावा लागतो.

डिफर्ड ( Deferred ) हा शेअर्सचा तिसरा प्रकार आहे. ( Deferred ) म्हणजे तहकूब. प्रेफरन्स, ऑर्डिनरी वगैरेंना नफा दिल्यावरच त्यांना नफा मिळतो. असले शेअर्स फारच थोडे असतात. झाला तर नफा फारच दिसतो व वाईट दिवसात त्यांचा कोणी भावही विचारीत नाही.

**डिबेंचर्स** ( Debentures ) :— यात व्याजाचा दर व मूळ रक्कम केव्हा परत मिळणार हे नक्की असते. सरकारी मुदतीच्या कर्जरोख्यांचे व त्यांचे स्वरूप सारखेच असते. सामान्यत: ती करपात्र असतात. शेअर्सच्या आधी त्यांचा कंपनीच्या मालमत्तेवर हक्क असतो. यात व्याजाचा दर नक्कीच असतो.

नेहमीच व्यवहारासाठी मराठी कंपन्या ठेवी (Deposits) स्वीकारतात. ठेवी व डिबेंचर यात फेर एवढाच की, डिबेंचर्सची मुदत वगैरे ठरलेली असते. पण ठेवी निरनिराळ्या मुदतीच्या असतात व असू शकतात.

एकदा शेअर्स काढल्यानंतर पुढे १०।२० वर्षांनी पुनः शेअर्स काढले तर त्याला नवीन भांडवल ( New issue ) असे म्हणतात. पहिले प्रेफरन्स असले व नवीन पुनः काढले तर त्यांना दुसरे ( Second ) प्रेफरन्स शेअर्स असे म्हणतात. अग्रहक्क अर्थात जुन्या म्हणजे पहिल्याचाच हे उघडच आहे.

## कंपनीची स्थापना

कंपनीची स्थापना म्हणजे Incorporation. या वेळी Memorandum of Association व Articles of Association वगैरे कंपनीच्या रजिस्ट्रारकडे दाखल होतात. Prospectus म्हणजे माहितीपत्रक. यात कंपनीचे डायरेक्टर्स, बँकर्स कायद्याचे सल्लागार, हिशेबतपासनीस, मुख्य कचेरी, मॅनेजिंग एजंटस् वगैरेंची माहिती द्यावी लागते. डायरेक्टरांत Ex–officio डायरेक्टरही असतात – म्हणजे ते निःपक्ष नसतात. पण मॅनेजिंग एजन्सीशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध असतो. मेमोरँडममध्ये कंपनीचे मुख्य उद्देश वगैरे असतात व आर्टिकल्समध्ये कंपनीच्या सभांचे नियम वगैरे असतात.

कंपनी सुरू झाली म्हणजे तिची Statutory सभा होते. या वेळी कंपनीचे शेअर्स वगैरे किती खपले याचा आढावा देण्यात येतो. कंपनीच्या स्थापनेस प्राथमिक खर्च (Preliminary Expenses) येतो. कित्येकदा दुसरा कोणी कंपनीचे शेअर्स विकण्याची हमी घेतो ( Under write ) त्यास हमी ( Under writer ) असे म्हणतात. अर्थात त्यात त्याला कमिशन मिळते; पण शेअर्स नच खपले तर बाकीच्या शेअर्सची किंमत संपूर्ण भरण्याची जबाबदारी पण येतेच. कंपनीच्या वार्षिक सभेस Annual general meeting असे म्हणतात. पण अशी खास सभा असली तर तिला Extra ordinery meeting असे म्हणतात.

रिपोर्टात डिव्हिडंडची तारीख दिलेली असते. त्यापूर्वी पण रजिस्टर बंद असताना जरी शेअर घेतला तरी डिव्हिडंड मिळण्याच्या हक्कासह तो मिळतो (With dividend). म्हणजे घेणारास खरेदी किंमतीत ते पैसे वजा करून पैसे भरावे लागतात हे वर आलेच आहे.

हजर माल ( Ready goods ) :– या सर्व बाजारातून हजर माल हा शब्दप्रयोग ऐकू येतो. बाजारावर हजर मालाचा बोजा फार आहे, बाजारात हजर मालाची तंगी आहे हे रूढ शब्द प्रयोग आहेत. वायद्यात सामान्यतः खरेदी विक्री करणारांच्या जवळ हजर माल नसतोच. पण हजर मालवालेही

वायद्यात विकण्यास येतातच. ते वायद्यात विकतात तेव्हा ते डिलिव्हरी देतील अशीच अपेक्षा असते व त्या दृष्टीने घेणाराची तयारी हवी. पण असा हजर माल पुष्कळसा आला व त्या मानाने घेणारे नसले म्हणजे मंदी होते अथवा बाजार फार उंच जाणे कठीण असते. उदा. बाजारात २२०० डाइंगचे शेअर्स डिलिव्हरीत घेण्यासारखे आहेत व सट्टा २५०० शेअर्सचाच आहे. तर २२०० शेअर्सची किंमत भरून ते घेण्याची खरेदीदाराची तयारी पाहिजे. अशा वेळी घेणारे हजर मालाच्या बोजापुढे टिकत नाहीत व जे थोडे टिकतात त्यांना चांगलाच बदला विकणारांना द्यावा लागतो. अशा वेळी बदला सोधा अथवा 'अंदर' झाला असे म्हणतात. सोधा बदला मंदीवाल्यांना अथवा विकणारांना मिळतो; अशा वेळी मार्केटची स्थिती सामान्यत: (Overbought) अधिक खरेदीदारीची असते हे उघडच आहे.

या उलट खरेदीवाले फार व विकणारे कमी असले म्हणजे जो थोडा हजर माल येतो तो चटकन पैसे भरून लोक घेतात व खोटी विक्री करणारांना उलट खरेदीदारांनाच बदला द्यावा लागतो अशा वेळी बदला 'उलटा' अथवा 'उपर' आहे असे म्हणतात हा बदला तेजीवाल्यांना मिळतो. युद्धकालात अनेक वर्षे असा बदला तेजीवाल्यांना सोने चांदीत मिळत होता.

## बँकांचे व कंपन्यांचे रिपोर्ट

बँकांच्या व्यवहारातही अनेक पारिभाषिक शब्द येतात एखाद्या बँकेचा रिपोर्ट घेतला तर ते विशेष स्पष्ट होतील म्हणून असा एक काल्पनिक रिपोर्ट खाली घेतला आहे.
भांडवल व देणे.

### दि सिल्व्हर बँक लि. मुंबई

| | |
|---|---|
| एकंदर भांडवल–एक लाख शेअर्स प्रत्येकी १०० रु. (Authorised). | |
| विक्रीस काढलेले भांडवल (Issued) प्रत्येकी १०० रु. चे ५० हजार शेअर्स. | |
| खपलेले भांडवल:– १०० रु. चे ४० हजार शेअर्स (Subscribed) | |
| भरलेले भांडवल (Paid up) ४० हजार शेअर्सवर प्रत्यकी ५० रु. प्रमाणे. | २० लाख |
| वजा–मागणी ( Calls ) चे न भरलेले पैसे– | १ लाख |
| | १९ लाख |
| रिझर्व्ह फंड | ७ लाख |
| बुडीत रकमेसाठी फंड (Sinking) | ४ लाख |
| जमा व घेणे. | |
| रोकड (Cash) | २ लाख |
| सरकारी कर्जरोखे (At cost) (खरेदी किंमत) | ३० लाख |
| इतर बँका वगैरेचे (At cost) प्रेफरन्स शेअर्स | ७१ लाख |
| इतर येणे (cash credit), over Draft. मालावर पैसे वगैरे) | ३७ लाख |
| बँकेच्या इमारती. | ८ लाख |
| माल वगैरे ( तिजोऱ्या, टेबले ) | २ लाख |
| इतर स्टेशनरी वगैरे | ३ लाख २२ हजार |
| डिपाझिटे:— मुदतीची ( fixed ) चालू खाते ( current ). सेव्हिंग बँक खाते, व इतर खाती | १ कोटी २० लाख |
| बिलसवरील परती ( Rabate ) | १ लाख |
| न मागितलेले डिव्हिडंड | ५० हजार |
| ड्राफ्ट वगैरेचे देणे | २ लाख २० हजार |
| किरकोळ देणें ( Sundries ) | ५५ हजार |
| नफा तोटा— गेल्या वर्षाची बाकी, Balance brought forward | १ लाख २ हजार |
| चालू वर्षाचा निव्वळ नफा | १२ लाख ३० हजार |
| एकूण– | १ कोटी ६७ लाख. |

या रिपोर्टशिवाय केवळ एक वर्षाचा नफा तोटा दाखविणारे वेगळे पत्रक असतेच. कित्येक कंपन्या त्या आकड्यां बरोबरच पाठीमागच्या वर्षाचे तेच आकडे देतात. यामुळे भागीदारांना कंपनीची स्थिती कशी काय बदलली याची चांगली कल्पना येते.

रिझर्व फंड :–म्हणजे गंगाजळी. ही रक्कम विशेषत: आपत्तीच्या वेळी उपयोगी पडावी म्हणून असते ती अर्थात रोकड असावी हा अर्थ अभिप्रेत असतो

## कंपन्यांचे रिपोर्ट

यातही जमा व खर्च अशा दोन बाजू असतातच. त्यात खालील गोष्टी सर्वसामान्य महत्त्वाच्या असतात.

### भांडवल व देणे

भरलेले भांडवल, रिझर्व फंड, घसारा फंड, इतर फंड, कराकरिता रिझर्व, डिव्हिडंडसाठी फंड (Dividend Equa-

lization fund), इतर घेतलेली कर्जे, इतर देणी, नफा अगर तोटा.

## मालमत्ता व देणे

एकंदर कायम खर्च (fixed capital expenditure), मालसामान (Store), येणे, रोकलेले भांडवल (Investments), इतर येणे, रोकड व इतर शिल्लक.

याशिवाय चालू वर्षाचे नफा तोटा पत्रक असतेच. कंपन्यांची रजिस्टर बुके काही दिवस वार्षिक सभेपूर्वी बंद असतात. म्हणजे ती बंद होताना ज्यांची नावे रजिस्टरात असतात त्यांनाच डिव्हिडड मिळतो. कित्येक लोक शेअर्स घेतात पण ते नावावर चढवीत नाहीत (transfer). यात त्यांचा नावावर चढविण्याचा खर्च (transfer fee, stamp duty) वगैरे वाचतो. अशा शेअर्सना कोरे शेअर्स (Blank transfer) म्हणतात. अर्थात कंपनीच्या रजिस्टरात नाव नसेल तर त्यांना डिव्हिडंड मिळत नाही.

## नफातोटा पत्रक Profit & Loss A/C

ताळेबंदाबरोबरच (Balance Sheet) त्या वर्षाचे नफा तोटा पत्रक (Profit & Loss Account) जोडलेले असते. त्यात जमा व खर्च अशा दोन बाजू असतात; काही माल बनविण्याचा धंदा असेल तर जमाखर्चाच्या मुख्य रकमा (Items) खालीलप्रमाणे असतात.

जमा (Credit)

By Sales (मालविक्रीची किंमत)
By Stock (शिल्लकी माल)
Transfer Fee (ट्रान्सफर फी)
Miscellaneous (किरकोळ)

खर्च

Manufacturing expenses = मालाचा उत्पादन खर्च
Salaries & wages = पगार व मजुरी.
Establishment Expenses = कचेरी खर्च.
Brokerage on Sales = विक्रीवर कमिशन.
Managing Agents Commission = मॅनेजिंग एजंटाचे कमिशन.
Directors Fees etc. = डायरेक्टरांची फी वगैरे.
Printing & Advertising = छपाई व जाहिरात.
Sundry Expenses = किरकोळ खर्च.
Balance carried to the balance sheet = ताळेबंदात नेलेली रक्कम (नफा अथवा तोटा) उत्पादन खर्च एकत्र न दाखविता वेगवेगळाही दाखवितात. उदाहरणार्थ– कापडाची मिल असेल तर कापूस, रंग, कोळसा, मजुरी वगैरे वेगवेगळी दाखविता येतील काही कंपन्या चालू सालच्या आकड्याबरोबरच मागील वर्षाचे आकडे देतात. त्यामुळे दोन्ही वर्षांची तुलना सहज करिता येते टाटाच्या कंपन्या तर असे निरनिराळ्या वर्षांचे आकडे देतात त्यामुळे कंपनीची प्रगति स्पष्ट होते.

कंपनी नवीन निघते तेव्हा अर्ज (application), अर्ज-मंजुरी (allotment) व नंतर मागणी (calls) अशा रीतीने पैसे घेण्यात येतात. सामान्यतः यात नेहमी तीन तीन महिन्यांचे अंतर असते सामान्यतः एका वर्षात असे पैसे भरावे लागतात. कित्येकदा शेअर्सची संपूर्ण किंमत कंपन्या कधीच वसूल करत नाहीत. अशा शेअर्सना अपुरे भरलेले म्हणतात (partly paid); विमा कं. व बँका यांचे शेअर्स पुष्कळदा असे असतात. हेतु हा की अडचणीच्या वेळी बाकीची रक्कम मागता यावी. चांगल्या कंपन्या कित्येकदा नवीन शेअर्स जादा रक्कम घेऊन (premium) काढतात अशा वेळी ते प्रीमि-अम घेऊन मिळणार आहेत असे म्हणतात (issued at a premium). कित्येकदा रिझर्व फंड मोठा असला तर त्यातून असे शेअर्स फुकट मिळतात (bonus shares). एकच कंपनी धंद्याची सोय व्हावी म्हणून निरनिराळ्या स्वतःच भांडवल पुरवून लहान लिमिटेड कंपन्या (subsidiary) काढते व ताळेबंदात त्यांचा ताळेबंदही सामील करावा लागतो.

• • •

# आयुर्विमा ग्राहकांचे संघटन आवश्यक नाही का ?

कोशकार श्री. ग. रं. भिडे

श्री. भिडे यांनी एकट्याच्या हिमतीवर ज्ञानकोशाच्या कार्याची केतकरी परंपरा जिद्दीने चालू ठेवली आहे. ते लेखक, साहित्यिक, टीकाकार व कोशकार म्हणून सुप्रसिद्ध आहेतच, पण विमा व्यवसायाशी त्यांचा फार घनिष्ठ संबंध आहे हे फारसे ज्ञात नाही. श्री. भिडे ह्यांनी विमा प्रतिनिधी ( L. I. C. Agent ) व विमा विकास अधिकारी ( Development Officer ) ह्यांच्या कार्याचा अनुभव घेतला आहे. विमा व्यवसायाला इष्ट प्रगती प्राप्त करण्याकरिता काही नव्या सुधारणांची गरज आहे. ह्यातील एक म्हणजे विमा ग्राहक संघटना. ह्या बाबतीतले त्यांचे हे विचार—

'अर्थ' मासिकाच्या संपादकांनी आयुर्विमा विशेषांक प्रसिद्ध करून व विशेषत: नाण्याच्या दोन्ही बाजू समाजापुढे आणून फार मोलाची कामगिरी बजावली आहे. समाजामध्ये लाखो विमेदार असताना ह्या राष्ट्रीकृत व्यवसायामध्ये विमेदारांच्या रास्त अपेक्षा समजावून घेण्याची कोणतीही यंत्रणा नसावी हा दुर्दैवाचाच भाग आहे ग्राहकाला एखाद्या दुकानदाराकडून वाजवी दराने वा चांगला माल मिळत नसेल तर दुसरे दुकान गाठता येते. अगदी नित्य गरजेची टूथपेस्ट खपविण्यासाठी निरनिराळ्या कंपन्या आपल्याच मालाची विक्री वाढावी म्हणून थेट ग्राहकांशी संपर्क साधून त्यांच्या आवडी नावडी लक्षात घेऊन त्याप्रमाणे आपल्या मालाचा दर्जा, रंग, रूप बदलतात. निरनिराळ्या बँका समाजाची गरज निरनिराळ्या सर्व्हे द्वारा घेऊन त्याप्रमाणे आपल्या 'बचत योजना' मध्ये बदल करून ग्राहकांशी संपर्क साधताना दिसतात. परंतु नाईलाजाने आयुर्विमा महामंडळाची आवडती घोषणा 'आयुर्विम्याला पर्याय नाही' थोडया वेगळ्या अर्थाने वाचण्याची वेळ आयुर्विमा ग्राहकावर येते. ह्याला ह्या घोषणेचा फक्त एकच अर्थ समजतो 'आयुर्विमा महामंडळाला पर्याय नाही.' महामंडळाने आयुर्विमा ग्राहकांचे संघटन करावे ही सूचना कितीहि योग्य असली तरी प्रत्यक्षात येणे कठीण

आयुर्विमा ग्राहकांचे संघटन खरोखरीच आवश्यक आहे का ? प्रश्न विचारात घेतल्यास तूर्त खालील एक उदाहरण आपण तपासून पाहू.

दिनांक १ जानेवारी १९७५ पासून आयुर्विमा महामंडळाने आपल्या विमापत्रातील (पॉलिसीमधील) अटंत खालील बदल केला आहे :-

विमा पॉलिसी मुदतबंद ( Paid up ) व्हावयाची मुदत प्रथम दोन वर्षापासून ३ वर्षे करण्यात आली. आता ही अट दिनांक १ जानेवारी १९७५ पासून ५ वर्षे करण्यात आली आहे.

हा एकतर्फी बदल का केला गेला ? ह्या विरुद्ध कोणी आवाज उठवावयाचा ? आयुर्विमा महामंडळ खाजगी कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करून निर्माण केले. तेव्हा निरनिराळ्या कंपन्यांमध्ये असणाऱ्या निरनिराळ्या मुदतबंद होण्याच्या अटींचा विचार करून विमेदारांचे हिताचे दृष्टीने विमा पॉलिसी मुदतबंद होण्याची अट दोन वर्षे ठरविली गेली. ह्या अटीमध्ये वेळोवेळी बदल का केला गेला ? दोन वर्षांचे अटीमुळे आयुर्विमा महामंडळाचे आर्थिक नुकसान होते काय ? त्यासाठी खालील उदाहरण पाहू.

विम्याची रक्कम रु. १,०००-०० व विम्याची मुदत २० वर्षे आहे असे धरू. विमा हप्ता दर वर्षी रु. ५५-०० आहे, असे समजू. आता ह्या हप्त्यापोटी दोन वर्षात महामंडळाकडे रु. ११०-०० जमा होतात. त्यापैकी रु ५७-७५ महामंडळाचे होतात. म्हणजे महामंडळाकडे साधारण रु. ५२-२५ पैसे राहातात व विम्याची पेड-अप रक्कम रु. १००-०० होते. हे रु. १००-०० महामंडळाला १८ वर्षानंतर विमेदाराला द्यावे

लागनात. महामंडळाजवळ राहिलेल्या रु. ५२–२५ चे ( ६ टक्के दराने व्याजाचा दर धरल्यास) १८ वर्षात रु. १४०–०० होतात. मग आर्थिक नुकसान कसे काय होते असे म्हणता येईल ? विमा मंडळाचा एक युक्तिवाद असा राहील की, १८ वर्षांचे काळात मृत्यु झाल्यास रुपये १००–०० पेड् अप व्हॅल्यू त्वरित द्यावी लागते. परंतु त्यासाठी महामंडळ विमेदारांकडून जोखीम प्रिमियम वसूल करून त्याचा जो लाईफ फंड बनविला जातो, त्यामधून क्लेम देते. म्हणजे कोणत्याहि परिस्थितीमध्ये आर्थिक ताण सहन करावा लागत नाही.

मुख्यतः ही अट लादण्यामागे अनेक विमे लवकर बंद पडतात हे असले पाहिजे. पण ह्या लवकर बंद ( Early lapses ) होण्याचे कारण शोधून त्यावर उपाययोजना करण्याऐवजी विमेदारावर जाचक अटी लादून सर्वसाधारण सामान्य विमेदाराला अडचणीत टाकले जाते. ह्याविरुद्ध कोणाकडे दाद मागावयाची ? विमा पॉलिसीज् लवकर बंद पडण्याचे खरे कारण माझ्या मते खालीलप्रमाणे आहे.

विमा प्रतिनिधीला विमा एजन्सी चालू ठेवण्यासाठी कमीत कमी १२ नवीन विमेदारांचे मार्फत १ लाखाचे काम पूर्ण करावे लागते. समजा, एका प्रतिनिधीने ६–७ विमेदारांचे साहयाने १ लाख रुपयांचे काम पूर्ण केले व त्याला उरलेल्या ५-६ विमेदार मिळणे अवघड झाले तर ५–६ बोगस विमेदार देऊन हा प्रतिनिधी मोकळा होतो. दुसऱ्या एखाद्या प्रतिनिधीने लहान लहान पॉलिसीज मिळविल्या व त्याचे काम १५–२० विमेदारांमार्फत ८० ते ८५ हजारांचे झाले, तर हा प्रतिनिधी १५–२० हजारांचे बोगस काम देऊन आपली एजन्सी टिकवितो. आता हे दिलेले बोगस काम पुढे टिकत नाही व विमा पॉलिसीज बंद होण्याचे शेकडा प्रमाण वाढते.

विमा प्रतिनिधीवर देखरेख करणारा विकासाधिकारी याला मिळणारा पगार इत्यादी त्याने त्याचे विमा प्रतिनिधी यांचे मार्फत दाखल केलेल्या विमा हप्त्यावर अवलंबून ठेवले आहे. ह्यामुळे नाइलाजाने त्याला विमा एजन्सीज टिकविण्यासाठी विमा प्रतिनिधीला बोगस काम दाखल करण्यास सहाय्य करावे लागते.

विकासाधिकारी वर्गावर देखरेख करणारे असिस्टंट ब्रँच मॅनेजर्स यांना आपल्या ब्रँचचा व्यवसाय वाढवून दाखवण्याच्या शर्यतीमध्ये सहभागी व्हावे लागते. त्या वेळी विमेदाराला झेपेल एवढाच विमा देण्याऐवजी जास्त विमा विमेदाराचे गळयात मारला जातो व ह्या पॉलिसीज पुढे बंद पडतात.

वरील सर्व गोष्टींचा अतिरेक टाळल्यास मला वाटते विमा काम लवकर बंद पडण्याचे खूपच कमी होईल. परंतु आयुर्विमा महामंडळाच्या व्यवस्थापकांना वास्तव भूमिकेवर येऊन विचार करावयास वेळ वा सवड नसावी असे अनेक इतर उदाहरणांवरून म्हणावेसे वाटते. या सर्वांवर माझ्या मते एकच उपाय आहे व तो म्हणजे आयुर्विमा ग्राहकांचे संघटन.

आयुर्विमा महामंडळात विभागीय पातळीवर 'पॉलिसी होल्डर्स कौन्सिल' अशी एक व्यवस्था आहे. या कौन्सिलवर विमेदारांचे ३ प्रतिनिधी निवडले जातात. दर ३ महिन्यांनी विभागीय अधिकारी ह्या कौन्सिलची मीटिंग बोलावतात. गेल्या २० वर्षांत ह्या मीटिंगमधून काय चर्चा झाली, कधी आपण वर्तमानपत्रात वा इतरत्र कोठे वाचले आहे ? किंबहुना या प्रतिनिधींची नावे तरी आपणास ठाऊक आहेत काय ? विभागीय व्यवस्थापक आपल्या मित्रमंडळींची वर्णी ह्या कौन्सिलवर लावतात. ही गोष्ट योग्य आहे का ?

विमा ग्राहकांचे एखादे संघटन अस्तित्वात असल्यास असे घडू शकेल का ?

ह्या सर्व गोष्टींचा विचार समाजधुरीण, विचारवंत व सामान्य विमेदार यांनी करावा व ग्राहक चळवळीचा पाया कोठे तरी रोवला जावा हीच या ह्या लेखाद्वारे अपेक्षा.

• • •

# राष्ट्रीकृत बँका आणि अग्रक्रम विभाग

श्री. माधव जोशी

महाराष्ट्र बँकेतील एक अधिकारी श्री. माधव जोशी ह्यांनी राष्ट्रीकृत बँकेतील अग्रक्रम विभाग ह्या नाजूक विषयाचे विवेचन केले आहे. अग्रक्रम विभागात कर्जे देताना अधिकाऱ्यांना फार काळजीपूर्वक विचार करावा लागतो. कर्ज दिले तर ते योग्य उद्देशासाठी ( Purpose ) योग्य व्यक्तीला दिले गेले काय, आणि कर्ज न दिल्यास आपली जबाबदारी चुकली काय, असा सतत दोलायमान करणारा प्रश्न अधिकाऱ्यांस भासतो. त्या दृष्टीने धोरण व निर्णय ठरविण्यास ह्या लेखाचा उपयोग होईल.

१९ जुलै १९६९ रोजी ५० कोटींपेक्षा जास्त ठेवी असलेल्या भारतातील सर्वात मोठ्या १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा ऐतिहासिक व धाडसी निर्णय भारत सरकारने घेतला आणि एका अर्थाने समाजाचा पैसा समाजासाठी वापरण्याचा मार्ग थोडाफार मोकळा झाला. भारतातील सामाजिक क्रांतीच्या इतिहासाचे एक महत्त्वाचे पान ठरावे इतके महत्व या निर्णयाला आहे.

भारतातील वर निर्देश केलेल्या १४ बँका म्हणजे उद्योगपतींची कुरणे झाली होती. आपला स्वतःचा उद्योगसमूह व तत्संबंधी इतरांना अर्थपुरवठा करण्यासाठी या बँकांच्या ठेवींचा विशेषतः उपयोग केला जात होता. खासगी क्षेत्रात असल्यामुळे त्या बँका समाजाचा जो दुर्लक्षित विभाग आहे (Neglected Sector) त्याकडे वळत नव्हत्या. त्यामागे नफ्या-तोट्याचा हिशोब व धोका पत्करण्याची तयारी ही दोन प्रमुख कारणे होती. तसे पाहिले तर या निर्णयाचा बोलबाला फार पूर्वीपासून चालू होता. १९६७ साली भारत सरकारने आपल्या पत पुरवठ्याची दिशा निश्चित करण्यासाठी नॅशनल क्रेडिट कौन्सील (N.C C.) नेमून त्यांच्याकडून अग्रहक्क विभाग ठरवून घेतले. त्याप्रमाणे त्यांनी कशा प्रकारे अर्थपुरवठा करावा याचा प्राथमिक आराखडा पूर्ण केला गेला.

राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर १४ बँकांना सदर अग्रहक्क विभागाची विस्तृत कल्पना देण्यात आली. त्यांनी अग्रहक्क विभागाला जास्तीत जास्त पतपुरवठा करावा याकरिता त्यांच्यावर नैतिक दडपण आणण्याचा प्रयत्न केला गेला. हळू हळू त्यांचे मतपरिवर्तन झाले व आज पाहिजे तेवढ्या मोठ्या प्रमाणात नाही तरी त्या काही प्रमाणात अग्रहक्क विभागाकडे वळत असल्याचे सुचिन्ह दिसू लागले आहे.

अग्रहक्क विभागात शेती, वाहतुक व्यवसाय, आयात-निर्यात, लघुउद्योग, (१० लाखांपेक्षा कमी भांडवली खर्च असणारे) लहान व्यापारी, (२ लाखांपेक्षा कमी विक्री असणारा) वगैरे व्यवसायांचा समावेश करण्यात आला. वरील पाच व्यवसाय विभाग हे देशाच्या सर्वांगीण विकासाचे आधारस्तंभ आहेत. यापैकी शेती या विषयावर स्वतंत्र लेख लिहावा लागेल. शेती हा व्यवसाय मुख्यतः खेड्यात व अशिक्षित शेतकऱ्यांकडून केला जात असल्यामुळे व त्यातील नैसर्गिक आपत्तीच्या धोक्यामुळे त्या व्यवसायाला कर्जपुरवठा करण्यास बँका धजत नसत.

भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण महत्त्व असून केवळ एका शेतीवर आपले लक्ष केंद्रित केल्यास आपण समाजाला तसेच साऱ्या जगाला अन्नधान्य पुरवठा करू शकू आणि इतका महत्त्वपूर्ण व्यवसाय बँका आपल्या काळ्या यादीत टाकीत होत्या. बँकांच्या एकूण कर्जाच्या १ टक्का १०६७ साली, ५.५ टक्के १९६९ साली, व ९.३ टक्के एप्रिल १९७६ मध्ये अर्थपुरवठा शेती विभागाला झाला आहे. याचा अर्थ शेती व्यवसायाकडे बँका हळू हळू वळू लागल्या आहेत.

तीच गोष्ट लघु उद्योगांची. औद्योगिक क्रांतीमध्ये लघु-उद्योगाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. जपानच्या औद्योगिक क्रांतीत लघुउद्योगांनी बजावलेली उल्लेखनीय कामगिरी आपण विसरता कामा नये. मोठे उद्योग लहान उद्योगावरच चालतात. तेही दुर्लक्षित केले गेले होते. जुलै १९६९ मध्ये या विभागाला ८.५ टक्के असलेला अर्थपुरवठा आज १२.५ टक्के झाला आहे.

लहान व्यापारी हा सुद्धा वितरण क्षेत्रातला अत्यंत महत्त्वाचा घटक. तोच खरा जनतेपर्यंत जाणारा व्यावसायिक. त्यालासुद्धा आज हळू हळू अर्थपुरवठा वाढत आहे.

देशातील उत्साही वाहतुक व्यवसायाची योग्य प्रकारे सांगड न घातल्यास त्याचे उत्पादनावर विपरीत परिणाम होतात. म्हणजे मालाची वाहतुक ज्याला म्हणतात ती अत्यंत कमी वेळात व कमी पैशात (economical) होण्यावर उत्पादनाचा खर्च अवलंबून असतो. यासाठी वाहतुक व्यवसाय सुसंघटित करून त्याचा उत्पादनाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून उपयोग केला जाणे आवश्यक असते. भारत सरकारने याची दखल घेऊन सदर व्यवसाय अग्रहक्क विभागात टाकला.

आयात–निर्यात हा सुद्धा एक दुर्लक्षित विभाग होता. अर्थात याचे कारण सर्व बँकांना या व्यवसायाविषयी सखोल ज्ञान नव्हते व हा व्यवसाय परदेशांशी असल्यामुळे यात सरकार व रिझर्व बँक यांच्या मध्यस्थीची आवश्यकता असते. आज सदर विभागाला अत्यंत महत्त्व देण्यात आले असून परदेशी चलनाचे व्यवहार सर्व बँका सुविहित पार पाडीत आहेत.

वरील अग्रहक्क विभागाव्यतिरिक्त कुठल्याच विभागात न बसणारा परंतु अत्यंत दुर्लक्षित असा जो वर्ग आहे त्याला सुद्धा आज बँका कर्जपुरवठा करीत आहेत. यामध्ये रस्त्यावरील चांभार, लोहार, पानपट्टीवाले, दोरखंडवाले, भाजीवाले, फळवाले, केशकर्तनकार, धोबी, लाकडे विकणारे, शिंपी वगैरेंचा समावेश होतो.

भारत सरकारने डी. आय्. आर्. Differential Interest Rate नावाची योजना तयार करून वरील विभागाला कर्जपुरवठा करणे सुलभ केले. सदर योजनेनुसार २००० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीस व्यवसायासाठी जामीन अगर तारणाशिवाय कर्जपुरवठा करण्यात येतो. सदर कर्जदारास स्टँप अगर इतर कुठलाच खर्च करावा लागत नाही. या योजनेबाबत जर योग्य ती खबरदारी घेऊन व नेमके गरजेपुरतेच कर्ज देऊन कर्जदारास विश्वासात घेतले तर आशादायक चित्र दिसते असा अनुभव आहे.

वरील सर्व मुद्यांचा विचार केल्यास आपणास असा निष्कर्ष काढता येतो की, राष्ट्रीयीकृत बँका समाजाचा जो दुर्बल व दुर्लक्षित विभाग आहे त्याला आज आपल्या समोरच्या खुर्चीत बसवून घ्यायला तयार आहेत. हे सुद्धा काही कमी नाही. सामाजीकरणाचे हे पहिले पाऊल आहे असे म्हटले तरी चूक होणार नाही.

याच दिशेने त्या गेल्या तर त्या बँकांचा राष्ट्रीयीकरणामागील उदात्त व विशाल दृष्टिकोन यशस्वी होण्यास वेळ लागणार नाही.

## एक प्रेरक उदाहरण

तुकाराम कोराटे नावांचा एक अंध तरुण टाटांच्या अंधांसाठी असलेल्या ट्रेनिंग सेंटर मधून ग्रामीण कलाकुसर व शेतीचे शिक्षण घेतलेला, हातात ६ ५०० ची देणगी संस्थेकडून पडलेली पण शेती घेऊन तिच्या खत, बी वगैरे खर्चासाठी पैसे नव्हते. बँक ऑफ महाराष्ट्रच्या लासलगांव शाखेत दबकत दबकत येतो. बँकेचे अधिकारी अंध म्हणून खुर्ची देतात. पण बसायला विनम्रपणे नकार. सर्व गोष्टींची चौकशी होते आणि अधिकाऱ्यांना त्याचे शिक्षण, प्रामाणिकपणा, विनय व कष्ट करण्याची जिद्द समजते. आणि त्याला सर्व प्रकारचे साहाय्य देण्याचे आश्वासन मिळते. केवढा धीर कृतज्ञतेने मिटलेले डोळे बोलू लागतात. अधिकाऱ्याच्या पायावर डोके ठेवायला निघतो आणि सर्व कायदेशीर व्यवहार पूर्ण होऊन तुकारामला कर्ज मिळते. तुकाराम आज ३ एकर शेतीचा मालक, महाराष्ट्र बँकेचा उल्लेखनीय व आदरणीय खातेदार व अभिमानाने स्वतःच्या पायावर उभा राहिलेला अंध तरुण आहे.
केवढे समाधान !

मानवतेचे अस्तित्व आपण थोडे तरी दाखविल्याचे समाधान अधिकाऱ्यांना, तर आपण दुसऱ्यावर अवलंबून नसल्याचे तुकारामला !

• • •

# नव नवीन यंत्रे प्रक्रिया नवी उपकरणे

# वायुशक्तीचा उपयोग

प्रा. प्रकाश देशपांडे
पदार्थ विज्ञान विभाग,
फर्ग्युसन कॉलेज, पुणे.

पवनचक्की ही भारतात नवीन नाही. पवनचक्कीच्या सहाय्याने गिरण्या व यंत्रे सुरू करणे हे वीज टंचाईच्या काळात पुन्हा एकदा महत्त्वाचे वाटू लागले आहे, अमेरिकेत पर्यायी संशोधन जारीने चालू आहे. औद्योगिकरणाचा प्राण म्हणजे विद्युत्शक्ति. जेव्हा या साधनाच्या वापरावर मर्यादा येतात, तेव्हा नवी शक्तिसाधने शोधणे अपरिहार्य होते. सूर्यशक्ति, जलशक्ति आणि वायूशक्ति ह्या तीन शक्तींची मदत घेणे भारतीय कारखानदारीतही अटळ आहे. त्या दृष्टीने हा लेख उद्बोधक होईल.

आपल्या जीवनामध्ये ऊर्जेला ( Energy ) अनन्यसाधारण महत्त्व आहे. खुद्द आपले अस्तित्व सुद्धा सूर्यापासून मिळणाऱ्या नियमित व परिमित ऊर्जेवरच अवलंबून आहे कारखाने, गिरण्या, शेती, वहातूक, निरनिराळ्या सुखसोयी इत्यादी गोष्टींसाठी निरनिराळ्या पद्धतीने उपलब्ध होणारी ऊर्जा आपल्याला लागते.

निसर्गातील बऱ्याच गोष्टींमध्ये ऊर्जा सुप्त स्वरूपात असते. मनुष्याने आपली बुद्धी वापरून तिचा विविध कामाकरता उपयोग करणे सुरू केले. भूगर्भातून मिळणारी कोळसा, तेले, वायू इत्यादी इंधने आपण ऊर्जा मिळविण्यासाठी वापरतो. विद्युत् शक्तीचा शोध लागल्यानंतर ती वापरणे फार सोयीस्कर असल्यामुळे लवकर लोकप्रिय झाली. त्यामुळे इतर सर्व प्रकारची ऊर्जासाधने विद्युत्शक्तीची निर्मिती करण्याकरता वापरली जातात. उदा. विद्युत् घटकांमध्ये रासायनिक प्रक्रियेमुळे विद्युतशक्तीची निर्मिती होते. पाण्याची वाफ करून त्या जोरावर विद्युत जनित्रे फिरविली जातात. अणुशक्तीचा उपयोगही पाण्याची वाफ करण्याकरता व त्या जोरावर विद्युत्निर्मिती करण्यासाठीच करतात. धरणामध्ये पाणी साठवून पाण्याच्या स्थितीजन्य शक्तीवर विद्युत् जनित्रे फिरविली जातात.

जगातील वाढत्या लोकसंख्येबरोबर व उत्पादनांच्या वाढत्या गरजांमुळे इंधनाची गरज वाढती आहे. अणुशक्तीमुळे खूप मोठ्या प्रमाणावर ऊर्जा मिळविणे शक्य आहे. परंतु एक तर ते खूप खर्चिक आहे व त्याचे इतरही अनेक तोटे आहेत. भूगर्भात असणारे इंधनाचे साठे मर्यादित असल्यामुळे केव्हा तरी संपणारच. तसेच मध्यंतरी तेलउत्पादक देशांनी तेलाच्या किंमती वाढविल्यापासून सर्व जगामध्ये इंधनाचा आणि पर्यायाने ऊर्जेचा प्रश्न बिकट झाला आहे.

ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर अमेरिकेमध्ये होतो. तेथील भूगर्भातील इंधनाचे साठे बरेच आहेत. तरीसुद्धा ऊर्जा मिळविण्यासाठी नवनवीन मार्गांचा अवलंब करण्यासाठी मूलभूत संशोधनाची गरज तेथील योजनाकार, राजकारणी व संशोधक यांना भासू लागली आहे.

ऊर्जेसाठी ही हाकाटी खरं म्हणजे विसंगत आहे. सूर्यापासून पृथ्वीला मिळणाऱ्या ऊर्जेच्या दशहजारांश ऊर्जा, जगाची सध्याची संपूर्ण गरज भागवू शकेल. दुसरा मार्ग म्हणजे वायुशक्ती. अमेरिकेमध्ये वर्षाला जेवढी ऊर्जा वापरली जाते त्याच्या १३०० पट ऊर्जा जगातील वायुशक्तीमुळे मिळू शकते केवळ टेक्सास परगण्यावरून वाहणाऱ्या वाऱ्यामुळेच इतकी ऊर्जा उपलब्ध होईल की, ती अमेरिकेच्या एकूण गरजेच्या ८ टक्के इतकी असेल.

१९७४ सालातील आकडेवारी आपण पाहू.

एकूण ऊर्जेचा वापर – २० ट्रीलीयन किलोवॅट अवर (kwh). वर म्हटल्याप्रमाणे जगातील वाऱ्यामध्ये १३०० पट म्हणजे २६०० ट्रीलीयन किलोवॅट अवर (kwh) ऊर्जा असते. ती जर विद्युत्शक्तीने परावर्तित केली तरी त्याच्या १/३ उर्जा (२६००/३ ट्रीलीयन किलोवॅट अवर) आपण वापरू शकतो. (१ किलोवॅट अवर = १००० वॅट अवर

म्हणजे २५ वॅटचा बल्ब ४० तास जाळण्याइतकी, किंवा १०० वॅटचा दिवा १० तास जाळण्याइतकी).

ऊर्जेचे मोठे परिमाण म्हणजे Q. एक q=२९३ ट्रीलीयन किलोवॅट अवर. सूर्यापासून पृथ्वीच्या पृष्ठभागावर दरवर्षी २८००q इतकी ऊर्जा येते. वाऱ्यामध्ये ९०q असते. भूगर्भातून एकूण (खनिज तेले, कोळसे, वायू इ.) मिळू शकेल अशी जास्तीत जास्त २००q व कमीत कमी ५०q ऊर्जा उपलब्ध होईल असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

अशा परिस्थितीमध्ये वायुशक्ती, सौरशक्ती इ. शक्तींना आपल्या काबूत आणण्यासाठी शास्त्रज्ञांनी प्रयोग सुरू केले नाही तरच नवल. या प्रयत्नामध्ये अग्रेसर असणाऱ्या अमेरिकेतील 'इरडा' (ERDA म्हणजे Energy Research and Development Administration) या संस्थेचा १९७३ मधील खर्च २ लाख डॉलर्स होता. तो १९७६ साली १२ मिलीयन डॉलर्स इतका वाढला.

असे असले तरीही सगळ्यांनाच वायुशक्तीच्या उपयोगितेबद्दल खात्री नाही. वायुशक्तीच्या सगळ्या फायद्यांकडे दुर्लक्ष करून काही शास्त्रज्ञ असेही म्हणत आहेत की, जरी वायूमध्ये जास्त शक्ती असली तरीसुद्धा त्या ऊर्जेचे परिवर्तन करून तिचा कितवा हिस्सा आपण यशस्वीरित्या वापरू शकू याबद्दल शंकाच आहे. परंतु असे वाटणारे लोक खूप कमी आहेत.

वायुशक्तीच्या किफायतशीर उपयोगितेबद्दल आशावादी असणारे 'इरडा' (ERDA) चे एक अधिकारी श्री. लुईस डिवोने (Mr. Louis Divone) म्हणतात– "१९१४ मध्ये विमान उड्डाणाचे शास्त्र ज्या अवस्थेमध्ये होते त्याच अवस्थेमध्ये आज वायुशक्ती उपयोगितेचे संशोधन आहे. त्या वेळेस विमान म्हणजे कापड, लाकूड व तारांच्या सहाय्याने बांधलेला एक सांगाडा असे. त्यानंतर फक्त दहाच वर्षांनी अमेरिकेच्या सैन्य दलातील दोन वैमानिक विमानातून पृथ्वीप्रदक्षिणा करून आले. आणखी ५० वर्षांनंतर आपल्याकडे मोठी व वेगवान अशी जंबो, कॉन्कार्ड अशी विमाने आहेत.

वाऱ्याबद्दल वारंवार केली जाणारी एक तक्रार म्हणजे तो अनियमित व वाकडातिकडा वाहतो. परंतु जर त्या शास्त्रशाखांमधील लोक एकत्र आले आणि पुरेसा पैसा उपलब्ध असेल तर या अडचणींवर मात करणे काहीही कठीण नाही. वारा वाकडातिकडा वाहतो, म्हणूनच प्रकाश जसा केन्द्रीभूत करतात तसा तो योग्य साधनांनी केन्द्रीभूत करता येईल. त्याच्या अनियमितपणावर मात म्हणजे मिळेल तेव्हा शक्ति साठवून ठेवणे. मुख्य गोष्ट म्हणजे या उपस्थित होणाऱ्या अडचणी नसून आपल्या विचार व कल्पनाशक्तीचे जडत्व होय.

श्री. लुईस डिवोने (Louis Divone) यांना नजीकच्या भविष्यकाळात वायुशक्ति सुलभतेने वापरता येईल असे वाटते. निरनिराळ्या विद्यापीठातील शास्त्रज्ञ आणि वैयक्तिकरित्या संशोधन करणाऱ्या लोकांना येणाऱ्या चार वर्षातच विशेष काही घडण्याची आशा आहे. वायुशक्तीमुळे मिळणारी वीज आपल्या नेहमीच्या विद्युत्पुरवठ्याबरोबर वापरण्यासाठी 'इलेक्ट्रॉनिक उपकरणे तयार केलेली आहेत. ज्या दूरच्या ठिकाणी नेहमीच्या पद्धतीने वीज पुरवठा करणे खर्चाचे ठरते तिथेही वायुशक्तीमुळे मिळणारी वीज फायदेशीर ठरेल असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

'इरडा' (ERDA) चा या संबंधातील कार्यक्रम धडाकेबाज आहे. याच वर्षाच्या जानेवारीमध्ये त्यांनी न्यूमेक्सिकोतील क्लेटॉन ही जागा जगातील आतापर्यंतची सर्वात जास्त ऊर्जा उत्पादक पवनचक्कीसाठी नक्की केली आहे. तीपासून मिळणारी वीज ही २०० किलो वॅट (KW) असेल. या नंतरच्या दहा वर्षांत १५०० किलोवॅट (KW) वीज उत्पन्न करू शकणाऱ्या दोन पवनचक्क्या इतर दोन ठिकाणी बसविण्यात येणार आहेत.

ओहिओ (Ohio) मध्ये एक प्रायोगिक पवनचक्की १०० KW इतकी ऊर्जा पुरविते. तिच्या उभारणीचा खर्च १ मिलियन डॉलर इतका होता. नंतर चालविण्याचा खर्च जवळजवळ नाहीच. वाऱ्याचा वेग जर दर ताशी २९ किलोमीटर असेल तर या पवनचक्कीमुळे मिळणारी वीज ४० घरांसाठी पुरू शकते.

व्हरमाउंट (Vermount) मध्ये एका टेकडीवर एक सगळ्यात अवाढव्य पवनचक्की होती. तिचा उभारणीचा खर्च १.२५ मिलियन डॉलर होता. तिच्यामुळे १२५० KW ऊर्जा १६ महिनेपर्यंत मिळाली. दुर्दैवाने १९४५ मध्ये या पवनचक्कीच्या दोनपैकी एक स्टेनलेस स्टीलचा पंखा तुटला. त्याची लांबी होती ५३ मीटर आणि वजन ८ टन! त्यानंतर या पवनचक्कीचा नाद सोडून देण्यात आला.

वाऱ्याच्या सध्या माहिती असलेल्या तीन विशिष्ट गुणांमुळे संशोधनास भरपूर उत्तेजन मिळते.

१) पृथ्वीवरील सर्व भागात वर्षांतील ३२० दिवस वारा वाहतो. हा सूर्यप्रकाशापेक्षा वाऱ्याचा चांगला भाग आहे.

२) सध्या जिथे वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ३२ कि.मी. आहे तिथे तिथे वायुशक्ति वापरणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत आहे.

३) पवनचक्कीतून मिळणारी ऊर्जा वाऱ्याच्या वेगाच्या घनाच्या सम प्रमाणात बदलते. उदा. वाऱ्याचा वेग ताशी १० कि.मी असताना जर १०० ऊर्जा मिळत असेल तर ताशी २० कि मी. वेगाला ८०० ऊर्जा मिळेल

या माहितीच्या आधारे आपल्या अपेक्षा उंचावायला काही हरकत नाही

'वायु–ऊर्जा' अशा मोठ्या प्रमाणात वापरण्याच्या शक्यतेमुळे शास्त्रज्ञ, निरनिराळ्या प्रकारच्या पवनचक्क्या करून बघत आहेत.

पारंपारिक पवनचक्कीला चार पंख असतात. तिच्या सहाय्याने वाऱ्याच्या एकूण शक्तीच्या ३ टक्के शक्तीच उपयोगात आणता येते. शास्त्राच्या प्रगतीमुळे हल्ली जास्त कार्यक्षम पवनचक्क्या उभारणे शक्य झाले आहे आणि त्याप्रमाणे निरनिराळ्या पद्धतीच्या प्रगत पवनचक्क्या सध्या प्रयोगावस्थेत आहेत.

पारंपारिक पवनचक्कीतील दोष कमी करून, कॅनडा व अमेरिका या देशांमध्ये बऱ्याच तऱ्हेच्या पवनचक्क्या उभारण्यात आलेल्या आहेत त्यातील एक मायकलीच्या मोठ्या चाकासारखी दिसते. त्यातील 'स्पोक्सना' अल्युमिनियमची मोठी पाती लावलेली आहेत.

जिनिव्हा ( Geneva ) मधील पवनचक्कीला फिरणारी दोनच पाती आहेत. ती प्रत्येकी ११ मीटर लांब आहेत. उपलब्ध वाऱ्याच्या ८० टक्के वारा यामध्ये पकडला जातो. दुसऱ्या अँन्ड्रचू ( Andreau ) पवनचक्कीची पाती पोकळ आहेत. त्यामुळे केंद्रोत्सारी ( Centrifugal ) प्रेरणेचा लाभ होऊन चक्कीची गति अजून वाढतेच.

समुद्रकिनाऱ्यावर वारा बराच जोरदार व नियमित असतो. त्यामुळे तिथे अशी मोठी शक्तिकेंद्रे उभारण्याचा 'इरडा' ( ERDA ) चा विचार आहे. येत्या तीन वर्षातच १० हजार KW ऊर्जा निर्मिणारी अशी काही केंद्रे तयार होतील. अशा तऱ्हेने समुद्रावरील वाऱ्याने बऱ्याच पवनचक्क्या फिरविता येतील.

हे सगळे खरे असले तरी प्रायोगिक अवस्थेमध्ये असलेल्या या पवनचक्क्यांचा खर्च फारच जास्त आहे. जिनिव्हाच्या पवनचक्कीचा खर्च ५० हजार डॉलर्स तर सन्डस्की (Sandusky) पवनचक्कीचा खर्च दशलक्ष डॉलर्स. म्हणजे ५ हजार डॉलर्स एका k.w. ऊर्जेकरता ! ज्या वेळेस तंत्रज्ञान पुढारून, मोठ्या संख्येने पवनचक्क्या तयार केल्या जातील त्या वेळेस अर्थात हा खर्च कमी होईल. दुसरे म्हणजे एकदा बसविल्यानंतर पवनचक्क्या चालविण्याचा खर्च जवळ जवळ नाहीच. प्रो. हिरोनेमस (Prof. Heronemus) यांच्या अंदाजानुसार एका 'क्ष' उर्जा उत्पादन क्षमतेच्या अणुकेंद्रापेक्षा समुद्रकिनाऱ्यावरील त्याच ऊर्जा उत्पादनक्षमतेच्या पवनचक्कीस ४५ टक्के कमी खर्च येईल.

खरं म्हणजे किंमतीचाही फार मोठा बाऊ करण्यामध्ये फारसा अर्थ नाही. वायुशक्तीच्या वापरामुळे होणारे इतर फायदे लक्षात घेतले म्हणजे हे म्हणणे पटेल.

वायुशक्ती ही पुन्हा पुन्हा वापरता येणारी आणि कधीही न संपणारी शक्ति आहे. ती फुकट मिळते. तिच्या वापरामुळे वातावरण दूषित होत नाही. नैसर्गिक परिस्थितीमध्ये काहीही बदल होत नाही, जसा इतर इंधनामुळे पडतो उदा भूगर्भातील इतर इंधने काढल्यामुळे जमीनीस खड्डे पडतात. धरणाच्या साठविलेल्या पाण्यामुळे भूकंप होतात. इंधनाच्या ज्वलनामुळे वातावरणात नको असलेली वायू व उष्णता निर्माण होते. अणुभट्टीमुळेही खूपच उष्णता व वाया जाणारे किरणोत्सारी पदार्थ तयार होतात. ते समुद्रात टाकल्यामुळे तेथील सजीवांना धोका पोहोचतो. इत्यादी.

सौरशक्ति सोडून ऊर्जेचा दुसरा कुठलाही प्रकार वायुशक्तीच्या तोडीचा नाही. ती जगभर मिळू शकते व कुठेही स्वयंपूर्णतेने वापरता येते. भारतासारख्या देशामध्ये जिथे खेडी जास्त आहेत तिथे, व इतर शहरापासूनच्या दूरच्या ठिकाणी छोटी छोटी वायु-ऊर्जा केंद्रे उभारणे फारच सोयीचे व फायदेशीर ठरेल. आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिका या विभागामध्ये लोक लाकडाचाच जळण म्हणून जास्त उपयोग करतात. त्यामुळे जंगलतोड वाढते. परिणामी जमिनीची धूप वाढणे, हवामान बदलणे या गोष्टी होतात. जळणामुळे हवा दूषित होते ती निराळीच. अशा ठिकाणी पर्याय म्हणून वायुशक्ति उत्तम आहे.

वारा अनियमितपणे वाहतो. त्यामुळे तो वहात असेल तेव्हा निर्माण होणारी शक्ति साठवून ठेवणे आवश्यक ठरते. वीज विद्युतघटकांमध्ये साठविता येते. मिळणारी हवा जास्त दाबाखाली साठवून त्याच शक्तीचा उपयोग पाणी उपसण्याकडे करता येतो. वायु विद्युतजनित्रापासून मिळणाऱ्या विजेने पाण्याचे विद्युतविघटन (Electrolysis ) करता येईल. त्यापासून मिळणारे प्राणवायू व हैड्रोजन वायु साठवून इंधन म्हणून वापरता येतात. हैड्रोजनकडे भविष्यकाळातील इंधन म्हणून पाहिले जाते. योग्य तऱ्हेने बनविलेल्या 'फ्लायव्हील' (Flywheel) मध्येही शक्ति साठविता येते. ऊर्जा साठवि-

ण्याच्या निरनिराळ्या पद्धतींच्या संशोधनासाठी अमेरिकन सरकारने दशलक्ष डॉलर्स मंजूर केलेले आहेत.

आपल्या भारतामध्ये यासंबंधीचे चित्र कसे आहे ते बघू. मिळणारी सौर व वायुशक्ति आपण फार थोडी वापरतो. आपली इंधनाची वाढती गरज लक्षात घेऊन यासंबंधातील संशोधनाकडे लक्ष देण्याची खूप गरज आहे. यात केवळ पाश्चात्य देशांच्या अनुकरणापेक्षा आपल्या गरजानुसार संशोधन होणे अधिक इष्ट ठरेल. नैसर्गिक परिस्थिती सौर व वायुशक्ति वापराच्या दृष्टीने आपल्या बाजूनेच आहे. संशोधन करून योग्य ते प्रकल्प मात्र आपण उभारले पाहिजेत.

जे काही थोडे फार प्रयत्न आपल्याकडे झालेत तेही फारसे उत्साहवर्धक नाहीत. सध्या काही छोटया पवनचक्क्या आपण पाणी उपसण्याकरिता वापरतो. राष्ट्रीय शास्त्र व तंत्रज्ञान आयोगांच्या (National Science and Technology Committee) शिफारशीप्रमाणे गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक आणि राजस्थान या ठिकाणी वाऱ्याचा सरासरी वेग ताशी १० कि.मी. पेक्षा जास्त आहे. त्यामुळे वायू–विद्युत्–जनित्रे बसविण्यास हे प्रदेश सोईस्कर आहेत.

दहा वर्षामागे बेंगलोरच्या राष्ट्रीय वायुविद्या (Aeronautics) प्रयोगशाळेने पवनचक्कीचे दोन नमुने केले होते. दुर्दैवाने ते काम पुढे चालविण्यात आले नाही. बेंगलोरमध्ये सध्या एक छोटे वायुविद्युत् जनित्र चालू आहे. त्याची किंमत १५००० रु. आहे व वाऱ्याच्या ताशी १६ कि.मी. वेगास ते ४२० वॅट वीज देते. त्यामुळे मिळणारी वीज १ किलोवॅट अवरला (1 kwh) १ रुपया इतकी महाग पडते. आपली विजेची वार्षिक गरज १२० बिलीयन kwh च्या आसपास आहे. त्यामुळे आपल्या देशात होणारा खर्च परवडण्यासारखा नाही. म्हणूनच यात अजून सखोल संशोधनाची गरज आहे, ज्यामुळे हा खर्च कमी करता येईल.

श्री. मॅथ्यू (Mr. M. V. Mathew टाइम्स ऑफ इंडियाचे सहाय्यक संपादक) यांनी एप्रिल १९७७ च्या स्पॅन मासिकाच्या अंकात या विषयावर एक लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी स्वतःच्या दोन तीन कल्पना मांडल्या आहेत.

वाऱ्याला मार्गदर्शक वापरून सगळीकडून येणारा वारा केंद्रीभूत करता येईल व त्यामुळे त्याचा वेग वाढेल.

पृथ्वीच्या पृष्ठभागापासून उंचावर वाऱ्याचा वेग जास्त असतो. हेलियम वायूच्या फुग्याच्या सहाय्याने तरंगत्या पवनचक्क्या उभारता येतील. मिळणारी वीज विद्युत्वाहक तारातून खाली आणता येईल.

काही काही वेळा समुद्रावर अगर जमिनीवर चक्री वादळे होतात. ती भयानक शक्तीची असतात. काही हैड्रोजन बॉंब इतकी शक्ती एका चक्रीवादळात असू शकते. ही शक्ती आपल्याला वापरणे अशक्य ठरू नये.

वायूशक्तीच्या संशोधनाच्या बाबतीत एक मजेदार गोष्ट आहे. कुणाही माणसाला थोडीशी जागा व कल्पनाशक्ती यांच्या जोरावर, थोडक्या हत्यारांच्या सहाय्याने वैयक्तिकरित्या प्रयोग करणे शक्य आहे. त्यामुळे अशा वरवर स्वप्नरंजित कल्पनांमधूनही एखादा माणूस सुरेख पवनचक्की शोधून काढेल की, ज्यामुळे पवनचक्कीबद्दलची विचारप्रणाली मुळातूनच ढवळून निघेल.

• • •

श्रमिक

# १९४८ च्या फॅक्टरीज् ॲक्टमध्ये झालेले नवीन बदल

ॲड. .भा. वि. घाणेकर
M. A, LL. M., D. L. W.

१९४८ सालच्या फॅक्टरी ॲक्ट मध्ये १९७६ साली मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. अर्थात फॅक्टरीज् ॲक्टचे जे मुख्य उद्देश ते म्हणजे कामगारांचे आरोग्य व कामगार कल्याण हे उद्देश अधिक व्यापक प्रमाणात साध्य व्हावे या हेतूनेच १९७६ साली बदल करण्यात आले आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे.

### १९७६ साली फॅक्टरीज ॲक्टमध्ये झालेल्या बदलाबद्दलची पूर्वपीठिका

२८ मे १९७६ साली त्या वेळचे केंद्रिय कामगार मंत्री श्री. रघुनाथ रेड्डी यांनी राज्यसभेमध्ये फॅक्टरीज् ॲक्टमध्ये बदल करण्याचा मसुदा सादर केला. १९४८ सालच्या फॅक्टरीज् ॲक्टमध्ये खालील कारणांसाठी बदल करण्याचे उद्देश मंत्री महोदयांनी प्रतिपादन केले. ते उद्देश पुढीलप्रमाणे (१) कामगारांचे हित व कामगार कल्याण हे उद्देश अधिक व्यापक प्रमाणात साध्य व्हावेत या हेतूने १९४८ च्या फॅक्टरीज् ॲक्ट मध्ये कामगार या संज्ञेच्या व्याख्येमध्ये बदल केला आहे.

(२) कामगारांचे अपघातापासून संरक्षण करण्यासाठी सेफ्टी ऑफिसर यांची नियुक्ति करण्याची सक्ती कारखान्यांच्या मालकांवर करण्यात आली आहे. सेफ्टी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे अपघातांचे प्रमाण कमी होईल व कामांचे तास एकूण वाढतील या हेतूने प्रेरीत होऊनच त्यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव केला आहे.

(३) स्त्री कामगारांच्या मानसिक भावनांचे व त्यांची उत्पादनक्षमता वाढण्यासाठी ' शिशुसंगोपन गृह ' ज्या कारखान्यात ३० किंवा त्याहून जास्त कामगार कामाला आहेत अशा कारखान्यात असण्याची सक्ती नवीन कायद्यामध्ये केलेली आहे

(४) त्याचप्रमाणे ज्या कारखान्यात अपघातामुळे प्राणहानी झालेली असते त्या अपघाताची संपूर्णपणे यथायोग्य चौकशी करण्यासाठी म्हणून नवीन कायद्याने बदल केला आहे.

वरील सर्व बदलांविषयींच्या ठरावाविषयी लोकसभेमध्ये व राज्यसभेमध्ये चर्चा झाल्यावर त्यास राष्ट्रपतींनी दिनांक ४ सप्टेंबर १९७६ रोजी मान्यता दिली.

फॅक्टरीज् ॲक्टमधील बदल कधीपासून अस्तित्वात आले ? केंद्र सरकारने याविषयी शासन राजपत्रात प्रकटन छापून १९७६ साली फॅक्टरीज् ॲक्टमध्ये नवीन झालेले बदल २६ ऑक्टोबर १९७६ पासून अंमलात येणार असल्याबद्दल जाहीर केले.

### १९७६ साली फॅक्टरीज ॲक्टमध्ये खालील प्रमुख बदल करण्यात आले आहेत.

(१) 'कामगार' या शब्दाची व्याख्या बदलली १९४८ सालच्या फॅक्टरीज् ॲक्टमध्ये ' कंत्राटी कामगारांना ' पूर्णपणे वगळले होते. परंतु १९७६ सालच्या नवीन झालेल्या बदलामुळे 'कंत्राटी कामागार' जर फॅक्टरीमध्ये काम करीत असतील तर त्यांना फॅक्टरीज् ॲक्ट लागतो व त्यांना फॅक्टरीज् ॲक्टमध्ये सांगितलेले कामगारांचे सर्व हक्क व सवलती त्यामुळे मिळू लागल्या आहेत. (२) कारखान्याची इमारत नादुरुस्त झाली असल्यास फॅक्टरी इन्स्पेक्टर त्याविषयी घेण्याच्या खबरदारीचा हुकूम करू शकतो. कारखान्याची इमारत मोडकळीस आली असेल किंवा नादुरुस्त झाली असेल, की ज्यामुळे कामगारांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असेल किंवा होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याबद्दलची फॅक्टरी इन्स्पेक्टरची खात्री झाली असल्यास फॅक्टरी इन्स्पेक्टर कारखान्याच्या मालकास किंवा मॅनेजरास त्यांनी त्यासंबंधी करावयाची योग्य उपाय-योजना केली पाहिजे व त्याची पूर्तता ठराविक दिवसांचे आत होण्याविषयीचा हुकूम करू शकतो. त्यासाठी फॅक्टरीज् ॲक्ट-मध्ये ' ४० अ ' खाली नवीन कलम घातले गेले आहे.

### सेफ्टी ऑफिसरची नियुक्ती

ज्या कारखान्यात १००० किंवा त्याहून जास्त कामगार कामाला आहेत अशा कारखान्यात सेफ्टी ऑफीसरची नेमणूक होणे कायद्याने आवश्यक ठरविले आहे व त्यासाठी फॅक्टरीज् ॲक्टमध्ये ४० ब हे नवीन कलम घातले गेले आहे. त्याचप्रमाणे एखाद्या कारखान्यात जरी १००० हून कमी कामगार कामाला असतील, परंतु त्या कारखान्यातील उत्पादनक्रिया किंवा मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेस जर कामगारांच्या आरोग्यास धोका

निर्माण करणारी असेल तर राज्य शासन त्या कारखान्यामध्ये सेफ्टी अधिकारी नेमण्याच्या हुकूम करू शकेल. 'सेफ्टी ऑफिसर' च्या नेमणुकीची अर्हता व नेमणुकीबाबतचे नियम राज्य सरकारास करण्याचा अधिकार फॅक्टरीज् ॲक्टच्या नव्या ४० ब या कलमाने दिलेले आहेत.

शिशुसंगोपन गृह-पूर्वी १९४८च्या फॅक्टरीज् ॲक्टप्रमाणे ज्या कारखान्यात ५० किंवा त्याहून जास्त स्त्री कामगार कामाला असतील अशा कारखान्यामध्ये शिशुसंगोपन गृह असलेच पाहिजे अशी तरतूद फॅक्टरीज् ॲक्टच्या ४८ कलमाप्रमाणे होती. परंतु १९७६ साली केलेल्या बदलामुळे ज्या कारखान्यात ३० किंवा जास्त स्त्री कामगार कामाला आहेत अशा कारखान्यांमध्ये देखील फॅक्टरीज् ॲक्टच्या ४८ व्या कलमाप्रमाणे शिशुसंगोपन गृह ठेवण्याची सक्ति करण्यात आलेली आहे.

प्रौढ कामगारांचे रजिस्टरमध्ये प्रौढ कामगाराचे नाव घातल्याशिवाय त्यास कारखान्यात काम करता येणार नाही. पूर्वीच्या ६२ कलमामध्ये एक नवीन १ अ हे पोटकलम १९७६ साली घालण्यात आले आहे. या नवीन पोटकलमाच्या तरतुदीमुळे कोणत्याही प्रौढ कामगाराचे नाव प्रौढ कामगारांच्या कामाच्या रजिस्टरमध्ये घातल्याशिवाय त्यास कारखान्यामध्ये काम करता येणार नाही.

हे पोटकलम घालण्यात आल्यामुळे कारखानदारांना "हा इसम आमचा कामगार नाही" ही सबब सांगता येणार नाही. त्यामुळे प्रौढ इसम कामगार संज्ञेस पात्र होण्यास अडचण येणार नाही.

## जादा कामाबद्दल सुपरव्हाईजर्सना देखील जादा वेतन मिळणार

१९४८ च्या फॅक्टरीज् ॲक्टमधील ६४ (१) हे कलम दुरुस्त करण्यात आले. त्यामुळे मे. चीफ इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज् यांना कोणत्याही इसमास तो सुपरव्हाईजर किंवा मालकांचा प्रतिनिधी ठरविण्याचा अधिकार दिला असून त्यास जर मासिक ७५० रु. पेक्षा जास्त वेतन मिळत नसेल व त्याने जादा काम (overtime) केले असेल तर त्यास त्या जादा कामाबद्दल जादा वेतन मिळू शकेल.

पूर्वी कारखानदार एखाद्या कामगारास जादा कामाचे जादा वेतन द्यावयाचे नसल्यास तो कामगार सुपरव्हायजर आहे वगैरे सबबी सांगून त्यास जादा कामाचे जादा वेतन सहजपणे नाकारू शकत. परंतु नवीन पोटकलमामुळे कोणत्याही सुपरव्हायझरास जर त्यास मासिक ७५० रु. पेक्षा जास्त मिळत नसेल तर त्यास जादा काम केल्याबद्दल जादा वेतन मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. वरील बाब निश्चितपणे सुपरव्हायझर्संना हितकारक आहे यात शंका नाही.

## फॅक्टरीज ॲक्टमधील काही कलमामधून माफी किंवा सवलत वाढविली गेली.

१९७६ च्या फॅक्टरीज् ॲक्टचे कलम ६५ (३) हे पूर्णपणे नवीन घालण्यात आले आहे. त्यामुळे राज्य सरकारास वा चीफ इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज् यांची खात्री झाल्यास कारखान्यातील कामाचे तासांबद्दल किंवा जादा वेतन करण्यासंबंधी असलेल्या फॅक्टरीज् ॲक्टच्या कलमांमधून विकसित अटींवर माफी देण्याचा अधिकार वाढविला गेला आहे. नवीन बदलामुळे प्रौढ कामगारांना कारखान्यात आठवड्यामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये जादा कामाचे तास धरून ६० तासांपेक्षा जास्त तास काम करता येणार नाही. राज्य सरकारला वा चीफ इन्स्पेक्टरास कारखान्यातील एकंदर परिस्थिती बघून फॅक्टरीज् ॲक्टच्या ५१ व्या (५१ व्या कलमाप्रमाणे आठवड्याला ४८ तासांपेक्षा जास्त काम करता येणार नाही.) कलमातून सूट देण्याचा अधिकार दिलेला आहे.

कामगारांना रोज ९ तासांपेक्षा जास्त काम करता येईल. राज्य सरकारास वा चीफ इन्स्पेक्टरला खात्री झाल्यावर कारखान्यातील प्रौढ कामगारांना कलम ५४ (कलम ५४ कामगारास रोज कारखान्यात ९ तासांपेक्षा जादा काम करता येणार नाही.) मधून सूट देऊन कामगारांना रोज १२ तासांपर्यंत काम करू देण्याची परवानगी देता येईल.

कामाच्या तासांची व्याप्ति १३ तासांपर्यंत करता येईल. १९७६ सालच्या फॅक्टरीज् ॲक्टच्या ६५ (३) कलमानुसार राज्य सरकारास वा चीफ इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज् यांना कारखान्यातील कामगारांच्या कामांच्या तासांची व्याप्ति १३ तासांपर्यंत वाढविण्याचा अधिकार दिलेला आहे. १९४८ च्या फॅक्टरी ॲक्टच्या ५६ व्या कलमानुसार कामगारांच्या कामाच्या तासांची व्याप्ति १०॥ तासांपर्यंत व विविक्षित परिस्थितीत १२ तासांपर्यंत वाढविण्याची परवानगी दिलेली होती. परंतु या ६५ (३) कलमानुसार राज्य सरकारास वा चीफ इन्स्पेक्टरास कामगारांच्या रोजच्या कामाची व्याप्ति (सुटीचा काल धरून) १३ तासांपर्यंत वाढविण्याचा अधिकार दिलेला आहे.

## जादा कामाच्या तासामध्ये नवीन बदल झालेला आहे

पूर्वीच्या ६४ (३) च्या फॅक्टरीज् ॲक्टप्रमाणे कामगारांना ३

महिन्यात फक्त ५० तास जादा वेळ काम करण्यास परवानगी मिळे परंतु आता कामगारांना ३ महिन्यामध्ये ७५ तास जादा वेळ काम करता येईल. फॅक्टरीज् अॅक्टखाली जानेवारीस वर्ष सुरू होते त्यामुळे १ जानेवारी ते ३१ मार्च या मुदतीत ७५ तास जादा वेळ कामगार काम करू शकतील. त्याचप्रमाणे पुढील तिमाहींना म्हणजे १ एप्रिल ते ३० जून, १ जुलै ते ३० सप्टेंबर, १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर या तिमाहीमध्ये प्रत्येक तिमाहीस जादा वेळ काम ७५ तास करता येईल.

परंतु कोणत्याही परिस्थितिमध्ये कामगाराने जादा वेळ काम संलग्नपणे ७ दिवसापेक्षा जास्त दिवस करता कामा नये.

## पगारी रजेविषयी नवीन बदल

पूर्वीच्या फॅक्टरीज् अॅक्टप्रमाणे कामगाराने मागील वर्षी २४० दिवस काम केले तर पुढील वर्षी २० दिवसाचे मागील वर्षी काम केल्याबद्दल १ दिवस रजा याप्रमाणे रजा मिळत असे नवीन फॅक्टरीज् अॅक्ट मध्येही हीच तरतूद ठेवली आहे. परंतु जे कामगार बडतर्फ किंवा कामावरून काढले जातात किंवा जे कामगार नोकरी सोडून जातात किंवा ज्यांचे वय झालेमुळे नोकरी संपते किंवा जे कामगार मरण पावतात अशा कामगारांनी मागील वर्षी २४० दिवस जरी काम केले नसेल तरी देखील त्यांनी काम केलेल्या दिवसांपोटी २० दिवसास १ दिवस याप्रमाणे रजेचा हिशेब करून त्यांना नोकरी सुटल्यापासून किंवा संपल्यापासून किंवा नोकरी सोडल्यापासून दुसरा कामाचा दिवस संपायच्या आत त्या कामगारास रजेचे वेतन मिळाले पाहिजे. आणि जे कामगार मृत झाले असतील किंवा वय झाल्यामुळे ज्यांची नोकरी संपली असेल अशा कामगारांच्या रजेचा हिशेब २ महिन्यांच्या आत पुरा करून त्यांच्या कुटुंबियांना रजेचे वेतन दिले गेले पाहिजे.

वरील प्रकारची तरतूद फॅक्टरीज् अॅक्टच्या ७९ कलमामधे घालण्यात आली आहे.

## अपघाताची चौकशी

फॅक्टरीज् अॅक्टच्या ८८ कलमामध्ये नवीन झालेल्या बदलामुळे एक नवीन पोटकलम घालण्यात आले आहे. ८८ (२) प्रमाणे जेव्हा कारखान्यात घडलेल्या अपघातामुळे एकादा इसम मृत झाला असेल त्या वेळी त्या अपघाताचा रिपोर्ट जेव्हा इन्स्पेक्टरास मिळेल त्या फॅक्टरी इन्स्पेक्टराने महिन्याच्या आत अपघाताची पूर्ण चौकशी केलीच पाहिजे. अपघाताचे वृत्त फॅक्टरी इन्स्पेक्टरास कळविलेच पाहिजे. १९७६ मध्ये नवीन ८८अ हे कलम फॅक्टरीज् अॅक्टमध्ये घालण्यात आले आहे. या नवीन कलमान्वये कारखान्याच्या चालकाने कारखान्यात घडलेल्या कोणत्याही धोकादायक घटनेचा तपशील फॅक्टरी इन्स्पेक्टरास कळविण्याचे बंधन घातलेले आहे. मग त्या धोकादायक घटनेमुळे कोणत्याही कामगारास वा इसमास जरी शारीरिक इजा झाली नसेल तरीदेखील त्या धोकादायक घटनेचा तपशील कळविला गेला पाहिजे.

फॅक्टरीज् अॅक्टच्या कलमाचा भंग झाल्यास दंड व कैदेची शिक्षा वाढविण्यात आली आहे. पूर्वी फॅक्टरीज् अॅक्टच्या ९२ व्या कलमानुसार फॅक्टरीज् अॅक्टच्या कोणत्याही कलमाचा भंग झाल्यास पराकाष्टा ५०० रु. दंड व ३ महिन्याची कैदेची शिक्षा सांगितली होती. परंतु नवीन केलेल्या बदलामुळे फॅक्टरीज् अॅक्टच्या हुकुमाचा भंग झाल्यास कारखान्याच्या चालकास २००० रु. दंड पराकाष्टा होईल. त्याचप्रमाणे पूर्वीच्या कलम ९२ ला एक नवीन परंतुक (proviso) जोडण्यात आले आहे. हे नवीन परंतुक ( proviso ) जोडल्यामुळे ज्या फॅक्टरीज् अॅक्टच्या ४ थ्या प्रकरणामधील (कामगारांच्या संरक्षणासाठी) कोणत्याही कलमाचा व त्यासाठी केलेल्या राज्य सरकारच्या नियमांचा भंग केल्यास त्याचप्रमाणे फॅक्टरीज् अॅक्टच्या ८७ व्या कलमाचा भंग झाल्यास (फॅक्टरीज् अॅक्टचे कलम ८७ ने असे सांगितले आहे की कोणत्याही फॅक्टरीमध्ये जर कुठल्याही प्रक्रियेमुळे कोणत्याही इसमास गंभीर शारीरिक इजा झाली असेल किंवा होण्याचा संभव असेल किंवा विषबाधा झाली असेल किंवा होण्याचा संभव असेल वा रोग झाला असेल किंवा त्याचा संभव असेल व तो टाळण्यासाठी राज्य शासनाने जे नियम केले असतील त्याचा भंग झाल्यास त्या कारखान्यांचा भोगवटा करणारा आणि कारखान्याचा मॅनेजर यांना जर कारखान्यातील प्रक्रियेमुळे एकादा इसम मृत झाला असेल किंवा कारखान्यातील प्रक्रियेमुळे एकाद्या इसमास अपघात झाला असेल तर पराकाष्टा १००० रु. ( इसम मृत झाला असेल) व इसमास अपघात झाला असेल तर ५०० रुपये पराकाष्टा दंड त्या कारखान्याच्या भोगवटा करणारास वा मॅनेजरास होईल.

फॅक्टरीज् अॅक्टखाली झालेल्या त्याच प्रकारच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा झालेली असेल तर नवीन त्याच प्रकारच्या गुन्ह्याबद्दल जास्त जादा शिक्षेची तरतूद नवीन कायद्याने केलेली आहे.

पूर्वीच्या अॅक्टमधील ९२ व्या कलमान्वये पूर्वी झालेल्या गुन्ह्याबद्दल शिक्षा झालेली असून त्याच प्रकारचा गुन्हा

परत कारखान्याच्या चालकाकडून घडल्यास त्यास १००० रु. पर्यंत पराकाष्ठा दंड वा सहा महिने पराकाष्टा शिक्षेची तरतूद केलेली होती. आता नवीन कायद्या-मधील तरतुदींमुळे पूर्वीच्या झालेल्या गुन्ह्याबद्दल शिक्षा या कायद्याखाली झालेली असल्यास आता परत त्याच स्वरूपाचा गुन्हा कारखान्याच्या चालकाकडून घडल्यास त्यास कोर्ट ५०००रु.पराका०ठा दंड करू शकेल.मात्र कोणत्याही परिस्थितीत २०० व दंडापेक्षा कमी दंड करता येणार नाही व २०० रु. पेक्षा कमी करावयाचा असल्यास तशी योग्य कारणे असली पाहिजेत. त्याचप्रमाणे राज्य सरकारने वा केंद्र सरकारने कामगारांच्या सुरक्षितनेसाठी केलेल्या नियमांचा परत भंग करून कोणत्याही इसमास (कारखान्यातील प्रक्रियेमुळे) गंभीर अपघात झाल्यास वा त्यामुळे इसम मृत झाल्यास त्या कारखान्याच्या चालकास अपघात झाला असल्यास कमीत कमी १००० रु. दंड व इसम मृत झाल्यास कमीत कमी २००० रु. दंड होईल.

**११९ वे नवीन कलम फॅक्टरीज् अॅक्टमध्ये घातले आहे.**


पूर्वीच्या फॅक्टरीज् अॅक्टने कंत्राटी कामगारांना, फॅक्टरीज् अॅक्टमधून वगळले होते. परंतु आता ११९ वे नवीन कलम १९७६ च्या फॅक्टरीज् अॅक्टमध्ये घालण्यात आले असून त्यानुसार असे ठरविण्यात आले आहे की कंत्राटी कामगारांच्या कायद्या-मध्ये काहीही सांगितले असले तरी देखील १९४८ च्या फॅक्ट-रीज् अॅक्टमध्ये ज्या १९७६ मध्ये नवीन बदल झाल्यामुळे फॅक्टरीज् अॅक्टच्या सर्व तरतुदी कंत्राटी कामगारांनाही लागू होतील.

आता यापुढे असा कोणासही युक्तिवाद करता येणार नाही की कंत्राटी कामगार कारखान्यात नोकरीवर असल्यामुळे त्यांना फॅक्टरीज् अॅक्ट लागू होणार नाही.

●●●

अर्थ
Posted under prepayment License ... at Deccan Gymkhana post office
रजि. नं. P.N.C. 205

संपादक–मालक–मुद्रक–प्रकाशक–प्रा. कमलाकर परचुरे, परशुराम प्रोसेस, पुणे ५.




# महाराष्ट्र बँकेची मदत घ्या

महाराष्ट्र बँक...तुमची जिव्हाळयाची बँक...कोणत्याना कोणत्या क्षेत्रामध्ये सातत्याने धडपड करणाऱ्या तुमच्यासारख्या महत्वाकांक्षी माणसांना जाणीवपूर्वक मदत करणारी बँक...

स्वतःचे भवितव्य घडविण्याच्या तुमच्या प्रयत्नांना आम्ही भरघोस मदत करू...आर्थिक साहाय्य करू...व्यवसायामधील अडचणी समजावून सांगू...तांत्रिक व व्यवस्थापनाबद्दलसुद्धा मार्गदर्शन करू.

आमच्याकडे या. देशभर पसरलेल्या ४५० पेक्षा अधिक शाखांपैकी प्रत्येक शाखा तुमच्या गरजांकडे व्यक्तिगतरीत्या लक्ष देईल...आत्मीयतेने सहकार्य करील...हवे तेव्हा.

महाराष्ट्र बँकेची मदत घ्या...सारे प्रश्न सुटलेच म्हणून समजा!

**बँक ऑफ महाराष्ट्र**
११७७ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२

PRATIBHA 768 MAR



- 6 JUL 1984

।अर्थी।
जून १९७७





## घन वळले

घन वळले:
गवतावर हिरव्या लाटा,
थेंब टपटपले,
गंधार लागुनी
तीव्र जाईच्या वाटा....

घन वळले:
अनवरत कसे हे झरती,
कळसास धुके बिलगले,
घर माझे
हृदयाशी धारा धरती....

घन वळले:
कुरणावर भिजले बगळे,
मनांतुन हलले
शुभ्र शब्दांचे
हे ओले पंखच सगळे....

घन वळले:
वाटेवर कुणिही नाही,
एकटा दूरवर बघतो:
अनाहत नादे
भरल्यात दिशा या दाही....

— मंगेश पाडगांवकर

## हे घन! आओ....

जन-जन के, मन के आँगन में, अमृत-कन बरसाते आओ;
कन-कन के, दुखिया जीवन में, नवजीवन सरसाते आओ-
हे घन! आओ.

आओ, 'पिहू' पुकार पपीहे, कब से तुमको बुला रहे हैं;
आओ, कब से मोर-मोरनी, डोर आस की झुला रहे है;
गगन-घाट पर, रुके हुए पग, कृषक-सुता को रुला रहे हैं;
जाने क्यों ये घन, सावन के; वसुंधरा को भुला रहे हैं?
नदिया, कूप, सरोवर प्यासे, हे घन! प्यास बुझाते आओ-
हे घन! आओ.

कब से आस लगाये बैठी, ग्रामवासिनी भारत-माता;,
जन-जन के जीवन की डोरी, तोड़ न देना जीवन-दाता;
खेत-खेत में रेत उड़ेगा, अगर न तुमने समझा नाता;
हे जलधर! अब आभी जाओ, कब से हलधर तुम्हें बुलाता;
जल बरसाते, हर्ष जगाते, मेघ! मृदंग बजाते आओ-
हे घन! आओ.

कालिदास के मेघदूत! पढ़ लो, जनता के मन की पाती;
दमका दो, हे मेघ मनोहर! आशा के दीपक में बाती;
इन्द्रधनुष का मुकुट लगाकर आओ, कर दो शीतल छात्री;
हे वर्षा के कलश! आरती सजा, भारती तुम्हें बुलाती;
मेघराग बनकर घन वरसो, व्याकुल मन की आग बुझाओ-
हे घन! आओ.

सरस्वती कुमार 'दीपक'

| अनुक्रम | पृष्ठे |
|---|---|
| आलोक | १ |
| भारताची राज्यघटना आणि गांधीजींच्या सत्ता बिकेंद्रीकरणाचा विचार — प्रा. स. म. गोळवलकर | २ |
| रशियाची आर्थिक प्रगती — प्रा. अ. कृ. पोफळे | ५ |
| वायदे बाजार, सोने-चांदी बाजार आणि शेअर बाजार — प्रा. स. अ. रानडे | ७ |
| एक्स्पोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन | १९ |
| सूर्यशक्तीचा उत्पादन कार्यात उपयोग — राजस परचुरे | २१ |
| विज्ञान वर्तमान | २३ |
| स्वतःचा उद्योगधंदा करण्याची संधी — प. म. विकास महामंडळ | २६ |



# अर्थ

आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

संपादक : **प्रा. कमलाकर परचुरे**

वर्ष ३ रे    अंक २ रा : जून १९७७

किंमत ३ रुपये    वार्षिक वर्गणी ३० रुपये

कार्यालय : ९०६ शिवाजीनगर, पुणे ४.


# आलोक

हा जूनचा अंक आम्ही आमच्या वाचकांना थोड्या विलंबाने देतो आहोत त्याबद्दल दिलगीर आहोत. जुलैचा अंक मात्र ह्याच महिन्याच्या २० तारखेपर्यंत प्रकाशित करू शकू. त्या अंकात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषितज्ञ डॉ. नानासाहेब पवार ह्यांचा, तसेच बँकिंग क्षेत्रातील नामवंत अर्थशास्त्रज्ञ डॉ. वसंतराव पटवर्धन ह्यांचे लेख संग्रहणीय आहेत. नेहमीच्या सदरांप्रमाणे इतर उपयुक्त साहित्य त्यात असेलच. जुलैच्या अंकात कृषिउत्पन्न आणि बँका ह्या विषयांवर अधिक भर देण्यात येईल.

● ● ●

# भारताची राज्यघटना आणि गांधीजींच्या सत्ताविकेंद्रीकरणाचा विचार

प्रा. स. म. गोळवलकर
फर्गसन महाविद्यालय, पुणे

असे म्हटले जाते की संविधाननिर्मिती हा एक साहित्य-चौर्याचाच नमुना असतो. ज्या भूमीसाठी व तेथील नागरिकांसाठी संविधानाचा आराखडा बनविला जातो तेथील गरजा, लोकांच्या आशा-आकांक्षा, प्रस्थापित रूढी व परंपरा यांचा प्रभाव हा जसा संविधानावर पडलेला दिसतो तसाच देशाच्या सरहद्दीबाहेरील असलेल्या इतर देशांच्या शासनपद्धतीचा प्रभावसुद्धा पडलेला आढळतो. तसेच संविधाननिर्मितीत जे प्रामुख्याने पुढाकार घेतात त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची राजकीय मूल्ये, विश्वास व एकूण विचारांचा कल यांचाही प्रभाव संविधानाच्या स्वरूपावर होतो. भारताच्या संविधानाचे वरील दृष्टिकोनातून परीक्षण केल्यास त्याची प्रचिती येते.

भारतीय घटनेच्या ठळक वैशिष्ट्यांकडे नजर टाकली तर आपण या निर्णयाप्रत येतो की हे संविधान म्हणजे पाश्चिमात्य उदारमतवादी राजकीय विचार व तेथे दृढ झालेल्या राजकीय संस्था यांचेच प्रतीक आहे. घटनेच्या निर्मात्यांना या पाश्चिमात्य राजकीय विचाराने प्रभावित झालेल्या शासकीय संस्था, हा देश व तेथील नागरीक यांच्या गरजांची पूर्तता करू शकतील असा विश्वास वाटत होता. भारताच्या संविधानावर या पाश्चिमात्य शासकीय संस्थांचा पडलेला प्रभाव पुढीलप्रमाणे दर्शविता येतो.

१) आपण जी संसदीय शासनपद्धति उचलली ती प्रामुख्याने ब्रिटनच्या संसदीय पद्धतीचे अनुकरण होते. ब्रिटनच्या संसदीय पद्धतीचा प्रभाव आपणावर इतका पडला होता की इतके दीर्घ संविधान बनविणाऱ्या संविधानकर्त्यांनी संसद सदस्य व विधानसभा व त्याचे सदस्य यांचे विशेषाधिकार व हक्क संविधानात नमूद न करता ते ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्स या लोकप्रतिनिधी गृहाचे व तेथील सदस्यांचे जे आहेत तेच आपले आहेत असे स्पष्टपणे नमूद केले.

२) भारतातील संघराज्यपद्धति ही प्रामुख्याने अमेरिकन संघराज्य पद्धतीवर आधारलेली आहे. त्याचबरोबर राष्ट्रकुलाचे सदस्य असलेल्या ऑस्ट्रेलिया व कॅनडा यांच्या संघराज्यपद्धतीचा प्रभावही भारतीय संघराज्यपद्धतीवर पडलेला दिसतो.

३) भारतीय घटनेतील मूलभूत हक्कांचा आराखडा अमेरिकन संविधानाच्या मसुद्यामुळे प्रभावित झालेला दिसतो. त्याचप्रमाणे युनोने स्वीकारलेली मानवी हक्कांची सनद भारतीय हक्कांच्या जडणघडणीस कारणीभूत झालेली आहे.

४) घटनेतील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे मार्गदर्शक तत्त्वे की ज्यात भारत हे समाजकल्याणकारी राज्य होण्यास काय करावे याबद्दल केलेले मार्गदर्शन हे प्रामुख्याने आयर्लंडच्या संविधानावर उभारलेले दिसते.

यावरून हे लक्षात येते की भारताच्या संविधानकर्त्यांना मिळालेल्या प्रेरणा या प्रामुख्याने अमेरिका व युरोप येथील संविधानविषयक असलेल्या राजकीय विचारातून मिळालेल्या होत्या. तसेच ब्रिटिशांनी भारतात ज्या पाश्चिमात्य शासनसंस्था राबविण्यास सुरुवात केली व त्यापासून जी एक परंपरा निर्माण झाली त्याचाही प्रभाव संविधानकर्त्यांवर पडलेला होता. भारतीयांच्या स्वातंत्र्याच्या मागणीला प्रतिसाद देत असताना अल्पशा प्रमाणात का होईना संसदीय पद्धत ब्रिटिशांनी रुजविली. या देशाची भव्यता व विस्तृतता तसेच सांस्कृतिक विभिन्नता लक्षात घेऊन स्वतः एकावयवी असणाऱ्या ब्रिटनने भारतात प्रथमच संघराज्य पद्धती निर्माण केली. भारतीय संघराज्य याचा जो आराखडा संविधानात दिसतो त्यावर १९३५ च्या कायद्याचा परिणाम खूपच जाणवतो.

या सर्व गोष्टींवरून हे लक्षात येते की गांधींचे राजकीय विचार व तत्त्वज्ञानाचा संविधानावर पडलेला प्रभाव हा अत्यंत अल्प आहे व केवळ रूपकात्मक आहे. जो काही थोडाफार प्रभाव पडलेला दिसतो तो घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वात आढळतो. अर्थात मार्गदर्शक तत्त्वांचा मूळ गाभा हा फॅबियन

समाजवादी तत्त्वज्ञानाचा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. गांधींच्या विचारांचा केवळ आदर करण्यासाठी त्यांना मान्य असणारी काही तत्त्वे घटनाकर्त्यांनी उचलली व त्यांचा मार्गदर्शक तत्त्वात समावेश केला. उदा० खेड्यातील ग्रामपंचायती ग्रामोद्योग, मादक पेयावरील बंदी, गोहत्या बंदी, अस्पृश्य जातीजमातींच्या कल्याणासाठी विशेष उपाय, इत्यादि गांधीमान्य तत्त्वे मार्गदर्शक तत्त्वांत आढळतात. तसेच जर मूलभूत हक्कांचे परीक्षण केले तर समता, स्वातंत्र्य, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क या हक्कात समाविष्ट होणाऱ्या गोष्टी गांधींना संमत होतील अशाच होत्या. तसे पाहिले गेल्यास केवळ वयाच्या अटीखेरीज इतर कोणत्याही अटीविरहित प्रौढ मतदानाचे तत्त्व जे घटनेने स्वीकारले ते गांधीमान्यच होते. अर्थात प्रौढ मतदानाचा हक्क देत असताना त्याची सांगड श्रमाशी घातली पाहिजे असे गांधींना वाटत होते. वर सांगितलेल्या प्रमाणातच म्हणजे अत्यंत मर्यादित स्वरूपात गांधीजींचा प्रभाव संविधानावर पडलेला दिसतो.

संविधानविषयक गांधींच्या ज्या काही कल्पना होत्या, त्या प्रत्यक्षात का आणल्या गेल्या नाहीत त्याची कारणमीमांसा पहाण्याचे अगोदर त्या कल्पना काय होत्या हे जाणून घेणे आवश्यक आहे. परंतु हे जाणून घेत असताना एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे, ती म्हणजे ज्यास आपण गांधीजींचे राजकीय विचार म्हणतो ते त्यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांशी अत्यंत संलग्न असे आहेत. त्यात फारकत करता येत नाही. त्यांचे सर्व विचार म्हणजे एक जीवनविषयक तत्त्वज्ञानच होते. संविधान बनवीत असताना भारतीयांनी आपल्या सांस्कृतिक वारशाकडे, रूढी व परंपरांकडे पाठ फिरवून पाश्चिमात्य राजकीय संस्थांचे अंधानुकरण करू नये असे त्यांचे मत होते. भारत हा खेड्यांचा देश आहे व तेथील ग्रामपंचायतींना एक काळाचे अधिष्ठान आहे हे लक्षात घेऊन ग्रामपंचायत त्याचा पाया आहे अशी अप्रत्यक्ष निर्वाचन पद्धतीने निर्माण केलेली पंचायत राज्य-पद्धति अखिल भारतीय स्तरावर निर्माण करावी हे त्यांचे संविधानविषयक विचार होते. सत्तेच्या केंद्रियकरणास, ती हिंसेवर आधारलेली आहे म्हणून त्यांचा विरोध होता व हे सत्ताविकेंद्रीकरण व लोकांचा राजकीय सहभाग, पंचायत राज्यपद्धतीची रचना केली तर प्राप्त होऊ शकेल असे त्यांना वाटत होते. भारतातील खेडी जरी आदर्श नसली तरी त्यामध्ये आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक सुधारणा घडवून आणता येतील असे त्यांना वाटत होते. खेड्यातील सरळ व साधी माणसे व तेथील साधेसुधे जीवन यांचे त्यांना विलक्षण आकर्षण होते. औद्योगीकरण व त्या आधारावर उभे असलेले नागरीकरण यांना गांधीजींचा विरोध होता. अशा ठिकाणचे जीवन म्हणजे अनैतिकतेने व खोट्या, कृत्रिम मूल्यांच्या आधारावर उभारलेले असते अशी त्यांची मनोधारणा होती. तेव्हा समाज व राजकीय संरचनेचा खेडे हाच पाया असला पाहिजे असे त्यांना वाटत होते. खेड्यातील ग्रामपंचायत खेड्याला शासनव्यवस्था देईल, तेथील शेती समाजाला अन्न पुरवील व तेथील ग्रामोद्योग ग्रामनिवासींच्या इतर भौतिक गरजा पुरवतील अशी व्यवस्था त्यांना मान्य होती. अशा प्रकारे राज्यविरहित व वर्गविरहित सहकार्य, अहिंसा व प्रेम यावर उभारलेल्या समाजरचनेचे स्वप्न ते पहात होते. भारताने या विचारांचा स्वीकार केला तर केंद्रोत्कर्षी शासनव्यवस्था पंतप्रधान व मंत्रिमंडळे, समाजात अनैतिकता निर्माण करणारे व सदा सत्तास्पर्धेत गुंतलेले राजकीय पक्ष यांची गरजच पडणार नाही अशी गांधींची खात्री होती. आवश्यक तेवढेच औद्योगीकरण केले जाईल व किमान गरजा असलेले आनंदी व समाधानी जीवन भारतीय नागरिकांना प्राप्त करून देऊन त्यांचा नैतिक दर्जा वाढावा. सर्वात मुख्य म्हणजे स्वावलंबी व स्वयंपूर्ण अशी खेडी बनून विकास हा तळापासून म्हणजे लोकांच्या पुढाकारापासून व्हावा असे गांधीजींना वाटत होते.

गांधीजींचे घटनाविषयक वरील तत्त्वज्ञान हे एक देशसेवेचे व्रत घेतलेल्या महापुरुषाचे तत्त्वज्ञान होते व हे तत्त्वज्ञान स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी ज्या काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केले त्याने स्वीकारावे अशी त्यांची इच्छा होती. म्हणूनच वरील स्वप्न साकार होण्यासाठी काँग्रेस पक्षाने स्वतःचे विसर्जन करावे व राजकीय पक्ष म्हणून न रहाता केवळ सेवाधारी व्रतस्थ व्यक्तींचा तो संघटित गट म्हणून रहावा अशी त्यांची इच्छा होती. परंतु स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे नेतृत्व मान्य असलेल्या नेहरू प्रभृति नेत्यांना गांधीजींचे हे राजकीय व आर्थिक विचार मान्य नव्हते. त्यामुळेच काँग्रेस पक्ष नेत्यांनी गांधीजींची पक्षविसर्जनाची मागणी तर फेटाळलीच व त्यांच्या घटनेच्या तत्त्वज्ञानाचा अस्वीकार केला. साहजिकच घटना समितीत गांधीजींच्या विचारांचा पाठपुरावा करणारे सभासद हाताच्या बोटावर मोजण्याइतके होते व त्यामुळे त्या विचारांचा मोठा प्रभाव संविधान निर्मितीत पडला नाही. गांधीजींचे हे तत्त्वज्ञान अस्वीकृत झाले याची पुढीलप्रमाणे कारणमीमांसा देता येईल.

१) घटना समितीतील नेहरू व अन्य प्रमुख नेते हे ब्रिटिश शिक्षणपद्धतीतून तावून सुलाखून निघाले होते. त्यामुळे

पाश्चिमात्य उदारमतवादी, राजकीय विचारांचा प्रभाव गांधीजींच्या विचारापेक्षा जास्त प्रमाणात त्यांच्यावर पडला होता. त्याचप्रमाणे या उदारमतवादी तत्त्वज्ञानाच्या पायावर उभ्या असलेल्या शासकीय संस्थांचे आकर्षण त्यांना वाटत होते.

२) स्वातंत्र्य लढ्यातील गांधींचे नेतृत्व मान्य असणाऱ्या वरील नेत्यांना भौतिकाकडे पाठ फिरविलेला व एक प्रकारचा व्रतस्थ संन्याशाचा दृष्टिकोन मान्य नव्हता.

३) गांधीजींचे अर्थविषयक तत्त्वज्ञान म्हणजे त्यांचा औद्योगिकरणास असलेला विरोध व केवळ ग्रामोद्योगावर भर हेहि पूर्णपणे मान्य नव्हते. या परंपराप्रिय जुन्या रूढीत बांधल्या गेलेल्या समाजाचे आधुनिकीकरण व्हावे अशी नेत्यांची इच्छा होती. विसाव्या शतकात झालेल्या तांत्रिक संशोधनाचा फायदा व त्याची फळे भारतीय जनतेला मिळावीत अशी नेत्यांची इच्छा होती.

४) गांधीजींच्या राजकीय तत्त्वज्ञानापेक्षा समाजवादी लोकशाही तत्त्वज्ञानाचा प्रभाव नेहरू इत्यादि धुरीणांवर पडला होता. आर्थिक नियोजन व त्याद्वारे येणारे सत्तेचे केंद्रीकरण हेहि त्यांना मान्य होते. आर्थिक विकास करावयाचा झाल्यास त्यासाठी उचलावयाची पाऊले ही केंद्रीय नेतृत्वाला घ्यावी लागतील त्या बाबतीत खेड्यातील अशिक्षित जनता तो पुढाकार घेण्यास असमर्थ आहे असे त्यांना वाटत होते.

५) केवळ खेड्यावरच जोर देणारी राजकीय रचना करावयाची झाल्यास जाती-जमातीत, अंधश्रद्धेत व प्रतिगामी रूढीत गुंतलेला ग्रामीण समाज हा त्यातून कधीच बाहेर पडणार नाही असे त्यांना वाटत होते. तसेच यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण हे एका अर्थापलिकडे गेले तर त्यातून संकुचितपणा अधिकच वाढेल व राष्ट्रीय एकता निर्माण व्हायची नाही अशी भीति नेत्यांना वाटत होती. गांधीजींच्या पंचायत राज्य कल्पनेचे गोडवे गाणाऱ्या घटना समितीतील सदस्यांची टर डॉ. आंबेडकरांनी खेडे म्हणजे अज्ञान, अंधःकार, प्रतिगामी रूढी व संकेत यांचे साचलेले तळे असे म्हणून केली होती.

६) गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढ्यात उतरलेल्या सामान्य समाजाला स्वातंत्र्योत्तर काळात प्रौढ मतदानाचा अधिकार देऊन राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी दिली जाईल, असे अभिवचन नेत्यांनी दिले होते. गांधीजींचा शासनविषयक दृष्टिकोन व त्यांनी स्वीकारलेली पंचायत राज्याची कल्पना ही प्रत्यक्ष मतदानाऐवजी अप्रत्यक्ष मतदानावर आधारलेली होती. ती स्वीकारणे म्हणजे वरील आश्वासनाचा भंग करणे असे झाले असते. भारतातील नागरिक अशिक्षित असले तरी सांसदीय पद्धत राबविण्याइतकी किमान बुद्धी अथवा शहाणपणा त्यांच्यात आहे असा विश्वास घटना समितीचे सदस्यांना होता. घटनेतील मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे शिक्षणाचा प्रसार जर सर्वत्र झाला तर हा सुशिक्षितपणा मतदारांना अधिक डोळस बनवेल असे त्यांना वाटत होते.

वरील सर्व कारणांमुळे गांधीजींच्या संविधानविषयक विचारांचा संपूर्ण प्रभाव घटना समितीवर पडला नाही, परंतु हे विचार पूर्णपणे डावलणे अशक्य असल्यामुळे एक तडजोडवादी भूमिका घटना समितीने स्वीकारली, ती म्हणजे प्रांत व केंद्र स्तरावर पाश्चिमात्य नमुन्याच्या शासकीय संस्था, तर जिल्हा व त्याखालील पातळीवर गांधीजींची पंचायत राज्याची कल्पना.

●●●

## लेखकांस आवाहन

अर्थ पुनरुज्जीवित होऊन दोन वर्षे झाली. गेल्या दोन वर्षात त्याचे प्रकाशन आम्ही चिकाटीने रेटून अर्थ बराच सुस्थिर करू शकलो ह्याचे समाधान आहे.

चालू वर्षापासून अर्थमध्ये प्रकाशित होणाऱ्या लेखांकरता योग्य ते मानधन देणार आहोत.

विशिष्ट सदरात ३ महिन्यापेक्षा अधिक काळ लिहावयाचा एखाद्या लेखकाचा विचार असल्यास, त्यांनी अवश्य संपर्क साधावा. तसेच अर्थशास्त्रीय विषयावरची लहान पुस्तके वा पुस्तिका ह्या माध्यमामार्फत प्रकाशित करण्याची इच्छा असेल त्यांनीही आपल्या योजना कळवाव्यात.

श्रमिक

# रशियाची आर्थिक प्रगती

**प्रा. अ. कृ. पोफळे**
कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
लासलगाव, जि. नासिक

१९१७ मध्ये राज्यक्रांती झाल्यानंतर नियोजित अर्थव्यवस्थेने रशियात जी गेल्या ६० वर्षात आर्थिक प्रगती झाली, तिच्यामुळे रशियनांचे जीवनमान कसे सुधारले त्याचे चित्र ह्या लेखाद्वारा स्पष्ट होते.

जगाच्या इतिहासात रशियाने प्रथम आर्थिक नियोजन सुरू केले. आर्थिक नियोजनाद्वारा मर्यादित कालावधीत देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची किमया दाखवून जगाला दिपविले आहे.

महान समाजवादी क्रांतीचे जनक लेनिन यांनी १९१७ मध्ये रशियात क्रांतीद्वारा मूठभर लोकांची मक्तेदारी व शाही कुटुंबाचे वर्चस्व संपुष्टात आणले व समाजवादी अर्थव्यवस्थेची प्रतिष्ठापना केली. १९२८ पासून प्रथम पंचवार्षिक योजनेद्वारा रशियाने आपल्या समृद्ध आर्थिक व सामाजिक प्रगतीचा भक्कम पाया घातला.

आज रशियाने आर्थिक, वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रात किती दैदिप्यमान प्रगतीचे शिखर गाठले आहे याची प्रचिती १४ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर १९७६ पर्यंत नवी दिल्ली येथे प्रथमच भरलेल्या अतिभव्य अशा प्रदर्शनावरून सहजगत्या येऊ शकते. विविध क्षेत्रातील अत्यंत प्रगत हजारो उत्पादने प्रदर्शनात ठेवण्यात आली होती. रशियाने अनेक क्षेत्रात साधलेल्या प्रगतीचे ते द्योतकच होते.

रशिया दहावी पंचवार्षिक योजना (१९७६-८०) राबवीत आहे. सोवियत कम्युनिस्ट पार्टीच्या २५ व्या कॉंग्रेसमध्ये या योजनेची प्रमुख उद्दिष्टें ठरविण्यात आली. ऑक्टोबर क्रांतीच्या ५९ व्या वाढदिवसानिमित्त रशियात सर्वत्र प्रगतीचा आढावा घेण्यात आला. दहाव्या पंचवार्षिक योजनेचे प्रथम वर्षसुद्धा अपेक्षित वाटचाल करीत असल्याचे आढळून आलेले आहे. १९२८ मध्ये जरी पंचवार्षिक योजनेस सुरुवात झालेली असली तरी नियोजनबद्ध आर्थिक विकास ही कल्पना रशियास नवी नाही. १९२० मध्ये लेनिन यांनी एक दीर्घकालीन योजना आखून रशियाचे विद्युतीकरण घडवून आणण्याचे ठरविले होते. या वेळी स्वीकारण्यात आलेली तत्त्वेच पुढील योजनांना मार्गदर्शक ठरलेली आहेत.

## दैदिप्यमान औद्योगिक प्रगति

रशियाच्या आर्थिक प्रगतीत गतीमानता आहे. प्रत्यक्ष वस्तुरूप उत्पादनात लक्षणीय वाढ घडवून आणून रशियन जनतेचे राहणीमान उंचावण्यात आलेले आहे. आतापर्यंत रशियाच्या उद्योगधंद्यात २०० पटीने वाढ झालेली आहे.

अमेरिका, जपान इ. राष्ट्रांपेक्षाही रशियाचा औद्योगिक उत्पादनाचा वेग जास्त आहे. १९७१-७५ या कालावधीत रशियाच्या औद्योगिक उत्पादनाचा वेग ७.४ टक्के होता. याच काळात अमेरिका व जपान या देशांचा औद्योगिक उत्पादनाचा वेग अनुक्रमे ४ टक्के व ५.४ टक्के येवढा होता. जगातील एकूण औद्योगिक उत्पादनाच्या २० टक्के उत्पादन एकट्या रशियात होते. प्रसिद्ध ऑक्टोबर क्रांतीपूर्वी रशिया एकूण जागतिक उत्पादनाच्या केवळ ४ टक्केच उत्पादन करीत होता.

कोळसा, खनीज तेले, लोखंड व पोलाद निर्मितीत रशिया जगात अग्रेसर आहे प्रथम पंचवार्षिक योजना काळात कोळसा उत्पादन केवळ ३५५ लाख टन होते. १९७५ ला हे उत्पादन ७०१० लाख टन झालेले असून दहाव्या योजनेच्या अखेरीस (१९८०) ते ८०५० लाख टन होईल. त्याचप्रमाणे सिमेंट उत्पादन १८ लाख टनावरून १२२० लाख टन येवढे वाढले (१९७५). सन १९८० मध्ये हे उत्पादन १४४५ लाख टन येवढे होईल. जगातील एकूण लोखंड व पोलाद निर्मितीच्या २३ टक्के उत्पादन एकट्या रशियात होते. १९२८ मध्ये हे उत्पादन ४३ लाख टन होते. १९७५ मध्ये १४१० लाख टन झालेले आहे. या लोखंड व पोलाद निर्मितीच्या बाबतीत रशियाचा प्रथम क्रमांक लागतो.

औद्योगिकरणास अधिकाधिक चालना मिळण्याच्या हेतूने दहाव्या पंचवार्षिक योजना काळात शास्त्रीय व तांत्रिक प्रगती

साधण्याच्या हेतूने दोनशे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. रशियात उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आलेले असल्यामुळे उद्योगधंद्यांना मिळणाऱ्या एकूण नफ्यापैकी ९० टक्के नफा अर्थसंकल्पासाठी उपयोगात आणता येतो.

## वाढते शेती उत्पादन

शेती उत्पादनातही रशियाने लक्षणीय वाढ घडवून आणलेली आहे. अन्नधान्याचे उत्पादन प्रथम पंचवार्षिक योजनाकाळात केवळ ६६३ लाख टन होते १९७५ मध्ये ते उत्पादन १८१६ लाख टन येवढे झालेले आहे. योजनेच्या अखेरीस उत्पादन २२०० लाख टन होईल असा अंदाज आहे. १९८० पर्यंत सर्वच प्रकारचे उत्पादनात स्पृहणीय वाढ होईल असे तज्ज्ञांचे मत आहे. कापूस उत्पादन ६ लाख टनावरून ७६७ लाख टन येवढे वाढलेले आहे. सोवियत रशिया आपले सर्व प्रकारचे शेती उत्पादन अत्याधुनिक यंत्रांनी करतो. दूध, दुभते, अंडी, मांस या प्रमुख अन्नपदार्थांच्या उत्पादनातही खूपच वाढ झालेली आहे.

## उच्च राहणीमान व प्रगल्भ समाज

वाढते राष्ट्रीय व दरडोई उत्पन्न, स्थिर किंमती, नियंत्रित लोकसंख्यावाढीचा दर यासुळे रशियन जनतेचे रहाणीमान खूपच उंचावलेले आहे. अमेरिकेसारख्या अत्यंत प्रगत राष्ट्राशी राहणीमानाच्या दृष्टीने रशिया बरोबरी करीत आहे. एका तज्ज्ञाच्या मते १९८० मध्ये रशियाचे राष्ट्रीय उत्पन्न हे १९७५ साली असलेल्या अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पन्नाएवढे होईल. एका समाजवादी राष्ट्राने भांडवलशाही राष्ट्राच्या तुलनेने केलेल्या प्रगतीस विशेष महत्त्व प्राप्त होते.

देशातील उपभोग्य वस्तु व सेवा यांच्या पुरवठ्यात वाढ करण्यासाठी रशियात "उपभोग निधीचा" उपयोग करून घेतला जातो. समाजाच्या राहणीमानात वाढ होण्यासाठी या निधीत वाढ करण्यात आली आहे हा निधी दहाव्या योजनेत ७६०० करोड रुबल एवढा होईल. (१ रुबल = ११७६ भारतीय रुपये- साधारणतः) नवव्या योजनेच्या तुलनेने हा निधी १२०० करोड रुबलने जास्त आहे. शिवाय १९८० पर्यंत रशियाचे राष्ट्रीय उत्पन्न २८ टक्क्यांनी वाढेल. या सर्वांचा एकत्रित चांगला परिणाम लोकांच्या राहणीमानात, सुखसोयीत वाढ होण्यात होईल.

रशियात किमान वेतन घेणाऱ्या शेतकरी, कामकरी, सामुदायिक शेतीवर राबणारे यांच्या वेतनात अगदी अलीकडील काळात वाढ घडवून आणण्यात आलेली आहे. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातही ३२ टक्क्यांनी वाढ होणार आहे. सेवानिवृत्त, असहाय्य व दुर्बल घटकांच्या मदतीत व सवलतीत वाढ करण्यात आली आहे. सेवानिवृत्त लोकांना लागणारी औषधे त्यांच्यासाठीच खास कमी केलेल्या दरात उपलब्ध होत आहेत. रशियात घरबांधणी हा राष्ट्रीय कार्यक्रम असतो. प्रतिवर्षी १० दशलक्ष लोकांना सुधारीत घरांचा लाभ होणार आहे. लोकांचे राहणीमान कायमस्वरुपी सुधारणा व्हावी या हेतूने त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ घडवून आणण्याकडे सरकारचा कटाक्ष असतो. योजनाकाळात सामाजिक काम करणाऱ्या कामगारांची कार्यक्षमता २५ टक्क्यांनी वाढणार आहे. औद्योगिक कामगारांच्या कार्यक्षमतेत ३१ टक्क्यांनी वाढ करण्यात येणार आहे.

बेरोजगारी या सर्वांत मोठ्या शत्रूचा नि:पात १९३० मध्येच करण्यात आलेला आहे. त्यानंतर सोवियत जनता बेरोजगारीशी परिचित नाही. दुसऱ्या योजनेपासूनच उद्योगांना सुयोग्य नफा मिळू लागल्यामुळे रशियात कराचे प्रमाण कमी करण्यात आलेले आहे. मजुरी व वेतन मिळविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या वास्तव उत्पन्नात १९५० च्या तुलनेने २.८ पटीने वाढ झालेली आहे. सामुहिक शेतीवर कष्ट करणाऱ्यांच्या वास्तव उत्पन्नात ४.७ पटीने वाढ झालेली आहे.

रशियन जनतेच्या करमणूकीच्या साधनातही वाढ करण्यात आलेली आहे. टुरिस्ट सेंटरची संख्या १९५० च्या तुलनेने कित्येक पटींनी वाढलेली आहे. चित्रपट सुविधा १९५० मध्ये ४२ हजार होत्या. १९७५ मध्ये हीच संख्या १ लाख ५४ हजारापेक्षा जास्त झालेली आहे.

## शैक्षणिक आघाडी

शिक्षण क्षेत्रातही रशियाची आगेकूच आहे. पहिल्या योजनेच्या सुरवातीस सार्वत्रिक निरक्षरता हा रशियाचा स्थायी भाव होता. आज हे चित्र पालटलेले आहे रशियात माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९५० मध्ये ३४.८ दशलक्ष होती. १९७५ मध्ये ही संख्या ४८.८ दशलक्ष होती. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्येही वाढ झालेली आहे ही संख्या १.२ दशलक्ष एवढी झालेली आहे. रशियन जनता जागृत असल्यामुळे देशाच्या आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक घडामोडीत आपला वाटा उचलत असते जनजागृतीचे कार्य वर्तमानपत्रे, मासिके इ. मार्फत केले जाते. पोस्टाचे सहाय्याने वर्तमानपत्रांचा खप १९५० मध्ये ६९९८ दशलक्ष एवढा होता. १९७४ मध्ये हा खप ३७०२४ एवढा वाढलेला आहे. याशिवाय विविध मासिकांचा खपही विलक्षण जास्त आहे. १९५० मध्ये वार्षिक खप १८१ दशलक्ष वरून २९७३ दशलक्ष एवढा झालेला आहे.

औद्योगिक, शेती, व्यापार वाहतुक व शिक्षणक्षेत्रात आमुलाग्र क्रांती घडवून रशियाने आपल्या समृद्ध जीवनाचा पाया घातलेला आहे. या सर्वच क्षेत्रात तो अमेरिका, जपान यासारख्या प्रगत राष्ट्रांच्या बरोबरीने आगेकूच करीत आहे. समाजवादी ध्येयाने प्रेरीत होऊन, रशियाने मूलभूत उद्योगधंदे, इंजिनिअरिंग, विद्युतनिर्मिती तेलउद्योग, खाणी, औषधे, वाहतुक, प्रशिक्षण इ. विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती साधून जगाला एक आदर्श उदाहरण घालून दिलेले आहे. ● ● ●

चलन वित्त बँका विकास नियोजन

# वायदेबाजार, सोने-चांदी बाजार आणि शेअरबाजार

प्रा. स. अ. रानडे, मुंबई

सेवानिवृत्त प्रा. स. आ. रानडे ह्यांचा नाणेबाजारावरील मागील अंकातील लेख, वाचकांना उपयुक्त वाटला. ह्या अंकात त्यांचेकडून वायदेबाजार, सोने-चांदीबाजार आणि सट्टा बाजार ह्या महाराष्ट्रातल्या सर्वसामान्यांना अनाकलनीय वाटणाऱ्या विषयांचा सुबोध परिचय करून देणारा प्रदीर्घ लेख मिळवला आहे. विशेषत: एम्. ए., एम्. कॉम. तसेच वाणिज्य शास्त्राच्या विद्यार्थ्यांना हा लेख संदर्भास आवश्यक वाटेल. मागणी आल्यास ह्या दोन्ही लेखांचे पुस्तिकेच्या स्वरूपात प्रकाशन करण्याचा आमचा मानस आहे.

### कापूस बाजार

कापूस ही वायदे बाजारातील महत्त्वाची वस्तु आहे. मुंबई, न्यूयॉर्क व लिव्हरपूल येथे त्यांचे बाजार होते, पण आता न्यूयॉर्क व मुंबई येथेच ते आहेत. त्यापैकी मुंबई बाजारात जेरिला कापसाचे सौदे होतात. ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनमध्ये वायद्याचे सौदे होतात. हजर मालाचे (Ready) सौदे शिवरीस होतात. कापूस, तेलबिया वगैरेंचा खाण्यास उपयोग नसतो. म्हणून त्यांना रोकड पिके (cash crops) अथवा money crops म्हणून संबोधण्यात येते. म्हणजे ती उत्पन्न करण्यात पैसा मिळविणे हाच मुख्य हेतु असतो.

कापसात सामान्यत: अश्विन व वैशाख असे दोन मुख्य वायदे असतात. एक वायदा संपत येतो तेव्हा दुसरा सुरू होतो. म्हणजे काही दिवस दोन्ही वायदे एकदम चालतात. युद्धकालात थोडया मुदतीचे वायदे निघाल्यामुळे एकदम तीनही वायदे चालू असू शकतात. यात वायद्याचे अखेरीस माल देणे अथवा घेणेचो कल्पना असतेच. सर्व वायदेबाजारात वायदा केव्हा पुरा होतो व डिलिव्हरी केव्हा व कशी द्यावी घ्यावी हे नियमानुसार ठरलेलेच असते. म्हणूनच वायदा हा जुगार नाही (wagering contract). सामान्य व्यवहारात यालाच 'हेज कॉन्ट्रॅक्ट" असे म्हणतात. To hedge याचा अर्थ to lessen one's holdings or obligations so as to minimise loss, नुकसान कमी व्हावे म्हणून माल विकणे असा होतो. म्हणूनच हजर माल ज्याचेजवळ आहे ते तो वायद्यात डिलिव्हरीच्या तयारीने विकतात. म्हणजेच ते "हजर माल हजर करितात" अथवा "हजर पोटी विक्री करितात" असे म्हटले जाते.

या बाजारातही shorts आणि longs असे दोन प्रकार पडतात. long अथवा to be on the long side of the market म्हणजे भाव वाढतील अशा आशेने माल पकडून ठेवणे अथवा नवीन घेणे असा अर्थ होतो. short याचा अर्थ माल नसताना भाव घटतील या आशेने विकणे असा होतो. निराळ्या शब्दात longs = तेजीवाले व shorts = मंदीवाले. यावरून shorts म्हणजे भाव घटेल या आशेने विकणारे व longs म्हणजे भाव वाढेल या आशेने घेणारे असाही अर्थ होतोच.

### तेजी–मंदीचा धंदा (Options)

कापूस, तेलबिया, सोने, चांदी या सर्व बाजारात तेजीमंदी लावली जाते व खाल्ली जाते. या दरेक बाजारात तेजीमंदी सही पडण्याचा दिवसही ठरलेला असतो. समजा आजच तेजीमंदी सही पडली व कालच नवी मासिक तेजीमंदी निघाली आहे. भाव खंडीस ४५७ आहे व तेजीमंदी अथवा जोटा १२ रु. आहे. तुम्ही १०० खंडीचा जोटा लावला आहे.

म्हणजे १०० खंडी बद्दल तुम्हास तेजीमंदी सही पडण्याच्या दिवशी १२०० रु. भरले पाहिजेत हे नक्की आहे.

या जोटा लावण्यापुरता तुमचा व्यापार एक महिन्यानंतर स्पष्ट होईल. ४५७ रु. वर तुम्ही जोटा लावला आणि ४४० वर तेजीमंदी सही पडली तर ४५७ ला तुम्ही विकले होते असे समजून ती विक्री ४४० ला तुम्ही खरेदी करून सौदा सारखा केला असे समजण्यात येईल. म्हणजे खंडीमागे तुम्हाला १७ रु. नफा झाला. पण जोटयाचे १२ रु. आहेत ते तुम्हास देणे आहे. म्हणून तुम्हाला खरा लाभ खंडीमागे पाच रु. होईल. तेजीमंदी ४५७ वरच सही पडली तर तुम्हास काहीच मिळावयाचे नाही, पण १२ रु. द्यावेच लागतील.

तेजीमंदी लावल्यामुळे प्रत्यक्ष काही एक न करिता आपोआप खरेदी अथवा विक्री होते हा त्याचा विशेष आहे. अर्थात् तशी सूचना दिली पाहिजे. ज्या भावावर आपण तेजीमंदी लावतो त्यापेक्षा तेजीमंदी सही पडण्याचे दिवशी भाव खाली अथवा कमी असले, तर ज्या भावावर तेजीमंदी लावली त्या भावावर आपण विक्री केली असे समजून तेजीमंदी सही पडण्याच्या भावावर आपली खरेदी होऊन तेजीमंदीचा सौदा सारखा होतो. या उलट तेजीमंदी ज्या भावावर लावली त्यापेक्षा उंच भावावर ती सही पडली म्हणजे जोटा (=तेजीमंदी) ज्या भावावर लाविली त्या भावात तुम्ही खरेदी केली होती असे समजून तेजीमंदी सहीच्या भावावर तुमची विक्री समजून सौदा सारखा होतो. या दोनही वेळी ज्या भावावर जोटा लाविला तो भाव आणि ज्या भावावर तेजीमंदी सही पडली तो भाव यातील फरक इतके पैसे तुम्हास मिळतील, पण जोटा लावला तेवढे जोटयाचे पैसे तुम्हास द्यावेच लागतील.

जर ४५७ वर तुम्ही १२ रु. जोटा लाविला व तेजीमंदी ४३० वर सही पडली तर ४५७ ला तुमची विक्री झाली व ४३० ला खरेदी केली असे समजून ४५७–४३०=२७ रु. खंडीमागे तुम्हास मिळतील, पण १२ रुपये जोटयाचे जातील. ४८२ वर तेजीमंदी सही पडली तर ४८० ला तुम्ही विक्री केली असे समजून ४५७ ला तुम्ही आधी खरेदी केली होती असे समजण्यात येईल व तुम्हास ४८०–४५७= २३ रु. खंडीमागे मिळतील पण १२ रु. जोटयाचे द्यावेच लागतील. म्हणजे १२ रुपये निश्चित जाणारच. सहीचा भाव व जोटा लावण्याचा भाव यात १२ रु. पेक्षा (जोटयापेक्षा) जास्त अंतर असेल तरच तुम्हास नफा होईल व तो १२ पेक्षा कमी असेल तर नुकसान होईल.

वर तेजीमंदी लावणाऱ्याच्या दृष्टीने विवेचन केले. तेजीमंदी खाणाऱ्याच्या दृष्टीने काय होते? त्याची स्थिती बरोबर उलट असते. ३५७ वर त्याने जोटा खाल्ला आहे, म्हणजे त्याला १२ रु. निश्चित मिळणार आहेत. पण तेजीमंदी ३५७ पेक्षा जास्त भावावर पडली तर ४५७ ला त्याने विक्री केली होती असे समजून ४५७ व तेजीमंदी सहीचा भाव यातील फरक त्याला भरावा लागेल. ४८० वर तेजीमंदी सही पडली तर ४८०–४५७=२३ रु. त्याला द्यावे लागतील. कारण ४५७ ला त्याने विकलेला माल ४८० च्या भावात खरेदी केला. उलट ४४० वर तेजीमंदी सही पडली तर ४५७–४४० = ७ रु. खंडीमागे त्याला द्यावे लागतील. ४५७ ची खरेदी त्याने ४४० ला विकली असा याचा अर्थ झाला. अर्थात १२रु. त्याला निश्चित मिळणार आहेतच. अर्थात या उदाहरणावरून तेजीमंदी लावणाराला व खाणाराला निश्चित नफा व नुकसान होते असे वाचकांना वाटेल ते खरे नाही. माझ्या "तेजी-मंदी" पुस्तकात याचा विशेष खुलासा आहे.

जसा जोटा लावता येतो तशी नुसती तेजी अथवा मंदी लावता येते. वरील उदाहरणात ४५७ रु. भावावर नुसती तेजी ६ ते ६॥ रु. पडेल व नुसती मंदीही तेवढीच पडेल.

याप्रमाणेच अमुक एक फेर तेजीमंदी लावता येते. उदा. वरील उदाहरणात ४५७ च्या भावावर २० टका फेर मंदी लावली असेल तर पैसे मिळतील. २० टका फेर तेजी लावली असेल तर ४४७–२०= ४३७ पेक्षा भाव वाढला तरच पैसे मिळणार. चालू भाव व तुमचा सौदा होण्याचा भाव यात फार अंतर आहे म्हणून तेजी मंदीही फार थोडी लावावी लागते यालाच "गली टाकणे" असे म्हणतात.

अशा रीतीने अमुक भावाची तेजी अगर मंदीही टाकता येते. उदा. बाजारात भाव ४५७ आहे. तेजीचे वातावरण आहे तेव्हा ४८० भाव होऊन खाली येईल असे तुम्हास वाटले तर ४८० ची मंदीही तुम्ही लावू शकता. म्हणजे ४८० भाव होऊन नंतर मंदी झाली तरच तुम्हास पैसे मिळतात. याप्रमाणे ४३० होऊन तेजी होईल असे वाटले तर ४३० ची तेजीही लावता येते व ४३० अगर कमी भाव होऊन पुनः वाढला तर तुम्हास पैसे मिळतात. ही रक्कम ४८० व सहीचा भाव अथवा ४३० व सहीचा भाव यातील फरकाइतकी असणार हे उघडच आहे. अर्थात् ४८० अथवा ४३० या मर्यादांना भाव एकदा पोचले तरच पुढे हिशेब होणार. अर्थात बाजारात याप्रमाणे नेहमीच सौदे होणे शक्य असते असे नाही. परंतु थोडा जास्तो दर दिला तर तेजीमंदी खाणारे व्यापारी

बाजारात सामान्यत: निघतातच. भयंकर वधघटीत अर्थात कोणी नवी तेजीमंदी खात नाहीच.

## हाजर व वायदा यातील बदला

वायदे बाजाराबरोबरच हाजर मालाची खरेदी विक्री सुरूच असते हे वाचकांना माहीतच आहे. यात हाजर व वायदा यांचा बदला तुम्ही करू शकता. सामान्यत: हाजर व वायदा यातील भावात खूप फरक असेल तरच यात चांगला लाभ होणार. तुमचे जवळ १००० खंडी कापूस आहे व हाजर भाव ५०० रु. आहे. चालू भावात तो काढला तर तुम्हास खंडीमागे ४० रु. नफा आहे असे समजा. वायद्यात काही कारणाने भाव ४४० रु. आहे. कारण पीक मोठे येण्याचा अंदाज आहे. पण तुम्हास पटत नाही. तर तुम्ही ५०० रु भावाने हाजर माल विका व १०० खंडी ४४० च्या भावाने घ्या. वायदा अजून ४ महिनें दूर आहे असे समजू. तर तुम्ही काही केले नाही तरी आजच तुम्हास १००० खंडी-मागे ६० हजार रुपये नक्की नफा आहे. कारण खंडीमागे ५०० –४४०=६० हा तुमचा नफा आहे. यात तुम्ही "हाजर विकून वायदा घेतला" असे म्हणतात. निराळया भाषेत हाजर पोटी वायदा घेणें असेहि म्हणता येईल.

या उलट हाजर ४५० व वायदा ५०० रु. आहे व तुमचेकडे माल आहेच. हा माल तुम्ही ४३० ला घेतला आहे. तो तुम्ही वायद्यात ५०० रु. भावाने विकला तर डिलिव्हरीच्या दिवशी तुम्हास पैसे मिळतील व त्याच दिवशी माल द्यावा लागेल, पण खंडीमागे आज ७० रु. निश्चित नफा आहे; यास "हाजर पोटी वायद्यात विकणे" असे म्हणतात.

## ५ इतर बाजार

यात सोने, चांदी व बिया हे बाजार मुख्य होत. सोने चांदी यांचे मुख्य बाजार मुंबई, कलकत्ता व इंदूर हे होत. मुंबई बाजारात सोन्याचा व्यापार किमान २५० तोळे व चांदीत २८०० तोळे (एक पाट=२८०० तोळे=१ bar) यात होतो. सोन्याच्या बाजारात १०० टच् हे उत्कृष्ट सोने समजले जाते. त्यापेक्षा खाली टच् असला तर त्याप्रमाणे ९९ टच्, ९६ टच् असे म्हणतात. सोन्याला "पाटलो" अशी गुजराथी संज्ञा आहे.

सोने चांदी मुख्यत: परदेशातून येतात. युद्धकालात परदेशातून माल येणे बंद झाले तेव्हा रिझर्व्ह बँकेने सोनेचांदीची विक्री सुरू केली. सरकारविषयक अविश्वासामुळेही पुष्कळांनी सोनेचांदीची धूम खरेदी केली. सोनेचांदीत असा शिलकी माल लोकांच्या जवळ पुष्कळ असतो. अशाला "संग्रहित माल" hoarded gold, silver अथवा hoardings असे म्हणतात. न्यूयॉर्क आणि लंडन येथेही चांदी सोन्याचे बाजार आहेत व तेथील वधघटीचा मुंबईच्या भावावर परिणाम होतो. भाव सामान्य रीतीने एकाच पातळीत असले पाहिजेत (parity) कित्येकदा हाजर मालाचा उठाव वाढतो अथवा कमी होतो. "१०० पाट आज पेशावरला गेले" म्हणजे मुंबईच्या बाहेर गेले. युद्धकालात रिझर्व्ह बँक हे एकच विक्रीचे मुख्य साधन होते. तेव्हा "रिझर्व्ह बँकेने टेंडरे मागितली आहेत", "रिझर्व्ह बँकेने ६० रु. ने सोने विकलें" अशा बातम्यांचा बाजारावर फार परिणाम होत असे. "टेंडरे निघाली आहेत" हा एक वायदे बाजारातील नित्य प्रयोग आहे. To tender = देणे, to offer in writing to execute work.

टेंडरे ही घर बांधणे वगैरेत नेहमी मागवली जातात. वायदे बाजारात खास वायद्यात डिलिव्हरीच्या महिन्यात विक्रीवाले व खरेदीवाले डिलिव्हरीची तयारी दर्शवितात. यात हाजर माल देण्याची तयारी असलेले विक्रेते टेंडरे काढतात, म्हणजे तेवढा माल ते डिलिव्हरीत देण्याची तयारी दाखवितात "रिझर्व्ह बँक टेंडरे मागवीत होती" म्हणजे सोने अथवा चांदी घेण्यासाठी व्यापाऱ्यांकडून अर्ज मागवीत होती. हेतु हा की जास्तीत जास्त भाव मिळावा.

चांदीत मध्यंतरी सरकारने ७ वा एडवर्ड व ८ वा जॉर्ज छापाचे रुपये बंद केले. पण कित्येकांनी त्यांचा संग्रह केला व चांदीचा भाव खूप वाढला तेव्हा त्यातील चांदीची किंमतही १ रु. पेक्षा जास्त झाली. अशा वेळी "रुपये कढईत गेले" असा प्रयोग होत होता. असे लाखो रुपये आले तर मुंबईत शिक्क्यांची आवक वाढल्यामुळे चांदी तयार झाली असे वाचण्यात येई. मुंबईत सरकारी टांकसाळेत ( Mint ) पुष्कळशी चांदी दिली तर ती शुद्ध करून टच् शोधून त्याचे पाट करून मिळतात. अर्थात याला फी द्यावीच लागते. पण यामुळे वायद्यात विकणाराजवळ असा माल असेल तर त्याचे पाट बनवून वायद्यात डिलिव्हरी देता येते. युद्धानंतर थोडथोडा माल येऊ लागला पण वायद्यात तो देता येईल की नाही या प्रश्नामुळे आगबोटीच्या येण्याच्या तारखा महत्त्वाच्या ठरल्या.

**बिया बाजार :–** यात आळशी, एरंडी व भुईमूग या मुख्य वस्तु आहेत. यात आळशीचा व्यापार किमान १०० टन होतो. एरंडीत हेच मान १०० खंडी आहे.

या सर्व कच्च्या वस्तूंच्या व्यापारात सामान्यत: दोन वायदे असतातच एकाला "नजीकचा वायदा" (near contract) आणि दुसऱ्यास "दूरचा वायदा" (distant contract) असे म्हणतात. उदा. वैशाख व आश्विन हे दोन वायदे फाल्गुनात चालू असले तर वैशाख नजीकचा वायदा व आश्विन दूरचा वायदा होईल.

पूर्वी परदेशात बिया खूप जात. व्होलकर्ट, रॅली वगैरे बिया व कापूस यात पुष्कळ खरेदी करून माल परदेशात पाठवीत. तेव्हा "ऑफिसे धूम·खरेदी करीत आहेत", "ऑफिसांची विक्री जोरात आहे" असल्या प्रयोगात 'ऑफिसे' म्हणजे असा खरेदी विक्री करून माल परदेशी चढविणाऱ्या कंपन्या. "जपानी लेवाली थंडी छे." म्हणजे जपान खरेदी करू इच्छित नाही.

युद्धकालात ब्रिटनने देशासाठी खाद्य पदार्थ खरेदी करण्यासाठी ब्रिटिश अन्नसंस्था (British Food Ministry) स्थापन केली व ती हिंदुस्थानात खरेदी करू लागली. तेव्हा तिच्या मागणीचाही बाजारावर परिणाम होऊ लागला. खरेदीसाठी तिच्याकडून भावाच्या मर्यादाही (limits) येत असतच.

तेली बिया व कापूस यांच्या उत्पादनाला अर्थात् चांगले हवामान व पाणी हवेच. ते आहे की नाही याचाही विचार बाजारात होतोच. पुण्याच्या ऑब्झरव्हेटरीचे रिपोर्ट या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. "दक्षिण अमेरिकेतील टोळांच्या उपद्रवामुळे न्यूयॉर्क बाजार तेजाळला," "वऱ्हाडात हिम पडल्यामुळे कापूस गरम आहे" यात हवेवरून काढलेली अनुमाने महत्त्वाची ठरतात.

कापूस बिया, ऊस वगैरेंच्या लागवडीसंबंधी सरकारी अंदाज नेहमी प्रसिद्ध होतात. (Forecasts) हे संपूर्ण बिनचूक नसतात पण ते तसे व्हावेत यासाठी सरकार खटपट करीत आहे, पण जे हल्ली मिळतात त्यांचाही बाजारावर परिणाम होतो. "यंदा कापसाची लागवड शे. १० वर वाढली व पीकही १० जास्त उतरेल अशा सरकारी अंदाजामुळेच जरीला ५०० वरून ४८० वर आला" याचा अर्थ स्पष्टच आहे

## वृत्तपत्रीय काही मथळे

१. Nervous unloading of the bulls = तेजीवाल्यांची घबराटपूर्वक विक्री-तेजीवाळाओनी घबराटभरी वेचावली.

२. Market swings both ways = बाजारातील द्विमुखी वधघट-बजारोमां द्विमुखी वधघट. Two sides fluctuations.

३. Steep rise in shares = शेअर्समध्ये एकसारखी तेजी शेरोमां तेजीनी चालू भडक.

४. Nervous covering by the bears = मंदीवाल्यांची घबराटपूर्वक खरेदी. मंदीवालाओनी घबराटभरी लेवाली.

५. The Market is listless = बाजारात विशेष धंद्याची प्रवृत्ती नाही-बजारमां खास धंधो नथी.

६. The Market is dull = बाजारात धंदा नाही - बजारमां कांई नवीजुनी नथी

७. The rumour of bonus share = बोनस शेअर मिळाल्याची हवा-बच्या शेरनी हवा.

८. Cornering = एकसारखे घेऊन माल एक हातात घेणे व विकणाऱ्यांना नमविणे अथवा खूप विकून घेणारे टिकू शकणार नाहीत असे करणे, यात पहिला प्रकारच असतो-खेलो.

९. Market is featureless = वधघटीशिवाय पडून असलेले बाजार-पडी रहेलो बाजार.

१०. Tired = (पुष्कळ दिवस बाजारात वधघट नसल्यामुळे) कंटाळलेले (तेजीवाले अथवा मंदीवाले)-कंटाळेलो.

११. Shares open firm but close weak = शेअर्स उघडताना मजबूत, पण बाजार बंद होताना नरम-उघडतां तेजी बंद बजारे मंदी.

१२. Overbought position = खूप खरेदीची स्थिती-वधारे लेणवाळी टेक्निकल परिस्थिती.

१३ Over sold position = खूप विक्रीची (वरच्या उलट) स्थिती-वधारे वेचाणवाळी टेक्निकल परिस्थिती.

१४. Nervous sentiment = अनिश्चित असे लोकमत (तेजी अगर मंदी बद्दलचे) - दहजारू लोकमानस.

१५. Sellers prove aggressive = मंदीवाल्यांचा खूप जोर-मंदीवाळाओनो हुमलो. मंदीवालाओनो वधेलो जोर.

१६. Buyers predominate = खरेदीवाल्यांचा जोर-लेणवाळा जोर करे छे.

१७. Restricted trading on the stock exchange = शेअर बाजारात सुस्ती-शेअर बजारमां सुस्ती.

१८. Cotton strong on advices from Karachi = कराचीच्या बातम्यामुळे कापूस मजबूत = करांचीना समाचारे रूनुं मजबूत वळण.

१९ Uncertain trend = अनिश्चित वळण-अनिश्चित वळण.

२०. Undertone = आंतरिक वळण (बाजारचा आतला सूर)-आंतरिक वळण.

२१. Good demand in ready silver = हाजर चांदीस चांगली मागणी – हाजर चांदीमां सारी मांग.

२२. Cotton touches a new peak = कापसाचा नवीन अत्युच्च भाव–रूनो नवो उंची भाव.

२३. Clive street = क्लाइव्ह स्ट्रीट – कलकत्त्याचा शेअर बाजार = कलकत्तानो शेर वजार.

२४. Dalal street = मुंबईचा शेअर बाजार–मुंबईनो शेर बजार.

२५. Wall street = लंडनचा शेअर बाजार–लंडननो शेर बजार.

## वृत्तपत्रीय माहिती कशी वाचावी ?

शेअर्स, व्यापार व तद्विषयक माहिती देणारी कॉमर्स, कॅपिटल, इंडियन फायनॅन्स वगैरे अनेक वृत्तपत्रे निघतात. त्यामध्ये शेअर्स हा एक भाग असतो. निरनिराळ्या दलालांचेही रिपोर्टस् निघतात. त्यात निरनिराळे लोक निरनिराळ्या रीतीने माहिती देतात खालील पत्रकात यासंबंधी सर्व कोष्टके घेतलेली आहेत; अर्थात् दरेकात ही सर्व कोष्टके असतातच असे नाही. (कोष्टक नं. १ पाहा.)

यापैकी १, २, ३, ४ यावरून कंपनीची आर्थिक स्थिती स्पष्ट होते. ५, ६, ७ या खान्यावरून कंपनीने धंद्यात किती पैसा गुंतविला आहे व घसारा फंड किती आहे हे कळते. ८ वरून मॅनेजिंग एजंटस्‌ची प्रतिष्ठा किती आहे हे कळते. ११ व १२ यावरून कंपनी जे काम करते त्याचे साहित्य किती आहे हे समजते. १३, १४, १६ यावरून आपण जे भांडवल गुंतविणार त्यावर किती व्याज येऊ शकेल हे कळते. १५ व्या स्तंभावरून कंपनीच्या मालमत्तेची खरेदीच्या वेळी काय स्थिती होती हे कळते व आज काय आहे, हे पाहून भविष्याविषयी अंदाज येतो. १९ व्या वरूनही गेल्या वर्षातील फेरफार कळतात. १७ व १८ यावरून डिव्हिडंड केव्हा मिळेल याचा अंदाज येतो. १९ वरून गेल्या वर्षातील चढउतार समजते. अशा पुस्तकातून ५।१० वर्षातीलही किमान व कमाल भाव दिलेले असतात.

### कोष्टक नं. १

| Paid up ordinary capital ऑर्डिनरी भरलेले भांडवल | Debentures. डिबेंचर्स | Pref. Capital प्रेफरन्स भांडवल | Reserve Fund रिझर्व्ह फंड | Block Account मालमत्ता | Depreciation घसारा फंड | Carried Forward पुढील वर्षासाठी खेचलेली रक्कम | Managing agents मॅनेजिंग एजंट | Name of the company कंपनीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |

| Year of Registration स्थापनेचे वर्ष | No. of Looms माग वगैरे | No. of spindles चात्या | Paid up per Share ऑ. शेअरमागे भरलेली रक्कम | Market Rate चालू बाजारभाव | Capitalization per loom per Planted acre etc. माग एकर वगैरेसाठी प्रत्येकी झालेला खर्च | Dividend P. C. for three years. तीन वर्षांचे डिव्हिडंड. (१) (२) (३) | Accounts closed वर्ष पुरे केव्हा होते ? | Peport in रिपोर्ट केव्हा येतो ? | Highest & Lowest rate in the preceding year, गेल्या वर्षातील किमान व कमाल भाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |

## २ कापूस बाजार वगैरे

यात Acrage = एकंदर लागवडीखालील जमीन,
Arrivals in Bombay = मुंबईतील आवक,
Cotton Ginned = जिन केलेला कापूस,
Total Crop = एकंदर पीक, वगैरे शब्द येतात.

## निरनिराळ्या वृत्तपत्रात वगैरे देण्यात येणारे बाजारभाव

शेअर्समध्येही निरनिराळे धंदे करणाऱ्या निरनिराळ्या कंपन्या असतात. त्यांचे वर्गीकरण त्याप्रमाणे केलेले असते. सरकारी कर्ज रोखे ( Govt. Securities ) बँका, विमा कं.;

विजेच्या कं. वगैरे (Public Utilities) कापसाच्या गिरण्या, हे मुंबईचे मुख्य प्रकार, तर मद्रासला मळे (Plantings) हा एक निराळा प्रकार. कारण तिकडे चहाचे व रबराचे मळे आहेत. कलकत्त्याला ज्यूट, चहा व कोळसा स्वतंत्र सदरात येतात.

मुख्य मुख्य सदरे झाली तरी इतर पुष्कळ कंपन्या राहतातच. त्या सर्व "इतर कंपन्या (Miscellaneous)" म्हणून दाखवितात.

## बाजारभाव

५ टक्के म्हैसूर (१९५५) लोन १२७–०–०

सरकारी कर्जाची मूळ किंमत नेहमी १०० असते. ते १९५५ चे आहे म्हणजे १९५५ मध्ये पैसे परत मिळणार.

### म्युनिसिपल कर्जे (Loans)

| रक्कम | किती साली काढले | परत केव्हा देणार | व्याजाचा दर | बाजार भाव |
|---|---|---|---|---|
| १७ लाख | Year of Issue. १८७६–९१ | Repayable १९४८ | ५ टक्के | १०४ |

सरकारप्रमाणेच मोठमोठ्या म्युनि. व प्रांतिक सरकारे पण मोठी कर्जे काढतात. सरकारी व असली निमसरकारी कर्जे यांचे व्याज नेहमी करासह (Taxable) असते व करमुक्त असेल (Tax Free) तर तसे दाखविलेले असते.

### काही छापील रिपोर्टस्

| Capital in (000) | Name नाव | Paid up भरलेले | Ct. Price चालू भाव |
|---|---|---|---|
| 200 | Coonoor Tea | 10 | 16 |

| Dividends % 1944 | 1945 | Yr. ending वर्ष अखेर | Dividend Payable डिव्हिडंड–मास |
|---|---|---|---|
| 15 | 5 | 9 | 2 |

× Interim

यात कं. चे भांडवल दोन लाख, प्रत्येक शेअरमागे भरलेले १०, भाव १६ व १९४४ व ४५ मधील डिव्हिडंड १५ टक्के ५% (सहा महिन्यांचे) वर्ष ऑक्टोबर अखेर व डिव्हिडंड मिळण्याचा महिना फेब्रुवारी एवढा बोध होतो. ९ = सप्टेंबर, २ = फेब्रुवारी.

| तेजपूर टी. | १.४.४४ | ७.४.४५ | १०.४.४५ | ११.४.४५ | १२.४.४५ | १३.४.४५ |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९¼ | २१¾ C. T. २१ S. O. | २१ ९/१६ | २२ | २१ ११/१६ | |

यात एक वर्षापूर्वीचे भाव दिले आहेत व चालू भाव दिले आहेत. C. T. म्हणजे Cross Transaction. अ कडून ब शेअर्स घतो व हातोहात कला विकतो त्याला C. T. म्हणतात. S. C. म्हणजे Small lot. कलकत्ता बाजारात लहान शेअर्स (१० रु. चे.) १०० व २५ अशा लॉटात मिळतात. S. L. म्हणजे २५ चा लॉट. (Small odd Lot) म्हणजे २५ पेक्षा कमी जास्त असा वेडावाकडा गट.

## रिपोर्टातून दिलेल्या टीपा

या अत्यंत महत्त्वाच्या असतात. खाली अशा काही कंपन्यांचा रिपोर्ट व टीपा दिल्या आहेत. नावे काल्पनिक आहेत.

| कंपनीचे नाव | मूळ किंमत | बाजार भाव. | शेकडा | डिव्हिडंड |
|---|---|---|---|---|
| | | | १९४४— | —१९४५ |
| श्री केमिकल | १०० | ३६५ | १५ × | १५× |
| न्यू टी ७% प्रे | १०० | १२० | ७ | ७ a. b. |
| मानूर इले. ५%प्रे | १०० | १३० | ५ | ५C. |
| राणा कॉटन् | १०d | २२५ | ५० | ५० |

टीपा × = includes bonus = डिव्हिडंडमध्ये बोनस मिळवून १५ टक्के आकडा दर्शविला आहे.

a=Redeemable at par at any time at six months notice. केव्हाही सहा महिन्यांची नोटीस देऊन, मूळ किंमत परत देण्याचा (व अशा रीतीने शेअर्स रद्द करण्याचा) हक्क आहे.

b = Preference dividend in arrears for three years. प्रेफरन्स शेअर्सचे तीन वर्षांचे व्याज देण्याचे बाकी आहे.

C = participate with the oridnary upto 8%. ८ टक्के ऑर्डिनरी शेअर्स बरोबर ८ टक्के व्याजास पात्र. (पहिले ५ टक्के नक्की व अधिक तीन टक्के ऑर्डिनरीस व्याज दिल्यानंतर मिळविण्यास पात्र.)

D = Every paid up ordinary share of 100 Rs. was reduced to Rs.10. (दरेक १०० रु. भरलेल्या शेअर्सची किंमत कंनेच घटवून १० रु. केली.)

वरील टीपा केवळ नमुन्यादाखलच आहेत. इतर अनेक टीपा असतात त्या येथे सर्व दिलेल्या नाहीत. पण या टीपा वाचून नंतरच शेअर्स घेणे शहाणपणाचे असते. नाहीतर माहितीच्या अभावी नुकसानीचा व्यवहार होतो. उदा. ८ टक्के व्याजाचा एक रिडीमेबल प्रेफरन्स शेअर १०५ ला मिळतो म्हणून आपण घेतला आणि सहा महिन्यांनीच त्याचे पैसे परत मिळावयाचे आहेत. तर फार तर १०० + ४ व्याज आपणास मिळणार. म्हणून या टीपा वाचणे जरूर असते.

खाली निरनिराळ्या तऱ्हेचे दोन मराठी रिपोर्ट सटीप दिले आहेत. पहिला केसरीतील आहे. दुसरा "उद्यम" मधील आहे. टीपांवरून वाचकांना त्या रिपोर्टांचा संपूर्ण अर्थ समजेलच. असे इंग्रजी, गुजराती, हिंदी रिपोर्टही प्रसिद्ध होतातच. पुढील प्रकरणात असे काही रिपोर्ट, त्यांची भाषांतरे व टीपा येतील.

## सोनेचांदी मजबूत

सोनेचांदी बाजारात पुन: तेजीवाल्यांनी [1]गोंधळ घातला आहे. या लोकांच्या खरेदीवर व मंदीवाल्यांना वेचणी कापणे भाग झाल्यामुळे चांदीसोन्याचे भाव कडाडले आहेत. बुलियन एक्सचेंजचा चालू [2]वायदा तेजीचा असल्याने भावात वाढ अपेक्षित होतीच. पण परदेशातून माल येण्याची अपेक्षा खोटी ठरली व तेजीवाल्यांची बाजारावर पकड झाली. तयार[3] मालाचा उठाव मध्यंतरी पडला होता तोही पुन: वाढला आणि बाजारात चांदीसोन्याचा तरता[4] साठा उरला नाही. अशा परिस्थितीतच मुंबईतील तेजीवाल्यांनी स्थानिक बाजारावर आपली पकड शाबूत ठेवण्यास न्यूयॉर्क व लंडन येथील बाजारास[5] पाठिंबा दिला असे म्हणतात. कारण त्यांच्या पाठिंब्यामुळे लंडनचा भाव पुन: ५९ पेन्सावर गेला. परंतु ही तेजी फसवी[6] आहे.

("केसरी" तून फेरफार करून)

१ गोंधळ घातला = जोर केला. खरेदीवाले खूप घेत आहेत.

२ चालू वायदा तेजीचा आहे = माल लौकर देण्याचा करार आहे ( व बाजारात माल नाही ). आठ दिवसांचा वायदा व तीन महिन्यांचा वायदा यात पहिल्यात बदला दर आठवड्यास द्यावा लागतो.

३ तयार माल = हजर माल. उठाव पडला होता = मागणी नव्हती.

४ तरता साठा = विक्रीस तयार असा माल. बाजारात मिळू शकेल असा.

५ बाजारास पाठिंबा दिला = खरेदी केली.

६ तेजी फसवी आहे = तेजी टिकेल अशी नाही.

सोनें–चांदी–रिझर्व्ह बँकेकडून माल [1]मिळण्याची शक्यता अखेर खोटी ठरली व मुंबई बुलियनमध्येही अखेर भाव[2] बांधण्यात आले आणि बाजार बंद करण्यात आला. वायदे बाजारात सहा महिन्यांचा[3] वायदा व मासिक वळण[4] करण्याची खटपट सुरू आहे.

शेअर्समधील तेजीची कारणे–चलनविस्तार[5] अजूनही सुरूच आहे. आणि लोकांच्या हातात भरपूर पैसा[6] असल्यामुळे ते खेळा करू शकतात. युद्धकालात मंदीवाल्यांना[7] चांगलाच मार बसला. त्यामुळे सट्टा बाजारात ज्यांना "गांवलोक"[8] म्हणतात तेही मंदीच्या तडाख्यात सापडत नाहीत.

कापूस–कापसामध्ये आंतरिक[9] स्थिती मजबूत असली तरी मेमध्ये येणाऱ्या मालाच्या[10] बोजामुळे भाव पुन: गडगडले.

(उद्यम, जून १९४७)

१ रिझर्व्ह बँक युद्धकालापासून सोनेचांदी विकू लागली.

२ भाव बांधणे = कमाल व किमान भाव ठरविणे. बाजारात गंभीर परिस्थिती उत्पन्न झाली म्हणजे बाजारचे नियामक मंडळ असे करते.

३ सहा महिन्यांचा वायदा = सहा महिन्यांनी डिलिव्हरी देणे व घेणे.

४ मासिक वळण = पैशांचा हिशेब करून त्याप्रमाणे हिशेब करून महिन्यातून एकदा पैसे देणे व घेणे. यात सौदे उभेच राहतात.

५ चलनविस्तार = Inflation नोटांची वाढ.

६ श्रीमंतांजवळ चलनविस्तारामुळे खूप खेळता पैसा आहे.

७ भाव घटतील या आशेने विकणारे.

८ गावलोक–Moffussil गिऱ्हाईके. बाहेरून धंदा करणारे, बाजारशी सबंध नसणारे लोक.

९ आंतरिक स्थिति–Undertone आंतरप्रवाह. बाजारचे आतले मत.

१० येणाऱ्या मालाचा बोजा=पीक तयार होऊन बाजारात येते त्याचा बोजा.

## आणखी काही रिपोर्टस् व त्यांची भाषांतरे

(1) " In the Calcutta Stock Exchange Jutes were neglected owing to persistent ru.. ours of strikes; but the shares of electric companies

were in demand. Dacca Electrics opened 23-40 but closed 23-14. In tea shares too the small priced shares were much in demand."

(१) कलकत्ता स्टॉक एक्स्चेंजमध्ये ज्यूट शेअर्समध्ये खरेदीचा अभाव होता, कारण त्यांच्यात संप होणार अशी एकसारखी अफवा होती. परंतु वीज कं. ना चांगलीच मागणी होती. चहाच्या शेअर्समध्ये लहान शेअर्संना ( १० रु. मूळ किंमत) मागणी होती.

(2) "In sympathy with the Calcutta market, the Bombay Stock exchange opened weak and there were more sellers than buyers. Tata Deferreds (last close 2720) opened 2680 and closed 2610. Unofficially they were quoted as low as 2590.

(२) कलकत्ता बाजाराच्या मंदीमुळे मुंबई शेअर बाजार नरम उघडला आणि खरेदीदारापेक्षा विकणारेच अधिक होते• टाटा डिफर्ड (आदल्या दिवशीचा भाव २७२०) २६८० उघडला व २६१० बंद झाला. परंतु खाजगीत त्याचाच भाव २५९० इतका खाली गेला.

(3) "There was strong rumour that the Tariff Board refused to continue the protection to the Sugar Industry. So there was long liquidation in them by investors, Belapurs lost 30 points, opening at 265 and closing at 235. However it is not advisable to sell at these because big parties are interested in the counter."

(३) टॅरिफ बोर्डाने साखरेच्या धंद्याला संरक्षण देण्याचे नाकारले अशी अफवा आली आणि त्यामुळे नाणे गुंतविणारांनी साखरेचे शेअर्स खूप विकले. बेलापूरमध्ये ३० रु. भाव खाली गेला, उघडताना २६५ बंद २३०. परंतु खालच्या भावात विकण्याचा सल्ला नाही कारण काही मातबर लोकांची त्यात पकड आहे असे म्हणतात.

(4) The repeal of the E. P. tax proved a tonic to the share bazar and there was hectic activity on the Bombay Stock Exchange. Bombay Dyings opened at 2820 and closed 3000. Caution however is needed because great upheavals are expected in the present unsteady position.

(४) जादा नफा कर रद्द झाला व शेअरबाजार बहरला. मुंबई शेअर बाजारात एकच गर्दी झाली बॉम्बे डाइंग २८२० वर उघडला व बंद भाव ३००० आहे परंतु धंदा फार सावधगिरीने करावा, कारण या अनिश्चित परिस्थितीत भाव फारच कमी जास्त होतील असे दिसते.

(5) "In the Steel section, there was a sharp decline in Indian Irons in sympathy with a lower London Market. Deferreds however were strong on rumours of the conversion scheme. In others business was on a restricted scale."

(५) स्टील शेअर्समध्ये, लंडन बाजारातील नरमाईच्या बातमीमुळे इंडियन आयर्न एकदम घसरला. परंतु कन्व्हर्शन् (फेरफाराची योजना-डिफर्डच्या ऐवजी काही ऑर्डिनरी शेअर्स देण्याची योजना) योजनेच्या अफवेमुळे डिफर्ड मजबूत होता. दुसऱ्या धंद्याचे मान फारच कमी होते.

(6) "In Bank Shares interest was evinced. The Bank of Baroda crossed 140 and Reserve Banks were wanted at 145."

(६) बँक शेअर्समध्ये लोकांचे लक्ष आहे आणि बडोदे बँक १४० वर गेली. रिझर्व्ह बँकेच्या शेअर्सना १४५ या भावाने मागणी आहे.

(7) "The new issue of Kohinoors changed the tone of the market. Everybody hopes for new issues everywhere. Kohinoors opened at 865 and rose to 900. We advise however to unload holdings at every good rise."

(७) कोहिनूरच्या नवीन (जादा) निघालेल्या शेअर्समुळे बाजाराचा रंग एकदम बदलला. आता दरेक कं. नवीन शेअर्स काढील असे प्रत्येकास वाटू लागले आहे. कोहिनूर ८६५ उघडला व ९०० वर बंद झाला. परंतु दरेक उंच भावावर हजर माल काढून टाकण्याचा सल्ला आहे.

(8) "Mysore shares proved popular because it is hoped there would be no hasty nationalisation. Mysore Sugars, Lamps and Chemicals touched new high peaks."

(८) म्हैसूर संस्थानात घिसाडघाईने राष्ट्रीयीकरण (सरकारने धंदे स्वतःच्या ताब्यात घेणे) होणार नाही या आशेने म्हैसूरातील कंपन्यांच्या शेअर्सची मागणी वाढली. म्हैसूर शुगर, लँप व केमिकल्स यांच्या भावांनी नवीन उच्चांक गाठले.

(9) "We have a short week to report a week of three days, as there were four holidays. Naturally traders held aloof and prices closed a shade easier than the last week. It is possible

that the prices would deteriorate further but our advice is to buy at every good reaction as the reasons for the fall are mainly psychological."

(९) हा रिपोर्ट मात्र तीन दिवसांचाच आहे, कारण गेल्या आठवड्यात ४ दिवस सुट्टी होती. मोठे व्यापारी त्यामुळे धंद्यापासून दूर होते आणि गेल्या आठवड्यापेक्षा भाव किंचित घटून बंद झाले. अजून भाव घटणे शक्य आहे, परंतु ह्या घटण्याची कारणे विशेषतः मानसिक आहेत. (खरी नाहीत) तेव्हा चांगल्या घटाड्यास अवश्य खरेदी करण्याचा सल्ला आहे.

Budget Speculation was also exerting its influence all along. It is expected that the budget may reveal a deficit of about Rs, 150 crores. There will be increased taxation and there may be recourse to borrowing also. Of course direct and indirect taxation is inevitable.

In the present confused situation we cannot but suggest to our clients to restrict their activities. To those who can look up their funds for a pretty long time we suggest purchases of the following for investment and capital appreciation."

बजेटविषयक अंदाजांचाही बाजारावर परिणाम होत होताच. बजेटात चांगली १५० कोटींची तूट येईल असे म्हणतात. अर्थात् नवीन कर पडतील आणि शिवाय कर्जही काढावे लागेलच. अर्थात् प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करात वाढ होणारच.

आजच्या अनिश्चित परिस्थितीत आमच्या गिऱ्हाइकांनी धंद्याचे प्रमाण फार कमी करावे एवढेच आम्ही सुचवितो. जे आपले भांडवल दीर्घ काळपर्यंत गुंतवू शकतात त्यांनाच भांडवल गुंतविण्यासाठी व पुढे चढलेल्या भावाचा लाभ मिळावा म्हणून खालील शेअर्स घेण्याची शिफारस आहे.

**बजारोनी हवा:**— स्टील शेरो पाछळ मील शेरो घसडाया छे पण स्टील जेटलो एमां उत्साह क्यां छे ? एटलुज नहि पण नवुं लेनाराओ पण सावचेतीपूर्वक अने कसीकसीने लेता होय एम लागे छे. एटले स्टील जेटला मील शेरोना आंतरप्रवाहो मजबुताईना सूचक नथी. केलिको तो पहेलेथीज दबायेलो छे. मुंबईवाला बहु उंचे मथाळे भरायेला छे. अेटले बजारनी रंगतज सुधारे तो एमां बहु झडपी सुधारो आवतां वार नहि लागे, पण ए तेजीना जुवाळमां लोको लाईटमां आवे अने जूना तेजीवाळाओनां पोटला छुटता जाय एवी शक्यता तरफ पण नजर राखतां रही उंचे बहु उतावळ नहि करतां घटाडे लईने काम करवा जेवुं छे. चांदी परदेशथी आयात थवानां संजोगो हजी उभाज छे, हायकोर्टे झगडो गयो छे. वळी सोनुं मजबुत छे एटले मंदीवाळाओनां वेचाणो कपाता चमकारो आव्यो छे. पण सोनाजेटला चांदीना आंतरप्रवाहो मजबुत छे खरो ? ए प्रश्न जबाब मागे छे. सोनामां आजे भारे वेचाणो कपाता सारो उछाळो आव्यो छे अने वायदानो भाव ९१। अने हजरनो भाव १००।। जेवो गणाय छे. सोनुं आयात थाय एवी शक्यता ओछी छे. बीरला अने नारण मनोरे लीधानुं जणाय छे. (गुजरात समाचार अमदाबाद, ता. १८-११-४५).

**बाजारांचे हवामान :**— स्टील शेअर्सच्या पाठीमागे मिल शेअर्सचे भावही वाढत आहेत पण त्यात स्टील इतका (तेजीचा) जोर आहे कुठे ? एवढेच नाही तर नवीन घेणारे पण सावधानपूर्वक व अतिशय कसून विचार करून घेत आहेत असे दिसते. म्हणजे मिल शेअर्सचे आंतरिक वळण (internal tone) शेअर्स इतके भक्कम नाही. कॅलिको पहिल्यापासूनच दबलेला (ज्याचा भाव वाढला नाही असा) आहे. मुंबईचे मोठे लोक (parties) फार उंच भावात त्यात पडले आहेत (ते घेऊन बसले आहेत) आणि बाजारचे धोरणच सुधारले तर त्यात एकदम झडपी सुधारा (steep rise) होणेस वेळ लागणार नाही. पण या तेजीच्या लाटेत लोक (public) तेजीत येतील आणि (वरचे) जुने तेजीवाले माल विकून मोकळे होतील ही शक्यता ध्यानात घेतली पाहिजे. आणि फार उंच भावात न घेता घटलेल्या भावात घेणे इष्ट दिसते. परदेशातून चांदी येईल असा संभव आहेच. (तेजीवाले व मंदीवाले यांचा चांदीतील) झगडा कोर्टात गेला आहे. सोने मजबूत आहे म्हणून मंदीवाल्यानी विकऱ्या कापल्या आणि भाव वाढले पण सोन्याइतकी चांदीची आंतरिक स्थिति मजबूत आहे काय ? ह्या प्रश्नाचा जबाब हवा. सोन्यात आज पुष्कळ विकऱ्या कापल्या व भाव वाढला. आणि वायदा ९१। व हजर १००।। असा भाव दिसतो. सोने परदेशातून येईल अशी शक्यता कमी आहे. बिरला व नारायण मनोर यांनी आज सोने घेतल्याचे समजते.

"The New Era Industries met with a good reception and the list was closed on the second day. It is expected that the allotments will be below 50 per cent "

न्यू इरा इंडस्ट्रीजचे शेअर्स फारच लोकप्रिय झाले आणि दुसऱ्याच दिवशी शेअरविक्री बंद झाली. मागणीच्या

५० टक्केच शेअर्स देण्यात येतील असे दिसते (म्हणजे जेवढे शेअर्स विक्रीस काढले. त्याच्या दुप्पट मागणी आली)

" The insurance shares give a very poor yield and so they are not good for middle class investors. However those who are prepared to look up, Vulcans is a good invesment. "

विम्याच्या शेअर्संवर (हल्लीच्या मिती लक्षात घेता) फारच थोडे व्याज सुटते, आणि म्हणून मध्यम वर्गाच्या भांडवल गुंतविणाराना ते चांगले नाहीत. परंतु जे पुष्कळ वर्षे भांडवल गुंतवून ठेवण्यास तयार आहेत, (Lock up) त्यांना " व्हल्कन " चे शेअर्स घेणेची शिफारस आहे.

" The ceiling prices of piecegoods are to be lowered, for Fine Counts, but they will be raised for Coarse Counts. The working day will be one hour less but the wages will remain the same. This will adversely affect the mill industry."

" कापडाचे कमाल भाव बारीक कापडाचे कमी होतील पण जाड कापडाचे वाढतील. मजुरांच्या कामाचा दिवस (कामाचे तास) एक तासाने कमी होईल, पण पगार तोच राहील. मिल्सवर याचा विपरीत परिणाम होईल. (त्यांचा नफा घटेल.) "

" In silver, up country arrivals are on the increase and ' S. S. India ' due on the 15th is to bring 2,000 bars. In the ready market the off take is 50 bars and arrivals are 80 bars per day. The stocks are steadily mounting up. So silver ready receded from 168 to 165 and the forward rate is 155 at the close. However the difference is too large and so we cannot advise hedge selling at lower rates. "

" चांदीत देशातून (देशाच्या आतल्या भागातून) रोज अधिक माल येत आहे आणि १५ तारखेस येणाऱ्या इंडिया नावाच्या जहाजात सुमारे २००० चांदीचे पाट येतील. दररोज सुमारे ८० पाट (देशावरून) येत आहेत व उठाव मात्र ५० पाटांचा आहे अशा स्थितीत मुंबईतील हजरचा साठा हळूहळू वढत आहे. त्यामुळे हजर चांदी १६८ वरून १६५ वर आली आणि वायद्यात १५५ वर बंद झाली. परंतु हजर व वायदा यातील भावात मोठा फरक आहे. तेव्हा घटलेल्या भावात चांदी विकण्याचा सल्ला नाही. "

## वृत्तपत्रातील एक कल्पित पान

व्यापारी बातम्या कशा वाचाव्या याची संपूर्ण कल्पना पूर्वीच्या प्रकरणावरून वाचकांना आलीच असेल. आता या बातम्या सामान्यत: कशा दिलेल्या असतात हे पुन: एकदा प

| अमेरिकन कॉटन फ्यूचर्स | |
|---|---|
| नोव्हेंबर १९४७ वायदा. न्यूयॉर्क ता. २४-६-४७ | |
| आदल्या दिवशी बंद | १८६० |
| आज उघडताना | १८६७ |
| आज बंद | १८८८ |
| फरक | २८ तेजी |

**अमेरिकन भाव** बाजूला दिलेल कोष्टकाप्रमाणे भाव असतात. न्यूयॉर्कच्या कापू बाजारातील हे भ होत. हे भाव पौंडाचे सेंटस् म दिलेले असतात.

उदा० १८६० म्हणजे १८·६० सेंट्स्. कालचा बंद भ १८६० आजचा बंद १८८८ म्हणजे २८ जास्त आ म्हणजे २८ तेजी. सामान्य व्यापाऱ्यांना याचे महत्त्व न पण " अंक–फरक " नावाचा जो बेकायदेशीर जुगार अ त्यात याचेच महत्त्व फार असते.

Rates at a glance = थोडक्यात मुख्य भाव.

Market barometer = बाजाराचे हवामान

Closing rates = बंद भाव

अशा शीर्षकांखाली निरनिराळ्या वस्तूंचे भाव दिले असतात. सामान्यत: हे भाव वायदेबाजारातीलच असता उदा० मुंबईतील भाव हे खालीलप्रमाणे दाखविण्यात येती

| | |
|---|---|
| Tata Deferred | = डिफर्ड २१३० |
| Dying | = डाईंग ११०० |
| Gold | = सोने ११४ |
| Silver | = चांदी १७५ |
| Gold ready | = सोने (हजर) ११५ |
| Silver ready | = चांदी (हजर) १७७ |
| Cotton ( Sept. ) | = कापूस (सप्टेंबर) ४४४ |
| Cotton ready | = कापूस (हजर) ४५४ |
| Castorseeds (Sept) | = एरंडा (सप्टेंबर) १४८ |
| Castorseeds(ready) | = एरंडा (हजर) १५४ |

वरील भाव हे काही दर्शविलेले नसेल तर सामान्य वायद्यातील असतात. कापूस (सप्टेंबर) म्हणजे कापसात सप्टेंबर वायदा. Ready = हजर. हा हजर मालाचा भ असतो.

## मुंबई शेअर्समधील सामान्य विभागणी

यात कापडाच्या गिरण्या (Mills), बँका (Banks), वि कं. (Insurance Cos.) व इतर (Miscellaneous) हे मु विभाग पडतात.

मद्रासला वरील विभागाशिवाय मळे (Plantings) हा एक जादा विभाग आहे.

कलकत्त्याला वरील विभाग आहेतच; पण शिवाय ज्यूट (Jute) खाणी (Mines) चहाच्या कं. (Tea) साखरेच्या कं. (Sugar) हेही विभाग आहेत.

या स्टॉक् एक्सचेंजिस्मध्ये ऑर्डिनरी, प्रेफरन्स, डिबेंचरे वगैरेंचा व्यवहार होतो.

To-day's Fluctuations = आजची वधघट.

| Name वस्तूचे नाव | Opening खुलता | Highest उच्चतमभाव वधीने | Lowest किमान भाव घटीने | closing बंदभाव |
|---|---|---|---|---|
| डिफर्ड | २००० | २०२५ | १९७० | १९८० |
| सोनें | १०१ | १०३। | १०१॥ | १०२। |
| चांदी | १७३ | १७७ | १७४॥ | १७५॥ |
| एरंडा (सप्टें.) | १४३ | १४५ | १४४। | १४४ |
| कापूस (सप्टें.) | ४४५ | ४४७ | ४४६ | ४४६ |

ह्या कोष्टकावरून बाजारातील एक दिवसाच्या वधघटीची सामान्य कल्पना येईल. असेच आठवड्याचे भाव असतील तर त्यात (Week's high, week's low) असे शब्द येतील.

**शेअर बाजार :–** Share bazar यासंबंधी खालील कोष्टक पहा :–

| | | | | |
|---|---|---|---|---|
| टाटा डिफर्ड | (३०) | (१२९) | (c. d.) | २०९० |
| कोहिनूर | (१००) | (२५) | (XR) | ७०० |
| सिंधिया स्टीम | (१५) | (१।) | | ३९ |
| ,, ,, | | (१५) | (New) | ३२ |
| शिवराजपूर | (१०) | (२) | (xd) | ४५ |

यात पहिल्या कंसातील भाव शेअरची मूळ किंमत आहे. पुढील कंसात त्याचे व्याज आहे. पुढे टीप आहे.

c. d. = (cum dividend) व्याजासह. म्हणजे घेणारास व्याज मिळणार.

X R = ex Rights. हक्कबाद. जुन्या शेअर्सना जे (नवीन शेअरचे वगैरे) हक्क असतील ते बंद होऊन आता जुने शेअर, घेणाराना मिळत आहेत.

New–कंपनीने काढलेले नवीन शेअर्स.

xd = ex dividend = व्याज बाद

Cotton forecast for Bombay Province = मुंबई प्रांतातील कापसाच्या पिकाचा अंदाज

(वर्ष १९४४–४५)

| Variety | जात | Area acres (क्षेत्रफळ) | Outturn bales (उत्पन्न गांसडी) |
|---|---|---|---|
| Oomras | उमरा (जेरिलासह) | ३४२७६३ | ३३८७० |
| Broach | भडोच | २०९३४९ | ५६२७९ |
| Surti | सुरती | २५७२८० | ४२०५८ |
| Dholleras | धोलेरा | ७०१५१६ | ११४५९९ |
| Southerns | दक्षिण | ७२४९८७ | १०११७४ |
| | एकूण | २२३५८९५ | ३७७९८० |

दोन वर्षांची तुलना

| सन १९४४–४५ | सन १९४३–४४ |
|---|---|
| ३७७९८० गांसडी | ८७९००० गांसडी |
| २२३५८९५ एकर | ४२६४७६० एकर |

सारांश ४४–४५ सालात उत्पादन पुष्कळच घटले (सुमारे ५५ टक्के) व कापसाच्या लागवडीखालील जमीनही सुमारे ४८ टक्के घटली, म्हणजे हा रिपोर्ट तेजीचा आहे, असे म्हणतात, या उलट असेल, तर रिपोर्ट मंदीचा आहे असे म्हटले जाते. शेंगदाणा, गहूं, ऊंस वगैरेचेही असे रिपोर्ट निघतात. अमेरिकन कापूस रिपोर्टाचाही बाजारावर परिणाम होतो. ज्यूट, कापड वगैरेंचेही असेच रिपोर्ट प्रसिद्ध होतात. त्यावरून मालनिर्मिती, उत्पादन वगैरेंची माहिती मिळते. रेल्वेच्या उत्पन्नाचे, आयात निर्यातीचे आकडे प्रसिद्ध होतात. यावरूनही पुष्कळ अंदाज बांधता येतात. मद्रासचे मळे (plantings) यांच्या उत्पादनाचे व कलकत्ता येथील चहाच्या विक्रीचे (auctions of tea) असेच आकडे मिळू शकतात. हे सर्व वाचून सूक्ष्म अभ्यास केला तर बाजारच्या स्थितीवर प्रकाश पडतो.

## व्यापारी समालोचने कशी वाचावी ?

व्यापारी समालोचने वाचणे हे वरील प्रकरण ज्यांनी आत्मसात् केली त्यांना अगदी सोपे पडेल. परंतु त्याशिवाय बातम्यांचा अर्थ करणे व लेखकाचे धोरण समजावून घेणे हे महत्त्वाचे आहे.

समालोचनकारांचा एक वर्ग असा की त्यात बाजारच्या परिस्थितीचे नुमते स्पष्ट चित्रच देण्यात येते. उदा

'आज टाटा डिफर्ड २९०० उघडला. काल २८७५ बंद होता. शेअरबाजारात सर्वत्र तेजीच होत होती. गांवलोक (Moffusil) व दलाल यांची खरेदी एकसारखी सुरूच होती. टाटामध्ये २९००, २९१०, २९३०, २९६०, २९५०, २९४०, २९४५ असे फेरफार होऊन तारवणीवाल्यांच्या विक्रीमुळे २९३५ बंद राहिला. बाजारचा आंतरिक टोन मजबूत दिसतो. लोखंडास मिळणारे संरक्षण व टाटानी मागविलेली नवी मशिनरी यामुळे ही तेजी झाली. या वेळी मंदीच्या कारणाकडे कोणी लक्ष देत नाही!"

यात बाजारात काय होत आहे याचेच चित्रण आहे, स्वतःचे मत नाही.

कित्येक चांगली पत्रे हेच धोरण ठेवतात. असली पत्रे अवश्य वाचावीत.

खाजगी कंपन्यांचे (Brokers) रिपोर्टही निघतात. हे वाचताना पुष्कळ तारतम्य ठेवावे लागते. कारण पुष्कळदा त्यांचा धंदा बाजारात उभा असतो व ते त्याच तऱ्हेचा सल्ला देतात. कित्येकदा लेखकाची नैसर्गिक दृष्टी "तेजी" अथवा "मंदी" अशीच असते. तेजीवाल्याला भाव जरा कमी झाले की फार घटले असे वाटते, तर मंदीवाल्याला जरा वाढले की फार वाढले असे वाटते.

व्यापार समाचार वाचताना दरेक ठिकाणच्या बाजारचे धोरणही ध्यानात घ्यावे. उदा. अहमदाबाद हे मंदीचे स्थान समजतात म्हणजे तेथे मंदी फार लौकर होऊ शकते. मद्रासचे भाव हे मुंबईच्या प्रमाणात कमीच वाढतात अथवा घटतात. काही बाजारातून भाव (Quotations) प्रसिद्ध होतात पण सौदे (Transactions) होणे फार कठीण असते. उदा० कलकत्ता, मुंबई मद्रासशिवायचे शेअर बाजार या दृष्टीने फारच लहान आहेत व वायद्यात जरी ८।१० शेअर्स असले तरी २।३ शेअर्संचेच खरोखर सौदे पडतात.

कित्येक वेळा व्यापारी असल्या लेखकांना लाचही देतात व त्याप्रमाणे ते लिहितात. वृत्तपत्रातूनही ही स्थिती असते. मोठ्या व्यापाऱ्यांची वृत्तपत्रे जसजशी वाढतील तसतशी ही स्थिति आणखी वाढेल.

समालोचनातून जी माहिती दिलेली असते ती संपूर्ण वाचावी (facts) व त्यावरूनच स्वतःचे मत बनवावे. हे मत बनविताना तुमचा अर्थशास्त्र, व्यापारी बाजारांचे मानसशास्त्र, राज्यशास्त्र यांचा अनुभव उपयोगी पडतो. यावरून पुढील अंदाज बांधता येतात व ते चुकले तर का चुकले याचा विचारही केलाच पाहिजे.

जे समालोचक स्वतःच्या चुका कबूल करितात ते मी स्वतः चांगले समजतो. उदा० उद्यमातील समालोचनात असे स्पष्ट करण्यात येते. समालोचन हे लघु दृष्टीचे आहे (short view) की दीर्घ दृष्टीचे आहे (long view) हेही पाहणे आगत्याचे आहे.


●●●

## वर्गणीदारांकरता आवाहन

सध्याच्या दिवसात अर्थसारखे शैक्षणिक उपयुक्त मासिक सामान्य व्यक्ती, तसेच विशेषतः विद्यार्थी व अभ्यासक ह्यांना विकत घेणे आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नाही. अर्थचे प्रधान ध्येय समाज प्रबोधनाच्या कार्याशी वचनबद्ध असल्यामुळे हे मासिक अधिकाधिक लोकांपर्यंत जावे ह्या हेतूने आम्ही वर्गणीच्या दरात खालील सवलत देऊ इच्छितो.

महाराष्ट्रातल्या कोणत्याही कॉलेजमधील कोणत्याही विषयाच्या प्राध्यापकाला, तसेच कॉलेज व हायर सेकंडरी प्रशालांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नावावर वैयक्तिक वर्गणी म्हणून वार्षिक वर्गणी रुपये ३० च्या ऐवजी २० रुपये देऊन अर्थचे सभासदत्व मिळू शकेल असे आम्ही ठरविले आहे.

ह्या सवलतीचा लाभ संबंधित वाचक अवश्य घेतील अशी अपेक्षा आहे.



# उद्योग व्यवस्थापन

# एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन

## (निर्यात पत–हमी महामंडळ)

भारताच्या गेल्या १० वर्षात रुजलेल्या अभियांत्रिकी उद्योगाला परदेशी बाजारपेठेत चांगले स्थान प्राप्त झाले आहे. निर्यात व्यापार गेल्या ५ वर्षात फार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्या व्यापारातील धोक्यांपासून सुरक्षितता मिळावी आणि निर्यातीला भरपूर उत्तेजन मिळावे ह्या दृष्टीने नुकतेच निर्यात पत हमी महामंडळ स्थापन झाले आहे. त्या मंडळाच्या कार्याचा परिचय करून देत आहोत.

एक्सपोर्ट क्रेडिट अँड गॅरंटी कॉर्पोरेशन ही संस्था इसीजीसी म्हणून ओळखली जाते. ही संघटना निर्यातीकरता पतपुरवठा करणे आणि पतपुरवठ्याचा विमा उतरवणे असे कार्य करते. या संघटनेच्या घटनेप्रमाणे त्यांना कर्ज देण्याचे सुद्धा कार्य करता येते पण हे कार्य या संघटनेने अजून हाती घेतलेले नाही. तरीसुद्धा या कॉर्पोरेशनने दिलेल्या हमीमुळे आणि पतपुरवठ्याच्या विमा पॉलिसीमुळे निर्यातदारांना त्यांच्या बँकांकडून सढळ हाताने कर्ज किंवा पत मिळू शकते. बँकादेखील या पॉलिसीमुळे निर्यातदारांना त्यांच्या गरजेप्रमाणे पतपुरवठा न भिता करू शकतात.

कुठल्याही व्यापारी व औद्योगिक संघटनेला पुरेसा व वेळेवर पैसा उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे असते. विशेषत: निर्यात माल जेथे तयार होतो अशा उद्योगधंद्यांना पैशाची आवश्यकता जास्त भासते. कारण मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जाते व जागतिक बाजारपेठेत चढाओढ करायची म्हणजे माल वेळेवर पोचण्याला महत्त्व असते. भारतासारख्या विकसनशील देशात निर्यातीसारख्या महत्त्वाच्या क्षेत्राकडे पुरेसा पतपुरवठा होईल याकरिता खास प्रयत्न करावे लागतात. कारण देशातील एकंदर बचत ही आर्थिक गरजेपेक्षा कमी आहे व मागणी खूप आहे. पतपुरवठा मर्यादित आहे. निर्यातदारांना पतपुरवठा करण्याचे महत्त्वाचे कार्य इसीजीसी करते.

बँका व इतर आर्थिक संस्था या निर्यातीनंतर व निर्यातीपूर्वी दिलेल्या कर्जपुरवठ्याचा धोका असतो म्हणून विमा उतरवत असतात. निर्यातदारांनासुद्धा निर्यात माल बोटीवर चढवल्यानंतरचे धोके व त्या मालावर थोडाफार खर्च झाल्यानंतर निर्यात मालाची मागणी रद्द केल्यामुळे होणारे हे नुकसान यापासून संरक्षण हवे असते. विशेषत: खास मागणीबरहुकूम तयार केलेल्या मालाच्या बाबतीत त्याची विशेष गरज भासते.

### पॅकिंग क्रेडिट

निर्यातदारांच्या आवाक्याबाहेर गेलेल्या परिस्थितीमुळे जर त्याला बँकेकडून घेतलेले कर्ज परत देता आले नाही तर हे कर्ज परत न दिल्यामुळे बँकांचे जे नुकसान होते ते भरून काढण्याची हमी पॅकिंग क्रेडिट गॅरंटी पॉलिसी देते. अंतर्गत व्यापाराला द्यावयाच्या कर्जपुरवठ्यासंबंधीचे नियम शिथिल करून गरजेप्रमाणे निर्यात व्यापाऱ्यांना कर्जपुरवठा बँका अशा प्रकारच्या पॉलिसीमुळे करू शकतात. या पॉलिसीमुळे बँकांचे दोनतृतीयांश नुकसान भरून देण्याची हमी असते.

बँकांचा शाखा-विस्तार होत आहे त्यामुळे कित्येक निर्यातदारांना कर्जपुरवठ्याकरता बँकांकडे जाता येते. त्यामुळे बहुतेक बँकांनी ही पॉलिसी घेतलेली आहे. माल तयार होऊन पाठवण्यापूर्वीच्या टप्प्यापर्यंत सर्व कर्जपुरवठ्याचा समावेश करून घेणारी एक पॉलिसी इसीजीसी कडून देण्यात आलेली आहे. त्याचा दर अतिशय कमी आहे व त्यासंबंधी माहिती देण्याची पद्धत अतिशय सोपी आहे. या पॉलिसीप्रमाणे ७५% नुकसानभरपाई दिली जाते.

माल जहाजावर चढवल्यानंतरच्या हमीची जी पॉलिसी आहे त्या पॉलिसीद्वारे निर्यात मालासंबंधीच्या हुंड्या विकत घेतल्यामुळे किंवा वटल्यामुळे होणारे नुकसान भरून देण्याची हमी आहे. परदेशातील राजकीय परिस्थितीमुळे होणारे नुकसान आणि ग्राहकाने पैसे न दिल्यामुळे होणारे नुकसान याकरिता निरनिराळ्या पॉलिसीज निर्यातदारांना सुचवल्या जातात. एखाद्या हुंडीच्या आधारावर बँकेने कर्ज दिले असले व ती न वटता परत आली आणि त्या निर्यातदाराला हे पैसे बँकेला परत देता आले नाही तर बँकेचे झालेले नुकसान अशा पोस्ट-शिपमेंट पॉलिसीने भरून निघते.

## राजकीय धोके

माल जहाजावर चढवल्यानंतरचे जे धोके आहेत त्यापैकी एक म्हणजे माल विकत घेणाऱ्या देशादेशातील राजकीय धोके, हुंडी न वटल्यामुळे होणारे नुकसान आणि ग्राहकाने दिवाळे काढल्यामुळे होणारे नुकसान. याकरिता इ. सी. जी. सी. विमा पॉलिसी देऊ करते. ठराविक रकमेच्या खुल्या पॉलिसीखेरीज परदेशातील प्रत्येक ग्राहकाच्या बाबतीत किती रकमेपर्यंतचे नुकसान या प्रकारच्या पॉलिसीमध्ये भरून दिले जाईल याबद्दलची मर्यादा निश्चित ठरवून द्यावी लागते. परदेशातील ग्राहकांची आर्थिक परिस्थिती व स्थैर्याबद्दल नीट चौकशी करून या मर्यादा ठरवल्या जातात.

भारताची तांत्रिक व औद्योगिक प्रगती झालेली आहे. त्यामुळे मशिनरीची निर्यात, किंवा संपूर्ण प्रकल्प उभारायला लागणाऱ्या साहित्याची निर्यात किंवा परदेशात संपूर्ण बांधकामाची कंत्राटे घेणे अशा क्षेत्रात भारत आता उतरलेला आहे. अशा प्रकारच्या निर्यातीला सर्वसाधारण निर्यातीपेक्षा खास अडचणी व धोके असतात. अशा प्रकारच्या निर्यातीत निर्यातदाराला निरनिराळ्या प्रकारच्या हमी द्यायला लागतात. (१) काम नीट होईल याबद्दलची हमी, (२) परदेशी ग्राहकांकडून अगाऊ उचल मिळविण्यासाठी द्यावी लागणारी हमी, (३) ज्या देशामध्ये बांधकामाचे कंत्राट किंवा सबंध प्रकल्प उभारण्याचे हाती घेतले असेल त्या ठिकाणी उभाराव्या लागणाऱ्या पैशासाठी हमी इ. आंतरराष्ट्रीय प्रथेप्रमाणे अशा हमी बँकांकडून द्याव्या लागतात. देशातील किंमतीपेक्षा निर्यात मालाची किंमत बरीच जास्त असते. विशेषतः मशिनरी सारख्या वस्तूंची किंवा संपूर्ण प्रकल्पाकरिता लागणाऱ्या सामानाची किंमत जास्त असते.

छोट्या निर्यातदारांपेक्षा अवघड मशिनरी किंवा मोठ्या प्रकल्पाचे कंत्राट घेणारे जे निर्यातदार आहेत त्यांना जास्त धोका पत्करावा लागतो. पहिल्या प्रकारात साधारणपणे सहा महिन्यात पैसे मिळतात. दुसऱ्या प्रकल्पात थोडा जास्त वेळ लागतो. अशा निर्यातदारांना राजकीय कारणाने किंवा व्यापारी कारणामुळे नुकसान होणार असेल तर ते टाळण्याकरिता इ. सी. जी. सी. वेगळ्या प्रकारची पॉलिसी देते.

## सल्ला सेवा

तंत्रज्ञान इत्यादि संबंधी आपण आता दुसऱ्या देशांना सल्ला देऊ शकतो. या तांत्रिक बाबीसंबंधी सल्ला दिलेल्याचे पैसे मिळायला उशीर होतो. निर्यात वाढवणे हे इ. सी. जी. सी. कार्पोरेशनचे ध्येय आहे. त्याला अनुसरून ही संस्था अशा प्रकारच्या निर्यातदारांकरिता वेगवेगळ्या पॉलिसी देते.

आर्थिक संस्था व निर्यातदारांचा या पॉलिसीवर किती विश्वास आहे हे इ. सी. जी. सी. च्या उलाढालींच्या पुढील आकडेवारीवरून दिसून येईल. १९७५ साली २१२४ कोटी रुपयांच्या निर्यातीला अशा प्रकारच्या पॉलिसी देण्यात आल्या. यापैकी पॅकिंग क्रेडिट परफॉरमन्स गॅरन्टीकरिता दिलेल्या पॉलिसीज् ची रक्कम १७०६ कोटी रुपये आहे. उरलेल्या ४१८४ कोटी रुपयांच्या शिपमेंट क्रेडिट रिस्क पॉलिसी दिल्या गेल्या. अशा पॉलिसीज्चे महत्त्व आता बँकांना व निर्यातदारांना पटले आहे. कार्पोरेशनचा व्यवसाय १० कोटी रुपयांवर जायला १६ वर्षे लागली. त्यानंतरच्या दोन वर्षांत हा आकडा दुप्पट झाला

●●●

# नवीन यंत्रे नव्या प्रक्रिया नवे प्रकल्प

# सूर्यशक्तीचा उत्पादनकार्यात उपयोग

राजस परचुरे

**बाष्पशक्ती, गॅस, पेट्रोल यासारखी ज्वालाग्रही तेले आणि वीज ह्यांचा उत्पादनकार्यात मानवाने उपयोग करून घेतला आहे. ह्या ऊर्जापेक्षाही अधिक किफायतशीर तसेच पूरक पर्यायी शक्ती म्हणून आता अणूशक्ती, वायुशक्ती, जलशक्ती ह्यांचबरोबर सूर्यशक्तीकडे संशोधकांचे लक्ष वेधले आहे. सूर्यशक्तीने दैनंदिन जीवन कशा प्रकारे बदलू शकेल त्याची एक झलक.**

The heat of the universe is produced by the Sun.
—Leonardo De Vinci

पृथ्वीवर जी काही शक्ति ( energy ) आज आहे ती सूर्यामुळेच कधीकाळी निर्माण झाली आहे. कोळसा, खनिज तेल, गॅस, पाऊसामुळे पाणी व विद्युतशक्ति, वारा, इत्यादी ह्या सगळ्या प्रकारच्या शक्ती सूर्याच्या प्रकाशामुळेच जन्माला आल्या. पण आता वरील गोष्टी फार वापरामुळे कमी होत चालल्या आहेत. जी आतापर्यंतच्या इतिहासात वापरली तेवढी शक्ति माणूस पुढच्या पंचवीस वर्षातच वापरेल.

अणुशक्तीच्या पुरस्कर्त्यांनी अणूच्या अचाट शक्तीबद्दल बरेच सांगितले असले तरी सुद्धा U. S. A. सारख्या देशात वापरल्या जाणाऱ्या शक्तीपैकी केवळ २% च अणुशक्ती आहे सौदी अरेबियावर एका वर्षात सूर्यप्रकाशाच्या वर्षावाबरोबर जी शक्ती मिळते ती संपूर्ण पृथ्वीच्या खनिज तेलाच्या शक्तीच्या दुप्पट आहे. म्हणूनच सूर्यशक्ती ही अणुशक्तीपेक्षा अधिक विपुल व कमी खर्चाची आहे.

डॉ. सीमान्स, डॉ. म्लास्की, रॉजर शिमट वगैरे मान्यवर लोकांनी त्यावर संशोधन केले आणि आता अमेरिकेत मोठ्या बिल्डिंग्सवर किंवा घरांवर आपल्याला Hot plate collectors दिसू लागले आहेत.

अमेरिकेतल्या नव्या कंपन्या आता १००० ते १६०० डॉलर्स मध्ये अशी यंत्रे गच्चीवर बसवून देतात. Flat plate collector ही एका ताटाच्या आकाराची सपाट चकाकणारी वस्तू असते. अशा खूप प्लेट्स बसवल्या जातात आणि एक concentrated प्रकाशस्रोत एका receiver वर केंद्रित केला जातो. रिसिव्हरमध्ये पाणी फिरत असते ते गरम होते व वापराला मिळू शकते. जिनोआमध्ये एक अशाच प्रकारचं पण बरंच मोठं युनिट बसवलं गेलं आहे. इथे पाण्याची १०२२°F पर्यंत तपमान असलेली वाफ तयार करता येते आणि ह्या वाफेच्या जोरावर generator सुद्धा चालू शकतात आणि विद्युत् शक्ती मिळू शकते. Minnesota मध्ये एका Heliostat मुळे टाक्यातच पाणी गरम केलं जातं. एका प्लॅन मध्ये ७४,००० Heliostat लावून त्यांच्या प्रकाशस्रोतानी ५०० मीटर उंचीचा बॉयलर बांधून त्याचं ५००°C पर्यंत तपमान वाढवून ४०,००० घरांना वीज पुरविली जाणार आहे.

तंबाखू वाळवणे किंवा इतर गोष्टी ज्या वाळवाव्या लागतात किंवा Dehydrate कराव्या लागतात त्या सूर्याच्या शक्तीचा उपयोग करून सहज करता येतात आणि ह्याचा खर्च पडत नाही. आफ्रिकेतले टेलिव्हिजन सुद्धा आता अशाच शक्तीवर चालतात. फ्लोरिडामधील पोहण्याच्या

तलावातील पाणी ह्याच पद्धतीनं गरम केलं जातं. एका parabolic reflector मुळे पॅरिस मधला एक प्रिन्टिंग प्रेस सुद्धा चालू आहे. मेक्सिकोमध्ये navigation light सूर्यशक्तीवर चालतात तसंच अंतराळात उड्डाण करणारी यानं सुद्धा solar cells पासून शक्ती घेतात,

घरात वापरल्या जाणाऱ्या यंत्रांवर इतक्यात Investment करण्यात मात्र फारसा लाभ होत नाही हे खरं आहे. एकतर यंत्र बसवण्याकरता बरीच जागा लागते. रात्री यंत्र काम करत नाही. याकरिता दिवसा मिळालेली शक्ती रात्री वापरता यावी म्हणून साठवण्यासाठी अजून काही यंत्रं बसवावी लागतात. ह्या अडचणी लक्षात घेता जी Investment करावी लागते ती साध्या इंधनाच्या किमतीच्या १० पट येते. पण तरीसुद्धा आता येत्या काळात विद्युत् शक्तीच्या आणि इंधनशक्तीच्या किमती वर जाणार आहेत आणि जर मोठ्या प्रोजेक्टस् वर देशांनी पैसे गुंतवले तर येत्या काळांत त्याचा फारच फायदा होणार आहे, कारण नंतर फक्त युनिटस्चं maintenance cost फक्त देशांना सोसावी लागणार, जी फारच कमी आहे. अमेरिकेतील कारखाने सुद्धा आता solar electricity कडे वळत आहेत. फ्रान्सच्या फेलिक्स ट्रोम्बने ट्रोम-हाऊस प्रकारच्या घरबांधणींची कल्पना दिली आहे. ह्या घरातल्या भिंती काळ्या दगडाच्या असतात आणि त्या खूप जाड असतात आणि त्यांच्यापुढे काचा लावलेल्या असतात त्यामुळे दिवसा भिंती तापतात आणि रात्री उष्णता बाहेर जाऊ शकत नाही आणि त्यामुळे घरे उबदार राहतात.

अशा प्रकारच्या घरबांधणीत आर्थिक अडचणी नसतात, कारण घरबांधणीस जास्त खर्च करावाच लागत नाही आणि काही भागात Hot plate collector एवढी यांची कार्यक्षमता असते. अर्थात यंत्रांची कार्यक्षमता वाढवता येते आणि कार्यक्षमता ही यंत्र एका डॉलर खर्चावर किती BTU (British thermal unit) जमवते ह्यावर ठरवली जाते. ही यंत्र वापरून किंमत कशी कमी करायची ह्याच आता शास्त्रज्ञांसमोर प्रश्न आहे.

जास्त कंपन्या आता ह्या धंद्यात येऊ लागल्या आहेत. Sunwarks Incorporation चे एव्हरेट बार्बर म्हणतात दक्षिणेकडे घराचं छप्पर जर वळलं असेल आणि जर का असं यंत्र त्यावर बसवलं तर ro & co sq. ft एरिआ लागेल. घरात पाहिजे तितकं गरम पाणी मिळू शकेल Space-heating चे सुद्धा ते पुरस्कर्ते आहेत आणि त्यांचं म्हणणं असं की जर काही त्या मधल्या अडचणी सोडवता आल्या तर ती कल्पना फार उपयुक्त ठरेल.

●●●


## अर्थ

हे एक दर्जेदार शैक्षणिक मासिक आहे. खालील व्यक्ती व संस्था हे ह्या मासिकाचे वर्गणीदार आहेत :

१. कॉलेजे व विद्यापीठे २. औद्योगिक संस्था, ३. बँका व वित्त संस्था, ४. व्यापारी पेढ्या, ५. संशोधन संस्था, ६. जिल्हा व तालुका ग्रंथालयें, ७ व्यवस्थापन तज्ज्ञ, ८. साखर कारखाने, ९. सहकारी संस्था, १०. ट्रेड युनियन व श्रमिक शिक्षण संस्था इत्यादी.

ह्या मासिकाचा वाचकवर्ग मोठा आहे शिवाय ह्याचा एक खास वाचकवर्ग आहे की जो अर्थ मासिकाला संदर्भसाहित्य म्हणून प्रमाणभूत मानतो.

आर्थिक घडामोडींचा आढावा, जागतिक व्यापार–उद्योग ह्यातील प्रवाह, भारतीय उद्योग, व्यापार व वित्त, नियोजन, विकास, शेती, सहकार, व्यवस्थापन समस्या तसेच सैद्धांतिक व प्रत्यक्ष व्यवहारोपयोगी बाबींवर अधिकारी तज्ज्ञांचे ह्या मासिकात लेख असतात. आर्थिक घडामोडींचे समग्र व अद्ययावत ज्ञान वाचकांना सुबोध रीतीने उपलब्ध करून द्यावे असा आमचा प्रयत्न असतो.

## जाहिरात

| | | |
|---|---|---|
| मुखपृष्ठ क्रमांक | २ | ३५० रु. |
| " " | ३ | ३०० रु. |
| " " | ४ (शेवटचे पान) | ४०० रु. |
| आतील कोणतेही पान | | २०० रु. |
| अर्धे पान | | १२५ रु. |
| पाव पान | | ७५ रु. |

मासिक १/४ क्राउन साईज – भाषा : मराठी

(१) पुस्तकविक्रेते व प्रकाशक तसेच शैक्षणिक संस्था ह्यांना ह्या दरांमध्ये १५% सूट.

(२) रंगीत छपाईकरता वेगळा आकार पडेल. ३०%

(३) वर्षाच्या कराराने दिलेल्या जाहिरातींना ह्या दरात सूट मिळेल.

वार्षिक वर्गणी रु. ३०/– किरकोळ अंक रु. ३/–

# विज्ञान—वर्तमान

## * मंगळावरील जीवन
## * मंगळावरील मातीचे पृथःकरण
## * उर्जेसाठी नवे संशोधन

### व्हायकिंग मंगळावरील जीवसृष्टीचा शोध घेत आहे

मंगळावर उतरलेल्या व्हायकिंग यानातील जीवशास्त्रीय प्रयोगशाळा मंगळावर जीवसृष्टी आहे किंवा काय याचा कसून शोध घेत आहेत. हा शोध घेण्यासाठी या प्रयोगशाळा क्रमवार प्रयोग करणार आहेत. हे क्रमवार प्रयोग प्रथम २० दिवस करण्यात येतील. या प्रयोगांपैकी काही क्रमघटक पुन्हा पुन्हा करावे लागतील. या दृष्टीने पाहिले असता मंगळावर जीवसृष्टी आहे किंवा नाही याविषयीचा निश्चित निष्कर्ष काढण्यास आणखी काही महिने जावे लागण्याची शक्यता आहे.

मंगळावर जीवसृष्टीचे संशोधन करणे ही सोपी गोष्ट नाही पृथ्वीवरील मातीत देखील जे अतिसूक्ष्म जीव असतात त्यांचा शोध घेणे शास्त्रज्ञांना बिकट जाते. अशा परिस्थितीत पृथ्वीपासून २१ कोटी ५ लक्ष मैल दूर असलेल्या मंगळासारख्या ग्रहावरील जीवसृष्टीचा शोध किती बिकट आहे याची कल्पना येऊ शकेल. पहिली गोष्ट अशी की यापूर्वी कोणतेही यान मंगळावर उतरलेले नाही. त्यामुळे व्हायकिंग यानात जीवसृष्टीचा शोध घेण्यासाठी जी उपकरणे बसविली आहेत त्यांना पूर्वज्ञानाची बैठक नव्हती. मंगळावरील परिस्थितीचा शास्त्रीय अंदाज घेऊनच ही उपकरणे तयार करण्यात आली होती.

दिनांक २० जुलै रोजी व्हायकिंग–१ हे यान मंगळावर उतरले, तेव्हा मंगळावर नायट्रोजन वायूचे अस्तित्व आहे ही गोष्ट शास्त्रज्ञांना समजली. आपण श्वासावाटे घेत असलेल्या हवेत ⅘ भाग नायट्रोजन असतो. जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी नायट्रोजनची आवश्यकता असते. मंगळावरील वातावरणात तीन टक्के नायट्रोजन आहे हे समजल्यामुळे तेथे जीवसृष्टी असण्याची आशा शास्त्रज्ञांना वाटू लागली आहे. परंतु हे जीवशास्त्रज्ञ व्हायकिंगकडून तशी निश्चित माहिती मिळेपर्यंत काहीही गृहीत धरायला तयार नाहीत याबरून मंगळावरील जीवशास्त्रीय संशोधन किती गुंतागुंतीचे असावे याची कल्पना येते.

मंगळावरील मातीत अतिसूक्ष्म जीव असतील तर त्यांचा शोध कसा घेणार ? इतके सूक्ष्म जीव न्याहाळू शकेल अशा क्षमतेचे सूक्ष्मदर्शी उपकरण व्हायकिंगमध्ये नाही. व्हायकिंग कॅमेरे आहेत, परंतु अतिसूक्ष्म जीव या कॅमेऱ्याने थोडेच टिपले जाणार ?

मंगळावरील जीवसृष्टीचा शोध घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी तीन प्रयोग योजले आहेत. पहिला प्रयोग मंगळावरील मातीत मेटॅबॉलीझम म्हणजेच चयापचय क्रिया संभवते किंवा नाही हे तपासण्याचा. आपण माणसे अन्न खातो, प्राणवायू श्वासून घेतो आणि कार्बन डायाक्साइड वायू व पाण्याची वाफ बाहेर फेकतो. अतिसूक्ष्म जीवात अशा प्रकारची चयापचयक्रिया अनेक प्रकारे अस्तित्वात असण्याची शक्यता आहे. ही क्रिया तेथे संभवत असल्यास कसल्या ना कसल्या वायूचे उत्सर्जन तेथे होत असले पाहिजे.

ही प्रक्रिया लक्षात घेऊन त्यावर हा पहिला प्रयोग आधारलेला आहे. या प्रयोगात मंगळावरील मातीचा नमुना पोषणद्रवाने भिजवण्यात येईल. या पोषणद्रवात लॅक्टेट, क्लायसिन आणि ग्लायसिन हे तीन घटक असतील. जर त्या मातीत अतिसूक्ष्म जीव असले तर ते या पोषणद्रवाचे सेवन करतील आणि चयापचक्रियेनुसार रेडियोॲक्टिव्ह कार्बनचे वायूकण बाहेर फेकतील.

दुसरा प्रयोग अशाच प्रकारे चयापचयक्रियेवर आधारित आहे. परंतु पहिला प्रयोग आणि दुसरा प्रयोग यात एक फरक आहे. पहिल्या प्रयोगात कार्बनकणांची शक्यता शास्त्रज्ञांनी गृहित धरून त्यानुसार उपकरणांची सिद्धता केलेली आहे. या दुसऱ्या प्रयोगात कार्बनखेरीज इतर वायूंची शक्यता अजमावण्याचा प्रयत्न राहील. या प्रयोगात माती भिजवण्यासाठी जे पोषणद्रव वापरण्यात येणार आहे त्यात ५९ घटक आहेत.

यांपैकी अॅमिनो अॅसिडचे १८ प्रकार आहेत आणि उरलेल्या घटकात रिबोफ्लाविन, थिअॅमिन आणि व्हिटॅमिन-सी यासारखी जीवनसत्त्वे आहेत.

तिसरा प्रयोग वनस्पतीसृष्टीची शक्यता गृहित धरून योजलेला आहे. या प्रयोगात पोषणद्रवांचा उपयोग करण्यात येणार नाही. या प्रयोगात मातीच्या नमुन्यावर रेडिओअॅक्टिव कर्बन डायाक्साईड व कार्बन मोनोक्साॅईड यांचा संस्कार कृत्रिम सूर्यप्रकाशात करण्यात येईल. यानंतर ती माती ६२५ सेंटिग्रेड इतक्या उष्णतामानावर तापवली जाईल आणि ती अशी तापवल्यानंतर जीवसृष्टीचा पुरावा मिळतो किंवा काय याचा शोध घेण्यात येईल.

मंगळावर जीवसृष्टी आहे किंवा नाही याचा शोध घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी वरील तीन प्रयोग योजिलेले आहेत. हे प्रयोग कितपत यशस्वी होतात ते आता पाहायचे

## मंगळावरील मातीचे पृथःकरण

मंगळावर जीवसृष्टी आहे किंवा नाही याविषयी सुरू असलेले संशोधन अधिकाधिक गुंतागुंतीचे होत चालले आहे. या संशोधनाच्या निष्कर्षाविषयी शास्त्रज्ञात एकवाक्यता होत नसल्याचे दिसते.

मंगळावरील मातीची जीवशास्त्रीय तपासणी तीन वेळा करण्यात आली. अशा आणखी ११ तपासण्या व्हावयाच्या आहेत. जेट प्रॉपल्शन लॅबोरेटरी येथे जमलेले शास्त्रज्ञ पहिल्या तीन तपासण्यावर सध्या चर्चा करीत आहेत.

जीवशास्त्रीय संशोधन पथकाचे प्रमुख डॉ हॅरॉल्ड क्लीन म्हणाले, "मंगळ आम्हाला चकवतो आहे की तो आमच्या प्रश्नांना सरळ उत्तरे देतो आहे हे आम्ही सध्या पाहतो आहोत."

मंगळ प्रश्नांना उत्तरे देतो आहे हे मात्र नक्की. ही उत्तरे सरळ आहेत की चकवाचकवीची आहेत हा प्रश्न वेगळा. पहिल्या तीनही जीवशास्त्रीय तपासण्यांनी मंगळावरील नैतिक प्रक्रियेविषयी अनुकूल उत्तरे दिली आहेत. याविषयी मंगळावरून आलेले संदेश क्षीण नव्हते आणि तपासण्या करणाऱ्या उपकरणातही काही दोष नव्हता. स्टॅन्फोर्डचे जोशुआ लेडरबर्ग हे शास्त्रज्ञ या संशोधकांपैकी एक आहेत. जंतूचे वंशशास्त्र या विषयावरील संशोधनाबद्दल त्यांना १९५८ साली नोबेल पारितोषिक मिळाले होते. डॉ. लेडरबर्ग म्हणाले, "मंगळावरून संदेश आमच्यापर्यंत पोहचतात की नाही याची प्रथम आम्हाला काळजी होती. पण ही काळजी आता राहिलेली नाही. मंगळावरील माती रासायनिकदृष्ट्या किती क्रियाशील आहे याचेच आम्हाला आश्चर्य वाटते. तीनही जीवशास्त्रीय उपकरणांनी महत्त्वाचे ठरतील असे अनुकूल निर्णय दिले आहेत."

मंगळावरून आलेले संदेश जीवशास्त्रीय प्रतिक्रिया सुचवतात की रासायनिक प्रतिक्रिया हाच खरा प्रश्न आहे. कदाचित दोन्ही प्रकारच्या प्रतिक्रिया हे संदेश सुचवीत असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

सजीव पेशींच्या अंतर्गत रासायनिक प्रतिक्रिया होत असतात. मंगळावरील रासायनिक प्रतिक्रिया या जीवपेशींच्या आतील आहेत की मातीतल्या आहेत हा प्रश्न सध्या शास्त्रज्ञांना आव्हान देत आहे. पृथ्वीपासून ३६ कोटी किलोमीटर दूर असलेल्या मंगळावरील मातीत होऊ शकणाऱ्या शास्त्रीय तपासण्यांची संख्या नाही म्हटले तरी मर्यादितच राहणार. या दृष्टीने पाहता त्या प्रश्नांचे निश्चयात्मक उत्तर देणे किती बिकट आहे हे ध्यानात येते.

पहिल्या दोन जीवशास्त्रीय तपासण्यातून व्यक्त होणारी प्रतिक्रिया रासायनिक होती असे म्हणायला बराच वाव आहे. परंतु तिसऱ्या तपासणीवरून निष्कर्ष काढणे कठीण वाटते. कॅलिफोर्निया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे डॉ. नॉर्मन हारोविझ यांनी हा तिसऱ्या तपासणीचा प्रयोग योजलेला होता.

त्यांनी मंगळावरील माती उपकरणांच्या साहाय्याने उबवली होती. या प्रयोगात वापरलेल्या उपकरणांनी जी नोंद केली त्यावरून प्राणवायुप्रक्रिया व्यक्त होत नसावी असे त्यांना वाटते.

डॉ. क्लिन म्हणाले, "अधिकाधिक माहिती गोळा होईल तसतसे जीवशास्त्रीय संदेश अधिक स्पष्ट होत जातील. कदाचित मंगळावरील मातीत रासायनिक प्रतिक्रिया आणि त्या मातीच्या आत जीवशास्त्रीय प्रतिक्रिया असेही आढळून येण्याची शक्यता आहे. परंतु सध्या हाती आलेल्या माहितीनुसार या दोन प्रतिक्रिया वेगवेगळ्या करून पाहणे शक्य दिसत नाही."

डॉ. जिराल्ड सॉफन म्हणाले, "या प्रतिक्रिया जर रासायनिक असतील तर तो निसर्गातला वेगळाच प्रकार म्हणावा लागेल. या प्रतिक्रियांचा अभ्यास रसायनशास्त्राच्या कक्षा वाढवील."

या प्रतिक्रिया जर जीवशास्त्रीय असतील तर शास्त्रज्ञांच्या मते मंगळावरील जीवसृष्टी फार थोड्या पाण्यात जगू शकते असा त्याचा अर्थ होईल.

## ऊर्जेच्या नव्या उगमांसाठी संशोधन

ऊर्जेच्या वाढत्या चणचणीची समस्या सोडवण्यासाठी आणि पेट्रोल, कोळसा व गॅस यासारख्या इंधनाच्या पारंपारिक साधनांना पर्याय शोधून काढण्यासाठी अमेरिकेत अनेक प्रयत्न चालू आहेत

केवळ अमेरिकेलाच ऊर्जेची चणचण जाणवते आहे असे नव्हे. युरोपात, आशियातील व आफ्रिकेतील विकसनशील राष्ट्रात झपाट्याने औद्योगीकरण होत आहे. त्यामुळे इंधनशक्तीची चणचण ही आता जागतिक समस्या बनली आहे.

औद्योगिकदृष्ट्या अमेरिका हे जगातले आघाडीवरचे राष्ट्र आहे. अमेरिकेतील उद्योगधंद्यांना व यंत्रांना जगात उत्पादन होणाऱ्या तेलापैकी एकतृतीयांश ऊर्जा लागते. स्वाभाविकच ऊर्जेच्या चणचणीची ही समस्या अमेरिकेला विशेष भेडसावत आहे.

ओक्लाहोमा राज्य विद्यापीठाने मोटारगाडीचे एक इंजिन तयार केले आहे. या इंजिनासाठी इंधन म्हणून हायड्रोजन गॅसचा वापर करण्यात येतो. या इंजिनाच्या एक्झॉस्टमधून गॅस बाहेर न पडता पिण्यास योग्य असे शुद्ध पाणी बाहेर पडते.

जॉर्जिया राज्यातील अॅटलांटा येथील शास्त्रज्ञ भुईमुगाच्या टरफलावर प्रयोग करीत आहेत. या टरफलात कोळशाच्या दोनतृतीयांश इतकी उष्णताशक्ति असल्याचे त्यांना या प्रयोगात आढळून आले आहे.

अमेरिकेतील काही शास्त्रज्ञ उष्ण झऱ्यातून बाहेर येणाऱ्या नैसर्गिक गॅसचा उपयोग करण्यात गुंतले आहेत तर काही जण ऊर्जा निर्माण करण्यासाठी सूर्यप्रकाशावर प्रयोग करीत आहेत.

ऊर्जेच्या समस्येवर आपण पर्याय शोधून काढू, ऊर्जेच्या नव्या उगमांचा आपण शोध घेऊ असा विश्वास अमेरिकन शास्त्रज्ञांना वाटतो आहे. असे संशोधन करणारे एक शास्त्रज्ञ म्हणाले, "ज्या राष्ट्राने गणकयंत्रे, ट्रान्सीस्टर व अवकाशयाने तयार केली, चंद्रावर माणूस उतरवला, ज्या राष्ट्राचे अवकाशयान आज मंगळाच्या पृष्ठभूमीवर उतरून संशोधन करीत आहे ते राष्ट्र ऊर्जेचीही समस्या निश्चितपणे सोडवील असा विश्वास वाटतो."

(युसिसच्या सौजन्याने)

●●●

**तरुणांचे मनोगत**

# शिक्षित असून नोकरी नसल्यास स्वतःचा उद्योग-धंदा करण्याची संधी

सुशिक्षित बेकारांना रोजगार आणि स्वतंत्र धंदा उपलब्ध करण्याच्या संधी पूर्वी नव्हत्या, आता आहेत. त्या संधींचा फायदा घेण्याचे आव्हान तरुणांनी स्वीकारले पाहिजे.

## सुशिक्षित बेकार लोकांना नवीन उद्योगधंदा सुरू करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाची सहाय्य योजना

**पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे कार्यक्षेत्र :**

पुणे, सातारा, सोलापूर, सांगली, अहमदनगर, कोल्हापूर, नाशिक, धुळे व जळगाव हे ९ जिल्हे पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे कार्यक्षेत्र आहे.

**पात्रता व भांडवलाची तरतूद :**

स्थापत्य शास्त्रातील पदवी / पदविका, औद्योगिक शिक्षण संस्थातील अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, कमीत कमी एस्. एस्. सी. आणि ज्यांना उद्योगधंद्यातील पुरेसा अनुभव आहे अशा कोणाही सुशिक्षिताला नवीन लघुउद्योग / सेवा सुरू करण्यासाठी या योजनेत भांडवल उपलब्ध होईल. आवश्यक असणाऱ्या स्थिर भांडवलापैकी १०% हिस्सा प. म. वि. म. पुरवेल. राष्ट्रीकृत बँका, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, सिकॉम या संस्थांद्वारा ७५% इतके कर्ज मिळू शकेल.

याचाच अर्थ तुमचे जवळ फक्त १५% भांडवल असेल तर तुम्हास कोणताही लघुउद्योग किंवा सेवाउद्योग सुरू करता येईल. पश्चिम महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाच्या या बीज भांडवलावर व्याजाचा दर अवघा ४% असेल व बँकेच्या कर्जाची परतफेड होईपर्यंत प. म. वि. म. चे कर्ज अगर त्यावरील व्याज भरावयास मुदत मिळते.

या योजनेखाली कर्जासाठी अर्ज करणाऱ्या उद्योजकाचे वय कमीत कमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ४० वर्षेपर्यंत असावे.

उद्योजकांच्या सहकारी संस्थांनाही त्यांनी नवीन सुरू केलेल्या प्रकल्पाच्या १५% इतके भांडवल पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ पुरवू शकेल.

भागीदारीमध्ये प्रायव्हेट लिमिटेड कंपनी करून सुरू केलेल्या लघुउद्योग / सेवाउद्योगांना बीज भांडवल मिळू शकेल, परंतु सर्व भागीदार किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे सर्व शेअर होल्डर्स कमीत कमी एस. एस. सी. असून त्यांना इतर कुठल्याही प्रकारची नोकरी अगर धंद्यातील भागीदारी असून चालणार नाही.

पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांच्या ठिकाणी नगरपालिकांच्या सहाय्याने गाळे बांधून सुशिक्षितांना देण्याचे प. म. वि. म. ने ठरविले आहे.

## सुशिक्षितांना सुरू करण्यासारख्या काही सोप्या सेवा व लघु उद्योगांची यादी

**१. काही लघुउद्योगांची यादी :**

(१) इंजिनियरिंग जनरल वर्क शॉप; (२) कागदाचे बॉक्सेस तयार करणे; (३) पुठ्ठ्याचे बॉक्सेस तयार करणे; (४) प्लॅस्टिकच्या औद्योगिक वस्तू [नेहमी उपयोगात येणाऱ्या] तयार करणे; (५) इमारतीसाठी लागणारे साचे-बंद लाकूड तयार करणे; (६) रबराच्या वस्तू तयार करणे; (७) शाई तयार करणे; (८) बेकरी [गोळ्या, बिस्किटे, पाव वगैरे तयार करणे]; (९) रंग तयार करणे; (१०) आईस कँडी; (११) हॉजियरी कपडे; (१२) कपडे तयार करणे; (१३) लोखंडाच्या खिडक्या तावदाने वगैरे बनविणे; (१४) लाकडाची खोकी तयार करणे; (१५) अॅल्युमिनिय-

मचें कड्या कोयंडे तयार करणे; (१६) लोखंडी ओतीव कामाची फाउंड्री.

२. **काही सेवा उद्योगांची यादी :**

(१) मोटार गाड्या, स्कूटर, मोटार सायकली यांची दुरुस्ती व देखभाल; (२) विद्युत् उपकरणांची दुरुस्ती (रेडिओ, टेलिव्हिजन वगैरे); (३) स्प्रे पेंटिंग; (४) ऑईल इंजिन, शेतकी अवजारे, ट्रॅक्टर, विद्युत् मोटारीची देखभाल व दुरुस्ती; (५) यंत्रसामुग्रीची देखभाल व दुरुस्ती; (६) दळण्याची गिरणी; (७) जाहिरात संस्थांसाठी फिल्म काढणे व दूरचित्रवाणी व आकाशवाणीसाठी ध्वनिमुद्रण; (८) छायाचित्रण; (९) फिरती उपहारगृहे; (१०) प्रवासी किंवा मालवाहतुकीसाठी वाहने चालविणे; (११) गृह-सजावट (इंटेरियर डेकोरेशन); (१२) पेट्रोल पंप व विश्रांती गृह; (१३) टंकलेखन, लघुलेखन, टेलिफोन ऑपरेटर्स, सेक्रेटरीचा शिक्षणक्रम वगैरेसाठी शिक्षणसंस्था; (१४) सायक्लोस्टायलिंग; (१५) पुस्तकाची बांधणी; (१६) जाहिरात संस्था; (१७) मोटार चालविण्याचे शिक्षण देणाऱ्या संस्था; (१८) शिंपीकाम; (१९) पुस्तके व नियतकालिके विकण्याचे दुकान; (२०) कृषि सेवा केंद्र (खते, जंतुनाशके, कीटकनाशके, सुधारित बी-बियाणे, इंजिनाचे तेल, गुरांचे खाद्य यांची विक्री व ट्रॅक्टर, नांगर कुळव इत्यादी शेतीची अवजारे भाड्याने देणे); (२१) कृमी-कीटकांना औषधी फवारे मारणे; (२२) उत्तम बी-बीयाण्यांची निर्मिती व प्रक्रिया; (२३) आधुनिक धुलाई केंद्र; (२४) बांधकामाची छोटी कंत्राटें; (२५) दुग्धव्यवसाय, कुक्कुट-पालन, वराहपालन; (२६) छायाचित्रांना चौकट बसविणे; (२७) टायरची दुरुस्ती; (२८) जनावरे व कोंबड्याचे खाद्य बनविणे; (२९) पृथक्करण करण्यासाठी प्रयोगशाळा; (३०) इलेक्ट्रिशियन, नळकाम करणारे, गवंडी सुतार, पेंटर यांच्या संयुक्त सेवा. धडाडी व धंद्याची माहिती असलेल्या तरुणांनी पुणे येथील प. वि. म. मंडळाच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.

● ● ●


**अर्थ मासिकासंबंधी प्रेस रजिस्ट्रेशन ॲक्ट कायद्याखालील कलम ८ अन्वये द्यावयाची माहिती**

प्रकाशन स्थळ : ९०६ शिवाजीनगर, पुणे ४

स्वरूप : मासिक

मुद्रक : परशुराम प्रोसेस, शिवाजीनगर, पुणे ५

राष्ट्रीयत्व : भारतीय

प्रकाशक : प्रा. कमलाकर परचुरे

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : ९०६ शिवाजीनगर, पुणे ४

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : ९०६ शिवाजीनगर, पुणे ४

मासिकाची मालकी : सत्यशिवसुंदर प्रकाशन
९०६ शिवाजीनगर, पुणे ४

मी, कमलाकर परचुरे, असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे

दि. ५ मार्च, १९७७

**प्रा. कमलाकर परचुरे**
प्रकाशक

पुणे विद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रमानुसार पहिल्या सत्रासाठी (First Semester) प्राध्यापक आर्. एम्. गोखले यांनी लिहिलेली, आमची पाठ्यपुस्तके

बी. ए. प्रथम वर्ष

- भारताचा आर्थिक इतिहास — भाग १ ला — किं. १० रुपये
- भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण — भाग १ ला — किं. १० रुपये

बी. कॉम. प्रथम वर्ष

- व्यावसायिक अर्थशास्त्र — भाग १ ला — किं. १० रुपये

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

विजयानगर कॉलनी, पुणे ३०.

अर्थच्या वर्गणीदारांची अद्ययावत यादी मुद्रित करण्याचे आम्ही योजिले आहे. तसेच वर्गणीदारांच्या महिनावार याद्या ( Monthwise Enlistment ) आमच्या कार्यालया-करता करावयाच्या आहेत. त्या दृष्टीने वर्गणीदारांनी ह्या वर्षाची आपली वर्गणी कोणत्या महिन्यापासून सुरू झाली आहे त्याचा खुलासा सप्टेंबर अखेर कृपया केल्यास वर्गणीच्या पावत्या पाठविणे आणि त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करणे सोपे होईल. ज्यांची पत्रे येणार नाहीत त्या वर्गणीदारांना ह्यासंबंधी कोणत्याही अडचणी नसाव्यात असे गृहित मानले जाईल.

अर्थ

Posted under prepayment License No. 61
at Deccan Gymkhana post office

रजि.नं. P.N.C. 205

तुमची समस्या कोणतीहि असो...
प्रत्येक आर्थिक प्रश्नाची समाधानकारकपणे सोडवणूक करण्यासाठी मदत करायला महाराष्ट्र बँक वचनबद्ध आहे. देशभरच्या ४५० पेक्षा अधिक शाखा आणि जगभरचे कार्यक्षम प्रतिनिधी यांच्या माध्यमातून महाराष्ट्र बँक तुम्हाला निरनिराळया सेवा उपलब्ध करून देते...आमच्या विविध बचत आणि ठेव योजना देखील तुमची आर्थिक कुवत आणि गरजा यांचा विचार करूनच तयार करण्यात आलेल्या आहेत.

• मुदत ठेव योजना • संचित ठेव योजना • लोकमंगल दैनंदिन ठेव योजना • निश्चितकाल ठेव योजना • मासिक व्याजाची ठेव योजना • शुभमंगल ठेव योजना • प्रवासी चेक • भेट चेक • लघुउद्योग, शेतीविकास यांसाठी अर्थसाहाय्य योजना

यापैकी कोणतीहि योजना स्वीकारा... सगळ्या योजना सारख्याच आकर्षक आहेत.

महाराष्ट्र बँकेमध्ये बचत करण्याची सवय म्हणजे उद्याची तरतूद आजच करून ठेवण्याची सर्वोत्तम सोय... अशा प्रकारे बचत करणे किती हितकारक असते हे तुम्हाला महाराष्ट्र बँकेमध्येच उमगेल.

महाराष्ट्र बँक...तुमची जिव्हाळ्याची बँक




बँक ऑफ महाराष्ट्र

११७७ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२

PRATIBHA 767 MAR

27 OCT 1977


# अर्थ

जुलै १९७७

मूल्य तीन रुपये




स्वतःचे भवितव्य
घडविण्यासाठी
महाराष्ट्र बँकेची मदत घ्या
महाराष्ट्र बँक...तुमची जिव्हाळयाची बँक...कोणत्याना
क्षेत्रामध्ये सातत्याने धडपड करणाऱ्या तुमच्यासारख्या
महत्वाकांक्षी माणसा... मदत करणारी बँक...
स्वतःचे भवितव्य घडविण्याच्या तुमच्या प्रयत्नांना आम्ही
भरघोस मदत करू...आर्थिक साहाय्य करू...व्यवसायामधील
अडचणी समजावून सांगू...तांत्रिक व व्यवस्थापनाबद्दलसुद्धा
मार्गदर्शन करू.
आमच्याकडे या. देशभर पसरलेल्या ४५० पेक्षा अधिक
शाखांपैकी प्रत्येक शाखा तुमच्या गरजांकडे व्यक्तिगतरीत्या लक्ष
देईल...आत्मीयतेने सहकार्य करील...हवे तेव्हा.
महाराष्ट्र बँकेची मदत घ्या...सारे प्रश्न सुटलेच म्हणून समजा
बँक ऑफ महाराष्ट्र
११७७ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२




# अर्थ

आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक
दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे

वर्ष : तिसरे | अंक : चवथा : जुलै १९७७

किंमत : २ रुपये | वार्षिक वर्गणी : २० रुपये


# आलोक

## महागाईचे सावट

गोडे तेल आणि इतर पर्यायी तेलांचे दि. १० जुलैपासून भाव वाढण्यास सुरुवात झाली आहे. किलोमागे कमीत कमी ५५ पैसे किंमती वाढल्या. पामोलिनच्या किंमतीतहि २० पैशांनी वाढ झाली आहे. कलकत्त्याकडून मुंबईच्या बाजारात खाद्यतेलाची मागणी आल्यामुळे, तसेच गोडया तेलाच्या टंचाईमुळे सरकी तेल सोडून इतर सर्व तेलाचा बाजार तेजीत गेला.

धान्य-बाजारातहि मुंबई बाजारात एकदम तेजी आली. आगोठीचे दिवस असल्यामुळे आणि नवा माल बाजारांत येत नसल्याकारणाने धान्याची आगाऊ खरेदी व साठवण वाढू लागली. विशेषत: कडधान्ये आणि डाळी ह्यांचे भाव अधिक प्रमाणावर वाढले. सोनाकल्याण जातीच्या गव्हाची किंमत १४५ रुपये क्विंटल, तूर डाळ ४५० रुपये क्विंटल आणि मसूर डाळ ३४५ रुपये क्विंटल, अशा किंमती एकदम वाढल्या. मान्सून आतापर्यंत बरा झालेला असला आणि पीक-पाण्याबाबत मिळणारी माहिती एकूण समाधानकारक असली तरी ह्या किंमती वाढण्याची प्रवृत्ति दिसते. त्याचे कारण वायदे बाजारांतील धाऊक व्यवहार. दिल्ली बाजारात वाटाणा, काबुली, आटा, चणा ह्यांच्या किंमती वाढल्या आहेत. ज्वारी, बार्ली, उडीद डाळ ह्यांच्या किंमती भाव किंचित उतरल्या आहेत. मेत्तूर धरणाच्या साठवणक्षेत्रांत कमी पाऊस झाल्याकारणाने आणि त्यावर अवलंबून असलेल्या कावेरी त्रिभुज प्रदेश आणि कमी दिवसांत पीक घेणाऱ्या कुरुलवई पट्ट्यातील संभाव्य उत्पादन घटेल ह्या अंदाजाने, मद्रास बाजारांत तांदळाचे भाव गेल्या आठवड्यात वाढले. मुंबई बाजारांत डी ३० जातीच्या साखरेचे भावहि ३९८ रुपये क्विंटलवरून ४०६ रुपये क्विंटल पर्यंत वाढले असून सहकारी साखर कारखान्यांनी चढाभाव देणाऱ्या धाऊक खरेदीदारांची मागणी लक्षांत घेऊन बाजारांतील नित्याचा पुरवठा घटवला आहे.

## गुळाचा तुटवडा

ऑगस्ट महिन्यांत नेहमीइतकी साखर उत्पादकांकडून बाजारांत न आल्यास, साखरेचे भाव वाढतील अशी शक्यता आहे. कोल्हापुरी गुळाचा सध्या तुटवडा भासत आहेच. कापड व इतर आवश्यक वस्तू कापडगिरण्यात एकूण मंदीचे वातावरण असल्या-

मुळे कापसाला उठाव नाही. मूळजी जेठा कापड बाजारांत कापडाचे सौदे नुकतेच वाढू लागले आहेत. रमजाननिमित्त हरक (पांढऱ्या कापडाचे तागे) आणि भडक रंगाच्या पॉपलीनची मागणी इतर राज्यांतून येऊ लागली आहे. नामवंत मिलच्या कोटिंग कापडाच्या भावात ५ टक्के वाढ झाली. चांदी-सोन्याचे बाजार मंद आहेत. सोने ५८० रुपये (१० ग्रॅम) आणि चांदी-११५० रुपये (१००० ग्रॅम) आसपास सध्या भाव आहेत. मुंबई बाजारापेक्षा स्थानिक बाजारांत यापेक्षा २–४ रुपयांनी किंमती नेहेमीच जास्त असतात. तांबे, पितळ, ॲल्युमिनियम, जस्त ह्या लोहतर धातूंच्या मोडींच्या किंमतीत अचानक वाढ झाली आहे. मिरच्यांची आवक सुरळीत असल्याने त्यांचे भाव स्थिर आहेत. सुक्या मेव्याचे भावहि, अफगाणिस्तानांतून आलेल्या बातम्यांमुळे स्थिर आहेत. मेण सोडून बाकी रसायनांच्या किंमतीहि स्थिरच आहेत. कलकत्त्याच्या ताग गिरण्यांना चांगल्या धाग्याचा ताग उपलब्ध झाल्या कारणाने, ताग उत्पादन घसरले आहे. वास्तविक तागाचे भाव वाढण्यासारखी स्थिती असूनहि कलकत्ता बंदलांत संपाचे वातावरण असल्यामुळे वहातूक करणाऱ्यांकडून मागणी मंदावली, त्या कारणाने भावहि स्थिर राहिले. मोठ्या प्रमाणावर चहाचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांच्या प्रमुखांची, मागील शुक्रवारी व्यापार मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. कंपन्यांनी किरकोळ विक्री-व्यवस्था सुरू करून किंमती वाजवी पातळीवर आणाव्या असे ठरले. प्रत्यक्षांत ग्रामीण बाजारांत कंपन्यांचा चहाहि दुर्मिळ होऊ लागला आहे. पण ह्या ३–४ आठवड्यांत चहाच्या किंमतीहि उतरू लागतील असा त्या गोटातील माहीतगारांचा अंदाज आहे. त्याचे कारण यंदा चहाचे उत्पादन गतवर्षीपेक्षा अधिक चांगले होईल.

## भारतीय रुपयाची किंमत

जर्मन मार्क, डच गिल्डर, स्वीस फ्रँक, बेल्जियन फ्रँक, फ्रेंच फ्रँक, जपानी येन व ऑस्ट्रेलियन शिलिंग ह्यांच्या विनिमयात रुपया थोडा घसरला असला तरी लंडन बाजारातील अमेरिकन डॉलरच्या बदल्यात रुपयाचे बाह्य मूल्य स्थिरच आहे.

ठाणे शहरांत १० वर्षांपूर्वी वागळे इस्टेट भागात फक्त ५० मोठे कारखाने होते. त्याच ठाणे-बेलापूर भागात आता ११०० मोठे मध्यम कारखाने असून दीड लाख कामगार दररोज त्या भागात कामावर येतात. या कामगारांना कारखान्यांच्या आसपास कोणत्याच सोयी उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा ताण ठाणे स्टेशन, तसेच शहरांतील रस्त्यांवर कमालीचा वाढत चालला असून एकूण परिस्थिती नियंत्रणाच्या बाहेर चालली आहे. रेल्वेची सध्याची गुडस् शेडहि वाढत्या कारखानदारीच्या मानाने लहान असल्यामुळे मालाचे वितरण अखंडित होत नाही.

## आजारी कारखान्यांचे धोरण

उद्योगमंत्री श्री. जॉर्ज फर्नांडिस यांनी ११ जुलै रोजी लोकसभेत एक 'मोठ्या आवाजातील चिंतन' प्रकट केले. आजारी कारखाने कामगारांनाच चालवावयास देण्याचा प्रयोग करून पहावा असा त्यांचा अभिप्राय आहे. त्याकरता शासनामार्फत त्यांना व्यवस्थापन, तंत्र आणि भांडवल ह्यांचे साहाय्यहि उपलब्ध होईल, असे आश्वासन त्यांनी दिले. हा प्रयोग झाल्यास बेकारी आणि नफेखोरी यांना स्वाभाविकपणे आळा बसेल. प्रत्यक्षांत कार्यवाहीत आल्यास त्यातल्या इतर अडचणी लक्षात येतील आणि त्याबाबतही योग्य ती पावले टाकता येतील. प्रयोगानेच प्रयोगाची यशस्विता सिद्ध होत असते.

## सातवे वित्त महामंडळ

भारताचे सातवे वित्तमहामंडळ २४ जून रोजी नेमण्यात आले असून त्याचे अध्यक्ष न्या. जे. एन्. शेलाट हे आहेत. इतर सभासद म्हणून डॉ. रामकृष्ण (नियोजन मंडळाचे प्रतिनिधी) दिल्लीच्या इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथचे संचालक डॉ. हनुमंतराव, केंद्रीय वित्त मंत्रालयाचे सचिव श्री. रे, आणि श्री व्ही. बी. ईश्वरन् यांची नियुक्ती झाली आहे. मंडळाला सोपविलेली कामे ६ व्या मंडळाचीच आहेत. विशेषतः केंद्रीय कर आणि उत्पन्नाची राज्ये व केंद्रे यामधील वाटणी नव्या परिस्थितीत कशी असावी यावर मंडळाने अभिप्राय द्यावयाचा असतो. विविध राज्यांना अनुदाने किती द्यावयाची हेहि ठरवावयाचे असते.

याशिवाय करविषयक कायद्यात सुधारणा सुचविण्याकरिता श्री. नानी पालखीवाला यांच्या अध्यक्षतेखाली एक वेगळी समिती नियुक्त केली आहे. समितीत मुंबईचे चार्टर्ड अकौंटंट श्री. सी. सी. चोक्सी, श्री. हरनाम शंकर, श्री. गणपति आणि श्री. नरसिंहन हे तज्ज्ञ आहेत. आयकर, 'सुपर' आयकर संपत्तीकर आणि देणगी कर या चार कायद्यांमध्ये, करप्रकरणे आणि त्यावरचे न्यायालयीन तंटे कमी करण्याकरता, आवश्यक त्या सुसंगत सुधारणा समितीने सुचवायच्या आहेत. वस्तु करात बेसुमार वाढ झाल्याकारणाने चलनवाढ आणि औद्योगिक मंदी या समस्या बिकट होत असल्याने, या करांच्या आकारणीबाबतहि नव्या सूचना मागवल्या आहेत.

## ागतिक बँकेचा अहवाल

भारतीय आर्थिक प्रगतीबाबत जागतिक बँकेने पाहणी करून जो निष्कर्ष सादर केला तो धक्कादायक आहे. जगांतल्या ११८ देशांच्या भाडवल-उत्पादन प्रमाणांची तुलना करून भारताचे हे प्रमाण फार कमी आहे, असे त्यात नमूद झाले आहे. या मूल्य-मापनानुसार भारताचा क्रमांक ७३ वा लागतो. साधनसामग्री आणि श्रमशक्ति यांची विपुलता असूनहि भारतीय भांडवलाची कार्यक्षमता आणि सुनियोजित वापर असमाधानकारक आहे. १९५१ ते १९६४–६५ या कालावधीत वार्षिक गुंतवणुकीचे सरासरी प्रमाण जे ८ टक्के होते ते त्या काळानंतर अलीकडे ३.७ टक्के इतके घसरले आहे.

## बँकांजवळील पैसा

दहा आठवड्यांपूर्वी बँकांजवळ भरपूर फंड आणि खेळता पैसा होता. गेल्या २ महिन्यांत कर्जे आणि उचल यात वाढ झाल्या-कारणाने बँकांकडील पैसा आकुंचित झाला आहे. दोन मोठ्या बँकांनी रिझर्व्ह बँकेकडे फंडाकरता मागणी केली आहे. नुकतेच बँकांनी आयकर केंद्रीय कर्जाचे हप्ते तसेच रिझर्व्ह बँकेकडून घेतलेली जादा कर्जे परत केली असल्यामुळे सध्या ही टंचाई भासत आहे. मागील वर्षापेक्षा या वर्षी ठेवींमध्ये तीव्रतेने वाढ झाली असली तरी ती अपेक्षेपेक्षा फार कमी आहे. बँकांच्या जुलै १९७६ च्या ठेवी १०४५ कोटि रुपयांच्या होत्या. त्य जुलै ७७ मध्ये ११८३ कोटि रुपये आहेत.

## इसप गोलाची करामत

भारतीय इसप गोल वनस्पति पाश्चात्य देशात इतकी लोक-प्रिय झाली आहे की तिच्या गेल्या वर्षातल्या केवळ निर्यातीने २५ कोटि रुपयांचे परदेशी चलन मिळविले. अमेरिका, जर्मनी, इंग्लंड आणि फ्रान्स या देशांतून या वनस्पतीस प्रचंड मागणी वाढत आहे. इसप गोलचा अर्थ आहे घोड्याचा कान. या वन-स्पतीच्या बियांचा आकार घोड्याच्या कानासारखा असतो. भारतात गुजरातेत बनासकाठा आणि मेहसाणा जिल्ह्यात या वनस्पतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर आहे. इकडील बाजा-रांतहि एक नवी फॅशन म्हणून या वनस्पतीची मागणी वाढली तर अनेकांना माहीत नसलेले गरिबांचे हे औषध देखील ...ाग होईल !

## पीकपाणी

पीक पाणी : मान्सूनची सुरुवात तर चांगली झाली आहे. आंध्र, गुजरात, काश्मीर, केरळ मध्यप्रदेश, पंजाब, बंगाल ह्या राज्यांत मान्सूनपूर्व पाऊस झाला. आसामात महापुरांमुळे आणि गुजरात, बिहार, उत्तर-प्रदेश इत्यादि राज्यांत आवश्यकते पेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे पेरण्या लांबल्या. मध्यप्रदेश, महा-राष्ट्र, ओरिसा, बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि काश्मीर या राज्यांत पेरण्या समाधानकारकरीतीने झाल्या आहेत. महा-राष्ट्रात काही जिल्ह्यांत अधिक पावसाची गरज आहे.

देशातल्या एकूण कृषि उत्पादनापैकी दोनतृतीयांश उत्पादन देणारा खरीप हंगाम यंदा खूप बरा राहील असा अंदाज आहे. तथापि १२५ दलशक्ष टन धान्य उत्पादनाचे उद्दिष्ट निश्चित-पणे पुरे होईल असे वाटत नाही. महाराष्ट्राचे निकटचे व्यापारी संबंध असलेल्या राज्यांतील परिस्थिती तूर्तास समाधानकारक आहे. आंध्र प्रदेशांत सुरुवातीचा पाऊस चांगला झाला. गत-वर्षी चक्रीवादळामुळे तेथील पिकांचे नुकसान झाले होते. मध्य-प्रदेशांत पावसाला योग्य वेळी सुरुवात झाल्यामुळे भात पिक-विणाऱ्या भागांत शेतीची प्राथमिक कामे पूर्ण झाली. ज्वारी आणि भुईमुगाच्या पेरण्यांकरता थोड्या उघडिपीची वाट आहे. गुजरातमध्ये मात्र पाऊस तुरळक झाल्याकारणाने कापूस व भुईमूग यांचा हंगाम लांबला आहे.

## उठाव नाही

औद्योगिक क्षेत्र : बड्या उद्योगसमूहांची व्याख्या करतांना २० कोटि ते ५० कोटि रुपये भांडवली गुंतवणूक असलेल्या कंपन्यांचाहि समावेश करावा असा जनता पक्षाच्या काही नेत्यांचा व अध्यक्षांचा आग्रह आहे. तथापि उद्योगमंत्रालयाने त्यांना तूर्तास बडे उद्योगसमूह ह्या गटातून वगळण्याची सूट दिली आहे. त्यामुळे मध्यमप्रतीच्या उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळेल. देशांत साधनसामग्रीचा तुटवडा असल्यामुळे सिमेंट उत्पादनांत ह्या वर्षी बरीच मोठी घट होईल. ह्या समस्येतून मार्ग काढण्याकरिता सिमेंट-निर्यातीवर बंदी येण्याची दाट शक्यता आहे. कापड उद्योगाला लांब धाग्याच्या कापसाची टंचाई गेली कित्येक वर्षे भासत असतांना ह्या वर्षी मात्र बाजा-रात मिल विभागाकडून मागणी नसल्यामुळे मालाला उठाव नाही.

आतापर्यंत मुंबई बंदरांत आयात झालेल्या १० हजार गाठी

पडून आहेत. १५ ऑगस्टपर्यंत सुमारे अडीच लक्ष गाठी आयात होतील. रोज ४ हजार गाठी कापूस उचलला गेला तर ह्या मालाचा उठाव संपूर्ण होऊ शकेल. नाही तर, पोर्ट ट्रस्ट अडचणीत येईल. ह्या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरिता पोर्ट-ट्रस्टने कॉटन कॉर्पोरेशनकडे धाव घेतली आहे. तूर्तास मात्र कॉर्पोरेशन काही करू शकेल असा रंग दिसत नाही. ठाणे, बेलापूर विभागांतील ४० कारखान्यात संप-टाळेबंदीमुळे उत्पादन संपूर्ण बंद पडले आहे. कृष्णा स्टील, फायझर, हार्डेलिया केमिकल्स, युनायटेड कार्बन, नोसिल, मुकुंद, पॉयशा, फिलिप्स इत्यादि बऱ्याच बड्या कंपन्यांमध्ये औद्योगिक अशांतता आहे. निर्यात होणाऱ्या चहाचे लिलाव वेगळे असावेत असे बंधन घातल्यामुळे देशात चहा अधिक उपलब्ध होईल व किमती उतरतील असा शासकीय गोटाचा अंदाज आहे.

टेलेव्हिजन, टेपरेकॉर्डर्स, डेस्क कॅलक्युलेटर्स आणि मिनी मायक्रो मीटर्स ह्यांचे उत्पादन वाढविण्याकरता त्यांच्यावरील निर्बंध शिथिल केले आहेत.

## भावात घसरण

सोने-चांदी व इतर बाजार : स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने, चांदीची निर्यात किमत किमान ४८० सेन्टस् असावी हे अवाजवी निर्बंध शिथिल करुनहि चांदीच्या निर्यातीच्या व्यापारात अनिश्चिततेचे वातावरण होते. कॉर्पोरेशनने नुकतीच फ्लोअर प्राईस ४६० रुपये औंस इतकी कमी केली. पण त्यावेळी जागतिक बाजारांत चांदीचा भाव ४३६.५० सेन्टस् इतका उतरला होता, त्यामुळे निर्यात पुन्हां एकदा घसरली. चांदीचा भाव जागतिक भावाच्या पातळीशी आणून स्मगलिंग थांबवावे असा कॉर्पोरेशनचा प्रयत्न आहे. पण यापेक्षा चांदी निर्यात करण्यासंबंधीचे होकारात्मक (पॉझिटिव्ह) धोरण स्वीकारले तर फारशी अडचण येणार नाही. जानेवारी ७४ मध्ये देशातील चांदीचे साठे ८१ हजार ५०० टन होते.

निर्यातीला कायदेशीर अनुमति मिळाल्यापासून फेब्रुवारी १९७४ पर्यंत ३७५० टन चांदीची निर्यात झाली. आताचा देशांतला साठा ७८ हजार टनांचा असल्यामुळे तो अनेक दशके आपल्याला पुरेल. कारण आपली वार्षिक सरासरी निर्यात १००० ते १५०० टनच असते. चांदीची किमत सध्या घसरली असून या महिन्यांत नेहमीप्रमाणे सोन्याचे भाव मंद आहेत.

तेलबियांच्या बाजारांत भिन्न प्रवृत्ति आहेत. काही भाव चढत आहेत तर काही उतरत आहेत. उदाहरणार्थ, करडई, एरंडी, अळशी, सरकी ह्यांचे भाव टिकून अहेत. खरिपाच्या आव[illegible] मुळे शेंगदाणा तेलभावात थोडी घट झाली आहे. तांबे आ[illegible] तांब्याच्या मोडीच्या आयातीवरील जकातीत दि. २५ जू[illegible] रोजी सुमारे १२० टक्क्यांनी वाढ केल्यामुळे, बाजार संपूर्ण विस्कळित झाला आहे. देशांतल्या मोडीचा भावहि परदेशांतल्या आयात धातूपेक्षा चढा राहील असा अंदाज आहे. मुंबई शेअर बाजारात थंडा काभार आहे. अहमदाबाद बाजारात मात्र परिस्थिती चांगली आहे.

या वर्षी बिस्किट कंपन्यांचा धंदा चांगला झाला. ब्रिटानिया बिस्किटाची विक्री व नफ्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे. संचालकांनी चालू वर्षी १५ टक्के डिव्हिडंड जाहीर केला आहे मागील वर्षापेक्षा कलरकेमने यंदा ३६ टक्के अधिक नफा मिळविला असून या कंपनीचा डिव्हिडंड १२ टक्के आहे. भेसळ करणाऱ्या मुंबईतील व्यापाऱ्यांनी आयात झालेले पॉमोलिन नांवाचे हलके तेल, गोडेतेल म्हणून विकण्यास सुरुवात केली आहे. हे दिसण्यास गोड्या तेलासारखे असून वासरहित व रिफाईंड आहे. याची खरी घाऊक किंमत ८ रु. ८० पैसे असतांना किरकोळ विक्री करतांना १० रु. ३० पैसे दर किलोला घेतल्यामुळे कांही व्यापाऱ्यांनी चांगलाच फायदा केला. टाटा ऑईल मिल या तेलाची टँकरमार्फत मुंबईच्या निरनिराळ्या विभागांत दर किलोस ८ रु. ५० पैसे या भावाने किरकोळ विक्री करीत आहे. या खात्रीच्या तेलाकरिता मात्र रांगेमध्ये नंबर लावावायला हवा !

## किमती खाली आणण्याचे राष्ट्रीय धोरण

**मागील सप्ताहातील जीवनावश्यक वस्तूंच्या भडकलेल्या किमतींची सार्वत्रिक प्रवृत्ती लक्षात घेता, त्याचे योग्य प्रकारे नियंत्रण करण्याची निकडीची गरज, सुदैवाने शासकीय पातळी वर भासू लागली. केंद्रीय मंत्रिमंडळाने याकरता संबंधित उपाययोजनांची चर्चा घडवून आणण्याकरता सर्व राज्यांच्या मुख्य मंत्र्यांची बैठक बोलाविली आहे. थोड्याच दिवसांत किमतपातळीविषयक राष्ट्रीय धोरण ठरविण्यात येईल.**

दरम्यान जनता पक्षाच्या मंत्रिमंडळाची एक बैठक झाली. त्याकरता पक्षाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तसेच नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. लकडावाला यांनाही निमंत्रित केले होते. चहा आणि साखर यांच्या किमती उतरतील असा विश्वास व्यापारमंत्री श्री. मोहन धारिया यांनी व्यक्त केला. गोड्या तेलाच्या बाबतीत व्यापारी गोटातील कांहींनी सरकारला आश्वासि[illegible]

सहकार्य दिले नाही, त्यामुळे किमती वाढल्या. त्यावर उपाय म्हणून सरकारने भरपूर प्रमाणावर खाद्यतेलाची आयात करण्याचे ठरवले आहे. ८ रु. ५० पैसे किलो या दराने रिफाइंड तेल पुरवठयास उपलब्ध झाल्यास किमतीस पायबंद बसेल अशी अपेक्षा आहे. लोकांजवळ असलेल्या चलनात घट करण्याची जरूर आहे. बोनसबाबत सरकारला या महिनाअखेर निर्णय घ्यावयाचा आहे. बोनस आणि किमती यांचाही एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. औद्योगिक धोरणाच्या बाबतीत केंद्रीय मंत्रिमंडळात तीन भिन्न प्रवाह दिसतात. चरणसिंग, राजनारायण यांचा मोठया उद्योगधंद्यापेक्षा शेती, लघु आणि ग्रामीण उद्योग यावर भर द्यावा, असा आग्रह आहे. पोलादमंत्री बिजू पटनाईक, रेल्वेमंत्री प्रा. दंडवते यांना मोठया उद्योगधंद्यांबाबत उपेक्षा झाल्यास एकूण आर्थिक विकासात पीछेहाट होईल, असे वाटते. त्या दोघात श्री. पटनाईक यांना खासगी क्षेत्राला मुक्त वाव द्यावा, असे वाटते तर श्री. दंडवते यांना सरकारी क्षेत्राचे सामर्थ्य आणि व्याप वाढावा असे वाटते. भूतपूर्व जनसंघाच्या नेत्यांना श्री. पटनाईक यांचे धोरण बरेचसे श्रेयस्कर वाटत असावे असा अंदाज आहे. महामंत्री श्री. मोरारजी देसाई आणि भूतपूर्व संघटना कॉंग्रेसचे त्यांचे सहकारी तसेच श्री. जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारख्या स्वतंत्र विचाराच्या समाजवादी मंडळींना कृषि आणि आधुनिक उद्योग तसेच खासगी आणि सहकारी क्षेत्र ह्या दोहोंवर संतुलित भर द्यावा असे वाटते. आर्थिक व्यवस्थेत खासगी क्षेत्राकडून खोडसाळपणा झाल्यास शासकीय शक्ती आणि निर्बंधांच्या द्वारा त्यावर लगाम घालता येईल आणि विकासाला गती देता येईल, असाही विश्वास त्यांना वाटतो.

## धोरण सुसंगत नाही

गेल्या तीन महिन्यात केंद्रीय मंत्रिमंडळातील जबाबदार नेत्यांनी परस्पर विसंगत आणि मनमानी विधाने विशेषत:, आर्थिक धोरणाबाबत केल्यामुळे बरेच नाजूक पेचप्रसंग निर्माण झाले. माजी उद्योगमंत्री श्री. ब्रिजलाल वर्मा, पटनाईक, सिकंदर बख्त, राजनारायण यांच्या विधानांमुळे योग्य तो खुलासा श्री. देसाई यांना करावा लागला. पटनाईक यांनी सरकारी क्षेत्रातील पोलाद कारखान्यांना रशियाकडून मदत घेतली जाणार नाही असे जे विधान केले त्यात यंत्रसामग्री रशियाकडून घेणे चालू राहील अशी सुधारणा जाहीर करावी लागली. जनता पक्षाच्या अध्यक्षांनी बडया उद्योगांची व्याख्या आणि रिझर्व्ह बॅंकेने पांच वर्षे मुदतीच्या ठेवीवरील व्याजाच्या दरांत केलेली २० टक्के कपात या प्रश्नात हस्तक्षेप केल्याने, अनुक्रमे त्या वेळचे उद्योगमंत्री आणि अर्थमंत्री यांना आवश्यक ती सारवासारव करावी लागली. तात्पर्य, सत्तारूढ पक्षाचे सुसंगत आर्थिक धोरण स्पष्टपणे ठरवण्याची आज जरूर आहे. त्यात एकजनसीपणा असल्यास, अर्थव्यवस्थेत निश्चित वातावरण निर्माण होऊन विकासाला वेग येईल.

## पीक बेताचे

१७ जुलै ह्या दिवशीचे बाजार लक्षात घेता खाद्यतेलांच्या आणि अन्नधान्यांच्या किमती उतरण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती आहे. खाद्यतेलाची आयात होणार असल्यामुळे, मान्सून ठीक असल्यामुळे आणि गोदी कामगारांचा संप तूर्तास स्थगित झाल्याकारणाने किमती स्थिर झाल्या. गोडया तेलाच्या किमतीत फार घट नाही ह्याचे कारण भुईमूग पिकवणाऱ्या सौराष्ट्रात यंदाचे पीक फारसे समाधानकारक नाही. खाद्यतेलांच्या किमतीत सरासरी क्विंटलमागे २ ते ५ रुपये घट झाली. दिल्ली बाजारातही अशीच प्रवृत्ती आहे. डाळींच्या किमतीही थोडया उतरल्या, ह्याचे कारण शीतगृहातून काही साठे, सरकार कडक कारवाई करील या धास्तीने, बाजारात आले. उडीद डाळीची किमत मूग, तूर व चणा डाळींपेक्षा अधिक घटली. बिहार आणि उत्तर प्रदेशातून मालाची आवक झाल्यामुळे मुंबई बाजारात मूग डाळीची किमतही उतरली. रेशन दुकानात गहू भरपूर उपलब्ध असल्यामुळे गहू, ज्वारी, बाजरी ह्या प्रमुख अन्नधान्यांचे भावही घटले. महाराष्ट्रातल्या सहकारी साखर कारखान्यांनी ६८,००० पोत्यांची क्विंटलला ३८८ ते ४०३ रुपये या भावाने विक्री केल्यामुळे घाऊक बाजारात साखरेचा पुरवठा वाढला. केंद्राकडून ऑगस्ट महिन्यात जुलै महिन्याइतकाच कोटा उपलब्ध असल्याकारणाने साखरेच्या किमती फार उतरणार नाहीत.

## कोटा वाढविला नाही

वास्तविक श्रावणातील सणाकरता साखरेच्या मागणीत वाढ होण्याचा संभव आहे पण कारखान्यांकडून साखरेच्या किमती उतरू नयेत याकरता गट एकत्रित झाल्यामुळे केंद्र सरकारने कोटा वाढवला नसावा. तथापि किमतीत अनपेक्षित वाढ झाल्यास ऑगस्टच्या पुरवठयात वाढ करणे आवश्यक होईलच. मसाल्याच्या जिनसांच्या किमतीही सर्वसाधारणपणे मंद आहेत. सोने-चांदीच्या किमतीत किंचित् वाढ आहे. तलम कापडावरील उत्पादनकर वाढल्यामुळे मुंबई कापडबाजारात

नाराजी आहे. देशांतील बाजारात हरक, पॉपलिन, चेक शर्टिंग आणि प्रिंटेट कापडाला मागणी आहे. कपाशी बाजारात मंदी आहे. बाजारात ब्याडगी, गुंटूर, वरंगळ आणि मद्रासकडून मिरचीची आवक झाल्यामुळे मिरची बाजार स्थिर आहे. मुंबई शेअर बाजारात उद्योगमंत्र्यांच्या विधानामुळे मंदीची प्रवृत्ती निर्माण झाली. कलकत्ता शेअर बाजार गोदी कामगारांचा संप रहित झाल्यामुळे येत्या गुरुवारपासून सुधारला. मद्रास, दिल्ली आणि अहमदाबाद येथील शेअर बाजारातील वातावरण शांत आहे.

जून ७६ ते जून ७७ या वर्षात व्यापारी बँकांनी ग्रामीण आणि उपेक्षित भागात बँकांच्या शाखाप्रसाराच्या कार्यात लक्षणीय कामगिरी केली आहे. गेल्या दहा महिन्यात विशेषतः ज्या भागात बँका नव्हत्या अशा ठिकाणी नव्या १३३४ शाखांची भर पडली आहे. मागील वर्षी ही संख्या ७१२ होती. एकूण नव्या शाखा शहरी आणि ग्रामीण मिळून ३०६२ निघाल्या. मागील वर्षाची ही संख्या २१६७ होती. १९६९ च्या राष्ट्रीयीकरणानंतर जून १९७७ पर्यंतच्या कालावधीत एकूण १६,१४३ नव्या शाखा सुरू झाल्या. त्यातील ७३९६ शाखा ग्रामीण भागात आहेत. प्राधान्य क्षेत्रातील ७६–७७ ह्या वर्षाची कर्जाची रक्कम ३५०८ कोटी रुपये आहे. गतवर्षी ही रक्कम २८५३ कोटी रुपये होती. १९६९ मध्ये या क्षेत्राला उपलब्ध झालेल्या रकमेचे एकूण कर्ज-रकमेशी प्रमाण १४ टक्के होते आता ते २६ टक्के झाले आहे. व्यापारी बँकांनी धान्य खरेदी व्यवहारांसाठी या वर्षी २२८१ कोटी रुपयांची कर्जे उपलब्ध केली. जून १९६९ मध्ये निर्यात व्यापाराकरिता बँकांकडून २५९ कोटी रुपये साहाय्य झाले. चालू वर्षी ते ११३३ कोटी रुपये आहे. त्यांच्या ठेवींमध्येही या वर्षी ३३६५ कोटी रुपयांची भर पडली आहे.

## उच्चाधिकार समिति

संपत्ती आणि आर्थिक बल यांचे केंद्रीकरण टाळण्यासाठी सरकारने उच्चाधिकार समिती नियुक्त केली आहे. या समितीचे अध्यक्ष श्री. के. एस्. हेगडे असून समितीने मक्तेदारी व्यापार नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित होते की नाही यासंबंधी पाहणी करावयाची आहे. सेंट्रल बँकेने कोहिनूर मिलला २५ कोटी रुपयांचे जे कर्ज मंजूर केले त्या व्यवहाराचीही चौकशी करण्याकरता अर्थमंत्र्यांनी स्वतंत्र तपासाची व्यवस्था करण्याचे मान्य केले. १९७४ पासून मिल फार अडचणीत आल्यामुळे आणि सेंट्रल बँक मिलला कर्जसाहाय्य करीत असल्यामुळे टाटा कन्सल्टन्सीच्या शिफारशीनुसार बँकेने व्यवस्थापनात सुधारणा करण्याकरता श्री. हिंगोराणी या तज्ज्ञ, अनुभवी व्यवस्थापकाची नेमणूक केली. सेंट्रल बँकेने दिलेले कर्ज सुरक्षित आहे असा निर्वाळा अर्थमंत्र्यांनी दिला आहे. १८ जुलै रोजी मजूरमंत्रालयाने ३० सदस्यांचे एक मंडळ श्रमिकांसंबंधींच्या सर्व कायद्यात योग्य त्या सुधारणा करण्याकरता नियुक्त केले असून मंडळाचे अध्यक्ष रवींद्र वर्मा त्यांचा अहवाल या २ महिन्यात सादर करतील. नॅशनल रेयॉन या प्रख्यात कंपनीच्या व्यवस्थापन मंडळांत सरकारने आपले ८ संचालक नियुक्त केले असून त्याचे अध्यक्ष स्टेट बँकेचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. तलवार हे आहेत. मध्यंतरी रेयॉनच्या व्यवहारात दोन बड्या उद्योग-समूहांच्या स्पर्धेमुळे गोंधळ निर्माण झाला होता.

## नवे चित्रपट नाहीत

जनता पक्षाला निवडणुकीत पाठिंबा देऊनही त्या सरकारने फिल्मच्या प्रिंटवरील उत्पादनकरात १५० टक्क्यांनी वाढ केल्यामुळे निर्माते व वितरक नाराज झाले असून त्यांनी यापुढे नवे चित्रपट न काढण्याचा, सरकारी पारितोषिक न स्वीकारण्याचा तसेच परदेशांतील स्पर्धात भाग न घेण्याचा निर्णय घेतला आहे. एकाच चित्रपटाच्या साधारणपणे ८० ते १०० प्रिंटस् निर्माते तयार करीत असत. ते प्रमाण ३६ वर आणावे लागेल. सिनेमा धंद्यातील थिएटरमालक व त्यांचे कर्मचारी यांना या उत्पादनकराची झळ बसेल. सुमारे २० हजार लोकांचा रोजगार बुडेल असा निर्मात्यांचा दावा आहे. अर्थमंत्र्यांनी त्यांच्या शिष्टमंडळाचा अपमान केला अशीही त्यांची भावना आहे. चित्रपटगृहात 'जुन्या चित्रपटांना' पुन्हा भाव येईल. नाटक, नृत्य, संगीत इत्यादी क्षेत्रात अप्रत्यक्षपणे तेजी येईल, टी. व्ही. वर मात्र नवे चित्रपट पाहावयाला मिळणार नाहीत असा रंग आहे.

## एंटरोव्हायफॉर्मचा धोका

पावसाळ्यात या दिवसांत पोटाच्या तक्रारी आणि डायरियाच्या साथी प्रसृत असतांना त्यांचे निवारण करणाऱ्या पेटंट एंटरोव्हायफॉर्म आदि १०० प्रकारच्या गोळ्यांच्या मुक्त विक्रीवर भारताचे ड्रग कंट्रोलर यांनी १ जुलै रोजी एक पत्रक काढून बंदी घातली आहे. एंटरोव्हायफॉर्म आणि मेक्झॉफ या गोळ्या गुणकारी असल्या तरी त्यांचे इतर परिणाम भयानक आहेत असे लॅन्सेट नावाच्या ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये छापून आले. विशेषतः दृष्टिदोष, मेंदूत बिघाड आणि पक्षाघात हे विकार या गोळ्यांच्या अतिरिक्त व सवयीच्या सेवनाने होऊ शकतात असे आरोग्यशास्त्रज्ञांनी सप्रयोग सिद्ध केले आहे. जपानमध्ये १९६० पासूनच ह्या गोळ्यांच्या इतर परिणामांचे संशोधन सुरू झाले. जपानी डॉक्टरांचे मत आहे की, त्यामुळे स्मोन (दृष्टि जाण्याचा रोग) या नावाचा रोग होतो. एंटरोव्हायफॉर्मवर बंदी घातल्यामुळे इतरही 'पोटशुद्धी' करणाऱ्या गोळ्यांवर संक्रांत आली. आता डॉक्टरांच्या लेखी सल्ल्याशिवाय या गोळ्या विकत घेता येणार नाहीत. आयुर्वेद, होमिओपथी तसेच घरगुती पाचकांच्या धंद्यांत तेजी येईल. तूर्तास बाजारात ह्या औषधांची टंचाई झाली आहे. आपल्या देशात अन्न मिळते आणि पाणी मिळते त्यापासून पचनव्यवस्था सुरक्षित ठेवणे दुर्घट आहे.

[केसरीच्या सौजन्याने]

# मराठी विश्वकोश कार्य

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रमुख संपादक, 'विश्वकोश'

**रविवार दि. २४ जुलै, १९७७ रोजी मराठी विश्वकोशाच्या पहिल्या ५ खंडांच्या प्रकाशनाचा समारंभ पुणे येथील टिळक स्मारक मंदिरात प्रधानमंत्री ना. मोरारजी देसाई, राज्यपाल सादिकअली, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. वसंतराव दादा पाटील ह्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. ह्या कोशाच्या निर्मितीस महाराष्ट्रातील तसेच अन्य भागातील, सुमारे ३००० विद्वद्-जनांनी आपल्या ज्ञानाचा व व्यासंगाचा लाभ महाराष्ट्रातील असंख्य वाचकास उपलब्ध करून दिला आहे. मानव्यविद्या, आणि विज्ञान व तंत्रविज्ञा ह्यात समावेश होणाऱ्या अनेक शास्त्रांचा अभ्यास वाचकाला आता स्वावलंबनाने करता येणे शक्य आहे.**

**हे ज्ञानाचे भांडार खुले झाले आहे. महाराष्ट्रातल्या सामान्य माणसाची गुणवत्ता, कार्यक्षमता त्याचप्रमाणे सुसंस्कारित ज्ञानलालसा ह्या कोशामुळे विकसित होईल ह्यात शंका नाही. विशेष म्हणजे अर्थशास्त्रावरील संदर्भसाहित्य, तसेच अर्थशास्त्राची मराठी परिभाषाहि ह्या कोशात उपलब्ध झाली आहे.**

मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ हे १९ नोव्हेंबर, १९६० रोजी स्थापन करण्यात आले. या मंडळाने जे अनेकविध उपक्रम सुरू केले आहेत, त्यांपैकी एक प्रमुख म्हणजे मराठी विश्वकोशाची निर्मिती हा होय. विश्वकोशाचे पहिले १७ खंड हे संहिता–खंड असून ते प्रत्येकी सु. १००० पृष्ठांचे आहेत. १८, १९ व २० या क्रमांकांचे खंड अनुक्रमे परिभाषासंग्रह, नकाशासंग्रह व सूचिखंड आहेत. नकाशाखंडात महाराष्ट्रातील जिल्हे, भारतातील सर्व राज्ये, जगातील सर्व देश यांच्या नकाशांबरोबरच सर्व प्रकारचे प्राकृतिक नकाशेही समाविष्ट आहेत. मराठीत सर्वांगीण असा हा पहिलाच नकाशासंग्रह ठरेल. मराठी विश्वकोशाच्या पहिल्या सात खंडांची छपाई पूर्ण झालेली असून त्यांपैकी पहिल्या पांच खंडांचे प्रकाशन या प्रसंगी होत आहे. साहित्य संस्कृति मंडळाचे प्रथमपासूनचे अध्यक्ष तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी हेच विश्वकोशाचे प्रमुख संपादक आहेत.

हा मराठी विश्वकोश सर्वविषयसंग्राहक आहे. त्यात जवळजवळ १०० विषयोपविषयांच्या अंगोपांगांची सर्वांगीण पण सारभूत माहिती देणारे लहानमोठे लेख योजिलेले आहेत. नैसर्गिक विज्ञाने, तंत्रविज्ञान, मानव्यविद्या या प्रमुख वर्गवारी खाली या सर्व विषयांचा अंपतर्भाव केलेला आहे. त्यांपैकी प्रमुख विषय पुढीलप्रमाणे आहेत :–

**विज्ञान व तंत्रविद्या :**

**(१) अभियांत्रिकी, अणुकेंद्रीय (२) अभियांत्रिकी, नाविक (३) अभियांत्रिकी, यांत्रिक (४) अभियांत्रिकी, रासायनिक (५) अभियांत्रिकी, विद्युत् (६) अभियांत्रिकी, वैमानिकी (७) अभियांत्रिकी, संदेशवहन (८) अभियांत्रिकी, स्थापत्य (९) अभियांत्रिकी, स्वयंचल (१०) अवकाशविज्ञान (११) उद्योग व व्यापार, (१२) कीटकविज्ञान (१३) कृषिविज्ञान (१४) गणितशास्त्र (१५) जीवरसायनशास्त्र (१६) ज्योतिषशास्त्र (१७) धातुविज्ञान (१८) प्राणिविज्ञान (१९) भूविज्ञान (२०) भौतिकी (२१) मत्स्योद्योग (२२) रसायनशास्त्र, (२३) वनस्पति रोगविज्ञान, (२४) वनस्पतिविज्ञान, (२५) वातावरणविज्ञान (२६) वैद्यक : (अ) मानवी (आ), पशू (२७) वैज्ञानिक संस्था, (२८) शरीरक्रियाविज्ञान (२९) शारीर, (३०) संग्रहालये, (३१) सांख्यिकी, (३२) सूक्ष्मजीवविज्ञान.**

**मानव्यविद्या :**

**(१) अर्थशास्त्र (२) अलंकरण, वेश इ. (३) इतिहास**

**(४) कनिष्ठ कला व कारागिरी, (५) ललितकला, (६) खेळ व मनोरंजन (७) ग्रंथालयशास्त्र (८) चलचित्रविद्या (९) जगातील भाषा व साहित्ये (१०) तत्त्वज्ञान (११) धर्म (१२) पुरातत्त्वविद्या (१३) भाषाशास्त्र (१४) भूगोल (१५) मानवशास्त्र (१६) मानसशास्त्र (१६) युद्धशास्त्र किंवा संरक्षण विद्या (१८) रंगभूमी (१९) राज्यशास्त्र (२०) लिपिप्रकार, (२१) विधि, (२२) वृत्तपत्रविद्या (२३) शिक्षणशास्त्र (२४) समाजशास्त्र (२५) साहित्यप्रकार व साहित्यसमीक्षा (२६) भारतीय भाषाव साहित्ये.**

विश्वकोशाची रचना मराठी वर्णानुसार अकारविल्हे केलेली आहे. पूरक संदर्भ तसेच संदर्भग्रंथ देऊन, प्रत्येक नोंद ही परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. विश्वकोशाचे संपादनकार्यालय हे चार प्रमुख शाखांत विभागलेले आहे. : विज्ञान व तंत्रविद्या, शाखा, मानव्यविद्या शाखा, कला शाखा आणि प्रशासन शाखा या त्या प्रमुख शाखा होत. यांतून जवळजवळ चाळीस संपादकीय कार्यकर्ते काम करतात. ज्ञानविज्ञानाच्या सर्वच शाखांतील तज्ज्ञ कायम संपादकवर्गावर नेमणे शक्य नसल्यामुळे वा उपलब्ध असणे शक्य नसल्यामुळे काही शाखांतील तज्ज्ञ त्यांच्या सवडीनुसार विश्वकोश कार्यालयांत अभ्यागत संपादक म्हणून काम करतात. त्यांच्या मदतीने लेखनकार्याबरोबरच विविध लेखांतील त्रुटी वा उणिवा काढून टाकणे शक्य होते. याखेरीज कोशाचे ग्रंथालय अद्ययावत असून त्यात तीस हजारांहून अधिक संदर्भग्रंथ आहेत.

विश्वकोश मुद्रणाची आपल्याकडे प्रथा नाही. त्यासाठी विशेष व्यवस्था करावी लागते. ती करण्यास काही कालावधी लागला. मौज मुद्रणालयाचे व्यवस्थापक कै. विष्णुपंत भागवत यांनी विशेष दक्षता घेऊन विश्वकोश मुद्रणाचे तंत्र निर्माण केले. त्याप्रमाणे प्रथम खंड छापला. तथापि कोशाचे मुद्रण हे गुंतागुंतीचे असल्याने मुद्रक आणि संपादक यांचा सतत संपर्क राहणे अत्यावश्यक आहे. या दृष्टीने वाईतच खास कोशमुद्रणासाठी स्वतंत्र असे शासकीय मुद्रणालय स्थापन केलेले आहे. त्यानंतरच्या पुढील सहा खंडांची छपाईसुद्धा पहिल्या खंडांच्या मुद्रणपद्धतीनुसार करण्यात आली.

मराठी विश्वकोशाचे एक खास वैशिष्ट्य,म्हणजे त्यात नैसर्गिक विज्ञाने आणि तंत्रविद्या यांना मानव्यविद्यांच्या बरोबरीने स्थान दिलेले आहे. एकूण सतरा हजार पृष्ठांच्या लेखनामध्ये साडेआठ हजार पृष्ठे विज्ञान व तंत्र विषयांना व तेवढीच पृष्ठे मानव्य विषयांना विभागून दिलेली आहेत. सध्याच्या, विज्ञानयुगांत वैज्ञानिक ज्ञानाचा परिचय आज–उद्याच्या मराठी माणसाला करून देण्याचे एक कालोचित असे कार्य अशा विभागणीमुळे होईल. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे विदेशी विश्वकोशांमध्ये भारतीय भाषा, साहित्य, ,कला, लेखक, शास्त्रज्ञ, वैज्ञानिक प्रगती त्याचप्रमाणे इतर सांस्कृतिक अंगोपांगे इत्यादीसंबंधीची माहिती अल्पशी तसेच त्रोटक असते. मराठी विश्वकोशाद्वारे आधुनिक भारतीय भाषांतील लेखक तसेच कलावंत, शास्त्रज्ञ वैज्ञानिक प्रगती व इतर सांस्कृतिक विषय यांसंबंधी पुरेशी माहिती वाचकास मिळू शकेल, असा विश्वास वाटतो. म्हणून हा विश्वकोश मराठीत असला, तरी तो खऱ्या अर्थाने भारतीय विश्वकोशच आहे.

विश्वकोशासारखा प्रचंड ज्ञानप्रकल्प मजबूत आणि निर्दोष पायावर व कार्यपद्धतीवर उभा करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. हे कार्य अनेक तज्ज्ञांच्या सहकार्यानेच यशस्वी होऊ शकते. हे एक प्रकारचे सांघिक असे ज्ञानकार्य आहे. शिवाय प्रत्येक विषयाची जास्तीत जास्त निर्दोष व अद्ययावत माहिती देणे, तिचे स्वरूप जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ राखणे आणि योग्य ती परिभाषा वापरून ज्ञानजिज्ञासेला उत्तेजन देणे या गोष्टींचे भान लेखक–समीक्षकांत सतत जागृत ठेवणे, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. या प्रकल्पात सुमारे दोन हजारांहून अधिक विविध विषयांचे तज्ज्ञ सहभागी झाले आहेत. त्यांच्या व्यासंगाचा जास्तीत जास्त फायदा कोशकार्याला लाभावा असा प्रयत्न केला जातो. तज्ज्ञांच्या समित्यांनी जे पायाभूत काम केले ते महत्त्वाचे आहे. उदा., विश्वकोशात येणारे विषय व उपविषय निश्चित करणे, त्यांची पृष्ठसंख्या ठरविणे, या पृष्ठसंख्येत प्रत्येक विषयांतर्गत कोणकोणत्या लेखांचा समावेश होईल ते निश्चित करणे, त्यांची शब्दसंख्या निश्चित करणे, वैज्ञानिक–तांत्रिक व इतर विषयांतील परिभाषा निर्माण करणे इत्यादी पायाभूत कामे विद्वानांच्या समित्यांनी पार पाडली आहेत. नंतरचा टप्पा त्या त्या विषयांचे लेखन तज्ज्ञांकडे लेखनार्थ सोपविणे आणि अशा लेखनाचे दुसऱ्या तज्ज्ञांकडून समीक्षण करून घेणे, हे होय. यासाठी प्रत्येक लेखात कोणते मुद्दे यावेत व त्यांची मांडणी कशा प्रकारे असावी, त्याची शब्दसंख्या किती, त्यातील परिभाषा कशी असावी आणि अशा लेखांना पूरक ठरणारे विश्वकोशातील इतर लेख कोणते इत्यादी गोष्टींचा विचार करून लेखकांना तपशीलवार आराखडा सादर करणे, हे कार्यही पार पाडले जाते. अशा प्रकारे आलेले लेखन काटेकोरपणाने तपासून त्यातील स्थलनामे, व्यक्तिनामे, ग्रंथनामे इत्यादींत एकवाक्यता आहे किंवा नाही ते तपासून व पूरक संदर्भ, संदर्भग्रंथ या दृष्टीने त्याचे संस्करण करून ते लेखन मुद्रणार्थ तयार केले जाते.

विश्वकोशासारखे संदर्भग्रंथ हे केवळ सरळ मजकूर छापून

उपयुक्त ठरत नाहीत. त्यासाठी चित्रे, आकृत्या, तक्ते, सूत्रे, समीकरणे इत्यादी गोष्टींचीही गरज असते. अनेक लिप्यांची ओळख व उपयोजनहि करावे लागते. अक्षरवाटिका म्हटली, तरी तिचे लहानमोठे अनेक प्रकारचे टंक वापरावे लागतात.

वैज्ञानिक व तांत्रिक विषयांवरील लेखांत योग्य ती सूत्रे, आराखडे, संरचना, चित्रे इत्यादी गोष्टीं अंतर्भूत होतात. हा भाग अत्यंत जिकिराचा व गुंतागुंतीचा असतो. यासाठी विषय-संपादक, कलासंपादक आणि मुद्रक यांनी एकत्र येऊन प्रत्येक पानाची योग्य ती आखणी करणे आवश्यक असते. चित्रे व आकृत्या केवळ माहितीच्याच दृष्टीने नव्हे, तर सौंदर्यदृष्टीनेही प्रत्येक पृष्ठावर योग्य प्रकारे गोठवाव्या लागतात. विषयाचा मजकूर कितपत चित्रक्षम आहे व किती प्रमाणात त्याचे चित्रमय दर्शन घडवावे, हे काळजीपूर्वक लक्षात घ्यावे लागते. हे सर्व काम अत्यंत जिकिरीचे ठरते. याची कारणे अनेक आहेत : त्यांपैकी एक म्हणजे चित्राकृती छायाचित्रे इत्यादींची दुर्लभता. योग्य चित्रे वा छायाचित्रे मिळविणे, हे अत्यंत अवघड ठरते. यासाठी चित्रकारांचे, चित्रे व छायाचित्रे पुरविणाऱ्या संस्थांचे व व्यक्तींचे, मान्यवर कलासंग्रहालयांचे व कलासंस्थांचे सहकार्य मिळवावे लागते व त्याकरिता त्यांच्याशी अखंड संपर्क राखावा लागतो. त्याचप्रमाणे त्या त्या विषयांच्या तज्ज्ञांचा चित्रकृति-विषयक अभिप्राय समजून घ्यावा लागतो. राजकीय व प्राकृतिक नकाशांचे निर्मिति कार्यही फार मोठया काटेकोरपणाने व दक्षतेने करून घ्यावे लागते. विश्वकोशाच्या एकूण अंतरंगाशी ही कलात्मक बाजू नीटपणे जुळवून घ्यावी लागते; कारण मज-कुराच्या संपादनाइतकीच त्याच्या प्रत्यक्ष मुद्रितरूपाची गुण-वत्ता महत्त्वाची असते.

मराठी विश्वकोशाचे आणखी एक महत्त्वाचे अंग म्हणजे मराठी परिभाषानिर्मितीचे होय. सुमारे ४५ हजार इंग्रजी–मराठी व मराठी–इंग्रजी पारिभाषिक संज्ञांचा १८ वा खंड १९७३ मध्येच प्रसिद्ध करण्यात आला आहे. तथापि विश्व-कोशाचे सर्व संहिता–खंड (१ ते १७) प्रसिद्ध झाल्यानंतर ह्या परिभाषासंग्रहात भर पडून तो अधिक समावेशक केला जाईल. वैज्ञानिक, तांत्रिक, तात्त्विक इत्यादी अनेक विषयांच्या स्वच्छ विवेचनासाठी मराठी संज्ञा तयार करणे भागच आहे. रूढ परिभाषा विचारात घेऊन हे कार्य केले जाते. शिवाय आंतर-भारतीय पातळीवर रूढ झालेल्या संज्ञा, मराठीची प्रकृती, संज्ञेची व्यवच्छेदकता व सुबोधता यांचाही विवेक करून संज्ञा-निश्चिती केली जाते. हा एक मोठा सर्वविषयस्पर्शी असा प्रयोग आहे. अखेरपक्षी त्याचे यश हे संज्ञांच्या वापरावर अवलंबून राहणार व या संदर्भात कसलाही बंदिस्त व जाचक दृष्टिकोन बाळगण्यात अर्थ नाही.

या मराठी विश्वकोशाच्या वाचकाचे तीन वर्ग संभवतात : (१) उच्च शिक्षण घेणारा आज–उद्याचा विद्यार्थिवर्ग, (२) शिक्षित प्रौढ, (३) शिक्षक–अध्यापक व अभ्यासक. प्रत्येक महत्त्वाच्या विषयाची सर्वांगीण पण सारभूत माहिती या वाच-कांना लाभावी, असा व्यवस्थित प्रयत्न केला जात आहे. ब्रिटानिका-सारखा दर्जा अर्थातच त्याला लाभेल असा दावा नाही. कारण ब्रिटानिकाची परंपरा दोनशे वर्षांची आहे. शिवाय पश्चिमी ज्ञानक्षेत्राचा विकास फार मोठया प्रमाणात झालेला आहे. कोशासारख्या संदर्भग्रंथाची उपयुक्तता व गुणवत्ता तिकडे दीर्घ परंपरेने उच्च स्थानावर नेऊन ठेवली आहे.

मराठी प्रज्ञा व प्रतिभा यांचे, महाराष्ट्राच्या बौद्धिक संस्कृ-तीचे प्रतिबिंब मराठी विश्वकोशात उमटेल. इंग्रजीचे कवाड समाजाच्या दालनात दिवसेंदिवस बंद होत असताना मराठी विश्वकोश जागतिक ज्ञानक्षेत्रावर उघडणारी एक खिडकी ठरेल, यात मात्र शंका नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात व विशेषतः भाषिक राज्यांच्या निर्मितीनंतर आधुनिक भारतीय भाषांतील विश्वकोशनिर्मितीस विशेष वाव मिळाल्याचे दिसते. त्या त्या प्रांतांत शासनभाषा म्हणून प्रांतिक भाषांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले. माध्यमिक व उच्च शिक्षणांत शिक्षणाचे माध्यम म्हणूनही प्रांतिक भाषांना मान्यता देण्यात आली. जनतेच्या भाषांचे एकूण कार्य-क्षेत्रच या कारणांनी विस्तृत झाले. त्यामुळे त्या त्या भाषेत आधुनिक ज्ञानविज्ञाने आणण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. भाषिक प्रगतीशिवाय सामाजिक प्रगती होणे कठीण आहे. त्याचप्रमाणे सामाजिक न्याय, आर्थिक समता, गरिबीचे उच्चाटन, दुर्बल सामाजिक घटकांचा विकास या नव्या राष्ट्रीय ध्येयांच्या प्राप्तीसाठी समाजातल्या प्रत्येक व्यक्तीला आणि वर्गाला आधुनिक ज्ञानविज्ञानांची द्वारे खुली करणे, हे एक राष्ट्रीय कर्तव्य ठरते आणि ज्ञानविज्ञाने समजावून घेण्या-साठी जनतेच्या भाषेसारखा दुसरा राजमार्ग नाही. इंग्रजी भाषेच अधिकार मान्य करूनहि सुलभ, सुबोध असे ज्ञानसंक्रमण करण्याचे जनतेच्या भाषेचे जे अंगभूत सामर्थ्य असते, ते या परकीय, म्हणजे जी भाषा जनतेची नाही, त्या भाषेतून साधणे कठीण आहे. म्हणूनच १९६० नंतर अनेक भारतीय भाषांत विश्वकोशासारखे प्रकल्प त्या त्या राज्यसरकारांच्या विद्यमाने सुरू झाल्याचे दिसते. महाराष्ट्र राज्य या बाबतीत अग्रेसर आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री माननीय श्री. यशवंत-राव चव्हाण यांनी शासनाचे मूलभूत धोरण सूचित करणारी काही सूत्रे सांगितली व त्या सूत्रांनुसार साहित्य संस्कृति मंड-ळाची स्थापना झाली. या मंडळाचा एक मुख्य प्रकल्प म्हणजे मराठी विश्वकोश होय. वर नमूद केलेल्या पार्श्वभूमीवर मराठी विश्वकोश तयार होत आहे आणि तो आपले अवतार-कार्य यशस्वीपणे पार पाडत आहे; कारण त्यामागील सांस्कृतिक भूमिकेची निश्चित जाणीव कोशाचे लेखक–संपादक आणि नेते यांना आहे. ■

# ग्रामीण कर्ज

## लहान शेतकऱ्यांच्या कर्ज थकबाकीची समस्या

श्री. प्रतापराव शिंदे, एम्. कॉम.

**कोल्हापूरचे 'रयत' नावाच्या निर्भीड, लोकाभिमुख व सत्यशोधक नियतकालिकाच्या संपादनकार्याच्या स्फूर्तीचा वारसा श्री. शिंदे ह्यांना त्यांच्या वडलांकडून प्राप्त झाला आहे. श्री. शिंदे ह्यांचा महाराष्ट्रातील सहकार चळवळीशी अतिशय निकटचा संबंध आहे. त्यांनी 'सहकार' ह्या विषयावर महाराष्ट्रातील अनेक तज्ञ व अधिकारी व्यक्तींचे लेख परिश्रमपूर्वक मिळवून एक बहुमोल संदर्भग्रंथ तयार केला आहे. संशोधन आणि विचारप्रवर्तन ह्या कार्याचा त्यांनी निदिध्यास घेतला आहे. ८ व्या बँक राष्ट्रीयीकरण दिनानिमित्त पुणे बँक ग्राहक संघाच्या विद्यमाने भरलेल्या चर्चाशिबिरांत प्रस्तुतचा निबंध त्यांनी सादर केला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कर्जविषयक समस्यांचे विदारक चित्रण त्यांत उपलब्ध झाले आहे.**

महाराष्ट्रातील जिल्हा सहकारी बँका या साखर वा कापूस बँका बनलेल्या आहेत. साहजिकच छोटया शेतकऱ्याकडे त्या जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असाव्यात असा (कदाचित् गैर) समज रिझर्व्ह बँकेचा झालेला असावा. कारण १९७१ च्या एप्रिल महिन्यात रिझर्व्ह बँकेने जिल्हा बँकांना एक परिपत्रक पाठविले. राज्य बँकेकडून उसनवारी केलेल्या रकमेपैकी २० टक्के रक्कम जिल्हा बँकांनी अल्पभूधारकांसाठी खर्च करावी आणि तशी ती केली तर हा फेरकर्जपुरवठा करण्यात येईल, अशी ती अट होती. परंतु तेवढीही रक्कम जिल्हा बँकांना काही वाटता आली नाही. शेवटी २० कलमी दट्टयामुळे उशिराने का होईना राज्य सरकारला जाग आली आणि यामागची कारणमीमांसा आपणच शोधून काढीत आहोत, या थाटात सरकारने या प्रश्नाला हात घातला. त्यासाठी प्रा. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारला एका समितीची प्रस्थापना करावी लागली.

**छोटया शेतकऱ्यासंबंधी काही भरीव अशी कामगिरी जिल्हा बँकांनी खरोखरीच पार पाडलेली आहे काय ? सहकारी पतपुरवठयात या मंडळींचा कितपत शिरकाव झालेला आहे ? उत्पादकी कामासाठी पुरेसा पैसा त्यांना उपलब्ध होतो काय ? होत असेल तर एकूण शेती पतपुरवठयात त्यांचा वाटा किती आहे ? किंवा असा पतपुरवठा करतांना जिल्हा बँकांना येणाऱ्या अडचणीमुळे ते अशक्य होते ? त्या अडचणी कोणत्या ? अशा कर्ज व्यवहारात बुडिताचा धोका या बँकांना वाटतो का ? त्यासाठी काही उपाययोजना सुचविता येतील काय ? रिझर्व्ह बँकेचा २० टक्क्याचा दंडक कितपत ग्राह्य आहे ? म्हणजे सहकारी पतपुरवठा, यामागील परंपरागत धोरण व कार्यवाही यामध्ये काही बदल करावे लागतील का ? ते कोणते असावेत ? त्याची अंमलबजावणी कशी करावयाची ? या साऱ्या प्रश्नांच अभ्यास मी या लेखात करणार आहे.**

### समासदत्व : कर्जव्याप्ति : कर्जउपलब्धता

### अल्पभूधारकांचा सहकारी क्षेत्रात असलेला सहभाग

छोटया शेतकऱ्यांची नेमकी व्याख्या करणे तसे सोपे नाही. तथापि जमीनधारणेचा ५ एकरी निकष लावून शेतकऱ्यांची दोन भागात विगतवारी केली तर काही निष्कर्ष काढणे शक्य आहे.

(३०–६–७४ रोजी : आकडे लाखात)

| | खातेदारांची संख्या | प्राथमिक सहकारी संस्थांचे सभासदत्व | | | सभासद नसलेल्यांची संख्या | एकूण खातेदारांत सभासदत्वाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जदार | बिगर कर्जदार | एकूण | | |
| अल्पभूधारक (५ एकरांखालील) | | | | | | |
| प. महाराष्ट्र (१२ जिल्हे) | १८.३७ | ४.४८ | २.५६ | ७.०४ | ११.३३ | ३५.६ |
| मराठवाडा (५ जिल्हे) | २.१८ | .५८ | .२९ | .८७ | १.३१ | ३८.८ |
| विदर्भ (८ जिल्हे) | ५.५८ | १.५७ | १.१५ | २.७२ | २.८६ | ४९.२ |
| बेरीज | २६.१३ | ६.६३ | ४.०० | १०.६३ | १५.५० | ४१.२ |
| २० कलमी दट्टयासाठी झालेली नोंदणी | | | | | | |
| ३०–६–७५ | – | – | – | – | – | ५१.६ |
| ३०–६–७६ | – | – | – | – | – | ६६.७ |
| प. महाराष्ट्र | १४.५२ | ४.११ | ५.५६ | ९.४७ | ५.०५ | ६६.६ |
| मराठवाडा | ७.१४ | .८७ | ३.७८ | ४.६५ | २.४९ | ७१.४ |
| विदर्भ | ८.५२ | १.८६ | ४.१२ | ५.९८ | २.५४ | ६६.६ |
| बेरीज | ३०.१८ | ६.८४ | १३.४६ | २०.१० | १०.०८ | ६८.२ |
| ३०–६–७५ | – | – | – | – | – | ७५.८ |
| ३०–६–७६ | – | – | – | – | – | ७६.६ |
| एकूण | ५६.३१ | १३.४७ | १७.४६ | ३०.७३ | २५.५८ | – |

(महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने संकलित केलेली आकडेवारी)

एकूण शेतकी खातेदारांपैकी (५६.३१ लाख) अल्पभूधारकांची संख्या (२६.१३ लाख) म्हणजे निम्म्याने आहे आणि त्यापैकी निम्मे खातेदार (२५.५८ लाख) अद्यापि सहकारी पतसंस्थांतून सहभागी झालेले नाहीत. अल्पभूधारकांपैकी ४१.२ टक्के सभासद (६.६३ लाख) सहकारी संस्थांतून मिळणाऱ्या पैशाचा लाभ उठवितात. मोठ्या शेतकऱ्यांपैकी (३०.१८ लाख) एकपंचमांश शेतकऱ्यांना (६.८४ लाख) सहकारी कर्जाची आवश्यकता भासते. म्हणजे ६० टक्के अल्पभूधारक व ३० टक्के बडे शेतकरी यांचा समावेश सहकारी संस्थांतून झालेला नाही. ही सारी मंडळी सहकारी संस्थांचे सभासद झाले तर त्यांना लागणारा पैसा कोठून आणावयाचा, कसा द्यावयाचा, परतफेड कशी करवून घ्यावयाची, त्यासाठी केवढी प्रचंड यंत्रणा उभी करावी लागेल या व अशा प्रश्नांना तोंड कसे द्यावयाचे हा पुढचा प्रश्न असला तरी, आहे तोच कर्ज व्यवहार सांभाळणे आज जिल्हा बँकांना अशक्य झालेले आहे. त्यांत पैशांची गरज नसणाऱ्या मंडळींना कर्जबाजारी करून सोडण्यामागे रिझर्व्ह बँकेचे कोणते प्रयोजन असावे हा खरोखरीच वादाचा मुद्दा म्हणावा लागेल. बड्या शेतकऱ्यांजवळ उत्पादकी खर्चासाठी पुरेसा पैसा आहे. सबब सहकारी पतपुरवठ्याची त्यांना गरज नाही अशी कल्पना केली तर सहकारातील त्यांच्या सभासदत्वाचा, त्यांच्या टक्केवारीचा फारसा विचार करण्याचे कारण नाही.

सहकारी संस्थांचे सभासदत्व न पत्करणारे (१५.५० लाख) व सभासदत्व घेऊनही कर्ज न घेणारे (४ लाख) असे एकूण १९.५० लाख अल्पभूधारक सहकारी कर्जव्यवहारांत आणावयाचे म्हटले, सरसरकट ३ एकर जमीन प्रत्येकाजवळ आहे अशी कल्पना केली आणि **कोरडवाहू शेतकऱ्याला साधारणपणे एकरी ३०० रुपये सहकारी क्षेत्रात उपलब्ध होतात असे गृहीत धरून आकडेमोड केली असती तर १९७३–७४ साली १७५.५० कोटी रुपये त्यांच्यासाठी उपलब्ध करावे लागले असते.** त्या वर्षी

पीक कर्जासाठी जिल्हा बँकांनी केलेल्या प्रत्यक्ष पतपुरवठ्यात (रु. १२५.७२ कोटी). अल्पभूधारकांसाठी अवघे रु. ८.७६ कोटी उपलब्ध केले होते. १९७४–७५ साली रिझर्व्ह बँकेच्या दट्ट्यामुळे त्यात भर पडून ती रक्कम २७.३२ कोटीपर्यंत गेली आणि सभासदसंख्येत १.७१ लाखाने वाढ झाली. २० कलमाखाली सहकारी संस्थांतून छोट्या शेतकऱ्यांना सभासद करून घेण्यासाठी राज्य पातळीवर जो हाका चालू झाला होता त्यामुळे मार्च १९७६ अखेरी त्यात ४.५७ लाखाची भर पडून एकूण १६.६० लाख अल्पभूधारक सहकारी संस्थांतून सहभागी झाले. त्यांच्या पीक कर्जासाठी १९७६ जूनअखेरी ३५.४२ कोटी वाटण्यांत आले. सहकारी सभासदत्व पत्करण्यास ते विविध कारणामुळे अपात्र आहेत. (सरकारी अंदाजाप्रमाणे) ५.२७ लाख अल्पभूधारकांची संख्या सोडून दिली तरी ४.२९ लाख मंडळी अद्यापि सहकारी क्षेत्रात यावयाची आहेत. तेव्हा साऱ्यांचा समावेश सहकारी पतपुरवठ्यांत करावयाचा हा अट्टाहास सहकारी तत्त्वप्रणालीत कितपत बसतो हा खरा मुद्दा आहे.

सारीच छोटी मंडळी सहकारी पतपुरवठ्यात आली अशी कल्पना केली तर त्यांच्यासाठी २०० कोटीची रक्कम उभी करावी लागेल. कापूस एकाधिकाराखाली महाराष्ट्र सरकारला पैसा उपलब्ध केल्यास चलनवाढ होते असे म्हणणारी रिझर्व्ह बँक २०० कोटीसाठी फेरकर्ज उपलब्ध करण्यास तयार होईल असे मला तरी वाटत नाही. कारण ही सारी रक्कम थकबाकीत जाणार आहे. मग रिझर्व्ह बँकेचा २० टक्क्यासाठी एवढा आग्रह कशासाठी आहे? वाते समितीची ४५० कोटीची क्रेडिट गॅप भरून काढण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांनी शेतीपतपुरवठा करावा असे रिझर्व्ह बँकेला प्रकर्षाने वाटू लागले. वास्तविक शेती कर्जव्यवहारात राष्ट्रीयीकृत बँकांनी पैसा गुंतवावा अशी आज परिस्थिती नाही. कारण शिल्लक निधि कुठे गुंतवावेत ही समस्या आज राज्य बँकेपुढे उभी आहे. जिल्हा बँकांच्या कर्जव्यवहारांत उसासाठी दिलेल्या कर्जाचे प्रमाण जास्त आहे अथवा जिल्हा बँका ऊस उत्पादकांचेच हितसंबंध जोपासतात आणि त्यामुळे कोरडवाहू शेतकरी पतपुरवठ्यापासून वंचित राहतो असा दोषारोप रिझर्व्ह बँक करीत असेल तर ते चुकीचे ठरेल. खरे म्हणजे जिल्हा बँकांची कर्जपात्रता कशी वाढेल, त्यांना पतहमी कशी देता येईल याचा रिझर्व्ह बँकेने विचार करावयाला हवा. राज्य बँकेकडून उसनवारी करण्याइतपत लागणारी जिल्हा बँकांची पात्रता कर्ज दिवसेंदिवस कमी होऊ लागली आहे. थकबाकीमुळे शेतकरी कर्जपात्र राहात नाही. शेवटी जिल्हा बँका आवश्यक तेवढी राज्य बँकेकडून उसनवारी करू शकत नाहीत. परिणामी राज्य बँकेला आपले निधी साखर कारखानदारीत गुंतविण्याशिवाय दुसरा पर्याय राहात नाही. खरा प्रश्न छोट्या शेतकऱ्यांची कर्जपात्रता कशी वाढेल हा आहे.

## लहान–मोठे सारेच शेतकरी सहकारी पतपुरवठ्यात आले तर –

महाराष्ट्रातील लहानमोठ्या सर्व शेतकऱ्यांचा समावेश सहकारी पतपुरवठ्यातून करण्यांत आला. लागवडीखालील एकूण एक क्षेत्रासाठी त्यांनी कर्जमागणी केली आणि विविध पिकासाठी १९७६ साली जिल्हा बँकांनी मंजूर केलेले कर्ज प्रमाण लक्षांत घेऊन आकडेमोड केली तर ७३६ कोटीची तरतूद जिल्हा बँकांना करावी लागेल. महाराष्ट्र आर्थिक समालोचन १९७६–७७ या आकडेवारीत भारतीय अहवालामध्ये १९७६ साली २३४२ रुपये किंमतीच्या शेतीमालाचे उत्पादन झाले असे नमूद केलेले आहे. पीककर्जासाठी हंगामी पतपुरवठा ४० टक्के करावा असा रिझर्व्ह बँकेचा दंडक आहे. ही अट पुरी करावयाची झाल्यास त्यासाठी ९३६.८ कोटी रुपये सहकारी क्षेत्रात उपलब्ध करावे लागतील. कर्जमंजुरीचे प्रमाण एकरी ४० टक्केऐवजी ३३ टक्के असल्यामुळे ती रक्कम ७३६ कोटीवर येते. परंतु प्रत्यक्षांत त्या रु. १७० कोटीच उपलब्ध करू शकतात. म्हणजे सहकारी क्षेत्रात एकरी पीककर्जाची उपलब्धता अवघी ७ टक्के होते असे दिसते.

(तक्ता क्र. २ पुढील पानावर)

बड्या शेतकऱ्यांपेक्षा छोट्या शेतकऱ्यांची एकरी कर्जपात्रता (रु. २३३) त्या मानाने मोठी आहे. छोट्या शेतकऱ्यांकडे बागायती क्षेत्र (१० टक्के) मोठ्या प्रमाणात असल्यामुळे पैशाची पिके ते घेत असावेत. सहकारी पतपुरवठ्यात पैशाची पिके घेणाऱ्या शेतकऱ्याची कर्जपात्रता मोठी असते. म्हणून त्याची कर्जपात्रता मोठी असणे शक्य आहे, मध्यम व बड्या शेतकऱ्याची कर्जमागणी फारशी मोठी असण्याचे कारण नाही. एक तर उत्पादकी खर्च करण्याची त्याची ऐपत असावी आणि म्हणून कर्जपात्रता असूनही त्यांच्याकडून कर्जमागणी होत नसावी. अथवा जिल्हा बँकांच्या पीककर्ज पद्धतीनुसार कोरडवाहू शेतीमुळे त्यांची कर्जपात्रता कमी असावी. शेतकरी, मग तो छोटा वा मोठा असो दर पिकागणिक एकरी कर्जप्रमाण सारखे असल्याने सर्वांना क्षेत्रानुसार कर्जपुरवठा होत असतो. विविध पिकाखालील जमीनधारणा व कर्जाचे एकरी प्रमाण यांच्या गुणाकाराइतक्या कर्जमागणीला कर्जदार सभासद पात्र होत असतो. छोट्या शेतकऱ्यांकडे १० टक्के जमीन असेल (४५१.८१

| | लागवडीखालील एकूण जमीन | | | पीककर्ज पद्धतीनुसार सर्व शेतकऱ्यांनी कर्जमागणी केल्यास | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण क्षेत्र (एकर लाखात) | त्यापैकी बागायती | बागायती टक्केवारी | कर्जपात्र रक्कम (कोटी रुपयात) | एकरी कर्जपात्रता | टक्केवारी |
| **अल्पभूधारक** | | | | | | |
| २।। एकराखालील | १२.७५ | १.७६ | १३.८ | २९.६० | २३२ | ४.०२ |
| २।। ते ५ एकराखालील | २८.३० | ३.०२ | १०.७ | ५७.४७ | २०३ | ७.८० |
| बेरीज | ४१.०५ | ४.७८ | १०.१ | ८७.०७ | – | ११.८२ |
| **बडे शेतकरी** | | | | | | |
| ५ ते १० एकराखालील | ६८.४४ | ५.८४ | ८.५ | १२२.२५ | १७८ | १६.६१ |
| १० चे पुढे | ३४२.३५ | २५.१५ | ७.४ | ५२६.७५ | १५४ | ७१.५७ |
| एकूण | ४१०.७९ | ३०.९९ | ७.५ | ६४९.०० | – | ८८.१८ |
| एकूण | ४५१.८४ | ३५.७७ | – | ७३६.०७ | – | १००.०० |

संदर्भ :—१. महाराष्ट्र शेतीगणना अहवाल १९७०–७१

२. जिल्हा बँकांनी, १९७५–७६ या सालासाठी, मंजूर केलेली एकरी कर्जपात्रता लक्षात घेऊन एकूण कर्ज-उपलब्धता किती करावी लागेल हे काढण्यासाठी केलेला आकडेमोड.

लाखपैकी ४१.०५ लाख एकर) तर त्यांचा पतपुरवठ्यातील वाटा ११.८२ असणे शक्य आहे. छोट्या व मोठ्या शेतकऱ्यांकडील बागायती क्षेत्राचे प्रमाण १० पासून ७ टक्क्यांपर्यंत असल्यामुळे त्यांच्या भूधारणेत बागायतीचे प्रमाण सारखे आहे असे आपण समजू. **एखाद्या जिल्ह्यात लागवडीखाली असलेल्या जमिनीपैकी १० टक्के जमीन छोट्या शेतकऱ्यांची असेल तर त्या जिल्ह्यातील सहकारी बँकेच्या पीककर्जांत त्याच्या वाट्याला १० टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम येणार नाही.** जिल्हा बँकांनी ठरविलेल्या एकरी कर्जमर्यादा व त्याची जमीनधारणा यांच्या गुणाकारामुळे त्यांच्यावर अन्याय होण्याचे कारण नाही. तथापि उत्पादकी खर्चाची रक्कम छोट्यांना पुरेशी व बड्यांना अपुरी मंजूर करण्याची प्रथा जिल्हा बँकांनी पत्करली तर मात्र पतपुरवठ्याचे जमीनधारणेशी गुणोत्तर राहाणार नाही. कदाचित हीच युक्ति जिल्हा बँकांनी वापरल्यामुळे रिझर्व्ह बँकेने २० टक्क्याची सांगड नव्याने दिलेल्या कर्ज रकमेशी घातली असावी. महाराष्ट्रात ७ टक्के जमीन बागाईत व बाकीची कोरडवाहू आहे. सहकारी बँकांचे कर्ज घेणाऱ्या बहुतेक अल्पभूधारकांच्या जमिनी बागायती असल्यामुळे त्यांची कर्जपात्रता त्या प्रमाणात मोठी असणे वाजवी आहे. परंतु नव्याने सभासद होणाऱ्या साऱ्याच अल्पभूधारकांच्या जमिनी कोरडवाहू असल्यामुळे त्यांची कर्जपात्रता जमीनधारणेच्या गुणोत्तरामुळे कमी होत जाणार हे उघड आहे. त्यावेळी रिझर्व्ह बँकेचा २० टक्केचा दंडक अर्थहीन झालेला दिसेल. तथापि अल्पभूधारकांच्या कर्जपात्रते-संबंधी जिल्हा बँकांनी अधिक चिकित्सा व दक्षता दाखवावी-त्यांची परतफेडक्षमता लक्षांत घेऊन त्यांचा कर्जव्यवहार अधिक नियमित, नियंत्रित व काळजीपूर्वक करावा.

## सहकारी पतपुरवठ्यात अल्पभूधारकांचा वाटा कमी आहे :

सभासद शेतकऱ्याची कर्जपात्रता ही त्याच्या एकरी पीक प्रकारावर अवलंबून असते. तो जे पीक घेईल त्यासाठी येणाऱ्या उत्पादकी खर्चाच्या प्रमाणात त्याला कर्जपुरवठा होतो. म्हणजे त्या जमीनधारणेबरोबर किती जमीन लागवडीखाली आहे, त्या वर्षी तो कोणते पीक घेणार आहे हे पाहिले जाते. त्यासाठी निरनिराळ्या जमिनीची उत्पादनक्षमता फारशी विचारात घेण्याची प्रथा नाही. काही असले तरी घेतलेल्या पिकापासून दरएकरी उत्पन्न काय येईल हे बरबर का होईना, पाहून सभासदांना उत्पादकी पतपुरवठा जिल्हा बँका करतात ही वस्तु-

स्थिती आहे. जमीनधारणा व उत्पादकी खर्च लक्षांत घेऊन शेतकऱ्यांची कर्जपात्रता ठरविण्याचा हा नेहमीचा सोपा मार्ग आहे. **कर्जपात्रतेच्या निकषावर उपलब्ध होऊ शकणाऱ्या कर्जाऊ रकमेला जमीनधारणने भागून छोट्यांना भरपूर व बड्यांना कमी मिळतात असे आकडेमोडीने दांडेकर समितीने सिद्ध केले.** तरी सहकारी पतपुरवठ्यात अल्पभूधारकांचा वाटा भरपूर मिळू शकतो असे म्हणणे चुकीचे आहे. छोट्या शेतकऱ्याकडील भूक्षेत्रापैकी १० टक्के जमीन बागाईत असल्यामुळे छोट्यांची कर्जपात्रता तशी जास्तच असणार. तसेच ९० टक्के जमीन बड्यांकडे असल्यामुळे बड्यांची एकरी कर्जपात्रता सरासरीने केव्हाही कमीच भरणार आणि म्हणून प्रत्यक्ष सहकारी पतपुरवठ्यात सहभागी झालेल्या सभासदांची जमीनधारणा, जिल्हा बँकांची कर्जमर्यादा यांच्या गुणोत्तरात फारसा फरक पडण्याची शक्यता नसल्यामुळे एकरी कर्जउपलब्धता त्याच प्रमाणात होऊ शकते हे पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

जिल्हा बँकांनी केलेल्या प्रत्यक्ष कर्जपुरवठ्यात अल्पभूधारकांना २२ टक्के रक्कम उपलब्ध होत असली तरी छोट्या-मोठ्यांच्या जमीनधारणेत व कर्जपात्र रकमेच्या उपलब्धतेत फारसा फरक पडत नाही हे आपल्या लक्षात येते. त्याचे गुणोत्तर सारखेच राहाते. तथापि एकूण कर्जपुरवठ्यात अल्पभूधारकांचा हिस्सा शोधण्याचा हा मार्ग समाजवादी नाही. त्यासाठी अल्पभूधारकाला दरडोई किती रक्कम सहकारी क्षेत्रात उपलब्ध होते हे पाहाणे महत्त्वाचे ठरेल.

(तक्ता क्र. ४ खाली पहा)

१९७१–७४ या तीन वर्षात ६.६३ लाख सभासद अल्पभूधारकांना जिल्हा बँकांनी ६६.९३ कोटीचे कर्जवाटप केले. **म्हणजे प्रत्येकाच्या वाटणीला १००९ रुपये आणि तेवढीच संख्या असलेल्या बड्या शेतकऱ्यांना २३१ कोटी रुपयांचे वाटप झाल्यामुळे प्रत्येकाच्या वाटणीला ३३८१ रुपये आले.** विषमतेचे

| | कर्ज उचल करणाऱ्या सभासदांची जमीन | १९७१–७४ या तीन वर्षांमध्ये जिल्हा बँकांनी प्रत्यक्ष केलेला कर्जपुरवठा | | |
|---|---|---|---|---|
| | (लाख एकरात) | कोटी रुपयात | एक कर्ज उपलब्ध रुपये | एकूण कर्जपुरवठ्यातील वाटा टक्के |
| अल्पभूधारक २॥ एकराखालील | १४.४३ | २२.७८ | १८० | ७.६४ |
| २॥ ते ५ एकराखालील | ३२.१० | ४४.१५ | १५६ | १४.८३ |
| बेरीज | ४६.५३ | ६६.९३ | – | २२.४४ |
| बडे शेतकरी ५ ते १० एकराखालील | ७८.२६ | ६३.०६ | ९२ | २१.१७ |
| १० चे पुढे | ४०४.६७ | १६८.२४ | ४९ | ५६.३६ |
| बेरीज | ४८२.९३ | २३१.३० | – | ७७.५५ |
| एकूण | ५२९.४६ | २९८.२३ | – | १००.०० |

(संदर्भ – महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने संकलित केलेली माहिती)

| | कर्जदार सभासद (लाखात) | तीन वर्षातील प्रत्यक्ष कर्जउचल (कोटी रुपये) | दरडोई कर्ज उपलब्ध रुपये | दरडोई वार्षिक कर्ज उपलब्ध रुपये | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| अल्पभूधारक ५ एकराखालील | ६.६३ | ६६.९३ | १००९ | ३३६ | २९ |
| बडे शेतकरी ५ एकरावरील | ६.८४ | २३१.३० | ३३८१ | १४६० | ७१ |
| एकूण | १३.४७ | २९८.२३ | – | – | १०० |

दरडोई प्रमाण २९ : ७१ असे आहे. ही विषमता नाहीशी करण्यासाठी छोटया शेतकऱ्यांचा समावेश सहकारी पतपुरवठ्यातून मोठ्या प्रमाणात केला तर दरडोई प्रमाण कमी होऊन विषमता वाढण्यापलीकडे फारसे काही घडणार नाही. लागवडीखालील जमिनीपैकी १० टक्के जमीन छोटया शेतकऱ्यांकडे असल्यामुळे सहकारी पतपुरवठ्यातील त्यांच्या वाटणीत फारसा फरक पडणार नाही. त्यासाठी बडया शेतकऱ्यांची जमीनधारणा कमी करून अल्पभूधारकांना पुरेसा भूधारक बनविण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

## कर्जवाटपातील विषमता दूर करण्यासाठी — पुरेशी जमीन द्यावी

**एकूण खातेदारांपैकी (५६.३१ लाख) अल्पभूधारकांची संख्या (२६.१३ लाख म्हणजे) ४७ टक्के आहे. एकूण जमिनीपैकी (४५१.१३ लाख एकर) ९ टक्के जमीन (४१.०५ लाख एकर) त्यांच्याकडे असून त्यापैकी एकदशांश जमीन (४.७८ लाख एकर) बागायतीखाली आहे.** सहकारी पतपुरवठ्यात अल्पभूधारकांना एकदशांश रक्कम मिळते आणि तेवढीच जमीन त्यांच्याकडे आहे. म्हणून बडया शेतकऱ्यांची जमीनधारणा कमी करून अल्पभूधारकांना पुरेशी जमीन दिल्यास कर्जवाटपातील हा प्रश्न सामाजिक न्यायावर आपणाला सोडविता येईल. अल्पभूधारकांना सरासरी दरवर्षी दरडोई ३३६ रुपये मिळत असतील आणि बडयांना तिप्पट रक्कम उपलब्ध होत असेल तर तेवढीच कर्जपात्रता वाढविण्यासाठी त्याला कमीत कमी २५ एक जमीन असणे आवश्यक आहे. ७ माणसांच्या एका शेतकरी कुटुंबाला ८ एकर बागाईत वा १६ एकर विहिरीखालची अथवा ३० एकर कोरडवाहू एवढी जमीन आर्थिक दृष्ट्या पुरेशी आहे. कमाल जमीनधारणेखाली उपलब्ध होणारी जमीन ज्या त्या गावात अल्पभूधारकांना करण्यासाठी देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. ज्यांना नांगर कसा धरावयाचा याची माहिती नाही अशा हरिजन, गिरिजन व भूहीनांना जमिनी वाटण्याचा कार्यक्रम २० कलमाखाली झाला त्यात काहीच अर्थ नव्हता. राष्ट्रीय मालमत्तेचा हा दुरुपयोग आहे. ज्यांचा शेतकी हा पिढीजात उद्योग आहे अशांना पुरेशी जमीन सरकारने उपलब्ध करून दिली पाहिजे. अर्धा एकरी भूदानाने सवंग राजकीय लोकप्रियता जरूर मिळेल. परंतु त्यामधून राष्ट्राच्या आर्थिक उद्दिष्टांची दीर्घकालीन सोडवणूक करता येणार नाही.

## कर्जमागणी : कर्जमुक्ति
## कर्जमागणीनुसार शेतकऱ्यांची विगतवारी करावयाची म्हटली तर — उत्पादकी खर्चाचा विचार करावा लागेल

जमीनधारणेनुसार शेतकऱ्यांची विगतवारी केली तर अल्पभूधारकांची कर्जपुरवठ्यातील हिस्सेदारी स्पष्टपणे प्रस्थापित करणे शक्य होत नाही. एक हजाराची मागणी करणारा छोटा व त्यानंतर हजाराच्या पटीत शेतकऱ्यांचे वर्ग करावेत असा त्यातून एक मार्ग दांडेकर समितीने काढला आहे. एक एकरही बागायत असेल तर छोटया शेतकऱ्यांची कर्जमागणी २ हजाराखाली असणार नाही. साहजिकच कर्जमागणीनुसार केलेल्या विगतवारीमुळे बागायती व कोरडवाहू असे दोन भाग पडतील व उत्पादकी खर्चात वाढ होत असल्यामुळे तो निकष बदलत्या स्वरूपाचा ठेवावा लागेल. उत्पादकी खर्च, औद्योगिक माल यामध्ये नेहमीच वाढ होत असते आणि शेतीमालाच्या बाजारभावाची शाश्वती नसते. परिणामी कर्जमागणीत घट न होता ती वाढत्या रकमेत दिसू लागणार. जमीनधारणा अथवा कर्जमागणी यांचा कर्जपात्रतेशी समन्वय साधताना त्याच्या उपादकी खर्चाचाही विचार करणे तितकेच महत्त्वाचे आहे. खते, पाणी, कीटकनाशके यांच्या किंमती रास्त असतील आणि शेतीमालाचे बाजारभाव किफायतशीर असतील तर शेतकरी कर्जफेड करून काही तरी बचत करू शकेल व त्या बचतींचा विनियोग पुढील हंगामात त्याला उत्पादकी खर्चासाठी करता आला तर त्याची कर्जमागणी वाजवी असण्याची शक्यता असेल. परंतु हे सारे स्वप्नरंजन आहे. व्यावहारिक जगात या गोष्टी घडण्याची शक्यता नाही. म्हणून शेतकऱ्याच्या कर्जमागणीत नेहमीच वाढ होत राहाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## सभासदत्वात किती वाढ झाली हा महत्त्वाचा प्रश्न नाही

जमीनधारणा अथवा कर्जमागणी यानुसार शेतकऱ्यांची विगतवारी केली तरी सहकारी पतपुरवठा अथवा त्यांच्या वाटणीत अनपेक्षित वाढ वा घट तशी दिसणार नाही. कारण शेतकरी, मग तो कोरडवाहू असो वा बागाईतदार असो, ज्वारीचे पीक घेणार असेल तर एकरी ३०० रुपये आणि ऊस घेणार असेल तर एकरी २००० रुपये त्याला जिल्हा बँकांतून उपलब्ध होतात. कोणत्याही पिकासाठी एकरी उत्पादकी खर्च संपूर्णपणे शेतकऱ्यांच्या पदरांत टाकण्याची प्रथा सहकारी कर्ज व्यवहारात मान्य झालेली नाही. आजकाल कोरडवाहू शेतकऱ्याला एकरी

१२०० च्या खाली उत्पादकी खर्च येत नाही. तेव्हा अल्पभूधारकांची नेमकी व्याख्या करणे, किती सहकारी पुरवठ्यातील त्यांची वाटणी शोधून काढणे व त्यांच्या सभासदत्वाची मोजणी करणे या गोष्टींना महत्त्व देण्याचे कारण नाही. रिझर्व्ह बँकेची अट तशी पाहिली तर राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आहे. जिल्हा बँकांनी अल्पभूधारकांसाठी काही तरी धडपड करावी एवढाच त्या अटीमागे हेतू आहे. सहकारी पतपुरवठ्यात अल्पभूधारकांना भरपूर पैसे कसे उपलब्ध होतात हे शोधण्याचा आणि २० टक्क्यांची पूर्तता करण्यासाठी ३१ डिसेंबर हीच तारीख कशी योग्य आहे हे सिद्ध करण्याचा खटाटोप दांडेकर समितीने का करावा हे गूढ आहे.

सहकारी बँका उत्पादकी कर्जपुरवठा किती करतात आणि कर्जबाजारीपणा किती वाढवितात हा प्रश्नच आहे. ज्या शेतीमालावर प्रक्रिया करावी लागते. उदा० ऊस, कापूस अशा पिकांची रोख वसुली होण्याची ठिकाणे प्रक्रिया कारखाने आहेत. अशा पिकासाठी जिल्हा बँकांनी दिलेले पीककर्ज उत्पादकी स्वरूपाचे असेल. शेतीमालाच्या विक्रीतून परतफेड सहजगत्या होऊ शकते. कोरडवाहू शेतकऱ्याची वरकड पिके असल्यामुळे त्याने शेतीमाल बाजारपेठातून विक्रीसाठी आणला तरी त्याच्या शेतीमालाच्या विक्रीतून परतफेड शक्य नसते. कधीकाळी दिलेल्या ५०० रुपयांवरील चक्रवाढ व्याजाने मुद्दलात भर पडत गेल्यामुळे आजघडीला ४००० रुपये बँकेला शेतकऱ्याचे देणे झाले असल्यास नवल नाही. कोरडवाहू शेतकऱ्यांच्या हाती प्रत्यक्ष किती रक्कम पडते हे त्यांना आणि कागदावर नवेजुने करून फक्त व्याजाची पठाणी वसुली करणाऱ्या जिल्हा बँकांनाच माहीत. बाकी छोट्या शेतकऱ्यांच्या मूळ व्याजाची रक्कम मुद्दलात जमा होते आहे आणि बँका व्याजावर जगताहेत अशी नाजूक परिस्थिति सध्या झालेली आहे असे म्हणतात. खासगी सावकारी व सहकारी सोपकारी यात थोडासा फरक आहे. **खाजगी सावकार व्याजाबरोबरच मुद्दलाचा काही भाग वसूल करण्याचा प्रयत्न करतात. सहकारी सावकारीत व्याजवसुलीवर कटाक्ष असतो. बँक नोकरांच्या पगाराचा प्रश्न त्या ठिकाणी असतो. कर्जदाराच्या मुद्दलांत व्याजाची भर पडत असते.** सहकारी बँकांचे सभासद किती वाढले यापेक्षा त्यांचा कर्जबाजारीपणा दूर कसा करता येईल याचा विचार झाला पाहिजे.

## ग्रामीण जनता सहकारी पतपुरवठ्यात आणली तरी ती कर्जमुक्त होईल असे नाही

महाराष्ट्रातील एकूण ग्रामीण कुटुंबांपैकी (५९.९४ लाख) लहान शेतकरी कुटुंबाचा (३२.३ लाख) कर्जबाजारीपणा पुढीलप्रमाणे आहे.

| ग्रामीण कर्जबाजारीपणा | कौटुंबिक संख्या (लाखात) | दरडोई कर्जबाजारीपणा रुपये | एकूण कर्जबाजारी रक्कम (कोटी रुपये) |
|---|---|---|---|
| अल्पभूधारक ५ एकराखालील छोटे शेतकरी | १८.३४ | ३२३.४६ | ५९.३२ |
| शेतमजूर | ११.९७ | ६८.३४ | ८.१७ |
| ग्रामीण कारागीर | १.७२ | १५१.९९ | २.६१ |
| बेरीज | ३२.०३ | २१८.८९ सरासरी | ७०.१० |

संदर्भ – " अखिल भारतीय कर्ज व गुंतवणूक पाहाणी १९७१ " रिझर्व्ह बँकेचा अहवाल

वरील माहितीवरून ग्रामीण कुटुंबियांचे एकूण कर्जबाजारी स्वरूप लक्षांत येते. हा कर्जबाजारीपणा नाहीसा करण्यासाठी सहकारी बँकांनी केलेला शेती पतपुरवठा व या दोन्हीमध्ये पडणारी तफावत यांचा तौलनिक अभ्यास केल्यास परिस्थितीवर बराच प्रकाश टाकता येतो.

| सहकारी थकबाकी | कर्जदार सभासद-संख्या (लाखात) | कर्जवाटप रुपये कोटींत | कर्जवाटप टक्के | येणे बाकी रुपये कोटींत | येणे बाकी टक्के | येणे बाकी सभासद-संख्या लाखात | दरडोई येणे बाकी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० जून १९७४ | | | | | | | |
| अल्पभूधारक | ६.६३ | २८.३८ | २२.५ | २०.७० | १५.९ | ७.०५ | २९४ |
| मोठी शेतकरी | ६.८४ | ९७.३५ | ७७.५ | १०९.०३ | ८४.१ | २२.४२ | ७०९ |
| बेरीज | १३.४७ | १२५.७३ | १००.० | १२९.७३ | १००.० | २९.४७ | ५७६ |
| २० कलमी दट्टयाखालील ३० जून १९७६ | | | | | | | |
| अल्पभूधारक सभासद : १६.३८ लाख | ७.३३ | ५५.४२ | २८.१ | ४७.५७ | १०.७ | १२.०६ | ३९४ |
| मोठे शेतकरी सभासद : २२.१५ लाख | ७.३८ | १३४.७४ | ७१.९ | १८१.९३ | ७९.३ | १२.१४ | १४९८ |
| ३८.५३ | | | | | | | |
| बेरीज | १४.७१ | १७०.१६ | १००.० | २२९.५० | १००.० | २४.२० | — |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य सहकारी खात्यातील आकडेशास्त्रीय विभागाची माहिती.

(१) येणे बाकीमध्ये थकबाकी व मध्यम मुदतीच्या कर्जाचा समावेश आहे.

(२) १९७५–७६ सालाची आकडेवारी केवळ माहितीसाठी. २० कलमी दट्टयाखाली महाराष्ट्र सरकारने केलेली प्रगती.

महाराष्ट्रातील छोटया ग्रामीण कुटुंबांपैकी (३२.०३ लाख) अवघी १०.६३ लाख कुटुंबे सहकारी संस्थांचे सभासद असून त्यापैकी ६.६३ लाख सभासद प्रत्यक्ष कर्जउचल करतात. या साऱ्या ग्रामीण कुटुंबाची कर्जदेणी रु. ७०.११ कोटींची असून त्यापैकी सहकारी पतपुरवठ्यातील येणेबाकी रु. २०.७० कोटीची आहे असे समजू. म्हणजे ५९.४१ कोटी रुपयांची पैशांची गरज ते खासगी सावकारांकडून भागवीत असावेत असे आपण मान्य करावयास हरकत नाही. या साऱ्यांची दरडोई कर्जबाजारी रक्कम रु. २१८ आहे. तेवढीच दरडोई रक्कम रु. २९८ सहकारी पतपुरवठ्यातून आहे. याचा अर्थ असा की; या साऱ्या मंडळींना सहकारी संस्थांचे सभासदत्व दिल्यास त्यांच्या आर्थिक गरजा सहकारी क्षेत्रात भागविता येणे शक्य आहे. परिणामी ३९.०३ लाख छोटया ग्रामीण कुटुंबाचा कर्जव्यवहार सावकाराच्या तावडीतून सोडवून तो सहकारी पतपुरवठ्यातून आणता येईल. परंतु त्यामुळे खासगी सावकारी जाऊन त्या ठिकाणी सहकारी सावकारी आपण प्रस्थापित केली एवढेच फार तर म्हणता येईल. केवळ ग्रामीण कुटुंबांचा कर्जव्यवहार सहकारी क्षेत्रात आणला म्हणून काही त्यांचा कर्जबाजारीपणा आपण नाहीसा करीत आहोत अशी समजूत करून घेणे ही शुद्ध आत्मवंचना ठरेल. ग्रामीण नियोजनबद्ध कार्यक्रम कार्यवाहीत आणावे लागतील. ते काम बँकांचे नसून त्यांचा आर्थिक विकास घडवून आणणाऱ्या एखाद्या महामंडळाचे आहे.

## कर्जपात्रता : उत्पादकी खर्च कर्जपात्रता नोंदणी कर्जपात्रता ठरविताना एकरी उत्पादकी खर्च लक्षात घ्यावा

छोटया शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र सरकार दरवर्षी गव्हासाठी मार्गदर्शक योजना राबविते. त्यासाठी रु. २८० रोख, रु. १५२.५२ संकरित बी (५० किलो), २५८ रुपयांचे मिश्र-खत, रु. ९२.५० युरिया आणि ७० रुपयांची औषधे असे एकूण ८५३ रुपये एकरी उत्पादकी खर्च प्रत्येक शेतकऱ्याला सहकारी क्षेत्रात उपलब्ध करण्यांत येतात. गहू पिकविताना जमिनीच्या नांगरटीपासून उत्पादनापर्यंत विचार केला तर नांगरट, कुळवाच्या पाळ्या, पहिल्या पिकाची धसकटे उचलणे, १५–२० गाड्या शेणखत, फवारणी पंपाचे

भाडे, पाणीपट्टी, मांगलण, १ ते २ महिन्याची राखण, कापणी, मळणी यासाठी शेतकऱ्याला दोन-तीनशेची पदरमोड करावी लागते. शिवाय त्याच्या कौटुंबिक मेहनतीचा हिशोब आपण कधीच लक्षांत घेत नाही. तरीसुद्धा साधारणपणे एकरी १२०० रुपये उत्पादकी खर्च त्याला येतो. गव्हाचे सरासरी उत्पादन एकरी १० क्विंटल धरले व बाजारभाव ११० रुपये क्विंटल धरला तर शेतकरी मोठ्या फायद्यात आहे असे आपणास म्हणता येत नाही. अर्थात् शेतीमालाला येणारा भाव, त्यातून त्याला करता येणारी परतफेड आणि कुटुंबपोषणासाठी लागणाऱ्या ग्राहकी मालाची खरेदी यांचा मेळ शेतकऱ्याला घालता येणे शक्य नाही. तो थकबाकीत जाणार. वर्षानुवर्षे तो कर्जबाजारी राहिला नाही तरच नवल. सहकारी क्षेत्रात कोरडवाहू शेतकऱ्याला देण्यात येणारा एकरी ३०० रुपये उत्पादकी खर्च म्हणजे त्याची चेष्टा करण्यापैकीच आहे. सहकारी बँकांनी उत्पादकी पतपुरवठा कसा करावा यासंबंधी रिझर्व्ह बँकेने काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केलेली आहेत. परंतु त्यानुसार महाराष्ट्रातील एकाही जिल्हा बँकेने शेतीपतपुरवठा केलेला नाही. उत्पादकी खर्चासाठी स्वतःचा पैसा गाठीशी नसल्यामुळे छोट्या शेतकऱ्यांच्या संपूर्ण गरजा भागविण्याचे उत्तरदायित्व जिल्हा बँकांनी पत्करले पाहिजे. परंतु पैशाची उपलब्धता म्हणा, बुडित कर्जाचा धोका म्हणा किंवा इतर काही कारणांमुळे म्हणा जिल्हा बँका छोट्या शेतकऱ्याला पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा करत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. ५ एकरी अल्पभूधारक सरासरी रु. ३३६ कर्ज-उचल करीत असला तरी त्याची विगतवारी बागायत व जिरायत अशी केली तर कोरडवाहू शेतकऱ्याची कर्जउचल सरासरी एकरी ५० रुपयांच्या आसपास येणे शक्य नाही. तेव्हा छोट्या शेतकऱ्याची उत्पादकी गरज जिल्हा बँकांनी संपूर्णपणे भागविली पाहिजे. जिल्हा बँकांनी यासंबंधी कर्जव्यवहार करताना काही अडचणी येते असल्यास त्यांचा गंभीर रीत्या अभ्यास करून त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## कर्जपात्रतेची नोंद खातेपुस्तिकातून करावी

दरेक खेड्यातील प्राथमिक सहकारी संस्थेने आपल्या कार्य-क्षेत्रातील शेतकऱ्यांची कर्जपात्रता यादी तयार करावी. सभासद होणारे, सभासदत्व पत्करूनही कर्ज न घेणारे तसेच कर्जदार सभासद या सर्वांनी कर्जपात्रता यादी दर तीन वर्षांतून एकदा तरी तयार करावी. ज्या शेतकऱ्यांची वस्ती त्या गावात नसेल अगर इतर काही कारणांमुळे त्यांचा सहकारी पतपुरवठ्यात समावेश करून घेता येण्यासारखा नसेल त्याच्या नावासमोर सभासद न होण्याची कारणमीमांसा स्पष्ट करावी. एकरी उत्पादकी खर्च व उत्पन्न लक्षांत घेऊन सभासद व सभासद न झालेल्या गावांतील प्रत्येक शेतकऱ्याची कर्जपात्रता हजार व हजाराच्या पटीत विभागल्यास त्यांची बेरीज ही त्या गावातील खातेदार शेतकऱ्यांची एकूण कर्जपात्रता असेल. सभासद व सभासद नसणाऱ्या शेतकऱ्यांच्या एकूण कर्जपात्र रकमेत पडणारी तफावत ही त्या गावातील कर्जपात्र मागणी म्हणून मान्य करावयाला हरकत नाही. तथापि कोणत्याही शेतकऱ्याची कर्जपात्रता ही त्याची जमीनधारणा, पीकप्रकार व उत्पादकी खर्च यांचा हिशोब करून पंचकमिटीने त्याची नोंद खातेपुस्तिकातून करावी. खातेपुस्तिकेचा वापर शेतकऱ्याच्या जमीनधारणेबरोबरच त्याची कर्जपात्रता, उत्पादकी खर्च, कर्ज-उचल, शेतीमालाचे उत्पादन, शिलकी शेतीमालाची विक्री, परतफेड यांची दर हंगामांत नोंद झाली पाहिजे. खातेपुस्तिकांतून शेतकऱ्यांच्या कर्जपात्रतेची होणारी नोंद आणि जिल्हा बँकांनी केलेले प्रत्यक्ष कर्जवाटप यांच्यात पडणारी तफावत हा निकष रिझर्व्ह बँकेने विचारांत घ्यावा असे मला वाटते.

## आर्थिक विकास : अर्थक्षमता : स्वतंत्र पत-विकास यंत्रणेची उभारणी अल्पभूधारकांचा प्रश्न हा कर्ज-पुरवठ्याचा नसून आर्थिक विकासाचा आहे

शेतकऱ्याच्या कुटुंबपोषणाइतकी पुरेशी जमीन त्याच्याकडे आहे की नाही, त्याच्या उत्पादकी खर्चाइतकी रक्कम त्याला सहकारी क्षेत्रांत उपलब्ध होते की नाही, दूधदुभते, कोंबडीपालन यासारख्या जोडधंद्यांतून त्याचे रोख उत्पन्न कसे वाढवावे, शेतीमालाचे भाव किफायतशीर मिळून त्याला थोडीफार बचत कशी करता येईल, त्यामधून त्याला परतफेड करता येईल का हे खरे महत्त्वाचे प्रश्न असून त्यांचा अभ्यास गंभीरपणाने करण्याची वेळ आलेली आहे. शेती कर्जाबरोबरच शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, खते, बी.-बियाणे, शेतीमालाची किफायतशीर विक्री याही बाबी पाहाणाऱ्या एखाद्या स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता आहे. छोट्या शेतकऱ्यांच्या कर्जव्यवहारावर देखरेख करण्यासाठी काही लॅटिन अमेरिकन देशात अशा प्रकारची मंडळे राबविली जात आहेत. १९६८ च्या अखिल भारतीय ग्रामीण पत पुनर्पाहाणी समितीच्या शिफारसीनुसार सरकारने SFDA, MFRALDA यासारख्या यंत्रणा उभ्या केल्या असल्या तरी त्यांची कार्यव्याप्ति अगदीच कमी आहे. शिवाय या यंत्रणा म्हणजे सरकारी नोकरांचा फावला उद्योग असल्यामुळे यांचे प्रयत्न प्रामाणिकपणे होत असावेत असे मी मानीत

नाही. या यंत्रणेचे स्वरूप स्वतंत्र नाही. त्याचे कामकाज सरकारी अखत्यारीत आहे आणि कर्जपुरवठा सहकारी क्षेत्रात केला जातो. त्यांचा समन्वय साधण्याचे कारण नाही. **नाशिक येथील काही आदिवासी सहकारी संस्थातील सभासदांना उत्पादकी ,खावटी पतपुरवठा करून कर्जाचा शेतीमालाच्या विक्रीशी कसा समन्वय घालता येईल याची पाहणी करण्याचा प्रयोग डॉ.. गाडगीळ यांनी राज्य बँकेच्या अध्यक्ष या नात्याने केला. सलग ५ वर्षातील तोटयाचे प्रमाण कमी कमी होत गेले तरी हे काम सहकारी बँकांचे नाही अशी स्पष्ट कबुली अखेरी त्यांना द्यावी लागली.**

## अर्थक्षमता वाढविण्यासाठी — स्वतंत्र शेतीपत व विकास महामंडळाची स्थापना करावी

**( Ag. Credit & Development Corporation )**

शेतीविकासाचे कार्यक्रम व साहाय्यकारी अनेक योजना सरकारने कार्यवाहीत आणल्या. परंतु त्याचा लाभ मोठया शेतकऱ्यांनी उठविला. लहान शेतकऱ्यांच्या जमिनीतून पुरेपूर उत्पादन कसे काढता येईल, त्याला जोडधंदे कसे उपलब्ध करून देता येईल, त्याला पुरेशी जमीन कशी उपलब्ध करून देता येईल याचा विचार या कार्यक्रमातून झालेला नव्हता. परिणामी अर्थक्षम शेतकऱ्यांचा विकास साधण्यासाठी SFDA, MFDA, ALDA यासारख्या यंत्रणांची कार्यवाही मोठी यशस्वी व व्यापक प्रमाणात झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

अर्थक्षम नसलेले शेतकरी व शेतमजूर ज्यांचे मजुरी हेच उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे अशांच्या जमिनी इतक्या तोकडया आहेत की, त्यांच्यासाठी खास काम करणाऱ्या विकास यंत्रणा त्यांना अर्थक्षम करू शकतील असे वाटत नाही. अशा मंडळींना त्याच परिसरात वर्षभर मजुरी कशी मिळेल याचा विचार झाला पाहिजे. त्यातून त्यांच्या जमिनीतील उत्पादित शक्ति एकत्रित करण्यासाठी सहकारी शेतीचा विचार पुढे येतो. त्यामध्ये मुख्य अडचण जमिनीच्या एकत्रीकरणाची आहे. शेती विकास कार्यक्रम हा शेतकऱ्याच्या व्यवसायाशी निगडीत ठेवणे आवश्यक असते. म्हणून अर्थक्षम नसलेले शेतकरी व शेतमजूर यांचे प्रश्न सोडविण्याचे मार्ग भिन्न ठेवले पाहिजेत. त्यांच्यासाठी ग्रामीण रोजगारीचे कार्यक्रम आखले जात आहेत. परंतु हे कार्यक्रम उत्पादनाला पोषक, नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास घडवून आणणारे असावेत. श्रमशक्तीचा वापर शास्त्रीय पद्धतीने कसा करावा यासंबंधी संशोधन झाले पाहिजे. ग्रामीण कारागिरी हा वेगळया अर्थाने उत्पादक आहे. परंपरागत ग्रामोद्योगांचा तांत्रिक व उत्पादित मालाची विक्री यासाठी काही कार्यक्रम आखावे लागतील. महाराष्ट्रात बलुतेदारासाठी तालुकावार स्वतंत्र सहकारी संस्था काढण्यात आल्या. कच्च्या मालासाठी कर्जे व हत्यारे त्यांना पुरविण्यात आली. तथापि त्यामागे त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी कोणतीही सुबद्ध यंत्रणा उभी न केल्यामुळे हा प्रयत्न फुकट गेलेला आहे. कारागिरांचा कर्जव्यवहार, त्यांच्या मालाची विक्री, तांत्रिक मार्गदर्शन या बाबींची संपूर्ण जबाबदारी वास्तविक महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळाने पत्करावयास हवी होती.

**लहान शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण कारागीर यांच्यासाठी आंखण्यांत येणारे विकास कार्यक्रम स्थानिक परिस्थितीशी जुळतील असे असावेत. या कार्यक्रमाचे उत्तरदायित्व जिल्ह्यापासून राज्य सरकारपर्यंत बांधण्यांत आले पाहिजे.** त्यामध्ये आर्थिक विकासापेक्षा सामाजिक न्यायाला प्राधान्य दिले पाहिजे. या मंडळींचा कर्जव्यवहार सहकारी वा राष्ट्रीयीकृत बँका यांच्याकडे सोपविण्यात अर्थ नाही. जे पतहीन आहेत, पुढेमागे अर्थक्षम होण्याची शक्यता नाही, ज्यांना दिलेली कर्जे १००

### अभिनंदन

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ यांना वॉशिंग्टन येथे सप्टेंबर २६ ते ३० या दिवसांत भरणाऱ्या जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या गव्हर्नर्सच्या संचालक मंडळाच्या बैठकीस बँकेचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण आले आहे. ही बैठक शेरेटन-पार्क हॉटेल, वॉशिंग्टन येथे भरणार असून सदर बैठकीस १३२ सभासद राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. बैठकीत गतवर्षीच्या कार्याचा आढावा घेतला जाईल. तसेच आंतरराष्ट्रीय आर्थिक विकासाच्या संदर्भात चर्चा, विचारविनिमय होईल. राज्य सहकारी बँकेला अशा स्वरूपाचे जागतिक बँकेचे आमंत्रण प्रथमच येत असून गेल्या ६६ वर्षात बँकेने केलेल्या सहकार सेवेची ही पावतीच मानावी लागेल.

तसेच महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊन संचालक मंडळावर सहकारी संस्थांतर्फे संचालक म्हणूनही डॉ. श्रीश्रीमाळ यांची निवड झाली.

टक्के बुडित जातील अशांचा कर्जव्यवहार सांभाळण्यात या बँका मोठी आत्मीयता साठवतील अशी कल्पना करण्यात अर्थ नाही. या मंडळींचा आर्थिक विकास या बँकांमार्फत होणार नाही. त्यासाठी पत व विकास महामंडळाची स्थापना करून त्यांचे कर्जव्यवहार व विकासाचे कार्यक्रम स्वतंत्ररीत्या सांभाळले पाहिजेत. अशा मंडळातून स्थानिक नेतृत्व पुढे येईल.

## आर्थिक संरक्षण : पीक-विमा : पतहमी
## पीक-विमा योजनेची कार्यवाही सोपी नाही

बी-बियाणे, खतपाणी, शेतीची मशागत व शेवटी निसर्गाची कृपा यांच्या समन्वयातून शेतीमालाचे उत्पादन होत असते. अपेक्षित उत्पादन झाले नाही तर पीकविम्यामुळे कोरडवाहू शेतकऱ्याचे संरक्षण करता येईल अशी अनेकांची समजूत आहे. पीकविम्यामुळे नुकसानभरपाईसाठी वैयक्तिक मोजणी कशी करावयाची, त्याला परवडेल इतका हप्ता कसा ठेवावयाचा आणि विमाशास्त्रानुसार या योजनेत सहभागी होणाऱ्याची प्रचंड संख्या किती असावी या तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. वैयक्तिक मोजणी करताना अपेक्षित उत्पादन किती व कोणी ठरवायचे, मळणीच्या प्रसंगी अधिकृत मोजणीदाराची उपस्थिती कशी व केव्हा ठेवायची, अपेक्षित उत्पादन न झाल्यास त्यामागची कारणे कोणी, कोणती, कशी ठरवावयाची या तीन बाबींना तोंड द्यावे लागेल, त्यातून मार्ग म्हणून ज्या त्या भागांतील पीक उत्पादनाचे सरकारी अंदाज ग्राह्य मानून हा प्रश्न आपणास सोडविता येईल. शेतकऱ्याला परवडेल इतक्या हप्त्यात किती नुकसानभरपाई देता येईल हे विमाशास्त्राप्रमाणे ठरविण्याचे काम विमा महामंडळाचे असेल. तथापि एवढा खटाटोप करण्यापेक्षा शेतकऱ्याने पेरलेल्या जमिनीच्या तुकड्यात जे उत्पादन तो काढणार आहे त्याची बाजारभावाने किंमत करून त्या रकमेचा तो विमा उतरू शकणार नाही का हा आणखी एक विचार पुढे येतो. प्रश्न असा आहे की, विम्याचा हप्ता भरावयाचा कोणी ? आणि कशातून ? हप्त्याची रक्कम वेळेवर भरण्याची मातब्बरी आमच्या शेतकऱ्याला कधीच वाटणार नाही हे उघडे गुपीत आहे. तेव्हा या मंडळींना हप्त्यासाठी जिल्हा बँकेतून नेमके पकडणे तसे सोपे आहे. अशा रीतीने पीकविमा योजनेची सांगड पीककर्जाशी घालण्याची युक्ति पुढे येते. एकरी उत्पादकी खर्च जेवढा येतो त्यापैकी ४० टक्के रक्कम मुळात जिल्हा बँका देतात, त्यापैकी भागभांडवलापायी १० टक्के जातात, त्यात आणखी विमाहप्ता काढून घेतल्यास शेतकऱ्याच्या पदरात काय पडणार हे पाहिले पाहिजे. मुख्य अडचण अशी की, या योजनेत किती शेतकरी सहभागी होतील ही. कारण शेतकऱ्यांची संख्या व त्यांचे क्षेत्र भरपूर असेल तर नुकसानभरपाईचे प्रसंग कमी येऊन विमा महामंडळ तोटचात जाणार नाही. सधन शेतकऱ्यांना सुरक्षित पाणीपुरवठ्यामुळे पीकविम्याची आवश्यकता भासणार नाही. परिणामी सर्व कोरडवाहू शेतकऱ्यांचा समावेश या योजनेत झाला आणि त्यांच्या पीकउत्पादनात नेहमीच घट येते तशी ती आली तर त्यांच्या नुकसानीची रक्कम देण्याची जिम्मेदारी उघडचा डोळघाने विमामंडळ घेईल असे मला तरी वाटत नाही. बरे, सहकारी पतपुरवठ्यातून त्यांचा सहभाग किती आहे, होऊ शकेल याचीही चर्चा आपण केली. प्रश्न असा आहे की, मोठे शेतकरी, अल्पभूधारक या सर्वांचा विमायोजनेत सहभाग झाला तरच विमाशास्त्राप्रमाणे ही योजना यशस्वी होण्याची शक्यता आहे. परंतु त्यासाठी सक्तीचा वापर करावयाचा म्हटले तर ती लोकशाही विचारप्रणालीत कितपत ग्राह्य ठरेल हेही लक्षात घेतले पाहिजे.

या देशात पीकविम्याचा विचार आपण गेली ३० वर्षे करीत आहोत. १९४७ साली डॉ. राजेंद्रप्रसाद शेतीमंत्री असताना संसदेत हा विषय प्रथम चर्चेला आला. त्यावेळी श्री. प्रियाळकर यांच्या एकसदस्य समितीने दोन प्रायोगिक योजना कार्यवाहीसाठी सर्व राज्यांना पाठविल्या. परंतु एकाही राज्याने त्यांची अमलबजावणी काही केली नाही. पुढे पंजाब सरकारने पुढाकार


थांबला तो संपला
चालणाऱ्याचे भाग्य उजळते
( चराति चरतो भगः )

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ नुसतीच चालत नाही. ती कालाबरोबर ( सतत ) पळते आहे. अल्प व अत्यल्प भूधारक, जंगल कामगार, भूमिहीन शेतमजूर, ग्रामीण कारागीर, आदिवासी, लघुद्योजक, फेरीवाले, निवृत्त सैनिक, हमाल, लेखक व प्रकाशक या साऱ्यांना तसेच कृषि-उद्योजकांना आपल्याबरोबर सतत पळायला लावणारी

भाग्यनिर्माती बँक

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लि.
( दि विदर्भ को-ऑप. बँक लि. सम्मीलित )
९ नगीनदास मास्तर रोड विस्तार, फोर्ट,
मुंबई ४०० ०२३

घेऊन एक योजना सरकारला पाठविली आणि आर्थिक मदतीसाठी मागणी केली. त्यावेळी कायदेशीर तरतूद करण्यासाठी १९६५ साली सरकारने एक ठराव व नमुना योजना प्रसृत केली. परंतु राज्यांची मतभिन्नता पाहून सरकारने १९७० साली डॉ. धरन नरेन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. **पीक विमा योजनेचा आर्थिक, कारभारी, हिशोबी, मांडवली या सर्वच दृष्टीने अभ्यास केला तर या देशात पीकविमा यशस्वी ठरणार नाही असे स्पष्ट मत समितीला द्यावे लागेल.** अशा रीतीने पीकविम्याचा प्रश्न सरकारदरबारी कायमचा बाजूला पडला.

## शेती–पतपुरवठा बँकांचे संरक्षण महत्त्वाचे

पीकविम्यातून शेतकऱ्याचे वैयक्तिक संरक्षण करावयाचे म्हटले तर ती योजना यशस्वी होण्याची शक्यता नाही हे आपण पाहिले. सहकारी क्षेत्रात एखादी स्वतंत्र पीकविमा संस्था काढावी तर विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झालेले आहे. सरकारदरबारी पीकविम्याला मान्यता मिळण्याचा मार्ग बंद झालेला आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे छोटे शेतकरी कर्जबाजारी होतात आणि शेवटी सावकारी पाशात अडकतात. तेव्हा प्रथम त्यांना सहकारी सावकारशाहीत आणण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. परिणामी या मंडळींच्या कर्जबाजारीपणामुळे सहकारी बँकांच्या कर्जबाजारीपणात वाढ होणार हे निश्चित. त्यामुळे शेती कर्जव्यवहार करणाऱ्या सर्वच सहकारी व राष्ट्रीयीकृत, व्यापारी बँकांचे संरक्षण करण्यासाठी एखादी योजना लवकरच आपल्याला हाती घ्यावी लागणार आहे.

सहकारी पतपुरवठ्यातील कर्जदार सभासदांपैकी ८० टक्के सभासद थकबाकीत जातात आ[illegible] ६५ टक्के [illegible]ा येणे[illegible] रक्कम थकबाकी असते. दुष्काळ, पू[illegible]र, [illegible]ळे पीक हातचे जाते आणि उत्पादकी खर्चासाठी क[illegible] कसे फेडावयाचे हा प्रश्न सर्व शेतकऱ्यांपुढे पडतो. शेत[illegible]ढे [illegible]बाकीत का जातो त्यामागे हे एक महत्त्वाचे कारण आहे [illegible]बाकीमागील कारणमीमांसा ही एक स्वतंत्र चर्चा होऊ शकेल. खरा प्रश्न छोट्या शेतकऱ्यांच्या कर्जव्यवहारातील बुडित कर्जाचा आहे, कारण त्याची कौटुंबिक संस्था, खावटी गरजा व शेतीमालाचे तुटपुंजे उत्पादन लक्षात घेता त्याची परतफेडक्षमता तशी कमीच असते. पीकहानीमुळे थकबाकी होते आणि त्यामुळे सहकारी पतपुरवठ्यातून तो कायमचा वंचित राहाण्याचा प्रसंग वारंवार येतो. त्यामधून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणून त्याच्या थकबाकीचे दीर्घमुदतीत पुनर्वसन केल्यास एखाद्या भरघोस हंगामातून शेतकरी कर्जमुक्त होईल अशी शिफारस १९५४ च्या अखिल भारतीय पतपाहाणी समितीने केली होती. पीकहानीचे प्रसंग लागोपाठ आल्यास कर्जाचा काही भाग माफ करण्यासाठी "शेतीपत स्थिरता निधी" तयार करावा असेही या समितीने आवर्जून सांगितले. असा निधी उभा करण्याच्या दृष्टीने २३ वर्षात आपण म्हणावा असा निधी उभारू शकलो नाही. १९७४ साली रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या अभ्यास गटाने प्राथमिक संस्था जिल्हा बँका यांच्या पातळीवर बुडित कर्जनिधी उभा करून त्यातून ही कर्जे माफ करावीत अशी शिफारस केली. पतस्थिरता निधी, बुडित कर्ज निधी अथवा खास राखीव बुडीत कर्ज निधीची रक्कम ३० जून १९७६ रोजी विविध पातळीवर किती जमा होती व त्याच वर्षी येणेबाकी व थकबाकीची रक्कम किती होते याचा तुलनात्मक आढावा पुढील तक्त्यावरून घेता येईल,

( रुपये कोटी रुपयांत)

| | राज्य बँक | जिल्हा बँक | प्रा. सहकारी संस्था |
|---|---|---|---|
| ३० जून १९७६ रोजी | | | |
| पतस्थिरता निधी | ९.७८ | ३.०७ | — |
| राखीव बुडित कर्ज निधी (धोका निधी) | ०.२५ | ०.४३ | १.१७ |
| बुडित कर्ज निधी | ३.६६ | ६.३४ | — |
| बेरीज | १३.६९ | ९.८४ | १.१७ |
| ३० जून १९७६ रोजी | | | |
| येणे कर्ज बाकी | २२४.४६ | २५२.५८ | २२९.५० |
| थकबाकी | ६.३६ | ७८.११ | १०३.४८ |
| येणेबाकीशी थकबाकीचे टक्के | ३ टक्के | ३१ टक्के | ४५ टक्के |

शेतकऱ्यांच्या अशांचा बुडित झाल्यास तरतूद म्हणून या निधींची उभा तून साठवण असली तरी त्या रकमेचे स्वरूप भांडवली असल्यामु आर्थिक बँकांची उसनवारी योग्य अशी कर्जपात्रता वाढविण्या विक कडे त्यांचा फारसा उपयोग होत नाही. या रकमेतून क कास फीची प्रकरण करणे बँकांना शक्य नसते.

१९७०–७३ या तीन वर्षात लागोपाठ पडलेल्या दुष्काळा नंतर पुनर्वसन झालेल्या थकबाकीपैकी पहिल्या वर्षातील थक- बाकीच्या व्याजात ५० टक्के सूट देण्यापलिकडे आपली प्रगति तशी काहीच नाही. उसासारख्य- खात्रीशीर पिकासाठी काही भागांत पीककर्ज विम्यासारखी एखादी योजना चालू करावी अशी शिफारस ( वास्तविक उसासारख्या बागायती पिकासाठी विमा योजनेची तशी आव- श्यकता का भासावी ? अभ्यास गटाने केली होती. याच कल्पनेचा पाठपुरावा करून दांडेकर समितीने पीककर्ज विमा निधीची कल्पना पुढे केली. छोटया शेतकऱ्यांना व्याज सवलतीचा दर देण्याऐवजी फरकाचा पैसा या निधीत जमा करावा, तसेच जिल्हा बँका, राज्य बँक, राज्य व केंद्र सरकार यांनी येणे कर्जाच्या ६ टक्के एवढी रक्कम या निधीत दरवर्षी टाकावी अशी दांडेकर समितीची शिफारस होती. शेतीपत स्थिरता निधि, किंवा बुडित कर्ज निधी य ाबाबतीत कोणीच काही केले नाही तर पीककर्ज विमा निधी निरुपयोगी ठरला नाही तरच नवल.

## महाराष्ट्र शेतीपत हमी महामंडळाची स्थापना करावी

व्यापारी बँकांच्या कर्जव्यवहाराची पतहमी घेण्यासाठी अखिल भारती पतहमी महामंडळ आहे. अशाच प्रकारचे राज्य पातळीवर शेतीपत हमी महामंडळ स्थापन करण्याची आव- श्यकता आहे. शेतीसाठी कर्जपुरवठा करणाऱ्या सर्व पतसंस्थांच्या कर्जव्यवहाराची हमी या संस्थेने घ्यावी. जिल्हा बँकांची बुडित कर्जमाफी प्रकरणे कशी हाताळावीत, त्यासाठी कोणते निकष लावावेत हा तसा तपशिलाचा भाग आहे. नियोजित मंडळाच्या भागभांडवलात राज्य सरकार, व्यापारी, सहकारी, राष्ट्रीयी- कृत बँका यांचा सहभाग असावा. कर्जदार वर्गणीच्या रूपाने अगर कर्जाऊ रकमेच्या टक्केवारीने उभ्या राहणाऱ्या निधीत छोटा-मोठा सर्व शेतकऱ्यांचा समावेश झाल्यामुळे बड्यांच्या त्यागावर छोटयांचा बुडित कर्जाचा धोका कमी होईल. त्यांचा आर्थिक उद्धार करण्याचे काम जिल्हा बँका मनापासून करतील. त्यांचा कर्जबाजारीपणा नाहीसा करण्याचा हा एकमेव मार्ग आहे.

कर्जबाजारी राहाणे ही महाराष्ट्रीय शेतकऱ्याला न पटणारी गोष्ट आहे. शेती उत्पादनात वारंवार येणाऱ्या घटीमुळे तो कर्जबाजारी होतो ही वस्तुस्थिती मान्य करून त्याला कर्जमाफी व्याजमुक्ति किंवा पीकविम्याचे संरक्षण द्यावे अशी आग्रही भूमिका आपण नाइलाजापोटी घेणे योग्य नाही. त्यामुळे भारतीय शेतकरी बेफिकीर, परावलंबी व आळशी बनविण्याचा धोका टाळता येणार नाही आणि म्हणूनच आणीबाणीच्या काळात कर्जमुक्ती, खावटी, अल्पव्याजी कर्जपुरवठा या बाबतीतील सरकारी कार्यवाहीबद्दल मला वृत्तपत्रीय लिखाणातून कडाडून टीका करावी लागली. शेतकऱ्याचे वैयक्तिक संरक्षण करण्या- ऐवजी अप्रत्यक्षरीत्या शेतकऱ्यांचे आर्थिक संरक्षण कसे करता येईल हे पाहिले पाहिजे. शेतीपतहमी महामंडळाची कल्पना सरकारने जरूर विचारात घ्यावी.

आज गरीब शेतकऱ्यांचा कोणी वाली नाही एवढे मात्र खरे

(पुणे येथे ८ व्या बँक राष्ट्रीयीकरण स्मृतिदिनानिमित्त पुणे बँक ग्राहक संघाच्या विद्यमाने भरलेल्या चर्चाशिबिरात वरील निबंधावर चर्चा आयोजित करण्यांत आली).

■ ■ ■

# शाखाधिकारी व त्यांचे कार्य

श्री. व्ही. डी. नखाते
युनायटेड वेस्टर्न बँक, सातारा

बँकांचा दिवसेंदिवस विस्तार होत आहे. मोठ्या शहरापासून अगदी लहानशा खेड्यांपर्यंत बँकेच्या शाखा उघडत आहेत. म्हणजेच बँका ह्या एक मोठ्या व सुशिक्षित व्यक्तींसाठीच नसून त्या गरजू व दुर्लक्षित झालेल्या क्षेत्रांतील लोकांच्या साठी झाल्या आहेत. दहा वर्षापूर्वीच्या काळापर्यंत बँकेत शेतकरी, कारागीर, लहान व्यापारी, लहान व्यवसाय करणारे इत्यादि व्यक्ती जाण्यास घाबरत असत. आता परिस्थिती बदलत चालली आहे. त्यानुसार बँकांचे ध्येयधोरणांत फरक पडत आहे. आता बँका खातेदार, कर्जदार व हितचिंतक यांच्याशी संपर्क साधीत आहेत. त्यांना बँकेच्या व्यवहारासमवेत राष्ट्रीय कर्तव्य म्हणून सामाजिक सेवा करणे आवश्यक झाले आहे. वरील सर्व बदलत्या परिस्थितीनुसार बँकेच्या केंद्रबिंदू म्हणजे "शाखाधिकारी" होय.

काळ झपाट्याने बदलतो आहे. निसर्गहि वरचेवर आपले अस्तित्व सिद्ध करू लागला आहे. अन्नधान्ये उत्पन्नांसाठी वेगवेगळे प्रयोग करावे लागत आहेत. समाजांतील शैक्षणिक पात्रता वाढत चालली आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीवरून असे सिद्ध झाले आहे की, " समाज जागृत झाला आहे" या सर्व परिस्थितीचा परिणाम साहजिकच आर्थिक संस्था व बँका यांच्यावर होत आहे. अशा परिस्थितीत जुन्या बँकांच्या व्यवहारांत बदल करणे क्रमप्राप्तच आहे. बँकांची बदलती परिस्थिती, बँकांचा फायदा, सामाजिक सेवा व कर्मचारीवर्गाशी सलोख्याचे संबंध ठेवून शाखाधिकारी यांना राष्ट्रीय कर्तव्य करावे लागणार आहे. वरील सर्व परिस्थितीशी झगडून किंवा सांगड घालून आता शाखाधिकारी यांना आपले कर्तव्य पार पाडावे लागणार आहे. त्यांच्यावर मोठी जबाबदारी पडत आहे.

शाखाधिकारी यांना मुख्य कार्यालयाच्या सूचना, नियम व अटी पाळाव्या लागतात. रिझर्व्ह बँकेच्या परिस्थितीनुसार होणाऱ्या ध्येयधोरणांत वरचेवर बदल करावा लागत आहे. स्थानिक परिस्थितीप्रमाणे सामाजिक संबंध दृढ करावे लागत आहेत. शाखेतील कर्मचारीवर्गाशी सलोख्यांचे संबंध ठेवून वेळेवर कामे करून घेण्याचे कौशल्यही शाखाधिकारी यांनाच दाखवावे लागत आहे. अशा परिस्थितीत त्यांनी वैयक्तिक पात्रता खालीलप्रमाणे असल्यासच तो शाखेचे कामकाज वेळेवर, बिनचूक व सर्व दृष्टीने समाधानपूर्वक पार पाडू शकेल.

(१) बँकिंग क्षेत्रांतील योग्य शिक्षण, तसेच संबंधित बँकेतील कामकाजांची संपूर्ण माहिती.

(२) स्वतःची वागणूक, रहाणीमान व पोशाख हा दर्जास शोभणारा.

(३) जबाबदारीची जाणीव असणारा, स्वतः काम करण्याची वृत्ती असणारा.

(४) खातेदार, हितचिंतक व वरिष्ठ अधिकारी यांच्याशी सौजन्याची वागणूक ठेवणारा.

(५) कर्मचारीवर्गाकडून काम करून घेण्याचे नेतृत्व असणारा.

(६) व्यवहारांत मैत्री व राजकारणांतील संबंध येऊ न देणारा.

(७) शाखेत नेहमी स्वतः उत्साही राहून प्रसन्न वातावरण ठेवण्यांचा सतत प्रयत्न करणारा.

(८) कर्मकारी, समाज, खातेदार, हितचिंतक यांचा विश्वास संपादन करणारा.

अशा पात्रांत असलेल्या व्यक्तीस शाखाधिकारी म्हणून काम करावे लागल्यास त्यास खालील 'कर्तव्ये' पाळावी लागतात.

(१) शाखेतील ठेवी व कर्जव्यवहार वाढवून नफावाढीकडे सतत लक्ष ठेवावे लागते.

(२) स्थानिक परिस्थिती, बँकेचे नियम, कामकाजपद्धति कर्मचारी वर्गाशी सलोख्यांचे संबंध ठेवून शाखेची उन्नती कशी होईल यासाठी जागरुक रहावे लागते.

(३) खातेदार, हितचिंतक यांना योग्य ते मार्गदर्शन करून आपुलकीची वागणूक द्यावी लागते.

(४) स्थानिक समाजाच्या सुखदुःखांत सामील व्हावे लागते.

(५) दुर्लक्षित विभागांतील गरजू समाजास कर्जव्यवहार करून त्यांची बँकेविषयी आस्था वाढविणे आवश्यक ठरते.

(६) स्थानिक संस्था, महाविद्यालये, मंडळे, यांच्याशी सतत संपर्क ठेवावा. म्हणजे त्यांतून शाखावाढीसाठी उपयुक्त गोष्टी निर्माण होऊ शकतात.

(७) बँकेतील कोणत्याहि परिस्थितीचा विचारपूर्वक धूर्तपणाने त्वरित निर्णय घ्याला लागतो.

(८) मुख्य कार्यालय यांचा विश्वास संपादन करून आपल्यावर टाकलेली जवाबदरी जाणीवपूर्वक हाताळणे यांतच शाखाधिकारी यांचे कौशल्य दिसून येते.

समाजांत "शाखाधिकारी" यांना मानाचे स्थान अद्यापहि दिले जाते. हा मोठेपणा टिकविण्यासाठी कष्ट, जिद्द व महत्त्वाकांक्षा यांचा आभाव असणे केव्हाहि हितावह नाही. म्हणतात ना " ज्यांचे अंगी मोठेपण त्यांना यातना कठीण. "

■ ■ ■

## श्री. सी. डी. दाते यांचा सत्कार

सोमवार दिनांक २५ जुलै १९७७ रोजी सायंकाळी ६.३० वाजतां महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या सभागृहात मुंबईतील सर्व सहकारी शिखर संस्थांच्या वतीने रिझर्व्ह बँकेच्या अॅग्रिकल्चरल क्रेडिट विभागाचे माजी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ. सी. डी. दाते यांचा प्रातिनिधिक स्वरूपाचा सत्कार आयोजित करण्यांत आला होता. या सत्काराला उत्तर देतांना डॉ. दाते यांनी सहकाराबद्दलचे आपले अनुभवसिद्ध विचार मांडले. ते म्हणाले की, मी सुचविलेल्या सूचनांचा शासनाने ज्या प्रमाणांत विचार करावयास पाहिजे तेवढा तो केलेला नाही, यामुळेच महाराष्ट्रातील थकबाकीचे प्रमाण वाढून ती आता १०३ कोटी रुपयांवर गेली आहे. आजपर्यंत महाराष्ट्रात २० हजार सहकारी सोसायटचा होत्या त्या आता १० हजारांवर आणण्याचा निर्णय शासनाने घेतलेला होता. आता तोही फिरवण्यांत आला आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही दिवसेंदिवस खऱ्या अर्थाने पुढे जावी असे वाटत असेल तर तिच्यात शिस्त आणली पाहिजे. सहकारातून राजकारण पूर्णपणे काढून टाका असे मी म्हणत नाही, पण सहकारातील निर्णय हे राजकारणाच्या दृष्टिकोनांतून घेतले जाऊ नयेत असे आपले ठाम मत असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

समारंभाचे अध्यक्ष सहकारमंत्री श्री. शिवाजीराव पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले की, आम्हाला समाजाची दुःखे समजावून घेऊनच चळवळी उभाराव्या लागतात, त्यामुळे तंत्रज्ञांचा सल्ला हा नेहमीच पाळणे शक्य होत नाही.

डॉ. दाते हे जरी निवृत्त झाले तरी आजही नवीन नवीन गोष्टी ग्रहण करून घेण्याची ताकद आहे, असे प्रमुख पाहुणे श्री. वि. स. पागे यांनी सांगितले.

चांदीची गणेशमूर्ति, चांदीच्या दोन समया देऊन डॉ. दाते यांचा व त्यांच्या पत्नी सौ. नीलांबरी दाते यांचा बनारसी शालूवजा साडी ,कापड व श्रीफळ देऊन सत्कार करण्यांत आला.

सर्वश्री वा. चु. श्रीश्रीमाळ, संपतराव पाटील, एस्. पी. आडारकर, रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर डॉ. आर. के. हजारी, एन्. एस्. कुलकर्णी, सी. पी. शहा प्रभृतींचा या सत्कार समारंभप्रसंगी भाषणे झाली. डॉ. दाते यांच्या जागी रिझर्व्ह बँकेच्या शेती पत-पुरवठा विभागाचे डेप्युटी डायरेक्टर म्हणून नेमणूक झालेल्या श्री. के. माधवदास यांचाहि सत्कार यावेळी करण्यांत आला. तसेच श्री. गणेश शेंदुर्णीकर यांनी संपादन केलेल्या दाते गौरव ग्रंथाचेही (कळियासी बहर आला) डॉ. हजारी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यांत आले.

# ग्रामीण विकासासाठी संस्थात्मक पत-पुरवठा

श्री. आय. जे. नायडू

सचिव, ग्रामीण विकास विभाग, पाटबंधारे मंत्रालय

भारतातील ७० टक्के शेतकरी अल्पभुधारक आणि माध्यम प्रकारचे आहेत. त्यामुळे खेड्यांतील गरीबांच्या आर्थिक व सामाजिक जीवनांत सुधारणा घडवून आणणे हाच या देशांतील ग्रामीण विकास कार्यक्रमाचा मुख्य हेतू असू शकतो. लहान व मध्यम शेतकरी, कुळे, भूमिहीन नवीन मजूर व ग्रामीण कारागीर यांचा प्रामुख्याने समावेश असलेल्या या समाज घटकापर्यंत विकासाचे फायदे पोहोचविण्यास या कार्यक्रमाने सर्वोच्च प्राधान्य देणे म्हणूनच आवश्यक आहे.

## ग्रामीण विकासाचा हेतु

ग्रामीण भागांतील गरीबांची आर्थिक वर्धनक्षमता वाढवून आणि हंगामी स्वरूपाच्या व कमी प्रमाणांत रोजगार असलेल्या क्षेत्रांमध्ये पुरेसा ग्रामीण रोजगार निर्माण करून दारिद्र्य दूर करणे हा ग्रामीण विकासाचा अंतिम हेतू होय. या स्वरूपाच्या प्रचंड कार्यक्रमासाठी पत म्हणून कर्ज-पुरवठा देण्याच्या प्रमाणांत वेगाने वाढ होणे निकडीचे आहे.

ग्रामीण विकासाला वेग देण्यात संस्थात्मक पत-पुरवठ्याने महत्वाची कामगिरी बजावली आहे. कृषि विकासासाठी नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास त्यामुळे मदत झाली आहे. सहकारी पत-पुरवठा संस्थांचा या कार्यातील वाटा फार मोठा आहे. १९५०–५१ साली ग्रामीण कुटुंबांना देण्यात आलेल्या एकूण कर्जात या संस्थांचा फक्त ३ टक्के वाटा होता. हे प्रमाण आता जवळजवळ ३५ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. सहकारी संस्थांचे कार्यकारी भांडवल सध्या १००० कोटी रुपये असून ४०० कोटी रुपयांचा त्यांचा गुंतवणूक पत-पुरवठा आहे.

याच कार्यासाठी व्यापारी बँकांहि पुढे आल्या असून त्यांचा सहकारी संस्थांनंतर दुसरा क्रमांक लागतो. डिसेंबर १९७६ पर्यंत या बँकांनी शेतीसाठी १००२ कोटी रुपयांचा पुरवठा केला होता. कृषि पुनर्वित्त व विकास महामंडळहि या कामी महत्वाचा हातभार लावत असून विविध शेती-योजनांसाठी १९७६–७७ मध्ये या संस्थेने २२१ कोटी रुपयांचा पुरवठा केला आहे.

## पत-उपलब्धता

पत-पुरवठा संस्थांनी किती पत-पुरवठा केला यावरूनच त्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करून चालणार नाही. तर ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचण्याची त्यांची किती क्षमता आहे हेही बघावे लागेल. मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाचे आणि पत-पुरवठ्याचे फायदे सर्वप्रथम मिळाले आहेत. हे फायदे आता समाजातील दुर्बल घटकांना मिळणे आवश्यक आहे. विविध राज्यांनी केलेल्या कर्जमुक्ती कायद्यांमुळे व पत पुरवठ्याच्या उपाययोजनांमुळे या घटकांना मोठा दिलासा मिळाला आहे. धर्मादाय किंवा सामाजिक सेवेच्या दृष्टीकोनांतून त्यांच्याकडे न बघता मोठ्या प्रमाणांतील उत्पादक म्हणून पत-पुरवठा करताना त्यांच्याकडे बघितले पाहिजे.

## संस्थात्मक चौकट

या घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी पत-पुरवठा करीत असताना संस्थात्मक चौकटीत कांही रचनात्मक फेरफार आवश्यक ठरतात. अगदी खालच्या स्तरावर एकात्मिक पत-व-सेवा यंत्रणेची स्थापना याबाबतीत अत्यंत आवश्यक ठरते. या संदर्भात किसान सेवा संस्थेच्या संघटनाबाबत राष्ट्रीय कृषि आयोगाने केलेल्या शिफारशी महत्वाच्या आहेत. त्यानुसार ही संस्था एक सहकारी संस्था म्हणून नोंद झालेली असते आणि लहान व मध्यम शेतकरी, शेत मजूर व ग्रामीण कारागीर यांच्यासारख्या दुर्बल घटकांना या संस्थेच्या व्यवस्थापनांत निर्णायक आवाज उठविता येऊ शकतो. आपल्या सदस्यांच्या कर्जाविषयक गरजा तर या संस्थेने भागवावयाच्या आहेतच. शिवाय उपयुक्त वस्तू पुरवठ्याचा व्यवसाय, दीर्घ-मुदतीच्या कर्जाचा पुरवठा, उत्पादित वस्तूंची खरेदी-विक्री हाती घेऊन दुग्धव्यवसाय, पशुपालन रेशीम उत्पादन, इत्यादी संबंधीहि उत्पादक व खरेदी-विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांशी त्यांचा योग्य तो संपर्क असला पाहिजे.

याच बरोबर पारंपरिक प्राथमिक कृषि पत संस्थांच्या पुनर्रचनेचा राष्ट्रीय कार्यक्रमहि विविध राज्यांतून हाती घेण्यांत आला आहे. यामुळे या संस्थांची संख्या सध्याच्या १,४०,००० वरून ८० हजारांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. या संस्थांचा प्रत्येकी किमान तीन लाख रुपयांचा व्यवसाय असेल. पत-पुरवठा आवश्यक ग्राहकोपयोगी वस्तू इत्यादींची एकात्मिक सेवा या संस्था पुरवतील. आदिवासी विभागांत पत-पुरवठा व खरेदी-विक्री सेवा या ग्राहकोपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी बृहद् आकार बहु उद्देशीय संस्था स्थापण्यांत येत असून सध्या त्यांची संख्या सुमारे ८०० आहे.

## पत-पुनर्रचना

याबरोबरच माध्यमिक स्तरावरील पतपुरवठा संस्थाहि मजबूत करण्याकडे खास लक्ष देण्यांत येत आहे. ग्रामीण भागांकडे पत मोठ्या प्रमाणात पुरवण्याचा त्यात मुख्य हेतू आहे. ग्रामीण गरीब जनतेला पुरेसे सहाय्य देण्याबाबत संबंधितांची बांधीलकी जरूरीची आहे. सरकार व रिझर्व्ह बँक यांनी पूर्णत: लहान शेतकरी व दुर्बल घटकांसाठी कांही विशिष्ट प्रमाणात पत-पुरवठा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सहकारी संस्थांनी १९७४–७५ साली दिलेल्या एकूण कर्जाच्या ३० टक्के रक्कम कार्यकारी भांडवल व गुंतवणूक पत यांच्या स्वरुपात दुर्बल घटकांना देण्यांत आली. शिवाय लहान शेतकरी विकास संस्था' दुष्काळी विभाग कार्यक्रम, आदिवासी व डोंगराळ प्रदेश विकास कार्यक्रम यांसारख्या योजनाही दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी राबविण्यांत येत आहे.

मांस व दुग्धव्यवसाय यासाठी पशु-उत्पादनात लहान शेतकरी मोठा हातभार लावतात. चाऱ्याच्या पुरवठ्यासाठी पत व खरेदी-विक्रीची सोय उकरून देऊन पशुधन वाढविले पाहिजे. या प्रश्नाला जर महत्व आहे. असेच महत्व समुद्र-किनाऱ्यावरील गरीबांच्या बाबतीत मच्छीमारीलाहि दिले पाहिजे.

एका विशिष्ट कालावधीत दुर्बलक्ष घटकांना स्वावलंबी केले पाहिजे. त्यांना पुन्हा पत-पुरवठा संस्थांवर पूर्णत: अवलंबून राहण्याची वेळ येऊ नये यादृष्टीने अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांनी खबरदारी घेतली पाहिजे.

## ग्रामीण उद्योग

शेतीच्या सर्वांगीण विकासाबरोबरच ग्रामीण विकास व बेकारी निर्मूलन यांच्या संदर्भात ग्रामीण उद्योगांना उत्तेजन देण्याची आयवश्यकताहि नजरेआड करून चालणार नाही. शेतीच्या आधुनिकीकरणामुळे नवी साधने व अवजारे यांची आवश्यकता निर्माण होते. खेड्यांमधील घरातहि आवश्यक ते फर्निचर व आधुनिक स्वयंपाकघर हवे आहे. लहान प्रमाणावरील ग्रामोद्योगांना सध्या उत्पादक वस्तूंचे उत्पादन करण्याच्या दृष्टीने विकसित करणे म्हणूनच आवश्यक आहे.

आर्थिक कल्याणाबरोबरच आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण यांच्यात ग्रामीण गरीबांसाठी सुधारणा झाली पाहिजे. या प्रचंड खर्चासाठी काळजीपूर्वक नियोजन व धोरण-आखणी अग्रक्रमांची फेररचना विविध क्षेत्रांमधील साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त वापर व सर्वांत महत्वाचे म्हणजे समर्पणाची भावना यांची आवश्यकता आहे. म्हणूनच ग्रामीण विकासाकडे सर्वोच्च स्तरावर लक्ष केंद्रित करण्यांत आले आहे.

■ ■ ■

# वाचकांचा पत्रव्यवहार

मा. संपादक, सौ. मीना कुलकर्णी
"अर्थ" ९९८ बी. वॉर्ड, रविवार पेठ,
प्रा. कमलाकर परचुरे कोल्हापूर
यांना स. न. वि. वि. दि. १९-७-१९७७

आपल्या "अर्थ"च्या नोव्हेंबर-डिसेंबर १९७६ च्या अंकात आमचे पुस्तक "श्रीशाहू छत्रपतींचे अर्थकारण" ह्या पुस्तकावरील डॉ. घुगे, प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे परीक्षण वाचलें. परीक्षणाच्या आधी डॅ. घुगेंचा परिचय करून देताना आपण पुढीलप्रमाणे लिहिले आहे-" ह्या ग्रंथामुळे सामान्य वाचकांचे जे काही गैरसमज होतील ते दूर करण्यांच्या दृष्टीने प्रा. घुगे यांनी त्यांच्या अभ्यासाप्रमाणे त्या ग्रंथात काही सुधारणा सुचविल्या आहेत. ह्या सुधारणांमुळे मूळ ग्रंथकर्त्यांवर अन्याय होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही." ह्या वाक्यामुळे आमचा समज असा होत आहे की, डॉ. घुग्यांच्या परीक्षणामुळे आपण संपादकांनी आमच्या पुस्तकाबद्दल एक विशिष्ट भूमिका घेतली आहे. दुसरी बाजू समजून घेतल्याशिवाय "सामान्य वाचकांचे ग्रंथामुळे काही गैरसमज निर्माण होतात" अशी भूमिका घेणे आम्हास योग्य वाटत नाही. डॉ. घुगे यांच्या अभ्यासानुसार त्यांनी आमच्या ग्रंथात सुधारणा सुचविल्या आहेत असे आपले म्हणणे आहे. त्या खरोखरच सुधारणा आहेत का नाही याचा विचार केला पाहिजे. एकच उदाहरण द्यावयाचे झाल्यास पुस्तकात नसलेली वाक्ये आमच्या नावावर खपविणे, चुकीच्या संदर्भात वाक्ये अर्धवट उद्‌धृत करणे हे टीकाकाराला कितपत बरोबर दिसते ? गोखले अर्थशास्त्र-राज्यशास्त्र संस्था पुणे यामधील प्रा. कुमुद पोरे ह्यांनी 'महाराष्ट्र टाइम्स' च्या अंकात आमच्या पुस्तकावर लिहिले आहे. डॉ. वि. म. दांडेकर आमच्या पुस्तकास प्रस्तावना देणार होते. कार्यबाहुल्यामुळे ते देऊ शकले नाहीत. डॉ. घुगे यांच्या परीक्षणानुसार जर खरोखरच आमचे पुस्तक चुकांनी भरलेले असते तर वरील गोष्टी शक्य झाल्या नसत्या.

डॉ. घुगे यांचे परीक्षण काळजीपूर्वक वाचून त्यातील प्रत्येक टीकेचा परामर्ष घेणारे उत्तर लिहिले आहे. डॉ. घुगे यांची टीका ही टीका कशी नसावी याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे ! आपण लिहिले आहे की, प्रा. कुलकर्णी ह्यांची देखील भूमिका व प्रतिक्रिया समजून घ्यावी अशी 'अर्थ'च्या वाचकांना साहजिकच उत्सुकता असणार. टीकेला उत्तर जरा सविस्तर द्यावे लागले आहे. सर्व बाजूंनी पुरावे द्यायचे म्हटल्यावर इलाज नव्हता. उत्तर 'अर्थ' मध्ये छापून आम्हाला न्याय द्यालच यात शंका नाही. 'अर्थ' च्या कोणत्या अंकात आमचे उत्तर देणार आहात हे कळविल्यास कृपया बरे होईल.

आपण घुगे यांचा परिचय करून देताना "छत्रपति शाहू महाराजांच्या आर्थिक विचार व धोरण' ह्या विषयावर त्यांचे इंग्रजी-मराठीत ग्रंथ आहेत. त्यांना शासनाचे पारितोषिक मिळाले आहे" असे लिहिले आहे. डॉ. घुगे यांच्या श्री शाहू छत्रपतींवरील इंग्रजी अगर मराठी ग्रंथाला शासनाचे पारितोषिक मिळालेले नाही, अशी आमची माहिती आहे. कदाचित् आमची माहिती चुकीची असण्याचीही शक्यता आहे. तेव्हा त्यांच्या त्या ग्रंथाला शासनाचे पारितोषिक मिळाले आहे का नाही ह्याची आपण कृपया चौकशी केल्यास व तसे ते मिळालेले नसल्यास आपल्या 'अर्थ' च्या पुढील अंकात विशेषतः ज्या अंकात आपण आमचे उत्तर छापणार आहात त्या अंकात स्पष्ट खुलासा केल्यास बरे होईल.

आपण आमचे "श्रीशाहू छत्रपतींचे अर्थकारण" हे पुस्तक वाचले नसल्यास त्याची एक प्रत आम्ही आपणास पाठवू इच्छितो. पुस्तकावरून व या आमच्या उत्तरावरून आपले व वाचकांचे "गैरसमज" दूर होतील, अशी आशा आहे. डॉ. घुगे यांचा आमच्या पुस्तकावरील टीकेमागील हेतू आमच्या "ग्रंथाचे काळजीपूर्वक वाचन, पुनर्वाचन व पुनर्विचार करण्यास अभ्यासकांना प्रेरणा मिळावी" हा नसून केवळ टीकेसाठी टीका, वैयक्तिक टीका हाच असल्याने त्यांचे गैरसमज कितपत दूर होतील याची मात्र आम्हाला शंका वाटते.

कृपया पत्रोत्तर पाठविण्याची व्यवस्था करावी.

आपले,
सौ. मीना बं. कुलकर्णी,
बं. शि. कुलकर्णी

संपादकीय टीप—

प्रा. सौ. मीना कुलकर्णी व प्रा. ब. शि. कुलकर्णी ह्यांचा सदरहू लेख आम्ही ऑगस्टच्या अंकात प्रसिद्ध करीत आहोत. जिज्ञासू वाचकांनी 'अर्थ'च्या नोव्हेंबर अंकात डॉ. घुगे ह्यांनी लिहिलेली प्रतिक्रिया (हा लेख वाचण्यापूर्वी) पहावी ही विनंती.

माननीय प्रा. श्री. कमलाकरराव परचुरेसाहेब,
संपादक, 'अर्थ', पुणे–४, यांना
सादर नमस्कार, वि. वि.

महोदय,

'अर्थ' मासिकाचा एप्रिल-मे १९७७ चा तृतीय वर्ष वर्धापन विशेषांक मिळाला. या विशेषांकाच्या मुखपृष्ठावरील पूज्य महात्मा गांधीजींचे पवित्र दर्शन घडविणारा फोटो व या अंकाचे मुखपृष्ठ उलटल्याबरोबर लगेच सामोरा येणारा, 'गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचाराचे मर्म' हा, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु, माननीय प्राचार्य देवदत्त दाभोळकरसाहेब यांचा अभ्यसनीय असा लेख ही अत्यंत औचित्यपूर्ण अशी वाटतात. या विशेषांकांतील इतर सर्व लेखांमध्ये 'अर्थ'विषयक बाबींची विविधता दिसून येत असून ते सर्व भारतीय अर्थसंस्थांचे अर्थकारण, व्यवस्थापन व तदनुषंगिक विषयांचे सम्यग् दर्शन घडविणारे असेच आहेत. धन्यवाद !

'अर्थ' मासिकाच्या तृतीय वर्ष वर्धापन विशेषांक प्रकाशनाचे या सुप्रसंगी, या मासिकाच्या सर्व वाचक बंधुभगिनींच्या वतीने या मासिकाचा मी एक नम्र वाचक त्यास व सर्व संबंधितांना सदैव सुयश चिंतितो. महोदयास कळावे, ही विनंती.

आपला कृपाकांक्षी
रामकृष्ण धोंडो कुलकर्णी
(अक्कलकोट)

---

प्रा. मुकुंद नातू
२२३ यशवंतनगर,
तळेगाव
२३–७–१९७७

स. न. वि. वि.

आपण पाठविलेला एप्रिल-मे ७७ चा अंक मिळाला. आभारी आहे. अंक नेटका व संग्रहणीय आहे.

माझा लेख आपण ज्या अंकात छापला (फेब्रुवारी) तो अंक कृपया पाठवावा.

आपण मा. कुलगुरूंची गांधीजींच्या अर्थशास्त्रासंबंधी घेतलेली मुलाखत सर्वस्पर्शी आहे. गांधीजींचे अर्थशास्त्र व भारतीय नियोजन यासंबंधी माझा एक लेख योजनेच्या १५–३१ जुलै ७७ च्या अंकात आला आहे. या दोन्हीतील साम्यस्थळे व इतर गोष्टींबद्दल आपला अभिप्राय कळवावा ही विनंती आहे.

मुकुंद नातू

---

प्रा. अरविंद पुराणिक,
वैकुंठ मेहता इन्स्टिटयूट ऑफ
को-ऑप. मॅनेजमेन्ट, पुणे–१६.
१० जुलै, १९७७.

स. न. वि. वि.

एप्रिल-मेचा तृतीय वर्षवर्धापन विशेषांक मिळाला. अंकातील सर्वच लेख उत्कृष्ट आहेत. संपादकीय कौशल्य जागोजागी जाणवते. गेली २ वर्षे अर्थ मासिकाचे एकापेक्षा एक सरस अंक काढून अभ्यासकांच्या मनांत अर्थाबद्दल लोभ व सद्भावना निर्माण करण्यात तुम्ही जे यश मिळविले आहे त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. विशेषतः ह्या अंकातील प्रा. स. अ. रानडे ह्यांचा 'नाणेबाजार व शेअरबाजार' हा लेख अप्रतिम आहे अशा प्रकारचे लेख सातत्याने मिळविल्यास जिज्ञासू वाचकांना त्याचा मोठा लाभ होईल.

अरविंद पुराणिक

---

श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर
१८–७–१९७७

मा. संपादक,
'अर्थ'
सत्यशिवसुंदर प्रकाशन
पुणे–४.

महोदय,

आपले उपरोक्त संदर्भाचे मा. तात्यासाहेब कोरे यांना लिहिलेले पत्र मिळाले. तसेच सोबत 'अर्थ'चे मागील काही अंकही मिळाले. अंक वाचनीय वाटले.

आपल्या विनंतीनुसार आपले मासिकाच्या पुढील अंकासाठी आमच्या संस्थेची रु. २००/– ची आतील पूर्ण पान जाहिरात प्रसिद्धीसाठी देत आहोत.

कळावे.

आपला विश्वासू,
नं. का. नाईक,
कार्यकारी संचालक

---

श्री

# शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली

## जि. सांगली

तार : साखर सांगली　　　　फोन : २६११ ते २६१५

टेलेक्स – ०१९, ३२३२ बळिराज

## सहकारातील संकल्पसिद्धी

शेतकरी – एकत्र येऊन आपल्या निश्चयाने

सहकारी – क्षेत्रामध्ये कारखानदारी उभी करतात व

साखर – निर्माण करणारा

* आशिया खंडातील सर्वात मोठा

कारखाना – उभारू शकतात हे माननीय

**पद्मभूषण वसंतरावदादा पाटील**

मुख्य मंत्री महाराष्ट्र राज्य, ह्यांच्या प्रेरणेने

सांगली – कारखान्याने सर्वप्रथम सिद्ध करून दाखविले.

आम्ही शुभ्र दाणेदार साखर निर्मितीबरोबर खालील उत्पादनामध्येही आघाडीवर आहोत –

**(१) अनेक प्रकारची अल्कोहोल्स (२) देशी व परदेशी मद्ये**

**(३) पशु-पक्षी यांचे खाद्य**

अनेक पाणीपुरवठा योजनाद्वारे २५ हजार एकरांना पाणीपुरवठा करून उसाबरोबर अन्नधान्याची पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. शेतकऱ्यांना अत्यंत उपयोगी असणारे गोबर गॅस प्लॅंट्स व विविध प्रकारच्या फळबाग योजना यशस्वीपणे राबविल्या जात आहेत.

दररोज ५ हजार टन ऊस गाळपशक्तीचा भारतातील हा कारखाना पहिला असून सन ७५–७६ च्या हंगामामध्ये ९,५८,८२९ पोत्यांचे विक्रमी उत्पादन करून भारतीय साखर धंद्याच्या आजपर्यंतच्या उत्पादनाचा उच्चांक ह्या कारखान्याने प्रस्थापित केला आहे. कारखान्याने भूमिहीन शेतमजुरांना आतापर्यंत १५ लाख रुपये खर्च करून सिमेंट कॉंक्रिटची तयार घरे बांधून देऊन मोफत वाटली आहेत.

| राम रघुवीर | दा. जि. पाटील | बाबासाहेब गो. पाटील |
| --- | --- | --- |
| मॅनेजिंग डायरेक्टर | व्हाइस चेअरमन | एम्. एल्. ए., चेअरमन |

Posted under prepayment License No.01
at Deccan Gymkhana post office
रजि.नं. P.N.C.205.





# वैभवाचा संकेत

अध्ययनामागे उद्दिष्टे ही असतातच.
जिज्ञासा हा त्याचा मूलाधार. परिश्रम आणि सातत्य ही कार्यप्रणालि ..प्रगतिसाठी अतिशय उपयुक्त ठरणारी...
जीवन समृद्ध होऊ शकते ते केवळ याच मार्गाने...
अपेक्षापूर्ति होत राहिल्यामुळे!

किर्लोस्कर उत्पादनेदेखील त्यांच्यापासून केल्या जाणाऱ्या अपेक्षा सर्वार्थाने पूर्ण करतात. अविरत कठोर परिश्रम आणि दीर्घकालीन संशोधन यांचे सुमधुर फळ म्हणजे विविध. विश्वासपात्र किर्लोस्कर उत्पादने...
शेती आणि औद्योगिक विकास या दोन्ही आघाड्यांवर अनमोल कामगिरी बजावणारी...

याच दृष्टिकोनातून विचार केला तर तुमच्याकडूनसुद्धा आम्ही पुष्कळ गोष्टी शिकतो, सर्वांगिण उन्नतिसाठी आम्ही अंगिकारलेल्या व्रताचा आणि त्यासाठी आरंभिलेल्या तपश्चर्येचा तो एक महत्वाचा भाग आहे असेच आम्ही मानतो.

Kirloskar

**किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड**
१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर पथ,
खडकी, पुणे-४११००३

® Registered User – Kirloskar C. Engines Ltd. Poona-411003.


अर्थ
ऑगस्ट ७७
मूल्य तीन रुपये
दि ग्रेट इंडियन नॅशनल सर्कस
लोक समाचाराला
हत्ती नेण्याची नवी प्रथा
पडल्यामुळे हत्तीचे खेळ
होणार नाहीत,
प्रेक्षकांनी इतर खेळ
गोड मानून घ्यावेत.

# अर्थ

आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक
दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे

वर्ष : तिसरे अंक : पांचवा : ऑगस्ट १९७७

किंमत : २ रुपये वार्षिक वर्गणी : २० रुपये


# आलोक

## विदेशी चलन मिळविण्यात भारताला अपूर्व यश!

एप्रिल ७६ ते मार्च १९७७ ह्या आर्थिक वर्षांत भारताने परदेशी चलन मिळविण्यात अपूर्व असे यश मिळविले आहे. चालू वर्षी भारताजवळ ३२४२ कोटी रुपयांचे परदेशी चलन-साठे आहेत. आयात नेहमीच्या वेगाने येत राहिली तरी हे साठे सहज नऊ महिन्यांच्या कालावधीपर्यंत पुरतील.

परदेशी कर्जाची तसेच व्याजाची परतफेड करणेसुद्धा समाधानकारकरीतीने होत आहे. १९७५ पर्यंत परकीय मदत आणि कर्जाचा बोजा वाढतच राहिला. पहिल्या योजनेत परत-फेडीकरता २३.८ कोटी, दुसऱ्या योजनेत ११९.४ कोटी, तिसऱ्या योजनेत ५४२.६ कोटी व १९६६–६९ ह्या कालात ९८२.५ कोटी तर चौथ्या योजनेत हा आकडा २४४५ कोटी रुपयांपर्यंत गेला. १९७४ पासून आपल्या देशातील निर्यात प्रतिवर्षी वाढत आहे.

१९७४–७५ ह्या वर्षी आपल्या चलनी साठ्याची क्षमता २.३ महिन्यांचा आयात खर्च भागवून शकण्याइतपतच होती. ह्या वर्षी ती ८–९ महिन्यांच्या आयात खर्चाइतकी आहे. पर-देशी देण्याघेण्याच्या संतुलनाच्या दृष्टीने, ही स्थिती तज्ज्ञांना आशादायक वाटते.

गेल्या तीन वर्षात भारतातील उद्योगधंद्यांनी परदेशी बाजारपेठा काबीज करण्यात बरेच यश मिळविले आहे. तसेच आयातनिर्यातीला आपण उत्तेजन देत असल्यानेही आयातीचे प्रमाण वाजवी राहिले. चालू आर्थिक वर्षात निर्यात व्यापारात तसेच अदृश्य व्यापारात वाढ झाल्याकारणाने हे उत्पन्न वाढले. भारतीय रुपयाचे बाह्यमूल्य पौंड व डॉलर ह्यांच्या विनिमयांत स्थिर राहिले हे त्याचेच द्योतक होय.

## सहावी पंचवार्षिक योजना

एप्रिल १९७९ पासून ६ वी योजना कार्यान्वित होईल. योजनेची उद्दिष्टे आणि अग्रक्रम ठरविण्याच्या कार्याला आता चालना मिळू लागली आहे. नव्या सरकारच्या जाहीरनाम्यात दहा वर्षांच्या अवधीत 'पूर्ण रोजगाराचे' उद्दिष्ट स्पष्ट केले होते. देशातील सर्वांना काम देण्याची आणि बेकारी संपूर्णपणे हटविण्याची जबाबदारी अवघड आहे. ग्रामीण विकासाला चालना कशी द्यावयाची, संघटित शहरी उद्योगांमध्ये जी घसरणीची प्रवृत्ती आहे ती कशा प्रकारे सावरावयाची, उत्पादनक्षमतेचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घ्यावयाचा तसेच किंमतपातळी स्थिर राखताना देशांतील वेतनविषयक धोरण कसे सुसंगत करावयाचे ह्या, देशातील सध्याच्या अडचणींतून, मार्ग काढणे सोपे नाही. ग्रामीण भागात उत्पादनवाढ तसेच न्याय्य जमीनकरण ह्याकरता जमीनमालकीवर मर्यादा बसविणे अपरिहार्य आहे. जिराईत वा बागाईत कोणत्याही प्रकारची जमीन २५ एकरांपेक्षा जास्त, एका व्यक्तीच्या मालकीची असण्यावर कायदेशीर निर्बंध आणावे लागतील. सर्वात डोकेदुखीची समस्या हीच आहे. योजनाभवनांत ज्या चर्चा होत आहेत त्यावरून असा अंदाज बांधता येतो की, सध्याच्या सरकारला जमीनवाटपाच्या धोरणाजी अंमलबजावणी करण्यावरच जोर द्यावा लागेल. ग्रामीण विकासाकरिता गट-पातळीवर विकेंद्रित योजना राबविल्या जाव्या असाही एक सूर आहे. ग्रामीण गटाच्या नियोजनाच्या कार्यवाहीकरता समित्या नेमाव्या आणि त्या समित्यांत भूहीन शेतकरी, शाळा-कॉलेजातील शिक्षक, छोटे शेतकरी, हरिजन, उपेक्षित इत्यादि विविध स्तरांतील प्रतिनिधींचा समावेश असावा, अशीही एक सूचना आहे.

## अन्नधान्य, भाजीपाला, डाळी

मान्सूनची प्रगति समाधानकारक असल्यामुळे चालू हंगामाच्या पिकांबद्दल अपेक्षा वाढल्या. तसेच उन्हाळी हंगामांत काढलेल्या पिकांचा बाजारांत पुरवठा सुरू झाला. त्यामुळे अन्नधान्य, डाळी इत्यादि वस्तूंचे भाव ह्या आठवड्यात बरेच घसरले. मध्यंतरी मुंबईत गृहिणींचे एक शिष्टमंडळ धान्य व्यापाऱ्यांच्या असोसिएशनच्या अध्यक्षांना भेटले. अशा प्रकारचे आंदोलन सुरू झाल्यास जनतेची सहानुभूती गमवावी लागेल. ह्या धोरणाने व्यापारी, मालाचे साठे विक्रीस काढण्यास उत्सुक झाले. त्याचा एकत्रित परिणाम तूर्तास दिसतो. मसूर डाळीचे भाव त्यांतल्या त्यात फार घटले. २४ जुलैचे दर, क्विंटलचे भाव असे : मसूरडाळ २५० रु., तूर डाळ ३०५-३१५ वाटाणा २०५-२४०, तूरडाळ २८०-३२५, हरभराडाळ १६०-१६५, मोगलाई मूग २४०-२५० उडीद ३००, सोनाकल्याण गहूं १३८-१४५. ह्या सर्व वस्तूंच्या भावात क्विंटलमागे सरासरी २०-३० रुपये घट झाली. बाजारांत मूग व उडीद ह्यांच्या नव्या पिकाची आवक नुकतीच सुरू झाली आहे. भाजीपाल्याच्या निर्यातीवर सरकारने निर्बंध घातल्यामुळे तसेच मुसळधार वर्षावामुळे बाजारांत ग्राहक कमी असल्यामुळे बहुतेक सर्व भाज्यांचे भाव ह्या आठवड्यांत एकदम घटले. फुलकोबी, कोबी ह्या भाज्या मध्यंतरी अदृश्य झाल्या होत्या. त्यांची निर्यात विमानाने होत होती. किंमतीही सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर होत्या. आता कोबी २-२॥ रुपये किलो झाली असून इतर आवडीच्या भाज्यांच्या किंमती १ ते २ रुपयांपर्यंत उतरल्या आहेत. मुंबई बाजारात दररोज ५०० ते ६०० टन भाजी येते. त्यातील ५० टन भाजी दररोज एअर इंडियाने परदेशात जाते. अर्थात हे प्रमाण फारसे नसले तरी परदेशी मागणीचा देशातील भावांवर परिणाम होतोच. विशेषतः कांदा-बटाटा ह्यांच्या निर्यातीवर नुकतेच निर्बंध आल्याकारणाने त्यांचे भाव वाजवी रहातील अशी अपेक्षा आहे. देशातील मागणीइतका पुरवठा होऊन, अतिरिक्त उत्पादन वाढविल्यास भाज्यांच्या निर्यातीने परदेशी चलन मिळविणे श्रेयस्कर होईल.

## औद्योगिक क्षेत्र

मुंबईतील २४ मोठ्या कापड गिरण्या, भांडवलाचा अभाव तसेच कामगारांचे संप या कारणांनी बंद पडल्या आहेत. एप्रिल ते जून ह्या तीन महिन्यांत सुमारे ७ लाख चात्या, पांच हजार लूम बंद पडून ३४ हजार कामगारांना काम नव्हते. गुजरात व तामिळनाडूतही हीच परिस्थिती आहे. गेला २ वर्षे वेस्टर्न इंडिया स्पिनिंग मिल बंद आहे. महाराष्ट्र राज्य टेक्स्टाईल कॉर्पोरेशन ही मिल चालू करण्याचा विचार करीत आहे. आजारी गिरण्यांचा प्रश्न बिकट आहेच. गिरण्यांना जोपर्यंत उत्पादनखर्चात घट करता येत नाही आणि कच्च्या मालाचा पुरवठा वाजवी किंमतीत होत नाही तोपर्यंत कापड उद्योगाची समस्या सुटणे कठीण आहे. सक्तीच्या ठेव योजनेचा दुसरा

रोख हप्ता वैयक्तिक मते व त्या धोरणाविरुद्ध असूनही सरकारने द्यावयाचे जाहीर केल्यामुळे कामगार संघटनांत समाधान व्यक्त होत आहे. इंटकने बोनसची रक्कम १ महिन्याच्या पगाराइतकी मिळावी अशी मागणी केली आहे; तर बोनसचे प्रमाण किमान ८.३३ टक्के असावे व ते सर्व कामगारांना मिळावे अशीही एक मागणी मुंबईच्या कामगार संघटनांनी केली. बडया उद्योगसमूहांच्या आयकराच्या थकबाकीसंबंधीचे आकडे अर्थमंत्र्यांनी राज्यसभेत दिले. बाजोरिया जालन समूहाकडून ७ कोटी आयकर, ३.८ कोटी संपत्ती कर आणि सुमारे १।। कोटी देणगी कर येणे आहे. बिर्ला समूहाकडून ३।। कोटी आयकर, सुमारे ७ कोटी संपत्तीकर आणि २७००० रुपये देणगी कर येणे आहे श्रियांप्रसाद जैन, डालमिया, जे. के. मोदी आणि जयपुरिया ह्या समूहांकडूनही आयकर येणी थकलेली आहेत. कंपन्यांच्या अध्यक्ष तसेच संचालकांचे पगार ह्यावर नियंत्रण घालण्याची गरज कायदेमंत्री श्री. शांतीभूषण ह्यांनी व्यक्त केली. इंडियन टोबॅको कंपनीचे अध्यक्ष श्री. ए. एन्. हक्सर ह्यांचा पगार दरमहा ७५०० रुपये असून कंपनीच्या नफ्यातील १ टक्का भाग त्यांना देण्यात येते. ह्याशिवाय दरवर्षी हजारो रुपये प्रवास, अनुरंजन इत्यादि भत्त्यांकरता वेगळे दिले जातात. सध्याच्या कंपनी कायद्यांतील २६९ (२) ह्या कलमान्वये हे बंध असल्यामुळे कंपनी कायद्यातच आवश्यक त्या सुधारणा करणे जरुरीचे वाटते.

## बँकिंग क्षेत्र

बँकांच्या बडया अधिकाऱ्यांचे पगार नियंत्रित करण्याकरता तसेच त्यात सुसूत्रता आणण्याकरता सरकारने पिल्ले कमिशन नेमले होते. कमिशनने आपला अहवाल सादर केला असून ह्यातला विनोद हा की अहवाल १९७४ मध्येच पुरा झाला होता. पण तो सरकारी दप्तरातल्या शीतगृहांत थंड राहिला. आता त्याला ऊब आणि चालना मिळेल असे वाटते, अत्युच्च श्रेणीच्या अधिकाऱ्यांना ३०००–१२५–३५००. त्याखाली २७५०–१२५–३२५०, त्यानंतर २५००–१००–२७०० अशा एकूण सात उतरत्या श्रेण्या आहेत.

## नवे संचालक मंडळ

आता व्यवस्थापकीय अधिकाऱ्यास ७००–४०–९००, मध्यम व्यवस्थापनास १२०० ते १८०० मूळ पगार असतील रिझर्व्ह बँकेच्या नव्या संचालक मंडळाची नियुक्ती दि. २४ रोजी घोषित करण्यात आली असून त्यांत श्री. जहांगिर पटेल, श्री. पी. सी. लाल, श्री. शंतनुराव किर्लोस्कर, श्री. वेंकटपय्या, श्री. एम्. पी. चितळे, डॉ. डी. पी. सिंग, डॉ. व्ही कुरियन, श्री. ए. एन्. हक्सर, प्रा. एम्. एल्. दोनवाला, श्री. एस्. व्ही. अरुणाचलम आणि श्री. भरतराम यांचा समावेश आहे. बँकांनी त्यांच्याकडून घेतलेल्या मुदत कर्जाच्या व्याजाच्या तिमाही आकारणीऐवजी मासिक आकारणी सुरू केली आहे. या नव्या योजनेची कार्यवाही गेला महिनाभर सुरू आहे. या बाबतीत प्रतिक्रिया परस्पर विरुद्ध आहे. काहींना मासिक आकारणीमुळे चलनवाढ प्रवृत्ती रोखली जाईल तसेच वित्तीय अनुशासन सुधारेल असे वाटते, तर काहींना या आकारणीमुळे अधिक व्याज द्यावे लागेल, असेही वाटते. उत्पादक व व्यापाऱ्यांना अधिक व्याज द्यावे लागले तर त्याचा परिणाम किंमतीवर होईल, अशीही भीती व्यक्त केली जाते. यासंबंधी 'निदान' करणे इतक्या थोडया अवधीत अशक्य आहे.

## 'बृहन्महाराष्ट्र' कॅनडात !

बृहनमहाराष्ट्र शुगर सिंडिकेट ही महाराष्ट्रांतील जुनी व ख्यातनाम कंपनी कॅनडामध्ये 'रम'च्या कारखान्याची उभारणी करीत आहे. वालिया बॉटलिंग कंपनीच्या सहकार्याने येथील रमवर कॅनेडियन रमचे संस्कार करून तेथील लोकांना रुचेल असे उत्पादन करण्याची योजना आहे. त्यामुळे या भागातल्या रमला परदेशी मागणी वाढेल. चालू वर्षी १ लाख पेटचांचे उत्पादन अपेक्षित आहे. येत्या ५ वर्षांत हे उत्पादन ५ पट होईल, असा कंपनीचा अंदाज आहे.

## निकटवर्तीयांचा अंदाज

महाराष्ट्राचे नांव आता कॅनडांत खाजगी व सार्वजनिक उत्सवप्रसंगी जल्लोषांत या निमित्ताने तरी 'दुमदुमेल यांत शंका नाही. या आदर्शाचे अनुकरण करण्यासाठी दक्षिण महाराष्ट्रांतील सध्या अग्रेसर साखर कारखान्यामध्ये 'ही' चुरस लागून कोणी जपान, तर कोणी ऑस्ट्रेलिया या अखिल पृथ्वीवर मराठी मद्यनिर्मिते मुलुखगिरी सुरू करतील असा निकटवर्तीयांचा एक अंदाज आहे.

## संप, टाळेबंदीमुळे ७॥ कोटी रुपयांचे नुकसान

आत्तापर्यंत विशेषत: गेल्या २ आठवड्यांत मान्सून समाधानकारक झाला आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्तान, दिल्ली, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरयाना, काश्मीर, पश्चिम बंगाल आणि आंध्र ह्या राज्यांत नेहमीच्या सरासरीपेक्षां १०।२० टक्के अधिक पाऊस झाला. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, तामीळनाडू, कर्नाटक, केरळ ह्या राज्यांत आतापर्यंत नेहमीची सरासरी पावसाने गाठली असून केवळ नागालँड — अरुणाचल हे प्रदेश सोडले तर मान्सूनचा पाऊस सर्वत्र चांगला झाला आहे. पंजाबात ह्या हंगामाला तांदळाचे विक्रमी पीक येईल असा रंग दिसतो.

महाराष्ट्रात भाताची लावणी संपत आली असून आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश ह्या राज्यांत ती लवकरच संपेल. गुजरातमध्ये कापूस, भुईमूग आणि धान्ये ह्यांची प्रगति उत्तम आहे. ह्या वर्षाच्या खरीप हंगामाचे ७४ दशलक्ष टनांचे उद्दिष्ट गाठले जाईल अशी अपेक्षा आहे. अर्थात् सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये येणाऱ्या सरीवर हे उद्दिष्ट निश्चित होईल. कोकणातील तिन्ही जिल्ह्यांत तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील तांदूळ पिकवणाऱ्या भागांत पाऊस समाधानकारक असल्यामुळे, तसेच अहमदनगर, सोलापूर, सांगली भागांतील बागायती कापसाची प्रगति असल्यामुळे तांदूळ आणि कापूस ह्यांचे उत्पादन समाधानकारक होईल. चंद्रपूर, भंडारा भागांत ह्या हंगामात सुमारे १। लाख हेक्टर जमीन संकरित लागवडीखाली आहे. त्यामुळे नेहमीपेक्षा त्या भागातील उत्पादन १५।२० टक्के वाढेल असा कृषि खात्यातील जाणकारांचा अंदाज आहे. नागपूर भागातील खरीप ज्वारी सुद्धां समाधानकारक आहे. जुलै महिन्यातील पावसाने खरीप हंगामाच्या यशाचा पाया भक्कम केला असे सध्याच्या परिस्थितीवरून दिसते. १९७५।७६ हे वर्ष भारताच्या अन्नधान्य तसेच रोख पैसा देणाऱ्या पिकांच्या उत्पादनाच्या दृष्टीने विक्रमी होते. त्या वर्षाचा खरीप-रब्बी मिळून उत्पादनाचा आकडा १२० लक्ष टन होता. चालू वर्षी खरिपाचे उत्पादन ७० दशलक्ष टनांपर्यंत गेल्यास आणि रब्बीहि असाच चांगला राहिल्यास १९७५।७६ ह्या वर्षाच्या उत्पादनाचा आकडा यंदाहि गाठता येईल.

## अनेक घोटाळे

आणीबाणीच्या काळात नोकरांच्या पगारांतील कांही रक्कम सक्तीच्या ठेवीत सरकारने जमा करण्याच्या योजनेबाबत गंभीर स्वरूपाचा हलगर्जीपणा असल्यामुळे, अनेक घोटाळे आता उघडकीस येऊ लागले आहेत. केंद्र सरकारने केलेल्या चौकशीत १०९ बड्या संस्थांकडून पगारातील कापून घेतलेल्या रकमांचा भरणा सक्तीच्या ठेव योजनेत वेळीच जमा झाला नाही असे आढळले. गरीब मध्यमवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पगारातून कापलेले असे सुमारे १॥ कोटि रुपये ह्या संस्थांनी दुसऱ्या कारणाकरता वापरले, गुंतवले किंवा निष्काळजीपणाने नुसतेच कुजत ठेवले अशा शंका घेण्यास वाव आहे. ह्या संस्थांविरुद्ध सरकारने कडक कारवाई करावयाचे ठरवले आहे. सध्या 'कारणे दाखवा' अशा नोटीसा देण्यात आल्या असून त्या रकमांची वसूली करण्यावर भर देण्यात येत आहे. ही प्रकरणे उजेडात येण्यास प्रथम कलकत्त्यापासून सुरुवात झाली. बंगालमधील ३०९ संस्थांनी सुमारे २ कोटि रुपयांच्या रकमा कापून घेऊन ह्या ठेवीत जमा केल्या नव्हत्या. कलकत्ता हायकोर्टातील त्यापैकी २० कंपन्यांनी रिट अर्ज केले असून हे खटले सध्या चालू आहेत. .

एप्रिल ते जून ह्या गेल्या ३ महिन्यांत विक्रीस निघालेले नवीन शेअर भांडवल ३३ कोटीच्या वर आहे. मागील वर्षी जूनमध्ये हाच आकडा २९ कोटीपर्यंत होता. जानेवारी ते मार्च १९७७ ह्या निवडणुकीच्या धामधुमीच्या काळात कंपन्यांचे जे नवीन शेअर भांडवल विक्रीस निघाले त्याच्या तीनपट वाढ ह्या दुसऱ्या तिमाहीत झालेली दिसते. ह्यावरून औद्योगिक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण दिसते. ह्या वर्षी जानेवारी ते मार्च ह्या तीन महिन्यांत १० कोटी रुपयांच्या आसपास नवे भांडवल विक्रीस काढले गेले. गेल्या १–२ महिन्यांतील शेअर बाजारातील विशेषत: डिबेंचर विक्री लक्षात घेता, एकूण गुंतवणुकीबाबतचे आशादायक चित्र दिसते.

## टाटा-फिन्ले अग्रेसर

पण हे चित्र काळजीपूर्वक लक्षात घेतले पाहिजे. नव्या ३३ कोटी रु. शेअर भांडवलापैकी २० कोटी रुपयांचे डिबेंचर

एकट्या आय्. सी. आय्. सी. आय्. ( इंडस्ट्रियल क्रेडिट व इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ) संस्थेने विक्रीस काढले आहेत. ही सरकारी क्षेत्रातील गुंतवणूकसंस्था आहे. १५ कंपन्यांनी सुमारे १० कोटी रुपयांचे शेअर्स विक्रीस काढले आहेत. ह्यात अग्रेसर टाटा-फिन्ले कंपनी आहे. तिने सुमारे २।। कोटी रुपयांचे शेअर काढले आहेत. विमकोचा दुसरा क्रमांक असून त्या कंपनीचे २ कोटी १३ लाख रुपयांचे शेअर्स बाजारात आले आहेत. खोसला कॉंप्रेसर्स या नव्या कंपनीने ९० लाख रुपयांचे तर आंध्र प्रदेश टॅनरीजने ६० लाख रुपयांचे शेअर भांडवल काढून आपल्या नव्या योजनांना विस्तृत स्वरूप देण्याचे ठरविलेले दिसते. हिंदुस्थान लिव्हर, बाटा आणि बुट्स ह्यांनीही उत्पादनाचे व गुंतवणुकीचे प्रमाण वाढविण्याचे धोरण स्वीकारले आहे.

आंतरराष्ट्रीय गहू मंडळाचा १९७७ व ७८ ह्या वर्षाच्या गव्हाच्या उत्पादनासंबंधीचा अंदाज नुकताच प्रसिद्ध झाला जगातील सर्व देशांचे गहू-उत्पादन यंदा ४०० दशलक्ष टना-पेक्षाही अधिक होईल अशी तूर्त परिस्थिति आहे. ह्यात फक्त रशियाचा वाटा ११० दशलक्ष टनांचा आहे. चालू वर्षी रशियाचे गहू उत्पादन मागील दोन वर्षाच्या उत्पादनांपेक्षा १०।१५ टक्के अधिक आहे. १९७६ मध्ये जागतिक बाजारात एकूण ६० दशलक्ष टन गव्हाची विक्री झाली. चालू वर्षी सुमारे ६७ दशलक्ष टन गहू बाजारात येईल असा मंडळाचा अंदाज आहे. ग्राहकां-ग्राहकांमध्ये चीन हा प्रमुख देश राहील. १९७६-७७ ह्या वर्षी चीनने १ राठीत ७ .लक्ष टन गहू कॅनडा, अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलिय राठीत . केला. याही वर्षी चीनने बऱ्याच मोठ्या प्रमाणाव म ४ खरेदी केला आहे. रशिया व अमेरिका या दोन देशांचे उत्पादन एकत्र केल्यास ते एकूण जागतिक उत्पादनाच्या ३५ ते ४० टक्के आहे.

औद्योगिक अशांतीमुळे गेल्या ४ महिन्यांत ४ दशलक्ष श्रमिक दिवसांची हानि झाली. ह्या संप व टाळेबंदीमुळे देशातील फक्त ५ राज्यांत एकूण एकूण ७।। कोटी रुपयांचे नुकसान झाले. सर्वांत अधिक संप झालेले राज्य म्हणजे महाराष्ट्र, आपल्या राज्यांतील संपांची संख्या ६४ असून बंगालमध्ये ६१ संप झाले. 'पोर्ट व डॉक वर्कर्स'चा संप सुदैवाने टळला. अन्यथा या संपात २ लाख कामगार सामील होऊन देशांतील व्यापार व उत्पादन यांना गंभीर स्वरूपाची खीळ बसली असती. देशांतील संपांचे नेतृत्व करणाऱ्या १३ युनियन तर इंटकच्या ११ सिटूच्या, ६ आयटकच्या तर ३ हिंद मजदूर सभेशी संलग्न असलेल्या अशा एकून ३३ युनियन्स होत्या. बोनसबाबतीत अजूनही धोरण जाहीर झाले नाही. साधारणपणं ८.३३ टक्के एवढा बोनस सर्व कामगारांना आवश्यक म्हणून द्यावा असे वाटत आहे. कानपूरची जे. के. मिल कामगारांना फक्त १ रुपयात विकून टाकावयास व्यवस्थापक तयार आहेत. त्यात अडकलेले २५ लाख रु. मात्र त्यांना दिले पाहिजेत.

[ केसरीच्या सौजन्याने ]

■ ■ ■

# अर्थसंवादाचे स्वागत

◆ ◆ ◆

प्रा. शरद कुलकर्णी

अर्थशास्त्राच्या व आर्थिक विषयांच्या चर्चेला वाहिलेली नियतकालिके भारतातील प्रादेशिक भाषांत कमीच आहेत. जुन्या 'अर्थ'चे पुनर्जीवन झाल्यानंतर या विषयाला वाहिलेले एक मासिक मराठी वाचकांना मिळू लागले. प्रत्येक नियतकालिक चालविणाऱ्या डोळ्यासमोर कांही विशिष्ट प्रकारचा वाचकवर्ग असतो व त्यानुसार त्या मासिकांतील लेख व इतर गोष्टी यांची मांडणी केली जाते. 'अर्थ'च्या संचालकांच्या डोळ्यासमोर अर्थशास्त्राचा अभ्यास करणारा पदवीपूर्व विद्यार्थीवर्ग, बँका, विमा-कंपन्या यांसारख्या अर्थशास्त्रीय विषयांशी निगडीत असणाऱ्या संस्थातील कर्मचारीवर्ग, तसेच महागाई, बेरोजगारी वगैरेंसारख्या मुख्यत: आर्थिक घटना समजावून घेऊ इच्छिणारा इतर वाचकवर्ग असावा अशी माझी आतापर्यंतचे त्या मासिकाचे स्वरूप पाहिल्यानंतर झालेली समजूत आहे. 'अर्थ'-संवाद' हे यापेक्षा अगदी वेगळ्या स्वरूपाचे नियतकालिक आहे. हे त्यातील संपादकीयावरून तसेच इतर मजकुरावरून दिसून येते. अर्थशास्त्रातील संकल्पनांची चर्चा, देशांतील महत्वाच्या आर्थिक समस्यांची या संकल्पनांच्या आधारे चर्चा यावर या नियतकालिकाचा भर राहणार आहे. अशा प्रकारचे एकहि नियतकालिक आज मराठीत नसल्यामुळे या नियतकालिकाचे जोरदार स्वागत करावयास हवे. आपल्या डोळ्यासमोर कोणता वाचकवर्ग आहे हे संपादकांनी स्पष्ट केलेले नसले तरी या नियतकालिकाचा वाचकवर्ग कोणता असेल याची कल्पना करणे अवघड नाही. या नियतकालिकाचा वाचकवर्ग प्रामुख्याने प्रगत अर्थशास्त्राचा अभ्यास करणारे पदव्युत्तर विद्यार्थी, महाविद्यालयांतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक, व आर्थिक समस्यांचा सखोल अभ्यास करू इच्छिणारे व अर्थशास्त्राची बरीच जाण असणारे वाचक असा राहणार आहे. यापैकी काही जणांना तरी इंग्रजी लिखाण वाचणे व समजणे जड जाते. त्यांच्यासाठी व इंग्रजी वाचणारे परंतु मराठीतही त्याच मोलाचे लिखाण वाचण्यास उत्सुक असणारे यांच्यासाठी प्रामुख्याने हे त्रैमासिक असावे असे वाटते.

कोणत्याही नियतकालिकाच्या एकाच व त्याही पहिल्याच अंकावरून त्याचे स्वरूप कसे असेल हे सांगणे कठीण आहे तरीपण या अंकातील लेख व संपादकीयात व्यक्त केलेली उद्दिष्टे यात सुसंवाद आहे हे नक्की. 'अर्थशास्त्राचे स्वरूप' हा लाडांचा लेख अर्थशास्त्रीय विचार मराठीत प्रभावीपणे व्यक्त करणे शक्य आहे. याचा सबळ पुरावाच आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेला अर्थशास्त्राचा विकास व मराठी भाषेचा विकास या दोन्ही गोष्टी साधावयाच्या आहेत, असे प्रा. पानसे यांनी परिषदेची भूमिका स्पष्ट करतांना म्हटले आहे. हे उद्दिष्टा अवघड असले तरी योग्य प्रयत्न झाल्यास असाध्य निश्चित नाही.

प्रा. सोवनींचा लेख एक मुळातच अवघड संकल्पनेची चर्चा करणारा असल्यामुळे कांहीसा क्लिष्ट झाला आहे. त्यांतून इंग्रजीतून मूळ अर्थशास्त्र शिकलेल्यांना तो अधिकच क्लिष्ट करण्याचा संभव आहे. मात्र या करण्यातील कांही भाग सवयीचा असणे शक्य आहे. पंत हा शब्ददेखील क्रेडिटपेक्षा दुर्बोध आहे असे सुरुवातीस प्रथमच मराठीतून अर्थशास्त्र शिकवणारे कांही प्राध्यापक म्हणत असत.

अर्थ-संवादासारख्या शास्त्रीय स्वरूपाच्या नियतकालिकात अनुवादित लेख येणे अपरिहार्य आहे. मात्र अनुवादासाठी लेख निवडतांना ते अतिशयच थोड्या वाचकांना वाचावेसे वाटतील अशा विषयावरील नसावेत; तसेच शक्यतो ते समजण्यासाठी विशेष ज्ञान लागेल असे नसावेत. उदाहरणार्थ या अंकात ज्या लेखाचा अनुवाद केला आहे तो लेख आहे आर्थिक इतिहासातील एक विवाद्य समस्येशी निगडीत. भारतातील उत्पादनपद्धती व संबंध यावरील मार्क्सचे विचार हा विषय आर्थिक इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांपुरता तसा मर्यादित आहे. जे थोडेफार असतील त्यांनी मूळ लेख इंग्रजीतून वाचला असण्याची शक्यताच जास्त. त्या दृष्टीने अनुवादासाठी लेख निवडतांना संपादकांनी जास्त काळजी घ्यावी व या नियतकालिकाच्या जास्तीत जास्त वाचकांना रस वाटेल असेच लेख निवडावेत ही विनंती.

या अंकात ग्रंथ-परीक्षण, आर्थिक पाहण्यांचे निष्कर्ष मांडणारे

लेख तसेच आजच्या भारतीय परिस्थितीचे विश्लेषण करणारे लेख आलेले नाहीत. पण ते पुढील अंकात येत जातील असे संपादकीय निवेदनांवरून वाटते. भारताच्या प्रचलित आर्थिक समस्येचे विवेचन करणारा किमान एक तरी चांगला लेख या त्रैमासिकांत येत जावा असे वाटते.

या त्रैमासिकाचा व ते काढणाऱ्या परिषदेचा मुख्य उद्देशच अर्थशास्त्रीय विवेचनाचा मराठीत विकास व्हावा व मराठी भाषाही त्या दृष्टीने विकसित व्हावी हा आहे. त्या दृष्टीने या अंकात वापरण्यांत आलेल्या मराठी विषयीदेखील कांही विचार व्यक्त करणे आवश्यक वाटते. अर्थशास्त्रावरील विचार व संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वापरावी लागणारी भाषा कांहीशी अवघड राहणार हे नक्की. पण जे विचार साध्या भाषेत व्यक्त करता येतात ते व्यक्त करण्यासाठी अवघड भाषा वापरणे प्रयत्नपूर्वक टाळले पाहिजे. वाचनीयता हा लेखनाचा एकमेव नसला तरी एक महत्त्वाचा गुण असला पाहिजे. मराठी नियतकालिकांतील मराठी मराठी असले पाहिजे. या दृष्टीने श्री. लाडांचा लेख अत्यंत आदर्श आहे. पण इतर लेख मात्र कांहीसे दुर्बोध आहेत आणि यातील कांही दुर्बोधता टाळता येण्यासारखी आहे. याची अनेक उदाहरणे या अंकातून दाखविता येतील. पण वानगी म्हणून कांही महत्त्वाची तेवढी पाहू.

मराठी अर्थशास्त्र परिषदेची भूमिका व कार्य स्पष्ट करतांना प्रा. पानसे यांनी 'परिषद ही एक उत्पादक स्वरूपाची संस्था होणे आवश्यक आहे', असे लिहिले आहे. तसे पाहिले तर परिषदेच्या स्वरूपाचे कार्य करणाऱ्या अनेक संस्था महाराष्ट्रांत आहे. भारत आणि चीन यांच्या आर्थिक विकासाची तुलना करणारे एक कोष्टक पान ११ वर दिले आहे. त्यात 'मापक घटक' म्हणून किलोग्रॅम्स, मिटर्स दिले आहे. या ठिकाणी मापक घटक या ऐवजी साधे माप म्हणता आले असते. मराठीत माप हा शब्द मापनाचे साधन या अर्थाने पण वापरला जातो. तसेच इंग्रजी-नामे मराठीत वापरतांना त्यांची इंग्रजीतील अनेकवचनी रूपेच मराठीत वापरली पाहिजेत असे नाही. मिटर, किलोग्रॅम हे शब्द मराठीत आज एकवचनी व अनेकवचनी या दोन्ही अर्थांनी वापरले जातात आणि यात आपण बदल करावयास पाहिजेच असे नाही. प्रा. सोवनी व्हेरिएबल्स याला प्रतिशब्द म्हणून चल हा शब्द वापरतात. त्याऐवजी चल घटक म्हटल्यास अर्थ अधिक स्पष्ट होईल असे वाटते. इंग्रजीत वापरल्या जाणाऱ्या एका शब्दाला प्रतिशब्द म्हणून मराठीतहि एकच शब्द वापरला पाहिजेच असे नाही. आपल्या सर्व अनुवादात नाडकर्णी-पळशीकर बूर्झ्वा शब्द का वापरतात कोण जाणे. याला मराठीत प्रतिशब्द नाही काय ?

हे सर्व सविस्तर लिहिण्याचे कारण हे नियतकालिक काढण्याचा उद्देश यशस्वी होण्यास मदत करावी व संपादकांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद द्यावा हेच आहे. हे नियतकालिक यशस्वी होण्यासाठी आणखी एक पथ्य पाळावे असे वाटते. **लेखकाचे लागोपाठ तीन अंकात लेख आल्यानंतर त्याला चौथ्या अंकात तरी सुट्टी द्यावी. वाटल्यास पुन्हा पुढच्या (तीनच) अंकात त्याचे लेख द्यावेत. त्यामुळे त्रैमासिकाची व लेखकाची अशी दोघांचीहि प्रकृती सुधारण्यास मदत होईल. कित्येकदा अशा स्वरूपाच्या नियतकालिकाच्या लेखकांचे एक कोंडाळे तयार होते आणि मग या कोंडाळयाला या मासिकाचा परिसार, गोतावळा असे गोंडस नाव दिले जाते. असे कोंडाळे एकच कार्य करते आणि ते म्हणजे ते नियकालिक आपल्या कोंडाळयाचेच मुखपत्र बनवते. 'अर्थसंवाद' हे खऱ्या अर्थाने संवादाचे माध्यम बनावे म्हणूनच ही सूचना आहे.**

या त्रैमासिकाचा आकार, सजावट व छपाई फारच चांगली आहे. संपादकांच्या या चोखंदळपणाचे कौतुक वाटते.

या त्रैमासिकाचे मन:पूर्वक स्वागत आणि त्यांच्या भावी वाटचालीला शुभेच्छा.

■ ■ ■

# विकृत व बिनबुडाच्या परीक्षणाचा नमुना


प्रा. मिना कुलकर्णी

प्रा. ब. शि. कुलकर्णी


शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. घुगे यांनी 'अर्थ' नोव्हेंबर – डिसेंबर १९७६ या अंकात आम्ही लिहिलेल्या 'श्री. शाहू छत्रपतींचे अर्थकारण' या ग्रंथाचे परीक्षण वाचले. त्यामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांना आमचे खालीलप्रमाणे उत्तर आहे.

१९–१२–१९७५ पासून डॉ. घुगे आमच्या ग्रंथावर हेतुःपुरस्सर, बिनबुडाची कांही ठिकाणी स्वतःच्या नावावर काही ठिकाणी एका प्राध्यापिकेच्या नावावर टीका करण्याचे प्रयत्न करीत होते, याचा पुरावा आमच्याजवळ आहे. 'रयत शिक्षण पत्रिके'त प रिक्षण जुलै १९७६ मध्ये आले होते. या दोन्ही परीक्षणात तीनचार वाक्याशिवाय काहीच बदल नाही. 'रयत शिक्षण पत्रिके'त आलेल्या टीकेची गंभीरपणे नोंद घ्यावीशी आम्हांस वाटली नाही. पण 'अर्थ'च्याही अंकात टीका आल्याने व डॉ. घुगेंची हेतुःपुरस्सर आमच्या पुस्तकावरील टीका येणाऱ्या-जाणाऱ्यांपुढे सतत चालूच असल्याने त्यांचे परीक्षणातील पितळ उघडे करणे आम्हांस भाग पडले.

पुस्तकाचे परीक्षण करायचे तर निदान पुस्तकाचे नाव नेमके काय आहे ही तरी किमान अपेक्षा परीक्षकाकडून असते. आमच्या पुस्तकाचे नाव 'श्री. शाहू छत्रपतींचे अर्थकारण' असे आहे. 'श्री. छत्रपती शाहूंचे अर्थकारण' असे नाही. पुस्तकाच्या लेखकांच्या क्रमातही बदल होत केला आहे. असलेच कांही कारण तर ते डॉ. घुगेनाच माहीत, अन्यथा ग्रंथ परीक्षणाचे साधे नियमही विद्यापीठाच्या अर्थशास्त्र प्रमुखास माहीत नसावे याचे नवल वाटते. असो.

आमचे पुस्तक प्रामुख्याने श्री. अण्णासाहेब लठ्ठे यांच्या ग्रंथात आलेल्या माहितीवर आधारलेले दिसते आहे असे डॉक्टरसाहेबांचे म्हणणे आहे.

पुस्तक 'प्राथमिक स्वरूपाचे' डॉ. घुगेंना वाटते. कुणाला आमचे पुस्तक कसे वाटावे याबद्दल आमचा मुळीच आग्रह नाही. तीन वर्षे सतत संशोधन करून एका फार मो ्या महाराजांच्या कामगिरीवर आम्ही पहिल्यांदा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. ख्यातनाम अर्थतज्ञांनी अभिप्राय देऊन गौरव केला. आमची ही अल्पशी कृती डॉक्टरांना प्राथमिक स्वरूपाची वाटली. आमचे काहीच म्हणणे नाही. डॉ. घुगेनीही राजर्षींच्या आर्थिक धोरणासंबंधी एक ग्रंथ लिहिला आहे आणि म्हणूनच खोडसाळपणे आमचा ग्रंथ प्राथमिक स्वरूपाचा आहे असे म्हटल्याचे आम्हास वाटत असल्यास त्यात गैर काही नाही.

डॉ. घुगेंचे म्हणणे आमच्या ग्रंथातील विवेचन विस्कळीत आहे व प्रकरण योजनेत विसंगती आहे. त्यांच्या पुस्तकात जशी प्रकरणे आहेत तशी दिली असता विवेचन सुव्यवस्थित झाले असते असे त्यांना म्हणावयाचे आहे काय ? प्रकरण योजना अत्यंत विचारपूर्वक, सुसंगत अशी आम्ही केलेली आहे. परत एकदा डॉक्टरांनी आमचे पुस्तक वाचावे. काहीना एकदा वाचल्यावर सर्वच गोष्टी समजू शकत नाहीत. 'पार्श्वभूमी' हे प्रकरण डॉ. घुगेंनी परत वाचावे. त्यामध्ये त्यांना ज्या गोष्टीवर प्रकाश टाकला नाही असे वाटते नेमक्या त्याच गोष्टींचा उहापोह केलेला आहे. राजर्षींच्या अठ्ठावीस वर्षांच्या कार्याचा आढावा 'पार्श्वभूमि' या प्रकरणात बसत नाही असे त्यांचे म्हणणे. आमचे ठामपणे असे म्हणणे की तो बसतो कारण तो चरित्रात्मक असा भाग आहे व तो भाग प्रथम द्यावा असे आम्हास वाटदेते. 'पार्श्वभूमी'चा अर्थ डॉक्टरांनी समजन घेणे आवश्यक आहे.

डॉक्टरांचे म्हणणे 'शेती व सहकार' या प्रकरणापासून 'पाटबंधारे' हे प्रकरण कृत्रिमपणे विभक्त ठेवले आहे. आम्हांस हे मान्य नाही. पाटबधाऱ्याच्या बाबतीत राजर्षींनी केलेले कार्य कार्य कसे उठून दिसणारे, क्रांतीकारक स्वतंत्र असे होते, हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी आम्ही जाणीवपूर्वक ते प्रकरण निराळे ठेवले आहे. राजर्षींची

'करवीर संस्थानातील कृषी प्रश्नांचे गांभीर्य दाखविताना लेखक १९७१ ची भारतीय अर्थरनेबद्दलची आकडेवारी पुरवितात हे तर विस्मयकारक वाटते' असे त्यांनी म्हटले आहे.

अजूनही शेतीचे महत्व भारतात आहे. राजर्षींच्या काळी तर शेतीचे महत्व किती असेल हा मुद्दा मांडण्याचा आमचा प्रयत्न आहे. 'विस्मयकारक' यात काहीच नाही. अर्थशास्त्राच्या एका प्राध्यापकांनी असा मुद्दा काढावा हेच आम्हांस विस्मयकारक वाटते.

त्यांचे म्हणणे रोजगारी विषयक धोरण स्पष्ट होत नाही. पान ९७ वर १८९५ मधील गॅझेटचा संदर्भ त्यानी पुन्हा एकदा वाचावा व रोजगारीचे तक्ते पान ९८–९९ वर दिलेले आहेत तेही शांत चित्ताने त्यांनी वाचावेत.

महाराजांच्या खाजगी व्ययासंबंधी पुणेकरांनी उठविलेल्या गदारोळासंबंधी खरेखोटेपणा तपासून पहावे असे विधान डॉक्टरांनी केले आहे. या गदारोळाची सत्यता पटली असती तर आम्ही हा ग्रंथ लिहिण्याचा प्रपंच केलाच नसता हे कुणाहि सुज्ञास आमचा ग्रंथ वाचून समजेल. शिवाय डॉ. घुगेंची पी. एचडी. अर्थशास्त्रातील सार्वजनिक आयव्यय या क्षेत्रातील आहे, असे असूनही त्यानी राजर्षींनी केलेल्या खाजगी खर्चाला सार्वजनिक खर्चापेक्षा महत्वाचे स्थान द्यावे याचे नवल वाटते.

'दळणवळणाची साधने' याविषयी स्वतंत्र प्रकरण नाही असे टीकाकार म्हणतात.

आमच्या ग्रंथात ऐतिहासिक विपर्यास आहे व चुकीची माहिती आहे, असा गंभीर आरोप डॉक्टर करतात. न्या. रानडे, ना. गोखले व राजर्षींचे संबंध कशा तऱ्हेचे होते. याबाबतीत आम्ही खालील पुरावे सादर करीत आहोत. रानडे-गोखले यांच्याबद्दल महाराजांना फार आदरभावना होती. डॉ. घुगेंना रानडे–गोखले एका विशिष्ट वर्गाचेच वाटत असावेत व त्यामुळे त्यांना आदरभावना वाटत नसल्यास कोणाचेच काही म्हणणे नसावे. पण महाराजांना आदरभावना होती हेच आम्हांस सांगायचे होते. जुलै १९२० मध्ये कर्नाटक ब्राह्मणेत्तर सामाजिक परिषद हुबळी शहरात भरली होती. त्या सभेमध्ये महाराज म्हणतात. ...... (पान १०५ 'राजर्षी श्री. शाहू महाराजांची भाषणे' – संपादक भगवानराव जाधव). "त्यांनी कधी जातीपातीचा विचार केला नाही. याबाबतीत त्यांनी कै. रानडे व कै. गोपाळ कृष्ण गोखले यांचा आदर्श ठेवला होता. (दैनिक पुढारी – राजर्षी शाहू छत्रपती जन्मशताब्दि विशेषांक २६ जुलै १९७४ पान – ३ 'उपेक्षितांना प्रतिष्ठा देणारे छत्रपती शाहू' ना. यशवंतराव चव्हाण यांचा लेख.)

"...गांधीजींनाही त्यांनी नुसतेच मिस्टर गांधी असे म्हटले आहे. पण न्यायमूर्ती रानडे यांचा उल्लेख महात्मा या विशेषणाने केला आहे. यावरून रानड्यांसंबंधी त्यांना किती आदर वाटत होता हे दिसून येते." (दैनिक पुढारी 'राजर्षी शाहू छत्रपती जन्मशताब्दि विशेषांक २६ जुलै १९७४ पान ५ आमचे शाहू महाराज' श्री. श्रीपाद जोशी यांचा लेख.)

"...कै. रानडे व गोखले यांच्यासारख्या उदारमतवादी ब्राह्मण लोकांशी महाराजांनी या प्रश्नासंबंधी (शिक्षण) चर्चा केली होती... अशा बाबतीत यांच्यासारख्या खऱ्या ब्राह्मणांच्या सल्ल्यापासून महाराजांना जो फायदा घडत होता तो उघड बोलून दाखविण्यास महाराज कधीही हयगय करीत नसत. महाराजांचा आपल्या चारित्र्याच्या अगदी प्रारंभी यांच्याशी संबंध घडला... ('श्री. शाहु छत्रपती यांचे चरित्र' – श्री. आ. बा. लठ्ठे पान १२७).

"...आणि ज्या शाहू महाराजांनी महर्षी रानडे यांना गुरु म्हणून पुढे संबोधिले ते न्यायमूर्ती रानडे याच साली वारले." (पान १० – 'राजर्षी शाहू – काल, विचार आणि कार्य' संपादक डॉ. एस. एस. भोसले – लेखाचे नाव ('शाहू पूर्वकाळ – आगेमागे' ले. रा. ना. चव्हाण.)

"...शाहू महाराजांचे नेमस्त दुसरे गुरु गोपाळराव गोखले. हे १९१५ साली अचानक मृत्युमुखी पडले. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांच्या चळवळींना न्यायमूर्ती रानडे यांच्यानंतर विशेष पोषक असलेला गुरु नाहीसा झाला व मोठी पोकळी निर्माण झाली..." (कित्ता पान ११) "...रानडे यांना शाहू महाराजांनी गुरु केले याचे कारण रानडे मराठा व तत्सम विद्यार्थ्यांना शिक्षणार्थ उत्तेजन द्यावे या मताचे होते. 'बहुजन समाज सुधारल्याशिवाय लहानशी ब्राह्मण जात काय करू शकेल?" असा विचार व्यक्त करून कै. गंगाराम भाऊ म्हसके वकीलांच्या नेतृत्वाखाली न्यायमूर्ती यांनी ८ जानेवारी १८८३ रोजी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन (पुणे) ही पहिली थोर अशी मोठी संस्था स्थापन केली." (कित्ता – २०४–२०५).

"...रानडे-गोखले यांची जनता शिक्षणविषयक सक्रीय कळकळ अनुभवल्यामुळे त्यांना राजर्षींनी गुरु मानले... (तित्ता – २०६).

"...पुणे येथील कै. गंगाराम भाऊ म्हस्के, न्यायमूर्ती रानडे, ना. गोखले यांच्याशी ते शैक्षणिक कार्याबाबत वेळप्रसंगी चर्चा करीत व त्यांचा सल्ला घेत..." ("कोल्हापूरचे शाहू छत्रपती – चरित्र व कार्य" ले. ए. के. घोरपडे पान ४४).

डॉक्टरांचे म्हणणे आम्ही ऐतिहासिक विपर्यास केला. त्यांचे अजब तर्कशास्त्र काय तर न्या. रानडे १९०१ मध्ये वारले व राजर्षींच्या क्रांतिदर्शी कार्याची भक्कम सुरुवात १९०२ पासून सुरू झाली. तेव्हा रानडेंचा सल्ला घेण्याचा सल्ला घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वरील पुराव्यांनी डॉक्टरांचा भ्रमनिरास दूर व्हावा. वस्तुनिष्ठ दृष्टीने कोणत्याही ग्रंथाकडे पाहण्याचे त्यांनी लवकर शिकावे अन्यथा वाचकांना उगाचच फसविण्याचे सोडून द्यावे अशी आमची कळकळीची विनंती आहे.

खोडसाळ विधाने करून चकविण्याचा प्रयत्न ते आपल्या परीक्षणात करतात. महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव राजर्षींच्या विचारावर पडला नव्हता असे विधान कुठेही आम्ही आमच्या ग्रंथात केलेले नाही. महाराजांच्या सामाजिक विचारात म्हणता फुल्यांचा सिंहाचा वाटा आहे हे कोणीही नाकारू शकत नाही.

दादाभाई नवरोजींच्या बाबतीतही आमच्यावर त्यानी टीका केली आहे. "दादाभाई नवरोजींचे तात्कालिन आर्थिक प्रश्नासंबंधीचे लिखाण म्हणजे नुसती (विघातक) टीका होय." असे आम्ही प्रकरण १ मध्ये म्हटल्याचे डॉक्टर म्हणतात. आमच्या संपूर्ण ग्रंथात कोठेही वरीलप्रमाणे विधान नाही. 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही पदवी घेतलेल्या प्राध्यापकाला अशा तऱ्हेने आम्ही न लिहिलेल्या वाक्यांचा आधार घेऊन वाचकांना फसविणे मुळीच शोभादायक नाही. आर्थिक परिस्थितीबाबत त्याकाळी दोन गट प्रामुख्याने होते. दादाभाई, रमेशचंद्र दत्त व सुब्रण्यम अय्यर यांची ?' दृष्टी जास्त टीकात्मक होती.' रानडे यांची बृष्वी विधायक होती, असे आम्ही लिहीले आहे. (पान ४) दादाभाईची भूमिका एका टोकाची व जास्त टीकात्मक होती. दादाभाईंची भूमिका स्वीकारणे महाराजांत तत्कालिन कोल्हापूरची राजकीय परिस्थिती पाहता शक्य नव्हते हे कोणाहि सुरू पाहता शक्य नव्हते हे कोणीही सूज्ञ वाचकास समजेल. न्यायमूर्ती रानडेंची सुद्धा २४-११-१९०० मध्ये दादाभाईंच्या फोटोचे उद्‌घाटन करताना खालील उद्‌गार काढले आहेत.

"It may be said, added Rahade, that in the work of reconciliation, Dadabhai's extreme position' had not bee n so helpful and so serviceable to the cause of India zs they might have expected..." ('Dadabhai Naoroji—The Great old Man of India' – R. P. Mansani Page 425.)

दादाभाई, रानडे, गोखले यांच्या आर्थिक विचारांची तुलना करून कोण श्रेष्ठ, कोण कनिष्ठ असा मुद्दा आमच्या ग्रंथांत कोठेही नाही. तेव्हा 'दादाभाईंच्या विचारांची विल्हेवाट आम्ही लावतों' असा बिनबुडाचा व गंभीर आरोप कुठल्या आधारावर डॉक्टर पुगे करतात हे आम्हांस समजू शकत नाही.

डॉक्टर म्हणतात की आमच्या ग्रंथात (पान २३) 'हिंदुस्थान सरकारने त्या काळात शेती सुधारणेकडे कोठेही लक्ष दिले नाही.' वाक्य तसे नाही. 'ब्रिटिशांच्या कारकिर्दीत शती सुधारणेकडे पुरेसे लक्ष पुरविले गेले नाही. (पान २३). यापुढे डॉक्टरांनी नीट वाक्य उद्‌धृत करावीत. आमचे वरील विधान अजूनही बरोबर आहे असे आम्हास वाटते. आणखीन् एक अत्यंत चुकीचे व आमच्या ग्रंथात नसलेले विधान ते करतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे 'समकालीन भारतात इतर कोणीच मानवी गुंतवणूक केली नाही.' आमचे विधान खालीलप्रमाणे आहे :

'ज्या घटकाकडे – मानवी गुंतवणुकीकडे भारतात त्यावेळी कोणीही फारसे लक्ष पुरविले नव्हते...' (पान १०६) 'फारसे' हा शब्द डॉक्टरांनी हेतु:पुरस्सर, खोडसाळपणे गाळला आहे. शिवाय 'पार्श्वभूमी' या प्रकरणात पान ७ वर, आम्ही बडोदा संस्थान व म्हैसूर संस्थानांचा खास उल्लेख केलेला आहे. सर्वांत महत्वाचा मुद्दा म्हणजे बाकीच्या संस्थानात व खुद्द ब्रिटिश मुलुखात मानवी गुंतवणूक बऱ्याच ('प्रचंड' रयत शिक्षण पत्रिका – जुलै १९७६) प्रमाणात होत होती, असे डॉक्टर महाशयांचे म्हणणे आहे. राजर्षींचे कार्य त्यांना प्रचंड व क्रांतीकारक वाटत नाही असेच आम्ही समजायचे काय ?

आमच्या ग्रंथात काही संकल्पना चुकीच्या पद्धतीने वापरल्या व त्यामुळे विवेचन संदिग्ध झाले अशी खोडसाळ, टीकाकारांच्या अर्थशास्त्राच्या ज्ञानाबद्दल शंका प्रदर्शन करणारी विधाने त्यांनी केलेली आहेत. आम्ही 'हरितक्रांती'ची व्याख्या कोठेच दिली नाही असे त्यांचे म्हणणे ग्रंथात घेतलेल्या सर्वच संकल्पनांची व्याख्या देणे कोणत्याही लेखकाला शक्य नसते. काही गोष्टी गृहीत धरून चालावे लागते. डॉक्टरांना हरितक्रांती ही संकल्पना माहीत नसेल तर आम्ही जरूर संबंधीत ग्रंथाची यादी सांगू. शिवाय महाराजांनी हरितक्रांती घडवून आणली असे आम्ही कोठेच म्हटले नाही. महाराजांनी 'राधानगरी' धरण बांधून हरितक्रांतीचा पाया घातला व त्याबाबतीत महाराजांना आम्ही हरितक्रांतीचे जनक म्हणून म्हटलेले आहे. अजूनही या विधानाशी आम्ही चिकटून आहोत.

बागाईत जमिनीविषयी दिलेली आकडेवारी डॉक्टरांना धक्का देणारी वाटली. त्यात त्याना विसंगती वाटली. वास्तविक

यांचे हेविधानच फार धक्कादायक आहे. १९११–१२ मध्ये १५५५७ एकर जमीन बागाईत होती. ती १९१९–२० मध्ये ३०१९५ एकर झाली. १९२०–२१ मध्ये त्यास अपवाद झाला व तो आकडा २३३१९ एकर इतका झाला पण लगेच दुसऱ्या वर्षी १९२१–२२ मध्ये तो आकडा २९९९५ (अंदाजे ३० हजार एकर इतका झाला (पान ६०). बागाईत क्षेत्र जवळ-जवळ दुप्पट झाले या सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट गोष्टीत डॉक्टरांना 'विसंगती' दिसते याला काय म्हणावे ? (पान ६०) परत नीट वाचावे म्हणजे त्यांच्या मनाची विसंगती कुठे जुळते का कळेल. महाराजांनी बागाईत क्षेत्र वाढविले नाही असे म्हणायचे आहे काय ? तसे असेल तर महाराजांचे अर्थशास्त्रीय विचार व कोल्हापूर संस्थानची आर्थिक प्रगती डॉक्टरांना समजलेली नसावी असे आम्हास वाटते.

चहा-कॉफी, वेलदोडे इत्यादि पिकांसंबंधी आम्ही दिलेली आकडेवारीही त्यांना समजलेली दिसत नाही. या लागवडी करण्यापाठीमागे महाराजांची क्रांतीकारक उपक्रमशीलता होती. प्रत्यक्ष किती एकर जमीन या पिकाच्या लागवडीखाली होती व त्यापासून मिळकत किती मिळाली हा मुद्दा आमच्या म्हणण्याप्रमाणे गौण आहे. महाराजांची उपक्रमशीलता येथे आम्हास मोलाची वाटते. नवीन-नवीन प्रयोग करण्यापाठीमागची शेती संशोधन, नवीन नवीन प्रयोग, घावटळ भागातील जमीन पडीक ठेवण्यापेक्षा त्यामध्ये काही तरी पीक काढून डोंगराळ भागातील लोकांना रोजगारी मिळेल हा महाराजांचा हेतू होता. यामध्ये महाराजांना फारसे यश आले नाही हे आम्ही (पान २९) वर सांगितले आहेच. डॉक्टरांना या उपक्रमशीलतेचे महत्व समजत नाही यास आमचा नाईलाज आहे.

'मानवी गुंतवणूक' हे प्रकरण डॉक्टरांना फार घोटाळ्याचे वाटते. डॉक्टरांना मानवी गुंतवणूक ही संज्ञा माहीत असावी, अशी आशा आहे. महाराजांचे सर्वात मोठे, डोळ्यात भरण्याजोगे, आधुनिक आर्थिक दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी केलेली प्रचंड प्रमाणावरची मानवी गुंतवणूक. डॉक्टरांच्या ग्रंथांत यावर प्रकरण नसल्याने आम्हास वरील शंका येते. 'जे मुद्दे इतरत्र चर्चेला घेतले नाहीत ते या प्रकरणांत समाविष्ट केले आहेत की, काय असा वाचकाला संशय येतो' असे त्यांचे म्हणणे. आरोग्य, मनोरंजन इत्यादींवरचा खर्च मानवी गुंतवणुकीत कसा काय येतो असा प्रश्न त्यांनी मांडला आहे. खाली आम्ही काही पुस्तकांची नावे देत आहोत. ती त्यांनी वाचावीत म्हणजे त्यांच्या मनातील 'घोटाळा' दूर होईल

Myrdal "Asian Drama Vol. III", I. L. O. "The Quality of Labour and Economic Development in Certain Countries". Havbison and Myers–"Education, Manpower and Economic Growth," Jha The Economic Development–Ends and Means", Papers Read at the Indian Economic Conference 1965–"Investment in Human Resources". Hanson & Brembeck – "Education and Development of Nations" हरबिशन व मायर यांच्या "Edu- cation, Manpower and Economic Growth"

"......Measures of capital formation based on fixed capital are deficient, as Simon Kuznets has pointed out, because they omit expenditures for education, non profit research, health, recreation etc. which 'contribute to economic growth by increasing the efficiency of a complext productive system......"

हा दुसरा उतारा पहा :

"......Broadly, investment in human resources would cover the expenditure on education, on the-job training, health, sanitation and nutrition and some of the labour and social welfare programmes......" (P. VII "Imvestment in Human Resources" Papers Read at the Indian Economic Conference 1965).

कोणता खर्च मानवी भांडवल गुंतवणूक म्हणावा, कोणता 'मेन्टेनन्स' समजावा याबाबत अजून अर्थशास्त्रज्ञांमध्ये चर्चा चालूच आहे. ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ सायमन कुझनेटस् काय म्हणतात पहा :

"However, other components now included under consumption could be viewed as capital investment, not because the expenditure is on durable goods with large unit values, because the use of the good is closely related to the efficiency of the consumer as a producer. The main item in question is outlays on education (Formal or on-the-job training) and there are some related outlays on health care and recreation......If direct costs of formal education alone are over 20 per cent of gross capital formation, outlays on education health and recreation, treatable as investment in man, may well be as high as four tenths of capital formation......" (Simon Kuznetsa "Modern Economic Growth" Page 228–229.)

एकंदरीत डॉक्टरांना घोटाळयाची व 'जे मुद्दे इतरत्न चर्चेला घेतले नाहीत...' इत्यादी स्वतःचे अज्ञान दाखविणारी जी विधाने त्यांनी आपल्या परीक्षणात (?) केलेली आहेत ती गैर-लागू व फसवी आहेत. डॉक्टर घुगेंनी 'मानवी गुंतवणूक' या संकल्पनेचा संपूर्ण अभ्यास करून मग टीका केली असती तर आम्हास आनंद झाला असता.

दुष्काळाकडे आधुनिक दृष्टीकोनातून कसे पाहिले जाते याबद्दलचा संदर्भ आमच्या ग्रंथात पान १४५ वर दिला आहे. अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे व सामाजिक शास्त्रा-वरील एनसायक्लोपिडिया सामाजिकशास्त्र शिकविणाऱ्या प्राध्यापक-डॉक्टरांनी संदर्भासाठी तरी वाचावा-चाळावा अशी किमान अपेक्षा असण्यास हरकत नसावी. एनसायक्लोपिडिया ऑफ दि सोशल सायन्स व्हॉल्युम ६ यामध्ये फ्रँक साऊथार्ड यांनी केलेले संबंधित विवेचन त्यांच्याच शब्दात आम्ही खाली देत आहोत :

"......Famine in India has been defined as 'only the exceptional aggravation of a normal misery......In famine regions imported food has been obtainable but the widespread and extreme poverty of the rural population has made the purchase of such food largely impossible......" (Page 86)

"Poverty stricken urban dwellers may starve to death but ample food exists......" (Page 85)

अमेरिकेतसुद्धा १९३०-३१ मध्ये काय झाले पहा :

"......When famines do occur in occidental societies the farmers are especially affected as in the famine stricken area in the United States in 1930-31, when poverty of the farmers made it impossible for them to purchase sufficient food from the ample supply existing in the country... (P. 85)

"......India although constantly threatened with local food shortage has evolved a system of relief which has mitigated sufferings in famines in which poverty rather than actual food shortage is the chief characteristic...(P. 89)

थिओडर मारिसनच्या पुस्तकातील खालील उतारा पहा :
"The development of Railway communication has thus, by the end of the century, deprived a 'famine' of one of its greatest terrors. Even in areas in which the crops have totally failed food is now to be had in abundance. The price, however, is high, and the people thrown out of work by the interruption of their industry have no means of purchasing it..." (Page 271 Theodore Morisona -- "The Industrial organisation of An Indian Province.")

१९४२-४३ सालचा आधुनिक काळातला बंगालचा दुष्काळ डॉक्टरांना माहीत असावयास हरकत नसावी. त्या दुष्काळाची चौकशी करण्यासाठी सर जॉन वुडहेड् यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमले होते. त्यात म्हटले आहे पहा :

"On the 13th of May, the Commissioner of Burdwan Division reported : 'Economic conditions approaching a crisis. Rice out of reach of the poor. Rice should be imported if people are not to starve......"

"Noakhali......" High prices keeping people on one meal.

"Chittagong..." May people starving in Chittagong district owing to high prices" (Chapter VII (P. 40-41)

"Prices rose rapidly and by January 1943 had reached levels never before known in Bengal. This rise in prices continued unchacked and converted a shortage of supply into a famine. The rise of prices, which we hold to be the second basic cause of the famine, was something more than the natural result of the shortage of supply, which had occured......" (Chapter XIaPage 80 'Famine Inquiry Commission'--Report on Bengal).

वरील संदर्भावरून चटकन लक्षात येईल की, आम्ही स्वतः दुष्काळाची व्याख्या मुळीच केली नाही. कोणतीही संकल्पना, आम्ही स्वतः प्रथमतः सांगितली आहे असा दावा आमचा नाही. तेव्हा 'तथाकथित आधुनिक व्याख्या' असली परीक्षणातली विधाने डॉक्टरांचे संभ्रम दर्शविते. नुसत्या वस्तूंच्या किमती वाढल्या म्हणजे 'दुष्काळ' असा सूर वरील विवेचनावरून येत नाही. पण टीकाकार तर्कदुष्ट विधान करतात की, १९५६ पासून भारतात किमती वाढतात तर ही सगळी वर्षे दुष्काळी समजायची का ? डॉक्टरांची ही शब्दांची सर्कस कोणत्या तर्कशास्त्रात बसते हेच मुळी आम्हास समजू शकत नाही.

महाराजांचे कर्तृत्व कमी लेखणारा असा एक परिच्छेद आपल्या टीकेत डॉक्टरसाहेब लिहून गेले आहेत. ते म्हणतात, 'करवीर संस्थान आजच्या एका जिल्ह्याएवढे. शिवाय इतर विस्तृत ब्रिटिश प्रदेशाशी खुला व्यापार अशा परिस्थितीत कर-

वीरातील किंमत पातळी बहुअंशी ब्रिटिश हिंदुस्थानातील मागणी-पुरवठा पातळीवर अवलंबून असणार यामुळेच तर करवीर संस्थानात १९०४ पासून किमती वाढत गेल्या. . .' महाराजांचा आर्थिक दृष्टिकोन व आर्थिक कामगिरी डॉक्टरांना खास करून समजलेली नसावी अशी आमची ठाम समजूत झाली आहे. कोल्हापूर हे अन्नधान्याच्या दृष्टिकोनातून तुटीचे संस्थान असूनसुद्धा केवळ महाराजांच्या दूरदृष्टीमुळे, दीर्घकालीन, व्यवहारी, योग्य अशा आर्थिक धोरणामुळे किमतीची पातळी ही सर्व हिंदुस्थानच्या किमतीच्या पातळीपेक्षा कमी होती यासाठी आम्ही खालील आधार देत आहोत.

INDEX NUMBER OF PRICES OF RICE

| | | |
|---|---|---|
| 1896 | 154 | ALL INDIA |
| 1897 | 208.3 | " |
| 1893 | 164.3 | " |

(Page 185 "Currency & Prices In India"--Vakil & Muranjan.)

वरील वर्षे दुष्काळी होती. हिंदुस्थानात १८९७ मध्ये १८९६ मधील किमतीशी तुलना केली असता तांदुळाच्या किमतीत ३५% वाढ झाली होती व १८९८ मध्ये १८९६ मधील किमतीशी तुलना केली असता तीत ७% वाढ झालेली होती.

कोल्हापूर संस्थानात हीच वाढ १८९७ मध्ये २३% आहे व १८९८ मध्ये तर तांदुळाच्या किमतीत घट झालेली दिसून येईल.

KOLHAPUR STATE
(PRICE OF RICE PER MOUND)

| | Rs. | Annas | Pies |
|---|---|---|---|
| 1896 | 3 — | 7 — | 9 |
| 1897 | 4 — | 8 — | 11 |
| 1998 | 3 — | 7 — | 7 |

(source–Report on Administration of Kolhapur state–1896, 97, 98, 99.)

वास्तविक कोल्हापूर संस्थानात किंमतीची पातळी ब्रिटिश प्रदेशापेक्षा जास्त असती तरी महाराजांना दोष आला नसता, कारण कोल्हापूर संस्थान हे अन्नधान्याच्या बाबतीत तुटीचे संस्थान होते. पण राजर्षींच्या वास्तव अर्थशास्त्रीय धोरणामुळे व त्यांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे येथे तर वस्तूंच्या किमतीची पातळी कमी झाली. आता ही गोष्ट जर टीकाकारांना उमगली नसेल तर तो दोष आमचा मुळीच नव्हे.

पुस्तकात नसलेली वाक्ये, आगापिछा संदर्भ न देता वाचकांना गोंधळून टाकणारे आणखी एक विधान वरेचसे गंभीर असे – डॉक्टरांनी केले आहे. "भोंगळ विवेचनाचा या प्रकरणात आलेला एक मुद्दा असा. दुष्काळी वर्षात महाराजांना सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचा भत्ता वाढवला तसा शाळामास्तरांचाही. पण लेखकद्वय शाळा मास्तरचा भत्ता वाढविला या मुद्द्यास धरून असे म्हणतात की, आपला गुरु फ्रेझरबद्दल आदरभाव व्यक्त करण्यासाठीच महाराजांनी तसे केले."

आम्ही वर केलेल्या विधानाप्रमाणे कोठेही लिहिले नाही. आमच्या ग्रंथात पान १५४ वर खालीलप्रमाणे विधान केलेले आहे :

"महाराजांच्या नजरेतून शिक्षक सुटले नाहीत. शिक्षकांनासुद्धा धान्याच्या स्वरूपात दुष्काळी भत्ता दिला गेला. महाराजांची जडणघडण श्री. फ्रेझर या ब्रिटिश विद्वान व शिक्षकी पेशाला वाहून घेणाऱ्या शिक्षकाकडे झाल्याने, अगदी लहानपणापासून फार चांगले संस्कार महाराजांवर झाले होते. चांगला शिक्षक काय करू शकतो, त्याची सांपत्तिक स्थिती कशी असते याची पुरेपूर कल्पना महाराजांना होती म्हणूनच त्यांचे लक्ष दुष्काळाच्या काळात शिक्षकांच्याकडे वळले."

शिक्षकाच्या सांपत्तिक स्थितीची पुरेपूर कल्पना असल्याने त्यांचा भत्ता वाढविला असा सरळ सरळ यातून अर्थ निघतो. भोंगळपणे वाचल्यावर टीकाही भोंगळच होणार.

आमच्या ग्रंथात आलेख आहेत. डॉक्टरांच्या पुस्तकात आलेख नाहीत. तेव्हा डॉक्टरसाहेब म्हणतात, "आमच्या ग्रंथातील आलेखांचा काहीच उपयोग होत नाही. आलेखाचे ज्ञान असणाऱ्यांना त्यांचा उपयोग होईल असे आमचे प्रांजळपणे म्हणणे आहे. सूज्ञ वाचकांनी ते ठरवावे."

"ग्रंथाची भाषा सहज व सोपी वाटत नाही. बोजड वाक्यरचना असल्यामुळे वाचकास पदोपदी अडखळल्यासारखे होते", असे डॉक्टर घुगे म्हणतात. मराठी भाषा त्यांच्याकडून शिकण्याचे भाग्य आम्हास लाभले नाही ही फार चांगली गोष्ट झाली नाही, असे आम्ही मानतो. 'राजर्षी' शाहू गौरव ग्रंथ समिती'चे अध्यक्ष आमदार पी. बी. साळुंखेनी आपल्या अभिप्रायात अर्थशास्त्रासारखा क्लिष्ट विषय आम्ही प्रासादिक व ओघवती भाषेत सुबोध करून दाखविला आहे असे म्हटले आहे. लोकसभेचे विद्यमान सभासद श्री. बाळासाहेब मानेंनी आमच्या पुस्तकाचे वैशिष्ठ्य 'सुबोधता' म्हणून वर्णन केले आहे. शिवाय महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक श्री. पु. ल. देशपांडे म्हणतात, ". . .शाहू महाराजांच्याच नव्हे तर अर्थशास्त्रीय विषयावर इतक्या सुबोध रीतीने लिहिलेले पुस्तक क्वचितच पहावयास मिळते. . ." (पत्र दि. १५–५–१९७६). आम्ही वरील विद्वान लोकांची प्रतिक्रिया ओघानेच मानली आहे. केवळ काही तरी टीका करायची म्हणूनच हा भोंगळ टीकेचा प्रपंच. शेवटी आणखीन एक विधान ते करतात, "आश्चर्य असे की, हे लेखकद्वय प्रस्तुत पुस्तक संशोधनात्मक आहे असा दावा आपल्या प्रस्तावनेत आवर्जून करतात." डॉक्टर घुगेनी "Social Science Research Methods" (Pages 124 to 154)
हा ग्रंथ जरुर वाचावा. व 'संशोधन' म्हणजे काय हे समजून घ्यावे. ही विनंती. ■

# अर्थसंकल्प १९७७–७८
## स्वायत्त खेड्याकडे वाटचाल

प्रा. अ. कृ. पोफळे

**अर्थमंत्र्यांनी १७ जून रोजी सादर केलेल्या अंदाजपत्रकातील ठळक गोष्टीकडे प्रा. पोफळे यांनी या लेखाद्वारे आपले लक्ष वेधले आहे.**

कोणत्याही अर्थव्यवस्थेत अर्थसंकल्पास अनन्यसाधारण महत्त्व असते. सरकारी उत्पन्न व खर्च याचे बरेवाईट परिणाम अर्थव्यवस्थेवर म्हणजेच जनतेवर होत असतात. या 'जनता बजेट' चे याशिवायही एक आगळेच महत्त्व आहे. नव्या सरकारच्या आर्थिक धोरणांचे सुस्पष्ट प्रतिबिंब अंदाजपत्रकात उमटत असते. नव्या अर्थसंकल्पात ग्रामीण भागात गुंतवणूक वाढवून प्रत्येक खेडे स्वायत्त बनविण्याकडे अधिकाधिक लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे.

मंत्रिमहोदय यांनी ज्या आर्थिक परिस्थितीत लोकसभेला अंदाजपत्रक सादर केले त्याचाही उल्लेख ओघाने येतो. श्री. हिरूभाई पटेल यांनी दि. १३ जून रोजी संसदेस सादर केलेल्या १९७६–७७ च्या आर्थिक स्थितीच्या आढाव्यावरून देशाच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते.

औद्योगिक उत्पादन, परकी चलन गंगाजळी, आयात-निर्यात व्यापार यांमध्ये वाढ यासर्व जमेच्या बाजू आहेत. १९७५–७६ या वर्षाच्या तुलनेने या वर्षाच्या प्रगतीचे वर्णन 'असमाधानकारक' असे केले जाते. अहवालाच्या वर्षात राष्ट्रीय उत्पन्न दोन टक्क्याहून कमी प्रमाणात वाढले. आदल्या वर्षी वाढीचे प्रमाण ८.५ टक्के होते. याचे प्रमुख कारण म्हणजे शेती आघाडीवर झालेली पीछेहाट होय. १९७५–७६ या वर्षी अन्नधान्य उत्पादन १२.०८ कोटी टन होते. तर १९७६–७७ या वर्षी ते ११.१ कोटी टन होते. या काळात बेकारीतही वाढ झाली. संघटित क्षेत्रातील एकूण रोजगारीत ५.२ टक्के वाढ झाली. असे असले तरी बेकारांची संख्याही वाढली. सेवा-योजना केंद्राच्या नोंदीप्रमाणे बेकारांची संख्या ४.८ टक्क्यांनी वाढून ९७.७ लक्षांवर गेली. १९७५ मध्ये सुशिक्षित बेकारांची संख्या ४८ लाख होती ती १९७६ मध्ये ५१ लाख झाली. १९६०–६१ च्या तुलनेने दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठणाऱ्या लोकांच्या प्रमाणात वाढ झालेली असून त्यातूनच बेकारी व दारिद्र्याचे दुष्टचक्र निर्माण झालेले आहे. या दुष्टचक्र भेदाचे 'अभिमन्यु-कार्य' श्रीयुत पटेल यांना करावे लागेल.

### अंदाजपत्रकाची कांही खास वैशिष्ट्ये

देशाच्या आर्थिक आघाडीवरील काहीशा पीछेहाटीच्या परिस्थितीत नवे अंदाजपत्रक मांडलेले आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेताही नव्या अर्थसंकल्पाबाबत थोडे आशावादी राहाण्यास हरकत नाही. ग्रामीण भागातील खेडुताला मध्यवर्ती घटक मानून त्याच्या सर्वांगीण प्रगतीवर लक्ष केंद्रित केले गेले आहे. या अंदाजपत्रकाचे वर्णन 'सामान्य माणसाचे अंदाजपत्रक' असेही केले जात आहे.

भारत हा शेतीप्रधान असून अजूनही सुमारे ८० टक्के लोक शेती व तत्सम स्वरूपाच्या व्यवसायावरच अवलंबून असल्यामुळे अर्थसंकल्पात शेतीच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष पुरविले आहे. तसेच ग्रामीण लघु व कुटीर उद्योग याकडे अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

### शेतीचे पुनरुत्थान

शेतीच्या उत्पादनवाढीवरच सर्व अर्थव्यवस्थेचे स्थैर्य अवलंबून आहे. या हेतूनेच शेतीउत्पादनवाढीवर भर देण्यात आलेला आहे. किंबहुना ग्रामीण भागातील प्रत्येक घरास आर्थिक व त्यायोगे सामाजिक स्थैर्य व प्रतिष्ठा मिळवून देण्याचा हेतु आहे. पाटबंधारे योजना, खते, बीवियाणे इ. महत्त्वाच्या शेती बाबींवर ३०२४ कोटी रुपये खर्च होणार आहेत. एकूण खर्चाच्या तुलनेने हा खर्च ३०.४ टक्के एवढा आहे. शेती उत्पादनाचा सुयोग्य मोबदला शेतकऱ्याच्या पदरात पडण्यासाठी त्यांना

आपले शेतीउत्पादन नजीकच्या बाजारपेठेत नेता यावे यासाठी ग्रामीण भागांतील रस्त्यांचा विकास घडवून आणण्यात येणार आहे. यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली असून राज्यसरकार व स्थानिक संस्था आपल्या कुवतीनुसार या कार्यक्रमाससहाय्य करून हे उद्दिष्ट सिद्धीसनेतील.

वीज : विद्युत् विकासासाठी २३४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याखेरीज ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सेवेसाठी ग्रामीण विद्युत् महामंडळाला २० कोटी रुपये देण्यात येणार आहेत.

पाटबंधारे : शेती उत्पादन वाढविण्यासाठी पाणीपुरवठ्यावर लक्ष केंद्रित केले आहे. राज्यांना पाटबंधारे प्रकल्पांसाठी कर्जे देण्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शेतकी, अर्थ आणि विकास महामंडळ व इतर कर्ज देणाऱ्या संस्थांकडून २६० कोटी रुपयांची तरतूद लहान पाटबंधाऱ्यासाठी करण्यात आलेली आहे.

ग्रामीण विभागासाठी एकसंध कार्यक्रम : ग्रामीण विभागाचा सर्वांगीण विकास होण्याच्या हेतूने संपूर्ण खेडे एक घटक मानून त्याचे स्वायत्त करण्यासाठी विकासाचा एकसंध कार्यक्रम आखण्यात आला. या कार्यक्रमान्तर्गत शेतमाल उत्पादन, गुरांचे जतन, कुक्कुटपालन, मत्स्योत्पादन, वनसंवर्धन याशिवाय दूध्रनिर्मित उत्पादनास सुयोग्य किंमती मिळाव्या म्हणून दुग्धव्यवसायाचे सहकारी तत्त्वावर पुनर्गठन करणे, शेतीच्या आधुनिकीकरणास चालना देणे, ग्रामीण भागातच रोजगारसंधी उपलब्ध करणे. मागणीनुसार पुरवठ्यात सुधारणा होण्यासाठी कापूस, तेलबिया, गळिताची धान्ये आणि डाळी यांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यावरच सरकारचा भर राहील यामुळे भाववाढीला पायबंद बसेल.

पिण्याचे पाणी : नियोजनाची तीन दशके पूर्ण होत आली असूनही पुष्कळशा खेड्यामध्ये पिण्याच्या पाण्यासारखे अतिशय सामान्य प्रश्नही सुटू शकलेले नाहीत याची नोंद घेऊन वित्तमंत्र्यांनी आगामी पाच वर्षातच या अत्यावश्यक सेवेचा लाभ सर्वांना उपलब्ध होईल, अशी आशा व्यक्त केली. याची सर्व जबाबदारी राज्यसरकारची असूनही केंद्राचा हातभार म्हणून चालू वर्षाच्या खर्चाच्या तरतुदीव्यतिरिक्त आणखी ४० कोटी रुपयांची व्यवस्था करण्यात आली आहे. आगामी वर्षात यात आवश्यकतेनुसार वाढ करण्यात येणार आहे.

स्वायत्त खेडे : खेड्याचा संपूर्ण सर्वांगीण विकास घडवून आणणे हेच अंदाजपत्रकाच्या सर्व तरतुदींचे उद्दिष्ट आहे. त्याशिवाय अर्थव्यवस्थेला बळकटी येणार नाही. म. गांधीजींच्या "स्वायत्त खेड्याच्या" कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचा पुनरुच्चार केलेला आहे. सर्व ग्रामस्थांच्या गरजा त्यांच्याच गावात पूर्ण होऊन त्यांच्या खेड्याचा सर्वांगीण विकास हाच आर्थिक प्रगतीचा एकमेव मार्ग असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. अर्थमंत्र्यांच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास, 'It is our intention. ro step up further the outlays next year on programmes designed to develop rural infra structure facilities so that over a period of, say, five yearf the bdsic needs of entire rural pupulaton could be met.'

० बेरोजगारीचे उच्चाटन : जास्तीत जास्त रोजगार निर्मिती व्हावी या उद्देशाने अनेकविध प्रयत्न केले जाणार आहेत. रोजगारासाठी केवळ औद्योगीकरणावरच अवलंबून न रहाता जास्तीत जास्त शेतीव्यवसायावरच लक्ष केंद्रित करण्याचे धोरण आहे. यामुळे शहराकडे होणारे स्थलांतर थांबेल व शेती-उत्पादनही वाढेल. शेती शास्त्रशुद्ध पद्धतीने केल्यास केवळ शेतीक्षेत्रातच अजूनही खूप रोजगारक्षमता आहे. याबाबत जपानचे उदाहरण घेता येईल. जपानमध्ये भारतापेक्षाही चार पटीने जास्त उपयोग श्रमशक्तीचा शेतीत केला जात आहे. शेतीत व तत्सम व्यवसायात आवश्यक ते तांत्रिक बदल परिणामकारकरीत्या करू शकलो तर रोजगारीत अपेक्षेप्रमाणे वाढ होऊ शकेल. ग्रामीण भागात अधिकाधिक रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून खादी आणि ग्रामोद्योग यांचा विकास होणे अत्यावश्यक आहे. योजनेत त्यावर ३५ कोटी रुपयांची तरतूद आहे. या कार्यक्रमांमुळे २५ लक्ष लोकांना रोजगार उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे. याशिवाय हातमागासाठी २० कोटी रुपये व रेशीम किडे जोपासना यांवर ४ कोटी रुपये खर्च केला जाणार आहे.

## प्रत्यक्ष कर योजनेतील लक्षणीय बदल व्यक्तिगत उत्पन्न व कर

मध्यमवर्गीयांचे जीवन थोडेबहुत समृद्ध व्हावे या हेतूने व्यक्ती, अविभक्त हिंदु कुटुंब, न नोंदलेल्या संस्था इ. यांना त्यांच्या १० हजार रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणत्याहि प्रकारचा कर भरावा लागणार नाही. पूर्वीच्या कर योजनेप्रमाणे, सरचार्जसुद्धा हा कर रु. ३३० एवढा द्यावा लागला असता. मात्र साधारणतः वार्षिक ११ हजार रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीस द्याव्या लागणाऱ्या कराच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झालेली आहे.

## उत्पन्न-करावरील सरचार्ज

पूर्वीच्या करयोजनेप्रमाणे सर्व प्रकारच्या करदात्यांना (कंपन्या वगळून) भरावा लागणारा सरचार्ज १० टक्के होता आता हा चार्ज १५ टक्के भरावा लागेल. या बदलामुळे सरचार्जसहित जास्तीत जास्त कराचे प्रमाण ६६ टक्क्यांवरून ६९ टक्क्यांवर गेलेले आहे.

## संपत्ती-कर

कर योजनेद्वारा जास्तीत जास्त उत्पन्न सरकारला सार्वजनिक कल्याणकारी योजनांसाठी उपलब्ध व्हावे या उद्देशाने संपत्तीकराचे दरातही या अर्थसंकल्पांत बदल सुचविलेले आहेत. २ लक्ष ५० हजार रुपयांपर्यंतच्या संपत्तीवरील करात कोणताही बदल सुचविलेला नसून तो दर पूर्वीइतकाच म्हणजे अर्धा टक्का एवढाच आहे. मात्र यापुढील संपत्तीकरात वाढ सुचविण्यांत आलेली आहे. २ लक्ष ५० हजार रुपयांपासून ५ लाख रु. पर्यंत पूर्वीचा कर दर अर्धा टक्का होता तो दर आता वाढवून एक टक्का एवढा करण्यात आला. यापुढील संपत्तीवरील कराचे दरात पूर्वीच्या करदरापेक्षा अर्ध्या टक्क्याने वाढ करण्यात आलेली आहे. आयकरदात्यांना पूर्वीप्रमाणे सक्तीचा ठेव, पुढील दोन वर्षांसाठी १९७४ च्या कायद्यानुसार ठेवावी लागणार आहे.

## कंपनी-कर

उद्योगसंस्थांना आयकरावर भराव्या लागणाऱ्या सरचार्जमध्ये ५ टक्केने वाढ करण्यात आली आहे. परंतु १९७६ च्या याबद्दलच्या कायद्यान्वये कंपनीस, सरचार्ज भरण्याऐवजी ५ वर्षाकरिता सदरहू रक्कम औद्योगिक विकास बँकेत डिपॉझिट म्हणून ठेवण्याची सवलत आहे.

प्रत्यक्ष करदरात अशी वाढ करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे काही क्षेत्रांना करात सवलती जाहीर करण्यात आलेल्या आहेत. विशेषतः गुंतवणुकीस चालना मिळून औद्योगिक विकासास चालना मिळावी म्हणून उत्तेजनार्थ काही खास सवलती अंदाजपत्रकात जाहीर करण्यात आलेल्या आहेत.

## औद्योगिक विकासार्थ सवलती

सध्याच्या तरतुदीप्रमाणे काही विशिष्ट क्षेत्रातील उद्योगांनाच व लघुउद्योगांना, त्यांनी यंत्रसामुग्रीत गुंतविलेल्या भांडवलाच्या २५ टक्केपर्यंत काही सवलती देण्यात येत असे. नवीन अंदाजपत्रकानुसार काही कमी महत्त्वाची उत्पादनक्षेत्रे सोडल्यास सर्वच उद्योगाना या सवलतीचा लाभ होणार आहे. देशातच विकसित झालेल्या तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून उत्पादन करण्यासाठी उपयोगात आणलेल्या यंत्रसामुग्रीवर ३५ टक्के एवढी सवलत देण्यात येणार आहे.

आजारी औद्योगिक संस्था सरकारने ताब्यात घेण्याऐवजी आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या तत्सम प्रकारच्या संस्थेमध्ये त्यांच्या विलीनीकरणास अधिक प्रोत्साहन देण्यात येणार आहे. अशा प्रकारची उपाययोजनाच आजारी उद्योगसंस्थांचे दृष्टीने हितावह आहे अशी सरकारची धारणा आहे.

## ग्रामीण भागातील औद्योगिक विकास

ग्रामीण भागातील औद्योगिक विकासास अधिकाधिक चालना मिळून खेड्यातच रोजगाराची संधी उपलब्ध होण्याच्या हेतूने काही सवलती जाहीर केलेल्या आहेत. पैकी पूर्वमंजुरी घेतलेल्या ग्रामीण विकास कार्यक्रमावर कंपनीने केलेला खर्च, नफ्यावरील कर आकारीत असतांना, नफ्यातून वगळता येईल. म्हणजेच खर्चाच्या प्रमाणात कराचे प्रमाण कमी होणार आहे.

जे लघुउद्योग ग्रामीण भागात ३० जून १९७७ नंतर आपले उत्पादन कार्य सुरू करतील त्यांना करात काही सवलती देण्यात आलेल्या आहेत.

## गुंतवणुकीस चालना

भांडवली फायदा जर कंपनीने बचत सर्टिफिकेटस्, युनिट ट्रस्ट, सरकारी कर्जरोखे, राष्ट्रीयीकृत बँकेत अगर सहकारी बँकेत गुंतविल्यास असा फायदा करमुक्त होऊ शकेल.

लहान प्रमाणावर होणाऱ्या गुंतवणुकीस प्रोत्साहन मिळावे या हेतूने कंपनीने रु. २५० पर्यंत जाहीर केलेल्या लाभांशामधून आता आयकर वसूल केला जाणार नाही. अर्थात त्यासाठी काही अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे उत्पन्नकर, संपत्तीकर, तसेच मोटारी, स्कूटर्स, पंखे, फिल्म्स्, सिगरेटस्, विडी इ. यावर अधिक कर बसवून आलेले उत्पन्न ग्रामीण विकासास उपलब्ध केले आहे. या करयोजनेचे खास वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष करावर भर देण्यात आलेला आहे. त्यामुळे करभार हा जास्त उत्पन्नगटावरच पडणारा असून हा करभार आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गावर लादणे करदात्यास शक्य होणार नाही. कारण अप्रत्यक्ष कराचा बोजा वाढलेल्या किमतीद्वारा गरीब जनतेवरच पडत असे. या नवीन करयोजनेतील बदलामुळे सरकारला १३० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे.

## दृष्टिक्षेपात आकडेवारी

अर्थसंकल्पानुसार या वर्षीचे सरकारचे उत्पन्न १५३६६ कोटी रु. एवढे आहे. खर्च १५५६८ कोटी रु. आहे. उत्पन्न व खर्च विचारात घेता २०२ कोटि रु. तूट येते. परंतु नवीन कर योजनेतील १३० कोटी रुपयांचे उत्पन्न गृहीत धरल्यास तूट ७२ कोटी रु. एवढी येईल. मंत्रिमहोदयांचे अंदाजाप्रमाणे या तुटीमुळे अर्थव्यवस्थेत कोणत्याही प्रकारची भाववाढीची परिस्थिती निर्माण होणार नाही. संरक्षणखर्चात काटकसर म्हणून ५६ कोटी रु. ने तरतूद कमी करण्यात आलेली आहे. खुल्या बाजारातील कर्जउभारणीपासून १ हजार कोटी रु. मिळतील असा अंदाज आहे.

## सामान्य माणसाची भावना

सामान्य माणसाचे आर्थिक जीवन कष्टमय झालेले आहे. वाढत्या महागाईपुढे त्याचे उत्पन्न तोकडे पडते. तो आता आकडेवारीच्या जाळ्यात गुंतण्यास तयार नाही. त्याला आता जीवनावश्यक वस्तूंची रास्त भावात उपलब्धता व विविध सवलती याचीच गरज आहे. त्या दृष्टीने काय प्रगती आहे ? हीच त्याची भावना आहे.

अर्थात हे सर्व अल्पावधीत शक्य होणार नाही. कोणतेही अंदाजपत्रक सर्वांचे एकाच वेळी समाधान करू शकत नसते. तसेच अंदाजपत्रकाने कोणत्या क्षेत्राचा किती फायदा वा नुकसान झालेले आहे एवढाच संकुचित दृष्टिकोन बाळगून चालणारे नाही. समाधानाची एक बाब म्हणजे अत्यंत विपरीत परिस्थितीशी झुंज देणाऱ्या ८० टक्के जनतेला थोडाफार दिलासा निश्चित मिळणार आहे. परंतु सर्व सरकारी, निमसरकारी यंत्रणा या हेतूने राबवीत असतांना काही जीवनमूल्ये निश्चित केली जाणे तसेच काही आदर्श तत्त्वांचा सार्वजनिक जीवनात अंगीकार करणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. या दृष्टीने काही प्रयत्नांची आवश्यकता आहे. कारण या सर्व नीतीमूल्यांवरच या सर्व आर्थिक प्रयत्नांचे यशापयश अवलंबून आहे.

■ ■ ■

# भारतीय रेल्वेच्या इंधनांची काटकसर

प्रा. मधू दंडवते
रेल्वे-मंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली

भारतीय रेल्वेने १९७६–७७ साली १३ दशलक्ष टन कोळसा ८,४९,००० किलो लिटर हायस्पीड डिझेल तेल आणि १४५४ दशलक्ष किलोवॅट वीज इतके इंधन वापरले. त्यातील कोळशाचा खर्च १४७ कोटी रुपये, हायस्पीड डिझेल तेलाचा खर्च १३० कोटी रुपये आणि विजेचा खर्च ५७.५ कोटी रुपये मिळून एकूण ३३५ कोटी रुपये झाला. ही रक्कम रेल्वेवर झालेल्या एकूण खर्चाच्या १७ टक्के होती. या आकडेवारीवरून रेल्वे इंधनाच्या काटकसरीचे महत्व आपणास कळून येईल.

वाफेच्या इंजिनासाठी लागणाऱ्या कोळशासाठी भारतीय रेल्वेला सर्वात जास्त खर्च येतो, तीही या प्रकारच्या इंजिनांची माल वाहून नेण्याची क्षमता आणि वेग इतर इंजिनांच्या मानाने कमीच पडतो. त्यांना ठाकठीक ठेवायलाही इतरांपेक्षा अधिक खर्च होतो, कारण वाफेच्या इंजिनांची संख्या जास्त आहे. या इंजिनांना द्याव्या लागणाऱ्या इंधन पाण्यासाठी त्यांना ठराविक अंतरावर थांबवावेच लागते.

त्यामानाने १९६८–५९ च्या दरम्यान पूर्व विभागात अधिक प्रमाणात वापरात आणलेल्या डिझेल इंजिनांची वेगमर्यादा, अधिक माल आणि अधिक प्रवासी डबे वाहून नेण्याची क्षमता वाखाणण्यासारखी आहे. शिवाय त्यांना खर्चही वाफेच्या इंजिनांच्या मानाने कमी येतो, म्हणून ही डिझेल इंजिने इतर मार्गावरही वापरण्यात येऊ लागली.

भारतीय रेल्वेचे विद्युतीकरण करण्याचे काम १९६० ते १०६९ च्या दरम्यान हाती घेण्यात आले. आतापर्यंत ४५०० किलोमीटर रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण झाले आहे. विजेवर चालणाऱ्या इंजिनामुळे वातावरणात धूर पसरत नाही. त्याचा वेग अधिक असतो व इतर दोन प्रकारच्या इंजिनांपेक्षा त्याला खर्चही बराच कमी येतो.

आर्थिक दृष्ट्या विजेवर चालणारी इंजिने जास्त परवडणारी असल्यामुळे यापुढे जास्तीत जास्त रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण करण्याचे धोरण रेल्वे मंत्रालयाने स्वीकारले आहे. ज्या मार्गाचे अजून विद्युतीकरण करण्याचे राहिले आहे तेथे शक्य तोवर डिझेल इंजिने वापरण्यात येतील. कमी महत्वाच्या मार्गावरच आता वाफेची इंजिने वापरली जातील. नेल्गा दोन दशकात वाफ, डिझेल आणि विजेवर चालणाऱ्या रेल्वे मार्गात बरेच बदल घडले आहेत. १९७१–७२ पासून वाफेच्या इंजिनांची निर्मिती थांबविण्यात आली आहे. त्या ऐवजी आता डिझेल आणि विजेवर चालणाऱ्या इंजिनांची निर्मिती करण्यात येते. या कामाची सुरुवात १९६१–६२ आणि १९६३–६४ पासून अनुक्रमे चित्तरंजन व वाराणशी येथील कारखान्यांत झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील या दोन प्रकल्पातून भारतीय रेल्वेला हव्या तेवढ्या इंजिनांचे उत्पादन करता येईल एवढी त्यांची क्षमता आहे.

याचा परिणाम म्हणजे १९५१–५२ सालापर्यंत भारतीय रेल्वेच्या एकूण माल वाहतूकीच्या ९८ टक्के वाहतूक वाफेच्या इंजिनांद्वारे केली जात असे ती आता २२ टक्क्यांवर येऊन ठेपली आहे. डिझेल इंजिने ५५ टक्के माल वाहतूक करतात आणि विद्युत इंजिने २३ टक्के वाहतूक करतात. देशाच्या वाढत्या काळात औद्योगिकरणामुळे या बदलांना प्राधान्य द्यावे लागले, असे असले तरी रेल्वेची ६३ टक्के प्रवासी वाहतूक अजून वाफेच्या इंजिनाद्वारेच द्यावे लागले. असे असले तरी रेल्वेची ६३ टक्के प्रवासी वाहतूक अजून वाफेच्या इंजिनाद्वारेच केली जाते. फरक एवढाच की रेल्वेची ही प्रवासी वाहतूक १९५०–५१ साली ९८ टक्के होती. डिझेल इंजिने ३७ टक्के प्रवासी वाहतूक करतात तर विद्युत इंजिने २० टक्के करतात. रेल्वेच्या एकूण विद्युत मार्गाच्या १७ टक्के प्रवासी वाहतूक मोठ्या शहरांतील उपनगरांसाठी करण्यात येते.

ज्या रेल्वे मार्गावर वाफेची इंजिने धावतात येथील सुरुवातीचा खर्च फारच कमी असतो. डिझेल इंजिनाच्या मार्गावर तो वाढतो आणि विद्युत मार्गावर तो त्याही पेक्षा जास्त होतो. हे खरे असले तरी वाफेच्या इंजिनासाठी लागणारा कोळसा

व त्याच्या डागडुगीचा खर्च सर्वात जास्त असतो म्हणून वाफेची इंजिने कोळशाच्या खाणीच्या जवळपासच्या मार्गावर चालविणेच परवडते. प्रत्येक वाफेच्या इंजिनाचे कमीत कमी ४० वर्षे उपयोगी सेवा दिल्यावरच त्याच्या जागी डिझेल वा विद्युत इंजिनाचा वापर करणे आर्थिक दृष्ट्या सोयीचे होईल. सध्या रेल्वेकडे ८५००० वाफेची इंजिने आहेत. ती संख्या १९८८–८९ पर्यंत ६००० वर आणता येईल.

मध्यंतरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भरमसाठ वाढलेल्या तेलांच्या किंमतीमुळे ८८०० किलो मिटर रेल मार्गांचे विद्युतीकरण करण्याचा विचार होता. परंतु एक किलो मिटर रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण करायला १३ लाख रुपये खर्च येत असल्यामुळे त्याला मुरड घालावी लागली आणि १९८८–८९ पर्यंत ४८०० किलो मिटर रेल मार्गांचे विद्युतीकरण करायचे ठरले.

१९७६–७७ साली रेल्वेने १३ दशलक्ष टन कोळसा वापरला ते प्रमाण १९८८–८९ साली १० दशलक्ष किलो टनांवर आणता येईल. त्याच काळातील डिझेल वापराचे प्रमाण १०३४ दशलक्ष किलो लिटर असेल. देशात खपणाऱ्या एकूण डिझेल तेलापैकी १० टक्के तेलाचा वापर करते.

रेल्वेला लागणाऱ्या इंधनाची बचत आणि काटकसर करण्यासाठी जे अनेक उपाय योजले त्याची दृश्यफळे आता दिसू लागली आहेत. उघड्या वाघीणीतून वाहतूक झालेल्या कोळशाच्या चोरीचे प्रमाण खूपच घटले आहे. कारण त्याची तपासणी ठिकठिकाणी होत असते आणि रेल्वे रक्षकांच्या अचानक धाडी वाढल्या आहेत. या कामी कामगारांच्या संघटनांनी सहकार्य केले. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सामंजस्यामुळे आपण रेल्वे इंधनाच्या काटकसरीची योजना यशस्वी रितीने पार पाडू शकू.

■ ■ ■

# उसाच्या चिपाडांवर आधारित सहकारी साखर कारखान्यांनी सुरू करण्यासारखे छोटे कागद कारखाने

केंद्र सरकारच्या साखर व वनस्पती संचालनालयातील तांत्रिक संचालक पी. जे. मनोहर राव यांनी उपर निर्दिष्ट मथळ्याचा एक प्रबंध साखर तंत्रज्ञ संघटनेच्या सुवर्ण महोत्सवी अधिवेशनात वाचून दाखविला होता. दिल्लीच्या इंडियन शुगर या मासिकाने तो यापूर्वीच आपल्या अंकात प्रसिद्ध केला आहे त्याला आत काही काळ लोटला असला तरी हा विषय अजूनही नवीन आहे. नुकताच मुंबईत या विषयाशी संबंधित अशाच एका विषयावर परिसंवादही आयोजित करण्यात आला होता. श्री. राव यांचा हा प्रबंध आम्ही वाचकांसाठी येथे प्रसिद्ध करीत आहोत. मूळ लेख इंग्रजीत असून त्याचे स्वैर भाषांतर अशोक हळबे यांनी केले आहे. प्रबंधाचे स्वरूप बरेचसे तांत्रिक असल्याने ज्या ठिकाणी मराठी प्रतिशब्द सहज उपलब्ध नाहोत असे इंग्रजी शब्द कायम ठेवले आहेत. सदरहू भाषांतरित लेख साखर संघाच्या 'गोडवा' मासिकातून उद्धृत केला आहे त्यबद्दल त्यांचे ऋण मानणे जरुरीचे आहे.

## चिपाडांची निर्मिती

साखर कारखान्यात ऊस गाळल्यानंतर जो तंतूमय पदार्थ मागे रहातो त्यालाच आपण उसाची चिपाडे म्हणून संबोधतो. या चिपाडांमध्ये काही प्रमाणात साखरेचा अंशही शिल्लक असतो परंतु तो आर्थिक दृष्ट्या काढून घेता येणे शक्य नसते. चिपाडांबरोबर बॉयलरमध्ये तोही जळून जातो.

कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या चिपाडांमध्ये ४६ ते ५२ टक्के दमटपणा असतो. त्या चिपाडांना ओली चिपाडे असेच म्हटले जाते. केवळ भारतातच नव्हे तर जगात सर्वत्र ही चिपाडे साखर कारखाने जाळण्यासाठी वापरतात. बॉयलरमध्ये ती जाळून वाफ निर्माण करण्यासाठी व रस आटवण्यासाठी त्या उष्णतेचा वापर करण्यात येत असतो. त्यामुळे साखर कारखान्यात हे ओले चिपाड वाळण्यासाठी खास व्यवस्था केलेली असते. कोणताही जादा खर्च न करता जागच्या जागी पाहिजे तेवढा पुरवठा होतो व कारखाना चालू आहे तोपर्यंत इंधनासाठी दुसऱ्या कोणत्याही संस्थेवर अवलंबून रहावे लागत नाही. चिपाडे इंधन म्हणून वापरण्याचे खरे कारण असते. ४८ टक्के दमटपणा असलेल्या ओल्या चिपाडांची सरासरी ढोबळ कॅलरीफिक किंमत २२२२.४ Kcal/Kg एवढी असते, तर सामान्य दर्जाच्या कोळशाची हीच किंमत ६१११.६ Kcal/Kg एवढी व फर्नेस ऑईलची किंमत १०,०००.८ Kcal/Kg एवढी असते.

कारखान्यातून बाहेर पडलेल्या ओल्या चिपाडांचे पृथक्करण केले असता त्यात पुढील घटक असतात.

(अ) तंतु – ४८.५ टक्के (ब) पाणी – ४८.०० टक्के

(क) साखर – ३.० टक्के (ड) अन्नघटक – ५ टक्के

कागद उद्योगाच्या दृष्टीने तंतूंचे प्रमाण महत्त्वाचे आहे. वाळलेल्या चिपाडांतील निरनिराळी घटक द्रव्ये पुढील प्रमाणात असतात.

(अ) सेल्यूलोज – ४५.० टक्के (ब) पेन्टोसन्स–२८.० टक्के

(क) लिगनीन–२०.० टक्के (ड) राख–२.० टक्के

(इ) साखर – ५.० टक्के

कोणत्याही साखर कारखान्यात उत्पन्न होणाऱ्या चिपाडांचे प्रमाण प्रामुख्याने उसातील तंतूंच्या प्रमाणावर अवलंबून असते.

सामान्यपणे उत्तरेकडील उसात हे प्रमाण अधिक असते. ते १५ ते १७ टक्के एवढे असते, तर दक्षिणेकडील राज्यात १२ ते १४ टक्के एवढे असते. त्यामुळे वरच्या राज्यात उसाच्या ३३ ते ३६ टक्के व दक्षिणेकडील राज्यात उसाच्या २६ ते ३० टक्के एवढे असते. भारताची सरासरी पहाता ते साधारणपणे १/३ (३३ टक्के) एवढे येते.

पुढील तक्त्यावरून १९६८–६९ ते ७२–७३ च्या कालखंडात भारतात सुक्या चिपाडांचे किती उत्पादन झाले ते स्पष्ट होईल.

(आकडे टनात)

| राज्य | ६८–६९ | ६९–७० | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ |
|---|---|---|---|---|---|
| उत्तर प्रदेश | २३,२८,२११ | ३०,४४,६६९ | २४,७८,९९६ | १५,२२,४५१ | २३,६२,७७८ |
| बिहार | ५,०१,१०४ | ७,०१,४९९ | ६,००,५५६ | ३,७१,७७५ | ३,९८,८२० |
| प. बंगाल | १३,७२५ | २४,३९५ | १५,५२२ | १,५४० | ७,९५९ |
| आसाम | ८,०२४ | १७,५९९ | १५,३८६ | ८,६८३ | ७,८६९ |
| हरियाना | १,२४,९७७ | १,९२,५६८ | १,२८,९७९ | १,२५,४४९ | २,६३,६३१ |
| पंजाब | ८९,८३२ | १,३४,२७० | ९३,२४५ | ५९,२३७ | ८,११,४०० |
| राजस्थान | २४,६०२ | ४०,६७० | २५,२८५ | १४,२१७ | २६,७७३ |
| मध्यप्रदेश | २६,८५३ | ७०,३५९ | ६९,०९६ | ३८,२८९ | ५२,९७३ |
| ओरिसा | ३०,०८६ | ३८,०१४ | १४,२५२ | ९,४०० | ९,२७९ |
| महाराष्ट्र | १३,५४,१६७ | १५,२४१ | १४,७५,५४० | ५,३०,८८८ | १,६६,२७० |
| गुजराथ | १,५२,७८१ | १,८०,७२० | १,४०,०९२ | १,४७,८१७ | २,३६,४२१ |
| कर्नाटक | ३,०४,५८५ | ४,०७,३९६ | ३,१५,९५९ | ३,३७,८४१ | ४,७८,३९१ |
| केरळ | ३०,२९८ | ३६,१८३ | २९,१६८ | २२,६३४ | ३१,६३४ |
| आंध्र प्रदेश | ६,०४,११५ | ५,८३,४८४ | ३,९७,५५१ | ४,८०,३२४ | ४,५६,४२४ |
| तामिळनाडू | ७,१७,६२६ | ५,७०,४९४ | ५,३२,९६२ | ५,३९,८२३ | ५,९८,७११ |
| पाँडिचेरी | ४५,५१८ | ३१,८५७ | ३१,८३४ | ४४,९१७ | ३७,८९६ |
| नागालँड | — | — | — | — | १,२२३ |
| एकूण | ६३,५५,५३६ | ७६,६०,४१८ | ६३,६४,४२३ | ५२,६४,२८५ | ६६,१८,४५६ |

वरील तक्त्यावरून हे लक्षात येईल की भारताचे एकूण वाळलेल्या चिपाडांचे उत्पादन ५२ ते ७६ लाख टनांच्या दरम्यान झाले आहे. त्यापैकी किती प्रमाणात व कोणत्या कारणासाठी त्या चिपाडांचा सध्या उपयोग केला जातो ते पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

## वाळलेल्या चिपाडांचा उपयोग

तक्ता क्र. २

(आंकडे लाखाचे टनात)

| तपशील | १९६८–६९ | ६९–७० | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ |
|---|---|---|---|---|---|
| चिपाडांचे उत्पादन | ६३.५६ | ७६.६१ | ६३.६४ | ५२.६४ | ६६.४२ |
| मागील साठा | ०.२९ | ०.४२ | ०.५९ | ०.४३ | ०.३८ |
| एकुण उपलब्ध चिपाडे | ६३.७५ | ७७.०३ | ६४.२३ | ५३.०७ | ६६.८० |
| इंधनासाठी वापरलेली चिपाडे | ६१.६० (९६.४९ %) | ७४.५० (९६.८३ %) | ६२.२९ (९६.९८ %) | ५१.२८ (९६.६१ %) | ६४.७७ (९६.९५ % |
| इतर कामासाठी वापरलेली चिपाडे | ०.५६ ( ०.८७ %) | ०.२८ ( ०.३७ %) | ०.१५ ( ०.२४ %) | ०.२७ ( ०.५२ %) | ०.३० ( ०.४५ |
| इतरांना विकलेली चिपाडे | १.०८ ( १.७० %) | १.४१ ( १.८३ %) | १.०७ ( १.६७ %) | १.१२ ( २.१० %) | ०.७९ ( १.१८ ) |
| गामाअखेरीस शिल्लक राहिलेला साठा | ०.६१ ( ०.९४ %) | ०.७६ ( ०.९७ %) | ०.७२ ( १.११ %) | ०.४० ( ०.७७ %) | ०.८५ ( १.४२% |

या तक्त्यावरून हे लक्षात येईल की सुमारे ९६.५ % चिपाडांचा उपयोग बॉयलरमध्ये जाळण्यासाठी करण्यात आला. फक्त २ % चिपाडे कागद, कागदाचा लगदा, गुरांचे खाद्य वगैरे गोष्टींसाठी वापरण्यात आली.

पुढील तक्त्यांत साखर कारखान्यांनी बाहेरच्या कारखान्यांना विकलेल्या चिपाडांचे आंकडे दिले आहेत. त्यावरून साखर कारखान्यांकडे उपलब्ध असलेल्या जादा (सरप्लस) चिपाडांचे प्रमाण लक्षात येईल.

## साखर कारखान्यांनी बाहेरच्या कारखान्यांना विकलेली चिपाडे

तक्ता क्र. ३

(आंकडे टनांत)

| राज्याचे नांव | १९६८–६९ | ६९–७० | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ |
|---|---|---|---|---|---|
| उत्तर प्रदेश | ७३,५०२ | ६०,२९४ | ४१,१२१ | ३८,४६१ | २३,८०३ |
| बिहार | ८२९ | ४,९४६ | ७,८०५ | ३,१०१ | २,४३१ |
| प. बंगाल | — | — | — | — | — |
| आसाम | — | — | — | — | — |
| हरियाना | ५२७ | १,५४१ | १,१५७ | ३,१२१ | १,२३८ |
| पंजाब | — | ५५४ | ४०० | — | — |
| राजस्थान | — | — | — | — | — |
| मध्यप्रदेश | १३२ | १,३२९ | — | ४,२०० | २५० |
| ओरिसा | ५०० | २,१२० | — | — | २७ |
| महाराष्ट्र | ११,०८५ | २३,७२५ | २३,१०७ | १८,५१२ | २३,२४३ |
| गुजराथ | ७६१ | ७०० | — | २३० | — |
| कर्नाटक | ९,३९९ | ३३,६७६ | १०,७०८ | २४,७८१ | ७०,२४१ |
| केरळ | ७ | १० | २५९ | १३३ | १५८ |
| आंध्र | १०९ | ३,३८४ | ५,१७६ | ३,६१२ | २,०२३ |
| तामिळनाडू | ११,७३१ | ९,१३८ | १७,५३९ | १५,५९३ | १४,८०१ |
| पाँडिचेरी | — | — | — | — | — |
| नागालँड | — | — | — | — | — |
| एकूण | १,०८,५८२ | १,४१,४१७ | १,०७,२७२ | १,११,७४४ | ७८,२१५ |

लेखकाने जमवलेल्या आकडेवारीवरून असे दिसते की, देशातील सुमारे ६० कारखाने छोट्या प्रमाणात चिपाडे वाचवीत असतात. हे कारखाने प्रामुख्याने उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्र प्रदेश या राज्यातील आहेत. या कारखान्यांनी आपली औष्णिक कार्यक्षमता सुधारल्यास अधिक प्रमाणात चिपाडे वाचवता येतील. सामान्यत: पुरेशी उपकरणे असलेला कारखाना आपल्या इंधन गरजेबाबत स्वयंपूर्ण असतो. पण कमी दाबाचे काही जुने कारखाने अधिक इंधन (लाकूड, तेल वगैरे) वापरतात. परंतु साखर कारखान्यांना औष्णिक कार्यक्षमतेचे (थर्मल इफिशिअन्सी) महत्त्व पटवून दिल्यास ते पुरेशा प्रमाणात चिपाडे वाचवू शकतील.

## कागदासाठी कच्चा माल या दृष्टीने चिपाडांचा उपयोग

कागदासाठी परंपरागत वापरण्यात येणारा कच्चा माल म्हणजे बांबू, लाकूड, अंबाडी ह्या वस्तू आहेत. परंतु त्याची वाढती टंचाई लक्षात घेता कागद उद्योगाला कठीण लाकूड, भुसा, गवत, चिपाडे वगैरेसारख्या अपरंपरागत वस्तूंवर आपली गरज यापुढे भागवावी लागणार आहे. त्यापैकी चिपाडांचे स्थान महत्त्वाचे आहे कारण ती सहज उपलब्ध आहेत.

कागद उत्पादनासाठी चिपाडांचे वाढते महत्त्व आता कागद तंत्रज्ञांना पटू लागले आहे. परंतु कागद उत्पादनासाठी चिपाडे वापरण्याचे यापूर्वी केलेले प्रयोग फारसे यशस्वी होऊ शकले नाहीत. त्यातील गर काढून योग्य अशा यंत्राची उणीव हे त्याचे प्रमुख कारण होते. बांबू किंवा अंबाडीपेक्षा चिपाडे वापरण्यात पुढील फायदे आहेत.

(१) कच्चा माल मोठ्या प्रमाणात काहीही जादा खर्च न करता मिळू शकतो.

(२) चिपाडांचे अधिक प्रमाण असलेला कागद छपाईसाठी चांगला असतो.

(३) चिपाडांपासून केलेला लगदा शुद्ध करण्यासाठी कमी वीज लागते.

असे असले तरी चिपाडांचे काही तोटेही आहेत ते पुढीलप्रमाणे –(१) चिपाडांमध्ये सेल्युलोजचे प्रमाण सुमारे २० टक्के असते तर मऊ लाकडात ते ९० टक्के ते ९५ टक्के व साध्या लाकडात ६० ते ७० टक्के असते.

(२) चिपाडांपासून बनवलेल्या लगद्यांचा तंतू लहान असतो.

कागदासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध कच्च्या मालाचे घटक पुढीलप्रमाणे असतात.

तक्ता क्र. ४

| कच्चा माल | तंतूंची सरासरी लांबी | तंतूंची सरासरी जाडी | राख % | सेल्युलोज % | पेंटोसन्स % |
|---|---|---|---|---|---|
| | (मि. मी.) | (मायक्रोन्स) | | | |
| बांबू | २.५ ते ४ | १४ | १.३ | ५६ ते ६७ | १५ ते ३२ |
| चिपाडे | १.४ | १८ | १.२ | ५१ ते ५४ | २४ ते २८ |
| (गर) नसलेली गवत | १.५ | १३.३ | ६.१ ते ६.६ | ४८ ते ५४ | २४ ते २८ |

चिपाडांतील तंतूंची लांबी कमी असल्यामुळे चांगल्या दर्जाचा कागद १०० टक्के चिपाडांपासून बनवता येत नाही तर चिपाडांबरोबरच बांबू, चिंध्या, खराब कागद वगैरेपासून तयार केलेला लगदा वापरावा लागतो. तसेच लहान तंतुमुळे लगदा अधिक प्रमाणात लागतो. त्यामुळे कागद तयार होणारे यंत्र सावकाश चालवावे लागते परिणामी कारखान्याची क्षमता कमी होते.

(३) गर (Pith) म्हणजे उसातील ज्या पेशीमध्ये रस साठवलेला असतो त्या पेशींचा भाग. त्यांत तंतू नसतो. त्यामुळे त्याचे कागद बनविण्यात काहीही महत्त्व नाही. गर काढून टाकल्याने तंतूची सरासरी लांबी वाढते व चांगल्या दर्जाचा कागद तयार होतो. गरात शोषण करण्याची शक्ती फार असते. त्यामुळे अशुद्ध द्रव्ये त्यात जातात. गर नीट काढला नाही तर कागद चांगला होत नाही.

## निरनिराळ्य देशांत चिपाडांवर चालणारे कागद कारखाने

कागद उत्पादनासाठी चिपाडाचे महत्त्व लक्षात आल्यावर आणि त्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाचा विकास झाल्यावर अनेक देशांमध्ये चिपाडांवर आधारित कागद कारखाने निघाले. सध्या जगात चिपाडांपासून तयार होणाऱ्या लगद्याचे उत्पादन सुमारे १० लाख टन (प्रतिवर्षी) आहे. उपलब्ध माहितीनुसार १९७३ अखेरीपर्यंत निरनिराळ्या देशात पुढीलप्रमाणे कागद कारखाने चिपाडावर आधारित होते.

( शेजारचे कोष्टक पहा )

यावरून हे लक्षात येईल की, भारत इतर देशांच्या मानाने ह्या क्षेत्रात मुळीच मागे नाही. या सर्व कारखान्यांत सिमा डे इंडस्ट्रिअल सन क्रिस्टोबॉल हा मेक्सिकोमधील कारखाना सर्वात चांगल्या प्रकारे चालू असून त्यात १०० टक्के चिपाडांचा वापर केला जातो. हा कारखाना अमेरिकन स्कॉट पेपर कंपनीच्या मालकीचा आहे. ही कंपनी उच्च दर्जाच्या टिश्यू पेपरसाठी प्रसिद्ध आहे. ही कंपनी चिपाडांपासूनसुद्धा टिश्यू पेपर बनविते. त्याशिवाय पॅकिंगसाठी, छपाईसाठी लागणारे विविध प्रकारचे कागद व अन्य कागदही चिपाडांपासून या कंपनीत बनवले जातात. या कारखान्यात रोज २३० टन लगदा बनवला जातो. त्यापैकी निम्मा अन्य कारखान्यांना विकून राहिलेला कागद उत्पादनाकरिता वापरला जातो. हा कारखाना साखर कारखान्यापासून खूप लांब असल्यामुळे कारखान्यातून चिपाडे नेली जातात. ही वहातुक साधारणपणे २०० मैलांएवढी असते. लांबवरचा साखर कारखाना आणि साखर कारखान्याचा लहान हंगाम यामुळे कागद कारखान्याला चिपाडांचा साठा करून ठेवावा लागतो. काही वेळ २ वर्षे ठेवलेला साठासुद्धा वापरला जातो. तरीही कागद उच्च दर्जाचा असतो.

याशिवाय वत्तपत्रीय कागदासाठीसुद्धा चिपाडांचा वापर केला गेला आहे. मेक्सिकोत त्यामुळे काही प्रमाणात परकी चलनाची बचत करण्यात आली.

| देश | कारखान्यांची संख्या | देश | कारखान्यांची संख्या |
|---|---|---|---|
| भारत | ७ | बंगाल देश | १ |
| ब्राझिल | ५ | दक्षिण आफ्रिका | १ |
| मेक्सिको | ५ | स्पेन | १ |
| तैवान | ४ | युनायटेड अरब रिपब्लिक | १ |
| क्युबा | ३ | अमेरिका | १ |
| अर्जेंटिना | ३ | व्हेनेझुएला | १ |
| चीन | २ | थायलंड | ३ |
| कोलंबिया | १ | इराक | १ |
| पेरु | ३ | इराण | १ |
| फिलिपाईन्स | २ | पाकिस्तान | १ |
| प्युअर्टोरिओ | १ | युक्वाडॉर | १ |
| | | एकूण | ४७ |

# भारतातील राज्यवार एकरी ऊस उत्पादन

( आकडे टनांत )

| राज्य | ६६–६७ | ६७–६८ | ६८–६९ | ६९–७० | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ | ७३–७४ | ७४–७५ | ७५–७६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ३०.० | ३२.६ | ३१.२ | २८.४ | ३०.९ | ३६.० | ३०.० | ३०.७ | २३.९ | २८.१ |
| अंदमान आणि निकोबार | — | — | — | — | — | — | — | — | १८.० | १८.० |
| आसाम | १३.४ | १५.२ | १४.३ | १९.४ | १५.२ | १५.२ | १५.४ | १६.४ | १५.५ | १५.० |
| बिहार | ११.९ | १३.९ | १५.८ | १५.८ | १५.५ | १२.७ | १४.३ | १५.० | १६.० | १४.९ |
| दिल्ली | २.१ | १.९ | २.० | २.० | २.२ | १.८ | २.३ | २.१ | २.३ | २.३ |
| गुजरात | २१.१ | २०.४ | १९.३ | २०.६ | २१.१ | २०.५ | १९.२ | २०.३ | १९.८ | २२.३ |
| हरियाणा | १३.७ | १५.८ | १६.९ | १९.० | १८.२ | १८.२ | १७.९ | १६.० | १४.८ | १७.५ |
| हिमाचल प्रदेश | ३.६ | ३.५ | ४.१ | ४.७ | ५.६ | ६.३ | ५.१ | ५.७ | ५.६ | ६.४ |
| जम्मू आणि काश्मीर | ४.७ | ३.० | ४.८ | ५.१ | ४.४ | ४.४ | ५.० | ५.० | १०.३ | ५.० |
| कर्नाटक | ३६.४ | ३५.३ | ३७.२ | ३४.३ | ३५.५ | ३३.२ | ३२.८ | ३१.६ | २८.१ | ३०.७ |
| केरळ | २५.२ | २५.२ | २५.२ | २६.० | १९.८ | २०.६ | २१.१ | २१.९ | २२.९ | २१.८ |
| मध्यप्रदेश | ९.३ | १०.३ | १०.३ | १०.२ | १०.८ | ११.२ | १०.७ | १०.८ | १०.० | १२.५ |
| महाराष्ट्र | २५.२ | २५.७ | २६.८ | २६.३ | २७.५ | २५.५ | २६.७ | ३१.८ | ३७.५ | ३५.८ |
| मणीपूर | — | — | — | — | — | — | — | १३.७ | १५.१ | १५.४ |
| मेघालय | आसाममध्ये समावेश आहे. | | | | १४.२ | १४.० | १४.० | १४.० | १४.२ | १६.२ |
| मिझोराम | –"– | –"– | –"– | | १४.७ | १३.६ | १३.७ | १४.३ | ११.५ | १४.० |
| नागालॅंड | — | — | — | — | — | — | ११.२ | १४.३ | १२.२ | ११.५ |
| ओरिसा | १९.८ | २०.१ | २३.४ | २१.१ | २१.७ | २५.२ | २६.४ | २३.८ | २५.३ | २६.३ |
| पंजाब | ११.३ | १४.५ | १३.३ | १६.८ | १६.७ | १५.९ | १८.५ | २१.३ | २०.२ | २१.७ |
| पांडिचेरी आणि गोवा, | ३७.५ | ३३.० | ४१.५ | ३४.४ | ३३.३ | २५.० | ३९.० | ४१.५ | ३५.७ | ३२.९ |
| दमण आणि दीव | | | | | | | २५.० | २६.७ | २०.४ | १९.० |
| राजस्थान | ४.९ | ६.४ | ५.६ | ५.४ | ३.२ | १७.७ | १६.१ | १९.६ | १७.१ | १५.७ |
| तामिळनाडू | ३१.६ | ३२.१ | ३२.४ | ३०.६ | ३१.३ | ३३.४ | ३४.१ | ३९.८ | ३६.८ | ३८.६ |
| त्रिपुरा | १३.६ | १३.० | १३.३ | १४.९ | १४.४ | १४.५ | १३.० | १२.७ | १५.९ | १६.७ |
| उत्तर प्रदेश | १३.४ | १५.४ | १७.० | १७.८ | १६.४ | १५.७ | १७.६ | १६.३ | १६.७ | १६.२ |
| पश्चिम बंगाल | १७.८ | १७.८ | १७.८ | १९.० | २१.८ | १९.७ | २०.५ | २१.४ | २३.५ | २३.७ |
| संपूर्ण भारत | १६.३ | १८.९ | १९.९ | १९.९ | १९.६ | १९.२ | २०.६ | २०.७ | ३०.२ | २०.७ |

# राज्यवार ऊस उत्पादन

( आकडे हजार टनात )

| राज्य | ६६–६७ | ६७–६८ | ६८–६९ | ६९–७० | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ | ७३–७४ | ७४–७५ | ७५–७६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ८०३३ | ९९२२ | १२००५ | १११०८ | ९१२२ | १०५७१ | ९९१७ | १०९०७ | ११४९६ | ९४२२ |
| अंदमान आणि निकोबार बेटे | — | — | — | — | — | — | — | — | १२ | ११ |
| आसाम | १०१७ | ११७४ | ११३० | १५७४ | १२०० | १२७४ | १३११ | १५८४ | १६०८ | १५२५ |
| बिहार | ४३९८ | ४०३१ | ५९१४ | ६५६३ | ६२०९ | ४४६५ | ४७५३ | ५९५७ | ५५६८ | ४९०७ |
| दिल्ली | १६ | ९ | १२ | १२ | ११ | ५ | ६ | ६ | ५ | ५ |
| गुजरात | १४०३ | १४९० | १६६१ | १८६६ | १९३७ | १८४९ | १८०१ | २२२७ | १९९९ | २०८० |
| हरियाना | ५१०० | ४७१० | ६६९० | ७९२० | ६९८० | ५१४० | ६००० | ५९३० | ५९१० | ६८७० |
| हिमाचल प्रदेश | ३१ | २७ | ४५ | ५१ | ४५ | ३८ | ४६ | ४८ | ५३ | ३१ |
| जम्मू आणि काश्मीर | २२ | १३ | २४ | २३ | २२ | २२ | १५ | १३ | २८ | ५८ |
| कर्नाटक | ६९३१ | ७३४५ | ९०८५ | ७७१४ | ८४८३ | ८७७६ | ८४५८ | ८५६३ | ८६२९ | ९९६५ |
| केरळ | ५४९ | ५०० | ५०३ | ५०१ | ३७६ | ३९१ | ४०० | ५१३ | ५३९ | ५०६ |
| मध्यप्रदेश | १०१६ | ९५१ | १४१७ | १६९१ | १६१३ | १४३८ | १३७० | १५१८ | २००० | २१३१ |
| महाराष्ट्र | ९९७७ | १०४८८ | १२६१३ | १४४४४ | १४७७० | ११४९४ | ११९१८ | १२९४३ | १७१७८ | ११९६७ |
| मणिपूर | — | — | — | — | — | — | — | ३७ | २६ | १७६ |
| मेघालय | (आसाममध्ये समाविष्ट) | | | ६ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ८ |
| मिझोराम | (आसाममध्ये समाविष्ट) | | | — | २२ | २५ | ३० | ११४ | ४२ | ६९ |
| नागालँड | — | — | — | — | — | — | ३९ | ५० | ६० | ८७ |
| ओरिसा | १७६९ | १८०९ | २१०८ | २०२२ | १६२७ | १९१७ | २००२ | २४०६ | २७५० | २९९० |
| पंजाब | ४३६० | ४५५ | ५१५० | ६१८० | ५२८० | ४०३० | ४६९० | ५८२० | ६१५० | ६१८० |
| पाँडिचेरी व गोवा | | | | | | | १५२ | १८५ | १६८ | १२१ |
| दमण आणि दीव | १५० | १३१ | २४९ | १७२ | १६८ | २०० | ५० | ६६ | ५१ | ५७ |
| राजस्थान | ३९३ | ३१३ | ५२४ | ६७७ | १२१५ | १२०३ | १३५२ | १९४६ | २१७० | १५५६ |
| तामिळनाडू | ६८९७ | ८८६४ | १३७३१ | १०२१५ | १०४४३ | ९६२६ | १२११३ | १८२९८ | १४५९३ | १४७८६ |
| त्रिपुरा | ९४ | ८७ | ९३ | १०२ | १०१ | ८७ | ६५ | ६७ | ८६ | ८६ |
| उत्तर प्रदेश | ३९३७० | ३७९०८ | ५०५४४ | ६०६७९ | ५४६७२ | ४९३५४ | ५६७२७ | ६०७७३ | ६१४७९ | ५८२१४ |
| पश्चिम बंगाल | १३०० | ११७८ | ११७८ | १५०४ | २०७५ | १६५७ | १६४४ | १६२७ | १६८२ | १७१३ |
| संपूर्ण भारत | ९२८२६ | ९५५०० | १२४६७६ | १३५०२४ | १२६३६८ | ११३५६९ | १२४८६६ | १४०८०५ | १४४२८९ | १४२७०४ |

# राज्यवार उसाखाली असलेली जमीन

(आंकडे हजार टानत)

| राज्य | ६६–६७ | ६७–६८ | ६८–६९ | ६९–७० | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ | ७३–७४ | ७४–७५ | ७५–७६* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | २६८ | ३०४ | ३८५ | ३९१ | २९६ | २९४ | ३३२ | ३५५ | ४८२ | ३३५ |
| अंदमान, निकोबार बेटे | — | — | — | — | — | — | — | — | १ | १ |
| आसाम | ७६ | ७६ | ७९ | ८१ | ७९ | ८४ | ८५ | ९७ | १०३ | १०२ |
| बिहार | ३६८ | २९० | ३७४ | ४१५ | ४०० | ३५१ | ३३२ | ३४३ | ३४८ | ३३० |
| दिल्ली | ८ | ५ | ६ | ६ | ५ | २ | २ | ३ | २ | २ |
| गुजरात | ६६ | ७३ | ८६ | ९१ | ९२ | ९० | ९४ | ११० | १०१ | ९३ |
| हरियाना | ३७३ | २९९ | ३९५ | ४१७ | ३८३ | २८२ | ३३६ | ३७० | ३९९ | ३९३ |
| हिमाचल प्रदेश | ९ | ८ | ११ | ११ | ८ | ६ | ९ | ८ | ९ | ९ |
| जम्मू आणि काश्मीर | ५ | ४ | ५ | ४ | ५ | ५ | ३ | ३ | ३ | ३ |
| कर्नाटक | १९० | २०८ | २४४ | २२५ | २३९ | २६४ | २५८ | २७१ | ३०७ | ३२४ |
| केरळ | २२ | २० | २० | १९ | १९ | १९ | १९ | २३ | २३ | २३ |
| मध्यप्रदेश | १०२ | ९२ | १३७ | १६७ | १५० | १२८ | १२८ | १४० | १९९ | १७१ |
| महाराष्ट्र | ३९७ | ४०८ | ४७० | ५४९ | ५३७ | ४४९ | ३६१ | ४०७ | ४५८ | ५३६ |
| मणिपूर | — | — | — | — | — | — | — | ३ | २ | ११ |
| मेघालय | ( समावेश | आसाममध्ये | आहे ) | | — | १ | १ | १ | १ | १ |
| मिझोराम | —"— | —" | —" | | १ | २ | २ | ४ | ४ | ५ |
| नागालँड | — | — | — | — | — | — | ४ | ३ | ५ | ६ |
| ओरिसा | ८९ | ९० | ९० | ९६ | ७५ | ७६ | ७६ | १०१ | १०९ | ११४ |
| पंजाब | ३८५ | ३१४ | ३८६ | ३६७ | ३१६ | २५४ | २५२ | २७२ | ३०४ | २८४ |
| पाँडिचेरी आणि | — | — | — | — | — | — | ४ | ५ | ४ | ५ |
| गोवा, दमण आणि दीव | ४ | ४ | ६ | ५ | ५ | ६ | २ | २ | ३ | ३ |
| राजस्थान | ८० | ४९ | ९४ | १२६ | ९२ | ६८ | ८४ | ९९ | १२७ | ९९ |
| तामिळनाडू | २१८ | २७६ | ४२४ | ३३४ | ३३४ | २८८ | ३५६ | ४६० | ३९६ | ३८३ |
| त्रिपुरा | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ६ | ५ | ५ | ५ | ५ |
| उत्तर प्रदेश | २९४० | २४६४ | २९७२ | ३४०२ | ३३२४ | ३१४८ | ३२३२ | ३६३९ | ३६८५ | ३५८४ |
| पश्चिम बंगाल | ७३ | ६६ | ६६ | ७९ | ९५ | ८४ | ८० | ७६ | ७ | ७२ |
| अखिल भारत | ५६८७ | ५०५७ | ६२५७ | ६७९२ | ६४६२ | ५९०७ | ६०५८ | ६८०० | ७१५१ | ६८९३ |

* अदाज

# प्रतिवर्षी उत्पादनात असलेले कारखाने, सुरुवातीचा साठा, उत्पादन आयात-निर्यात आणि वापर यांची माहिती

(आकडे लाख टनात)

| हंगाम | चालू असलेले कारखाने | सुरुवातीचा साठा | वर्षातील उत्पादन | आयात | एकूण उपलब्ध साठा | वापर | निर्यात |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५०–५१ | १३८ | ०.९१ | ११.३४ | ०.५७ | १२.८२ | १०.९८ | — |
| १९५१–५२ | १३९ | १.८४ | १५.२० | — | १७.०४ | ११.८२ | ०.०८ |
| १९५२–५३ | १३४ | ५.१४ | १३.१८ | ०.६० | १८.९२ | १६.७९ | ०.०७ |
| १९५३–५४ | १३४ | २.०६ | १०.३० | ७.२९ | १९.६५ | १८.३६ | — |
| १९५४–५५ | १३६ | १.२९ | १६.२२ | ५.७४ | २३.२५ | १७.५१ | — |
| १९५५–५६ | १४३ | ५.७४ | १८.९० | ०.६९ | २५.३३ | १९.७२ | — |
| १९५६–५७ | १४७ | ५.६१ | २०.७४ | — | २६.३५ | २०.१८ | ०.४७ |
| १९५७–५८ | १५८ | ४.७० | २०.०९ | — | २४.७९ | २०.७५ | ०.३६ |
| १९५८–५९ | १६४ | ३.६८ | १९.५१ | — | २३.१९ | २१.१३ | ०.३० |
| १९५९–६० | १६८ | १.७६ | २४.८२ | — | २६.५८ | २०.५३ | — |
| १९६०–६१ | १७४ | ७.४२ | ३०.२१ | — | ३७.६३ | २०.८७ | १.९४ |
| १९६१–६२ | १८० | १४.८२ | २७.२९ | — | ४२.११ | २६.०१ | ३.५४ |
| १९६२–६३ | १८६ | १२.५६ | २१.३९ | — | ३३.९५ | २५.०२ | ५.६६ |
| १९६३–६४ | १९४ | ३.२७ | २५.७३ | — | २९.०० | २३.२६ | २.४३ |
| १९६४–६५ | १९८ | ३.३१ | ३२.३२ | — | ३५.६३ | २४.२७ | २.६७ |
| १९६५–६६ | २०० | ८.५९ | ३५.४१ | — | ४४.०० | २७.९२ | ३.९२ |
| १९६६–६७ | २०० | १२.१६ | २१.५१ | — | ३३.६७ | २५.९५ | २.३५ |
| १९६७–६८ | २०० | ५.३७ | २२.४८ | — | २७.८५ | २२.११ | १.३९ |
| १९६८–६९ | २०५ | ४.३५ | ३५.५९ | — | ३९.९४ | २६.०९ | ०.७९ |
| १९६९–७० | २१५ | १३.०६ | ४२.६२ | — | ५५.६८ | ३२.६१ | २.१७ |
| १९७०–७१ | २१५ | २०.९० | ३७.४० | — | ५८.३० | ४०.२५ | ३.९५ |
| १९७१–७२ | २२० | १४.१० | ३१.१३ | — | ४५.२३ | ३७.८० | १.४४ |
| १९७२–७३ | २२८ | ५.९९ | ३८.७३ | — | ४८.१२ | ३५.२९ | ४.०५ |
| १९७४–७५ | २४६ | ८.७८ | ४७.९७ | — | ५६.७५ | ३४.५७ | ९.२४ |
| १९७५–७६ | २५२ | १२.९४ | ४२.६२ | — | ५५.५६ | ३६.९० | १०.२१ |

सूचना :–१९५९–६० पर्यंतचे आंकडे नोव्हेंबर ते ऑक्टोबर असे वर्षे धरून आहेत, तर ६०–६१ पासून पुढे ऑक्टोबर ते सप्टेंबर असे वर्ष धरण्यांत आली आहेत.

# गेल्या वीस वर्षांतील जागतिक साखर उत्पादन व साखरेचा वापर

गेल्या वीस वर्षातील साखरेची आंकडेवारी पाहता असे दिसते की, बऱ्याच वर्षांत उत्पादनापेक्षा वापर कमी झाला आहे. १९६४–६५ मध्ये सर्वाधिक वाढ दिसते. त्यावर्षी वापरापेक्षा उत्पादन ७५,५८,००० टन अधिक होते.

६२–६३ साली वापर उत्पाददनापेक्षा अधिक होता. गेल्या १० वर्षांत सतत ३ वर्षी वापरापेक्षा उत्पादन कमी झाले आहे. ७३–७४ मध्ये पुन्हा उत्पादन वाढले आहे.

| वर्ष | जागतिक साखर उत्पादन | साखरेचा जागतिक वापर | साखरेचा वापर व उत्पादनापेक्षा असलेली वाढ किंवा घट |
|---|---|---|---|
| १९७६–७७ | ८७,६२७,००० | ८३,२४६,००० | + ४,३८१,००० |
| १९७५–७६ | ८२,८६९,००० | ८०,०१५,००० | + २,८५४,००० |
| १९७४–७५ | ७९,८८७,००० | ७७,८३२,००० | + २,०५५,००० |
| १९७३–७४ | ८०,२७४,००० | ८०,०७०,००० | + २०४,००० |
| १९७२–७३ | ७७,३६९,००० | ७७,९९८,००० | — ६२९,००० |
| १९७१–७२ | ७३,८८५,००० | ७५,९२५,००० | — २,०४१,००० |
| १९७०–७१ | ७२,७११,००० | ७४,४१९,००० | — १,६४८,००० |
| १९६९–७० | ७४,३४६,००० | ७२,२२३,००० | + २,१२३,००० |
| १९६८–६९ | ६७,७८४,००० | ६८,१४१,००० | — ३५७,००० |
| १९६७–६८ | ६६,४३५,००० | ६५,६३५,००० | + ८००,००० |
| १९६६–६७ | ६५,६४२,००० | ६५,४५७,००० | + १८५,००० |
| १९६५–६६ | ६३,१०२,००० | ६२,८१६,००० | + २८६,००० |
| १९६४–६५ | ६६,८३१,००० | ५९,२७३,००० | + ७,५५८,००० |
| १९६३–६४ | ५४,७४५,००० | ५४,२६१,००० | + ४,८४०,००० |
| १९६२–६३ | ५१,१७२,००० | ५४,४७९,००० | — ३,३०७,००० |
| १९६१–६२ | ५२,३५१,००० | ५५,६०२,००० | — ३,२५१,००० |
| १९६०–६१ | ५६,०७३,००० | ५२,७३४,००० | + ३,३३९,००० |
| १९५९–६० | ४९,५६४,००० | ४८,८५८,००० | + ७०६,००० |
| १९५८–५९ | ५१,०३४,००० | ४७,५६१,००० | + ३,४७३,००० |
| १९५७–५८ | ४५,१७२,००० | ४४,७०४,००० | + ४६८,००० |

# भारतातील उसाचा निरनिराळ्या कारणासाठी केलेला वापर

| वर्ष | ऊस उत्पादन (हजार टन) | वापरलेला ऊस (हजार टन) साखर उत्पादनासाठी | बेणे, खाणे वगैरेसाठी | गूळ व खांडसरीसाठी | वापरलेल्या उसाचे प्रतिशत प्रमाण साखरेसाठी | खाणे, बेणे वगैरेसाठी | गूळ व खांडसरीसाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६०–६१ | ११०,००१ | ३१,०२१ | १३,६२० | ६५,३६० | २८.२ | १२.५ | ५९.४ |
| १९६१–६२ | १०३,९६७ | २७,९४६ | १२,७४३ | ६३,२७८ | २६.९ | १२.२ | ६०.९ |
| १९६२–६३ | ९१,८१३ | २०,७९९ | ११,१५७ | ५९,८५७ | २२.६ | १२.१ | ६५.३ |
| १९६३–६४ | १०४,२२५ | २५,७१६ | १२,५३५ | ६५,९७४ | २४.७ | १२.० | ६३.३ |
| १९६४–६५ | १२१,९०९ | ३३,४५४ | १४,५३९ | ७३,९१६ | २७.४ | ११.९ | ६०.७ |
| १९६५–६६ | १२३,९९० | ३६,५१२ | १४,६०६ | ७२,८७२ | २९.४ | ११.८ | ५८.८ |
| १९६६–६७ | ९२,९२६ | २१,६३७ | ११,०९४ | ६०,०९५ | २३.३ | ११.८ | ६४.७ |
| १९६७–६८ | ९५,५०० | २२,६३८ | ११,२३४ | ६१,६२८ | २३.७ | १२.० | ६४.५ |
| १९६८–६९ | १२४,६७६ | ३७,६९९ | १४,७३४ | ७२,२४३ | ३०.२ | ११.८ | ५८.० |
| १९६९–७० | १३५,०२४ | ४५,७०१ | १६,२९१ | ७३,०३२ | ३३.९ | ११.८ | ५४.० |
| १९७०–७१ | १२६,३६८ | ३८,२०५ | १५,१७३ | ७२,९९० | ३०.२ | १२.१ | ५७.८ |
| १९७१–७२ | ११३,५६९ | ३१,०१५ | १३,५१४ | ६९,०४० | २७.३ | १२.० | ६०.८ |
| १९७२–७३ | १२४,८६६ | ४०,४०७ | १४,९९९ | ६९,४६० | ३२.४ | ११.९ | ५५.६ |
| १९७३–७४ | १४०,८०५‡ | ४२,२७८ | १६,८०२ | ८१,७२५ | ३०.० | १२.० | ५८.१ |
| १९७४–७५ | १४४,२८९‡ | ४८,४२५ | १७,१८८ | ७८,६६६ | ३३.६ | ११.९ | ५४.५ |
| १९७५–७६† | १४२,७०४‡ | ४१,८८० | १६,९११ | ८३,९१३ | २९.३ | ११.९ | ५८.८ |

* कांही प्रमाणांत सुधारलेला अंदाज.  ‡ अंतिम अंदाज  † तात्पुरता अंदाज

# भारतातील राज्यवार साखरेचा खप

आकडे हजार टन

| राज्य | (साखर वर्ष नोव्हेंबर ते ऑक्टोबर असे धरलेले आहे.) | | | | | | | (साखर वर्ष ऑक्टोबर ते सप्टेंबर असे आहे.) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ६१–६२ | ६२–६३ | ६३–६४ | ६४–६५ | ६५–६६ | ६६–६७ | ६७–६८ | ६८–६९ | ६९–७० | ७०–७१ | ७१–७२ | ७२–७३ | ७३–७४ | ७४–७५ |
| आंध्रप्रदेश | १०९ | १०७ | १०० | ११८ | १३७ | १२९ | ९५ | ११४ | १५० | २०२ | १७२ | १७१ | १६४ | १७३ |
| आसाम | ६८ | ७१ | ७३ | ८४ | ७० | ७६ | ५७ | ७३ | ८४ | १०४ | ८५ | ८० | ८२ | ७४ |
| बिहार | १५८ | १४६ | १२६ | १४२ | १७१ | १५४ | ११३ | १२९ | १७८ | २११ | २०२ | १९३ | १९८ | १८६ |
| महाराष्ट्र व गुजरात | ७१३ | ७०८ | ६३० | ६३५ | ७३० | ६७१ | ६०३ | ७०६ | ९२३ | १०५८ | ९६० | ९०१ | ९०३ | ८७४ |
| केरळ | ४५ | ५५ | ७० | ७५ | ९९ | १०० | ६९ | ९६ | ११६ | ११० | १३६ | १३३ | १२६ | १२३ |
| मध्यप्रदेश | १४० | १३३ | १४३ | १४७ | १५८ | १४४ | १०३ | १२४ | १३६ | १८७ | १८४ | १९१ | १७० | १७८ |
| तामिळनाडू | १२२ | १४४ | १३१ | १४० | १७२ | १६८ | १४९ | १६५ | १८० | २६६ | २३५ | १९६ | २१० | २०८ |
| कर्नाटक | १३६ | ११७ | १०७ | १११ | १३४ | १२९ | ९१ | ११६ | १२५ | १९७ | १६९ | १५९ | १६९ | १७० |
| ओरिसा | ३९ | १४२ | ४६ | ५१ | ५६ | ५८ | ४० | ५० | ५४ | ६६ | ६३ | ७३ | ५८ | ६४ |
| पंजाब | १८२ | १७० | १७० | १७९ | १९६ | १७१ | १३५ | १७० | २१५ | २८९ | २७३ | २१७ | २३० | २११ |
| हरियाना | समावेश पंजाद मध्ये केला आहे. | | | | | | ५५ | ६४ | ८४ | ११४ | १०४ | ८५ | ९५ | ९० |
| राजस्थान | ८३ | ६७ | ८० | ८९ | १०१ | ९३ | ९९ | ११० | १३० | १६८ | १६२ | १५४ | १७४ | १६० |
| उत्तर प्रदेश | ३७५ | ३२१ | २५४ | २७९ | ३२७ | २८७ | २२५ | २७० | ३८३ | ५२३ | ४८० | ४४३ | ४९० | ४९८ |
| पश्चिम बंगाल | २८२ | २४८ | २३१ | २६५ | २९८ | २७६ | २१९ | २४२ | २९६ | ३४१ | ३३७ | ३०२ | २२९ | २१८ |
| दिल्ली | १२४ | ११५ | ८० | ७५ | ८७ | ८६ | ७९ | ८५ | ९८ | १०७ | ९९ | ९४ | १०१ | १०७ |
| इतर राज्ये | १२ | ४६ | ६६ | ७९ | ७४ | ५९ | ८३ | ९१ | ११२ | ८२ | १३४ | १२२ | १२३ | १०१ |
| संपूर्ण भारत | २५८८ | २४८६ | २३०७ | २४६९ | २८१० | २६०१ | २२१५ | २६०५ | ३२६४ | ४०२५ | ३७९५ | ३५१४ | ३५२२ | ३४३५ |

( 'गोडवा' वरून पुनर्मुद्रित )

सत्यशिवसुंदर प्रकाशनाचे हे मासिक. संपादक प्रा. कमलाकर परचुरे ह्यांनी सच्चिदानंद मुद्रणालय, लक्ष्मी रोड, पुणे येथे छापून
९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.

Posted under prepayment Licence No. 61
at Deccan Gymkhana post office

रजि.नं. P.N.C.205

तुमची समस्या कोणतीहि असो... प्रत्येक आर्थिक प्रश्नाची समाधानकारकपणे सोडवणूक करण्यासाठी मदत करायला महाराष्ट्र बँक वचनबद्ध आहे. देशभरच्या ४५० पेक्षा अधिक शाखा आणि जगभरचे कार्यक्षम प्रतिनिधी यांच्या माध्यमातून महाराष्ट्र बँक तुम्हाला निरनिराळया सेवा उपलब्ध करून देते...आमच्या विविध बचत आणि ठेव योजना देखील तुमची आर्थिक कुवत आणि गरजा यांचा विचार करूनच तयार करण्यात आलेल्या आहेत.

● मुदत ठेव योजना ● संचित ठेव योजना ● लोकमंगल दैनंदिन ठेव योजना ● निश्चितकाल ठेव योजना ● मासिक व्याजाची ठेव योजना ● शुभमंगल ठेव योजना ● प्रवासी चेक ● भेट चेक ● लघुउद्योग, शेतीविकास यांसाठी अर्थसाहाय्य योजना

यापैकी कोणतीहि योजना स्वीकारा... सगळ्या योजना सारख्याच आकर्षक आहेत.

महाराष्ट्र बँकेमध्ये बचत करण्याची सवय म्हणजे उद्याची तरतूद आजच करून ठेवण्याची सर्वोत्तम सोय... अशा प्रकारे बचत करणे किती हितकारक असते हे तुम्हाला महाराष्ट्र बँकेमध्येच उमगेल.

महाराष्ट्र बँक...तुमची जिव्हाळ्याची बँक




बँक ऑफ महाराष्ट्र

११७७ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२

PRATIBHA 767 MAR


# अर्थ


सप्टें. ७७ मूल्य रुपये तीन

3 NOV 1977

## सहकार विशेषांक

एकमेका सहाय्य असे प्रगति तेथ नित्य वसे ।।





**श्री विखे पाटील यांच्या ७७ व्या वाढदिवसानिमित्त भेट**

# हे कारटं तर म्हणतंय हुंडा घेणार नाही....!




**म्हणजे बेबीसारखं याच्याही लग्नासाठी पैसा सांठवणं आलं !**

तुटपुंज्या पगारातून पै पैसा साठवून त्याचं शिक्षण केलं. पुस्तके, फी, भारी भारी कपडे, सहली यासाठी कितीतरी पैसा खर्च केला. स्वत:ची, बायकोची हौसमौज बाजूला ठेवली- वाटलं होतं...याची प्रॅक्टिस सुरु झाली की हे गरीबीचं दुखणं नाहीसं होईल. शिक्षणासाठी केलेल्या खर्चाची थोडीफार भरपाई हुंड्यातून काढता येईल. आणि आता हे 'बाजीरावचे बेटे' हुंडा घेणार नाही म्हणतात....शपथ घेतलीय म्हणे. उद्या त्या पोरीच्या लग्नाच्यावेळी कुठला टेकोजी म्हणतोय कां बघू .... हुंडा घेणार नाही म्हणून !

आजोबा आपण समजता तितके आपले चिरंजीव अविचारी नाहीत. आपल्या विवाहासाठी सांगली बँकेत त्याने केव्हांच तरतूद केली आहे.

प्रत्येक विचारी तरुण सांगली बँकेत नित्य बचत करीत असतो.

आपल्या उत्कर्षातील साथीदार

**दि सांगली बँक लि.**

रजि. ऑफीस - राजवाडा चौक, सांगली


# अर्थचा दिवाळी अंक

## ( ऑक्टोबर नोव्हेंबर जोड अंक )

**नोव्हेंबरच्या १० तारखेच्या सुमारास प्रकाशीत होत आहे.**

ह्या अंकात आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या अर्थ तज्ञांचें आगामी आर्थिक प्रगतीबद्दलचे भाष्य करणारे संग्रहणीय लेख प्रसिद्ध करताना आम्हाला विशेश आनंद होतो त्यात प्रा. ब्रह्मानंद, प्रा. पी. एन्. माथूर, प्रा वि. म. दांडेकर, प्रा. भारद्वाज ह्यांच्या भारतीय अर्थव्यवस्थेवरील आलोचना करण्याच्या लेखांची छपाई सुरू झाली आहे. अर्थच्या वाचकांना दिवाळी निमित्त ही घसघशीत भेट देताना कृतार्थता वाटते अंकाची राखीव मागणी नोंदविण्याकरीता संपर्क साधा. ( अर्थाची वार्षिक वर्गणी दि. ८ नोव्हेंबरच्या आत भरणाऱ्या नव्या वर्गणीदारांस हा खास दिवाळी अंक ही उपलब्ध होईल. )

संपादक :- अर्थ ९०६, शिवाजी नगर, पुणे.

वर्ष दुसरे अंक नववा : सप्टेंबर १९७७
किंमत : ३ रुपये वार्षिक वर्गणी : ३० रुपये
कार्यालय ९०६ : शिवाजीनगर, पुणे ४.



# अर्थ

आर्थिक विषयांच्या अभ्यासकांना प्राधान्य देणारे मासिक दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे

अनुक्रम पृष्ठे


१ शेतकऱ्यांच्या सहकारी कारखान्याचा श्रीगणेशु — ३
कै. वामनराव वर्दे

२ मी पाहिलेले विखे पाटील — ६
डॉ. आर. जी. काकडे

१ श्रेष्ठ भूमिपत्र — १०
श्री. राजा मंगळवेढेकर

४ प्रवरा काठचा कल्पवृक्ष — १५
श्री. वसंतदादा पाटील

५. शेतकऱ्यांचा झुंझार नेता — १७
श्री. अण्णासाहेब शिंदे

६. कर्मयोगी विखे पाटील — २१
श्री. शंकरराव मोहिते

७ पदरची भाकरी सहकाराची निर्लेप चाकरी — २४
श्री. तात्यासाहेब कोरे

८ पद्मश्री विखे पाटील यांचे नेतृत्वगुण — २९
डॉ. वा. चु. श्री. श्रीमाळ

९ सहकाराचे स्फूर्तिस्थान — ३३
श्री. जाधवराव

१० सहकार सांदिपनी — ३४
श्री. शंकरराव कोल्हे


## आलोक

श्री. विखे पाटील ह्यांना बऱ्याच दिवसात भेटलो नव्हतो त्यांना अलिकडे पाहिले नव्हते.

पुण्याला ते गोखले अर्थशास्त्र संस्थेत येत असत त्यावेळी कै. प्रा. नानासाहेब गाडगीळ आणि ह्या लोणीच्या पाटलांचे, कसे बुवा जमते ह्याचे कोडे वाटे.

प्रा. गाडगीळांना आपलेसे करण्यात बऱ्याच निकटवर्तियांना शिष्योत्तमांनाही यश लाभले नाही ह्या पार्श्वभूमीवर प्रवरेकाठच्या, खिशात भाकरी घेऊन येणाऱ्या ह्या सुदाम्याने भारतातल्या शेतकऱ्यांच्या पहिल्या सहकारी साखर कारखान्याची द्वारका उभी करण्याकरता गाडगीळांचे मन जिंकले हा महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीतील एक असाधारण चमत्कार.

प्रवरा सहकारी कारखाना म्हणजे एक अर्थतज्ञ आणि एक शेतकऱ्यांचा संघटक त्यांच्या सहकार्याचे, जिद्दीचे, कल्पकतेचे चिरंतन प्रतीक महाराष्ट्रातील

बुद्धिवंत आणि बहुजनसमाजातील शेतकरी-कष्टकरी एकत्र असल्यास केवढे मोलाचे समाजपरिवर्तनाचे कार्य करू शकतात त्याचे हे स्फूर्तिदायक उदाहरण.

अलिकडे दोन्ही अंगाने तुटकपणा आणि सहकार वाढत चालल्याने ह्या दोहोतील अंतर वाढत चालले आहे. काळपरत्वे हे अंतर कमी करण्याची निकड पुन्हा एकदा भासेल त्याची काळजी नाही.

१४ ऑगस्ट रविवार दुपार विखे पाटील ह्यांना खास भेटावे म्हणून प्रवरानगरला धडकलो. आल्याची वर्दी दिल्यावर मराठमोळे स्वागत जेवणाचा आग्रह. नको म्हणता चहा आलाच. बंगल्यावर पद्मश्री विखे पाटील, त्यांची काळजी वाहणारी एक परिवारातील एक चुणचुणीत मुलगी आणि एक गडी एवढेच लोक होते. बंगला कसला ! साधे ३-४ खोल्यांचे एक घर. कसल्याच प्रकारचा डामडौल नाही, भपका नाही, मिजास नाही. साधे फर्निचर, वास्तूला श्रद्धेचा, भक्तीचा आणि अहर्निश कष्टांचा सुगंध.

श्री. विखे पाटलांना मोतीबिंदूमुळे आता स्वच्छ दिसत नाही. मोठ्याने बोलले तर ऐकू येते. तुळशी-माळ घालून, डोईला मुंडासे कसेबसे गुंडाळून, पलंगावर पाय पोटाशी घेऊन विठ्ठलनामाचा गजर करीत स्वस्थ बसलेले विखे पाटलांचे नवे रूप पाहिलें.

'पुण्याहून आलो' असं सांगितल्यावर कै. नाना-साहेब गाडगीळ ह्यांच्या आठवणीने त्यांचे हृदय भरून आले. डोळे पाण्याने डबडबले. "जे काही कार्य घडलें ते गुरूच्या कृपेमुळे आणि देवाचे कृपेने. माझे त्यांत काही नाही. ही भावना त्यांनी पुनःपुन्हा व्यक्त केली.

निरोप घ्यायला लागल्यावर त्यांनी पुन्हा एकदा जेवणाखाणाची चौकशी केली. निघतांना प्रा. गाडगीळ ह्यांच्या पत्नींना आणि डॉ. काकड्यांना नमस्कार सांगा हे आवर्जून सांगितलें.

२८ ऑगस्ट १९७७ रविवार नारळी पौर्णिमा. संध्याकाळी भरत नाट्यमंदिरात श्री. विखे पाटील ह्यांच्या ७७ व्या वाढदिवसानिमित्त स्नेही मंडळींनी आयोजित केलेला सुटसुटीत समारंभ. राजा मंगळ-वेढेकर लिखित भूमिपुत्र ग्रंथाचे प्रकाशन. गदिमा, शिवाजीराव भोसले अनुक्रमे अध्यक्ष व महनिय वक्ते.

त्यावेळी एका काचेच्या पेटीतल्या मेणबत्त्यांवर फुंकर मारताना आणि केकला सुरी लावतांना ह्या शेतकऱ्यांमधील आधुनिक भगीरथाच्या चेहऱ्यावरचे भाव पाहिले. जन्मभर पदराची भाकरी खाऊन कुणा-चेही मिंधे न राहता प्रामाणिकपणे व तळमळीने सहकारी शेतकऱ्यांचा पहिला कारखाना उभा करणारा हा स्वाभिमानी शेतकरी मेणबत्त्या व केक ह्या दोन्ही गोष्टी एकत्र पाहाताना गंमत वाटली. मात्र ते काम पार पडल्यावर 'देवा देवा' असं पुटपुटत आपल्या खुर्चीवर मराठमोळ्या झोकाने जेव्हा विखे पाटील बसलें आणि प्रत्येक हाराला त्यांनीं तो देवाला अर्पण, कर्मवीर भाऊराव पाटलांना, गाडगीळांना असा जप चालवला ते पाहून मात्र लक्षात आलें की कष्टाच्या भाकरीवर पोसलेल्या ह्या शेतकऱ्याचा कणा मजबूत तर आहेच पण श्रद्धास्थानांपुढे असणारी मनाची विनम्रताही त्यात आहे.

१४ ऑगस्टला निरोप घेता घेता व यामुळे ते असे ही म्हटल्याचे आठवते की आमचा नमस्कार आणि कृतज्ञता आमच्या गुरुंना कळवा. त्या भावनेचा अन्वय लावून आदर करावा ह्या दृष्टीने ह्या जोडीचे सह-कार क्षेत्रातील कार्य, कॉलेजातील तरुण विद्यार्थ्यास माहित करून द्यावे ह्याकरता ह्या विशेषांकाचे प्रयो-जन. ह्या अंकामुळे व त्याच्या वाचनामुळे गेल्या पिढी-तील सहकारी चळवळीचा चालता इतिहासच महारा-ष्ट्रातील नव्या पिढीच्या कार्यकर्त्यांना उद्बोधक ठरेल ही अपेक्षा.

ह्या अंकातील साहित्य पुनर्मुद्रित करण्यास श्री विखे पाटील ह्यांचे चिरंजीव खासदार श्री एकनाथ-राव विखे ह्यांनीं सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचे व अंकातील सर्व मान्यवर लेखकांचे आभार.

श्री विखे पाटील ह्यांच्या ७७ व्या वाढदिवशी, १९७७ चा हा 'अर्थ' चा सहकार विशेषांक म्हणजे सहकार क्षेत्रातील एका अलौकिक कार्याचा अपूर्ण गौरव.

# शेतकऱ्यांच्या सहकारी कारखान्याचा श्रीगणेशा

कै. वामनराव वर्दे
संस्थापक-संचालक प्रवरा सहकारी साखर कारखाना

**ह्या लेखातील शब्दांना आता विशेष प्रकारचे महत्व जिवंतपणा आला आहे. महाराष्ट्रातल्या सहकारी बँकेत आणि सहकारी चळवळीचे शिल्पकार ना. वैकुंठभाई मेहता आणि जुन्या अर्थचे संपादक प्रा. वा. गो. काळे ह्यांचे निकटचे सहकारी श्री. वामनराव वर्दे ह्यांचे शुक्रवार दि. ३० सप्टेंबर रोजी दुःखद निधन झाले. नव्या अर्थात त्यांचा हा लेख प्रसिद्ध होताना त्यांच्या नावामागे कै. लिहावे लागेल अशी कल्पना नव्हती. अंक प्रकाशित होण्यापूर्वीच....**

महाराष्ट्राची सहकारी चळवळ ही एकूण भारताच्या सहकारी चळवळीच्या महासागरातील दिपस्तंभ आहे. दीपस्तंभाचे काम दिशा दाखविण्याचे असतें. वाऱ्यावादळांत सापडलेल्या नौकांना प्रकाश दाखविण्याचे, धोक्याची व येणाऱ्या संकटांची कल्पना देण्याचे असते. अचूक दिशा दाखवून त्यांचा प्रवास सुखकर व सुकर होण्याच्या दृष्टीने पथ प्रदर्शन करण्याचे असते. ही नुसती कविता नाही तर ती एक वस्तुस्थिती आहे आणि ती केवळ आपणच मान्य करतो असे नव्हे तर अवघ्या भारतीय सहकारी चळवळीने मान्य केलेली आहे. सहकारी क्षेत्रांतील महाराष्ट्राची कामगिरी केवळ नेत्रदीपकच नव्हे तर प्रेरक, मार्गदर्शक व दिग्दर्शक स्वरूपाची आहे. ती विविध स्तरीय आहे. अनेक कल्पना महाराष्ट्राच्या चळवळीने प्रथम मांडल्या पुरस्कारिल्या. आणि नंतर विविध प्रांतातल्या सहकारी चळवळींनी स्वीकारल्या, राबवून दाखविल्या. पीक कर्ज पद्धतीचे एकच उदाहरण या संदर्भात पुरेसे बोलके आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ विकासाची विविध क्षेत्रे शोधून काढण्यात त्याव्दारे महाराष्ट्राचे कृषि औद्योगिक मानचित्र पालटून टाकण्याच्या प्रयत्नांत केवळ अग्रेसरच नव्हे तर गतिशील राहिलेले आहे. प्रयोग-प्रयत्नांतूनच प्रगति साधते गतिशीलतेतून केवळ विनाशच टळत नाही तर नवी क्षितिजे गवसतात आणि प्रयोग-प्रयत्नांतून एक नवे जग निर्माण करता येते,

महाराष्ट्राची साखर कारखानदारी हे महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीने दाखवलेले नवे जग आहे. आपण अभिमान बाळगावा असे जग आहे केवळ आपणच अभिमान बाळगावा असे नव्हे तर अवघ्या देशाने कौतुक करावे असा हा विषय आहे. साखर कारखाने निर्माण झाले आणि ते यशस्वी झाले म्हणूनच महाराष्ट्रात अनेक प्रक्रिया व्यवसाय सुरू झाले आणि कृषि औद्योगिक क्रांतीची नांदी म्हटली गेली. भात गिरण्या, तेल गिरण्या, वनस्पति तयार करण्याचे कारखाने, जिनिंग प्रेसिंग सोसायटया, सूतगिरण्या, मद्यार्क, तयार करण्याचे कारखाने, सॉल्व्हन्ट एक्स्ट्रॅक्शन प्लॅन्टस् आदि संस्था सुरू झाल्या, तसेच अनेक कृषि उद्योगही आज सुरू झाले आहेत. परंतु आजच्या यशाची नीटशी कल्पना येण्यासाठी महाराष्ट्राच्या सहकारी साखर चळवळीचा आढावा घेणे आवश्यक ठरते. या जगात 'यशा सारखं यशस्वी' काही असत नाही. साखर कारखान्यांनी इतके यश संपादन केले आहे की ते यशच आता 'चिंतेचा' व 'हेव्या' चा विषय झाले आहेसे दिसते. परंतु हे यश अपघाताने वा केवळ दैवयोगाने मिळालेले नाही. **जिद्द, आशावाद, परिश्रम, अचुक मार्गदर्शन द्रष्टेपण आणि स्वीकृत कार्याबद्दलची निष्ठा आणि आत्मविश्वास यांच्या बळावरच ते संपादन केले गेलेले आहे.**

## सहकारी चळवळीतील सोनेरी पान

महाराष्ट्रातील साखर कारखानदारी ५० वर्षापूर्वी सुरू झालेली असली तरी सहकारी साखर कारखान्याच्या इतिहासातले पहिले सोनेरी पान मात्र १९५० साली लिहिले गेले. कारखान्याची नोंदणी १९४८ सालीच झालेली असली तरी प्रत्यक्षांत मात्र १९५० साली. महाराष्ट्रातील पहिला कारखाना सुरू झाला. उत्पादकांच्या सहकारी सोसायटयांची कल्पना श्रीरामपूर येथे बागायतदारांच्या परिषदेत मांडली

गेली. खाजगी क्षेत्रातील कारखान्यांची गाळप क्षमता मर्यादित होती. ऊस उत्पादक शेतकऱ्यांपुढे त्याकाळी केवळ तीनच पर्याय होते. स्वतःचे गुऱ्हाळ तरी घालावे किंवा उत्पादित ऊस या खाजगी कारखान्यांना ते म्हणतील त्या भावाने विकावा किंवा तो व्यापारी गुऱ्हाळकरांना तरी विकावा. ग्रामीण भागात ह्या खाजगी कारखानदारीने काही प्रमाणात रोजगार उत्पन्न करून दिला होता. हे जरी खरे असले तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे शोषण काही त्यामुळे थांबत नव्हते. हे शोषण उघडया डोळ्यांनी दीर्घकाळ पाहत बसणे हेहि शेतकऱ्यांना उचित वाटत नव्हते. शेतकऱ्यांच्याच मालकीचे कारखाने असावेत ही कल्पना जरी मूळ धरू लागली असली तरीही त्या कल्पनेला कितपत प्रतिसाद मिळेल वा ती तितकीशी प्रमाणात यशस्वी होईल याविषयी खुद्द उत्पादक शेतकऱ्यांच्या मनातच अनेक आशंका होत्या. परंतु कुणीतरी कोठे तरी ही कोंडी फोडणे अगत्याचे होते. साखर कारखान्याच्या म्हणजेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालकीच्या कारखान्याच्या कल्पनेची टिंगल करण्यात आली. तिला हास्यास्पदही ठरवण्यात आले होते. परंतु कै. धनंजयराव गाडगीळ यांचे खंबीर व अचुक मार्गदर्शन, दृष्टेपणा आणि विठ्ठलराव विखे पाटील यांचा जबर आत्मविश्वास व सहकारी प्रयत्नांवरील निष्ठा यांच्या बळावर १९५० साली पहिला कारखाना प्रवरा पाटक्षेत्रात लोणी येथे अस्तित्वात आला. ऐतिहासिक दृष्टचा हा केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतीय सहकारी साखर कारखान्याच्या इतिहासातील पहिला साखर कारखाना होय! ह्या कारखान्याच्या निर्मितीत अनेक अडचणी आल्या आणि त्या अडचणी जशा आर्थिक होत्या तशाच त्या काही प्रमाणांत मानसिक स्वरूपाच्याही होत्या. आर्थिक बाबतीत राज्य सहकारी बँकेचा कार्यकारी संचालक म्हणून माझा संबंध आला आणि आर्थिक बाबी बँकेने तत्परतेने भागविल्या. आत्मविश्वास निर्माण झाल्याशिवाय शेतकरी ह्या बाबतीत हार्दिक व सक्रिय पाठिंबा देणार नाहीत हे आम्ही जाणत होतो. परंतु त्याबाबत धनंजयराव गाडगीळ, विखे पाटील, गणपतराव औताडे यांनी चोख कामगिरी बजावली आणि लोणी क्षेत्रांतील 'प्रवरा' कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. याबाबत बँकेचा कार्यकारी संचालक म्हणून श्री. विखे पाटील यांची जिद्द, सहकारनिष्ठा, श्रम करण्याची क्षमता यांच्याशी माझा परिचय झाला. त्यांच्या व्यक्तित्वातील साधेपणा व स्वीकृत कार्य यशस्वी होणारच हा आत्मविश्वास यांचा प्रत्यय मला आला.

लोणी ( प्रवरा ) कारखान्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात आत्मविश्वासाची बीजे रोवली गेली. त्यामुळे सहकारी क्षेत्रांत साखर कारखाने यायला हवेत ही भावना बळावली. साखर निर्मिती हा एक प्रक्रिया व्यवसाय (प्रोसेसिंग इंडस्ट्र) असल्याने सहकारी कार्यक्षेत्र त्याला सुयोग्य आहे हा विचारही मान्यता पावला. तसेच साखर उत्पादन जर खाजगी क्षेत्रांत राहिले तर २५–३० वर्षांच्या खंडाच्या कराराने जमिनी द्याव्या लागतील व अंतिमतः शेतकरी हा भूमिहीन मंजूर बनेल व तेच त्याचे दीर्घ कालीन प्राक्तन ठरेल व त्याचे शेतीवरच परिणाम होतील असे नव्हे तर राजकीयही परिणाम होण्याची शक्यता नाकारून चालणार नाही हा विचार करून सहकारात साखर कारखाने दिले जावेत ह्या कल्पनेला पाठिंबा लाभला. कै. भाऊसाहेब हिरे हे त्यावेळी शेती मंत्री होते. डेव्हलपमेंट कौन्सिलचेही ते सभासद होते. त्यांनी ही कल्पना उचलून धरली. मी शासनाला (केंद्र) पत्र लिहिले त्याची प्रत त्यांना मी पाठविली होती व नवीन परवाने फक्त सहकारी प्रकल्पांना देण्यात यावेत असे सुचविले होते डेव्हलपमेंट कौन्सिलच्या मिटींगसाठी ते दिल्लीला गेले होते. मीही गेलो होतो. काही कामासाठी परत येताना त्यांनी फ्रॉन्टीयर मेलमध्ये मला बघितलें. **मला म्हणाले, "आनंदाची बातमी आहे" मी म्हणालो 'कशाबद्दल तुमच्या पत्राबद्दल!' यापुढे साखर कारखाने सहकारी क्षेत्रातच निघावेत या कल्पनेला हिरवा कंदिल मिळालेला आहे' त्यानंतर १५ कारखान्यांना लायसेन्स मिळाले.**

सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भात आणखी एक गोष्ट नमूद केली पाहिजे. ती अशी की त्यावेळी पुण्यास 'डेक्कन टेक्नॉलॉजिस्ट कॉन्फरन्स' झाली होती. त्या कॉन्फरन्समध्ये अध्यक्षांनी असे विचार व्यक्त केले होते की, 'गाडगीळ वर्दे यांनी शेतकऱ्यांना भांडवली खर्चात पाडू नये. त्यातून काही साधणार नाही परंतु महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी त्यांच्यापुढे उभे राहिलेले आव्हान अति समर्थपणे स्वीकारले व पेलले असे दिसते. हा ग्रामीण धंदा असला तरी धंदा काढून तो आपण समर्थपणे व सक्षमतेने चालवू शकतो. हा नवा विश्वास साखर कारखान्यांनी निर्माण केला ही वस्तुस्थिती आहे. ह्या आत्मविश्वासाची निर्मिती, न्युनगंडाची हकालपट्टी ही साखर कारखान्यांची सर्वात मोठी देणगी आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये या देणगीचे खरे शिल्पकार आहेत विठ्ठलराव विखे पाटील. त्यांच्या दृष्टेपणामुळेच ग्रामीण महाराष्ट्राचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कायापालट घडवून आणणारे साखर कारखाने येथे रुजले, वाढले. त्यांची जिद्द व आत्मविश्वास मोठा. पण

त्याहून महत्वाची गोष्ट ही की आपल्या भोवतालच्या मातीची व त्या मातीत उगवलेल्या माणसांची त्यांना अचूक जाण होती. त्यांच्यातलें आत्मविश्वासाचे 'अक्षय्य वट' त्यांनीच पाहिले व त्या वृक्षांच्या सावलीतच ग्रामीण महाराष्ट्रातील दारिद्र्याची काहिली आज नाहिशी झालेली दिसते आहे.

ग्रामीण भागातील जनतेशी ह्या साखर प्रकल्पांच्या निमित्ताने माझा बराच संबंध आला. आपण शहरी माणसे खेड्यात वावरणाऱ्या व शेतो करणाऱ्या माणसांना अडाणी समजतो. परंतु ही माणसे अडाणी नव्हती व नाहीत असे माझे मत आहे. त्यांना जे कळत होते वा कळते ते पुष्कळशा पदवीधरांनाही कळत नाही असे मला वाटते. त्यांची अस्मिता सहकारी साखर कारखान्यांच्या रूपाने फुलली, कार्यरत झाली आणि त्यांच्या सर्व सुप्त शक्तींना भरती आली. आज शेतकऱ्यांचे, शेतकऱ्यांनीच सर्वस्वी चालविलेले आणि शेतीद्वारे **ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट घडवून आणणारे ६९ सहकारी साखर कारखाने महाराष्ट्रात नोंदविले गेले असून त्यातील ४५ साखर कारखान्यांनी गाळप सुरु केले आहे. अवघ्या २५ वर्षाच्या काळात साखर प्रकल्पांनी घेतलेली ही झेप अभिमानास्पद नाही असे कोण म्हणेल?** याशिवाय महत्वाची गोष्ट अशी की ऊस उत्पादन करणाऱ्या भागातच हे कारखाने वाढले असे नव्हे तर ज्या भागांत ऊस उत्पादन होतच नव्हते वा नाममात्र होते. अशा भागातही ऊस उत्पादनाचे व साखर कारखान्याबाबतचे नवे आव्हान स्वीकारले गेले आहे. (विदर्भ, मराठवाड्यांत काही कारखानें निघाले आहेत.) ऊस उत्पादकांची (सभासद) संख्या सुमारे २,८२,००० इतकी असून त्यांचे ऊसक्षेत्र (अर्थातच कारखान्याकडे नोंदलेले) ५,००००० एकर इतके आहे. जमीन, इमारती. यंत्र सामुग्री वगैरे बाबतची गुंतवणूक ७.५ कोटी आहे. **अखिल भारतात १७१ सहकारी साखर कारखाने असून त्यापैकी ६९ कारखाने महाराष्ट्रांत आहेत. १९७४–७५सालात ल साखर उत्पादन १,२७,०३,९४७ पोती इतके आहे.** भाग भांडवलात शासकीय हिस्सा असला तरी ऊस उत्पादक सभासदांचा वाटा मोठा व महत्त्वाचा असतो. आत्मोद्धाराचे हे फार मोठे व प्रभावी साधन महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेच्या हाती आले आहे असे निदान मला तरी वाटते.

### कायापालटाची प्रक्रिया

सहकारी साखर कारखान्यांच्या यशामुळे केवळ आर्थिक मानचित्रच पालटले नाहीतर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व कृषि औद्योगिक प्रकल्प दृष्टयाही महाराष्ट्राचा चेहरामोहराच पालटून गेला आहे असे दिसेल. शेती मालावरील प्रक्रिया उद्योगांना तर इंधन व प्रेरणा मिळालीच पण शेतीला आवश्यक व पूरक अशा मालाची निर्मिती करणाऱ्या संस्थांची ही स्थापना महाराष्ट्रात झालेली दिसते. दाणेदार खते, मिश्र खते, डिझेल इंजिने, ट्रॅक्टर कम टिलर वगैरेचे कारखानें सहकारी क्षेत्रात निघाले. तसेच प्राथमिक प्रक्रिया झाल्यानंतर जे काही बाकी उरते त्यावरून निर्माण होणाऱ्या वस्तूवरही प्रक्रिया करून त्यातून काही नवनिर्माणाचे प्रयत्नही चालू झाले आहे तसे दिसते. साखर कारखान्यातील मळीपासून मद्यार्क गाळणे, तसेच ऊसाच्या चोयट्या व भुईमुगाची टरफले यापासून कागद व पुठ्ठे तयार करणे आदि गोष्टींचा या संदर्भात उल्लेख करता येईल.

कारखाने यशस्वी झाल्यामुळे त्या त्या भागातील असंख्य माणसांना रोजगार उपलब्ध झाला. गरज ही शोधाची जननी असते. गरजेपोटी अनेक कृषि उद्योग प्रकल्प निघाले व नवी नवी क्षितीजे शोधण्याचा ग्रामीण जनतेने सुजाण प्रयत्न केला शाळा, कॉलेज, रुग्णालये, वाचनालये, सांस्कृतिक केन्द्रे उत्पन्न झाली. शिक्षण व सांस्कृतिक सहयोगामुळे आत्मविश्वास दुणावला. कठीण वा अशक्य शब्दच जणू ग्रामीण जनतेच्या शब्दकोषातून नाहीसे झाले. ऊसाची तोडणी, वाहतूक आदि गोष्टी हे कारखानेच करीत असल्यान वाहतुक यंत्रणा व रस्ते सुधारले. आर्थिक सुस्थिती लाभल्याने ग्रामांचे व ग्रामीण जनतेचे भोग संपले व विवंचनाशून्य समाज महाराष्ट्र व राष्ट्र या दोघांनाही संकटकाळी सहाय्यभूत ठरला आहे. दुष्काळ वा परकीय आक्रमण, महापूर वा रोगराई या परिस्थितीत कारखान्यांनी मोलाची मदत केली आहे. म्हणजेच **ह्या कारखान्यांनी केवळ 'अर्थकारण'च बघितलेच नाही तर समाज संस्कृति, शिक्षण व राष्ट्र या सर्वच बाबतीत मोलाची कामगिरी केली आहे. मूलगामी स्वरूपाची व अहिंसात्मक अशी क्रांती घडवून आणली आहे. काहीजण तिला 'साखर' क्रांती म्हणतात.** नांव काहीही दिले तरी सहकारी साखर कारखान्यानी ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट घडवून आणला आहे ही वस्तुस्थिती पालटत नाही. ती वस्तुस्थिती मी साभिमान नमूद करतो. तिच्या प्रारंभकाळीच तिच्याशी माझा संबंध आला हे मी माझे भाग्य समजतो. सुदैवाने मी नुकताच जाऊन, हे बदललेले गांव पाहून आलो. मन तृप्त झा ो येवढेच नमूद करतो.

# मी पाहिलेले विखे पाटील

**डॉ. आर. जी. काकडे**

संस्थापक–संचालक प्रवरा सहकारी साखर कारखाना

दि बागायतदार (प्रवरा हे नांव नंतर घेण्यात आलें) सहकारी साखर कारखाना, लि. लोणी बुद्रुकच्या संचालक मंडळाचा पहिली सभा पुणे येथे ता. ६ एप्रिल १९४९ रोजी भरली असता श्री. विठ्ठलराव विखे पाटील यांना मी प्रथम पाहिले. त्याच सभेत प्रा. ध. रा. गाडगीळ यांची अध्यक्ष म्हणून व श्री. विठ्ठलराव विखे यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. तसेच मुंबई प्रांताचे भूतपूर्व चीफ इंजिनियर व महाराष्ट्र शुगर मिल्समध्ये मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून कांही वर्षांचा साखर धंद्याचा प्रत्यक्ष अनुभव असलेले श्री. आर. जी. मुळे यांची मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नियुक्ति करण्यांत आली अहमदनगर जिल्हयात इरिगेशन खात्याचे इंजिनियर म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केलेलें असल्यामुळे ते श्री. विखे पाटील आणि अन्य स्थानिक संचालक यांना सुपरिचित होते.

प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्यासारखे प्रथितयश अर्थशास्त्रज्ञ अध्यक्ष म्हणून व श्री. मुळे यांच्यासारखे साखर धंद्याची सर्वांगीण माहिती असलेले मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून कारखान्याला लाभलेले असले तरी सहकारी पद्धतीवर साखर कारखाना उभा करणे तितके सोपे नव्हते. ज्या जाणकार लोकांना, त्यावेळी महाराष्ट्रात चांगल्या रितीने चाललेल्या खासगी क्षेत्रातील साखर कारखान्यांचा व्याप व विस्तार माहित होता त्यांना तर ही कल्पनाच मुळी मृगजळासारखी अशक्य कोटीतील वाटली. कारण साखर कारखान्याला फार मोठ्या प्रमाणावर भांडवल जमवावे लागते. मुंबई–पुण्यासारख्या शहरातून ते जमविले जाते. लोणी बुद्रुकसारख्या ग्रामीण भागातून ते जमणे अशक्य, दुसरे म्हणजे खासगी क्षेत्रात सुद्धा साखर कारखाना काढण्यासाठी व चालविण्यासाठी विशिष्ट प्रकारचे संघटनाचातुर्य, संयोजकता, धडाडी व कार्यक्षमता व कर्तबगारी यांची आवश्यकता असते, दि बागायतदार सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाचे सर्वच सभासद एवढा मोठा भांडवली धंदा काढण्याच्या व चालविण्याच्या दृष्टीने अनभिज्ञ. एवढया मोठया आर्थिक संघटना उभ्या करण्याचा अनुभव कोणालाच नव्हता. त्यांत सहकारी संस्था म्हणजे बारभाई. सर्वांच्या संमतीने व सहकार्याने काम व्हावयाचे. एकाद्या व्यक्तीच्या संघटनाचातुर्य व धडाडीबरोबरच सांघिक प्रयत्नांची गरज असते. सर्व संबंधित लोकांना बरोबर घेऊन जाईल अशा प्रकारच्या नेतृत्वाची आवश्यकता असते. साहजिकपणे कामाची गति व उरक कमी. त्यांत श्री. विठ्ठलराव विखे पाटलांसारखा खेडवळ, पुस्तकी शिक्षण फारसे नसलेल्या व अहमदनगर जिल्हयाबाहेर अप्रसिद्ध अशा माणसाची व्हाईस चेअरमन म्हणून निवड झाल्यामुळे तर साखर कारखान्याच्या यशाबद्दल सर्वत्र साशंकता व्यक्त करण्यात येई. त्यांतच पुणे जिल्हयातील बारामती भागांत ऊस–उत्पादकांचा एक सहकारी साखर कारखाना १९२३–२४ च्या सुमारास फसला ही महाराष्ट्रातील घटना लहानमोठे बागायतदार विसरलेले नव्हते. गुळाला भरमसाठ भाव आल्यामुळे सभासदांनी आपला ऊस कारखान्याला न घालता त्याचा गूळ केला व ऊसाचे अभावी कारखाना बंद पडला व कांहींना त्याची घस सोसावी लागली. तेव्हापासून साखर कारखाना यशस्वी व्हावयाचा असेल तर कारखान्याचे स्वतःचे असे ऊसाचे क्षेत्र पाहिजे असा संकेत महाराष्ट्रांत रूढ झाला. त्यास अनुसरूनच महाराष्ट्रातील सर्व खासगी साखर कारखान्यांचे स्वतःचे असे भरपूर ऊसाचे क्षेत्र होते. दि बागायतदार सहकारी साखर कारखाना हा पुन्हा वरील संकेताच्या विरुद्ध जाऊन सभासदांच्या ऊसावर अवलंबून राहून चालविला जाणार होता. अशा परिस्थितीत त्या कारखान्याचे सभासद

होणे थोडे फार धोक्याचे आहे अशी भिती सर्वांना वाटणे साहजिक होते. अशा भितीच्या वातावरणात सहकारी साखर कारखान्याचे सभासद होण्याला बागायतदारांना प्रवृत्त करणे कठीण काम होते. अनेकांच्या दृष्टीने ते जुगार खेळण्यासारखे होते. काही धोका पत्करुनही जुगार खेळला पाहिजे असा बागायतदारांत विश्वास निर्माण करण्याचा प्रश्न होता.

श्री. विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकारी पतपुरवठ्याच्या क्षेत्रात अनेक वर्षे काम करून तोपर्यंत आपले स्थान निर्माण केलेले होते. लोकांचा विश्वास संपादन केलेला होता. त्यांच्या संचालक मंडळावरील स्थानिक सहकारी हेही आपापल्या भागात सुपरिचित होते. त्या सर्वांनी पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्व मंडळींनी नोंदणीसाठी लागणाऱ्या भाग भांडवलाची जमवाजमव, अडचणींना तोंड देऊन, यशस्वी रित्या करून कारखान्याच्या यशाच्या दृष्टीने पाऊल पुढे टाकले.

पण सुरवातीचा ३७५ टन गळीतक्षमतेचा कारखाना उभारणीच्या वेळेस भांडवल कमी पडू लागले, सहकारी कारखानदारीत भागीदार होण्याचे तात्त्विक धोरण, त्यावेळच्या मुंबई सरकारचे अर्थ व सहकार मंत्री कै. वैकुंठलाल मेहता यांच्या प्रयत्नाने मान्य केलेले असले तरी सरकारकडून अधिक पैसे वेळेवर येण्याची शक्यता नव्हती. कर्जासाठी बँकेला तारण देण्यास काहीच शिल्लक राहिलेले नव्हते. त्यावेळी श्री. विखे पाटील यांनी आपली स्वतःची जिंदगी तारण देण्याची तयारी दर्शविली व स्थानिक संचालकांनीहि तसे करण्याचे आनंदाने मान्य केले. सुरवातीच्या काळात सहकारी साखर कारखान्याच्या प्रयोगाकडे पाहण्याची दृष्टि सध्याच्याप्रमाणे आत्मीयतेची नव्हती. १९५४ मध्ये सहकारी साखर कारखान्यांना सर्वतऱ्हेची मदत करण्याचे धोरण राज्य सरकारने अवलंबिले त्यानंतर बँकेच्या कर्जासाठी परतफेडीची हमी सरकार देऊ लागले. श्री. विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक संचालकांनी त्यावेळी आपली खासगी जिंदगी बँकेला तारण म्हणून दिली नसती तर महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याच्या चळवळीचे भवितव्य कदाचित त्याचवेळी ठरून गेले असते.

भारत सरकारच्या साखर विषयक धोरणामुळे ५२-५३ च्या सुमारास गुळाच्या भावास तेजी आली. त्यामुळे सहकारी साखर कारखान्यास ऊस देण्यापेक्षा त्याचा परस्पर गूळ करणे जास्त फायदेशीर होऊ लागले. सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांपुढे पैसे मिळविण्याची एक सुवर्ण संधि आपोआप चालून आली होती. अगदी अशीच संधि साधण्याचा मोह सभासदांना अनावर झाल्यामुळे महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचा बारामतीजवळचा पहिला प्रयोग सपशेल फसला. ह्याचा उल्लेख वर आलाच आहे. तसाच बाका प्रसंग दि बागायतदार (प्रवरा) सहकारी साखर कारखान्यावर गुदरण्याची भिति निर्माण झाली होती. श्री. विखे पाटील यांचेपुढे हे आव्हान उभे राहिले होते. श्री. विखे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात हिंडून सभासदांना संभाव्य धोक्याची कल्पना दिली. प्रत्येक सभासदाने कारखान्याकडे नोंदलेला ऊस भागाच्या प्रमाणात कारखान्यास दिलाच पाहिजे. अन्यथा त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल. अशा पोटनियमाची त्यांना जाणीव करून देण्यात आली. नमूद करण्याजोगी गोष्ट म्हणजे अगदी हाताच्या बोटावर मोजता येण्याइतके थोडे सभासद वगळल्यास वरील पोटनियमाचा कोणाकडून भंग झाल्याचे दृष्टोत्पत्तीस आले नाही. ज्यांचेकडून नियमभंग झाला होता त्यांच्यापैकी बहुतेकांच्या बाबतीत तांत्रिक अडचणी उणीवा आढळून आल्या. फक्त २-३ सभासदांना ताकीद देण्याचा प्रसंग आला. या प्रसंगीही श्री. विखे पाटील यांच्या नेतृत्वाचा खरा कस लागला. त्यावेळी ते तोकडे पडले नाहीत तर अत्यंत प्रभावी ठरले. अलिकडच्या काळात गुळाचे भाव चढल्यावर महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखान्यांच्या बऱ्याच सभासदांनी आपला ऊसाचा परस्पर गूळ केला ही वस्तुस्थिती लक्षात घेता श्री. विखे पाटील व त्यांचे सहकारी यांच्या नेतृत्वाचे महत्व सहज लक्षात येईल.

सहकारी साखर कारखान्यांच्या पोटनियमाप्रमाणे ऊस पिकविणाऱ्या बागायतदारांनाच सभासद होता येते. कार्यक्षेत्रातील लहानसहान शेतकऱ्यांना जेथे पुरेसे चांगले पीक घेणेही शक्य होत नाही तेथे ऊसासारखे पैशाचे पीक घेणे दुरापास्तच. तेव्हा ते सहकारी साखर कारखान्याच्या फायद्यापासून वंचितच राहणार. अशांना पुढेमागे कारखान्याचे सभासद होता यावे म्हणून त्यांचेसाठी दोनशे भाग कारखान्याने राखून ठेवले होते. तसेच ५४–५५ च्या सुमारास प्रवरा कारखान्याला २०० एकर उसाकरता पाटाचे पाणी मिळाले होते कारखान्याने आपला ऊस पिकविण्याचे ठरविले असते तर स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी खंडाने घेऊन त्यांत ते वापरता आले असते किंवा बागायतदार सभासदांत ते वाटून देता आले असते. पण श्री. विखे पाटील यांनी ते सर्व पाणी लहान शेतकऱ्यांत किंवा ज्यांचा ऊसच नव्हता अशा सभासदांत वाटून

देण्याचा निर्णय घेतला. लहानलहान शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची त्यांची प्रवृत्ती दिसून आली. सर्व स्थानिक संचालकाचा याबाबतीत त्यांना पाठिंबा होता हे निराळे सांगावयास नको.

प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदासाठी किमान १० भाग घेण्याची पोटनियमात तरतूद होती. या पोटनियमामुळे १० पेक्षा कमी भाग असणाऱ्या सभासदांना संचालक मंडळावर निवडून येणे शक्य नव्हते. सुरुवातीच्या प्रयोगावस्थेतील काळात वरील पोटनियम कदाचित समर्थनीय असला तरी तो पुढे कालबाह्य वाटू लागला. म्हणून कारखान्याने पुढे वरील पोटनियम बदलून १० पेक्षाकमी भाग धारण करणाऱ्यांनाही संचालक मंडळाचा मार्ग खुला करून दिला. त्यानंतरच्या सर्व सहकारी साखर कारखान्यांच्या पोटनियमात वरील दुरुस्त पोटनियम प्रथम पासूनच घालण्यात आला.

दि बागायतदार सहकारी साखर कारखान्याचे पहिले संचालक मंडळ तीन वर्षासाठी नियुक्त करण्यात आले होते त्यानंतर निवडणूका होऊन संचालक मंडळ अस्तित्वात यावयाचे होते. निवडणूक म्हणजे स्पर्धा, त्यातून पुढे वैयक्तिक हेवेदावे बेबनाव निर्माण होण्याची शक्यता व भिती. कारखान्याची घडी नीट बसेपर्यंत असे प्रसंग कटाक्षाने टाळले पाहिजेत असे श्री. विखे यांचे मत होते. त्यांच्या स्थानिक सहकाऱ्यांनाही ते पटले. म्हणून पहिली दोन वर्षे उमेदवारीच्या नावाबाबत आपाआपसांत समझोता करून त्यांनी निवडणुका टाळल्या अलिकडे सहकारी साखर कारखान्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणुका किती गाजतात, किती खटले खोकले यातून निर्माण होतात हे पाहिले म्हणजे वरील घटनेचे महत्व सहज लक्षात येईल.

सहकारी साखर कारखान्यांच्या इमारती, मशिनरी स्टोअर्स, गोडाऊनमधील साखर वगैरेवर आगीचे व इतर अनेक प्रकारच कोट्यावधि रुपये किमतीचे विमे उतरवावे लागतात. ह्या विम्याच्या कामावर लक्षावधि रुपयाचे कमिशन बिमा कंपन्याकडून एजंटाना फायद्याने मिळू शकते. प्रवरा कारखान्यातील विम्याच्या कामासाठी श्री. विखे पाटील हे संचालक मंडळाच्या संमतीने एजंट झाले होते. एजन्सीच्या कामाच्या कमिशनचे हिशेब ते दरवर्षी संचालक मंडळाला पहाण्यासाठी ठेवीत असत. ही कमिशनची रक्कम कारखान्याच्या कार्यक्षेत्रांत शिक्षणाच्या कामासाठी खर्चिण्याचे संचालक मंडळाच्या संमतीने ठरलेले होते. सार्वजनिक कामातील संकेत, शिस्त व पद्धत पाळण्याच्या दृष्टीने हा उपक्रम नमूद करण्याजोगा आहे.

प्रवरा सहकारी साखर कारखान्यांचा सर्व आर्थिक व्यवहार फार काटकसरीचा व व्यवस्थित असे. फायनान्स कॉर्पोरेशनचे कर्ज फिटेपर्यंत अधिकारी–सेवक याचेसाठी राहण्याची घरे, कारखान्याची कचेरी वगैरेकरता पक्या इमारती बांधावयाच्या नाहीत, उसाच्या किमतीतून बिनपरतीची ठेव जास्तीतजास्त काढून ठेवावयाची, शक्य तेथे अनावश्यक खर्च टाळावयाचे असे प्रा. गाडगीळ व श्री. विखे यांचे धोरण होते. त्यामुळे फायनान्स कॉर्पोरेशनचे पहिले कर्ज मुदतीपूर्वी ४–३ वर्षे अगोदर फेडता आले. श्री. विठ्ठलराव विखे यांची रहाणी अत्यंत साधी व काटकसरी १९६० पर्यंत कारखान्याचे उपाध्यक्ष व प्रा. गाडगीळ यांच्या निवृत्तीनंतर कारखान्याचे अध्यक्ष झाले तरी विठ्ठलरावांच्या पेहरावांत व एकूण राहणीमानांत फारसा फरक झाला नाही. तीच त्यांची दृष्टि काहींच्या मते कालबाह्य-कारखान्यात वाटत असे. कारखान्याच्या दैनंदिन कामाशी ते निगडित असताना कारखान्याला सहज भेट देणाऱ्यांना ती जाणवे. तिच्यामुळे कारखान्याचा एकूण लाभच झाला यात शंका नाही काही प्रसंगी काटकसर व काटेकोरपणा महागात पडला. पण असे प्रसंग अगदीच थोडे होते.

प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या यशात प्रा. ध. रा. गाडगीळ, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, राज्य सरकार, श्री. विठ्ठलराव विखे पाटील व त्यांचे सहकारी यांचा वाटा निःसंशय आहे तसे असले तरी श्री. विखे पाटील यांच्या नेतृत्वाकडे त्यातील सिंहाचा वाटा जातो. संचालक मंडळांतील सर्व स्थानिक सहकाऱ्यांना बरोबर घेऊन जाणे, कारखान्याच्या कामात त्यांना जाणीवपूर्वक सामावून घेणे, परिस्थितीची आव्हाने स्वीकारण्यास त्यांना प्रवृत्त करून नव्यानव्या योजना हाती घेणे; कार्यकर्त्यांचा एक संच निर्माण करून कायम टिकविणे, या सारख्या त्यांनी केलेल्या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. प्रवरा कारखान्याच्या प्रगतीशील काही थोड्या बाबींचा वर उल्लेख केला. सहकारी साखर कारखाना चळवळीच्या प्रगतीच्या संदर्भात आज तितक्या महत्वाची वाटणार नाहीत. पण ही सतत वाढणारी चळवळ जोमदार व निरोगी राहण्याच्या दृष्टीने त्या लक्षांत आणून देणे युक्त वाटले.

श्री. विठ्ठलराव विखे पाटील यांचे शालेय शिक्षण बेताचे झालेले असले तरी व्यवहारज्ञानाचा त्यांचा आवाका फार

मोठा व भक्कम आहे. कोणत्याही प्रश्नातील खाचाखोचा चटकन लक्षांत येण्याइतकी त्यांची बुद्धी तल्लक आहे. ह्या दोन्हीं भांडवलाच्या बळावर त्यांचा सर्व व्यवहार चालतो. कोणताही आर्थिक वा सामाजिक स्वरूपाचा प्रश्न उपस्थित झाला तर त्याचा परिणाम ग्रामीण भागावर व त्या भागांतील विशेषत: लहान शेतकऱ्यावर काय व कसा होईल या निकषावर तो घासून पाहिला जातो व त्यांना योग्य वाटेल अशी भूमिका घेतली जाते. हा निकष त्यांना फारसा दगा देत नाही. ते आपले मत फारच थोडचा व तुटक शब्दांत सांगत असले तरी त्यांनी गाळलेले शब्द पुष्कळ काही सांगून जातात. फारच आजारी असल्याशिवाय त्यांच्या सकाळ-संध्याकाळच्या धार्मिक कृत्यांत सहसा खंड पडत नाही. परान्न घेत नसल्यामुळे परगावी जाताना ते आपलें जेवण वा शिधा बरोबर घेतात. त्यांना आळस अगर स्वस्थ बसणे माहीत नव्हते. सतत कोणत्या ना कोणत्या सार्वजनिक कामात तें गढून गेलेले दिसत. त्याच्या उपजत बुद्धिच्या भांडवलात व्यवहारज्ञानाची व प्रत्यक्ष अनुभवाची भर पडल्यामुळे साखर धंद्याच्या सर्व अंगोपांगाची त्यांना फारच चांगली माहिती झाली होती, त्या त्या विषयांतील तज्ञांची चर्चा करण्याइतको. प्रवरेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी थोडी वर्षे यशस्वीरीत्या कारखाना चालविला डोळस ग्रामीण नेतृत्व मोठा अर्थव्यवहार कसा चोख व यशस्वीपणे हाताळू शकतें याचें त्यांनी एक प्रात्यक्षिकच निर्माण केले आहे. वार्धक्यामुळे व वाढत्या दृष्टीदोषामुळे साखर कारखान्याच्या व्यवहारातून तें बऱ्याच वर्षापूर्वी निवृत्त झाले. प्रवरा कारखान्याच्या परिसरांत त्यांनी सुरू केलेल्या औद्योगिक व शैक्षणिक कार्याचा व्याप, त्यांचें नेतृत्व, कर्तबगारी, सार्वजनिक विधायक कार्याची प्रवृत्ति वगैरे त्यांच्या गुणांची भविष्यकाळांतही साक्ष देत राहील. आज त्यांचें कर्ते चिरंजीव खासदार श्री. बाळासाहेब विखे त्यांनी घालून दिलेल्या मार्गाने त्या भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या प्रयत्नांत आहेत. हें प्रयत्न फलद्रूप होत असल्याचे पाहण्याचें भाग्य श्री विठ्ठलरावांना मिळावे व त्यासाठी त्यांना दीर्घायुरायोग्य लाभो हीच इच्छा या प्रसंगी व्यक्त करावीशी वाटतें.

□ □ □


## उजाडले, पण सूर्य कोठे आहे ?

या प्रश्नाचे ठाम उत्तर ' सहकारा ' ला सापडलेले आहे.

ग्रामीण कर्जमुक्ती, आदिवासी व जंगल कामगार विकास योजना, भूमिहीनांना घरे भूमि-वाटप, बेघराना घरे, शेतकऱ्याना खावटी कर्जे आदि योजनामुळे खेडोपाडी ' सूर्य ' पोहचला आहे. अंधारातून प्रकाशाकडे दुर्बलतेतून स्वयंपूर्णतेकडे सहकारी चळवळीचा प्रवास चालू आहे. या प्रवासाचे नेतृत्व करणारी

## दि महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह बँक लि;

( दि विदर्भ को ऑपरेटिव्ह बँक सम्मीलित )

९, नगीनदास मास्तर रोड विस्तार फोर्ट

मुंबई ४०००२३

# श्रेष्ठ भूमिपूत्र

**श्री. राजा मंगळवेढेकर**
**पुणे**

" प्रवरापान आणि गंगास्नान "

अशी एक लोकश्रद्धा प्रवरेच्या परिसरात प्राचीन काळापासून प्रचलित आहे.

पतीतपावनी गंगामैया आणि देवतात्मा हिमालय यांची एक विलक्षण ओढ भारतीय मनाला सततचीच आहे.

या अद्वितीय ओढीतून आणि श्रद्धामय आकर्षणातून भारतीय माणूस नजीकच्या नदीलाही " गंगा " च म्हणू लागतो.

प्रवरेच्या परिसरातील माणसांनी देखील प्रवरेच्या पाण्याला गंगोदकाची प्रतिष्ठा आणि पावित्र्य भक्तिपूर्वक सर्मपित केलेले आहे. त्यातून प्रवरेलाही आपली अशी प्रतिष्ठा, पावित्र्य आणि मांगल्य आहेच ! प्रवरा नुसतीच जलवाहिनी नाही, तर ती संतसानिध्यामुळे पुण्यवंत प्राणदायिनी देखील आहे. पुराणातही प्रवरेला अमृतवाहिनी " च म्हटलेले आहे. तीर्थाचे पावित्र्य प्रवरेलाही लाभलेले आहे. हिच्याच काठी, नेवाशाच्या भूमित, मायमराठीतले वेशीकार लेणे जन्माला आहे !

अशी अमृताशी पैजा लावणारी मराठी वाणी ज्ञानदेवांच्या मुखातून इथेच प्रगट झाली. मराठी भाषेत ब्रम्हविद्येचा सुकाळ करणारी, रसराज श्रृंगाराच्या माथ्यावर पाय देवून शांत रसाची पृष्टी तुष्टी करून अवघ्यांना डोलावणारी ''ज्ञानेश्वरी' इथेच सिद्ध झाली.

असे ज्ञानदेवांनी विश्वात्मक देवाच्यापुढे ओंजळ पसरुन पसायदान सांगितले तेही या प्रवरेच्या तटीच !

आणि त्यामुळेच की काय, पण प्रवरेच्या पाण्याचे

'' समता वर्तावी । अहंता खंडावी ।' हे ब्रीदच बनले !

अगदी प्रवरेच्या काठी जरी नाही तरी प्रवरेच्या परिसरात लोणी नामक एक लहानसे गाव आहे. आणि याच गावात तीनेएकशे वर्षापासून विखे पाटलांच्या सहा पिढया नांदत-आल्या आहेत.

तत्पूर्वी विखे हे कुठले, कोण याचा नीट ठावठिकाणा ठाऊक नाही.

विठोजी हा ज्ञात पूर्वज. विठोबाचा मुलगा खंडोबा, खंडोबाचा मुलगा पिठोजी पाटीलबोबा आणि पाटीलबोवाचे दोन मुलगे अेकनाथराव आणि तात्याबा.

अेकनाथरावांचा विवाह औरंगाबाद जिल्ह्यातील लाखबा-पतरे नावाच्या गावचे आनंदराव चांदगुडे यांची कन्या गंगूबाई हिच्याशी झाला होता.

लोणी हे नाव धारण करणारी तशी दोन गावे नगर-नासिक हमरस्त्यावर आहेत. शेजारी शेजारीच. अेक ओळखले जाते लोणी खुर्द म्हणून, आणि दूसरे संबोधिले जाते लोणी बुद्रुक म्हणून. विखे हे लोणी बुद्रुकचे राहणारे.

व्यक्तीच्या अंगी वसत असलेल्या कर्तृत्वाला जेव्हा परिस्थितीमधून आव्हान मिळते तेव्हाच ते मोहोरून उठते. व्यक्ती मोठी होते, थोर बनते. त्याला तिच्या अंगी वसत असलेल्या जिद्द चिकाटी, सचोटी अित्यादी मद्गुणांचे बळ तर कारणीभूत असतेच. पण ती व्यक्ती ज्या परिस्थितीत जन्मली, वाढली रुजली ती परिस्थितीही कारणीभूत असते. म्हणून एका अर्थाने ''परिस्थितीचेच ती अपत्य असते'' असे विधान केले तर ते वावगे ठरू नये.

स्वातंत्र्याचा लढा नसता तर बाळ गंगाधर टिळक हे ''लोकमान्य'' झाले असते काय किंवा मोहनदास करमचंद गांधी हे ''राष्ट्रपिता'' बनले असते काय हा या दृष्टीने विचारात घेण्यासारखा प्रश्न ठरेल. अनेक थोर माणसांच्या संदर्भात असे प्रश्न करता येतील. आणि या प्रश्नांच्या उत्तरातच वरील विधान सामावलेले दिसेल.

विठ्ठलराव विखे पाटील यांचा कर्मयज्ञ ज्या भूमीत घडला ज्या सहकाराचे बीज रोवून त्याचा वटवृक्ष फुलला त्या भूमीची तिच्या आजूबाजूची परिस्थिती त्यांच्या जन्मकाळाच्या आगे-मागे काय होती, कशी होती हे लक्षात घेणे म्हणूनच आवश्यक ठरते विठ्ठलरावांचा जन्म १९०१ साली झाला. त्या सुमारास त्यापूर्वी. आणि त्यानंतरही पंचवीस अेक वर्षे नगर जिल्ह्यातला बराचसा भाग दुष्काळी प्रदेश म्हणून गणला जात होता. या जिल्ह्याला लागून असलेल्या पुणे जिल्ह्यातील काही भाग आणि सोलापूर जिल्हा हा देखील बारमाही दुष्काळी प्रदेश म्हणूनच ओळखला जात होता.

शेती हाच मुख्य व्यवसाय. शेतीवरच लोकांची उपर्जीविका अवलंबून. सुमारे ७०–७२ टक्के लोक शेतीच्या धद्यांतच

गढलेले उपलब्ध रोजगारीपैकी ७१-७२ टक्के रोजगार देखील शेती व्यवसायाशीच निगडीत. त्यामुळे देशाच्या निम्म्याहून अधिक राष्ट्रीय उत्पन्नाचो बाब म्हणजे देखील शेतीच; अशी परिस्थितीत आहे.

पूर्वीच्या काळी लोकसंख्येच्या मानाने कुणबी थोडा व काळी फार अशी स्थिती होती; पुढे लोकसंख्येच्या वाढीबरोबर ही स्थिती राहिली नाही, हे खरे. परतु दोन्ही ही अवस्थेत शेतीवरच लोकजीवनाचा भरी भार अधिक ही वस्तुस्थितीच आहे.

त्या काळी शेती होच तारणारी होती, तरी ती तेवढीच दैवाधीन आणि म्हणून वेभरवशाची होती. पाटवधाऱ्यांची व्यवस्था नव्हती. पाऊस पाणी तर हातचे नव्हतेच. त्यामुळे बागायद शेती जवळ जवळ नाहीच नगण्य —अशा स्थितीत होती. आणि बाकीची सर्वच्या सर्व शेती ही जिरायतच होती.

या भागात पाऊस पाण्याचे मान सरासरीने बेतासवात अशाच स्वरूपाचे होते पण तेही वेळेवर न पडल्यामुळे या प्रदेशावर दुष्काळाची छाया सततचीच पडलेली असायची.

फार पूर्वीच्या दुष्काळांचा विचार जरी येथे केला नाही, तरी १८७६–७७ पासून पुढील पंचवीस-तीत वर्षे देखील दुष्काळांच्या खाईतच गेली होती.

१८९६-९७ साली आणि १८८९-१९०० साली तत्कालीन मुंबई अिलाखाभरच भीषण दुष्काळ पडलेला होता. त्यांतही खानदेश अहमदनगर, नासिक, पुणे, सातारा व सोलापूर, या जिल्ह्यांना हा दुष्काळ विशेष जाणवला होता १८९६ सालच्या दुष्काळवद्दल लो. टिळकांच्या 'केसरी' ने आपल्या दिनांक २६-१२-१८९६ च्या अंकांत लिहिले होते,

"गुरे कडब्याच्या किंमतीत विकू लागली आणि कडवा सोन्याच्या भावाने जात चालला आहे . . . .

पाऊस पाण्याची ही अस्मानी आपत्ती सोडली तरी अन्य बाबतीत ठीकठाक होते असेही म्हणता येणार नाही. पाऊस नसे तेव्हा पिके बुडतच असत, पण तो दडला आणि रानात पिके उभी राहिली तरी ती पदरात पडेपर्यंत शेतकऱ्याला त्याची शाश्वती वाटत नसे. चोर चिलटांचा आणि रोगराईचा त्रास तर असेच, पण टोळीधाडीसारखी संकटे देखील त्याकाळी वरचेवर येत असत आणि हाता तोंडाशी आलेला घास टोळच फस्त करून टाकत असत.

दुष्काळाने शेतकरी वर्ग हैराण झाला होता. त्याचे कंबरडे मोडलेलेच होते त्यात सावकारांनीही आपले हात धुवून घेण्यास कमी केले नाही. नाडलेल्या, पीडलेल्या, गांजलेल्या शेतकऱ्यांच्या मानेभोवती सावकारी पाश पडलेलाच होता. दुष्काळ ही तर शेठ-सावकारांना पर्वणीच झाली होती.

परंतु १८७६–७७ सालच्या दुष्काळाच्या वेळी अवर्षणासारख्या अस्मानीविरुद्ध जरी नाही तरी सावकारीच्या सुलतानी विरुद्ध मात्र काही ठिकाणी उठाव झाले. "बुभुक्षितः किं न करोति पापम् । या" या वचनाचे प्रत्यंतर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी काही ठिकाणी आणून दिले. म्हणून या उठावांना "शेतकऱ्यांची ' असेच पुढे म्हणू लागले " दख्खनचे दंगे" या नांवानेही. इतिहासात व सरकारी अवहवालातून हे उठाव प्रसिद्ध आहेत हे उठावही प्रामुख्याने अहमदनगर, पुणे, सोलापूर, व सातारा या दख्खनच्या भागातच झाले होते.

या दंग्यांत त्रस्त शेतकऱ्यांनी घरावर हल्ले चढवले होते आणि कर्जविषयक कागदपत्रे कर्जरोखे फाडून जाळून टाकण्याचा सपाटा लावला होता. कांही ठिकाणी सावकारांची मालमत्ताही जाळली. अन्य दहशतीचे अनुचित प्रकारही घडले परतु दंगेखोरांचा रोख प्रामुख्याने कर्जरोखे नष्ट करण्याकडे होता. म्हणून या दंग्याला "कर्जरोखे फाडीची चळवळ " असे ही म्हटले जाई.

अखेरीस ही चळवळ पोलिसांच्या साहाय्याने व कांही ठिकाणीही तर लष्करांच्या मदतीने तत्कालीन सरकारला मोडून काढावी लागली.

आपल्या हाताच्या पाशवी बळाच्या जोरावर दंगेधोपे व चळवळी यांचा बीमोड करणे सत्ताधाऱ्यांना शक्य असते. पण अशा बळाच्या साहाय्याने जी शांतता निर्माण केली जाते ती खरीखुरी अथवा चिरस्थाय शांतता नसते. ती दहशतीच्या द्वारा आणलेली वरवरची शांतता व शिस्त असते; आणि दंग्याचे मूळ तसेच राहिल्यामुळे दडपलेला असंतोष जनमानसात तसाच खदखदत असतो. पुनश्च कधीतरी त्याचा स्फोट होण्याची शक्यता असते.

सरकारलाही शेतकऱ्यांच्या हितापेक्षा देखील स्वतःच्या अस्तित्वासाठी तरी करणे भागच होते.

वरचेवर पडणाऱ्या दुष्काळाची चौकशी करून त्याविषयी उपाययोजना सुचविण्यासाठी १९०० सालीच त्यावेळचे व्हाईसराय लॉर्ड कर्झन यांनी एक "एक फॅमिन कमिशन" नेमलेले होते. या कमिशनने सर्व चौकशी आपल्या अहवालात ज्या शिफारशी केल्या होत्या त्यात त्यांनी असे स्वच्छ लिहून ठेवले आहे की —

"जर देशांत सहकारी पतपेढया निघाल्या आणि चांगल्या वाढल्या तरच भरघोस यशाचा संभव आहे"

सहकारी तत्वाचा आणि सहकारी मार्गाचा सहकारी विचार अशा प्रकारे १९०१ साली प्रथम प्रकट रीतीनें उच्चारण्यांत व पुरस्कारण्यांत आला.

आणि योगायोग असा खो, याच सुमारास आपल्या भावी जीवनात सहकाराचा महान यशस्वी प्रयोग करणारे विठ्ठलराव विखे पाटील यांचा जन्म झाला.

विठ्ठलराव विखे पाटील यांचा आणि भारतामधील, व विशेषत महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा पाळणा जवळपास अेकाच वेळेस हालला हा अेक नियतीचा नेमच म्हणायचा !

अेकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस सहकाराचा मार्ग जागतिक क्षेत्रातही चोखाळलाजाऊ लागला होता. अिग्लंड, जर्मनी अित्यादी युरोपीय देशात सहकाराचे प्रयोग साकार होवू लागले होते.

मद्रास सरकारने सर फ्रेडरिक निकल्सन नावाचा आपला अेक अधिकारी १८९१ मध्ये युरोपमधील बँकांची पाहणी व अभ्यास करण्यासाठी धाडला होता. निकल्सनने विविध देशात जाऊन पाहणी केली. सहकारी चळवळीचा अभ्यास केला आणि जर्मनीतील रायफेसन पद्धतीच्या — अनियमित जबाबदारीच्या पतपेढया हिंदुस्थानात सुरू करण्यात याव्यात असे आपल्या अहवालात सुचविले. १९०१ च्या "फॅमिन कमिशन च्या शिफारशीही असाच स्वरूपाच्या होत्या.

या शिफारशी लक्षांत घेऊद लॉर्ड कर्झन यांनी या बाबतीत सांगोपांग विचार करण्यासाठी सर अेडवर्ड लो यांच्या नेतृत्वाखाली अेक समिती नेमली. या समितीने केलेल्या शिफारशीवर आधारलेला "हिंदुस्थान क्रेडिट सोसायटचांचा" कायदा १९०४ मध्ये प्रथमत: पास करण्यांत आला.

भारतीय सहकारी चळवळीला कायदेशिर स्वरुप प्राप्त झाले होते.

या वेळी विठ्ठलराव पाटील विखे पाटील चार वर्षाचे झाले होते.

भारतातील सहकारी चळवळ अेका कालखंडातून दुसऱ्या कालखंडात पदार्पण करत होती.

विठोजी पाटील पोटापुरती शेती बाळगून होते त्यांच्यापूर्वी कोणी घराण्यात तलवार बहादूर होऊन गेले म्हणतात. कोणी १८५७ च्या बंडाचे वेळीही कामगिरी बजावली असे सांगतात. परंतु हृया सगळ्या सांगोवांगीच्या गोष्टी.

विठोजी पाटलांच्या घरात शेतीबरोबरच नांदत होती ती भगवद्भक्ती !

काळ्या आओीच्या कुशीतच ते वाढले. बारा मास आणि तेरा काळ ते तिच्याच कटीखांद्यावर खपले. कष्टाची जिरायती शेती. दैवाच्या आधीन. पण देवावर श्रद्धा ठेवून विटोबानी तिच्यातच घाम गाळला. आपले कुटुंब पोसले. वैलबारदाना सांभाभाळला.

प्रपंच करताना परमार्थही साधता येईल तेवढा साधण्याचा प्रयत्न केला. शेतीच्या रामगाड्यातून सवड काढून पंढरीची वारी पत्करली. विठोजी दरवर्षी आषाढीच्या वारीला पंढरीच्या विठ्ठलाच्या दर्शनभेटीला नित्यनेमाने जात असत.

विखे पाटलांच्या घराण्यात धरतीच्या सेवाधर्माबरोबरच विठोजींनी वारकरी निष्ठेची भागवतधर्मालाही सुप्रतिष्ठित तो वारसा आजपावेतो जतन केलेला आहे.

विठोजींनी आपल्या मुलाचे नांव घराण्याच्या कुलदैवताचे खंडोबा असे जरी ठेवले होते तरी त्यांच्या नातवाचे नांव त्यांच्या मुलाने विठोबाच ठेवले. विठोबा पाटीलबोवांनी भागवत धर्माच्या परंपरेला अनुसरुन आपल्या मुलाचे नांव अेकनाथ ठेवले; आणि अेकनाथरावांनी पुन्हा आपल्या अेका मुलाचे नांव विठ्ठलच ठेवले. अशा प्रकारे पाच पिढ्यात तीन विठ्ठल या घराण्यात झाले. आजोबांचे नांव नातवाला ठेवण्याची प्रथा महाराष्ट्रात कांहीं ठिकाणी जुनीच आहे.

नातू—विठ्ल याची प्रकृती मूळचीच नाजूक. त्यामुळे आजी राधाबाई हिचे त्याच्याकडे विशेष लक्ष असे. आजीचे प्रेम व सहवास विठ्ठलरावांच्या वाट्याला अितर भावडांच्या मानाने अधिक आला. त्यानाही आजीचा लळा जन्मदात्या आओीपेक्षा अधिक लागला. आजीच्या कुशीत आणि नजरेखाली विठ्ठलरावांचे बालपण गेले. देवधर्म गृहकार्य किंवा लग्नसमारंभ या सारख्या प्रसंगी ते आजीबरोबरच असायचे.

आजी—राधाबाई हृया जशा वत्सल, प्रेमळ स्वभावाच्या होत्या तशाच गृहदक्ष व कर्तबगार देखील होत्या घरातली ठेव देव जशा त्याच पाहात असत, तशीच मुलाबाळांचा काळजी त्यांचे भरपोषण अित्यादी गोष्टींकडेही त्याच बघत असत.

विठ्ठलराव वयाच्या नवव्या वर्षी शाळेत गेले. तसे उशीरानेच. लोणी खुर्दला मराठी शाळा होती. बुद्रुकची मुलंही मधला ओढा ओलांडून या शाळेत यायची.

बुद्धीचे लेणे मूळचेच लाभलेले असल्यामुळे शाळेतील अभ्यासात विठ्ठलरावांनी चांगली प्रगती दाखवली. त्याचा वर्गात नेहमी प्रथम क्रमांक असे. परीक्षेत चांगले गुण ते पटकावीत असत. शाळेतल्या आठवणी सांगताना अेकदा ते म्हणाले.

"माझी बुद्धी चांगली चालायची. मास्तर सगळ्या पोरांना उभे करायचे. त्यात चौथीची पण मुलं असायची. मोठी दांडगी दिसायची. मास्तर प्रश्न विचारायचे. मी झटकन उत्तर द्यायचा. मग मास्तर मला एकाद्या पोराच्या थोबाडीत मारायला लावून वरच्या नंबरावर जायला सागायचे."

वरच्या इयत्तेमधल्या विद्यार्थ्यांना ज्या प्रश्नांची उत्तरे देत येत नसत ती आपण कशी देत असू याबद्दलही विठ्ठलराव म्हणाले.

"माझं बारीक लक्ष पहिल्यापासून चहूकडे असे. लक्षात चांगले राही. आणि धोरणानं, अंदाजानं सांगत असे ते बरोबर येत असे."

विठ्ठलरावांचे शालेय शिक्षण तसे बेतानेच झालेले आहे. मराठी तिसरी पास होऊन चौथीत गेल्यावर काही दिवसांनीच त्यांनी शाळा सोडली. परंतु शाळेतल्या ह्या अत्यल्प शिक्षणापेक्षाही त्यांनी बिनभिंतीच्या शाळेतले — उघड्या जगातले पुष्कळच शिक्षण घेतले यात शंकाच नाही.

विठ्ठलरावांचे वडील एकनाथराव हे श्रद्धाळू, भक्तिमार्गी, त्यांना पोथी-पुराणाची आणि भजन-किर्तनाची आवड मनःपूर्वक होती. त्यामुळे घरातच पोथीचे वाचन नित्यनेमाने चाले. एकनाथराव स्वतः मुळीच शिकलेले नव्हते. परंतु पोथी ऐकण्यासाठी त्यांनी एक ब्राह्मणच पोथी वाचायला नेमून टाकलेला होता. त्याला या कामगिरीबद्दल वर्षाकाठी चार मण ज्वारी देत असत.

घरात चालणाऱ्या पोथीवाचनामुळे लहानग्या विठ्ठलरावांनाही त्याची आवड उत्पन्न झाली. तेही लक्षपूर्वक पोथी ऐकत असत. पोथी विषयी त्यांना एवढी आवड वाटू लागली. या संबंधीची आठवण सांगताना विठ्ठलराव म्हणाले,

माझं मन नेवासापूर भक्तिमार्गाकडे वळलं. पोथी ऐकल्याशिवाय बरेच वाटेनासे झाले. मी पोथी ऐकायला शाळा चुकवून बसायचा वडील शाळा बुडवतो म्हणून रागवायचे' घालवून द्यायचे. मग मी घरातल्या मोरीत दडून बसायचा आणि पोथी ऐकायचा. राहवायचेच नाही.

लहानपणी आवडलेली पोथी अजूनपर्यंत सुटलेली नाही हे विशेष.

पोथी श्रवणामुळे आणि घरातल्या धार्मिक वातावरणामुळे

लोणी खुर्द गावांत वेदशास्त्रासंपन्न असे ब्राम्हणाचे अेकूलते एक नांदते घर होते. जोशी हे त्यांचे उपनाम. जोश्यांचे पूर्वापार घराणे लोणीचेच. नारायणराव जोशी हे मोठे वेदाभ्यासी गृहस्थ. धार्मिक प्रवृत्तीचे व्यासंगी त्यांचा आणि विठ्ठलरावांची मैत्री बालपणापासूनची. अेकमेकावाचून अेकमेकांना बनायचे नाही अशी. पुढे पुढे तर विठ्ठलरावांच्या आजारीपणात नारायणरावानी त्यांची सेवाशुश्रुषा करावी, रात्रदिवस जवळ बसावे म्हणजे औषधाने न येणारा गुणही येई नि विठ्ठलराव बरे होत असत. तीच गत नारायणरावांची. नारायणराव उत्कृष्ट प्रवचनकार होते. कीर्तनकार होते. विठ्ठलरावांची त्यांच्यावर अपार स्नेहभक्ती जी जडली ती अखेरपर्यंत कायम होती. विठ्ठलराव त्यांना "महाराज" म्हणूनच संबोधित असत.

तरुण वयात विठ्ठलरावांच्या धार्मिक श्रद्धेला नारायणराव जोशांच्या संगतीमुळे निष्ठेची बैठक लाभली. त्या वयात या दोन मित्रांच्या विविध विषयावर चर्चा चालत असत. अेक वाचन होत असे विठ्ठलरावांची वृत्ती अध्यात्माकडे झुकू लागली. लग्न झाले होते. पण प्रपंचा लक्ष रमत नव्हते.

लोणीजवळ सात्रळ नामक गाव आहे. तिथे पंथी शंकरबाबा म्हणून अेक सिद्ध पुरुष होऊन गेले. दर गुरुवारी तिथे भक्तगणांची मोठी जत्राच जमत असे. नारायणराव जोशांच्यासह विठ्ठलरावही तिथे जात असत. निर्जळी अेकादशी, पुणताब्याला अनवाणी जावून चांगदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन अशी साधना किंवा व्रतवैकल्येही मोठ्या निष्ठेने विठ्ठलराव करू लागले होते.

अेका गुरुवारी शंकर बाबांपुढे नारळ ठेवून विठ्ठलरावांनी प्रपंचाचा निरोप घेऊन साधूच्या मेळाव्यात सामील होण्याची अनुज्ञा मागितली होती. विधिघटना वेगळी होती. विठ्ठलरावांना अनुज्ञा मिळाली नाही.

काही दिवसांनीच थोरल्या बंधूंचे — शंकररावांचे अकस्मात निधन झाले आणि निवृत्त होऊ पाहणारे विठ्ठलराव प्रपंचात अधिकच गुरफटले गेले. घराचे कर्तेपणच त्यांचेकडे आले.

विठ्ठलरावांनी शेतीचा भरिमार उचलला. पातळाचा अंत पाहणाऱ्या विहिरी खोदून काढल्या काळ्या मातीच्या कुशीतून कष्टाचा घाम गाळून हिरवी माया फुलवली.

१९२१-२२ साल भंडारदऱ्याच्या धरणाचे पाणी ओसाड जमिनीला ओलावा देण्यासाठी येऊ लागले होते पण पाण्याची किमया जाणून त्यातून सोने पिकविण्याची धमक शेतकऱ्यात उरलेली नव्हती. पारंपारिक शेतीच्या कल्पनेने खुरटलेले मन आणि फाटका खिसा. त्यामुळे गंगा दाराशी येऊनही शेतकरी कोरडाच होता. पाणी आले पण रानाला बांधी बंदिस्ती नव्हती. पाण्याने जमिनी उपळून जावू लागल्या, दलदली माजू लागल्या विठ्ठलरावांचे चौफेर लक्ष होते. ते केवळ स्वतःचीच शेती पिकवत होते असे नव्हे तर आजूबाजूच्या

शेतीची आणि शेतकऱ्यांची दीनवाणी स्थितीही उघड्या डोळ्यांनी पाहात होते आणि "बुडती हे जन न देखवे डोळां" अशी त्यांच्या हृदयाची कालवाकालव होऊ लागली.

१९२५–२६ साल. जागतिक मंदीचा तो काळ. शेतीमालाला भाव नाही, शेतकऱ्याच्या हातात काय पण दृष्टीलाही पैसा पडायची मारमार. १९२३ सालीच लोणी गावात शेतकऱ्यांची एक पतपेढी निघालेली असते. पण आजूबाजूंच्या गावातील पतपेढ्यांसारखीच दिवाळखोर अवस्था याही पतपेढीची झालेली असते. आज बुडेल की उद्या अशा रुग्णावस्थेत ती धुगधुगत असते. शेतकऱ्यांचा असलेला काडीचा आधारही मोडून जाणार. मग पुन्हा सावकार. त्याचे कर्ज. भरमसाठ व्याज. जमिनींचा लिलाव. परिणामी भूमिधारक भूमिहीन... असे दुष्टचक्र अधिक वेगाने गतिमान होणार...

विठ्ठलराव अस्वस्थ झाले. बेचैन बनले. हृदयातली कालवाकालव अधिकाधिक वाढली. करुणेचा उमाळा दाटून आला. नुसती चुकचुकून स्वस्थ बसणारी, हताश होऊन दुःखाचे सुस्कारे सोडणारी किंवा बांझोटी खंत करीत स्वबांधवांचा आकांत ऐकणारी ती निरर्थक, निष्प्रेम आणि निराश करुणा नव्हती. तर बुडत्याला उडी घेऊन हात देणारी आणि मरत्याला तारण्याची धमक बाळगणारी कर्तव्योन्मुख अशी ती समर्थ करुणा होती. या करुणेच्या उमाळ्यातूनच विठ्ठलरावांनी स्वतःच्या प्रपंचाबरोबरच अवघ्यांच्या प्रपंचात लक्ष घातले. "अवघाची संसार सुखाचा करीन" ही संताची आकांक्षा त्यांच्या अंतर्यामी ठाम मांडून बसलेली होतीच.

विठ्ठलरावांनी गावांतले तरुण सवंगडी जमवले, "गावभलाईचा सुपंथ" हा त्यांच्या मनावर बिंबवला आणि बुडती सोसायटी हाती घेतली. तिला नाना प्रयत्नांनी संजीवनी दिली. तिचा पुनर्जन्म झाला. सहकाराचा 'ओनामा' विठ्ठलरावांनी तिशी पंचविशीतच गिरवायला प्रारंभ केला.

विठ्ठलरावांनी गावच्या सहकारी सोसायटीच्या कामात लक्ष घातले, पण पंचकमिटीतील एक सभासद या पलिकडे कधी अधिकारपद त्यांनी स्वतःकडे घेतले नाही. सोसायटीचे चेअरमन वगैरे होण्याची महत्वाकांक्षा, शक्य असूनही, त्यांनी कधीही धरली नाही. महत्वाकांक्षा उराशी बाळगली ती सचोटीने, काटकसरीने सोसायटीचा व्यवहार चालावा आणि शेतकरी सभासदांचे जास्तीत जास्त भले व्हावे हीच !

भलाईच्या भलावणीतही विठ्ठलरावांनी कधी भोळेपणा दाखवला नाही की भ्याडपणाही पत्करला नाही.

सोसायटीचे सभासद असलेले बरेच शेतकरी सोसायटीचे थकबाकीदार बनलेले होते. दिलेले कर्ज वसूलच झाले नाही तर सोसायटीचा व्यवहार तरी चालावा असा ? सरकारी अधिकारी नियमांवर बोटे ठेवणारे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी कर्जापोटी लिलावात निघाल्या. या पेचप्रसंगातून विठ्ठलरावांनी आपल्या व्यवहारिक शहाणपणाने मार्ग काढला. कायद्याचे काटेकोर पालन करण्याची ठराविक चाकोरी माणूसकी खुंटीला टांगून ठेवून अवलंबू नये असा सल्ला त्यांनी अधिकाऱ्यांना दिला आणि कर्जदार सभासदांनाही हिताच्या गोष्टी सांगून, अडीअडचणी कशा निवारण करता येतील हे आस्थेने पाहून वसुलीही केली. आर्थिक मंदीच्या खडतर काळातही विठ्ठलरावांनी सोसायटीचे तारू सुखरुपपणे हाकले. त्या काळापासूनच सोसायटीला नेहमी "अ" वर्ग मिळवून दिला. सर्वांच्या सलोख्याने सगळ्यांकडून सोसायटीचा कारभार चालवून घेतला. स्वतः कधी अधिकारावर राहिले नाहीत, पण त्यांच्या सल्ल्याशिवाय सोसायटीचे पानही कधी हालले नाही. सर्वांना सांभाळून घेण्याच्या त्यांच्या ठायीच्या कुशल, निःस्वार्थ नेतृत्वामुळे सोसायटीची भरभराई झाली. अशा रीतीने त्यांच्या सहकार कार्याचा श्रीगणेश झाला.

•••

# प्रवरा काठचा कल्पवृक्ष

श्री. वसंतदादा पाटील
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

एका सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलेले विठ्ठलरावजी गरीबीमुळे केवळ सही करण्यापुरतेच शिक्षण घेऊ शकले. शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजलेल्या दारिद्र्याचाच अखंड अनुभव त्यांना घ्यावा लागला. या अनुभवातून एक जिद्द निर्माण झाली. शालेय शिक्षण मिळाले नसले तरी अनुभवाने त्यांनी बरेच शिक्षण मिळविले. आपण स्वत: आणि आजूबाजूचे शेतकरी यांची परिस्थिती आणि या दारिद्र्याच्या चाकोरीतून बाहेर पडण्याचा त्यांच्या मनाला लागलेला ध्यास हीच त्यांच्या कार्याची गंगोत्री. महाराष्ट्रातला शेतकरी लहान आहे. त्याची शेती लहान आहे. शेती जिराईत असून पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे आणि केवळ परंपरागत चालत आलेल्या पद्धतीनेच शेती करीत असल्यामुळे वर्षानुवर्षे श्रम करूनही नशीबी शेवटी दारिद्र्यच आहे ही खंत त्यांच्या मनाला लागली. प्रवरेसारखी अमृतदायिनी शेजारून वाहत असताना केवळ पावसावर अवलंबून राहावे लागते ही स्थिती त्यांना डाचत होती. या सर्व परिस्थितीतून वर यावयाचे असेल तर सहकार हे प्रमुख साधन आहे हे त्यांनी ओळखले.

सहकारी चळवळीची त्या वेळेला या देशात फक्त ओळख होती ती एक कर्ज देणारी संस्था म्हणून. या चळवळीचा वापर शेतकऱ्याला आपल्या विकासासाठी करून घेता येईल ही कल्पना तेव्हा अप्राप्य होती. तरी पण व्यवहाराच्या शाळेत शिकलेल्या विठ्ठलराव विखे पाटलांनी भविष्याची चाहूल ओळखली आणि शेतकऱ्याला कारखानदार करावयाचे मनसुबे तयार केले.

त्यावेळची परिस्थिती लक्षात घेता ही बाब निश्चित हास्यास्पद होती आणि त्यामुळे कुचेष्टेची ठरली होती. तरी पण भविष्याचा आढावा घेणारी दूरदृष्टीची माणसे तात्कालिक टीकेला विशेष महत्त्व देत नसतात आणि म्हणूनच त्यांची दूरदृष्टी नेहमी फलदायी ठरते. त्यांनी पाहिलेली स्वप्नं साकार होतात आणि टीकाकाराचे तोंड बंद होते. एवढेच नव्हे तर आपण टीका केली होती हे विसरून कौतुकाच्या गुणगानाला लागतात.

पद्मश्री विखे पाटील यांच्या जीवनात नेमके हेच घडले. प्रवरानगरचा शेतीमालावर प्रक्रिया करणारा सहकारी साखर कारखाना हा केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिला साखर कारखाना त्यांच्या प्रचंड जिद्दीने उभा राहू शकला. अस्सल ग्रामीण वेष, अशीच निखालस ग्रामीण भाषा. परंतु विचार मात्र अस्सल अर्थशास्त्रज्ञाच्या तोडीचे. त्यासोबत आपण पाहिलेल्या स्वप्नांना आकार देण्यासाठी सतत धडपड करीत राहण्याची वृत्ती यामुळे प्रवरानगरचा साखर कारखाना उभा राहिला. यशस्वी झाला. आणि महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या चळवळीचा तो पाया ठरला. सहकारी कार्यकर्त्यांनी कसे राहावे, कसं वागावं याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे विखे पाटील. त्यांच्या वागणुकीने शेतकऱ्यांचा सहकारावर विश्वास बसला आणि केवळ प्रवरा नगरच्याच परिसरात नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रात वाढीला लागला. प्रवरा नगरचा सहकारी साखर कारखाना ही महाराष्ट्रातील सहकारी कारखानदारीच्या चळवळीची सुरुवात. ती केवळ शेतकऱ्यांच्या आर्थिक दृष्टीकोनातूनच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनं राबविण्याची सुरुवात आहे असे म्हटले तरी ते वावगे होणार नाही. आतापर्यंत दारिद्र्यात पिचत असलेल्या शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी सहकाराच्या माध्यमातून शेतकरी कारखानदारीची एक चळवळ त्यांनी उभारली. ती यशस्वी करून दाखविली. सहकारी साखर कारखान्याद्वारे शेतकऱ्याच्या विपन्नावस्थेला दूर करण्याचा

त्यांनी प्रयत्न केला आणि तो यशस्वी रीतीने पूर्ण केला. परंतु ग्रामीण भारताचा विकास व्हावयाचा असेल तर माझ्या वाट्याला आलेली दुःखे निदान भावी पिढीच्या वाट्याला यऊ नयेत असे स्वप्न त्यांनी उराशी जोपासले आणि म्हणूनच कार-खानदारीतून निर्माण झालेल्या आर्थिक शक्तीचा ओघ समा-जाच्या सर्वांगीण विकासासाठी कसा वळवता येईल याचे त्यांनी शास्त्रशुद्ध चिंतन केले. एवढेच नव्हे तर प्रवरानगरच्या माध्यमातून ते चिंतन त्यांनी साकारही केले आहे.

प्रवरानगरचा साखर कारखाना सुरू झाला त्यावेळी केवळ ४०० टन ऊस गाळपाची शक्ती असलेला होता. कारखा-न्याच्या वाढीनंतर आता २५०० टनापर्यंत त्याची गाळप शक्ती वाढली आहे. व पुढल्याच वर्षी ऊस गाळपाची शक्ती ४००० टनापर्यंतच पोहोचणार आहे. या कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे ऊस. तो शेतकरी पिकवितात या कच्च्या मालाचे रूपांतर करताना, करीत असताना ऊसाची साखर होण्याच्या प्रक्रियेतील कुठलाही भाग वाया जाऊ नये याची दक्षता त्यांनी घेतली आहे. त्याचे फलित म्हणून एरवी वाया जाणाऱ्या मळीपासून अल्कोहोल व त्यातून दारू तयार करण्याचा प्रकल्प त्यांनी उभारला. या प्रकल्पाला लागूनच नजीकच्या भविष्यकाळात विदेशी दारू तयार होईल. मळी-प्रमाणेच ऊसाचा चोथा वाया जाऊ नये म्हणून त्यांनी कागद कारखान्याची कल्पना मांडली आणि कारखान्याचे बांधकाम पूर्ण करीत आणले.

शेतकऱ्याच्या श्रमाचे उचित मूल्य मिळावयाचे असेल तर त्याच्या उत्पादनाचा पर्याप्त वापर झाला पाहिजे हेच कार-खानदारीचे प्रमुख सूत्र आहे. या सूत्राचा विचार कुठल्याही कसलेल्या कारखानदाराप्रमाणेच विठ्ठलरावजी विखे पाटील यांनी केला. त्यामुळे वाया जाणाऱ्या वस्तूतूनही समृद्धीच्या निर्मितीचा ओघ त्यांनी कायम ठेवला.

सहकारी साखर कारखान्यातून निर्माण झालेली आर्थिक शक्ती आज बुद्धीवंतांच्या टिकेचा विषय बनली आहे. बरेच बुद्धीवंत या नवीन निर्माण झालेल्या क्षमतेविषयी बरेच बोलत आणि लिहित असतात. सहकारी साखर कारखान्याचा आणि विशेषतः प्रवरानगरचा परिसर जो कोणी पाहील त्याला या टीकेतील फोलपणा त्वरीत जाणवतो. ह्याचे कारण म्हणजे विठ्ठलरावजी विखे पाटीलांची चतुरस्त्र दूरदृष्टी. साखरकार-खानदारीमुळे निर्माण झालेली केवळ सभासदांच्या भल्यासाठी सीमीत न राहता तिचा उपयोग परिसरातील सर्वसामान्य गरीब, दरिद्री शेतकऱ्याला व्हावा यासाठी त्यांनी हेतुपरस्सर लक्ष दिले. त्यासाठी योजना आखल्या आणि त्या कार्यान्वित केल्या.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने सर्वप्रथम आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे शेतीविषयी तांत्रिक सल्ला. शेतीप्रधान ग्रामीण भागाचा विकास व्हावयाचा असेल तर परंपरागत शेतीपद्धती सोडून नवीन पद्धतीचा अंगीकार शेतकऱ्यांनी केला पाहिजे विखे पाटीलांनी हे ओळखले परंतु केवळ प्रचारावर न थांबता त्यांनी त्यासाठी योग्य त्या सोयींची सुरवात आपल्या कारखा-न्याच्या माध्यमातून केली. कारखान्यातर्फे शेती अधिकाऱ्यांचा नियुक्ती करून त्यांच्याद्वारे शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन व सहाय्य मिळेल ह्याची त्यांनी दक्षता घेतली. जमिनीच्या प्रतवारीची तपासणी करून त्यानुसार शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी एक संशोधन केन्द्र सुरू केले केवळ निदान केल्यानंतर रोग दूर होत नाही त्याला उपचाराची जरूरी असते हे ओळखून जमिनीच्या प्रतीचं निदान झाल्या-वर शेतकऱ्यांना योग्य ते उपचार जमिनीवर करता यावेत म्हणून १२ ट्रॅक्टर्सचे एक पथक प्रवरानगर साखर कारखान्याने तयार केले आहे. शेतकऱ्यांना अल्प दरात नांगरट करून देण्याची व्यवस्था केली आहे. शेतकऱ्यांच्या खताची आवश्यकता पूर्ण करता यावी म्हणून मिश्रखताचा एक कारखानाही सुरू केला आहे.

पाणी म्हणजे शेतकऱ्यांचे जीवन. या पाण्याचा वापर करून शेतकऱ्यांना संपन्नता मिळाली. नदीकाठच्या शेतकऱ्यांना लाभलेले योग नदीकाठ नसणाऱ्या शेतकऱ्यांनाही थोड्या-बहुत प्रमाणात मिळावे यासाठी ओलीताचा जास्तीत जास्त

(२३ वर पहा)

# शेतकऱ्यांचा झुंझार नेता

खासदार **श्रीं. अण्णासाहेब शिंदे**

आता सुमारे पंचवीस वर्षापेक्षाही अधिक काळ लोटला आहे. १९४०–५० साली माझी स्थानबद्धतेतून नुकतीच सुटका झाली होती. कारण त्यावेळच्या मुंबई सरकारने डावा (Leftist) कार्यकर्ता म्हणून मला स्थानबद्ध केले होते. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर मी श्रीरामपूरला वकिलीचा व्यवसाय करण्यासाठी आलो. प्रवरा कारखान्याच्या उभारणीचे काम त्यावेळेस वेगाने चालले होते. सहकारी क्षेत्रातील हा नवीन धाडशी प्रयोग होता. पद्मश्री विखे पाटील आणि कै. धनंजयराव गाडगीळ या धाडशी प्रयोगाचे नेतृत्व करीत होते. पद्मश्री विखे पाटील यांचा व माझा त्या अगोदरही थोडा परिचय होताच ग्रामीण भागातील एक सुशिक्षित कार्यकर्ता म्हणून प्रवरा कारखान्याचे सभासद होण्याबद्दल पद्मश्री विखे पाटील यांचे काही सहकारी मला आग्रह करू लागले. श्री. चंद्रभान पाटील घोगरे यांनी विशेष लक्ष घालून व पुढाकार घेऊन मला प्रवरा कारखान्याचे उत्पादक सभासद बनविले व त्यामुळे पद्मश्री विखे पाटील आणि कै. धनंजयराव गाडगीळ यांचे व माझे खूपच जवळचे संबंध निर्माण झाले. सर्वांच्या प्रोत्साहनामुळे मीही प्रवरा सहकारी कारखान्याच्या कामकाजात एक कार्यकर्ता म्हणून लक्ष घालू लागलो व पुढे जवळ जवळ १२–१३ वर्षे (१९६२ साली लोक सभेला निवडून येईपर्यंत) पद्मश्री विखे पाटील व कै. धनंजयराव गाडगीळ यांच्या बरोबर काम केले. काही वर्षे मी प्रवरेच्या संचालक मंडळाचा सभासद होतो कै. धनंजयराव गाडगीळ कारखान्याचे अध्यक्ष होते व पद्मश्री विखे पाटील उपाध्यक्ष होते. कै. धनंजयराव गाडगीळ अध्यक्ष पदावरून निवृत्त झाल्यानंतर पद्मश्री विखे पाटील अध्यक्ष म्हणून काम पाहू लागले व मी उपाध्यक्ष म्हणून त्यांचेबरोबर काम करीत होतो. माझ्या प्रवरा कारखान्यातील पद्मश्री विखे पाटील यांच्या बरोबर केलेल्या कामामुळे मी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचाही अध्यक्ष झालो.

महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरेलाच का स्थापन व्हावा हा समाजशास्त्र व अर्थशास्त्राच्या दृष्टीने एक अभ्यासाचा व संशोधनाचा स्वतंत्र विषय होऊ शकेल. महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, नाशिक वगैरे जिल्ह्यात प्रवरेपेक्षा अधिक अनुकूल परिस्थिती असलेली अनेक ठिकाणे होती. ऊसाचे क्षेत्र व पाटपाण्याची उपलब्धी या दोन्हीही दृष्टीने प्रवरा कारखान्याचे कार्यक्षेत्र सहकारी कारखाना काढण्याच्या दृष्टीने अनुकूल नव्हते. प्रवरा कारखान्याचे परिसरात त्यावेळी फक्त ७०० एकर जमिनीत ऊसाला पाटपाणी मिळत होते. प्रवरा कालव्याचे इतर सर्वत्र पाणी अगोदरच वाटले गेलेले होते. नवीन ऊसाचे ब्लॉक्स् मिळण्याची शक्यता नव्हती. ऊसाचे क्षेत्रही कारखानदारीच्या दृष्टीने बरेच कमी होते शिवाय प्रवरा कारखान्याचे अगदी शेजारी १०–१२ मैलाचे परिसरांत खाजगी क्षेत्रांत महाराष्ट्र शुगर मिल्स् लिमिटेड हा अतिशय सुस्थिर व भरभराटीस आलेला खाजगी कारखाना होता. नगर जिल्ह्यात या खाजगी कारखान्या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील सर्वात अधिक खाजगी कारखाने अगोदरच स्थापन झाले होते व त्यांचा प्रवरा सहकारी कारखान्याच्या स्थापनेस विरोध होता. सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याच्या दृष्टीने जी पहिली सभा कै धनंजयराव गाडगीळ याचे अध्यक्षतेखाली झाली तीही प्रवरा परिसरात झाली नाही, तर श्रीरामपूरच्या पूर्व भागात म्हणजे हल्ली जे अशोक सहकारी कारखान्याचे कार्यक्षेत्र आहे तेथे म्हणजे मातापूर (ता. श्रीरामपूर) येथे झाली होती. याही घटनेचा अर्थ मी केलेल्या वरील विवेचनावरून स्पष्ट होऊ शकेल. केवळ नैसर्गिक परिस्थिती अनुकूल असली म्हणजे औद्योगिक विकास होऊ शकतो हेहि प्रवरेच्या स्थापनेवरून खरे दिसत नाही. नैसर्गिक अनुकूल परिस्थितीपेक्षाही मानवी प्रयत्न व नेतृत्व याला अधिक महत्त्व असते. जपानमध्ये कच्चे लोखंड, कच्चे तेल इत्यादि कच्च्या मालाचा पुरवठा नसतानाही प्रचंड प्रमाणात पोलादाची आणि पेट्रोकेमिकलचीं कारखानदारी स्थापन झाली व सगळ्या चढाओढीत जगातील

अनेक राष्ट्रांना जपान मागे टाकू लागला याचा उलगडा समाजशास्त्राच्या दृष्टीने परिस्थितीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला तरच समजू शकेल. तसेच प्रवरा सहकारी साखर कारखान्याची स्थापना, मानवी प्रयत्न व पद्मश्री विखे पाटील यांचे नेतृत्व यामुळेच होऊ शकली हे सहज लक्षात येईल.

अहमदनगर जिल्हा हा एक दुष्काळी जिल्हा म्हणून महाराष्ट्रात व देशात माहीत आहे. दुष्काळी अशा या अहमदनगर जिल्ह्यातील अर्धा शतकापूर्वीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेतली व या प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी जे ठोस प्रयत्न अहमदनगर जिल्ह्यांत व विशेषत: प्रवरा सहकारी कारखान्याचे परिसरांत झाले त्या प्रयत्नातून प्रवरा सहकारी कारखान्याच्या स्थापनेस अनुकूल अशी परिस्थिती निर्माण झाली. १८७७ साली म्हणजे सुमारे एक शतका पूर्वी याच भागात शेतकऱ्यांचे बंड झाले होते (Deccan Riots) व या बंडाचे प्रमुख केंद्र सोलापूर, पुणे व नगर जिल्ह्याचा दुष्काळी भाग हेच होते. शेतकऱ्याला सावकाराशिवाय कर्ज मिळण्याची सोय नव्हती. व्याजावर काही निर्बंध घालण्यासाठी त्यावेळी ब्रिटीश सरकारने कायदा केला होता तरी मोठ्या व्याजाच्या दराने व दाम दुप्पटीच्या रोख्याचे पद्धतीमुळे शेतकऱ्यांची अमानुष पिळवणूक सावकार लोक करीत होते. सावकारांचे कर्ज न फेडल्यामुळे फार मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या जमिनी कोर्टात लिलाव होऊन सावकारांच्या ताब्यात गेल्या होत्या. सरकारची अनास्था, सहकारी चळवळीचा अभाव आणि वारंवार पडणारा दुष्काळ यामुळे शेतकरी वर्ग जर्जर झाला होता कुणालाही स्पष्ट दिशा दिसत नव्हती. सर्वत्र अंधःकार पसरला होता. तरीही शेतकरी मंडळी आपआपल्या परीने या प्रतिकूल परिस्थितीशी तोंड देण्याचा प्रयत्न करीत होती. जीव मुठीत धरून शेतकरी वर्ग जीवंत राहण्याचा प्रयत्न करीत होता. शेतकऱ्यांचा असंतोष कमी व्हावा म्हणून ब्रिटीश सरकारने विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात थातूर मातूर इलाज म्हणून सहकारी चळवळीला प्रोत्साहन देण्याचे ठरविले. अर्थात त्यावेळची सहकारी चळवळ ही प्रामुख्याने कर्ज पुरवठा करण्यापुरतीच मर्यादित होती. या ब्रिटीश सरकारच्या धोरणामुळे शेतकरी वर्गाचे सगळे प्रश्न सुटणेही शक्य नव्हते. परंतु तरी सुद्धा सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यात मदत होईल किंवा सावकाराची शेतकऱ्यावरील पकड ढीली करता येईल म्हणून ग्रामीण भागात काही सहकारी सोसायट्या १९१० ते १९२० चे दरम्यान स्थापन झाल्या. खेडेगावात ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे समंजस नेतृत्व अस्तित्वात होते अशा ठिकाणी हा प्रयत्न मूळ धरू लागला. शेतकऱ्यांना सावकाराच्या पाशांत पडण्याची पाळी येऊ नये आणि शेतकऱ्यांच्या जमिनी लिलाव होऊन त्यांच्या उपजिविकेचे साधन नाहीसे होऊ नये म्हणून सहकारी सोसायटी स्थापन केली तर कदाचित यातून मार्ग निघू शकेल असा विचार पद्मश्री विखे पाटील यांच्या मनात घोळू लागला व यातूनच लोणी बुद्रुक ता. श्रीरामपूर (पद्मश्री विखे पाटील यांचे गाव) येथे सहकारी संस्था स्थापन करण्याचा १९२२ सालच्या सुमारास प्रयत्न झाला. पद्मश्री विखे पाटील यांचा हा प्रयत्न खूपच यशस्वी झाला. शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणे त्यांच्या मालाची वाजवी भावात विक्री करणे इत्यादी कामे ही सोसायटी करू लागली हल्लीही अर्ध्या शतकानंतर ही सोसायटी एक यशस्वी ग्रामीण सहकारी संस्था म्हणून नावारूपाला आलेली आहे. प्रवरा सहकारी कारखाना स्थापन होण्यापूर्वी पद्मश्री विखे पाटील यांनी या सहकारी सोसायटीचे जे नेतृत्व केले त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. सहकारी पद्धतीने शेतकऱ्यांना एकत्र आणून संघटीत केल्याने एक शक्ती निर्माण होऊ शकते व या शक्तीच्या सहाय्याने अर्थ व्यवहारातील अनेक कामे जी व्यक्तिगत शेतकऱ्यांना शक्य होत नाही अशी कामे करणे शक्य आहे अशी पद्मश्री विखे पाटील यांची खात्री पटली व या सामाजिक अनुभवा तूनच प्रवरा कारखान्याचा जन्म झाला.

१९३० सालचे सुमारास भारत सरकार साखर धंद्यास संरक्षण देणारे धोरण जाहीर केल्यानंतर जे अनेक खाजगी कारखाने देशभर स्थापन झाले त्यात खाजगी

क्षेत्रातील परंतु थोडया वेगळया स्वरुपाचा कारखाना महाराष्ट्रात माळीनगर येथे स्थापन करण्यात आला होता. व या माळीनगरच्या कारखान्याचे स्वरूप इतर खाजगी कारखान्या पेक्षा गुणात्मक दृष्टीने जरा भिन्न स्वरूपाचे होते. माळीनगरच्या कारखान्याचे भागीदारी मंडळी ही बहुतेक शेतकरी होती. ते स्वतःचे ऊस पिकवित होते व कंपनीचा कारभारही स्वतः चालवित होते. माळीनगरच्या कारखान्यामुळे ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत आमुलाग्र बदल झाला होता त्या कारखान्यापासूनही पद्मश्री विखे पाटील यांनी काही निष्कर्षाचा सहकारी चळवळीसाठी उपयोग करण्याचे ठरविले. माळीनगरच्या कारखान्याचा पाया तसा व्यापक नव्हता. परंतु सहकारी साखर कारखाना स्थापन करून व पाया अधिक व्यापक करून लहान शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात भागीदार करून घेता येईल आणि शेतकऱ्यांना संघटीत करून त्यांच्या शक्तीचा उपयोग कृषि औद्योगिक प्रकल्प उभारणेसाठी करता येईल ही कल्पना पद्मश्री विखे पाटील यांनी मनाशी धरून त्याप्रमाणे पुढील काळात पाऊल टाकण्याचा निर्धार केला

महाराष्ट्रातील खाजगी साखर कारखान्याचा अनुभव चांगला नव्हता. असंख्य शेतकऱ्यांच्या जमिनी दीर्घ मुदतीचे कराराने घेऊन अगर खरेदी करून खाजगी साखर कारखाने त्यांना लागणारा ऊस त्या जमिनीत पिकवीत होते. परंतु यामुळे ज्या भागात खाजगी कारखाने अस्तित्वात आले तेथील शेतकरी समाजाची फारच अवनति आली होती. मुख्य उपजीविकेचे साधन जमीन ही साखरकंपन्यांच्या ताब्यात गेल्यामुळे शेतकरी समाज उघडा पडला होता व त्यांची फार दैना झाली होती. खाजगी कारखान्याच्या भागातील ग्रामीण अर्थ व्यवस्था कायम स्वरूपाच्या अर्थ संकटात ( perpetual crisis ) सापडली होती. खाजगी कारखान्यांचे वाईट अनुभव टाळून नव्या पद्धतीने कृषि औद्योगिक प्रकल्प उभारता येईल अशी खुणगाठ पद्मश्री विखे पाटील यांनी मनात बांधली होती. तरी पण अशा प्रकारच्या प्रकल्पाला त्यावेळचे शासन, सहकारी यंत्रणा, प्रशासक व धोरण ठरविणारे राज्यकर्ते हे कितपत पाठींबा देतील याबद्दल अनेक प्रकारच्या शंका पद्मश्री विखे पाटील यांचे मनात होत्या. कै. धनंजयराव गाडगीळ त्यावेळेस महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रमुख चालक होते व त्यांचे नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने फार मोठा यशाचा टप्पा गाठलेला होता. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक प्रांतातील सहकारी चळवळीलाही अनेक तऱ्हेने मदत करीत होती. व्यक्तिशः कै. धनंजयराव गाडगीळ यांचा या चळवळीला पाठींबा मिळाला तर शासनाकडूनही पाठींबा मिळू शकेल या विचारातून पद्मश्री विखे पाटील यांनी कै. धनंजयराव गाडगीळ यांचे सहकार्य घेतले. ग्रामीण अर्थव्यवस्थेत नवीन प्रयोग करून पहावे व अशा प्रयत्नांच्या अनुभवातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला पोषक अशी नवीन दिशा कशी द्यावयाची या संबंधी निकाल घेता येईल असे विचार कै. धनंजयराव गाडगीळांच्या. मनांतही घोळत होते. ते ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ होते त्यांच्या शब्दाला समाजात व शासनात मान होता. ते जनताभिमुखही होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत तयार झालेली कोंडी फोडण्याचे दृष्टीने नवीन पावले टाकावीत असे विचार त्यांचेही मनात घोळत होते. याच सुमारास नगर जिल्ह्यात सहकारी पद्धतीने सहकारी साखर कारखाना उभारावा असे विचार काही मंडळी मांडीत होती व त्यादृष्टीने कै. धनंजयराव गाडगीळ यांच्या बरोबर अशा मंडळींनी संपर्कही स्थापन केला होता. परंतु या विचारास मुर्तस्वरूप देण्याचा प्रयत्न पद्मश्री विखे पाटील यांचे नेतृत्वाखाली प्रवरेत झाला. सुरवातीस खूपच अडचणी आल्या. शासनाची फारशी साथ मिळाली नाही. शासकीय पातळीवर असल्याप्रकारच्या प्रयत्नास देणे दूरच राहिले पण हा प्रयत्न यशस्वी होणार नाही असे निक्षून सांगण्यात आले होते व निरुत्साही करण्याचा प्रयत्न होत होता. परंतु पद्मश्री विखे पाटील यामुळे नाराज झाले नाहीत. उलट अत्यत चिकाटीने ते या प्रयत्नाचा पाठपुरावा करीत राहिले. त्यांच्या चिकाटीमुळे व कै. धनंजयराव यांच्या मदतीने त्यावेळचे मुंबईराज्याचे अर्थमंत्री श्री.वैकुंठभाई मेहता यांनी मुंबई सरकारचेही मन वळविले आणि अखेर मुंबई राज्याच्या या प्रकल्पास आशिर्वाद मिळाला. पद्मश्री

विखे पाटील यांनी एकदा एखाद्या मुद्याचा पाठपुरवठा करण्याचे ठरविले तर ते कधीही आपला मुद्दा सहजासहजी सोडणार नाहीत. या त्यांच्या स्वभावामुळे भारतातील पहिल्या साखर कारखान्याचा प्रयत्न प्रतिकूल वातावरणातही यशस्वी होऊ शकला.

हल्ली महाराष्ट्रातील सहकारी कारखान्यांचे क्षेत्रात अनेक वाद आहेत. देशातील राजकीय नेत्यांचे मनातही सहकारी कारखान्या संबंधी अनेक प्रकारच्या शंका कुशंका आहेत व यासंबंधी निराळी सखोल चर्चा होण्याची शक्यता आहे. सहकारी कारखानदारीत कांहीं दोष असल्यास ते दूर करण्याचे दृष्टीने काय प्रयत्न करता येतील याचाही विचार व्हावयास हवा. परंतु सहकारी साखर कारखाने अस्तित्वात असल्यामुळे या देशामध्ये साखरेचे उत्पादन गेल्या पंचवीस वर्षात प्रचंड प्रमाणात वाढले एवढेच नव्हे तर चालू वर्षी परदेशीय हुंडणावळीच्या रूपाने रुपये ४५० कोटी, साखर निर्यातीमुळे राष्ट्राच्या तजोरीत जमा झाले सहकारी कारखानदारी अस्तित्वात आली नसती तर खाजगी क्षेत्रात ही कारखानदारी एवढ्या मोठ्या प्रमाणावर देशात वाढविता येणे शक्य झाले नसते आणि महाराष्ट्रातही साखर कारखानदारी इतक्या मोठ्या प्रमाणात उभी राहिली नसती. देशातील साखर कारखानदारीच्या विकासात प्रवरा सहकारी साखर कारखान्याचा मोठा वाटा आहे.

आर्थिक क्षेत्रात सहकारी साखर कारखान्यांनी काटेकोर नियम पाळण्याचीही आवश्यकता आता निर्माण झाली आहे. सहकारी कारखान्याच्या निवडणुकीचे वेळी दोन पक्ष जेव्हा एकमेकांच्या विरूद्ध प्रचार करतात. त्यावेळेस कारखान्याच्या यंत्रणेचा व आर्थिक सामर्थ्याचा इतर कारणासाठी दुरूपयोग केल्याचे आरोप-प्रत्यारोप केले जातात. पद्मश्री विखे पाटील प्रवरा सहकारी कारखान्याचे चालक होते. परंतु त्यांनी कारखान्याचे अन्नही कधी घेतले नाही. **स्वतः घरची भाकरी बांधून सतत ते कारखान्यावर येत असत व कारखान्याचे कामासाठी कुठेही गेले तरी त्यांनी भत्ताही स्विकारलेला नाही कारखानदारी राजकारणापासून संपूर्ण अलिप्त ठेवण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला**

हल्ली महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींनी पद्मश्री विखे पाटील यांचे पासून खूपच शिकण्यासारखे आहे. १२–१३ वर्षे पद्मश्री विखे पाटील यांचे बरोबर, वर उल्लेख केल्याप्रमाणे, मला काम करण्याचा योग आला. खेड्यातील सुज्ञ माणूस आणि खेड्यातील शहाणपण यामुळे भारताची खेड्यातील संस्कृती शतकानशतके प्रतिकूल परिस्थितीशी तोंड देऊनही टिकाव धरू शकली. पद्मश्री विखे पाटीलांचे नेतृत्व म्हणजे ग्रामीण भागातील सुज्ञ व शहाणे नेतृत्वाचा व भारतीय संस्कृतीचा उत्तम वारसाच होय. आपल्या प्रपंचासाठी काही करीत असताना समाजाचे ऋणही फेडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाज शक्तिमान झाला तरच समाजाचा घटकही शक्तिमान होतील या विचारानेच पद्मश्री विखे पाटील यांनी आयुष्यभर काम केले. **पद्मश्री विखे पाटील आणि कै. धनंजयराव गाडगीळ यांनी महाराष्ट्रातील सहकारी कारखानदारीचा अतिशय चांगला पाया घातला त्यामुळेच सहकारी चळवळीची गेल्या पंचवीस वर्षात महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. आता ही कारखानदारी अगदी निकोप कशी बनविता येईल, ती सर्व जनतेच्या आदरास पात्र कशी होईल, या दृष्टीने चळवळीस नेतृत्व देण्याची गरज आहे.**

○ ○ ●

# कर्मयोगी विखे पाटील

श्री शंकरराव मोहिते
अध्यक्ष, सहकारी साखर कारखानदार संघटना
अकलूज

आज जगी या वेडे म्हणता।
गातील पुढती उद्या पवाडे
देशातील अपुल्या धवल यशाचे फडकावून निशाण।
अमुचे जग गाईल जयगान ।।

अशी एक कविता शालेय जीवनात मी अभ्यासलो आहे. परंतु कवीने केलेली कल्पना व्यवहारात जशीच्या तशी उतरते त्यावेळी कवीच्या द्रष्टेपणाचे कौतुक करावे की ती प्रत्यक्षात आणण्याचे काम करणाऱ्यांना साष्टांग दंडवत घालावेत असा प्रश्न पडतो. एवढे काम ज्या तपस्व्याने केले आहे. त्याचे नाव आहे 'विठ्ठलराव एकनाथ विखे-पाटील'.

नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात लोणी नावाचे एक छोटेसे गाव आहे श्री विठ्ठलराव विखे-पाटील त्याच गांवचे आहेत. विखे पाटलांनी या गांवाला आपल्या कर्तृत्वाने मोठे नाव मिळवून दिले आहे ग्रामीण शेतकऱ्यांच्या जीवनातील अस्मीतेचा आणि आर्थिक क्रांतीचा त्यांनी पाया घातला आहे. सहकारी क्षेत्रात शेतकऱ्यांच्या मालकीची कारखानदारी निर्माण करणे, ही कल्पना ज्यावेळी वेडेपणाची गणली जात होती त्यावेळी या कल्पनेची कास धरून ती मूर्त स्वरुपात आणण्याचे आसामान्य कार्य विखे पाटलांनी केले आहे. विठ्ठलरावांना ज्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले आहे. त्या परिस्थितीचे अन्तर्मुख होऊन चिंतन केले तर सुरवातीला उल्लेखलेली कविता विठ्ठलरावांच्या बाबतीत किती योग्य ठरते, याची कल्पना येते.

१९४५ साली श्रीरामपूर येथे कालव्याचे पाणी घेणाऱ्या बागायतदारांची एक परिषद झाली होती मोठमोठ्या बागायतदारांच्या पुढाकाराने झालेल्या या परिषदेत एक वेगळीच घटना घडली. साखर कारखाने भांडवलदारांच्या मालकीचे न घेता शेतकऱ्यांनीच साखर कारखाने काढावेत असा ठराव विखेपाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या सभेत केला. शेतकऱ्यांच्या मालकीची कारखानदारी ही कल्पना आणण्याचे श्रेय कै. धनंजयराव गाडगीळ यांना आहे. निश्चितस्वरुपी सऊ पुरवठा व धरण करावयाचे भाग यांचे प्रमाण ठरवून पुरुषांनी केले. मा. गणपतराव औताडे-पाटील महाराष्ट्र ज्या सहकारी बँकेचे त्यावेळचे व्यवस्थापक श्री. गायतोंडे, बँकेचे चिफ् अकौन्टन्ट श्री. धारप कार्यकर्ते श्री. घुमाळ, श्री. तांबवेकर ही मान्यदर मंडळी विखे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहीली म्हणूनच सहकारी साखर कारखानदारीचे स्वप्न साकार होऊ शकले. त्यानंतर प्रत्यक्षात साखर कारखाना सुरू होण्यामध्ये ५ वर्षे गेली. याच पाच वर्षांच्या काळात साखर कारखाना उभा करण्यासाठी ज्या यातना सहन कराव्या लागल्या त्या या भूपुत्राने मोठ्या संयमपूर्वक सहन करून, यावर मात करून अंतिम उद्दीष्ट साध्य केले आणि अनुयायांना सहकारी साखर कारखानदारीचा मार्ग सुकर करून दिला आहे. त्यादृष्टीने पोट नियम तयार करण्याचे महान कार्य या युग-

शिक्षणाचा फारसा गंध नसलेल्या शेतकऱ्यांनी लाखो रुपयाचा कारखाना उभा करणे आणि ज्यांनी बैलगाडी किंवा टांगा ह्याशिवाय दुसरी कसलीही चाके पाहीली नाहीत, त्यांनी मोठाली अवघड यंत्रसामुग्रीची चाके सतत फिरत राहातील. याची जबाबदारी उचलणे, ह्या कल्पनाच मनाला पटणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे ज्यावेळी विखे पाटील आणि त्यांचे सहकारी भागभांडवल जमा करण्यासाठी बाहेर पडत, तेव्हा त्यांना अनेक जण खरोखरच वेड्यात काढीत असत आणि मालक घरी असला तरी त्यांचे कुटुंबीय तो घरी नसल्याचे सांगत. साखर कारखान्याला सरकारी परवाना मिळण्याबाबत जो विलंब झाला त्याचाही विखे पाटील यांना खूप त्रास सहन करावा लागला. पदरमोड करून हाती घेतलेले काम त्यांनी समर्थपणे पुरे केले व प्रवनगरच्या कारखान्यात साखर उत्पादनास सुरवात झाली.

केवळ एक साखर कारखाना उभारण्याचेच काम विखे पाटील करीत होते, असे नव्हे तर सरकारकडून सहकारी साखर कारखनदारी मुलभूत तत्व मान्य करून घेण्याचे काम त्यांनी त्यावेळी, केले म्हणून इतर कारखान्यांना मागाहून

परवाने आणि कर्जे मिळतांना फारसा त्राम झाला नाही. विखे पाटीलांनी केलेला प्रयोग यशस्वी झाला त्याचे अनुकरण इतरांनी केले महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात एकामागोमाग एक सहकारी साखर कारखाने उभे राहू लागले.

विखे पाटलांमुळे ग्रामीण भागातील जनतेला ज्ञानगंगा मिळाली आणि त्यांच्यामुळेच आज विशेषकरून सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात शेकडो शिक्षण संस्था निर्माण झाल्या आहेत. सामान्यत: लक्ष्मी आणि सरस्वती यांचे सहकार्य कोठेच दिसत नाही. परंतु सहकारी साखर कारखान्यांनी विखे पाटलांचा आदर्श समोर ठेवून, शिक्षणक्षेत्रात भरीव कामगिरी केला. हे निर्विवाद आहे. शिक्षणकार्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेची तरतूद करताना विखे पाटलांनी 'म्हसोबा फंड' निर्माण केली वाचकांना हा म्हसोबा फंड म्हणजे काय? असा प्रश्न पडेल. 'म्हसोबा' हे प्रवरानगरचे ग्रामदैवत आहे. कारखान्याच्या आवारात रोज शेकडो गाड्या ऊस घालायला येत असतात. त्यामुळे ऊसाच्या ज्या कांड्या आवारात पडतात, तो ऊस जमा करून गाळपासाठी वापरला जातो व होणारी किंमत "म्हसोबा फंडला" दिली जाते याप्रकारे दरवर्षी १५-२० हजार रुपये कारखाना या फंडास देत आहे. कचऱ्यातून सोने निर्माण करण्याची ही पद्धत माझ्या माहितीप्रमाणे फक्त प्रवरा कारखान्यात अस्तित्वात आहे. विखेपाटीलांची दूरदृष्टी आणि हिशोबातील काटेकोरपणे समजायला ही उदाहरणे पुरेशी आहेत.

प्रवरा कारखान्यांने अनेकांना स्फूर्ती दिली. तात्यासाहेब कोरे यांनी आपल्या "मी एक कार्यकर्ता" ह्या पुस्तकात लिहीले आहे की, विखे पाटील ऊंसाची साखर निर्माण करीत होते, त्याचवेळी कोल्हापूर भागातील आम्ही शेतकरी ऊसाचा कोळसा करीत होतो. तेव्हा आम्हींही विखेपाटलांपासून स्फूर्ती घेतली हे सगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

जिराईत शेतकऱ्यांना बागायती करुन त्यांचे जीवन सुखी आणि संपन्न करण्याचे महान कार्य सहकारी साखर कारखान्यामुळेच होऊ शकले. ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही आकाशाचे प्रतिबिंब अथांग सागरामध्ये विशाल दिसते व तेच प्रतिबिंब लहान विहीरी अगर डबक्यामध्ये संकुचित दिसते. सहकारी साखर कारखान्यांनी सर्वांगिण स्तरावर केलेल्या प्रगतीचे मुल्यमापन अथांग सागरामध्ये दिसणाऱ्या प्रतिबिंबातून करावयाचे अगर विहिरीतील किंवा डबक्यातील प्रतिबिंबातू नकरावयाचे हे पाहाणाऱ्यानी ठरवावयाचे आहे. मात्र पाहणाऱ्याची दृष्टी कशी, हा प्रश्न आहे?

महाराष्ट्रातील ४५ साखर कारखाने दरवर्षी सुमारे २३० कोटी रुपये शेतकऱ्यांना ऊसाची किंमत म्हणून वाटत असतात-सुमारे २ लाख मारसांना कारखान्यानी प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. प्रवरानगरच्या एका छोट्या कारखान्यापासून रुजलेले सहकारी साखर कारखानदारीचे रोपन आज कल्पवृक्ष झाला आहे.. प्रवरा कारखान्याचे विद्यमान चेअरमन खासदार श्री. बाळासाहेब विखेपाटील यांनी त्यांच्या वडीलांचा वारसा त्यांच्या विधायक कार्यातून पुढे चालविला आहे, आणि पद्मश्रीच्या अपूऱ्या राहीलेल्या इच्छा फलद्रूप करुन त्या पुर्ण करण्याचा आणि त्यातून गोरगरीबांच्या अनेकविध अडचणी सोडविण्याचा प्रयत्न ते करीत आहेत.

कमळामुळे पाण्याला, पाण्यामुळे कमळाला आणि कमळ व पाणी यादोघा मुळे सरोवराला शोभा येते. असा अर्थाचे एक संस्कृत सुभाषित आहे. विखेपाटील हे ही असेच एक कमळ आहे. हे कमळ सहकारी साखर कारखानदारीच्या सरोवरात फुलले. अशा या कमळे असलेल्या विशाल सरोवराने सारा देश शोभिवंत होत आहे. याचा आनंद कोणाला होणार नाही? अशा या द्रष्टया नेत्याला दिर्घायुरारोग्य लाभो, हीच शिवचरणी प्रार्थाना.

प्रमाणात वापर करण्याची मोहीम विखे पाटील यानी सुरू केली. त्यासाठी प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याने विहिरींचे बोअर खोदण्याचे काम करण्यासाठी एक पथक तयार केले. त्याने आतापर्यंत तीन हजार बोअर खोदलें आहेत.

परंपरागत शेतीपद्धतीला धक्का दिल्याखेरीज शेतकऱ्यांचा विकास होऊ शकणार नाही हे जाणून त्याबाबतीत विखे पाटीलांनी घेतलेल्या पुढाकारामुळे १९७७ च्या खरीप हंगामात प्रवरानगरच्या परिसरात वीस हजार एकरात खरीप ज्वारी घेण्यात आली. नगर जिल्ह्यात खरीप ज्वारी होऊ शकत नाही असा शेतकऱ्यांचा वर्षानुवर्षे समज होता. त्याला बसलेला एक प्रचंड धक्का होय

नगर जिल्ह्यातील बराचसा भाग दुष्काळी आहे. या दुष्काळ प्रवण भागात शेतकऱ्यांना सहाय्यभूत व्हावे म्हणून प्रवरानगर संस्थेने ४२ पाझर तलाव तयार केले. काही ठिकाणी तयार झालेल्या ह्या पाझर तलावांना पावसाच्या अभावी पाणी नसते व त्यामुळे या पाझर तलावांचा उपयोग व्हावा त्या प्रमाणात होत नाही. अमाप खर्चाने व प्रचंड कष्टाने तयार झालेले हे तलाव शेतकऱ्यांच्या दृष्टीने उपयोगी ठरावे यासाठी पावसाळ्यात जेव्हा कॅनॉल भरून वाहतात व ज्यावेळी पाण्याचा उपयोग करून घेणे शक्य नसते तेव्हा कॅनॉलमधील पाणी पाइपलाईनद्वारे लिफ्ट करून पाझर तलावात टाकावयाची कल्पना विखे पाटीलांनी सुचविली. भगिरथाशी सदृश असणाऱ्या या योजनेचा जेव्हा त्यांनी उच्चार केला त्यावेळी याविषयी बऱ्याच शंका कुशंका निर्माण झाल्या. परंतु प्रायोगिक स्तरावर ही योजना परवानगी दिल्यानंतर, वरवर पाहता चमत्कारिक वाटली असली तरी या प्रकारामुळे सर्व पाझर तलाव पाण्याने भरले व दुष्काळप्रवण भागातील विहिरींना व त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा बराच फायदा झाला. सुमारे १७ ते १८ हजार शेतकरी या योजनेचा फायदा घेत आहेत. शासनाने या उपक्रमाची दखल घेऊन केवळ पावसाळ्यातच नव्हे तर इतर वेळीही कॅनॉलमधील पाण्याचा वापर करण्याची परवानगी आता दिली आहे. ही कल्पना अतर्क्य व अशक्य वाटत असताना विखे पाटील यांनी पूर्ण केली. ती पूर्ण करण्याची सिद्धि त्यांचेठायी आहे म्हणूनच.

शेतकऱ्याचा आर्थिक विकास केवळ शेतीनेच नव्हे तर कृषिसंलग्न धंद्यांची जोड दिल्याशिवाय होऊ शकणार नाही याची पूर्ण जाणीव ठेवून १९७० पासून विठ्ठलरावजींनी दुग्ध व्यवसायाच्या वाढीसाठी आपल्या परिसरात प्रयत्न सुरू केले. सुधारलेल्या जातीच्या वळूंचे गावठी गायींवर कृत्रिम रेतन करण्यात येऊन त्याद्वारे अधिक दूध उत्पादन देणाऱ्या गायींची निर्मिती करावयाची हा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी परिसरातील दुधाचे उत्पादन ४०० लिटर्स होते. ते आज भितीस ३००० लिटर्संवर गेले आहे व याच प्रमाणात वाढले तर पुढील पाच वर्षात ३० हजार लिटर्सपर्यंत जाईल. सध्या सहकारी योजनेअंतर्गत सरकारी दूध योजनेसाठी हे दूध विकत घेतले जाते. परंतु दुधाचे उत्पादन अधिक झाल्यास ते मुंबई किंवा इतर मोठ्या बाजार पेठेत पोहोचवावयाचे असल्यास त्यासाठी योग्य ती यंत्रणा उभारण्याची तयारी सुरू झाली आहे. श्रीरामपूर, नेवासा, कोपरगाव व राहुरी या चार तालुक्यासाठी २० हजार लिटर्स क्षमतेचा चिलिंग प्लॅन्ट बसविण्यात येत आहे.

●●●

# पदरची भाकरी सहकाराची निर्लेप चाकरी

**श्री तात्यासाहेब कोरे**
अध्यक्ष, वारणा सहकारी साखर कारखाना
**वारणानगर**

---

आज एका अमृत क्षणाचे स्मरण होत आहे...

जो साखरेचे खातो त्याला देव देतो अशी आपल्याकडे एक म्हण आहे. त्यातल्या गर्भित अर्थाप्रमाणे ज्याला देवानेच भगवंतानेच, परमेश्वराने साखरेचे माधुर्य चाखायला दिले अशा एका अमृत पुत्राच्या कार्याचा चित्तथरारक, मन हेलावणार अभिमानाने छाती भरुन आणविणारा आणि कृतज्ञतेने मान लवविणारा कर्तृत्व इतिहास, गेल्या पंचवीस वर्षाचा कालपट दूर सारून जिवंतपणे दृष्टीसमोर उभारताना दिसत आहे.

ह्या अमृतपुत्राचे नांव : माननीय विठ्ठलराव विखे-पाटील पद्मश्री विखे-पाटील, प्रवनगरचे प्रवर्तक, महाराष्ट्राचे मन्वन्तर घडविणारे प्रणेते, असे आमचे पितृतुल्य, साधुतुल्य सामान्य शेतकरी रूपांतील साखर पंढरीचे सात्त्विक विठोबा...

माझ्या जीवनात पद्मश्री विखे पाटलांना अढळ ध्रुवताऱ्याप्रमाणे मान आहे, स्थान आहे. त्यांच्या जीवनामुळे, साहचर्यामुळे माझ्या जीवनाचे व वारणा परिसराचे सोने झाले ! जणू काही परीस स्पर्शच झाला त्यांच्यामुळे... आज त्या अमृत क्षणाचे गदगदून स्मरण होत आहे...

१९५१ साल चोवीस पंचवीस वर्षं होऊन गेली त्या घटनेला ... माझ्या आयुष्यातील अत्यंत विकल वर्ष. माझ्या आयुष्यातील भेसूर व भयाण वर्ष. माझ्या उमेदींना सुकवून टाकणारा तो वखवखलेला काळ. माझ्या मतीला चक्रावून भांबावून टाकणारा असा तो भयाण काळ ! १९५१ साली गुळाच्या धंद्याला 'न भूतो न भविष्यती' अशी मंदीतली कमी किंमत आली नसती तर ? आणि

१९५१ साली शेतकरी सहकारी संघाचे तात्यासाहेब मोहिते जर माझ्या योजनेत हुरूपाने सामील झाले नसते तर... आणि

**१९५१ साली तात्यासाहेब मोहिते यांच्यासमवेत, प्रवरा येथे सुरू झालेला प्रवरा सहकारी साखर कारखाना जरी मी पाहिला नसता तर म्हणजेच पद्मश्री विखे पाटलांची भेट झालीच नसती तर ?**

तर... तर आणि जर... जर हे शब्द, जीवनातील अकल्पित आणि असंभाव्य वाटणाऱ्या घटना साकार होत असताना होणारी, मनाची दोलायमान स्थिती दाखवितात...

आणि ह्या आंदोलित मनःस्थितीत मनुष्य जो निर्णय घेत असतो त्यावर त्याच्या जीवनाची पुढील गती अवलंबून असते मदार आधारलेली असते यशापयश ठरणार असते...

या क्षणी, यावेळी, अगदी मोक्याच्या जागी मला पद्मश्री विखे पाटील भेटले...

१९५१ च्या कोल्हापूर बाजारात गूळ चक्क चूळ भरण्यासाठी पाणी झाला आणि तर हुकमास पैसा कमविणारे शेती उत्पन्न, पण शेतीचे भवितव्य ठरविणारे पाऊस, बी बियाण हेच केवळ आधार नसत नाहीत. आणखी एक सूत्रधार आधार असतो. तो म्हणजे बाजारभाव.

१९५१ च्या हंगामामध्ये गुळाचा दर अगदी खाली पडला. त्यावर्षी पहिल्या नंबरची गुळाची एक ढेप रुपाया सव्वा रुपयाला मिळू लागली. तीन नंबरची ढेप फिनतानासह ८ आण्यांना मिळू लागली. इतका भाव खाली आला की गूळ चुन्याच्या घाणीत मळण्यासाठी वापरला जाऊ लागला. कुठे गूळ खायची वस्तू आणि कुठे तोच गूळ इमारती चुन्यात मळायची वस्तू ! ऊसकरी शेतकऱ्याने ऊसशेतीसाठी जो खर्च केला असेल, जे कष्ट वेचले असतील त्याच्या १।८ मोबदलाही या वर्षी ऊसकरी शेतकऱ्याला मिळाला नाही. मग आता गुऱ्हाळाचा खर्च कुठला परवडणार ? गुऱ्हाळ करुन उपयोग नाही पीक तर उभे आणि त्याचा दुसरा काही उपयोग नाही आमच्या डोंगर मळ्याच्या शेतीत तर ह्यावर्षी असे काही सुरेख पीक आले होते की, विचारायची सोय नाही. एकरी १२ — १३ गाडी इतका गूळ तयार झाला असता ऊसाची पेरे पहिलवानाच्या मनगटा एवढी. उंची तर अबब, १४ ते फूट एवढी ! १५ — १६ एकर एवढा ऊस ! सर्व बागायत नाकबंदी झालेली ऊस गाळून गुऱ्हाळ लावयाचे म्हटले तीही बाजू नुकसानीची म्हणून बंद झालेली !

शेवटी दुःखी व कष्टी अंतःकरणाने आम्ही आमचा १६-१७ एकर ऊस अक्षरशः पेटवून दिला. मनाला किती वेदना झाल्या काय वर्णन करून उपयोग? हजारो इंगळ्या जणू डसल्या पण हतबलतेने केवळ पहात राहिलो. ऊसाचा फड पेटवून दिल्यावर त्या अग्निप्रलयातून जो ऊस पूर्णपणे जळला नव्हता ? तो काळा पडून तसाच उभा होता. असे ते भयाण विदीर्ण करणारे काळे वर्ष. पण आश्चर्य म्हणजे त्याच वर्षी साकरेला चांगला भाव होत ! म्हणजे गुळाची हलाकी व साकरेची नवलाई !

हे चित्र पाहून मी तर पुरा हादरूनच गेलो. अस्वस्थ झालो १९३८ पासून कोल्हापूरात आम्हा कोरे बंधूंचे अडत दुकान होते. त्याच सुमारास कोल्हापूरात 'शेतकरी सहकारी संघाची' स्थापना झाली. कोल्हापूरने देशाला तीन गोष्टी मनःपूर्वक दिल्या. गूळ, कुस्ती आणि सहकारी चळवळ ! तात्यासाहेब मोहिते या सहकारी चळवळीतील एक कर्तबगार व्यक्तित्व तात्यासाहेबांच्या शेतकरी सहकारी संघाचे गूळ अडत दुकानही शाहुपुरीत आमच्या दुकानाशेजारी होते. त्यामुळे परिचय तर झालाच परंतु तात्यासाहेब मोहिते माझे खूप अंतरंग मित्रही झालेले होते.

तात्यासाहेब मोहिते ही असामी, सहकारी चळवळीतील विलक्षण जबरदस्त ताकद होती. किंबहुना शेतकरी संघ म्हणजे तात्यासाहेब मोहिते व तात्यासाहेब मोहिते म्हणजे शेतकरी संघ असे समीकरण होते. ते प्रागतिक शेतकरी होते. माझ्याप्रमाणेच त्यांनी स्वतःच्या शेतीवर विविध प्रकारचे प्रयोग केलेले होते त्यामुळे ही आमची जवळीक अधिक !

गुळाच्या मंदीने १९५१ साली मला जो तडाखा दिला होता त्याची झळ तर इतर सर्व शेतकऱ्यांप्रमाणे मोहिते साहेबांना लागली होती. गूळ मंदीमुळे आमच्या वारणा परिसरातील शेतकऱ्यांचे होणारे अपरिमित नुकसान, तात्यासाहेब मोहित्यांच्या समोर मांडले नि मी म्हणालो, :

"तात्यासाहेब, गूळ बाजाराची हमी कोण घेणार ? किती वर्षे ह्या तेजीमंदीवर अवलंबून रहायचं ? गूळ आणि साखर एकाच ऊसाची संतती, सख्खी भावंड ! जो शेतकरी साखर कारखान्याला ऊस घालतो त्याच्या घरी लक्ष्मीचे पाऊल उमटते आणि जो गूळ करतो त्याला गोवऱ्या वेचाव्या लागतात. याशिवाय साखर कारखाने काही सर्वांचाच ऊस घ्यायला तयार नाहीत. आम्ही शेतकऱ्यांनी स्वतःचा कारखाना काढण्याचा प्रयत्न का करू नये ? एवढ्या सहकारी संस्था तुम्ही आम्ही करून दाखवितो, मग साखरेच्या बाबतीत काय आहे एवढं? तात्यासाहेब तुमच्यामागे शेतकरी संघासारखी बलाढ्य संस्था आहे. ह्या शेतकरी संघाने शेतकऱ्यांच्या आर्थिक भल्यासाठी दारिद्र्य नष्ट करण्यासाठी साखर कारखाना काढला पाहिजे. शेतकऱ्यांनी शेतकऱ्यासाठी काढलेला व शेतकऱ्यांचा असा सहकारी साखर कारखाना काढलाच पाहिजे. बघा, खऱ्या अर्थानं शेतकऱ्याचं कोट कल्याण होईल. मी असे ऐकतो की, शेतकऱ्यांच्या मालकीचा असा एक सहकारी कारखाना विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर जवळ लोणी येथे प्रवरा नदीवर निघाला आहे. तो आपण पाहू या."

तात्यासाहेब मोहिते यांचे डोके विलक्षण बोलके होते. त्यांच्या मध्ये त्यावेळी एक धारदार चमक मला दिसली. ते म्हणाले, :

"कोरे आण्णा, चला तसं करू या तरी खर. पहिल्यादा आपण विखे पाटलांना पत्र तरी पाठवू या." तात्यासाहेब मोहिते म्हणजे पत्रव्यवहार आणि झटपट कार्यवाहीचा आदर्श जणू !

त्यांनी तात्काळ आपल्या कारकुनाला बोलावले व पत्राचा मसुदा सांगितला. पत्र रवाना झाले.

सुमारे आठ दिवसांनी लगेच प्रवरा सहकारी साखर कारखान्याची घटना, नियमाची प्रत, सर्वसामान्य माहिती विखे पाटलांनी अत्यंत आस्थेने पाठविली. पद्मश्रींनी लिहिलेल्या पत्राचा आशय साधारणपणे असा होता.

आपले पत्र पाहिले. मनाला समाधान वाटले. कोल्हापूर जिल्ह्यातील गुळाच्या अत्यंत मंदीच्या अवस्थेमध्ये ऊसकरी शेतकऱ्याला दिलासा व धीर देण्याच्या दृष्टीने आपण साखर कारखाना उभारण्याचा जो विचार करता आहात तो अत्यंत युक्त, प्रशंसनीय व स्तुत्य असाच आहे. आपण या सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीचे काम लवकर हाती घ्यावे असे मी नम्रपणे याप्रसंगी आपणास सुचवितो. आपल्या या कार्यामध्ये मला ज्या ज्या प्रकारची मदत व सहकार्य करणे शक्य होईल ते ते करण्यास मला समाधानच लाभेल. आमचा कारखाना पहाण्यास येण्यासंबधी लिहिले आहे. त्याचे मी हार्दिक स्वागत करतो. आपण केव्हाही आमच्या कारखान्याला भेट द्यावी. आपल्या स्वागतासाठी सहकार्यासाठी सदैव उत्सुक आहे. नवीन सहकारी साखर कारखाना उभारणीचे हे आपले कार्य यशस्वी होवो अशीच याप्रसंगी ईश्वरचरणी माझी शुभेच्छा."

विखे पाटलांचे हे पत्र म्हणजे जणु काही वरदहस्तच वाटला आम्हाला. आमच्या साध्या चौकशीला विखे पाटलांनी जेवढ्या आस्थेनें उत्तर दिलं, त्यामुळे आमच्या मनांत आत्मविश्वासाची गंगोत्री अशी स्फुरली की, तिच्या स्वादाचे वर्णन करणे शक्य नाही ! जाणणारे कार्यकर्ते शुभकार्याला एखाद्या पूज्य व्यक्तीचा आशिर्वाद लाभला की असे खूश होतात, तसाच हा आमचा आनंद होता. जणू काही देवाचा उजवा कौल !

सहकारी चळवळीमध्ये, अशिक्षित कार्यकर्त्यांनी अनेक कार्यकर्त्यांना निरलस, निर्लेप व निर्लोभी मनाने सहाय्य केल्याचें अनेक दाखले आहेत. माझ्या अनुभवातील प्रत्यक्ष घडलेली गोष्ट म्हणजे पद्मश्री विखे पाटलांनी आम्हाला मनःपूर्वक दिलेला आशिर्वाद व पाठिंबा! मागे पुढे न पाहता, न संकोच करता, उदार अंतःकरणाने !

पत्र हाती येताच तात्यासाहेब मोहिते यांच्याशी सल्ला मसलत करून वारणा **परिसरातील कार्यकर्त्यांची बैठक आम्ही मौजे तळसंदे येथे अंबाईच्या देवालयात योजली. त्या मिटींगला प्रमुख कार्यकर्ते हजर राहिले होते. आम्ही असे ठरविले की, काही निवडक मंडळींनी प्रवरा सहकारी साखर कारखाना त्यांचे कार्य पाहून सगळी माहिती घेऊन यावे व पुढील भाग भांडवल जमविण्याच्या कार्यास शुभारंभ करावा.**

त्याच वर्षी १९५१ सालच्या साधारणपणे मे महिन्यामध्ये तात्यासाहेब मोहिते शेतकरी सहकारी संघाचे एक संचालक नानासाहेब इंगळे, माझे मित्र गणेश बापूजी जोशी पांडूरंग रावजी जगताप व मी स्वतः शेतकरी सहकारी संघाच्या गाडीतून प्रवरा सहकारी साखर कारखान्यांचे प्रत्यक्ष अवलोकन करण्यासाठी गेलो.

डोक्याला साधा रूमाल, अंगात बंडीसारखा साधा शर्ट अशा अत्यंत साध्या वेषातील पद्मश्री विखे पाटलाचो शेतकऱ्यांची मूर्ती पाहिल्यानंतर आम्हाला सर्वांना आश्चर्य वाटलें आणि अत्यंत आनंदही वाटला फारसे न शिकलेला आणि इतक्या साध्या रहाणीचा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भात विचार करू शकतो त्या संदर्भात काही शास्त्रीय माहिती सांगू शकतो हें सगळे ऐकून आणि पाहून आम्ही थक्कच झालो. **त्यांचा प्रत्येक शब्द व्यावहारिक ऐरणीवर ठोकून ठणठणीत ठरलेला जणू किळा होता.** माझ्या मनावर तें शब्द आपला दणकटपणा उठवून आहें. त्यांच्या व्यक्तिमत्वानें भारावून गेलो. यानंतर थोड्याच वेळात ते सहकारी साखर कारखाना दाखविण्यासाठी आम्हा सर्वांस बरोबर घेऊन गेलें.

प्रवरा सहकारी साखर कारकाना १९५० च्या डिसेंबर महिन्यामध्ये उभारण्यात आला. प्रारंभी हा एक ५०० टन गळीत शक्तीचा लहान कारखाना होता. परंतू तो भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना होय. भारतातील लहान लहान शेतकऱ्यांचे भाग्य उजळविणारा सहकारी क्षेत्रातील हा पहिला साखर उद्योग पाहात असताना माझ्या मनात सुखद मंथन सुरू झाले, आजही त्यांचे स्मरण होत आहे. एका साध्या शेतकऱ्याच्या ठिकाणी निर्माण झालेले द्रष्टेपण पाहिल्यानंतर मला अचंबा आणि आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही. ती कल्पना पाहून माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याच्या भावना एकसारख्या उचंबळून येऊ लागल्या आणि हृदय हेलावले जाऊ लागलें.

यानंतर पद्मश्री विखे पाटील यांनी प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या निर्मितीची कथा आम्हाला सांगावयास प्रारंभ केला. ती कथा ध्येयवादाने ओतप्रोत भरलेली होती. ती कथा अंगावर शहारे आणणारी एक रोमहर्षक हकीगत होती. त्याच्या त्या कथेचा उल्लेख मी या ठिकाणी करणे अत्यंत योग्यच होईल ! कारण ती कथा स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक समृद्धीसाठी जीवापाड प्रामाणिकपणे केलेल्या प्रयत्नांची चिरंजीव गाथा आहे. नगर जिल्ह्यामध्ये एक सहकारी साखर कारखाना काढण्यासंबंधीची कल्पना सुरूवातीलाच विखे पाटील यांनी कै. **सन्माननीय वैकुंठभाई मेहता व कै. डॉ. धनंजयराव तथा नानासाहेब गाडगीळ यांना बोलून दाखवि ली. वैकुंठभाई हे थोर गांधी वादी अर्थशास्त्रज्ञ होते. व त्यांची सहकारी चळवळीला हार्दिक प्रेरणा लाभली होती. डॉ. गाडगीळ यांचे नांव ग्रामीण अर्थशास्त्राचे शिल्पकार म्हणून अजरामर आहे.** या त्यांच्या विचारास उभयतांनी आपला पाठिंबा दिला. किंबहुना त्या उभयतानाही असा प्रयत्न व्हावा असे वाटत होतेच. वैकुंठभाई हे त्यावेळेला मुंबई राज्याचें सहकार मंत्री होतें आणि डॉ. गाडगीळ हे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष होते.

या नवोदित सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्षपद स्वीकारावे म्हणून पद्मश्री विखे पाटील यांनी नानासाहेब गाडगीळांचा अगदी पक्का आग्रह धरला अखेर त्यांच्या ह्या पराकोटीच्या आग्रहाला विनंतीला मान देऊन त्यांनी अध्यक्षा नात्याने कारखान्याची जबाबदारी स्वीकारण्यास मान्यता

दिली. कारखान्यासाठी आवश्यक ते शेअर भांडवल शेतकऱ्यां कडून जमविण्याचा प्रारंभ वैकुंठभाई मेहता यांच्या शुभहस्ते करण्यात आला. त्या भागातील लहान लहान शेतकऱ्यांनी काही भाग भांडवल जमा करायचे आणि त्याच्यामध्ये राज्य-सरकारने आपले भाग भांडवल गुंतवायचे अशी योजना प्रारंभी तयार झाली. अखेर गरीब शेतकऱ्यांनी आपले भांडवल जमा केले. कारखान्याच्या मशिनरीची ऑर्डर देण्यापूर्वी आवश्यक ते भाग भांडवल जमा करण्याची अट होती. त्याशिवाय कारखाना मशिनरीची ऑर्डर देता येणे शक्य नव्हतें. स्वत: पद्मश्री व त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत परिश्रमाने व चिकाटीच्या प्रयत्नात आपल्या वाट्याला येणारे भाग भांडवल अत्यंत कष्टाने जमा केले आणि शासनाकडचे भाग भांडवल मिळावे अशी मागणी विनंती अर्जाद्वारे केली. भाग भांडवल प्रत्यक्षात जमा होण्यासाठी विखे पाटील यांनी अनेक ठिकाणी उंबरे झिजवले होते. भगिरथाप्रमाणे मोठे प्रयत्न केले होते. सरकारकडे वारंवार खेटे घातले पण सरकारकडील भाग भांडवल लवकर उपलब्ध होऊ शकत नव्हते. त्यामुळे यंत्र-सामुग्रीची ऑर्डर लवकर देता येत नव्हती. भाग भांडवलाच्या संदर्भात मुंबईला खूप वेळा हेलपाटे घालूनसुद्धा प्रत्यक्ष शासनाकडून ज्यावेळेला हे भांडवल मिळण्याचे काहीही दिसेना तेव्हा त्या भागातील जनता त्यांचे कार्यकर्ते व विखे पाटील आणि सहकारी संचालक निराश झाले.

शेवटी या संदर्भात अखेरचा विचार तीव्रतेने करण्यासाठी सहकारी संचालकांची एक सभा घेण्यात आली ! गरीब शेतकऱ्यांचा पैसा अत्यंत अडचणी सोडून जमा होऊन पडलेला इकडे सरकारचे भाग भांडवल लवकर येण्याची चिन्हे दिसेनात. अशा प्रसंगी काय धोरण ठरवायचे ? यासंबंधीची ती संचालक मंडळाची मिटींग होती. या सभेत खूप गरमागरम चर्चा झाली आणि पद्मश्रींनी यासंबंधाने धोरण ठरवावे असा निर्णय सभेने दिला. पद्मश्रींनी वैकुंठभाई मेहताना भेटून शेवटचा निर्णायक प्रयत्न करावा आणि रिपोर्ट मंडळास सादर करावा असे ठरविण्यात आले. पद्मश्री या निर्णयास अनुसरून वैकुंठभाई मेहता यांना भेटण्यासाठी सचिवालयात गेले.

पण हा साध्या वेषधारी शेतकरी, पागोट बांधलेला, उपरणे घेतलेला मंत्रीमहोदयांच्या शिपायाला विखे पाटलांची थोरवी अजून कळली नव्हती. त्याने प्रतिकार केला. आत जाऊच देईना. त्या शिपायाला विखे पाटलांनी खूप समजावून सांगितले पण तो काही आत सोडेना ! त्या शिपायाला त्यांनी भेटीच्या संबंधात चिठ्ठी दिली पण तो चिठ्ठीही देईना व आतही जाऊ द्यायला तयार होईना. यावर पद्मश्रींच्या डोक्यात एक कल्पना सुचली आणि त्यांनी शिपायाला आरडाओरड करून दणकावले, " आता तू जर का मला आत सोडले नाहीस तर भेटीसाठी तू शंभर रुपये मागतोस असे मोठ्याने ओरडेन, तेव्हा ही चिठ्ठीतरी आत दे किंवा मला आत सोड !" हा त्याचा आवाज व नवा पवित्रा पाहून शिपायाने ओळखले की, हा शेतकरी म्हणजे काही वेगळंच काम आहे. त्याने ती चिठ्ठी गुपचूप आत नेऊन दिली. चिठ्ठी पाहिल्याबरोबर वैकुंठभाई मेहतानी पद्मश्रींना भेटण्यासाठी आत बोलाविले.

'मंत्री महोदयाना भेटल्याबरोबर पद्मश्री विखे पाटलांना आपलं कसं काय चाललय, काय कामगिरी घेऊन आलेला आहात म्हणून प्रश्न विचारला. त्यानी अत्यंत मार्मिकपणाने परंतु अत्यंत महत्वपूर्ण असे प्रसंगोचित उत्तर दिलें. पद्मश्री म्हणाले. " मेहतासाहेब, आपल्या शुभहस्ते आम्ही आमच्या सहकारी साखर कारखान्याचे भाग भांडवल जमा करायला सुरूवात केली. संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. त्या गरीब शेतकऱ्यानी अत्यंत त्रासातून, हालअपेष्टातून आपले शेअर भांडवल जमा केले आहे. शेतकऱ्यानी भांडवलाचा पूर्ण वाटा उचलला आहे परंतु सरकारकडून येणारे भाग भांडवल मात्र आम्हाला आतापर्यंत खूप प्रयत्न करूनही मिळू शकले नाही. माझ्या सर्व सहकाऱ्याचा विचार घेऊन आपल्याला आता अखेरची नवी विनंती करण्यासाठी आलेलो आहे. आपण पुन्हा एकवार आमच्या संस्थेला भेट द्यावी अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे. फक्त त्या भेटीची तारीख व वेळ ठरवून मला आता द्यावी म्हणजे परिसरातल्या शेतकऱ्याना निमंत्रण करणे सोयीचे होईल." हे ऐकून वैकुंठभाई मेहता चक्रावले, ते म्हणालें, " आता भेट कोणत्या कामासाठी हवी आहे ?" तेव्हा पद्मश्री चटकन म्हणालें, " आता दुसरे काहीच कारण उरलें नाही; उलट आता आपली फारच गरज आहे आपल्या शुभहस्ते शेअर भांडवल जमा करण्याचा आम्ही शुभारंभ केला होता. भांडवलही जमले पण शासनाच्या काही अडचणी असतील म्हणून शासनाला यंत्र खरेदीसाठी आम्हाला आपला हिस्सा देता येत नाही. त्यामुळे कारखाना काही सुरू होत नाही. यापुढे काही प्रगती करता येत नाही असे स्पष्ट-दिसतंय. तेंव्हा आपल्याच शुभहस्ते जमा झालेले शेअर भांडवल शेतकऱ्याना परत करण्यासाठी आपल्याला निमंत्रण देत आहे.तेवढयासाठी मी आपल्याला निमंत्रण द्यायला आलो आहे.' हे त्यांचे विशादयुक्त बोल ऐकून वैकुंठभाईना अत्यंत दु:ख झालें. तेही कुशाग्र बुद्धीमान लोकनेते होते. समजायचे ते समजले आणि त्यानी सागितले की, " ठीक आहे, मी एवढेच

आश्वासन देतो की, लवकरात लवकर कबूल केल्याप्रमाणे शासनाकडील शेअर भांडवल तुमच्या कारखान्याला देण्याचे मी वचन देतो, पुढील कामाला आता तुम्ही लागा.”

पद्मश्रींनी अशा प्रकारे विविध प्रसंगी सांगितले. त्यांची काम करण्याची पद्धत त्यांची सहकारी चळवळीबाबतची आत्मियता, त्यांचा निर्धार, त्यांची कार्यकुशलता समयोचित बोलण्याची पद्धत ह्या सर्व गुणांचा माझ्यासारख्या सहकारी कार्यकर्त्यांच्या मनावर अत्यंत मार्मिक परिणाम झाला. वारणा परिसरात कारखाना उभारताना मला त्यांच्या अनुभवाचा खूप लाभ झाला. हे मी नम्रतेने नमूद केलें पाहिजे. मला तर तें नेहमीच उद्‌बोधक आणि मार्गदर्शक ठरले आहे.

**डॉ. धनंजयराव गाडगीळांसारख्या एका व्यावहारिक अर्थशास्त्रज्ञाकडे पद्‌मश्रींनी प्रवरा सहकारी साखर कारखान्याचें नेतृत्व हें सुद्धा अत्यंत ज्ञानी पात्र आणि कामाची जबाबदारी जाणू शकणाऱ्या अशा नेतृत्वाकडे देण्याची त्यांचा सामर्थ्यशाली दृष्टीकोन हा सुध्दा मला अत्यंत मार्गदर्शक असाच वाटला** कोणत्या कार्यासाठी कोणाला घेतले पाहिजे याबाबतची त्यांची योजकता धंद्याच्या यशाची गुरुकिल्ली होती. याकामी जो द्रष्टेपणा आहे यामुळे वरून साध्या दिसणाऱ्या ह्या लोकोत्तर माणसाच्या अंगातील उत्तुंग व्यक्तीमत्व सिद्ध होत नाही काय ? कारखाना चांगल्या पद्धतीने चालवावा त्याला मार्गदर्शन लाभावे आणि कुशल नेतृत्वाची शक्ती व परंपरा आपणास लाभावी हा अत्यंत कर्तृत्वशाली समर्थ व्यवस्थापनाचा विचार साध्या सुध्या शेतकऱ्यामध्ये किती रूजलेला आहे हे पाहून मी भारावून गेलो, दिपून गेलो.

१९५६ साली वारणा सहकारी साखर कारखाना उभा होत असताना आमच्या कारखान्याचें अध्यक्षपद नानासाहेब गाडगीळ किंवा वैकुंठभाई मेहता यापैकी कोणीतरी स्वीकारावे या दृष्टीने आम्हीही त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या सहाय्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यापैकी वैकुंठभाई मेहतांनी सांगितले, मी ग्रामोद्योगाचे नेतृत्व करीत आहे म्हणून कारखान्याचे नेतृत्व मला स्वीकारता येत नाही तर नानासाहेबानी सांगितलें की, मला कामाच्या व्यापामुळे वेळ मिळणार नाही. तात्पर्य हे की पद्‌मश्रींच्या पावलावर पाऊल टाकून मीही अनेकदा वाटचाल करण्याचा प्रयत्न केला आहे.

पद्‌मश्रींचा कारखाना प्रथम ५०० टन गाळप शक्तीचा होता. कालानुक्रमे त्या शक्तीत वाढ करत आता तो २५०० टन गाळप शक्तीचा झाला आहें. आज त्यांचे कर्तबगार चिरंजीव बाळासाहेब हे अध्यक्ष आहेत, त्यांची महत्वाकांक्षा ५००० टन गाळप शक्ती करण्याची आहे.

या कारखान्याच्या कार्यक्षमतेमुळे त्या भागात ऊसाचे क्षेत्र भर आहे. **आश्चर्याची गोष्ट अशी की या कारखान्याचें ८० टक्कें ऊसाचे क्षेत्र विहीरीवर आहे. आणि कालव्यावरचें अवघे २० टक्कें आहे. नगर जिल्हा दुष्काळी असल्यामुळे पाणी फारसे नाही. कारखाना निर्माण केला तेव्हा पाण्याची सुबत्ता व्हावी म्हणून पाण्याच्या योजना त्यांनी अनेक ठिकाणी अंमलात आणल्या. प्रवरा कारखान्याने आजवर ४५ पाझर तलाव पूर्ण केले आहेत ही नक्कीच भूषणावह बाब आहे.** पाझर तलावामुळे विहिरींना भरपूर पाणी उपलब्ध झाले. केवळ कारखाना काढून ते थांबलें नाहीत तर कारखान्याच्या वाढीबरोबर शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी विविध सोयी अंमलात आणण्यासाठी अविश्रांत श्रम घेऊन त्यांनी क्रांतीकारी बदल घडवून आणला आहे. पद्मश्रींनी केवळ शेतीचा विकास आणि कारखानदारीचा विकास केला एवढेच नाहीतर त्या भागातील शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाचे पर्व सुरू केले आहे.

पद्मश्री यांची रहाणी साधी आहें. साधा शब्दही त्यांचा साधेपणा साधू शकत नाही. त्यांच्या जीवनामध्ये त्यांनी काही 'निग्रही पथ्यें' स्वीकारली आहेत. ती पाहिल्यानंतर तर अचंबाच वाटतो ! एवढे मोठे समाजसेवेचे काम केले एवढा मोठा उद्योग प्रस्थापित केला, त्या कामासाठी अनेकवेळा मोठमोठ्या शहरामध्ये, निरनिराळ्या ठिकाणी त्यानः प्रवास करावा लागतो, परंतु त्यांचे एक पथ्य असे आहे. तें बाहेरचे अन्न 'परान्न' घेत नाहीत. ते अत्यंत निग्रही पथ्य आहे ते ज्या ज्या ठिकाणी प्रवासाला जातात त्यावेळी त्यांच्याबरोबर दशमी असतें. ज्या ठिकाणी दोन चार दिवस मुक्काम करण्याचा प्रसंग येणार असतो त्यावेळी ते भाकरीचे पीठ बरोबर घेऊन जातात.

बाहेरगावी ते स्वतः स्वतःची भाकरी बनवून खातात ! हे यांचे पथ्य कडक आणि तीव्र आहे. स्वतःच्या कन्येच्या घरीसुद्धा ते स्वतःची दशमी बरोबर घेऊन जातात. आता बोला ह्या निग्रहाला काय म्हणावे ? पण आहे ते असे आहे. त्यांच्या या साधेपणाची छाप त्यांच्या कारखान्यावर पडलेली आहे अर्थात नव्या पिढीच्या नेतृत्वाबरोबर कालानुसार थोडंदळ परिवर्तने घडू लागली आहेत.

एथ चातुर्य शाहणे झाले।
प्रेम रुचीस आलें।
आणि सौभाग्य पोखलें।
सुखाच एथ । १ : ६४

-- जय सहकार

# पद्मश्री विखे पाटील यांचे नेतृत्वगुण

डॉ. वा. चु. श्री श्रीमाळ
महाराष्ट्र राज्य सहकारी बॅन्क,
मुम्बई

कपड्यात ठेवलं वा कपाटात ठेवलं तरी चंदनाचा सुगंध लपत नाही. पेटीत ठेवलं वा पुस्तकांच्या आड ठेवलं तरी अत्तर आपला सुगंध लपवू शकत नाही. अंगभूत मोठेपणाचा सुगंध लेवून आलेल्या माणसाबाबतही असंच म्हणता येईल. ती कुठेही गेली, कुठेही बसली, कुठेही वावरली तरी त्याचा सुगंध कधी लपत नाही. कर्मवीर म्हणून एकाच शब्दात ज्यांचं वर्णन करता येईल अशा श्री. विठ्ठलराव विखे पाटलांबाबतही असेच म्हणता येऊ शकेल. त्यांच्या सहवासात आलेली माणसे माझ्या ह्या विधानाशी सहमत होतील असा मला विश्वास वाटतो.

श्री. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सहवासातील काही मधुर स्मृतींचे मी जेव्हा जेव्हा स्मरण करतो तेव्हा मन सुगंधीत होऊन जाते. चंदनापरी झिजलेल्या व्यक्तींच्या सहवासात 'सुगंधा' चा धुंद करणारा अनुभव न आला तरच नवल. विठ्ठलरावांनी स्वतःचं चंदन झिजवलं आणि मराठी मातीला गंधवती केलं. मराठी मातीतून ऊस पिकवला नाही तर सोनं पिकवलं. इथे ऊस पिकवला नाही तर मराठी अस्मिता पिकली. इथे आत्मविश्वासाची ताटे उभी राहिली. इथे विश्वास, निष्ठा, ऐक्य सहजीवन आणि त्यागाची झाडे बहरली. आज येथे, अश्रु, उसासे, कज्जे-खटले, जप्ती, लिलाव आणि घरादारावरील नांगराऐवजी अस्मिता, आत्मविश्वासाचे नांगर फिरताना दिसतात. नेपोलियनच्या शब्दकोशांत 'अशक्य' असा शब्द नव्हता तसाच श्री. विठ्ठलरावांच्या शब्दकोशांतही 'अशक्य' असा शब्द नाही आणि त्यांच्या भोवती वावरणाऱ्या, 'कष्ट, हाल हे अमुचे भाई' असं मानणाऱ्या तथाकथित सामान्य मानल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या शब्द कोशातही अशक्य हा शब्द नाही. ते हात लावतील त्याचं सोनं होतं. परंतु हा परिस त्यांच्या हाती देणारा द्रष्टा कर्मवीर म्हणून श्री. विठ्ठलराव विखे पाटलांचंच नांव घ्यावं लागेल.

१९५२ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत (१–१०—१९५२) मी बॅन्केत आलो आणि अवघ्या सहा महिन्यातच माझी श्रीरामपूरला बदली झाली. सिनियर ऑफिसर अंडर ट्रेनिंग म्हणून ! बॅन्केत नवीन होतो आणि ज्या भागांत झाली होती तो भागही मला नवीन होता. काहीसा गांगरलो होतो. ज्या ठिकाणी मी जात होतो तो भाग अतिशय सुपीक म्हणून प्रसिद्ध होता. श्रीरामपूर, कोपरगांव, राहूरी हे तसे सुपीक तालुके म्हणून विख्यात होते. १९४८ सालीच तिथला पहिला साखर कारखाना तसा सुरु झालेला होता. तीस टक्क्याहून अधिक भाग तेथे खर्च झालेला होता. व्यवस्थापक, डिव्हीजनल ऑफिसर श्रीरामपूर ही मंडळी तेथे भेटीसाठी येत असत. पाहुणीसाठी येत असत. श्रीरामपूर ही एक प्रयोग शाळा मानली जात असे. सहकारी क्षेत्रातील नवीन प्रयोग आधी तेथे केले जात असत. तिथलं 'नॉन ऑफिशियल केडर' बलवान होतं. नेकीचे कार्यकर्ते लाभले होते. त्यांच्याजवळ अव्यभिचारी निष्ठा होत्या. कणखर, बंडखोर नेतृत्व त्यांना लाभलं होतं.

श्रीरामपूरला पोहोचण्यापूर्वीच हे सारं माझ्या कानी आलं होतं तिथे पोहोचलो. श्री. कल्याणपूरकर तेथे होते. त्यांच्याबरोबर प्रवरानगरला गेलो. प्रवरानगरला साखर कारखाना निघाला असला तरी त्यावेळचं तेथलं वातावरण मोठं मजेशीर होतं. **गोडाऊन, बैठं ऑफिस, गुरुकुल पद्धतीच्या तट्ट्याच्या झोपड्या, इंजिनियरांची खोली हेच कार्यकारी संचालकांचे कार्यालय होते. अशाच एका झोपडीवजा घरात श्री. विखे पाटलांना मी पाहिलं. सकाळी साडेआठ वाजतांच ते तेथे येत असत.**

मी गेलो त्यांचा माझा परिचय करुन देण्यात आला. रंगाने काळा, इनमीन पांच फूट ऊंचीचा, मातीच्या रंगाशी स्पर्धा करु शकेल अशा रंगाचे धोतर नेसलेला. अंगात शर्ट व त्यावर साधारणतः पांढऱ्याच रंगाचा कोट घातलेला, डोक्यावर पांढऱ्याच रंगाचा पण ज्याचं पुढलं मागलं टोक ओळखू येणार नाही असा पटका बांधलेला असं म्हणण्यापेक्षा गुंडाळलेला, अंगाने काही स्थूल असलेला असा हा माणूस समोर उभा

ठाकला. त्यांच्याबद्दल मी आधीच खूपसं ऐकलं होतं. पहिल्याच भेटीत ते मला म्हणाले, "डॉक्टर तुम्ही आला आहात. तुम्हा आम्हालाच काम करायचे आहे, बँक हा तर ह्या उपक्रमाची जननी आहे याची बांधिलकी आम्ही स्वीकारली आहे. येथली माणसे ओळखा. त्यांचे नेतृत्व तुमच्या बँकेने करावयाचे आहे. सर्व प्रकारचं सहाय्य मी देईनच."

कै. गाडगीळांनी ह्या प्रकल्पाचं नेतृत्व पत्करलेलं होतं. त्यांच्याबद्दल त्यांच्या व माझ्या मनात अतीव आदर वसत असलेला. ते तर माझे गुरु होते तेही त्यांना गुरुस्थानी मानत होतेच. पण त्या माणसाला पहून त्याची किमया पाहून माझ्या मनासमोर मात्र एक कोडं उभं राहीलं. ते कोडं मनात वागवीत मी कामाला सुरुवात केली. परिचय वाढू लागला मनुष्य ठेंगणा-ठुसका असला तरी उत्तुंग विचारांचा आहे ही गोष्ट माझ्या ध्यानी आली. या माणसाचं व्यक्तित्व नितळ व विचार स्वच्छ असल्याचं मला जाणवलं. मन निर्मळ असल्याची ग्वाही मिळाली. निष्ठा पतिव्रतेहून मोठी असल्याची खात्री पटली. त्या निष्ठेच्या पाठीशी जनतेची निष्ठा उभी असल्याचा प्रत्यय आला व ही निष्ठा त्यागाच्या भक्कम पायावर उभी असल्याचाही मला प्रत्यय आला. कणखर व निर्भीड मन त्याला लाभलं आहे याची जाणीव झाली. दीड दोन वर्षाचा सहवास मला लाभला, त्या अवधीत आलेले अनुभव गोड आहेत. प्रेरक प्रोत्साहक आहेत हे ग्रंथित करण्याची संधी मला मिळते आहे म्हणून मी स्वतःला धन्य समजतो.

"प्रवरा" चा सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना. त्यापूर्वी त्या भागातील शेतकऱ्यांची एक परिषद बोलावण्यात आली होती. १९४८ ची ही गोष्ट. आज सहकारी साखर कारखाना ही कठीण गोष्ट राहिलेली नाही परंतु त्याकाळी १ लाख रुपये उभे करण्यासाठी सुद्धा काही वर्षे जावी लागली ५०० टन गाळपक्षमतेची मशिनरी आली परंतु ती सोडवून घेण्यासाठी सुद्धा पैसा नव्हता. पण शेवटी पैशाची व्यवस्था त्यांनी केली. अखेर कारखाना तर निघालाच. परंतु तो काळ जणु अनेक प्रकारांनी कसोटीच पाहणारा होता. मुळात साखर कारखान्याची कल्पना हास्यास्पद ठरविली गेली. टिंगल टवाळीही झाली विरोधही झाला. त्यातच आणखीही एक समस्या उभी राहिली. गुळाला तेजी आली साहजिकच लोकांना ती पर्वणी वाटली. परंतु त्या कारखान्याच्या परिसरातच ऊसकऱ्यांनी आपला निर्धार सोडला नाही. त्यागपूर्वक, निष्ठापूर्वक ते या सहकारी प्रकल्पाच्या पाठिशी उभे राहिले. हा विश्वास श्री. विठ्ठलरावांनी निर्माण केला होता. त्या कारखान्याशी संबंधित शेतकऱ्यांचा न्याय व निष्ठांनाही न्याय मिळावा या भावनेने काही क्रांतिकारक स्वरूपाचे सिद्धांत स्वीकारले गेले. त्याला पहिला सिद्धांत असा होता की, **दर ठरवितांना शर्करांशाचे प्रमाण विचारात न घेता सर्व ऊसाला समान दर सरासरी दर देण्याबाबतचा होता.** सहकाराचे ते महत्वाचे सूत्र म्हणता येईल. चांगल्यातला चांगला (म्हणजेच जादा शर्करांश असलेला) ऊस देणाऱ्याने कमी शर्करांशाचा ऊस देणाऱ्यासाठी पर्यायाने त्याग केलेला असतो तर त्याच्या त्यागामुळे सामान्य शेतकऱ्यांना आपल्या ऊसाची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील होण्याची प्रेरणा मिळू शकते. आजही सहकारी साखर कारखानदारीत हाच सिद्धांत मानला जातो. पाळला जातो पंचवीस वर्षानंतरही त्यात बदल झाला नाही, करण्याची गरजही भासली नाही, इतका मुलगामी, क्रांतीकारक अशा स्वरूपाचा हा सिद्धांत मांडला गेला.

दुसरा सिद्धांत कार्यकारी मंडळावरील प्रतिनिधीत्वाबाबतचा होता. **पांच एकराहून कमी जमीन धारण करणाऱ्या सुद्धा संचालक मंडळावर स्वतंत्र प्रतिनिधीत्व दिले व तशा प्रकारची तरतूद पोटनियमांत करण्यात आली.**

तिसरा सिद्धांत असा होता की ठराविक एकरातला ऊस कारखान्यासाठी खरेदी करावयाचा. **लहान व कमकुवत घटकांकडून प्राधान्ये ऊस खरेदी करावयाची. घटकांची एकूण स्थिती सुधारली पाहिजे अशी भूमिका त्यामागे होती.**

प्रवरा नगरचा कारखाना यशस्वी करून दाखविणे भाग होते. ते फार मोठे काळाचे आव्हान होते. त्याचे कारण १९३३-३४ साली बारामती तालुक्यात सहकारी साखर कारखाना काढण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु तो फसला. परंतु प्रवरानगरचा प्रयत्न अयशस्वी झाला असता तर महाराष्ट्रात कोठेही सहकारी साखर कारखाने काढण्याची कल्पना निघाली नसती तसा प्रयत्न झाला नसता. परंतु विठ्ठलराव जनतेसाठी उभे राहिले. पडेल तो त्याग आणि होईल ती शिक्षा भोगावयाची त्यांची तयारी होती. त्यांनी हे केले म्हणून प्रवरांचा कारखाना उभा राहिला. तो उत्तम चालला म्हणूनच मग अन्य कारखान्याबाबत प्रकल्प उभे राहिले. नवी अस्मिता जागृत झाली. आत्मविश्वास निर्माण झाला. सुप्त पराक्रम

पेटला. सहकारी तत्त्वावरला विश्वास दुणावला. सामान्य माणसाच्या सामुदायिक प्रयत्नातून महान प्रकल्प यशस्वी करून दाखविता येतात ह्याची खात्री पटली. 'प्रवरा' कारखान्याच्या यशाने महाराष्ट्रात झालेल्या ह्या अस्मिता जागरणालाच मी अधिक महत्व देतो. 'ग्रामीण महाराष्ट्राच्या कायापालटा ' ची प्रवरा कारखान्याने जणु नांदी म्हटली. त्या नांदीचे सूत्रधार आहेत विठ्ठलराव विखे पाटील.

"प्रवरा" च्या उद्घाटनाचा खर्च शेकड्यापेक्षा जास्त नव्हता. एक साधे जेवण दिले. कुणाही मंत्र्याला बोलावले नव्हते, मंत्र्यांसंबंधी त्यांच्या मनात आकस होता वा आहे म्हणून बोलावले नाही अशातला भाग नाही. तर त्यांचे म्हणणे असे होते की, ही जनतेची सहकारी साखर कारखानदारी आहे. मंत्री हे जनतेचे प्रतिनिधी आहेत. त्यांनी ही कारखानदारी पहायला आपणाहून यायला हवे. तसे ते आले तर त्यांचे जरुर स्वागत केले जाईल.

'प्रवरा' कारखाना यशस्वी झाला. चांगला चालू लागला, तेव्हा दुसऱ्या सहकारी साखर कारखान्याबाबतचा विचार सुरू झाला त्या कारखान्याबाबत कै. नानासाहेब गाडगीळ वामनराव वर्दे, वगैरे मंडळींनी सरकारकडे आग्रह धरला की सहकारी साखर कारखान्याला परवानगी मिळाली पाहिजे. सरकारी अधिकारी म्हणाले "तुम्ही तीन लाख रुपये जमा करू शकलात तर सहकारी क्षेत्रात साखरकारखाना पेलण्याची धमक आहे, हे सिद्ध होईल" "सहकारी कार्यकर्त्यांची सभा झाली. मी व विभागीय अधिकारी तेथे होतो. १५ महिन्यात ३ लाख रुपये जमा करु शकाल काय ? असा सवाल सभेत केला गेला. मी होकार दिला. नगरला गेलो. विठ्ठलरावांना म्हणालो "आपण जर हे करु शकलो नाही तर नव्या जुन्या सहकारी कार्यकर्त्यांची इतक्या वर्षांची सारी तपःश्चर्या फुकट गेल्यासारखे होईल. पण तसे होणार नाही असा मला विश्वास वाटतो. तेएक सामाजिक आव्हान आहे. आपण अस्मिता दाखवून ते स्वीकारले पाहिजे. पेलले पाहिजे. तसे ते आपण पेलू शकलो तरच साखर कारखानदारी सहकारी क्षेत्रात राहील, अन्यथा नाही. "

"आपण करुन दाखवू " असा विश्वास विठ्ठलरावांनी दला. आणि एकाच नव्हे तर चार सहकारी साखर कारखान्याची योजना तयार केली. अवघ्या एक महिन्यांत तीन लाख रुपये जमा केले आणि कै. नानासाहेब गाडगीळ यांजकडे ते सादर केलें. ते जमा करण्यात विठ्ठलराव व अनेक सहकारी कार्यकर्ते सहभागी होते. आमचा सुरेख मेळ जमला होता. साखर कारखाना काढणे ही अवघड गोष्ट वाटत नाही. कारण सहकारी साखर कारखानदारीचे 'यश' निर्माण करुन नवा विश्वास सर्वत्र पेरला आहे. परंतु त्या काळी तीन लाख रुपये जमा करणे हे मोठे दिव्य होते. त्यासाठी पायपीट करुन अक्षरशः घाम गाळावा लागला होता. त्या काळातच अनेक सहकारी कार्यकर्तेही लाभले. **श्री. जगताप, श्री. गणपतराव अवताडे, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे ही त्यातली काही नांवे, ही मंडळी पाठीशी उभी राहिली. पैसा जमा करून विश्वास लाभला होता.** शासनाला खात्री पटली. केन्द्र शासनालाही खात्री पटल्याने प्रक्रिया कारखाने सहकारी क्षेत्रात आले. पण विठ्ठलराव वगैरे मंडळींनी जी जिद्द दाखविली, निष्ठापूर्वक परिश्रम केले म्हणूनच हे घडले आहे. या साऱ्यांच्या पाठीशी कै. गाडगीळ यांची प्रेरणा असली तरी ग्रामीण महाराष्ट्रात ह्या प्रकल्पाचे शिल्पकार वा त्यांचें मेरुमणी म्हणून श्री. विठ्ठलरावाचाच उल्लेख करावा लागेल. एखादी गोष्ट होणार नाही असे त्यांच्या सहवासात कधी वाटलंच नाही.

कारखान्यांना परवाने मिळाले. कारखाने कोठे निघू शकतील या दृष्टीने विचार सुरु झाला. एक अहवाल तयार करण्यांत आला (फिजिबल रिपोर्ट) माणसे एकत्र आली. लोकांनी मला चीफ प्रमोटर केले. श्री. विठ्ठलराव व अन्य सहकारी कार्यकर्ते पाठीशी होतेंच. पहिल्याच बैठकीला १०,००० कार्यकर्ते हजर होते. 'शुगर कमिटी फॉर को ऑपरेशन' निर्माण झाली. तीत कै. गाडगीळ, श्री. शेंबेकर, श्री. विखे पाटील ही मंडळी होती. त्या काळात त्यांच्याबरोबर भरपूर काम करण्याची संधी सुदैवाने मला लाभली. रात्री बेरात्री आम्ही दोघे लोकांकडे जात होतो. विठ्ठलरावांचे शब्द धारदार असत. त्यात त्यागी व निष्ठावंत माणसाचा आत्मविश्वास जणु प्रगट होत असे. बोलण्यांत एक प्रकारचा रांगडेपणा असे. कधी अगदी सहजपणे उपमाही देत असत. त्या ऐकल्या की मन थक्क होत असे. त्या उपमा अगदी मनाचा ठाव घेणाऱ्या असत. भेदक असत. उदाहरणाच द्यायचे झाले तर एक देता येईल.

कारखान्याच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रास्ताविक करीत होते, ते अध्यक्ष होते. कै. नानासाहेब गाडगीळ उद्घाटक होते. १०,००० वर लोक उपस्थित होते. ते म्हणाले "**बंधूहो, आज नानासाहेब आले आहेत. मी अध्यक्ष आहे खरा पण एक सांगतो. आपल्याकडे एक पद्धत आहे.**

रांगोळी काढण्यापूर्वी आपण शेणसडा करतो. माझे भाषण म्हणजे शेणसड्यासारखे आहे. मी शेणसडा टाकणार आहे. त्यावर नानासाहेब सुंदर रांगोळी काढणार आहेत." या प्रसंगी मला आणखीही एक गोष्ट आठवते आहे. रामकृष्ण परमहंसांना एकदा एकाने विचारले "कोण तुम्ही ? देवाचे प्रेषित ?" त्यावर ते म्हणाले, "मी आहे एक केरसुणी. दर दिवशी सकाळी देवाचा गाभारा झाडून स्वच्छ करण्याचे सारी घाण काढून टाकण्याचे माझे काम आहे." बंधूहो, मीही तशीच एक केरसुणी आहे असं मला समजा."

त्यांच्या बोलण्यात वास्तववादी व व्यावहारिक उपमा उत्स्फूर्तपणे येत असत. काही ग्रामीणही असत तर काही नागरीही असत.

लोकांकडे जाऊन आम्ही परत येत असू. कधी त्यांच्या गाडीतून तर माझ्या गाडीतून. परत आलो की ताट मागवून घेत. खिशातून एक पुरचुंडी काढून घेत. त्यातली भाकरी खात. एकदा मी त्यांना विचारले. तेव्हा ते म्हणाले, "मी परान्न घेत नाही." या मागची भूमिका काय असावी याचा मी शोध घेतला. तेव्हा मला आढळून आले की, या माणसाची मानसिक जडणघडणच अशी आहे की, कुठेही लाचारीने वागायचे नाही. नाही म्हटले तरी अन्नाने लाचारी येते. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, अशी म्हण आहे. खाल्ल्या मिठाला जागणं येतंच म्हणून हा माणूस कुणाचंही, अगदी कारखान्याचे सुद्धा अन्न घेत नसावा असे मला वाटते.

एकदा माझे सातारचे कर्मवीर भाऊराव पाटील व विठ्ठलराव आले होते. भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेच्या शाळा विठ्ठलरावांच्या सहकार्याने नगर जिल्ह्यात निघाल्या. ते म्हणत "तुम्ही ऊसावर प्रक्रिया करुन साखर निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहात. परंतु मुळातच हा ऊस गोड व्हावा म्हणून मी शिक्षणाची प्रक्रिया करतो आहे. स्वावलंबन हा शिक्षणाचा पाया आहे. दर टनामागे पैसा घ्या आणि शाळा चालवा."

**विठ्ठलरावांनी ते आव्हान स्वीकारले. सर्व ठिकाणी हीच कल्पना त्यांनी कार्यान्वित केली. शाळांचे जाळे आज सर्वत्र पसरले आहे.**

दोघेही घरी आले असताना विठ्ठलरावांना मी "दूध तरी तुम्ही घेतलेच पाहिजे" असा आग्रह केला. तेव्हा त्यांनी दुध घेतले. माणसांवर प्रेम करणारा, माणुसकीची जाण असणारा, माणसाची कदर करणारा असा माणूस आहे. त्यांना काही राजकीय मतेही आहेत. पूर्वी ते शेतकरी कामकरी पक्षात होते परंतु आपल्या सहकारी व्यवहारात त्यांनी कधीही राजकारण आणले नाही. हजारो मैल दूर ठेवले. आपल्या भोवती चांगली माणसे त्यांनी जमा केली. त्यांना प्रोत्साहित केले. पैलू पाडले. अनेक रत्ने उजेडात आणली. ना. आण्णासाहेब शिंदे यांचे उदाहरण देता येण्यासारखे आहे. त्यांचे कर्तृत्व विठ्ठलरावांच्या सहवासात व त्यांच्या साक्षीने फुलले, बहरले आहे. विठ्ठलरावांनी ही माणसे घडविण्याचे, फुलविण्याचे काम निर्मल व निरीच्छ बुद्धीने केले आहे. त्या अर्थाने मी तर त्यांना 'अभोगी राजयोगी' मानतो. सहकार निष्ठा हे त्यांचे सामर्थ्य आहे. ही कै. नानासाहेबांनी जपली, जोपासली आहे. माझ्यावरही सहकाराचे संस्कार त्यांनी केले आहेत. त्या अर्थाने आम्ही गुरुबंधू आहोत. त्यांचे माझ्यावर अपरंपार प्रेम आहे. साखर कारखान्यांच्या संदर्भात बॅंकेत काही समर प्रसंग उत्पन्न झाले तेव्हा विठ्ठलरावांनी वरिष्ठांना बजावले होते,

"एक वेळ तो नोकरी सोडेल. पण तुमचे ऐकणार नाही. मनात योजिलेला कारखाना होणार आहे."

'माणूसकी' हे विठ्ठलरावांचे बलस्थान आहे असे मी मानतो. काम करणाऱ्यांच्या सुखदु:खांचा, गैरसोयींचा ते जाणीवपूर्वक विचार करतात. कारखाना हे एक मोठें कुटुंब आहे अशी त्यांची श्रद्धा आहे. कार्यकर्त्यांच्या घरी जाणे, चौकशी करणे, स्नेहशीलतेने सुख:दुखाचा विचार करणे या गोष्टी ते करतात त्यांतून कार्यकर्त्यांच्या मनांत विश्वास निर्माण होतो. प्रेम वाढते. त्यातूनही क्वचित प्रसंगी ते रागावतात, चिडतात, निघून जाण्याची तंबी देतात. कधी निघूनही जातात. परंतु ते राग मनात ठेवीत नाहीत. झटकन विसरुन जातात. भांडणे झाली तर ते यशस्वी मध्यस्थी करु शकतात. कुणाचेंही अभद्र वा अशिव होऊ नये यासाठी ते नेहमी झटत असतात. कधी त्यांचा पराभव झाला तरी ते शिव्या देत नाहीत. खंत बाळगीत नाहीत. उलट अब्राहम लिंकन म्हणतो त्याप्रमाणे 'वुइथ नो इल वुइल अ‍ॅन्ड गुड वुइल फॉर ऑल' अशी त्यांची मनोधारणा आहे. 'ना खेद--ना खंत' ही त्यांची वृत्ती आहे.

•••

# सहकाराचे स्फूर्तिस्थान

श्रीं. जाधवराव
माळेगाव शुगर कारखाना

पद्मश्री विखे पाटील आणि महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग यांचा परस्पर संबंध हा महाराष्ट्राच्या सहकारी जगातील एक सुवर्ण क्षण आहे. कै. धनंजयराव गाडगीळ आणि श्री. विखे पाटील यांनी विसाव्या शतकाच्या पाचव्या दशकाला सहकारी क्षेत्रात अक्षय स्थान प्राप्त करून दिले. विखे पाटलांच्या दूरदृष्टीने एका नव्या सृष्टीची कोनशीला या दशकात बसवली गेली आणि प्रवरेच्या तीरावर महाराष्टातील पहिला वहिला सहकारी साखरकारखाना उभा राहिला.

श्री. विखे पाटलांच्या या कार्याला खरोखरच तोड नाही. महाराष्ट्रातील यच्चयावत् शेतकरी विखे पाटलांचे यासाठी अक्षय ऋणी राहतील. या प्रसंगी ऊस शेतकऱ्यांच्या अगदी सुरूवातीच्या काळात दयनीय परिस्थिची आम्हाला तीव्रतेने आठवण होते. सुरूवातीच्या काळात ऊसापासून जे गुळाचे उत्पादन होई त्यासाठी शाश्वत अशी बाजारपेठ न लाभल्यामुळे शेतकऱ्यांना जबरदस्त अशी आर्थिक झळ सोसावी लागली. हे नुकसान इतके मोठे होते की, पाणीपट्टी भरता न आल्यामुळे काही शेतकऱ्यांच्या जमिनीचे लिलावही झाले. परंतु विखे पाटलांच्या प्रवरेने शेतकऱ्यांना पावन केले आणि त्याला पुढचे बरे दिवस दाखवले. विखे पाटलांनी महाराष्ट्रात रूजवलल्या सहकारी साखर कारखानदारीमुळेच हे शक्य झाले.

श्री. विखे पाटलांना पद्मश्रीच्या रुपाने सरकार दरबारी मानमरातब मिळाला आहे. सरकारने त्यांच्या कार्याचे योग्य ते कौतुक केले हे जरी खरे असरें तरी शेतकरी बंधुंनी त्यापूर्वीच या विठ्ठलाला आपल्या अंतकरणात श्रद्धेचे स्थान देऊन त्यांचा अपार गौरव केला आहे.

विखे पाटील सहकारी महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान आहे. प्रवरेने महाराष्ट्राला दिलेले ते चालते बोलते जीवन आहे. विखे पाटील कोणाच्या एका कपर्दिकेचेहि मिंधे नाहीत. मागे एकदा कामानिमित्त माळेगांव कारखान्यावर येण्याची त्यांना आम्ही विनंती केली होती. पाटील आले. बरोबर स्वतःच्या घरी केलेली भाकरी फडक्यात बांधून घेवून आले. महात्मा गांधी भाकरीला देव मानत. या जगात देवाला कधी जन्म घ्यावा लागला तर तो भाकरीच्या रूपानेच घ्यावा लागेल असे गांधीजी म्हणत. असा हा गांधींचा देव विखे पाटलांची सदैव साथ करीत असतो. विखे पाटील ही आता सामान्य व्यक्ती राहिलेली नाही. सहकारी महाराष्ट्राची ती एक श्रद्धास्थान झाली आहे.

०००

# सहकार संदीपनी

श्री. शंकरराव कोल्हे
अध्यक्ष, संजीवनी सहकारी साखर कारखाना,
कोपरगांव

असं म्हणतात की, पूर्वी, या देशात सोन्याचा धूर निघत असे. सुवर्ण भूमी म्हणून या देशाची संबंध जगात ख्याती होती. या देशाची संस्कृती, या देशाची परंपरा, या गोष्टीचाही साऱ्या जगात दबदबा होता. आजही त्या इतिहासाच्या आठवणी काढतो. त्यांच्यांत रममाण होतो—स्वतःला विसरून जातो. त्यामुळे काहीजण आम्हाला इतिहासात पहाणारे लोक, भूतकाळात जगणारे, म्हणून हिणवतात. या इतिहासात आमचा धर्म, आमची अति प्राचीन संस्कृती, आमचा भूगोल या सर्वांना स्थान आहे. परंतु या देशाचा ऐंशी टक्के जो शेतकरी त्याला मात्र कुठेच जागा नाही.

क्वचित कुठे शबरी बोरे तोडताना दिसते. श्रीकृष्ण गायी राखताना दिसतो. गोपी दुधदुभते विकताना दिसतात, त्यावरून त्याकाळची आर्थिक परिस्थिती चांगली असावी असा थोडासा कयास करता येतो. जेजूरीच्या खंडोबा पाटलानं कुठंतरी राज्य केल्याचं दिसतं. खंडोबा, म्हसोबा, विरोबा ही त्यांकाळची व आजची ही आमच्या शेतकऱ्यांची दैवतं. त्यांच्या प्रमाणंच उपेक्षित आहेत त्यांच्याबद्दलही फारसं कुठं काही सापडत नाही. खूपच कष्ट घेतले तर शेतकऱ्यांचा जो दिसतो तो फक्त राक्षसी दुष्काळ धुमाकूळ घालीत असतानाच. त्यांच्या गरीबीच्या चिंध्या गावभर लोंबत असलेली वर्णन वाचायला मिळतात. सावकारांच्या, व्यापाऱ्यांच्या दावणीत सापडलेल्या या शेतकरी नामक एका जातीचे वर्णन अधूनमधून डोकावत असते. परंतु शेतकऱ्याच्या उन्नतीचे कोण्या महाभागाने केलेले प्रयत्न एखादा दुसरा अपवाद सोडला तर डोळे फोडले तरीही आपणास पहावयास मिळत नाहीत एखादे मोटेवरची कविता नाही तर हिरव्यागार मळ्याचं कथा कादंबरीतील वर्णन सोडलं तर शेतकऱ्यांच्या वाट्याला आले आहे ते अठरा विश्वे दारिद्र्यच. छत्रपति शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात रयतवारीची पद्धत आणली, शेतकऱ्याला जमिनीचा मालक बनवलं हा एकच अपवाद अभिमान वाटण्यासारखा !

आमच्या शहरी मंडळीची शेतकऱ्यांकडे पहाण्याची दृष्टी पहिल्यापासून कशी आहे यावर वेगळे भाष्य न करता लोकमान्य टिळकांनी केसरीतील आपल्या लेखात दुष्काळाच्या एका प्रसंगी त्यावेळच्या शहरी मंडळी विषयी जे म्हटले आहे ते त्यांचे उधृत केले आहेत. ते आजच्या स्थितीतही बरोबर लागू होतात, असे मला वाटते.

"दुष्काळाच्या वर्षी लग्नादि फाजील खर्चाचे समारंभ कमी होतात असा जगाचा साधारण नियम आहे. पण आम्ही सर्वच साधारण नियमांना अपवाद आहोत. तेव्हा यंदा (पुणे) येथे लग्न कार्य कमी तर नाहीच पण उलट दर वर्षापेक्षां थोडे बहुत जास्तीच प्रमाण आहे यात आश्चर्य नाही. खेड्यापाड्यांतून हजारो गरीब लोक धान्याच्या टंचाईमुळे एव्हापासूनच निकृष्ट गादर उपजिविका करू लागले आहेत. पोटाकरितां घरदार सोडून जागाऱ्यांची संख्या उत्तरोउत्तर वाढत आहे व याहून अधिक वाढत जाण्याचा संभव दिसत आहे. यंदाचे साल सुखरुप कसे पार पडते व पुढील वर्षी काय स्थिती होते याची सर्वात मोठी काळजी लागली आहे असे असूनही मोतीचूर आणि जिलब्यांची भोजने झोडण्यात मंडळी गर्क झाली आहेत. यापेक्षा आमच्या परदुःख शितलतेचे, अदूरदर्शित्वाचे व बेअकलेचे आणखी दुसरे प्रदर्शन कोणते पाहिजे ? खरोखर पंचपक्वान्नानी ढेकर देत पोटावर हात फिरवतांना ज्यांच्या कष्टावर आपणाला फुकट खायला मिळते त्या बिचाऱ्या शेतकऱ्यांची व मजुरांची कशी अन्न अन्न दशा झाली किंवा लवकरच होण्याची भिती आहे. त्याची आठवण आम्हाला कशाने होणार ? "

लोकमान्य टिळक सांगून सवरून सामान्य जनतेचे पुढारी होते, तेल्या तांबोळयाचे पुढारी ते ओळखले जात, शेतकऱ्यांचा, शेतकऱ्यांच्या दु:खाचा त्यांना कधी विसर पडला नाही. लोकहितवादींनीही आपल्या शतपत्रातून शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचे जागोजागी वर्णन केले आहे, म. फुले यांनी तर शेतकऱ्याची पिळवणूक, त्याची आर्थिक दैन्यावस्था, त्याच्या उर्जितावस्थेसाठी करावयाच्या उपायांची चिकित्सा पूर्वी कधी नव्हती इतक्या आस्थेवाईकपणे आणि विस्ताराने आपल्या लेखनात केली आहे, अर्थात शेतकऱ्यांविषयी असणाऱ्या अपार प्रेमापोटीच हे घडले आहे.

**महात्मा फुले यांनी १८८३ साली लिहिलेल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या आपल्या पुस्तकात शेतकऱ्याची दयनीय स्थिती वर्णन करताना एके ठिकाणी म्हटले आहे.**

**" शेतकऱ्यांजवळ पहिल्यासारखी मनमुराद जनावरे शिल्लक नसल्यामुळे त्यांच्या बागायतीची वेळच्या वेळी उस्तायारी होऊन त्यास पोटभर खतपाणी मिळेनासे झाल्याबरोबर बागायती जमिनीतील फूल कमी झाल्यामुळे हल्ली पूर्वीसारखे पीक होत नाही. शिवाय आमचे सरकार धूर्त अधिकाऱ्यांना हाताशी धरून दर तीन वर्षांनी अज्ञानी भेकड शेतकऱ्यांच्या शेतीवर मन मानेल तसे सारे वाढवू लागल्याने शेतकऱ्यांची हिंमत खचून त्यांच्याने त्यांच्या शेतीची मशागत होईना यास्तव कोटयावधि शेतकऱ्यास पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळेनासे झाले. शेतकरी जसजसे शक्तिहीन होऊ लागले तसतशी त्यांच्यात महामारीच्या आजाराच्या साथी येऊ लागल्यामुळे दरवर्षी हजारो शेतकरी मरू लागले.**

परंतु हे अपवाद सोडले तर शेतकरी सर्वार्थाने उपेक्षित राहिला आहे. थोरामोठ्यांनी, विचारवंतांनी, समाजकारण अर्थकारण, राजकारण करणाऱ्यांनी त्याला कधीच आपला मानले नाही. आजही आमच्या पुण्या-मुंबतील विद्वानांना दिल्लीपासून ते गल्लीपर्यंतच्या विविध थरांतील विचारवंतांना शेतकऱ्याच्या परिस्थितीची खरी जाणीव आहे का हा प्रश्न शिल्लकच आहे.

हे सर्व आज येथे विस्ताराने आठवण्याचे कारण म्हणजे नेमके हेच ऐतिहासिक स्वरूपाचे काम, इतिहासाला आपली दखल घ्यायला भाग पाडण्याचे काम एका सामान्य शेतकऱ्याने करून दाखवले आहे. ज्यांचा आपण आज अमृत महोत्सव साजरा करीत आहोत ते पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, भारतातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक हेच ते असामान्य कार्य करणारे सामान्य शेतकरी. आपल्या असामान्य धडपडीने अविरत प्रयत्न करून इतिहासाला आपली दखल त्यांनी घ्यायलाच लावली. आजपर्यंत इतिहासाने उपेक्षिलेली शेतकरी नव्या भारताच्या नव निर्माणात इतिहासाच्या सोनेरी पानांवर मोठ्या ऐश्वर्याने चमकू लागला. चमत्काराशिवाय नमस्कार मिळत नाही हेच खरे. मागच्या अनेक पिढ्या अशिक्षीत, आई-वडील अशिक्षीत, शिक्षणाचा कसलाही गंध नाही आर्थिक, शैक्षणिक व राजकीय परंपरेचा वारसा नाही, अशा विठ्ठलरावांनी महान पराक्रम करून दाखविला. जगात अशी उदाहरणे अगदी क्वचित सापडतात आणि अशा या विठ्ठलरावांबद्दल लिहिण्याचे भाग्य मला लाभले याचा मला अभिमान वाटतो.

## महाराष्ट्राची सहकारी चळवळ

| तपशील | १९६१ | १९६६ | १९७३ | १९७४ |
|---|---|---|---|---|
| एकंदर सहकारी संस्था | ३१५६५ | ३७४१४ | ४५७४० | ४१७६४ |
| एकंदर सभासद संख्या (लाख) | ४२ | ६७ | ९६ | ९८ |
| एकूण भाग भांडवल (कोटी) | ५३ | १२० | २७० | २५६ |
| सरकारी भाग भांडवल रु. | ८ | १८ | ५७ | ६४ |
| स्वत:चे भांडवल | ७३ | १६१ | ४३३ | ४५९ |
| खेळते भांडवल (रु.) | ३२६ | ८२८ | १९२६ | २०१६ |
| कर्ज (रु.) | ९५ | १८८ | ४२५ | ४४० |
| फायदा (रु.) | ५,५ | ८,९ | १९ | १७ |
| तोटा (रु.) | ०,६ | ३,१ | १६ | १८ |
| तपासणीचे वर्ग | | | | |
| (अ) | ३११० | ३७४१ | ३५२७ | ३५८३ |
| (ब) | १०९२१ | १२३९४ | १२७८२ | १४३७९ |
| (क) | ७५१५ | ११८०५ | १७६३२ | १८२१७ |
| (ड) | २०८८ | ३११४ | ३०६९ | ३९२६ |
| वर्गीकरण न झालेल्या संस्था | २९१ | ६२२ | ६३६ | ९६७ |
| तपासणी न झालेल्या संस्था | ६६४० | ५७३८ | ५०८४ | ५६९२ |

(रुपयांचे आकडे कोटी मधील आहेत)

वर दिलेली आकडेवारी अधिक विस्तृतपणे देणे शक्य आहे. परंतु वाचकांना आकडेवारीचा कंटाळा असतो आणि शिवाय लेखाचा विस्तार वाढण्याचीही शक्यता असते हे लक्षात घेऊन मी येथे ती मर्यादित ठेवली आहे. आज सहकारी चळवळ जीवनाच्या जवळ जवळ प्रत्येक अंगाला स्पर्श करीत आहे. पत पुरवठा, खरेदी विक्री, कापूस, सूत, कागद, तेल, साखर, तांदुळ वगैरेंच्या प्रक्रिया, जंगल कामगार, रस्ता मजुर, वाहक क्षेत्रातील कामगार सोसायटया, मच्छिमारी, शेतीसाठी पाणी पुरवठा, दुग्ध उत्पादन व प्रक्रिया, घर बांधणी, ग्राहक सोसायटचा वगैरे सर्वत्र सहकारी सोसायटचा स्थापन झाल्या, सरकारच्या इतर कुठल्याही खात्याला जेवढे महत्व आहे तेवढेच महत्व आता सहकारी खात्यानेही मिळविले आहे, हे खरे असले तरी काही वेळा आपण आत्मवंचना तर करीत नाहीना अशी भिती वाटते. सहकारी चळवळीचा उदो उदो करणाऱ्या उठसुठ सहकारी वारेमाप गुणगान गाणाऱ्या मंडळीनीही अंतर्मूख होण्यासारखी परिस्थिती दुर्दैवाने आजही आहे.


**आमची प्रकाशने**

**(१) कॉलेज शिक्षण घेणाऱ्यांसाठी**
**व्यवसायमार्गदर्शन पुस्तिका क्र. १ किं. २ रु.**
**(२) अशिक्षित बेकारांसाठी**
**व्यवसायमार्गदर्शन पुस्तिका क्र. २ किं. १ रु.**
**(३) मिनी अर्थशास्त्र किं. ८ रु.**
**(४) Mini Textbook of Economics Rs: 6-00**
**(५) अर्थ मासिक विक्रमसंवत्सर विशेषांक**
**किमत १२ रुपये (अर्थबत्तिशी)**

अर्थची वर्गणी पाठवताना चेक वा मनिऑर्डर खालील नावाने पाठवावी.

**" अर्थ मासिक ARTHA [Monthly] "**

पत्रव्यवहाराचा पत्ता – संपादक_अर्थ,
९०६, शिवाजीनगर, पुणे ४.

**वार्षिक वर्गणी ३० रुपये**

वर्गणीदारांकरिता अर्थ मासिकाचा कुठल्याही प्रकारचा अर्ज फॉर्म इ. भरावा लागत नाही.
वर्गणी मनिऑर्डर वा चेकने वरील पत्यावर पाठविल्यास अंक रवाना होणे सुरू होईल.



सत्यशिवसुंदर प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर ह्यांनी सच्चिदानंद मुद्रणालय ५९० सदाशिव पेठ येथे छापून ९०६, शिवाजीनगर, पुणे ४. येथे प्रसिद्ध केले.

# श्री वारणा स. [illegible]खर
# कारखाना लि. वारणानगर

तहशील पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र

तार-वारणासाकर वारणानगर ※ दूरध्वनी ३३ वारणानगर

## • आमची प्रमुख वैशिष्ट्ये •

१) शिवाजी विद्यापिठात उत्कृष्ट निकालांची परंपरा टिकविणारे श्री वारणा महाविद्यालय.

२) गुरूकुल पध्दतीचे श्री वारणा महाविद्यालय.

३) साखर धंद्याबरोबर युगोस्लाव्हिया येथील मुलांच्या संगीत मेळाव्यात प्रथम क्रमांक मिळवून आंतरराष्ट्रीय संगीतामध्ये वारणेची व अखील भारताची शान उंचावणारा 'वारणा बाल वाद्यवृंद'

४) सभासद व दुर्बल घटकाना निरनिराळ्या उद्योगांसाठी व विकास कार्यासाठी आर्थिक सहाय्य पुरविणारी 'श्री वारणा सहाकारी बँक'

५) महाराष्ट्रात 'कुक्कुट पालन व्यवसायाचा आदर्श निर्माण करणारा श्री वारणा सहकारी संघ'

६) कामगारांच्या सर्वकष कल्याणासाठी वारणा कामगार सोसायटी.

७) कामगार महिलांसाठी अर्थोत्पादन, महिला गृहोद्योग, लिज्जत पापड केंद्र.

८) बेघरांसाठी अल्पावधीत पहिल्याच वर्षी सिमेंट विटांची २२० घरे बांधून पुर्ण केली.

९) श्री वारणा सहकारी ग्राहक मंडळ लि. ची वाटचाल चालू आहे.

| | | |
|---|---|---|
| नंदकुमार नाईक | निवृत्ती विठोजी घोरपडे | वि. आ. तथा तात्यासाहेब कोरे |
| कार्यकारी संचालक | व्हाइस चेअरमन | चेअरमन |

Posted at City Sorting off
on Tuesday 10th August 19

P.N.C. 205



दिवाळी-नववर्ष
शुभेच्छा

# अर्थ

ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७७ मूल्य सहा रु.



भारतातील आद्य अर्थशास्त्रज्ञ महादेव गोविंद रानडे यांना अभिवादन

*With best compliments of:*

Dr. Beck & Co. (India) Ltd.

*Specialists in the Manufacture of Insulating Enamels, Varnishes and Resins for the Electrical Industry.*

**Pimpri, Poona – 411 018**

अनुक्रम


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| (१) | प्रा. पी. आर. ब्रह्मानंद | ३—९ |
| (२) | प्रा. पु. ना. माथूर | ११—४३ |
| (३) | प्रा. नी. वि. सोवनी | १७—२० |
| (४) | डॉ. वि. म. दांडेकर | २१—२२ |
| (५) | श्री. त्रिलोकनाथ सिन्हा | २३—२८ |
| (६) | कु. उज्ज्वला जोशी | २९—३१ |
| (७) | प्रो. दिनकर बोरीकर | ३२—३४ |
| (८) | प्रा. के. एम्. बावगे | ३५—४० |
| (९) | डॉ. वसंतराव पटवर्धन | ४५—४८ |
| (१०) | श्री. भालबा केळकर | ४९—५६ |




# अर्थ


आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक | वर्ष दुसरे | ऑक्टोबर—नोव्हेंबर १९७७

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते. | किमत : ३ रुपये | वार्षिक वर्गणी :३० रुपये

संपादक : **प्रा. कमलाकर परचुरे** | **कार्यालय : ९०६ शिवाजीनगर, पुणे ४**


आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या चार अर्थतज्ज्ञांचे विशेष लेख मिळवून आणि भारतीय अर्थनीतीशास्त्राशी संबंधित असलेले पूरक लेख एकत्र करून आगामी आर्थिक रचनेच्या कार्यक्रमाची दिशा कशी असावी ह्याचा ऊहापोह ह्या खास अंकात आला आहे. हुकूमशाही आणि बळजोरीचे राजकीय पर्व संपले आहे. तथापि झुंडशाही आणि अराजकाची मुळे डोके वर काढू लागली आहेत. अशा संक्रमणकाळात आर्थिक जीवनाची घडी व्यवस्थित बसावी आणि जनसामान्यांच्या आर्थिक अपेक्षा व समस्या दूर करण्याचे आव्हान योग्यपणे स्वीकारले जावे. भारतीय जनतेत नियोजनाविषयी हुरूप आणि विश्वास वाढविण्याकरिता आर्थिक समस्यांची उत्तरे शोधण्याची निकडीची गरज ह्या घटकेस प्रकर्षाने भासते.

डॉ. ब्रह्मानंद हे भारतीय अर्थतज्ज्ञांच्या परिषदेचे अध्यक्ष आहेत. प्रा. माथूर हे युनोच्या विकसनशील देशांच्या कृति समितीचे (Action Committee) एक सदस्य आहेत. प्रा. सोवनी हे मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष आहेत आणि प्रा. दांडेकर हे भारतात मान्यता पावलेल्या गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्थेचे संचालक आहेत. ह्या सर्वांची मते ही प्रातिनिधिक तसेच अधिकारी आहेत. प्रशासकीय पातळीवर रचनात्मक कार्य करू इच्छिणाऱ्या लोकधुरिणांचे लक्ष आम्ही वेधू इच्छितो ह्याशिवाय, नाशिक सिक्यूरिटी प्रेसचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी श्री. त्रिलोकनाथ सिन्हा, महाराष्ट्र बँकेचे अध्यक्ष डॉ. वसंतराव पटवर्धन, प्रा. बोरीकर. प्रा. भालबा केळकर, प्रा. बावगे, कु. उज्ज्वला जोशी ह्यांच्या अभ्यासपूर्ण लेखांनी ह्या अंकाचे संदर्भमूल्य वाढले आहे. अर्थचे हितचिंतक आणि वाचक ह्या अंकाचे स्वागत करतील अशी आशा आहे. ह्या अंकाच्या जाहिरातदारांचे आम्ही विशेष आभार मानतो. वर्गणीदार, जाहिरातदार, आश्रयदाते, मुद्रक, हितचिंतक, लेखक आणि वाचकांस नूतन वर्ष सौख्याचे आणि समाधानकारक जावो ही प्रार्थना.


शुभेच्छा
WIL
वालचंदनगर इंडस्ट्रीज लि.
हाऊस, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०००३८

# दूरदृष्टीचे सुफलदायी नियोजन

* प्रा. पी. आर. ब्रह्मानंद *
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई

ह्या अंकाकरिता लेख मिळवायचा ह्या हेतूने डॉ. ब्रह्मानंदांना त्यांच्या कार्यालयात भेटलो. (बरोबर डॉ. माथुरही होते) डॉ. ब्रह्मानंदांना 'अर्थ'चे आद्य संपादक कै. प्रा. वा. गो. काळे ह्यांच्याबद्दल अतीव आदर. नव्या अर्थ मासिकाचे अंकही त्यांच्या पाहण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. काळे ह्यांच्या जन्मशताब्दिनिमित्त आम्ही प्रकाशित केलेल्या एप्रिल ७६ च्या अंकाचे त्यांनी मन:पूर्वक कौतुक केले. ह्या वर्षी डिसेंबरमध्ये इंडियन इकॉनॉमिक्स असोसिएशनचे हीरक महोत्सवी अधिवेशन भरणार आहे. त्याचे अध्यक्षस्थान प्रा. ब्रह्मानंद मंडित करणार आहेत. तेव्हा हीरक महोत्सवप्रसंगी इंडियन इकॉनॉमिक्स असोसिएशनचे एक संस्थापक प्रा. वा. गो. काळे ह्यांच्या जीवनासंबंधी आणि लेखनासंबंधी अधिक माहिती नव्या सदस्यांना व्हावी ह्या दृष्टीने एक स्मरणिका प्रकाशित करावयाची आहे. त्याकरिता 'अर्थ'च्या त्या अंकातील काही लेखांचे इंग्रजी भाषांतर करून, त्यांचे पुनर्मुद्रण करावे असेही त्या भेटीत ठरले.

'अर्थ'वर लोभ असल्यामुळे ह्या विशेषांकाकरिता Perspective Planning हा पूर्वी प्रसिद्ध झालेला एक निबंध त्यांच्याकडून मिळाला. त्याचा अनुवादित संक्षेप सादर करीत आहोत.

## ह्या निबंधाचा प्रधान हेतु

पंचवार्षिक योजनांचा दृश्य परिणाम देशातील उपभोग पातळीवर आणि विशेषत: गरीब जनसामान्यांच्या दैनंदिन उपजीविकेवर कशाप्रकारे होतो ह्याचे परीक्षण करावे हा ह्या निबंधाचा हेतु आहे. भारतातील आर्थिक प्रगति करायची झाल्यास आणि प्राधान्यक्रम (Priorities) ठरवायचे झाल्यास गरीब आणि गरजू बहुसंख्य लोकांच्या दैनंदिन जीवनातील आवश्यक वस्तूंचा पुरवठा वाढविण्यावर भर द्यावा लागेल.

## भौतिक कल्याणाचे गमक

'दरडोई उत्पन्न' ह्या संकल्पनेने आर्थिक कल्याणाची प्रचिती येऊ शकत नाही. कारण, दरडोई उत्पन्नातील वाढ, दरडोई उपभोगात वाढ करू शकेलच असे नाही. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली आणि गरिबांच्या वाट्याला त्या केकची फोड लहानच आली तर त्यांची उपभोग-पातळी आणि राहणीमान ह्यांत कोणतीच सुधारणा होणे अशक्य आहे. म्हणूनच नियोजनात काही अग्रक्रम ठरवायचे असल्यास आणि नियोजन लोककल्याणकारी (Welfare oriented Egalitarian) करावयाचे असल्यास गरिबांच्या (Masses) अन्नधान्यादि वस्तू त्यांना उपभोगासाठी किती प्रमाणात उपलब्ध होत आहेत ह्याचा शोध घेणे दरडोई राष्ट्रीय उत्पन्नापेक्षाही महत्त्वाचा ठरेल. नियोजनाचा असाही एक हेतु असावा की, ज्यायोगे गरिबांना अन्न, वस्त्र, निवारा ह्या मूलभूत गरजा उपभोगासाठी पुरेशा उपलब्ध व्हाव्यात, ह्याकरिता अलीकडे आपण आपल्या नियोजनात 'राष्ट्रीय गरजेच्या किमान मूलभूत गोष्टींवर ४ थ्या योजनेपासून भर देऊ लागलो आहोत. (National minimum of Basic Consupmtion) गरिबांच्या ह्या मूलभूत गरजा भागविण्याची हमी आपण घेऊन त्यांचे आर्थिक कल्याण पार पाडीत नसून त्यांच्या कल्याणाकरिता आवश्यक असलेली प्राथमिक पूर्वतयारी पार पाडीत असतो.

# दिवाळी आणि 'पैसाच पैसा'


## सामायिक बक्षीस

## रु. ५,००,०००

एकूण पाच मालिका
प्रत्येक मालिकेत पहिले बक्षीस

**रु १,००,०००**

आणि ३३.३१० हून अधिक अन्य बक्षिसे.
सर्व मालिका मिळून बक्षिसांची एकूण रक्कम
२३ लाख रुपयाहून अधिक.



तिकिट मूल्य फक्त १ रु

सोडत दिनांक १५.११.७७

**महाराष्ट्र राज्य लॉटरी**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क
महासंचालनालयातर्फे प्रकाशित

# दिवाळी आणि 'पैसाच पैसा'



## सामायिक बक्षीस

## रु.५,००,०००

एकूण पाच मालिका
प्रत्येक मालिकेत पहिले बक्षीस

**रु १,००,०००**

आणि ३३,३१० हून अधिक अन्य बक्षिसे,
सर्व मालिका मिळून बक्षिसांची एकूण रक्कम
२३ लाख रुपयांहून अधिक.

तिकिट मूल्य फक्त १ रु

सोडत दिनांक १५.११.७७

**महाराष्ट्र राज्य लॉटरी**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क
महासंचालनालयातर्फे प्रकाशित

भारतात उत्पन्न-वाटणीत खूप विषम प्रमाण तर आढळतेच. पण त्याचबरोबर उपभोग्य वस्तूंच्या वाटपातही कमालीची भिन्नता दिसते. उपभोगाच्या राष्ट्रीय सरासरी पातळीपेक्षा कमी प्रमाणात वाटपास येणारी गरीब प्रजा देखील भरपूर प्रमाणावर आहे. ह्या श्रमशक्तीचा उत्पादनकार्यात योग्य उपयोग करून घेणे शक्य नसते ही दुसरी समस्या. आपल्या देशात अतिरिक्त लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. गरिबांचे प्रमाण आणि गरिबीचे प्रमाणही अधिक आहे. विशेषत: ह्या लोकांच्या निर्वाहाच्या प्राथमिक गरजा आपण नियोजनाने भागवू लागलो म्हणजे अप्रत्यक्षपणे त्यांची कार्यक्षमता, उत्पादनक्षमता वाढून देशातील आर्थिक विकासाला देखील गति मिळते. राष्ट्रीय नमुना पाहणीने (National Sample Survey) तसेच शेत-मजूर पाहणी समितीने (Agricultural Labour Enquiry Committee) देशातील विभिन्न उपभोग-पातळींचे गट स्पष्ट केले आहेत. १९६०–६१ ह्या वर्षी देशातील एकूण उपभोगखर्च १३००० कोटी रुपयांचा झाला. त्या वेळी प्रतिवर्षी सरासरी उपभोगखर्च २९४ रुपये हा होता. राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक खर्च प्रतिवर्षी करू शकणाऱ्या लोकांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या फक्त ३६ टक्के असून त्यातील १० टक्के लोकांनाच ह्या सरासरीच्या दुप्पट खर्चापेक्षाही अधिक खर्च करणे परवडते. ह्याचा सरळ अर्थ ६४ टक्के लोकांची उपभोग पातळी राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी तर आहेच पण २६ टक्के लोकांची सरासरी पातळीपेक्षा अधिक असूनही फारशी समाधानकारक नाही. सारांश १० टक्के लोकांनाच बऱ्यापैकी रहाणीमान उपलब्ध झाले आहे.

## काही प्रमुख वस्तूंच्या उपभोगाचे प्रमाण

| वस्तु (राष्ट्रीय सरासरी १६.५ औंस दररोज) अन्नधान्य | लोकसंख्येची आकडेवारी |
|---|---|
| ११ औंसांपेक्षा कमी | ४३ |
| ११-१६ औंस | २१ % |
| १६-३२ ,, | २६ % |
| ३२ औंसांपेक्षा जास्त | १० % |
| दूध (राष्ट्रीय सरासरी प्रतिदिन ४.९ औंस) | लोकसंख्या शेकडेवारी |
| १.६ औंसांपेक्षा कमी | ३१ % |
| १.६ ते ३.३ औंस | ३२ % |
| ३.३ ते ४.९ ,, | ५ % |
| ४.९ ते ९.८ ,, | १७ % |
| त्यापेक्षा जास्त | १५ % |
| कापड (राष्ट्रीय सरासरी प्रतिवर्षी १५.८ यार्ड) | लोकसंख्या शेकडेवारी |
| ५.३ वारांपेक्षा कमी | ३१ % |
| ५.३ ते १०.४ वार | २१ % |
| १०.४ ते १५.८ ,, | १६ % |
| १५.८ ते ३१.६ ,, | १७ % |
| त्यापेक्षा जास्त | १५ % |
| साखर (राष्ट्रीय सरासरी प्रतिवर्षी १०.९ पौन्ड) | लोकसंख्या शकडेवारी |
| ५.५ पौन्डांपेक्षा कमी | १४ % |
| ५.५ ते ७.३ | २९ % |
| ७.३ ते १०.९ | २१ % |
| १०.९ ते २२ | २१ % |
| त्यापेक्षा जास्त | १५ % |

ह्या कोष्टकातील माहितीवरून खालील निष्कर्ष निघतात.

(१) ४०% लोकसंख्येला ११ औंसांपेक्षा कमी अन्न मिळते ह्याचा अर्थ दारुण दारिद्र्याची झळ एवढ्या मोठ्या संख्येला भासत आहे.

(२) ६३% लोकसंख्येला दररोजच्या उपभोगासाठी ३ औंसांपेक्षा कमी दूध मिळते.

(३) ५०%लोकसंख्येला पुरेसे वस्त्र नाही.

(४) ४३% लोकसंख्येला दरडोई दरवर्षाला ७ पौंडां-पेक्षाही कमी साखर खरेदी करता येते.

भारतीय नियोजनाचा विचार करता ह्या वर्गाच्या ह्या समस्यांकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे.

अन्नधान्याचा पुरवठा करताना देशातील विभिन्न श्रमिक गटांना किती अन्न आवश्यक आहे हे लक्षात घेतले पाहिजे. देशात सर्वसाधारणपणे सध्याचा धान्यपुरवठा गृहीत धरल्यास दरडोई १८९० कॅलरीज देणारे धान्य उपलब्ध आहे. प्रगत देशांत ह्यापेक्षा दुप्पट म्हणजेच साधारणपणे ४००० कॅलरीज देणारे अन्नधान्य उपलब्ध आहे. आपल्यासारख्या समस्या असणाऱ्या चीनमध्ये देखील आपल्यापेक्षा सुमारे २५% अधिक कॅलरीज मिळतील एवढा धान्यपुरवठा आहे. अवजड काम करणाऱ्या भारतीय मजुराला किमान ४००० कॅलरीजचे अन्न जरुरीचे आहे. ट्रक ड्रायव्हरला ३००० कॅलरीज आणि प्राध्यापक शिक्षकास २७०० कॅलरीज अपेक्षित आहेत.

"सूर्यफुलाची दृष्टी सदैव सूर्याकडेच तद्वत् आमचे लक्ष सदैव आपल्या उत्कर्षाकडे"
आमच्या विविध योजनांत सहभागी व्हा व आपल्या भावी उत्कर्षाची मुहूर्तमेढ रोवा.

*छोटे उद्योग उत्पादन वाढवी लाभे त्या संगत कॉसमॉसची*

# दि कॉसमॉस को. ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९०६ दूरध्वनि : कार्यालय : ४५२७३, ४४२२१
कार्याध्यक्ष निवास : ४६७८७

६१२, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे ३०

**आमच्या खालील शाखा आपल्या सेवेस रुजू आहेत.**

| पर्वती दर्शन शाखा | खडकी दापोडी शाखा | गोखलेनगर शाखा |
|---|---|---|
| पुणे ९ | पुणे ३ | पुणे १६ |
| ४२३८६ | ५३९३५ | ५७७२६ |

**आपल्या आर्थिक अडचणी व विकासासाठी आजच संपर्क साधा**

| गो. वा. पुजारी | शं. गो. बर्वे | व. रा. पिंगळे |
|---|---|---|
| व्यवस्थापक | उप. कार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

अत्यंत गरीब उत्पन्न गटातील लोकांना उपभोगाच्या राष्ट्रीय सरासरीपर्यंत आणावयाचे झाल्यास आवश्यक उपभोग्य वस्तु म्हणजे अन्नधान्य, साखर, दूध, दुधाचे पदार्थ आणि कापड ह्यांच्या उत्पादनात किमान ५० टक्क्याने वाढ करणे जरुरीचे आहे. लोकसंख्येची प्रतिवर्षी वाढ आणि आपल्या उत्पादनाचे प्रमाण लक्षात घेता दारिद्र्य आणि दुर्भिक्ष नाहीसे करावयाचे त्यास अजून सुमारे २५ वर्षे लागतील. ह्याचा अर्थ चालू शतकाचा उर्वरित भाग संपेपर्यंत आणि इ. स. २००० हे नवे पर्व सुरू होईपर्यंतच्या काळात आपल्याला दूरलक्षी नियोजन करावे लागेल. तरच तळच्या उत्पन्न गटातील सामान्य माणसाचे रहाणीमान अपेक्षेइतके योग्य उंचावेल.

## उपभोग खर्चातील संभाव्य वाढ

आगामी नियोजन कालात उपभोग खर्चातील वाढ कसकशी वाढत जाईल ह्याचा अंदाज देणारे आकडे खालील कोष्टकात आहेत. ह्याकरिता १९६०–६१ हे वर्ष सुरवातीचे असे गृहीत धरले असून १ ल्या गटात प्रतिवर्षी ९८ रु. उपभोग खर्च करणारे, दुसऱ्या गटात १४८ रुपयांपर्यंत खर्चणारे आणि तिसऱ्या गटात ३५० रुपये खर्च करणाऱ्या कुटुंबांचाच समावेश केलेला आहे.

| | गट १ | | | गट २ | | | गट ३ | | | सर्व गट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | लोकसंख्या (दशलक्ष) | दरडोई खर्च | ए. कोटी रु. खर्च | लोकसंख्या | दरडोई खर्च | ए. खर्च | लोकसंख्या | दरडोई खर्च | एकूण खर्च | १, २, ३ |
| १९६०–६१ | ६२ | ९८ | ६०८ | ७७ | १४६ | ११२४ | ३०४ | ३५० | ११२७० | ४४३/२९४/१३००० |
| १९६५–६६ | ६९ | १३७ | ९५७ | ८६ | २०४ | १७५४ | ३४३ | ३९५ | १३५२५ | ४८९/३२६/१६२३६ |
| १९७०–७१ | ७८ | १९२ | १५०० | ९६ | २८६ | २७४६ | ३८१ | ४२६ | १६२३० | ५५५/३७०/२०४७६ |
| १९७५–७६ | ८७ | २६९ | २३५० | १०८ | ३५८ | ३८६६ | ४२७ | ४५६ | १९४७६ | ६२२/४१२/२५६१२ |

## गृहीत कृत्ये

(१) लोकसंख्येची वाढ प्रत्येकी ५ वर्षांच्या योजनेमध्ये अदमासे १२ टक्के.

(२) उपभोगखर्चातील वाढ ३ ऱ्या व ४ थ्या योजनाकालात अदमासे ४० टक्के.

(३) त्यानंतरच्या ५ व्या, ६ व्या योजनेत उपभोगखर्चातील वाढ कमी कमी होत जाईल.

(४) १९६०–६१ ह्या पायाभूत वर्षातील उपभोगखर्च १०० धरल्यास १९७५–७६ मध्ये त्याचा निर्देशांक १९७ म्हणजे सुमारे दुप्पट होण्याचा संभव आहे.

## राष्ट्रीय किमान अत्यावश्यक गरजा

ह्यात साधारणपणे खालील वस्तूंचा समावेश करता येईल. अन्नधान्य, फळे, भाज्या, मांस, मच्छी, अंडी, दूध, दुधाचे पदार्थ कापड, पादत्राणे, मीठ, साखर आणि केरोसीन. त्यात मोफत प्राथमिक शिक्षण, वैद्यकीय मदत, कुटुंब कल्याण सल्लाकेंद्रे, सार्वजनिक आरोग्य, शुद्ध स्वच्छ पिण्याचे पाणी आणि निवारा ह्या गोष्टींचाही अंतर्भाव करावा लागेल. ह्यांतील शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक सफाई, पाणी इत्यादींकरता शासनाची मदत घेणे अनिवार्य आहे. त्याकरता उद्दिष्टे ठरविण्यासाठी कोणती वस्तु किती प्रमाणात उपलब्ध केली पाहिजे ह्यासंबंधीचे इष्टांक ठरवावे लागतील. दरडोई २३ औन्स प्रतिदिवशी अन्न ह्या देशात द्यायचे झाल्यास आपले धान्य उत्पादन १६० दशलक्ष टनांपर्यंत भिडवावे लागेल. तूर्तास ४ औंस दूध मिळत असल्यास ते ६.८ औंसांपर्यंत वाढवावे लागेल. त्याकरिता दुधाचा पुरवठा १२० कोटी मणांपर्यन्त आणि कापडाची उपलब्धता प्रतिवर्षी प्रतिमाणसी २२ वार गृहीत धरल्यास १८०० कोटी वार कापडाचे उत्पादन करावे लागेल.

## उत्पादनाची वाटप व्यवस्था

समजा देशात आपण उत्पादन वाढवू शकलो तरी गरीब गरजू जनतेच्या झोळीत ते व्यवस्थितपणे पोचण्याची वाटप व्यवस्था आपल्याला विचारात घ्यावी लागेल. वितरण व्यवस्थेचे दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे परंपरागत चालत आलेल्या बाजार व्यवस्थेचा. आणि दुसरा मार्ग म्हणजे प्रशासकीय वितरण व्यवस्थेचा. पहिला खुल्या व्यापाराचा मार्ग हा विसंबून रहाण्यासारखा आहे. कारण तो नैसर्गिक आहे. त्यातील कार्यक्षमता योग्य व सुरक्षित रहाण्याकरिता भांडवल गुंतविलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या दक्षतेचा उपयोग आपोआप होत असतो. ह्यातला धोका एकच. तो म्हणजे उत्पन्नातील विषमता

एकमेका साहाय्य करू अवघेचि धरू सुपंथ

# श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि. वारणानगर

तहसिल पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर
(महाराष्ट्र)

तार – वारणासाकर – वारणानगर

दूरध्वनि – २३ वारणानगर

**आमची प्रमुख वैशिष्टये**

(१) शिवाजी विद्यापीठात उत्कृष्ट निकालाची परंपरा टिकविणारे श्री वारणा महाविद्यालय

(२) गुरुकुल पद्धतीचे श्री वारणा विद्यालय

(३) साखर धंद्यावरील युगोस्लाव्हिया येथील मुलांच्या संगीत मेळाव्यात प्रथम् क्रमांक मिळवून आंतरराष्ट्रीय संगीतामध्ये वारणेची व अखिल भारताची शान उंचावणारा वारणा बालवाद्यवृंद

(४) सभासद व दुर्बल घटकांना निरनिराळ्या व्यासंगासाठी व विकास-कार्यासाठी आर्थिक साहाय्य पुरविणारी श्री वारणा सहकारी बँक

(५) महाराष्ट्रात कुक्कुटपालन व्यवसायाचा आदर्श निर्माण करणारा श्री वारणा कोंबडी सहकारी संघ

(६) कामगारांच्या सर्वमात्र कल्याणासाठी वारणा कामगार सोसायटी

(७) कामगार महिलांसाठी अर्थोत्पादन 'महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र'

(८) बेघरांसाठी अल्पःवधित पहिल्याच वर्षी सिमेट विटांची पक्की २२० घरे बांधून पूर्ण केलेला

(९) श्री वारणा विश्वास सहकारी ग्राहक मंडळ लि. ची वाटचाल चालू आहे.

नंदकुमार नाईक
कार्यकारी संचालक

निवृत्ती विठोजी घोरपडे
व्हॉ. चेअरमन

वि. आ. तथा तात्यासाहेब कोरे
चेअरमन

वाढण्याचा; पण त्याकरता ह्या गटांवरील आयकराचे चढते प्रमाण ठेवणे सापेक्षतेने श्रीमंत वर्गाच्या चैनीच्या वस्तूंवरील उत्पादन कर वाढविणे, औद्योगिक परवाने देताना संपत्तीचे केंद्रीकरण आणि एकाधिकाराला आळा घालणे, इतर वित्तीय नियंत्रणे वाढविणे इत्यादि मार्गाचा अवलंब करता येईल. त्याच बरोबर बडे पगार आणि इतर भत्ते ह्यांच्या उत्पन्नावर मर्यादा घालणेही अनिवार्य होईल. श्रीमंतांच्या चैनीच्या उपभोगावर जबर कर आकारणे आणि बचतीला आयकरातून सूट देऊन बचतीला अधिक व्याज दराचे आकर्षण ठेवणे अशा विविध मार्गांनी भडक उपभोगावर (Conspicuous Consumption आळा घालता येणे आणि अधिक श्रीमंत गटांतील लोकांच्या उत्पन्नातून भांडवल निर्मिति साधणे शक्य होईल.

तथापि वर्तमान परिस्थिति लक्षात घेता जीवनावश्यक वस्तूंच्या वितरण व्यवस्थेकरिता मुक्त व्यापार नीति पुरेशी कार्यक्षम होऊ शकणार नाही. ह्याचे प्रमुख कारण म्हणजे ५० टक्यांहून अधिक लोकांजवळ भारतीय उपभोग सरासरीपेक्षा कमी क्रयशक्ति आहे. विशेषतः ग्रामीण भागातील गरीब शेतकरी आणि शेतमजुरांची व्यवस्था अधिक चिंतनीय आहे. देशात दरडोई ४ एकर जमीन उपलब्ध आहे. ह्या शेतीला बारमास पाणीपुरवठा नाही. तसेच कांही जमिनींना पुरांपासून संरक्षण नाही. बरेच शेतकरी त्यांच्या पोटापुरते. पिकवू शकतात. देशातील एकूण उपभोगखर्चाच्या ३० टक्के व्यवहारच रोख पैशांखेरीज म्हणजेच वस्तुविनिमयाने होतात. सामान्य शेतकऱ्याजवळ रोकड जिंदगी नाही आणि पतक्षमताही नाही. शेतकरी साधन सामग्रीवर (Inputs) खर्च करतो तोही मर्यादित आहे. देशात शेतीमाल बाजारात अतिरिक्त स्वरूपात येण्याचे प्रमाणही कमी आहे ह्या कारणांनी शेतकऱ्यांकरिता मुक्त व्यापार वितरण व्यवस्था योग्य ठरणार नाही. मुक्तव्यपार व्यवस्था उचित होण्यास मुळात ग्रामीण भागात चलनाचा प्रसार आणि वापर वाढला पाहिजे. अशा स्थितीत प्रशासकीय वितरण व्यवस्था ह्या गरीब गटांकरिता खास असणे ही गोष्ट अनिवार्य आहे. शेतीतून निघणारे उत्पादन वाढविण्याकरिता सामाजिक भांडवलाची गुंतवणूक (Social Overhead Capital) वाढवावी लागेल. शेतीची उत्पादकता वाढवायची झाल्यास भांडवल निर्मिति आणि तांत्रिक प्रगति ह्यांवर भर दिल्याखेरीज गत्यंतर नाही. पाश्चिमात्य पद्धतीचे वित्तीय नियंत्रण ह्या ठिकाणी उपयुक्त होऊ शकणार नाही. उत्पादनकर आणि विक्रीकरावर अवाजवी भर दिल्यामुळे सर्व सामान्य माणसाला त्यायोगे भाव वाढीची झळ भासते. जीवनावश्यक वस्तूवरील अप्रत्यक्ष कर म्हणजे बहुसंख्य गरीब वर्गाकडून घेतलेला प्रत्यक्ष करच होय. सारांश गरीब गटाच्या उपभोगावर मर्यादा बसविणारे कोणतेही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मार्ग हेही गरिबांना जाचक ठरतील. त्या ऐवजी श्रीमंतांच्या उपभोगावर निर्बंध घालून त्यांचेकडून बचती वाढविणे श्रेयस्कर ठरेल.

## निष्कर्ष

आपले भारतीय नियोजन बरेचसे तात्पुरते, वेळ बखत येईल तशी पावले उचलणारे आहे. (Ad Hoc) आपल्या योजनांचे कच्चेपण, योजनांच्या सद्हेतूपेक्षा, योजनांविषयक आवश्यक असलेल्या ज्ञानाचा आणि तंत्राचा अभाव ह्यात आहे. (The weaknesses of our plan are possible not due to absence of good intentions but due to want of knowledge. आपल्या देशातील गरिबी आणि दुर्भिक्ष नाहीशी करावयाची झाल्यास देशातील उपलब्ध साधनसामग्रीचा वापर कोणत्या प्रमाणात करावयाचा ह्याकरिता संलग्न एकसूत्री विचार होऊ शकत नाही. आतापावेतो दारिद्र्य विमोचनाचे अर्थशास्त्र पूर्णपणे व सुसंगतपणे विकसित होऊ शकले नाही. ह्यातच अर्थशास्त्राच्या सापेक्ष दारिद्र्याची प्रचिती मिळते.

There is not as yet an adequate and integrated science of the economics of poverty or rather of indigence – is important aspect of the relative poverty of economics and its lack of Comprchension Foverty of Planning, however, cannot wait Economic Science provides all the answers.

अर्थशास्त्र आपल्या समस्यांना समर्पक उत्तरे शोधून काढण्यास तूर्तास असमर्थ असले तरी नियोजन तोपर्यंत वाट पहात, खोळंबून राहू शकत नाही. ते चालूच रहाते. नियोजनातील मध्यवर्ती बिंदु आहे देशातील दारिद्र्याचा; आणि जीवनावश्यक उपभोग्य वस्तूंच्या विशेषतः गरीब वर्गाला भासत असणाऱ्या, टंचाईच्या प्रश्नाचा. हा प्रमुख प्रश्न सोडवायचा झाल्यास सामाजिक न्यायानुसार समान वाटप व्यवस्था वा अधिक उत्पादकता किंवा एकाच वेळी दोन्ही पद्धतींचा समन्वय घालून आपल्या नियोजनाच्या कार्याला ह्याच प्रधान उद्दिष्टांकरिता तत्परतेने इष्ट वळण देण्याची आज तातडीची गरज आहे.

देशातील दुर्भिक्ष आणि गरीब गांजलेल्या लोकांचे दारिद्र्य नष्ट करण्याकरिता प्रत्यक्ष आणि निश्चित स्वरूपाची योजना आखणे आता जरुरीचे आहे. त्याकरिता जीवनावश्यक वस्तूंच्या वापर उत्पादनासंबंधीचे इष्टांक, उत्पादनवाढीकरता आवश्यक असलेली अमलंबजावणी करणारी यंत्रणा, उत्पादनाचे वितरण करणारी व्यवस्था इत्यादी तपशिलांचा साद्यंत अभ्यास ,करणारे आणि विविध उद्दिष्टे पार पाडण्याकरता तसेच विविध अडचणींचे निराकरण करू शकणारे एकसूत्री धोरण त्या प्रयत्नातून उपलब्ध व्हावे ही अपेक्षा आहे.

अर्थ-नीति विशेषांकास
आमच्या
हार्दिक शुभेच्छा !


वाढत्या गरजांना
पुरी पडेल अशी
बचत करा...



सेंट्रल बँकेची
मनी मल्टीप्लायर
डिपॉझिट स्कीम
पैसे गुंतविण्याचा
किफायतशीर मार्ग
रु. ५००० चे ७ वर्षात
रु. १०,०४० आणि
१० वर्षात रु.१३,५३५
झाल्याचे सुख अनुभवा.

इतक्या जलद आपल्या पैशाची मनी मल्टीप्लायर स्कीममध्ये वाढ होते.
गरज उद्भवण्याच्या आधीच बचतीची रक्कम हजर.

अधिक माहितीसाठी सेंट्रल बँकेच्या नजिकच्या शाखेला भेट द्या.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
( भारत सरकारचा अंगीकृत व्यवसाय )
जागोजागी जनतेकडे जाणारी बँक

PADMA

# भारतीय आर्थिक नीतीची समीक्षा

* प्रा. पुरुषोत्तम नारायण माथूर *
अर्थशास्त्रविभाग, वेल्स विद्यापीठ, (ब्रिटन)

प्रा. माथुर हे माझे संशोधन कार्यातील मार्गदर्शक आणि भाव-जीवनातील ज्येष्ठ बंधु-तुल्य मित्र. नुकतेच सप्टेंबर महिन्यात ते भारतात आले होते. त्या वेळी मी त्यांची खास भेट 'अर्थ' करिता घेतली. भारताबाहेर आता ते बरीच वर्षे असल्यामुळे; भारतातल्या पंचवार्षिक योजना आणि आगामी आर्थिक धोरण व उपाय-योजना ह्यांविषयी त्यांची मते अधिक तटस्थ आणि वस्तुनिष्ठ होणे स्वाभाविक आहे. विकसन-शील देशांच्या आर्थिक सहकार्याचा विचार करणाऱ्या युनोच्या अभ्यासमंडळाचेही ते तूर्तास सदस्य असल्यामुळे त्यांना भारत आणि भारतासारखे उदयोन्मुख देश ह्यांची आर्थिक कुवत आणि भावी प्रगति ह्यांविषयी योग्य असे अंदाज बांधता येणे शक्य आहे. नुसत्याच तात्त्विक बाबींचा काथ्याकूट करण्यापेक्षा भारतीय विकासाकरिता कोणत्या गोष्टी करण्याची आज जरूर आहे, ह्याचे मार्ग-दर्शन करण्याची आज गरज आहे. समस्येचे विश्लेषण अनिवार्य आहे, पण समस्येला त्यातल्या त्यात समर्पक असे उत्तर शोधणे हेच अर्थशास्त्रज्ञां पुढ आज आव्हान आहे. प्रा. माथुर ह्यांनी त्या दृष्टीने भारतीय समस्यांकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन दिला आहे.

भारताच्या आर्थिक नीतीची उद्दिष्टे परस्परविरोधी आहेत. एक उद्दिष्ट स्वीकारावे तर दुसऱ्या उद्दिष्टाचा भंग होतो. उदाहरणार्थ आपल्याला विकास हवा असल्यास किंमतीची पातळी स्थिर ठेवणे अशक्य दिसते. विकासाची अत्याधुनिक यंत्रसामग्री, तंत्र इत्यादीचा वापर केल्यास बेकारीचा प्रश्न अल्पकाळात सुटू शकत नाही. परंपरागत उत्पादन पद्धतीचे पुनरुज्जीवन केल्यास कदाचित रोजगार वाढेल. पण आंतरराष्ट्रीय विकासाच्या स्पर्धामय युगात आपण फार पाठीमागे राहण्याची शक्यता आहे. उत्पादनवाढीवर निव्वळ भर दिल्यास संपत्तीच्या विषम वाटणीचा आणि आर्थिक न्यायाचा प्रश्न निर्माण होतो. सारांश विकास, स्थैर्य, पूर्ण रोजगार आणि आर्थिक निर्भरता व न्याय ह्या साऱ्या उद्दिष्टांचा पर्याप्त समन्वय कसा करता येईल?

आज देशात चलनवृद्धि आणि भाववाढ ह्यांनी सर्वसामान्य नोकरीपेशाचा माणूस गांजतो आहे तर असंघटित कृषि उद्योग, व्यापार-उदिम आणि स्वतंत्र व्यवसाय ह्यांतील लोकांना त्यांच्या उत्पादनाची वा सेवेची किंमत अधिक हवी आहे. ह्या सर्व गुंतागुंतीतून कोणता मार्ग काढता येईल ?

* मी विवेचक, सविस्तर उत्तरांपेक्षा सरळसरळ उत्तरे देण्याचे ठरविले आहे. माझ्या प्रत्येक उत्तराकरिता मी कोणत्याही वेळी योग्य खुलासा आणि स्पष्टीकरण देऊ शकेन. तथापि तुमच्या मासिकाच्या वाचकांस समस्यांची उत्तरे शोधण्याकरिता एखादा निःसंदिग्ध आणि निश्चत दृष्टिकोन सादर केल्यास ह्या प्रश्ना-विषयी अधिक चांगल्या प्रकारे विचारपरिमर्श होऊ शकेल; ह्या दृष्टीने आता ह्या प्रश्नाकडे वळूया. अर्थनीतीची उद्दिष्टे परस्परांचा छेद घेणारी सकृद्दर्शनी दिसली तरी ती परस्परपूरक असतात एवढेच नव्हे तर त्या उद्दिष्टांचा पर्याप्त समन्वय

॥ श्री ॥

# ब्रिमा शुगर लि.,

(दि बृन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. च्या संपूर्ण मालकोची कंपनी)

## शुभ्र दाणेदार साखरेचे उत्पादक

रजिस्टर्ड आणि हेड ऑफीस
९८० सदाशिव पेठ, पुणे ३०.

: फॅक्टरी :

मु. श्रीपूर, व्हाया अकलूज, जि. सोलापूर.

फोन :
४४४९१– पुणे.
२३ व ४२ श्रीपूर.

टेलेक्स :
३८८ पुणे.

तार :
श्री
(पुणे व श्रीपूर)

ज. चं. आगाशे
चेअरमन

(optimalmix) करता येणे अशक्य नाही. ह्याकरिता कोणते उद्दिष्ट कितपत ताणायचे ह्यावर मर्यादा ठरविल्या पाहिजेत.

ह्याकरिता काही सत्ये मान्य केल्याखेरीज पुढे जाता येणार नाही. उदाहरणार्थ–

(१) विकास हवा असल्यास तुमच्या परंपरागत उत्पादन तंत्राचा तुम्हाला त्याग करावा लागेल. आधुनिक तंत्राचा स्वीकार केल्याखेरीज विकासाला गति देणे बरेच अशक्य आहे. त्यातून जुन्या तंत्रांचा सोस (संस्कृति, माती, परिस्थिति इत्यादि सबबी सांगून) केवळ) आग्रहीपणाने चालू ठेवल्यास विकास समाधानकारक होऊ शकणार नाही हे मानण्याइतपत प्रांजळपणा असावा.

(२) राहणीमान उंचावयाचे असल्यास तसेच राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे म्हणजेच राष्ट्रीय उत्पादनात वाढ करणे म्हणजेच वास्तव संपत्ती आणि भांडवल ह्यांत वाढ करावी लागेल.

(३) 'गरिबी' ही संकल्पना आर्थिकदृष्ट्या सापेक्ष आहे. प्रगत देशातील लोक देखील आर्थिक दारिद्र्याच्या समस्येबाबतीत कुरकुर करीत राहतात. तेव्हा गरिबी 'कुणाची' नाहीशी करावयाची, तसेच गरिबी कितपत दूर करावयाची ह्या बाबतीत निश्चित ठरवावे लागेल.

(४) आर्थिक न्यायाच्या बाबतीत फार हळवे झाल्याने देशातील सुस्त, आळशी, ऐषारामी लोकांना मिंधेपणाने आश्रितासारखे दक्षिणा (Doles) घेऊन जगण्याची चटक लागेल

(५) प्रत्येक साधनसामग्रीचा पर्याप्त उपयोग करून घेताना ते समाजवादी पद्धतीने, सहकारी संस्थेमार्फत, सहकारी व्यवस्थापनाने की वैयक्तिक प्रेरणेने करायचे ह्या पद्धतींबाबत घोळ घालीत बसण्यापेक्षा कार्यक्षमता आणि उत्पादनक्षमता ह्या निकषांनाच निर्भेळ महत्त्व दिले जावे. 'काय साधायचे' हे 'कसे साधण्यापेक्षा' निर्विवाद अधिक महत्त्वाचे आहे.

(६) विकासाबरोबर चलनवृद्धीचा धोका निर्माण होतो ह्याचे कारण प्रचलित नियोजनपद्धतीस आपण योजनांचे संकल्प चलन संख्येने ठरवितो. ह्याचा अर्थ आपण वित्तीय नियोजनावर (Financial planning) अवास्तव भर दिला आहे. तिसऱ्या योजनेचा संकल्प ११००० कोटी रुपयांचा असेल तर चौथ्या योजनेच्या काळात २२००० कोटी रुपयांची, पाचव्या योजनेत ५०,००० कोटी रुपयांची तरतूद करतो. राष्ट्रीय खर्चात अशा रीतीने कृत्रिम वाढ करून आपण राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो. ह्या सर्व नियोजनपद्धतीत प्रत्यक्ष वास्तव उत्पादनावर भर दिला गेल्यास तसेच मजुरीकरिता पैसा उपलब्ध करून देण्याच्या पद्धतीपेक्षा 'रोजगार-वेतन' (wage-goods) उपलब्ध करून देण्यावर भर दिला पाहिजे. तरच सर्वसामान्य माणसाला जीवनावश्यक वस्तूंचे दुर्भिक्ष भासणार नाही.

(७) राष्ट्रीय नियोजनाविषयी जनतेत हुरूप आणि विश्वास निर्माण करावयाचा झाल्यास, सर्वांना काम, सर्वांना संधि आणि सर्वांना 'निर्वाह-वेतन मिळून, अत्यावश्यक मूलभूत गरजा उपभोगण्याची क्षमता उपलब्ध केली पाहिजे.

(८) राष्ट्रीय नियोजन काळात सामान्यांना 'वाऱ्यावर' सोडून देण्यापेक्षा जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याची यंत्रणा प्रथम निर्माण करावी लागेल. सर्वसामान्य माणूस जीवनावश्यक गरजा भागविण्याइतपत समर्थ केल्यास, विकासाच्या पुढील कार्यक्रमाची योग्य बैठक तयार होईल.

(९) आपल्या नियोजनात चलन पत आणि सरकारी वित्त ह्यांचेवर भर दिला जातो. सर्व नियोजन हे चलनाधिष्ठित झाले आहे. त्याऐवजी साधने (inputs) आणि उत्पादन (outputs) ह्यांचा विचार करणारे अर्थशास्त्रीय नवे तंत्र 'साधन–फल' (Input-output theory) सिद्धांत ग्राह्य समजले जावे.

(१०) आपण 'रोजगार-वेतन' कितपत उपलब्ध करू शकतो तितका आवाका लक्षात घेऊनच रोजगार वाढवावा. जसजसे राष्ट्रीय उत्पादन वाढत जाईल त्या प्रमाणात रोजगार वाढविल्यास मागणी-पुरवठा ह्यांचा मेळ बसू शकेल. उदाहरणार्थ अन्नधान्य ही बाब घेतल्यास ती गरीब, मध्यम, श्रीमंत वर्गांची एकच गरज आहे. सर्वांना धान्य हवे आहे, आणि ते गरजेपेक्षा वा मागणीपेक्षा कमी असल्यास ज्यांच्याजवळ धान्य खरेदी करण्याकरिता अधिक उत्पन्न आणि क्षमता असल्यास क्रयशक्ती नसणाऱ्या गरिबांना धान्य समाधानकारकपणे उपलब्ध होऊ शकणार नाही. देशातील गरीब माणूस अन्नधान्य, पुरेसा कपडा आणि निवारा ह्यांचीच प्रकर्षाने अपेक्षा करीत आहे. त्याला पुरेसे होईल इतके धान्योत्पादन झाल्याखेरीज देशातील अभियांत्रिकी उद्योग आणि आधुनिक राहणीमानाच्या फ्रीज, टीव्ही, मोटारगाडी इत्यादी वस्तु आणि सेवा निर्माण करणाऱ्या कारखानदारीत प्रचंड प्रगती झाली आणि ह्या गोष्टी आपण निर्यातही करू लागलो तरी ह्या आधुनिकीकरणाचा व्यवहार्य लाभ होऊ

अर्थ–नीति विशेषांकास आमच्या हार्दिक शुभेच्छा

# तंत्रज्ञ साहाय्य योजना

## या योजनेतर्फे तंत्रज्ञांना आता २॥ लाख रुपयांऐवजी ५ लाख रुपयांपर्यंत कर्जाची सोय

**बदललेली एकूण परिस्थिती व खर्चातील वाढ लक्षात घेऊन महावित्तने आपली तंत्रज्ञ साहाय्य योजना अधिक सवलतीची केली आहे.**

या नवीन योजनेनुसार आता तंत्रज्ञांना मिळणाऱ्या आर्थिक साहाय्याची मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर त्यांनी स्वतः उभारावयाचे भांडवल आता ७½ % एवढे कमी करण्यात आले आहे.

हे आम्ही कसे करू शकलो ?

तर...

तंत्रज्ञ साहाय्य योजना व आमची दुसरी एक आकर्षक अशी खास 'बीज भांडवल योजना' यांची आम्ही घातलेली सांगड !

हेच पहा ना !

समजा तुमच्या प्रकल्पासाठी लागणाऱ्या स्थावर मालमत्तेची किंमत १०० रुपये आहे तर त्यासाठी आम्ही ८५ रुपयांचे कर्ज तर देऊच, शिवाय ७॥ रुपये बीज भांडवलही देऊ. म्हणजेच पाहा की तुम्हां तंत्रज्ञांना फक्त ७॥ रुपयेच आणावे लागतील.

कर्जावरील व्याजाचा दर १२½ % (मागास विभागात ८½ % ते ९½ %त). तसेच परत फेडीसाठी दीर्घ मुदत.

बीज भांडवलावरील व्याजाचा दर अवघा १ %

या योजनेविषयी तुम्ही साहजिकच उत्सुक असाल. मग आमच्या कोणत्याही कार्यालयाशी संपर्क साधा किंवा लिहा.

महावित्त

# महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

MSFC

राष्ट्राची अग्रेसर प्रादेशिक विकास वित्तसंस्था

एम्. आर. कोल्हटकर
कार्यकारी संचालक

होमी जे. एच. तल्यारखान
अध्यक्ष

मुख्य कार्यालय : न्यू एक्सेलसियर बिल्डिंग, अमृत केशव नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनि : २६७७११-१२

विभागीय कार्यालये : मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, पणजी (गोवा)

शकणार नाही. भारतात गेल्या २०-२५ वर्षात आधुनिक कारखानदारी आणि तंत्र ह्यात बरीच प्रगति झाली आहे. प्रश्न खरा हा आहे की ह्या तंत्राचा वापर देशातील अत्यंत महत्त्वाचे नैसर्गिक साधन शेती, त्यांत व्यवस्थितपणे होत नाही. म्हणूनच शेती मागासलेली आणि कारखानदारी आंतरराष्ट्रीय पातळीची आधुनिक असा विसंवाद वाढू लागला आहे. कारखानदार, बुद्धिजीवी, स्वतंत्र व्यावसायिक (Professionals) शहरी मजूर ह्यांना अन्नधान्याची वाण भासत नसल्यामुळे ह्या वर्गाच्या अद्ययावत राहणीमानाच्या गरजा भागविण्याच्या वस्तू निर्माण करण्याकडे आपल्या उद्योगाचा कल दिसतो. म्हणूनच काही मोजक्या क्षत्रात आपण (रॉकेट) रॉकेटसारखी ऊर्ध्व दिशेने प्रगति करीत आहोत आणि आपल्या अर्थव्यवस्थेचा पाया असलेल्या (Base) कृषिक्षेत्राची प्रगति मात्र बैल, गाडीच्या गतीने समांतर दिशेकडे खिळून आहे. सर्व क्षेत्रांचे अद्यावतीकरण आणि संपूर्णपणे आधुनिकीकरण हाच मूळ मंत्र आपण मान्य करण्यावाचून दुसरा पर्याय नाही.

(११) ह्या करता सर्व क्षेत्रांना उपयुक्त होईल अशा प्रकारची संरचना (Infra Structure) उत्कृष्टपणे तयार करणे ह्यावर नियोजनाने भर दिला पाहिजे. अन्नपुरवठा योजना, पाणी पुरवठा योजना, घरे बांधून देण्याचे प्रकल्प, पुरेसे वस्त्र, शिक्षण, आरोग्य, तांत्रिक शिक्षण, वीज, कोळसा, अणुशक्ती, रेल्वे, दळण वळणाची साधने, अवजड उद्योग, अभियांत्रिकी उद्योगास आवश्यक असलेले लोखंड, पोलाद, तांबे, सिमेंट इत्यादि सारखे उद्योग, खते, बि-बियाणे, औषधे, रसायने इत्यादि उद्योग सहाय्यकारी उत्पादनावर भर देण्यात यावा.

## तूर्तास लघुउद्योग, ग्रामीण उद्योग, कुटिरोद्योग ह्यांवर भर देण्याची 'हवा' आहे. आपणांस ह्याबाबतीत काय वाटते.?

* ह्या सर्व उद्योगांची आवश्यकता रोजगार निर्माण करण्याकरताच आहे. हे लक्षांत घेतले पाहिजे. पण अशा रोजगारातून उत्पादन कमी वा महागडे (costly) होणार असल्यास रोजगार म्हणजे नेमके काय ह्यचा विचार झाला पाहिजे. भारतात आज खरा प्रश्न आहे 'रोजी' मिळवण्याचा म्हणजेच कामाचा मोबदला मिळवून त्यातून जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्न, कपडा, निवारा खरीदण्याची खरी समस्या आहे. आज देशाचा विचार करता, सर्व लोकांचे कापड हँडलूमने बनवायचे झाल्यास ते पुरेसे होणार नाही तसेच त्याचा खर्चही अधिक होईल. कापडगिरण्यातून जे मोठ्या प्रमाणावर कापड तयार होते ते जनतेच्या गरजा पुरवू शकण्याइतपत प्रचंड आहे. तसेंच त्याचा उत्पादनखर्च (दर मिटरचा) हँडलूमपेक्षा कमी आहे. मिलमध्ये तयार झालेली साडी हाताने विणलेल्या साडीपेक्षा निश्चितच स्वस्त आहे. तेव्हा वस्त्र विणण्याचे आधुनिक तंत्र स्वीकारले तरच ह्या देशाची गरज भागणार आहे. हे स्वप्नाळू मंडळींनी लक्षात घ्यावे. अन्न, वस्त्र जेवढे सर्व भारतीय जनतेला लागते. तेवढे उत्पादन करण्याकरिता आधुनिक तंत्र आपण स्विकारले तर; सर्व जनतेला ते पुरेसे आपण देऊ शकू तसेच ते स्वस्त दरानेही उपलब्ध करू शकू, ह्याचाच अर्थ हँडलूम इत्यादि अनार्थिक उद्योगांतून आपली श्रमशक्ती अधिक श्रेयस्कर व फलदायी उद्योगाकडे वळेल. हातमागाचा खरा अर्थिक लाभ बनारसी शालू वा तत्सम श्रीमंत मंडळींच्या वस्तूंचे उत्पादनातच आहे. अन्नधान्याचे उत्पादनही नव्या तंत्राने आपण विपुल केल्यास, काम न करता कोणालाही अन्न देता येणे अशक्य नाही. समजा देशातल्या कोणत्याही माणसाला भुकेच्या वेळी मोफत अन्न पुरविण्याची व्यवस्था निर्माण केल्यास रोजगाराचे भय राहणार नाही. अशा प्रकारची उत्पादनवाढ नव्या तंत्राखेरीज अशक्य आहे. सारांश रोजगार निर्माण करण्याकरता वस्तूच्या उत्पादनखर्चाचा बोजा वाढवून घेणे तसेच टंचाईला निमंत्रण देणे ह्यापेक्षा नव्या तंत्राने, यांत्रिकीकरणाने वस्तूचे उत्पादन अधिक वाढविणे आणि त्याचा खर्च कमी करून ती जवळ-जवळ मोफत पुरविण्याची क्षमता निर्माण करणे ही गोष्ट अधिक तर्कसंगत आहे.

ह्या देशात अर्थिक विकास करायचा म्हणजे नेमके काय? तर, सर्वसामान्य माणसाच्या उपभोगक्षमतेची वाढ करावयाची असेच ना? त्याचे रहाणीमान वाढवायचे असल्यास त्याचे उत्पन्न वाढविले पाहिजे. पण दरडोई उत्पन्न वाढवायचे म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून दरडोई उत्पादन (per capital output) वाढविले पाहिजे. नवे तंत्र म्हणजे तरी काय? त्याचा सरळ अर्थ आहे दरडोई उत्पादनात वाढ करणे तसेच दरडोई उत्पादनखर्चात घट करणे. म्हणूनच मला आश्चर्य वाटते ते हे की, अर्थतज्ज्ञ मंडळी ह्या ग्रामीण कुटिर उद्योग, हस्तव्यवसाय, श्रमप्रधान (Labour-intensive) अशा बाबींवर आपले स्पष्ट परखड मत का देत नाहीत! विकास आणि परंपरागत उत्पादनपद्धती ह्या दोन्ही गोष्टी परस्परविसंगत (contradictory) आहेत. हस्तव्यवसाय हा अल्पसंख्य श्रीमत वर्गाच्या कलात्मक वस्तूंच्या गरजा भागवू शकेल. यंत्रप्रधान उद्योग हाच भारतातील बहुसंख्य लोकांच्या सर्वसामान्य गरजा भागवू शकेल. आधुनिक उद्योगात (Sophisticated Industry) काम करणाऱ्या श्रमिकांचे ८ तासांतील उत्पादन, परंपरागत

[पृष्ठ ४१ वर पहा]

*Our best wishes for prosperity*

*of Artha and Artha's Readers From*

# M/s K. S. Nigade

**Engineers and Contractors**
**Manufacturers of Control Panels**
**Industrial heaters etc.**

**Pune – Nagar Road,**
**Pune**

*With best compliments to*

*ARTHA From*

# M/s A 1 Engineering

**Nawi Peth, Pune.**

**Manufacturers and Dealers in**

**Foundry Equipment**

# आर्थिक धोरण

* प्रा. नी. वि. सोवनी *
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

'नवी विट्टी नवे राज्य' या म्हणीप्रमाणे नवीन शासनाचे आर्थिक धोरणही नवेच असावे ही अपेक्षा साहजिकच आहे. त्यासंबंधी चर्चा करण्याच्या आधी 'धोरण' व विशेषतः 'आर्थिक धोरण' या संज्ञेभोवती कल्पनारम्यत्वाचे जे वलय निर्माण झाले आहे ते प्रथम नाहीसे केले पाहिजे. आर्थिक धोरण हे आर्थिक स्थितीचे व इतर परिस्थितीचे मुख्य कारक आहे असा पुष्कळांचा समज आहे. त्याचप्रमाणे अशा धोरणाचे स्वरूप, त्याची सुसंगतता, त्यातील प्रमेये व निष्कर्ष यांवरच त्याचे प्रत्यक्षातील यश ठरते अशीही समजूत सर्वत्र दिसते. असे धोरण प्रत्यक्षात उतरविण्याच्या मार्गातील अडचणी, त्यात पूर्वानुभवावरून निश्चितपणे आलेले अपयश, याची यासंबंधात दखल घेण्याची फारशी पद्धत नाही. आर्थिक धोरणाचे कर्तृत्व व कारकत्व हे सर्वसामान्यतः समजले जाते तितके मोठे नसते यावर बहुतेकांचा विश्वास बसणे कठीण असते. परंतु कितीही अप्रिय असले तरी ते सत्य आहे आणि ते डावलता येणे कठीण आहे. म्हणून तेथूनच सुरुवात करणे आवश्यक आहे.

निवडणुकीचा जाहीरनामा आर्थिक किंवा कोणत्याही शासकीय धोरणाबाबतचे निवेदन किंवा पंचवार्षिक योजनेचा अहवाल हे सर्व सजातीय प्रकार आहेत. अप्रगत देशातच नव्हे तर सोव्हिएट, रशिया वगैरे साम्यवादी देशांतही या सर्वांचा मुख्य हेतु सजावटीच्या किंवा आराशीच्या स्वरूपाचा असतो. त्यातील घोषणा प्रकल्प वगैरे प्रत्यक्षात किती आणता येतील, आणल्या जातील व मूर्त स्वरूपात अवतरतील हे इतर पुष्कळ गोष्टींवर अवलंबून असते. उक्ति आणि कृति यांच्यातील फरक सर्वश्रुतच आहे. ही निवेदने वगैरे मुख्यतः राजकीय असतात आणि ते साहजिक आहे. राजकारणाचा अंतिम हेतु धोरण ठरविणे हाच असतो. म्हणून धोरणात राजकारण प्रामुख्याने प्रतिबिंबित व्हावे हे साहजिकच आहे. आर्थिक धोरण हे मुख्यतः राजकीय तर्कशास्त्रावर अधिष्ठित असते, असावे लागते. आर्थिक सिद्धांतानुसार अगर तर्कशास्त्रानुसार त्याची घडण होत नाही. राजकीय तर्कशास्त्राशी जेथे आर्थिक तर्कशास्त्राचा विरोध येत नाही तेथेच ते चालवून घेतले जाते. पर्क्षी त्याचा त्याग केला जातो. म्हणून आर्थिक धोरणासंबंधीचे निवेदन हे अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार असेल अशी अपेक्षा करणे चूक ठरेल. मात्र ते तसे आहे असे वाटावे, निदान दिसावे, अशी ते घडविण्याची खटपट असते. आर्थिक धोरणासंबंधीच्या मर्यादित अर्थाचा हा संदर्भ सतत ध्यानात बाळगला पाहिजे.

शासनाचे सर्वसाधारण किंवा आर्थिक धोरण—विशेषतः त्याची करणात्मक बाजू – कार्यवाहीत येण्याच्या प्रक्रियेवरही पुष्कळ मर्यादा असतात. शासकीय धोरण अमलात आणण्याचे मुख्य साधन शासकीय नोकरशाही होय. नोकरशाहीच्या संदर्भातील मर्यादा प्रसिद्ध आहेत; परंतु या मर्यादा मुख्यतः संशयातीत आदेशांचा अभाव, शासकीय नोकरांची अकार्यदक्षता, भ्रष्टाचार, लाचलुचपत वगैरे गोष्टींमुळे पडतात व त्यांचे निर्दालन त्वरित व सहजसाध्य आहे अशी समजूत सर्वत्र पसरलेली दिसते. परंतु या गोष्टी जरी 'अशक्य ते शक्य' होऊन नाहीशा केल्या गेल्या तरीसुद्धा नोकरशाहीच्या कार्यवाहीतील अकार्यदक्षता फार मोठ्या प्रमाणावर कमी होण्याचा संभव नाही. कारण ती नोकरशाही या संस्थेच्या कार्यानुवर्तनाच्या स्वभावात अनुस्यूत आहे, किंबहुना नोकरशाहीचा हा स्वभावधर्म शासकीय नियोजनासंबंधीच्या मूलभूत कल्पनेशीच विरोधी आहे. कोणत्याही प्रश्नाचा व्यापक बुद्धिनिष्ठ विचार करून तो तर्कशुद्ध रीतीने कसा सोडवावयाचा याचा मार्ग तपशीलवार आखणे हा नियोजनाचा गाभा समजला जातो. नोकरशाहीच्या कार्यानुवर्तनाच्या पद्धतीत कोणताही प्रश्न कायमचा सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली जात नाही. कोणत्याही प्रश्नावर वारंवार उपाय करणे हा नोकरशाहीचा स्वभाव आहे. कारण नोकरशाही ही दैनंदिन कालक्षितिजापलीकडे फारशी

पाहात नाही. ती वर्तमानातच वावरत असते त्यामुळे अल्पकालीन तात्कालिक उपाययोजनेकडेच तिचा कल असतो. एखादा प्रश्न जाचू लागला म्हणजे त्या वेळेपुरती त्यासंबंधी कारवाई करून तो जाच तात्पुरता संपवावयाचा व तो पुन्हा जाणवू लागेपर्यंत त्याकडे दुर्लक्ष करावयाचे ही नोकरशाहीची सनातन रीत आहे. म्हणूनच नोकरशाही प्रश्न कायम सोडविण्याचा प्रयत्न कधीच करीत नाही. त्याच प्रश्नावर पुन: पुन्हा प्रक्रिया करून त्या प्रश्नाची तात्पुरती व्यवस्था लावते. नोकरशाही या संस्थेच्या कार्यानुवर्तनाच्या या मूलभूत मर्यादा आहेत. म्हणून या संस्थेच्या मूलभूत स्वभावातच जर काही सुधारणा झाल्या तर गोष्ट निराळी. परंतु अशी सुधारणा सहजसाध्य अगर तातडीने होणारी नव्हे. म्हणून सध्याच्या काळात तरी निदान तो प्राप्त परिस्थितीचा एक भाग म्हणून समजला पाहिजे.

शासकीय धोरणाच्या कार्यवाहीबद्दल आणखी एक समज फार लोकप्रिय आहे. तो म्हणजे शासकीय धोरणाच्या कार्यवाहीत सामान्य जनता सहभागी न झाल्यामुळे त्याची कार्यवाही असमाधानकारक होते. हा समज बरोबर नाही. वस्तुस्थिति त्याच्या अगदी उलटी आहे. बुद्धिमंतांना वाटते तशी इतकी जनता अकरणात्मक नाही. करणात्मक वर्तनासंबंधी ती पूर्णपणे उदास असली तरी ज्या गोष्टी तिला नको असतात त्या कार्यवाहीत येऊ नयेत याबद्दल ती अत्याग्रही व कार्यशील असते ही अनुभवाची गोष्ट आहे. जमीनसुधारणा सर्वस्वी कायद्याप्रमाणे अंमलात आणल्या जात नाहीत याचे मुख्य कारण जमीनमालक वर्गाला त्या नको असतात हे सुप्रसिद्ध आहे. परंतु या उदाहरणात सत्ताधारी वर्ग व समाजातील सत्तेची संरचना वगैरे गोष्टींचा संबंध येतो व त्यामुळे हे होते असा युक्तिवाद करता येतो. म्हणून त्यांचा जेथे फारसा संबंध येत नाही अशी एक दोन उदाहरणे घेणे आवश्यक आहे. चीनशी झालेल्या लढाईच्या प्रसंगी 'सुवर्ण नियंत्रण' कायदा केला गेला त्याचा बोजवारा काय झाला हे सर्वांना परिचित आहे. ते नियंत्रण आर्थिकदृष्ट्या सयुक्तिक होते पण जनतेला मुळीच आवडणारे नव्हते. अस्पृश्यतेसंबंधीच्या कायद्यांचीही तीच अवस्था आहे. हुंडाबंदी कायद्याला फारसे यश प्राप्त झालेले नाही. कुटुंब-नियोजन सर्वच दृष्टीने आवश्यक आहे याबद्दल बुद्धिवाद्यांत जरी एकमत असले तरी जनतेत त्यास फारसा पाठिंबा नसल्यामुळे त्यासंबंधीच्या शासकीय धोरणाची अंमलबजावणी समाधानकारक होत नाही. ती जबरदस्तीने केली तर शासनच सत्ताभ्रष्ट होऊ शकते हे नुकत्याच झालेल्या निवडणुकांच्या निकालावरून स्पष्ट झाले आहे. अशी आणखी कितीतरी उदाहरणे देता येतील. तेव्हा गेल्या काही वर्षांत शासकीय धोरण व त्याची कार्यवाही यांतील तफाव[illegible] ही जनतेच्या औदासीन्यामुळे नसून त्यांच्या प्रतिकूल सह[illegible] भागित्वामुळे पडलेली आहे हे ध्यानात घेणे जरूर आहे.

-आणि त्याच अनुषंगाने ध्यानात घ्यावयाची आणखी ए[illegible] गोष्ट म्हणजे शासन ही जनतेपेक्षा निराळी अशी काही संस्थ[illegible] आहे व ती जनतानिरपेक्ष स्वतंत्रपणे पुष्कळ गोष्टी करू शक[illegible] असा जो बुद्धिमंतात सर्वत्र पसरलेला समज आहे तोही बरोब[illegible] नाही. परकीय ब्रिटिश शासनाबद्दल तसे म्हणणे मर्यादि[illegible] अर्थाने का होईना बरोबर ठरले असते. त्या शासनाला इंग्लंड मधील पार्लमेंटला जाब द्यावा लागे, हिंदी जनतेला नव्हे. त्यामुळे हिंदी जनतेच्या आवडीनिवडींची पर्वा न करता काही बाबतीत त्या शासनाला तसे वागणे शक्य होते. परंतु स्वतंत्र हिंदुस्थानच्या लोकशाही शासनाला तसे वागण्याची मुळीच सोय नाही. शासनाने काय करावे, शासन काय करू शकते वगैरे संबंधीच्या बुद्धिमंतांच्या कल्पना ब्रिटिश शासन काय व कसे करू शकत असे याच्या अनुभवावर व माहितीवर आधारलेल्या आहेत. त्या कल्पना स्वतंत्र हिंदुस्थानातील लोकशाही शासनावर कलम करणे अवास्तव आहे हे विसरून पुष्कळ प्रसंगी शासनाला विनाकारण दोष दिला जातो. शासन हे जनतेच्या प्रवृत्तींचे, तिच्या कार्यदक्षतेचे, तिच्या आवडीनिवडींचे प्रतिबिंब असते, आणि ते तसे असणे हे लोकशाहीत साहजिकच आहे. त्यामुळे शासनाचे गुणदोष व जनतेचे गुणदोष यांत फारसा फरक नसतो. त्यांचा संबंध बिंब-प्रतिबिंबासारखा असतो.

'धोरण' व 'आर्थिक धोरण' या संज्ञांच्या वर विश्लेषिलेल्या मर्यादित अर्थाच्या संदर्भात नव्या शासनाच्या आर्थिक धोरणा[illegible] बद्दल आता विचार करता येईल. कोणत्याही शासनाचे आर्थि[illegible] धोरण दोन अक्षांच्या संदर्भात ठरते. त्यांपैकी एक अक्ष त्य[illegible] शासनाची सर्वसाधारण विचारसरणी व दुसरा अक्ष म्हण[illegible] स्थळकालपरिस्थितीनुरूप त्या शासनापुढे असलेली देशाची व त्याच्या अर्थव्यवस्थेची संरचनात्मक स्थिति. पहिल्या अक्षा संबंधी विचार करावयाचा तर जनता पक्षाचे शासन कोणत्य[illegible] विचारसरणीचे आहे याचा अंदाज बांधावयाचा. सर्वसाधारणपणे विचार करता ह्या शासनाची विचारसरणी उजवी कडे कललेली आहे असे वाटते. शेतीविकासावर भर, गांधींचे अर्थशास्त्र, राष्ट्रीयीकरणास सर्वसाधारण अननुकूलता वगैरे गोष्टींवर त्याचा भर असणार हे त्यातील जबाबदार व्यक्तींनी केलेल्या आतापर्यंतच्या घोषणांवरून सहज दिसते. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार त्यांच्याकडून फार मोठ्या प्रमाणावर होईल अशी शक्यता कमी दिसते. खासगी व्यापार व उद्योगधंदे यांना

व्यापलेल्या क्षेत्रास विरोधी असे त्यांचे धोरण असण्याचा संभव कमी दिसतो. कामगारवर्ग व त्यांचे प्रश्न यासंबंधी त्याला आस्था असली तरी सर्वस्वी त्यांच्या बाजूला झुकणारे हे शासन नाही अशी खूणगाठ बांधावयास हरकत नाही.

स्थळकाळपरिस्थितीचा अक्ष हा अल्पकाळात बदलणारा नसतो. हिंदुस्थानचे विस्तीर्ण क्षेत्र, शेतीवर निर्वाह करणारी बहुसंख्य जनता, अनियमित पावसावर अवलंबून असलेली शेती, वाढलेली व वाढती लोकसंख्या, दारुण दारिद्र्य, पराकाष्ठेची आर्थिक व सामाजिक विषमता वगैरे संरचनात्मक गोष्टी हिंदुस्थानच्या कोणत्याही शासनाला त्याच असतात. त्यामुळे आर्थिक धोरणावर पडणारे निर्बंध किंवा धोरणासंबंधी मर्यादित निवडच करण्याची शक्यता हेही सर्वच शासनाला सारखेच असतात. या स्थळकाळ-विशिष्ट परिस्थितीत जनता शासनाच्या विचारप्रणालीनुसार आर्थिक दृष्ट्या निर्माणक्षम असे धोरण आखता येईल का व तसे आखले जाईल का हा आपल्यापुढचा मुख्य प्रश्न होय. या प्रश्नाला अल्पकालीन व दीर्घकालीन अशा दोन बाजू आहेत. त्यांचा विचार निरनिराळा करणे योग्य ठरेल.

अल्पकाळात शासनापुढे प्रामुख्याने उभा असलेला प्रश्न हा चलन अतिवृद्धीचा आहे. १९७६ च्या मार्च महिन्यापर्यन्त किंमती उतरत होत्या. परंतु त्यानंतरच्या काळात त्या सुमारे १२ टक्क्यांनी वाढल्या आहेत. त्याच काळात देशातील पैसा व पतपैसा यांची सुमारे १९ टक्के वाढ झाली आहे. किंमतवाढ ही गळिताची धान्ये, विशेषतः शेंगदाणे, कापूस अशा काही वस्तूत विशेषत्वाने केंद्रित झालेली दिसते. यासंबंधी शासनाने काय करावे? ही परिस्थिति चलन अतिवृद्धीची आहे हे शासकीय प्रवक्त्यांच्या उद्गारावरून शासनालाही मान्य आहे असे दिसते. चलनाची बेसुमार वाढ झाल्यामुळे ही परिस्थिति निर्माण झाली आहे हेही त्यांना मान्य दिसते. तसे असेल तर त्यासंबंधी त्यांचे धोरण काय असावयास पाहिजे हे सहज सांगणे शक्य आहे. शासकीय व खासगी खर्चास कात्री, नफा, वेतन व महागाईभत्ता यांच्या वाढीवर निर्बंध, बचतीची सक्तीच्या व इतर योजनाद्वारे वाढ, मोठी करवाढ, तुटीचा अर्थसंकल्प टाळणे, पैसा व पतपैसा यांच्या वाढीवर निर्बंध, व्याजाचे दर कमी न होऊ देणे, वगैरे, वगैरे. परंतु यांपैकी पुष्कळशा गोष्टी जनता शासनाला अंगीकारणे कठीण आहे असे वाटते. वकील ब्रह्मानंद यांच्या 'फुलमंगल' वगैरे निवेदनात सुचविलेली या व अशा प्रकारची धोरणे ही बहुतेक जनता पक्षाच्या निवडणूक जाहिरनाम्यात देऊ केलेल्या वचनांशी विरोधी आहेत. अर्थात् प्रत्यक्ष परिस्थिति लक्षात घेता त्या घोषणांना शासनाने किती महत्त्व द्यावयाचे हे ठरवावयाचे असते. परंतु बहुधा सनातन पद्धतीप्रमाणे शासन दोन्ही डगरीवर हात ठेवण्याचा प्रयत्न करील व त्यात त्यास नेहमीप्रमाणे अपयश येईल असे भविष्य वर्तविण्यास मुळीच हरकत नाही. आतापर्यन्त जनता शासनाने यासंबंधी ज्या गोष्टी केल्या आहेत त्या याच्याच द्योतक आहेत. व्याजाचे दर कमी करण्याचे धोरण, सक्तीच्या बचतीच्या योजनांचे अर्धवट विसर्जन, व्यापारी व उद्योगपति यांना आव्हान देऊन अगर शाब्दिक जरब देऊन किंमती रोखण्याचे प्रयत्न, वगैरे सर्व गेल्या तीस वर्षांत पुनः पुनः वापरलेली हत्यारेच जनता शासन वापरीत आहे व वापरणार हे उघड दिसते. प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीनेही ही हत्यारे कुचकामी आहेत हाही अनुभव वारंवार आलेला आहे. पण याच "येरे माझ्या मागल्या" मार्गाने जनता शासन जाणार आहे असे आतापर्यंतच्या प्रसादचिन्हांवरून वाटत आहे.

दीर्घकालीन आर्थिक धोरणाबद्दल विचार करावयाचा तर हाच चलन अतिवृद्धीचा संदर्भ पुढे चालविता येईल. कारण काही डाव्या गटाच्या अर्थशास्त्रज्ञांच्या मते देशातील सध्या प्रचलित असलेल्या चलन अतिवृद्धीचा प्रश्न हा अल्पकालीन नसून दीर्घकालीन आहे. त्यांच्या मते या देशाची आर्थिक संरचनाच अशा चलन अतिवृद्धीला सतत जन्म देणारी आहे. सध्याची चलन अतिवृद्धि ही संरचनाजन्य आहे. त्यामुळे वर उल्लेखिलेल्या वरवरच्या उपायांनी ती जेरबंद होणार नाही. त्यासाठी देशाची आर्थिक संरचनाच आमूलाग्र बदलली पाहिजे. त्यासाठी शेतजमिनीचे सक्तीचे समान वाटप, सर्व उद्योगधंदे व व्यापार यांचे राष्ट्रीयीकरण, अवजड व उत्पादन साधने निर्माण करणाऱ्या उद्योगधंद्यांची सार्वजनिक क्षेत्रात वाढ, खुल्या किंमतींच्या तालावर नाचणाऱ्या बाजारपेठेची हद्दपारी, जागतिक पेढी अगर परदेश यांच्याकडून कर्ज न घेण्याचा निश्चय, वगैरे उपाय ते सुचवितात. हे जोपर्यंत अंमलात येत नाही तोपर्यंत चलन अतिवृद्धीची परिस्थिति नाहीशी होणे शक्य नाही. याच मार्गाने गेल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास वेगाने व भरीव होणार नाही. एकप्रकारे आर्थिक विकासासाठी दीर्घकालीन धोरण काय असावे यासंबंधीच्या या तपशीलवार कल्पना आहेत. विकासाच्या कार्यक्रमाचा पाया म्हणून त्यांचे महत्त्व काही असले तरी देशातील सध्याच्या चलन अतिवृद्धीसंबंधीची त्यावर आधारलेली मीमांसा तपासून पाहण्यास येथे अवकाश नाही. फक्त ती बरोबर नाही एवढेच येथे नोंदवून पुढे जाऊ या.

दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या सुचविलेल्या निरनिराळ्या मार्गांपैकी एका व साधारणपणे डाव्या गटाचे स्थूलमानाने हे

विचार आहेत. अशा प्रकारचा आर्थिक विकासाचा आकृतिबंध हा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत अनुस्यूत होता व तिसऱ्यातही थोडयाफार प्रमाणात होता. त्यानंतर, म्हणजे साधारणपणे १९६६ नंतर, जे काय दुर्बल नियोजन या देशात चालू आहे ते या आकृतिबंधापासून दूरदूरच जात आले आहे. त्यामुळे या काळात आर्थिक प्रगति फारशी झालेली नाही असे या गटाचे म्हणणे आहे. याउलट विकासाचा हा आकृतिबंध सर्वस्वी चूक आहे व गांधींच्या तत्त्वज्ञानावर आधारलेली विकास योजनाच या देशाच्या प्रकृतीला मानवणारी व हितप्रद आहे असे दुसऱ्या एका गटाचे म्हणणे आहे. औद्योगीकरणावर अवास्तव भर दिल्याकारणाने व शेती विकासावर त्या मानाने कमी भर दिल्याने आतापर्यंतच्या विकास योजनांद्वारा देशाचा आर्थिक विकास फारसा झालेला नाही. त्याचप्रमाणे रोजगार निर्माण करण्याकडे दुर्लक्ष झाले आहे व त्यातून बेकारीची बिकट समस्या निर्माण झाली आहे. ही विचारसरणी साधारणतः जनता पक्षाची असावी असे तिच्या प्रवक्त्यांच्या व पुढाऱ्यांच्या वक्तव्यांवरून वाटते व तिलाच दीर्घकालीन धोरणाच्या घडणीत महत्त्व प्राप्त होईल असे म्हणावयास हरकत नाही.

आरंभीच म्हटल्याप्रमाणे धोरण, नियोजन वगैरे संबंधीचा मर्यादित अर्थ लक्षात घेतला तर या निरनिराळ्या विचार-प्रणाली विकासनियोजन ठरविणाऱ्या दोन अक्षांपैकी एकाच अक्षाशी संबंधित आहेत. दुसरा स्थळकाळपरिस्थितीचा अक्ष सर्वांना सारखाच आहे. या निरनिराळ्या विचारप्रणाली एकमेकांशी तोलून त्यातली सर्वांत योग्य कोणती असे विवेचन पुष्कळ वेळा केले जाते. परंतु अशा विवेचनात प्राप्त परिस्थितीत सर्वस्वी चपखल बसणारे एकमेव आर्थिक धोरण आहे वा असू शकते हे गृहीत धरलेले असते. हे गृहीततत्त्व बरोबर नाही. प्रत्येक मूर्त वा अमूर्त धोरण हे गुणदोषांनी युक्त असते. संपूर्णपणे दोषमुक्त धोरण ही कविकल्पना आहे. वास्तवात कोणत्याही धोरणात मर्जीप्रमाणे दोष काढता येतात किंवा गुण शोधता येतात. म्हणून सर्वदोषमुक्त अशा आदर्श धोरणाच्या मृग-जळामागे न धावता कोणतेही धोरण स्वीकारले तरी ज्या नुसत्याच मूलभूत सामाजिक घटितावर त्याचे प्रत्यक्षातील यश अवलंबून असते त्याबद्दल विचार करणे जास्त सयुक्तिक ठरेल.

योजनांची कार्यवाही नीट होत नाही हा आज ३० वर्षांचा अनुभव आहे. त्याची कारणे कोणती यांचा फारसा खोलवर विचार आपण केलेला नाही. राज्यकर्त्यांचा भ्रष्टाचार, शासकीय नोकरशाहीची अकार्यदक्षता वगैरे नेहमीच्या सभेतील वक्तव्यां-तील कारणांच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची आपली तयारी नाही. कारण तसे केले तर बऱ्याच न आवडणाऱ्या लोकप्रिय नसणाऱ्या गोष्टीसंबंधी व आपल्या समाजाच्या दोषांविषयी बोलावे लागेल. परंतु हे अप्रिय पण पथ्यकर अ विश्लेषण केल्यास या सर्वांच्या मुळाशी आपल्या समाजाती संस्थांचे व त्यांच्या कार्यानुवर्तित्वाचे संस्कृतिजन्य दुर्बल आहे हे लक्षात येईल. ५० वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील नामवं इतिहासकार वासुदेवशास्त्री खरे यांनी केळकरकृत 'इंग्रज मराठे' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत मराठ्यांच्या (व पर्याया हिंदी लोकांच्या) ऱ्हासाची कारणे सांगताना त्यांचा इंग्रजांच्य तुलनेने सर्वांत मोठा दोष म्हणजे 'संस्थात्मक जीवनाचा अभाव हे दिले आणि हा दोष दूर झाला नाही तर येणाऱ्या स्वराज्याच हो बोजवाराच उडेल असा इतिहास डिंडिमाचा इषारा आ असेही सांगितले. त्याचा प्रत्यय आज येत आहे.

आधुनिक समाजव्यवस्था – साम्यवादी वा भांडवलशाही उभारण्यासाठी व तिच्या सुसूत्र कार्यानुवर्तनासाठीं इहवादी जुन्या परंपरेबाहेरील अशा आधुनिक संस्थांचे जाळे उत्प व्हावे लागते. त्यासाठी लागणाऱ्या प्रेरणा, मूल्ये, प्रबोधन सामाजिक कर्तव्यबुद्धि, इहवादी दृष्टिकोन वगैरेंचा आपल्य समाजात अभाव असल्यामुळे आपल्या समाजात आज दिसणाऱ्य अशा संस्था मुख्यतः अनुकरणाने उत्पन्न झालेल्या, त्यांच्य पाश्चिमात्य प्रतिमानांसारख्या दिसणाऱ्या परंतु त्यांचा इहवाद सामाजिक आत्मा हरवला असलेल्या – म्हणजेच आमच्या खा पद्धतीप्रमाणे चालणाऱ्या – आहेत. त्यामुळे त्या दिखाऊ, आधुनिकीकरणाच्या दृष्टीने व समाजबळ उत्पन्न करण्याच्य दृष्टीने निकामी आहेत. हे आजचे दुखणे नाही. शतकां आहे. राज्यकर्त्यांचा भ्रष्टाचार व नोकरशाहीची अकार्यदक्षत ही या मूळ दुखण्याचीच दोन उपांगे आहेत. ती मूळ रो नव्हे. या रोगामुळे आमच्या विकास प्रयत्नांना फार मोठ पायबंद बसतो. योजना कितीही चांगल्या व निर्दोष करा त्य कार्यवाहीत आणण्यातील आमची दुर्बलता व अकार्यदक्षत त्यांचा पार नाश करून टाकतात. या रोगाचे मुख्य कार सामाजिक प्रबोधनाची व परिवर्तनाची अपूर्णता व दुर्बल हे आहे. त्यासंबंधी काही करण्याची आवश्यकता खास आहे परंतु ते कोणत्याही शासकीय धोरणात अगर नियोजनात बस नाही, म्हणून जनता शासनाने काय आर्थिक धोरण आखा या प्रश्नात मला फारसे तथ्य वाटत नाही, त्याने कोणतेह धोरण स्वीकारावे; परंतु त्याची यशस्वी कार्यवाही करण्यासाठ ते काय करणार आहेत यात मला रस आहे.

(साधना समाज प्रबोधन सौजन्याने)

# लोकशाही प्रक्रिया व आर्थिक क्षेत्र

* डॉ. वि. म. दांडेकर *
संचालक, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था पुणे

खाजगी मालमत्तेचा अमर्याद अधिकार व निरंकुश अर्थव्यवहाराच्या तत्त्वज्ञानाची अनिर्बंध अंमलबजावणी असाच गैरसमज आर्थिक क्षेत्रातील लोकशाही प्रक्रियेबद्दल बहुधा करून दिला जातो. हा समज अर्थातच चुकीचा आहे.

काही थोडया लोकांच्या हातात आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होत असताना लोकशाही प्रक्रिया निश्चित राहू शकणार नाही. त्याचप्रमाणे एखाद्या गरीब जनतेच्या दुरावस्थेबद्दलही लोकशाही प्रक्रिया बघ्याची भूमिका घेऊ शकणार नाही.

परंतु आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण रोखण्याची इच्छा व गरिबांबद्दलची कळकळ असूनही लोकशाही राष्ट्रांनी पुष्कळदा काही अविवेकी व स्वार्थी राजकारण्यांच्या हातांत मोठ्या प्रमाणात राजकीय व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ दिले असल्याचे दिसून येते. या केंद्रीकरणाबरोबरच नोकरशाहीचा विस्तार केला जातो. आणि अर्थव्यवस्थेवरील एकतर्फी नियंत्रण या नोकरशाहीच्याच हाती जाते. लोकशाही प्रक्रिया यामुळे अर्थातच धोक्यात येते.

आर्थिक क्षेत्रातील लोकशाही प्रक्रियेत निर्णय घेणाऱ्या यंत्रणेस मजबूत केले जाते. विविध व्यक्ति, स्वयंस्फूर्त संघटना, सहकारी संस्था व कायदेशीर लोकनियुक्त पदाधिकारी या यंत्रणेत क्रियाशील भाग घेत असतात.

## दक्षतेची आवश्यकता

अकरणात्मकदृष्टया बोलावयाचे झाल्यास या यंत्रणेने भांडवलशाही किंवा संघटित कामगार यांपैकी कोणत्याही विशिष्ट क्षेत्राची मक्तेदारी चालू देता कामा नये. तसेच आवश्यकता असल्याशिवाय नोकरशाहीचा देखील विस्तार होऊ देता कामा नये. मक्तेदार व नोकरशाही यांच्या साहाय्याने राजकीय व आर्थिक सत्ता बळकावून लोकशाही प्रक्रिया धोक्यात आणण्यास टपून बसलेल्या राजकारणी मंडळींच्या कारवायांकडे या यंत्रणेने डोळ्यात तेल घालून लक्ष दिले पाहिजे.

## शेतीबद्दल एकतर्फी भूमिका

माझा हा मुद्दा स्पष्ट करावयाचा झाल्यास किमान जमीन धारणेचा उल्लेख करता येईल. ही बाब सार्वजनिक धोरणाचा एक भाग झाल्याने शेत-जमिनीसारख्या एका उत्पादक साधनाबाबत त्यामुळे एक खास स्वरूपाची एकतर्फी भूमिका निर्माण झाल्याचे कोणाच्या लक्षातही येत नाही. शिवाय त्यानुसार घालण्यात आलेल्या विशिष्ट मर्यादाही बहुधा एकतर्फीच वाटतात.

अतिरिक्त जमिनीचे वाटपही बहुधा एकतर्फीच असते. कारण ज्यांना जमीन दिली जाते त्यांच्याजवळ मशागतीची साधने व ती करण्याची क्षमता यांचा अभाव असतो. नोकरशाहीची लाचलुचपत व राजकीय भ्रष्टाचाराचाच बहुधा या जमीन वाटपात जोर असतो.

याच्या उलट प्रस्थापित जमीन धारणा कायदा, जमीन धारणेवर कोणतीही एकतर्फी मर्यादा घालीत नाही. अपेक्षित दिशेने जमिनीचे फेरवाटप होण्याच्या दृष्टीने हा कायदा विशेष जोर देतो असे दिसते. मशागतीची क्षमता व करयोजनेला मिळणारा प्रतिसाद या गोष्टी लक्षात घेऊन संबंधित व्यक्ति व सरकार जमिनीच्या खरेदी-विक्रीचे निर्णय घणार असल्याने राजकारणी व नोकरशहांच्या लुडबुडीस विशेष वाव राहिलेला नाही.

## निरर्थक प्रयोग

शेतीतील किमान वेतन कायदाही एक निरर्थक प्रशासकीय प्रयोग ठरला आहे. रोजगार देण्याची शक्ति नसताना किमान वेतन देण्यास सांगणे शक्यच नाही. याच्या उलट ग्रामीण रोजगारहमी योजना आपोआपच शेतीतील किमान वेतन सुनिश्चित करते. वर्षाच्या बोलीने जमीन करण्यापेक्षा वेतन देणारा रोजगार स्वीकारण्यास अशा जमिनीचे मालक यापुढे उद्युक्त होतील. लहान व खर्चिक जमिनीवर प्रत्येकास उपजीविका करावयास लावण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरला आहे.

## किमान उत्पन्न

ग्रामोद्योग, कारागिरी उद्योग व रस्त्यावरील चहाच्या दुकानासारखे नव्याने वाढणारे उद्योग यांतील तथाकथित स्वयंरोजगाराच्या बाबतीतही ही गोष्ट खरी ठरली आहे. या उद्योगांत स्वयंरोजगार मिळालेल्या लोकांपैकी अनेकजण किमान उत्पन्नही मिळवू शकत नाहीत. किमान वेतनाची हमी दिल्यास ही मंडळी वेतन रोजगाराकडे वळण्याचीच अधिक शक्यता आहे.

स्वयंरोजगार निर्माण करण्याच्या अगोदरच्या कार्यक्रमांनी खरे पाहता नोकरशाहीच वाढविली· राजकीय हितसंबंध वाढविले, आणि लोकांना किरकोळ नोकरशहांवर आणि त्यांच्यापेक्षाही किरकोळ अशा राजकारण्यांवर अवलंबून राहण्यास भाग पाडले.

## धान्याचे सार्वजनिक वाटप

अन्नधान्यासारख्या जीवनावश्यक वस्तूंचे सार्वजनिक वाटप हेही उदाहरण देता येईल. खाजगी व्यापाऱ्याकडे हे काम पूर्णतः सोपविता येणार नाही याबद्दल विशेष शंका नसली तरी पूर्वीच्या धोरणांनी व पद्धतींनी गृहीत धरल्याप्रमाणे त्याचा पर्याय नोकरशाही व राजकीय व्यवस्थापन होऊ शकत नाही. कारण असे व्यवस्थापन खर्चिक व अकार्यक्षम ठरले आहे.

नोकरशाही व राजकीय हस्तक्षेपापासून स्वतंत्र व पुरेशी विकेंद्रित अशी सार्वजनिक वितरण व्यवस्था हा याला योग्य पर्याय होऊ शकतो. यात निर्णय घेण्याची जबाबदारी स्वतंत्र सार्वजनिक खरेदी-विक्री संघटनांकडे असली पाहिजे. हे करणे शक्य असून लोकशाही प्रक्रियेनेच हा प्रश्न सोडविला पाहिजे.

## विकेंद्रित व्यवस्थापन

रेल्वे, रस्ते, हवाई व सागरी वाहतूक, बँकिंग, विमा, टपाल, तार, पाटबंधारे यांसारख्या अनेक सेवा-उद्योगांत विकेंद्रित व्यवस्थापन समर्थनीय आहे. या उद्योगांत होणारा राजकीय हस्तक्षेप लोकशाही प्रक्रियेने प्रथम कमी करावा आणि त्याची कार्यक्षमता वाढवावी.

पिण्याचे पाणी, सफाई व सार्वजनिक आरोग्य या सर्वसामान्य माणसाच्या किमान गरजा असून लोकशाही प्रक्रियेने त्यास सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे.

## कामगारांचा अर्थपूर्ण सहभाग

औद्योगिक व व्यापारी व्यवस्थापनाच्या विकेंद्रीकरणासाठी व्यवस्थापनात कामगारांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे. अशा अर्थपूर्ण सहभागासाठी त्या त्या उद्योगाच्या इक्विटी भांडवलाच्या बाबतीत त्यांनी सहभागी झाले पाहिजे. एखाद्या उद्योगाचे बोनस शेअर्स जेव्हा धारकांना दिले जातात तेव्हा ते कामगारांच्या संयुक्त खात्यावरही जमा केले गेले पाहिजेत.

कामगारांच्या सहभागाबाबत विचार करीत असताना आपल्या न्याय्य मागण्या मान्य करून घेण्यासाठी संप करण्याचा कामगारांचा हक्कही मान्य केला पाहिजे. मात्र उत्पादन व काम बंद करण्याचा त्यांना अधिकार नाही.

## काम न थांबविता संप

संपाची परिस्थिति निर्माण झाल्यास संपाची नोटीस दिली जावी. उत्पादनात मात्र खंड पडू दिला जाऊ नये. संपाच्या काळात कामगारांना त्यांचे वेतन जसे मिळणार नाही त्याप्रमाणे व्यवस्थापनही या काळातील नफा स्वीकारू शकणार नाही. या काळातील वेतन व नफा यांची रक्कम एका वेगळ्या खात्यावर जमा करून वीज तुटवड्याच्या उद्योगासारख्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे ले-ऑफ दिला गेल्यास तेव्हाच्या काळातील वेतन देण्यासाठी किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कारणासाठी या पैशाचा उपयोग होऊ शकेल.

## व्यर्थ नियोजन प्रयत्न

नियोजनाच्या क्षेत्रात लोकशाही प्रक्रियेने प्रत्येकास किमान राहणीमान मिळवून देण्यासाठी उत्पन्नाचे वाटप करण्यावर भर दिला पाहिजे. याऐवजी गेल्या तीस वर्षांत मागण्यांचे आराखडे करण्यात नियोजन प्रयत्न वाया दवडण्यात आला आहे. आराखड्यावरहुकूम गुंतवणूक ठरवावयाची आणि नंतर परवाने व नियंत्रणांच्या प्रदीर्घ पद्धतीद्वारा खाजगी गुंतवणुकीचे नियंत्रण करीत बसावयाचे यांत नियोजन प्रयत्न वाया गेला आहे. कारण नियोजित विकासप्रमाण व उत्पन्नवाटपातील अपेक्षित बदल या दोन्ही गोष्टी प्रत्यक्षात येत नसतात. त्यामुळे मागण्यांचे आराखडे चुकतात आणि हा सारा खटाटोप व्यर्थ ठरतो. या पद्धतीने खाजगी व्यापार उद्योगास नोकरशहा व राजकारणी मंडळ यांच्या फार जवळ आणले आणि त्यामुळे लाचलुचपतीला वाव मिळाला.

## लोकशाहीच्या अभिवृद्धीसाठी

गेल्या तीस वर्षांत लोकशाही सत्तेची जी यंत्रणा देशात तयार झाली तिनेच देशातील या लोकशाही प्रक्रियेस धोक्यात आणले आहे. लोकशाहीच्या पुनःस्थापनेसाठी तिच्या मुळावरच घाव घालून ती नष्ट केली पाहिजे.

सर्व स्तरांवरील राजकारणी मंडळींचे उत्पन्न व संपत्ति सार्वजनिक पाहणीस व पडताळ्यासाठी उपलब्ध केली पाहिजे आणि ठराविक मर्यादेपलीकडे उत्पन्न व संपत्ति असणाऱ्यांना कोणत्याही निवडणुकीत उभे राहण्यास व एखादे राजकीय सत्तास्थान स्वीकारण्यास मनाई केली पाहिजे. अशी आचारसंहिता लोकशाहीच्या अभिवृद्धीसाठी आवश्यक आहे. राजकारणी लोक ती स्वीकारण्यास तयार नाहीत हे जरी उघड असले तरी सर्वसामान्य जनतेनेच अशी आचारसंहिता घटनेत समाविष्ट करण्याची मागणी केली पाहिजे.

(प. सू. का. सौजन्याने)

श्रमिक कामगारांच्या सहभागातून

# विधायक औद्योगिक संबंध निर्मिति

* श्री. त्रिलोकनाथ सिन्हा *
चीफ एडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, इंडिया सिक्युरिटी प्रेस

* अनुवादक : रवि सहस्रबुद्धे *
नासिक रोड, ४२२१०१

१८ व्या व १९ व्या शतकांमध्येच औद्योगिक क्रांतीच्या काळात प्रामुख्याने आधुनिक औद्योगिक नीतिसंबंधाचा पाया रचला गेला ही वस्तुस्थिति मान्य करूनही औद्योगिक लोकशाहीच्या भव्य मंदिराचे रम्य वास्तुशिल्प विसाव्या शतकातच समूर्त झाले. औद्योगिक संबंधामध्येही संघर्ष आणि यातनाचे ऐवजी सहकार्य व सृजनकारी प्रयत्नांद्वारा एकप्रकारचे स्थैर्य येऊ लागले. या प्रयत्नांचा कणा होता सदिच्छा, आत्मीयता भाव आणि प्रबोधनात्मक विचार, सामाजिक संबंधांना प्रामुख्याने साहाय्यकारी ठरणारे औद्योगिक संबंध सर्व साधारणपणे अस्थिर स्वरूपाचे असतात. आणि प्रगति व स्थैर्य ही दोन्ही उद्दिष्टे साधावयाची असल्यास या स्थितीकडे आपातत: परिणाम म्हणून डोळे झाक न करता हे असंतुलन उचित मार्गावर आणण्याचा विचार करावा लागेल. ज्याअर्थी बदल हा मानवी जीवनाचा स्थायी भाव आणि सारमात्र आहे त्याअर्थी त्याची स्थूल व सूक्ष्म उद्दिष्टे कायम राहू शकत नाहीत आणि या उद्दिष्टांचा वेळोवेळी मागोवा घेत राहणेही आवश्यक असते. हा मागोवा घेत असतानाच या ध्येयांची पुन: पुन्हा तपासणी व कालातील बदलास अनुसरून प्रगतीचा वेग कायम ठेवण्याचे दृष्टीने आवश्यक ते बदलही करणे क्रमप्राप्त असते.

औद्योगिक संबंध ही स्थितिच जिवंत व गतिमान असल्याने साहजिकच उद्दिष्टामध्ये बदल व प्रभाव कमी जास्त होणे हे प्रचलित राजकीय व आर्थिक घडामोडीवर बऱ्याच वेळा अवलंबून असते.

या पार्श्वभूमीवर एक सुखद असा योगायोग म्हणूनच की काय, भारत सरकारही येत्या हिवाळी अधिवेशनात एक समग्र विचार करू पाहणारे औद्योगिक संबंध विषयक विधेयक संसदेच्या सभागृहासमोर ठेवणार आहे. या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून मे महिन्याच्या सुरवातीला दिल्ली येथे भरलेल्या त्रिपक्षीय श्रमिक परिषदेमध्ये असा एकमुखी प्रस्ताव करण्यात आला की कामगारांच्या सहभागाचे प्रश्नाचा अभ्यास करण्याकरिताही समिति असावी व तिने या प्रश्नाचे मूलगामी तथा सर्वस्पर्शी परिशीलन करावे.

या परिषदेमध्ये जणू त्रिमितिचित्राप्रमाणेच श्रमिक क्षेत्रांतील मूलसंबंधांचे प्रतिनिधित्व झाले होते व त्यांनी औद्योगिक प्रगति व कामगार कल्याण यांबरोबरच येणाऱ्या काही वर्षांकरिता तरी आपल्याला औद्योगिक शांतता कामगारांच्या व्यवस्थापनात सहभागाद्वारा साध्य करता येईल अथवा काय याचा गंभीर विचार केला.

परिषदेत भाग घेणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने मालकांचे प्रतिनिधी श्री नवल टाटा व 'सीटू' या केन्द्रीय कामगार संघटनेचे प्रतिनिधींनी मांडलेल्या विचारांनी सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. त्यांनी कामगारांचे व्यवस्थापनातील सहभागासंबंधी मांडलेले विचार बहुश: स्वागतार्ह वाटले. श्री टाटांचे विचार स्थूलमानाने असे होते की कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग हा स्वयंस्फूर्त व विकसित होत जाणारा असा असावा आणि तो क्रांतिकारी बदल एकदमच घडवून आणण्याची घाई दाखविणारा नसावा. सहभागाचा मूलाधार परस्पर सल्लामसलत असावा. हट्टाग्रह अथवा दुराग्रह असू नये.

'सीटू' च्या प्रतिनिधीने उपरिनिर्दिष्ट प्रतिपादनाची दखल घेताना असे मत मांडले की जोपर्यंत उत्पादन हा कुणा एका

व्यक्तीचे फायद्याकरिता वापरण्यात येणारी प्रक्रिया आहे तोंवर कामगाराचा व्यवस्थापनात सहभाग ही कल्पना तिच्या अभिनामाशी इमान राखणारी ठरणार नाही. या महदंतर असणाऱ्या विचार प्रवाहांचा अभ्यास करता एक विचारसूत्र समान दिसते ते म्हणजे कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याकरिता व त्यांच्या फायद्याच्या दृष्टीनेही या दोनही संघर्षात्मक भूमिका घेणाऱ्या व परस्परांशी ३६ चे आंकड्याइतपत सख्य असणाऱ्या घटकांनाही कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग हा तत्त्वतः तरी आवश्यक वाटतो.

औद्योगिक कामगारांच्या देशांत आर्थिक विकासाचे प्रक्रियेमध्ये असणाऱ्या महात्त्वपूर्ण स्थापनाबाबत विशेष म्हणून काही परम वक्तव्य करण्याची आवश्यकता तर नाहीच नाही. प्रगतीच्या प्रक्रियेत औद्योगिक कामगारांच्या स्थानाला एक सरकारी घटक म्हणून वाढते स्थान प्राप्त होत असतानाच बदलाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचें साधन म्हणून "औद्योगिक संस्कृति" च्या नव्या कालखंडात पदार्पण करीत असताना गरिबीच्या आणि बेकारीच्या महाराक्षसाविरुद्ध सुरू असणाऱ्या संगरांत समाजाशी आपले असणारे नाते अधिक दृढ करीत अतीव आत्मीयतापूर्वक समाजविषयक कर्तव्येही पार पाडावी लागणार आहेत.

या साऱ्या विवेचनात्मक पार्श्वभूमीवर असे सहजतः स्पष्ट होईल की कामगारांच्या व्यवस्थापनात सहभाग राबविणाऱ्या योजनेस एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होत आहे.

तत्त्व आणि व्यवहार या दोन्ही बाजूंनी कामगारांच्या व्यवस्थापनातील सहभागाच्या संकल्पनेचा जगातील ज्या प्रमुख राष्ट्रांनी स्वीकार केला आहे त्यांचे देशातील या संकल्पनेचे व्यावारिक अंमलबजावणीचा अभ्यास केल्यास डोळ्यांत भरणाऱ्या गोष्टी म्हणजे अधिक व अधिक महत्त्वपूर्ण भूमिका कामगारांना देणे व त्याद्वारे लोकांचे आर्थिक विकासाचे प्रक्रियेस आकार देत असतानाच मानवी ऋणानुबंधासही अधिक स्थैर्य येऊन ते अधिक सौहार्द व आत्मीयतापूर्ण कसे होतील हे पहाणे. कामगारांच्या व्यवस्थापनात सहभाग म्हणजे बरोबर दुसरे तिसरे काहीही नसून लोकशाही मार्गाने व्यवस्थापन किंवा स्वशासन स्वनियंत्रित शासन अथवा उद्योग व्यवस्था. पण खेदाची बाब अशी आहे की आपल्या भारतीय संदर्भात निरीक्षण केले असता फारच थोडे व्यवस्थापक खऱ्या व्यवस्थापनाची भूमिका अनुस्यूत असणाऱ्या अर्थाने बजावतात. भारतासंबंधी व्यवस्थापन खऱ्या अर्थाने अत्यंत उच्च स्तरावरच कार्यवाहीत असल्याचे दिसते. असे करण्यात येणारे विधान बऱ्याच अंशी वस्तुस्थितीचे यथार्थ दिग्दर्शन करते. भारतातील व्यवस्थापन पद्धतीचे आणखी एक लक्षण म्हणजे धोरणात्मक निर्णयांचे झालेले केन्द्रीकरण व ते इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेले आहे की व्यवस्थापन आणि धोरणात्मक निर्णयाचे अधिकाधिक केन्द्रीकरण असे समीकरणच होऊ पहात आहे.

आपल्याकडे अस्तित्वात असणाऱ्या सरंजामशाही व जमीनदारी पद्धतीचा आपल्याला मिळालेला हा वारसाच आहे आणि त्याची तंतोतंत अंमलबजावणीच आपल्याला त्यांच्या कसेही करून अगदी कामगारांचा असंतोष पत्करूनही काम काढून घेण्याच्या भूमिकेत दिसते. आणि नेमक्या याच स्थितींमुळे व्यवस्थापकीय भूमिका ही कमी परिणामकारी बनून उत्पादन क्षमतेमध्येही अधिक वैगुण्ये निर्माण करते आणि या कारणांचाच तर्कसंगत परिणाम म्हणून आपण आपल्या निरनिराळ्या उद्योगांतर्गत चालू असणाऱ्या उत्पादन, अर्थ, विक्री व कामगार संबंध विषयक विभाग याचे संघर्षात पाहू शकतो. आणि कधी कधी तर परिस्थिति बदलण्याचे टप्प्याबाहेर केवळ सहकार्य व एकसूत्रीपणा यांचे अभावामुळे जाण्याची शक्यता निर्माण होते.

वास्तविक पाहाता वरील अभावानेच दिसणारी तत्त्वे हीच खऱ्या अर्थाने कामगाराचे व्यवस्थापनातील सहकार्याचा मूलाधार असतो व त्यांचा अभाव हेच खंडित होणाऱ्या व जिकिरीच्या प्रगतीचे कारण असते व अशा स्थितीत कामगारांचे व्यवस्थापनात सहभागाचे पद्धतीचा काही विशिष्ट उद्योगात अवलंब केलेला असला तरीही उपयोग मात्र शून्यमात्र होतो. ही सारी स्थिति अशी विशेष आवश्यकता निर्माण करते की संबंधित अशा सर्वच घटकांनी काही गंभीर विचार, विशेषेकरून या योजनेची स्थूल व सूक्ष्म अशी उद्दिष्टे ठरविण्याचे दृष्टीने केला पाहिजे आणि व्यावहारिक दृष्टीने अधिक सोयीची तथा सुलभ अशी योजना, कामगारांमध्ये हा उद्योग व कारखाना आपला आहे अशी आत्मीयतापूर्ण भावना निर्माण करीत व सर्वांनाच या उद्योगाचे होणाऱ्या प्रगतीत फायदा आहे, हिस्सा आहे, वाटा आहे अशी निरोगी आणि एकात्म भूमिका कशी निर्माण होईल याकडे अधिक लक्ष पुरविले पाहिजे आणि याद्वारा विश्वास, आदर व सहकार्य कसे वाढीस लागेल हे पाहिले पाहिजे. कारण या त्रिसूत्रीची अधिक बळकटी हाच या योजनेच्या यशस्वितेचा मूलाधार ठरू शकतो.

या योजनेचे अंमलबजावणी व विकासाचे दृष्टीने काही प्रयत्न भारतात तसेच जगातील अन्य देशांतही करण्यात आलेले

आहेत. ब्रिटनमध्ये या प्रयोगास १९५६ सालीच सुरुवात झाली असून "व्हिटले कमिशन" चे शिफारशीची अंमलबजावणी हा या योजनेचे अंमलबजावणीचा पहिला टप्पा होता. युद्धप्रयत्नास अधिक उठाव मिळावा या दृष्टीने पहिल्या महायुद्धाच्या काळात कामगार कर्मचारी तथा मालक यांची संयुक्त औद्योगिक मंडळे निर्माण करण्यात आली. फ्रान्समध्ये मात्र कायद्याचे द्वारा संयुक्त निर्णय सिद्धान्त १९४५ साली प्रत्यक्षात आला आणि तदनंतर ह्या विचाराने बेल्जियम, हॉलंड व पश्चिम जर्मनीत मूळ धरण्यास सुरवात केली.

भारतामध्ये मात्र या भूमिकेची बीजे आपल्याला प्रामुख्याने महात्माजींच्या विश्वस्त कल्पनेच्या विचारात सापडतात. ही विचारसरणी मुख्यत्वेकरून श्रम आणि भांडवल हे घटक परस्परावलंबी असतात आणि कर्मचारी व मालक हे, खरा मालक जो समाज त्याच्या कल्याणार्थ चाललेल्या सामाजिक कार्यामधील सहकारी असतात या श्रद्धेवर आधारित आहे. याचकरिता मिलमालक व मिलमजदूर यांच्यामधील नाते हे मूलत: पिता व पुत्र अथवा रक्तसंबंध असलेल्या भावांच्या नात्याप्रमाणे असावीत अशी गांधीजींची कल्पना होती. या आदेशाद्वारा प्रभावित झाल्याने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत योजनाकारांनी कामगारांच्या व्यवस्थापनातील सहभागाला विशेष महत्त्व देण्याची भूमिका स्वीकारली. त्यांची अशी धारणा होती की अधिक उत्पादन वाढीच्या दिशेने प्रगति करण्याकरिता उद्योगातील कामगारांचे यथार्थ स्थान समजावून घेऊन त्यांची स्वत:चे विचार प्रकट करण्याची इच्छा पुरी करण्याची आवश्यकता आहे व त्या दृष्टीने त्यांनी कामगारांना उद्योगाचे व्यवस्थापनातील सहभाग उचित मानला.

याच भूमिकेचा पाठपुरावा करण्याच्या हेतूने भारत सरकारने १९५६ साली एक अभ्यास गट युरोपीय देशात पाठविला व त्याने सादर केलेला अहवाल १९५७ सालच्या भारतीय श्रम-परिषदेपुढे मांडला. या परिषदेने कामगारांच्या व्यवस्थापनातील सहभागाची कल्पना तत्वत: स्वीकारून संयुक्त व्यवस्थापन समित्या नेमण्यास अनुकूलता दर्शविली. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या हेतूने मोठ्या उत्साहाने काही निवडक उद्योगांत संयुक्त व्यवस्थापन समित्या स्थापनही झाल्या. त्यानंतर अनेक प्रकारच्या व छटांच्या योजना विशेषत: सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात कार्यान्वित झाल्या आहेत.

एवढे सर्व प्रयत्न करूनही दृष्टिकोनात स्पष्टता व वस्तुनिष्ठतेचा अभाव असल्याने तसेच व्यावहारिक उपयोग करताना कल्पनाशक्तीचा अभाव दिसल्याने काही रचना व अपेक्षा व्यक्त करून स्वीकारलेल्या सहभागाच्या योजना फारच थोडी प्रगति करू शकल्या आहेत. म्हणून आता अशी वेळ आली आहे की तात्त्विक चर्विचर्वणापेक्षाही संपूर्ण विचारच व्यावहारिकतेच्या निकषावर घासून पुसून घेऊन नवरचित करण्याची आवश्यकता आहे. हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे की ज्या योजनेत कामगारांना उचित आदराचे स्थान नाही, व प्रतिष्ठा नाही अशी कोणतीही योजना कामगार मनापासून स्वीकारणे अशक्य. त्याचप्रमाणे उद्योग चालविण्याचे प्रभावी दायित्वही त्यांच्यावर टाकले जाणे आवश्यक ठरेल.

या योजनेचे मूलोद्दिष्ट जर आपण संपूर्ण सहभाग असे मानले तर या योजनेत अथवा तत्त्वाची व्यावहारिक अंमलबजावणी करताना उद्योगाच्या व्यवस्थेच्या आर्थिक बाजूचे विचारातही सर्वसाधारण कामगारापासून सर्वांचा विचार घ्यावा लागेल. चिनी राज्यकर्त्यांनी 'तळापासून वरपर्यंतचे' नियोजनाची पद्धत आज यशस्वीपणे राबविली आहे असे जरी मानले तरी त्याचाही बराचसा विचार गांधीजींनी अर्धशतकापूर्वीच केला होता.

गांधी तत्त्वांना आपण पुन्हा एकदा नवजीवन देण्यात यशस्वी होऊ काय ? याच भूमीत सामाजिक आणि औद्योगिक व्यवस्थेला एक व्यावहारिक व वस्तुनिष्ठ बैठक प्राप्त करून देण्याच्या हेतूने गांधीजींना अशी रचना अपेक्षित होती की जिच्यामध्ये निर्णय घेण्याची संधी व स्वातंत्र्य निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्यांना असेल. प्रचलित व्यवस्थेत मात्र गांधीप्रणीत आदर्श मानल्या गेलेल्या विश्वस्त कल्पनेच्या आपण खूप खूप मागे आहो एवढी मात्र कबुली देणेच उचित ठरेल.

अर्थशासनाच्या निरीक्षणानुसार कामगारांना आर्थिक निर्णय दिले गेले आहेत अशा उद्योगात विकास निश्चित करणाऱ्या घटकांवरही परिणाम होतो आणि कामगारांवरच अतिरिक्त नफ्याची गुंतवणूक तथा उपयोग या दोन्ही आघाड्यांवरील विभागणी ठरविण्याचा अधिकार बजावून नियोजनावरही महत्त्वपूर्ण प्रभाव पाडू शकतील अशी स्थिति ते प्राप्त करू शकतात. दुर्दैवाची बाब अशी की आमच्या देशात या दिशेने केवळ प्रयोगात्मक देखील पाऊले उचलण्यात आलेली नाहीत.

भारतापुढे असणारी समस्या वेगळीच असून ती सोडविण्याकरिता अधिक मूलग्राही विचार करण्याची गरज आहे व या विचारातूनच आपले नियोजन व आर्थिक विकासावरील परिणाम व ज्यात कामगाराला अभिमानाचे स्थान आहे असे लोकशाही तत्त्वज्ञान यांना अर्थपूर्ण दिशा मिळू शकेल.

वरील पार्श्वभूमि पाहता कामगारांच्या व्यवस्थापनातील सहभागासंबंधीच्या आपल्या विचाराच्या दोन अवस्था होऊ शकतात. स्थूल आणि सूक्ष्म.

औद्योगिक न्यायव्यवस्थेची अशी जबाबदारी आहे की सामाजिक आर्थिक न्यायाच्या दृष्टीने कामगारांच्या उद्योगातील सहभागाचे तत्त्वास वैधानिक मान्यता दिली गेली पाहिजे. कारण या तत्त्वाचे अंगीकाराने दूरगामी औद्योगिक सुसंवादाची जडण घडण उत्पादन व व्यवस्थापन यांच्या संयुक्त कारभारातून होऊ शकेल, आणि म्हणूनच १९४७ चे औद्योगिक कलह निर्णायक कायद्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून कामगारांच्या व्यवस्थापनातील सहभागाच्या तत्त्वास वैधानिक मान्यता दिली जाणे आवश्यक वाटते. कर्मचाऱ्यांच्या वर्क्स कमिटीच्या द्वारा जरी सुयोग्य कामगार मालक संबंध राखण्याच्या दृष्टिकोनातून १९४७ च्या औद्योगिक कलह कायद्याच्या तिसऱ्या कलमाद्वारे काही विशिष्ट क्षेत्रात वैधानिक तरतुदी करण्यात आल्या असल्या तरीही एकतर त्यांचे गैरसमज झाले आहेत आणि व्यवस्थापक व कामगार यांना त्यांचा हेतु साध्य करण्याच्या दृष्टीने कार्य समित्या अकार्यक्षम अथवा त्यांचा व्यवहार असमाधानकारक ठरला आहे अशी सर्वसाधारणपणे समजूत दिसते. तसेच त्यांची ध्येये व कार्येही फारच मर्यादित स्वरूपाची आहेत आणि बऱ्याच वेळा त्यात अंतर्विरोधही असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. निःसंशयतः कार्यसमित्यांनी आपल्या परीने काही एका प्रमाणात जरूर उपयुक्त अशीच भूमिका पार पाडली आहे पण उत्पादन-वाढीच्या सर्व प्रयत्नांच्या दृष्टीतून कार्यक्षमता तसेच कामगारांचे व समाजाचे आर्थिक कल्याण साधण्याच्या एकंदर उद्दिष्टांच्या दृष्टीने कार्यसमित्यांच्या कामाच्या कक्षेत कामगारांच्या व्यवस्थापनात सहभागाच्या तत्त्वादि विविध योजना करून या कार्यसमितीला व वरील महत्त्वपूर्ण तत्त्वाला वैधानिक पाया प्राप्त करून देणे उचित ठरेल. त्या दृष्टीने १९४७ चा औद्योगिक कलह कायदा आवश्यक तेथे सुधारून "कार्यसमिति आणि कामगारांचा उद्योगात सहभाग" असे अन्वर्थक नवे नाव देणेही उचित ठरेल. याचे कारण एकच की स्वयंस्फूर्तीने हे तत्त्व व्यवहारात यावे ही अपेक्षा फलद्रूप झालेली नाही.

वस्तुतः कार्यसमितीची कक्षा जेथे संपते, तेथेच नेमकी कामगारांच्या उद्योगात सहभागाच्या तत्त्वाच्या अंमलबजावणीस सुरुवात होते. उपरिनिर्दिष्ट सूचित सुधारित कायद्याचे विधानाद्वाराच ही योजना कायद्याने कामगार व व्यवस्थापन या दोघांनाही बंधनकारक करावी आणि पुढे सूचित केल्या जाणाऱ्या गोष्टींचा विधायक सहकार्याच्या दृष्टीने समावेश केला जावा. या नवीन कायद्याच्या अडचणीमुळे अशी आशा वाटते की कामगारांत उद्योग आपला स्वतःचा आहे अशी भावना निर्माण होऊन योजनेचे उद्दिष्ट खऱ्या अर्थाने साध्य होईल. कार्य समित्यांचे अधिकार व कक्षा यांच्यामध्ये बदल न करता कामगारांचे सहभागाच्या योजनेद्वारा त्या अधिक दृढ केल्या जाव्यात व कार्यसमित्या आणि त्यांच्या द्वारा त्यांच्या मदतीने कामगारांचा उत्पादनात स्वयंस्फूर्त सहभाव या दोन तत्त्वांच्या अश्वाच्या द्वारा औद्योगिक लोकशाहीचा रथ सुलभतेने मार्गक्रम करू शकेल अशी अवस्था स्वभावतः निर्माण होईल. कार्य-समित्यांची ध्येये जरी कामगारांना अधिक विश्वासात घेऊन उत्पादनवाढ करणे अशी असली तरी त्यांच्याबद्दलच्या गैर-समजामुळे ही उद्दिष्टे प्रत्यक्षात आणण्यात त्या सर्वसाधारणपणे कमी यशस्वी ठरल्या आहेत याचीही नोंद गंभीरपणे घेतली जाणे योग्य ठरेल.

कामगारांच्या उद्योगाचे व्यवस्थापनातील सहभागाची प्रमुख वैशिष्ट्ये ढोबळमानाने खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील :

कायदा अस्तित्वात असल्यापासून १० दिवसांचे आत घटक आणि उत्पादनाचे छोट्या छोट्या विभागांत संयुक्त समित्यांचे गठन केले जावे. हा कायदा १०० अथवा त्यापेक्षा जास्त कामगार कामाला असणाऱ्या उद्योगास बंधनकारी असावा आणि १:१० प्रमाणात कामगार आणि मालक यांचे प्रतिनिधी त्या समितीत असावेत.

कामगारांच्या प्रतिनिधींची निवड त्या त्या विभागांतून अथवा घटकांमधून व्हावी. कार्यसमितीत निवडून आलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त वेगळे प्रतिनिधी या समितीत असावेत. ही समिती दोन वर्षे अस्तित्वात असावी व मालकाचे त्याच्या विभागात काम करणारे प्रतिनिधी त्या समितीवर नेमले जावेत. साधारणतः मालकाचे प्रतिनिधी कामगारांत जास्तीत जास्त वेळ राहण्याची आवश्यकता असणारे असे असावे.

या समितीने महिन्यातून एका वेळी एकत्र येऊन एकत्रितपणे घेण्यात आलेल्या एकमताच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जावी. ज्या बाबींचा निर्णय होऊ शकला नसेल अशा बाबी उद्योगाचे पातळीवर असणाऱ्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात याव्यात. विभागीय समितीने त्याचे मधूनच अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड करावी व व्यवस्थापना द्वारा आवश्यक कारकुनी अथवा कामकाजी मदत दिली जावी.

या विभागीय समितीच्या सदस्यांनी निरीक्षणात्मक, प्रशासकीय आणि सल्लागार या तीनही भूमिकेतून कामे करावी.

व विभागातील कामाचे ठिकाणची परिस्थिति व उत्पादनाची स्थिति, उत्पादनांत सुधारणा, कार्यक्षमता वाढ, वाया जाणाऱ्या कच्च्या मालाचे प्रमाणात घट करण्याचे प्रयत्न, उत्पादन लक्ष्ये ठरविणे, मनुष्य शक्ति व यंत्रशक्ति यांचा पुरेपूर वापर करण्याची योजना, कमी उत्पादन मिळण्याची शक्यता आणणारी यंत्रे अथवा उत्पादन अवस्थांचे निरीक्षण व त्यांवर उपाययोजना, गैरहजेरीचे प्रमाणांत घट, आरोग्य, सुरक्षा आणि कल्याणकारी योजनाचे अंमलबजावणीकडे लक्ष देणे, कामाचे ठिकाणावरील स्थितीत अधिक सुधारणा करण्याचे प्रयत्न कामगारांमध्ये शिस्त आणण्याकरिता योजना, प्रकाश, हवा, आवाज धूळ वगैरेचे अभाव व प्रभावाबद्दल योग्य उपाययोजना. कामगारांच्या गाऱ्हाण्यांची तड लावण्याची कार्यक्षम व्यवस्था व या सर्वांचा परिणाम म्हणून वाढती उत्पादन लक्ष्ये गाठण्याचा प्रयत्न याकडे लक्ष द्यावे.

ही झाली नाण्याची एक बाजू. दुसऱ्या बाजूचे पाहाता उद्योगाचे केंद्रस्थानी संयुक्त कामगार–व्यवस्थापक समिति असावी. समितीचे दोन्ही व बाजूंचे प्रतिनिधींची संख्या १६ चे वर नसावी. याही समितीची मुदत दोन वर्षे असावी व उद्योगाचा प्रमुख व्यवस्थापक या समितीचा अध्यक्ष असावा व लोकनियुक्त प्रतिनिधी उपाध्यक्ष असावा. विभागीय समित्यांचे सभासदांना त्या संयुक्त समितीवरील सभासद निवडण्याचा अधिकार असावा.

या समितीची बैठक दोन महिन्यांतून एकदा व्हावी. व प्रत्येक निर्णय हा सर्वसाधारणपणे सर्वसंमत असून देखील पक्षांवर बंधनकारक असावा. निरनिराळ्या जागांकरिता संयुक्त समित्यांनी खालील कामे पाहावीत.

१. भरती व बढतीचे नियम तयार करणे व उद्योगांतील स्टँडिंग ऑर्डर्स तयार करणे.

२. निवासस्थाने कर्मचाऱ्यांना उपलब्ध करण्याच्या दृष्टीने निवासस्थानविषयक कायद्याचे गठन.

३. कामात उपयुक्त अशा लाभदायी व नफ्यांतही वाढ देणाऱ्या योजना तयार करणे.

४. संपूर्ण उद्योगाचा कार्यभार लक्षात घेऊन वार्षिक उत्पादन लक्ष्ये ठरविणे.

५. कामाच्या तासांची व सुट्ट्यांची आखणी.

६. नोकरीतून कमी करणे, ले ऑफ, कामाच्या पद्धतीचा अधिक व्यापक व तर्कनिष्ठ विचार, टाळेबंदी, कामाच्या पद्धतीत वाढ अथवा घट व पद्धतीची प्रचलित व्यवस्थेपेक्षा वेगळी मांडणी, भरतीकरिता नव्या पद्धतीचा अवलंब व शिक्षा व्यवस्था यांचा विचार.

७. निवास व वाहतूक व्यवस्था.

८. विभागीय समितीच्या पातळीवर ठरलेल्या निर्णयांचा पूर्ण विचार व त्या समित्या निर्णय न घेऊ शकतील त्या बाबींचा निर्णय करणे आणि उद्योगाच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करणाऱ्या अन्य बाबींवर लक्ष ठेवून त्यांचा विचार करणे.

९. कामगारांच्या अंगी असणाऱ्या कसबाचा व हुशारीचा विकास करण्याकरिता प्रशिक्षण कार्यक्रम व त्याकरिता आवश्यक त्या सोयी.

१०. उत्पादनवाढीस जास्तीत जास्त अनुकूल परिस्थिति तयार करणे. कामगार व यंत्रे याकरिता उत्पादनाची कामे ठरविणे व विभाग व संपूर्ण उद्योगा द्वारा उत्पादन केल्या जाणाऱ्या मालाचा दर्जा उच्च प्रतीचाच राहील यासंबंधी काळजी घेणे.

११. सर्वसाधारण आरोग्य, कामगार कल्याण आणि कामगार व उद्योगाचे सुरक्षेच्या दृष्टीने योजना आखून अंमलबजावणी करणे.

वरील बाबी सर्वसाधारणपणे ढोबळ मानाने स्पष्ट केल्या असून निरनिराळ्या उद्योगांतील निरनिराळ्या स्थितीमुळे एकच, अथवा याच बाबी असाव्यात असा आग्रह धरणे अयोग्य ठरेल. याशिवाय कामगारांबरोबर सुसंवाद साधून व्यवस्थापकांनी प्रतिनिधित्व अधिक उचित प्रकारे व परिणामकारक कसे होईल याचा शोध घेतला पाहिजे. कारण अशा प्रकारे कामगारांचे असलेले उचित प्रतिनिधित्वच अंशत: परिणामकारी हेतुपूर्ण व विशालबंधुत्व व सहकार्याच्या पायावर आधारित कर्मचारी सहकार्याची उभारणी करण्यात साह्यकारी होत असते.

कायदा केवळ स्थूल स्वरूपाची उद्दिष्टे स्पष्ट करू शकेल अथवा एखादी स्थूल स्वरूपाची चोकट सुचवू शकेल. पण या व अशा प्रकारच्या योजनेला खरा अर्थ येतो तो कामगार आणि मालक यांच्या सौहार्दपूर्ण सहकार्यातून आणि ज्या वेळी हे दोन्ही घटक ही योजना उद्योगात संबंधित अशा सर्वांचे दृष्टीकोनांचा समजावून घेऊन विचार करण्याची एकभावात्मक व यंत्रणा म्हणून वापरतील त्याच वेळी सुसंवाद वाढविण्याचे

सर्वंच पातळ्यांवरील एक नवे उपयुक्त साधन म्हणून तिचे महत्त्व सिद्ध होईल.

या योजनेच्या यशाकरिता सर्वतोपरी महत्त्वाची स्थिति म्हणजे व्यवस्थापकांचा या योजनेवर संपूर्ण विश्वास पाहिजे आणि त्यांची कामगारांना विश्वासात घ्यायची तळमळ खरी-खरी व प्रामाणिक असली पाहिजे. तसेच त्यांचा असाही विश्वास असला पाहिजे की कामगारांजवळ उद्योगाचे अभिवृद्धीकरिता देण्यासारखे पुष्कळ आहे. दुसरी आवश्यक बाब म्हणजे सर्वंच पातळ्यांवर मानवी संबंधाची जाण व भान ठेवणारी आत्मीयतापूर्ण संयुक्त समित्यांची यंत्रणाही उद्योगात सर्वदूर प्रभावित व कार्यान्वित असणे हे तर आवश्यक आहेच आहे.

योग्य सुसूत्रता व समितीमधील निर्णयावर अनुकूल हालचाल हेही महत्त्वपूर्ण घटक आहेत. संयुक्त समितीच्या सभासदांमध्ये अशी जाणीव व संवेदना निर्माण होणे आवश्यक आहे की उद्योगाचे अभिवृद्धीकरिता व त्यातील अंतर्विरोध व अडचणी यांचे निवारणाकरिता ते सारेजण संयुक्तपणे सामुदायिक रीतीने आणि अनेक प्रकारांनी शासनांतील कॅबिनेट मंत्रिमंडळात जसे जबाबदारीचे तत्त्व अनुस्यूत असते तसेच जबाबदार आहेत. आणि म्हणूनच संघटनेच्या लक्ष्यांबद्दल व एकंदरीतही निवेदन करताना त्यात विसंवाद असू नये या साऱ्या बाबी लक्षात घेऊन तदनुसार विचार करणे उचित. कारण यांतील एकाही गोष्टीचा अभाव योजनेच्या अपयशासाठी कारणीभूत होऊ शकतो.

कामगार संघटनांनीही या योजनेची अंमलबजावणी करताना सामुदायिक सौदेबाजीचे आणखी एक व्यासपीठ म्हणून या व्यासपीठाचा उपयोग करण्याचा मोह टाळणे आवश्यक आहे. पण त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की या योजनेच्या यशाला मोठ्या अर्थाने हातभार फक्त शिस्तबद्ध आणि सुसंघटित अशा कामगार संघटनाच लावू शकतात. फक्त त्यांनी प्रतिसादात्मक भूमिका घेण्याची मात्र जरुरी आहे. १९६४ च्या आशियाई विभागीय परिषदेच्या निरीक्षणानुसार योजनेबाबतचे गैरसमज, निरनिराळ्या युनियनमधील वितुष्टे यांमुळे बऱ्याच देशांतही योजना यशस्वी होऊ शकलेली नाही. त्यामुळे ही योजना राष्ट्रीय पातळीवर राबविण्याच्याच वेळी निरनिराळ्या कामगार संघटना संबंध असणाऱ्या केंद्रीय कामगार संघटनांना विश्वासात घेणेही अगदी प्राथमिक स्वरूपाची गरज मानावी लागेल.

तरीही उत्साहवर्धक वैशिष्ट असे की, आजचे प्रगतिशील व्यवस्थापकांमध्ये चांगल्या व्यवस्थापनाची एक गरज म्हणून संयुक्त समित्या आवश्यक असे मानण्याची भूमिका वाढीस लागली आहे. औद्योगिक संस्कृतीमधील विसंवादी स्वार्थ गटांना सुसूत्र अशा व्यवस्थेत ठेवल्याचे हे एक विधायक आव्हान विधायक आणि प्रशासक अशा दोहोंपुढेही उभे आहे.

आणि चिरस्थायी औद्योगिक शांतता व उत्कर्षाच्या नव्या युगांत प्रवेश करताना वैधानिक मान्यताप्राप्त अशी कामगारांच्या उत्पादनांत सहभागाची योजना आपल्याला साह्यकारी ठरू शकणार आहे. कारण संपूर्ण समाजाच्या भावात्मक कल्याणाकरिता काम करण्याकरिता कटिबद्ध होण्याची प्रेरणा देतच ही योजना कामगार व मालक या दोहोंमध्येही परस्परविषयक एक नवा आदर आणि एक जबाबदाऱ्यासंबंधीचा विश्वास निर्माण करण्यास सहायक होतो.


दीपावली अभीष्टचिंतन !

जिच्या चवीने जिभेला
सद्भावनेचा अंकुर फुटतो
अशा गोड साखरेशी
निगडित नाव

**कोल्हापूर केन शुगर वर्क्स लि.**

कसबा बावडा, कोल्हापूर ४१६००६

(जयेंद्र)

# गणित-संशोधन आणि प्रसाराचे संकल्पित कार्य

डॉ. श्रीराम अभ्यंकर
ह्यांची मुलाखत

कु. उज्ज्वला जोशी,
एम्.,ए., पुणे

[ विश्वविख्यात गणितज्ञ डिस्टिंग्विश्ड् मार्शल प्रोफेसर डॉ. श्रीराम अभ्यंकर यांच्या प्रेरणेने पुण्यात "भास्कराचार्य प्रतिष्ठान" ही गणित विषयात मूलगामी संशोधन करणारी यंत्रणा सुरू झाली. उण्यापुऱ्या एक वर्षाच्या कालावधीतच आपल्या कार्याच्या मगदुरावर प्रतिष्ठानाने आपले नाव भारत सरकारच्या Department of Science and Technology च्या Scientific Research Associations च्या यादीत झळकविण्याची दुर्मिळ संधि मिळविली.

दि. १५ ऑगस्ट १९७७ रोजी वॉशिंग्टनमध्ये American Mathematical Association कडून प्रा. अभ्यंकर यांच्या Historical Ramblings on Algebraic Geometry या प्रबंधास १९७६ मधील सर्वोत्कृष्ट लोकशिक्षणात्मक प्रबंध म्हणून सन्मानपूर्वक बक्षीस मिळाले. चालू शतकातील या थोर गणितज्ञाने मायभूमीतील गणित संशोधकांसाठी सुरू केलेल्या या उपक्रमाचा परिचय निश्चितच उद्बोधक ठरावा! विशेषत: अर्थशास्त्रात आणि इतर समाजशास्त्रात गणिताचा उपयोग सिद्धांतनाकरिता होऊ लागल्यामुळे ह्या संस्थेचा लाभ समाजशास्त्राच्या तत्त्ववेत्त्यांनी आणि अभ्यासकांनी करून घ्यावा. ]

'गणित' शास्त्राच्या संशोधनात्मक वाढीसाठी आणि गणिताभ्यासकाला संशोधनोन्मुख दृष्टि देऊन भारतातील गणिताची वाढ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून पुण्यात "भास्कराचार्य प्रतिष्ठान" या नावाची एक संस्था गेल्या दीड वर्षापासून काम करीत आहे.

पुण्यामुंबईच्या विद्याजगतात ही बातमी केव्हापासून कुजबुजत आहे. आपल्या देशात शास्त्रशाखेबद्दील संशोधक पहायला मिळणे अगोदर दुरापास्त; त्यात गणित हा विषय तर त्यातल्या त्यात अधिकच दूर! या विषयातही संशोधन असते का? असेल तर ते कशा प्रकारचे असू शकेल? अशा तऱ्हेच्या अनभिज्ञांच्या प्राथमिक स्वरूपाचे कुतूहल कुठे दृष्टीस पडेल, तर कुठे बरे होईल बुवा, आमच्या संशोधनातील गणितविषयक सल्ला विचारावा अशी चार माणसे तरी इथे असतील असा दिलासा इतर शास्त्रांच्या अभ्यासकांत व चिंतकांत दिसून येतो. प्रत्यक्ष गणितात काम करणाऱ्या लोकांना तर ती अभूत अशी पर्वणी वाटते आणि अशा या सृजनशील हालचालींचे जनकत्व प्रोफेसर श्रीराम अभ्यंकरांसारख्या थोर गणित संशोधकाकडे असणे हा तर दुग्धशर्करायोग परमानंदकारक वाटणे सहज सुलभ आहे.

द्रव्यार्जनासाठी, सन्मानासाठी आणि केवळ स्वान्त:सुखाय अशा तीन कारणांसाठी सामान्यत: विद्योपासना केली जाते. (अर्थात रूढी म्हणून, किंवा दुसरे काहीच करायला नसते म्हणून

वद्याभ्यास करणाऱ्यांचाही एक वर्ग करावा लागेलच !) द्रव्य ही सर्वांनाच हवीशी गोष्ट आहे. त्यामुळे झटपट पैसा देणारी विद्या हस्तगत करण्याकडे सामान्यपणे कल असणे अपरिहार्य आहे. त्यामुळे आर्थिक प्राप्तीच्या दृष्टीने धोक्याच्या असलेल्या संशोधनाच्या क्षेत्रात पाऊल टाकायला बिचकायला होणे आणि त्यामुळे बुद्धिमान् आणि प्रतिभावान् विद्यार्थी असला तरी त्यास संशोधनाकडे पाऊल टाकणे मोठे अपरूप आणि धाडसाचे वाटते. शिवाय प्रत्यक्ष संशोधक नावाचा प्राणीही फक्त बालसाहित्यातच लहानपणी वाढलेला ! शतकानुशतकांच्या पारतंत्र्यामुळे ह्या स्वयंप्रज्ञ प्राण्याचे प्रत्यक्ष अस्तित्व मात्र कुठे दिसत नाही. त्यामुळे परोपजीवित्वाचे संस्कार झालेल्या बुद्धीला पारतंत्र्याचा कोश फोडून बाहेर काढण्याचे हे मोठे तडफेचे, चिकाटीचे आणि धडकदार दिलाचे काम आहे. शिवाय ते काम करणारा वीरपुरुष स्वतः ज्ञानवन्तही हवा ! दिव्याक्षेत्रात फैलावलेले मवाळ पक्षाचे निष्क्रिय राजकारण फोडून दुसऱ्याने लिहिलेली बुके पाठ करून कधी काळी 'विद्वान्' असा शिक्का घेतलेले जरठ, परतंत्र राजमुकुट पुन्हा नवोन्मेषाच्या स्वातंत्र्याने तरुण करायला हवा असेल तर आज नितान्त निकड आहे दिलदार, प्रगल्भ आणि क्रियाशील नेतृत्वाची. खरे म्हणजे विद्यापीठाचे हेच काम की संशोधन हा केंद्रबिंदु कल्पून तदनुसार कार्यक्रम आखणे. पूर्वीच्या गुरुकुलात जेव्हापर्यंत भारत सुवर्णयुगात होता तोंवर— आणि आजच जगात इतरत्र छोट्या-मोठ्या अनेक देशांत ह्या तत्त्वामुळे अनेक विषयांत संशोधन होत राहिलेले आहे. भास्कराचार्यापर्यंत आपणही संशोधन परंपरा नांदवली. ती परत सुरू करणे आणि गणिताच्या जगात ज्ञानाची देवाण-घेवाण करता येईल असा एक जिवंत गणितस्रोत निर्माण करण ही या प्रतिष्ठानाच्या निर्मितीमागील प्रेरणा !

भारतात शुद्ध गणिताचा अभ्यास करता येतो अशा संस्था फारच थोड्या आहेत. एक "टाटा इन्स्टिट्यूट, मुंबई" वगळता नाव घेण्याजोग्या संस्था आपल्या या खण्डप्राय देशात नाहीत असे दुर्दैवाने म्हणावे लागते. त्यामुळे अर्थात् बरेच व्यावहारिकही तोटे होतात. त्यांपैकी (१) विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी आज इथे दुसरीकडे कुठे पाहायला जागा नाही. (२) गणितात काम करू इच्छिणाऱ्याला ह्या देशात भवितव्य नाही. (३) गणित हे सर्व शास्त्रांच्या विचारार्थ आवश्यक शास्त्र असल्याने इतर शास्त्रांच्या संशोधकांसही गणित संपर्क न साधता आल्याने कळत न कळत कुचंबल्यासारखे होते. (४) इथे गणितास भवितव्य नसल्याने शक्यता असलेले प्रज्ञावंत तरुण देशाबाहेर जातात किंवा त्यांची गणितप्रज्ञा फुकट जाते. इ. महत्त्वाचे मुद्दे निश्चितच गंभीर आहेत. अर्थात् य मुद्द्यांची व्याप्ति गणित विषयापुरतीच मर्यादित आहे अ नाही, तर सर्वच शास्त्रशाखा की ज्यांच्या कार्यामुळे देशाचं मान उंच होईल या अडचणींना तोंड देत आहेत.

पण गणित विषयासाठी काही विशेष अडचणी आहेत; त्याही मोकळेपणे विशद करणे अप्रस्तुत नाही असे मानतो (१) गणित हा विषय ताबडतोब काही प्रत्यक्ष फायदा करून देणारा नाही. (त्याचा उपयोग होतच असला तरी तो फार दूरगामी परिणाम करणारा असू शकेल.) त्यामुळे आणि सर्वसामान्य मानवाच्या रसग्रहणशक्तीच्या जवळपास तो विषय नसल्याने लोकांत त्याबद्दल सुप्त दबदबा असला तरी त्याच्या वाढीबद्दल उत्साह आहे असे नाही.

(२) मूळ गणित विषय आणि त्याचा व्यवहारात उपयोग ह्या दोन अगदी भिन्न गोष्टी आहेत. बहुजनांच्या कल्पनेत नसल्याने मोठीच अडचण निर्माण होते. त्याचा मुख्य तोटा हा की जिथे गणित वापरले जाते ते दुसरे शास्त्र म्हणजे गणितच असे मानले गेल्याने कदाचित् दुसऱ्या कक्षाची तरी वाढ होते आणि ती वाढ होते आणि ती गणिताची वाढ झाली असा सामान्यांस भ्रम होतो. शिवाय कोणते गणित चांगले, कोणता गणिती योग्य याचा विचार करणारे लोक बऱ्याच वेळा गणिती नसतातही. त्यामुळ तथाकथित ज्ञात्याकडून ज्ञान घेण्याचा विनोदही घडू शकतो. परिणामतः मूळ गणित विषयाकडे पूर्ण दुर्लक्ष होते आणि हे दुष्ट चक्र कसे थांबेल हेही कळत नाहीसे होते. भारतातील अनेक विद्यापीठात अशा कारणांनी गणित हे कळत नकळत दाबले जात आहे.

जिथून एखाद्या गोष्टीबद्दल नैसर्गिक अपेक्षा आहेत, तिथे या गोष्टी नसल्याने नैसर्गिक प्रयत्न करावे लागणे हा एक मोठा दैवाचा फटका आहे. पण प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढीत आपले काम पुढे ओढून यशोमंदिराकडे या प्रतिष्ठानास नेण्यासाठी काही गणितवेडे तरुण काम करीत आहेत ही गोष्ट पुण्यास, महाराष्ट्रास आणि आपल्या देशास खचितच अभिमानास्पद अशी आहे यात शंका नाही.

आज प्रतिष्ठानापुढे आराखडा ज्या कामाचा आहे त्यात (१) गणिय संशोधनात रस असणारे लोक घेणे. (२) संशोधनासाठी सुरवात करणारे विद्यार्थी घेणे. (३) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध कार्यक्रमांद्वारा विचारांची देवाण-घेवाण करणे. (४) शक्यतेनुसार पदव्युत्तर आणि पदवीच्या शिक्षणाची तरतूद करून तरुण रक्ताला संशोधनाची

अर्थ

नजर देणे. (५) अद्ययावत् ग्रंथालय, प्रतिष्ठानात काम करणाऱ्यांसाठी राहण्याची आणि ज्ञानार्जनाच्या जागेची व्यवस्था करणे. अशा तऱ्हेच्या आवश्यक अशा सोयी उपलब्ध करून देण्याचा संकल्प आहे.

थोर थोर गणित्यांच्या प्रतिष्ठानाशी येऊ शकणारा संपर्क हे कदाचित् या गणितकेंद्राचे वैशिष्टय ठरावे. स्वतः डॉ. अभ्यंकरांचे गणित क्षेत्रातील कर्तृत्व विश्वविदितच आहे. थोर थोर गणित्यांच्या प्रज्ञेचे डोळे दिपविणारे त्यांचे गणितातील उत्तुंग संशोधन या शतकाला जे काही देऊन बसले आहे त्यामुळे भारताची मान गणित संशोधनात निश्चितच ताठ झाली आहे. आंतरराष्ट्रीय गणित परिषदेस सन्मानाने आमंत्रिला गेलेला हा पहिला भारतीय गणिती (मॉस्को १९६६), त्यानंतर १९७० मध्ये नीस (फ्रान्स) येथे जेव्हा ही परिषद भरली त्या वेळी गणितातील त्यांच्या Algebraic Geometry या विभागाचे तर ते अध्यक्षच होते. Resolution of Singularities या Algebraic Geometry मधील एका कठिणात कठीण समस्येवरील त्यांच्या कामाची प्रशंसा जगभर आहे. जगातल्या नामवंत विद्यापीठात सन्मानाने सतत पाचारिला जात असलेला हा थोर गणितज्ञ आजच्या गणित जगाचे खास आकर्षण होऊन बसला आहे.

अर्थात् सर्वसामान्य परिस्थितीला काही अपवाद हे असतातच. इथल्या कोण्या एका थोर विद्यापीठाने आपल्याकडील तथाकथित गणिताच्या अस्तित्वास धोक्याचे सावट येऊ नये म्हणून प्रा. अभ्यंकरांच्या कार्याच्या थोरवीची कल्पना असूनही त्यांच्या गणित विभागातील प्रवेशास बंदी घातली. अशी एखादी नाटयपूर्ण घटना हे कदाचित् खास पुण्याचे बारभाई वैशिष्टय ठरावे !

ही वस्तुस्थिति इथे निवेदण्यास काही कारण आहे. विद्यापीठे ही विद्यामंदिरे होत आणि जिवंतपणे कार्य करणारे ज्ञानवंत, शास्त्रज्ञ हे तर त्या मंदिरांत चैतन्य भरणाऱ्या देवतासमान ! पण जेव्हा मंदिराचे प्रस्थच इतके माजले की तिथे देवतांसाठीच कवाड बंद व्हावी. तेव्हा सामान्यपूजकाची स्थिति काय असणार ! यावद्दल काही तर्क केला तर तो योग्यच ठरावा ! संशोधनात्मक कार्याच्या सुरवातीस अगदी असहकाराची पण त्याचमुळे आवश्यकतेच्या दृष्टीने म्हणजेच अर्थशास्त्राच्या दृष्टीने (क्षमस्व, मी त्या विषयात अनभिज्ञ आहे.) अगदी अनुकूल वातावरण आपल्या प्रतिष्ठानास आहे. मात्र लोकजागृति करून याबाबतची अज्ञता दूर करणे आणि शास्त्रीय संशोधनाचा सामान्य स्तरापर्यंत सामाजिक संबंध ठेवणे हे आजचे निकडीचे काम आहे. आज शास्त्रज्ञ हा शब्द ऐकला की आपल्या डोळ्यांसमोरील काही सरकारी पातळीवरील, समाजापासून दूर असलेल्या यंत्रणा किंवा या देशाला परक्या असलेल्या दुसऱ्या कोणी अशाच कल्पनांशी थांबण्याची सामान्यांची सवय होऊन बसली आहे. त्या त्या विषयात संशोधन करणारे लोक आपल्या विषयात रस घेणाऱ्या मुलांस त्या विषयाची चटक लहानपणापासून फैलावत आहेत, आणि परिणामी ती मुले कर्तृत्वाच्या काळात शास्त्रज्ञ होत आहेत अशीही कल्पना साकार होणे देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक आहे. पण भारतीय संशोधकांची वरील तऱ्हेची विवक्षित मानहानि पाहिली की हे चित्र बदलणे किती दूरचे ध्येय असू शकते हे कळत नाहीसे होते.

आपल्या विषयात पारंगतता मिळवून देशोदेशीचे ज्ञान कणाकणाने संपादून परत मायदेशी परत आलेल्यांना आपण कायम स्वरूपाचे काम तर देऊ शकत नाहीच, पण सुट्टीत तसे लोक येऊन फुकट काम करायची गोष्ट आपणहून काढू लागले. तरी तशी सोय आपल्याकडील विद्यापीठे करू शकत नाहीत. "Visiting Chair" ची कल्पना मुळी इथे कोणी हाताळायलाच तयार नसते ! या उलट जगातील नामवंत विद्यापीठात तर कित्येक वेळा Visiting Staff जास्त अशी सुद्धा स्थिति असू शकते. आपणाला मात्र साचलेल्या डबक्यातील पाण्याला गंगा म्हणायची पाळी आहे ! वहात्या पाण्याला 'जीवन' म्हणतात. डबक्यातल्या नव्हे ! परीक्षा, त्यासाठी तयारी, मार्क मिळविण्यासाठीच्या युक्त्या इ. गोष्टींचा फैलाव खुद्द विद्यापीठे आणि कॉलेजेही करू लागली. Mass Education हे विद्यापीठांचे ध्येय आणि संशोधनासाठी विशेष हालचालींसाठी इतर बाहेरच्या योजना अशी फारकतीची समीकरणे तथाकथित विचारवंतही खरी मानू लागले. सामान्य पातळीच्या शिक्षणविषयक धोरणाबाबत संकल्प आणि संकल्प हाताळणारे शिक्षण तज्ञ असामान्य गोष्टी घडविणाऱ्या शिक्षणाचे मूळ कशात आहे याकडे लक्ष देत नाहीसे झाले. समूहाच्या प्रगतीचा विचार करताना त्याच्यासाठी अत्यावश्यक असलेले त्या त्या विषयातील उन्नत नेतृत्व कसे तयार होईल याकडे लक्ष देण्याची रीत संपली. गोळाबेरजेची सोय होण्यात कृतार्थता मानली जाऊन थोडक्यात सहचारी निर्मिण्याचे कारखाने विद्यामंदिराच्या रूपाने सुरू झाले. पण या क्षेत्रात देवतापद मिळवायची इच्छा करणाऱ्या ध्रुवांना स्वतःची बाजीच लावण्यावाचून तरणोपाय नाही. सुयोग्य वातावरण, आवश्यक त्या सोयी आणि मार्गदर्शनाला समर्थ नेतृत्व या त्रयींची आवश्यकता भारतातली शास्त्र विद्या संगोपनास अत्यावश्यक आहे.

भास्कराचार्य प्रतिष्ठान आपल्या शक्तीनुसार अशा तऱ्हेची राष्ट्रीय गरज भागविण्यास आटोकाट प्रयत्न करीत राहणार आहे.

प्रा. अभ्यंकर आणि प्रा. साठे यांच्यासारख्या त्यांच्या सहकाऱ्यांस या कार्याबद्दल सुयश चिंतण्यास माझ्यासारखे उत्सुक आहेत.

चलन वित्त बँका — विकास नियोजन

# ‘ फुलमंगल ’

## किंमती स्थिर ठेवण्यासाठी चलन अतिवृद्धि रोखण्याचा उपाय

* प्रा. दिनकर बोरीकर, औरंगाबाद *

प्रा. सी. एन. वकील, डॉ. पी. आर. ब्रह्मानंद इत्यादि अर्थशास्त्रज्ञ चलनवादी अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. देशातील वाढत्या प्रमाणातील महागाईला आळा घालण्यासाठी हे अर्थशास्त्रज्ञ चलनविषयक उपाय सुचवितात. ‘ फुलमंगल ’ नियम हा त्यातलाच एक उपाय आहे. भारतातील भाववाढीच्या समस्येवर दूरगामी व दीर्घकालीन उपाय म्हणून वार्षिक चलन पुरवठा वाढीचा दर पाच टक्क्यांपेक्षा जास्त कधी असू नये, हे त्यांच्या योजनेचे मुख्य सूत्र आहे. यासाठी त्यांनी भारतीय संविधानातच दुरुस्ती सुचविली आहे.

### दुरुस्तीचे प्रस्तावपत्र

संविधानात खालील कलम घातल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था, चलन अतिवृद्धि व त्यांचे अर्थव्यवस्थेवर होणारे दुष्परिणाम यांपासून नेहमीसाठी मुक्त होईल. चलन अतिवृद्धीमुळे संपत्तीचे सदोष वितरण, सामाजिक अन्याय, बचतीला अनुत्तेजन, औद्योगिक संबंधात बिघाड, निर्यातीची पिछेहाट इत्यादी दुष्परिणाम होतात ते टाळता येतील.

या कलमाद्वारे जी तरतूद करावयाची आहे तिला ‘फुलमंगल’ असे संबोधता येईल. ‘ Five per cent Upper Linear Limit on Money's Annual Growth rate as per law. ’ या शब्दरचनेतील सोयीची आद्याक्षरे एकत्र आणून ‘ FULMANGAL ’ हा शब्द तयार करण्यात आला आहे.

### दुरुस्ती

संविधानात राज्य धोरणविषयक मार्गदर्शक तत्वे या चौथ्या भागात कलम ४३ ला, ‘ ४३-अ ’ ची दुरुस्ती जोडली जावी ती अशी —

“ किंमतीची पातळी स्थिर ठेवणे हे राज्याच्या चलनविषयक, अर्थसंकल्पीय, उत्पादन, गुंतवणूक, सार्वजनिक वितरण या धोरणांचे एक प्रमुख उद्दिष्ट राहील आणि हे उद्दिष्ट गाठण्यासाठी दर पाच वर्षांच्या काळात सरासरी वार्षिक चलन पुरवठा वाढ पाच टक्क्यापेक्षा जास्त असणार नाही, अशा पद्धतीने राज्य आपले चलनविषयक व अर्थसंकल्पीय व्यवहार करील. ”

### वरील दुरुस्तीचे स्पष्टीकरण

भारतीय अर्थव्यवस्थेत या देशातील बव्हंशी ग्रामीण उत्पादक आपल्या उत्पादनाचा फारच कमी भाग बाजारात नेऊन विकतात. शिवाय त्यांच्या इतर उपभोग्य गरजासाठी ते बाजारात जाऊन आवश्यक त्या वस्तू खरेदी करतात. आपल्या देशातील एकूण मजूर संख्येत शेतमजूरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे आणि त्यांची वास्तविक मजुरी अत्यल्प आहे, हे सर्वमान्यच आहे. ग्रामीण भागातून याशिवाय कारागिरी, व्यापार व सेवा या व्यवसायांतूनही मोठ्या प्रमाणात लोक काम करतात. किंमती वाढण्यामुळे या सर्वांवर अत्यंत प्रतिकूल परिणाम होतो. नागरी भागातूनही मोठ्या प्रमाणात कामगार असंघटित रूपात विविध उद्योगातून, व्यापार व सेवा क्षेत्रातून काम करतात. किंमती वाढल्या तर त्यांचे उत्पन्न आपोआप वाढावे अशी कोणतीच व्यवस्था आपल्या अर्थव्यवस्थेत आज नाही.

### चलन अतिवृद्धीचे परिणाम

चलन अतिवृद्धीमुळे वर उल्लेखिलेल्या उत्पादकांच्या व कामगारांच्या आर्थिक स्थितीवर व त्यांच्या वास्तविक वेतनावर प्रतिकूल परिणाम होतो. किंमती वाढल्या तरी त्यांचे उत्पन्न-वाढत्या किंमतीचा परिणाम शंभर टक्के प्रभावहीन करण्या

इतके वाढत नाही. जे काही थोडे फार उत्पन्न वाढते ते किंमती वाढल्यानंतर बऱ्याच काळाने वाढते. यामुळे त्या सर्वांची वास्तविक क्रयशक्ति घटायला लागते. चलन अतिवृद्धीमुळे झालेल्या किंमत वाढीमुळे बँकेतील ठेवीतून, अल्पबचतीतून, विम्यातून व प्रॉव्हिडंट फंडातून बचत करणाऱ्यांचेही नुकसान होत असते. एकीकडे त्यांचे वास्तविक उत्पन्न कमी होते, तर दुसरीकडे त्यांनी बचत रूपाने जमा केलेल्या जिंदगीचे मूल्य संकोचून जाते. चलन अतिवृद्धीमुळे दुर्मिळ वस्तूंची साठेबाजी करण्याची प्रवृत्ति वाढते व सोन्याचे स्मगलिंगही वाढते. सामाजिक दृष्ट्या अनुत्पादक असलेल्या बाबींवर गुंतवणूक वाढू पाहते. थोडक्यात रुपयाचे बाह्य मूल्य खूप घसरते.

पुन्हा चलन अतिवृद्धीने डोके वर काढले आहे. पण त्याच बरोबर वाढत्या किंमतीला आळा घालण्याचा निर्धारही जनता सरकारने केला आहे. चलन अतिवृद्धीचा धोका हंगामी स्वरूपाचा नसून तो सतत उद्भवणारा धोका आहे. उपभोग्य वस्तूंच्या पुरवठ्यातील वाढीपेक्षा चलन पुरवठा जेव्हा जास्त वाढतो, तेव्हा चलन अतिवृद्धी उद्भवते. सरकारच्या चलनविषयक व अर्थसंकल्पीय धोरणांचा हा परिपाक असतो. या धोक्यापासून समाजाचे विशेषतः कामगारांचे व गरीबांचे रक्षण केले गेले पाहिजे. याचा एक प्रभावशाली उपाय म्हणजे वार्षिक चलन पुरवठा वाढीवर वैधानिक कमाल मर्यादा लादणे. काही अर्थशास्त्रज्ञांनी यावर सखोल विचार केल्यानंतर चलन पुरवठावाढीच्या वार्षिक दरावर पाच टक्क्याची कमाल मर्यादा असावी. या निष्कर्षाप्रत ते पोहोचले आहेत.

म्हणून भारतीय संविधानात वरीलप्रमाणे दुरुस्ती करावी. अशी दुरुस्ती केल्यास सामाजिक न्याय, काटकसर व समता यांची संविधानांतर्भूत शाश्वती मिळू शकेल. ही दुरुस्ती अगदी समयोचित अशी आहे. कारण वेळीच ही दुरुस्ती झाली नाही तर, जगभर चाललेल्या चलनअतिवृद्धीच्या तडाख्यात आपली ही अर्थव्यवस्था सापडेल.

## चलनसाठा म्हणजे काय ?

देशातील एकूण चलनसाठा खालील घटकांचा बनलेला असतो. (अ) समाजात असलेले एकूण चलन (बँकांची हातावरील शिल्लक वजा जाता राहिलेले एकूण चलन). (ब) समाजात असलेला ठेवरूपी पैसा. त्यात बँकातील चालू ठेवी व रिझर्व्ह बँकेत असलेल्या इतर ठेवी यांचा पैसा जमा आहे. चलन किंवा पैसा बँकांच्या दृष्टिकोनातून दायित्व असतो. या दायित्वाचे प्रमाण खालील घटकांवर अवलंबून असते.

१. सरकारी क्षेत्रास होणाऱ्या बँक पतपुरवठ्याच्या वाढीचा दर, २. औद्योगिक व व्यापारी क्षेत्रास होणाऱ्या बँक पतपुरवठ्यातील वाढ (यात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग व व्यापार यांचा समावेश आहे.) ३. बँक क्षेत्रातून वाढणारा परकीय चलन साठा.

## बँक पतपुरवठ्याची वाढ :—

सरकारी क्षेत्रास होणाऱ्या बँक पतपुरवठ्याची वाढ सरकारच्या वार्षिक अंदाज पत्रकातील तुटीच्या आकारमानावर अवलंबून असते. तुटीचे आकारमान ठरविताना खालील घटकांचाही समावेश केला जातो.

१. महसूली व भांडवली खात्यावर सरकारकडे जमा होणाऱ्या रकमेपेक्षा बटवड्याची रक्कम जास्त असेल तर ती फरकाची रक्कम, मात्र जमा होणारी रक्कम मोजताना बँकाकडून घेतलेली व बटवड्यातून मिळालेली व बँकांना परत केलेली रक्कम या रकमा वगळल्या पाहिजेत.

२. सरकारी क्षेत्रातील रोख्यांचा साठा बँकांना विक्री करून मिळालेली रक्कम.

३. वर्षभरात सरकारी क्षेत्रातील रोकड शिलकेत झालेला बदल.

तूट मोजण्यासाठी जमा रकमेत व्यापारी बँकांकडून कर्जाऊ घेतलेल्या रकमेचा समावेश करण्याची पद्धत भारतात रूढ आहे. मात्र वरील क्रमांक २ व ३ च्या रकमा वगळल्या जातात. रिझर्व्ह बँक सरकारी क्षेत्रास जो निव्वळ पतपुरवठा करते ती रक्कम जवळपास क्रमांक १ इतकी असते.

उद्योगधंदे व व्यापार क्षेत्रांना वाढणारा बँक पतपुरवठा, हे उद्योगधंदे व व्यापार क्षेत्र आपल्या चालू भांडवलातील तुटीचा काही भाग बँकाकडून कर्ज घेऊन भरून काढीत असतात, त्यावर अवलंबून असतो.

बँकांतील परकीय चलनसाठा आंतरराष्ट्रीय व्यापारातील बचत रकमेवर अवलंबून असतो. आंतरराष्ट्रीय व्यापारातील बचत मोजताना दृश्य वस्तू व अदृश्य सेवा यांच्या देवाणघेवाणीचा विचार केला जातो.

सरकारी क्षेत्राची तूट एका बाजूने त्यांना मिळणाऱ्या कर व बिगरकर रूपी उत्पन्न, परकीय मदत, बिगर बँक संस्थाकडून व समाजातील खाजगी बचतीवर घेतलेले कर्ज यावर अवलंबून असते. तर दुसऱ्या बाजूने सरकार करीत असलेल्या बट-

वड्याच्या रकमेवर अवलंबून असते. बटवड्याची रक्कम सरकारी क्षेत्राच्या खर्चाच्या परिमाणावर अवलंबून असते.

अपेक्षित तूट व वास्तविक तूट क्वचितच एकमेका समान असतात. कारण केन्द्र सरकार व विविध राज्य सरकारे स्वतंत्र असतात. तसेच सरकारी क्षेत्रात काही अकल्पित व अनपेक्षित खर्च करावे लागतात.

**सरकारला होणारा बँक पतपुरवठा :—**

सरकारने बँकाकडून किती पुरवठा करून घ्यावा यावर कसलेही कायदेशीर बंधन नाही. किती खर्च करावयाचा याचे निर्णय मंत्र्यांच्या व खात्यांच्या पातळीवर घेतले जातात व असे निर्णय घेताना त्यांचा एकूण तूटीवर काय परिणाम होईल हे विचारात घेतले जात नाही. लोकसभेतून किंवा विधानसभेतून अंदाजपत्रकावर जी चर्चा होत असते ती फक्त कर आकारणीच्या भोवतीच जास्त फिरते. त्या अंदाज पत्रकातील तरतुदींचा चलन पुरवठ्यावर काय कमी जास्त परिणाम होणार आहे याला फारसे महत्त्व दिले जात नाही. तुटीच्या अर्थभरणामुळे किंमती वाढून त्याचा सर्वांच्याच हितावर परिणाम होत असतो. त्यात समाजातील जे संघटित घटक असतात त्यांच्या हितसंबंधाचे आंशिक कां होईना संरक्षण होत असते. पण असंघटित समाज आणि निम्न स्तरावरील लोकांची खरेदी शक्ति अशा भाववाढीमुळे खूपच कमी होते, व दुर्दैवाने अशा लोकांचा कोणी वाली नसतो.

१९६१ ते १९७० या दशकाच्या मध्यात विशेषत: दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्या लोकांचे प्रमाण खूपच वाढले पण इतर खर्च गटातील लोकांचे प्रमाण जवळपास स्थिर कायम राहिले. याचाच अर्थ महागाईची झळ उच्चस्तरीय समाजापेक्षा निम्नस्तरीय लोकांना जास्त पोहचते.

पाच वर्षांचा काळ समोर ठेवून सरासरी वार्षिक चलनवाढीवर पाच टक्क्यांची मर्यादा टाकल्याने चलन पुरवठा तसा लवचिक राहू शकेल. एखाद्या वर्षी चलन पुरवठा पाच टक्क्यांपेक्षा जास्त असू शकेल. फक्त पाच वर्षांचा अवधि समोर ठेवून त्याची सरासरी वाढ पाच टक्क्यापेक्षा जास्त वाढू नये एवढी मात्र दक्षता घेतली जावी. अशा प्रकारे चलन वाढीवर एकदा मर्यादा घालून घेतली म्हणजे इतर मार्गाने पैसा उभा करण्याची जिद्द निर्माण होऊ शकेल. आर्थिक दृष्ट्या फारसा विचार न करता धाडसी योजना हाती घेताना सरकार शंभरदा विचार करील. उत्पादन क्षमतेचा अपव्यय टाळला जाईल. उठसूट बँकांकडून पतपुरवठा करवून घेण्याची सोय असल्यामुळे भ्रष्टाचारही वाढला आहे. त्यालाही आळा बसेल.

**साधनांचा उत्तम वापर :—**

यामुळे किंमती स्थिर राहण्यास मदत तर होईलच, शिवाय जी साधन संपत्ति आपल्याजवळ उपलब्ध आहे तिचा वापरही उत्तम प्रकारे होईल. बचतीला प्रेरणाही मिळेल.

'फुलमंगल' योजनेची अंमल बजावणी रिझर्व्ह बँक व केन्द्रीय वित्त मंत्रालयाने मिळून करावयाची आहे. आपण नियोजित अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेला असल्यामुळे या दोन सत्ताभागात संघर्ष निर्माण न होता एकसूत्री धोरण आखण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे.

या योजनेची अंमलबजावणी अधिक सक्षम व सुकर होण्यासाठी राष्ट्रीय पत पुरवठा मंडळ कायम करता येईल. रिझर्व्ह बँक, केन्द्रीय वित्त मंत्रालय, नियोजन आयोग, राज्य सरकारे, मोठे व लघु उद्योग, शेती, व्यापार, कामगार, ठेवीदार व अर्थशास्त्रज्ञ या सर्वांचे प्रतिनिधित्व या राष्ट्रीय पतपुरवठा मंडळात असावे. अंदाजपत्रक मांडले जाण्याच्या आधी एकदोन महिने व ते मांडल्यानंतर दोन तीन महिन्यांनी या मंडळाची अवश्य बैठक व्हावी.

येथे एका बाबीचा उल्लेख केला पाहिजे. चीनने अशा स्वरूपाची योजना आपल्या देशात अमलात आणली असून त्याचे सुपरिणामही त्यांना दिसून येत आहेत. महागाई कमी होत आहे. त्यांचा अनुभव आपणास निश्चित प्रेरक ठरू शकेल.


सामान्यांची असामान्य चळवळ

म्हणजेच

सहकारी चळवळ

या विकासशील चळवळीचा दीपस्तंभ

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक, लिमिटेड**

(दि विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँक संमिलित)

९ नगीनदास मास्तर रोड विस्तार,

फोर्ट

मुंबई ४०००२३

पीक कर्ज, कृषि औद्योगिक प्रकल्प (प्रक्रिया संस्था) इंजिनिअरिंग संस्था, मुद्रणालये, प्रकाशन संस्था, निवृत्त सैनिक, कागद व्यवसाय. मद्यार्क निर्मिति तसेच अल्प-भूधारक, आदिवासी, जंगल कामगार व फेरीवाले या सार्‍यांना विकासाची दिशा दाखविणारा व त्या मार्गावर सतत साथ सोबत देणारा दीपस्तंभ

# म. गांधीजींचे आर्थिक विचार

* प्रा के. एम. बावगे, *
दयानंद कॉमर्स कॉलेज, लातूर

## प्रास्ताविक

जागतिक कीर्तीचे एक महान् विचारवंत म्हणून गांधीजी ओळखले जात असले तरी अजूनही त्यांच्या तत्त्वज्ञानाला सर्वार्थाने व सर्व दृष्टीने योग्य असे शाश्वत रूप देण्यात आलेले नाही. समाजाने प्रचलित नव्या मूल्यांची कास धरून, त्यांचे विचार विसरले आहेत. आपल्या देशातील राज्यकर्त्यांनी त्यांचे प्रतिकात्मक महत्त्व फक्त वाढविले.

आज कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेतील विकासाची प्रतिमाने अयशस्वी ठरत आहेत. दारिद्र्य, बेकारी, हिंसा, शोषण, वैफल्यता इ. हे विकासातून विनाशाकडे, उन्नतीकडून अवनतीकडे, संस्कृतीकडून विकृतीकडे असलेल्या वाटचालीचे द्योतक ठरले आहे. मानव हा निसर्गापासून दूर जात आहे, त्याला अंतिम सुख सापडेनासे झाले आहे. समाजाची मूल्ये बिघडली आहेत. खऱ्या लोकशाहीचे दृश्य मृगजळ बनले आहे. भेद, नाश, ह्रास, संघर्ष व अपयशाच्या चक्रात आजच्या मानवाचे आयुष्य गुरफटले गेले आहे. या सर्व परिस्थितीची हांक आता गांधीजींच्या आर्थिक विचारांकडे आहे.

## विचारांचे अधिष्ठान

गांधीजींच्या विचारांत विविध धर्मग्रंथ व तत्त्वज्ञान्याचा प्रभाव दिसून येतो. हिंदुधर्मावर त्यांची श्रद्धा असल्याने सर्व धर्मांना समान दृष्टिकोन बाळगण्याची त्यांची मतप्रणाली बनली. बौद्ध व जैन धर्मांमुळे सत्य व अहिंसा हे विचार त्यांच्यात रुजले. ख्रिश्चन धर्माच्या शिकवणीमुळे मानवतावाद, समता, बंधुत्व इ. गुण त्यांच्यात मुरले. येशू, रस्कीन, टॉलस्टाय, थोरो, गोखले, इत्यादींचे विचार व शिकवण त्यांनी अंगीकारली. या सर्वांचा परिणाम म्हणजे त्यांच्या विचाराला एक नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले.

## विचारांचे मर्म

गांधीजींनी जगाला अर्थशास्त्राचा एक नवा अर्थ व नवीन व्याप्ति दाखविली. अर्थशास्त्र, मानसशास्त्र, धर्मशास्त्र, यांच्यात जो परस्पर संबंध असतो, त्याद्वारे त्यांनी मानवी समस्या अभ्यासल्या. अर्थ (पैसा), कर्म (इच्छा), धर्म (सत्य), व मोक्ष (मुक्ति) या चक्रबद्धतेतून मानवी विकास होतो. या चक्रातून मिळणाऱ्या मुक्तीशी गांधीजींनी अर्थशास्त्राचा संबंध जोडला. अर्थशास्त्रावरील सध्याची पुस्तके माणसाला अंतिम सुखाचा मार्ग दाखवीत नाहीत. त्यापेक्षा जगातील महान् धर्मग्रंथ कितीतरी सुरक्षित व मजबूत मार्ग दाखवितात.

त्यांच्या मते निसर्ग नियमांतून अर्थशास्त्रीय नियमांचा उगम आहे. दोन्ही नियमांत फरक हा की, निसर्गाचे नियम सर्वव्यापी असतात तर अर्थशास्त्रीय नियम त्या त्या देशातील समाजाच्या बदलत्या परिस्थितीनुसार बदलत असतात. इतःपर कोणाही देशाने आपल्या विकासाची योजना किंवा तंत्र स्वतःच्या देशातील परिस्थितीप्रमाणे शोधले व आखले पाहिजे. या दोन्ही नियमांत संतुलन असले पाहिजे. अन्यथा गोंधळ निर्माण होईल.

एखाद्या देशाची 'प्रगति' म्हणजे काय? याचाही त्यांनी वेगळा अर्थ सांगितला आहे. एखाद्या देशाचे फक्त राष्ट्रीय उत्पन्न वाढले, आर्थिक उन्नति झाली म्हणजे ती प्रगति नव्हे. शोषण, लूट, स्वार्थ, जुलूमरहित व समता, न्याय व अहिंसा यांवर आधारित आदर्श समाज त्यांना निर्माण करायचा होता. जर देशात चारित्र्यसपन्न माणसांची संख्या अधिकतम झाली तर ती खरी प्रगति होय. तेव्हा नैतिक प्रगतीला ते खरी प्रगति मानतात. यावरून ते म्हणतात, "जेथे नीतिशास्त्र संपते, तेथे अर्थशास्त्रही संपते." त्यांनी भौतिक विकासाऐवजी माणसाच्या नैतिक मूल्यांना महत्त्व दिले. आजच्या तथाकथित प्रगतीद्वारे संपत्तीत जी वाढ झाली आहे व हे होताना निसर्गावर मिळविली गेलेली

जी सत्ता आहे त्याद्वारे समाजाचे भले काही झाले नाही. आदर्श संस्कृति नामशेष होत आहे, नीति पोरकी झाली आहे. चोरी, हिंसा, अन्याय, रोगराई, जुगार, भ्रष्टाचार इत्यादि जीवविघ्नी व जीवघातकी बाबी, ही विकासाची फळेच आहेत काय ? आर्थिक विकासाच्या व सामाजिक विकासाच्या प्रक्रिया अतूट आहेत. यामुळेच डॉ. गाल्ब्रेथसारख्या अर्थतज्ज्ञांनी " समाज कल्याणाचे अर्थशास्त्र " प्रतिपादले आहे.

गांधीजींच्या विचारांचा रोख व्यक्ति सुधारण्यावर आहे. त्यांच्या अर्थव्यवस्थेत मनुष्य हा अधिक आत्मनिर्भर व आत्मसंतुष्ट बनविणे आहे. देशाची विकासाची पद्धत व त्यासाठी लागणारी साधने ठरविताना नैतिकतेच्या दृष्टीने विचार होणे महत्त्वाचे आहे. समाजातील शेवटच्या स्तरातील व्यक्तींच्या मूलभूत गरजा भागविल्या जाणे हे त्यांच्या आर्थिक विचारांचे मूळ आहे. संपत्तीचे सर्व समाजात समान वाटप झाले पाहिजे. विकेंद्रित अर्थव्यवस्थेद्वारे शोषणरहित अर्थव्यवस्था उभी राहील. शोषणाद्वारे मिळविलेली वस्तु हिंसेच्या मार्गाने मिळविली असे ते मानीत. भांडवलशाही व्यवस्थेत वर्ग संघर्ष उपजत राहतात हे त्यांना मान्य नाही. वर्गसंघर्षाऐवजी वर्ग तडजोडीवर त्यांचा विश्वास आहे.

गांधीजींनी अर्थशास्त्राचा इतका व्यापक अर्थ लावून जगाला एक महान् आदर्श घालून दिला आहे. स्वतः त्यांनी अर्थशास्त्रावरील पुस्तके वाचली नसतानाही त्यांचे विचार फार महत्त्वाचे ठरतात. त्यांची व्याख्याने, लेखन, पत्रव्यवहार इत्यादींवरून निघणाऱ्या आर्थिक विचारांचे विविध घटक आपण विचारात घेऊ.

## स्वदेशी व स्वावलंबी अर्थव्यवस्था

गांधीजींनी अपेक्षिलेले समाजजीवन स्वावलंबी अर्थव्यवस्थेवर आधारित आहे. देशातील लोकांच्या गरजा खुद्द त्या देशाद्वारे पुरवल्या जाण्याची क्षमता असली पाहिजे. असे असेल तरच त्या देशाची औद्योगिक व्यवस्था आदर्श समजली जाईल. आर्थिक नियम हे देशाची भूरचना, वातावरण व माणसाच्या वंशस्वभावानुसार ठरविले जावे. तेव्हा आपल्या अर्थव्यवस्थेचे वशिष्ट्य पाहून विकासाचे मार्ग शोधले पाहिजेत. बदलत्या परिस्थितीनुसार आर्थिक नियमांचा अवलंब पण बदलून घेतला पाहिजे. आपल्या देशाच्या नैसर्गिक नियमांच्या साच्यात आर्थिक नियमांचा विचार करणे आवश्यक आहे.

देशातील प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनले जावे असे त्यांचे मत होते. खेड्याला लागणाऱ्या वस्तु खेड्याद्वारे पुरवल्या पाहिजेत. यासाठी त्यांनी ग्रामोद्योगाचा पुरस्कार केला. वस्तूचे उत्पादन देशाच्या गरजेनुसार झाल्यास वस्तु वितरणात पण समानता आणता येईल. असा त्यांचा विचार आहे. वस्तुनिर्मितीसाठी लागणारे तंत्रज्ञान व भांडवल विदेशी असेल तर मात्र ते स्वदेशाच्या नियंत्रणाखाली असेल तर त्या वस्तूंना गांधीजींनी स्वदेशी म्हटले आहे. एखादी वस्तु लक्षावधि लोकांच्या उपयोगाची असेल तर ती वस्तु स्वदेशी होय. एखादी वस्तु आयात केलेली देशातील उद्योगांना हानि पोहोचत असेल तर त्या वस्तूंची आयात थांबविणे महत्त्वाचे आहे. तसेच अनावश्यक वस्तूंशी आयात करून देशाच्या संपत्तीची उधळपट्टी केली जाऊ नये. आज गांधीजींचे विचार पाश्चिमात्य राष्ट्रात देखील पटत आहेत. गुन्नर मिर्डालने आपल्या 'आशियन ड्रामा' मध्ये स्थानिक गरजांना अनुसरून स्वदेशी तंत्र अवलंबिण्यावर व तसेच ग्रामोद्योगाच्या विकासाबद्दल मत व्यक्त केले आहे.

## साध्य व साधने

म. गांधीजींनी साध्या राहणीबद्दल व उच्च विचारसरणीबद्दल आग्रह धरला. नैसर्गिक साधनांची दुर्मिळता, यांत्रिकीकरणामुळे जीवनावर येणारा ताण, भांडवलाचा तुटवडा, अमर्यादित इच्छापूर्ती न झाल्याने निर्माण होणारा निराशावाद इत्यादि समस्या साध्या राहणीमुळे सुटू शकतील. साध्य व साधने यात बी व झाडासारखा संबंध आहे. साध्यासारखीच साधनेही शुद्ध असली पाहिजेत, साधन शुचितेला लोक एक उच्च तत्त्वज्ञान समजतात. पण गांधीजींनी ही बाब व्यवहारी आहे असे पटवून दिले. जितके महत्त्व गरजांना दिले जाते तितकेच महत्त्व त्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनाना पण दिले जाते. मर्यादित वस्तूंचा उपभोग घेणारा मनुष्य आदर्श ठरतो. माणसाला त्यामुळेच सुसंस्कृतपणा प्राप्त होतो. अर्थात् साधी रहाणी म्हणजे वैराग्य समजू नये. इतरांच्या गरजा पाहून आपल्या गरजा ठरविल्या जाव्यात, त्यात सामाजिक जाणीव असावी. समाजवाद हा स्फटिकासारखा आहे व समाजवाद आणण्यासाठी स्फटिकासारखीच साधने वापरली पाहिजेत.

अती गरजा बाळगल्याने माणसाला अंतिम सुख प्राप्त होत नाही. जितक्या जास्त प्रमाणात गरजा असतात तेवढ्याच प्रमाणात मनाची अशांतता व वर्गकलहाला आमंत्रण होते. मानवी सुख हे सापेक्ष आहे, सुखदुःखाचा विचार स्वतःपुरता करावा. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय श्रीमंती जीवनात नाही. भौतिक सुख अल्पकालीन असते. अमर्यादित गरजांची पूर्तता करण्यासाठी भरमसाट उत्पादन व त्यासाठी राक्षसी कारखान-

दारी त्यांना अमान्य होती. मानवाच्या मूलभूत गरजांची पूर्तता हे गांधीप्रणीत अर्थव्यवस्थेचे ध्येय आहे, प्रो. डब्ल्यू रोस्टो याने आपल्या पुस्तकात मानवाच्या जीवन गुण सुधारणेवर यामुळेच भर दिला आहे.

गांधीजीच्या उपरोक्त विचारावर अशी टीका केली जाते की, आज गरजा कमी करण्याचा प्रश्न नाही, तर किमान गरजा कशा भागवाव्यात हा प्रश्न आहे. श्रीमंतांची श्रीमंती तशीच ठेवून गरिबांच्या गरजा कशा भागवाव्यात हा त्यांना प्रश्न आहे. दुसरी एक अशी टीका केली जाते कीं, गांधीजींच्या आदर्शातील मनुष्य कसा रहावा हे कळते; मात्र तो प्रत्यक्षांत तसा रहात नाही. याला उत्तर असे की मनुष्य हा काही जन्मताच आदर्शहीन होऊन जन्मत नाही. आपण निर्माण केलेल्या परिस्थितीत तो जगतो व सर्व काही शिकतो. तिसरी एक अशी टीका आहे की, दोन वेळा साधे अन्न न मिळणाऱ्या स्वजनांना काय म्हणून साधेपणा शिकवावा? गांधीजींनी किमान गरजा कमी करण्यास सांगितले नसून त्या भागविण्याबद्दल आग्रह धरला. मोठमोठ्या फ्लॉटमध्ये आरामशीर चैनबाजीने राहून मदिरेच्या नशेत गरिबीची विटंबना करीत खिदळत बसणाऱ्यांनी गरजा मर्यादित केल्यास लोकांना दोन वेळाच काय तीन वेळाही अन्न मिळू शकेल. काहीजण असेही म्हणतात की आज अनावश्यक वस्तूंच्या उत्पादनासाठी प्रचंड प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक झाली आहे त्याचे कसे करावे? याला उत्तर असे की, चुकीने चुकीची दुरुस्ती होत नाही. या गुंतवणुकीमुळे सामान्य जनतेचे कल्याण साधले गेले नाही. देशातील उपासमारीचा विचार करता या गुंतवणुकीची विल्हेवाट लावणे विशेष दुरास्पद व खर्चाचे ठरणार नाही.

## विश्वस्ताची कल्पना

महात्मा गांधींनी वस्तु उत्पादनाच्या साधनांवरील खाजगी मालकीद्वारे व त्या अनुरोधाने होणाऱ्या आर्थिक सत्तेच्या केंद्री करणामुळे उद्‌भवणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी विश्वस्ताची कल्पना मांडली. त्यांना आर्थिक विषमता नष्ट करावयाची होती. व्यापाऱ्यांनी व उद्योगपतींनी मिळविलेली संपत्ति ही पूर्णतः त्यांची नसून संपूर्ण समाजाच्या मालकीची आहे. खाजगी संपत्तीविषयी त्यांचे विचार नैतिक स्वरूपाचे होते. जमिनदार व भांडवलदारांची संपत्ति जप्त करावी हे त्यांना मान्य नव्हते. संपत्तीच्या मालकांनी आपल्या गरजा मर्यादित स्वरूपात भागवून शेषसंपत्तीचा उपयोग समाजाच्या हितासाठी करावा. याद्वारे संपत्तीची वाटणी समाजात होईल. केंद्रित संपत्तीच्या दोषांचे निर्मूलन करण्यासाठी हिंसात्मक मार्ग व कायद्याचा बडगा यापेक्षा विश्वस्ताची कल्पना उपयोगी ठरते. ही कल्पना मांडताना त्यांनी माणसाच्या सद्‌बुद्धीवर व सद्‌गुणावर विश्वास ठेवला. ही कल्पना त्यांनी मानवी बुद्धि, कला इत्यादींना पण लागू केली आहे. ही कल्पना भांडवलशाहीस पर्याय ठरेल. या कल्पनेच्या अनुरोधाने गांधीजींनी व्यावसायिक समाजातर्फे सर्व सामान्य समाजाविषयीची जबाबदारी स्वीकारण्याबद्दल आग्रह धरला.

उद्योगपतींनी विश्वस्त वृत्ति नाही दाखविल्यास त्यांच्याशी असहकार पुकारावा किंवा सरकारने उद्योग हाती घेऊन समाजहितार्थ चालवावेत. या कल्पनेप्रमाणे गांधीजीनी मालक व कामगार यांची उद्योगातील भागीदारी प्रतिपादिली. मालकांनी श्रमिकांचे विश्वस्त या नात्याने वागावे. तसे ते न वागल्यास कामगारांनी त्यांची न्यायबुद्धि जागृत करावी. गांधीजींना वर्गसंघर्ष नको होता. समाजवादी समाजरचनेत उद्योगपति व कामगार हा फरक आधारहीन आहे. उद्योगपतींनी कामगारद्वारे उत्पादन वाढले जाईल अशी परिस्थिति निर्माण करून द्यावी तर कामगारांनी पण उद्योगाच्या विकासाकडे लक्ष द्यावे. विश्वस्ताची कल्पना अंगीकारल्याने आर्थिक समता व सामाजिक न्याय प्रस्थापित होईल.

## उत्पादन प्रक्रिया व नफा उद्देश

व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक गुणस्वभावानुसार त्यांच्या गरजांमध्ये विविधता असते. वस्तूला येणारी मागणी तर्कशुद्ध व्यवहार्य सदसद्‌विवेक बुद्धीवर आधारित असावी कारखानदारांनी द्रव्यात्मक रूपात व्यक्त होणाऱ्या मागणीना लक्ष न देता लोकांच्या खऱ्या गरजा जाणून उत्पादन करावे. मात्र आज परिणामी मागणीवरून उत्पादन होत आहे. ग्राहक, यंत्रनिर्मित वस्तूंची मागणी करताना यंत्रद्वारे निर्माण झालेल्या बेकारीची सामाजिक हानि जाणू शकत नाही. त्यांना त्यांच्या खऱ्या गरजा कळत नाहीत. शिवाय ग्राहकांच्या परिणामकारी संघटना नाहीत. त्यामुळे उत्पादनांत 'ग्राहकराजा' दिसून येत नाही. जे वस्तूंचा उपभोग घेणारे आहेत त्यांच्याद्वारेच उत्पादनाबद्दलचा निर्णय असावा. वस्तु उत्पादनाची प्रक्रिया उत्पादकाच्या लहरीनुसार न रहाता समाजाच्या खऱ्या गरजांवर आधारलेली असावी. उत्पादक व ग्राहक यांच्यात सुसंवाद असला पाहिजे. वस्तूचे उत्पादन स्थानिक गरजेनुसार झाल्यास वस्तूच्या वितरणात समानता आणता येईल.

उत्पादनाची पातळी सामाजिक गरजेनुसार ठरल्यास 'अधिक' उत्पादनाची समस्या टळेल व स्पर्धिकी स्थिति निर्माण

होणार नाही व वस्तु वितरणातील अनावश्यक खर्च टळतील. गरज न पहाता भरमसाट उत्पादन अनावश्यक आहे. त्या-दृष्टीने उद्योगाच्या पूर्ण क्षमतेचा वापर महत्त्वाचा नसतो. मूलभूत गरजेनुसार उत्पादन ठेवल्यास विनाकारण लोकांच्या गरजा पाहून त्याची पूर्तता यंत्राद्वारे करण्याचा प्रश्नही उद्भवत नाही.

उद्योग अस्तित्वात राहण्यासाठी नफा ही बाब महत्त्वाची नाही. नफा नसतानाही ग्रामोद्योग व कुटीरोद्योग चालतात. नफ्यापेक्षा समाजहित महत्त्वाचे आहे. कारखानदारांनी कमवलेल्या नफ्याचे समाजात सुयोग्य वाटप झाले पाहिजे, त्यासाठी राष्ट्रीयीकरण हा एक मार्ग आहे किंवा कामगारांना त्यांच्या कामाच्या प्रमाणात नफ्याचे वाटप हा दुसरा एक मार्ग आहे.

उत्पादन खर्चात कच्च्या मालाचा खर्च व श्रमिकांचा मोबदला हे दोनच घटक महत्त्वाचे आहेत. धंद्याची लाभदायकता मोजताना वितरण खर्च व भांडवली झीज हे दोन आहेत. जाहिरात खर्च, मध्यस्थाचा नफा हे वस्तूच्या किंमतीतील घटक रास्त नाहीत. लघु उद्योगाच्या बाबतीत सरासरी खर्च हेच वास्तविक मूल्य.

## ग्रामोद्योग-कुटीरोद्योग

लोकांच्या अत्यंत महत्त्वाच्या गरजा एखाद्या उद्योगामुळे कितपत भागविल्या जातात यावरून ते उद्योग अर्थशास्त्राच्या तत्त्वाला अनुसरून आहेत कीं नाहीत हे ठरवावे असे गांधीजींचे मत आहे. ग्रामोद्योग, कुटीरोद्योग अगदी स्वस्तात माणसाच्या मूलभूत गरजा भागवितात. यासाठी खेड्यांतील कच्च्या मालाची उपलब्धता लक्षात घेऊन तेथे असे उद्योग चालवावेत खरा भारत हा खेड्यांत वास्तव्य करतो. ग्रामीण जनतेचा कायापालट झाल्याशिवाय भारताची खरी प्रगति होणार नाही. कुटीरोद्योग आर्थिकदृष्ट्या परवडणारे असतात. कारण त्यांच्या बाबतीत स्पर्धेची स्थिति, व्यवस्थापन खर्च, वाहतूक खर्च, संग्रह खर्च इत्यादी उद्भवत नाही. असे उद्योग विशेष रोजगारक्षम असतात. या उद्योगाचा विकास झाल्याशिवाय प्रत्येकाला काम मिळणे कठीण होईल व समाजाची खरेदी शक्ति पण वाढणार नाही.

भारतीय शेतकऱ्यांना वर्षातून ५ ते ६ महिने काम मिळते. बाकीच्या मोकळ्या दिवसांच्या काळात उदरनिर्वाहाचा खर्च चालूच असतो. शेतकऱ्यांना ग्रामीण उद्योगाद्वारे दुय्यम उत्पन्नाचे साधन प्राप्त होईल व त्यांना आर्थिक स्वातंत्र्य लाभेल. अशा उद्योगामुळे प्रादेशिकसमता येईल व वस्तूंचे समान वाटप होऊ शकेल. कृषिक्षेत्रावरील लोकसंख्येचा भार कमी होईल आणि मोठ्या उद्योगास पूरक पण ठरतील. जनता पक्षाकडून या उद्योगाच्या विकासाच्या योजना ठरविल्या जात आहेत. कारण भारतीय खेडी जिवंत ठेवण्यासाठी या उद्योगाचा विकास अति आवश्यक आहे.

## भांडवल व संपत्ति

भांडवल हे संपत्ति निर्मितीचे साधन आहे. गांधीजींच्या मते द्रव्ययुक्त व श्रमयुक्त असे दोन प्रकारचे भांडवल असते. या दोन्हीत फरक हा की भांडवलदार आपली शक्ति जाणतात. मात्र कामगार अशिक्षित, असंघटित व गरीब असल्यामुळे आपली शक्ति जाणू शकत नाही. उत्पादनासाठी दोन्ही भांडवलांची आवश्यकता असते. कारखानदार व कामगार दोघाचीही बौद्धिक शक्ति समान राहिली असती तर कामगार उद्योगातील भागीदार समजले गेले असते. शिवाय परस्परांबद्दल आदरही राहिला असता. दोन्ही भांडवलांचे सुयोग्य संघटन असल्याशिवाय औद्योगिक शांतता नांदणार नाही. गांधीजींचा विरोध प्रत्यक्ष भांडवलाला नसून भांडवलशाहीला आहे. भांडवलशाहीचा कल केन्द्रित होण्याचा असतो तर श्रमिकांचे तसे नसते. एकाच उद्योगात भांडवल एकवटत गेल्यास त्याची खर्चक शक्ति वृद्धिगत होते. मात्र कामगारांची शक्ति तेवढीच राहिल्याने त्यांची पिळवणूक सुरू होते. यासाठी भांडवलावर विकेंद्रित मालकी आवश्यक आहे.

गांधीजींचे संपत्तीविषयी विचार येशूप्रणीत आहेत. संपत्तीवर ज्याचा जीव जडतो त्यांना ईश्वराच्या दरबारी प्रवेश मिळणे कठीण असते. एकाच वेळी परमेश्वर व पैसा यांची सेवा करता येत नाही. जरी व्यक्तीच्या भौतिक व अभौतिक उन्नतीसाठी संपत्ति आवश्यक असली तरी संपत्ति संगृहीत करताना ही बाबच मनुष्य विसरतो. संपत्तीच्या मागे असलेली लालसा नष्ट झाली पाहिजे. अनावश्यक संपत्ति बाळगणे हा मानवतेचा अपराध आहे. जितके संपत्तीचे जास्त संग्रहण असते तितकाच मोठा नैतिक दुराचार असतो. संपत्तीचे केंद्रीकरण हे खऱ्या प्रगतीला विघ्न आहे.

## श्रम व रोजगार

श्रम करून जगणे हा निसर्गाचा नियम आहे. प्रत्येकाने श्रम करून आपला उदरनिर्वाह चालवावा. दुसऱ्याच्या श्रमातून निर्माण झालेल्या वस्तूंचा उपभोग घेऊ नये. कारण त्यामुळे

काम करण्याची सवय कमी होईल. बेकारी व वगभद वाढतील. ईश्वराने प्रत्येकाला रोजच्या भाकरीपेक्षा काहीसे अधिक मिळविण्याची शक्ति दिली आहे. त्याचा वापर माणसानें केला पाहिजे. प्रामाणिकपणे काम करू इच्छिणाऱ्यांना देशात काम मिळू शकते. गांधीजींना श्रेणीबद्ध जातीव्यवस्थेतील श्रमविभागणी मान्य नव्हती. प्रत्येकाने अंगभूत गुणानुसार काम करावे असे त्यांचे मत होते. गुणानुक्रमानुसार श्रमांची वर्गव्यवस्था ही आदर्श व्यवस्था असे ते मानीत. माणसाला त्याच्या आवडीनुसार काम मिळाल्यामुळे मानसिक व शारीरिक समाधान लाभेल, ते जास्त आनंददायी होईल. वस्तु उत्पादनात यंत्राचा वापर केल्याने सकृत् दर्शनी वस्तु स्वस्त वाटतात. मात्र त्यामुळे मानवी श्रमही स्वस्त होतात ही बाब लक्षात आली पाहिजे.

बृहत् प्रमाणावर उपभोगाची पातळी असल्याशिवाय बृहत् प्रमाणावरील उत्पादन कामाचे नाही. यासाठी प्रत्येकाला काम मिळणे आवश्यक आहे. म्हणून उत्पादनाची साधने सर्वसामान्य जनतेच्या हातात असणे आवश्यक आहे. अमेरिकेत प्रचंड औद्योगिकरण असूनही गरिबी, बेकारी आहेच. पूर्ण रोजगार देण्यासाठी वर सांगितल्याप्रमाणे कुटीर उद्योग-ग्रामोद्योगाचा विकास आवश्यक आहे.

## प्रचंड यांत्रिकीकरण

गांधीजींच्या मते, यंत्राच्या अतिरेकी वापरामुळे माणसाचे व्यक्तिमत्त्व नाश पावत आहे. व्यक्ति व समाज यांतील संबंध बिघडत आहेत. माणसाचे मानसिक दौर्बल्य वाढत आहे. खरोखर आज अधिकतम यांत्रिकीकरणामुळे कित्येक समस्या उद्‌भवल्या आहेत. मोठमोठ्या शहरांत घरांचा प्रश्न, गोंगाट, प्रदूषण, औद्योगिक अशांतता, अपघात इत्यादि अनेक प्रश्न भेडसावीत आहेत. बृहत् यांत्रिकीकरणाचे दुष्परिणाम पटवून देताना गांधीजी बायबल मधील उदाहरण देतात, " माणसाला सारे जग हाती लागले, पण जर तो आत्मा गमावून बसला तर त्याचा काय उपयोग " स्वतःचे व्यक्तिमत्त्व गमावून यंत्राचा गुलाम बनून राहणे म्हणजे मानवी प्रतिष्ठेची क्षतीच होय. मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण झाल्यास ग्रामीण जनतेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नुकसान होते. त्यामुळे उद्योगाच्या आकारमानात अवास्तव वाढ होऊन, स्पर्धा वाढून वस्तु विक्रीचे प्रश्न उद्‌भवतात. यंत्राद्वारें काम करण्याने उत्पादकता वाढेल पण त्यामुळे बेकार झालेल्या लोकांना यंत्रामुळे कोणताही उपयोग होणार नाही.

गांधीजींचा यांत्रिकीकरणाला समूळ विरोध नव्हता. आवश्यक तेथे व आवश्यक त्या प्रमाणातच यंत्राचा वापर व्हावा जिथे मनुष्यबळाचा भरपूर पुरवठा आहे व वस्तूला मोठ्या प्रमाणात मागणी नाही अशा ठिकाणी यंत्राचा वापर अयोग्य आहे. यंत्राद्वारे जर जनतेची गरिबी होत असेल व लोकांच्या कामाच्या प्रेरणेत बाधा येत नसेल तर त्याचा उपयोग करण्यास हरकत नाही. मूलभूत उद्योग मोठ्या प्रमाणावर यंत्रबळावर चालविण्यास त्यांची हरकत नव्हती. यंत्राद्वारे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते ती कल्पना आता वाजवी समजली जात नाही. म्हणूनच सर आर्थर लेविस, अर्नाल्ड टॉइनबे, जे. बी. प्रिस्टले इत्यादि ख्यातनाम अर्थतज्ज्ञांनी असा इशारा दिला आहे की जी. एन. पी. वाढविण्याच्या दृष्टीने स्वीकारलेल्या उत्पादन तंत्रावर राष्ट्र उभे राहू शकणार नाही. गांधीजींचा यंत्रवापराला विरोध नाही तर यंत्रामागे सतत धावण्याच्या हव्यासाला विरोध आहे.

## मतभिन्नता व अनुरूपता

गांधीजींचे अर्थशास्त्रीय विचार विखुरलेले आहेत. त्यांच्या भाषणावरून, लिखाणावरून त्यांचे आर्थिक विचार संकलितरीत्या व्यक्त झाले आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रांत गांधीवादावर बरीच पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत, म्हणजे त्यांच्या विचारांची जाणीव तेथे निर्माण झाली आहे. गांधीजींचे विचार आजच्या काळास अनुरूप आहेत का ? हा निर्णय घेण्यापूर्वी आपण आपल्या समोरची उद्दिष्टे कोणती आहेत, माणसाचे अंतिम साध्य काय आहे इत्यादींचा विचार करावा लागेल. जर आपणास शोषणरहित शांततापूर्ण, आत्मसंपन्न असा आदर्श समाज पाहिजे असेल तर त्यांची शिकवण विचारात घ्यावी लागेल.

काही बाबतीत त्यांचे विचार विपर्यासात्मक रूपाने सांगितले गेले आहेत. अर्थात् त्यांचे विचार म्हणजे सर्व यक्षसी व राक्षसी प्रश्नांना एकदम रेडीमेड फॉर्म्यूला समजू नये. त्यांचे विचार फारच स्वर्गस्वप्नाळू आहेत असेही नाही. त्यांची शिकवण

अंमलात येण्यासाठी अहर्निश व प्रामाणिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. अर्थशास्त्रीय सिद्धान्त सर्वकाल, सर्व परिस्थिति व सर्वदेशीय अनुरूप असतात असे नाही. त्यांचे विचार ज्या प्रमाणात व ज्या बाबींशी अनुरूप होतील ते तरी आत्मसात् केले पाहिजेत काहींना त्यांचे विचार अशक्यप्राय वाटत असले तरी आदर्शाच्या दृष्टीने केलेली वाटचाल निकामी ठरणार नाही. काहीजण असेही म्हणतात की त्यांचे विचार आत्मसात् केल्याने आपण जागतिक स्पर्धेत मागे पडू. पण हेही लक्षात घ्यावे लागेल की इतर देशही आता गांधीवाद स्वीकारीत आहेत, किंबहुना जाणीव तरी निर्माण होत आहे.

त्यांचे विचार समाजात रुजवून त्या दिशेने वाटचाल केली तर निश्चितच भारताचे रूप बदलेल व भारत जगाचा एक आदर्श ठरेल.

**संदर्भ**–


गांधीयन इकॉनॉमिक फिलॉसफी– बिपीन बिहारी

इंडिया नीडस् गांधीजी— श्रीमन्नारायण

कॉंटेम्परररी इस्सेज– व्ही. कुमार

ग्रामस्वराज्य— गांधी वाङमय प्रकाशन समिति


महात्मा गांधी संकलित वाङमय

भारतीय राजकीय विचारवंत— आडगांवकर

आधुनिक भारतीय राज्यविचार – गद

याशिवाय साधना, अर्थ, समाजप्रबोधन पत्रिका, इत्यादि मासिके व वृत्तपत्रीय टाचणे.





उद्योगात गुंतलेल्या श्रमिकांच्या तितक्याच वेळातील उत्पादनापेक्षा अधिक मौल्यवान आणि लाभदायक असते हे मान्य करण्यात कोणतीच अडचण नाही. पण अर्थशास्त्रज्ञ आधुनिक उद्योगांबरोबरच जोडीने घरेलु उद्योग अशी तडजोडीची भूमिका लोकप्रिय दबावांनीच (Popular pressures) स्वीकारतात की, काय अशी शंका वाटते. भारताचा विकास घडवायचा असल्यास कोणत्याही आकाराचा उद्योग घ्या; त्याची उत्पादनक्षमता लक्षात घेतली पाहिजे. रोजगारक्षमता ही दुय्यम नव्हे तर गौण बाब समजली जावी. समजा लघु वा मध्यम आकाराच्या एखाद्या उद्योगात मोठ्या उद्योगापेक्षा अधिक आर्थिक लाभ शक्य असेल तर उद्योगाचे त्या विशिष्ट क्षेत्रात, पर्याप्त आकारमान तेच राहील. आग्रह मोठे वा लघु प्रमाण हा नसून ते पर्याप्त प्रमाण आहे की नाही ह्याचा असावा श्रमप्रधान वस्तु ह्या सध्याच्या रहाणीमानाचा खर्च लक्षात घेता जनसामान्यांच्या आवाक्यात रहाणार नाहीत. बहुसंख्य लोकांना रास्त दरात वस्तू (Mass Consumption goods) द्यावयाच्या झाल्यास यांत्रिकीकरण हेच लाभदायक ठरेल. आधुनिक तंत्र नको असणाऱ्या लोकांनी आपल्या घरच्या घड्याळातील काटे मागे खुशाल फिरवावेत परंतु कालचक्राच्या उलट जाणे हे शहाणपणाचे ठरणार नाही. पाश्चात्यांच्या आधुनिकीकरणाच्या तंत्राची छापड बंद अनुकरण, जसे नको तसाच परंपरागत उद्योगपद्धतींबाबत अतिरेकी आग्रहही ठीक नाही. आर्थिक विकासाकरिता अधिक उत्पादन आणि उत्पादनवाढी करता नव्या तंत्राचे साहाय्य हीच संहिता उपयुक्त ठरेल असे मला वाटते.

**रोजगार वाढीबाबत आपल्या देशाने कोणते धोरण स्विकारावे ? यांत्रिकीकरण आणि आधुनिकीकरण स्विकारल्यास अल्पकाळात रोजगारवाढ करण्यावर मर्यादा येतील. देशातील वाढती लोकसंख्या आणि श्रमशक्ती ह्यांची समस्या कशी सोडवता येईल ?**

* आपल्या देशातील विपुल साधनसामग्रीचा योग्य उपयोग करून घेण्यास ही श्रमशक्ती सहजगत्या वापरता येईल. जंगलांची वाढ मोठमोठ्या नद्यांवरील धरणांचे प्रकल्प, गंगा-कावेरी ह्या सारख्या नद्या जोडणारे प्रकल्प, राजस्तान कॅनाल त्याचप्रमाणे रेल्वेमार्ग बांधणे, रस्त्यांचे जाळे वाढविणे, जमिनीची बांधबंदिस्ती, मशागत, नवीन जमीन लागवडीखाली आणणे आणि इतर विकासाची कामे करून घ्यायला भरपूर वाव आहे. एकीकडे यांत्रिकीकरण आणि उद्योगधंद्यांचा विकास श्रमशक्तीला सामावून घेईल आणि त्याचवेळी सरकारी क्षेत्रात रोजगार-हमी योजनेमार्फत ह्या विराट विकास-प्रकल्पांत उर्वरित श्रमशक्ति कार्यान्वित झाल्यास रोजगारविषयक धोरण यशस्वी होऊ शकेल. रोजगार-हमी योजना यशस्वी करावयाची असल्यास ३ रुपये, ५ रुपये रोज असे चलनाच्या परिभाषेत वेतन देण्यापेक्षा श्रमिकाला प्रत्यक्ष अन्न, वस्त्र आणि निवारउपलब्ध करता येईल काय, ह्यावर भर देण्यात यावा. ह्याकरता सरकारी गुदामात धान्य गोळा करून त्याचे वितरण ह्या श्रमिकवर्गास देता येईल अशी व्यवस्था निर्माण करता आली पाहिजे. अन्यथा ५ रुपये दरात श्रमिकांच्या कुटुंबाचा व त्याचा स्वतःचा उदरनिर्वाह महागाईने होऊ शकत नसल्यास या दराने श्रमिकवर्ग कामावर येण्यास नाखुश राहील.

ह्या वर्षी भारतात अन्नधान्य उत्पादन चांगले झाले आहे आणि सरकारी गुदामात शिल्लक धान्य आहे ही वेळ रोजगार निर्मितीस योग्य आहे. सारांश चलनवाढीचे प्रमुख लक्षण म्हणजे लोकांना जीवनावश्यक वस्तूंची टंचाई भासू लागणे आणि 'निर्वाह-मजुरी' (Wage-goods) न मिळणे हे होय. भरपूर धान्य उत्पादन व वितरण कमी दरात उपलब्ध असल्यास चलनवाढीच्या प्रश्नाचे गांभीर्य बरेच कमी होऊ शकेल.

**ह्या वर्षी आपल्या परदेशी चलनाच्या शिलकीत वाढ झाली आहे. ह्या साठ्यांचा उपयोग कसा करावा?**

* परदेशी चलन नुसतेच शिल्लक ठेवल्यास त्यातून नव्या समस्या निर्माण होतील. असे चलन राखून ठेवणे हे फारसे लाभदायक नाही. त्यापेक्षा त्या चलनाच्या सहाय्याने देशाच्या जलद विकासाकरिता जी परदेशी यंत्र सामग्री, साधने आवश्यक आहेत. त्याची खरेदी करून ही बचत गुंतवणुकीमध्ये रुपांतरित करणे अधिक श्रेयस्कर होईल. ह्या गुंतवणुकीने विकासाच्या कार्याला अधिक गती देता येईल. ह्यापुढे धान्यशिल्लकी वाढल्यास रोजगारवाढ आणि परदेशी चलनशिल्लक वाढल्यास राष्ट्रीय विकासाला आवश्यक असलेल्या यंत्राची आयात असे व्यावहारिक धोरण असावे.

**भारतीय कृषि उद्योगाबद्दल आपल्याला कोणती सुधारणा सुचवाविशी वाटते ?**

* प्रथमतः हे लक्षात घेणे जरूर आहे, की भारतीय कृषीचे व्यवस्थापन उद्योग वा व्यापार ह्या पद्धतीनेच करण्याची नितांत आवश्यकता आहे. सर्वात कमी उत्पादन देणारा आणि अकार्यक्षम असा भारतातील उत्पादनघटक, म्हणजे शेती. दर-एकरी अधिक पीक कसे काढता येईल आणि उत्पादनखर्चात जास्तीतजास्त काटकसर कशी करता येईल ह्या आर्थिक दृष्टिकोनाने शेतीचे व्यवस्थापन झाले पाहिजे. शेतीचे व्यवस्थापन अल्प जमीन धारक शेतकऱ्याकडून योग्य रीतीने होत नसल्यास सामूहिक वा सहकारी कोणत्याही पद्धतीने पण आर्थिकदृष्ट्या लाभदायक करून घेता येणे अशक्य नाही. लहान शेतकऱ्याची स्थिती त्याला कोरडवाहू २-३ एकर जमीन देऊन आणि त्याला त्या जमिनीचा 'मालक' करून सुधारत नाही. अशा जमिनीतून त्याला 'निर्वाह-वेतन' देखील मिळू शकत नाही. त्यापेक्षा तो

*With best compliments to,*
*Artha's Noble Role in Development of Entrepreneneurship in New Maharashtra from*

# D'Rona Rohitra Pvt. Ltd.

**Manufacturers and Repairers of**
- **Power, Distribution,**
- **Welding, Industrial furnace,**
- **Current and potential transformers**

**Regd. Office**
**Suyash BB2/A 4th Cross lane**
**B. L. Road, Shivajinagar**
**Pune 411004**

**Gram :**
**Rohitra, Pune 26**
**H. O. phone : 57169**
**Factory : 83180**

**Works**
**C. I. Functional Electronics**
**Industrial Estate, Bhosari,**
**Pune 411026**

*With best compl'ments to Artha's devoted mission from*

# M|S BHARAT TRANSFORMERS

**The unique unit in Marathwada Manufacturers and repairers of Power, distributior, current and Potential Transformers**

**92–94 Cooperative Industrial Estate, NANDED**

हकारी पद्धतीच्या शेतीत सेवा देवू लागल्यास त्याचे वेतन आणि आर्थिक स्थिति सुधारण्याचा संभव आहे २-३ एकर बागाईत असल्यास त्याची स्थिती सुधारते असे दिसून येते. ह्याचाच अर्थ शेतीच्या पाणीपुरवठ्याबाबतही अधिक काम होणे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट असावे.

**आगामी ५-१० वर्षात भारताची आर्थिक प्रगति वेगाने होण्यासारखी परिस्थिति आहे काय ?**

* तसं पाहिलं तर माणूस हा आशावादी आहे. माणसाला ज्ञानाचं फल चाखायला मिळाल्यापासून तो निसर्गाशी आशावादाने आणि जिद्दीने टक्कर देत आलाय. (Man has eaten that opple of knowledge. Therefore he has to be optimistic even against the God.) गेल्या २०-२५ वर्षात भारतात नियोजनद्वारा नव्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. नवे उद्योग, नवी तंत्रे भारतीय बँका, उद्योजन, व्यापार, व्यवस्थापन, नवी कृषि तंत्रे, ह्यात प्रगति झाली-आहे, अजून होत आहे. भारताच्या अभियांत्रिकी उद्योगांची निर्यात वाढविली असून आजूबाजूचे विकसनशील देश भारतातून उपभोग्य वस्तु, शेतीप्रधान (Land-intensive) वस्तु


# हे कारटं तर म्हणतंय 'हुंडा घेणार नाही....!'




म्हणजे बेबीसारखं याच्याही लग्नासाठी पैसा सांठवणं आलं !

तुटपुंज्या पगारातून पै पैसा साठवून त्याचं शिक्षण केलं. पुस्तके, फी, भारी भारी कपडे, सहली यासाठी कितीतरी पैसा खर्च केला. स्वत:ची, बायकोची हौसमौज बाजूला ठेवली-वाटलं होतं...याची प्रॅक्टिस सुरू झाली की हे गरीबीचं दुखणं नाहीसं होईल. शिक्षणासाठी केलेल्या खर्चाची थोडीफार भरपाई हुंड्यातून काढता येईल. आणि आता हे 'बाजीरावचे बेटे' हुंडा घेणार नाही म्हणतात....शपथ घेतलीय म्हणे. उद्या त्या पोरीच्या लग्नाच्यावेळी कुठला टेकोजी म्हणतोय कां बघू.... हुंडा घेणार नाही म्हणून !

आजोबा आ..ण समजता तितके आपले चिरंजीव अविचारी नाहीत. आपल्या विवाहासाठी सांगली बँकेत त्याने केव्हांच तरतूद केली आहे.

प्रत्येक विचारी तरुण सांगली बँकेत नित्य बचत करीत असतो.

आपल्या उत्कर्षातील साथीदार

## दि सांगली बँक लि.

रजि. ऑफीस - राजवाडा चौक, सांगली

चेअरमन : एम. आर. रणदिवे



# पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ पुणे १

## महात्मा गांधी रस्ता

या सुवर्ण संधीचा फायदा जरूर घ्या. पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित ११ म. गांधी पंथ, रेडक्रॉस हाऊस तिसरा मजला पुणे ४११००१

धुळे, जळगाव, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, नाशिक, या ९ जिल्हलात उद्योगधंदा व व्यवसाक करू इच्छिणाऱ्या उद्योजकांसाठी आमच्या महामंडळाकडे खालील सवलती उपलब्ध होतील.

सुशिक्षित पण उद्योग व्यवसाय नसणाऱ्या बेरोजगार च्छुक उद्योजकांकरिता बीज भांडवल कर्ज साहाय्य योजना, प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या १०% एवढ्या रकमेची दरसाल दरशेकडा ४% व्याजाने कर्ज. हे कर्ज बँकेच्य कर्जाच्या व्याजाउह मुदतीत पूर्ण परतफेड झाल्यानंतर, दर सहामाही हप्त्यांनी परत करण्याची सवलत.

उद्योग व्यवसायासंबधी व प्रकल्प तयार करण्यासंबधी मार्गदर्शन व माहिती आणि औद्योगिक वसाहतीमध्ये बेरोजगार उद्योजकांना गाळे मिळविण्यास सहाय्य लहान उद्योगधंद्यासाठी तालुक्याच्या गावी छोट्या औद्योगिक वसाहती ! लघुऔद्योगिक घटकांसाठी त महाराष्ट्र राज्यशासनाकडील सुधारीत श्रेणीयुक्त एकत्रित सवलतींची योजना ! स्थिर भांडवलावर केलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या १५% एवढे लघुउद्योजकास दीर्घ मुदतीचे विनव्याजी कर्ज.

अधिक माहितीसाठी आमच्या वरील पत्त्यावर संपर्क साधा

तंत्रज्ञान यंत्रसामग्री ह्यांची मागणी करीत आहेत तसेच अति-प्रगत देश आपल्याकडील श्रम प्रधान (Labour-intensive) वस्तू आणि सेवा खरेदी करीत आहेत. देशातील आर्थिक विकासाचा वेग वाढवल्यास आणि राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार वाढल्यास देशातल्या देशात एक प्रचंड बाजारपेठ उपलब्ध आहे. देशातील गरिबी, बेकारी इत्यादि बाबतीत कल्लोळ आणि आक्रोश केला जातो. त्याचे कारण बरेचसे अज्ञान. अंधारातच झुरळे वाढतात. अज्ञानाच्या अंधारामुळे शंकाकुशंका, पूर्वग्रह आग्रह, गैरसमज, हीनगंड आणि दुबळेपणाची झुरळे वाढत आहेत. ह्या परिस्थितीत अर्थतज्ज्ञांनी "लांडगा आला रे आला" अशा आरोळ्या मारणे आणि ह्याच्या नेमकी उलट बाजू म्हणजे आर्थिक नीतिबाबत सरकार वा जनता ह्यांच्या लोकप्रिय भावनांचा (feelihgs) आदर करण्याकरता त्यांची भाटगिरी करणे हे दोन्हीही मोह आहेत अर्थतज्ज्ञांनी प्रामाणिकपणे, निर्भीडपणे आणि निःस्पृहपणे लोकप्रिय धोरणांची तपासणी करून आपले मत व्यक्त करण्याचे कर्तव्य बजावीत रहावे. देशातल्या कोणत्याही वंदनीय महात्म्याचे विचारांचे भज्जन करण्याची आवश्यकता जरी नसली तरी; त्याचबरोबर जर ते विचार बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात राष्ट्र-कल्याणाला उपयुक्त नसतील तर त्या विचाराप्रमाणे मार्ग आचरण्यातील धोके, धोरण ठरविणाऱ्या लोकांच्या निदर्शनास आणून देण्याचे, कार्य करावे. भारतीय अर्थशास्त्रज्ञांनी अधिक क्रियाशील (Active) आणि राष्ट्रीय समस्यांबाबतीत अधिक जागरूक (Involved) असण्याची आज घटकेला गरज आहे.


*With best compliments to this, Special Number of 'Artha' From*

**Shree Harihar Agencies**

Home Guard Bungalow,
Ganeshkhind Road, Pune 411 005

Tel. No: : 53283, 54846, 53024

Cable— Jaldhara

अर्थच्या 'अर्थनीती विशेषांकाकरिता'
हार्दिक शुभेच्छा

महाराष्ट्राच्या लघुउद्योग विकासाकरिता बद्धपरिकर

**महाराष्ट्र लघुउद्योग विकास निगम**

कृपानिधि, ९ वालचंद हिराचंद मार्ग,
बॅलर्ड इस्टेट, मुंबई ४०००३८,

फोन २३११२१
टेलेक्स ०११–२३९९
केबल Massidcor

## ग्रामीण व शहरी विभागातील

# लहान कर्जदार व बँका यांचे प्रश्न, अडचणी

## [थकबाकी वरील उपाय]

* डॉ. वसंतराव पटवर्धन, चेअरमन, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे

भारतासारख्या मोठ्या देशात बेकारीची समस्या जर सोडवायची असेल तर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करणाऱ्या लघुउद्योगांचा, कुटिरोद्योगांचा आणि बलुत्यांच्या स्वरूपात पूर्वापार चालू असलेल्या व्यवसायांची आपल्याला दखल घ्यावयाला लागणार आहे. सर्वसाधारणपणे यापुढे दरवर्षी सत्तर ते ऐंशी लाख तरुण रोजगार मागणार आहेत, असे धरले आणि आपल्या पंचवार्षिक योजनेनुसार दर वर्षी दहा हजार कोटी रुपये गुंतवणूक होणार आहे असे धरले तर माणशी बारा ते साडेबारा हजार रुपयांत एक रोजगार निर्माण व्हायला हवा. मोठ्या उद्योगधंद्यांचीही देशाच्या मूलभूत उभारणीत गरज असली तरी लहान लहान उद्योगांची संख्या जितकी जास्त वाढेल तितकी कमी भांडवलात रोजगारी निर्माण होण्याची शक्यता होईल. अर्थात् बारा ते तेरा हजार रुपये हा केवळ सरासरीने येणारा आकडा आहे. प्रत्येक उद्योगात भांडवलाची जी गुंतवणूक लागेल ती वेगवेगळी असेल आणि काही ठिकाणी दरडोई गुंतवणूक जास्त दिसली तरी त्या उद्योगाच्या स्थापनेमुळे अन्यत्र उद्योग व्यवसाय निघण्याची जी गुणकशक्ति (Multiplier Strength) ती धरूनच गुंतवणूक योग्य की अयोग्य हे ठरवावे लागेल. उदाहरणार्थ स्कूटर्स, ट्रक व मोटारींच्या कारखान्यातील रोजगारी व गुंतवणूक यांचा हिशेब करताना त्यामुळे ठिकठिकाणी निघणाऱ्या यंत्रशाळा दुरुस्तीची दुकाने अन्य सुट्या वस्तूंचे कारखाने व रस्त्यावरील हॉटेले, ढाबे यांचाही विचार करून रोजगार कसा वाढतो हे लक्षात घेतले पाहिजे. स्वयंचलित वाहने, पेट्रोलवर आधारित अन्य उद्योग आणि घरबांधणी यांच्याबाबत भारतात प्रचंड गैरसमज आहेत, आणि तज्ज्ञ म्हणविणारे अर्थतज्ज्ञही विशेषतः पहिल्या दोन बाबींसाठी त्यात भर घालून सामान्य माणसाचा गोंधळ वाढवीत आहेत.

एक घर बांधायचे म्हटले म्हणजे लोखंडी वा अन्य धातूंच्या बिजागऱ्या, खिळे, खिडक्या, दारे, विटा, चुना, सनला, कुलपे, कड्या, इलेक्ट्रिकच्या तारा, स्वच्छतागृहातली भांडी, फरशा, टाईल्स, सिमेंट, अनेक लाकडी वस्तु, रंग, दिवे, खोरी, फावडी' इतक्या वस्तु निर्माण करण्यासाठी कुठेतरी रोजगारात भर पडले. त्याशिवाय ही कामे करणारे, कुंभार, गवंडी, रंगारी, सुतार, लोहार अशा अनेक बलुत्यांच्या स्वरूपातल्या व्यावसायिकांची वाढती गरज निर्माण होते. या निर्मितीसाठी लागणारे भांडवल सरासरीसाठी घरबांधणीतून धरले तर गुणक शक्तीचा खरा अंदाज करता येईल. जपान, जर्मनी यां सारख्या देशांत महायुद्धानंतर केवळ कारखान्यांच्या वाढीमुळेच नव्हे तर घरबांधणीमुळेही प्रचंड रोजगार निर्माण झाला. छोटी छोटी खेडी, एकजीव, एकसंध होऊन त्यांची टुमदार गावे व्हायला लागल्याबरोबर गवळी, लॉन्ड्री, बेकरी, शाळा, बस वाहतूक, तयार अन्नांची दुकाने, भेटवस्तू. माळी, वर्तमानपत्रे, प्रासिद्धिके यांसाठी छापखाने यांची जरुरी भासून आपोआप माणसांना कामे मिळू लागली. इतकी की ती करण्यासाठी माणसे कमी पडू लागल्याने एकतर दुसऱ्या देशांतली माणसे आवर्जून आणवावी लागली किंवा जास्त जास्त यांत्रिकीकरणाकडे प्रवृत्ति वाढू लागली.

जास्त यांत्रिकीकरण झाले की श्रमिकांची संख्या कमी होते असे सुरवातीला वाटले तरी या वाढत्या यांत्रिकीकरणामुळे गुणांक परत वाढतो आणि परत यंत्रशाळा ते शहरीकरण हा प्रवास सुरू होतो. भारतातही आपल्याला म्हणूनच यांत्रिकीकरणाचा दुस्वास न करता, गरजा वाढविता कशा येतील व त्यामुळे रोजगार कसा निर्माण करता येईल हे बघितले पाहिजे. स्वयंपूर्णता हे दुधारी शस्त्र आहे. देशातल्या देशात ते वापरताना त्याचा उद्देश गरजा कमी करणे हा न ठेवता वाढत्या गरजाही जवळपासच साधनसामुग्री उपलब्ध करून वाढविणे व त्यासाठी किमान भांडवलाची आवश्यकता ठेवणे हा असला पाहिजे. नाहीतर किमान गरजांमुळे आपण रोजगारीही किमानच निर्माण करू शकू.

म्हणजेच शहरीकरण टाळणे हा आपला उद्देश न राहता केंद्रीकरण टाळावे हा आपला उद्देश असला पाहिजे. २३०० वर्षांपूर्वी कौटिल्याने किंवा त्याच्या समकालीन ॲरिस्टॉटल व त्या आधीच्या अन्य ग्रीक तत्त्ववेत्यांनी शहर राज्याचा जो विचार मांडला तो आजही तितकाच लागू पडतो. फक्त नगर राष्ट्राऐवजी आपण अनेक नगरांचे असे राष्ट्र आज मानायला लागलो की दोन्ही विचार जुळतात. ज्या बिहारमधून ग्रामराज्याची कल्पना लोकनायक जयप्रकाश आज मांडीत

आहेत त्याच मगध देशातून चाणक्याने ग्रामसंस्थेचा पुरस्कार तेवीसशे वर्षांपूर्वी केला आणि जनपदविभाग व नागरविभाग असे दोन विभाग सांगून तिथे कसा रोजगार केला जावा याची माहिती आपल्या अर्थशास्त्रात दिली आहे हा एक अकल्पित योगायोग आहे.

विषयांतर करून हा थोडासा ऊहापोह करण्याचे कारण आज आपल्याकडे बेकारीची प्रचंड समस्या उभी आहे व गेल्या अनेक वर्षांत जी कमी होऊ शकलेली नाही ती पुढील दहा वर्षांत नाहीशी करण्याची महत्त्वाकांक्षा आपण बाळगीत आहोत. ही महत्त्वाकांक्षा केवळ राज्यकर्त्यांच्याच जवळ असून चालणार नाही तर सर्वसाधारण नागरिकांनाही त्याचा तितकीच जिद्दीने जाण असली पाहिजे. बेकारी घालविणे म्हणजे जादा रोजगार निर्माण करणे व जादा रोजगार म्हणज जादा श्रमदान किंवा आर्थिक गुंतवणूक आली हे उघड आहे. आपल्याकडील दुष्टचक्रामुळे (कमी उत्पन्न—कमी बचत—कमी गुंतवणूक-कमी रोजगार-कमी उत्पन्न) आपल्याला नक्की कुठे सुरवात करावी हे लक्षात येत नाही. त्यावरचा उपाय म्हणजेच कमी गुंतवणूक करूनही जादा रोजगार निर्माण कसा होईल हे बघणे हा होय.

त्यासाठी कुटिरोद्योग, ग्रामोद्योग, लघुउद्योग, सेवाधारित उद्योग यांची कास धरून ते ठिकठिकाणी गावागावांत पसरवता आले पाहिजेत. शेताला लागणाऱ्या बाबींची जवळच्या जवळ सोय करता आली आणि शेतीवरील लोकभार यांत्रिकीकरणाद्वारे बाहेर काढता आला तर त्यासाठी भांडवल कमी लागेल ही विचारधारा आहे.

पूर्वी उद्योग, व्यापार, किंबहुना सावकारीवर अवलंबून असलेली शेती आणि नोकरी सोडता अन्य काहीही बाबीसाठी द्रव्यसाहाय्याची चणचण भासायची. त्यामुळे गुणाधारित, कौशल्यावर अवलंबून असे उद्योग, व्यापार सुरू होण्याऐवजी ज्याला द्रव्याचे पाठबळ मिळायचे त्यालाच स्वयंरोजगाराचे आणि इतरांना रोजगार देण्याचे स्वप्न बघता यायचे. पण आज छोटा मोठा उद्योग करणाऱ्या उद्योजकाला भांडवलाची सहसा वानवा पडत नाही. बँका, वित्तमहामंडळे यांच्याकडून अर्जात खरोखरीच अपयश दडलेले असेल तर त्याचा अपवाद सोडून, जवळ जवळ सत्तर ते ऐंशी टक्के कर्ज दिले जाते. हे कर्ज देताना अर्जदाराकडून काही किमान माहिती आवश्यक असते. आणि तो देणारा फॉर्म हल्ली सुटसुटीत व प्रादेशिक भाषेत करण्याची बऱ्याच अंशी व्यवस्था झालेली आहे. पण अनुभव मात्र असा येत आहे की कर्ज मागताना आपण समाजातील गरीब वा मध्यमवर्गीयांनी अडीअडचणीसाठी शिल्लक टाकलेले पैसे वापरीत आहोत याची जाणीव न दाखवता ह्या रकमा जवळजवळ अनुदान स्वरूपात आहेत किंवा असाव्यात. त्या ज्या उद्योगासाठी वापरल्या जायच्या आहेत त्याबद्दल आणि अर्जदाराच्या वैयक्तिक वागणुकीबद्दल बँका व आर्थिक संस्थांनी फार खोलात जाऊन चौकशी करू नये अशी एक समजूत होत चालली आहे व त्याबद्दल किंवा कर्जपरतीबद्दल स्पष्ट व परखड बोलायचे धाडस कशाला करा, गप्प बसणे सगळ्यात बरे अशी एक भावना बळावत चालल्याचे दिसते. पण कर्जातील थकबाक्या म्हणजे नवीनांना रक्कम न मिळणे म्हणून ही परिस्थिति सतत राहणे देशाच्या दृष्टीने दुर्भाग्याचे ठरेल. व्यवसाय यशस्वी होण्यासाठी केवळ अर्थसाहाय्याचीच जरुरी नसते. किंबहुना अर्थसाहय गौण ठरावे इतक्या अन्य काही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. करावयाच्या व्यवसायातील तांत्रिक कौशल्य, निर्माण केली जाणारी वस्तु वा सेवा योग्य किंमतीला विकण्याची खात्री व त्यासाठी विक्रयकला व नवीन ग्राहकपेठा धुंडाळण्याची व काबीज करण्याची निश्चिति, आणि योग्य परवडणाऱ्या किंमतीला माल विकण्यासाठी रास्त भावात कच्चा माल आणून व नोकर, मजुरांची व्यवस्था नीट लावून निर्मिति व विक्री हे साधण्यासाठी लागणारे चतुरस्त्र व्यवस्थापकीय ज्ञान यांची खात्री पटवून दिली तर भांडवल आपोआप चालत येते.

दुर्दैवाने ज्या संस्थानी भांडवल पुरवावे त्यांनीच बाजारी पेठाही धुंडून द्याव्यात, उधार विक्री केल्यास तिच्या वसुलीचा किंवा ती होवो न होवो पुढच्या भांडवलाची सतत सोय करावी अशा अपेक्षा धरून उद्योजक उद्योक करावयाचे ठरवितात व्यवसाय कुठला करावा, माहिती कशी गोळा करावी, ती मांडावी वा लिहावी कशी याबाबत, देखील सुरवातीपासून स्वतः तयारी करावयाची त्यांना अेक तर कल्पना नसते किंवा अिच्छा नसते. आम्हाला येत व माहीत नाही या सबबीवर जे व्यवसाय सुरू करू इच्छितात, त्याना आवर्जून सुरवातीला मार्गदर्शन दिले तरी तो व्यवसाय त्यांनाच यशस्वी करावयाचा असतो. पण या यशाबाबत फारशी काळजी त्यांना लागत नाही कारण भांडवल हे जवळपास बाहेरून आले असल्याने प्रत्यक्ष स्वतःला तोशीस लागण्याचा प्रसंग फार थोडा असतो. ती कर्जे वसूल करण्यासाठी आर्थिक संस्थांनी दिलेल्या कर्जातूनच निर्माण झालेल्या जिंदगीची, वस्तूंची ताबेदारी, विक्री, जप्ती वगैरे करण्याची वेळ आली तरी इतरांच्या सहृदयतेला हांक घालून अर्थसंस्थांच्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना निर्दय ठरविणे हा प्रकार अंमलात आणता येतो. त्यांच्यावर सामाजिक एकतेतून उभे राहिलेल्या भांडवलाची जबाबदारी असते, लेखातपासनिसांच्या शेऱ्याबाबत त्यांना काळजी करायची असते. हा प्रश्न सगळीकडे हल्ली दुय्यमच नव्हे तर नगण्य मानला जाऊ लागला आहे.

अर्थसंस्थांच्या व्याजाबद्दलही असेच गैरसमज झालेले आहेत. कर्जदाराचे कर्ज वाढले, आकस्मिक संकट आले तर कर्जाचे व्याज लादू नये, कमी लावावे. मुद्दलांतही सूट द्यावी हा विचार मांडताना ठेवीदारांवर—विशेषतः गरीब व लहान रकमा ठेवणाऱ्यावर असे संकट आले तर त्याना जास्त व्याज द्यावे असे म्हणता येईल कां? शिवाय ठेवीदारांना पुरेसे व्याज देण्यासाठीच कर्जदारांना व्याज आकारले जाते. मग ज्यांना पूर्वी व्याज दिले आहे त्यांना जर परत व्याज मागता येत नाही तर कर्जदारांचे व्याज अर्थसंस्थानी कुठून कमी करावे? ठेवीवरील सध्या सरासरी दर सात ते आठ टक्क्यांच्या वर किंवा आस-

पास पडतो. कर्जावर पंधरासोळा टक्के सर्वांनाच लावले जात नाहीत. ठेवीपैकी एकतृतीयांश रक्कम कायद्याने ज्या सरकारी कर्जरोख्यांत गुंतवावी लागते त्यावर साडेपांच ते सहा सव्वा सहा इतकेच व्याज मिळते. सहा टक्के रक्कम कायद्याने रिझर्व बँकेकडे बिनव्याजी रोकड ठेवावी लागते. म्हणजे उरलेल्या साठ टक्के (१४ जानेवारीपासून पुढच्या ठेवीपैकी १० टक्के रक्कम परत रिझर्व बँकेकडे सहा टक्के व्याजाने ठेवावी लागल्याने आतां पन्नास टक्के रकमेवरच ठेवीच्या व्याजाचा दर देणे प्राप्त झाले की सरासरीच पंधरा टक्कयाखाली येत नाही. त्यांत निर्यात व लहान कर्जांना त्यापेक्षा कमी दराने कर्ज दिले की तो बोजा दुसऱ्या कुणाच्या तरी खांद्यावर द्यावाच लागतो. मग बुडीत, कर्ज, आकस्मिक संकटे, व्याजाच्या सुटी, इतर खर्च यासाठी बँकांजवळ वा अर्थिक संस्थांजवळ कूस किंवा माया राहतेच कुठे? त्यामुळे सरासरीने हा प्रश्न आला तर मोठी अवघड गोष्ट होईल हे समजणे रोजगार सुरू करताना मग तो लहान असो वा मोठा असो जरूर आहे. कर्जदारांची सोय बघण्यासाठी कमी व्याज करावयाचे म्हटले तरी ठेवीदारांना कमी व्याज देण्याचा पर्याय काढावा लागतो. दुर्दैवाने इतर देशांत असते तसे इथे व्यक्ति किंवा संस्था कधी कर्जदर कधी ठेवीदार (म्हणजे फक्त गरच भागविण्यासाठी, हंगामी वाढता व्यवसाय करण्यासाठी कर्ज घेणारी) असे चित्र दिसतच नाही. कर्जदार हे कर्जजार व ठेवीदार हे ठेवीदारच राहतात. हे ठेवीदार म्हणजे सर्रास केवळ, शिल्लक टाकू शकणारे, सधन, सुस्थित समजणे चुकीचे आहे. भारतातील आजच्या सुमारे एकोणीस हजार कोटी रुपयांच्या ठेवी या चार ते पांच कोटी लहान लहान खात्यांमधून विखुरलेल्या आहेत. अडचण भागविण्यासाठी केलेली बचत असेच बरेचसे त्यांचे स्वरूप आहे. तेव्हां त्यांच्याबद्दल आपुलकी दर्शवून, प्रत्येक व्यक्तीनेच अशी थोडी थोडी बचत केली तर कर्जदारांची, नवीन व्यावसायिकांची सोय होईल हे विसरून चालणार नाही. वर्षानुवर्षे कर्ज घेणाऱ्यांनी आता ती कमी करण्याची व ठेवीदार होण्याची बुद्धिपुरस्सर कृति केली पाहिजे. त्यांत लहान मोठा भेदभाव करून चालणार नाही. हे सर्वांनाच लागू आहे.

हे झाले तर बँकांजवळ जास्त व्यावसायिकांना कर्ज देण्यासाठी रकमा उपलब्ध होतील. आज जिकडे बघावे तिकडे अपवादात्मक पूर्वी असलेल्या काही आजारी कापडगिरण्यांऐवजी कर्ज घेऊन चालविलेले बरेचसे व्यवसाय डळमळीत, अस्थिर, आजारी, अनुकंपनीय अवस्थेत आहेत. मोठ्याप्रमाणे लघुउद्योगांतही बंद होणाऱ्या व्यवसायांची संख्या वाढून सहस्रावधि होत आहे. हे सर्व लघु उद्योग आणि लहान लहान कर्जदारांचे छोटेमोठे धंदे बंद का पडत आहेत? पूर्वी ते कां बंद पडत नव्हते? त्यांच्या खात्यातील कोटचवधि रुपयांच्या रकमेचे भारतीय बँकांनी काय करावयाचे? क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनसारख्या संस्थांना या साऱ्या रकमा परत करणे कसे शक्य आहे? अशी महामंडळे काय किंवा बँका व अर्थसंस्था काय त्यांना जर रकमा बुडीत धराव्या लागल्या तर शेवटी ते राष्ट्राचे नुकसान म्हणून कुठल्यातरी वर्षी अर्थसंकल्पात टाकावयाचे का? तशाने कर्ज बुडाले तरी चालते. अशी नवी प्रवृत्ती निर्माण होईल कां? ती झाल्यास अर्थसंस्थांचा कर्ज देण्यावरील, कर्जाचे अर्ज पारखण्यावर विश्वास आणि भर कितपत राहील? या सर्व बाबींत भ्रष्टाचाराला आणखी थारा मिळेल कां? का ठेवीदारांना याची अप्रत्यक्ष झळ लागणार आहे? तसे झाल्यास बँकांमधील ठेवी वाढतील कां? पूर्वी बँकांच्या कारभारांत काही पथ्ये होती कां? त्यात बदल कसे करावेत असे अनेक प्रश्न आज या व्यवसायात उभे राहिले आहेत.

हे सर्व प्रश्न लौकर सुटणारे नाहीत. किंवा त्यांची उत्तरे एकाच ठिकाणाहून येणार आहेत असे नाही. पण त्यांचा कुठलाही आग्रह न धरता विचार केला तर ते न सुटणारे आहेत असेही मानण्याचे कारण नाही. बँकिंगचा व्यवसायच असा आहे की शेती किंवा अन्य उद्योगाप्रमाणे येथेही थोडीफार झीज तूट येण्याचा संभव असतोच. पण इतर सर्वत्र एकदोन वर्षे चांगली गेली की एकदोन वर्षे वाईट जातात. त्यामुळे सर्वसामान्यपणे आजचे नुकसान उद्या भरून येऊ शकते. या उलट बँकिंगचा व्यवसाय हा किरकोळ किराणा भुसार विक्रेत्याप्रमाणे असतो. एका ठिकाणाहून माल खरेदी करावयाचा व दुसरीकडे नाममात्र नफा घेऊन विकावयाचा या तत्त्वावरच तोही चालतो पण भुसारी विक्रेत्याच्या सर्वच ग्राहकांनी माल उधार घेतला आणि उधारी महिन्याच्या महिन्याला दिली नाही तर त्याच्या व्यवसायावर बंधने पडतील. ही बंधने त्याला आणि त्याच्या ठराविक ग्राहकवर्गाला त्रासदायक ठरतील. बँकांचे बाबतीत मात्र दोन फरक आहेत. पहिला म्हणजे सामाजिक जाणिवेमुळे आणि शैक्षणिक पातळीमुळे निदान आजतरी भारतीय बँका आपल्या ग्राहकवर्गाबद्दल एकूण आजारपणाबाबत व्यक्त उघड आकडे प्रकट करू शकत नाहीत. त्यामुळे एकतर त्यांच्याबद्दल गैरसमज वाढतील किंवा त्यांचा वेगळ्या रीतीने दुरुपयोग केला जाईल. पाश्चात्य जगांत बँकांच्या ताळेबंदात दुष्प्राप्य कर्जाच्या तरतुदीबद्दल स्पष्ट उल्लेख असतात. दुसरा फरक म्हणजे असे आकडे प्रकट केले तरी आणि दुरुपयोग किंवा गैरसमज यांना थारा मिळाला नाही तरी घोडा का अडला. पाने कां सडली आणि भाकरी कां करपली. या तीनही प्रश्नांचे उत्तर जसे 'न फिरविल्याने' आहे तसेच बँकांतील कर्जखातीही त्याच जागेवर तशीच राहिली तर नवीन कर्ज वितरणास स्वाभाविकच मर्यादा पडतील. आणि कमी गुंतवणूक–कमी रोजगार–कमी बचत–असे दुष्टचक्र परत सुरू होईल. बँका दरवर्षी केवळ नव्या येणाऱ्या ठेवीतूनच कर्जे देत नाहीत तर जुन्यांची जी वसूली होईल त्यातूनही नवी कर्जे देतात. त्यामुळे कर्जदारांचे आजारपण ही एक सामाजिक समस्या होऊन चालणार नाही. त्यासाठी अशा आजारपणाची कारणे कायकाय आहेत हे विनाविलंब हुडकून काढले पाहिजे.

कर्जदाराला कारण पाहून कर्ज दिले पाहिजे हे सर्व मान्य आहे. पण पोहायला लागणारा मनुष्य एकदम ज्या प्रमाणे समुद्रात जात नाही त्याप्रमाणेच कर्जदाराने एकदम मोठा

व्यवसाय तोही स्वतःचे भांडवल फारसे नसताना करावयाची इच्छा धरून बँकेने त्यासाठी संपूर्ण अर्थसाह्य केलेच पाहिजे असा आग्रह धरू नये. उदाहरणार्थ ट्रकचा व्यवसाय, मोठी डेअरी, मोठा छापखाना यासाठी एक ते सव्वा लाख रुपये जर कर्जाऊ द्यायचे असतील तर बँकेला कर्जदाराचा येवढा व्यवसाय पेलण्याची ताकद आहे अशी सुरवातीलाच कशी खात्री पटावी ? शिवाय अशा कर्जदारांचे प्रकरण १२ टक्के व्याजावर योग्यताक्षम होत असेल पण सोळा टक्के व्याजावर होत नसेल तर अशा काठावर क्षमता असणाऱ्या व्यवसायाला अनपेक्षित धक्का सहन करण्याची ताकद नसते. म्हणजे मुळातच बऱ्याच प्रकरणांचा योग्यताक्षमता ओढूनताणून आणली असल्याने आजारीपणाची लक्षणे मुळातच सुप्त असतात. किंवा थोडक्यांत अंतर्गत कारणांपैकी पहिले कारण हे असते, की व्यवसाय हा लाभक्षम म्हणून अंगीकारला जात नाही.

अशा अंतर्गत कारणात व्यवसायाबद्दलचे अज्ञान, स्वतःचे भांडवल जवळजवळ नसल्याने पाय रोवून उभे न राहण्याची इच्छा, अपुरे नियोजन, अकुशल व्यवस्थापन, भागीदार असल्यास आपापसातील भांडणे, हेवेदावे, पुरेसे भांडवल नसल्यास सगळीकडून कर्जे काढूनच व्यवसाय उभा केल्याने पण व्याप्ति न वाढविल्याने व्याजाची मोठी ओझी, सतत नवीन जोडयंत्र सामग्री न घेण्याची तयारी वा शक्यता व जुनी यंत्रे कालांतराने झिजल्यावर कमी होणारा धंदा, एकच वस्तू, एकच ग्राहक वा माल पुरवणारा आणि कर्ज हा एकच भांडवल पुरवठा यावर अवलंबून असल्याने परावलंबित्व, कमी गुणवत्तेचा माल, उधार वसुली करण्यातील उशीर, वसूलातील रक्कम व्यवसायात फिरवण्याऐवजी अपरिहार्यपणे अन्य वैयक्तिक गरजा भागवणे अशी अनेक कारणे अंतर्भूत होतात. त्यातच भरीला अपूरा वीज पुरवठा किंवा कच्चा माल, संपामुळे उत्पादनावर होणारा परिणाम. मंदी. इतर स्पर्धकांची जीवघेणी चढाओढ, झीज किंवा दुरुस्ती याखाली नियमित पैसे बाजूला न काढल्यामुळे, व्यवसाय मध्येच बंद पडणे किंवा उरलेली यंत्रसामग्रीही मोडकळीस येणे यांचीही भर पडते. या सर्व बाबतीत कर्जदार केवळ लहान आहे म्हणून त्याने गाफील वा बेफिकीर राहणे समर्थनीय ठरत नाही. रेल्वेच्या चालत्या इंजिनासमोर लहान मूल असो वा मोठी व्यक्ति असो, गाफील राहिल्यास दयामाया नसते. तसेच आजारीपणाच्या बाबतीत मोठी कापडाची गिरणी असो अथवा दोर वळण्याचा किंवा चपला करण्याचा व्यवसाय असो. वरील कारणे सर्वांनाच लागू होतात.


ह्या बाबी लक्षात घेऊन कर्ज घेणाराने, आपण समाजाकडून कर्ज घेतले आहे. तेव्हा वरील कारणे व्यवसायात शिरणार नाहीत हे कटाक्षाने बघितले पाहिजे. त्यासाठी कर्जफेड म्हणजे स्वतःचे भांडवल क्रमशः वाढविणे हे न विसरता कर्जफेड केलीच पाहिजे. काही महाभाग कर्ज हे न फेडण्यासाठी असते असे मानतात; पण अशा लोकांमुळे बँकिंगमधल्या चांगल्या-प्रवृत्तीवर आघात होण्याची शक्यता. लहानासाठी, गरिबांसाठी बलुतेदारांसाठी, लघुउद्योगासाठी, लहान शेतकऱ्यांसाठी केवळ कणव म्हणून नव्हे किंवा कर्तव्य म्हणून नव्हे तर थोड्या भांडवलात जास्त रोजगार वाढवता येतो व चांगल्या पद्धतीने वाढलेला व कर्जफेड करणारा रोजगार हा राष्ट्रीय उत्पन्न वाढवणारा असतो. या तत्त्वामुळ बँकांकडून जास्तीत जास्त मदत केली जात आहे बँका सामान्यासाठीच आहेत हे आता गेल्या आठ दहा वर्षात सगळ्यांना माहीत झाले आहे. त्यांना लागणारी माहिती ही सोपी व धंद्यातला लाभ दाखवणारी एवढीच असते हेही सगळ्यांना ठाऊक झाले आहे. छापील फॉर्मचा कुठलाही गबगबा न करतां, कर्ज कां, किती, केव्हां हवे आहे. त्यामुळे उत्पन्न कसे वाढेल व त्यातून परतफेड किती केव्हा होऊ शकेल एवढे शेतकऱ्यांने, टॅक्सीवाल्यांने, किंवा चर्मकारानेही दिले म्हणजे झाले. मोठ्या गिरण्यासाठीही ख॰ पाहिलं तर हीच माहिती पण जरा तपशीलात असते. स्वतःचे भांडवल व कर्ज यांचे प्रमाण; गिऱ्हाईक कुठले, किती उधारीचं कच्चा माल किती व कुठून आणणारा, पक्का माल किती व कुठं विकणार, देणी, कर, पगार यंत्रसामग्रीचा देखभालीचा खर्च वेळेवर भागणार नां असल्या बाबी सर्वांनाच माहीत असाव्या लागतात. थोडक्या मुदतीचे उधार उसनवार वा कर्जाचे पैसे परतफेड करताना त्रास होईल असे खर्च करून भागत नाही. हे एक सूर्यप्रकाशासारखे सत्य आहे. हातगाडीवाल्याला आणि इतर गिरणीला वेगळं असं काही या सर्वांत नाही. लाभ आणि लोभ यात फरक करता आला, नैसर्गिक अडचणींवर त्याचा दर वेळेला बाऊ न करता मात करता आली. उधळमाघळ थांबविली आणि रोजच्या कारभारावर घारीची नजर ठेवली तर बँकाना दिलेली कर्जे हे वाढत्या प्रमाणावर उत्पादन वाढवू शकणारा व त्यामुळे किंमतीही रोखू शकणारी ठरणारी आहेत.

आता तुटीच्या नियोजनाऐवजी समृद्धीचे नियोजन आखायचे आहे आणि त्यात स्वयंरोजगार करणाऱ्या किंवा दुसऱ्यांना रोजगार थोड्या गुंतवणुकीत देणाऱ्याना जास्त महत्त्व आहे. लहान कर्जदार आणि बँका यांचे प्रश्न थकबाकी आणि उपाय हे वेगवेगळ्या कप्प्यात टाकतां येणार नाहीत कारण दोन्हीही समाजाचेच अभिन्न भाग आहेत हे समजून घेतले तर एकाच्या प्रश्नांची उकल म्हणजे दुसऱ्याच्या प्रश्नांची उकल आणि एकाचा प्रश्न आपोआप दुसऱ्याची पर्यायाने समाजाची समस्या होते हे लक्षात येईल.

## नाट्यसंस्थांचे अर्थशास्त्र

# नाट्यसृष्टीतील 'अर्था'चे नाटक

* प्रा. भालबा केळकर *



'तू खुशाल क्षुल्लक गोष्टीसाठी माझा पाणउतारा करतेस ? अगऽऽ ! माझ्या गुणांची माझ्या मित्रांत किती चहा असते ते तुला...'

आणि कपबशांच्या आवाजानं त्याचं लक्ष विचलित झालं. त्यानं त्या आवाजाच्या अनुरोधानं त्या दिशेला तिरक्या नजरेनं पाहिलं आणि दिग्दर्शकाकडे पाहून हसत आपलं वाक्य पुन्हा उच्चारलं,

'तू खुशाल चहासाठी माझा पाणउतारा करतेस ? माझ्या गुणांची माझ्या मित्रांत किती चहा असतो ते तुला...'

दिग्दर्शक आणि नायिका आ वासून ते वाक्य ऐकत राहतात. प्रॉम्प्टर पुस्तकाची पानं उलटून त्या वाक्याचा ठाव शोधीत असतो आणि—

'साहेब चहा! ' या शब्दांनी सर्वांची मन:स्थिति चहात बुचकळलेल्या ब्रेडसारखी क्षणार्धात चहानं भिजून चिब होते. महत्प्रयासानं रंगात आलेली तालीम निमिषार्धात कोसळून भुईसपाट होते, चहाच्या वाफेच्या लोटात होरपळून निघते दिग्दर्शक पुन्हा विटेला वीट जोडून ही तालीम पुन्हा कशी उभी करू याचा विचार करीत चहापानात रंगलेल्या तालिमोत्सुक समुदायाकडे हताश मुद्रेनं पाहात असतो. तेवढ्यात त्याच्या कानावर शब्द येतात,

'साहेब चहा ! '

आणि त्याचे सगळे तालमीचे मनोरथ पुन्हा एकदा चहाच्या पेल्यात कोसळून गटांगळ्या खाऊ लागले. दिग्दर्शक सचित मनानं चहा पीत असताना त्याच्या कानावर संवाद पडू लागला.

'अहो मिस्टर नायक ! तुम्ही बडबडलात काय?'

'अगं ! कपबशांच्या आवाजानं त्यांची चहा होत होती, तो चहा झाला.'

'हो ना ! मी ऐकतच राहिले ! म्हटलं नाटककारानं चहाच्या नशेत लिहिलंय की काय असंच !'

'संवादात असे उल्लेख नकोतच, खाद्यपेयांचे उल्लेख मनाला अस्वस्थ करतात. आणि मग..'

'तालमीचे तीन तेरा वाजतात. असंच ना ? तुमच्या पुढं तानाजीचं वाक्य उच्चारायची सोय नाही. 'यशवंत्ये ! आता मागं फिरलीस तर खांडोळी करून भाकरीसंगं खायला देईन.. तुम्ही एकदम...'

'माझी खांडोळी करायला आणि भाकरीसंग खायला पुढं सरसावायचे.'

'खरंच भूक लागली बुवा ! चहा ॲपिटायझर आहे.'

'आलं घातलंय ना ! सेक्रेटरी आणखी आहे का हो चहा?

'आणायला सांगा घसा सुकलाय...'

'काही डिश् नाही का?'

'हो ना! आज तालमीला न जेवताच आलोय!'

'हो! आणि रात्री परत गेल्यावर जेवणार नाही म्हणून सांगून आलोय. जरा काही मागवा...'

'काय मागवू? ब्रेड-भाजी..'

'अहाहा! काय चॉइस आहे पण! अरे काही समच्युअस मागवा! तालीम करायची कशी?'

'अरे पण इथं काय जोर बैठका काढायच्या आहेत?'

'बौद्धिक जोर बैठकाच!'

'नाहीतर काय! नाटककारानं लिहिलंय ते दिग्दर्शकाला कळत नाही...'


'आणि बसवणाऱ्याचं बोलणं नटांना कळत नाही, आणि.. प्राम्प्टरला कुणाचंच कळत नाही.'

'आणि मग या दंगामस्तीनंतर भूक लागेल नाहीतर काय होईल?'

'बिर्याणी मागवा. एग्‌करीबरोबर टोस्टही असू देत.'

'हे सारं येईतो..'

'तालीम सुचणार नाहीऽऽ!' दिग्दर्शक हे सारं ऐकून तालमीच्या बाबतीत अक्षरशः मग चुरमुरे खात बसतो. कारण दुसरं काही त्याला खाववत नाहीच. प्रयोगाची अवस्था काय होईल याबद्दल तो हवालदिल झालेला असतो.



थोड्या वेळानं रिफ्रेशमेंट येते. त्या रिफ्रेशमेंटचा समाचार घेण्यात सारे दंग होतात. तालमीच्या जागेला जेवणावळीचं स्वरूप येतं. तेवढ्यात...

तेवढ्यात संस्थेच्या व्यवस्थापन विभागातला एक येतो. धापा टाकीत तो म्हणतो,

'प्रयोगासाठी तारीख मिळत नाही, आपण ठरविली, ती आधीच गेलीय. अलीकडची पंधरा दिवस मिळतेय. पुढची महिन्यानंतरची मोकळी आहे. कोणती घ्यायची?'

'महिन्यानंतरची घ्या!'

'आजच्या सारखी खणखणीत तालीम करू!'

'नको! पंधरा दिवस अलीकडची घ्या!' सेक्रेटरी घाई-घाईनं निर्णय देतो. त्याला डोळ्यासमोर रिफ्रेशमेंटच्या डिशेस् दिसत असतात.

'मग तालमी रोज जास्त वेळ घ्यायला लागतील.' दिग्दर्शक

'सेक्रेटरी! रिफ्रेशमेंट रोज ठेवा हं. समुच्यअस. सैन्यं पोटावर चालतात.'

'मग बघा तालीम..'

'चला सुरू करूया तालीम पुढे..' दिग्दर्शक सरसावत म्हणतो. त्याच्याकडे कुणीच लक्ष देत नाही.

मग थोड्या वेळानं. मोकळ्या बशा बाजूला सारत—

'मग उद्या केव्हा जमायचं?'

'म्हणजे आजची तालीम?'

'छेः! शक्यच नाही. आता एवढं पोटात गेल्यावरऽऽ छे! आत्ताच जांभई येऊ लागली. सेक्रेटरी इथं गाद्या आणून टाका उद्या.'

'आणि तालीम..'

'ती करू होऽऽऽ काय उगीच चालवलंय!'

'बरंय! उद्या बरोबर नऊ वाजता. अच्छा!'

थोड्याच वेळात सारं शांत होतं, आणि सेक्रेटरी आणि दिग्दर्शक त्या निर्मनुष्य भकास जागेकडे आणि एकमेकांकडे निर्विकार मुद्रेनं पाहात बसले असताना, चहावाला मुलगा येतो. बिल सेक्रेटरीपुढे करतो.

'एकूण आजचे रुपये पन्नास आणि पैसे पंचाहत्तर' सेक्रेटरी सुस्कारा सोडतो.

'आणि मागच्या आठवड्याचे?' दिग्दर्शक.

'सत्तर रुपये!' सेक्रेटरी. 'उद्या एकदम सगळे देतो.' चहावाला मुलगा जातो. दोघंही निघतात.

'सेक्रेटरी! सेटचं लवकर बघायला हवं!' दिग्दर्शक.

'तुम्ही म्हणता तसं होणं अवघड दिसतंय!' सेक्रेटरी.

'का? तसा सेट हवाच. त्याप्रमाणे तर हालचाली, ॲक्टिंग एरिया..' दिग्दर्शक.

'सॉरी! बदलावं लागेल. नो बजेट! नाहीतर अव्हेलेबल आहे त्यावर बघा जमतंय का!' सेक्रेटरी.

'आणि लाइटिंगसाठी sss' दिग्दर्शक,

'दोन दिव्यांत जमवा. बाकी प्लेन लाइटिंग वापरा.

सेक्रेटरी.

'पण आपल्या लाइटिंग एक्स्पर्टनं वीस लाइट हवेत म्हणून मला सांगितलं !' दिग्दर्शक.

'सॉरी ! नो बजेट ! अहो लाइटिंग कसलं करताय ? अभिनय करायला शिकवा. छान टीम दिली आहे तुम्हाला. नाटक अभिनयावर चाललं पाहिजे. टेक्निक म्हणजे आपलं उगीच मदतीला. काळ्या पडद्यावर आणि आगिनच्या उजेडात नाटक करीत होते लोक. वा ! काय ताकद होती अभिनयात. तसं बघा काही करता आलं तर.' सेक्रेटरी.

'बरं ! बॅक ग्राऊंड इफेक्ट्स...' दिग्दर्शक.

'कटाप करा ! अहो संवादातलं म्युझिक आगळं असतं. ते शिकवा...' सेक्रेटरी.

'पण मग तालमी...' दिग्दर्शक.

'त्या होतील होऽऽऽ ! उद्या रिफ्रेशमेंट बघा !' सेक्रेटरी.

'पण तालमीची वेळ...' दिग्दर्शक.

'करा ना चांगली दोन तास. उद्या नऊला सांगितलंय यायला. घ्या एकपर्यंत !' सेक्रेटरी.

'पण चहामुळं ऽऽऽ' दिग्दर्शक.

'दोन चार मिनिटं जातील. नाहीतर सुरवातच करू चहा घेऊन...' सेक्रेटरी.

'नको नको ! तशीच करू. चहा आणाऽऽ' दिग्दर्शक.

'दहाला आणतो. प्रयोगाच्या दिवशीचा मेनू बघा.' सेक्रेटरी.

'पण माझं म्हणणं ऽऽऽ' दिग्दर्शक.

'गुडनाईट ! तालमी घ्या कसून... नाटकाचं यश तुमच्यावर आहे. मेहनत करा.' सेक्रेटरी निघून जातो.

दिग्दर्शक विचार करीत चालू लागतो.

* * *

## कामाला छान पण अर्थाला ताण ? नको.

'अहो त्या हिला काम द्या ! छान करेल !'

'बापरे ! नको !'

'का ?'

'फार लांब राहाते. जाणार कोण पोहोचवायला ? हायली एक्स्पेन्सिव्ह ! त्यापेक्षा हिला द्या. जवळ राहाते !'

'हे काम तिला जमणार नाही. तिला मायनॉर रोल देऊन तयार करू ऽऽऽ अन् मग...'

'त्या ह्याला घ्या त्या कामाला ! तो तिकडंच रहातो. तो सोडेल तिला. !'

'पण रोज त्याला कन्व्हेयन्सचा एक्स्पेंडिचर म्हणजे ऽऽऽ'

'आता नाटकात काम करायचं म्हणजे ऽऽऽ येवढा सॅक्रिफाईस करायला नको ?'

'त्याच्या कामाला एक सूट पाहिजे हं करायला ?'

'तसा सूट असलेला दुसरा नाही का कुणी ?'

'का ?'

'त्याला काम द्या ते ! नवा सूट करणं आपल्याला परवडणार नाही.'

'पण तो म्हणाला की मी सूट करून घेतो.'

'त्याला हवा तर कर म्हणावं. आपल्या नाटकात वापर. देखभाल तू कर!'

'अहो त्या प्रवेशात एक काळी चंद्रकळा हवी आहे.'

'पहा ना मैत्रिणीकडे ! तुम्हाला शोधायला नको.'

'पण हल्ली कुणी चंद्रकळा नेसत नाही.'

'तुम्ही नेसायला लागा. त्यासाठी घ्या ! आणि नाटकात ... हॅं ! हॅं !'

'पगडी हवी हं पेशवाई !'

'साधी वापरा ! चालेल ! आणा की कुणाच्या तरी घरची!'

'अहो पण ती चांगली दिसणार नाही !'

'अॅक्टिंग करा नीट ! कपड्यावर काय आहे ! छे ! पुढच्या वेळेपासून साफ अलीकडचं नाटक निवडायला हवं एक फ्लॅट, तीन अंक एक दिवसात घडणारे. वेतात बसलं पाहिजे'

'छे ! चहा मागवा ! डिस्कशननं घसा कोरडा पडला !'

'हो ! हो ! अरे चहा आणायला सांग रे आणि ऽऽऽ सांगू का कांही ? मीही काही खाल्लं नाही दुपारी...'

आणि मग इतर चर्चा ... पण नाटकासंबंधीच का ? अं ऽऽ

## खर्चाची काळजी नको हो ! आपल्याला काय कमी?

'नाटक छान आहे. घेतलं. तुम्ही खर्चाची काळजी करू नका म्हणाल तेवढा करू.'

'सेट ऐसा करतो कीयंव. फिरता रंगमंच हवाच. वरं का हो प्रोड्यूसर !'

'अहो फिरता घ्या ! सरकता घ्या ! उडता घ्या ! उघडता घ्या ! मिटता घ्या !

'अहो पण ! माझ्या नाटकात...' नाटककार काकुळतीनं.

'आपण त्याला पोषक प्रसंग डेव्हलप करू हो ! खर्चात कमी नाही करायचं.'

'आणि लाइटिंगला पंचवीस स्पॉट, पाच फोको, पाच सोलर, बॅक प्रोजेक्शन..'

'एवढं सारं माझ्या नाटकात... ...' नाटककार स्तिमित होऊन.

'प्रसंग डेव्हलप करू हो ! खर्चात कमी नाही करायचं.'

'हो ना ! प्रेक्षक दिपले पाहिजेत !'

'पण माझ्या नाटकात ...' नाटककार डोळे विस्फारत.

'टेक्निकला वाव किती आहे. तुम्हाला कल्पना नाही. कास्टिंग काही करा. आम्ही नाटक मारून नेतो.'

'अरे हो ! काठीला पितळेची मूठ नको हं ! सोन्याचं पाणी द्या त्यावर'

'हो आणि दागिने ? कुंडलं ? कुड्या? बांगड्या ?'

'आणि मुकुट, तरवारी, शेले !'

सगळं आणतो हो.'

'पन्नास हजारावर खर्च झाला पाहिजे.'

'पण माझ्या नाटकात ...' नाटककार अगतिकतेनं.

'तुमच्या नाटकाचं भाग्यच तसं आहे. तुम्ही खर्चाची काळजी करू नका! आणि नाटककार डोळ्याभोवती तारांगणं फिरत आहेत अशा स्थितीत. स्वतःच्या नाटकाची किंमत पन्नास हजार कशी ? ती मला नाटकात का दिसत नाही ? याचा विचार करीत घरची वाट चालत असतो.

## पुढचं प्रॉडक्शन स्वस्तात हं !

'हूं ! नाटकाचा प्रयोग काही जमला नाही...'

'तर काय ? बरं झालं, उगीच फार खर्च नाही झाला प्रॉडक्शनचा.'

'पण रिफ्रेशमेंटचा फार झाला असं नाही वाटत ?'

'मग ? एवढा व्हायचाच. अरे ! सारीजण फुकट कामं करतात. त्यांना निदान एन्टरटेन करायला नको ?'

'पण रिफ्रेशमेंटचा ...'

'तुम्ही फार कंजूषपणानं विचार करता बुवा!'

हो ना! तेवढीच खूष राहतात. त्यांच्यावर तर नाटक.'

'आणि तोऽऽ ऐन प्रयोगाच्या दिवशी मुंबईला जाऊन बसला आणि फोन केलान् की क्रोम लेदरचे बूट द्या. तर विमानानं वेळेत येतो प्रयोगाला. त्याला बूट घेऊन दिलात.

'हो मग काय करणार ? त्याच्यावर तर नाटक.'

'पण आधी कास्टिंग करताना..'

'हे पहा आपण नाट्यगुण पाहतो.'

'आणि ती दूर रहाते म्हणून चांगली नाट्यगुण असलेली.

'मग ट्रॅन्स्पोर्टचा खर्च कुणी करायचा !'

स्मोक मनी द्यायला सुरवात करू या का? पाच पाच रुपये पर प्रयोग ?

'नको ! कशाला ? दर प्रयोगालाच देणं वाईट दिसतं म्हणून पाचव्या प्रयोगाला पंचवीस द्यायचे ठरवले तर फक्त पाचवा प्रयोग चांगला झाला.?

'त्यापेक्षा फ्लॅट रेट नाइट देऊ या. पंचवीस रुपये पॉकेट मनी.'

म्हणजे सगळेच गड्याच्या कामाला राजी!'

'म्हणजे रिफ्रेशमेंट नको. तालमी चोपून घेऊ.'

'पहा करून ! नाइट आणि रिफ्रेशमेंट बिल पहा किती होतंय ते!'

'हो ना ! केवळ कल्चरल वर्क म्हणून सॅक्रिफाइस तरी किती करायचा माणसानं.'

'आणि कलेला काही मोल आहे की नाही ?

'तर ! सगळ्यांना काहीतरी टोकन ऑफ ॲप्रिसिएशन म्हणून एखादं एम्ब्लेम देऊ या. आणि एक डिनर?'

'पुढचं प्रॉडक्शन स्वस्तात काढायचं हं !'

'चला चहा मागवा ?'

## स्वस्थ बसून आहात त्यापेक्षा !!

'पंचवीस रुपये नाइट मिळेल.'

'थोडी नाही का वाटत?'

'महिन्यातून पंचवीस प्रयोग. स्वस्थ बसलात. महिना सव्वा सहाशे मिळतील.'

'ठीक आहे. पण दौऱ्यावर असताना ?'

'प्रवास खर्च कंपनीचा. जेवणखाण तुमचं!'

'म्हणजे पंधरा रुपये नाइटच पडली.'

'कमी जेवा! स्वस्थ बसून आहात, त्यापेक्षा!'

'ठीक आहे!'

दुसऱ्या मुक्कामाला—

'वीसच दिलेत नाइटचे!'

'रिझर्व्हेशन आणि प्रवासातला फराळ, याचे कापले.'

'पण आमचं मग नुकसानच की!'

'सोय केली. नुकसान का ? स्वस्थ बसला आहात त्यापेक्षा..'

'ठीक आहे!'

* * *

## खरा कलावंत म्हणजेऽऽ! हॅंऽ हॅंऽ!

'अहो! ही ड्रेपरी! इस्त्रीसुद्धा नाही! वापरायची कशी नाटकात ?'

'नाटक चालत नाही! पसे नाहीत! वापरायची तर वापरा नाही तर तसेच जा! नाटकाचा प्रयोग लावलाय! झाला पाहिजे!'

'मागच्या नाइट्सही मिळाल्या नाहीत.'

'नाटक चालत नाही. प्रयोग लावतोय. नाव होतंय! तुमचाच फायदा! मी तोटयात! काम करा! नाइटचं बघू!'

'मग बाईना नाइट देता ती?'

'त्यांना पाहायला लोक येतात. तुम्हाला यांच्यामुळे पाहातात. रात्री जेवण मिळेल. पुढे पाहू!'

'सेट खराब झालाय हो!'

'नाटक करा! अभिनय करा! पूर्वी तर काळया पडद्यावर..'

'पण हाऊस फुल्ल झालंय की'

'जाहिरात काय केलीय ! त्यात किती खर्च झालाय माहिती आहे? सारं उत्पन्न खर्चात गेलं.'

'पण जाहिरात.....'

'म्हणून चाललंय' तुमच नाव होतय. डिमांड येईल. काम करा! खरा कलावंत कलेत मशगूल होतो. त्याला जेवणाखाण्याचं भान नसतं आणि तुम्ही.....'

* * *

## टेक्निकचं नावच नको हो!

'छे! नाटकातच दम नव्हता! नुसतं टेक्निक उत्कृष्ट असून काय उपयोग हो ?'

'संहिता छान हवी! मग सेट, लाईटिंग, ड्रेपरी, म्युझिक यांनी काय फुलते ती संहिता.'

'पण माझ्या नाटकात...' नाटककार धीटपणानं.

'दम नव्हताच.'

'पण टेक्निकसाठी नको ते प्रसंग का घातलेत ? ते काही माझे...' नाटककार तडकून.

'ध्याssss! ज्याचं करावं बरंss! तो म्हणतो ssss! अहोs! टेक्निकवर इतका खर्च केला म्हणून चार सहा तरी प्रयोग झाले, नाही तर कुणी हातात धरलं नसतं ते नाटक'

'छे! सारा खर्च फुकट गेला. तुमच्या नाटकानं कर्जात जायची पाळी आली.'

'पुढचं नाटक कमी खर्चाचं घ्यायला पाहिजे.'
आणि नवं नाटक घेतलं जातं.

'छान आहे नाटक! स्वस्तात होईल. संहिता काय आहे. टेक्निकचा पसारा नको. शब्दच काय आहेत!'

'होय ना! अभिनयाच्या कौशल्याला काय वाव आहे. बस्! त्या जोरावर नाटक इफेक्टिव्ह होईल. सेट नकोन् काही नको'

'अरे अंधारात करा ना! नाही तर मेणबत्तीच्या उजेडात करा. नुसते शब्द भिडतील'

'अरे शब्दांत संगीत आहे राजा! लेखन असं हवं!'

'पण माझ्या नाटकात...' नाटककार खुलून,

'पहाटेचा देखावा ना ? अरे नुसती पाटी लावू. शब्द काय आहेत तुमचे! नुसते उच्चारले नटांनी की पहाटेचा वारा सुटल्यासारखं वाटेल प्रेक्षकाला.'

'जुन्या काळातला वाडा जो माझ्या नाटकात आहे तो ...' नाटककार भीतभीत.

'एक जुनी कमान आहे की, आहे ना हो आपल्या जुन्या सेटमध्ये ? ती टांगू सजेस्टिव्ह. बस्! प्रसंग काय आहेत तुम्ही निर्माण केलेले. नुसते अभिनयानं साकार होतील.'

'नाही, म्हणजे माझं म्हणणं स्वप्नातला तो प्रसंग.. माझ्या नाटकाचं...' नाटककार साशंक घाबरून.

'ते अभिनयावर अवलंबून आहे हो, ती काळजी सोडा. जागेपणचा अभिनय थांबवायचा, क्षणभर निर्विकार चेहेरा की लगेच स्वप्नातला अभिनय सुरू.'

'पण लाइटिंग आणि म्यूझिकचा वापर केला तर मला वाटतंss... कारण माझ्या नाटकात' नाटककार विनयशील धीटपणानं.

'तुम्ही रंगभूमीवर तुमचं नाटक कसं दाखवायचं पॉवर कुली, ते आमच्यावर सोडा हो. कुठल्याही टेक्निकची जरुरी नाही. तुमच्या नाटकाची शक्ति, सामर्थ्य तुम्हाला कळले नाही म्हणजे कमाल आहे.

'कस्तुरीमृगाला कुठं माहीत असतं त्याच्या जवळच कस्तुरी आहे म्हणून ? तो धावत सुटतो, ' हा सुवास कसला ' म्हणून शोध लावत.

'कसं बोललात! असे नाटककार आपल्याला लाभले हे आपलं नशीब !'

'आणि त्यांचं नाटक म्हणजे निख्खळ शब्दसामर्थ्य आहे, हे सिद्ध करायच धाडस करायला पुढं सरसावलेलो आपण sss'

'प्रश्नच नाही. उद्यापासून तालमी. पंधरा दिवसांत प्रयोग?'

'पंधरा दिवसात? पण माझं नाटक...' नाटककार हबकून.'

'मग ? भाषणं पाठ की प्रयोग. बाकी टेक्निकचा प्रश्नच नाही ना ? '

'नऊला नाटक असलं तर पावणे नऊला थेटरवर हजर, लेव्हल मांडल्या की नऊला नाटक सुरू. '

' पण मेकप, ड्रेपरीss ... नाटककार भोवळ येत येत.

' जुजबी लागेल हो. प्रत्येकजण नुसता तोंड धुऊन आला तरी बास्. पेन्सिलीनं मिशा, एकादा निराळा कपडा की सुरू'

'आणि बायका रोज करतात तो मेकप करून येतीलच. आपल्या ड्रेपरीत नाहीत इतक्या साड्या आहेत त्यांच्याजवळ.'

'पण माझ्या नाटकात...' नाटककार बेशुद्धीच्या मार्गावर.

'आधुनिक पोशाखात करू हो. 'प्ले इज दी थिंग असं म्हणतात. ते तुमच्या नाटकानं सिद्ध होईल? आणि नाटकाचा प्रयोग होतो.'

'लिहिलंय चांगलं. नटांना टेक्निकची जोड असती तर...'

'पण आता चालायचं नाही. एकदा इम्प्रेशन झालं की गेलं?'

'टेक्निक लागणारं नाटक लिहू नका हो. खर्चाला काळ? नाटककाराचे डोळे खाडकन उघडतात. आणि नाटक चालत नाही. नाटककाराची रॉयल्टी ? हॅं ! हॅं !

## देणगीचं बघा जरा !

'सुवर्ण महोत्सवी प्रयोगाचा कार्यक्रम ठरवायला हवा?'

'महोत्सव कसला करताय ! इथं मागची बिलं राहिली आहेत. द्यायची ?'

'दोन वर्षात महोत्सवी प्रयोगापर्यंत गाडी आली त्यात काय करायचंय कौतुक ?'

'पण नाटक कसं चाललं ! आपापले व्यवसाय संभाळून म्हणजेsss'

'जरा बरं वाटेल सगळ्याना! एकादं टोकन...'

'खर्चाचं काढू नका. त्यापेक्षा जेवण देऊ. प्रमुख पाहुण्यांसह कार्यकारिणीला.'

'अन् बाकीच्यांना निदान अल्पोपहार...'

कॉन्ट्रिब्यूशननी करू या का? थोडी भर घालू लागली तर

'नाटककाराला एकादं प्रेझेंट?'

'हंss ! देऊ या! पण थोडक्यात बसवा. रॉयल्टी देताच 'की. ती कुठं सुटलीय'

'नटांना काही !'

'आता वाढवू नका हं !'

'देणगीचं बघा जरा. बिलं फार द्यायची आहेत.!

'पण प्रयोग तर हाऊसफुल्ल झाले. काहींना उत्पन्न छान झालं. !'

'पण प्रयोगाचा खर्च ? प्रत्येक प्रयोगात तोंड मिळवणी नाही होत. फायदा कुठला !'

पण मग एवढे प्रयोग ?'

'सारे मिळून जरा प्लस मध्ये जातात.'

'पण नाइट्स नसून?'

'दर कुठे जास्त आहेत? प्लॅन बेताचाच करतो आपण.'

'स्मरणिकेतल्या जाहिरातीची बिलं आली का हो ?'

'बरीच राहिली आहेत. पण काय करणार हो.'

'हे नेहमीचंच आहे. बरं स्मरणिकेचं बिल ? दिलं ना ?'

'थोडं दिलं, थोडं द्यायचंय. ..!'

'देणगीचं बघायला हवंच.'

'संवाद संपतो. विषण्ण शांतता. थोड्या वेळानं.'

'नव्या नाटकाचं कुठपर्यंत आलंय?'

'तालमी चालू केल्या आहेत. बघू या. पोरांची धडपड कारणी लागेल.' पुन्हा सारं स्तब्ध. डिस्पर्स.

## कधी कधी असहो.

'नाटक छान आहे.'

'सेट जरा नवा कनसीव्ह करू'

'सजेस्टिव्ह ! पण आवश्यक ते डेकोरेशन हवं हं !'

'प्रश्नच नाही. आपणच तयार करू सेट.'

'त्या हयांची जागा आहे अंगणात माझी सुतार कामाची पेटी आहे.'

'माझ्याकडे फळ्या पडल्यात फुकट चालल्या आहेत.'

'माझ्याकडची खोकी आणू का ?'

'थर्मोकूलचे तुकडे आहेत.'

'सुतळीचं विणून, अल्युमिनियम पेंट देऊन चिलखत करू. आणि हार्ड बोर्ड पडलाय माझ्याकडे.'

'आणा सेट आपणच करू.'

'हां ! हवा तो भास झाला म्हणजे जमलं.'

'म्यूझिक करता त्या हया देवळात जाऊ कॅसेट रेकॉर्डर घेऊन.'

'मी त्याला भेटून आलो. त्याच्याकडचं ट्रॅन्सफर करून घेऊ आपल्या टेपवर.'

'मग तालमीत करू फायनल टेप.'

'ड्रेपरी मिळणं अवघड जाईल.'

'अरे जुन्या कपड्यातून उभी करू ड्रेपरी.'

'धुवून घेतो छान. आणि इस्त्री मी मारतो.'

'तालमीसाठी लेव्हल्स लावायच्या आहेत ना ?'


'चला आपण लावूया. गडी कशाला ? रात्री उचलून ठेवत जाऊ.'

'म्हणून तर जागा मिळाली तालमीला थोडक्यात.'

'आणि हे बघ ! तालमीला चहा नको.. डिस्टर्ब होते तालीम. हवाय कशाला चहा !'

'इतकी टेनॅसिटी नाही की काय ? चार तास तालीम करायची म्हणजे येवढं काही होत नाही एक्झॉस्ट व्हायला.'

'हो ना ! तो खर्च वाचला तर ड्रेपरी, लाइटिंग, म्यूझिक, जागेचं भाडं यात वापरता येईल.'



'अन् वाटलं एखाद्या दिवशी तर एक एकजण स्टॅंड होऊ चहाला. काय?'

'प्रश्नच नाही.'

'एकान म्हटलं मला, 'तुमचा रिफ्रेशमेंटचा खर्च काहीच नाही.' मी म्हटल, 'संस्था रिफ्रेशमेंटची नाही, नाटकाची आहे.' हंशा.

'अरे पाटी रंगवायची आहे ना?'

'माझ्या घराजवळच्या बोळात रंगवतो. लाकडी चौकटा आहेत. जुनं तपकिरी पातळ आहे फाटकं. ठोकतो त्याच्यावर आणि चुन्याच्या रंगानं रंगवितो. रात्री बसतो. म्युनिसिपालिटीच्या दिव्याचा उजेड असतोच.'

'आणि मेकप? असं करू. मला एक जुनी पेटी मिळलीय. लागतय काय? फेस कलर, अंबर, पावडर, काळी पेन्सिल, मिशा तयार करतो आणि जाळीवर चिकटवून आणतो'

'आपण आपला करू मेकप. एकमेकाचा किंवा स्वत: स्वत:-चा!'

'उद्यापासून तालमी जोरात सुरू हं!'

त्या प्रवेशात सिगरेट लागते कामापुरती. मीं एक आणल.या चार मिनार पाकीट. तालमीला पुरेल अन् प्रयोगालाही प्रवेश झाला की विजवून खिशात ठेवायाचं. एन्ट्रीच्या वेळी पेटवून एन्ट्री स्टेजवर ऑफर करताना एखादी.'

'ठीक! प्रॉडक्शनचा अनावश्यक रिकरिंग एक्स्पेन्स कमी करू म्हणजे बाकीच्या जरूर त्या बाबींना वाव देता येईल.'

'लाइटिंगचा प्लॅन केलाय. ग्रुपिंगमुळं थिएटरच्या अव्हेलेबल लाइटमध्ये बसवता येईल. म्हणजे अन्‌नेसेसरी एक्स्पेंडिचर नको ऑपरेशन सक्सेसफुल'

'आणि एक कल्पना. प्रयोगाच्या रात्री अवेळी जेवण किंवा रस्सापुरी नको.'

'फुकट प्रकृति बिघडायला काहार!'

'त्यापेक्षा चहा घेऊ कॉन्ट्रिब्यूशननं!'

'प्रयोगानंतर माझ्या घरी दुसऱ्या दिवशी चहा रे! डिस्कशन करता येईल चहा घेता घेता.'

'छान कल्पना! ही आपली कॉन्ट्रिब्यूशन!'

'अवघा आनंदी आनंद! उत्साह! निर्मितीचा उत्साह! आत्मीयता! जिद्द! कल्पकता! आणि इकॉनॉमि!

* * *

## इकॉनॉमिक्स पैशाचं आणि नांवाचंही

'छान ! रंजक झाला प्रयोग! उत्पन्न किती झालं हो? माफ करा हं. तपशिलात कुतूहलानं शिरतोय केवळ ?

'थॅंक्स ! आवडला प्रयोग? ट्रिक सीन्स अगदी साध्या टेक्निकनं केले आहेत. तुम्ही सुद्धा करू शकाल.!

'असं ? आणि सीन्स काय झटपट बदलता.!

'अहो ! साकेट केलय लाकडी. त्यात भराभर प्लॅट सरकवायजे. आणि स्टेजच्या मध्यावर सेट दिसला म्हणजे झालं. प्रेक्षकांचं लक्ष तिकडंच वेधतं.!

'पण मग त्याला गडी माणसं?!

'कशाला ? अहो कंपनीत केवळ बारा तेरा माणसं आम्ही. आम्हीच आळीपाळीनं काम करतो. जरूर तेव्हा एकादी कॅरेक्टरही लगेच रंगून येऊन करतो. आतून गाणं म्हणून जमावाच्या गाण्याचा इफेक्टही देतो. लाइटिंग आम्हीच करतो.'

'ट्रिक सीनचं सांगा ना एखादं. झोपडीत स्वयंपाक चालल्याचा इफेक्ट आत उदबत्त्यांचा जुडगा पेटवून ठेवून देतो. आणि झोपडीची भिंत पारदर्शक कापडाची आहे. बाहेर लाईट खूप आणि आत नसला की आतलं दिसत नाही. आणि बाहेर लाईट कमी करून आत लावला की माणूस आत जेवण्याचं अॅक्टिंग करतो. तो जेवत बसलाय असं दिसतं. झाडाची पानं जुळवून पंख्यासारखी धरली आणि भिंतीवर फेकली की धरून ठेवलेला फ्लॅट खाली जातो आणि पत्रावळ चिवटवलेला प्लॅटचा तुकडा दिसतो. पानांची एकदम पत्रावळ झालेली दिसते. तसा भास होतो.

'पण तुम्हाला उत्पन्न ?'

'एका प्रयोगाला कमीत कमी तीनशे पुरतं, कारण खर्च भागतो. थिएटर, जाहिरात.' 'आणि बाकीचं आम्हीच करतो. ना. सारे महिना पगारी. त्यामुळे अडचण नाही. परगावी जेवण एका ठिकाणी आणि पुणे मुक्कामी घरोघर. एकूण मुक्काम फायद्यात पडतो. पावसाळ्यातसुद्धा पगार घरोघर जातो. लहान गावात प्रयोग चालतात आणि उत्पन्नही देतात. त्या जोरावर मोठ्या गावात प्रयोग चालतात.आणि नाव देतात त्या नावावर लहान गावातही प्रयोग चालतात आणि उत्पन्न देतात. माफक अपेक्षा माफक खर्च, पैसा बरा मिळतो आणि विशिष्ट प्रेक्षक वर्गात नावही!

वा ! छान जमलं ! इकॉनॉमिक्स पैशाचं आणि नावाचंही!

तर अशी दृश्य आणि संवादही नाटयसंस्थाच्या अर्थशास्त्राची कल्पना देऊन हौशी आणि व्यावसायिक क्षेत्रात आशेचा किरण दाखवत असतील का ?

## अर्थ मासिकाच्या प्रकाशनासंबंधी निवेदन


दि प्रेस अॅण्ड रेजिस्ट्रेशन आॅफ बुक्स अॅक्ट व रजिस्ट्रेशन आॅफ न्यूजपेपर्स (केंद्रीय) नियम १९५६ अन्वये (नियम क्र. ८ नमुना क्र. ४)

१. प्रकाशन स्थळ : ९०६ शिवाजी नगर, पुणे ४

२. प्रकाशन अवधि : मासिक

३. मुद्रकाचे नाव : राष्ट्रीयत्व व पत्ता : मु. शं. दाते, यशवंत मुद्राणालय १८३५ सदाशिव पेठ, पुणे ३०

४. प्रकाशकाचे नाव : राष्ट्रीयत्व व पत्ता : कमलाकर महादेव परचुरे, भारतीय. ९०६, शिवाजीनगर, पुणे ४

५. संपादकाचे नाव : राष्ट्रीयत्व व पत्ता : कमलाकर महादेव परचुरे, भारतीय, ९०६, शिवाजीनगर, पुणे ४

६. मासिकाची मालकी : सत्यं शिवं सुंदरं प्रकाशन.

मी कमलाकर महादेव परचुरे घोषित करतो की, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी आहे.

कमलाकर महादेव परचुरे



सत्यशिवसुंदर प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे ह्यांनी यशवंत मुद्रणालय, १८३५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.




## उद्यांचे भव्य शहर-नवी मुंबई !
## नव्या मुंबईला आजच तुमच्या भावी जीवनांत स्थान प्राप्त करून घ्या.

**CIDCO**

सिडको लिमिटेड, 'निर्मल' २ रा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१. टेलिफोन– २९४६१५.

SIMOES/C/PR/77M

Posted under prepayment License No. 61

रजि.नं. P.N.C. 205.



# अर्थ

डिसेंबर १९७७
मूल्य तीन रुपये

---

# मराठी अर्थशास्त्र परिषद


## पहिले अधिवेशन

## मुंबई

## दिनांक २५, २६ नोव्हेंबर १९७७

## अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी यांचे भाषण





PRATIBHA 7518MAR

# वैभवाचा संकेत

अध्ययनामागे उद्दिष्टे ही असतातच.
जिज्ञासा हा त्याचा मूलाधार. परिश्रम आणि सातत्य ही कार्यप्रणालि ...प्रगतिसाठी अतिशय उपयुक्त ठरणारी... जीवन समृद्ध होऊ शकते ते केवळ याच मार्गाने... अपेक्षापूर्ति होत राहिल्यामुळे।

किर्लोस्कर उत्पादनेदेखील त्यांच्यापासून केल्या जाणाऱ्या अपेक्षा सर्वार्थाने पूर्ण करतात. अविरत कठोर परिश्रम आणि दीर्घकालीन संशोधन यांचे सुमधुर फळ म्हणजे विविध, विश्वासपात्र किर्लोस्कर उत्पादने... शेती आणि औद्योगिक विकास या दोन्ही आघाड्यांवर अनमोल कामगिरी बजावणारी...

याच दृष्टिकोनातून विचार केला तर तुमच्याकडूनसुद्धा आम्ही पुष्कळ गोष्टी शिकतो, सर्वांगिण उन्नतिसाठी आम्ही अंगिकारलेल्या व्रताचा आणि त्यासाठी आरंभिलेल्या तपश्चर्येचा तो एक महत्वाचा भाग आहे असेच आम्ही मानतो.

Kirloskar

**किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर पथ,
खडकी, पुणे-४११ ००३

® Registered User — Kirloskar Oil Engines Ltd. Poona-411 003.

अनुक्रम


(१) श्री. मिलिंद जोशी — १
(२) प्रा. नी. वि. सोवनी — २—१६
(३) डॉ. रवींद्र रा. दोशी .. १७—१९
(४) प्रा. अ. कृ. पोफळे .. २०—२१
(५) प्रा. वसंत द. नखाते ... ... २२—२४
(६) संख्याचित्र ... ... —२५




# अर्थ


आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक वर्ष तिसरे : अंक सातवा डिसेंबर : १९७७
दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते. किंमत : ३ रुपये वार्षिक वर्गणी : ३० रुपये
संपादक : प्रा. कमलाकर परचुरे कार्यालय : ९०६ शिवाजीनगर, पुणे ४


अर्थचा हा डिसेंबर महिन्याचा अंक, डिसेंबर महिन्यातच प्रसिद्ध करताना आम्हास विशेष समाधान होत आहे. मध्यंतरी मुद्रणासंबंधीच्या अडचणींनी अक्षरक्षः आम्ही हताश झालो. सरतेशेवटी महाराष्ट्रातील मुद्रणमहर्षि श्री. शंकर रामचंद्र तथा मामा दाते ह्यांचेकडे आम्ही साकडे घातले. अर्थाला साहाय्य करण्याचे त्यांनी मनावर घेतले हे आमचे सद्भाग्य. सामाजिक कार्याबद्दल त्यांच्यासारख्या मंडळींस विशेष आस्था आहे, म्हणूनच आमचे अंक आम्ही ह्यापुढे नियमितपणे प्रसिद्ध करू शकू असा विश्वास वाटतो. ह्या अंकात मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी ह्यांचे व्याख्यान, त्याचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेऊन मुद्दाम सादर करीत आहोत. त्या सोबत प्रा. डॉ. दोशी, प्रा. पोफळे, श्री. नखाते ह्यांचे लेखही अर्थाच्या वाचकांना उपयुक्त वाटतील.

जानेवारी महिन्याचा अंक, जानेवारीच्या १ ल्या आठवड्यातच प्रसिद्ध होईल. फेब्रुवारीपासून दर महिन्याच्या १ तारखेस अर्थ वर्गणीदारांकडे रवाना होईल. वाचकांनी आणि विशेषतः ग्रंथपालांनी ह्याची नोंद घ्यावी ही विनंती.

# सातवे अर्थ मंडळ

**संकलक – मिलिंद जोशी**

सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ति श्री. जे. एम्. शेलात यांच्या अध्यक्षतेखाली सातव्या अर्थ मंडळाची (फायनान्स-कमिशन) स्थापना हंगामी राष्ट्रपतींनी जूनच्या शेवटच्या आठवड्यात केली.

आयकर (कंपन्यांवरील आयकर वगळून) आणि केंद्रीय अबकारी कर यांचे केंद्र व राज्य सरकारांत आणि राज्या-राज्यांत कशा प्रकारे वाटप करावे, आणि भारताच्या एकत्रित-निधीमधून राज्यांना महसूलरूपाने कसे अनुदान देण्यात यावे. त्या संबंधीची तत्वे ठरवून देण्याचे व त्या संबंधी शिफारशी करण्याचे काम या अर्थ मंडळाकडे सोपविण्यात आले आहे.

अर्थमंडळ आणि नियोजन मंडळ यांच्या कार्यात एकसूत्रता यावी म्हणून मागील प्रथेप्रमाणे याही वेळी नियोजन मंडळाच्या एका सदस्याला (डॉ. राजकृष्ण) अर्थमंडळावर घेण्यात आले आहे.

आपल्या शिफारशी सादर करताना अर्थमंडळाने, केंद्र-सरकारची साधन संपत्ति तसेच तिच्या खर्चाच्या बाबी लक्षात घ्याव्यात, तसेच राज्यांना त्याच्या पंचवार्षिक योजनांसाठी केंद्रातर्फे आर्थिक मदत देण्याची व ती ठरविण्याची सध्याची पद्धती अर्थमंडळाने लक्षात घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यांत आली आहे.

राष्ट्रीय धोरणें व अग्रक्रम लक्षात घेऊन, राज्य सरकारांना त्यांच्या प्रशासकीय व बिगर-योजना खर्च व जबाबदाऱ्या भागविण्यासाठी महसूल खाती किती निधीची जरूर आहे. त्याचा हे मंडळ अभ्यास करील. विशेषत: राज्यांच्या गरजा निश्चत करताना, इतर गोष्टी बरोबरच, शिक्षक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नोकरांच्या पगारावर होणारा खर्च (कमिशन ठरवील त्या दिनांकाला) मंडळ विचारात घेऊन मदतीचे स्वरूप ठरवील.

मागास राज्यांच्या बाबतीत, तेथील प्रशासनाची पातळी आणि बिगरयोजना क्षेत्रातील व सेवेतील कामाचा दर्जा १९८३–८४ पर्यंत इतर पुढारलेल्या राज्यांच्या बरोबरीने यावा म्हणून तो उंचावण्यासाठी काय करावयास पाहिजे, त्याचा मंडळ विचार करून शिफारशी करील. याखेरीज पाटबंधारे व वीज प्रकल्प, वाहतूक उपक्रम आणि इतर व्यापारी व औद्योगिक उपक्रम यामध्ये गुंतविलेल्या रकमांवर योग्य उत्पन्न मिळण्याची गरज हाही एक प्रश्न कमिशन पुढे शिफारशीसाठी आहे.

शेतजमीन सोडून इतर मालमत्तेवरील वारसा कर, त्याच प्रमाणे सुती व लोकरी वस्त्रे रेयॉन व कृत्रिम रेशामाची वस्त्रे साखर, तंबाखू यावर राज्यांच्या विक्री कराऐवजी बसविण्यात आलेला व गोळा केलेला जादा अबकारी कर यांचे राज्ये व केंद्र सरकारात कसे वाटप करावे त्या संबंधीच्या चालू तत्वात काही बदल सुचवावयचा असल्यास तीही बाब अर्थमंडळाने लक्षात घ्यावयाची आहे. शेतकी मालमत्तेवरील संपत्ति करापोटी, तसेच रेल्वे उतारू भाड्यावरील करातून राज्यांना किती अनुदान द्यायचे तेही हे मंडळ ठरवून देईल.

नैसर्गिक आपत्तीच्या वेळी राज्यांकडून केल्या जाणाऱ्या मदत कार्यावरील खर्चाच्या बाबतीत केन्द्रातर्फे जे साहय केले जाते. त्या बाबतची धोरणे व्यवस्था या बाबत मंडळ विचार करील. आणि सर्व संबंधीत बाबी लक्षात घेऊन सध्याच्या मदत व्यवस्थेत फेरबदल करण्याची गरज असल्यास बदल सुचवील.

सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या १९७९–८० ते १९८३–८४ या कालखंडाचा विचार करून मंडळाने आपला निवाडा द्यावयाचा असून ज्या बाबतीत लोकसंख्या हा एक निकष असतो. त्याबाबतीत १९७१ ची शिरगणती (लोकसंख्या) विचारात घ्यावी, असे कमिशनला सांगण्यात आले आहे. दि. ३१ ऑक्टोबर १९७८ पर्यंत मंडळाने आपला अहवाल सादर करावयाचा आहे.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## अधिवेशन पहिले : मुंबई

**अध्यक्ष : प्रा. नी. वि. सोवनी, यांचे भाषण**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या या पहिल्या वार्षिक अधिवेशनाचा अध्यक्ष निवडून तुम्ही जो माझा बहुमान केला आहेत त्याबद्दल मी आपले मनःपूर्वक आभार मानतो. ही परिषद स्थापन व्हावी व तिचे उद्दिष्ट कार्य महाराष्ट्रात व मराठी भाषिक जनतेत वेगाने वाढावे अशी पुष्कळांची अनेक वर्षे इच्छा होती. परंतु ती फलद्रूप होण्याचा योग गेल्या वर्षी आला व या परिषदेची रीतसर स्थापना होऊन या वर्षारंभी परिषदेची घटना तयार झाली. ती संस्था म्हणून सरकार-दप्तरी नोंदली गेली. तिचे मुखपत्र 'अर्थसंवाद' हे त्रैमासिक जुलैपासून सुरू झाले व आतापर्यंत त्याचे दोन अंक प्रसिद्ध झाले असून तिसरा तयार आहे. आज परिषदेचे पहिले अधिवेशन भरत आहे. हा प्रगतीचा वेग निःसंशय अभिनंदनीय आहे. परंतु तो तसाच कायम ठेवण्याची आपल्यावर जबाबदारी आहे, हे मात्र या आनंदाच्या प्रसंगी विसरता कामा नये. हे सर्व घडून यावयास पुष्कळांचे साहाय्य झाले हे नमूद करण्यास आनंद वाटतो. तसे करताना हे साहाय्य देण्यात ज्यांचा फार मोठा वाटा होता ते माझे स्नेही श्री. गोवर्धन पारीख मात्र दुर्दैवाने आज आपल्यात नाहीत याबद्दल फार वाईट वाटते. ते आज असते तर आपल्या आनंदात आणखीच भर पडली असती. त्यांच्या स्मृतीच्या मंगल सुवासातच आपण आपल्या कार्याला सुरुवात करू या.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या या पहिल्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानावरून मराठीत प्रसिद्ध झालेले अर्थशास्त्रीय लिखाण, त्याच्या मर्यादा, मराठीतून अर्थशास्त्रावर लिहिण्यात उत्पन्न होणारे प्रश्न, परिषदेच्या यासंबंधीच्या प्रचाचे नेमके कार्यक्षेत्र, या एकमेकांशी संलग्न व आपणा सर्वांना जिव्हाळ्याच्या असणाऱ्या विषयांवरील माझे विचार आपल्यापुढे ठेवण्याचा माझा विचार आपल्याला उचित वाटेल अशी मला आशा आहे.

मराठी भाषेत आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रावरील लिखाणाचा स्थूल आढावा व परीक्षण येथूनच या विषयास सुरुवात करावी असे मला वाटते. मी घेणार असलेला आढावा स्थूल स्वरूपाचा आहे. दाते यांची १९५० पर्यंत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची ग्रंथसूची व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रसिद्धिलेल्या मराठी नियतकालिकांची १८४० ते १९५० पर्यंतची सूची यांच्या साह्याने मी तो तयार केला आहे. या काळातील या सर्व वाङ्मयाचा बारकाईने अभ्यास करून तो तयार केलेला नाही. या क्षेत्रात आजवर झालेल्या कार्याची रूपरेषा, त्यात दिसून येणाऱ्या सामान्य प्रवृत्ति वगैरे गोष्टींचे स्थूलमानाने दिग्दर्शन करण्याचा त्याचा हेतु आहे हे कृपया लक्षात घ्यावे.

मराठी भाषेत छापलेल्या व प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रावरील लिखाणाचा इतिहास जुना आहे. मुंबईस १८४३ साली प्रसिद्ध झालेला विश्वनाथ रामकृष्ण यांचा 'हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिति व पुढे त्याचा काय परिणाम होणार याविषयी विचार' हा मराठी भाषेत प्रसिद्ध झालेला अर्थशास्त्रावरील पहिला ग्रंथ असे मानले जाते. तो गोखले अर्थशास्त्र संस्थेने संपादित करून पुनर्मुद्रित केलेल्या 'जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ' (१८४३–१८५५) या ग्रंथात छापला आहे. या ग्रंथाच्या संपादकांनी विश्वनाथ रामकृष्ण यांच्या या ग्रंथात ॲडम स्मिथचा एका ठिकाणी उल्लेख आहे आणि त्याच्या पलीकडे त्यात अथशास्त्रासंबंधी फारसे विवेचन नाही असे म्हटले आहे. म्हणून मराठीतला अर्थशास्त्रावरील पहिला ग्रंथ हा मान

१८४९ साली प्रसिद्ध झालेल्या लोकहितवादींच्या ' लक्ष्मीज्ञान ' या ग्रंथासच दिला पाहिजे. हा ग्रंथ क्लिफ्टकृत ' एलेमेंटस् ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ' या १८३६ साली कलकत्ता येथे प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाच्या आधारे लिहिलेला आहे. त्यानंतर चार वर्षांनी, म्हणजे १८५३ साली, नारो बाळकृष्ण पटवर्धन यांनी लिहिलेले ' मनिमॅटर्स ' (संपत्तिविवेचन) हेही इंग्रजी ग्रंथाधारे लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध झाले. १८५४ मध्ये हरि केशवजी व विश्वनाथ नारायण मंडलीक यांनी श्रीमती मार्सेटच्या संवादरूप इंग्रजी ग्रंथाधारे व मिलच्या ग्रंथाधारे लिहिलेले ' देशव्यवहार व्यवस्था ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याच्याच पुढच्या वर्षी जॉन स्टुअर्ट मिलच्या १८४८ साली प्रसिद्ध झालेल्या ' प्रिन्सिपलस् ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ' या ग्रंथाच्या पहिल्या भागाचे कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी केलेले रूपांतर ' अर्थशास्त्र परिभाषा ' या नावाने प्रसिद्ध झाले. मिलच्या ग्रंथाच्या दुसऱ्या भागाचेही रूपांतर कृष्णशास्त्री यांनी तयार केले होते असे सरकारी दप्तरातील पत्रव्यवहारावरून दिसते. परंतु ते प्रसिद्ध झालेले दिसत नाही.

अर्थशास्त्रावरील मराठीतील लिखाणाचा व त्याच्या प्रसिद्धीचा ५–६ वर्षे सतत वाहिलेला हा झरा नंतर एकदम गुप्त झालेला दिसतो. त्यानंतरच्या जवळ जवळ ३० वर्षांत अर्थशास्त्रावर मराठीत कोणताच नवा ग्रंथ प्रसिद्ध झालेला आढळत नाही. १८८४ साली ही गंगा पुन्हा वाहू लागली. त्या साली श्रीमती मिलिसन्ट फॉसेटच्या अर्थशास्त्रावरील गोष्टीरूप इंग्रजी ग्रंथाधारे गणपुले यांनी लिहिलेले ' संपत्तिशास्त्रविषयक चार गोष्टी ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. हे इंग्रजी पुस्तक मराठी लेखकांत फारच लोकप्रिय होते असे दिसते. कारण त्याच पुस्तकाच्या आधाराने १८९१ साली ग. ज. आगाशे यांचे ' अर्थशास्त्राची मूलतत्त्वे ' व फणसळकर यांचे ' अर्थशास्त्र ' ही दोन पुस्तके प्रसिद्ध झालेली आढळतात. मध्यंतरी १८८८ साली मुजुमदार यांचे ' अर्थशास्त्र तत्त्वादर्श ' हे पुस्तक कोल्हापुरास प्रसिद्ध झालेले होते १८९७ मध्ये श्रीमती हॅरिएट मार्टेन्यू हृयांच्या इंग्रजी पुस्तकावर आधारलेले शंकर विष्णु पुराणिक यांचे गोष्टीरूप व संवादरूपाने अर्थशास्त्र प्रवेश ' हे पुस्तक बडोदा येथे प्रसिद्ध झालेले आहे.

१९ व्या शतकात मराठीत अर्थशास्त्रावरही एकूण ८ पुस्तके प्रसिद्ध झाली व ती सर्वच इंग्रजी पुस्तकांच्या आधारे व बहुधा त्यांचे भाषांतर अगर रूपांतर या स्वरूपाचीच आहेत. त्यात सुद्धा गोष्टी किंवा संवादरूपाने अर्थशास्त्राची प्राथमिक ओळख करून देणाऱ्या व स्त्रियांनी लिहिलेल्या पुस्तकांचे मराठी लेख-

कांना ... [आ]श्चर्यकारक आहे. या ८ पैकी ५ पुस्तके ... रित आहेत आणि त्या ५ पैकी ३ पुस्तके श्रीमती फ... [पुस्त]कावरच आधारित आहेत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस या आघाडीवर पुन्हा सामसूम दिसते. १८९७ नंतर एक तपाने १९१० साली चो. चि. भाटे यांचे ' अर्थशास्त्राची मूलतत्त्वे वगैरे ' व कवठेकरांचे ' अर्थशास्त्र ' ही दोन पुस्तके प्रसिद्ध झाली. पैकी कवठेकरांच्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति १९१० साली प्रसिद्ध झाली. परंतु त्याची पहिली आवृत्ति केव्हा प्रसिद्ध झाली याची नोंद सापडत नाही. तथापि अर्थशास्त्रावरील पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग त्या काळी आला होता ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

यानंतर पुन्हा १४–१५ वर्षांची फट आहे. यानंतरचे अर्थशास्त्रावरील पुस्तक म्हणजे १९२५ साली अमरावतीस प्रसि[द्ध] झालेले पु. बा. साठे यांचे ' सुलभ अर्थशास्त्र ' हे होय. त्यानंत[र] १९२७ साली वा. गो. काळे व द. गो. कर्वे यांचे 'अर्थशास्त्र पुण्यास प्रसिद्ध झाले. त्याच साली भास्कर त्रिंबक काळे यां[चे] ' संपत्ति आणि भांडवल ' हे पुस्तक सयाजी बालज्ञानमाले[त] बडोद्यास प्रसिद्ध झालेले आढळते.

त्या वेळी क्रमाने प्रसिद्ध होत असलेल्या डॉ. केतकरांच्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशातील भाग ६ व भाग ७ या १९२४ सालात प्रसिद्ध झालेल्या भागांतील ' अर्थशास्त्र ' या विषयावरील चर्चेचा परामर्श घेणे आवश्यक आहे. या चर्चेने एकूण ४६ पाने व्यापली आहेत. 'अर्वाचीन अर्थशास्त्राचे स्वरूप ' येथून सुरवात करून पूर्वीची अर्थशास्त्रे व अर्वाचीन अर्थशास्त्रे यांतील भेद पुढीलप्रमाणे सांगितला आहे. " क्यामेरल शास्त्र आणि पोलिटिकल इकॉनॉमी यांमध्ये फरक हा आहे की, क्यामेरल शास्त्राचे ध्येय शासनसंस्थांची दौलत वाढविणे हे होते, आणि पोलिटिकल इकॉनॉमीचा हेतु शासनसंस्था श्रीमंत करण्याचा नसून शासनसंस्था हे ज्या राष्ट्राचे किंवा संस्थानाचे यंत्र आहे ते राष्ट्र अथवा संस्थान श्रीमंत करण्याचा आहे चाणक्यादिकांचे अर्थशास्त्र आणि अर्वाचीन अर्थशास्त्र यांमध[्ये] फरक हा आहे की, चाणक्याचे अर्थशास्त्र क्यामेरल शास्त्र होईल तर अर्वाचीन अर्थशास्त्र पोलिटिकल इकॉनॉमी होय."

नंतर ' अर्थशास्त्र ' हा व्यावहारिक विषय असल्यामुळे त्या विषयी जे वाङ्मय उत्पन्न होते ते पुष्कळसे चालू आर्थि[क] प्रश्नांमुळे उत्पन्न होते असे म्हणून त्यास पुस्ती जोडली आ[हे] की, " ज्याप्रमाणे एखाद्या कायदेपंडितास कायदा समजावू[न]

सांगण्याकरिता तो विशिष्ट परिस्थितीशी संबद्ध असाच घ्याव-याचा असतो, त्याप्रमाणेच अर्थशास्त्राचे पाश्चात्यांचे नियम "केस लॉ" म्हणजे विशिष्ट प्रसंगानुरूप झालेले नियम असे समजूनच घेतले पाहिजेत."

या पुढचा परिच्छेद अर्थशास्त्रातील निरनिराळी मते वा विचारसंप्रदाय असा आहे व त्यात समाजसत्तावाद विरुद्ध व्यक्तिसत्तावाद, राष्ट्रीय अर्थशास्त्र आणि जागतिक अर्थशास्त्र यांवर चर्चा आहे. त्यानंतर 'अर्थशास्त्राचा इतिहास' असा परिच्छेद असून त्यात 'संस्कृत ग्रंथकारांचे अर्थशास्त्र' या मथळयाखाली जवळ जवळ ५ पाने वेद, महाभारत वगैरेतील व कामंदकी नीतिसार, सोमदेवाचे नीतिवाक्यामृत, शुक्रनीति व कौटिलीय अर्थशास्त्र यावर विवेचन आहे.

त्यानंतर 'मराठेशाहीतील अर्थशास्त्रविषयक वाङ्मय' असे सदर असून ते स. बा. देशपांडे यांनी लिहिलेले आहे. नंतर पाश्चात्य अर्थशास्त्राचा इतिहास दिला आहे. त्यात ग्रीक व रोमन अर्थशास्त्र, मध्ययुगीन अर्थशास्त्र, मर्कंटाइल पंथ, फिजि-ओक्रॅट्स, अॅडम स्मिथ, मालथस्, रिकार्डो, मिल, केर्नस्, या इंग्लंडमधील, कूर्नो या फ्रान्समधील व लिस्ट, म्यूलर या जर्मनी-मधील अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचा गोषवारा आहे. हे सदर ऐतिहासिक पंथ अगर हिस्टॉरिकल स्कूल यांच्या चर्चेने संपले आहे. ते प्रा. वा. ना. गोडबोले यांनी लिहिलेले आहे. त्यानंतर शेवटचे सदर 'हिंदी अर्थशास्त्र – स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता' हे डॉ. केतकरांनीच लिहिलेले दिसते. कारण त्यात त्यांच्या त्याआधी बरीच वर्षे प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी ग्रंथाचा विस्तृत गोषवारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाची ४६ पाने अर्थशास्त्राला मिळाली आहेत; परंतु त्यावरचा मजकूर अत्यंत विस्कळीत, समतोल नसलेला व असमाधानकारक आहे. कौटिलीय अर्थशास्त्राचा विस्तृत गोषवारा दिल्यावर चाणक्य (विष्णुगुप्त) हा कोण होता, त्याचा काळ कोणता वगैरे अर्थशास्त्रात संपूर्णपणे अना-वश्यक गोष्टींवर १ ते १½ पाने चर्चा केलेली आहे. पाश्चात्य अर्थशास्त्राचा इतिहास ग्रीक रोमन काळापासून 'ऐतिहासिक संप्रदाय' व केर्नस्पर्यंतच आणला आहे. त्यानंतर, म्हणजे १९ व्या शतकाच्या शेवटच्या पादानंतर त्या अर्थशास्त्रात पडलेली भर, त्यानंतरचे अर्थशास्त्रज्ञ वगैरेंची १९२४ साली ज्ञानकोशाने दखल घेऊ नये याचे आश्चर्य वाटते. सीमान्त विचारसरणी, नवसनातन अर्थशास्त्राची वाढ व विकास याची वार्ताही या मजकुरात नाही. ज्ञानकोशापुरते पाश्चात्य अर्थशास्त्र हे १९व्या शतकाच्या शेवटच्या पादापर्यंत काय वाढले तेवढेच. त्यापुढे ते वाढले नाही असे दिसते. पाश्चात्य विचारसरणी साधारणपणे दोन पिढ्यांनंतर नवी म्हणून हिंदुस्थानात येते अशी परंपरा दिसते. हे विचारांचे पाश्चायन अलीकडे मुदतीने कमी झाले असले तरी पुढच्या काळातही सातत्याने हिंदुस्थानातील अर्थ-शास्त्रीय लिखाणात दृष्टीस पडते, हे कटुसत्य या निमित्ताने नोंदविणे भाग आहे. महाराष्ट्रीय ज्ञानकोशातील 'स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता' हे सदर मौलिक आहे. त्यासंबंधी पुढे विचार करावयाचा आहे.

१९२७ सालानंतर मराठीत प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रा-वरील लिखाणातील पुढचे पुस्तक न. वि. गाडगीळ यांचे, १९४३ साली प्रसिद्ध झालेले 'ग्यानबाचे अर्थशास्त्र' होय. त्या आधी दोन वर्षे पां. वा. गाडगीळ यांचे 'मार्क्सचे कॅपिटल–सार ग्रंथ' व जावडेकरांचे 'अर्थशास्त्र की अनर्थशास्त्र' ही दोन भाषां-तर–रूपांतरवजा पुस्तके प्रसिद्ध झाली होती. परंतु ती अर्थ-शास्त्राच्या मूळस्रोतातील नव्हेत. कुमारप्पा यांचे 'अहिंसेचे अर्थशास्त्र' हे १९४६ मध्ये प्रसिद्ध झालेले पुस्तकही याच वर्गात पडते. अर्थशास्त्राच्या मूलस्रोतातील गाडगिळांच्या नंतरचे पुस्तक म्हणजे वि. गो. सहस्रबुद्धे यांचे १९४८ सालचे 'सुलभ अर्थशास्त्र' हे होय. १९४९ मध्ये भा. ह. मुंजे यांचे 'सुबोध अर्थशास्त्र' हे पुस्तक दोन भागांत प्रसिद्ध झाले.

दाते यांच्या १९५० पर्यंत प्रसिद्ध झालेल्या व निव्वळ अर्थ-शास्त्र या सदरात पडणाऱ्या मराठीतील अर्थशास्त्रावरील लिखाणाच्या सूचीवरून हा त्रुटित आढावा घेतला आहे. अर्थ-शास्त्राच्या शाखांत व उपशाखांत प्रसिद्ध झालेल्या त्याच काल-खंडातील ग्रंथांचा आढावा अगदी थोडक्यात आता घेतो. 'समतावाद, समाजसत्तावाद' या उपविषयावर १९५० पर्यंत सर्वात जास्त पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. १९३७ पर्यंत २० व त्यानंतरच्या तेरा वर्षांत २० अशी एकंदर ४० पुस्तके या सदरात नोंदलेली आहेत. 'चलन, पैसा' या सदरात एकंदर १३ पुस्तके आहेत. 'बँका आणि त्यांचे व्यवहार' यावर ९, 'जमीनधारा' यावर १८, 'सहकारी चळवळ व पेढ्या' यावर १४ पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. 'कर' वगैरेवर १४ पुस्तके नोंदलेली आहेत. परंतु सरकारी अर्थव्यवस्थेचे साकल्याने विवे-चन करणारे दोनच ग्रंथ आढळतात. एक न. वि. गाडगीळ यांचा १९४२ सालचा 'अंदाजपत्रके' व व. गो. सहस्रबुद्धे यांचा 'सरकारी अर्थव्यवस्था' हा १९४७ साली प्रसिद्ध झालेला. 'बेकारी, मजुरवर्गाची स्थिति, ट्रेड युनियन' या विषयांवर १९३७ पर्यंत १० पुस्तके प्रसिद्ध झालेली आढळतात. 'आर्थिक नियोजन' या सदरात ५ पुस्तके नोंदलेली आहेत व ती सर्व १९३७ नंतर प्रसिद्ध झालेली आहेत.

सर्वसाधारणपणे विचार करता १९३७ पर्यंत अर्थशास्त्रावर सुमारे १२५ पुस्तके प्रसिद्ध झालेली होती. त्यांपैकी १४ निव्वळ अर्थशास्त्रावर व बाकीची उपविषयांवर व आनुषंगिक विषयांवर आहेत. १९३७ ते १९५० या काळात अर्थशास्त्रावर सुमारे २०० पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यांपैकी निव्वळ अर्थशास्त्रावर ३ च पुस्तके आहेत व बाकीची उप व आनुषंगिक विषयांवर आहेत. तथापि या काळात मराठीत अर्थशास्त्रावर प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांच्या उत्पत्तीचा वेग फारच वाढला होता हे सहज ध्यानात येते. अर्थात दोन्हीही कालखंडात आनुषंगिक विषयांवर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात निव्वळ त्या विशिष्ट विषयासंबंधीच्या कायद्यासंबंधी माहिती देणारीही पुष्कळ पुस्तके आहेत. ही पुस्तके शास्त्रीय चर्चा करणारी नव्हेत, निव्वळ व्यवहारोपयोगी आहेत हे ध्यानांत बाळगले पाहिजे.

ग्रंथलेखनाप्रमाणेच नियतकालिकांतून अर्थशास्त्रावर स्फुट लिखाण प्रसिद्ध करण्याचीही परंपरा मराठीत जुनी आहे. 'मराठी नियतकालिकांची सूची (१८४० ते १९५०)' या ग्रंथाधारे याही वाङमयाचा थोडक्यात आढावा घेता येईल. 'निव्वळ अर्थशास्त्र' या विषयावर 'विविध ज्ञान विस्ताराच्या' पहिल्या अंकापासून म्हणजे १८६८ पासून १८७५ पर्यंत लेख प्रसिद्ध झालेले आहेत व त्याच्या मथळ्यांवरून ते एका पुस्तकाचे क्रमशः प्रसिद्ध होणारे भाग असावेत असे वाटते. परंतु पुस्तकरूपाने ते प्रसिद्ध झालेले दिसत नाहीत. त्याचप्रमाणे 'ज्ञानसंग्रह' मासिकात १८७२ ते १८७४ या काळातील १३ अंकांत प्रत्येकी ३–४ पाने याप्रमाणे अर्थशास्त्रावर लेख प्रसिद्ध झालेले आढळतात. १८९० ते १८९३ या काळात 'विविधज्ञान विस्तारात' पुन्हा 'अर्थशास्त्र पाठमाला' या मथळ्याखाली लेख आलेले आहेत. तेही एका पुस्तकाच्या निरनिराळ्या भागासारखे वाटतात. परंतु एकत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले नसावेत.

१८४० ते १९५० या समग्र कालखंडातील मराठी नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रावरील लेखांची संख्या १५०० पेक्षा थोडी जास्त आहे. 'निव्वळ अर्थशास्त्र' या विषयावर ४४ लेखांची नोंद आहे. 'आर्थिक इतिहास व आर्थिक स्थिति' या सदरात १११ लेख आहेत. त्यांपैकी ८५ भारतासंबंधी व ११ महाराष्ट्रासंबंधी आहेत. 'श्रमिक अर्थशास्त्र' या शाखेत २०७ लेखांची नावे आहेत. त्यांत बेकारीवर ७५, श्रमिक संघटनांवर २८, श्रमिक महिलांवर २५ व संपावर २० लेख आहेत. 'वित्तीय अर्थशास्त्र' या विषयावर ४९६ लेख आहेत. त्यांपैकी 'सहकार व सहकारी संस्था' यांच्यावर १८५, 'पैसा' यावर १६०, 'बँका व त्यांचे व्यवहार' यांवर ८३ व 'भूविषयक अर्थशास्त्रावर' ६८ लेख आहेत 'समाजवादावर' ११३ लेख व 'करव्यवस्थेवर' जवळ जवळ ९० लेख आहेत. एकंदरीने पाहता मराठीतील अर्थशास्त्रावरील स्फुट लिखाणाचा भर वित्तीय अर्थशास्त्र, श्रमिक अर्थशास्त्र व समाजवाद यावर उतरत्या क्रमाने होता असे दिसते हे स्फुट लिखाण निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहे. अर्थशास्त्रीय प्रश्नांनाच वाहिलेले मराठीतील पहिले नियतकालिक म्हणून १९३४ साली प्रा. वा. गो. काळे यांनी सुरु केलेल्या 'अर्थ' पाक्षिकाचा उल्लेख येथे केला पाहिजे. त्याचे मासिकात परिवर्तन करून ते नवीन स्वरूपात प्रा. कमलाकर परचुरे यांनी चालू ठेवले आहे व त्याची चाळिसाहून अधिक वर्षांची परंपरा लुप्त होऊ दिलेली नाही हे येथे अगत्याने नोंदणे इष्ट वाटते.

१९५० नंतर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची व लेखांची सूची अद्यापि तयार झालेली नसल्यामुळे त्यानंतरच्या काळातील मराठीतील अर्थशास्त्रावरील लिखाणाचा आढावा घेणे अवघड आहे. तथापि स्थूलमानाने या लेखनासंबंधी काही कल्पना देणे अवघड आहे. १९५० नंतरच्या काळात अर्थशास्त्रावर मराठीत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची व स्फुट लिखाणांची संख्या व त्यांच्या उत्पादनाचा वेग पूर्वीच्या काळापेक्षा फारच झपाट्याने वाढला आहे, याबद्दल दुमत होणार नाही. या ग्रंथांमध्ये निव्वळ अर्थशास्त्रावरील व त्याच्या शाखा उपशाखांवरील पाठ्यपुस्तकांची संख्य सर्वांत अधिक आहे. या काळातच विद्यापीठीय स्तरावर मराठी माध्यमाचा स्वीकार व प्रसार झाल्यामुळेच हे उदंड पीक आलेले आहे. परंतु गुणवत्तेच्या दृष्टीने ते फारसे सकस नाही अशीच भावना सार्वत्रिक दिसते. मराठीतील अर्थशास्त्रावरील २–४ वर्षांपूर्वीपर्यंत प्रसिद्ध झालेल्या पाठ्यपुस्तकांचा समग्र विचार करून एका अनुभवी प्राध्यापकांनी पुढील मीमांसा केली आहे. ती सर्वसाधारणपणे प्रातिनिधिक समजण्यास हरकत नसावी ते लिहितात :

"मी गेली काही वर्षे मराठीतून अर्थशास्त्र शिकवीत आहे य काळात अनेक पुस्तके पाहण्यात आली बहुतेक पुस्तके गुणांपेक्षा उणिवांनीच परिपूर्ण आहेत! या लेखकांनी (प्राध्यापकांनी) ज्ञानाची गरज भागविण्याच्या हेतूने मराठीतून ग्रंथलेखन केले नसून अर्थोत्पादनाच्या हेतूने केले आहे. या प्रकारचे अर्थोत्पादन बुद्धिजीवी वर्गाच्या बाबतीत अटळ आहे हे पटू शकते, किंबहुना लेखनाला प्रवृत्त करणारा, प्रोत्साहन देणारा तो महत्त्वाचा हे आहे हेही मान्य. पण लेखन करताना प्रस्तुत असलेल्या विषयाशी, ज्ञानाशी, स्वतःच्या कर्तव्याशी किमान प्रामाणिकपण

राखला जावा, एवढीही अपेक्षा करू नये? आपण प्राध्यापक आहोत, आपले 'ऐकणारे' विद्यार्थी आपल्या हाताशी आहेत, आपण सांगू ते पुस्तक विद्यार्थी विकत घेतात, मग आपणच पुस्तक लिहून ते का खपवू नये?—या विचारातून आज पाठ्यपुस्तकांची निर्मिति होत आहे. प्राध्यापक आपल्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तके लिहितात. त्यांचे विद्यार्थी ती विकत घेतात. त्या पुस्तकातील 'ज्ञान' (!) परीक्षेत उतरवितात. परीक्षक (म्हणजे अनेकदा पुस्तककर्तेच !) त्यासाठी भरपूर गुण देतात. विद्यार्थी उत्तीर्ण होतात. त्यातून सर्वांचेच भले होते. प्राध्यापकांना पैसा मिळतो, विद्यार्थ्यांना पदवी मिळते. परस्परहिताच्या अशा चमत्कारिक मार्गाने मराठीत ज्ञानाची देवाणघेवाण चालू असते. "तेरी भी चूप मेरी भी चूप !"

"प्राध्यापकी स्वीकारल्यानंतर पहिल्या दोनचार वर्षांतच ग्रंथलेखन करण्याइतकी ही मंडळी तज्ज्ञ कशी होतात, हे एक कोडेच आहे. विषयाची सखोल व नेमकी समज येण्यापूर्वीच घाईघाईने ग्रंथलेखन करावयास घेणे हा क्रमांक एकचा अप्रामाणिकपणा आहे. काही इंग्रजी पाठ्यपुस्तके समोर ठेवून, काही मजकूर या पुस्तकातून तर काही त्या पुस्तकातून घेऊन, थोडासा शब्दांचा फेरफार करून भाषांतरित करणे हा दुसरा अप्रामाणिकपणा भाषांतर करताना निदान विषयात अपेक्षित असे सर्व मुद्दे त्यांत येतील अशा रीतीने तरी भाषांतर करावे; पण तेही नाही. ज्यांचे भाषांतर करणे कठीण जाते किंवा ज्यांचे मराठी पर्याय चटकन सुचत नाहीत असे मुद्दे सरळ गाळून टाकावयाचे, हा तिसरा अप्रामाणिकपणा. बहुतेक पुस्तके 'विषय' डोळ्यासमोर ठेवून त्या विषयाला पुरेसा न्याय देऊन, विषयाच्या स्वभावानुसार आवश्यक तेथे विस्तार करून व शास्त्रीय लेखनाला आवश्यक तेवढा नेमकेपणा ठेवून लिहिलेली नसतात. कोणत्याही विषयातील प्रत्येक भागाची जी विशिष्ट व्याप्ति असते ती विचारात न घेता सरसकट सर्व भाग (कदाचित् प्रकाशकांनी ठरवून दिलेल्या) पानांची मर्यादा आधी लादून घेऊन ग्रंथलेखन केले जाते. शिवाय पुस्तकात कोणत्या भागांचा समावेश करावयाचा हेही त्या विषयाच्या स्वरूपावरून ठरविले जात नाही, तर विशिष्ट विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार ते ठरविले जाते."

"माझ्यासमोर आज असलेल्या बहुतेक पाठ्यपुस्तकातून एक दोष प्रकर्षाने दिसतो व तो म्हणजे ग्रंथलेखन 'किमान'- तेच्या तत्त्वाच्या आधारे केले जाते. वास्तविक ज्ञानाच्या क्षेत्रात 'कमाल' तेचे तत्त्व अपेक्षित असते; परंतु सर्व ठिकाणी 'किमान' तेचे तत्त्वच हातपाय पसरून आहे. उदाहरणार्थ, अभ्यासक्रम तयार करताना पेपरमध्ये 'मिनिमम पोर्शन' किती असावा याचा विचार केला जातो. शिक्षक, वर्गामध्ये 'कमीत कमी' काय शिकविलेच पाहिजे किंवा अधिक नेमके सांगावयाचे तर कमीतकमी किती शिकवून चालेल याचा विचार करतात. विद्यार्थीसुद्धा कमीत कमी काय वाचले पाहिजे, किती वाचले पाहिजे, किमान किती प्रश्न तयार केले पाहिजेत, इतकेच नव्हे तर उत्तीर्ण व्हावयास किमान किती गुण मिळाले पाहिजेत, याचाच विचार करतात. मग याच शिक्षकांनी याच विद्यार्थ्यांसाठी लिहिलेली पुस्तकेसुद्धा या तत्त्वाला अपवाद कशी ठरावी? ग्रंथाद्वारे एखाद्या विषयाची जास्तीत जास्त माहिती विद्यार्थ्यांपुढे ठेवली जाईल यापेक्षा कमीत कमी काय लिहिलेच पाहिजे याचा विचार प्रमुख असतो. या दृष्टिकोनातून लिहिलेली पुस्तके विषयाला योग्य तो न्याय देऊ शकत नाहीत."

अर्थशास्त्रावरील अलीकडच्या मराठी पाठ्यपुस्तकांची व त्यांच्या लेखक-प्राध्यापकांची ही संभावना परखड असली तरी वास्तव आहे हे कटू सत्य मानणे भाग आहे. त्याची संभाव्य कारणे पुष्कळ आहेत, परंतु त्यातील सर्वांत प्रमुख कारण माझ्या मते अर्थशास्त्रावरील मराठीतील ग्रंथ व स्फुट लिखाणाच्या स्वरूपाच्या प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणासंबंधी, सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या चर्चात्मक व टीकात्मक लेखनाचा संपूर्ण अभाव हेच आहे. टीकाकारांचा अंकुशच शास्त्रीय विषयावरील चर्चा उच्च पातळीवर टिकवून ठेवू शकतो. लेखकांनाही त्या अंकुशाची सादर भीति वाटून ग्रंथरूप किंवा स्फुट लिखाणही जास्त काळजीपूर्वक करावे लागते. आजपर्यंत मराठीतील अर्थशास्त्रविषयक वाङ्मयासंबंधी निरंकुश परिस्थितीच विद्यमान आहे. ती सुधारणे हे मराठी अर्थशास्त्र परिषदेचे एक प्रमुख कर्तव्य आहे असे मी मानतो. त्या अनुषंगाने अशा, टीका वाङ्मयासंबंधीच्या आपल्याकडील काही प्रवृत्तींसंबंधी सांगणे आवश्यक आहे असे मला वाटते.

पुस्तकांवर अभिप्राय देणे अगर त्यातील विवेचनावर टीका करणे यासंबंधी, काही चमत्कारिक अपेक्षा व रिवाज आपल्याकडे निर्माण झालेले दिसतात. मराठी ललित वाङ्मयावरील टीकात्मक लिखाणात, असे रिवाज व अपेक्षा गेल्या काही वर्षांत पुष्कळच कमी झाल्या आहेत. परंतु शास्त्रीय चर्चेला वाहिलेल्या वाङ्मयासंबंधी अद्याप तसे झालेले नाही. अशा लिखाणातील विवेचनावर शास्त्रीय दृष्टीने टीका केली, त्यातील दोष दाखविले तर अभिप्राय देणाराने अगर टीका करणाऱ्याने ती ग्रंथकाराच्या अगर लेखकाबद्दल वैयक्तिक द्वेषामुळे अगर हेव्यादाव्यामुळे केली असणार असे मानण्याकडे प्रायः कल दिसतो.

त्याचप्रमाणे ग्रंथकाराने विषय किती चांगला बिनचूक विवेचिला आहे, वगैरे निकषांपेक्षा तो कोण आहे, त्याची सद्यः परिस्थिति काय आहे, तो राष्ट्रीय महत्त्वाच्या कामात गुंतला आहे की काय, वगैरे सर्वस्वी अवांतर गोष्टींवरच त्याच्या ग्रंथावरचा अभिप्राय अवलंबून असावा अशी अपेक्षा बाळगली जाते. याबाबत माझ्या स्वतःच्या बाबतीतच फार पूर्वी घडलेली एक हकीकत उद्बोधक वाटेल.

श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी १९४३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'ग्यानबाचे अर्थशास्त्र' या पुस्तकाचा निराळ्या संदर्भात यापूर्वीच उल्लेख केला आहे. ते पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर 'ज्ञानप्रकाश' वर्तमानपत्रातर्फे ते माझ्याकडे अभिप्राय लिहावयास आले. त्यावर मी अभिप्राय लिहिली व तो यथाकाल 'ज्ञानप्रकाशात' प्रसिद्ध झाला. त्यात ते पुस्तक "बेनहॅमच्या सुप्रसिद्ध पाठ्यपुस्तकाचे भाषांतर आहे. मूळ पुस्तक ग्यानबांच्यासाठी लिहिलेले नसून सनदी परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांसाठी लिहिलेले आहे. त्याचे भाषांतर ग्यानबांना उपयोगी पडणारे नाही. विवेचनात जेथे काकासाहेबांनी हिंदुस्थानातील उदाहरणे घेतली आहेत ती ऐकीव माहितीवर आधारलेली व पुष्कळ ठिकाणी चूक आहेत. उदाहरणार्थ 'हिंदुस्थानात बाजरी महाराष्ट्राबाहेर फारशी पिकत नाही' हे काकासाहेबांचे विधान बरोबर नाही. त्याचप्रमाणे अर्थशास्त्रीय परिभाषेतील एकाच इंग्रजी संज्ञेचे मराठीतील भाषांतर निरनिराळ्या संदर्भात तेच होत नाही. त्या निरनिराळ्या संदर्भाचे तारतम्य राखून त्या संज्ञेचे निरनिराळे मराठी भाषांतर करावे लागते याचे भान काकासाहेबांना सर्वत्र राहिलेले नाही. त्यामुळे त्यांचे विवेचन पुष्कळ ठिकाणी दूषित झालेले आहे. अशी टीका करून त्यात पुढे म्हटले होते की, 'राजकारण हा असा एकच धंदा आहे की, ज्यात उमेदवारी लागत नाही' असे काकासाहेबांनी या पुस्तकात एके ठिकाणी म्हटले आहे. परंतु तोच न्याय काकासाहेबांनी अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना व अर्थशास्त्रावरील लिखाणाला लावू नये."

हा अभिप्राय 'ज्ञानप्रकाशात' प्रसिद्ध झाला त्या वेळी ४२ च्या लढ्याच्या निमित्ताने काकासाहेब तुरुंगात होते. त्यांच्या निकटवर्ती असणाऱ्या मंडळींपैकी एक गृहस्थ दुसऱ्या दिवशी प्रा. द. गो. कर्वे यांच्याकडे गेले व त्यांना हा अभिप्राय दाखवून म्हणाले, "काकासाहेब देशासाठी तुरुंगात असताना त्यांच्या पुस्तकावर असा अभिप्राय लिहिणे उचित आहे का? ज्ञानप्रकाशाला हे शोभते का?" प्रा. कर्वे त्यांना म्हणाले की, "अभिप्रायातील टीका चुकीची आहे का? ती जर नसेल तर तुम्ही सांगता या इतर गोष्टी गौण आहेत." परंतु कर्वे यांचे हे उत्तर त्या गृहस्थाना मुळीच पटले नाही व तसे त्यांनी कर्व्यांना बजावले. दुसऱ्या दिवशी मला बोलावून घेऊन प्रा. कर्वे यांनी ही हकीकत सांगितली. त्या वेळी मला फार आश्चर्य वाटले. आपण खरोखरीच काही गुन्हा केला की काय असा संभ्रम उत्पन्न झाला. पण तो फार थोडा काळ टिकला. ही हकीकत सांगितल्यावर मला हेही नमूद केले पाहिजे की, खुद्द काकासाहेबांनी मात्र तो अभिप्राय आपल्या नेहमीच्या खिलाडू वृत्तीने स्वीकारला. ते सुटून आल्यावर एकदा गोखले संस्थेत चहाच्या वेळी आले असता मला व ध. रा. गाडगिळांना म्हणाले की "तुम्ही लोक पुस्तके लिहीत नाही म्हणून आम्ही लिहितो व चुकतो. तुम्ही लिहाल तर आम्हाला त्या वाटेला कशाला जावे लागेल."

आपल्या लिखाणावर होणाऱ्या टीकेसंबंधी काकासाहेबांच्या सारखी खिलाडू वृत्तीच लेखकांनी स्वीकारली पाहिजे. कोणत्याही शास्त्रीय चर्चेत शास्त्रीय सत्याचा शोध हा महत्त्वाचा असतो. चर्चा अगर विवेचन करणारा लेखक, हा तिचा विषय नसून, ती चर्चा अगर विवेचन शास्त्रशुद्धतेच्या कसाला उतरते, की नाही हाच तिचा खरा विषय होय. कोणत्याही लिखाणावरून त्याच्या लेखकासंबंधी काही मत बनणे अपरिहार्य आहे, पण ते शास्त्रीय चर्चेवर कुरघोडी करणार नाही याबद्दल टीकाकारांनी काळजी घेतली पाहिजे. टीका किंवा चर्चा वैयक्तिक स्तरावर उतरता कामा नये. तिला वैयक्तिक हेव्यादाव्याचे स्वरूप तर मुळीच येऊ नये. शास्त्रीय पातळीवर मात्र ती कितीही कठोर, तर्ककर्कश असली, तर त्याबद्दल तक्रार करता येणार नाही. काहीही लिहिले तरी खपून जाते अशी आजची स्थिति नाहीशी होऊन अभिरुचिसंपन्न व शास्त्रशुद्ध टीका करणाऱ्या टीकाकाराच्या सतत जागृतीमुळे काहीही लिहिले तरी ते जास्तीत जास्त चांगले व शास्त्रशुद्ध कसे होईल याची आच लेखकांना लागली पाहिजे. वाईट लिहिले, निष्काळजीपणाने लिहिले तर आपल्याबद्दल टीकाकारांचे व त्यामुळे वाचकांचे मत वाईट होईल असा टीकाकारांचा धाक लेखकांना वाटला पाहिजे.

शास्त्रशुद्ध टीका ही लेखकावर वैयक्तिक पातळीवर नसून त्या शास्त्रातील प्रमेयांवर व त्यांच्या त्याने केलेल्या विवेचनावर, आविष्कारावर, अभिव्यक्तीवर असते. ती व्यक्तिगत आहे असे समजून राग धरणे हे शास्त्राच्या विद्यार्थ्यांना शोभत नाही. अर्थशास्त्रीय चर्चेची परदेशी परंपरा अशी नाही. याच्या अगदी उलटी आहे. आपल्या चुका प्रांजळपणे कबूल करण्याची, त्या

सुधारण्याची आहे. आपणापैकी बहुतेकांनी अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास वाचलेला आहे; त्यामुळे आपणांस ही गोष्ट परिचित आहे. मिलने आपला वेतननिधि सिद्धान्त त्याच्या विरुद्ध त्याच्या टीकाकारांनी सादर केलेला पुरावा ग्राह्य मानून जाहीर रीतीने परत घेतला. त्यात त्याला कोणताही वैयक्तिक अपमान वाटला नाही. त्याचप्रमाणे विकस्टीड याने सीमान्त उत्पादकतेनुसार उत्पादनाचे उत्पादन-घटकात कसे न्याय्य विभजन होते. यासंबंधीचा आपला गणिती सिद्धान्त परेटोच्या टीकेमुळे जाहीरपणे परत घेतला. त्यात त्याला काहीही कमीपणाचे वाटले नाही. आपल्याकडे उदाहरण द्यावयाचे तर माझ्या गुरूंचेच देता येईल. डॉ. केतकरांनी ज्ञानकोशात मांडलेल्या स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राच्या कल्पनेस कसून विरोध करणारा लेख ध. रा. गाडगीळ यांनी १९२४ मध्ये 'विद्यासेवकात' लिहिला. परंतु त्यानंतर १८ वर्षांनी आपले आताचे विचार स्वतःच्या पूर्वीच्या विचारापेक्षा डॉ. केतकरांच्या विचारांशीच जास्त जुळते आहेत असे आवर्जून जाहीरपणे सांगितले. त्यामुळे मूर्खपणा आपल्या पदरी येईल असे त्यांना चुकूनसुद्धा वाटले नाही. अर्थशास्त्रीय चर्चेची ही परंपरा व हा वारसा आपण मराठीत जोपासला पाहिजे व आपल्या लिखाणावर होणाऱ्या टीकेसंबंधी आपली वृत्ति उदार व खिलाडू ठेवली पाहिजे.

अशी वृत्ति जोपासावयासाठी लक्षात ठेवावयाची एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अर्थशास्त्रीय विवेचनात चुका करणे व होणे हे इतके साहजिक आहे की, मोठमोठ्या अर्थशास्त्रज्ञांनासुद्धा ते टाळता आलेले नाही. इतरांची तर गोष्टच सोडा. मार्शलसारखा प्रथितयश अर्थशास्त्रज्ञ उतरत्या फळाच्या सिद्धान्ताची व्याख्या सीमान्त आणि सरासरी विधानांच्या स्वरूपात एका पाठोपाठ सांगतो पण त्यातले बरोबर स्वरूप कोणते व का ते सांगत नाही. पुढे एजवर्थला स्वतंत्र लेख लिहून ते करावे लागले. परेटोने परिमाणगण्य उपभोगितेच्या संकल्पनेवर हल्ला चढविला व ती कशी अशास्त्रीय आहे हे स्थापित केले. परंतु तीच संकल्पना वापरून पुढे व नंतरही आर्थिक विवेचन करण्याचा उपक्रम चालू ठेवला. हिंदुस्थानातील सध्याच्या एका प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाला सीमान्त उपभोगाची प्रवृत्ति म्हणजे उत्पन्नसापेक्ष लवचिकता नव्हे हे दुसऱ्या अर्थशास्त्रज्ञाने जाहीरपणे शिकविण्याची वेळ आली. अर्थशास्त्रातील घटनांचे स्वरूप व त्यांचे विश्लेषण-विवेचन हे वाटते त्यापेक्षा पुष्कळच कठीण व गुंतागुंतीचे आहे. त्यात चुका होणे स्वाभाविक आहे. म्हणून त्या कोणी दाखविल्यास त्याचे स्वागतच केले पाहिजे, राग धरण्याचे मुळीच प्रयोजन नाही.

अर्थशास्त्रावर मराठीत झालेल्या व करावयाच्या लिखाणासंबंधी आणखी दोनतीन प्रश्नांचा विचार येथे प्रस्तुत आहे. त्यांपैकी एक प्रश्न हे लिखाण मुख्यतः कोणत्या प्रकारच्या वाचकांसाठी आहे हा आहे. दुसरा प्रश्न मराठीत वापरावयाच्या अर्थशास्त्रीय परिभाषेसंबंधी आहे. तिसरा प्रश्न अर्थशास्त्रासंबंधी मराठीत लिखाण करताना एकंदर अर्थशास्त्राबद्दलचा कोणता दृष्टिकोन मराठी लेखकांनी बाळगावा यासंबंधी आहे. हे प्रश्न जरी एकमेकांशी निगडित असले तरी विवेचनाच्या सोयीसाठी त्यांचा निरनिराळा विचार करणे आवश्यक आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या स्थापनेतील उद्देश व तिचे कार्य, हे अर्थशास्त्र व आर्थिक प्रश्न यांवर मराठी भाषेत शास्त्रशुद्ध विवेचन, विश्लेषणाची वाढ व जोपासना करणे हे आहे. अर्थशास्त्राचे विद्यार्थी, प्राध्यापक, अभ्यासक, जिज्ञासू व आर्थिक विषयात रस घेणारी सुशिक्षित मंडळी, यांच्या अर्थशास्त्रीय ज्ञानाच्या गरजा भागविण्याच्या प्रयत्नांना साह्य होणे, उत्तेजन देणे यासाठीच या परिषदेचा अवतार आहे. ज्या शास्त्रशुद्ध चर्चा-विवेचनाची जोपासना करावयाची आहे, ती सर्वसाधारणपणे सामान्य शिक्षितांच्या आवाक्यात ठेवण्याचा जरी सतत प्रयत्न राहिला तरी ती सर्वदा व सर्वकाळ त्याच पातळीवर राहील अशी खात्री देता येणार नाही. शास्त्रीय चर्चा शक्यतितकी सोपी व सुबोध असावी हे तत्त्व मान्यच आहे. परंतु ती तशी व्हावी राहावी म्हणून शास्त्रीयतेपासून दूर गेली तरी चालेल असे मात्र नाही. अगदी कटाक्षाने नाही. शास्त्रीय चर्चा शास्त्रीय निकषाप्रमाणेच झाली पाहिजे. ती तशीच करण्याचा, वाढवण्याचा व जोपासण्याचा परिषदेचा प्रयत्न राहील, राहिला पाहिजे. जे लिखाण अर्थशास्त्राचे विद्यार्थी, अभ्यासक, जिज्ञासू यांच्यासाठी करावयाचे ते जनसामान्यास समजेल, अशी अपेक्षा करणे म्हणजे विशेष सूक्ष्म किंवा अवघड अशा मीमांसेच्या पातळीखालीच सर्व विवेचन झाले पाहिजे अशी अपेक्षा ठेवणे होय. ती अर्थातच चूक आहे. शास्त्रीय वाङ्मयात त्या शास्त्रातील संकल्पना व विश्लेषण हे सूक्ष्मतर मीमांसेपर्यंत विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांनी आत्मसात करणे आवश्यक असते! जनसामान्यांना अर्थशास्त्रीय प्रश्नांबद्दल स्थूल व सामान्य जिज्ञासा असते. विद्यार्थ्यांना व अभ्यासकांना त्याच पातळीवर ओढणे किंवा ठेवणे हे योग्य नव्हे. जनसामान्यांसाठी आर्थिक प्रश्नांची चर्चा-विवेचन करणाऱ्या इतर पुष्कळ संस्था आहेत. वर्तमानपत्रे, मासिके व इतर नियतकालिकेही आहेत. त्यांच्यातून या चर्चा सतत चालूच असतात. त्यात भर म्हणून मराठी अर्थशास्त्र परिषद ही नवीन संस्था व तिचे त्रैमासिक यांची गरज नाही. अर्थशास्त्राचे शेकडो

विद्यार्थी आज महाविद्यालयांत आहेत. दरवर्षी शेकडो बाहेर पडत आहेत. प्राध्यापकांची व अभ्यासकांची संख्याही शेकडांनी मोजण्यासारखी आहे व ती वाढती आहे. या मंडळींच्या मार्फतच अर्थशास्त्राचे ज्ञान जनसामान्यांपर्यंत जावयाचे आहे ही ज्ञानवाहिनीच आहे. तिची जोपासना नीट झाली, तिचे ज्ञानजल उत्तम गुणवत्तेचे राहिले, झाले, सुधारले व वाढत गेले, तरच ते जनसामान्यांपर्यंत योग्य त्या स्वरूपात पोचेल. या नदीमुखानेच जनसमुद्रात प्रवेश करावयाचा आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्य या नदी अगर वाहिनीपुरतेच पहिली काही वर्षे मर्यादित आहे. ते कार्य जितके चांगले होईल तितके ते जगसामान्यांपर्यंत लवकर पोचेल. परंतु परिषदेचे कार्य या जनसामान्यांसाठी करावयाच्या कामाची तयारी करण्याचे आहे याबद्दल आपल्या मनात शंका नसावी. मराठीत अर्थशास्त्राची व तदनुषंगिक प्रश्नांची शुद्ध शास्त्रीय चर्चा विवेचन करण्याच्या उद्दिष्टास वाहिलेली एकही संस्था अगर नियतकालिक नाही. ती वाण परिषदेने भरून काढावयाची आहे. हेच तिचे कार्यक्षेत्र तिने आखून घेतलेले आहे.

मराठीत अर्थशास्त्रावर लिहिताना परिभाषा कोणती वापरावी, ती परिभाषा कशी असावी, ती कशी तयार करावी व व्हावी वगैरेसंबंधी विविध व परस्परविरोधी अशी मते, मराठी लेखकांनी मांडलेली आढळतात त्यांच्याही मुळाशी ही शास्त्रीय चर्चा कोणासाठी अभिप्रेत आहे, यासंबंधीच्या निरनिराळ्या लेखकांच्या भिन्न कल्पनाच आहेत असे मला वाटते. परिभाषेसंबंधीचा दृष्टिकोन कालगतीत पुष्कळच पालटत आला आहे. एक काळ असा होता की अर्थशास्त्रातील तज्ज्ञ व्यक्ति असे मानीत की, अर्थशास्त्रातील संकल्पना व सिद्धान्त इतके सूक्ष्म, मराठी व हिंदी प्रकृतीशी इतके परके आहेत की, त्यांची योग्य ती अभिव्यक्ति करण्यास जरूर तसे शब्द अगर संज्ञा मराठीत अस्तित्वात नाहीत व नव्या तयार करणेही शक्य नाही. सांप्रत अशा धारणेची माणसे थोडीच भेटतात. परंतु अजूनसुद्धा ज्ञानदेवांनी 'अनुभवामृतात' अद्वैताबद्दल म्हटल्याप्रमाणे "आमुची करावया गोठी । जे झालीच नाही वाक्सृष्टी" असे अर्थशास्त्रासंबंधी म्हणणारे महाभाग आढळतात दोन तीन वर्षांपूर्वी स्राफ यांचे सिद्धान्त व विवेचन मराठीत मांडणे अशक्य आहे असे एका परिचित अर्थशास्त्रज्ञाने मला पैजेवर सांगितले. मी त्याची पैज घेतली व स्राफाच्या विचारांचे विवेचन करणारा लेख मराठीत लिहून त्याला वाचावयास दिला. (तो आता प्रसिद्धही झाला आहे.) तो वाचल्यावर त्याने प्रांजलपणे पैज हरल्याचे कबूल केले; परंतु अशी पैज घालून अशा लिखाणास मला उद्युक्त केल्याचे श्रेय आपलेच आहे अशी आत्मप्रौढीही विनोदा मारली.

पण अशी एकान्तिक मते असणारी मंडळी जरी आत क्वचित भेटतात तरी अर्थशास्त्रीय परिभाषेसंबंधीच्या कल्पन विसंवादी आढळतात. याचे कारण मराठी लेखकांत त्यासंबंध पसरलेल्या धूसर, भावनाजड व म्हणून पुष्कळवेळा अशास्त्री कल्पना हे आहे. प्रथमतः परिभाषा कशी बनावी, बनवावी या संबंधी दोन परस्परविरोधी मतें मराठी लेखकांची मांडल आहेत. 'जुने अर्थशास्त्रीय ग्रंथ' या पूर्वोक्त पुस्तकाचे संपादक दि. के. बेडेकर हे या जुन्या ग्रंथांतून वापरलेल्या परिभाषेसंबंध चर्चा करताना लिहितात. "पारिभाषिक शब्दांची जडणघडण अशी अडखळत, प्रायोगिक पद्धतीने होत जाणे भाषाविकासाच्य दृष्टीने नैसर्गिक आहे व फायद्याचेही आहे. कारण बोलभाषेश असे नाते राखीतच ग्रांथिक किंवा शास्त्रीय भाषेचा विकास होणे श्रेयस्कर ठरते. कोठेतरी कोणीतरी पारिभाषिक शब्दकोश तयार करावयाचा व मग तो मराठी लेखकांनी फक्त वापराव याचा ही पद्धत व्यवहारात सोपी वाटली तरी कृत्रिम आहे चुकतमाकत आणि लेखनाच्या ओघात व अर्थप्रवाहात शब्दांचं घडण होत जाणे कसे उपयुक्त असते याचे प्रात्यक्षिक प्रस्तुत चार ग्रंथांतील पारिभाषिक शब्दांच्या बदलत्या विकसनशील रूपावरून दिसून येते."

याउलट अशी अनाग्रही भूमिका घेणाऱ्या ग्रंथकाराला प्रा भा. शं. भणगे यांनी बजावले आहे : "आग्रह नसण्यात औदार्य आहे, सहिष्णुता आहे, संग्राहकता आहे. नव्या शास्त्राच्या वाढीस मात्र हे गुण आड येतात. एखाद्या कोशात सांपडले म्हणून (उदा. रघुवीर यांच्या) किंवा पाठ्यपुस्तकात रूढ आहे म्हणून किंवा लिहिण्याच्या ओघात सापडले म्हणून शब्द योजले असे जबाबदार लेखकांस चालण्यासारखे नाही. मूळ विषयाचे ज्ञान पक्के आहे आणि ते सांगताना शब्दांसाठी अडून बसावयाचे नाही ही भूमिका अपुरी आहे. मूळ विषयाचे ज्ञान जितके सूक्ष्म, तितकीच संज्ञा किंवा परिभाषा वापरताना दृष्टि सूक्ष्म असावयास हवी. अर्थ अधिकतम अंशाने पकडला जाईल अर्थाचा अचूक बोध होईल अशीच संज्ञा वापरली पाहिजे. केले नाही तर संकल्पनांमधला सूक्ष्म भेद आणि कारणांची मीमांसा व्यक्त होण्यास अडचण निर्माण होते. औदार्य आणि सहिष्णुता मानणाऱ्यांनी अर्थशास्त्राच्या मराठीतील वाढीत गुण कसे अडथळा आणतात याचा विचार करण्याची वेळ आली आहे."

शास्त्रीय परिभाषा निर्माण व्हावयाच्या वा करावयाच्या प्रक्रियेच्या विकसनातील निरनिराळ्या टप्प्यांवर ही परस्पर-विरोधी मते सुसंगत ठरतील हे सहज लक्षात येईल. मराठीतील अर्थशास्त्रावरील आद्य ४१५ ग्रंथांतील परिभाषेचे परीक्षण करताना दि. के. बेडेकरांची विचारसरणी ठीक वाटते. परंतु तीच आजच्या जमान्यालाही योग्य आहे असा त्यांच्या विचारातला ध्वनि अमान्य करणे अपरिहार्य आहे. अर्थशास्त्रावरील मराठीतील वाङमयात पुष्कळ वाढ झाल्यावर व ती वाढ अधिक वेगाने पुढे होणार, असा संभव दिसत असताना त्यातील परिभाषेत जास्त सुसूत्रता यावयास पाहिजे व त्यासाठी मुद्दाम प्रयत्न केले पाहिजेत हे प्रा. भणगे यांचे मत सद्यःपरिस्थितीत ग्राह्य होण्यास काहीच हरकत नाही. परंतु अशी परिभाषा तयार करण्याची जबाबदारी ही वैयक्तिक लेखकाची आहे, या त्यांच्या सूचित मताशी सहमत होणे कठीण आहे. कारण परिभाषा तयार करणे हे एका व्यक्तीचे काम नाही. ते सामुदायिक काम आहे. एवढेच नव्हे तर ते सर्वांगपरिपूर्ण व्हावयाचे असेल, तर एकाच विषयाची परिभाषा तयार न करता, सर्वच संबंधित विषयांची बृहत परिभाषा तयार करण्याशिवाय गत्यंतर नाही, हे थोडा विचार केला तरी सहज लक्षात येईल. निरनिराळी शास्त्रे कप्पेबंद नसतात. प्रत्येकाचे जरी स्वतःचे असे खास व्याप्त विज्ञानप्रदेश असले तरी त्यांच्या सीमा इतरांना लागलेल्या असतात. या सीमारेषा स्पष्ट व रेखीव कधीच नसतात. खरोखरी दोन्ही शास्त्रांत पडणारा तो धूसर असा सीमाप्रदेश असतो व तो दोन्ही बाजूंस पसरलेला असतो. शिवाय निरनिराळ्या शास्त्रांच्या ज्ञानप्रदेशात विचारांची, संकल्पनांची ज्ञापकांची संज्ञांची, वगैरे देवाणघेवाण सदैव चालू असते. त्यामुळे कोणत्याही विशिष्ट शास्त्रातील शास्त्रीय संज्ञा त्याच शास्त्रापुरत्या मर्यादित असतात. काहीच असतात. त्यामुळे एका शास्त्राची परिभाषा तयार करताना इतर शास्त्रांतील परिभाषांकडेही लक्ष देणे आवश्यक असते. अर्थशास्त्रातील परिभाषेचाच विचार करावयाचा, तर त्यात राज्यशास्त्रीय, तत्त्वज्ञानीय, गणिती सांख्यिकीय वगैरे पुष्कळ इतर शास्त्रातील संकल्पना आलेल्या आहेत. तशाच अर्थशास्त्रातील संकल्पनाही त्या त्या शास्त्रात स्वीकृत झालेल्या आहेत. म्हणून अर्थशास्त्राची मराठी परिभाषा करताना या इतर शास्त्रातील परिभाषाही ठरणे आवश्यक आहे, हे निराळे सांगावयास नको. परिभाषा तयार करण्याचे काम नुसते वैयक्तिक तर नाहीच; आणि ते सामुदायिक आहे, तरी एका विषयापुरते मर्यादित न ठेवता सर्व विषयांना वेढणारे होणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे मराठीतीतील सर्व शास्त्रांची परिभाषा तयार-करण्याचे काम महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या सहकार्याने सुरू केले आहे व त्यांपैकी काही विषयांचे परिभाषाकोष तयार करून त्यांच्या भाषासंचलनालयाने ते प्रसिद्ध केले आहेत. हे येथे नमूद करण्यास आनंद वाटतो. अर्थशास्त्राच्या संदर्भात या प्रयत्नांचे फळ म्हणून 'वाणिज्य कोश' प्रसिद्ध झाला आहे. अर्थशास्त्रावरील कोशाचे कामही पुष्कळसे झाले आहे व पूर्ण होत आले आहे. तो कोश लवकरच प्रसिद्ध होईल व आपणा सर्वांना उपलब्ध होईल अशी अपेक्षा बाळगूया.

या कोशाच्या कार्याच्या निमित्ताने अर्थशास्त्रीय परिभाषेवर काम करण्याची जी संधि मला मिळाली, त्यातील अनुभवाधारे मी त्यासंबंधी दोन तीन प्रश्नांचा विचार येथे करू इच्छितो. परिभाषा कशी तयार करावी, वा व्हावी, यासंबंधीची जशी मराठीतील दोन परस्परविरोधी मते सांगितली, त्याच चालीवर परिभाषा कशी असावी, यासंबंधीही दोन परस्परविरोधी मते मराठी लेखकात प्रचलित आहेत. त्यांपैकी एक अत्यंत लोकप्रिय परंतु शास्त्रीय परिभाषेच्या स्वरूपासंबंधीच्या अज्ञानातून जन्मलेले आहे. दुसरे भाषाशुद्धीच्या अनिवार हव्यासातून उद्‌भवलेले आहे. पहिले मत असे की: "परिभाषेतील पर्याय सोपे, सरळ, सुबोध पाहिजेत. परिभाषा वापरून निष्पन्न होणारे मराठीचे भाषिक स्वरूप सामान्य जनांच्या बोलीचे पाहिजे. ती भाषा नित्य व्यवहाराच्या मराठीपासून दूर असल्यास तिच्यामुळे मराठीच्या संसारात ढवळाढवळ केल्यासारखे होईल. तुकाराम, रामदास यांची मराठी भाषा हीच राजभाषा म्हणून मिरविली पाहिजे. 'अमृतातेही पैजा जिंके' अशा मराठी भाषेत कोश तयार झाला पाहिजे." दुसरे मत असे की, मराठीतीतील शास्त्रीय परिभाषेत इंग्रजी अगर परकीय शब्द मुळीच असता कामा नयेत. शक्यतोवर अशी परिभाषा संस्कृतोद्‌भव शब्दांचीच असावी.

पहिले मत भावनाजड व मराठी भाषेच्या अभिमानातून उत्पन्न झालेले व लोकप्रिय आहे. परंतु परिभाषा व लोकभाषा यांमधील सर्वच भाषांत आढळणारा फरक, भाषेचे कालपरत्वे बदलणारे व बदलते स्वरूप, त्यासंबंधी भाषाशास्त्रीय संशोधनातून निष्पन्न झालेले व सर्वत्र मान्य झालेले सिद्धान्त, वगैरे-संबंधीच्या अज्ञानावर ते उभारलेले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या भाषा ही जशी सार्वकालिक व स्थिर नसते तसेच समकालीन व्यवहारातही तिचे स्वरूप सार्वत्रिक व समान नसते. म्हणून भाषेचे लौकिक भाषा व तांत्रिक भाषा हे दोन प्रकार सर्वमान्य

विद्यार्थी आज महाविद्यालयांत आहेत. दरवर्षी शेकडो बाहेर पडत आहेत. प्राध्यापकांची व अभ्यासकांची संख्याही शेकडांनी मोजण्यासारखी आहे व ती वाढती आहे. या मंडळींच्या मार्फतच अर्थशास्त्राचे ज्ञान जनसामान्यांपर्यंत जावयाचे आहे ही ज्ञानवाहिनीच आहे. तिची जोपासना नीट झाली, तिचे ज्ञानजल उत्तम गुणवत्तेचे राहिले, झाले, सुधारले व वाढत गेले, तरच ते जनसामान्यांपर्यंत योग्य त्या स्वरूपात पोचेल. या नदीमुखानेच जनसमुद्रात प्रवेश करावयाचा आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्य या नदी अगर वाहिनीपुरतेच पहिली काही वर्षे मर्यादित आहे. ते कार्य जितके चांगले होईल तितके ते जनसामान्यांपर्यंत लवकर पोचेल. परंतु परिषदेचे कार्य या जनसामान्यांसाठी करावयाच्या कामाची तयारी करण्याचे आहे याबद्दल आपल्या मनात शंका नसावी. मराठीत अर्थशास्त्राची व तदनुषंगिक प्रश्नांची शुद्ध शास्त्रीय चर्चा विवेचन करण्याच्या उद्दिष्टास वाहिलेली एकही संस्था अगर नियतकालिक नाही. ती वाण परिषदेने भरून काढावयाची आहे. हेच तिचे कार्यक्षेत्र तिने आखून घेतलेले आहे.

मराठीत अर्थशास्त्रावर लिहिताना परिभाषा कोणती वापरावी, ती परिभाषा कशी असावी, ती कशी तयार करावी व व्हावी वगैरेसंबंधी विविध व परस्परविरोधी अशी मते, मराठी लेखकांनी मांडलेली आढळतात त्यांच्याही मुळाशी ही शास्त्रीय चर्चा कोणासाठी अभिप्रेत आहे, यासंबंधीच्या निरनिराळ्या लेखकांच्या भिन्न कल्पनाच आहेत असे मला वाटते. परिभाषेसंबंधीचा दृष्टिकोन कालगतीत पुष्कळच पालटत आला आहे. एक काळ असा होता की अर्थशास्त्रातील तज्ज्ञ व्यक्ति असे मानीत की, अर्थशास्त्रातील संकल्पना व सिद्धान्त इतके सूक्ष्म, मराठी व हिंदी प्रकृतीशी इतके परके आहेत की, त्यांची योग्य ती अभिव्यक्ति करण्यास जरूर तसे शब्द अगर संज्ञा मराठीत अस्तित्वात नाहीत व नव्या तयार करणेही शक्य नाही. सांप्रत अशा धारणेची माणसे थोडीच भेटतात. परंतु अजूनसुद्धा ज्ञानदेवांनी 'अनुभवामृतात' अद्वैताबद्दल म्हटल्याप्रमाणे "आमुची करावया गोठी। जे झालीच नाही वाक्सृष्टी" असे अर्थशास्त्रासंबंधी म्हणणारे महाभाग आढळतात दोन तीन वर्षांपूर्वी स्राफ यांचे सिद्धान्त व विवेचन मराठीत मांडणे अशक्य आहे असे एका परिचित अर्थशास्त्रज्ञाने मला पैजेवर सांगितले. मी त्याची पैज घेतली व स्राफाच्या विचारांचे विवेचन करणारा लेख मराठीत लिहून त्याला वाचावयास दिला. (तो आता प्रसिद्धही झाला आहे.) तो वाचल्यावर त्याने प्रांजलपणे पैज हरल्याचे कबूल केले; परंतु अशी पैज घालून अशा लिखाणास मला उद्युक्त केल्याचे श्रेय आपलेच आहे अशी आत्मप्रौढीही विनोदाने मारली.

पण अशी एकान्तिक मते असणारी मंडळी जरी आता क्वचित भेटतात तरी अर्थशास्त्रीय परिभाषेसंबंधीच्या कल्पना विसंवादी आढळतात. याचे कारण मराठी लेखकांत त्यासंबंधी पसरलेल्या धूसर, भावनाजड व म्हणून पुष्कळवेळा अशास्त्रीय कल्पना हे आहे. प्रथमत: परिभाषा कशी बनावी, बनवावी यासंबंधी दोन परस्परविरोधी मतें मराठी लेखकांची मांडली आहेत. 'जुने अर्थशास्त्रीय ग्रंथ' या पूर्वोक्त पुस्तकाचे संपादक दि. के. बेडेकर हे या जुन्या ग्रंथांतून वापरलेल्या परिभाषेसंबंधी चर्चा करताना लिहितात. "पारिभाषिक शब्दांची जडणघडण अशी अडखळत, प्रायोगिक पद्धतीने होत जाणे भाषाविकासाच्या दृष्टीने नैसर्गिक आहे व फायद्याचेही आहे. कारण बोलभाषेशी असे नाते राखीतच ग्रांथिक किंवा शास्त्रीय भाषेचा विकास होणे श्रेयस्कर ठरते. कोठेतरी कोणीतरी पारिभाषिक शब्दकोश तयार करावयाचा व मग तो मराठी लेखकांनी फक्त वापरावयाचा ही पद्धत व्यवहारात सोपी वाटली तरी कृत्रिम आहे. चुकतमाकत आणि लेखनाच्या ओघात व अर्थप्रवाहात शब्दांची घडण होत जाणे कसे उपयुक्त असते याचे प्रात्यक्षिक प्रस्तुत चार ग्रंथांतील पारिभाषिक शब्दांच्या बदलत्या विकसनशील रूपावरून दिसून येते."

याउलट अशी अनाग्रही भूमिका घेणाऱ्या ग्रंथकाराला प्रा. भा. शं. भणगे यांनी बजावले आहे : "आग्रह नसण्यात औदार्य आहे, सहिष्णुता आहे, संग्राहकता आहे. नव्या शास्त्राच्या वाढीस मात्र हे गुण आड येतात. एखाद्या कोशात सापडले म्हणून (उदा. रघुवीर यांच्या) किंवा पाठ्यपुस्तकात रूढ आहे म्हणून किंवा लिहिण्याच्या ओघात सापडले म्हणून शब्द योजणे असे जबाबदार लेखकांस चालण्यासारखे नाही. मूळ विषयाचे ज्ञान पक्के आहे आणि ते सांगताना शब्दांसाठी अडून बसावयाचे नाही ही भूमिका अपुरी आहे. मूळ विषयाचे ज्ञान जितके सूक्ष्म, तितकीच संज्ञा किंवा परिभाषा वापरताना दृष्टि सूक्ष्म असावयास हवी. अर्थ अधिकतम अंशाने पकडला जाईल, अर्थाचा अचूक बोध होईल अशीच संज्ञा वापरली पाहिजे. हे केले नाही तर संकल्पनांमधला सूक्ष्म भेद आणि कारणांची मीमांसा व्यक्त होण्यास अडचण निर्माण होते. औदार्य आणि सहिष्णुता मानणाऱ्यांनी अर्थशास्त्राच्या मराठीतील वाढीत हे गुण कसे अडथळा आणतात याचा विचार करण्याची वेळ आली आहे."

शास्त्रीय परिभाषा निर्माण व्हावयाच्या वा करावयाच्या प्रक्रियेच्या विकसनातील निरनिराळ्या टप्प्यांवर ही परस्पर-विरोधी मते सुसंगत ठरतील हे सहज लक्षात येईल. मराठीतील अर्थशास्त्रावरील आद्य ४१५ ग्रंथांतील परिभाषेचे परीक्षण करताना दि. के. बेडेकरांची विचारसरणी ठीक वाटते. परंतु तीच आजच्या जमान्यालाही योग्य आहे असा त्यांच्या विचारातला ध्वनि अमान्य करणे अपरिहार्य आहे. अर्थशास्त्रावरील मराठीतील वाङ्मयात पुष्कळ वाढ झाल्यावर व ती वाढ अधिक वेगाने पुढे होणार, असा संभव दिसत असताना त्यातील परिभाषेत जास्त सुसूत्रता यावयास पाहिजे व त्यासाठी मुद्दाम प्रयत्न केले पाहिजेत हे प्रा. भणगे यांचे मत सद्यःपरिस्थितीत ग्राह्य होण्यास काहीच हरकत नाही. परंतु अशी परिभाषा तयार करण्याची जबाबदारी ही वैयक्तिक लेखकाची आहे, या त्यांच्या सूचित मताशी सहमत होणे कठीण आहे. कारण परिभाषा तयार करणे हे एका व्यक्तीचे काम नाही. ते सामुदायिक काम आहे. एवढेच नव्हे तर ते सर्वांगपरिपूर्ण व्हावयाचे असेल, तर एकाच विषयाची परिभाषा तयार न करता, सर्वच संबंधित विषयांची बृहत परिभाषा तयार करण्याशिवाय गत्यंतर नाही, हे थोडा विचार केला तरी सहज लक्षात येईल. निरनिराळी शास्त्रे कप्पेबंद नसतात. प्रत्येकाचे जरी स्वतःचे असे खास व्याप्त विज्ञानप्रदेश असले तरी त्यांच्या सीमा इतरांना लागलेल्या असतात. या सीमारेषा स्पष्ट व रेखीव कधीच नसतात. खरोखरी दोन्ही शास्त्रांत पडणारा तो धूसर असा सीमाप्रदेश असतो व तो दोन्ही बाजूंस पसरलेला असतो. शिवाय निरनिराळ्या शास्त्रांच्या ज्ञानप्रदेशात विचारांची, संकल्पनांची ज्ञापकांची संज्ञांची, वगैरे देवाणघेवाण सदैव चालू असते. त्यामुळे कोणत्याही विशिष्ट शास्त्रातील शास्त्रीय संज्ञा त्याच शास्त्रापुरत्या मर्यादित असतात. काहीच असतात. त्यामुळे एका शास्त्राची परिभाषा तयार करताना इतर शास्त्रांतील परिभाषांकडेही लक्ष देणे आवश्यक असते. अर्थशास्त्रातील परिभाषेचाच विचार करावयाचा, तर त्यात राज्यशास्त्रीय, तत्त्वज्ञानीय, गणिती सांख्यिकीय वगैरे पुष्कळ इतर शास्त्रातील संकल्पना आलेल्या आहेत. तशाच अर्थशास्त्रातील संकल्पनाही त्या त्या शास्त्रात स्वीकृत झालेल्या आहेत. म्हणून अर्थशास्त्राची मराठी परिभाषा करताना या इतर शास्त्रातील परिभाषाही ठरणे आवश्यक आहे, हे निराळे सांगावयास नको. परिभाषा तयार करण्याचे काम नुसते वैयक्तिक तर नाहीच; आणि ते सामुदायिक आहे, तरी एका विषयापुरते मर्यादित न ठेवता सर्व विषयांना वेढणारे होणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे मराठीतीतील सर्व शास्त्रांची परिभाषा तयार-करण्याचे काम महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील वीद्यापीठांच्या सहकार्याने सुरू केले आहे व त्यांपैकी काही विषयांचे परिभाषाकोष तयार करून त्यांच्या भाषासंचलनालयाने ते प्रसिद्ध केले आहेत. हे येथे नमूद करण्यास आनंद वाटतो. अर्थशास्त्राच्या संदर्भात या प्रयत्नांचे फळ म्हणून 'वाणिज्य कोश' प्रसिद्ध झाला आहे. अर्थशास्त्रावरील कोशाचे कामही पुष्कळसे झाले आहे व पूर्ण होत आले आहे. तो कोश लवकरच प्रसिद्ध होईल व आपणा सर्वांना उपलब्ध होईल अशी अपेक्षा बाळगूया.

या कोशाच्या कार्याच्या निमित्ताने अर्थशास्त्रीय परिभाषेवर काम करण्याची जी संधि मला मिळाली, त्यातील अनुभवाधारे मी त्यासंबंधी दोन तीन प्रश्नांचा विचार येथे करू इच्छितो. परिभाषा कशी तयार करावी, वा व्हावी, यासंबंधीची जशी मराठीतील दोन परस्परविरोधी मते सांगितली, त्याच चालीवर परिभाषा कशी असावी, यासंबंधीही दोन परस्परविरोधी मते मराठी लेखकात प्रचलित आहेत. त्यांपैकी एक अत्यंत लोकप्रिय परंतु शास्त्रीय परिभाषेच्या स्वरूपासंबंधीच्या अज्ञानातून जन्मलेले आहे. दुसरे भाषाशुद्धीच्या अनिवार हव्यासातून उद्भवलेले आहे. पहिले मत असे की: "परिभाषेतील पर्याय सोपे, सरळ, सुबोध पाहिजेत. परिभाषा वापरून निष्पन्न होणारे मराठीचे भाषिक स्वरूप सामान्य जनांच्या बोलीचे पाहिजे. ती भाषा नित्य व्यवहाराच्या मराठीपासून दूर असल्यास तिच्यामुळे मराठीच्या संसारात ढवळाढवळ केल्यासारखे होईल. तुकाराम, रामदास यांची मराठी भाषा हीच राजभाषा म्हणून मिरविली पाहिजे. 'अमृतातेही पैजा जिंके' अशा मराठी भाषेत कोश तयार झाला पाहिजे." दुसरे मत असे की, मराठीतीतील शास्त्रीय परिभाषेत इंग्रजी अगर परकीय शब्द मुळीच असता कामा नयेत. शक्यतोवर अशी परिभाषा संस्कृतोद्भव शब्दांचीच असावी.

पहिले मत भावनाजड व मराठी भाषेच्या अभिमानातून उत्पन्न झालेले व लोकप्रिय आहे. परंतु परिभाषा व लोकभाषा यांमधील सर्वच भाषांत आढळणारा फरक, भाषेचे कालपरत्वे बदलणारे व बदलते स्वरूप, त्यासंबंधी भाषाशास्त्रीय संशोधनातून निष्पन्न झालेले व सर्वत्र मान्य झालेले सिद्धान्त, वगैरे संबंधीच्या अज्ञानावर ते उभारलेले आहे. ऐतिहासिकदृष्टचा भाषा ही जशी सार्वकालिक व स्थिर नसते तसेच समकालीन व्यवहारातही तिचे स्वरूप सार्वत्रिक व समान नसते. म्हणून भाषेचे लौकिक भाषा व तांत्रिक भाषा हे दोन प्रकार सर्वमान्य

आहेत. "भाषा म्हटली की सामान्यत: तिचे लौकिक स्वरूप ध्यानात येते. शिक्षित, अशिक्षित, शेतकरी-कामकरी या सर्वांना सहज समजणारी ही भाषा असते...परंतु विवक्षित कामासाठी समाजातील व्यक्ति एखाद्या गटात किंवा वर्गात ज्या वेळी संघटित होतात, तेव्हा सर्वसाधारण समाजाच्या भाषेहून वेगळी भाषा प्रचारात येते. निरनिराळे व्यवसाय व व्यापार, उद्योग व शिल्प, विज्ञान व तंत्रशास्त्र यांच्या निरनिराळ्या शाखा, वृत्तपत्रव्यवसाय, सेनादले, धर्मसंस्था, शिक्षणसंस्था, खेळ इत्यादि क्षेत्रांत त्यांचा वेगवेगळा शब्दसंग्रह उपयोगात येतो." ही तांत्रिक भाषा लोकभाषेशी एकरूप असू शकत नाही. "सामान्य व्यवहाराच्या भाषेचे स्वरूप पुष्कळसे स्थिर व साचेबंद असते. नित्याच्या मर्यादित व्यवहारापुरताच तिचा उपयोग असल्याने तिचा शब्दसंग्रह ठराविक व मर्यादित असतो. या शब्दांना निश्चित व काटेकोर अर्थ नेहमीच असेल, असे म्हणता येत नाही. संदर्भानुसार एकच शब्द निरनिराळ्या अर्थी वापरला जाऊ शकतो. सामान्य भाषेतील शब्दसंग्रहाच्या मर्यादित स्वरूपामुळे व संदिग्धतेमुळे व्यवसायविशिष्ट तांत्रिक भाषांना आपला वेगळा शब्दसंग्रह तयार करावा लागतो व नित्याच्या भाषेतील शब्दांनाही कधी कधी वेगळा व निश्चित अर्थ द्यावा लागतो. त्यातूनच त्या त्या व्यवसायातील व क्षेत्रातील परिभाषा निर्माण होते."

हाच फरक पुष्कळ वेळा साहित्याची भाषा व शास्त्रीय-तांत्रिक क्षेत्रातील भाषा असाही करण्यात येतो. या वर्गीकरणाने या भाषाप्रकारांतील वेगळेपण निराळ्या प्रकारे दृष्टोत्पत्तीस येते. साहित्याच्या भाषेत भावप्रकटीकरण हा मूळ हेतु असतो तर शास्त्रीय भाषेत एखाद्या वस्तुसत्यासंबंधीचे प्रतिपादन करण्याचा किंवा माहिती देण्याचा उद्देश असतो. "व्यक्तीच्या मनातील भावसत्य कलात्मक रीतीने प्रकट करणे हे साहित्याच्या भाषेचे प्रयोजन आहे शास्त्रविज्ञानाच्या क्षेत्रातील वस्तुसत्याहून हे भावसत्य भिन्न असते. वस्तुसत्य हे व्यक्तिनिरपेक्ष असते, तर भावसत्य हे व्यक्तिसापेक्ष असते... साहित्याच्या भाषेत नादसौंदर्याला, लयबद्धतेला स्थान असते. अर्थसौन्दर्य निर्माण करण्यासाठी या भाषेत शब्दांच्या लक्षणा, व्यंजना यांसारख्या शक्तींचा उपयोग करून घेण्यात येतो. वाच्यार्थापेक्षाही अनेक अर्थछटा व्यक्त करणार ध्वन्यर्थ हा अशा अर्थसौंदर्यास पोषक ठरतो...म्हणजेच अनेकार्थक एकच शब्द व एकाच अर्थाचे अनेक शब्द साहित्याच्या भाषेत प्रयुक्त होतात. शास्त्रीय व तांत्रिक भाषेत अर्थाचा निश्चितपणा ही महत्त्वाची कसोटी असल्यामुळे अनेकार्थक शब्दांना या क्षेत्रात वाव नसतो..शास्त्रीय भाषेत शैलीला व अलंकरणाला किंवा लालित्याला स्थान नसते. तार्किक संगति हेच या भाषेचे अलंकरण. ही तार्किक संगति साधण्यासाठी विचार व त्यांची अभिव्यक्ति स्पष्ट व नेमकी पाहिजे. शास्त्रीय व तांत्रिक भाषेचा स्वतंत्र शब्दसंग्रह जसा निर्माण होतो तशीच तिची घाटणी व व्याकरण या गोष्टीही वेगळ्या असू शकतात."

भाषाशास्त्राच्या दृष्टीने परिभाषेचे हे स्वरूप लक्षात घेतले तर शास्त्रीय चर्चेची मराठी भाषा मराठमोळी जनाइची किंवा श्रीपादांची कलावती वाणी असावी अशी अपेक्षा ठेवणे व्यर्थ आहे; व भाषेच्या समृद्धीच्या दृष्टीने चूकही ठरेल. कारण सामान्य भाषेहून वेगळी झालेली परिभाषा ही आज विशिष्ट क्षेत्रातील विशिष्ट लोकांच्यासाठीच आहे तशी ती राहणार नाही. समाजाचा भौतिक, सांस्कृतिक विकास झाला की ती सामान्य माणसाच्या भाषेत बरीचशी सामावू शकेल हे भाषाशास्त्रीय इतिहासातील प्रमेयही विसरता उपयोगी नाही. भाषेची अशी स्वाभाविक वाढ रोखून धरणे इष्ट होणार नाही. भाषेची पातळी खाली आणून ती सोपी करावयाची की, तिला एका विकसित स्तरावर पोचवावयाचे या प्रश्नाचे उत्तर फारसे कठीण असू नये. रशियातील याच समस्येबद्दल रुसी लेखक बोरिस क्युएव्ह याने म्हटले आहे. "भाषा सोपी की कठीण हे ठरते ते सामान्य जनतेच्या पातळीनुसार. प्रश्न आहे तो भाषेला अर्धशिक्षितांच्यापर्यंत आणून ती सोपी करण्यात यावी, वा साक्षरतेचा स्तर इतका वाढवावा की सामान्य जनता सामाजिक संबंध, विज्ञान आणि तंत्र यांतील सूक्ष्म गोष्टी सहज समजू शकेल. रशियात साक्षरतेची पातळी उंचावून हे साध्य करण्यात आले आहे. 'सिन्कोफेसेट्रॉन,' 'सायबरनेटिक्स' हे शब्द रशियातला सामान्य मजूर व शेतकरीही समजू शकतो."

परिभाषेसंबंधीचे मुख्यत: भाषाशुद्धीच्या दृष्टिकोनातून सिद्ध झालेले दुसरे मत आता विचारात घेऊ. या मताची तपशिलवार परीक्षा करण्याअगोदर त्याच संदर्भातील एका जोड प्रश्नासंबंधी प्रथम सांगितले पाहिजे. पुष्कळ वेळा मुद्दाम केलेली परिभाषा ही सामान्य जनतेला अवघड वाटते, कळावयास कठीण जाते; म्हणून परिभाषा ही सोपीच व ओळखीचीच सामान्य असली पाहिजे असा आग्रह धरण्यात येतो. कोणतीही गोष्ट सोप्या भाषेत सांगितली की ती सर्वसामान्यांना समजते. तीच अवघड परिभाषेत सांगितली की, कळत नाही. या भूमिकेचे गृहीत तत्त्व असे आहे आहे की, शास्त्रीय ज्ञान आत्मसात करण्यात अगर कळून घेण्यात मुख्य अडचण काय ती भाषेची आहे. ती सोपी असेल तर कितीही जटिल ज्ञानाची संक्रांती सामान्यजनापर्यंत सहज शक्य आहे, ही समजूत सर्वस्वी चुकीची आहे. शास्त्रीय

विवेचनात खोलवर जावयाचे तर त्यातील बऱ्याच संकल्पना, सिद्धान्त, ज्ञापके ही अवघडच असतात. ती कितीही सोप्या भाषेत अगर शब्दांनी व उदाहरणांनी उलगडून दाखविली तरी त्यांचा नेमका अर्थ नीट कळून व तोच नेमका अर्थ लक्षात बाळगून त्यावर आधारलेली तर्कपरंपराधिष्ठित विचारप्रणाली समजणे हे वाचकांच्या बुद्धीची तशी तयारी झालेली असल्याखेरीज अशक्य असते. याच्या पुष्ठ्यर्थ अर्थशास्त्रातील उदाहरण देण्याअगोदर मी काय म्हणत आहे ते एका जास्त सर्वश्रुत उदाहरणाने सांगतो. ज्ञानदेवांसारख्या शब्दसृष्टीच्या ईश्वराने गीतार्थ मराठीत उलगडून दाखविला. पण ज्ञानेश्वरी वाचून किती सामान्य माणसांना गीतेचे तत्त्वज्ञान संपूर्णपणे कळले याचा थोडा जरी विचार केला तरी वरील प्रश्नाचे उत्तर सहज मिळेल. कारण गीतेतील तत्त्वज्ञान सूक्ष्म आणि जटिल आहे. त्यातल्या संकल्पना, त्यातील विश्लेषणाची पद्धति या सामान्यांना अवघडच वाटणार. इतर शास्त्रांतही तशीच परिस्थिती आहे. अर्थशास्त्रातील 'सीमान्त' ही मध्यवर्ती कल्पना समजण्यास खरोखरीच अवघड आहे. ती फार सोपी आहे असा गैरसमज पसरल्यामुळेच ती पुष्कळ वेळा, अगदी चुकीच्या अर्थाने वापरली गेल्याची अनेक उदाहरणे दाखविता येतील. एखाद्या पदार्थाची सीमान्त उपयोगिता म्हणजे त्या पदार्थाच्या त्या वेळी सेवन केलेल्या शेवटच्या एककापासून मिळणारी उपयोगिता नसून त्या शेवटच्या एककाच्या सेवनाने तोपर्यंत मिळालेल्या एकूणात उपयोगितेत जी भर पडते ती होय. या दोहोंतील सूक्ष्म फरक व अशीच व्याख्या का करावी लागते याची कारणमीमांसा अर्थशास्त्राच्या किती विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना कळलेली असते याचा शोध घेतला तर निराशाच पदरी येईल. मग सामान्यांची गोष्टच सोडा. किंवा अर्थशास्त्रातील 'लवचिकतेची संकल्पना' ही 'प्रमाणांचे प्रमाण' या स्वरूपाची आहे हे विधान नेमक्या अर्थाने किती विद्यार्थ्यांना समजले असते याची चाचणी केली तर 'फार थोड्या' असेच त्याचे उत्तर येईल. विद्यार्थ्यांची ही अवस्था तर ग्यानबांची काय विचारावी ? याचे कारण या संकल्पना वाटतात इतक्या सोप्या नसतात. त्यांचे काटेकोर अर्थ समजावून घेण्यास बुद्धीची तशी तयारी व्हावी लागते. अमूर्त स्वरूपाच्या व बिनओळखीच्या संकल्पना नेमक्या अर्थाने लक्षात ठेवून त्यांच्या साहाय्याने गुंफिलेल्या लांबलांब तर्कमाळा बांधण्यास व समजावून घेण्यादेण्यास बुद्धीवर त्याप्रकारचे संस्कार व तिला त्या प्रकारचे शिक्षण, वळण मिळालेले असावे लागते. सामान्य माणसाच्या बुद्धीवर असे संस्कार झालेले नसल्यामुळे त्याचे काम नुसते सुलभ परिभाषेने होणारे नाही. नुसत्या सोप्या भाषेने व परिभाषेने हे प्रश्न सुटण्यासारखे नाहीत.

आता मराठी अर्थशास्त्रीय परिभाषा तयार करताना उद्भवणाऱ्या काही प्रश्नांची आमच्या उपसमितीतील कामाच्या अनुभवाच्या आधारे व त्या समितीवरील माझ्या सहकाऱ्यांच्या व शासनाधिकाऱ्यांच्या अनुमतीने थोडीशी चर्चा करतो. परिभाषा लोकभाषेपेक्षा निराळी असली, तरी तिच्यात समाविष्ट करण्यासाठी निवडलेले व घडवलेले शब्द शक्यतो सोपे व त्या भाषेतीलच असावे हे तत्त्व सर्वमान्यच आहे. यासंबंधात पुष्कळ लोक असे म्हणतात की, परिभाषा करताना प्रत्येक शब्द देशीच असावा असा हट्ट धरू नये. जे परदेशी (इंग्रजी) शब्द व्यवहारात रूढ झालेले आहेत, त्याबाबतीत तर असा अट्टहास मुळीच नसावा. या तत्त्वालाही कोणाचा फारसा विरोध होईल असे वाटत नाही. परंतु हे तत्त्व अंमलात आणताना परिभाषानिर्मितीच्या कामात कोणते प्रश्न निर्माण होतात याची कल्पना ही सूचना करणारांना नसते. एका उदाहरणाच्या साह्याने हे विशद करता येईल. 'बँक' ही संज्ञा घ्या. ही मराठीत सर्वत्र रूढ असलेली व सामान्यांपर्यंत पोचलेली संज्ञा त्याच स्वरूपात परिभाषेत स्वीकृत करण्यास कोणतीच अडचण नाही व ती स्वीकृत करण्यात आलेलीही आहे. परंतु परिभाषा तयार करणारांचे एवढ्यावर भागत नाही. कारण 'बँक' या इंग्रजी नामाचे त्या भाषेच्या लवचिक घाटणीमुळे क्रियापद व धातुसाधित नाम होत असल्यामुळे तशी सिद्ध झालेली रूपेही इंग्रजी अर्थशास्त्रीय परिभाषेत रूढ झालेली आहेत. जसे 'banking' हे क्रियापद आणि धातुसाधित नाम जसेच्या तसे मराठीत पर्याय म्हणून घेता येत नाही. कारण 'बँक' जरी जनसामान्यांस माहिती असली तरी 'बँकिंग' या इंग्रजी शब्दास अभिप्रेत असलेली प्रक्रिया त्यांना तशी माहीत नसते. निदान 'बँकिंग' या शब्दाने खासच नाही ! यासाठी 'बँकिंग' या इंग्रजी शब्दासाठी निराळी संज्ञा तरी तयार करावयाची नाही तर 'बँक' हा पर्याय कायम ठेवून त्याच्या जोडीला त्या इंग्रजी शब्दाप्रमाणेच लवचिकपणे वापरता येईल अशी देशी संज्ञा जादा पर्याय म्हणून घ्यावयाची. अर्थशास्त्रीय कोशात 'बँक' यासाठी 'बँक' व 'अधिकोश' असे दोन पर्याय सुचविले आहेत. त्यातील देशी पर्यायावरून 'बँकिंग'ला 'अधिकोषण' असा पर्याय क्रियापद व धातुसाधित नाम या अर्थी तयार केला आहे. आणि मग त्या अनुषंगाने central banking केन्द्र अधिकोषण, branch banking शाखा अधिकोषण, unit banking शाखाहीन अधिकोषण वगैरे जरूर ते पर्याय तयार केले आहेत.

रूढ इंग्रजी संज्ञा स्वीकारणे जरी इष्ट असले तरी त्याने काहीच प्रश्न सुटतात. सर्व सुटत नाहीत.

परिभाषा निर्मितीत उद्भवणारा आणखी एक प्रश्न म्हणजे चुकीच्या पण रूढ झालेल्या संज्ञांचा स्वीकार करावयाचा, का त्या त्याज्य ठरवून त्यांच्या जागी नव्या संज्ञा घालावयाच्या ? एक स्वीकार्य आणि एक अस्वीकार्य अशा दोन संज्ञांची उदाहरणे येथे उपयुक्त ठरतील. margin ही संज्ञा अर्थशास्त्रात मध्यवर्ती शेतीतील लागवडीच्या सीमेवरील जमिनीस रिकार्डोने ती प्रथम लावली. पुढे उपयोगितेची संकल्पना अर्थशास्त्रात महत्त्व पावली व त्या संदर्भात उपभोग्य वस्तूच्या सेवनात शेवटी सेवन केलेल्या एककामुळे जी भर एकंदर उपयोगितेत पडते, तिचे वर्णन final utility असे जेव्हन्सने केले. तिलाच मार्शल व त्याचे समकालीन अर्थशास्त्रज्ञ यांनी margin अशी संज्ञा वापरली व तीच सर्वत्र प्रचारात आली. तीच आजही वापरात आहे. margin म्हणजे सीमा व त्यावरून marginal म्हणजे सीमान्त अशी संज्ञा मराठीत तयार झाली व वापरात आली. मूळ कल्पना विकलन गणितातील. या गणिताप्रमाणे विकलक (differential) हा limit शी एकरूप असल्यामुळे limit याचे सीमा अगर अन्त हे भाषांतर बरोबर आहे. तथापि हे दोन्ही शब्द एकत्र केले तर सीमान्त या षष्ठीतत्पुरुष समासाचा अर्थ end of the margin म्हणजे ' सीमेचा अन्त ' असा होईल. हा अर्थ marginal या संज्ञेचा नाही. तेव्हा ही संज्ञा अन्वर्थक आहे की नाही ? षष्ठी-तत्पुरुष समास म्हणून घेतली तर ही संज्ञा अन्वर्थक नाही, म्हणून रूढ पण त्याज्य समजावी लागेल. परंतु सीमान्त हा सामासिक शब्द नसून मराठीतील द्वित्त शब्दांप्रमाणे आहे असे मानले तर हा आक्षेप टिकत नाही. मराठीत ' पिवळा-जर्द ', ' तांबडा-लाल ', ' हिरवा-गार ' असे द्वित्त शब्द आहेत. त्यातील दोन्ही शब्दांचा अर्थ एकच; एक मराठीत व दुसरा फारसी. द्वित्त शब्दांचा उपयोग विशिष्ट गुणांचा प्रकर्ष सूचित करण्यासाठी आहे. सीमान्त या शब्दातही सीमा व अन्त या दोन समानार्थी शब्दांचा जोड आहे व तो अर्थावर जोर देण्यासाठी आहे असे मानले तर तो शब्द अन्वर्थक ठरतो. तो मराठीतील अर्थशास्त्रीय लिखाणात रूढ आहे हे लक्षात घेऊन व त्याचे अन्वर्थकत्व थोड्या निराळ्या प्रकारे सिद्ध करता येते म्हणून अर्थशास्त्र समितीने तो स्वीकारला आहे.

परंतु efficiency या इंग्रजी संज्ञेसाठी आपल्याकडे रूढ झालेली ' कार्यक्षमता ' ही संज्ञा अन्वर्थक तर नाहीच उलट घोटाळे उत्पन्न करणारी आहे असे आढळले व म्हणून ती त्याज्य ठरवावी लागली. efficiency या संज्ञेत वेबस्टर कोशाप्रमाणे तीन गोष्टी एकत्र अभिप्रेत आहेत. (१) विशिष्ट काम करण्याची क्षमता (२) ते काम करण्याचे कौशल्य (३) ते काम दक्षतेने करणे. ' कार्यक्षमता ' या संज्ञेने यापैकी एकच अर्थ आकळिला जातो. दुसऱ्या दोन्ही अर्थांची त्यात सूचनासुद्धा नाही. शिवाय अर्थशास्त्रात उत्पादनक्षमता (production capacity) आणि तिची efficiency असे पुष्कळ वेळा वर्णन व विवेचन करावे लागते. ते मराठीतील रूढ संज्ञेच्या स्वरूपात आणल्यास ' उत्पादन क्षमतेची कार्यक्षमता ' असा प्रयोग होतो व तो अर्थवाही न होता उलटा अर्थाचा गोंधळ करणारा होतो. म्हणून ' कार्यक्षमता ' हा पर्याय समितीने त्याज्य ठरविला. त्या जागी वर दिलेले तीनही गुण सामावणारी ' दक्षता ' ही संज्ञा स्वीकारली. ' दक्षता ' या संज्ञेने वर दिल्यापैकी एकाच गुणाचा बोध होतो असे वाटेल. परंतु संस्कृतात दक्ष या शब्दाचे skillful, capacity, attentive असे तीन निरनिराळे अर्थ आहेत व ते तिन्ही त्या संज्ञेत समाविष्ट झालेले आहेत. हे सर्व लक्षात घेता efficiency ला ' कार्यदक्षता ' हाच पर्याय योग्य आहे असे समितीला वाटले. हा पर्याय रघुवीरांनी सुचविलेला आहे. समितीने efficiency ला ' कार्यक्षमता ' ही रूढ संज्ञा त्याज्य ठरविली व ' कार्यदक्षता ' ही नवी संज्ञा मुक्रर केली.

आणखी काही संकीर्ण प्रश्नांचा उल्लेख करून ही चर्चा आवरती घेतो. चांगले पण जुने मराठी शब्द पुष्कळ वेळा परिभाषा करणाऱ्यांच्या नजरेतून सुटतात व त्याऐवजी जड असे संस्कृतोद्भव शब्द सुचविले जातात. अशा वेळी मराठी शब्दाला त्याचे स्थान पुन्हा दिले पाहिजे. उदाहरणार्थ spillway (धरणातील जादा पाणी वाहून जाण्यासाठी काढून दिलेला पाट) या शब्दाला शासन व्यवहारकोशाने ' उत्प्लव मार्ग ' हा पर्याय दिला आहे. तथापि आपल्याकडचा जुना शब्द 'सांडवा' जास्त अर्थवाही व परिचयाचा आहे. समितीने ' उत्प्लव मार्ग ' हा पर्याय त्याज्य ठरवून ' सांडवा ' हा नवा पर्याय स्वीकारला आहे.

पुष्कळ वेळा सोपे, सुटसुटीत असे संस्कृत शब्द परिभाषेत चपखल बसतात. उदाहरणार्थ exchange या शब्दाला विनिमय हा पर्याय मराठीत आहे. त्यांवरून barter म्हणजे वस्तुविनिमय अशी संज्ञा तयार झाली आहे. परंतु विनिमयातला 'वि' काढून टाकला तर उरणारा ' निमय ' या शब्दाचा मूळ अर्थ barter असाच आहे व तो त्या अर्थाने जुन्या संस्कृत वाङ्मयात वापरलेलाही आहे. म्हणून barter ला वस्तुविनिमय या पर्यायाच्या जोडीलाच ' निमय ' ही आणखी एक संज्ञा समितीने सुचविली आहे. आणि त्याच शब्दाच्या संदर्भात ' निमान '

म्हणजे ज्याने मोजावयाचे ते म [illegible] इंग्रजीतील numeraire या अर्थाचा शब्द आहे. [illegible]aire या इंग्रजी शब्दाला ‘गणक’ व ‘निमान’ असे [illegible]र्याय समितीने सुचविले आहेत.

काही संज्ञा या मुळा[illegible]च चित्ररम्य असतात. कारण त्या चित्ररम्य प्रतिमांच्या साह्याने प्रयुक्त होतात. अशा संज्ञांना मराठी पर्याय देताना ती मूळची प्रतिमा कायम ठेवावयाची की नाही असा प्रश्न उत्पन्न होतो. उदाहरणार्थ अर्थशास्त्रात अलीकडे spin-off या टुमदार शब्दाचा वापर फार वाढला आहे. त्याच्या मागची प्रतिमा फार उठावदार आहे. परंतु त्याचा साधा प्राकृत अर्थ a useful by-product एवढाच आहे. त्या शब्दाचा विचार करताना समितीने त्याच्या मागच्या प्रतिमेला गौण महत्त्व दिले व अर्थाला प्राधान्य देऊन ‘आनुषंगिक उत्पादन’ असा पर्याय त्यासाठी सुचविला आहे. परंतु अशा प्रकारे bandwaggon effect या संबंधी विचार करताना त्या संज्ञेमागची प्रतिमा अमेरिकी संदर्भात स्पष्ट असली तरी आपल्या संदर्भात नाही असे समितीला वाटले. त्या संज्ञेचा अर्थ सरळ असल्यामुळे त्यातील अमेरिकी प्रतिमेऐवजी देशी प्रतिमेचा आश्रय करून ‘गतानुगतिक परिणाम’ अशी संज्ञा समितीने स्वीकृत केली.

या उलट गेल्या ५।६ वर्षांत अर्थशास्त्रात नव्याने आलेला software हा शब्द घ्या. हा शब्द वेबस्टर कोशातही नव्या शब्दांच्या परिशिष्टात सापडतो. गेल्या १५।२० वर्षांत निर्माण झालेली अवकाशयाने, गणकयंत्रे, अग्निबाण, वगैरेच्या सिद्धीत आणि वापरात आलेल्या तंत्र व विज्ञान विकासातून ही कल्पना साकार झाली आहे. तिचे तीन अर्थ आहेत. (१) गणक-यंत्रात घालावयाची माहिती ज्या कागदाच्या पट्ट्यावर छिद्रित केली जाते किंवा कचकड्याच्या पट्टीवर प्रकाशलेखित केली जाते ती सामग्री. (२) अग्निबाणाचे वा अवकाशयानाचे इंधन (३) त्याच अनुषंगाने नव्या यंत्राची बनावट, उभारणी वगैरे संबंधीचे संकल्पन वगैरे. यांपैकी तिसरा अर्थ विशेषत्वाने व पहिला थोड्या दुरान्वयाने अर्थशास्त्रात येतो. पहिले दोन अर्थ ही सर्व यंत्रे, वगैरे कठीण धातूंची केलेली असतात व त्यात निविष्टी (आदान) म्हणून कागद, इंधन वगैरे त्यामानाने मृदू वस्तु असतात या चित्ररम्य संदर्भात हा शब्द तयार झाला आहे. तो अमेरिकी आहे हे सांगावयास नकोच. Hardware म्हणजे लोखंडी माल हा इंग्रजीतला अर्थ सरळ व रूढ आहे. त्याने वैधर्म्य म्हणून soft ही संज्ञा वापरण्यात आली आहे. इंग्रजीमध्येही हे अर्थ वापराने व साहचर्याने या प्रतिमेवरून सिद्ध झालेले आहेत. मूळच्या शब्दांच्या अर्थावरून नाही. मराठीतही यांच प्रतिमेच्या साहचर्याने ते येणार आहेत. म्हणून ती प्रतिमा कायम ठेवून त्याला देशी पर्याय ‘मृदू सामग्री’ असा समितीने स्वीकारला आहे.

या शब्दब्रह्मातून बाहेर पडून आता अर्थशास्त्राच्या ‘मायेत’ शिरले पाहिजे. ‘अर्थशास्त्राची माया’ ही शब्दावली मी बुद्ध्या वापरली आहे. कारण अर्थशास्त्रावर लिहिताना मराठी लेखकांनी कोणता दृष्टिकोन स्वीकारावा याची थोडी चर्चा मला करावयाची आहे व प्रचलित अर्थशास्त्राचे स्वरूप पुष्कळसे मायामय आहे, याकडे मला मराठी अभ्यासकांचे लक्ष वेधावयाचे आहे. या विषयात प्रवेश करण्यापूर्वी प्राथमिक म्हणून मराठीत परभाषेतील अर्थशास्त्रीय लिखाणाच्या भाषांतरासंबंधी काही विचार व्यक्त करतो. मराठीतील अर्थशास्त्रीय लिखाणाच्या वाढीत भाषांतराचा वाटा मोठा आहे व राहील याबद्दल दोन मते असण्याचे कारण नाही. तथापि कोणत्या प्रकारच्या 'पर' भाषीय आर्थिक लिखाणाचे भाषांतर होणे आवश्यक आहे याचा थोडा विचार करणे आवश्यक आहे. इंग्रजी पाठ्यपुस्तकांच्या मराठीतील भाषांतराची परंपरा जुनी आहे. किंबहुना मराठीतील अर्थशास्त्राचा अवतार इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर म्हणूनच झाला हे सर्वश्रुत आहे. ती परंपरा आजतागायत कमी जास्त अंशाने चालू आहे. अलीकडच्या पाठ्यपुस्तकांच्या पुरात तीच प्रवृत्ति बलवत्तर असल्याचा प्रत्यय येतो. तथापि माझी अशी कल्पना झाली आहे की, एकाच पाठ्यपुस्तकाचे भाषांतर करण्याची प्रवृत्ति कमी होत असून एकाहून अधिक पुस्तकांच्या निरनिराळ्या भागांची भाषांतरे एकत्र जोडून नवे मराठी पाठ्यपुस्तक निर्माण करण्याचा उपक्रम वाढीस लागला आहे. ‘एकाच पुस्तकावरून लिहिले म्हणजे ते वाङ्मयचौर्य होते परंतु एकाहून अधिक पुस्तकांच्या आधारे लिहिले म्हणजे त्याला संशोधन म्हणतात’ या चाटूक्तीच्या उपदेशानुसार हे होत आहे असे विनोदाने म्हणता येईल. परंतु वास्तवात तसे नसावे. मला वाटते की, सध्या सर्वच अर्थशास्त्र हे संक्रमणावस्थेत असल्यामुळे कोणत्याच परभाषी लेखकाचे पुस्तक सर्वच बाबतीत सारखेच समाधानकारक वाटत नाही. त्यामुळे एकाहून अधिक पुस्तकांच्या आधारे मराठीतील पाठ्यपुस्तके लिहिली जात असावीत. अशा असमाधानाच्या जाणिवेतून मराठी लेखक लिखाण करीत आहेत हे सुचिन्ह आहे असे मी समजतो. यापुढे जाऊन अनेक पुस्तकातील विवेचनांचा अभ्यास करून व तो पचवून आपल्या स्वतंत्र बुद्धीने त्या विश्लेषणाचा आविष्कार मराठीत करण्याच्या मार्गावरील हे मध्यंतर असेल अशी मला आशा वाटते. या मध्यंतरातून लवकर संक्रमित होऊन पुढे मार्गस्थ व्हावे असे आवाहन मी मराठी लेखकांना करतो.

प्रगतीची हीच पुढची पायरी आहे असे मी म्हणतो. याचे कारण अर्थशास्त्राच्या सध्याच्या संक्रमणावस्थेत सापडेल आज सर्वंकष व सर्वव्यापी असे अर्थशास्त्रावरील पाठ्यपुस्तक परभाषेतही उपलब्ध नाही. त्यामुळे त्याचे भाषांतर केले की झाले अशी आज परिस्थिति उरलेली नाही. आज अर्थशास्त्रातील निरनिराळ्या शाखा पूर्वीच्या मानाने कितीतरी वाढल्या आहेत. त्यापैकी कित्येकांनी आपला स्वतंत्र संसारही उभा केला आहे. अर्थशास्त्रीय शिक्षणाचा व पांडित्याचा ओघ विशिष्ट शाखांत प्रावीण्य मिळविण्याकडेच आहे. त्या दृष्टीने विचार करता यापुढे मराठीत भाषांतरित करावयाचे परभाषी लिखाण असे विशिष्ट व निवडकच असावे लागेल. एके काळी अर्थशास्त्रीय शिक्षण मराठीतून देण्यासाठी लागणारी पुस्तके सरसहा इंग्रजीवरून भाषांतर करून घ्यावीत असे मत प्रचलित होते व त्या दृष्टीने काही प्रयत्नही झाले होते. परंतु आज हे मत कोणाला फारसे मान्य होईल असे वाटत नाही.

जुन्या अर्थशास्त्रीय पुस्तकांच्या मराठी भाषांतराचा प्रश्न थोडा निराळा आहे. कृष्णशास्त्रींनी मिलच्या ग्रंथाचे भाषांतर केले तसेच कोणी मार्शल किंवा केन्स यांच्या ग्रंथाचे करावे अशी निकड मला जाणवत नाही. कोणी हौसेने केले तर मात्र त्याचे कौतुक करावयास हवे. उदाहरणार्थ श्री. वसंतराव तुळपुळे यांनी मार्क्सच्या 'कॅपिटल' च्या तिन्ही भागांचे पूर्ण भाषांतर मराठीत केले आहे व त्याचे दोन भाग प्रसिद्ध झाले असून तिसरा छापला जात आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे असे मला वाटते.

प्रचलित अर्थशास्त्राच्या मायामय स्वरूपाविषयी मी इतरत्र विस्तृतपणे लिहिले आहे. म्हणून त्याचा विस्तार न करता मुख्य मुद्द्यांचा उल्लेख करतो प्रचलित पश्चिमी—म्हणजेच नवसनातन अर्थशास्त्र स्थितिशील व कल्पित अर्थव्यवस्थांच्या प्रतिमानांवर बहुतांशी निगमनाने (गणिताने) उभारलेले आहे. हे प्रतिमानांचे जग वास्तवापासून पुष्कळ दूर आहे. आणि वास्तव जग हे पूर्णपणे मायास्वरूपी आहे असे मानल्याखेरीज या प्रतिमानांच्या कल्पित जगात आकार घेतलेल्या अर्थशास्त्रावर विश्वास ठेवणे कठीण आहे. म्हणून मी अर्थशास्त्राचा माया म्हणून उल्लेख केला आहे. प्रचलित अर्थशास्त्र हे अवास्तव आहे, एका जागतिक कालखंडाशी व एका प्रादेशिक समाजसमूहाशी निगडित आहे, सर्वकाळी व सर्वस्थळी लागू पडणाऱ्या नैसर्गिकशास्त्र सिद्धान्ताप्रमाणे नाही. विगमनाने व निगमनाने सिद्ध झालेले सिद्धान्तन त्यात अस्तित्वात नाही, त्याचा पुष्कळसा भाग निव्वळ बुद्धिविलासाच्या स्वरूपाचा आहे वगैरे गोष्टी आता बहुतेक सर्वमान्य झाल्या आहेत. प्रचलित अर्थशास्त्राच्या वैफल्याची भावना सर्वच बुद्धिवंतांत दृढ झालेली दिसते. परंतु प्रचलित अर्थशास्त्राची जागा घेईल असे अधिक समाधानकारक सिध्दान्तन अद्याप तरी अस्तित्वात आलेले नाही. एवढेच नव्हे तर क्षितिजावरही दिसत नाही. ही परिस्थिति लक्षात घेऊनच मराठीत अर्थशास्त्रावर लेखन करणे आवश्यक आहे. सध्याच्या मराठीतील अर्थशास्त्रीय लिखाणात या प्रचलित पश्चिमी अर्थशास्त्राचे प्रतिबिंब शाबूत उमटत असल्यामुळे त्या अर्थशास्त्राचे हे स्वरूप मराठी लेखकांनी सतत ध्यानात बाळगले पाहिजे. एवढेच नव्हे तर वाचकांनाही तशी स्पष्ट कल्पना येईल अशी खबरदारी घेतली पाहिजे.

याच संदर्भात स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची शास्त्रीयता व आवश्यकताही मराठी लेखकांनी विशेषत्वाने मनात बाळगली पाहिजे. विशेषत्वाने अशासाठी की स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची कल्पना व परंपरा रानडे, केतकर, गाडगीळ या पिढिजात मार्गाने मराठी लेखकांना वारसाहक्काने प्राप्त झालेली आहे तो वारसा पुढे चालवावयाचे कर्तव्य मराठी लेखकांचे आहे हे मान्य व्हावयास अडचण असू नये नुसती वडिलांची कीर्ति न सांगता ती वाढवण्याची आकांक्षा अर्थशास्त्रावर लिहिणारांनी बाळगणे आवश्यक आहे.

मराठीतील आतापर्यंतच्या अर्थशास्त्रीय लिखाणात टीकात्मक व चर्चात्मक वाङमयाचा अभाव फार जाणवतो याचा उल्लेख पूर्वीच केला आहे. त्यासाठी सातत्याने होणारे स्फुट लिखाण वाढले पाहिजे. परिषदेने सुरू केलेल्या 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाकडून या बाबतीत भरीव कामगिरी व्हावी अशी अपेक्षा आहे सर्वसामान्य अर्थशास्त्रावरील पाठ्यपुस्तकांचा जरी मराठीत सुकाळ झाला असला तरी त्या शास्त्राच्या निरनिराळ्या शाखांवरच केंद्रित असे लिखाण थोडेच झाले आहे. ते होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शास्त्रास व शास्त्रीय चर्चेस पायाभूत असे चिकित्सा शास्त्रातील प्रश्न व त्यांचे विवेचन यावर फारच थोडे लिखाण झाले आहे. अर्थशास्त्रीय गणितावर मराठीत चांगला ग्रंथ व्हावयास हवा आहे. या काही त्रुटी येथे नोंदण्याचे कारण येवढेच की या क्षेत्रातील आणखी किती जमीन लागवडीस आणावयाची राहिली आहे, याचे भान करून देणे हे आहे. परंतु जी जमीन लागवडीखाली आली आहे तिची उत्तम मशागत झाली आहे व तिची उपज गुणाने व राशीने समाधानकारक आहे असा त्याचा अर्थ नाही. तीही मेहनत अधिक जोमाने करावयास हवी याबद्दल दुमत होणार नाही. आणि हे सर्व साधण्यासाठी व जोपासण्यासाठीच या मराठी अर्थशास्त्र परिषदेचा अवतार आहे. म्हणून तिच्या पहिल्या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानावरून ज्ञानदेवांच्या शब्दात अशी शुभेच्छा व्यक्त करतो की या परिषदेच्या कार्याने, तिच्या नियतकालिकांच्या आणि प्रकाशनांच्या योगाने मराठी अर्थशास्त्राच्या क्षेत्रात

" विवेका वेलीची लावणी । हों दे सैंघ ॥
'संवाद'फल निधाने । प्रमेयाचि उद्याने ॥
लावी म्हणे गहने । निरंतर ॥
पाखांडाचे दरकुटे । मोडी वागवाद् अव्हांटे ॥
कुतर्काचि दुष्टे । सावजे दडवी ॥
मऱ्हाटियेचां नगरी । 'अर्थ' विद्येचा सुकाळु करी ॥
घेणे देणे सुखचि वेन्ही । जगा हों देई ॥

धन्यवाद !

# सहकार आणि ग्रामीण विकास

डॉ. रवींद्र रा. दोशी, अर्जुननगर

आमचा देश १९४७ मध्ये स्वतंत्र झाला आणि आमचे भवितव्य ठरविण्याची जबाबदारी आम्ही आमच्या शिरावर घेतली. स्वातंत्र्याचे दान हातात पडले होते खरे, परंतु आमची झोळी होती जीर्ण, जुनी पुराणी. राज्यकारभाराचा अनुभव थोड्या दिवसांचाच आणि अर्थकारण सुलभतेने करण्याइतकी अर्थव्यवस्था भक्कम नव्हती. स्वातंत्र्यावरोबरच फाळणी झाल्यामुळे राजकीय आणि सामाजिक समस्यांबरोबरच आर्थिक परिस्थितीही अधिक भयावह बनली.

तसे पाहिले तर स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर सुस्थिर अर्थव्यवस्था मिळण्याच्या बाबतीत आपण दुर्दैवी होतो. ब्रिटिशांच्या कारकिर्दीत भारताची प्रगति भरीवपणे घडून यावी अशा तऱ्हेचे कोणतेही प्रयत्न सरकारकडून झाले नव्हते. देश औद्योगिकदृष्ट्या अप्रगत आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेला होता. काही किरकोळ प्रयत्नांमुळे भारताची संपत्ति वाढत होती. परंतु तिचा ओघ होता इंग्लंडकडे. आमच्याकडे जे काही मोजकेच मोठे धंदे होते त्यांना इंग्लंडच्या स्पर्धेला तोंड देणे कठीण झाले.

**ग्रामीण विभागात दीर्घकाल अस्तित्वात असलेले लघु-उद्योग आणि कुटिरोद्योग गुदमरून नाहीसे झाले. यामुळे भारताच्या ग्रामीण जीवनाचा कणाच मोडला आणि भावी प्रगतीला मोठी खीळ बसली.**

वस्तुतः आपला देश हा खेड्यांचा. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात शहरी विभागाचा विकासच जर दुर्लक्षिलेला होता तर ग्रामीण भागाचा विकास उपक्षिलेला राहणे साहजिकच आहे असे म्हणावे लागेल. शेती हा लोकांचा जीवनाधार आणि राष्ट्रीय संपत्तीचा गाभा. त्याकडे दुर्लक्ष होणे म्हणजे राष्ट्राची दुर्दशा करण्यासारखेच. घडले ते असेच. पूर्वापार परंपरेनुसार शेतकरी शेती करीत होता आणि सावकाराच्या कर्जाखाली दर वर्षी वाकून जात होता. घरगुती उद्योगधंद्यांना वाव राहिला नसल्याने पूरक उत्पन्नाचा मार्गही नाहीसा झाला. तशातच अवर्षण किंवा अतिवर्षाव यामुळे परिस्थित अधिक विकट व्हावयाची. त्या सर्वांतून बचाव झालाच तर शेतमालाच्या अवाजवी किंमतींना तोंड द्यावे लागत होते. ह्या पार्श्वभूमीवर अडीअडचणींमध्ये हात देणारा खेड्यातील सावकार त्यांना देवासारखा वाटायचा! आर्थिक अडचण निभावण्यासाठी घरदार आणि जमिनीचा तुकडा त्याच्या पदरात घालायची कायमची तयारी असायची. त्यांची सहकारी संस्था कर्ज देण्यासाठी उभ्या होत्या. परंतु त्यांनी अजून आपला पगडा ग्रामीण भागावर बसवलेला नव्हता. सहकारी चळवळ जोमाने वाढीला लागून ग्रामीण विभागाचा एक अविभाज्य घटक बनण्यासाठी काही दशकांचा कालावधि लोटणे आवश्यक होते. ह्या सर्व परिस्थितीचा संकलित परिणाम म्हणजे शेती उत्पादनाची वाढ मुंगीच्या पावलाने चाललेली होती आणि ग्रामीण जीवन डबक्यातील पाण्याप्रमाणे बनले होते. देशाची आर्थिक प्रगति अतिशय मंद, वेडीवाकडी आणि एकांगी होत होती. सुसूत्रता अभावाने तळपत होती. स्वातंत्र्याने वारसा आणला तो ह्या अर्थव्यवस्थेचा!!

स्वातंत्र्याच्या आनंदाने आम्ही बेहोष होऊन गेलो. परंतु लवकरच आम्हाला खऱ्या परिस्थितीची जाणीव झाली आणि आम्ही भानावर आलो. निर्वासितांचा प्रचंड लोंढा येत होता. त्यांची सोय लावायची होती. अन्नधान्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी उपाययोजना करावयाची होती. युद्धामुळे विस्कळित झालेली आर्थिक घडी नीट बसवावयाची होती. दारिद्र्याची श्रीमंती कमी करावयाची होती; एक ना दोन, अनेक समस्या आ वासून उभ्या होत्या. सर्वांचीच निकड होती. परिस्थितीची नीट कल्पना आली. उत्पादन सर्व क्षेत्रांतच वाढवावयाला हवे होते. त्याचे योग्य विभाजन करण्याची यंत्रणा हवी होती, ग्रामीण भागात चैतन्य निर्माण व्हायला पाहिजे

होते. थोडक्यात, जलद गतीने विकास पावणारी व औद्योगिक-दृष्ट्या प्रगमनशील असणारी अर्थव्यवस्था निर्माण करावयाची होती. कार्याची दिशा ठरली. त्या पाठोपाठ मार्गही ठरविला. लोकशाहीच्या चौकटीत राहून पूर्वीच्या परंपराप्रिय समाजाला प्रगमनशील करावयाचे. आर्थिक, सामाजिक, राजकीय समतेच्या आधारावर लोककल्याण साधावयाचे. यातूनच निर्माण झाले लोकशाही नियोजन.

नियोजनाची तयारी होत असतानाच मनाशी एक खूणगाठ पक्की केली. नियोजन म्हणजे केवळ शेती अगर उद्योगधंदे यांची वाढ नव्हे. या सर्वांशी संबंधित असणारा मानव हा खरा केंद्रबिंदु आहे. त्याचा विकास साधावयाचा आहे आम्हाला. भारतातील प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विकासाची संधि प्राप्त करून द्यायला हवी. अमाप पैसा प्रत्येक प्रकल्पावर खर्च केला म्हणजे हे साध्य होते असे नाही. प्रत्येक व्यक्तीच्या सुधारणेसाठी प्रयत्न करायला पाहिजे. ते शक्य व्हायचे असेल तर योजना ही व्यक्तीपासून कार्यान्वित झाली पाहिजे. प्रत्येक व्यक्ति ही कार्यरत झाली पाहिजे, सहभागी झाली पाहिजे. देशाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिसदृश परिवर्तन घडावयाचे झाले तर सर्वत्र सहकार्याची जाणीव निर्माण करून, जनतेला प्रत्यक्ष सहभागी होण्याची संधि निर्माण व्हायला हवी. या दृष्टीनेच भारताच्या विकासात सहकारी चळवळीला एक महत्त्वाचे स्थान आहे.

सहकारी चळवळीचा उगम दारिद्र्य आणि आर्थिक दुरवस्था यांत सापडतो असा इतिहासाचा दाखला आहे. सावकारी पाशातून सामान्य माणसाला मुक्त करण्यासाठी सहकारी बँका स्थापन झाल्या, आणि अवास्तव नफेबाजीला आळा घालण्यासाठी सहकारी भांडारांचा जन्म झाला. याचा अर्थ मात्र असा नव्हे की खालच्या थरातील लोकांनीच सहकाराची कास धरावी आणि इतरांनी त्याचा विचारही करू नये. सहकाराची कल्पना सर्वसमावेशक आहे. लोकशाही तत्त्वाच्या आधारावर स्वेच्छेने उभारलेली ती संघटना आहे. सर्वांच्या प्रयत्नाने सर्वांचा विकास साधण्याचा त्यामागे उद्देश आहे. गरिबाबरोबर श्रीमंतही एकत्रित येऊ शकतो; ग्रामीण भागातील माणसाबरोबर शहरी माणूसही हात मिळवणी करू शकतो. सहकाराला लोकशाही तत्त्वनिष्ठेची बैठक आहे. आपल्या देशाच्या प्रगतीसाठी तर हे अगदीच पोषक आहे. कारण, लोकशाही जीवननिष्ठा ही आपल्या समाजाची धारणा आहे. सहकाराची कास धरल्यामुळेच ग्रामीण भागात चैतन्य निर्माण होईल, विकासातील एकांगीपणा कमी व्हायला लागेल, आणि लोकशाही नियोजनाला गति मिळेल.

आपल्या देशातील सहकारी चळवळ तसे पाहू गेल्यास अनेक पावसाळे पाहिलेली आहे. १९०४ मध्ये जन्म झाला, मात्र १९१२ पासून खऱ्या अर्थाने तिला बाळसे धरायला लागले. शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा कमी करण्याचा मर्यादित उद्देश होता सुरुवातीला. त्यामुळे दीर्घकाळपर्यंत सहकारी संस्था पतपुरवठ्याच्या कार्यातच मग्न होत्या. संस्थांची आर्थिक कुवतच इतकी कमी होती की, ईप्सित साध्य करण्यात त्या असमर्थ ठरल्या. सहकारी चळवळीने अंग धरायला सुरुवात केली ती दुसऱ्या महायुद्धानंतरच. पतपुरवठ्यात वाढ व्हावयास लागली, इतर सेवा पुरविण्याचा प्रयत्न सुरू झाला, आणि उत्पादन व खरेदी-विक्रीच्या व्यवहारात पदार्पण झाले.

सहकारी चळवळ जोमाने वाढीला लागली ती दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून. चळवळीच्या अर्धशतकाचे सिंहावलोकन करून विचारवंतांनी स्पष्ट कबुली दिली की, सहकाराने अद्यापपर्यंत फारसे काही साधले नाही; परंतु यापुढे मात्र सहकाराने नेत्रदीपक कार्य केलेच पाहिजे. सरकार हे त्यामुळे पाठीशी उभे ठाकले. सहकाराची विविध रूपे दिसायला लागली. पंचवार्षिक योजनांच्या मसुद्यातून आम्ही जाहीर केले की, सहकारी चळवळच ग्रामीण भारताला ऊर्जितावस्था प्राप्त करून देईल. परिणामी सहकारी बँका शेतकऱ्याला अधिक कर्ज द्यायला लागल्या. सहकारी शेतीचा प्रयत्न जोमाने सुरू झाला. विविध प्रकारच्या सेवा पुरविणाऱ्या संस्था दिसायला लागल्या. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा रास्त भावात करण्यासाठी खेड्यापाड्यातून सहकार उभा राहिला. हे सारे खेड्यांपुरतेच मर्यादित नव्हते. शहरवासियांनी तर सहकाराचा अवलंब उत्साहाने केला. ग्राहक भांडारांचे जाळेच त्यांनी उभे केले. सहकारी तत्त्वावर आणि सरकारी आशीर्वादाने उघडलेले 'अपना बाजार' हे प्रत्येक मोठ्या शहराचे एक आकर्षणच शहरातील उच्चभ्रू लोकांना झाले. शहरवस्तीतील मजूरवर्ग देखील 'स्टोअर'मधून मालाची खरेदी करायला लागलेला दिसतो, तर खेड्याखेड्यातून अशिक्षित माणूस देखील 'सोसायटी'ची भाषा करायला लागला आहे. घरबांधणीच्या क्षेत्रात शहरी भागात सर्वजण सहकाराने पछाडलेले दिसतात. माल वाहतुकीचे धंदेही अनेक ठिकाणी सहकाराच्या चाकावरच पळताना दिसतात एकंदरीत, सहकाराने शहरी व ग्रामीण जनतेला कार्यरत बनविले आहे असे दिसते.

एवढी प्रगति झाली असली तरी ग्रामीण भागाचा कायापालट झाला आहे असे मात्र म्हणता येत नाही. त्यासाठी अद्याप फार मजल मारली पाहिजे आणि फलदायी प्रयत्न निष्ठेने केले पाहिजेत. सहकारी चळवळीच्या फलिताचा कुणी

कितीही उच्चरवाने आवाज उठविला तरी सत्य लपविता येणार नाही. चार योजना संपून आता पाचवीही संपत आली, मोठ्या प्रमाणात पैसा खर्च केला, सहकारी संस्थांचे जाळे विणले, तरीही त्या संस्था ग्रामीण जनतेला सर्वस्वी व्यापू शकलेल्या नाहीत ही वस्तुस्थिति आहे. योजनाकाळात सहकाराने प्रगति केली हे खरे असले तरी ग्रामीण भागाच्या अपेक्षा आणि गरजाही इतक्या मोठ्या प्रमाणात वाढल्या की सहकाराचे प्रयत्न थिटे पडले आहेत. एवढेच नव्हे तर सहकाराने फक्त काही राज्यांतच स्थान मिळविले. आसाम, राजस्थान, प. बंगाल, ओरिसा, बिहार आणि जम्मू व काश्मीर या राज्यांतून सहकारच्या प्रयत्नाला फक्त बीजांकुर फुटलेला दिसतो, आणि पुढील वाढ खुंटलेलीच दिसते.

म्हणजे सहकार हा सर्व भारतीय जनतेच्या जीवनाचा स्थायीभाव बनला आहे असे म्हणता येत नाही. ही एक मोठीच उणीव राहून गेलेली आहे.

सहकाराला खरे कार्य करावयाचे आहे ते ग्रामीण भागाच्या विकासाचे. शेती हा तर ग्रामीण जीवनाचा–नव्हे, भारतीय जीवनाचाच–आधार आहे. खेड्यातला मनुष्य अजूनही शेतीकडे पोट भरण्याचे साधन म्हणूनच पाहतो आहे. शेती हा एक धंदा हा विचार बनण्याइतके परिवर्तन अद्याप झालेले नाही–हे झाले पाहिजे. शेतीचे उत्पादन आणि जमिनीची उत्पादकता वाढविणे ही भारताची प्राथमिक गरज आहे. देश आत्मनिर्भर व्हावयाचा असेल, नियोजनाच्या कार्यक्रमातून संपन्नता निर्माण करावयाची असेल, आणि वाढत्या लोकसंख्येच्या गंभीर समस्येला तोंड द्यावयाचे असेल तर शेतीच्या उत्पादनाची अवहेलना करून चालणार नाही, असे चार योजना पूर्ण झाल्यानंतरही म्हणावे लागते. शेती उत्पादनाशी संबंधित प्रश्न आपण कशा रीतीने सोडवितो यावरच आपल्या नियोजनाचे आणि लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे हे विसरता येणार नाही.

शेतीच्या क्षेत्रातील सहकाराचा अनुभव खूपच बोलका आहे. पतपुरवठ्यात बरीच वाढ झाली. अल्प मुदतीची आणि दीर्घ मुदतीची कर्ज सहकारी बँकांनी दिली खरी. परंतु हा सर्व पैसा पूर्णपणे उद्दिष्टपूर्तीसाठी वापरला गेला असे मात्र नव्हे. ह्या पतपुरवठ्याचा लाभ बव्हंशी सधन शेतकऱ्यानेच घेतला. ज्या सामान्य शेतकऱ्याला कर्ज मिळाले त्याने त्यातले थोडेसे शेतीसाठी वापरले. घरखर्चाच्या अडचणी निभावत असतानाच ह्या पैशाचा उपयोग त्याने धर्मकृत्ये आणि विवाहादी समारंभासाठी केला. शेती उत्पादनात सुधारणा घडून आलीच नाही; परंतु त्याचबरोबर कर्जाची परतफेड करण्यातही दिरंगाई होऊ लागली. सहकारी संस्थांची थकबाकी वाढली. मुळातच मर्यादित पैसा, त्यात वाढती थकबाकी. असलेला पैसा खेळता राहिला असता तरीही मोठे काम होऊ शकले असते.

शेतकऱ्यांची खरी गरज पैशाची नसून शेती उत्पादनासाठी लागणाऱ्या साधनांची आहे. बी-बीयाणांचा पुरवठा अद्यापही सुसूत्रपणे होत नाही, रासायनिक खते वेळेवर मिळत नाहीत, पीक पाणी बव्हंशी वरुणराजाच्या कृपाप्रसादावरच अवलंबून आहे. शेतमालाची विक्री स्वतःच्याच जबाबदारीवर करावी लागत आहे. शेतमालाचा साठा करण्यासाठी गुदामांची सोय झालेली नाही, शेतीची साधीसुधी साधनेही स्वतःच्या मालकीची नाहीत, शेतीचा आकार लहानच राहिलेला आहे, पाणीपुरवठ्याच्या सोयी तोकड्या पडतात, आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा वाजवी किंमतीत व वेळेवर होत नाही.

वरीलपैकी काही महत्वाच्या गरजा पुरविण्यासाठी सहकारी संस्था खेड्याखेड्यातून निर्माण झाल्या. परंतु आर्थिक कुवत तोकडी पडत असल्याने कार्यक्षेत्र मर्यादित राहिले आणि थोड्यांनाच थोडाफार फायदा उठविता आला. हे सर्व देखील केवळ मोठ्या खेड्यामधून शक्य झाले आहे. लहान खेडी सहकारापासून चार हात दूरच राहिलेली दिसतात. वास्तविक सहकारी संस्थांनी कार्यक्रमाच्या बाबतीत जो उत्साह दाखविला तो आपली शक्ति वाढविण्यात दाखविला नाही. खेड्याखेड्यातून विखुरलेल्या लहान लहान बचती गोळा करण्याकडे त्यांनी लक्षच दिले नाही. आर्थिक साहाय्यासाठी प्रामुख्याने सरकारी यंत्रणेवरच अवलंबून राहण्याची वृत्ति दिसते. सरकारने धोरणात सुसंगती राखली नाही. पहिल्या उत्साहाच्या भरात मुसंडी मारली. आणि पुढे एकदम धीमेपणाने घाई करण्याचे ठरविले. सहकारी संस्थांचा आकार व प्रकार यांबाबतही निर्णय लवकर होऊ शकला नाही. विशिष्ट कार्यकारी की विविध कार्यकारी संस्था असा संभ्रम निर्माण झाला. सहकारी शेतीचा प्रयोगही जमेनासा झाला. म्हणजे सहकार स्वावलंबीही होऊ शकला नाही, आणि गरजू शेतकऱ्यापर्यंतही पोचू शकलेला नाही.

# बेरोजगारी, गरिबी व गांधीमार्ग

प्रा. अ. कृ. पोफळे
आर्टस् व कॉमर्स कॉलेज, लासलगाव

बेरोजगारी व गरिबी ह्या शत्रूंशी गेली २६ वर्षं 'दोन हात' करूनही त्यांचा निःपात होण्याऐवजी ते अधिकच उग्र स्वरूप धारण करीत आहेत. वाढती महागाई, तुटपुंजे उत्पन्न यांची सांगड घालताना सामान्य माणूस आता मेटाकुटीस आलेला आहे. जीवनातील आल्हाद उपभोगण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंचे भाव सुयोग्य पातळीवर आणून ते 'स्थिर' ठेवणे व त्याचबरोबरीने सामान्य माणसाची क्रयशक्ति वाढविण्यासाठी त्याला वर्षभर पुरेल असे उत्पादक काम देणे आवश्यक होऊन बसलेले आहे.

'रुपयाची वरचेवर विघडणारी प्रकृति', बेरोजगारी वाढती लोकसंख्या, घटते जीवनमान यातून सामान्य माणसाची दोन वेळेची रोटीही महाग झाली.

जागतिक बँकेचे अध्यक्ष श्री. मॅकनामारा यांच्या म्हणण्याप्रमाणे जगातील दारिद्र्य हे प्रामुख्याने आशिया खंडात केंद्रित झाले असून भारत, बांगला देश, पाकिस्तान, इंडोनेशिया इ. राष्ट्रात ते प्रकर्षाने जाणवते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महागाई, बेरोजगारी, दारिद्र्य याबद्दल काही विचारवंत ब्रिटिश सत्तेला जबाबदार मानीत. एक सरकार दुसऱ्या सरकारला याबद्दल दोष देण्याचा प्रयत्न करीत असते. परंतु यामुळे मूळ प्रश्न सुटणार नाही. या सर्व समस्या एकमेकांशी निगडित अशा आहेत. त्यामुळे अशा सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार करणे क्रमप्राप्त झाले आहे.

## नियोजनाने काय साधले ?

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५१ पासून भारतात नियोजन पर्व सुरू झाले. नियोजनास २६ वर्षे पूर्ण होऊनही अशा मुलभूत समस्यांचा विचार करावा लागतो याचाच अर्थ आपल्या नियोजनात काही उणीवा राहिलेल्या आहेत. नियोजनाच्या डावपेचात बदल करणे अनिवार्य ठरलेले आहे.

पहिल्या योजनाकाळात आचार्य कृपलानी यांनी लोकसभेत पुढील उद्‌गार काढले होते, "दारिद्र्य आणि बेकारी हे बिकट प्रश्न सोडविण्याची क्षमता आमच्या नियोजनात नसल्याने पंचवार्षिक योजना यशस्वी होणार नाहीत."

भारतातील ग्रामीण विकासाबाबत "एशियन इन्स्टिट्यूट ऑफ रूरल डेव्हलपमेंट" या संस्थेने नुकतेच एक सर्वक्षण केलेले आहे. त्यांच्या अहवालानुसार भारतातील अजूनही सुमारे ५० टक्के लोक अत्यंत दारिद्र्यावस्थेत जीवन व्यतीत करीत आहेत. एकूण लोकसंख्येपैकी सुमारे २४० दशलक्ष लोक आपल्या चरितार्थासाठी दिवसाकाठी एक रुपयाही खर्च करू शकत नाहीत. असेही सर्वेक्षणात आढळून आलेले आहे.

औद्योगीकरण, नियोजनावर होणारा अफाट खर्च, प्रगत देशांचे साहाय्य घेऊनही गरीब लोकांचा जीवनमानाचा रथ पुढे सरकू शकलेला नाही. नियोजनातील चुकीचे अग्रक्रम, सुसूत्रीकरणाचा अभाव व 'वरून लादलेले' नियोजन यामुळे भारताच्या ग्रामीण विकासास गति मिळाली नाही. "नियोजनाचे पाव शतक ओलांडूनही भारतीय अर्थव्यवस्थेने 'तारुण्यात पदार्पण' केलेले नाही."

## स्वयंपूर्ण खेडे : गांधीजींचे एक स्वप्न

भारतीय नियोजन भारतापुढील आर्थिक प्रश्न सोडवू शकले नाही याचे प्रमुख कारण म्हणजे शेती आघाडीवर आलेले अपयश होय. भारतात जोपर्यंत शेतीचा पूर्ण विकास होत नाही तोपर्यंत आर्थिक विकासाचे प्रयत्न परिणामकारक ठरणार नाहीत. पहिल्या योजनेने शेतीक्षेत्रात बरीच प्रगति साधली. अन्नधान्य व इतर शेतीमाल ह्यांचे उत्पादन वाढले. किंमतमानास स्थैर्य आले. परंतु दुसऱ्या योजनेत अधिक भांडवल लागणाऱ्या उद्योगधंद्यांवर भर देण्यात आला. परिणामतः शेती उत्पादनवाढ अपेक्षेप्रमाणे झाली नाही. तसेच जीवनावश्यक वस्तूंची निर्मिति, खाद्य पदार्थांची टंचाई तीव्रतेने जाणवून या वर्षापासून सातत्याने भाव वाढतच गेले. त्यावर अजून प्रभावी नियंत्रण ठेवता आलेले नाही. घटते उत्पादन व उत्पन्न, वाढता अप्रत्यक्ष कराचा बोजा यामुळे सामान्य जनतेची पिळवणूक झाली. बेकारांची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेली. धडधाकट व्यक्तीस आज वर्षभर पुरेल इतके उत्पादक काम अर्थव्यवस्थेत उपलब्ध होत नाही. इतर क्षेत्रांत रोजगारसंधि उपलब्ध न झाल्याने शेतीवर ताण पडून छुप्या बेरोजगारीचे प्रमाण वाढले

परिणामतः मजुरीच्या दरावरही त्याचा विपरीत परिणाम झाला. शिवाय भारतीय शेतीचा अजून पूर्ण विकास साधलेला नाही. अशा विपरीत परिस्थितीत तुटपुंजे का होईना पण नियमित उत्पन्न मिळविणारा वर्ग कसाबसा तग धरून आहे. उत्पादक व व्यापारीवर्गाचे वाढत्या किंमतीमुळे फारसे नुकसान झाले नाही. परंतु स्वतःचे धडधाकट हातपाय हेच भांडवल असणारा अल्पभूधारक अगर भूमिहीन शेतमजुराची पूर्णपणे अवहेलना झाली. अत्यल्प मजुरी व कामाचा अभाव यामुळे बहुसंख्य वर्गाचे जीवनमान सातत्याने घसरत गेले. लोकांची क्रयशक्ति नष्ट होऊन बाजारातील वस्तूंची मागणीच संपुष्टात आली. अशा दुष्टचक्राचा भेद 'स्वयंपूर्ण खेडे' या म. गांधीजींच्या मूलमंत्रानेच होऊ शकतो. जोपर्यंत शेतीचा पाया भक्कम होत नाही तोपर्यंत इतर क्षेत्रांतील प्रगति ही परिणामकारक ठरू शकणार नाही. प्रत्येक खेडे आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण व्हावे ही गांधीजींची इच्छा होती. त्याशिवाय प्रश्नांची उकल होऊ शकणार नाही. अर्थतज्ज्ञांनी, विचारवंतांनी व योजनाकारांनी ग्रामीण विकासाबाबत तटस्थ राहून चालणार नाही. 'भारत हा खेड्यात राहतो', हे म. गांधींचे विचार अगदी सार्थ व अर्थपूर्ण आहेत.

यासाठी शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सुटावयास हवेत. अन्नधान्याचे भाव वाजवी पातळीपेक्षा कमी आल्यास शेतकऱ्यांचेच नुकसान होईल. योग्य किंमतीत ग्राहकांना अन्नधान्य, भाजीपाला यांचा पुरवठा व शेतकऱ्यांना उत्पादनखर्चाच्या संदर्भात मिळणारी किंमत यांचा मेळ घालूनच भाववाढीचा प्रश्न सोडविता येईल. बी-बियाणे, खते, कीटकनाशके इ. योग्य किंमतीलाच बाजारात उपलब्ध होतील याकडे कटाक्षाने लक्ष ठेवणे अगत्याचे आहे. ग्रामीण भागात उत्पादक कार्ये हाती घेणे ही आजच्या परिस्थितीची निवड आहे. यासाठी खेड्यांमध्ये भू-संधारण, पाणी पुरवठ्याच्या सोयी, खेड्यातील रस्तेसुधारणा, शेतकऱ्यांना आवश्यक सेवांची उपलब्धता अशी उत्पादक कामे हाती घेतली तर रोजगार उत्पन्न व उत्पादनात वाढ होईल.

शेतीबरोबरच ग्रामोउद्योगास फारच महत्त्वाचे स्थान द्यावे लागते. श्रमप्रधान भारतात या उद्योगाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. कारण या उद्योगामुळे रोजगारात मोठ्या प्रमाणात वाढ होईल. लोकांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्याची जबाबदारी या उद्योगावर सोपविली पाहिजे. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंची निर्मिति वाढून भाववाढीवर नियंत्रण ठेवता येईल. शिवाय शेतीवरील अतिरिक्त ताण कमी होऊन शेती उत्पादनही वाढू शकेल. दुग्धव्यवसाय, पावनिर्मिति, विविध खाद्यपेये, मधुमक्षिका पालन, कुक्कुट पालन, हातकागद, काड्यांच्या पेट्या, साबणनिर्मिती, तेलबाण्या इ. अनेक लहान परंतु अत्यंत महत्त्वाचे व्यवसाय हाती घेऊन ते आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी केल्यास अर्थव्यवस्थेस बळकटी येईल. या उद्योगास लागणारे तंत्रज्ञान व कामगारांचा पुरवठा सहजगत्या होईल व मागणी व पुरवठ्याचा समतोल साधता येईल. शिवाय अशा व्यवसायांच्या बाबतीत व्यवस्थापन खर्च, वाहतूक खर्च स्पर्धा असणार नाही व त्यामुळे प्रादेशिक समता होऊ वस्तूंचे समानवाटप होईल.

## भारत गरीब नाही

प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ लेविस याने स्पष्ट केले आहे की, "जर इच्छा असेल तर राष्ट्रीय उत्पन्नाच्या १२ टक्के बचत करणे कोणत्याही गरीब राष्ट्राला शक्य होते." भारत पूर्वी गरीब नव्हता. आपल्या उद्योगधंद्यांमुळे भारताची कीर्ति जगात पसरलेली होती. भारताजवळ साधनसामग्रीची विपुलता व वैचित्र्य पण आहे. परंतु कमतरता आहे ती योजकतेची, कल्पनेची, परिश्रमांची व राष्ट्रप्रेमाची. उपलब्ध साधनसामग्री प्रभावीपण उपयोगात आणून उत्पादनवाढीकडे व उत्पादनातंत्रात सुधारणा करण्याकडे प्रत्येकाचे लक्ष केंद्रित झाले पाहिजे. अजूनही शेतीसारख्या प्राथमिक व्यवसायाची प्रगति साधू शकली नाही ही वस्तुस्थिति नाकारून चालणार नाही. वरुणराजाची कृपा झाल्यास व हंगाम उत्तम येणार अशी चाहूल लागताच साठबाजी व नफेखोरी कमी होऊन भाव खाली येतात. ह्या परिस्थितीत बदल व्हावयास पाहिजे नियोजनाची पंचवीस वर्षे पूर्ण होऊनही शेतीप्रधान राष्ट्राची शेतीतील दुरवस्था दूर झालेली नाही. शेतीचाच राहो तर खेड्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही अजून सोडवावा लागतो. खेड्याची उपेक्षा करून चालणार नाही. म. गांधींच्या "खेड्याकडे चला" या आदेशाची यथार्थता अजूनही पटते हेच गांधीजींच्या आर्थिक विचारांचे वैशिष्टच म्हणावे लागेल. नियोजनावर पाण्यासारखा पैसा खर्चून सामान्य माणूस अजूनही तृषार्तच राहीला.

## लवचिक योजना

दरवर्षी योजना आखून पाचवर्षांच्या काळासाठी ठरविलेली उद्दिष्टे पूर्ण करावयाची आहेत. भारत खंडप्राय देश आहे. त्याचे प्रश्न विविध आहेत. अल्पविकासामुळे नियोजित उद्दिष्टे गाठण्यात प्रत्येक वेळी नवनवीन अडचणी निर्माण होतात. यासाठी दरवर्षी झालेल्या कामाचा व आलेल्या अडचणींचा विचार करून पुढील वर्षाच्या नियोजनात आवश्यक ते बदल करण्यात यावेत. या पद्धतीत योजना आखणारे व योजना राबविणारे यांच्यातील सुसूत्रीकरण वाढून योजना प्रभावी ठरतील. नियोजनच्या या लवचिक पद्धतीमुळे नियोजनास वेळोवेळी योग्य दिशा मिळेल व उद्दिष्टे साध्यकरण्यात येणाऱ्या अडचणींचे प्रभावही खूपच कमी होईल आर्थिक विकासास योग्य गति व दिशा मिळवण्याच्या दृष्टीने 'लवचिक योजना' प्रभावी ठरू शकेल.

परंतु योजना किती चांगली असली तरी ती राबविणारी यंत्रणा, पदाधिकारी, व ज्यांच्यासाठी योजना राबविली जाते ते लोक उच्चध्येयाने प्रेरित होऊन श्रद्धेने व निष्ठेने सूत्रबद्ध पद्धतीने काम करीत नाहीत तोपर्यंत आर्थिक अरिष्टातून मार्ग निघणे दुरापास्तच.

# बँकेची प्रश्नोत्तर माध्यमाने ओळख

लेखक वसंत द. नखाते B.A.
C/o दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. हेड ऑफीस– सातारा

(सर्वसामान्य नागरिकांसाठी)

**(१) बँक म्हणजे काय ?**

ठेवीच्या स्वरूपात रक्कम (पैसे) स्वीकारणारी व ती गरजूंना कर्जरूपाने देणारी संस्था.

**(२) बँकेवर कोणाचे नियंत्रण असते ?**

बँकेवर सरकार व रिझर्व बँक ऑफ इंडियाचे नियंत्रण असते.

**(३) बँकेचा व्यवहार कोणकोणत्या कायद्यानुसार चालतो ?**

बँकेचा व्यवहार (१) रिझर्व बँक ऑफ इंडिया अॅक्ट १९३४, (२) बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट १९४९; (३) निगोशिएबल इन्स्ट्रमेंट अॅक्ट १८८१; (४) दि कंपनीज् अॅक्ट १९५६; (५) डिपॉझिट इन्सुरन्स अॅक्ट १९६१; (६) दि इंडियन रजिस्ट्रेशन अॅक्ट १९०८ इत्यादि कायद्यांनुसार चालतो.

**(४) बँकेतच रक्कम (पैसा) का ठेवावी ?**

रकमेची सुरक्षितता, परतफेडीची हमी, रु. २०,०००।– पर्यंतच्या ठेवीचे इन्शुरन्स, ठराविक पण चांगल्या पद्धतीने मिळणारे व्याज, राष्ट्रीय विकासास मदत, व योग्य तऱ्हेचा सल्ला यासाठीच बँकेत रक्कम गुंतवावी/ठेवावी.

**(५) बँकेत कोणाला खाते उघडता येते ?**

कोणत्याही सुशिक्षित अगर अशिक्षित व्यक्तीस, मुलांस, फर्म, क्लब, ट्रस्टी, असोशिएशन, नगरपालिका/कार्पोरेशन व कंपनी यांना खाते उघडता येते.

**(६) बँकेत कोणते खाते उघडावे ?**

खाते उघडताना, रक्कम, काळ व व्याजाचा दर यांवर ते अवलंबून ठेवावे.

**(७) बँका व इतर आर्थिक सहकार्य करणाऱ्या संस्था कोणत्या ?**

(१) व्यापारी, (२) सहकारी, (३) भूविकास, (४) रिजनल रूरल बँक, (५) दि इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया, (६) सहकारी सोसायटी, (७) दि इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडिया, (८) इंडस्ट्रियल क्रेडिट अॅन्ड इन्व्हेस्टमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया लि., (९) दि नॅशनल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कार्पोरेशन, (१०) दि स्टेट फायनान्शियल कार्पोरेशन, (११) दि अॅग्रिकल्चरल रिफायनान्स कार्पोरेशन, (१२) दि युनिटी ट्रस्ट ऑफ इंडिया, (१३) दि एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन लि., (१४) दि रिफायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडस्ट्रिज, (१५) रिझर्व बँक ऑफ इंडिया.

**(८) १९ जुलै १९६९ साली राष्ट्रीयीकृत झालेल्या (१४) चौदा बँका कोणत्या ?**

(१) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, (२) बँक ऑफ इंडिया, (३) पंजाब नॅशनल बँक, (४) बँक ऑफ बरोडा, (५) युनायटेड कमर्शियल बँक, (६) कॅनरा बँक, (७) युनायटेड बँक ऑफ इंडिया, (८) देना बँक, (९) युनियन बँक ऑफ इंडिया, (१०) अलाहाबाद बँक, (११) सिंडिकेट बँक, (१२) इंडियन ओव्हरसीज बँक, (१३) इंडियन बँक, (१४) बँक ऑफ महाराष्ट्र.

**(९) बँकेबद्दल जादा माहिती कोठे मिळू शकेल ?**

'इंडियन बँक असोसिएशन', स्टेडियम हाऊस, वीर नरीमन रोड, मुंबई ४०००२०.

**(१०) सध्या बँकेच्या किती शाखा व नोकरवर्ग आहे?**

सध्या सर्व बँकांच्या मिळून सुमारे २४०००।– शाखा आहेत. ४,००,०००।– लाख नोकरवर्ग व ८ कोटी बँकिंगचा व्यवहार करणाऱ्या आहेत.

## ठेवी व्यवहार (Deposits)

**(११) ठेवींची खाती कशा प्रकारची उघडावीत ?**

रक्कम (पैसे) ठेवताना ती काळ, रक्कम व व्याजाचा दर पाहून वैयक्तिक नावावर, काही जॉइंट अगर Either or Survor, तसेच अज्ञान मुले अगर पत्नी व काही कंपनी व फर्मच्या नावाने ठेवखाती उघडावीत.

**(१२) बँकेत कोणकोणत्या प्रकारची खाती असतात?**

(१) मुदत ठेव, (२) संचित ठेव, (३) दामदुप्पट/दीड पट ठेव योजना, (४) अल्पमुदत, (५) स्मॉल सेव्हिंग्ज (भिशी), (६) पेन्शन, (७) कॅश सर्टिफिकेटस्, (८) मासिक व्याज ठेव, (९) सेव्हिंग्ज, (१०) चालू इत्यादि खाती असतात.

## (१३) ठेव ठेवताना ओपनिंग फॉर्म का भरून घेतात?

बँकेचे नियम व अटी ठेवीदारांस मान्य असून त्यावर ठेवीदारांचे सहीचा नमुना घेतलेला असतो. रक्कम काढताना अगर परत करताना त्या सहीवरून पडताळून पहाता येते.

## (१४) चेकबुक कोणत्या खात्यास मिळते?

(१) सेव्हिंग्ज, (२) चालू (current), मात्र या खात्यात ठराविक (नियुक्त) रक्कम खात्यात शिल्लक ठेवावी लागते.

## (१५) ठेवखाते कोणत्या प्रकारचे उघडावे?

रक्कम ठेवताना ती कोणत्या उद्देशाने ठेवली जाते त्यावर सर्वस्व अवलंबून असते. उदा— मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न, भावी काळाची तरतूद, धंद्यासाठी वगैरे. याबाबत नेहमी 'शाखाधिकारी' (Manger) यांना आपला उद्देश सांगून त्यांचा सल्ला घ्यावा.

## (१६) खाते उघडताना 'ओळख' का मागतात?

बँकेत रक्कम ठेवताना ती योग्य त्या नावानेच ठेवली जावी. बेनामी असू नये. रक्कम मूळ कोणाच्या मालकीची आहे. त्यांनी कोणास फसवून अगर चोरून आणली आहे किंवा कशी? ती परत करताना योग्य त्या व्यक्तीसच परत केली जाईल. बँकेचे नियम व अटी पाळल्या जातील, याची खात्री दुसऱ्या व्यक्तीने द्यावी लागते. अशी व्यक्ती ही बँकेची ठेवीदार अगर गावातील प्रतिष्ठित व्यक्ति लागते. ठेवीदार बँकेशी सचोटीने व्यवहार करील याची जबाबदारी त्याच्यावर येते.

## (१७) अन्य व्यक्तीस/संस्थेस चेक देताना तो शक्यतो क्रास/ऑर्डर का द्यावा?

क्रास/ऑर्डर चेकची रक्कम त्याला कौन्टरवर ताबडतोब मिळत नाही. त्यांस सदरहू चेक हा खात्यातूनच वटवून रक्कम घेता येते. त्यामुळे त्यांचा जमाखर्च होतो. रेकॉर्ड झाल्यामुळे चेक देणाराला स्वतंत्र पावतीची गरज लागत नाही.

## (१८) ठेव खातेवरील प्रचलित व्याजाचे दर कोणते?

सहकारी व रूरल बँका यांमध्ये व्यापारी बँकांपेक्षा २५ पैसे ते १ रुपयापर्यंत जादा व्याजाची तरतूद सध्या केलेली आहे.

व्यापारी बँकांचे सध्याचे ठेवीचे दर खालीलप्रमाणे—

(१) चालू खाते— व्याज नाही.

(२) सेव्हिंग्ज— चेकबुक वापरणारे – ३ %
चेकबुक न वापरणारे – ५ %

(३) ९१ दिवस ते ६ महिन्यांपर्यंत – ४ %

(४) ६ महिने ते ९ महिनेपर्यंत – ४.५० %

(५) ९ महिने ते १ वर्षपर्यंत – ५ %

(६) १ वर्ष ते ३ वर्षेपर्यंत – ६ %

(७) ३ वर्ष ते ५ वर्षेपर्यंत – ८ %

८) ५ वर्षानंतर –१० %

## कर्जव्यवहार (Advances)

## (१९) बँकेकडूनच कर्ज का घ्यावे?

कमी व्याजदर, परतफेडीचे सोयीनुसार हप्ते, योग्य ती कर्जाऊ रक्कम, वेळोवेळी मदत व सल्ला, निष्कारण त्रास नाही, मध्यंतरी मागणी नाही. इत्यादि कारणास्तव बँकेकडूनच कर्ज घ्यावे.

## (२०) बँकेकडून कोणत्या कारणासाठी कर्ज मिळू शकते?

(१) शेती, (२) व्यापार, (३) लहान व मोठे उद्योगधंदे (४) लहान व मोठे व्यवसाय, (५) शिक्षण, (६) घर बांधणीस, (७) ट्रक व रिक्षा ड्रायव्हर्स, (८) कुशल कामगारांना मदत म्हणून. इत्यादि कारणास्तव कर्ज दिले जाते.

## (१९) कर्जाचे प्रकार कोणकोणते असतात.?

(१) डिमांड लोन्स, (२) टर्म लोन्स, (३) कॅश क्रेडिटस्, (४) ओव्हर ड्राफ्टस्, (५) वैयक्तिक कर्ज, (६) बिल्स् परचेंसड् अँड डिस्काऊटेड, (७) एक्सपोर्ट क्रेडिटस्, (८) कॉललोन्स्, इत्यादि कर्जाचे प्रकार असतात.

## (२०) कर्जास तारण कोणत्या प्रकारे घेतले जाते.

(१) नजरगहाण (tlypotheeation) (२) मालतारण (Pledge) (३) दस्त ऐवज करून (Mortgage) (४) जमीनदार (Guarantor)

## (२१) कर्ज कोणास मिळू शकते?

ज्यांची पत, ऐपत, उद्देश, व्यवसाय, गरज, या गोष्टी चांगल्या प्रकारच्या व योग्य आहेत अशा कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कर्ज मिळू शकते. मात्र त्यांनी बँकेचे कर्जाबद्दल असलेल्या नियम व अटी मान्य कराव्या लागतात.

## (२२) कर्जास कोणकोणते तारण घेतले जाते?

(१) सोने व चांदी, (२) शेअर्स व सिक्युरिटीज्, (३) मुदत ठेव, (४) लाईफ इन्शुरन्स् पॉलिसीज्, (५) डाक्युमेंटरी बिल्स्, (६) प्रॉपर्टी तारण, (७) बुकडेटस्, (८) शेतीमाल,

(९) औद्योगिक माल व मशिनरी, इत्यादि थोडक्यात म्हणजे ज्या मालाची बाजारात सहजासहजी विक्री होऊ शकेल अशा प्रकारचा माल तारण म्हणून घेतला जातो.

**(२३) बँकेत बिनतारणी कर्ज केव्हां मिळते ?**

बँकेला ज्या वेळी कर्जदारांची 'पत' चांगली असून उद्देश खरोखर चांगला आहे अशी खात्री पटल्यानंतर ती एक किंवा दोन जामीनदार घेऊन कर्ज आदा करते.

**(२४) कर्ज आदा करावयाचे वेळेस बँका कोण-कोणत्या गोष्टी पहातात ?**

(१) परत फेडीची खात्री, (safety) (२) पैश्याची लवचितका (Lqiuidity) (३) उद्देश (Purpose) (४) तारण (Seecurity) (५) फायदा (Pocitadilily) (६) सामाजिक कर्तव्य (Nationaļ Policy)

## इतर कार्यं (General)

**(२५) बँकेत इतर कोणत्या सुविधा (सोयी) असतात ?**

(१) सेफ डिपॉझिट लॉकर्स, (२) गिफ्ट चेक्स्, (३) टेलर सिस्टिम, (४) ट्रव्हलर्स चेकस्, (५) कन्सल्टंन्टस् इत्यादि

**(२६) बँकेतून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रक्कम कशी पाठवता येते ?**

(१) ड्राफ्टने, (२) चेकने, (३) मेल अगर टेलिग्राफिक ट्रान्सफरने. पाठविता येते

**(२७) बँका इतर कोणती कामे / कार्ये करतात ?**

(१) इन्शुरन्स् हप्ता भरणे, (२) घरभाडे देणे / वसूल करणे, (३) निरनिराळी वर्गणी भरणे, (४) डिव्हिडंड अथव व्याज वसुली करणे, (५) मौल्यवान वस्तु ठेवून घेणे, (६) पेन्शनची वसुली करणे, (७) लेटर ऑफ क्रेडिट देणे, (८) फॉरेन एक्सचेंज् मिळवून देणे, (९) इलेक्ट्रिक बिल भरणे, (१०) फिरती बँक काढून सोय उपलब्ध करून देणे, (११) ट्रस्टी, एक्झिक्यूटर्स म्हणून काम पाहाणे, इत्यादि कामे करतात.

**(२८) वरील कामासाठी बँका मोबदला घेतात काय ?**

होय. वरील कामासाठी बँका कमिशन, भाडे व इतर चार्जेस घेतात.

**(२९) नवीन पैशांचा (रकमेचा) व्यवहार करताना बँकेचा सल्ला घ्यावा काय ?**

बँक या संस्थेचा मूळ उद्देशच ठेवरूपाने रक्कम घणे व गरजूनां ती कर्जरूपाने देणे असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीने संस्थेने बँकेचासल्ला जरूर घ्यावा. कारण वैयक्तिक हेवेदावे नसतात,-स्वार्थ नसतो, अथवा त्या क्षेत्रातील ती अधिकारी व्यक्ति असल्यामुळे आपणांस त्याचेकडून योग्य तोच सल्ला मिळतो.

**(३०) बँकांची शाखाविस्तार वाढ योग्य आहे काय ?**

बँकांची वाढ / शाखाविस्तार होणे अगदी योग्य आहे. अजूनही भारतीय लोक बँकेशी व्यवहार करताना घाबरतात असे दिसून येते बँकांच्या बाबतीत बरेच अज्ञानी आहेत. त्यांनी बँकेशी सतत संपर्क साधवा म्हणून सरकारचे प्रयत्न चालू आहेत


नूतन वर्षानिमित्त शुभेच्छा... दूरध्वनी : ५४५२९ व ५८१५४

# श्री सुवर्ण सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय

७५९।५१, डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४११ ००४.

| जोगेश्वरी शाखा : | टिळक रोड शाखा : | श्रीपूर शाखा : |
|---|---|---|
| ३१ बुधवार, रेणुसे, बिल्डिंग, | २०३५।२, टिळक रोड, | श्रीपूर, |
| पुणे ४११ ००२. | पुणे ४११ ०३०. | ता. माळशिरस, जि. सोलापूर |
| दूरध्वनी ४६५१९ | दूरध्वनी ४२६४८ | दूरध्वनी ५७ |
| श्री. जे. सी. आगाशे, | श्री. जी. एच्. सवनीस, | श्री. वसंत चिचाळकर, |
| चेअरमन | व्हॉ. चेअरमन | मॅनेजर |

सौजन्यशील सेवा म्हणजेच 'सुवर्ण-सेवा'

तक्ता क्रमांक १

## चहाचे लागवड क्षेत्र आणि उत्पादन

| वर्ष | लागवड क्षेत्र (हजार हेक्टर) | एकूण उत्पादन (कोटी किलो | प्रति हेक्टर उत्पादन (किलो) |
|---|---|---|---|
| १९५० | ३१५·७ | २७·८२ | ८८१ |
| १९५५ | ३२०·२ | ३०·७७ | ९६१ |
| १९६० | ३३०·७ | ३२·११ | ९७१ |
| १९६५ | ३४१·८ | ३६·६४ | १०७२ |
| १९७० | ३५४·१ | ४१·४८ | ११८२ |
| १९७१ | ३५६·५ | ४३·३३ | १२१५ |
| १९७२ | ३५७·० | ४४·९५ | १२७१ |
| १९७३ | ३५८·० | ४७·२० | १३११ |
| १९७४ | ३६१·६ | ४८·९४ | १३६१ |
| १९७५ | ३६१·४ | ४८·७४ | – |

तक्ता क्रमांक २

## चहाचा निर्यात व्यापार

| वर्ष | प्रमाण (कोटी किलो) | मूल्य (कोटी रुपये) |
|---|---|---|
| १९६०–६१ | १९·६ | १२३·६ |
| १९६२–६३ | २२·१ | १२८·८ |
| १९६५–६६ | १९·७ | ११४·८ |
| १९७०–७१ | १९·९ | १४८·२ |
| १९७१–७२ | २०·९ | १५५·० |
| १९७२–७३ | १८·८ | १४५·२ |
| १९७३–७४ | २०·६ | १४२·० |
| १९७४–७५ | २१·८ | २२१·४ |
| १९७५–७६ | २१·१ | २३६·६ |
| १९७६–७७ | २२·४ | २६०·० |

सत्यशिवसुंदर प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे ह्यांनी
यशवंत मुद्रणालय १८३५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले

'अर्थ' License to post without prepayment No.61. Regd. No. P.N.C. 205


# जन-कल्याणासाठी झटणारी, जनतेची बँक महाराष्ट्र बँक

महाराष्ट्र बँक...तुमची जिव्हाळयाची बँक...कोणत्याना कोणत्या क्षेत्रामध्ये सातत्याने धडपड करणाऱ्या तुमच्या-सारख्या महत्वाकांक्षी माणसांना जाणीवपूर्वक मदत करणारी बँक...


स्वतःचे भवितव्य घडविण्याच्या तुमच्या प्रयत्नांना आम्ही भरघोस मदत करू... आर्थिक साहाय्य करू...व्यवसायामधील अडचणी समजावून सांगू...तांत्रिक व व्यवस्थापनाबद्दलसुद्धा मार्गदर्शन करू.

आमच्याकडे या. देशभर पसरलेल्या ४५० पेक्षा अधिक शाखांपैकी प्रत्येक शाखा तुमच्या गरजांकडे व्यक्तिगतरीत्या लक्ष देईल...आत्मीयतेने सहकार्य करील...हवे तेव्हा.

महाराष्ट्र बँकेची मदत घ्या... सारे प्रश्न सुटलेच म्हणून समजा!

**बँक ऑफ महाराष्ट्र**

११७७ बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२




PRATIBHA 766 MAR


2 FEB 1978

# अर्थ

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## प्रथम अधिवेशन विशेषांक

जानेवारी १९७८ ,मूल्य तीन रु.

निबंध - चर्चा - ठराव - पुढील संकल्प ०



'लक्ष्मीज्ञान' या मराठीतील पहिल्या अर्थशास्त्रीय ग्रंथाचे लेखक
श्री. गोपाळराव हरी देशमुख (लोकहितवादी) यांचे प्रेरक स्मरण

# अर्थ

आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक. दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे

वर्ष : तिसरे    अंक : दहावा : जानेवारी १९७८

किंमत : ३ रुपये    वार्षिक वर्गणी : ३० रुपये

## संपादकीय

यशवंत मुद्रणालय आणि मेनका मुद्रणालय ह्या संस्थांनी सहकार्य दिल्यामुळे 'अर्थ' आता नियमितपणे प्रसिद्ध होईल.

नव्या वर्षाचे स्वागत करताना नव्या उमेदी, नव्या आकांक्षा आणि नवा हुरूप स्वाभाविकपणेच वाटतो. १९७८–७९ हे अर्थसंकल्पीय वर्ष यंदा भरीव आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने वाटचाल करील अशी आशा वाटते.

नोव्हेंबर ७७ मध्ये मराठी अर्थशास्त्र परिषदेचे पहिले अधिवेशन झाले. त्याचे अध्यक्षीय अभिभाषण आम्ही डिसेंबरच्या अंकात छापले होते. त्याच अधिवेशनात वाचले गेलेले अभ्यासपूर्ण निबंध ह्या अंकात प्रसिद्ध करीत आहोत.

फेब्रु. ७८ चा अंक आम्ही १ फेब्रुवारीसच प्रकाशित करू शकू. आणि यापुढे दर महिन्याच्या १५ तारखेऐवजी दर महिन्याच्या पहिल्या तारखेलाच 'अर्थ'चे अंक प्रकाशित होतील.

— संपादक

अनुक्रम :

१. स्वागत: प्रा. स. ह. देशपांडे

२. इन्फ्लेशन अथवा अतिपैसा वाढ : पां. वा. गाडगीळ

३. महाराष्ट्राची ग्रामीण रोजगार हमी योजना : प्रा. एस्. एन्. भावे

४. चक्री योजनेची पहिली दिवाळी : प्रा. सिद्धार्थ चक्रवर्ती

५. व्यवस्थापन आणि सरकार : पी. जे. फर्नांडीस

६. टेक्नोकास्ट : राजेंद्र पटवर्धन

७. प्रेशर कुकर उद्योगाची ओळख : प्रा. प्रभाकर फरसोले

...हे वर्ष आमच्या वर्गणीदार, वाचक, लेखक, मुद्रक, जाहिरातदार आणि हितचिंतकांना सुखाचे जावो !

# मराठी अर्थशास्त्र परिषद : पहिले अधिवेशन

## ( २५ व २६ नोव्हेंबर १९७७ )

# स्वा ग त

### प्रा. स. ह. देशपांडे यांचे भाषण

अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी, उद्घाटक श्री. भाऊसाहेब नेवाळकर, निमंत्रित पाहुणेमंडळी. प्रतिनिधी व मित्रमंडळींनो,

मराठी अर्थपरिषदेच्या ह्या पहिल्या अधिवेशनाला आपण उपस्थित झालात ह्याबद्दल परिषदेतर्फे मी आपले मनापासून स्वागत करतो आणि आपले स्वागत करण्याचा हा मान मला दिल्याबद्दल परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानतो.

ह्या अभिनव उपक्रमात सहभागी होत असताना मीही आपणा सर्वांप्रमाणेच सोत्कंठ आहे. येथे आपण सर्वांनी मिळून नवे काही घडवू घातलेले आहे. एक नवा पायंडा आपण पाडीत आहोत. आज होत असणाऱ्या लहानश्या प्रारंभापासून येथून पुढे बरेच काही नवे आणि दोन्ही अर्थांनी अर्थघन असे घडणार आहे अशी आपणाप्रमाणेच मलाही उमेद आहे.

शिक्षणाच्या सर्व स्तरांवर मातृभाषाच शिक्षणाचे माध्यम म्हणून राहावी, हा विचार आज तत्त्वत: तरी सगळीकडे मान्य झाल्यासारखा दिसतो. ह्या मार्गाने काहीशी वाटचाल अगोदरच झालेली आहे. पण ह्या तत्त्वाचा प्रत्यक्ष आचार जसा अनेक अंगांनी आणि भरघोसपणे व्हावयास हवा तसा होत नाहीही खंत आपणा सर्वांच्याच मनात आहे. खरे म्हणजे हे काम विविध पातळ्यांवर होत आहे. अर्थशास्त्रावर मराठीत ग्रंथ, विशेषत: पाठ्यपुस्तके, तयार होत आहेत. काही अभिजात ग्रंथांची किंवा प्रमाण पाठ्यपुस्तकांची भाषांतरे होऊ घातली आहेत. आपल्या आजच्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी यांच्या अध्यक्षतेखाली एक संयुक्त शासकीय–विद्यापीठीय समिती अर्थशास्त्र परिभाषेच्या कोशाचे काम करीत आहे व ते जवळ जवळ पूर्ण होत आलेले आहे. पण व्हावयास हव्या असणाऱ्या कामाच्या मानाने ही कामगिरी फारच तुटपुंजी आहे ह्यात काही शंका नाही.

ह्या पार्श्वभूमीवर मराठी अर्थशास्त्र परिषद जे काम कर इच्छिते ते अभिनंदनीय ठरावे. वर उल्लेखिलेल्या प्रयत्नात न सामावलेले, किंबहुना त्या प्रयत्नांना पायाभूत म्हणून ठरेल अश प्रकारचे काम परिषदेने आपल्या अंगावर घेतलेले आहे. हे काम म्हणजे मूलभूत अर्थशास्त्रीय संशोधन व्यवहारत मराठीतून प्रचलित करणे हे होय. परिषद हे काम दोन तऱ्हांनी करणार आहे एक आजच्यासारखी अधिवेशने, संमेलने किंवा सभा भरवून मराठीत लिहिलेल्या शोध–निबंधांवर मराठीत चर्चा घडवून आणणे. दोन ' अर्थसंवाद ' ह्या आतापर्यंत दोन अंक निघालेल्या त्रैमासिकामार्फत अर्थविचाराला व संशोधनाला चालना देणे. अर्थसंवादचा उपक्रम तसा सर्वस्वी नवीन नाही. गोखले राज्यशास्त्र–अर्थशास्त्र संस्थेच्या ' अर्थविज्ञान ' ह्या त्रैमासिकाने असा प्रयत्न काही काळ केला. मराठीत नव्हे तर सर्व भारतीय भाषांमधून संशोधनात्मक लिखाण प्रसिद्ध व्हावे ही ' अर्थविज्ञान 'ची भूमिका अतिशय स्वागतार्ह होती आणि ह्या दूरदर्शित्वाचे श्रेय आपण कै. प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांना द्यावयास हवे. दुर्दैवाने हा उपक्रम अल्पजीवी ठरला. ह्याचे एक कारण कदाचित् असे असू शकेल की एकाच वेळी अनेक भाषांना विचारांचे वाहन केल्याने होणारा परिणाम फुटकळ ठरण्याचा संभव असतो. दुसरे आणि कदाचित् अधिक संभाव्य कारण संशोधक–लेखकांचाच फारसा प्रतिसाद नसणे हेही असू शकेल–आणि अर्थसंवादलाही ह्या दुसऱ्या प्रकारच्या अडचणीला तोंड द्यावे लागणार नाही असे नाही. पण केवळ मराठी भाषेत आणि नियमितपणे संशोधनाला एक वाहन उपलब्ध करून देणे हे ' अर्थसंवाद 'च्या कार्याचे स्वरूप आहे. आणि अशा प्रकारचे काम किती मूलभूत स्वरूपाचे आहे हे आपणांस विस्ताराने सांगण्याची गरज नाही. अर्थात्, प्रारंभी काही काळ तरी ' अर्थ-

सवाद ' केवळ संशोधनपर ठेवून चालणार नाही. पाठ्यक्रमातीलच काही जटिल अर्थशास्त्रीय सिद्धांतांची काहीशा विस्ताराने उकल करून देणाऱ्या लेखांचीही अनेक विद्यार्थ्यांना गरज आहे आणि तीही भागविणे आवश्यक आहे. तेही काम अर्थसंवाद करीत राहील. संशोधन व विशदीकरण ह्यांत श्रमविभागणी होणे आवश्यक आहे, पण तूर्त तरी ' बाजारपेठेचा व्याप ज्या प्रमाणात वाढेल त्याच प्रमाणात श्रमविभाग वाढू शकतो ' हे अॅडम स्मिथ्चे सूत्र ध्यानात ठेवून दोन्ही क्रिया एकत्रितपणे करण्यावाचून गत्यंतर नाही.

सर्व आधुनिक विज्ञानें मराठीत यावीत किंवा शिक्षणाचे माध्यम मराठी असावे हा विचार संकुचित प्रादेशिक अभिमानातून निर्माण झालेला नाही. उलट औपचारिक ( Formal ) आणि उपचाररहित ( Non-Formal )अशा दोन्ही शैक्षणिक दृष्टींनी ह्या विचाराचे फार महत्त्व आहे. ज्ञानग्रहणाची क्रिया मातृभाषेतून नैसर्गिकपणे आणि सहजपणे होते हे गृहीत तर निर्विवादच आहे. आणि म्हणून औपचारिक शिक्षणात माध्यम म्हणून मातृभाषेला स्थान मिळावे हे ओघानेच आले. पण औपचारिक व्यवस्थेच्या बाहेर असणाऱ्या असंख्यांकानाही आधुनिक ज्ञान खुले करून देणे ही गोष्ट केवळ मातृभाषेच्याच माध्यमांतून शक्य आहे. प्रचलित राजकीय-सामाजिक जीवनात हरघडीला नजरेस येणारी गोष्ट म्हणजे सर्वसामान्य जनता व विशेषत: तिचे नेते यांच्यांत दिसून येणारे अर्थशास्त्राच्या प्राथमिक प्रमेयांविषयीचे अज्ञान. हे अंदाज धोक्याचे ठरण्याचा नेहमीच संभव असतो. आर्थिक विकास किंवा आर्थिक नियोजन ही शेवटी बऱ्याच अंशी एक राजकीय प्रक्रिया असते. आणि ह्या राजकीय प्रक्रियेचे मूळातले सूत्रधार म्हणजे जनता व तिचे नेते असतात. त्यांचे कार्यक्रमविषयक आणि धोरणविषयक प्रयत्न अधिक जागरूकपणे आणि शास्त्रशुद्ध रीतीने व्हावेत ह्यासाठी सर्वसाधारण समाजामध्ये अर्थशास्त्रीय साक्षरता निर्माण होणे जरूर आहे. तेव्हा माध्यमविषयक ही चळवळ म्हणजे आपल्या लोकशाही जीवनाचेही एक अनिवार्य अंग आहे. हा विचार सर्वांच्या मनात ठसणे अतिशय अगत्याचे आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ह्या उपक्रमातून आणखीही एक लाभ होईल अशी अपेक्षा आहे. तो म्हणजे परिषदेत आणि ' अर्थसंवादा 'त होणाऱ्या चर्चांना साहजिकपणेच एक प्रादेशिक परिमाण लाभेल. अशा प्रकारच्या परिमाणाचीही नितांत गरज आहे हे अर्थशास्त्राच्या विद्यार्थीना स्पष्ट करून सांगण्याची जरूर नाही. महाराष्ट्राचा आर्थिक विकास, त्याची शेती, त्यातील बेप्रमाण नागरीकरणामुळे निर्माण झालेले आर्थिक आणि परिसरविषयक प्रश्न, महाराष्ट्रातील अंतर्गत प्रादेशिक असमतोल, महाराष्ट्राचा आर्थिक इतिहास-ह्या सर्व विषयांबाबत अनेक प्रकारचे संशोधन होणे अवश्यक आहे. हे जवळ जवळ दुर्लक्षित राहिलेले विषय अधिक मोठ्या प्रमाणावर व अधिक तळमळीने ह्या व्यासपीठावर व अर्थसंवादात चर्चिले जातील अशी आपण आशा करू या व तसे प्रयत्नही करू या.

मात्र हे सर्व प्रयत्न करीत असताना त्यातील एकांगी अतिरिक्तता टाळली पाहिजे हे मात्र मला अगत्याने सुचवावेसे वाटते. मराठीत कितीही ग्रंथरचना केली. भाषांतरे केली वा कोश निर्माण केले तरी ज्या प्रमाणांत व ज्या वेगाने उपलब्ध ज्ञानात भर पडत आहे त्याच्याशी बरोबरी साधणे कोणत्याही प्रादेशिक भाषेला अजून बराच काळ अशक्य आहे. म्हणून ज्या इतर भाषांमधून शास्त्रीय ज्ञान निर्माण होते आहे त्या भाषांवरचे प्रभुत्व ही गोष्ट अपरिहार्यच मानावी लागेल. आज दुर्दैवाने अशी स्थिती आहे की मातृभाषेतून जे विद्यार्थी शिकतात त्यांना विषयाची समजूत जरी सोपेपणाने पडली तरी त्यामुळे उत्तेजित झालेली त्यांची ज्ञानग्रहणाची भूक भागेल असे सकस वाङमय पुरेशा प्रमाणावर त्यांना वाचावयास मिळत नाही. परिणामी मातृभाषेतून शिकवायचे जे काही लाभ म्हणून म्हटले जातात ते केवळ पुस्तकी स्वरूपाचेच आहेत की काय अशी शंका फैलावते. ही दरी मराठीतच भरून काढण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत हे खरेच, आणि आपण सर्वजण त्यांपैकीचे एक प्रयत्न येथे करीत आहोत. पण विदेशी भाषा आणि काही ऐतिहासिक कारणांमुळे आपणास सोयीची आणि सवयीची असलेली इंग्रजी भाषा यांची उपेक्षा करून चालणार नाही हे आपण विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षणसंस्थांच्या मनावर बिंबविले पाहिजे. नाहीतर ' इदं नास्ति, परं च न लभ्यते ' अशी दुरवस्था प्राप्त होण्याची शक्यता फार.

अध्यात्मज्ञानाच्या कावडी भरून मराठीत ओतण्याचे काम मराठी संतांनी सुरु केल्याला शेकडो वर्षे झाली. आता आधुनिक Secular विज्ञाने व विशेषत: अर्थशास्त्रासारखे करडे इहप्रवण समाजविज्ञान मराठीत आणणे प्राप्त झाले आहे. एकूण ऐहिक विचार आणि अर्थशास्त्र ह्यांचा विकासाचे साहचर्य पाश्चात्य वैज्ञानिक इतिहासात स्पष्टपणे दिसून येते. तेव्हा संतांनी त्या काळाला अनुरूप असे जे कार्य केले त्यासारखे आपल्या काळाला अनुरूप असे कार्य परिषदेला करावयाचे आहे. म्हणजे हे कार्य परिषदच प्रथम करीत आहे असे नाही. लोकहितवादापासून किंवा तत्पूर्वीपासूनही हे काम चालू आहे. परिषद ह्या कामात एक व्यवस्था आणि संघटित प्रयत्नांचे सकेंद्रीकरण Concentration आणू इच्छिते, एक व्यापक व्यासपीठ उभे करू इच्छिते. संतांच्या कार्याला काही विशिष्ट परंपरेतल्या पंडितांचा विरोध होता तसा ह्याही प्रयत्नाला असू शकेल. पण मला वाटते तो अडसर मह-

त्याचा नाही. खरा अडसर आपल्या इच्छाशक्तीचा आहे.

म्हणून हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी आपल्या व ह्या सभागृहात आता उपस्थित नसलेल्या अनेकांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. अनेक प्रकारांचे सहकार्य अपेक्षित आहे. परिषदेचा संदेश व तिचे कार्य सर्व महाराष्ट्रात व्हे तर सर्व मराठी भाषिकांमध्ये पोहोचले पाहिजे. ह्यासाठी परिषदेच्या सभासदांची संख्या सर्व भाषांमधून वाढली पाहिजे. परिषदेला व 'अर्थसंवाद'ला आपला उपक्रमांचा व्याप व भरीवपणा वाढवता यावा म्हणून त्यांचे आर्थिक बळ वाढविणे हेही अगत्याचे आहे. सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे अर्थशास्त्रांतर्गत विविध विषयांच्या अभ्यासासाठी, निबंधलेखनासाठी व चर्चेसाठी अधिकाधिक मंडळी उद्युक्त होतील असे प्रयत्न करावयास हवेत. हे सर्व झाले तरच मराठी अर्थशास्त्र परिषद ही महाराष्ट्राच्या बौद्धिक क्षेत्रातली एक जिवंत शक्ती म्हणून वावरू लागले.

ह्या परिषदेमागची एक प्रेरणा कै. गोवर्धन पारीख यांची होती. भारतातील नियोजनविषयक विचाराच्या इतिहासात प्रा. पारीखांचे नाव त्यांच्या जनता योजनेमुळे निश्चितच चिरंतन राहील. प्रा. पारीखांचे स्मरण ह्या प्रसंगी आपणा सर्वांना होणे साहजिकच आहे.

प्रा. सोवनी आपल्या ह्या पहिल्या अधिवेशनाची धुरा सांभाळणार आहेत. अर्थशास्त्रातील तात्त्विक समस्यांकडे त्यांचे जागरूक लक्ष असते. मराठीत कटाक्षाने व सातत्याने अर्थशास्त्रीय लिखाण त्यांनी केलेले आहे. शिवाय ते नुसतेच अर्थशास्त्रज्ञ नसून व्यापक सामाजिक आणि ऐतिहासिक आलोकही (Perspective) त्यांच्या नजरेसमोर नेहमी असतो. आणि मुख्य म्हणजे अगदी सुरुवातीच्या काळापासून परिषदेच्या घडणीत त्यांचा फार मोठा हिस्सा आहे. परिषदेच्या बाल्यात तिचे संगोपन आणि संवर्धन प्रा. सोवनींच्याकडून व्हावे हा योग फार चांगला जमून आलेला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ह्या अधिवेशनाचे काम कार्यदक्षतेने आणि उत्साहपूर्ण रीतीने पार पडेल यात आपल्याप्रमाणेच मलाही शंका नाही.

आपले पुन्हा एकदा हार्दिक स्वागत करून आणि आपली येथली उपस्थिती आणि निवास आनंदाचा व उद्बोधक ठरेल अशी आशा व्यक्त करून मी आपली रजा घेतो. □


# हे कारटं तर म्हणतंय हुंडा घेणार नाही...!




म्हणजे बेबीसारखं याच्याही लग्नासाठी पैसा सांठवणं आलं!

तुटपुंज्या पगारातून पै पैसा साठवून याचं शिक्षण केलं. पुस्तके, फी, भारी भारी कपडे, सहली यासाठी कितीतरी पैसा खर्च केला. स्वतःची, बायकोची हौसमौज बाजूला ठेवली. वाटलं होतं...याची प्रॅक्टिस सुरू झाली की हे गरीबीचं दुखणं नाहीसं होईल. शिक्षणासाठी केलेल्या खर्चाची थोडीफार भरपाई हुंड्यातून काढता येईल. आणि आता हे 'बाजीरावचे बेटे' हुंडा घेणार नाही म्हणतात....शपथ घेतलीय म्हणे. उद्या ह्या मोठीच्या लग्नाच्यावेळी कुठला थेरोबा म्हणतोय का बघू.... हुंडा घेणार नाही म्हणून!

आजोबा आपण समजता तितके आपले चिरंजीव अविचारी नाहीत. आपल्या विवाहासाठी सांगली बँकेत आम्ही केव्हाच तरतूद केली आहे.

प्रत्येक विचारी तरुण सांगली बँकेत नित्य बचत करीत असतो.

आपल्या उत्कर्षातील साथीदार

**दि सांगली बँक लि.**

रजि. ऑफीस - राजवाडा चौक, सांगली

चेअरमन एच. आर. रणदिवे



सामान्यांची असामान्य चळवळ
म्हणजेच
सहकारी चळवळ
या विकासशील चळवळीचा दीपस्तंभ

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक, लिमिटेड.**

(दि विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँक संमिलित)
९ नगीनदास मास्तर रोड, विस्तार,
फोर्ट
मुंबई ४०००२३

पीक कर्जे, कृषि औद्योगिक प्रकल्प (प्रक्रिया संस्था) इंजिनिअरिंग संस्था, मुद्रणालये, प्रकाशन संस्था, निवृत्त सैनिक, कागद व्यवसाय, मद्यार्क निर्मिति तसेच अल्पभूधारक, आदिवासी, जंगल कामगार व फेरीवाले या साऱ्यांना विकासाची दिशा दाखविणारा व त्या मार्गावर सतत साथ सोबत देणारा दीपस्तंभ.


# इन्फ्लेशन अथवा अति पैसा वाढ

□ पां. वा. गाडगीळ

बाजार किमती अनेक कारणांनी वाढतात. काही वस्तूंची टंचाई होऊन मागणी कायम राहते अथवा वाढते तेव्हा त्या त्या वस्तूंच्या किमती भडकतात. भारतासारख्या पुष्कळ गरीब लोकसंख्या असणाऱ्या देशात अन्नधान्यावरचा खर्च हा लोकांचा फार मोठा खर्च असतो. अशा देशात अन्नधान्याचा दुष्काळ पडला की अन्नधान्ये महाग होतात, त्यामुळे लोकांचा मुख्य जीवनखर्च वाढून मजुरीचे दर वाढतात व त्यामुळे सर्वच वस्तूंचा उत्पादन खर्च वाढून सार्वत्रिक महागाई होते. वरील दोन्ही प्रकारची किमतवाढ म्हणजे महागाई ही समाजाच्या गरीबीचे लक्षण ठरते. उलट समाजात मोठ्या प्रमाणावर बेकारी असल्यास लोकांच्याजवळ खरेदीशक्तीचा तुटवडा असतो, यामुळे वस्तू खपत नाहीत व त्यांच्या किमती पडतात. पण येथे ही स्वस्ताईच दारिद्र्याचे लक्षण ठरते. अशावेळी विविध उद्योगधंदे सुरू होऊन रोजगारी वाढली तर समाजात खरेदीशक्ती वाढून वस्तूंच्या किमती वाढू लागतात. ही वाढती महागाई यावेळी समाजाच्या वाढत्या वैभवाची द्योतक ठरते. कारण मालाला मागणी वाढत जाण्याने उत्पादन व रोजगारी वाढत जाते. पण याच परिस्थितीत पुष्कळदा उत्पादन वाढीच्या वेगापेक्षा मागणीचा वेग फारच अधिक वाढतो. यामुळे महागाई अधिक वेगाने भडकते. याचे कारण बहुधा उत्पादनवाढीपेक्षा पैशाची वाढ अधिक वेगाने होत असावी हे असू शकेल. पैशाची ही अतिवाढ म्हणजे इन्फ्लेशन.

अति पैसावाढ ही अनेक कारणांनी होते. सरकार महसूलापेक्षा अधिक खर्च करते. त्यासाठी कर्ज काढते अथवा जादा नोटा छापते. या अधिक खर्चातून सरकारने उत्पादक कामे केली तर रोजगारी व खरेदीशक्ती वाढून उपभोग्य मालही वाढतो व मग माल व खरेदी–शक्ती लागोपाठ वाढत जाऊन 'अति पैसावाढ' होण्याचे टळते, महागाई भडकत नाही. कामगार व नोकरवर्गाने वेतनवाढ करून घेतल्यामुळे अथवा अनुत्पादक रोजगारी फाजील वाढल्यामुळे उत्पादनवाढीपेक्षा पैसावाढ अधिक होऊन सर्वच वस्तूंना मागणी वाढते व महागाई भडकते. येथेही 'अति पैसावाढ' हेच महागाईचे कारण असते. व्यापारी बाजाराची कोंडी करून किमती भडकवितात, तेव्हा मजूर व इतर नोकरवर्ग वेतनवाढ करून घेतो. येथे उत्पादनवाढीपेक्षा पैसावाढ होते व पैसावाढ झाल्याने पुन्हा महागाई भडकते. पैसावाढीने किमती वाढणे व किमती वाढण्याने पैसा वाढणे असा उलट सुलट कार्यकारण संबंध घडत असतो. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात महागाई व पैसावाढ एकमेकींच्या ज्या पाठशिवणीने होत गेली तिचे स्वरूप विशिष्ट प्रकारचे आहे. ते खालील रेखाचित्रात दिले आहे. ते रेखाचित्र आता वाचून समजून घेऊ.

अनेक चौकोनांचे हे रेखाचित्र आहे असा प्रथमदर्शनी भास होतो. पण निरखून पाहिल्यास आतल्या चौकोनाची चौथी बाजू पहिल्या बाजूच्या बाहेर जाऊन दुसरा चौकोन सुरू करते व असे




बाहेर बाहेरचे चौकोन आतल्या आतल्या चौकोनाची चौथी बाजू वाढून तयार होतात असे लक्षात येते. महागाई व पैसावाढ यांची पाठशिवणी भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळी कशी होत गेली हे यात दाखविले असून त्याचबरोबर इतर सामाजिक आर्थिक चित्र कसे बदलत गेले हेही या रेखाचित्रातून समजते.

अगदी आतल्या चौकोनाच्या डाव्या बाजूच्या खालच्या टोकास ज्वारी पिकवणारा शेतकरी आहे. सुमारे—वीस पंचवीस वर्षांपूर्वी ज्वारीच्या एक क्विंटल पोत्यास या शेतकऱ्याला व्यापाऱ्याकडून २० रुपये मिळत. त्याच्या वरच्या कोनाला असणारा व्यापारी ते पोते तिसऱ्या कोनाला असणाऱ्या ग्राहकाला तीस रुपयांना विकी. तिसऱ्या कोनाचे ग्राहक म्हणजे कोण ? ज्वारी विकत घेऊन खाणारा सर्व अठरापगड समाज. येथे ग्राहकाला ज्वारी दहा रुपये महाग पडली व व्यापाऱ्याला दहा रुपये फायदा झाला. (या सर्व चौकोनावरच्या खरेदीविक्री व्यवहारात वाहतूक, साठवण वगैरे खर्च उपेक्षिला आहे.) व्यापाऱ्याने ज्वारी एकदम दीडपट महाग कशी केली ? या प्रश्नाचे उत्तर त्या काळच्या परिस्थितीत आहे.

सरकार व खाजगी भांडवलदार नवीन भांडवल गुंतवणूक करून रोजगार भराभर वाढवीत होते. त्यामुळे बाजारात ज्या वेगाने ज्वारीला नवीन गिऱ्हाईक येत होते त्या मानाने ज्वारीचा पुरवठा वाढत नसल्याने व्यापारी ज्वारीच्या पोत्याची किंमत दीडपट करू शकला. या तिसऱ्या कोनातील समाजाकडून शेतकऱ्याला लागणाऱ्या सर्व वस्तू व सेवा शेतकरी खरेदी करतो. चौथ्या कोनाला शेतकरी या वस्तूंचा व सेवांचा खरेदीदार म्हणून उभा आहे. त्याला या वस्तू व सेवा तीस रुपये किंमतीच्या पातळीखाली खरेदी मिळूच शकत नाहीत. कारण तिसऱ्या कोनाच्या जनतेला ज्वारीचे पोते तीस रुपयांना खरीदावे लाग. त्याने शेतकऱ्याला विकायची वस्तू व सेवा तीस रुपयांखाली ती जनता विकूच शकत नाही. याचा परिणाम शेतकऱ्यावर होतो ?

शेतकऱ्याने विकलेल्या पोत्याचे त्याला वीस रुपये मिळाले तर त्याला खरीदाव्या लागणाऱ्या वस्तू व सेवा यासाठी त्याला तीस रुपये गमवावे लागले. म्हणजे त्याचा शेतीव्यवसाय दहा रुपयांनी तुटीचा झाला व व्यापाऱ्याचा त्याच पोत्याच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार दहा रुपयांनी नफ्याचा झाला. दरम्यान या शेतकऱ्याने मजुरी वगैरे करून व व्यापाऱ्याचे कर्ज काढून तूट भरून काढली. शिवाय पुढील साली व्यापाऱ्याकडे शेतकऱ्याने दर पोत्यामागे दहा रुपये जास्त मागितले. येथे आपण दुसऱ्या चौकोनाच्या पहिल्या कोनाशी शेतकऱ्याबरोबर येतो. व्यापाऱ्याने शेतकऱ्याच्या मागणीसरशी दहा रुपये जास्त का दिले ? कारण तिसऱ्या कोनाशी अर्थव्यवहारात खर्च, भांडवल व रोजगारी वाढत असून गिऱ्हाईक वाढत असल्याने तीस रुपयांचे पोते पन्नास रुपयाला आपण विकू अशी व्यापाऱ्याला खात्री होती. त्याप्रमाणे तिसऱ्या कोपऱ्यावरील विविध समाजाला व्यापाऱ्याने पन्नास रुपयाला पोते विकले व वीस रुपये नफा मिळविला. पण या तिसऱ्या कोनावरील विविध समाजाने आपल्या वस्तू व सेवा ज्या शेतकऱ्याला विकल्या त्या तो पन्नास रुपयाला या किंमतीच्या पातळीखाली विकू शकला नाही. कारण त्याला आपले ज्वारीचे पोते रु. पन्नासला खरीदावे लागले होते. परिणामी शेतकऱ्याला पोत्यामागे पहिल्यापेक्षा दुसऱ्या वेळी दहा रुपये अधिक मिळूनही त्याला वीस रुपये तुटीचा शेतीव्यवसाय झाल्याचे आढळले. दरम्यान ज्वारीला वाढीव किंमत मिळणार या आशेने शेतकऱ्याने व्यापाऱ्याकडून कर्ज काढून भांडवल वाढविले, मोलमजुरी, बैलगाडीभाडे वगैरे मार्गांनी तूट भरून काढली. शिवाय पूर्वी तूट आली म्हणून व्यापाऱ्याकडून आता दर पोत्यामागे आणखी वीस रुपये मागितले व तिसऱ्या कोनाजवळील गिऱ्हाईक वाढते असल्याने आपण ते पोते रुपये पंच्याहत्तरला विकू शकू या भरवशाने व्यापाऱ्याने शेतकऱ्याला वीस रुपये अधिक दिले व पंच्याहत्तर रुपये पोत्यामागे किंमत मिळवून पंचवीस रुपये नफा मिळविला. याच क्रमात शेतकऱ्याला खरेदी कराव्या लागणाऱ्या वस्तू व सेवा रुपये पंच्याहत्तर या किंमतीच्या पातळीत खरीदाव्या लागल्यामुळे शेतकऱ्याचा शेतीव्यवसाय पुन्हा पंचवीस रुपये तुटीचा झाला.

पाच क्रमात ज्वारीच्या पोत्याची किंमत पुढे ११० रुपयांत

मली व त्यानंतरही ती वाढत राहिली. एकेका वर्षाला एकेक चौकोन वाढत गेला असे मला येथे म्हणायचे नाही. महागाई कशा मार्गाने व क्रमाने वाढत गेली हे मला येथे स्थूलमानाने दाखवायचे आहे.

याच रेखाचित्रात इतर बरीच आर्थिक-सामाजिक घडामोड चालू असलेली वाचायला मिळते. यातला शेतकरी धान्य विकणारा शेतकरी आहे. घरच्या खाण्याला धान्य ठेवून विकायला उरेल इतके तो पिकवतो. पण हे विकायचे धान्य मोठ्या बाजारात नेऊन नफ्याने विकू शकेल इतका हा शेतकरी सधन नाही. एकूण शेतकऱ्यात सधन शेतकऱ्यांच्या कितीतरी पट मोठी संख्या या शेतकऱ्यांची आहे. नियोजनाच्या काळात धान्याला मिळणाऱ्या वाढत्या किंमतीच्या आमिषाने या शेतकऱ्याने आपले पीक वाढविले आहे. त्याला विविध रोजगारही मिळत राहिला आहे. पण त्याला धान्यविक्रीने मिळणाऱ्या किंमतीपेक्षा; त्याला खरीदाव्या लागणाऱ्या वस्तू व सेवा यासाठी द्याव्या लागणाऱ्या किंमती फार अधिक पडल्याने हा शेतकरी पीकवाढ करीत राहूनही कर्जबाजारीच राहिला आहे. या शेतकऱ्यांची भूधारकांत मोठी संख्या आहे. भूधारक शेतकऱ्यांचा शेतीव्यवसाय, त्याने पीकवाढ सतत केली तरीही तुटीत चालू राहिला असा याचा अर्थ आहे.

याचा शेतीमालाचा व्यापारी मात्र सतत तितक्याच नफ्यात राहिला, शेतकऱ्याची तूट व कर्ज वाढत गेली तसाच या व्यापाऱ्यांचा नफा वाढत गेला. ग्रामीण भागातील हा व्यापार प्राप्तीकरासाठी दाखविण्याच्या पावत्यांनी फार थोडा होत असल्याने काळ्या पैशाचा मुख्य झरा येथून निघतो. या व्यापारी नफ्याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. सरकारने उत्पादनात भांडवल घालण्याची रूढी नव्हती त्या काळी व्यापारी नफा उत्पादनाकडे भांडवल म्हणून जात असे. कारण व्यापारात खरेदीविक्री करण्यासाठी मालाची जरूरी असे. पण सरकारने भांडवल घालण्याच्या व मालपुरवठा वाढविण्याच्या आजच्या काळात, व्यापारी मालपुरवठ्यावर ताबा मिळविणे, त्याची कोंडी करणे यावर पैसा खर्च करतो. उत्पादक भांडवलात भर घालण्याची जबाबदारी स्वीकारीत नाही. आणि गेल्या २५-३० वर्षांत गिऱ्हाईक वेगाने वाढत गेल्याने व्यापारात गुंतविलेल्या भांडवलावर नफा जितका लवकर मिळत गेला, तितका व्यापाऱ्याने उद्योगधंद्यात भांडवल गुंतवले असते तर त्याला मिळाला असता.

व्यापारात पैशाचे हे जे फार मोठे परिणाम फिरत राहते तेही महागाईला कारण होते. कारण उत्पादकापासून गिऱ्हाईकांस माल पोहोचेपर्यंत गरजेहून अधिक दलालांच्या हातून माल पुढे पुढे जातो व किंमत वाढते.

वरील रेखाचित्रातल्या प्रत्येक चौकोनाचा तिसरा म्हणजे उजव्या बाजूचा वरचा कोन हा अति पैसावाढीचा कोन होय. व्यापारी येथे किंमती वाढवितो यामुळे फक्त पगारी नोकर व मजूरवर्ग वेतनवाढीचा आग्रह धरतात. त्यामुळे सर्वच वस्तू व सेवा यांच्या किंमती वाढून बँकांना पैसा वाढवावा लागतो. हेच इन्फ्लेशन. असा पैसा वाढला की त्यामुळे पुन्हा किंमती वाढतातच. पण प्रथम इन्फ्लेशनमुळे किंमती वाढल्या हे खरे नसून किंमती वाढल्या म्हणून इन्फ्लेशन झाले व मग मात्र या दोहोंची पाठशिवणी सुरू झाली.

गेल्या २८ वर्षांच्या नियोजनाच्या काळात शेतीमालाचे उत्पादन वाढले, इतर उत्पादनही वाढले, रोजगारी वाढली, पण हा प्रचंड संख्या भूधारक कर्जबाजारीच राहिला. पैसा वाढला व तो वाढत्या प्रमाणात व्यापारातच जमला आणि काळ्या बाजाराला व महागाईला कारण झाला. सरकारी भांडवलाने रोजगारी वाढली, उत्पादन वाढले, त्यामानाने महागाई व व्यापारी नफे फारच वाढले आणि अत्यल्प भूधारक शेतकरी व भूहीन मजूरी यांची महागाईने लूट झाली असून त्यांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे. या नियोजनाच्या काळात व्यापारी व सावकार हे काळ्या पैशाचे उगम व महागाईचे निमित्त ठरले, तेच सधन झाले, आवश्यकतेपेक्षा व्यापाऱ्यांची संख्या वाढली व उत्पादनापेक्षा व्यापारात पैसा जास्त जाऊन महागाईला कारण झाला. गेल्या २८ वर्षांच्या नियोजनाची संक्षिप्त मीमांसा हीच असून तिचा बोध होण्यास वरील रेखाचित्राचे सहाय्य पुष्कळ होईल. या रेखाचित्रातील शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे ? कर्ज हा त्याच्या आर्थिक जीवनाचा आधार आहे. पण मोठमोठे धंदेवालेही कर्जावरच धंदा करतात. व्याज द्यावे लागते त्यापेक्षा नफा अधिक मिळत असेल तर कर्ज काढून धंदा करण्याने धंदेवाल्यांची सधनता वाढत असते. कर्ज हे येथे दारिद्र्याचे लक्षण नसते. पण वरील रेखाचित्रातला शेतकरी नफ्यात धंदा करीतच नाही. त्याला त्याचा माल विकून जी मिळकत होते, त्यापेक्षा अधिक पैसा खर्चून त्याला गरजेच्या वस्तू व सेवा खरीदाव्या लागत. ही तूट भरून काढण्यासाठी त्याला सतत कर्जबाजारी रहावे लागते. गरीबीच्या रेषेखाली ६० ते ७० टक्के समाज जो भारतात आहे त्यातला हा पहिला थर होय.

गरीब म्हणजे निर्धन व बेकार. या अर्थाने हा शेतकरी गरीब नव्हे. अन्न खरेदी करून खाणारा समाज जवळ जवळ पन्नास टक्के असतो असे मानले जाते. कारण भारतात पन्नास टक्के संपत्ती शेतीत होत असून इतर सर्व निर्मिली जाणारी संपत्ती पन्नास टक्के आहे. या दोन बाजूंच्या संपत्तीच्या विनिमयाने समाजाचे पोषण

होते. अन्नधान्य हे सर्व लोकसंख्येला लागते. आणि आपण उत्पन्न केलेल्या अन्नधान्यापैकी घरच्या खाण्यापुरते ठेवून जो विकतो व त्या विक्रीतून मिळणाऱ्या पैशाशिवाय इतर रोजगारही जो मिळवतो त्याला अखेर उत्पन्नापेक्षा, किमान साध्या राहणीसाठीही खर्च अधिक करावा लागत असेल तर त्याचे किंमतीत व मजुरीत शोषण होत असले पाहिजे असे अनुमान काढणे शक्य होते. अर्थव्यवहार तुटीचा होत असल्याने भांडवल अपुरे पडून त्याचे उत्पादनही शक्यतेपेक्षा कमी होते. म्हणजे या शोषणामुळे हा समाज दरिद्री राहून शिवाय सारी लोकसंख्या जीवनावश्यक अशा अन्नधान्याबाबत दरिद्री राहते.

या रेखाचित्रातील शेतकऱ्याचे दारिद्र्य हे निर्धनत्व व बेकारी यांनी आलेले नसून शोषणाने आलेले आहे. हा शेतकरी व त्याचे अन्नधान्य खाणारा अंतिम ग्राहक या दोहोमधील व्यापारी दूर झाला तर शेतकऱ्याला रास्त किंमत मिळणे, ग्राहकाला रास्त किंमतीला अन्यधान्य मिळणे आणि परिणामी शेतकऱ्याला लागणाऱ्या वस्तू व सेवा यासाठी करावी लागणारा खर्च त्याच्या मिळकतीतून करता येईल. इतक्या खालीपर्यंत त्या वस्तूंच्या व सेवांच्या किंमती येणे हे शक्य होईल.

त्यासाठी शेतीमालाचे खुले बाजार जागोजाग असणे आणि उत्पादकांच्या सहकाराने आणि ग्राहकाच्या सहकाराने खरेदी–विक्री होणे हा उपाय आहे. यामुळे पैशाच्या अतिवाढीचे कारण नाहीसे होऊन हा शेतकरी बँकेच्या कर्जाने भांडवल वाढवील व उत्पादनही वाढवील.

० ० ०

वरील विवेचनात ' इन्फ्लेशन ' या इंग्रजी शब्दाला ' अति पैसावाढ ' हा मराठी शब्द वापरला आहे. ' चलन ' म्हणजे ' करन्सी '. पण ' करन्सी ' म्हणजे सगळा ' मनी ' अथवा पैसा नव्हे. बँकांच्या ठेवी याही पैशात मोडतात. आणि ' इन्फ्लेशन ' होते तेव्हा चलन, ठेवी दोन्ही वाढतात. म्हणजे एकूण सर्व पैसा वाढतो. म्हणून ' अति पैसावाढ ' हा शब्द ' इन्फ्लेशन 'साठी वापरणे योग्य वाटते.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या पहिल्या अधिवेशनात ' इन्फ्लेशन ' विषयी चर्चा करण्याचे जे प्रश्न दिले आहेत त्यात ' इन्फ्लेशन ' कसे होते हा प्रश्न आवश्यक असूनही घातलेला दिसत नाही. त्या प्रश्नाचे संक्षिप्त विवेचन हे सर्व चर्चेत प्रथम क्रमांकाचे मानले जावे व या दृष्टीने वरील विवेचनाचा विचार व्हावा.

☐

# अर्थशास्त्र परिषद पुढील वर्षाचे अधिवेशन !

परिषदेचे १९७८ मधील वार्षिक अधिवेशन नागपूर येथे घेण्याचे ठरले. नागपूर विद्यापीठातर्फे प्रा. पिंपरकर यांनी त्यासंबंधीचे केलेले निमंत्रण परिषदेच्या साधारण सभेने आभारपूर्वक स्वीकारले. या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक प्रा. वि. भा. दांडेकर यांची एकमताने निवड झाली. अधिवेशनातील चर्चेसाठी तीच विषय निवडण्यात आले. ते खालीलप्रमाणे आहेत : (१) नफ्याविषयीचे सिद्धांत, (२) लोकसंख्या आणि आर्थिक विकास, आणि (३) महाराष्ट्रातील एकाधिकार कापूस–खरेदी योजना. याशिवाय तत्कालीन आर्थिक परिस्थितीशी संबंधित असा एक विषय अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील.

पहिल्या वार्षिक अधिवेशनात परिषदेच्या घटनेला दोन महत्त्वाच्या दुरुस्त्या सुचविण्यात आल्या आणि साधारण सभेने त्या संमत केल्या. एका दुरुस्तीन्वये संस्था–सदस्य असा सभासदांचा एक नवीन वर्ग निर्माण करण्यात आला. महाविद्यालये, बँका, व्यावसायिक संघटना, कंपन्या इत्यादी संस्थांना आता परिषदेचे सभासद होता येईल. दुसऱ्या दुरुस्तीप्रमाणे परिषदेच्या कार्यकारी मंडळावर ' कार्याध्यक्ष ' हे एक जादा पद निर्माण करावे व या पदासाठी निवडणूक दर तीन वर्षांनी व्हावी असे ठरले. पहिले कार्याध्यक्ष म्हणून प्रा. नी. वि. सोवनी यांची एकमताने निवड करण्यात आली. प्रा. वि. म. दांडेकर (अध्यक्ष) प्रा. नी. वि. सोवनी (कार्याध्यक्ष) आणि डॉ. रवींद्र सबनीस (कार्यवाह), यांच्या व्यतिरिक्त खालील आठ सदस्य कार्यकारी मंडळावर बिनविरोध निवडून आले. प्राचार्य प्र. ज. जोशी, प्रा. प्रमोद ठोंबरे, डॉ. स. हृ. देशपांडे, डॉ. आनंद नाडकर्णी, प्रा. रमेश पानसे, प्रा. ग. प्र. पिंपरकर, प्रा. मु. गो. भानुशाली, आणि प्राचार्य या. शि. महाजन. याशिवाय नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. एम्. ए. देशपांडे यांची स्थानिक कार्यवाह म्हणून अध्यक्षस्थानी नियुक्ती केली.

☐

मराठी अर्थशास्त्र परिषदेस
आमच्या शुभेच्छा

साठे बिस्किट ॲण्ड चॉकोलेट
कं. लि.

पुणे ४११००२.

# महाराष्ट्राची ग्रामीण रोजगार हमी योजना

## काही सैद्धान्तिक समस्या

**प्रा. एस्. एन्. माने**

प्रमुख – अर्थशास्त्र विभाग, बळवंत कॉलेज, विटा ( सांगली )

महाराष्ट्राची गेल्या जवळ जवळ तीन वर्षांपासून संबोधण्यात येणारी ' ग्रामीण रोजगार हमी योजना ' आतापर्यंत अनेक स्थित्यंतरांतून गेली आहे. आणि नुकतेच (ऑगस्ट ७७) तिने नवीन व क्रांतिकारक अशा स्थित्यंतरात पदार्पण केले आहे. कारण महाराष्ट्राच्या विधिमंडळाने, बेकार व धडधाकट अशा व्यक्तींने कामाची मागणी करूनदेखील तिला कामाचा पुरवठा करता आला नाही, तर बेकारभत्ता देण्याची कायदेशीर जोखीम पत्करण्याचे वचन देणारे अपूर्व असे ' ग्रामीण रोजगार हमी विधेयक ' मंजूर केले आहे. महाराष्ट्रातील ' क ' वर्ग नगरपरिषदांच्या स्तरापर्यंतच्या प्रत्येक बेकार, धडधाकट व पंधरा वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि कामाची मागणी करणाऱ्या व्यक्तीला काम किंवा बेकारभत्ता देण्याची कायदेशीर तरतूद नवीन ( ऑगस्ट ७७) ग्रामीण रोजगार हमी योजनेत करण्यात आली आहे. ते काय किंवा तो बेकारभत्ता, अर्थातच, त्या व्यक्तीचे शेतीकडून बिगर–शेती क्षेत्राकडे स्थानांतर न करता द्यावयाची तरतूद आहे. १९६९–७४ या काळात ' समन्वित प्रदेश विकास कार्यक्रम ' (Integrated Area Development Programme) या नावाने ती योजना ओळखली गेली. अर्थक्षेत्र शेती–क्षेत्राच्या तत्त्वापेक्षा भूमीहीन शेतमजुरांना रोजगार पुरविण्यावर या योजनेत अधिक जोर देण्यात आला. त्यापूर्वी म्हणजे १९६५–६९ या काळात ' पथदर्शक समन्वित प्रदेश विकास योजना ' ( Pilot Integrated Area Development Scheme) म्हणून ती प्रथम लोकांसमोर आली. ' पागे योजना ' या पर्यायी नावाने ती परिचित आहे. अल्प व सीमान्त शेतकऱ्यांच्या मालकीखालील जमिनीचे क्षेत्र अर्थक्षम करणे हे ' पागे योजने 'चे प्रमुख उद्दिष्ट होते. अशा प्रकारे ग्रामीण रोजगार हमी योजना अनेक स्थित्यंतरांतून गेली असली तरी सैद्धांतिक दृष्टीने ती ' अतिरिक्त श्रमा 'च्या (Surplus Labour) संकल्पनेवर आधारित आहे. अतिरिक्त श्रमाची संकल्पना, बुरख्याखालील बेकारी ' (Disguised Unemployment ) किंवा ' न्यून–रोजगारी Under–employment) या पर्यायी नावानेदेखील ओळखली जात असली तरी वरील प्रत्येक प्रकारच्या संकल्पनेची लक्षणे, स्थल, काल व देशांच्या विकासपरत्वे बदलत गेली आहेत. तात्पर्य, नवीन रोजगार हमी योजना समन्वित प्रदेश विकास कार्यक्रमाची एक अविभाज्य घटकावयव आहे.

गेल्या जवळ जवळ २५ वर्षांत विकास अर्थशास्त्रज्ञांमध्ये न्यून–विकसित देशांच्या ग्रामीण अर्थव्यवस्थांमधील अतिरिक्त श्रमाच्या स्थानांतराविषयी क्वचितच एकवाक्यता दिसून येते. अतिरिक्त श्रमाने युक्त अशा न्यून–विकसित देशांतील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकास करण्याचे दोन परस्परविरोधी दृष्टिकोन मांडण्यात येतात. दोन्ही दृष्टिकोन अतिरिक्त श्रमाचे अस्तित्व मान्य करतात. मात्र अतिरिक्त श्रमाचे शेतीकडून बिगर–शेती क्षेत्राकडे स्थानांतर करण्याविषयी त्यांच्यामध्ये विसंवाद निर्माण होतो. ' अतिरिक्त शेतीविषयक श्रमाची बिगर शेती क्षेत्राकडे जाण्याची गतिक्षमता ' ( Mobility of Surplus Agricultural Labour to Non–agricultural Sector ) या नर्क्स–लेविस प्रतिमानांचा थोडक्यात आशय असा : न्यून–विकसित देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त श्रमाचे स्थानांतर करून त्याचा तरफेसारखा उपयोग केल्यास आर्थिक विकासास आवश्यक असणारी बचत व भांडवलनिर्मिती यांच्यामध्ये भर

पडणे शक्य आहे. या अनुमानाला विरोध करताना प्रो. खुस्रो त्यांच्या 'लोकसंख्येच्या स्थानांतराशिवाय आर्थिक विकास' (Economic Development with No Population Transfer) या प्रतिमानात प्रतिपादन करतात की अतिरिक्त श्रमाच्या शेतीकडून बिगर-शेती क्षेत्राकडील स्थानांतरामुळे, भारतीय संदर्भात, उद्भवणाऱ्या ती 'गळतीच्या समस्या' (Problems of Leakages) आर्थिक विकासाला प्रतिरोध करतील. त्या समस्या थोडक्यात पुढीलप्रमाणे देता येतील :

(अ) न्यून-विकसित देशातील शेतकऱ्यांचा किमतविषयक संवेदनशीलतेचा अभाव व त्याचा परिणाम म्हणून दिसून येणारी पुरवठ्याची अलवचिकता.

(ब) व्यापाराच्या अटी (Terms of Trade) ज्यावेळी शेतीला अनुकूल होतात त्यावेळी बाजारातील विक्रीयोग्य अधिक्यात दिसून येणारी घट व शेतीमालाच्या पाठीमागे कलणाऱ्या पुरवठा वक्राची अभिव्यक्ती.

(क) शेतकऱ्यांच्या तसेच घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांच्या धान्याचा साठा करण्याच्या क्षमतेत वाढ झाल्यामुळे बिगर-शेती क्षेत्रासाठी उपलब्ध होणाऱ्या पुरवठ्यातील वाढीचा अभाव.

पहिले दोन प्रश्न भारतीय शेतीच्या पारंपारिकपणाशी निगडीत आहेत. आणि सर्वसामान्य विधान करण्याचे साहस पत्करून असे म्हणावेसे वाटते की अतिरिक्त श्रमाचे प्रमाण भारतीय शेतीच्या पारंपारिकतेच्या घटकावयवांबरोबर वाढत जाते. तिसरा प्रश्न भांडवलशाहीप्रणित शेतीशी निगडीत आहे. त्यामुळे धान्यांचे उत्पादन मर्यादित करून किंवा उत्पादित धान्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करून धान्यांच्या किमती वाढविण्याची प्रवृत्ती बळावते. आणि प्रो. नर्क्स प्रतिपादन करतात त्याप्रमाणे बचत व भांडवलनिर्मितीत अपेक्षित भर पडण्याऐवजी परिणामतः भाववाढीचे विळखे आर्थिक विकासाला प्रतिरोध करतात. शिवाय भारतात काय किंवा महाराष्ट्रात काय, औद्योगिकरणाचा वेग वाढवून ग्रामीण क्षेत्राकडून येणाऱ्या अतिरिक्त श्रमाच्या प्रवाहाला संपूर्णतया व किफायतशीरपणे सामावून घेण्यावर निश्चित अशा तांत्रिक व लोकसंख्यावाढीच्या वेगातून उद्भवणाऱ्या मर्यादा पडतात. अशा परिस्थितीत महाराष्ट्राच्या नवीन ग्रामीण रोजगार हमी योजनेत प्रो. खुस्रो यांच्या प्रतिमानाची व्यवहार्यता अप्रत्यक्षपणे समर्थनीय ठरली आहे. दुसऱ्या शब्दात, प्रो. नर्क्स यांचे प्रतिमान, भारतीय संदर्भात, व्यवहार्य व म्हणून समर्थनीय ठरू शकत नाही.

अतिरिक्त श्रम किंवा न्यून-रोजगारीशी संबंधित महाराष्ट्राच्या योजनेच्या संदर्भात कोणते प्रतिमान अधिक व्यवहार्य व म्हणून समर्थनीय हा प्रश्न महत्त्वाचा आहेच, परंतु त्या योजनेच्या प्रत्यक्ष कार्यवाहीच्या संदर्भात अधिक महत्त्वाचा कोणता प्रश्न असेल तर तो म्हणजे विविध व परस्परविरोधी पदरांचे मिश्रण झालेली रोजगारीची (Multi dimensional Magnitudes of Employment) संकल्पना पुरती ध्यानात घेऊन कामांचा पुरवठा करणे. आणि त्या अनुरोधाने बेकार व्यक्तींना काम किंवा बेकारभत्ता देण्याची कायदेशीर हमी देणाऱ्या योजनेची प्रत्यक्ष कार्यवाही करताना काही व्यावहारिक मर्यादा व सैद्धान्तिक समस्या निर्माण होतात. त्यांचा या ठिकाणी थोडक्यात विचार करण्याचे योजले आहे.

आपण पाठीमागे निर्देश केला त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या ग्रामीण रोजगार हमी योजनेचे मूळ १९६५ च्या 'पथदर्शक समन्वित प्रदेश विकास योजने'त सापडते. १९६९ पर्यंत त्या योजनेची व्याप्तता अर्थक्षम शेती-क्षेत्रापुरती मर्यादित ठेवण्यात आली. १९६९-७४ या काळात योजनेची व्याप्ती भूमीहीन शेतमजुरांपर्यंत वाढविण्यात आली. आणि मार्च ७५ ते ऑगस्ट ७७ या काळात महाराष्ट्रात त्या योजनेचा व्याप-विस्तार बराच वाढला. ऑगस्ट ७७ नंतर तथाकथित बेकार व्यक्तीला काम किंवा बेकारभत्ता देण्याची कायदेशीर जोखीम त्या योजनेत स्वीकारण्यात आली आहे. आणि म्हणून ऑगस्ट ७७ च्या नवीन योजनेकडून अपेक्षित हेतूंची पूर्तता होईल किंवा काय, हे पाहण्यापूर्वी मागील योजनेच्या अनुभवाकडे आज दुर्लक्ष केल्यास ती एक चूक ठरेल. म्हणून निरनिराळ्या पाहणीत काढलेल्या निष्कर्षांमधून स्पष्ट झालेल्या काही ठळक उणिवांचा आता थोडक्यात निर्देश करू.

(१) १९६५-६९ काळातील 'पथदर्शक' योजना प्रामुख्याने छोट्या शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात तिचा अधिकतर लाभ सधन शेतकऱ्यांसाठी झाला. त्याचे असे झाले, छोट्या शेतकऱ्यांकडून कसल्या जाणाऱ्या जमिनीची बांधबंदिस्ती करणे व ती जमीन समपातळीत आणण्यासाठी १९६७-६८ मध्ये २ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले. परंतु मोठ्या शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या गाव-गोदामांवर २.८ लक्ष रुपये खर्च करण्यात आले.

(२) त्या वर्षी ५० टक्के आर्थिक सहाय्य देऊन भूमिहीन मजुरांना १८०० बकऱ्या पुरविण्याचे ठरविण्यात आले. परंतु प्रत्यक्षात फक्त १९९ बकऱ्या पुरविण्यात आल्या.

(३) १९६६-६९ मध्ये एकूण ९७ विहिरी तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले. परंतु १९७० पर्यंत एक-दोन विहिरींचा अपवाद सोडला तर एकही विहीर संपूर्णतया पूर्ण होऊ

शकली नाही.

(४) भूमिहीन मजुरांच्यासाठी आखण्यात आलेल्या कार्यक्रमांचा निर्देश कागदोपत्रीच राहिला.

(५) योजनेसाठी निर्माण करण्यात आलेल्या जिल्हा जमीन–सुधारणा मंडळा'वर मास्टर प्लॅन तयार करण्याची जबाबदारी टाकण्यात आली. पण प्रत्यक्षात ते काम समाधानकारकपणे पूर्ण होऊ शकले नाही. परिणामतः औडक–चौडक प्रकल्प हाती घेण्यात आले व त्यांची कार्यवाही घाईगर्दीनेच झाली. औडक–चौडक प्रकल्पांवरील खर्चदेखील औडक–चौडक असाच असतो हे सांगण्याचे कारण नाही.

(६) विशिष्ट विभागात योजनांतर्गत कामे सुरू झाल्यानंतर दोन वर्षांनी त्या विभागातील लोकांची सामाजिक-आर्थिक अशी आधारभूत माहिती गोळा करण्यात आली. म्हणजे 'आधी कळस मग पाया' अशी अजब अवस्था दिसून येते. योजनेनंतर अशी माहिती गोळा करण्याइतकेच योजनेपूर्वी अशी माहिती गोळा करणे महत्त्वाचे ठरते.

(७) विशेष महत्वाचा निष्कर्ष असा की योजनेच्या असमाधानकारक प्रगतीला 'मध्यस्थ म्हणून वावरणाऱ्या धंदेवाईक राजकारणी व्यक्ती' प्रामुख्याने जबाबदार आहेत.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की या योजनेखाली अल्प भूमीधारकांचे सुधारीत बी-बियाणे, खते व जंतुनाशके यांचा उपयोग करण्याचे प्रमाण वाढले. परंतु कुक्कुटपालन केंद्रांचा अनुभव केवळ असमाधानकारक नसून तो निराशाजनकदेखील आहे. बरीच केन्द्रे बंद पडली, व अर्थातच थकबाकीची नवीन समस्या निर्माण झाली.

मार्च १९७५ ते ऑगष्ट १९७७ मधील योजनेचा अनुभवदेखील फार निराळा आहे असे समजण्याचे कारण नाही. वरीलपैकी बहुतेक उणिवांचे निवारण करता आले नाही, असे महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या अंदाज समितीने विधिमंडळाला नुकताच सादर केलेल्या अहवालावरून स्पष्ट होते. योजनान्तर्गत कामावर अंदाजित केलेला खर्च प्रत्यक्षात लादण्यात आला नाही. तसेच काही प्रकल्प सुरु झाले तरी त्यांचे आराखडे तयार करणे व आधारभूत माहिती गोळा करणे यांच्या बाबतीत चांगलीच चालढकल झाली.

महाराष्ट्राच्या योजनेवर मर्यादा पडण्याची अनेकविध कारणे आहेत. आणि त्यांचा पाठीमागे निर्देश करण्यात आला. या उणिवा अगर मर्यादा निर्माण होण्याचे एक प्रमुख कारण म्हणून विविध व परस्परविरोधी पदरांच्या मिश्रणाने तयार झालेल्या रोजगारीच्या संकल्पनेचा निर्देश या ठिकाणी अनिवार्य ठरतो. त्या शिवाय महाराष्ट्राच्या नवीन ( ऑगष्ट ७७ ) योजनेच्या कार्यवाहीच्या संबंधात उद्भवणाऱ्या पुढील काही सैद्धान्तिक समस्यांचे समाधानकारक उकल होऊ शकणार नाही. म्हणून त्या समस्यांचा विचार करणे या ठिकाणी उचित ठरते.

(१) दारिद्र्याचे दुष्टचक्र फोडणे हे ऑगस्ट ७७ च्या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्या हेतूने कामाचा पुरवठा करण्यात येणार आहे. परंतु कामाचा अभाव म्हणजे दारिद्र्य नव्हे. जमीनमालकाच्या शेतावर कूळ किंवा भू–दास म्हणून राबणारी व्यक्ती बरेच काम करते. म्हणून ती सहन झाली असे नाही. उलट, जमीनमालक तौलनिक दृष्टीने अल्प काम करतो, अगर अजिबात काम करत नाही. परंतु तो एकमेकांशी संपूर्णतया समकक्ष चांगलाच सधन असतो. दारिद्र्य व बेकारी एकमेकाशी निगडीत असतील. परंतु ते एकमेकाशी संपूर्णतया समकक्ष नाहीत. कामाच्या जोडीला अगर त्यापूर्वी 'उत्पादनातील नाते–संबंध' सुधारणे अधिक महत्त्वाचे व आवश्यक ठरते.

(२) महाराष्ट्राच्या शेतीत अतिरिक्त श्रम अस्तित्वात आहे असे घटकाभर समजू. असे समजण्याचे कारण असे की श्रमाची सीमांत उत्पादकता शून्य होणे ही अतिरिक्त श्रमाची अद्याप प्रस्थापित झालेली अट नाही. परंतु अतिरिक्त श्रमाचे बिगर–शेती क्षेत्राकडे स्थानान्तरित केल्यामुळे शेतीतील उत्पादन वाढेल असे समजू. निदान ते घटणार नाही. परंतु त्या शेतीत पाठीमागे राहाणारांचे उत्पन्न वाढू शकेल काय ? तसेच स्थानान्तरित अतिरिक्त श्रमाचे आता बिगर–शेती क्षेत्रात काम मिळाल्यामुळे पैशातील उत्पन्न वाढेल. परंतु त्या कामामुळे वास्तव उत्पादन वाढेल याची हमी कोण व कशी देणार ? जर आज पुरविलेल्या कामातून मिळालेल्या वेतनाच्या प्रमाणात उद्या उत्पादन वाढले नाही, तर परवा अशा श्रमावर करावा लागणारा गुंतवणूक–खर्च घटण्याच्या प्रवृत्तीचा झाल्याशिवाय राहणार नाही. मग भविष्यकाळात बेकारी नष्ट करणारा रोजगारीचा कार्यक्रम अखंडितपणे कसा चालू ठेवायचा ? म्हणून कामाचा पुरवठा करण्यापूर्वी त्यांची काळजीपूर्वक आखणी व नियोजन अनिवार्य ठरतात. हे काम तांत्रिक तसेच प्रशासकीय स्वरुपाचे आहे. आज ते काम कार्यकुशलतेने व चोखपणे पार पाडले जाईल याची हमी मिळण्यायोग्य महाराष्ट्राची परिस्थिती व तयारी नाही असा आजपर्यंतचा अनुभव आहे. मग कामाची हमी देणारा कायदा काही म्हणो.

भारतीय संदर्भात बोलायचे झाल्यास आज अन्नमहामंडळाकडे सर्वाधिक म्हणजे सुमारे २२ दशलक्ष टन इतके धान्य गोळा झाले आहे. तसेच मार्च ७७ पासून रिझर्व बँकेकडे विदेश विनिमयात चांगलीच भर पडत आहे. परंतु पाच घटक] राज्यांपेक्षा अधिक

राज्यांमध्ये 'कामासाठी–अन्न–प्रकल्प' ( Food For Work Scheme ) सुरू करून त्या वित्तसाधनांचा उपयोग केल्याचे दिसत नाही. विपुलतेतील दारिद्र्याचा हा अजब नमुना म्हणावा लागेल.

(३) सदरची योजना ज्या वित्तविषयक निवेदनपत्रिकेवर ( Financial Memorandum ) आधारित आहे त्या निवेदनपत्रिकेत असा अंदाज करण्यात आला आहे की एका वर्षात ९९२ दशलक्ष मनुष्य दिवस इतक्या कामाची एकुणात मागणी येऊ शकेल. मात्र प्रत्यक्षात १८० दशलक्ष मनुष्य–दिवस इतक्या कामाचा पुरवठा करणे शक्य आहे आणि त्यावर केवळ वेतन म्हणून वर्षाकाठी ५४ कोटी रुपये खर्च होणार आहेत. याचा अर्थ असा की एका महिन्यातील कामाचे २५ दिवस धरल्यास एका वर्षाचे असे ३०० मनुष्य–दिवस होतात. आणि १८० दशलक्ष मनुष्य–दिवस इतक्या कामाचा एका वर्षात पुरवठा होईल हा अंदाज ध्यानात घेऊन वर्षाकाठी ६ लक्ष व्यक्तींना काम मिळू शकेल. आणि एका व्यक्तीला ८ तासांच्या कामाच्या एका दिवसाकाठी ३ रुपये याप्रमाणे ६ लक्ष व्यक्तींना एका वर्षात वेतनापोटी ५४ कोटी रुपये मिळतील. आणि या हिशेबाप्रमाणे ९९२ दशलक्ष मनुष्यदिवस इतक्या कामाचा पुरवठा करण्यासाठी ( एका वर्षात सुमारे ३३ लक्ष व्यक्तींना काम देण्यासाठी ) केवळ वेतनापोटी जवळ २९७ कोटी रुपये खर्च करावे लागतील. परंतु या ठिकाणी प्रश्न केवळ ५४ कोटी रुपये किंवा २९७ कोटी रुपये असा नाही. रोजगारीकडे आपण खर्च (Cost) म्हणून पाहणार किंवा लाभ (Benefit) म्हणून पाहाणार हा खराखुरा प्रश्न आहे.

ऑगस्ट ७७ च्या योजनेत काम किंवा बेकारभत्ता मिळण्यासाठी तीन अटी दिलेल्या आहेत. पहिली अट अशी की काम मागणारी व्यक्ती धडधाकट हवी. दुसरी अट म्हणजे तिचे वय पंधरा वर्षापेक्षा कमी असता कामा नये. तिसरी अट म्हणजे ती व्यक्ती बेकार असली पाहिजे. पहिल्या दोन अटी सरळ व समजण्यायोग्य आहेत. परंतु तिसरी अट तांत्रिक व म्हणून गुंतागुंतीची आहे. उपलब्ध माहितीनुसार बेकार किंवा काम मागणाऱ्या व्यक्तींचे अनेकविध प्रकार पडतात. सध्या काम करणाऱ्या ( Engaged in work ), कामाच्या शोधात असलेल्या (Persons Seeking work ), काम न करणाऱ्या ( Not working) व कामासाठी उपलब्ध होणाऱ्या ( Available For work ). या प्रत्येक प्रकारात मोडणाऱ्या व्यक्तींना मोघमपणे काम पुरविण्यापूर्वी तारतम्य बाळगण्याची गरज निर्माण होते. समजा, अर्थशास्त्रातील डॉक्टरेट संपादन केलेल्या व्यक्तीला महाविद्यालयात प्राध्यापकांची नोकरी मिळाली नाही. त्यामुळे एस. टी. बसचा वाहक होण्याची त्याच्यावर पाळी आली. नियमानुसार प्रवाशांकडून योग्य पैसे घेऊन त्यांना तिकिटे देणे, निवाऱ्याच्या ठिकाणी प्रवासी उभे असतील तर सिंगल बेल व नसतील तर डब्बल बेल देणे ही कामे त्या वाहकाला करावी लागतात. त्यासाठी अर्थशास्त्रातील डॉक्टरेटची मुळीच जरूरी नाही. थोडक्यात, आपला वाहक कामावर आहे. परंतु एखाद्या महाविद्यालयात प्राध्यापकाची जागा निर्माण झाली तर त्या जागेवर प्राध्यापक म्हणून काम करण्याची त्याची इच्छा आहे. म्हणजे तो कामाच्या शोधात आहे. परंतु रस्त्याच्या बांधकामावर खडी फोडण्याचे काम चालून आले तरी त्याची ते स्वीकारण्याची तयारी नाही. म्हणजे उत्पन्नाच्या दृष्टिकोनातून तो वाहक पूर्णांशाने बेकार नाही, किंवा त्याच्या पदवीच्या दृष्टिकोनातून तो पूर्णांशाने कामावर नाही. तसेच काही व्यक्ती काम करत नाहीत. म्हणून त्या पुरविण्यात आलेल्या कामासाठी उपलब्ध होतीलच असे नाही. शिवाय, तांदळात गारगोटीच्या वाळूची भेसळ करण्यासाठी त्या गारगोटीपासून तांदूळासदृश वाळूचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यातील व्यक्तींना तांत्रिक दृष्टीने काम मिळाले आहे. परंतु सामाजिक व नैतिक दृष्टिकोनातून (कदाचित् म्हणून प्रो. मिर्डाल म्हणत असावेत की दारिद्र्याची समस्या केवळ आर्थिक नसून ती एक सामाजिक समस्या आहे.) त्या रोजगारीला 'बेरोजगारी' (Misemployment) म्हणावे लागेल. म्हणून काम पुरविण्यापूर्वी प्रत्येक प्रकारात मोडणाऱ्या व्यक्तींच्या स्थितीचा तारतम्याने विचार करणे जरूर आहे.

४) आठ तासांच्या कामाबद्दल बेकार व्यक्तीला दिवसाकाठी तीन रुपये मिळणार आहेत. काम मागून त्याचा पुरवठा करता न आल्यास तिला घरी बसून बेकारभत्ता म्हणून एक रुपया मिळणार आहे. परंतु वेतन दर व बेकारभत्ता म्हणून दिवसाकाठी एक रुपया मिळणार आहे. परंतु वेतन–दर व बेकारभत्ता यांच्यातील तफावत अशी आहे की आठ तास काम करून तीन रुपये मिळविण्यापेक्षा घरी बसून एक रुपया मिळविणे अधिक पसंत केले जाईल. निदान चारी बाजूंनी तसे दबाव निर्माण होण्याची शक्यता टाळता येणार नाही.

वरीलपैकी बहुतेक समस्या निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे १९७० पर्यंत, पाठीमागे निर्देश केलेल्या विविध व परस्परविरोधी पदरांनी युक्त अशा रोजगारीच्या संकल्पनेकडे, आपले लक्षच गेले नाही. पहिल्या चार पंचवार्षिक योजनान्तर्गत रोजगारनिर्मितीचा कार्यक्रम लोकसंख्येतील वाढ व त्यावर अवलंबून असणारी श्रम–शक्ती यांच्या पलिकडे गेलाच नाही. त्यामुळे रोजगार वाढीविषयीचे प्रयत्न 'अर्थपूर्ण नव्हते व उपयुक्त

नव्हते ' असे आपले मत देताना 'बेकारीच्या अंदाजावरील तज्ज्ञ समितीच्या अहवालात ' स्पष्ट करण्यात आले आहे. पुढे अहवालात असा इशारा देण्यात आला आहे की रोजगारीविषयी 'अप्रसंगोचित ' ठरणाऱ्या विचाराचा त्याग करण्यात यावा. मात्र महाराष्ट्राच्या योजनेत (ऑगस्ट ७७) रोजगाराच्या अनेकपदरी संकल्पनेचे पुरेसे प्रतिबिंब पडले आहे असा निर्णय करणे कठीण आहे. डॉ. राज व प्रो. अमर्त्य सेन यांच्या अनुक्रमे लेखात व ग्रंथात तसेच 'राष्ट्रीय नमुना पाहणींच्या अलिकडील काही फेऱ्यां 'मध्ये भारतातील बेकारीविषयी उपर्युक्त व विचार-प्रवर्तक माहिती उपलब्ध झाली आहे. तिच्या आधारे मांडण्यात येणारी रोजगारीच्या संकल्पनेची स्वरुपे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) उत्पन्न स्वरूपाची रोजगारी : ही कामावरील व्यक्तीला उत्पन्न देते.:

ब) उत्पादन स्वरूपाची रोजगारी : ही उत्पादनाची पैदास करते.

क) मान्यता स्वरूपाची रोजगारी : ही कामावरील व्यक्तीला दरम्यानच्या काळात कसाबसा वेळ मारून नेण्यासाठी काम करण्याची मान्यता देते.

आतापर्यंतच्या बेकारी निवारण करणाऱ्या महाराष्ट्राच्या योजनेत बुरख्याखालील बेकारीवर अधिकतर जोर देऊन कामावरील व्यक्तींना उत्पन्न कसे मिळेल एवढ्यापुरतेच प्रयत्न मर्यादित राहिले. आणि उरलेल्या दोन प्रकारांची उपेक्षाच झाली. रोजगारीमुळे कामावरील व्यक्तीला उत्पन्न मिळणे जितके सहज शक्य असते. तितके त्या उत्पन्नातून अपेक्षित उत्पादनाची निपज करणे सहज शक्य नसते. महाराष्ट्राची योजना ( ऑगस्ट ७७ ) या अनुभवाला अपवाद ठरो इतकीच अपेक्षा. नाहीतर भविष्यकाळात रोजगार हमी योजनेखाली कामावरील व्यक्तीला मिळणारे उत्पन्न व अंध विधवेला पोटगी म्हणून मिळणारे बदली उत्पन्न ( Transfer Earning ) यांच्यामध्ये फरक करणे अर्थशास्त्रज्ञाला कठीण होऊन बसेल.

## समारोप

मे १९६५ ते ऑगष्ट १९६७ या काळात महाराष्ट्राची योजना अनेक स्थित्यंतरातून गेली आहे. त्या योजनेच्या असमाधानकारक प्रगतीची कारणे म्हणून सधन शेतकऱ्यांचा प्रभाव, काळजीपूर्वक नियोजनाचा अभाव, आधारभूत माहिती गोळा करण्याच्या कामातील दिरंगाई, त्यामुळे एरवी टाळता येण्यासारखा परंतु प्रत्यक्षात अटळ ठरणारा ओढक-चोढक खर्च, मध्यस्थ म्हणून वावरणाऱ्या धंदेवाईक राजकारणी व्यक्ती व विशेषत: विविध व परस्परविरोधी पदरांनी युक्त अशा रोजगारीच्या संकल्पनेची उपेक्षा अशा घटकांचा आपण निर्देश केला.

न्यून-विकसित देशांच्या आर्थिक विकासाविषयी दोन परस्परविरोधी प्रतिमाने मांडण्यात येतात. त्यांचा प्रातिनिधीक स्वरूपात आपण निर्देश केला. एका प्रतिमानानुसार अतिरिक्त श्रमाचे स्थानांतर करून भांडवलनिर्मितीत अपेक्षित भर पडू शकते. आणि आर्थिक विकास करणे शक्य होते, तर दुसऱ्या प्रतिमानानुसार त्या आर्थिक विकासाला प्रतिरोध करणारे गळतीचे प्रश्न उद्‌भवणे अटळ होते. भारताच्या सध्याच्या परिस्थितीचा विचार करता, दुसरे प्रतिमान अधिक व्यवहार्य व म्हणून समर्थनीय वाटते. कारण वाढती लोकसंख्या, श्रम-प्रधान उत्पादन पद्धतींवर पडणाऱ्या मर्यादा, स्थानांतरित अतिरिक्त श्रमाला संपूर्णपणे व किफायतशीरपणे सामावून घेण्याची उद्योगांची मर्यादित क्षमता व स्वयंपोषित आर्थिक विकासास आवश्यक असलेल्या बचत व गुंतवणूक दरांचा अभाव यांच्यामुळे महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेसारख्या बेकारी निवारण करणाऱ्या कार्यक्रमाला निदान नजिकच्या काळात अधिक चांगला पर्याय दिसत नाही. म्हणजे ग्रामीण बेकारीची समस्या शेतीतच सोडविणे अटळ व शक्य आहे. तथापि अतिरिक्त श्रमाचे स्थानांतर न करता ग्रामीण क्षेत्रातील बेकारीच्या व्याप-विस्तारावर (म्हणजे रोजगारीच्या अनेकपदरी संकल्पनेवर) चौफेर नजर ठेवण्याची गरज आहे. केवळ 'उत्पन्नासाठी रोजगारी ' या प्रकारापुरता कार्यक्रम मर्यादित ठेऊन बेकारीची समस्या कायमची मुटणे शक्य नाही. बेकारीचे निवारण करणाऱ्या कार्यक्रमाचे यश कामातून अधिक तर उत्पादनाची किंवा जिंदगीची (Assets) वाढ होणे व कामाची मागणी करणाऱ्या व्यक्तींना शक्यतो त्यांच्या कुवतीनुसार व कसबानुसार काम पुरविणे यावर अधिक निर्भर आहे. □

# चक्री योजनेची पहिली दिवाळी

## प्रा. सिद्धार्थ चक्रवर्ती

आणीबाणीच्या अंधारयुगात सत्तेच्या केंद्रीकरणाने जी दडपशाही निर्माण झाली होती तिचे निर्मूलन करून देशात खुले, निर्मळ आणि स्वतंत्र वातावरण सर्व क्षेत्रांत निर्माण करण्याचे धोरण जनता पक्षाने निवडणुकीच्या पूर्वीच जाहीर केले होते. पक्षाच्या जाहीरनाम्यात दारिद्र्य, अज्ञान आणि रोगराई ह्या देशाच्या महत्त्वाच्या आर्थिक समस्या सोडविण्याचे आश्वासन होते. पक्षाला 'भाकरी,' इतकेच 'स्वातंत्र्य'ही महत्त्वाचे वाटते. व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि लोकशाही ही मूल्ये अबाधित ठेवून आर्थिक प्रगतीला वेग द्यायचे हा दृष्टिकोन पक्षाने स्वीकारला असून लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत कोटयावधी लोकांनी ह्या प्रकारच्या नव्या धोरणाचे स्वागतच केले, एवढेच नव्हे तर आपल्या मतदानाने त्यास स्वीकृती दिली. जनता पक्षाच्या मंत्रिमंडळाने ह्याच धोरणाचा पाठपुरावा आपल्या 'पहिल्या वहिल्या अंदाजपत्रकात केला आहे असे अर्थमंत्र्यांनी बजेटवरील भाषणात सांगितले.

बजेट सादर करण्यासाठी संबंधित मंत्रालयास जो मर्यादित वेळ उपलब्ध होता ती गोष्ट बजेटचे मूल्यमापन करताना भाष्यकारांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

ह्या बजेटच्या कार्यवाहीनंतर बजेटमध्ये चालू वित्तीय वर्षात जे बदल होतील, तसेच ज्या काही नव्या तरतुदी होतील, त्यांचा परामर्ष अधिक विस्ताराने घेण्याची जरूर आहे.

तूर्तच्या परिस्थितीत बजेटमधील त्रुटींना दोष देत बसण्यापेक्षा बजेट जाहीर करण्यात जी तडफ आणि उरक दाखविला गेला त्याचे अभिनंदन करणे उचित होईल.

१९७७–७८ ह्या चालू वित्तीय वर्षात सरकारकडे सर्व मार्गाने येणाऱ्या उत्पन्नाबद्दलची अंदाजी रक्कम १५,३६६ कोटी रुपये आहे. त्यात ८,८७९ कोटी रुपयांचा, म्हणजे एकूण सरकारी उत्पन्नाचा ५० टक्के भाग सर्व प्रकारच्या करांच्या उत्पन्नामुळे सरकारी तिजोरीत जमा होणार आहे. मागील वर्षाच्या तुलनेने यंदा ७९८ कोट रुपयांची निव्वळ करवाढ झाली आहे. केंद्रीय उत्पादनकरामध्ये ३७३ कोट रुपयांची आयकर आणि कंपनी कर ह्यामध्ये १८० कोट रुपयांची तसेच परदेशी व्यापारातील जकातीमध्ये २४३ कोट रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

करवाढीव्यतिरिक्त इतर उत्पन्नवाढीच्या मार्गांमध्ये सरकारी कर्जाचा प्रामुख्याने समावेश होतो. गेल्या वर्षी ८४९ कोट रुपयांचे कर्जरोखे विकले गेले. ह्या वर्षी १००० कोट रुपयांचे कर्ज उभे करता येईल असा अंदाज आहे.

आपल्या देशाने मिळविलेल्या परकीय चलनाच्या आधाराने ८०० कोट रुपयांचे कर्ज उभे करता येईल.

देशाच्या तसेच राज्यांच्या नियोजन खर्चाकरता ५,७९० कोट रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षी ह्या आकडा ४,७५९ कोट रुपये एवढाच होता. बजेटवरून असे दिसते की, सध्या प्रचलित असलेला विकासाचा दर आणि आर्थिक प्रगतीचे वातावरण ह्यात उत्साह व वेग (Tempo) वाढविणे नव्या मंत्रिमंडळास इष्ट वाटते.

नियोजित खर्चाव्यतिरिक्त नेहमीच्या प्रशासकीय व अन्य कारणांकरिता होणाऱ्या सरकारी खर्चात कपात व्हावी असा अर्थमंत्र्यांचा आग्रह आहे. त्याकरता साधेपणा आणि काटकसर ह्यांवर भर देण्यात येणार आहे. अनावश्यक खर्चाचे प्रकार लक्षात आणून संबंधित खात्यांना ते खर्च टाळण्यासाठी स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

चालू वार्षिक अंदाजपत्रकाचे दृष्टिक्षेपात आकलन होण्यासाठी सोबत कोष्टक दिले आहे.

## अर्थसंकल्प १९७७–७८

| महसुली खाते Revenue Account | १९७६–७७ (अर्थसंकल्प | १९७६–७७ सुधारित अर्थसंकल्प | १९७७–७८ (अर्थसंकल्प) |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ८२१९ | ८५०७ | ९५५४ |
| खर्च | ७६९० | ८५५४ | ९४८७ |
| | +५२९ | –४७ | +६७ |
| भांडवल खाते Capital Account | | | |
| उत्पन्न | ४४२३ | ५२५२ | ५९४२ |
| खर्च | ५२८० | ५६३० | ६०८१ |
| | –८५७ | –३७८ | –१३९ |
| एकूण तूट | –३२८ | –४२५ | –७२ |

ह्या कोष्टकाकडे पाहिल्यास खालील निष्कर्ष ठळकपणे लक्षात येतात.

१. बजेटमधील सरकारी उत्पन्न आणि खर्चांच्या रकमा मागील बजेटपेक्षा अधिक आहेत.

२. १९७६–७७ च्या सुरुवातीच्या अर्थसंकल्पात खर्चवजा शिलकी रक्कम (महसूल खात्यात) ५२९ कोटी रुपयांची होती. पण त्यानंतर प्रत्यक्षात त्या वर्षी सरकारी खर्चात वाढ झाल्याने महसुली तूट ४७ कोटी रुपयांची होती. ह्याचाच अर्थ, खर्चामध्ये प्रचंड वाढ झाली. काही खर्चावर आवर राहिला नाही.

३. चालू अर्थसंकल्पात महसूली तूट येऊ नये ह्याची दक्षता घेण्यात आली आहे. शिल्लकी बाजूला ६७ कोटी रुपये रक्कम दिसते.

४. भांडवली खात्यात ( Capital Account ) उत्पन्नामध्ये तसेच खर्चातही वाढ आहे. खर्च अधिक असल्यामुळे त्या खात्यातील तूट १३९ कोटी रुपयांची आहे. पण ह्या खात्यावरील जे आर्थिक दायित्व ते मागील वर्षांच्या धोरणामुळे बंधनकारक असते. त्यावर सध्याच्या मंत्रिमंडळाचे नियंत्रण नव्हते.

५. तथापि भांडवली तसेच महसुली खात्यातील शिल्लक–तूट बेरीज केल्यास ह्या अर्थसंकल्पातील एकूण तूट फक्त ७२ कोटी रुपयांचीच आहे. अर्थसंकल्पीय तूट शक्यतो मर्यादित करण्याची गरज सध्याच्या चलनवाढ आणि महागाईने प्रकर्षाने भासत आहे. त्याच दृष्टीने ह्या बाबतीत विचार झालेला दिसतो.

## दृष्टिक्षेपात करउत्पन्न

| एकूण कर उत्पन्न | ☐ | ८८७९ | कोट रुपये |
|---|---|---|---|
| केंद्रीय कर उत्पन्न | | ४४५० | ,, ,, |
| आयकर व कंपनी कर | | २२५८ | ,, ,, |
| जकाती | | १७३४ | ,, ,, |
| इतर कर | | ४३७ | ,, ,, |
| | एकूण | ८८७९ | कोट रुपये |

## वार्षिक चक्री योजना

पाच वर्षांच्या मुदतीचे दूरलक्षी नियोजन ( Perspectiv Planning ) सध्याच्या संक्रमणकालात नव्या सरकारला इष्ट वाटत नव्हते. भरमसाट आश्वासनांपेक्षा आणि अवाजवी महत्त्वाकांक्षांपेक्षा सावधपणा, स्थिरपणा आणि निश्चितपणा ह्यावर भर देणे हे धोरण अंगिकारले आहे. त्याकरता उक्तीपेक्षा कृतीवर भर देणारे सुटसुटीत एक वर्षाचे नियोजन करण्याची कल्पना नियोजनमंडळाने मान्य केली असून प्रत्येक वर्षाच्या योजनेचे मूल्यमापन करून, पार पडलेल्या कामगिरीचा आढावा घेऊन पुढील वर्षाच्या योजनेत आवश्यक ते निर्णय घेणे, ह्या पद्धतीने सोयीचे होईल, असेही सरकार आणि नियोजन मंडळ ह्यांचे मत आहे.

चक्री योजनेतील पहिल्या वर्षाची योजना करण्याचे काम पूर्ण झाले असूनही त्या योजनेचे आकडे हाती आलेले नाहीत. नियोजन मंडळाचे डॉ. राजकृष्ण ह्यांनी दिल्लीस ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पत्रकार परिषद घेतली होती. तत्पूर्वी चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात ह्यासंबंधीचे धोरण पूर्वीच प्रगट झाले आहे. नव्या योजनेच्या आकड्यात आणि तपशीलातच थोडाफार फरक होईल. म्हणून ह्या वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या अनुरोधाने ह्यासंबंधीची चिकित्सा करावी लगेल.

चालू वर्षाच्या योजनेत खालील गोष्टींवर भर देण्यात येईल. संबंधित उद्योगधंद्यातील व्यक्ती आणि संस्था ह्यांना आगामी सहा महिन्यांच्या अवधीत सरकारी खर्च कोणत्या क्षेत्रात किती आणि कसा होणार आहे, ह्यावरून आपल्या उद्योगाच्या उत्पादन आणि व्यापारासंबंधी निर्णय घेणे आणि आडाखे बांधणे सुलभ होईल.

१. वर्षयोजनेत शेती, जलसिंचन, वीज, खादी, ग्रामीण उद्योग, रेशीम, हातमाग, पोस्ट आणि टेलिफोन सोयी, विशेषतः ग्रामीण

भागात फोन आणि इतर दळणवळणाच्या सुविधा, मोठ्या रस्त्यांना जोडणारे रस्ते आणि ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची सोय.

२. ग्रामीण लोकसंख्येच्या अन्न वस्त्र, व निवारा ह्या मूलभूत गरजा भागविणे.

३. पीकसंरक्षण, पशुपालन, पोल्ट्री, मत्स्योद्योग, वनसंवर्धन दुग्धव्यवसाय, ग्रामीण भागात जोड उद्योग, नोकऱ्या, व्यवसाय दुग्धव्यवसाय, ग्रामीण भागात जोडउद्योग, नोकऱ्या व्यवसाय उपलब्ध करणे, कपाशी, तेलबिया आणि डाळी ह्यांचे उत्पादनात वाढ इत्यादींवर विशेष भर देण्यात येईल.

४. हरियाना गुजराथ व राजस्थान ह्या राज्यातील ओसाड वाळवंटांचे उत्पादक जमिनीत रूपांतर करणे.

५. विविध राज्यांतील मोठ्या धरण योजनांकरता १०० कोटी रुपयांची तरतूद केली असून मध्यम आणि लघु जलसिंचन प्रकल्पांकरिता कृषिवित्तमहामंडळामार्फत २०० कोटी रुपये उपलब्ध होतील. ग्रामीण विद्युत करणाकरिता १७५ कोटी रुपयांची तरतूद आहे.

६. शेती आणि ग्रामीण विकासाकरिता ३०२४ कोटी रुपये म्हणजे एकूण खर्चाच्या सुमारे ३० टक्के हा मोठा भाग, ह्यावेळेस देण्यात आला आहे.

७. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करण्याचे काम राज्यसरकारच्या कार्यक्षेत्रात असूनही केन्द्रसरकारने ह्याकरिता ४० कोट रुपये, अधिक अनुदान देण्याचे ठरविले आहे.

८. वीजनिर्मिती आणि पुरवठा ह्यांवर १६७६ कोट रुपये खर्च होतील. त्यात ३३ कोट रुपयांची सिंग्रोली येथील मोठ्या औद्योगिक केंद्राचा समावेश आहे. आंतर–राज्यीय वीजपुरवठ्याकरिता ५२ कोट रुपयांची तरतूद आहे.

९. इंधन तेलाच्या स्वयंपूर्णतेकरिता ६७७ कोठ रुपयांची तरतूद आहे. त्यात ४५१ रुपये इंधन आणि नैसर्गिक वायू महामंडळाला नवे तेलसाठे शोधण्याकरिता मंजूर केलेले आहेत. 'उंच मुंबई' ( Bombay High ) आणि वसई येथील तेलनिर्मिती सुरु झाली असून मागील वर्षी तेलउत्पादन ९ दशलक्ष टन होते ते चालू वर्षी ११॥ दशलक्ष टन होईल.

१०. रेल्वेकरिता ३०२ कोटी रुपये आणि इतर वाहतुकीवर सुमारे ३०० कोटी रुपये मंजूर झाले आहेत.

११. पोस्ट आणि टेलिफोन सोयींची वाढ करण्याकरता १० कोट रुपये खर्च होतील.

१२. ग्रामीण खादी–ग्रामोद्योगांकरिता ३५ कोट रुपयांची तरतूद असून त्यामुळे सुमारे २५ लक्ष लोकांना रोजगार उपलब्ध होईल.

१३. प्रत्यक्ष करातील सवलती–

अ ) हिंदु अविभक्त कुटुंबे, नोंदणी न झालेले उद्योगधंदे आणि संस्थांच्या वार्षिक उत्पन्नाची करमुक्त मर्यादा १०,००० रुपयांपर्यंत.

ब ) अधिकर १० टक्क्यावरून १५ टक्के ( करचार्ज ) केल्यामुळे एकूण उत्पन्नाच्या कमाल ६९ टक्के कर द्यावा लागेल. मागील वर्षी ६६ टक्के होता.

क ) मालमत्ता कर, अडीच लाखांपर्यंत १/२ टक्के, अडीच ते ५ लाखापर्यंत १ टक्का, ५ लाख ते १० लाख २ टक्के. १० लाख ते १५ लाख २॥ आणि १५ लाखापेक्षा अधिक ३॥ टक्के करण्यात आला आहे.

ड ) यंत्रे, इमारती आणि इतर आवश्यक भांडवल ह्यांच्या गुंतवणुकीकरिता उत्पन्नाच्या २॥ टक्के भाग करमुक्त आहे. काही बाबतीत ही सूट ३५ टक्के वाढवण्यात आली आहे.

इ ) ग्रामीण भागात उद्योग सुरू केल्यास नफ्याच्या २० टक्के भागावर सूट आहे. ही सवलत सुरुवातीची १० वर्षे मिळणार आहे.

फ ) भांडवल, यंत्रसामग्री इत्यादि विकून मिळणारा जो विशेष वाढावा असतो ( Capital gain ) तो जो केंद्रीय वा राज्यसरकारचे कर्जरोखे युनिट ट्रस्ट, राष्ट्रीकृत बँकातील मुदतबंद ठेवी, मान्य अशा कंपन्यांचे शेअर इत्यादींत गुंतविल्यास त्यांना कर आकारणीतून सूट देण्यात येणार आहे. प्रत्यक्ष गुंतवणुकीत वाढ करण्यास उत्तेजन द्यावे हा ह्या सवलतीचा वास्तववादी दृष्टिकोन आहे.

वार्षिक योजनेचा आढावा घेताना त्यात शेती, उद्योगधंदे, वीजनिर्मिती, धरणयोजना, खादी–ग्रामोद्योग, वाहतूक आणि दळणवळण ह्या बाबींवर विशेष भर देण्यात आलेला दिसतो. ही पहिलीच योजना यशस्वी करण्याने जनतेत भावी योजनांविषयी उमेद आणि विश्वास वाढण्यास मदत होईल.

नियोजनमंडळाच्या कामात सावधपणा असावा पण सावधपणा म्हणजे तडफेचा अभाव नव्हे. स्थिरता म्हणजे मंदपणा हेही समीकरण अयोग्य. गोष्टी काळजीपूर्वक करायच्या याचा अर्थ त्या उशिरा करावयाच्या असेही मानणे अयोग्य. ज्या गतीने अंदाजपत्रक जाहीर झाले त्यानंतर त्याच गतीने वार्षिक योजना किंवा चक्रीयोजनेचे धोरण निश्चित झाले नाही ही वस्तुस्थिती आहे.

नियोजनमंडळातील नोकरशाहीची जबरदस्त चौकट अनेक वर्षांपासून तयार झाली असून काम करण्याच्या जबाबदाऱ्या, अधिकार, संकेत, परंपरा, उपचार आणि नियम ह्यांच्यात आमूलाग्र परिवर्तन निर्माण करणे हेच एका योजनेचे पूर्ण काम होईल. सध्याचे नियोजन ठीक आहे, प्रभावी नाही; चैतन्ययुक्त नाही, तडफदार नाही, अशी जनतेची भावना होणे इष्ट नाही. □

# व्यवस्थापन आणि सरकार !

**पी. जे. फर्नांडिस**

सचिव, वित्तमंत्रालय, नवी दिल्ली.

असा एक सर्वसाधारण समज आहे की कोणत्याही गोष्टीचे संचालन दोन प्रकारे होऊ शकते. त्यांपैकी एक प्रकार म्हणजे व्यवस्थापन. उद्योग आदी क्षेत्राशी या प्रकाराचा संबंध येतो. दुसरा प्रकार म्हणजे प्रशासन. सरकारी कामकाज चालविण्याशी हा प्रकार निगडित आहे. कोणत्याही कार्याची सुस्पष्ट कल्पना आणि उत्पादनक्षमतेचा व्यवस्थापनाशी संबंध असतो. तर प्रशासन म्हटले की वेळखाऊ विलंब, दिरंगाई आणि नोकरशाही वृत्ती यांचा प्रशासनाशी संबंध जोडण्याकडे कल असतो. तथापि, मला प्रांजळपणे असे वाटते की, या म्हणण्याला तात्त्विक वा तार्तिक स्वरुपाचा काहीही आधार नाही.

## व्यवस्थापन म्हणजे काय ?

व्यवस्थापनांचा सरळ आणि साधा अर्थ असा की एखादे उद्दिष्ट एखाद्या विशिष्ट साधनसामुग्रीद्वारे मिळविण्यासाठी करावा लागणारा खटाटोप. व्यवस्थापनाची हीच जर व्याख्या असेल तर, तीच व्याख्या एखादी यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या कारखान्याला या एखादी शिक्षणसंस्था चालविण्यालाही लागू होऊ शकेल. हीच व्याख्या हवाई वाहतूक, जलसिंचन प्रकल्प, किंवा एखादा भव्य पोलाद प्रकल्प अथवा सार्वजनिक इस्पितळ चालविण्याबाबतही लागू होऊ शकते.

## व्यवस्थापनाची काही परिमाणे

व्यवस्थापनाची तीन परिमाणे सांगता येतील. १. काही उद्दिष्टे निश्चित करणे, २. ही उद्दिष्टे मिळविण्यासाठी तशी योजना आखणे आणि ३. त्यासाठी दिलेल्या साधनसामुग्रीचा योग्य प्रकारे वापर करणे.

उद्योग–क्षेत्राबाबत व्यवस्थापनांची उद्दिष्टे अगदी सुस्पष्ट असतात. ती म्हणजे जास्तीत जास्त नफा मिळविणे, उत्पादनवाढीची अभिलाषा धरणे, आणि आधुनिक प्रवृत्तीच्या संदर्भात जनतेची सदिच्छा संपादन करणे. सरकारी क्षेत्राबाबत मात्र, ही उद्दिष्टे गुंतागुंतीची, भिन्न स्वरुपाची आणि नेहमीच परस्परविरोधी असतात. लोकशाही समाजात व्यवस्थापनातील उद्दिष्टांच्या निश्चितीकरणाची बाब हे लोकमत प्रक्रियेचे एक अविभाज्य अंग असते. देशाच्या कारभाराची सूत्रे आपल्या हाती घेऊ इच्छिणारे राजकीय पक्ष, आपल्या जाहीरनाम्यातून मतदारांपुढे आपल्या पक्षाची काही निश्चित ध्येयधोरणे ठेवतात. मतदार त्यांतून आपली निवड करतो. आणि नंतरच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी ही उद्दिष्टे पूर्ण केली गेली किंवा नाही याची शहानिशा तो करतो.

## एकसंघ अंमलबजावणी कार्यक्रम

आपल्याला कोणती उद्दिष्टे साध्य करायची आहेत ते नमूद केल्यावर, लागलीच दुसरा प्रश्न निर्माण होतो तो हा की आपण ती कशी साध्य करणार आहोत, त्यासाठी राष्ट्रीय योजनेमध्ये काही सुस्पष्ट कल्पना मांडण्यात येतात. त्यावर श्वेतपत्रिका तयार होतात आणि तशा धोरणविषयक घोषणा संसदेतून करण्यात येतात.

रासायनिक खत–क्षेत्रासंबंधीचे राष्ट्रीय पातळीवरील एक उदाहरण मी यासंबंधात आपल्याला देतो. यासंबंधी आपली उद्दिष्टे काय आहेत ? प्रथम कृषि–उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले पाहिजे याची आवश्यकता पटवून देण्यात येते. पर्यायाने शेतीला रासायनिक खतांची विशेष गरज आहे, असे सांगण्यात येते. दुसरी गोष्ट म्हणजे आपला दर हेक्टरी रासायनिक खतांचा वापर फारच कमी आहे, तो वाढविण्याची आवश्यकता पटवून देण्यात येते. रासायनिक खतांच्या आयातीमुळे परकीय चलन खर्च होते, आणि आपल्याकडे परकीय चलन अमर्याद प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे आपण ही खते देशातच तयार करण्याचे व स्वयंपूर्ण होण्याचे ठरवितो. स्वयंपूर्णता मिळवताना आपण तंत्रशास्त्रात स्वावलंबी होण्याचे ठरवितो. याशिवाय आपण तयार केलेली रासायनिक खते शेतकऱ्यांना परवडतील अशा किफायतशीर भावाने मिळणे आवश्यक आहे. रासायनिक खत कारखान्यांत भांडवल गुंतवणाऱ्यांना योग्य तो फायदा मिळावा अशीही आपली इच्छा असते.

## काही विसंगती

वर सांगितलेली एकूण एक उद्दिष्टे स्तुत्य आणि तर्कशुद्ध आहेत. तथापि त्यांच्यात एकदम न दिसून येणाऱ्या काही विसंगतीही आहेत. एखादी वस्तू ग्राहकांना कमी किंमतीत देताना उत्पादकालाही त्या वस्तूची रास्त किंमत मिळेल अशी हमी कशी देता येईल ? तीव्रगतीने स्वयंपूर्णता मिळविणे आणि तंत्रशास्त्राचा विकास साधणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करणे शक्य आहे का ? रासायनिक खताचे उत्पादन करण्याबाबतच्या राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमाने या प्रश्नांची आशावादी उत्तरे शोधली पाहिजेत. योजना आणि कार्यक्रमांवर मी एवढा जोर दिला याचे कारण असे की, हे दोन्ही विभाग, व्यवस्थापन प्रक्रियेचे अविभाज्य घटक आहेत.

एक वेळ अशी होती की, लोक नियोजनाचा संबंध कम्युनिझम अथवा समाजवादी तत्त्वज्ञानाशी लावीत असत. तथापि आज व्यावसायिक व्यवस्थापनाचे आवश्यक अंग म्हणून नियोजनाचा स्वीकार केला जात आहे. इतकेच नव्हे तर समाजवादी नसलेली जगातील बहुराष्ट्रीय महामंडळेही आज नियोजनाचे कट्टे पुरस्कर्ते आहेत. म्हणून नियोजनाला सुट्टी देण्याची भाषा समजणे कठीण आहे.

भारत हा गरीब देश आहे. आपल्याला अपव्यय परवडण्यासारखा नाही. म्हणून आपल्याजवळील मर्यादित साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त वापर झाला पाहिजे.

पैशाच्या प्रश्नाचे दोन पैलू आहेत. तो कसा मिळेल हा एक आणि त्याचा वापर आपण कसा करणार हा दुसरा. पैसा उभा करता येण्याच्या आपल्या क्षमतेनुसार आपली ध्येये व आपल्या आकांक्षा यांच्यात आपण फेरबदल करायला हवा.

करआकारणीचेच उदाहरण घेऊ. करआकारणी दुधारी तलवारीसारखी आहे. त्यामुळे सरकारी खजिन्यात महसूल जमा होतो हे खरे, त्याचप्रमाणे बाजारातील वस्तूंच्या किंमतींवरही त्याचा फार परिणाम होतो. म्हणून बाजारव्यवस्था, मागणीपुरवठा आणि वस्तूंच्या किंमतीत होणारा चढउतार यांची तीव्र जाणीव असणे आवश्यक असते. कर्जरूपाने पैसा उभा करणे हाही एक मार्ग आहे. जनतेकडूनच कर्जरूपाने आपण पैसा उभा करू शकतो. परदेशांतही कर्ज उभारता येते. हे सर्व ठीक आहे. पण प्रश्न उभा राहतो की, कर्ज कशासाठी उभारायचे आणि किती कर्ज उभारणे आपल्याला परवडण्यासारखे आहे ? आपणास परतफेड करण्याची क्षमता आहे का ? उभारलेले कर्ज, योग्यरीत्या गुंतवण्यात येते का ? हे सारे प्रश्न, पैसा गुंतवणाऱ्यांना परिचित आहेत.

राष्ट्रीय अर्थ उभारणीसाठी एक नवे साधन उदयास येऊ पाहत आहे. ते म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील नफा. आज केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातच मुळी जवळजवळ १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. त्यावर फक्त १० टक्के नफा मिळू शकला तरी, दरवर्षी एक हजार कोटी रुपये राज्याच्या खजिन्यात जमा होतील. पैसा उभारणे ही एक गोष्ट आणि त्याचा काटकसरीने वापर करणे ही दुसरी गोष्ट होय. गुंतवणुकीबाबतचा निर्णय घेणे ही एक अत्याधुनिक व्यवस्थापकीय प्रक्रिया आहे.

अलिकडे या क्षेत्रात काही हितकर व्यवस्थापकीय घडामोडी आढळून येत आहेत. नियोजन मंडळात प्रकल्प मूल्यमापन विभाग निर्माण करणे आणि सार्वजनिक गुंतवणूक मंडळाची स्थापना करणे, ह्या त्या घडामोडी होत.

आपण 'यंत्रसामुग्रीचेच उदाहरण घेऊ. हा शब्द मी अत्यंत व्यापक अर्थाने वापरीत आहे. एखाद्या उद्योगातील यंत्रांच्या

क्षमतेचा पुरेपूर वापराचा प्रतिध्वनी, सार्वजनिक व्यवस्थेत उमटतो. नद्ये-जलसिंचन प्रकल्पांचा जास्तीत जास्त वापर, सार्वजनिक इमारती आणि उपकरणांचा पूरेपूर वापर आदी. या गोष्टींचा प्रत्यक्ष संबंध नफा-तोटा वा जमाखर्चाच्या ताळेबंदाशी नसला तरी, अशा मूल्यवान राष्ट्रीय संपत्तीचा योग्य प्रकारे वापर होण्याच्या दृष्टीने काही मानदंड शोधून काढणे आवश्यक आहे.

आता मनुष्यबळाचा विचार करू. उद्योगव्यवसाय, मनुष्यबळ व्यवस्थापनाचे महत्त्व जाणून असतात. राष्ट्रीय व्यवस्थापनाच्या अवाढव्य कार्यात तर त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आज, देशातील सार्वजनिक क्षेत्रात कित्येक लाख लोक गुंतलेले आहेत.

## व्यावसायिकतेची गरज

सार्वजनिक सेवाक्षेत्रात व्यावसायिकता अंतर्भूत असते. परराष्ट्रातील सेवेत, प्रशिक्षित राजनीतिज्ञ असतात. आयकर विभागात व्यवसायकर गोळा करणाऱ्यांचा समावेश असतो. तर पोलीस विभागात कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारांचा तपास लावण्याचे प्रशिक्षण घेतलेल्यांचा समावेश असतो.

आय्. ए. एस्. सेवेतील अधिकाऱ्यांनादेखील सार्वजनिक प्रशासनाचे विशेष प्रशिक्षण दिले जाते व ते केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यातील व्यवस्थापनविषयक दुवा ठरतात.

सरकारी सेवांची व्यावसायिकता गतिशून्य राहणार नाही, याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. विकसनशील व बदल घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठेवलेल्या समाजामध्ये सरकारी सेवांची व्यावसायिकता चैतन्यशील ठरली पाहिजे. 'नव्या व्यवस्थापकीय संज्ञा आत्मसात करणारे शिक्षण, नव्या गोष्टी अधिक परिणामकारकरीत्या करण्याचे नवे मार्ग आणि सतत काहीतरी शिकायचे असा दृष्टिकोन आवश्यक आहे.

## सार्वजनिक सेवक म्हणजे काय ?

माझ्या कनिष्ठांकडून कित्येकदा मला अशा कैफियती मिळाल्या आहेत की, 'मला सरकारी सेवेतील तीस वर्षांचा अनुभव असता, बढती देताना मला का डावलण्यात आले ?' अनुभव आणि अमुक वर्षांची सेवा, यांचे समीकरण बनवण्यात आले हा यातील चुकीचा युक्तिवाद आहे. अनुभवाबद्दल माझी एक गणिती व्याख्या आहे. अनुभव म्हणजेच शिकण्याची क्षमता, गुणिले शिकण्याची इच्छा, गुणिले अमुक वर्षांची सेवा. या समीकरणात कुठेही शून्य असेल तर त्याचे उत्तर शून्यच येईल. सरकारी नोकरांना आधुनिक व्यवस्थापनाबाबतचे केवळ प्रशिक्षण देऊन भागण्यासारखे नाही. त्यांच्या जबाबदाऱ्या, त्यापेक्षाही अधिक व्यापक आहेत. जनतेची मते आणि तिच्या मागण्यांबाबत सरकारी नोकर अत्यंत संवेदनाशील राहतील, अशा प्रकारची व्यावसायिकता त्यांच्यात निर्माण व्हायला हवी.

साधन या दृष्टीने 'वेळेचे' किती महत्त्व आहे याची पुरेशी जाणीव अद्याप झालेली नाही. सार्वजनिक व्यवसायात 'वेळ म्हणजेच धन' याला विशेष अर्थ आहे. निर्णय घेण्याबाबतची प्रक्रिया अधिक झपाट्याने होणे अत्यावश्यक आहे. नोकरशाहीची दिरंगाई थांबविली पाहिजे, फायलींचे वर्तुळाकृती भ्रमण, बैठकी, टिप्पण यांची जागा यापुढे अर्थपूर्ण कार्यपद्धतीने घेतली पाहिजे.

मनुष्य आणि त्यांच्या प्रवृत्ती यांवर मी विशेष भर दिला, याचे कारण माझ्या मते, व्यवस्थापन आणि प्रशासन यांच्यासंबंधीचा प्रश्न सोडवण्याचे सामर्थ्य या दोन गोष्टींतच आहे, काही जणांचे म्हणणे आहे की हे जग, गणकयंत्रांचे, स्वयंचलित यंत्रांचे किंवा यंत्रसामुग्रीचे आहे. मी मात्र विचाराशी सहमत नाही.

माझ्या मते, मानवी बुद्धिमतेला आणि कार्यक्षमतेला आज जेवढे महत्त्व प्राप्त झाले आहे, तितके ते यापूर्वी कधीही नव्हते. एखादे यंत्र सर्वसाधारण पन्नास माणसांचे काम सहज करू शकेल, पण पन्नास यंत्रे एखाद्या तरी असामान्य माणसाचे काम करू शकतील का याबद्दल मला शंका वाटते. आज असाच असाधारण माणूस, आपल्याला सार्वजनिक क्षेत्रातील व्यवस्थापनासाठी हवा आहे.

□

(आकाशवाणीच्या सौजन्याने)

# टेक्नो कास्ट

राजेंद्र पटवर्धन

साखर कारखान्यांसाठी लागणारी यंत्रसामग्री, डिझेल इंजिने, बॉयलर्स, पंप किंबहुना सर्व यंत्रांसाठीच–या सर्वांसाठी एक मूलभूत गोष्ट लागते. ती म्हणजे 'कास्टिंग्ज'–म्हणजेच ज्यांच्यापासून यंत्राला आकार येतो ते धातूचे भाग. यामध्ये लोहाची आणि बिनलोहाची हे दोन मुख्य प्रकार. पुण्यामध्ये यंत्रसामग्री बनवणाऱ्या इतक्या कंपन्या आहेत की, कास्टिंग्जना सतत वाढती मागणी आहे. त्यातून यांचा पुरवठा करणाऱ्या 'भट्ट्या' (फाऊंड्रीज) बहुसंख्येने पुण्याबाहेरच्या आहेत. पुण्यातूनच चांगल्या दर्जाच्या कास्टिंग्जना पुढे यावयाला खूपच वाव आहे.

श्री. दिलीप राजाराम गोडबोले आणि श्री. रमेश गणेश परांजपे या दोन विशींतल्या तरुणांना एवढे पुरेसे होते. दोघेही धातुशास्त्राचे पदवीधर. राष्ट्राच्या संपत्तीत भर घालण्यासाठी आपला सक्रीय हातभार लागावा हे दोघांचे खूप दिवसांपासूनचे स्वप्न साकार करण्यासाठी 'आपण एक फौंड्री काढावी' असे दोघांनी ठरविले. वर्ष, दोन वर्षे त्या दृष्टीनं त्यांनी वेगवेगळ्या फौंड्रीमध्ये नोकऱ्या करून अनुभव मिळवला. आपल्याला आवश्यक ते तांत्रिक ज्ञान आहे याची खात्री करून घेतली.

## स्वतःचा उद्योगधंदा

१९७५ च्या सुरवातीला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एम्. आय. डी. सी.) एक योजना जाहीर केली. फक्त ५ हजार रुपये अनामत रक्कम भरून संपूर्ण बांधलेल्या औद्योगिक वास्तु तरुण उद्योजकांना देऊ केल्या. श्री. गोडबोले आणि श्री. परांजपे यांनी 'हीच आपली संधी' असे ठरवून तात्काळ नोकऱ्या सोडल्या आणि आपला स्वतःचा उद्योगधंदा उभारण्यासाठी कार्याला सुरुवात केली.

स्वतःजवळचे पाच हजार रुपये भरून एम्. आय. डी. सी. कडून वास्तु मिळविली. वास्तु मिळविल्याशिवाय बँकांनी कर्ज दिले नसते. पण बँकांना पटविण्यासाठी एवढंच भागत नाही. मग गिऱ्हाईकांना भेटून, बाजारातील उलाढाली पाहून, त्यांतला कास्टिंग्जचा व्यवसाय पाहून त्यातून आपल्याला वाटा किती मिळेल हे अजमावून बँकांना आपली पत दाखवावी लागते. हे सर्व होईपर्यंत १९७६ उजाडले.

बँकांनी पूर्ण गुंतवणुकीच्या ७५ टक्के कर्ज मंजूर केले. या भरभक्कम पायावर पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाने (डब्ल्यू. एम्. डी. सी.) १० टक्के कर्ज सवलतीच्या दराने दिले आणि जून १९७६ मध्ये गोडबोले–परांजपे यूतीचा 'टेक्नोकास्ट' हा कारखाना उत्पादन करू लागला.

## आकर्षक योजना

श्री. दिलीप गोडबोले यांची मी भेट घेतली, तेव्हा त्यांनी कृतज्ञतेने सांगितले की, एम. आय. डी. सी. आणि डब्ल्यू. एम्. डी. सी. यांच्या सहाय्यामुळे हा कारखाना उभारणे फार सोपे गेले. ६०० चौरस फुटांची बांधलेली वास्तु आणि तीन हजार चौरस फुटांचे खुले क्षेत्र फक्त पाच हजार रुपये अनामत रकमेवर मिळणे हे आजच्या काळात वरदानच होय. त्यानंतर पुढील दोन वर्षे काहीच हप्ते नाहीत. त्यानंतर दहा वर्षांपर्यंत दरसाल अदमासे नऊ हजार रुपयांचा हप्ता आहे. नवीन उद्योजकांना अत्यंत आकर्षक अशी ही योजना होती.

लोहाच्या कास्टिंग्जना स्थावर गुंतवणूक (यंत्रसामग्री) वगैरे जास्त लागते, तर अलोह कास्टिंग्जना खेळती गुंतवणूक अधिक लागते. अलोह प्रकारात उत्पादन–प्रक्रियेत रसायन आणि इतर प्रक्रिया द्रव्ये अधिक लागतात. स्थावर गुंतवणुकीत जास्त पैसा घालून वार्षिक व्याजाची बेरी वाढविण्यापेक्षा गोडबोले आणि परांजपे यांनी अलोह कास्टिंग्जच बनवण्याचे ठरवले. त्याप्रमाणे बँकांकडूनही त्यांना पुरेशा खेळत्या भांडवलाची हमी मिळाली.

आवडीप्रमाणे कामाचे विभाजन झाले. श्री. परांजपे यांनी उत्पादन नियंत्रण, कामगारांचे प्रश्न वगैरे गोष्टी पाहावयाच्या तर श्री. गोडबोले यांनी ऑर्डर्ससाठी फिरणे, पैशाचे व्यवहार वगैरे पाहायचे, ही विभागणी अजूनही सुरूच आहे.

आणि उद्योग प्रत्यक्ष सुरू झाला. पुण्यामध्ये इतकी गिऱ्हाईके होती की, पुण्याबाहेर जावयाचेच कशाला असे ठरले. पुण्यामध्येच व्यवसाय केंद्रित झाला. आज 'टेक्नोकास्ट'चे जवळ जवळ तीस ग्राहक पुण्यात आहेत. त्यांच्यामध्ये डिझेल इंजिने, थर्मोकोलचे, साखर कारखान्याच्या यंत्रसामग्रीचे – पादत्राणांचे असे विविध तऱ्हेचे उत्पादक आहेत. त्यामुळे एका तऱ्हेच्या धंद्याला मंदी आली तरी 'टेक्नोकास्ट'चा धंदा अबाधित आहे.

## २० हजारांची विक्री

सुमारे चाळीस हजार रुपयांच्या गुंतवणुकीवर आज 'टेक्नोकास्ट'ची महिना सुमारे वीस हजार रुपयांची विक्री आहे.

सर्व खर्चवेच वजा जाता दहा टक्के निव्वळ नफा झाला आहे. तीन भट्टया, कोअरसॅन्ड मिक्सर, विजेचा ब्लोअर, लेथ, बेंच ग्राईंडर वगैरे सामग्री उपलब्ध आहे. दोन महिन्यांपर्यंत काम आधीच दाखल होत आहे. जून १९७६ ते नोव्हेंबर १९७७ या अल्पावधीतच 'टेक्नोस्काट 'ची ही वाटचाल कोणालाही गौरवास्पद अशी आहे.

फौंड्रीची प्रक्रिया तशी दिसायला सोपी असते. हवा तसा धातूच्या आकाराचा पॅटर्न (नमुना) बनवावयाचा असतो. लाकडाचा किंवा अॅल्युमिनियमचा. त्यापासून साचा बनवायचा. साच्यात तप्त धातूचा रस ओतायचा. अॅल्यूमिनियमचा रस ७०० अंश सेल्सिअर्स तर गनमेटलचा रस ११०० अंश सेल्सिअसपर्यंत तापवलेला असतो. साच्यात रस ओतून ते गार केले की, हवे ते आकार (कास्टिंग) तयार होतात. ते साफ करून लेथ किंवा दुसऱ्या यंत्रावर काम करवून हव्या त्या मोजमापाला आणायचे असतात. खूप वेळा गिऱ्हाईकांकडे पॅटर्नस् तयार असतात. त्यांच्या मागणीप्रमाणे 'टेक्नोकास्ट' कास्टिंग्ज बनवून देतात.

श्री. गोडबोले म्हणाले, 'ही फौंड्रीची प्रक्रिया वरवर सोपी वाटली तरी त्यात सूक्ष्म समस्या फार असतात. तपमान आत्यंतिक जास्त असल्याने वायु आत घुसण्याची शक्यता खूप असते. कास्टिंग्जमध्ये हे वायू छिद्रांच्या स्वरूपात दिसतात. ही वायूछिद्रे फार असतील, तर सबंध कास्टिंग वाया जाते. धातु किंवा मिश्रधातूंच्या प्रमाणात थोडासा जरी बदल झाला, तरी आमचे ग्राहक कास्टिंग बाद ठरवतील ही भीती असते.' धातूंचे प्रमाण, वायुछिद्र, मोजमापे इत्यादि सर्व गोष्टी पसंतीला उतरल्या, तरच कास्टिंग्ज स्वीकारले जाते.

## विनाकारण खरेदी–खर्च

श्री. गोडबोले यांच्या मते त्यांच्या धंद्याचा मुख्य प्रश्न हा आहे की, नियोजन करणे फार अवघड जाते. याचे कारण कोणत्या तऱ्हेच्या कास्टिंगची मागणी केव्हा येईल. हे सांगता येत नाही. यामुळे धातु–मिश्र धातु यांचा पुरेसा साठा कधीच ठेवता येत नाही. हल्ली एक मात्र चांगली गोष्ट आहे की, सर्व कच्चा माल भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. पण तरी दर वेळेला माल विकत आणण्यामुळे खरेदीसाठीचा खर्च विनाकारण वाढतो.

सध्या 'टेनोकास्ट 'कडे नियमित स्वरुपाचा ४० टक्के धंदा आहे तर ६० टक्के अनियमित स्वरूपाचा आहे. अनियमित म्हणजे गिऱ्हाईक तेच, पण काम दर वेळेस नवीन स्वरूपाचे देणारे ! पुन्हा आगाऊ रक्कम काही न देणारे. कारण या धंद्यात स्पर्धा फार. टेक्नोकास्टला पुण्यातल्या पुण्यात जवळ जवळ २० स्पर्धक आहेत. यामुळे खेळत्या भांडवलाची गुंतवणूक फाऊंड्री चालविणाऱ्याचीच हे गृहित सत्यच झाले आहे.

या अडचणी या धंद्याचा भागच आहेत. 'टेक्नॉलॉजी 'ची प्रगती सुरूच आहे. सध्या सात कामारांची ही कंपनी एका पाळीत काम करीत आहे. येत्या एक–दोन वर्षात दोन पाळयांत काम सुरू करून उलाढाल दुप्पट करण्याचा श्री. गोडबोले यांचा मानस आहे. जनता सरकारने अलिकडेच अतिलघु उद्योगाची कल्पना मांडली आहे. टेक्नोकास्ट व्याख्येच्या दृष्टीने अतिलघुउद्योगच आहे. परंतु त्याची झेप ही कोणत्याही आकाराच्या धंद्याला आदर्श अशीच आहे.

धंदा यशस्वी होण्यासाठी श्री. गोडबोले यांच्या मते काही गुरुकिल्ल्या आहेत. एक ही की, प्रत्येक पैसा हा उत्पादक कामासाठीच खर्च झाला पाहिजे. एका जरी पातळीवर पैशाचा अपव्यय झाला, तरी कालान्तराने तो तुम्हाला गोत्यात आणल्याशिवाय राहणार नाही. दुसरी गुरुकिल्ली ही की, स्वतःच्या धंद्यात कंटाळा चालत नाही. एखादा फोन कॉल, एखादी भेट एखादे पत्र–एक जरी गोष्ट राहून गेली तरी, ती भोवल्याशिवाय राहणार नाही. मोठमोठ्या कंपन्यांत अशा गोष्टी लपू शकतात. स्वतःच्या लघुद्योगात हे शक्य नसते.

हे ऐकून मला हेन्री फोर्डची आठवण झाली. त्याला एकदा कुणी तरी विचारले, 'मोटारी बनविण्याचा धंदा इतके लोक करताहेत पण तूच तेवढा यशस्वी, बाकीचे अयशस्वी असे का ?' हेन्री उत्तरला, I plug all the leaks, others don't. ( मी सर्व गळती थांबवतो, दुसरे थांबवत नाहीत ) !

दैनंदिन व्यवहारात आणि तांत्रिक बाबीत अद्ययावत् तांत्रिक ज्ञानाची जरुरी नसूनही श्री. गोडबोले मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या ग्रंथालयात जाऊन नियमितपणे 'फाऊंड्री ट्रेड जर्नल' हे इंग्लंडातून प्रसिद्ध होणारे मासिक आवर्जून वाचतात. यामधील नवनवीन प्रक्रियांवरील अभ्यासामुळे आपला दृष्टिकोन मोठा होत जातो असे त्यांना फार वाटते.

श्री. गोडबोले यांचा एक अनुभव फार मौलिक आहे. तो त्यांच्याच शब्दांत देतो–'तुम्हाला आश्चर्य वाटेल की, मी धंद्यात पडल्यापासून मला सर्व स्तरांवर अत्यंत चांगले सहकार्य मिळाले आहे. बँकेचे अधिकारी, सरकारी अधिकारी, ग्राहक कुठेच मला अडवणूक झाली नाही. मला नमूद करावीशी वाटणारी गोष्ट म्हणजे मला आजतागायत कोणालाही एका नव्या पैशाची लाच द्यावी लागलेली नाही.'

# प्रेशरकुकर उद्योगाची ओळख

**प्रा. प्रभाकर फरसोले,** एम्. कॉम्., जयसिंगपूर

**प्रेशर कुकर ही आधुनिक शहरी कुटुंबाची एक प्रधान गरज. या उद्योगाची प्रगती गेल्या वीस–तीस वर्षांतच झपाट्याने झाली आहे. त्यासंबंधीची ही माहिती मनोरंजक ठरेल !**

स्त्री–शिक्षणात झालेल्या सुधारणेमुळे भारतात गृहिणींना प्रेशरकुकरची आवश्यकता भासते व त्यामुळे भारतीय जीवनात प्रेशरकुकर आवश्यक आहे. या साधनामुळे कमी वेळात अन्न शिजवण्यात येते. त्यामुळे वेळेची व श्रमाची आर्थिक दृष्टीने बचत होते. यामुळे ७५ टक्के वेळ वाचतो. प्रेशकुकरमध्ये अन्न शिजवण्याकरिता इतर कोणात्याही साधनापेक्षा २५ टक्के कमी जळण लागते. एका उत्पादकाने असे सिद्ध केले आहे की दररोज अन्न तयार करण्याकरिता अर्धा लिटर तेल या साधनामुळे कमी लागते. त्यामुळे वार्षिक २०० रु.ची बचत होते व त्याची रक्कम वसूल होते. याची उपयोगिता यांत्रिक सुधारणेमुळे व जळणाची अनिश्चितता असल्यामुळे वाढत आहे.

१९५९ साली देशात १५ हजार प्रेशरकुकरचे उत्पादन झाले व त्यानंतर त्यामध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या. हे उत्पादन १९६५ साली १.३० लाख, १९७० साली ३·५० लाख, १९७२ साली ५ लाख, १९७३ ला ५.५० लाख, १९७४ ला ६ लाख झाले. १९७४ नुसार या उद्योगधंद्यात १७ उद्योगसमूह कार्य करीत आहे त्यापासून १५ लक्ष प्रेशरकुकरचे उत्पादन झाले. या उद्योगांत २० प्रकारचे प्रेशरकुकर तयार करण्यात येतात. त्यांची क्षमता ५ लिटर ते १६ लिटरपर्यंत आहे.

या उद्योगधंद्याची दोन प्रमुख वैशिष्टे आहेत. (१) १७ उद्योगधंद्यांपैकी २ मोठे उद्योग ५० टक्के उत्पादन करतात व त्यांनी १९७४ साली ३.५० लक्ष प्रेशरकुकर तयार केले. या उद्योगाची क्षमता ६·५० लक्ष एवढी होती. त्यांपैकी ४४ टक्के एवढेच उत्पादन करण्यात आले. हे दोन उद्योग मुंबई व बंगलोर येथे आहेत. त्यांनी स्वतःचे उत्पादन आपल्या नावावरच तयार केले व त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठेत चांगली मागणी आहे. विदेशांतसुद्धा बाजारपेठ निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. (२) या उद्योगांनी आपला विकास मुंबईपुरताच मर्यादित ठेवला व या उद्योगगृहात ९ लहान उत्पादन व १ मोठे उत्पादक कार्य करीत आहे. देशातील एकूण उत्पादनाच्या ६४ टक्के उत्पादन या कारखान्यात होते.

प्रेशरकुकरचे यांत्रिकीकरण (Techno logy):—या उत्पादनाला विशेष ज्ञानाची आवश्यकता नाही. व्यक्तिगत रीतीने याचे उत्पादन करता येते. ५० हजार प्रेशरकुकर तयार करण्याकरिता जो कारखाना निर्माण करावा लागतो त्यामध्ये २.५ लक्ष ते ३ लक्ष रुपयांची यंत्रसामुग्री आवश्यक असते. यामध्ये प्लेट (धातु) बनवण्याचे यंत्र व छिद्र पाडणारे यंत्र इत्यादींचा समावेश आहे. व्यक्तिगत ज्ञानामुळे व उत्पादनातील तंत्रामुळे याचे उत्पादन सुलभ झाले आहे.

उत्पादन क्षमता:—प्रेशरकुरची मागणी दिवसेंदिवस वाढत असली तरी या उद्योगधंद्याच्या क्षमतेपैकी फक्त ४० टक्केच उत्पादन करण्यात येते. मोठे कारखाने आपल्या क्षमतेच्या ५८ टक्के उत्पादन करतात. १९७३ साली लहान कारखान्यांनी २.२० लाख उत्पादन केले. त्याची क्षमता ८.५० लाखांची होती. ते प्रमाण २६ टक्केच आहे.

प्रमुख अडथळे:—या उद्योगधंद्यापुढे खालील प्रमुख अडथळे आतेत. १. अॅल्युमिनिया.

अनियमित पुरवठा :—प्रेसरकुकरच्या निर्मितीमध्ये ५० टक्के अॅल्युमिनियमची आवश्यकता असते व त्याची किमत एकूण उत्पादनाच्या ५० टक्के इतकी आहे. या उद्योगाला १० ते २० गेजच्या

३ ते ४ हजार टन अॅल्युमिनियमची आवश्यकता आहे. अॅल्युमिनियमची किंमत दिवसेंदिवस वाढत आहे. १९७३ साली त्याची किंमत दर किलोस ८ रु. २५ पैसे होती ती १९७४ ला दर किलोस ११ रु. २५ पैसे झाली. या उद्योगाला फक्त १,५०० टन अॅल्युमिनियम नियंत्रित दराने मिळते व बाकीची आवश्यकता खुल्या बाजारातून पुरी करावी लागते. विजेच्या योग्य पुरवठ्यामुळे अॅल्युमिनियमच्या उत्पादनात सुधारणा झाली. १९७६-७७ मध्ये ६९,६९२ लक्ष टन उत्पादन झाले. मागील वर्षापेक्षा ते ३९ टक्क्यांनी जास्त आहे.

## जास्त किंमत

प्रेशर कुकरच्या जास्त किंमतीचा परिणाम कारखान्याच्या उत्पादनक्षमतेवर होतो. काही महत्त्वाचे उत्पादक अॅल्युमिनियम व स्टेनलेस स्टीलच्या दरात झालेल्या वाढीचा वाईट उपयोग करतात. १९७४ साली प्रेशर कुकर्सच्या दरात ३५ ते ७० टक्के वाढ झाली. त्यामुळे सर्वसाधारण ग्राहक वस्तूची खरेदी करू शकत नाही. विक्रेत्याला मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाण २० ते २५ टक्के आहे. वितरणामध्ये एकसूत्रीपणा नाही.

## प्रेशर कुकरच्या मागणीचे प्रकार

मागणी साधारणतः २० प्रकारांमध्ये आहे. १९७२ मध्ये ५ लिटर ते ७५ लिटर कुकरची मागणी ८० टक्क्यांपेक्षा जास्त होती. जास्त लिटरच्या कुकरची मागणी निर्माण करणे कठीण आहे. कारण त्याची किंमत वाढत जाते. कुकरच्या मागणीमध्ये १ लिटरचा फरक केल्यास अर्धा किलो अॅल्युमिनियम जास्त लागते व त्याची किंमत ४ रु. ते ६ रु. आहे. परंतु ५ लिटर ते ७·५ लिटर याच्या किंमतीत ६० रु. चा फरक आहे. उत्पादकांनी कुकरची विक्री ग्रामीण व शहरी भागात केली आहे. परंतु त्याचा प्रचार खेड्यातून अजून झालेला नाही. १९७४ मध्ये ६ लाख प्रेशर कुकरपैकी ५·२५ लाख शहर व गाव यांच्यात विकण्यात आले. खेडे विभागात एकूण विक्रीच्या १२·५ टक्केच विकण्यात आले. विभागीय विक्रीमध्ये काही वैशिष्ट्ये दिसून येतात. मुंबईच्या उत्पादकांनी निर्माण केलेले कुकर्स अनुक्रमे, मुंबई व गोशीरपूर, उत्तर भारताची मागणी ८० टक्के पूर्ण करतात. बंगलोर येथील उत्पादक दक्षिण भारतातील मागणी पूर्ण करतात. मुंबईतील इतर उत्पादक महाराष्ट्र व गुजरातची मागणी पूर्ण करतात. विभागीय प्रदेशानुसार प्रेशरकुकर्सच्या आकारमानामध्ये फरक आहे. दक्षिण व पश्चिम भागात मोठ्या क्षमतेचा म्हणजे ६·५ ते ७·५ लिटरला मागणी आहे. उत्तर भागात ५ लिटरची मागणी आहे.

## मागणीचा अंदाज

सध्या भारतात ३० लाख घरांतून प्रेशरकुकर्सचा उपयोग करतात. म्हणजे १० कोटी घरांपैकी ३ टक्केच उपयोग करतात. त्याकरिता उत्पादकांनी कुकरच्या योग्य किंमती ठेऊन बाजारपेठ निर्माण करणे आवश्यक आहे. ५०० रु. पेक्षा जास्त पगार असणाऱ्या कुटुंबात याची मागणी आहे. ९० लक्ष कुटुंबांजवळ कुकर्स नाहीत. त्यांची मागणी दरवर्षी ९ लक्षप्रमाणे पूर्ण करण्यास १० वर्षे लागतील. तसेच दरवर्षी १२ ते १४ लाख कुकर्सची मागणी आहे.

## निर्यातीचे मार्ग

देशातील मागणीबरोबर विदेशातील मागणी कुकर्सला आहे. विदेशातील मागणी पूर्ण करताना त्याच्यापुढे काही अडचणी निर्माण होतात. विदेशात २० लिटरपेक्षा जास्त क्षमतेची मागणी आहे. ज्याचे उत्पादन भारतात सध्या होत नाही. आशिया व आफ्रिका खंडात विक्री करताना चीन हा प्रतिस्पर्धी आहे. निर्यातीमध्ये थोड्या प्रमाणात वाढ झाली आहे. १९६९-७० साली अंदाजे ०·२० लाख रुपयांचे ३०० कुकर्स निर्यात करण्यात आले. १९७४-७५ साली ४७०० कुकर्स अंदाजे किंमत २·८० लाख रु. चे निर्यात करण्यात आले. मुंबईच्या कंपनीला मॉरीशस व ऑस्ट्रियाची मागणी मिळाली आहे. या दोन्ही प्रदेशाच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न भारत करतो आहे. निर्यात वाढविण्याकरिता कुकर्सच्या निर्मितीमध्ये परिवर्तन करणे आवश्यक आहे. २० लीटरपेक्षा जास्त क्षमतेचे कुकर्स निर्माण करणे हे विचारात घेऊन मुंबईच्या कंपनीने पंजाबमध्ये उत्पादनाला सुरुवात केली आहे. मध्यवर्ती यंत्रसहाय्य संस्थेने कुकर्सचे तळ व काठ जास्त जाडीचे निर्माण करण्यात यश मिळविले आहे. विदेशी बाजारपेठेत मागणी निर्माण झाल्यामुळे इतर लहान व नवीन कारखानदारांनी देशातील खेडे व ग्रामीण भागात कुकर्सची नवीन बाजारपेठ निर्माण करावी.

सध्याची १२ लाख ते १४ लाखांची मागणी विचारात घेता या उद्योगाला भविष्यकाळ उज्ज्वल आहे. कुकर्सचे उत्पादन फक्त ६ लाख एवढेच आहे, जरी कारखान्याची क्षमता १५ लाख एवढी आहे. त्यामुळे या उद्योगाला प्रगती करण्याची योग्य संधी आहे. उत्पादकांनी कुकर्सच्या किंमती कमी केल्यास, खेडे विभाग व विदेशी बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न केल्यास ह्या उद्योगाची चांगली प्रगती होईल. मागणी निर्माण करण्याकरिता मोठ्या प्रमाणात आकर्षक रीतीने जाहिरात करणे आवश्यक आहे. तसेच प्रेशर कुकर्सच्या उपयोगासंबंधी प्रात्यक्षिक दाखविण्याची सोय उत्पादकांनी करायला पाहिजे. वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास हा उद्योगधंदा फायदेशीर आहे. □

सत्यं शिवं सुंदरम् प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे यांनी मुद्रक – यशवंत मुद्रणालय, १८३५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.



# वैभवाचा संकेत

PRATIBHA 7518MAR

अध्ययनामागे उद्दिष्टे ही असतातच.
जिज्ञासा हा त्याचा मूलाधार. परिश्रम आणि सातत्य ही कार्यप्रणालि ...प्रगतिसाठी अतिशय उपयुक्त ठरणारी... जीवन समृद्ध होऊ शकते ते केवळ याच मार्गाने... अपेक्षापूर्ति होत राहिल्यामुळे!

किर्लोस्कर उत्पादनेदेखील त्यांच्यापासून केल्या जाणाऱ्या अपेक्षा सर्वार्थाने पूर्ण करतात. अविरत कठोर परिश्रम आणि दीर्घकालीन संशोधन यांचे सुमधुर फळ म्हणजे विविध, विश्वासपात्र किर्लोस्कर उत्पादने... शेती आणि औद्योगिक विकास या दोन्ही आघाड्यांवर अनमोल कामगिरी बजावणारी...

याच दृष्टिकोनातून विचार केला तर तुमच्याकडूनसुद्धा आम्ही पुष्कळ गोष्टी शिकतो. सर्वांगिण उन्नतिसाठी आम्ही अंगिकारलेल्या व्रताचा आणि त्यासाठी आरंभिलेल्या तपश्चर्येचा तो एक महत्वाचा भाग आहे असेच आम्ही मानतो.

Kirloskar

**किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर पथ,
खडकी, पुणे-४११ ००३

® Registered User – Kirloskar Oil Engines Ltd. Poona-411 003.

LICENCE TO POST WITHOUT
PREPAYMENT No. 61.

REGD. No. P.N.C. 205

तुमची समस्या कोणतीहि असो... प्रत्येक आर्थिक प्रश्नाची समाधानकारकपणे सोडवणूक करण्यासाठी मदत करायला महाराष्ट्र बँक वचनबद्ध आहे. देशभरच्या ४५० पेक्षा अधिक शाखा आणि जगभरचे कार्यक्षम प्रतिनिधी यांच्या माध्यमातून महाराष्ट्र बँक तुम्हाला निरनिराळया सेवा उपलब्ध करून देते...आमच्या विविध बचत आणि ठेव योजना देखील तुमची आर्थिक कुवत आणि गरजा यांचा विचार करूनच तयार करण्यात आलेल्या आहेत.

• मुदत ठेव योजना • संचित ठेव योजना • लोकमंगल दैनंदिन ठेव योजना • निश्चितकाल ठेव योजना • मासिक व्याजाची ठेव योजना • शुभमंगल ठेव योजना • प्रवासी चेक • भेट चेक • लघुउद्योग, शेतीविकास यांसाठी अर्थसाहाय्य योजना

यापैकी कोणतीहि योजना स्वीकारा... सगळ्या योजना सारख्याच आकर्षक आहेत.

महाराष्ट्र बँकेमध्ये बचत करण्याची सवय म्हणजे उद्याची तरतूद आजच करून ठेवण्याची सर्वोत्तम सोय... अशा प्रकारे बचत करणे किती हितकारक असते हे तुम्हाला महाराष्ट्र बँकेमध्येच उमगेल.

महाराष्ट्र बँक...तुमची जिव्हाळ्याची बँक





बँक ऑफ महाराष्ट्र
११७७ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२

PRATIBHA 707 MAR

17 APR 1978

# अर्थ

फेब्रुवारी ७८
मूल्य तीन रुपये




# काँग्रेसचे काय?

# अर्थ

आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक. दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

संपादक : प्रा. कमलाकर परचुरे

वर्ष : तिसरे    अंक : अकरावा : फेब्रुवारी १९७८

किमत : ३ रुपये    वार्षिक वर्गणी : ३० रुपये

## – या अंकात –


- ☐ श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण : सौ. व श्री. बी. एस्. कुलकर्णी यांना उत्तर ... ... ... डॉ. वि. बा. घुगे ... ... ३
- ☐ श्री. शाहू छत्रपतींचे राजकारण : ग्रंथ परिचय व परीक्षणे ... ... ... ... डॉ. र. रा. दोशी ... ... ५
- ☐ औद्योगिक धोरण व विकास ... ... ... ... भा. पु. चक्रपाणी ... ... १०
- ☐ बँकिंग कायद्यात व्यावहारिक बदलाची आवश्यकता ... ... माधव जोशी ... ... १३
- ☐ लघुउद्योजकांच्या व्यवस्थापनातील समस्या ... ... ... अरुण नेवासकर ... ... १५
- ☐ असे व्यवसाय–असे उद्योग : पापड व्यवसाय ... ... ... शरद जावडेकर ... ... १५
- ☐ रिझर्व बँकेचे गव्हर्नर डॉ. आय्. जी. पटेल आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे कार्यकारी चेअरमन डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ यांची भेट ... ... ... ... ... २०
- ☐ वाचकांचा पत्रव्यवहार ... ... ... ... ... ... ... २२
- ☐ कापड व्यवसाय : संख्याचित्र ... ... ... ... ... ... ... २३

# थांबला तो संपला

# चालणाऱ्याचे भाग्य उजळते

**( चराति चरतो भगः )**

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळ नुसतीच चालत नाही ती काळाबरोबर ( सतत ) पळते आहे.**

अल्प व अत्यल्प भूधारक, जंगल कामगार, भूमिहीन शेतमजूर, ग्रामीण कारागीर आदिवासी, लघुउद्योजक, फेरीवाले, निवृत्त सैनिक, हमाल, लेखक व प्रकाशक या साऱ्यांना तसेच कृषिउद्योजकांना आपल्या बरोबर सतत पळायला लावणारी भाग्यनिर्माती बँक

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

**( दि विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँक लि., सम्मिलित )**

९, नगिनदास मास्तर रोड विस्तार, फोर्ट, मुंबई ४०००२३

# श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण

# सौ. व श्री. बी. एस्. कुलकर्णी यांना उत्तर

**डॉ. वि. बा. घुगे**
प्रमुख : अर्थशास्त्रविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सौ. मीना कुलकर्णी व श्री. बी. एस्. कुलकर्णी यांच्या 'श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण' या पुस्तकाचे मी केलेले परीक्षण 'अर्थ' मासिकाच्या नोव्हेंबर–डिसेंबर १९७६ च्या अंकात प्रकाशित झाले आहे. त्याचे उत्तर उशिरा का होईना लेखकद्वयांनी 'अर्थ'च्या ऑगस्ट १९७७ च्या अंकात दिले आहे. तरीही यामुळे पुस्तकात असलेल्या उणीवा काही दूर होत नाहीत. मात्र या निमित्ताने लेखकद्वयांनी परीक्षणकर्त्यावर आगपाखड भरपूर केली असे दिसते. त्यांच्या उत्तरातील काही मुद्यांचा उहापोह येथे करणे जरूरीचे आहे.

पहिला मुद्दा ऐतिहासिक विपर्यासाचा. व्यक्तिचरित्र रेखाटताना लेखकास सत्यता व सापेक्षता यांचे भान विसरून चालणार नाही व वरपांगी चर्चेच्या आधारे कोणालाही चरित्रनायकाच्या गुरुस्थानी नेऊन बसविता येणार नाही. हाच मुद्दा मी माझ्या परीक्षणात प्रकर्षाने मांडला आहे. तसेच म. फुल्यांचा प्रभाव शाहू महाराजांच्या विचार व कार्यावर जास्तीत जास्त पडलेला असूनही लेखकद्वयांनी या गोष्टीकडे संपूर्ण दुर्लक्ष केलेले आहे. (या संदर्भात डॉ. आर. आर. दोशी यांनी संबंधित ग्रंथाचे परीक्षण मे–जून, १९७६ च्या 'समाज प्रबोधन पत्रिके'च्या अंकात केले आहे. ते बघावे. पृ. १८५.)

लेखकद्वयांचा दुसरा मुद्दा असा. 'ज्या घटकाकडे, मानव गुंतवणूकीकडे भारतात त्यावेळी कोणीही फारसे लक्ष पुरविले नव्हते ...' (पृ. २०६), हे सपशेल चुकीचे विधान आहे. पहिली गोष्ट म्हणजे तत्कालीन इतर संस्थानांचा व ब्रिटिश सरकारच्या अंदाजपत्रकांचा त्यांनी अभ्यास केलेला दिसत नाही. आपले म्हणणे पडताळून पाहण्यासाठी लेखकद्वयांनी त्रावणकोर, कोचिन, म्हैसूर इ. संस्थानांची व्ययविषयक आकडेवारी तपासून बघावी व मगच असे विधान करावे.

दुसरा मुद्दा आर्थिक संकल्पनांचा. लेखकद्वयांच्या पुस्तकात पृ. २५ व २६ वर असलेले विधान पुढे दिले आहे. 'शेती मालाच्या विक्रीसाठी संघटनांचा अभाव असल्याने ब्रिटिशांच्या धर्तीवर महाराजांनी सहकारी पतपेढ्या आपल्या संस्थानात स्थापन करायला प्रोत्साहन दिले.' आता, पतपेढ्या सुरू करण्यामागची लेखकद्वयांची ही कल्पना कोणाला तरी पटेल का ?

हरितक्रांतीची लेखकद्वयांची कल्पना कशी सदोष आहे हे इतरांनीही दाखविले आहे. (डॉ. आर. आर. दोशी, किता पृ. १८६). हरितक्रांतीविषयी लिहिताना त्यांच्या पुस्तकात पृ. ५३ वर दिलेल्या कोष्टकातील आकडेवारीवरून काय अर्थ निघतो, तो काढतीलच.

'श्रम–कामगार संघटना–रोजगारी' हे एका प्रकरणाचे नाव आहे. यातील दोष इतरांनीही दाखविले आहेत. (डॉ. दोशी, किता. पृ. १८८). माझ्या परीक्षणात मी म्हटले होते की राजर्षींनी सार्वजनिक क्षेत्रात प्रत्यक्ष रोजगार वाढ सार्वजनिक खर्चामुळे व्हावी म्हणून प्रयत्न केलेच पण त्याचा लाभ तळाच्या माणसाला मिळावा म्हणून कायदेशीर तरतूदही केली. परंतु यासंबंधी प्रस्तुत पुस्तकात माहिती आलेली नाही. लेखकद्वयासंबंधी उत्तर म्हणून पुस्तक–पृ. ९८–९९ वरच्या तक्त्याकडे बोट दाखवितात. परंतु या तक्त्यात आहे तरी काय ? सार्वजनिक क्षेत्रातील रोजगाराविषयी काहीही माहिती नाही. दुसरे, सर्व संस्थानांतील अकुशल व कुशल कामगारांची संख्या फक्त १९०८ पर्यंतचीच दिली आहे. नंतरच्या वर्षांची दिलेली नाही. तिसरी गोष्ट

म्हणजे या तक्त्यावरून असे दिसते की १८९४ मध्ये अकुशल कामगार ४८ हजार होते ते १९०८ मध्ये ७० हजार एवढे झाले. पण याच काळात कुशल कामगारांचा संख्या २३ हजारांहून २० हजारांवर घसरली. या आकडेवारीचा काय अर्थ निघतो तो लेखकद्वयांनीच लावावा.

लेखकद्वय ' मानव्य गुंतवणूक ' या विषयीच्या स्वतःच्या मताशी चिकटून आहेत असे दिसते. त्यासाठी अनेकांचे उतारे उद्धृत करून पुरावा जमवण्याचा प्रपंच त्यांनी केला आहे. ( १ ) शिक्षण (जनरल, उच्च, कृषी, औद्योगिक, तांत्रिक, वैद्यक इ. ) प्रशिक्षण, उत्तम कला ( गायन, नृत्य, पेन्टींग इ. ) संशोधनावरचा सार्वजनिक खर्च मानव्य गुंतवणूक आहे, कारण त्यामुळे मानवाची उत्पादनक्षमता प्रत्यक्षपणे वाढते याबद्दल दुमत नाही. ( २ ) पण ज्या काही सार्वजनिक खर्चामुळे मानवाची कार्यक्षमता शाबूत राहील त्याला 'मेन्टेनन्स ' खर्च म्हणायचा. ( ३ ) काही सार्वजनिक खर्चास सामाजिक महत्त्व आहे व काही प्रशासकीय तरतूद व कायदेशीर सुधारणा यांनाही सामाजिक महत्त्व आहे. वरील २ व ३ मुद्दे मानव्य गुंतवणुकीचे असू शकत नाहीत प्लेग व इतर साथी निर्मूलन, सोनतळीस प्रजाजनासाठी चालविलेली मोफत अन्नछत्रे, अस्पृश्यांची हजेरी बंद करणे, गुन्हेगारी जमातीविषयीच्या सुधारणा इ. गोष्टी वरील २ व ३ ह्या मुद्याखाली येतात. त्यांना प्रचंड सामाजिक महत्त्व आहे. मात्र त्या मानव्य गुंतवणूक होऊ शकत नाहीत. लेखद्वयांच्या मते प्लेग–निर्मूलनामुळे जीवितहानी टाळता येते. मग पोलीस यंत्रणेमुळेही मानवाचे चोर, डाकू इ. पासून रक्षण होते व जीविताची हानी टळू शकते. तेव्हा या दोन्हीवरचा खर्च मानव्य गुंतवणूक समजावयाचा का ? तसे समजून जर सार्वजनिक खर्चाची सरमिसळ केली, तर व्ययाचे आर्थिक अथवा कार्यात्मक वर्गीकरण करताच येणार नाही व शास्त्रीय विवेचन अशक्य होईल.

' दुष्काळा 'विषयी लिहिताना लेखक म्हणतात, ' वाहतुकीमुळे झालेल्या सुधारणांमुळे अन्नधान्याच्या पुरवठ्यात तीव्र तुटवडा येणे व त्यामुळे गरीब माणसाला अपुऱ्या उत्पन्नामुळे त्या विकत न घेता येणे व त्यामुळे उपासमार होणे, असा अर्थ हल्ली आपण दुष्काळास लावतो. दुष्काळात आधुनिक व्याख्येनुसार अन्नधान्य बाजारात भरपूर असू शकेलही, पण त्यांच्या किमती इतक्या वाढलेल्या असतील की त्या गरीब माणसाला परवडणाऱ्या नसतील. ( पृ. १४५ ). ही व्याख्या बरोबर नाही असे मी ग्रंथ परीक्षणात मांडले होते. दुष्काळाची व्याख्या खाली दिल्याप्रमाणेच आहे.

मॅसफील्ड, सोरोकिन, लव्हडे, विल्यम डिग्री, बी. एम्. भाटीया, रमेश दत्त, एच्. एस्. श्रीवास्तव या सर्वांनी दुष्काळावर शास्त्रीय पद्धतीने लिखाण केले आहे. त्यावरून असे स्पष्ट होते की अवर्षणामुळे किंवा अतिवृष्टीने जेव्हा अन्नधान्याची कमतरता विशिष्ट भागात व अल्पकाळापुरतीच भासू लागते तेव्हा ती टंचाईची परिस्थिती म्हटली जाते. परंतु दुष्काळ म्हटल्यानंतर, फार मोठ्या क्षेत्रात फार काळ पाऊस पडलेला नसल्यामुळे अन्नधान्य व चारा यांचे दुर्भिक्ष निर्माण झालेले असते आणि त्यामुळे नेहमीपेक्षा मृत्यूचे प्रमाण वाढलेले असते. या अर्थानेच वरील काही विद्वानांनी भारतातील टंचाई व दुष्काळी परिस्थितीचा अभ्यास केलेला आहे.

लेखकद्वय आपल्या उत्तरात ( अर्थ, पृ. १३ ) किमतीविषयी १८९६ ते १८९८ ची आकडेवारी देतात. या आकडेवारीचा त्यांच्या दुष्काळाच्या व्याख्येशी कसा मेळ घालावयाचा ? १९०४ ते १९१४ या काळात कोल्हापूर संस्थानात इतरत्र झाली तशी किमतवाढ झाली व १९१४ नंतरच्या काळात ती झपाट्याने झाली. याचा मेळ ते त्यांच्या दुष्काळाच्या व्याख्येशी कसा घालणार आहेत हे न कळे ( दुष्काळाच्या अन्य भागासंबंधीचे लेखकद्वयांचे विचार व आकडेवारी हे कसे अशास्त्रीय व विसंगत आहेत हे डॉ. दोशी यांनी दाखवून दिले आहेच. किता पृ. १८९. )

किमत पातळीत चढउतार झाला म्हणून महाराजांना कोणीही कमी लेखत नाही. तसा संशय लेखकद्वयांना का यावा ( अर्थ, पृ. १२ ) हे न कळे. अर्थात या त्यांच्या विधानात हेतुपुरःसर खोडसाळपणा कसा लपलेला आहे हे वाचकांच्या लक्षात सहज येऊ शकते.

संशोधनाचे शास्त्रीय टप्पे, प्रकरण योजना, विवेचनाची भाषा, इ. संबंधी लेखकद्वयांच्या पुस्तकात उणीवा आहेत, असे मी लिहिले होते, ते त्यांना रुचले नाही. पण जवळ जवळ अशीच टीका इतरांनीही त्यांच्या पुस्तकावर केली आहेच की. ती अशी–' जागोजागी आलेले शब्दप्रयोग खटकणारे आहेत. उदाहरणार्थ ' जीवनाचे राहणीमान, ' ' ओलेतीखालील जमीन ' ' परकियांचे ब्रिटिश सरकार ', ' दुधदुभती जनावरे ' वगैरे. प्रकरणाच्या मांडणीत द्विरुक्ती टाळता येणेही शक्य झाले असते. उदाहरणार्थ महाराजांच्या परदेश ' प्रवासातील अवलोकना 'चे संदर्भात तीच तीच वाक्ये अनेक ठिकाणी आली आहेत. रस्ते, पूल बांधणी याविषयीची माहिती एकाच प्रकरणात ( प्रकरण दुष्काळ ) दोनदा आली आहे. ( पाहा–पान १५३ आणि १६३–६४ ). पाणी पुरवठ्याच्या योजनांबाबतच्या काही तपशीलाची पुनरुक्ती झाली आहे. ' ( डॉ. दोशी किता–पृ. १८९–१९० ).

[;

# ग्रंथ परिचय आणि परीक्षणे

**डॉ. र. रा. दोशी**
प्रमुख : अर्थशास्त्र विभाग,
देवचंद कॉलेज,
अर्जुननगर ( निपाणी )

१८९४ ते १९२२ हा काळ दक्षिण महाराष्ट्राच्या दृष्टीने समाज परिवर्तनाचा काळ म्हणून इतिहासात नोंदला गेला आहे. राजर्षी शाहू छत्रपतींच्या रूपाने कोल्हापूर संस्थानाला राजकीयदृष्टचा स्थैर्य लाभले. एवढेच नव्हे, तर परंपरागत आचार–विचार व सामाजिक दृष्टिकोनाच्या परिवर्तनाची प्रक्रियाही जोराने सुरू झाली. दीर्घकाळपर्यंत कोल्हापूर संस्थानला प्रभावी नेतृत्व न मिळाल्याने राज्यकारभाराची सूत्रे उच्चवर्णीय हितसंबंधियांच्याकडे राहिली. त्यांनी आपल्या अधिकाराच्या जोरावर राजकीय मक्तेदारी तर निर्माण केलीच, परंतु त्याचबरोबर सामाजिक व आर्थिक दरी रुंदावण्याचे कार्यही केले. सामाजिकदृष्टचा पिढया न् पिढया चालत आलेल्या चातुर्वर्ण्य पद्धतीची कसोशीने जोपासना केली. त्यामुळे सामान्य जनता राजकीय व सामाजिक अधिकारापासून वंचित राहिली, तसेच आर्थिक दुरावस्थेच्या जोखडाखाली वाकून राहिली.

सामाजिक सुधारणेच्या कार्याला १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातच महात्मा फुल्यांनी हात घातला होता. विरोधाची तमा न बाळगता बहुजनसमाजाला ज्ञानविज्ञानाची कवाडे उघडून देण्याचे दिव्य त्यांनी केले. सामाजिक जागृती निर्माण करण्याचा पश्चिम महाराष्ट्रातील हा प्रयत्न एकाकी असला, तरी प्रभावी होता. त्यांच्या सत्यशोधक चळवळीने अनेकांना आकृष्ट केले. महात्मा फुले एक सामान्यांतील असामान्य व्यक्ती होती. त्यांच्या मागे राजकीय शक्तीचे सामर्थ्य नव्हते. होते ते नैतिक व वैचारिक अधिष्ठान.

महात्मा फुल्यांच्या विचारांचा वारसा चालविणारी व्यक्ती म्हणून राजर्षी शाहू छत्रपतींचे नाव इतिहासात नोंदले गेले आहे. चातुर्वर्ण्य पद्धतीचा बिमोड करण्याचा जणू विडाच त्यांनी उचलला होता. त्यासाठी आपली २८ वर्षांची कारकीर्द त्यांनी खर्च केली. सामान्यांच्याकडूनही कटू आणि अपमानास्पद बोलणी त्यांनी शांतपणाने सोसली, आणि राजकारण्यांचे डावपेच व टीका यांना ते खंबीरपणाने सामोरे गेले. सामान्यजनांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतानाच, त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठीही पुरोगामी व प्रगत धोरणे शाहू महाराजांनी अनुसरली. उद्योग, व्यापार, शेती, रोजगार, कामगार संघटना वगैरे बाबतीत नवीन विचार व उपक्रमांना चालना देऊन प्रजेच्या आर्थिक प्रगतीचा मार्ग त्यांनी मोकळा केला. राजर्षी शाहूंनी सबंध महाराष्ट्राचेच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरीलही विचारवंत व राज्यकर्ते यांचे लक्ष वेधून घेतले होते. सामान्य जनांचा कल्याणकारी राजा, रयतेचा राजा, क्रांतिकारक राजा या रीतीने राजर्षींचा उल्लेख होत आहे.

२६ जुलै १९७४ रोजी शाहू छत्रपतींच्या जन्माला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने त्यांचा जन्मशताब्दी महोत्सव वर्षभर साजरा करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविले. इतर अनेक उपक्रमांबरोबरच शाहू छत्रपतींच्या जीवनाचे, कारकीर्दीचे व विचारांचे मूल्यमापनही सुरू झाले. याचाच एक भाग म्हणून कोल्हापूरच्या सौ. मीना कुलकर्णी व श्री. ब. शि. कुलकर्णी या प्राध्यापक पति–पत्नींनी संयुक्तपणे 'श्री. शाहू छत्रपतींचे अर्थकारण' हा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. दोघेही अर्थशास्त्राचे प्राध्यापक असल्याने श्री. शाहूंच्या आर्थिक विचारांचा व धोरणांचा परामर्श घेण्यापुरताच या ग्रंथाचा पसारा त्यांनी मर्यादित ठेवला आहे. आपल्या निवेदनात लेखकांनी ग्रंथाचे उद्दिष्ट पुढील शब्दांत स्पष्ट केले आहे. 'कोल्हापूर संस्थानाचा आर्थिक विकास करण्यामध्येही महाराजांचे विचार किती धाडसी, पुरोगामी, कृतीची जोड मिळालेले व आधुनिक आर्थिक कसोटयांशी किती मिळतेजुळते आहेत यावर फारसा प्रकाश टाकला गेला नाही. महाराजांच्या

आर्थिक कृतीची बाह्य मानचिन्हे आजच्या कोल्हापूरास" ...णावेहू झालेली आहेत. उद्योग, व्यापार व शेती, पाटबंधारे, श्रम, सहकार, नैसर्गिक संकटांशी झुंज, मानवी गुंतवणूक, सार्वजनिक आय- व्यय या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या क्षेत्रांत त्यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. त्यामागचे त्यांचे विचार, तत्त्वप्रणाली, त्यांनी टाकलेली पाऊले ही निश्चितच अभ्यासनीय ठरतात. त्यांच्या ह्या कामगिरीचाही परिचय महाराष्ट्राला तरी घडून यावा यासाठी हा संशोधनपर ग्रंथ लिहिण्याचा उपक्रम आम्ही हाती घेतला.' या शब्दांत ग्रंथाचे प्रयोजन स्पष्ट झालेले आहे.

आर्थिक विचार व धोरणांचे परिशीलन करण्यासाठी लेखकांनी आधुनिक अर्थशास्त्रातील निकष लावण्याचा प्रयत्नही केलेला आहे. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीस संबंधित अर्थशास्त्रीय तत्त्वांचे थोडक्यात विवरण आले आहे. या संदर्भात लेखक म्हणतात-'त्यांचे आर्थिक विचार व कृती आधुनिक अर्थशास्त्राच्या निकषांशी पडताळून बघितली तर जितके महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी सामाजिक बाबतीत केले आहे, तेवढेच किंबहुना अधिक महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी आर्थिक बाबतीत केले आहे असे म्हणावे लागेल.' (पान १) आर्थिक विकासाची प्रक्रिया, हरितक्रांती, केन्सचे अर्थशास्त्र, सार्वजनिक आय- व्ययाची तत्त्वप्रणाली, आर्थिक नियोजन वगैरे विषयींच्या तात्त्विक विश्लेषणांचा आधार घेऊन शाहू महाराजांच्या धोरणात ही तत्त्वे कशी आढळतात हे दाखविण्याचा प्रयत्न लेखकांनी केलेला आहे. विषयमांडणीसाठी अनुसरलेली ही पद्धत. परंतु त्याचबरोबर लेखकांनी याच संदर्भात केलेले एक विधान मात्र खटकणारे आहे. 'महाराजांच्या आर्थिक कामगिरीचे मूल्यमापन करताना आपल्याला महाराजांचे कार्य एका बाजूला व दुसऱ्या बाजूला आधुनिक अर्थशास्त्राच्या कसोट्या असे करून चालणार नाही. महाराजांनी काळाच्या ज्या चौकटीत काम केले ती चौकट महत्त्वाची आहे. ज्या पार्श्वभूमीवर महाराजांनी कार्य केले ती विसरून चालणार नाही.' (पान ३). असे विधान करून पहिल्याच प्रकरणात शाहूमहाराजांच्या वेळची आर्थिक व सामाजिक परिस्थिती कशी होती याचे विवेचन केले आहे. या विधानावरून असे मानावयाचे काय, की शाहू महाराजांचे आर्थिक क्षेत्रातील कार्य मनापासून पाहताना अर्थशास्त्रीय कसोट्यांना गौणत्व देऊन तत्कालीन परिस्थितीला प्रधान स्थान दिले पाहिजे ? लेखकांचे हे विधान अगोदरच्या विधानाला काटशह देणारे आहे. आर्थिक क्षेत्रातील कार्य व अर्थशास्त्रीय कसोट्या यांचा संबंध लावून चालणार नाही असे सांगूनही प्रत्यक्षात लेखकांनी सर्व प्रकरणांत तो संबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. असो.

ग्रंथाची मांडणी एकूण ९ प्रकरणे आणि दोन परिशिष्टे यांमध्ये केलेली आहे. शेवटी संदर्भ ग्रंथांची यादी व सूची आहे.

कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या आर्थिक उन्नतीचा पाय शेतीव्यवसाय आहे हे जाणून शाहू छत्रपतींनी शेतीच्या ऊर्जितावस्थेसाठी विविधांगी उपाययोजना केली. शेतकऱ्यांना चांगले बियाणे, खते व कर्ज मिळण्याची व्यवस्था केली. चहा, कॉफी सारख्या पिकांच्या लागवडीचे प्रयोग केले. शेतीविषयक प्रदर्शने भरविली. आदर्श शेतीचा प्रयोग केला. पाणीपुरवठ्याच्या योजना कार्यान्वित केल्या. शेतजमिनीचे तुकडे तोट्याचे राहू नयेत म्हणून मोठ्या आकाराच्या तुकड्यांचा पाठपुरावा केला. शेतीला पूरक व्यवसायांचीही वाढ करण्याकडे लक्ष दिले. विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन दिले.

शाहू छत्रपतींचे हे प्रयत्न स्तुत्य होते याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. तथापि, लेखकांनी शाहू महाराजांना 'हरित क्रांतीचे जनक' असे संबोधले आहे (पान ५१) यामध्ये अतिशयोक्ती जाणवते. लेखक म्हणतात, 'महाराजांनी या योजनेचा पाया घातला म्हणून कोल्हापूरवासियांना दोन वर्षांपूर्वीच्या दुष्काळात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा तडाखा बसला नाही. उसाची लागवड विस्तृत प्रमाणावर करता येते, शेतीला पाण्याचा पुरवठा होऊ शकतो हे सर्व फायदे आपल्याला मिळत आहेत, ते श्री. शाहू महाराजांनी राधानगरी श्री लक्ष्मी तलावाची योजना व्यवहारात आणल्याने. आणि ह्यामुळे त्यांना 'हरित क्रांतीचे जनक' ही पदवी योग्य ठरते (पान ५४). केवळ बीजपाण्याची सोय केली एवढ्यावरच हरित क्रांतीचे जनकत्व बहाल करता येईल काय ? 'हरित क्रांती' ह्या शब्दास खास अर्थ असून ह्या विषयावरचे लेख श्री. दोशी आणि इतर लेखकांनी 'पत्रिकेत' लिहिले होते.

अर्थात असे म्हटल्याने छत्रपतींच्या प्रयत्नांना कमी लेखण्याचाही मानस नाही. त्यांच्या शेतीसंबंधीच्या कार्यात प्रागतिक दृष्टिकोन होता हे खचित. शेती उत्पादनवाढीला पोषक परिस्थिती निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न होता तो. स्वातंत्र्योत्तर काळात घडून आलेल्या बदलांची बीजे त्यात सापडतात.

शेतीसाठी पाणीपुरवठा व्हावा आणि लोकांनाही पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू नये या उद्देशाने शाहू महाराजांनी पाणीपुरवठ्याच्या लहान मोठ्या योजना कार्यान्वित केल्या. जुन्या विहिरींची दुरुस्ती केली, नव्या विहिरी खोदल्या, ठिकठिकाणी लहान मोठे तलाव बनविले, आणि या सर्वांवर कळस म्हणून राधानगरी गावाजवळ भोगावती नदीवर मोठे धरण बांधले-या सर्व कार्याचा तपशील 'पाटबंधारे' या प्रकरणात आला आ... विवेचनाच्या ओघात शाहूमहाराजांचा द्रष्टेपणा सिद्ध करीत अ...



अर्थ

ताना लेखनद्वय सर्वच प्रकरणांत शाहूमहाराजांचे आर्थिक धोरण आजही कसे उपकारक ठरू शकेल हे सांगण्याचाही प्रयत्न करतात. यातूनच काही वेळा न पटणारी विधाने येऊन जातात. लेखक म्हणतात आपल्याकडे शेतीला भरपूर प्रमाणात पाणी हवे असते. पाऊस भरपूर पडतो, पण नद्यांना पूर येऊन ते पाणी शेवटी सागराला मिळते व उन्हाळ्यात आपल्याला एकूणच पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. अजूनही महाराजांच्या नंतर पन्नास वर्षांनी-सुद्धा आपल्या ह्या दृष्टिकोनात फारसा फरक झाला आहे असे वाटत नाही.' (पान ५५). गेल्या २५ वर्षांतील भारताच्या पंचवार्षिक योजनांचा आढावा घेतला, तर अगदी पहिल्या पंचवार्षिक योजनांपासूनच पाटबंधाऱ्यांच्या अनेक लहान मोठ्या योजना कार्यान्वित झालेल्या असून त्यांच्यापासून लाखो हेक्टर जमिनींना पाणीपुरवठा होत आहे. ही वस्तुस्थिती असतानाही 'ह्या दृष्टिकोनात फारसा फरक झाला आहे असे वाटत नाही' असे विधान अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांनी करावे याचे नवल वाटते.

शाहू महाराजांनी आपल्या इंग्लंड व इतर देशांच्या भेटीत तेथील उद्योगधंद्यांच्या वाढीबद्दल विशेष औत्सुक्य दाखविले होते. नवनवीन उद्योग आपल्याही संस्थानात सुरू करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. विविध प्रकारच्या व्यवसायांना त्यांनी हस्ते परहस्ते नाना प्रकारे मदत केली. उद्योगधंद्यांना स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभे राहता यावे यासाठी शक्य तेवढी पोषक परिस्थिती निर्माण केली. कोल्हापूर स्टेट रेल्वे लाईन, श्री शाहू मिल, काताचा कारखाना, पुण्यातील कापूस, रेशीम व कागदाच्या गिरण्या, जिनिंग व विव्हिंग फॅक्टरीज, कापड रंगविण्याचा कारखाना, राळ तयार करण्याचा उपक्रम, राधानगरीचा लाकूड शुद्धीकरण कारखाना, घोड्याची जीन बनविण्याचा व्यवसाय वगैरे उपक्रमांतून शाहूमहाराजांनी संस्थानाच्या औद्योगिक विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे स्वरूप समजून येते. त्यामुळे कोल्हापूर संस्थानातील कोल्हापूर, शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज, रायबाग, गारगोटी, राधानगरी वगैरे ठिकाणी व त्या परिसरात औद्योगिक उत्पादनाला चालना मिळाली. महाराजांनी खाजगी कारखानदारीबरोबरच सहकारी प्रयत्नांचाही पाठपुरावा केला.

उद्योग व व्यापार ही परस्परपूरक असतात. शेती व कारखानदारीतून तयार होणाऱ्या मालाला बाजारपेठ उपलब्ध होणे जरूरीचे असते. या दृष्टीने महाराजांनी कोल्हापूर संस्थानात बाजारपेठा स्थापण्याकडे लक्ष दिले. कोल्हापूर ते मिरज रेल्वेचे बांधकाम या हेतूनेच पूर्ण केले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोल्हापूरच्या रेल्वे स्टेशनच्या परिसरात 'शाहूपुरी' या नावाने वसविलेली बाजारपेठ. या ठिकाणी आपली दुकाने उघडण्यासाठी कोल्हापुरातील व्यापाऱ्यांना त्यांनी सक्रीय प्रोत्साहन दिले, तसेच निपाणी पेठेतील व इतर ठिकाणच्या व्यापाऱ्यांना निमंत्रणे देऊन वखारी उघडण्यास मदत केली. गूळ, साखर, भुईमूग वगैरेंची मोठ्या प्रमाणात उलाढाल या बाजारपेठेत होऊ लागली. शाहूपुरी पेठेतून निर्यात होणाऱ्या मालाची १८९४–९५ सालातील किंमत ६ लक्ष रुपये होती, ती १९२१ मध्ये ३० लक्षांपर्यंत वाढली.

शाहू छत्रपतींनी व्यापारवाढीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेत असताना लेखकांनी याच प्रकरणात नव्हे, तर सबंध पुस्तकात एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करू नये याचे आश्चर्य वाटते. ती म्हणजे जयसिंगपूरची बाजारपेठ. आपल्या संस्थानच्या अगदी सरहद्दीवर असलेल्या ओसाड माळरानावर बाजारपेठ वसविण्यात शाहूमहाराजांची दूरदृष्टी स्पष्टपणे जाणवते. शिरोळ, इचलकरंजी ही आपल्या संस्थानातील औद्योगिक केंद्रे वाढीला लागण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला महत्त्व होते. निवडुंगाची फडे आणि इतर झाडाझुडपांनी गजबजलेल्या माळरानावर एक गाव वसवून त्यातून बाजारपेठ निर्माण करण्याचे कार्य क्वचितच उल्लेखनीय होय. इ. सन १९१६ मध्ये या कामाला सुरुवात झाली. याचा उल्लेख जयसिंगपूर नगरपालिकेने श्रीमंत जयसिंगराव घाटगे यांच्या बसविलेल्या पुतळ्याच्या चबुतऱ्यावरील कोनशीलेतही सापडतो. त्यावरील संबंधित मजकूर असा : 'करवीर संस्थानचे लोकप्रिय राजे कै. राजर्षी श्रीमंत छत्रपती शाहूमहाराज यांनी आपले जनक वडील कै. जयसिंगराव आबासाहेब घाटगे (कागल) यांचे स्मरणार्थ त्यांचे नावाने या जयसिंगपूर नगरीची वसाहत इ. स. १९१६ मध्ये वसविली.'

ब्रिटिशांच्या आधिपत्त्याखालील एक संस्थानिक राजा असूनही शाहू छत्रपतींनी मजूरांच्या हितसंवर्धनासाठी संघटना बसविण्याला प्रोत्साहन द्यावे ही गोष्ट त्यांच्या पुरोगामी विचारांची साक्ष पटवून देणारी मानावी लागेल. युरोपात घडणाऱ्या घटनांची माहिती मजूर परिषदांमधून सांगून मजूरांना एकीचे बळ पटवून देण्याचा त्यांनी अनेक वेळा प्रयत्न केला. मुंबईला स्थापन झालेल्या पीपल्स युनियनचे शाहूमहाराज आश्रयदाते होते.

श्रमिकांच्या बाबतीतही त्यांना रोजगाराची संधी शक्यतो त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी मिळण्याची व्यवस्था झाल्यास खेड्यातून शहराकडे येणारा मजूरांचा लोंढा रोखता येईल ही शाहूमहाराजांची भूमिका होती. त्यासाठी शेतीला पूरक व्यवसाय, हस्तोद्योग व कुटिरोद्योग वगैरे वाढविण्यावर भर देण्यात आला. ग्रामीण कारागिरांच्या प्रशिक्षणाचे महत्त्व ध्यानात घेतले गेले.

मजूरवर्ग सामान्यतः कनिष्ठ वर्णीयांपैकीच असल्याने त्यांच्या

शोषणाला मर्यादा नव्हती. या जोखडातून त्याला मुक्त करण्यासाठी छत्रपतींनी हजेरी, वेठबिगार व वतने रद्द केली. अस्पृश्य वर्गावरील मोठे ओझे त्यामुळे कमी झाले मजुरांच्या मुलाबाळांना शिक्षण मिळण्याचीही त्यांनी व्यवस्था केली. अशा प्रकारच्या उपाययोजना सध्या अखिल भारतीय स्तरावरून होत आहेत हे लक्षात घेतल्यास शाहूमहाराजांनी किती मजल मारली होती हे समजून येईल.

श्रमविषयीचा उहापोह करताना लेखकांनी शाहूंच्या उपक्रमांचे सार सांगताना शाहूराजांचा उल्लेख 'कामगारांच्या राज्याचे स्वप्न पाहणारा हा सस्थानिक!' असा केला आहे (पान ९२). युरोपात मजुरांच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताके स्थापन होत आहेत, मजुरांचा प्रभाव पक्ष व पक्ष वाढत आहे, तेव्हा यावरून तुम्हीही बोध घ्या असे मजुरांना शाहू राजे सांगत. परंतु याचा अर्थ कोल्हापूर संस्थानात असो अगर अखिल हिंदुस्थानात असो, त्याच प्रमाणे मजुरांची सरकारे यावीत असे शाहूराजांना सुचवावयाचे होते काय? खचितच नाही. कामगारांमध्ये जागृती निर्माण करण्यामागे त्यांचे राज्य स्थापण्याचे उद्दिष्ट नसून कामगारांची आर्थिक व सामाजिक उन्नती साधणे एवढाच प्रयत्न होता. लेखकद्वयानी केलेला उल्लेख अनाठायी आहे.

भांडवली गुंतवणुकीबरोबरच मानवी गुंतवणूक समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. या भूमिकेतून शाहूमहाराजांनी मानवी गुंतवणुकीकडे किती कटाक्षाने लक्ष दिले होते याचे बरेच तपशीलवार विश्लेषण लेखकांनी दिले आहे. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणासाठी शाहूमहाराजांनी कसे कसे प्रोत्साहन दिले ते समग्रपणे सांगून विविध जातींच्या वसतिगृहांचे जाळे निर्माण करण्यामागची महाराजांची भूमिकाही विशद करण्यात आली आहे. याखेरीज अस्पृश्यांची हजेरी बंद करणे, गुन्हेगार जमातींना सन्मार्गाला लावणे व मनोरंजनासाठी साठमारी, कुस्तीसारखे खेळ लोकप्रिय करणे याबाबतही शाहू महाराजांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला आहे.

या सर्व विश्लेषणात काही महत्त्वाचे संदर्भ राहून जावेत याचे मात्र नवल वाटते. पान १२५ वर महाराजांनी ग्रंथालयांना मदत दिल्याचे उल्लेख आहेत, परंतु सध्याच्या करवीरनगर वाचन मंदिराचा संदर्भ कुठेच येऊन जात नाही. महाराजांच्या काळात हे ग्रथालय 'कोल्हापूर नेटिव्ह लायब्ररी' या नावाने ओळखले जात होते. श्री. शाहू महाराज या संस्थेचे पहिले आश्रयदाते होते. मद्रासचे 'जस्टिस' दैनिक व इतर काही वृत्तपत्रे त्यांनी उत्स्फूर्तपणे संस्थेस नियमितपणे दिली. एवढेच नव्हे, तर संस्थेचे रुपांतर मध्यवर्ती वाचनालयात झाल्यानंतर संस्थेच्या नोकरांवर होणारा सारा खर्च व संस्थेस मदत दरबारकडून मिळत असे. आपले पिता श्री. शाहूमहाराज यांनी ग्रथालयाबाबत अनुसरलेले उदार धोरण चालू ठेवण्याचे अभिवचन श्री. राजाराम महाराज यांनी त्यांच्या राज्यारोहणप्रसंगी दिले होते.

दुसरी गोष्ट म्हणजे आजचे केशवराव भोसले नाट्यगृह (तेव्हाचे पॅलेस थिएटर). शाहूमहाराजांनी ज्या काही चिरस्मरणीय गोष्टी केल्या त्यामध्ये या नाट्यगृहाची उभारणी ही एक आहे. १९१३ साली या नाट्यगृहाचे बांधकाम सुरू होऊन १९१५ साली दसऱ्याचे मुहूर्तावर त्याचे उद्घाटन झाले. नाट्यगृहाचे बांधकामासाठी लागणारे काही सामान त्यावेळी शाहू महाराजांनी परदेशातून मागविले होते. नाट्यगृहाचे उद्घाटन किर्लोस्कर मंडळींच्या 'मानापमान' या नाटकाने झाले.

या प्रकरणात महाराजांनी नाट्य व चित्रकलेला कसे प्रोत्साहन दिले याचा थोडक्यात का असेना, परामर्ष येऊन जायला हवा होता. मानवी गुंतवणुकीत अशा उपक्रमांचे स्थान महत्त्वाचे आहे हे प्रकरणाच्या प्रास्ताविकात आवर्जून सांगितल्यानंतर तपशील येणे अपरिहार्य वाटते. केवळ 'चित्रकला, नाट्यकला व संगीतकला यांना प्रोत्साहन दिले' (पान १३९) एवढ्यावरच बोळवण करणे रास्त ठरणार नाही. वास्तविक शाहू महाराजांनी नाट्य, संगीत, चित्र, मल्ल अशा विद्येत चमकलेली व अग्रभागी तळपणारी अशी माणसे आपल्या राज्यात असावीत या जिद्दीने अनेक कलाकारांना कोल्हापूरच्या परिसरात आणले. त्यांच्या अडीअडचणी दूर केल्या. नाटकमंडळींना घरच्यासारखे मानून त्यांचा प्रपंच चालविला, बालगंधर्वांना मिरजेस पाठवून त्यांच्यावर औषधोपचार करविला तर केशवराव भोसले पुण्यात आजारी असताना स्वत: त्यांच्या घरी जाऊन त्यांची चौकशी आस्थेने केली. 'नाट्यकंपन्यांना शाहूमहाराज एखाद्या दुखवताप्रमाणे धुण्याच्या पाण्यापासून ते तोंडाचा रंग जाण्याच्या शिकेकाईपर्यंत सर्व जिनसा पुरवीत असत. जवळजवळ किराणा मालाचे एक मोठे दुकानच ते कंपनीला देत असत.' (करवीर नाट्यमंडळ स्मरणिका, नाट्य संमेलन, १९७०, पान २०) बालगंधर्व, केशवराव भोसले दत्तोपंत हल्याळकर, दत्तोबा भोसले, विष्णुपंत औंधकर, विष्णुपंत पागनीस वगैरे नामवंत नटांना प्रोत्साहन देण्यात शाहू महाराजांचा मोठा हातभार होता.

'देवल क्लब' ही कोल्हापुरातील नाट्य व संगीताच्या क्षेत्रात काम करणारी एक जुनी संस्था. शाहू महाराजांनी या संस्थेला सक्रीय आश्रय दिला. संस्थेच्या सध्याच्या इमारतीसाठी जागा व रोख सहा हजार रुपये १९१६ मध्ये त्यांनी देवल क्लबला दिल्याची नोंद आहे.

वरील माहिती थोडक्यात का असेना पुस्तकात येऊन जावयास हवी होती. त्यामुळे मानवी गुंतवणुकीचे प्रयत्न अधिक स्पष्टपणे नजरेत भरू शकले असते.

शाहू महाराजांनी १८९४ साली, म्हणजे वयाच्या विसाव्या वर्षी, कारभाराची सूत्रे आपल्याकडे घेतली. आणि थोड्याच कालावधीत—१८९६ आणि १९००—त्यांना दुष्काळाच्या गभीर आपत्तीशी झुंज द्यावी लागली. एवढ्या लहान वयातही त्यांच्या प्रयत्नांची झेप वाखाणण्यासारखी होती खचितच—त्यांनी तावडतोबीच्या उपाययोजना जातीने लक्ष घालून केल्याच, तथापि अशा आपत्ती पुन्हा उद्‌भवणार नाहीत या दृष्टीनेही प्रयत्न केले. दुष्काळाशी झुंज देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सिद्ध करण्याबरोबरच स्वस्त धान्याची दुकाने, धान्याची इतर ठिकाणांहून आयात, पिण्याच्या पाण्याच्या सोयी, रस्ते व पूल यांची बांधकामे, दुष्काळी भत्ता वाटप, दुष्काळी कचेऱ्या, लहान मुलांची देखभाल, गरीबांसाठी आश्रम, मोफत अन्न व शिधावाटप, गरीब विद्यार्थ्यांना वसतिगृहातील सवलती, दुभत्या जनावरांची देखभाल, धरणे व पाटबंधाऱ्यांच्या योजना, शेतकऱ्यांना कर्जे, सुधारित शेतीचे प्रयोग व शिक्षण, अशा एक ना अनेक मार्गांनी दुष्काळाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न महाराजांनी जातीने लक्ष घालून केला लेखकद्वयांनी हा सर्व भाग तपशीलात दिला असल्याने शाहू महाराजांच्या प्रजाहितदक्षपणाची कल्पना येऊ शकते.

शाहू महाराजांचे एकंदर प्रयत्न स्तुत्य व अनुकरणीय होते हे निर्विवाद. परंतु त्यांच्या कामगिरीचे वर्णन करताना अतिशयोक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावयास हवी होती. 'त्या काळात एकही भूकबळी पडला नाही हे महाराजांच्या प्रशासनाचे, आर्थिक धोरणाचे वैशिष्ट्य !' (पान १६९.) हे विधान परिशिष्ट २ मध्ये दिलेल्या आकडेवारीशी पडताळून पाहता विसंगत वाटते. परिशिष्टातील संबंधित आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | जन्मसंख्या | मृत्यूसंख्या | एकूण लोकसंख्या | जन्म (दर हजारी) | मृत्यू (दर हजारी) |
|---|---|---|---|---|---|
| १८९६–९७ | ३१,०६२ | २६,६४६ | ९,१३,१३१ | ३४ | २९ |
| १८९७–९८ | २२,४२३ | ३३,०६९ | „ | २५ | ३६ |
| १८९८–९९ | २७,९३४ | १७,९९० | „ | ३१ | २० |
| १८९९–१९०० | २७,७४६ | २४,८१९ | „ | ३० | २७ |
| १९००–०१ | २०,८२८ | ३६,८३८ | ९,१०,०११ | २३ | १४ |
| १९०१–०२ | १८,७४२ | ४४,२६६ | „ | २१ | ४९ |
| १९०२–०३ | २६,७७४ | ४०,११८ | „ | २९ | ४४ |

टीप : दर हजारी मृत्यूचा पुस्तकात छापलेला हा आकडा चूक आहे. तो इतर माहितीच्या संदर्भात ४० असावयास हवा.

या कोष्टकावरून लक्षात येईल, की दुष्काळनंतरच्या वर्षात (१८९७–९८, १९००–०१, १९०१–०२ आणि १९०२–०३) मृत्युसंख्या बरीच वाढली आणि दर हजारी मृत्युसंख्या जन्मसंख्येपेक्षा बरीच जास्त राहिली. शाहू महाराजांच्या उपाययोजनेचा फायदा प्रामुख्याने कोल्हापूर शहरातील नागरिकांना मिळू शकला. ग्रामीण भागातील परिस्थिती शोचनीयच राहिली होती. याची जाणीव शाहू महाराजांना होती व याबद्दलची आपल्या मनातील काळजी व व्यथा त्यांनी आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली होती. या गोष्टी लक्षात घेतल्या तर 'एकही भूकबळी पडला नाही' असे विधान वाजवी ठरणार नाही.

या प्रकरणाच्या संदर्भात लेखकद्वयांनी केन्सच्या अर्थशास्त्राचा गाभा स्पष्ट करून केन्सप्रणीत धोरणाचा अवलंब त्यापूर्वीच शाहू महाराजांनी कशा रीतीने केला होता हे ठसविण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: आर्थिक विकासाच्या कार्यक्रमासाठी परंपरागत 'समतोल अर्थसंकल्पा'चे धोरण सोडून देणे आवश्यक असते व ही गोष्ट शाहू महाराजांच्या प्रयत्नांत प्रकर्षाने जाणवते हे स्पष्ट केले आहे, व त्यासाठी कोल्हापूर शहर व संबंध संस्थान यांच्या उत्पन्न व खर्चाचाही तपशील विस्तृतपणे दिला आहे. तथापि हा तपशील पडताळून पाहिला तर मात्र शाहू महाराजांनी समतोलाच्या अर्थसंकल्पाचे धोरणच सामान्यत: अनुसरले होते, असे जाणवते. लेखकांनी पान २०८ ते २११ वर कोल्हापूर संस्थानाचे जहागिरीसह उत्पन्न व खर्च यांचा तपशील दिला आहे. एकूण उत्पन्न व खर्च यांचे आकडे एकत्रित आणले, तर वस्तुस्थितीची

कृपया पृष्ठ १९ पहा

# औद्योगिक धोरण व विकास

भा. पु. चक्रपाणी, नागपूर

गेल्या काही वर्षांत भारतात औद्योगिक विकासाला चांगलीच गती मिळाली आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे सरकारने औद्योगिक विकासाबाबत मुक्त मनाने स्वीकारलेले डोळस धोरण हे होय. तसेच या देशातील उद्योगपतींनाही त्याचे श्रेय द्यावे लागेल. कारण त्यांनी आपल्या काही अडचणी वेळोवेळी निर्भीडपणे सरकारपुढे मांडल्या व सरकारनेही सुयोग्य दाद दिली. १९७५ पासून सरकारने २९ निवडक उद्योगांना आपली पूर्ण क्षमता वापरण्याची परवानगी देऊन औद्योगिक विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले. ही पूर्णपणे वापरली जाणारी क्षमता परवानाप्राप्त मर्यादेपेक्षा जास्त असेल तरी त्यास हरकत घेण्यात येत नाही. मात्र त्यांनी अतिरिक्त यंत्रसामुग्री (आयात केलेली अथवा देशी) परवानगीशिवाय घेऊ नये. तसेच लघु-उद्योग क्षेत्रासाठी जे उत्पादन राखून ठेवण्यात आले आहे ते त्यांनी करू नये.

स्थापित क्षमतेचा पूर्ण वापर करता यावा म्हणून काही उत्पादनक्षेत्रांत विविधतेचा अवलंब करण्यासही परवानगी देण्यात आली. अशी उत्पादनक्षेत्रे म्हणजे औद्योगिक यंत्रसामुग्रीचे उत्पादन, यांत्रिक अवजारांचे उत्पादन, विद्युत् उपकरणे, पोलाद कास्टिंग, फोर्जिंग, पोलाद पाईप व नळ्या, प्रवासी मोटरगाड्या व शक्तीवर चालणारे उद्योग. मात्र या क्षेत्रात जेवढी परवानाप्राप्त क्षमता आहे तेवढीच त्यांनी वापरावी ही अट आहे. अशी अट असण्याचे कारण त्या त्या उद्योगांनी आपला मूळ उद्योग सोडून नवीन उद्योग परवानगीशिवाय करू नये हे आहे. पण असे असले तरी मूळ उद्योगातीलच भांडवल व यंत्रांच्या साह्याने उत्पादनाची विविधता त्यांना साधता येते. त्यामुळे एकाच कारखान्यात निरनिराळ्या प्रकारचा माल तयार करता येतो.

## उद्योगांना आणखी एक स्वातंत्र्य

सध्याच्या औद्योगिक परवाना देण्याच्या धोरणानुसार परवानित क्षमतेपेक्षा (लायसेन्स कपॅसिटी) २५ टक्क्यांपर्यंत अधिक उत्पादन करता येते. त्यास अतिरिक्त परवानगी घेण्याची जरुरी नाही. याचा अर्थ एखाद्या कारखान्याने पूर्ण क्षमता वापरून शिवाय अधिक यंत्रसामुग्री घेऊन २५ टक्क्यांपर्यंत उत्पादन वाढविण्याचे ठरविल्यास तसे करण्याकरिता केंद्र सरकारची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. हे धोरण मुक्त औद्योगिक विकासाला लाभदायक ठरले आहे. कारण परवानगी मिळण्याकरिता करावा लागणारा खर्च, श्रम व वेळ या सर्वांत बचत झाली आहे. त्यामुळे उत्पादनवाढ करण्याकरिता उद्योगांना मिळालेले हे एक स्वातंत्र्यच ठरते. यावर काही लोकांना वाटते की फक्त २५ टक्के विस्तारच का परवानामुक्त ठरविण्यात आला? अधिक का नाही? याचे काही निश्चित उत्तर देता येण्यासारखे नसले तरी एक अतिरिक्त सोय वा सवलत म्हणून एवढी मर्यादा आहे हे लक्षात घेता येईल. तसेच ही वाढ करताना मूळ क्षमता किती होती किंवा उद्योगाची परिस्थिती कशी आहे याचा विचार करण्यात येत नाही. मूळ क्षमता ही कितीही असो वा उद्योगाची परिस्थिती कशीही असो, २५ टक्केपर्यंत परवानित क्षमतेपेक्षा अधिक उत्पादन परवानामुक्त आहे.

## तांत्रिक विकास विभाग व फंड

उद्योगांनी आपली पूर्ण क्षमता वापरावी, त्यांनी मालाची निर्यात करावी आणि त्यांना त्यांच्या उद्योगात आधुनिकीकरण करता यावे म्हणून तांत्रिक विकास विभाग (टेक्निकल डेव्हलपमेंट सेल) उद्योग मंत्रालयात काढण्यात आला. तसेच या गोष्टीकरिता विदेशी चलनावळ उपलब्ध व्हावी म्हणून एक तांत्रिक विकास निधी (टेक्निकल डेव्हलपमेंट फंड) स्थापन करण्यात आला. या निधीतून पुढील कारणांकरिता विदेशी चलनावळ उपलब्ध होते--

१) ज्यांच्यामुळे मालाची प्रत सुधारते, उत्पादन वाढते अशी उपकरणे घेणे.

२) तांत्रिक ज्ञानाची (नो हाऊ) आयात करणे.

३) परदेशी सल्लागार सेवा घेणे.

४) विदेशी यंत्रांचे वा प्लँटसचे नकाशे, आराखडे वि घेणे.

हा निधी प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय विकास एजन्सीने (अ डी. ए.) निवडलेल्या उद्योगांपुरता मर्यादित आहे. ते उ

असे– व्यापारी वाहतूक करणारी वाहने, ट्रॅक्टर, फोर्जिंग्ज, मोठ्या भट्ट्या, कापड उद्योगांची यंत्रसामग्री व यांत्रिक अवजारे. कोणत्याही एका उद्योग कंपनीला या योजनेखाली फक्त २,५०,००० डॉलर्सचे विनिमय मिळेल. जे उद्योग आपल्या कारखान्याची पुढीलप्रमाणे ताबडतोब शक्यतो एकत्र सुधारणा करू चाहतात त्यांना हे विनिमय देण्याकरिता प्राधान्य देण्यात येईल.

१) निर्यातक्षमता वाढवून निर्यात माल वाढविणे.
२) उत्पादन खर्चात बचत करण्याची योजना.
३) क्षमता वापरण्यात सुधारणा करणे.
४) तांत्रिक दृष्टीने उन्नती करणे.
५) मिश्र उत्पादन करून संतुलन साधणे.
६) आधुनिकीकरण व रॅशनलायझेशन करणे.

## भांडवल वाढविता येते

औद्योगिक कंपन्यांना भांडवल मिळविणे सुलभ व्हावे म्हणून भाग–भांडवल उभारण्याच्या काही अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. कोणतीही कंपनी प्रतिवर्षी फक्त २५ लाख रुपयांपर्यंत भांडवल नियंत्रकाच्या परवानगीविना उभारू शकत असे. परंतु आता कोणत्याही वर्षी ५० लाख रुपयांपर्यंत भांडवल उभारण्यास औद्योगिक कंपन्यांना भांडवल नियंत्रकाची परवानगी घ्यावी लागत नाही. मात्र त्यांनी 'भांडवल उभारणी (सूट) आदेश १९६९' मधील मार्गदर्शक सूत्रांचे पालन करणे आवश्यक आहे.

## काही अन्य सवलती

जे लघुउद्योग–क्षेत्रातील उत्पादनाशी स्पर्धा करीत नाहीत अशा २१ उद्योगांना परवान्यापासून मुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे असे नवीन उद्योग काढता येऊन उत्पादनवाढ, रोजगारनिर्मिती वगैरे उद्दिष्टे साधता येतील. मात्र या उद्योगांना आयात केलेल्या यंत्रसामग्रीची, आयात कच्च्या मालाची जरूरी नसावी. म्हणजेच काय की ते स्वदेशी यंत्रसामग्रीवर व देशातच मिळणाऱ्या कच्च्या मालावर आधारित असावेत. अशा उद्योगांना परवानगीची आवश्यकता नाही.

उद्योगांनी निर्यात करण्याकरिता उद्युक्त व्हावे म्हणून व त्यांना परदेशात स्पर्धा करता यावी म्हणून १५ अभियांत्रिकी उद्योगांना पाच वर्षांच्या काळाकरिता २५ टक्के क्षमतावृद्धीची परवानगी दिली आहे. अशीच सवलत इतरही काही महत्त्वाच्या (कोअर इंडस्ट्रीज) उद्योगांना जरूरीप्रमाणे दिली जाईल.

अशा प्रकारचे औद्योगिक धोरण पूर्वीच्या केंद्र सरकारने गेल्या दोन–तीन वर्षांत अवलंबिले होते.

आता काही निवडक उद्योगधंद्यांत किती उत्पादन वाढले ते पाहू.

## औद्योगिक वृद्धीचा दर

१९७६ मध्ये औद्योगिक वृद्धीचा सरासरी दर १०·१६ ते १५·८ होता. यात प्रामुख्याने कच्चे लोखंड, पोलाद, ॲल्युमिनियम, वनस्पती, नत्र व स्फुरद खते, मोटरगाड्या, ऑटो रिक्षा, स्कूटर्स, विद्युत निर्मिती, साखर इत्यादी उद्योगांचा समावेश आहे. या उद्योगांत उत्पादनाची वृद्धी समाधानकारक आहे व अजून उत्पादनवाढीस भरपूर वाव आहे.

पुढील आकडेवारीवरून महत्त्वाच्या उद्योगांच्या उत्पादनवाढीच्या दराची कल्पना येईल.

| अनु. क्र. | उद्योग | भारांक १९७०=१०० | टक्केवारीतील बदल जुलै–सप्टेंबर १९७६ जुलै–सप्टेंबर १९७५ |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | कोळसा | ६.०४२७ | + ४.२ |
| २. | कच्चे लोखंड | ०.७५८२ | + २२.० |
| ३. | विक्रीयोग्य पोलाद (मुख्य पोलाद उद्योगातील) | ३.८७७४ | + १८.६ |
| ४. | ॲल्युमिनियम | ०.५४९६ | + १५.० |
| ५. | जस्त | – | + ९.७ |
| ६. | शिसे | – | + २.५ |
| ७. | साखर | २.७९०० | + २४.४ |
| ८. | वनस्पती | ०.६७८० | + २०.० |
| ९. | कापूस धागा | ६.२४३८ | + २.० |
| १०. | वृत्तपत्र कागद | ०.०२१० | + ७.२ |
| ११. | नत्र खते | ०.८६६२ | + २३.४ |
| १२. | स्फुरद खते | ०.५१९२ | + ४६.८ |
| १३. | कापड (गिरणी विभाग) | ५.३४०७ | + १.७ |
| १४. | पेट्रोलियम वस्तू | १.६२०० | + ३.९ |
| १५. | सिमेंट | १.१७०० | + २.३ |
| १६. | व्यापारी वाहने | १.२४९९ | + ८.० |
| १७. | मोटारगाड्या | ०.४९३६ | + ७०.८ |
| १८. | स्कूटर्स | – | + ४८.४ |
| १९. | मोटारसायकली | ०.१०९३ | + ८.४ |
| २०. | मोपेड स्कूटर्स | ०.१०९५ | + ४.४ |
| २१. | ऑटो रिक्षा | ०.०२९६ | + ४५.२ |

वरील आकडेवारीवरून रासायनिक खते, साखर, वनस्पती, कच्चे लोखंड यांचा वृद्धीचा दर चांगला आहे हे दिसते तर सिमेंट, कापूस धागा, जस्त, पेट्रोलियम पदार्थ यांचा विकास–दर तितका गतिमान वाटत नाही. मोटरगाड्या, ऑटोरिक्षा, स्कूटर्स यांचा विकास–दर भरपूर आहे. त्या मानाने व्यापारी वाहनांचा विकास–दर कमी वाटतो. व्यापारी व प्रवासी वाहनांच्या निर्मितीवर अधिक भर देणे आवश्यक आहे हे यावरून लक्षात येते. तसेच सामान्य माणसांच्या आटोक्यात येईल असे मॉपेड स्कूटर्स उत्पादन-वाढीचे लक्ष्य ठरविता येईल हे सर्व उद्योग एकूण औद्योगिक क्षेत्राच्या अंदाजे ५२ टक्के क्षेत्र व्यापणारे आहेत.

याशिवाय सार्वजनिक उद्योग, ग्रामीण उद्योग, लघुउद्योग ही उद्योगाची महत्त्वाची अंगे आहेत. त्याविषयीचे धोरण, विकासवृद्धी इत्यादीविषयी स्वतंत्र लेखात पुढे प्रतिपादन करता येईल.

## जनता पक्षाचे औद्योगिक धोरण

जनता पक्षाचे औद्योगिक धोरण सध्या तरी मागील पानावरून पुढे चालू असेच आहे. त्यात काही बदल समाजवादी उद्योगमंत्री श्री जॉर्ज फर्नांडिस करतीलही आणि त्यांनी कोणते बदल करावे हे त्यांनाच ठरवू देणे योग्य होईल. तथापि, समाजवादी तत्त्वज्ञान अधिक गांधीवादी दृष्टिकोन यांचा समन्वय साधूनच त्यांना पावले उचलावी लागतील. समाजवादाच्या तत्त्वाप्रमाणे उद्योगधंद्यातील खाजगी मालकीचे विकेंद्रीकरण आवश्यक ठरते, तर गांधीजींच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे खाजगी मालकीचे विश्वस्त स्वरूपात रुपांतर करणे जरूरीचे राहील. ज्या उद्योगात निव्वळ खाजगी मालकी आहे अशा सर्व उद्योगांच्या संचालक मंडळात सरकारचे प्रतिनिधी नियुक्त केल्यास खाजगी उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण न करताही समाजवादी तत्त्व अंमलात आणता येईल. मात्र सरकारचे हे प्रतिनिधी निव्वळ समाजवादी वा निव्वळ गांधीवादी असले पाहिजेत. तसेच त्यांचे कार्य म्हणजे सल्ला देणेच नुसते नसावे, तर समाजवादी आणि गांधीवादी तत्त्वानुसार उद्योगाचे व्यवस्थापनास वळण लावणे, हे असले पाहिजे. ही कल्पना मूर्त स्वरूपात आणणे कठीण नाही.

औद्योगिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट एकाधिकारशाही नष्ट करणे, उत्पादनवाढ करणे, नफा नियंत्रण, औद्योगीकरणास प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण करून त्याचबरोबर उद्योगांना सर्व प्रकारचे साह्य करणे हे असू शकते. मात्र उद्योगधंद्याच्या नावावर सर्व प्रकारच्या सवलती घेऊन जे वैयक्तिक संपत्ती गोळा करतात आणि प्रत्यक्षात कारखानदारी यथातथाच करतात, अशा उद्योगपतींना आवरलेच पाहिजे.

ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन देणे हे जनता पक्षाचे मुख्य धोरण असले तरी कोअर इंडस्ट्री, सार्वजनिक उद्योग व ग्राहक उद्योग यांविषयी मागील धोरण पुढे चालविणेच सध्या तरी अधिक श्रेयस्कर राहील. त्यात काही बदल करावयाचा झाल्यास विचारपूर्वक करावा लागेल हे निश्चित.

## काही सूचना–औद्योगिक धोरण संकुचित नको

येथे काही सूचना करणे अप्रस्तुत होणार नाही. जनता पक्षाने आल्या आल्याच उद्योग मंत्रालयातील निरनिराळे विभाग (सेल्स) रद्द केले. असे करण्याचे कारण कोणतेही असले तरी उद्योग खात्याच्या धोरणाप्रमाणे निरनिराळी कार्ये करण्याकरिता मंत्रालयात सेल्स असणे यात गैर काही नाही. जरी सेल्स रद्द केले तरी ती कार्ये करावयाची असतातच. उद्योग मंत्रालय म्हणजे निरनिराळ्या उपचारांचे एक जंजाळच आहे या मंत्रालयाच्या वेगवेगळ्या कार्यांत सुसूत्रता आणून परवाने देणे, नोंदणी करणे वगैरेसारखी कार्ये विशेष विलंब न होता झाली पाहिजेत. कोकणातील एका कागद कारखान्यास पूर्वीच्या उद्योग मंत्रालयाने दोन–तीन वर्षे परवाना देण्यातच घोळविले. मागास विभागात नवीन उद्योगांना प्रोत्साहन देणे हे पूर्वीच्या सरकारचे धोरण निव्वळ कागदोपत्रीच होते की काय असे त्यामुळे वाटते. जनता पक्षाने या बाबतीत कार्यक्षमता दाखविली पाहिजे. मागास विभागात काढावयाच्या कोणत्याही उद्योगाच्या प्रकल्पाची छाननी व परवानगी देणे ही प्रक्रिया तीन महिन्यांच्या काळापेक्षा अधिक वेळ न लागता पार पाडली पाहिजे. मुख्य म्हणजे देशातच तयार होणाऱ्या यंत्रसामुग्रीवर, कच्च्या मालावर आधारित कोणताही उद्योग काढण्यास परवानगीची आवश्यकताच असू नये. फक्त लघुउद्योग क्षेत्रातील उत्पादनाशी त्या उद्योगाने स्पर्धा करू नये ही अट पाळली म्हणजे झाले.

## उद्योगांची उत्पादनक्षमता वाढविण्याबाबत

पूर्वीच्या सरकारच्या धोरणात काही बदल करावयाचा असल्यास तो असा असावा की, परवानित क्षमता पूर्ण वापरू देण्यात कोणतीही आडकाठी करू नये. कारण त्यामुळे उत्पादनवाढीचे लक्ष्य साध्य होऊन त्याचबरोबर परवानित क्षमता व प्रत्यक्ष उत्पादन यांमधील दरी बुजविली जाऊ शकते. स्थापित उद्योगांची पूर्ण क्षमता न वापरली जाताच तत्सम दुसरा उद्योग निर्माण करणे म्हणजे भांडवल, श्रमादी साधनसंपत्तीचा अपव्यय करणेच होय. जे उद्योग पूर्ण क्षमता वापरीत नाहीत त्याची कारणे शोधून त्यांच्या काही अडचणी असतील तर त्यांचे निराकरण केले पाहिजे.

कृपया पृष्ठ १९ '

# बँकिंग कायद्यात व्यावहारिक बदलाची आवश्यकता

माधव जोशी
अकौंटंट : बँक ऑफ् महाराष्ट्र,
जत शाखा

भारतातील व जगातील कोठल्याही बँकिंग व्यवसायाचे पूर्वज सावकार ( Moneylenders ) आहेत. सावकारीमध्ये ऋणकोंची जास्तीत जास्त पिळवणूक केली जाते. सावकारीच्या पुढील अवस्था म्हणून बँका अस्तित्वात आल्या. या बँकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट केला गेला. आजही आपल्या देशातील जवळ जवळ ८० च्या पेक्षा जास्त व्यापारी बँका ज्यांच्या २४००० पेक्षा जास्त शाखा आहेत व ८००० कोटींपेक्षा जास्त ठेवी आहेत, त्या याच कायद्यावर चालत आहेत.

आपण बँकांकडून आज अवास्तव सेवा व सहकार्य अपेक्षित करतो. अशा वेळी त्यांना पुरेसे संरक्षण देणारा कायदा अस्तित्वात असणे आवश्यक नाही काय ? मी हे विधान अत्यंत जबाबदारीने केले आहे. वरकरणी कोणी अस्तित्वात असलेल्या कायद्याकडे बोट दाखवून या विधानाला आव्हान देईल. परंतु व्यावहारिक दृष्टीकोनातून बँकांनी कर्जवसुलीसाठी केलेल्या कायदेशीर कारवाईतून त्यांना किती टक्के यश मिळते याचा अभ्यास केल्यास वरील विधानाची प्रचिती येईल.

उदाहरणार्थ बँका या प्रामुख्याने Negotiable Instrument Act 1881 व Contract Act 1872 या दोन प्रमुख कायद्यांवर चालत असतात. १८८१ साली अस्तित्वात असलेली समाजरचना, बँकांची संख्या, त्यांच्या सेवांचे स्वरूप व प्रमाण, १९७७ मधील परिस्थिती सारखीच राहणे शक्य आहे का ? आज बँका मोठ्या प्रमाणावर धोका पत्करून वेगवेगळ्या सेवा ( Traveller cheques सारख्या ) व वेगवेगळ्या प्रकारची कर्जे देत आहेत. सरकार व पर्यायाने रिझर्व्ह बँक एक फटकाऱ्याने अमुक विभागाला अगर तमुक व्यवसायाला कर्जे द्या असे फर्मान काढते. पण याचबरोबर व्यापारी बँकांना ही कर्जे वसूल करण्यासाठी व्यापक अधिकार दिले आहेत काय, याचा विचार केला जात नाही. यामधून सहकारी बँकांना मुद्दाम वगळले आहे. कारण सहकारी कायद्यानुसार त्यांना प्रत्येक ठिकाणी वसुलीस अग्रहक्क आहेत व व्यापारी बँकेस खालचा क्रमांक आहे.

वरील विवेचनास भक्कमपणा आणण्यासाठी एकच सविस्तर उदाहरण देतो.

बँका ज्यावेळी कर्जे देतात त्यावेळी वेगवेगळ्या प्रकारचे बाँड्स व वचनचिठ्ठी लिहून घेतात. १९७३ सालच्या Law of Limitation नुसार ती घेतली जातात. यामध्ये वचनचिठ्ठीची मुदत ३ वर्षांनी संपते. म्हणजे ३ वर्षानंतर ती वचनचिठ्ठी न्यायालयात कायदेशीर ठरत नाही. त्याचप्रमाणे नजरगहाण अगर गहाण खात्यांचा बाँड अनुक्रमे ३ व १२ वर्षांनी बेकायदेशीर ठरतो.


त्यामुळे दर ३ वर्षांनी बँक अधिकाऱ्यांना त्या कर्जदाराच्या व त्याच्या जामीनदाराच्या मागे फिरून कागदपत्रांचे नूतनीकरण करून घ्यावे लागते. ते करण्यास ते असमर्थ झाल्यास त्यांना कायदेशीर कारवाई करता येत नाही. त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून विचारणा केली जाते. विचार करा की जनतेच्या ठेवीतून वाटलेले पैसे वसूल करण्यासाठी जर बँक अधिकारी कागदपत्रांचे नूतनीकरण करून घेऊ शकले नाही तर तो कर्जदार ते पैसे नाकारू शकतो. याबरोबर दर ३ वर्षांनी करावा लागणारा स्टँप खर्च वेगळाच. सदर स्टँप ड्यूटी वेगवेगळया राज्यांत वेगवेगळी आहे, हा मुद्दा निराळाच.

वरील उदाहरण अगदी बोलके आहे. Law of Limitation मध्ये योग्य ते बदल करून प्रॉमिसरी नोट ही कर्ज फिटेपर्यंत कायदेशीर मानली तर काय हरकत आहे ? यामुळे बँकेला कोर्टात संरक्षण मिळेल व कागदपत्रांच्या नूतनीकरणाच्या कटकटीच्या त्रासातून सुटून ती वसुलीच्या अधिक भरीव कार्यास जास्त वेळ देऊ शकेल. याच बरोबर कोर्टाच्या केसचा असा अनुभव आहे की सदर केस सिव्हील केस असल्यामुळे निकाल लागण्यास वेळ लागतो. सदर काळात जरी वसुली झाली तरी ते कर्ज खात्यात जमा करून घेता येत नाही. त्यामुळे कर्जदाराचे व्याज चालूच राहते. या सव्यापसव्यातून जर निकाल बँकेच्या बाजूने लागला तर कोर्ट त्यांना सरकारी ६ टक्के दराने व्याज द्यावे असा निर्णय देते. म्हणजे कोर्टाला कर्ज फेडणे मान्य असते व ते फेडण्याचा हुकूम ते देते. मग व्याज दरात भरमसाट सूट का ? बँक वास्तविक या कर्जावर वसुलीसाठी अतोनात खर्च करते. मग १५ टक्केच्या ऐवजी ६ टक्के दराने पैसे घ्यायचे. यातून आपण कोणता व्यवहार साधला ? कर्जदार मात्र नक्की फायद्यात असतो.

आपण आज समाजवादाच्या गोष्टी करतो. बँकांचे सामाजिकरण करण्यात आलेले आहे. मग आपण बँकेला तिच्या कर्जाची वसुली करण्यासाठी व्यापक संरक्षण देणे सयुक्तिक ठरणार नाही काय ?

दुसरी गोष्ट म्हणजे बँक अधिकाऱ्यांना असणाऱ्या अधिकाराची. आपण बँक अधिकाऱ्यांना कर्ज देण्यास सांगतो. पण ते वसूल करण्यास त्याला सतत कर्जदाराचा पाठपुरावा करण्यापलिकडे कोणताही अधिकार नाहीं. साधा कर्जदाराच्या दुकानातील माल जप्त करण्यासाठी सुद्धा त्याला कोर्टाचा आधार घ्यावा लागतो. बँक अधिकाऱ्यांना सरकारी अधिकाऱ्यांचे अधिकार नाहीत. तहसिलदार हा सरकारी कर्ज वसूल करणारा प्रमुख अधिकारी. परंतु त्याला व्यापक अधिकार व यंत्रणा असल्यामुळे तो कर्जदाराला दहशत अगर कायद्याचा बडगा वापरून वसुली करू शकतो. या उलट बँक अधिकाऱ्याला मात्र कर्जदाराच्या विनवण्या करण्यापलीकडे अधिकार नाहीत. यामध्ये बदल घडवून बँक अधिकाऱ्यांना योग्य ते अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

या लेखात बँकेच्या अडचणींच्या एकाच मुद्याचा विचार केला आहे. या सारख्या अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड देऊन बँका कार्य करीत आहेत. बँक अधिकारी रोजचे काम करीत असताना त्याच्या डोक्यावर मात्र सतत कायद्याचा बडगा असतो. कारण तो पैशाशी खेळत असतो. एक चूक त्याला कित्येक रुपयांच्या नुकसानीचा बळी करू शकते. कारण प्रत्येक ठिकाणी सही करताना आपण कायद्याच्या कक्षेत आहोत ना याची चुचकारणी करावी लागते. या पार्श्वभूमीवर आज पगाराच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर लक्ष्य बनलेल्या बँकांच्या अधिकाऱ्यांच्या जबाबदारीचा विचार करणे श्रेयस्कर ठरेल.

# लघुउद्योजकांच्या व्यवस्थापनातील समस्या

**अरुण नेवासकर**
टी. वाय्. बी. ए. विद्यार्थी
फर्ग्युसन कॉलेज, पुणे ४

लघुउद्योजकाला 'संशोधन आणि विकास'–मग ते बाजारसंशोधन असो की नवीन तंत्रशोधन असो–आवाक्याबाहेरच्या खर्चाचे वाटते. या कामांसाठी उच्च पदवीधर, बुद्धिमान आणि शक्यतो ज्यांच्यावर केलेल्या खर्चाचे फळ मिळणे दूरवरचे असते अशीच माणसे लागतात व त्यामुळे संशोधन विकासाच्या बाबी हाताबाहेरच्या असतात असा बव्हंशी गैरसमज आहे.

याबाबत कर्तबगार उद्योगपती श्री. आबासाहेब गरवारे यांच्या पूर्वायुष्यातला एक दाखला देता येईल. मोटारदुरुस्तीचे गॅरेज चालवताना नोकराचे साफसफाईचे काम ते करत व नंतर कोट चढवून पुढच्या दाराने येऊन मालक बनत. एका माणसाने अनेक पात्रे रंगवण्याचा हा प्रकार संशोधनातही मान्य आहे. कुणाही महागड्या विशेषज्ञाची मदत न घेता लघुउद्योजक स्वतःच बाजारसंशोधक बनू शकतो.

माहिती (Information) आणि बाजारअस्तित्व (Market existence) या दोन शब्दांत अतूट नाते आहे. उत्पादनाचे यश आणि लोकप्रियता गोष्टी मूलतः बाजारविषयक धोरणांवर अवलंबून असतात. धोरणांची आखणी करताना खालील गोष्टींचा अभ्यास करणे आवश्यक असते.

वर्तमानकाळातील बाजारातील खरेदीविक्रीचा अंदाज.

वर्तमानकाळातील बाजाराच्या वाढीचा व घडीचा दर.

बाजारातील कल कसे आहेत त्याचा अंदाज.

वितरणव्यवस्थेच्या परिणामकारकतेचा अंदाज व त्यास शक्य असणारे पर्याय.

निवडयोग्य उमेदवारांच्या (वितरणव्यवस्थेतील) व्यक्तिगत गुण, व्यापारकुशलता व भौगोलिक परिस्थितीचा विचार.

खरेदीनिर्णयामागे असणाऱ्या प्रथा आणि खरेदीदारांच्या अंदाजाची दखल.

विविध विक्री आणि वाढीयोग्य योजनांचा विचार व त्यांची सापेक्ष परिणामकारकता.

नव्या उत्पादनाच्या यशाची शक्यता.

बाजाराच्या विभाजनाबद्दल Segmentation माहिती.

स्पर्धकांच्या वस्तूंच्या गुणावगुणांचा, धोरणाचा आणि हालचालींचा अभ्यास.

सरकारी निर्बंधाचे मूल्यमापन–निर्यात–आयात परवाने, आयातीवरील कर इत्यादींचा विचार.

वरील सर्व माहिती गोळा करणे आणि मिळालेल्या माहितीचे योग्य पृथःक्करण करणे या दोन भिन्न व महत्त्वाच्या क्रिया म्हणजे बाजारसंशोधन होय. माहिती गोळा करण्याच्या क्रियेची –माहितीचा उगम, तिचा लघुअंदाजपत्रकाशी संबंध, ती तपासून पाहण्याची जरुरी आणि पृथःक्करणाच्या क्रियेत बनवण्याची क्रियाशील अंदाजपत्रके–विक्री अंदाजपत्रक, उत्पादन अंदाजपत्रक, आर्थिक अंदाजपत्रक, मनुष्यबळ अंदाजपत्रक, नफा अंदाजपत्रक इ. तयार करण्याशी बाजारसंशोधन निगडीत असते.

आधीच सांगितल्यानुसार बाजारसंशोधन हा सयामचा पांढरा हत्ती नव्हे तर हा एक उद्योजकीय गुणांचा अंशतः पर्याय व गुंतवणुकीचा धोका टाळण्याचे प्रभावी साधन आहे.

संशोधनाची आवश्यकता पटल्यावरदेखील त्याचे अंतिम ध्येय –'पृथःकरणीय निष्कर्षाचे रूपांतर प्रत्यक्ष कृतीत करणे' हे असायला हवे. वेळकाढूपणासाठी, निर्णयात ढकलाढकली करण्यासाठी त्याचा दुरुपयोग करणे मूळ उद्देशाशी विसंगत आहे लघुअंदाजपत्रकात संशोधन करण्यासाठी खर्च कमी करणाऱ्या पद्धतींचा विचार करणे आवश्यक ठरते.

संशोधन अंदाजपत्रकाची प्राथमिक रचना–

'उपयोगी' वाटणाऱ्या माहितीपेक्षा 'अत्यावश्यक' माहितीचाच संचय करावा.

माहितीच्या अत्यावश्यकतेचे निकष खालील होत.

या माहितीवर आधारित निर्णयामुळे कुठला धोका पत्करला जात आहे?

निर्णयासभोवतालच्या धोक्याची तीव्रता किती आहे?

जास्त माहिती गोळा केल्यास धोक्याची तीव्रता कमी करता येईल काय?

निर्णयास आवश्यकतेपेक्षा जास्त माहितीचा पसारा गोळा केल्यास जास्त खर्च केलेल्या पैशापासूनची सीमान्त उपयोगिता कमी मिळते व निष्कारण खर्च वाढतो.

संशोधनाचे हेतू व लघु अंदाजपत्रक.

संशोधनाची सुरुवात समोर असणाऱ्या हेतूंची महत्त्वानुसार यादी करणे यापासून होते. या हेतूतील तळाशी असणारे हेतू गाळून टाकणे योग्य ठरते. ही क्रिया अनेक चल बाबींवर अवलंबून असते.

माहिती गोळा करण्याचे प्रमाण—एकतर तपशीलवार अथवा ढोबळ.

किती प्रकारच्या वस्तूंची माहिती गोळा करावयाची त्याची निश्चिती—उदा. घड्याळांचा विचार केला तरी त्यात इलेक्ट्रॉनिक घड्याळे व यांत्रिक घड्याळे, मनगटी घड्याळे, भिंतीवरची घड्याळे असे प्रकार लक्षात घेता येतात.

कुठल्या वस्तूबद्दल माहिती गोळा करावयाची ते निश्चित करणे फायद्याचे ठरते.

संशोधनाचा भौगोलिक विस्तार—बाजारक्षेत्र विशाल, आंतरराष्ट्रीय असल्यास दोन पद्धतींचा उपयोग करता येतो.

१. नमुना पद्धत—बाजारक्षेत्राची सर्व तऱ्हेची वैशिष्टये अंगभूत असणाऱ्या लहान भागाचा Random Sample अभ्यास करणे.

२. गाळण पद्धत—काही मूलभूत निकष ठरवून मिळालेल्या प्राथमिक माहितीच्या आधारावर लांबलचक यादीतून कमी महत्त्वाची बाजारक्षेत्रे गाळून टाकणे.

संशोधनाची अचूकता—अचूकतेची व्याख्या करण्यावर व ही अचूकता किती वेळ खर्च करून मिळवली पाहिजे याच्यावर खर्च अवलंबून असतो.

१०० कोटींच्या अंदाजपत्रकात १ लाखाची चूक विशेष नसते आणि जास्त अचूकतेसाठी झटपट निर्णयाची जरुरी असतानाही वेळ खर्च करणे अयोग्य असते हे लक्षात घ्यायला हवे.

संशोधनपद्धती व लघुअंदाजपत्रक

बैठे संशोधन, प्रश्नावली, टेलिफोन मुलाखत, व्यक्तिगत मुलाखत या क्रमाक्रमाने खर्च वाढत जातो.

लघुसंशोधनात तयार माहितीचा जास्तीत जास्त उपयोग करणे फायद्याचे ठरते. तयार माहितीतील चुका टाळण्यासाठी अनेक ठिकाणांहून मिळालेली एकच माहिती पडताळावी.

आंतरराष्ट्रीय संघटना UNO, OECD, EEC, IMF IBRD या संघटनांचे येथील प्रतिनिधित्व.

शासकीय खाती — व्यापार, उद्योग, रोजगार, बांधकाम व नागरी, कस्टम्स व एक्साईज, परदेशातील आपले दूतावासातील व्यापार अधिकारी.

परदेशाच्या राजदूतांच्या कचेऱ्या.
परदेशाच्या चेंबर्स ऑफ कॉमर्स.
आर्थिक वृतपत्रीय संस्था.
व्यापारी, धंदेवाईक संस्था.

शासकीय, राजकीय पक्ष, कामगार संघटना यांच्या संशोधन संस्था.

व्यापारी बँकांचे संशोधन विभाग.
व्यापारविषयक माहितीपत्रके, डायऱ्या इत्यादी साहित्य.

बैठ्या संशोधनानंतरच्या प्रायोगिक संशोधनाचा वापर ज्यानेत्याने स्वत:च्या आर्थिक कुवतीनुसार करावा.

प्रत्यक्ष संशोधनकार्य—

या क्रियेत मिळत असलेल्या माहितीचे ताबडतोब पृथ:करण करून पुढच्या संशोधनात त्याचा वापर करणे यास महत्त्व असते.

संशोधनात व्यापारी सल्ला देणाऱ्या संस्थांची मदत—

तुमचे उत्पादन Consumer Good असल्यास सतत अस्तित्वात असणारा स्वतंत्र संशोधनविभाग उपयुक्त ठरतो व त्यामुळे बाह्य व्यापारी संस्थांची मदत लागत नाही.

इतर वेळी मात्र व्यापारी सल्लासंस्थांच्या कामातील कौशल्य, वेग, ठराविक मोबदल्यात निश्चित माहिती देण्याची क्षमता आणि तिऱ्हाईताच्या दृष्टिकोनातील योग्य सल्ला या बाबी महत्त्वपूर्ण ठरतात.

अंदाजपत्रकातील कपात—

संशोधनावरील खर्च हा शेवटी न संपणारा—मारुतीच्या शेपटासारखा वाढत जाणारा खर्च आहे. त्या खर्चावर नियंत्रणासाठी विशिष्ट पद्धती तयार करून सतत पाळत ठेवणे महत्त्वाचे ठरते.

अखेर संशोधन ही यांत्रिक प्रक्रिया नसून माणसांकरवी होणारी बाब आहे.

माणसे हाताळण्याचा, मानसिक झटापटीचा व लढाईचा भाग असणे क्रमप्राप्तच आहे.

संशोधन करणाऱ्या संचाचा पुरेपूर वापर करता येणे मानसंबंध शास्त्राच्याच कक्षेत येते.

# पापड व्यवसाय

**शरद जावडेकर**

एच्. ओ. सी. ज्युनिअर कॉलेज,
पनवेल

श्रावणाचे दिवस असावेत, मुसळधार पाऊस पडत असावा. हवेत छान गारठा असावा, मग संध्याकाळी जेवणाचा मेनू असतो मुगाच्या डाळीची खिचडी व पापड किंवा भात-पिठलं व पापड. पावसाळयातले जेवण पापडाशिवाय पुरेच होत नाही. लॉजमध्ये जेवणात दररोज पापड असतोच. हल्ली महिला-वर्ग नोकरी करू लागला व वर्षाचे पापड, लोणची, इ. मे महिन्यात तयार करणं अशक्यच झाले आहे व 'बेडेकर' 'कुवळ' 'लिज्जत' पुढे आले आहेत. आता या व्यवसायाचे व्यापारीकरण झाले आहे.

असला पापडाचा लहान प्रमाणावर व्यवसाय करणारे एक कुटुंब पनवेलचे दीनानाथ बापट व सौ. उर्मिला बापट. श्री. बापटांचे शिक्षण एस. एस. सी. पर्यंत झाले आहे. १९७१ पासून ते हा व्यवसाय करत आहेत. त्या आधी 'धूतपापेश्वर'मध्ये अकाऊंट विभागात नोकरी करत होते. काही मतभेदांमुळे हे तेथून बाहेर पडले व व्यवसाय सुरू केला.

पापडाचा व्यवसाय सुरू करण्याचे कारण म्हणजे त्यांच्या माहितीतल्या एक बाई बरीच वर्षं हा व्यवसाय करतात. त्यांचे आता वय झाले व मुले मोठी होऊन नोकरीला लागली. त्या आता हा व्यवसाय बंद करतील, व त्यांचा ग्राहक आपल्याला मिळेल ही अपेक्षा होती. तसेच सौ. बापट यांच्या वडिलांचे मुंबई-ठाकुरद्वार येथे एक दुकान आहे, तेथे त्या मुंबईत घरपोच माल पुरवत. मुंबईत त्यांच्या पुष्कळ ओळखी होत्या. मुंबई व पनवेल येथे बाजार चांगला आहे, या अपेक्षेने त्यांनी पापडव्यवसाय सुरू केला.

## पापडाचे प्रकार

बापट एकंदर तीन प्रकारचे पापड करतात. पोह्यांचे, उडिदाचे व बटाटयाचे. यात परत उपप्रकार आहेत. पोह्यांच्या पापडांत तिखट असलेले व तिखट नसलेले, उडिदाच्या पापडात तिखट असलेले व तिखट नसलेले असे प्रकार आहेत. तिखट पापडांत हिरव्या मिरच्यांचे व लाल मिरच्यांचे तिखट वापरले जाते. बटाटयाचे पापड उपवासाचे, जिरे घातलेले असतात. तिखट नसलेले पापड मधुमेह व हार्ट पेशंटसाठी असतात.

ग्राहक आला की त्याला जिरे, तिखट मीठाचे प्रमाण विचारले जाते. ही एक प्रश्नावलीच असते व त्याप्रमाणे ३ ते ४ दिवसांत माल पुरवला जातो. मागणीप्रमाणे पुरवठा केला जातो.

## अंगमेहनत हेच भांडवल

तसा हा उद्योग जिकीरीचा, तासाचा आहे. यांत्रिकीकरणाला फारसा वाव नाही. स्वतःचा घाम हेच भांडवल आहे. पोहे किंवा उडीद हे गिरणीतून दळून न आणता घरीच दळतात. याची काही कारणे आहेत. गिरणीच्या दळणात भेसळ येते व त्याचा पिठाच्या चिकटपणावर परिणाम होतो. पापड मोडतो. दुसरे म्हणजे गिरणीत पीठ उडून फुकट जाते. एका किलोला जवळ जवळ १०० ग्रॅम पीठ फुकट जाते. १०० ग्रॅम पिठात २० पापड होतात. पापड हलका होण्यासाठी पीठ दोनदा दळावे लागते. म्हणजे पीठ बारीक होते. पण गिरणीत पीठ दोनदा दळून मिळत नाही. म्हणून घरीच पीठ दळणे बरे पडते. पीठ दोनदा दळण्याची पद्धत बापटांनी लिज्जतमध्ये पाहिली. ते स्वतः ५ ते २० किलोपर्यंत पीठ दळतात.

तिखटही घरीच कुटले जाते. बाजारी तिखटात भेसळ असते. व त्याचा परिणाम पापडाच्या चिकटपणावर होतो. मिरच्या निवडून घरीच कुटल्या जातात. ही दोन्ही कष्टाची कामे बापट स्वतः करतात.

बापटांना या धंद्याचा पूर्वानुभव नव्हता. आर्थिक पाठबळ फार नव्हते. लोकांकडून अॅडव्हान्स घ्यायचा व माल पुरवायचा अशी पद्धत होती. १९७३ ते ७५ पर्यंत भाताला जिल्हाबंदी लागू होती. बाजारात भात, पोहे, मिळत नव्हते. खाजगी साठा पाच किलोपेक्षा जास्त करायला परवानगी नव्हती. पाच किलोपेक्षा जास्त खरेदी–विक्री करता येत नव्हती. तेव्हा आजूबाजूच्या गावातून एक–दोन किलो भात विकत घेऊन त्याचे पोहे काढावे लागत असत. असा द्राविडी प्राणायाम करावा लागे. १९७५ मध्ये जिल्हाबंदी उठली. बाजारात पोहे, भात मिळू लागला. पापडांना 'भडस' व 'मोदगा' जातीचे पोहे लागतात. त्यात चिकटपणा जास्त असतो. पापड मोडत नाही.

## व्यवसायाचा कालखंड

सुरुवातील हा व्यवसाय बारा महिने चालत नव्हता. पावसाळ्यात चार महिने धंदा बंद असे. पण उपजीविकेचे हेच साधन असल्याने, पावसाळ्यातही व्यवसाय करून बघू म्हणून एक, एक महिना धंदा वाढवत गेले. पावसाळ्यात पापड होत नाहीत ही समजूत चूक आहे हे त्यांच्या लक्षात आले. खालील आकडेवारी धंद्याचा कालखंड व एकूण उत्पादन दर्शवते.

| वर्ष | पापडाचे एकूण उत्पादन | | धंद्याचा कालखंड | | |
|---|---|---|---|---|---|
| १९७१ | ७००० | पापड | ८ | महिने | धंदा |
| १९७२ | १५००० | ,, | ८ | महिने | धंदा |
| १९७३ | ७०,००० | ,, | ९ | महिने | धंदा |
| १९७४ | १,१०,००० | ,, | १० | ,, | ,, |
| १९७५ | १,५०,००० | ,, | १० | ,, | ,, |
| १९७६ | १,८०,००० | ,, | ११ | ,, | ,, |
| १९७७ | २,१०,००० | ,, | १२ | ,, | ,, |

अतीपावसाचा एखादा महिना धंदा बंद ठेवावा लागतो. पावसाळ्यात प्रमुख अडचण म्हणजे, पापड वाळवण्याची. यासाठी त्यांनी एक कल्पना काढली. त्यांच्याकडे संगमरवरी फरशीचे तुकडे होते. ते तुकडे स्टोव्हवर तवा ठेवून गरम करायचे व पापड वाळवायचे. पण प्रत्यक्षात पापड न वाळता भाजले जाऊ लागले. म्हणून संगमरवरी फरशी तापवून चाळणीच्या गाद्यावर ठेवायची व पापड वाळवायचे. पापड फार वाळत नाहीत. अर्धवट वाळतात. त्यामुळे पापड मोडत नाही. पावसाळ्यात हा व्यवसाय फार चालत नाही. १९७७ मध्ये आषाढ, श्रावण, भाद्रपद या तीन महिन्यांत ९००० पापड झाले.

## दररोजचे काम

दररोज सर्वसाधारणपणे १००० पापड होतात. यात पोह्यांचे व उडिदाचे पापड जास्त असतात. रोजचा हजारी उत्पादन खर्च ६५ रु. येतो. विक्री दर ८० रु. असतो. उत्पादन खर्चात श्री. व सौ. बापट व त्यांची तीन मुले यांची सगळ्यांची दररोजची मजुरी ५ ते ६ रु. असते. महिन्यात सरासरी २०,००० ते ४०००० पापड होतात. म्हणजे मजुरीचे १५० ते २०० रु. अधिक २०टक्के फायदा म्हणजे एकूण महिन्याचे उत्पन्न ५५० ते ६०० पर्यंत जाते. श्री. व सौ. बापट जवळजवळ १० तास काम करतात. मुलांचे पापड वाळवण्याचे काम असते. पापड लाटण्यासाठी एक बाई येते. ती शेकड्याला ७५ पैसे घेते. बाजारात लाटणावळीचा दर ८५ पैसे आहे. पण येथे काम वर्षभर असते. म्हणून लाटणावळीचा दर कमी घेतात.

## भांडवलाची अडचण

सध्या त्यांच्यापुढे भांडवलाची अडचण आहे. अॅडव्हान्स घेऊन काम चालते. १९७५ मध्ये स्टेट बँकेकडून ६०० रु. कर्ज घेतले. पण त्याचे हप्ते वेळेवर देता आले नाहीत. त्यामुळे बँकेतील क्रेडीट गेले. बँका कर्ज द्यायला तयार नाहीत. म्हणून खाजगी कर्ज काढावे लागते. खाजगी व्याजाचा दर महिन्याला शे. ५ रु. आहे. असे खाजगी कर्ज ८०० रु. आहे. तर नातलगांकडून ८०० रु. काही रक्कम व्याजी व काही बिनव्याजी घेतली आहे. महिन्याची कमाई ५५० ते ६०० रु. होत असली तरी घरचा प्रपंच, कर्जावरील व्याज, मुद्दल इ. देऊन गुंतवणुकीसाठी भांडवल शिल्लक राहत नाही. भांडवल नसल्याने जेव्हा पोहे, उडीद, मिरची स्वस्त असते तेव्हा साठा करून ठेवता येत नाही.

## विक्री

पापडाची मुख्य बाजारपेठ पनवेलच. पण मुंबईतही माल विकला जातो. पनवेलमध्ये गिऱ्हाईक कधीकधी घरी येते, तर [illegible] त्यांना माल पोचवायला इतरांच्या घरी जावे लागते. [illegible] घरपोच मालाचे जादा पैसे लावले जात नाहीत. गिऱ्हाईक [illegible] हेच त्यांचे ध्येय आहे. घरगुतीच माल विकला जातो. [illegible] दुकानांना माल विकला जात नाही. मुंबईत घरोघरी जाऊन मा[illegible] विकला जातो. मुंबईत पापडाचा दर, हजारी १०० रु. आहे. [illegible] कोळ दुकानदार किंमत पाडून माल खरेदी करतात. पण म[illegible]

मंडळ इ. संस्थांनी एकदम ३००० ते ४००० ची मोठी मागणी केली तर थोडया कमी किंमतीला माल विकला जातो.

पनवेलमध्ये गिऱ्हाईकांच्या मागणीनुसार लहान मोठया आकाराचा पापड पुरवला जातो. त्याचा दर ६ रु., ७ रु., ८ रु. असतो. मुंबईत एकाच आकाराचा पापड पुरवला जातो. मुंबईत पापड विकतानाच पुढच्या ऑर्डर्स व थोडी आगाऊ रक्कम आणली जाते. मुंबईत मालाची ने–आण पत्र्याच्या डब्यातून केली जाते, तर पनवेलमध्ये, कागदाच्या पुडयातून माल पुरवला जातो.

### पुढील योजना

याच वर्षी प्लॅस्टिकच्या पिशव्यांतून माल पोचवण्याची पद्धत सुरू केली आहे. या पिशव्या रॉकेलच्या दिव्यावर बंद केल्या जातात. ५०, १००, १५० पापड राहतील एवढया आकाराच्या या पिशव्या असतात. धंद्याचे रजिस्ट्रेशन करून, 'दीनानाथ पापड' या ट्रेडमार्कने पापड विकण्याचा त्याचा विचार आहे. या धंद्याला वाव पुष्कळ आहे. मेतकूट, चिकवडया, पापडया हेही करून विकता येईल, पण भांडवलाची कमतरता आहे.

यात ट्रेड सिक्रेट्स काही नाहीत. पापडाचे निरनिराळे प्रमाण ते सर्वांना सांगतात. पण पापड चांगला होण्यासाठी, अंगमेहनत करणे हीच धंद्याची प्रमुख गरज आहे. पण ही अंगमेहनत, करायला गृहिणींना वेळ नसतो, जागा नसते, त्यामुळे प्रमाण सांगून गिऱ्हाइक जात नाही. या व्यवसायाला पनवेलमध्ये स्पर्धा आहे. पण सातत्याने धंदा चालू ठेवणारे थोडे असतात. मालाचा दर्जा टिकवणे, गिऱ्हाईकांना पाहिजे त्या प्रमाणात माल तयार करून देणे व अंगमेहनत याच भांडवलावर यांचा व्यवसाय चालू आहे. □

## ग्रंथ परिचय आणि परीक्षणे

पृष्ठ ९ वरून

जाणीव स्पष्टपणे होऊ शकेल (श्री. दोशी यांनी दिलेले दीर्घ कोष्टक स्थलसंकोचामुळे येथे गाळले आहे–संपादक.) त्यात सामान्यतः जमा व खर्च यांची सांगड घातलेली दिसते. एवढेच नव्हे, तर बऱ्याच वर्षी थोडी फार शिल्लकच राहिलेली आढळते. खास तर १९०० च्या दुष्काळाच्या वर्षात व त्यानंतरही काही वर्षांत जमाखर्चातून शिल्लक राहिलेली दिसते. ह्या गोष्टी विचारात घेतल्या, तर आपला अर्थसंकल्प शिलकी राखण्याकडेच महाराजांचा अधिक कल होता असे म्हणावे लागेल.

प्रकरणवार आढावा घेतल्यानंतर शेवटी काही सर्वसामान्य स्वरुपाचे मुद्दे. जागोजागी आलेले शब्दप्रयोग खटकणारे आहेत. उदाहरणार्थ, 'जीवनाचे राहणीमान', 'ओलेतीखालील जमीन', 'परकियांचे ब्रिटिश सरकार', 'दूधदुभती जनावरे' वगैरे प्रकरणांच्या मांडणीत द्विरुक्ती टाळता येणेही शक्य झाले असते. उदाहरणार्थ, महाराजांच्या परदेश प्रवासातील अवलोकनाचे संदर्भात तीच ती वाक्यं अनेक ठिकाणी आली आहेत. रस्ते, पूलबांधणी याविषयीची माहिती एकाच प्रकरणात (प्रकरण दुष्काळ) दोनदा आली आहे–(पाहा–पान १५३ आणि १६३–६४), पाणीपुरवठयाच्या योजनांबाबतच्या काही तपशीलाची पुनरुक्ती झाली आहे.

लेखकांनी प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी आवश्यक ती संदर्भ यादी व सांख्यिकी माहिती देऊन शाहू छत्रपतींच्या अर्थकारणावर प्रकाश टाकण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. परिशिष्टातूनही आलेख व सांख्यिकी माहितीचा उपयोग केला आहे. एकंदरीत, काही तुटीचा भाग बाजूला ठेवला तर, सामान्य वाचकांना शाहू महाराजांच्या आर्थिक व्यवहाराची व कल्याणकारी प्रयत्नांची माहिती होण्याच्या दृष्टीने पुस्तक फार उपयोगी पडू शकेल. □

## औद्योगिक धोरण व विकास

पृष्ठ १२ वरून

संघटित क्षेत्रातील उत्पादनक्षमता वाढविण्याची परवानगी देण्यात येऊ नये असे मत जनता पक्षाच्या आर्थिक उपसमितीने नुकतेच व्यक्त केले. संघटित क्षेत्रापेक्षा विकेंद्रित क्षेत्रासच विस्तृत होऊ द्यावे हा या मागील उद्देश असला तरी संघटित क्षेत्राला उत्पादनक्षमता वाढविणे खर्चाच्या दृष्टीने सोयीचे व सुलभ असते. त्यामुळे त्यांनाही उत्पादनक्षमता वाढविण्यास परवानगी द्यावी. परकीय खाजगी भांडवलास प्रोत्साहन दिल्यास, स्वार्थी शक्तींना वाव मिळतो हे जनता पक्षाचे मत ग्राह्य धरण्यास हरकत नाही. मात्र भांडवलाची तीव्र गरज असलेल्या व तांत्रिक दृष्टीने सुधारित (Highly Capital Intensive & Sophisticated) उद्योगाबाबत परकीय खाजगी भांडवलाला परवानगी देण्यास हरकत नसावी. त्यात सरकारचे प्रतिनिधी राहतील ही अट असली म्हणजे झाले. आणि वर म्हटल्याप्रमाणे सरकारचे प्रतिनिधी हे गांधीवादी व समाजवादी असावेत.

विविध प्रकारच्या उत्पादनवाढीकरिता विविध प्रकारची कारखानदारी वाढविणे हे औद्योगिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे. देशात विज्ञान, तंत्रज्ञान व शेतीचे आधुनिकीकरण याकरिता सुद्धा कारखानदारीचा विस्तार होणे जरूरीचे आहे. त्यामुळे औद्योगिक धोरण हे संकुचित असून चालणार नाही. □

# रिझर्व बँकेचे गव्हर्नर डॉ. आय्. जी. पटेल

## आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे कार्यकारी चेअरमन

## डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ यांची भेट

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डॉ. आय्. जी. पटेल यांच्या विनंती-वरून राज्य सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक डॉ. वा. चु. श्रीमाळ यांनी दिनांक १२–१–१९७८ रोजी त्यांची भेट घेतली. त्या भेटीत त्यांनी, रिझर्व्ह बँकेनं अल्पसुधारक शेतकऱ्यांना शेतीकर्जे देताना, आकारावयाच्या व्याजदराबाबत तसेच सर्व वर्गाच्या शेतकऱ्यांना द्यावयाच्या विकास कर्जाबाबत व या नव्या धोरणविषयक सूचनांच्या एकूण सहकारी पतव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाबाबतच्या अनुत्तरित समस्यांबाबत गव्हर्नर डॉ. पटेल यांना एक निवेदन सादर केले होते. सुरुवातीलाच डॉ. पटेल यांनी असा खुलासा केला की, विविध धोरणविषयक, सिद्धांतविषयक मुद्द्यांबाबत खुल्या दिलाने चर्चा करण्याची त्यांची वृत्ती असून, सहकारी चळवळीबाबत त्यांच्या मनात कसलेही पूर्वग्रह नाहीत. उलट राष्ट्रीयीकृत बँका व सहकारी बँका यांच्यांत समान कृती वा सर्वसामान्य हितसंबंधांबाबत समन्वय असला पाहिजे, अशी आपली इच्छा असल्याचे त्यांनी बोलून दाखविले. याही पुढे जाऊन राष्ट्रीयीकृत बँकांनी आपल्या ठेवींचा उपयोग अल्पसुधारकांना कर्जे देण्यासाठी करावा व तो सहकारी बँकेच्या माध्यमातून भागीत वा अन्य स्वरूपात करावा, असेही आपले मत असल्याचे व तशी शक्यता असल्याचे त्यांनी सूचित केले. यामुळे सहकारी पतव्यवस्थेचे हितसंबंध धोक्यात येणार नाहीत व सहकारी पतव्यवस्थेने निर्माण केलेली कित्येक वर्षांची शिस्तही धोक्यात येणार नाही. परंतु 'सुयोग्य व रास्त व्याजदराने अल्पभूधारक, छोटे शेतकरी व लघुउद्योजक यांसारख्या असमर्थ घटकांना कर्जे उपलब्ध करून दिली जाणे अगत्याचे असल्याचे आपले मत आहे' असेही डॉ. पटेल संभाषणाच्या ओघात म्हणाले.

डॉ. श्रीश्रीमाळ यांनी आपल्या निवेदनात मांडलेले व बोलण्याच्या ओघात निर्देशिलेले मुद्दे, सकृतदर्शनीही विचारणीय वाटत असल्याचे व त्याबाबत मुळातच अभ्यास होणे अगत्याचे असल्याचे डॉ. पटेल यांनी मान्य केले.

डॉ. श्रीश्रीमाळ यांनी बोलण्याच्या ओघात आणखी एक गोष्ट डॉ. पटेल यांच्या निदर्शनास आणली. ते म्हणाले की, शाखा विस्तारातील असमतोल ठेवी जमा करण्यासाठी होणारी स्पर्धा व कर्जवितरणाबाबतची भिन्नभिन्न धोरणे याकडे पाहिले तर, राष्ट्रीयीकृत बँकांत तरी शिस्त पाळली जात असल्याचे दिस[ते] नाही. समाजातील असमर्थ घटकांना अर्थसहाय्य उपलब्ध करू[न] विकास चळवळीची फळे त्या वर्गालाही चाखायला मिळाली पाहि-जेत, हा जसा बँक राष्ट्रीयीकरणाचा एक प्रमुख हेतू होता, तसे[च] विविध बँकांच्या 'अर्थकारणात' शिस्त यावी, धोरणात [व] कार्यपद्धतीत सुसूत्रता यावी, असाही एक हेतू होता. परं[तु] ह्याबाबत काहीसे दुर्लक्ष झाले असल्याचे डॉ. श्रीश्रीमाळ ह्यांनी डॉ. पटेल यांच्या निदर्शनास आणले. राष्ट्रीयीकृत बँकांनी कार्या-न्वित करावयाची ध्येये– धोरणे अखेरीस मध्यवर्ती शासन [व] रिझर्व्ह बँक यांनी निश्चित करावयाची असतात, हे मान्य करू[न] डॉ. श्रीश्रीमाळ म्हणाले की, ध्येये–धोरणे कुठलीही असोत, त[ी] आखली जात असताना, सहकारी पतव्यवस्थेला ती मारक ठरणार नाहीत, इतपत काळजी घेतली जावी, एवढीच आपली अपेक्षा आहे. राष्ट्रीयीकृत बँका व सहकारी बँका ह्यांनी हातात हात घालून सहकार्याने काम करावे, अशी गरज आहे. तसे घडले तरच गरजू माणसांना कर्जपुरवठा करण्याचे मुख्य उद्दिष्ट, कुठ-ल्याही तऱ्हेचा संघर्ष न होता, सहज साध्य होऊ शकेल.

जेथे नागरी बँका उपलब्ध नसतील तेथे वैयक्तिक उद्योज-कांना कर्जपुरवठा करण्याची परवानगी जिल्हा मध्यवर्ती सहकार[ी] बँकांना देणे, सहकारी बँकांची साधनसंपत्ती विचारात न घेत[ा] त्यांना सवलतीच्या दराने रिझर्व्ह बँकेने पतपुरवठा करणे, भक्कम पायावर उभ्या असलेल्या व सुविहित राज्य सहकारी बँकांना राज्याबाहेर शाखा उघडण्याची संमती देणे, कापूस एकाधिकार योजना, राज्य बँका व अन्य सहकारी बँकांना मर्यादित अर्थरचने[त] स्वायत्तता उपलब्ध करून देणे व व्याजावरील कर रद्द करणे, य[ा] व अशासारख्या समस्यांबाबतही चर्चा करण्यात आपल्याला आनं[द] वाटेल असे डॉ. पटेल यांनी नमूद केले.

सहकारी पतव्यवस्थेपुढील विविध समस्यांवर चर्चा करण्या-साठी वेळ दिल्याबद्दल डॉ. श्रीश्रीमाळ यांनी डॉ पटेल यां[चे] आभार मानले. आणि त्यांच्या रूपाने सहकारी चळवळीला एक मित्र, तत्त्वज्ञ व मार्गदर्शक मिळाला असल्याबाबतचा विश्वास व्यक्त केला.

## एप्रिल ते डिसेंबर १९७७...

### फक्त आठ महिन्यांचा कालावधी...

### आणि त्यांत लाखो सामान्य माणसांच्या भल्यासाठी घेतलेले...

# अनेक महत्त्वाचे निर्णय !

## कृषि विकास

- अधिक धान्योत्पादनासाठी खरीप हंगामात ४३९ पथप्रदर्शक गट, ९४.३३१ हेक्टर क्षेत्रात व रब्बी हंगामात २३० पथप्रदर्शक गट ४८, १९० हेक्टर क्षेत्रात घेण्यात आले.
- विशिष्ट अल्पभूधारकांच्या बाबतीत ६८ कोटी रुपयांची कर्जमाफी.
- छोटया शेतकऱ्यांना राष्ट्रीकृत बँकांकडून कर्ज घेताना मुद्रांक शुल्क व नोंदणी फी यांत माफी.
- जमीन एकत्रीकरण योजनेखालील सुमारे १४.३७० गावांतील जमिनींच्या हस्तांतरणासाठी महसूल अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीची अट रद्द.
- शासन-संपादित जमिनींच्या सोलेशियमच्या रकमेत १५ टक्क्यांवरून ३० टक्यांपर्यंत वाढ. नुकसान भरपाईच्या रकमेवरील व्याजात ४ टक्क्यांवरून ८ टक्क्यांपर्यंत वाढ.
- सर्व पाटबंधारे योजनांच्या पाणलोट क्षेत्रात ५ दशलक्ष घनफूट क्षमतेपर्यंत पाझर तलाव बांधण्यास सर्वत्र मुभा.
- भरपूर पाण्यासाठी विविध प्रकारच्या बंधाऱ्यांच्या आर्थिक निकषांत वाढ.
- धरणग्रस्तांना उपसा-सिंचनासाठी पाणी मिळावे म्हणून, संबंधित जलाशयातून एकुण प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्राच्या ६ टक्के मर्यादेपर्यंत पाणी वापरण्यास परवानगी.
- पाच रुपयापेक्षा कमी शेतसारा असणाऱ्यांना संपूर्ण सारामाफी.साडेसात रुपयांपेक्षा कमी शेतसारा असणाऱ्यांना मोफत खातेपुस्तिका.
- वीस रुपयांपर्यंत शेतसारा असणाऱ्यांना त्यांच्या थकबाकीत नेहमीच्या व दंडाच्या दोन्ही व्याजाची सूट. वीस ते पन्नास रुपयांपर्यंत सारा असणाऱ्यांना दंडाचे व्याज संपूर्ण माफ व नेहमीच्या व्याजातून ५० टक्के सूट.
- सरकारी थकबाकीची सक्तीची वसूली स्थगित.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, मुंबई

# वाचकांचा पत्रव्यवहार

स. न. वि. वि.

'अर्थ' मासिकाचा ऑक्टोबर–नोव्हेंबर १९७७ चा अंक मिळाला. या अंकाचे मुखपृष्ठावर भारतातील आद्य अर्थशास्त्रज्ञ माननीय श्रीमान महादेव गोविंद रानडे यांचे स्फूर्तिदायक छायाचित्र छापून, त्यांना अभिवादन करून या अंकाचे द्वारा आपण आपल्या दीपावली–नववर्ष शुभेच्छा व्यक्त केल्यात याबद्दल आपणास मनःपूर्वक धन्यवाद !

या अंकातील पहिले नऊ लेख हे बहुतांशी भारतीय आर्थिक क्षेत्राचे–विविधांगांशी निगडित असलेल्या तज्ज्ञ व्यक्तींच्या अनुभवप्रणित अभ्यासाचे विचारधन असलेले, अत्यंत मननीय असेच आहेत. या नऊ अभ्यासनीय लेखांचे मनन केल्यानंतर या मासिकाचे सर्वसामान्य वाचकांना येणारा मानसिक शीण घालविणेचे वा तो कमी करणेचे कार्य या अंकांतील शेवटच्या लेखाने व्हावे या दृष्टीने केलेली अंकांतील लेखाची योजना औचित्यपूर्ण अशीच वाटते.

नुकतेच सुरू झालेले नूतन वर्ष, 'अर्थ' मासिकास व सर्व संबंधितांना अभ्युदयाचे जावो हीच श्री प्रभूचरणी प्रार्थना.

**रामकृष्ण धोंडो कुलकर्णी,** (अक्कलकोट)

ता. क. – यासोबत माझी एक कविता पाठवीत आहे—

'उत्पादकतेचे सुस्वरूप प्रकट होई कशाने ?'—

मानवी सर्वांगीण विकासाचा मार्ग असे कशात ?

तो असे मानवी सर्वंकष उत्पादकतेच्या जपणुकीत !

ऐशा उत्पादकतेचे सुस्वरूप प्रकट होई कशाने ?

ते होई तिचे निर्मळ नि निरागस तेजाने.

तिचे उपरिनिर्दिष्ट तेज असे कशात ?

ते तळपे व्यक्ती नि संस्थांचे अंतर्बाह्य व्यवस्थापन कौशल्यात.

ऐसे तळपणारे व्यवस्थापन कौशल्य वसे कशात ?

ते वसे, मानवी शक्ती, अर्थ, यंत्र नि साधनसामुग्री या चतुःसूत्रीचे सुसंयोजनेत—

ऐसे सुसंयोजित व्यवस्थापनकौशल्य सातत्याने उपलब्ध होई कशाने—

ते होई व्यवस्थापनविषयक सम्यक् साहित्याचे अनुभवप्रणित मनन नि कृतिशीलतेचे अवलंबनाने.

ऐशा भारतीय सर्वांगीण विकासास 'अर्थ' मासिक देत असलेले उत्तेजन,

करू या, आपण सारेजण त्याचे वाचन मनन नि अभीष्टचिंतन.

**आर. डी. कुलकर्णी**

स. न. महाशय, मा. संपादक 'अर्थ' मासिक, पुणे.

मी, नंदुरबार येथील महाविद्यालयात टी. वाय्. बीकॉम.च्या वर्गात असून मी आपल्या 'अर्थ' या मासिकाचा नियमित वाचक आहे. आपल्या मार्च '७७ च्या अंकात 'अर्थशास्त्र या विषयात उपयुक्त पुस्तके' या सदराखाली, निरनिराळ्या नामवंत लेखकांची पुस्तके लिहिलेली वाचलीत, परंतु त्यांपैकी 'भारतीय आर्थिक समस्या' ले. श्री. बर्वे व भेंडे, तसेच 'आपले अर्थशास्त्र, ले. श्री. गाडगीळ' या पुस्तकांच्या प्रकाशनांचा पत्ता मला माहिती नाही. आणि वरील दोन्ही पुस्तके आम्हाला अत्यंत उपयुक्त आहेत. करिता आपण सदरच्या दोन्ही पुस्तकांच्या प्रकाशनाचा पत्ता किंवा ही पुस्तके जेथून उपलब्ध होऊ शकतील त्या संस्थांचा पत्ता मला कळविण्याचे सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

**दे. ह. गर्गे**
'नंदुरबार'

प्रिय प्रा. कमलाकर परचुरे,

या पत्रासोबत 'अर्थ' मासिकासाठी एक लेख पाठविला आहे. अशा स्वरूपाचे लिखाण मराठीतून वाढावे असे आपल्या 'अर्थ'चे धोरण असल्यामुळे तुम्हाला तो प्रकाशनयोग्य वाटावा. काही कारणामुळे तुम्हाला पसंद नच पडल्यास कृपया लेख मला परत करावा.

यापुढे 'अर्थ' साठी शक्यतो नियमित लिखाण करण्याचा मानस आहे. तुमचे मत कळवावे.

अधूनमधून तुमचे 'उर्दू शायरीवर' लिखाण वाचावयास मिळते. चौफेर कुस्ती हाकण्याचा तुमचा उपक्रम स्तुत्य वाटतो.

या निमित्ताने पत्र लिहावयास मिळाले याबद्दल समाधान वाटते. पत्रोत्तर द्यावे.

**दिनकर बोरीकर,** औरंगाबाद

स. न.

नुकतेच आपल्या 'अर्थ' ह्या मासिकाचे काही अंक एका ठिकाणी पाहावयास मिळाले. एका अंकात आपण पद्मश्री विठ्ठलराव विखेपाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्यावरचे बरेचसे लेख प्रसिद्ध केले आहेत. त्यांपैकी बहुतेक लेख आम्ही श्री. विखेपाटील यांचा मुंबईत भव्य सत्कार केला त्यावेळी प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्मरणिकेतून पुनर्मुद्रित करण्यात आले आहेत.

कृपया पृष्ठ २४

# ★ संख्याचित्र ★

## सुती कापड गिरण्यांतील कामगार नोकर–उद्योग धंदे

(हजारी आकडे)

| वर्ष | यादीवरील एकूण नोकर संख्या | प्रत्यक्षात नेमलेला सर्वसाधारण प्रथम पाळी | दुसरी पाळी | कामगार वर्ग तिसरी पाळी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९६३ | ९,३० | ४,१८ | २,६३ | १,२३ | ८,०४ |
| १९६७ | ९,२८ | ४,०० | २,५४ | १,३५ | ७,८९ |
| १९७१ | ९,४१ | ३,६१ | २,२४ | १,३४ | ७,१९ |
| १९७४ | १०,२३ | ३,८५ | २,३६ | १,६६ | ७,८७ |
| १९७६ | | | | | |
| जानेवारी | १०,२७ | ३,७४ | २,३१ | १,६७ | ७,७२ |
| फेब्रुवारी | १०,२९ | ३,७६ | २,३२ | १,६३ | ७,७१ |
| मार्च | १०,२९ | ३,७१ | २,३१ | १,६० | ७,६२ |
| एप्रिल | १०,३३ | ३,७१ | २,३१ | १,६१ | ७,६३ |
| मे | १०,३१ | ३,७० | २,३२ | १,६२ | ७,६४ |
| जून | १०,३२ | ३,७० | २,३० | १,६२ | ७,६२ |
| जुलै | १०,३२ | ३,७४ | २,३१ | १,६१ | ७,६६ |
| ऑगष्ट | १०,३० | ३,६८ | २,३२ | १,५९ | ७,५९ |
| सप्टेंबर | १०,३० | ३,६८ | २,२५ | १,५८ | ७,५३ |
| ऑक्टोबर | १०,२९ | ३,६७ | २,२८ | १,५८ | ७,५३ |
| नोव्हेंबर | १०,२५ | ३,६४ | २,२६ | १,५६ | ७,४६ |
| डिसेंबर | १०,२८ | ३,६३ | २,२७ | १,५६ | ७,४६ |

## सुती कापडाच्या गिरणीतील उत्पादन (दशलक्ष) मिटर)

| वर्ष | भरड | कनिष्ट मध्यम | वरिष्ठ मध्यम | उत्कृष्ट (तलम) | अत्युत्कृष्ट | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १९६३ | ८१० | १,३२१ | १,८०८ | २०४ | २८० | ४,४२३ |
| १९६७ | ६८३ | १,१४४ | १,७६८ | १७० | ३३२ | ४,०९७ |
| १९७० | ५७९ | १,१०८ | १,८६६ | २१९ | ३८५ | ४,१५८ |
| १९७४ | ५५४ | १,२७२ | १,९५७ | २७७ | २५६ | ४,३१६ |
| १९७६ | ५५३ | १,१३० | १,७८८ | १६४ | २४६ | ३,८८१ |

## सुती– कापूस गिरण्यातील उत्पादन (दशलक्ष किलो)

| वर्ष | १ ते १० | ११ ते २० | २१ ते ३० | ३१ ते ४२ | ४१ ते ६० | ६१ ते ८० | ८०चे वर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६३ | १०४ | ३०४ | २५९ | १५० | ४३ | २३ | १० | ८९३ |
| १९६७ | १०५ | २६३ | २७३ | १५६ | ५९ | २५ | १५ | ८९६ |
| १९७० | ११५ | २६४ | २८४ | १८२ | ७४ | २७ | १९ | ९६५ |
| १९७४ | १०४ | २७७ | ३१२ | २०४ | ७१ | २९ | १० | १०९७ |
| १९७६ | ११३ | ३२२ | २५७ | १९४ | ६९ | ३४ | १७ | १००६ |

## गिरण्यातील विणलेल्या कापडाची निर्यात

| | वस्तु | | सुत | | तयार कपडे | होजिअरी | इतर कपडे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रमाण | किमत | प्रमाण | किमत | किमत | किमत | दशलक्ष रु. | दशलक्ष |
| | द. चौ. मी. | द. रु. | द. कि. | द. रु. | द. रु. | द. रु. | | |
| १९६७ | ४०९–५६ | ५९३–७१ | १–०२ | ७४–८५ | २४–५५ | १–४२ | १२७–७० | ८२२–१३ |
| १९७१ | ३८२–२४ | ६६५–९५ | १२–४० | ११८–८५ | ११७–७१ | ३–७७ | १७३–२९ | १०९३–५७ |
| १९७४ | ४४९–८३ | १५३२–८८ | ११–४५ | १९३–८९ | ९२०–६९ | ५२–८४ | ४८९–२४३ | १८९–५४ |
| १९७७ | | | | | | | | |
| जाने. | | | १४८–३० | २९–०० | २१८–२० | २१–९० | २३–६० | ४४१–०० |
| फेब्रु. | | | २६५–५० | २७–२० | २३०–८० | २४–१० | ३२–०० | ५७९–५० |

## वाचकांचा पत्रव्यवहार

पृष्ठ २२ वरून

पुनर्मुद्रित करण्यास आमची कोणतीही हरकत नाही. परंतु ह्या स्मरणिकेचा उल्लेख आपण आपल्या मासिकात केला असता तर अधिक संयुक्तिक ठरले असते. संघाचे अध्यक्ष श्री. शंकररावजी मोहिते पाटील ह्यांनी ही स्मरणिका प्रसिद्ध केली होती. एवढेच ह्या निमित्ताने आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

**अशोक हळबे**
संपर्क अधिकारी

संपादकीय टीप :–उपरोक्त स्मरणिकेचा उल्लेख मोघमरीत्या केला होता. या पत्राने ते स्पष्ट नमूद झाले आहे. धन्यवाद.

मा. संपादक, 'अर्थ', पुणे.

मी आपल्याकडे 'अर्थ' मासिकासाठी 'रोलिंग–प्लॅन' या विषयावर लिखाण पाठविले आहे. सदरहू लेख मी आधी गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था पुणे येथील माझे गुरुवर्य डॉ. व्ही. पी. पेठे यांच्याकडे पाठविला होता. त्यांनीच मला तुमच्याकडे हा पाठविण्यास सांगितले आहे. तरी कृपया लेखास यथायोग्य ती प्रसिद्धी द्यावी. लेख प्रसिद्ध झाल्यानंतर त्या अंकाच्या दोन प्र वरील पत्त्यावर पाठवाव्यात ही नम्र विनंती. कळावे,

**शि. यु. पाटील,** जळगा

मा. संपादक 'अर्थ' मासिक, पुणे ४.

'अर्थ' मासिकात अलिकडे झालेला बदल स्वागतार्ह आ परंतु थोडी ( काही लेखात ) क्लीष्टता वाढली आहे.

आर्थिक वृत्त कण, बँकींग क्षेत्रातील नवी आव्हाने व समर यांचा उहापोह पचायला सोप्या व वाचायला रंजक अशा स्वरूप अधिक प्रमाणात वाचावयास मिळेल अशी अपेक्षा बाळगावी काय निरनिराळ्या बँकांच्या शाखाधिकारी–क्षेत्राधिकारी यांना आप भेटून, लिहून वरील विषयांवरील साहित्य मागविल्यास वरि पद्धतीचे लेख मिळणे अशक्य नाही. परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांक मात्र Vague पद्धतीचे लिखाण मिळेल अशी भीती वाटते. आप शक्य असल्यास वरील सूचनांचा विचार करावा ही विनंती.

**चिंतामणी दात**
शाखाधिकारी, बँक ऑफ महारा
खर्डी. जि. ठ

[

सत्यं शिवं सुंदरम् प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे यांनी मुद्रक – यशवंत मुद्रणालय, १८३५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.

## गिरण्यातील विणलेल्या कापडाची निर्यात

| | वस्तु | | सुत | | तयार कपडे होजिअरी | | इतर कपडे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रमाण | किंमत | प्रमाण | किंमत | किंमत | किंमत | दशलक्ष रु. | दशलक्ष |
| | द. चौ. मी. | द. रु. | द. कि. | द. रु. | द. रु. | द. रु. | | |
| १९६७ | ४०९–५६ | ५९३–७१ | १–०२ | ७४–८५ | २४–५५ | १–४२ | १२७–७० | ८२२–१३ |
| १९७१ | ३८२–२४ | ६६५–९५ | १२–४० | ११८–८५ | ११७–७१ | ३–७७ | १७३–२९ | १०९३–५७ |
| १९७४ | ४४९–८३ | १५३२–८८ | ११–४५ | १९३–८९ | ९२०–६९ | ५२–८४ | ४८९–२४३ | १८९–५४ |
| १९७७ | | | | | | | | |
| जाने. | | | १४८–३० | २९–०० | २१८–२० | २१–९० | २३–६० | ४४१–०० |
| फेब्रु. | | | २६५–५० | २७–२० | २३०–८० | २४–१० | ३२–०० | ५७९–५० |

## वाचकांचा पत्रव्यवहार

पृष्ठ २२ वरून

पुनर्मुद्रित करण्यास आमची कोणतीही हरकत नाही. परंतु ह्या स्मरणिकेचा उल्लेख आपण आपल्या मासिकात केला असता तर अधिक संयुक्तिक ठरले असते. संघाचे अध्यक्ष श्री. शंकररावजी मोहिते पाटील ह्यांनी ही स्मरणिका प्रसिद्ध केली होती. एवढेच ह्या निमित्ताने आम्ही आपल्या निदर्शनास आणून घेऊ इच्छितो.

**अशोक हळबे**
संपर्क अधिकारी

संपादकीय टीप :–उपरोक्त स्मरणिकेचा उल्लेख मोघमरीत्या केला होता. या पत्राने ते स्पष्ट नमूद झाले आहे. धन्यवाद.

मा. संपादक, ' अर्थ ', पुणे.

मी आपल्याकडे ' अर्थ ' मासिकासाठी ' रोलिंग–प्लॅन ' या विषयावर लिखाण पाठविले आहे. सदरहू लेख मी आधी गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था पुणे येथील माझे गुरुवर्य डॉ. व्ही. पी. पेठे यांच्याकडे पाठविला होता. त्यांनीच मला तुमच्याकडे हा पाठविण्यास सांगितले आहे. तरी कृपया लेखास यथायोग्य ती प्रसिद्धी द्यावी. लेख प्रसिद्ध झाल्यानंतर त्या अंकाच्या दोन प्रती वरील पत्त्यावर पाठवाव्यात ही नम्र विनंती. कळावे,

**शि. यु. पाटील,** जळगाव.

मा. संपादक ' अर्थ ' मासिक, पुणे ४.

' अर्थ ' मासिकात अलिकडे झालेला बदल स्वागतार्ह आहे. परंतु थोडी ( काही लेखात ) क्लीष्टता वाढली आहे.

आर्थिक वृत्त कण, बँकींग क्षेत्रातील नवी आव्हाने व समस्या यांचा उहापोह पचायला सोप्या व वाचायला रंजक अशा स्वरूपात अधिक प्रमाणात वाचावयास मिळेल अशी अपेक्षा बाळगावी काय ? निरनिराळ्या बँकांच्या शाखाधिकारी–क्षेत्राधिकारी यांना आपण भेटून, लिहून वरील विषयांवरील साहित्य मागविल्यास वरील पद्धतीचे लेख मिळणे अशक्य नाही. परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मात्र Vague पद्धतीचे लिखाण मिळेल अशी भीती वाटते. आपण शक्य असल्यास वरील सूचनांचा विचार करावा ही विनंती.

**चिंतामणी दातार**
शाखाधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र
खर्डी. जि. ठाणे

□

सत्यं शिवं सुंदरम् प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे यांनी मुद्रक – यशवंत मुद्रणालय, १८३५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.

Licence to Post without
Prepayment No. 61



Regd. No.
PNC 205


# माझे जीवन गाणे




नागपूरच्या पुंडलीक खडसेचं जीवन सुरेल झालं. पायानं अधू असूनही स्वतःच्या पायावर उभं राहणं त्याला शक्य झालं! जीवनाला नवा अर्थ प्राप्त झाला. योग्य गुणांची शिदोरी घेऊन स्थिर जीवनाचा मार्ग शोधणाऱ्या कोणासही आर्थिक आधार देण्यासाठी आम्ही सदैव सिद्ध आहोत.

बँक ऑफ महाराष्ट्र
( भारत सरकारचा उपक्रम )
पुणे ४११००२.

PRAJAKTA

17 APR 197

# अर्थ

## अर्थसंकल्प विशेषांक

मार्च १९७८



### दृष्टिक्षेपात केंद्रीय अर्थसंकल्प १९७८–७९

| महसुली जमा बाजू | कोटी रुपये | कोटी रुपये |
|---|---|---|
| उत्पादन कर (एक्साइज) | ४०३७ | |
| आयात निर्यात जकाती | १८६० | |
| कंपन्यावरील कर | १४५० | |
| आयकर | ३९९ | |
| इतर कर (संपत्ति इ.) | २८२ | ८०२८ |
| इतर अपेक्षित जमा | | |
| कर्जवसुली | २३८६ | |
| कराव्यतिरिक्त उत्पन्न | २७५४ | |
| सरकारी कर्ज प्रॉ. फंड इ. | २३५८ | |
| परकीय कर्ज | ८३३ | |
| इतर जमा | १००८ | ९३३९ |
| | | १७३६७ |
| अपेक्षित तूट | | १०५० |
| | | १८४१७ |

| बजेटची खर्ची बाजू | कोटी रुपये | कोटी रुपये |
|---|---|---|
| शासकीय खर्च | | |
| संरक्षण | २९४६ | |
| व्याज-देणी | २०२८ | |
| राज्यांना अनुदाने | १०४९ | |
| इतर आवश्यक खर्च | १३५७ | ७३८० |
| विकास योजना खर्च | | |
| केंद्रीय योजना | ४५२० | |
| राज्यविकास योजना | २७६१ | |
| इतर | ३७५६ | ११०३७ |
| | | १८४१७ |

"सूर्यफुलाची दृष्टि सदैव सूर्याकडेच तद्वत् आमचे लक्ष सदैव आपल्या उत्कर्षाकडे"
आमच्या विविध योजनांत सहभागी व्हा व आपल्या भावी उत्कर्षाची मुहूर्तमेढ रोवा.

**छोटे उद्योग उत्पादन वाढवी लाभे त्या संगत कॉसमॉसची**

# दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९०६ दूरध्वनी : कार्यालय : ४५७७३, ४४०२९
कार्याध्यक्ष निवास : ४६७८७
६१२, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे ३०

**आमच्या खालील शाखा आपल्या सेवेस रुजू आहेत.**

| पर्वती दर्शन शाखा | : | खडकी दापोडी शाखा | : | गोखलेनगर शाखा |
|---|---|---|---|---|
| पुणे ९ | | पुणे ३ | | पुणे [illegible] |
| ४२३८६ | | ५३९३५ | | [illegible] |

**आपल्या आर्थिक अडचणी व विकासासाठी आजच संपर्क साधा**

| गो. वा. पुजारी | शं. गो. बर्वे | व. रा. पिंगळे |
|---|---|---|
| व्यवस्थापक | उप. कार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

# अर्थ



आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक

र महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

वर्ष तिसरे अंक बारावा मार्च १९७८

किंमत ३ रु. वार्षिक वर्गणी : ३० रुपये

संपादक प्रा कमलाकर परचुरे

कार्यालय – ९०६ शिवाजीनगर, पुणे ४

## या अंकात

१ बँकांची बदलती क्षितिजे — २

श्री. व्ही. एम भिडे याचे विचार

२ महाराष्ट्र बँकेचा ४२ वा वर्धापन दिन — ७

३ महिलांची वैचारिक पातळी–एक पाहणी — ९

प्रा, लीला पाटील श्रीमौनी विद्यापीठ, गारगोटी

४ भारतीय नियोजनातील नवे तंत्र–नवी संकल्पना रोलिंग प्लॅन — १४

प्रा. शि. यू. पाटील, नूतन मराठा कॉलेज जळगांव

५ केंद्रीय अर्थसंकल्प — १९

प्रा. सिद्धार्थ गुप्त

६ गतवर्षातील (एप्रिल ७७ मार्च ७८) लेखांची–सूची — २३

# बँकांची क्षितिजे

श्री. व्ही. एम्. भिडे
अध्यक्ष अग्रि. फिनान्स कॉर्पोरेशन्स

**(डॉ. एस्. के. मुरंजन मेमोरियल लेक्चर्स १९७७ च्या निमित्ताने श्री व्ही. एम्. भिडे यांचे झालेले भाषण)**

डॉ. एस्. के. मुरंजन मेमोरियलपुढे भाषण करणे हे मी माझे भाग्य आणि सन्मान समजतो. डॉ. मुरंजन यांनी आपले सारे आयुष्य अर्थशास्त्र, विशेषत: बँकिंग शिकविण्यांत व्यतीत केले. तत्कालीन आर्थिक बँका आणि नाणे विषयक प्रश्नांचा ऊहापोह करताना डॉ. मुरंजन अतिशय स्पष्ट आणि नि:संदिग्ध भूमिका घेत असत.

१९५६ साली गोखले इंस्टिट्यूटमध्ये त्यांनी केलेल्या आर्थिक विकासावरील भाषणात, ब्रिटिश सत्तेबाहेर पडणाऱ्या देशांचे आर्थिक विवेचन मोठे मार्मिक होते. आपल्या पुस्तकातून डॉ. मुरंजन यांनी आर्थिक व्यवस्थेच्या नियंत्रणाचे नेहमीच समर्थन केले आहे. त्यांचे आर्थिक विषयावरील त्या वेळचे विवेचन, आजच्या आर्थिक कसोटीच्या काळालाही लागू पडेल.

भारतीय बँकांचे स्वरूप मोठे विलक्षण आहे. चालू शतकाच्या मध्यास आणि त्यानंतर विकसनशील अर्थव्यवस्थेत बँकांनी बरेच बदल आणि चढउतार अनुभवले त्यातील प्रमुख गोष्ट म्हणजे अनेक छोट्या मोठ्या बँकांची पावसाळी भूछत्राप्रमाणे अनिर्बंध वाढ झाली. १९४९ मध्ये ७५० च्या वर बँका होत्या. हे चित्र लक्षात घेता असे आढळते की बँकांनी व्यापारी वृत्तीने आपल्या हितसंबंधीयांकरिता शाखा तसेच नव्या बँका यांची वाढ केली.

बऱ्याच बँकांच्या अपयशामुळे ठेवींची सुरक्षितताही धोक्यात आली होती. १९३९ ते १९४५ मध्ये ४८२ बँका अपयशी ठरल्या. त्यामुळे बँकिंग क्षेत्राचे कायद्याने नियंत्रण करण्याची निकड भासू लागली. १९४८–४९ मध्ये बँकिंग कंपनीज अँक्टमुळे बँकिंग क्षेत्रात एक नवे दालन उघडले गेले.

स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजतागायत भारतीय बँकांच्या प्रगतीचे विवेचन तीन भागांत करता येईल.

(१) बँकिंगचे कायद्याने नियमन व त्यांत सामाजिक नियंत्रण तसेच राष्ट्रीयीकरणापर्यंत झालेली उत्क्रांति.

(२) पंचवार्षिक योजनांच्या सुरवातीपासून बँकांकडून अपेक्षित असलेली आणि बँकांनी पार पाडलेली देशाच्या विकासातील भूमिका.

(३) राष्ट्रीयीकरणामुळे बँकांचे पूर्णपणे बदललेले व्यक्तिमत्त्व.

## कायदेशीर नियंत्रण

१९४८ मध्ये झालेले रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण आणि त्या अनुषगाने सरकारने सुचविलेले 'मध्यवर्ती संचालक मंडळ' हे दोन महत्त्वाचे बदल झाले. शतकी

अर्थ

व सहकारी क्षेत्रातील प्रत्येकी एक सभासद ह्या मंडळावर घेतले गेले ही एक नवी प्रथा सुरू झाली.

ह्यानंतरची महत्वाची गोष्ट म्हणजे १९४९ चा बँकिंग कंपनीज अॅक्ट. ह्यामुळे रिझर्व्ह बँकेचे जॉइंट स्टॉक बँकांवरील नियंत्रण खूप वाढले. नवीन अस्तित्वात येणाऱ्या बँका, त्याचप्रमाणे जुन्या बँका, त्यांच्या शाखा, शाखेच्या जागेत होणारे बदल वगैरे सर्व गोष्टीत रिझर्व्ह बँकेची परवानगी आवश्यक झाली. तसेच बँकांच्या भाग भांडवलाच्या संरचनेत मोठा बदल झाला. बँकांची रिझर्व्ह बँकेकडून होणारी तपासणी अत्यावश्यक ठरली. तसेच त्यांचा कारभार सदृढ बनावा ह्यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या.

१९६२ च्या डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशनमुळे आणि नंतरच्या त्यावरील १९५०, ५३, ५९, ६०, ६२ आणि ६५ च्या सुधारणांमुळे बँकिंग कंपनीज अॅक्ट मधील बऱ्याचशा त्रुटी भरून निघाल्या. मुख्य म्हणजे बँक बुडीचे प्रमाण पूर्णपणे घटले त्यामुळे जनतेचा बँकावरील विश्वास वाढू लागला. १९४९ च्या बँकिंग कंपनीज अॅक्टची सर्वोच्च उन्नतीची पायरी म्हणजे १९७० च्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय.

१९४८ साली इंडस्ट्रियल फिनान्स कॉर्पोरेशनचा कायदा अमलात आला. मोठ्या कारखानदारीच्या क्षेत्रात भांडवल गुंतवणुकीच्या मदतीसाठी मुख्यत: हे नियंत्रण होते. १९५६ मध्ये राज्यपातळीवर मुख्यत: लघुउद्योग मदतीसाठी स्टेट फिनान्स कॉर्पोरेशन्स नेमण्यात आली. १९५५ साली नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन्स उभी राहिली. पुष्कळशा राज्यांनीही आपल्या क्षेत्रातील कारखान्यांना उत्तेजन मिळावे म्हणून अशा प्रकारची कॉर्पोरेशन्स निर्माण केली. शेवटी १९६४ मध्ये दीर्घ मुदतीच्या कर्जामध्ये एकसंधपणा यावा म्हणून इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया अस्तित्वात आली.

बँकांना आणखीही काही क्षेत्रांत मदत व्हावी म्हणून १९६३ मध्ये अॅग्रिकल्चरल रिफिनान्स अॅण्ड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन अस्तित्वात आले. त्यामुळे लँड डेव्हलपमेंट बँका, स्टेट को-ऑपरेटिव्ह बँका आणि इतर बँकांना शेतकी कर्जाबद्दल दिलासा मिळू लागला.

१९६८ मध्ये अॅग्रिकल्चरल फिनान्स कॉर्पोरेशन अस्तित्वात आले. ते प्रामुख्याने शेतीच्या अनुषंगाने येणाऱ्या अनेक व्यवसायांना अर्थसाहाय्य मिळावे म्हणून.

बँकांचे अधिकारी प्रशिक्षित असावेत म्हणून त्यांना शिक्षण देण्याच्या दृष्टीने नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंट १९६८ मध्ये स्थापन झाली.

१९७१ मध्ये बँकांनी लघुउद्योगांना दिलेल्या कर्जाची हमी घेण्यासाठी क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन निर्माण झाले. सहकारी संस्थांनी दिलेल्या दीर्घ मुदतीच्या शेतकी कर्जांत वाढ व्हावी म्हणून १९६५ मध्ये कायदेशीर तरतूदी करण्यात आल्या.

इतक्या सुविधा आणि तरतुदी असूनही समाजातील त्यांचा लाभ अपेक्षित क्षेत्रांना मिळू शकत नाही. म्हणूनच १९६७ मध्ये 'सोशल कंट्रोल अॅक्ट' निर्माण झाला.

ह्यापुढील अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणजे बँकिंग कंपनीज 'अॅक्वीझिशन अॅण्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकिंगचा १९७० चा कायदा. समाजवादाकडे जास्त वेगाने वाटचाल व्हावी आणि त्यासाठी बँकांनी अग्रक्रम असलेल्या विभागांना जास्तीत जास्त कर्जे उपलब्ध करावीत हा त्यामागचा मुख्य हेतु होता.

त्यानुसार प्रमुख १४ बँकांची मालकी जरी सरकारकडे गेली तरी त्यांची स्वायतत्ता अबाधित ठेवण्यात आली.

बँक राष्ट्रीयीकरणामुळे मुख्यत: तीन गोष्टी साधता येतात. बँकांच्या कारभाराला भक्कम आधार लाभतो. सर्वसाधारण जनतेचा विश्वास वाढतो आणि बँकांचे क्षेत्र विस्तृत होते. शेतकी आणि लघुउद्योगांना दिलेल्या कर्जाबाबत बँकांना हमी मिळू शकते. तसेच त्यांच्या सामाजिक जबाबदारीबाबत जाणीव होऊन देशाच्या आर्थिक प्रगतीत बँकांचा हातभार लागतो.

## आर्थिक विकासातील बँकांची भूमिका :

दुसऱ्या महायुद्धानंतर बँका, त्यांच्या शाखा आणि ठेवी यांत एकदम खूप वाढ झाली. परंतु ती वाढ फक्त प्रमुख बंदरे आणि मोठी शहरे ह्यापुरतीच मर्यादित राहिली. १९५१ मध्ये ७५% बँका मोठमोठ्या शहरात होत्या. सर्वांगीण आर्थिक विकासासाठी खेडोपाडी बँका पोहोचणे इष्ट होते. इंपिरियल बँक ऑफ इंडियाकडे १९५१ ते १९५६ च्या काळात ११४ शाखा उघडण्याचे

काम देण्यात आले. परंतु फक्त ६३ शाखा उघडण्याचे काम करण्यात त्यांना यश आले.

बँकांचे नूतनीकरण, राष्ट्रीयीकरण आणि कायद्याने नियंत्रण ह्या पाठीमागे नेहमीच ग्रामीण आर्थिक विकासाचे ध्येय आहे.

१९५५ ते १९६८ या काळात बँक व्यवसाय खूपच विस्तारला, बँका ग्रामीण भागात पोहोचल्या. परंतु कायदेशीर तरतुदी, कर्जहमीच्या योजना अंमलात आणूनही बँकांनी, शेतकी आणि ग्रामीण भागातील आर्थिक विकासाची त्यांची जबाबदारी उचलली नाही. या बाबतीत आपली निष्क्रियता सोडायला बँका तयार नव्हत्या. १९५१ मध्ये बँकांनी दिलेल्या एकूण कर्जापैकी २·१% शेतीसाठी होते तर १९६५–६७ मध्ये ते फक्त ०·२% होते!

## राष्ट्रीयीकरण :

कितीही प्रयत्न झाले तरी शहरी आणि ग्रामीण भागांत दिली गेलेली कर्जे कधीच समतोल राहिली नाहीत. १९६० पासून लघुउद्योगांना काही प्रमाणात कर्जे मिळू लागली. परंतु शेतकरी आणि लहान धंदेवाईक नेहमीच वंचित राहिले. राष्ट्रीयीकरणानंतर शेतकी, ग्रामीण, लघुउद्योग आणि इतर मागासलेल्यांना मिळालेली कर्जे पाहून राष्ट्रीयीकरणाचे चीज झाले असे वाटते. राष्ट्रीयीकृत बँकांचे कार्य आता आर्थिक विकासाच्या दृष्टीने आमूलाग्र बदलले आहे हे निश्चितच.

राष्ट्रीयीकरणानंतर ग्रामीण भागातील बँकाचे जाळे आणि गरजूंना मिळालेले कर्ज एकट्या स्टेट बँकेमार्फत कितपत शक्य झाले असते? नेहमीची ग्रामीण विकासाबद्दलची निष्क्रियता सोडून बँकांना अधिक क्रियाशील बनावे लागले आहे. याचे कारण राष्ट्रीयीकृत बँकांवर ती जबाबदारी निश्चितपणे सोपविली गेली.

रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या विभागात प्रमुख बँका म्हणून राष्ट्रीयीकृत बँकांना काम करावे लागले. ठरवून दिलेल्या विभागात शाखा उघडाव्या लागल्या. व्याजदर काही योग्य ठिकाणी ४% पर्यंत देखील खाली आणावे लागले.

बँक राष्ट्रीयीकरणानंतर भारताची जी आर्थिक प्रगति झाली तिला सर्व जगात कुठेच तोड नाही. जुलै १९६९ ते जून १९७० मधील काळात ११५० शाखा राष्ट्रीयीकृत बँकांनी उघडल्या. एकूण शाखा वाढीत ग्रामीण शाखांत १७% वरून २७% पर्यंत वाढ झाली ही निश्चित स्वागतार्ह बाब आहे.

बँकांच्या ठेवीतही नेत्रदीपक वाढ झाली. १९६९ मध्ये एकूण ठेवी रु. ४६४६ कोटी होत्या. त्या १९७६ मध्ये रु. १७,१३२ कोटी झाल्या. ह्याच कालावधीत बँकांनी दिलेली कर्जे रु. ३५९९ कोटींवरून रु. १२,९०९ कोटीं पर्यंत वाढली. शेतकी खातेदार १,७६,६०० वरून ७,३०,७०० पर्यंत वाढले.

राष्ट्रीयीकृत बँकांचे व्यवहार तोटयाचे ठरतील ही भीति आता निर्विवादपणे खोटी ठरली आहे. अर्थात राष्ट्रीयीकरण हा काही सर्वच आर्थिक प्रश्नावरचा 'रामबाण इलाज' नव्हे हे लक्षात ठेवले पाहिजे. तसेच राष्ट्रीयीकरणाचे धोरण कितपत फायद्याचे ठरेल हे कळायला अजून काही काळ जावा लागेल.

बँकांचे व्यक्तिमत्त्व, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अलीकडे पूर्णपणे बदलले आहे. बँकांची केवळ दैवयोगाने होणारी दिशाहीन वाढ जाऊन एकसंधपणा असणारी, कायद्याने नियंत्रित केलेली, देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेली, ग्रामीण विकासाला हातभार लावणारी अशी सुव्यवस्थित बँक पद्धति आज देशात रूजू लागली आहे.

## 'उद्या'करता 'आज'चे बँकिंग :–

आज आपल्याकडे खेड्यापासून मोठ्या शहरापर्यंत आर्थिक साहाय्य देणाऱ्या सुव्यवस्थित संस्था आहेत. देशाच्या आर्थिक उलाढालीत महत्त्वाचा वाटा आज बँकांनी उचलला आहे. परंतु देशाची जी सर्वांगीण प्रगति आहे ती काही केवळ बँकामुळेच शक्य झाली आहे असे नाही. जी काही आर्थिक मदत देणे शक्य आहे ती बँका देत आहेत. पण देशातील एखाद्या प्रकल्पाला दुसऱ्या अनेक बाजूंनी मदत घेणे शक्य आहे. बँकांच्या साहाय्यावर काही संस्थात्मक मर्यादा पडतातच. राष्ट्रीयीकरणानंतर केवळ आवश्यक म्हणून खेडोपाडी शाखा उघडल्या गेल्या. समाजाचे जे घटक आर्थिक मदतीच्या अभावी वंचित होते त्यांना आर्थिक मदतही देऊन झाली.

पण यापुढे काय? भविष्यात बँका काय करू शकतील?

आज ६०% शाखा ग्रामीण किंवा अर्ध ग्रामीण भागात आहेत. परंतु मुख्यत्वेकरून त्या लोहमार्ग, राजरस्ते, हमरस्ते यांच्या जवळपासच आहेत. जिथे बँकांचा मागमूस नाही अशा विभागात यापुढे शाखा उघडणे इष्ट होईल. ह्या शाखांत बँकांना फायदेशीररीत्या काम करणे शक्य होईलच असे नाही. म्हणूनच बँकांच्या व्यवस्थापनाचे काम अतिशय काळजीपूर्वकपणे झाले पाहिजे.

आपली आर्थिक व्यवस्था ही मुख्यत्वेकरून शेतकीप्रधान आहे आणि म्हणूनच डॉ. मुरंजन म्हणतात त्याप्रमाणे शेतीला आर्थिक साहाय्य सगळ्यात जास्त दिले गेले पाहिजे. शेती उत्पादनात घट ही अन्नधान्य आणि कच्च्या मालाच्या किंमती वाढविते. तसेच उत्पादनाच्या किंमती वाढतात आणि शेवटी सर्व आर्थिक व्यवस्थेवर त्याचा दुष्परिणाम होतो.

ग्रामीण भागांचा आर्थिक विकास करावयाचा असेल तर तो शेतीला अर्थसाहाय्य देऊनच केला पाहिजे. सहकारी संस्था या बाबतीत अपेशी ठरल्या आहेत. बँकांनी जरी कर्जे देण्यास सुरवात केली असली तरी ती वैयक्तिक स्वरूपाची आहेत. वैयक्तिक स्वरूपाची कर्जे शेतमालाची साठवण आणि त्यांची एकाच संस्थेतर्फे विक्री हे प्रश्न सोडवू शकत नाहीत.

त्यासाठी विभागीय आर्थिक विकास योजना चालू झाल्या पाहिजेत. सध्या अॅग्रिकल्चरल फिनान्स कार्पोरेशन अशा प्रकारचे काम करीत आहे. परंतु ग्रामीण भागात बँकांनी हे काम सरसकटरित्या चालू केले पाहिजे.

जलसिंचन योजना आणि विभागीय विकास योजना यांमध्ये सरकारी योजनांबरोबर सल्लामसलत करून त्यातील बँकांच्या दृष्टीने योग्य अशा योजना निवडाव्या आणि त्या ठिकाणी एक किंवा जास्त बँकांनी एकत्र येऊन काम करावे हे उचित होईल. कारखानदारीच्या क्षेत्रात बँका एकत्र येऊन कर्जे देऊ लागल्या आहेत. शेतकी क्षेत्रात सुद्धा एकत्र येऊन कर्जे देणे बँकांच्या दृष्टीने फायदेशीर ठरेल यात शंका नाही.

मागासलेल्या भागात बँका, आर्थिक साहाय्य देणाऱ्या इतर संस्था आणि विकास कार्य करणाऱ्या सरकारी आणि निमसरकारी संस्था यांनी एकत्र येऊन आर्थिक विकासाचे काम करावयाचे आहे. महत्त्वाची गरज यांच्यातील एकसूत्री सहकार्याची.

राष्ट्रीयीकरणानंतर बँका खेडोपाडी जाऊन पोहोचल्या आहेत. परंतु विभागीय विकासयोजना अजून मूर्त स्वरूपात अस्तित्वात आल्या नाहीत. अशा वेळी बँका काय करू शकतील?

एकट्या दुकट्या शाखेने या क्षेत्रात काम करण्यापेक्षा थोड्या शाखा एकत्र येऊन बँकेच्या दृष्टीने योग्य अशी एखादी योजना राबवू शकतील. एकाजिनसी शेतकी प्रश्न असलेल्या विभागाची पाहाणी करून आणि ह्या विषयात जे तज्ज्ञ लोक आज बँकांमध्ये आहेत. त्यांचा सल्ला घेऊन बँका प्रभावी कार्य करू शकतील.

हा जो विभागीय विकास योजनेचा विचार आहे तो संघटित विकास, उत्पादनक्षमतेत वाढ यांसाठी तर आहेच परंतु त्याबरोबरच बँकाची क्षमता वाढविण्यासाठी सुद्धा आहे.

ग्रामीण शाखा ह्या व्यापारी दृष्टीने राबविल्या गेल्या तर बँकांना दोष देता येणार नाही. परंतु व्यापारी दृष्टि ठेवूनही बँकामार्फत मायक्रो प्लॅनिंग जास्त सुलभ होऊ शकेल.

एखाद्या बड्या शेतकऱ्याला बँक कर्ज मिळणे जितके सहज शक्य आहे, तितकेच ते लहानातील लहान शेतकऱ्यालाही बँकेने दिले पाहिजे. लहान शेतकऱ्याची उत्पादनक्षमता आणि कर्जफेडीची ताकद वाढावी म्हणून जलसिंचन योजना, लिफ्ट इरिगेशन, यासाठी बँकांनी कर्ज दिले पाहिजे.

सीमान्त शेतकऱ्यांना पशुपालन, कुक्कुटपालन, मेंढपाळी इत्यादि पूरक व्यवसाय बँकेने उपलब्ध करून दिले पाहिजेत.

शेती विकास हे एकदा बँकांचे ध्येय ठरले की त्याबरोबरच बियाणे, खते ह्या विषयांच्या जबाबदाऱ्या बँकांना उचलाव्या लागतील. तसेच शेतकी अवजारांची दुरूस्ती, गोबर गॅस निर्मिति, पाणी पंपाची दुरुस्ती त्यासाठी लागणारे कुशल कामगार, औषधी फवारणी, मातीचे परीक्षण इत्यादि अनेक महत्त्वाच्या बाबतीत बँका लक्ष घालू शकतील.

अर्थात् यासाठी प्रथम बँका, अर्थतज्ज्ञ मंडळी, राज्य सरकारे या सर्वांनी एकत्र येऊन त्या प्रश्नांचा सांगोपांग विचार करून योजना ठरविल्या पाहिजेत. बँकांनी राज्य सरकारकडून मिळणाऱ्या इतर मदतीसंबंधी सूक्ष्म विचार करावयास हवा.

सहकारी संस्था आणि बँका यांनी एकमेकांच्या सहकार्याने ग्रामीण विकास घडविणे सुरवातीस कठीण दिसते, परंतु कालांतराने परस्परांतील सामंजस्य वाढून एकसंधपणा येऊ शकेल अशी आशा वाटते.

शेतमालाच्या विक्रीविषयी बँक गरीब शेतकऱ्यांची मित्र होऊ शकेल. ग्रेन बँकेची निर्मिति करून किंवा सहकारी संस्थांशी एकत्र येऊन शेतमालाला वाजवी किंमत मिळू शकेल. शेतमालाला वाजवी किंमत मिळणे शेतकऱ्यांच्या कर्जफेडीच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल.

बँकांनी आजच्या टेक्नोक्रॅफ्टस्‌ना तसेच लघुउद्योग क्षेत्रात जे नवनवे प्रयोग करतात त्यांना मदत केली पाहिजे.

भविष्यात बँकांनी लघुउद्योगाला मदत करतान इतर आर्थिक मदत करणाऱ्या संस्थांबरोबर एकतानत साधली पाहिजे. बाजारभावविषयक अभ्यास, आया निर्यात परवान्यांचे धोरण, उत्पादनाचा काळ, कच्च मालाचा पुरवठा ह्याविषयी अभ्यास करून ग्राहकांन मदत केली पाहिजे, त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे

उद्याचा बँकर हा सर्व स्तरांवरच संशोधन करणारा नव विचार प्रकल्पक असावा. तसेच नव्या रीती, नः मार्ग अनुसरणारा, नवीन कल्पनांना मूर्तस्वरूप देणार अभिक्रमशील असण्याची नितान्त आवश्यकता आहे.

**क्रिएटिव्ह बँकिंगची पाच वैशिष्टये श्री. डेव्हिड रॉकफेलर यांनी सांगितली आहेत.**

**(१) लवचिक दृष्टिकोन**

**(२) नव्या क्रांतिकारक बदलाविषयी ग्रहणशीलता**

**(३) आशावादी विचारसरणी, समस्येत अडकून न पडता ती सोडविण्याकडे वस्तुनिष्ठ कल.**

**(४) चुकांच्या किंमती मोजून नवे उपक्रम करण्याचे धारिष्टय.**

**(५) सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि सामाजिक जीवनात क्रियाशील भाग घेण्याची इच्छा.**

ह्या सर्व चर्चेचा निष्कर्ष म्हणजे भविष्यात आपल्या बँकांना वेगळया क्षेत्रात पदार्पण करावयाचे आहे हे आधुनिक बँकर्सनी लक्षात घेतले पाहिजे.

◆ ◆ ◆

# महाराष्ट्र बँकेचा ४२ वा वर्धापनदिन

दिनांक ८ फेब्रुवारी १९७८ रोजी बँकेने आपला ४२ वा वर्धापन दिन मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला. महाराष्ट्र बँकेच्या नव्या इमारतीच्या पटांगणात हा दिवस साजरा करण्यात आला. ही नवी इमारत गणेशखिंड रोडवर वेधशाळेच्या इमारतीसमोर होत आहे. बँकेच्या ग्राहकांनी, शुभचिंतकांनी आणि समाजातल्या निरनिराळ्या थरातल्या व क्षेत्रातल्या अनेक पाहुण्यांनी महाराष्ट्र बँकेच्या या संध्याकाळच्या स्वागत समारंभास उपस्थित राहून शोभा आणली.

बँकेची ही नवी इमारत जवळ जवळ बांधून तयार होत आली असून ३–४ महिन्यांत या इमारतीत कामकाज सुरू होईल. बरोबर २५ वर्षांपूर्वी १९५३ साली बँकेची सध्याची बाजीराव रोडवरची इमारत बांधून पूर्ण झाली आणि आज ही नवी इमारत पूर्ण होऊन बँकेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा पार करण्यात आला आहे. गेल्या २५ वर्षांतील बँकेच्या प्रगतीचे निदर्शक म्हणूनच या नव्या इमारतीकडे पाहाता येईल. या वर्षात बँक एक 'भारतीय बँक' झाली. तिच्या शाखांचा विस्तार भारतातल्या बहुसंख्य प्रांतांत पसरला. दि. ३१ डिसेंबर १९७७ रोजी संपणाऱ्या वर्षात बँकेच्या ठेवीची संख्या ४५० कोटींपर्यंत गेली.

खाली दिलेल्या निरनिराळ्या नव्या ठेव योजना कार्यान्वित करून बँकेने आपल्या ठेवीचा विभाग आकर्षक केला आहे.

(१) सदाफुली ठेव योजना,
(२) कॅश सर्टिफिकेट योजना,
(३) फेस्टिव्हल डिपॉझिट योजना.

बँकेच्या विद्यार्थी ठेव योजनेने पुण्यातील विद्यार्थी वर्गाच्या मनांत चांगलेच स्थान मिळविले आहे.

अग्रक्रमप्राप्त विभागांना आणि दुर्लक्षित विभागांना दिली जाणारी मदत हे बँकेच्या कर्जविभागाचे फार महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होय. एकूण कर्जाशी या कर्जाचे प्रमाण ४० टक्के आहे. राष्ट्रीय प्रमाण कमीतकमी ३३.३ टक्के आहे. कर्ज खात्यातील ८५ टक्के खाती दुर्लक्षित आणि अग्रक्रमप्राप्त विभागातील आहेत आणि या एकाच गोष्टीवरून बँकेचे त्या बाबतीतील लक्ष आणि प्रयत्न ध्यानात येतात. उत्तर प्रदेशात हरिजन कुटुंबासाठी घरबांधणीच्या कार्याला आर्थिक मदत करण्याचे बँकेने मान्य केले आहे. उत्तर प्रदेशातील प्रत्येक शाखा १०० घरांना कर्ज पुरवठा करील. हरिजन विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधण्याकरिता देखील कर्ज देण्याचे बँकेने मान्य केले आहे.

बंगलोर येथील महानगरपालिकेत काम करणारे शहराचे सफाई कामगार बहुतेक मागासलेल्या आणि अनुसूचित जमातींतील आहेत. या कामगारांना प्रत्येकी रु. १००० पर्यंतची मदत करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांची पूर्वीची कर्जे फेडण्यासाठी त्यांना मदत होईल. या योजनेखाली त्यांना रु. ५ चे आवर्त ठेव खाते उघडावे लागणार आहे. यामुळे त्यांची बचतही आपोआपच वाढणार आहे.

बँकेच्या अधिकारीवर्गाला प्रत्यक्ष कार्याच्या वेळी कोणतीही अडचण येऊ नये आणि कर्जाचा प्रवाह या विभागातून नीटपणे वहावा यासाठी बँकेने निरनिराळ्या ३५ योजनांची "अवर हेल्पिंग हॅण्ड टू स्मॉल मॅन" ही पुस्तिका तयार केली आहे. या सर्व योजनांची रचना अशा तऱ्हेने केली आहे की ग्रामीण आणि निमशहरी विभागात, जेथे बँकेच्या जवळ जवळ ६२ टक्के शाखा कार्यमग्न आहेत, तेथे जास्तीत जास्त रोजगार निर्मिति व्हावी. एकूण ५३७ शाखांपैकी ३२२ शाखा

ग्रामीण आणि निमशहरी विभागात, १२२ शाखा शहरी विभागात, आणि ८३ शाखा मोठ्या शहरांतून आहेत. या नव्या वर्षात ८० नवीन शाखा उघडण्याचा बँकेचा मानस आहे आणि ही संख्या १९८० सालच्या शेवटी ८०० शाखापर्यन्त जावी, अशी अपेक्षा आहे.

कृषि विभागातील कर्जाच्या बाबतीत निरनिराळ्या प्रदेशांची प्रगति साधण्याचे जे बँकेचे जुनेच धोरण आहे त्याचाच बँकेने पाठपुरावा केला आहे. त्यानुसार बँकेने अनेक नव्या योजना तयार केल्या असून अनेक योजनांतून भाग घेतला.

महाराष्ट्र विद्युत् महामंडळाने १९७५ ते १९७८च्या दरम्यान ९५०० ते १२००० विहिरींना विद्युतीकरणाच्या साहृयाने शक्तिशाली बनविण्याची योजना आखली आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यांत अमलांत येणाऱ्या या योजनेला बँकेने रु. ३०० लाखांचे कर्ज मंजूर केले आहे, त्यापैकी रु. २८५·३३ लाख वितरित केले असून त्यामुळे ५,९९० कृषि पंपांचे विद्युतीकरण होत आहे. महाराष्ट्रातल्या महत्त्वाच्या नद्यांवर जलसिंचन प्रकल्प स्थापण्याची एक मोठी योजना जलसिंचन विकास महामंडळाने आखली आहे. यातील ३२५ योजनांपैकी ५० योजनांना बँकेने आर्थिक मदत केली असून त्यात रु. १३१·३२ लाख इतक्या रकमेचा समावेश आहे. पुणे, नाशिक, औरंगाबाद, नांदेड, सातारा आणि चंद्रपूर जिल्ह्यांतून पसरलेली ३१,०९७ एकर जमीन या प्रकल्पाने ओली होणार आहे.

मध्य प्रदेशातील, दुर्ग जिल्ह्यात ४९ शेतकऱ्यांचा एक समूह एस.एफ.डी.ए. योजनेखाली सहकारी सोसायटीच्या स्वरूपात एकत्र आला असून त्यांना बँकेने जलसिंचन योजनेखाली कर्जे दिली आहेत. या शेतकऱ्यांची पीक-कर्जाची संपूर्ण गरजही बँकेतर्फे भागविली जाणार आहे.

मराठवाडा ग्रामीण बँक या नांवाची प्रादेशिक ग्रामीण बँक महाराष्ट्र बँकेने १९७६ साली स्थापन केली. तिने नांदेड, परभणी, उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यांत २६ शाखा उघडल्या आहेत. प्रत्यक्षपणे आणि ५४ कृषि सोसायट्यांच्या मार्फत ३,२३५ शेतकऱ्यांना आणि खेड्यांतील कारागिरांना ग्रामीण बँकेने कर्जे दिली आहेत.

एकूण तीस साखर कारखान्यांचे भाग विकत घेण्यासाठी बँकेने छोट्या आणि मध्यम प्रतीच्या शेतकऱ्यांना कर्जे दिली आहेत. भिमा सहकारी साखर कारखाना भोगावती सहकारी साखर कारखाना, आणि मुळा सहकारी साखर कारखाना हे ते तीन कारखाने सोलापूर, कोल्हापूर आणि अहमदनगर जिल्ह्यात आहेत. या कारखान्यांनाच यंत्रेवगैरे घेण्यासाठी बँकेने कर्जे दिली आहेत.

बँकेचा विदेश विनिमय (फॉरेन एक्सचेंज) विभाग १९६० साली सुरू झाला. गत वर्षी या विभागातर्फे होणाऱ्या आर्थिक उलाढालीची पातळी १०० कोटींच्या पर्यंत गेली. सध्या जगातील निरनिराळ्या आणि महत्त्वाच्या ठिकाणी बँकेचे प्रतिनिधि (कॉरेस्पॉण्डण्टस्) आहेत. त्याचप्रमाणे भारतातल्या २० केंद्रातून विदेश विनिमयाची सोय आहे. निर्यात केंद्राची स्थापना सर्व राजधान्यांच्या मोठ्या शहरातून व्हावी अशी योजना आखली जात आहे. जे कर्मचारी अशा केंद्रांतून काम करतील त्यांना प्रदीर्घ प्रशिक्षण भारतात आणि भारताबाहेरही देण्यात येईल.

बँकेच्या स्थापनेपासून सामान्य माणसाच्या कल्याणावर बँकेचा फार मोठा भर आहे. गत वर्षी देखील निरनिराळ्या ठेव आणि कर्ज योजनाची निर्मिति करून हा दृष्टिकोन कायम ठेवण्यात आला बँकेच्या 'पांच लाखांना काम' या योजनेखाली ३४६१ लोकांना मदत करण्यात आली आणि १४९९ लोकांनी बँकेच्या सुशिक्षित बेकारांच्या साठी निर्माण करण्यात आलेल्या योजनेचा फायदा घेतला.

ग्राहकांच्या सूचनांना कार्यान्वित करण्यासाठी एक स्वतंत्र विभागच स्थापन करण्यात आला असून विशेष म्हणजे हा विभाग ग्राहकांच्या तक्रारींचे मुद्दा स्वागतच करतो. मोठ्या शाखांमधून या विभागाशी संबंधित अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून त्यायोगे ग्राहकांना कारभाराविषयी मत व्यक्त करणे आणि सूचना करणे अत्यंत सुकर झाले आहे.

# महिलांची वैचारिक पातळी—एक पाहणी

प्रा. लीला पाटील

(श्रीमौनी विद्यापीठ, गारगोटी)

मौजे मडिलगे खुर्द हे सर्वसामान्य भारतीय खेड्याचे प्रतीक आहे. वेदगंगेच्या काठावर कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यात हे गाव वसले असून गारगोटी ह्या तालुका ठिकाणापासून ते उत्तरेला ४ मैल आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार येथील लोकवस्ती १२६५ आहे. मराठा जातीतील लोक बहुसंख्य आहेत. गावातील मध्यभागात त्यांची वस्ती असून अवतीभवती दलितेतर बलुतेदारांचे वास्तव्य आहे. इतर दलित मात्र गावाच्या बाहेर राहतात. गावातील बलुतेदारांमध्ये सुतार, चांभार, न्हावी या जाती आढळतात. अनुसूचित जातींपैकी फक्त मांग जात आढळते. गावातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. दोन लहान दुकानदार असून इतर सर्व एकतर शेतकरी, नाहीतर शेतमजूर आहेत. नोकरी करणाऱ्या पुरुषांची संख्या १० ते १५ आहे.

मडिलगे खुर्दमध्ये सध्या प्रौढ स्त्रियांची संख्या प्रौढ मतदार यादीनुसार २०२ आहे. अशा महिलांपैकी ८२ महिलांची प्रश्नावलीच्या साहाय्याने मुलाखती घेण्यासाठी यादी तयार केली. प्रश्नावली तयार करताना हुंडा पद्धति, शिक्षण, कुटुंबनियोजन व मुलांची संख्या, मुला—मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा, वृद्ध व एकत्र कुटुंब पद्धति, आंतरजातीय विवाह, सरासरी वेतन, ग्रामपंचायतीतील स्त्री सभासदांचे स्थान, महिला मंडळ वगैरेच्या बाबतीत त्यांची मते अजमावण्याचा प्रयत्न करण्याचा दृष्टिकोन ठेवला. २८ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर १९७७ या कालावधीत रात्री ७ ते ९ च्या दरम्यान या महिलांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखतीसाठी निवडलेल्या महिला ह्या २५ ते ४५ ह्या वयोगटातील आहेत. ८२ पैकी आठ विधवा महिला वगळता, बाकीच्या विवाहित सुवासिनी आहेत. सर्वच महिला शेती व्यवसायात काम करणाऱ्या आहेत. घरकामाव्यतिरिक्त स्वतःच्या शेतांत किंवा मजुरीने दुसऱ्यांच्या शेतात काम करणाऱ्या महिलांचा त्यांत समावेश करण्यात आलेला आहे. पहाणीच्या द्वारे हाती आलेल्या माहितीच्या आधारे पुढील विवेचन केले आहे.

## १. मुलींचे शिक्षण

शिक्षणाचा प्रसार खेडोपाडी होत आहे. स्त्री-शिक्षणावर भर देण्याची गरज वारंवार प्रतिपादन केली जात आहे. घरातील स्त्री सुशिक्षित झाली तर कुटुंब सुशिक्षित होते हे मान्य करावे लागेल. पण मडिलगे खुर्द या गावामध्ये मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत फारच उदासीनता दिसून येते. निवडलेल्या महिलांच्यापैकी, ९४ टक्के महिला निरक्षर आहेत. उरलेल्यांच्यापैकी दोन महिला तिसऱ्या इयत्तेपर्यंत व तीन महिला चौथ्या इयत्ते पर्यंत शिकलेल्या आहेत. मात्र लिहिण्या—वाचण्याचा सराव अजिबात नसल्याने त्यांना आता अक्षर ओळखही उरलेली नाही. याचा अर्थ सर्वच महिला खऱ्या अर्थाने अशिक्षित आहेत.

मुलींच्या शिक्षणाविषयी मत व्यक्त करताना 'आमचं शिक्षणाच्या बाजूनं उणं कशाचं काय समजत न्हाय.'

निदान पोरींना तरी शिकवाव वाटतय अस मत सर्वच महिलांनी व्यक्त केलं, पण लहान भावंडांना संभाळण्यासाठी, घरकाम करण्यासाठी व जरूर पडल्यास शेतात ये-जा करण्यासाठी निदान मोठी मुलगी तरी शाळेत पाठविता येत नाही अशीही असमर्थता त्यांनी प्रकट केली. म्हणजे मुलींना शिक्षण देण्याची गरज त्यांना पटलेली आहे; पण शेती व्यवसाय व आर्थिक परिस्थिति मुलींच्या शिक्षणाच्या आड येते असे दिसून येते.

## २. हुंडा पद्धति

हुंडा पद्धति ही सामाजिक व आर्थिक दृष्टया अनिष्ट प्रथा समजली जाते. हुंडा घेणे योग्य की अयोग्य याविषयीच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करता, ७९.५ टक्के महिलांनी हुंडा घेणे योग्य वाटत असल्याचे सांगितले. हुंडा कां घेतला जावा? याची कारणे सांगताना ४३ टक्के स्त्रियांच्या मते, दिल्या घरी मुलीला सुख मिळाले पाहिजे व तिची हौस झाली पाहिजे म्हणून हुंडा द्यावा, तर २६.१ टक्के महिलांच्या मध्ये हुंडा ही पूर्वापार चालत आलेली पद्धति आहे व ती आपण पाळली पाहिजेच, हुंड्याशिवाय लग्न ही कल्पनाच त्यांना पटत नाही. १०.६ टक्के महिलांच्या मते, शिक्षणाचा खर्च भरून निघावा म्हणून हुंडारूपाने पैसे मिळाले पाहिजेत. १६.९ टक्के स्त्रियांनी, स्वतःच्या मुलींना हुंडा द्यावा लागतो म्हणून मुलांचा हुंडा घेणे आवश्यक आहे, असे सांगितले. १०.७ टक्के महिलांनी हुंडा घेणे कां योग्य आहे हे सांगताना मुलींच्या आई-वडिलांनी सगळी इस्टेट मुलांना द्यावी पण हुंड्याच्या रूपाने मुलीवर खर्च करण्याची आर्थिक कुवत असताना मागे-पुढे पाहू नये असा विचार मांडला. १९.५ टक्के स्त्रियांनी मात्र हुंडा पद्धति अयोग्य वाटत असल्याचे मत मांडले. त्यांच्या मते आर्थिक परिस्थिति चांगली नसलेल्यांचे हुंड्यामुळे फार हाल होतात. लग्न मोडणं, लांबणीवर पडणं व कर्जबाजारी बनण्याशिवाय लग्नाची तरतूद करणे अशक्य. या कारणामुळे हुंडा अयोग्य वाटतो.

सारांश, बहुसंख्य महिलांच्या मते, हुंडा पद्धति योग्य; विविध कारणांचा आधार घेऊन हुंडापद्धतीचे ठामपणे त्यांनी समर्थन केले. ज्यांनी हुंडा पद्धति अयोग्य वाटते असे मत मांडले त्यांनी ते केवळ तो देण्याची ऐपत नसल्याचे कारण सांगूनच.

## ३. आंतरजातीय विवाह

आंतरजातीय विवाह करण्याची कल्पना किंबहुना तो शब्द उच्चारणेही या महिलांना पाप वाटते. जात भ्रष्ट होते, समाजात विटंबना होते, वाडवडिलांनी अजूनपर्यंत घराण्याची अब्रू सांभाळली व असे विवाह करणे पाप आहे, जातीबाहेर तोंड काढायला जागा राहणार नाही असे शब्द वापरून आंतरजातीय विवाह सर्वस्वी अयोग्य व परंपरेला शोभणारे नाहीत असे प्रतिपादन केले. सर्वच महिलांनी नकारात्मक उत्तर दिले, यावरून जात हा अत्यंत प्रभावी घटक व त्याचा प्रखर पगडा या महिलांच्यावर दिसून येतो.

## ४. विवाह वय

मुलां-मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा किती असावी या बाबतीत या महिलांची मते अजमावण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार असे दिसून आले की, मुलाखत घेतलेल्या एकूण ८२ महिलांच्यापैकी ४९ (५९.५ टक्के) महिलांच्या मते, मुलांच्या लग्नाची वयोमर्यादा २२ ते २३ वर्षे असावी. तर २३ (२८.९ टक्के) महिलांनी तो २० ते २५ वर्षे असावी असे सांगितले, मात्र १५ व्या वर्षी मुलाचे लग्न करावे असे म्हणणाऱ्यांची संख्या १० (१२.३ टक्के) आहे.

मुलींची लग्ने मात्र लवकर उरकावीत असे म्हणणाऱ्या महिलांची संख्या अधिक आहे. ५४ महिलांच्या दृष्टीने (६५.९ टक्के) मुलीचे लग्न १४ ते १५ व्या वर्षीच व्हावे. १८ महिलांच्या मते लग्नाचे योग्य वय हे १८ ते २० वर्षे आहे, व त्या वेळीच लग्न व्हावे, तर १० महिलांच्या मते (१२.३ टक्के) १२ वर्षे वय झाले की मुलगी देऊन टाकलेली बरी. शेवटी मुली म्हणजे परक्यांचं धन, जेवढी लवकर दिल्या घरी जाईल तेवढी बरी, आमचा जीव मोकळा असे विचार त्यांनी मांडले. म्हणजे शिक्षण, लग्न म्हणजे काय? हे कळण्याअगोदरच, शक्यतो मासिक पाळी (त्यांच्या भाषेत, बाहेरच्या होण्याअगोदरच) येण्याअगोदरच मुलीचे लग्न करणे हीच विवाह वयोमर्यादेची कक्षा. म्हणजे मुलाचे विवाहाचे वय २० वर्षांच्या पुढे असावे असे मत व्यक्त करून मुलींना मात्र १५ व्या वर्षीच लग्नायोग्य समजावे असे ठाम मत मांडले.

## ५. दलितांविषयी दृष्टिकोन

दलित व दलितेतर वस्तीच्या वेगळया सीमारेषा स्पष्टपणे जाणवतात. अस्पृश्यतेची तीव्र झळ या वर्गाला जाणवते हे महिलांच्या विचारसरणीवरून स्पष्ट दिसते. गावातील अस्पृश्यांना घरात समानतेने वावर करू देणे शक्य नाही ही सर्वच महिलांनी स्पष्टपणे कबुली दिली. आपल्या पाल्यांना हरिजन मित्र आहेत काय? या प्रश्नाचे उत्तर ८९ टक्के स्त्रियांनी नकारात्मक दिले. वडिलोपार्जित रुढीनुसार अस्पृश्यता पाळली पाहिजे. जातीजातीमध्ये फरक राहणारच. कायद्याने तो मोडणार हाय थोडाच! देवानं त्या जातीत त्यांना जन्माला घातलय तर फरक हा रहाणारच अशा शब्दांत त्यांनी आपले विचार मांडले.

उरलेल्या ९ महिलांनी शाळेत जाणाऱ्या आपल्या मुलांना हरिजन वर्गमित्र आहेत पण त्यांची ये-जा बाहेरच्या खोलीपुरती शक्यतो दारातच. स्वयंपाक घरात प्रवेश नाही. मात्र देऊळ, पाणवठा, या ठिकाणी त्यांना शिरकाव देण्यास सर्व स्त्रियांनी हरकत व्यक्त केली. यावरून दलितोद्धार अस्पृश्यता–निवारण, एक गाव एक पाणवठा, निधर्मी राज्य हे सर्व खेडयात फोल ठरले आहे. भारतीय समाजाच्या पारंपरिकतेचे जातिव्यवस्था हे निदर्शक व त्याची पाळेमुळे खेडयात खोलवर रुजलेली आहेत. शिक्षण औद्योगीकरण, वाहतुकीची व संचाराची साधने, विविध सामाजिक चळवळी राजकीय व्यवस्था या आधुनिकीकरणाच्या शक्तींची खेडयातील जातीव्यवस्थेमध्ये व स्पृश्यास्पृश्यतेच्या संबंधामध्ये शिथिलता आणण्यामध्ये असमर्थता दिसून येते. नवीन जाणिवा, नवा दृष्टिकोन खेडयातील स्त्रीसमाजावर अजिबात, दूरान्वयानेही परिणाम करू शकला नाही.

## ६. कुटुंबनियोजन व मुलांची संख्या

ग्रामीण कुटुंब व्यवस्था पुरुषप्रधान आहे हे स्पष्टपणे जाणवते. पाहणी केलेल्या सर्वच महिलांच्या मते मुलगा हा असलाच पाहिजे. तो वंशाचा दिवा, म्हातारपणाचा आधार, कुटुंबातील कर्त्या मुलाशिवाय घराला शोभा नाही. अशा शब्दात मुलगा असलाच पाहिजे का? या प्रश्नाला उत्तर दिले गेले.

तुम्हांला किती मुलं असावीत असे वाटते? या प्रश्नाला उत्तर देताना कोणतीही महिला संभ्रमात पडली नाही किंवा तिने संदिग्ध उत्तर दिले नाही. मुलाखतीसाठी निवडलेल्या ८२ महिलांपैकी ५१ म्हणजे बहुसंख्य ( ६२·१ टक्के ) स्त्रियांच्या मते मुलांची संख्या ३ असावी मात्र त्यातील एक तरी मुलगा असला पाहिजे. ४ मुले असावीत असे म्हणणाऱ्या महिला २५ (३०·४ टक्के) इतक्या आहेत तर सहा मुलं असावीत असे म्हणणाऱ्या महिलांची संख्या नगण्य (६) आहे. अर्थात् प्रत्यक्षात ही परिस्थिति असेलच असे अजिबात नाही.

यावरून महिलांच्या विचारसरणीवर सरकारच्या दो या तीन अथवा लाल त्रिकोण याचा प्रसार खेडयापर्यंतच नव्हे तर महिलांपर्यंत पोहचला आहे. अन्य कोणतेही कायदे, कार्यक्रम व योजनांपेक्षा कुटुंबनियोजनाची मोहीम ग्रामीण स्त्रियांच्या विचाराला स्पर्शून गेली आहे ही बाब आशादायक म्हणावी लागेल.

कुटुंबनियोजन, ऑपरेशन योग्य वाटते काय? या प्रश्नाचे होकारात्मक उत्तर सर्वच्या सर्व महिलांच्या तोंडून मिळाले. ऑपरेशन स्त्रियांनीच करून घ्यावे असे मत दोन महिलांव्यतिरिक्त सर्वांनी दिले. पुरुषांना कष्टाची कामे करावी लागतात व ऑपरेशनमुळे आजारपण वा अशक्तपणा येईल अशी धास्ती वाटत असल्याने त्यांनी हा विचार मांडला.

## ७. मुलांचे आजारपण व उपाय

आरोग्याच्या प्राथमिक कल्पना व आजारपणाची लक्षणे याविषयी त्यांना फारसे ज्ञान नाही. देवी फक्त परिचित आहेत. ट्रीपल पोलिओ ही नावे सर्वांनाच ऐकूनही माहीत नाहीत. मुलांच्या आजारपणात सुरुवातीला घरगुती उपाय व नंतर मांत्रिकाचा सल्ला घेतला जातो. जास्तच रोग बळावला तर डॉक्टरकडे जातात. कारण कामाचा एक दिवस मोडतो. गावात डॉक्टर नाही. शिवाय पैशाची अडचण कायम आहेच. अशाच कारणाने डॉक्टरी उपाय टाळले जातात. गारगोटीला डॉक्टरकडे जावे लागते. अंधश्रद्धा, गरिबी व डॉक्टरची सेवा गावातच उपलब्ध नसल्याने मुलांची आजारपणे अंगावरच काढली जातात.

एक ते दीड वर्ष वयाच्या मुलांना अंगावर पाजणाऱ्या स्त्रियांची संख्या फक्त तीन, दोन ते अडीच वर्षे अंगावर पाजणाऱ्या स्त्रिया २७ होत्या तर अडीच ते साडेतीन वर्षे अंगावर पाजतो असे म्हणणाऱ्या स्त्रिया ३७ होत्या. अंगावर पाजलं की पोरांची रखरख नाही. गप्प राहतात व तेवढीच त्यांची किरकीर कमी असं त्यांचं म्हणणं. त्याप्रमाणे १५ महिलांच्या मते ४ ते ५ वर्षे अंगावर पाजण्यास काहीच हरकत नाही. त्यांनी हा कालावधि सांगताना असाही विचार मांडला की, दुसरं मूल पोटात राहीपर्यंत पाजण्यास हरकत नाही व त्या प्रत्यक्षात तसेच वागतात.

## ८. एकत्र कुटुंबपद्धति व वृद्धांविषयी दृष्टिकोन

एकत्र कुटुंबपद्धति ही व्यक्तीच्या जीवनपद्धतीला बळकटी आणणारी संस्था आहे. म्हणून उपयुक्त असा त्यांचा सूर दिसला. ७८ टक्के महिलांनी संयुक्त कुटुंब पद्धति योग्य आहे असे मत मांडले. अडीअडचणीला एकमेकाला सांभाळून घेण्यासाठी, आजारपणात व मुख्यतः शेती व्यवसायाला ही कुटुंब व्यवस्था उपयुक्त ठरणारी आहे असे त्यांनी सांगितले तर उरलेल्या २२ टक्के महिलांनी विभक्त कुटुंब पद्धति योग्य वाटत असल्याचे सांगितले. कारण स्वतंत्र राहिल्याने प्रत्येकाला आपली जबाबदारी ओळखता येते व मान मोडून काम करतात असे मत त्यांनी मांडले.

घरातील वृद्धांची सोय सरकारने करावी काय ? असा प्रश्न विचारला असता, ८०.४ टक्के महिलांनी त्याला विरोध केला, आम्ही पण केव्हा तरी म्हातारे होऊच की ! मग आमची जबाबदारी मुलांनी व सूनांनी घेण्याचं टाळलं तर फार वाईट वाटेल. म्हातारी माणसं जड होऊन चालेल कसं ? असे शब्द वापरून ती जबाबदारी सरकारने उचलू नये अशी भावना व्यक्त केली. मात्र १० महिलांनी (१९.६ टक्के) उत्तर देण्याचे टाळले. कदाचित् होकारात्मक उत्तर देणे प्रशस्त न वाटून त्या गप्प राहिलेल्या दिसल्या. यावरून संयुक्त कुटुंबपद्धति अजूनही खेड्यात प्रचलित आहे व ती सर्वांनी मान्य केलेली दिसते. याला शेती व्यवसाय हा कारणीभूत असावा.

## ९. बचतविषयक विचार

बचत करण्याची निकड सर्वच महिलांना जाणवली. मात्र पाचवीला पुजलेली गरिबी शिल्लक टाकण्याच्या बाबतीत अडथळा ठरते असा निराश व हतबल सूर जाणवला. बचतीचा उद्देश सांगताना, ४३ महिलांच्या मते (५२.४ टक्के) घरप्रपंच चांगला चालावा व अडीअडचणीला गाठीशी पैसा असावा म्हणून शिल्लक हवी तर २५ महिलांच्या मते (३०.४ टक्के) मुलींच्या लग्नाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद म्हणून बचत हवीच. २५.६ टक्के (२१) महिलांना मुलांचे शिक्षण चांगले व्हावे व तो खर्च भागविण्यासाठी बचत व्हावी असे वाटते १४.६ टक्के महिलांनी डाग-डागिन्याची हौस पूर्ण करता यावी म्हणून पैसा मागे टाकला पाहिजे तर २२ महिलांच्या मते म्हातारपणात उपयोगी पडावा म्हणूनही बचत व्हावीशी वाटते. जमीन घेण्यासाठी ३ महिलांनी व घर बांधण्यासाठी २ महिलांनी शिल्लक टाकण्याची निकड वाटली. म्हणजे बचतीचे महत्त्व व उद्देश याविषयी निश्चित विचार त्यांनी व्यक्त केले. अर्थात् ही दृष्टि व भूमिका स्तुत्य वाटते.

## १०. दारूबंदी

दारुबंदी व्हावी याविषयी सर्व महिलांनी होकारात्मक मतं व्यक्त केले. मात्र नुसती व्हावी म्हणून काय साधणार? व प्रत्यक्षात अजूनपर्यंत कोणीही दारूबंदीवर नियंत्रण घातले नाही असे मत व्यक्त करून त्या त्या बाबतीत हतबल व केविलवाण्या दिसल्या. संसार सुखाचा व्हावा, समाजात प्रतिष्ठा राहावी व घरातील भांडण-तंटे टळावेत व आरोग्याची नासाडी टळावी म्हणून दारूबंदी केली जावी ही प्रतिक्रिया अपेक्षित आहे.

## ११. समान शेतमजुरी

महाराष्ट्र सरकारने किमान वेतन कायदा शेतमजुरीच्या बाबतीत केलेला आहे याची माहितीही महिलांना नाही. स्त्री पुरुषांना शेतमजुरी समान असावी काय ? असा प्रश्न विचारला असता ५२ महिलांच्या मते (६३.४ टक्के) पुरुषांना स्त्री शेतमजुरापेक्षा जास्त मजुरी देणे अयोग्य नाही. स्त्रियांच्या पेक्षा पुरुषांना जादा काम व मेहनतीचे असणारे काम करावे लागते. तेव्हा वेतनात

क्र.पं.

मानता आणण अयोग्य आहे. उरलेल्या ३० महिलांच्या मते (३६·६ टक्के) स्त्री-पुरुष शेतमजुरांना समान मजुरी असावी. स्त्रियाही पुरुषांच्या बरोबरीने राबतात. विनाकारण कमी मजुरी कां द्यावी ? असाही त्यांनी प्रतिप्रश्न केला. मात्र शेतमालक याला सहजासहजी तयार होणार नाही हेही त्यांनी जाणवून दिलं. कायदा केल्यावरही मजुरी वाढवून देण्याची शक्यता नाही असेही मत त्यांनी मांडले. यावरून बहुसंख्य महिलांना समान वेतन ही कल्पना अयोग्य व अव्यवहार्य वाटली. कायद्याविषयीचे अज्ञान असल्याचे कारण सांगताना त्यांच्या मते, कायदा केला असेल पण जोपर्यंत आमच्या गावात तो अमलात आणला जात नाही, तोपर्यंत आम्हांला तो कळणार कसा? असा दावा त्यांनी केला. म्हणजे कायद्या विषयीचे अज्ञान, पुरुषांचे कामाचे बाबतीत स्त्रियांपेक्षा उच्च स्थान व शेतमालकाचे वर्चस्वाची जाण त्यांच्या विचारात दिसून येते.

## १२. ग्रामपंचायतीत स्त्रीसभासदांचे स्थान

मडिलगे खुर्द सारख्या ग्रामीण भागात स्त्रियांचा सामाजिक दर्जा निम्नस्तराचा असलेला तीव्रतेने जाणवतो. मडिलगे खुर्दचा कारभार पाहण्यासाठी ग्रामपंचायत आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये पक्षपद्धतीला फारसे स्थान नाही. वैयक्तिक प्रतिष्ठेवर निवडणुका जिंकल्या जातात. ग्रामपंचायतीमध्ये दलित व स्त्री सभासद असतानाही व ग्राम विकासासंबंधी ठराव पास करतानाही त्यांना विचारले जात नाही. स्त्री सभासद सभेला हजर राहत नाही असे दिसून आले. ९३·९ टक्के महिलांच्या मते (७६) स्त्री सभासदाला कारभारातले काय कळणार? तेव्हा उपस्थित राहून भाग घेण्याची गरज वाटत नाही असे मत मांडले. बाकीचे मेंबर बघतात. आपण भानगडीत कशाला पडायचं ? त्यांच्या त्यांच्यात घड मेळ नाही तर बायकांनी जाऊन काय साधणार? असे विचार मांडले. उरलेल्या ६ महिलांनी सांगितले की, स्त्री सभासदाने सभेला हजर राहायला पाहिजे. ग्रामपंचायतीच्या सभासद यादीच्या पाटीवर एवढं नाव लिहिलंय तर मग हजर राहून नुसतं ऐकायला काय जातंय? मग स्त्री सभासद असून तरी काय उपयोग ? फार तर नवऱ्यालाही बरोबर घेऊन जावं असे विचार मांडले.

अशा तऱ्हेने स्त्री सभासद केवळ नावापुरते, दलितांची तीच स्थिति. दलित सभासद पायरीवर बसून घेतलेल्या निर्णयाला संमति देतात. अशा रितीने राजकारणात स्त्रियांनी पडू नये ते त्यांना जमण्यासारखं नाही अशी एकंदरीत विचारसरणी दिसली.

## समारोप

गावातील सामाजिक परिस्थिति फारशी बदललेली नसल्याने महिलांच्या दृष्टिकोनात व विचारसरणीत कसलाही बदल झालेला आढळून येत नाही. स्त्रियांचा सामाजिक दृष्ट्या असलेला गौण दर्जा, अर्थोत्पादनाच्या दृष्टीनेही त्यांच्या कामाचे अवमूल्न, त्यांची परंपरागत अशिक्षित व अत्यल्प शिक्षित परिस्थिति यांमुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या २७ वर्षांच्या काळात त्यांच्या विचारसरणीत फारसा बदल आढळून येत नाही.

ग्रामीण समाजाची अभिवृत्ति व सांस्कृतिक घडण यांत कोठेही आधुनिकतेचा शिरकाव नाही. जात, धर्म, रूढि व परंपरेचा अधिक प्रभाव महिलांच्यावर झालेला जाणवतो. औद्योगीकरणाचा व शहरी संपर्काचा अभाव; राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने झालेल्या परिवर्ताची मंद गति यांमुळ त्यांच्या विचारसरणीत मागासलेपणा आढळतो. औद्योगीकरण व शहरीकरण यांमुळ होणारे संस्कार मडिलगे खुर्दच्या महिलांच्या पर्यंत किंवा गावापर्यंत पोचले नाहीत. धर्मनिरपेक्षता, स्त्रियांचा सामाजिक दर्जा, लोकशाही, शिक्षणाचे महत्त्व ही आधुनिक मूल्ये अजूनपर्यंत खेड्यापर्यंत पोचलेली नाहीत. ग्रामीण जीवन, धार्मिक अंधश्रद्धा व अविकसित राहिल्याचे त्यांच्या विचारसरणीतून स्पष्टपणे जाणवते. सामाजिक, राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या देशात व समाजात होत असलेल्या बदलाची पुसटशीही जाणीव त्यांना दिसत नाही. खेडे स्थितिशील आहे व स्त्री हा खेड्यातील घटक त्याहूनही स्थितिशील राहिलेला आहे असेच म्हणावे लागेल.

भारतीय नियोजनातील नवे तंत्र—नवी संकल्पना

# रोलिंग प्लॅन

**प्रा. शि. यु. पाटील**
नूतन मराठा कॉलेज, जळगाव.

आजकाल जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी जलद आर्थिक विकासाठी नियोजनाचा स्वीकार केला आहे. देशातील साधनसामग्री संघटित करून तिचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन ठरलेली सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आखण्यात आलेला मार्ग किंवा पद्धति म्हणजे नियोजन असा आपण सर्व साधारणपणे अर्थ लावतो. नियोजन म्हणजे राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे साधन. त्या साधनाचा वापर जितक्या चांगल्या पद्धतीने केला जाईल तितक्या चांगल्या प्रमाणात राष्ट्र विकास आणि समृद्धीकडे वाटचाल करते.

नियोजनाची कल्पना भारताला अगदीच नवीन नाही. १९३४ मध्ये सर एम्. विश्वेश्वरअय्या यांनी भारताच्या नियोजनाची कल्पना सर्व प्रथम मांडली. १९३५ मध्ये कॉंग्रेस पक्षाने कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मार्गदर्शनाखाली वैचारिक दृष्टिकोनातून नियोजनाच्या तात्विक बैठकीचा पाया घातला. त्याच काळात भांडवलशाही विचारप्रणालीची 'मुंबई योजना' (Bombay Plan) समाजवादी तत्त्वाशी निगडित मानवेन्द्र रॉय यांची 'जनता योजना' (Peoples' Plan) त्याचप्रमाणे गांधी तत्त्वज्ञानावर आधारित श्रीमन्नारायण यांनी मांडलेली 'गांधीयोजना' (Gandhi Plan) इ. अनेक विचार मांडले गेले.

## भारतीय नियोजनाचा आढावा

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपली अर्थव्यवस्था आर्थिक वावटळीत सापडली होती. तिला ह्या वावटळीतून सहीसलामतपणे बाहेर काढण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेला सुरवातीच्या काळात स्थिर स्थावर करण्यासाठी १९५१ मध्ये नियोजनाला सुरुवात झाली. नियोजन ही एक दीर्घकालीन प्रक्रिया असल्यामुळे आपण ती प्रक्रिया टप्प्याटप्प्यांमध्ये विभागून पंचवार्षिक योजना सुरू केल्या आहेत. परंतु समाजातील आर्थिक विषमता दूर करण्याच्या दृष्टीने ह्या योजनांनी आपला अपेक्षाभंग केला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेतीतील उत्पादन अपेक्षेप्रमाणे वाढल्यामुळे आपण १९५६ मध्ये दुसरी पंचवार्षिक योजना आखताना औद्योगिक उत्पादनात वाढ घडवून आणणे आणि समाजवादी समाजरचना प्रस्थापित करणे या उद्दिष्टांवर अधिक जोर दिला. पण या काळात नैसर्गिक आपत्ति, किमतवाढ, परकीय चलनांची चणचण यांसारख्या गोष्टींना तोंड द्यावे लागल्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत बनले आणि गरीब अधिक गरीब झाले. अशा वातावरणातच १९६१ मध्ये स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने तिसरी पंचवार्षिक योजना हाती घेतली गेली. पण या योजनेच्या काळात दोन परकीय आक्रमणे आणि आर्थिक आपत्ति यांना तोंड द्यावे लागल्यामुळे आपली उद्दिष्टे साध्य होऊ शकली नाहीत. १९६३ च्या सुमाराला नियोजनाला सुट्टी द्यावी असा विचार मांडला जाऊ लागला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडात अर्थव्यवस्थेवर मंदीची छाया पसरल्यामुळे ?

नंतरच्या काळात आपण पंचवार्षिक योजनेनंतर तीन वर्षांपर्यन्त पंचवार्षिक योजनांना रामराम ठोकला. आणि १९६९ पर्यन्त वार्षिक योजना सुरू केल्या. त्यानंतर थोडी स्थिर स्थावर झाली. आणि पुन्हा चौथी पंचवार्षिक योजना जोमाने सुरू केली.

चौथ्या पंचवार्षिक योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे आपण प्रथमच स्थानिक पातळीवरून नियोजन (Planning from Below) हे धोरण स्वीकारले, त्यामुळे नियोजनाच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया देशात सुरू झाली. जिल्हा पातळीवरील नियोजन (District Planning) या धोरणामुळे समतोल विकासाच्या दृष्टीने पाऊल उचलले गेले होते. पण या योजनेच्या काळात पुन्हा नैसर्गिक आपत्ति आणि बांगला देश युद्ध यांना तोंड द्यावे लागल्यामुळे आपण स्वावलंबनाच्या दृष्टीने वाटचाल करू शकलो नाही. चौथ्या पंचवार्षिक योजनेनंतर आर्थिक विकास जलद गतीने वाढवून आर्थिक विषमता दूर करण्याच्या दृष्टीने रोजगाराभिमुख पाचवी पंचवार्षिक योजना आपण आखली पण ती गर्भावस्थेतच मरण पावली. अशी काहींनी त्या संदर्भात केलेली टीका आज रास्त वाटू लागली आहे.

थोडक्यात, आपल्याला असे सांगता येईल की, आपण पाच पंचवार्षिक आणि तीन वार्षिक योजना स्वीकारूनही राष्ट्रातील दारिद्र्य, बेकारी आणि आर्थिक विषमता ह्या प्रमुख समस्या सोडवू शकलो नाही. आतापर्यन्त आपण ज्या अनेक योजना पार पाडल्या त्या लवचीक स्वरूपाच्या नव्हत्या. कारण एकदा योजना आखली की ती पूर्ण करणे एवढेच आपले काम असायचे. मध्यंतरीच्या काळात अर्थव्यवस्थेत जर काही स्थित्यंतरे घडवून आली तर त्यांचा विचार योजनांच्या बाबतीत केला जात नसे. म्हणूनच आपण जागतिक अर्थव्यवस्थेत मानाचे स्थान प्राप्त करू शकलो नाही असे म्हणावे लागते.

## नवे सरकार–नवा प्रयोग

मार्च १९७७ मध्ये केंद्र सरकारात काँग्रेस पक्षाचा प्रथमच पराभव करून जनतापक्षाचे सरकार आले. त्यांनी देशातील मूलभूत समस्या दूर करण्याच्या दृष्टीने आणि बदलत्या परिस्थितीनुरूप नियोजनात सुसूत्रता निर्माण करण्याच्या दृष्टीने एक नवीन पायंडा घालण्याचे ठरविले आहे. तो पायंडा म्हणजे 'रोलिंग प्लॅन' होय.

## रोलिंग प्लॅन म्हणजे काय ?

भारताच्या नियोजन मंडळाने भारतीय आर्थिक इतिहासात पहिल्यांदाच 'रोलिंग प्लॅन' (Rolling Plan) किंवा 'रोल–ऑन–प्लॅन' (Roll on Plan) ही संकल्पना मांडली. ही संकल्पना एखाद्या विशिष्ट राजकीय किंवा आर्थिक ध्येयप्रणालीशी बांधलेली नसून स्वतंत्र आहे. ही कल्पना जरी आपल्याला नवीन असली तरी जगात पोलंडमध्ये आणि फ्रान्समध्ये निदर्शक नियोजनाच्या (Indicative Planning) बाबतीत प्रचलित आहे.

रोलिंग प्लॅन म्हणजे भविष्यकाळातील समस्यांचा विचार करून परिस्थितीनुसार नियोजनात योग्य ते फेरबदल घडवून आणणे, रोल–ऑन–प्लॅन हा भविष्याच्या काळपटावर पुढे पुढे सरकत जाणारा असल्यामुळे त्याला 'सरकती योजना' असेही काही अर्थशास्त्रज्ञ म्हणतात, तर काही तज्ज्ञांच्या मते राष्ट्रापुढील बदलत्या समस्यांचा परिस्थितीनुरूप विचार करणारे हे तंत्र असल्यामुळे याला 'लवचीक योजना' म्हणावे. काही मंडळी तर याला 'फिरती योजना' असेही म्हणत आहेत. त्यामुळें सर्वसामान्य माणूस या संकल्पनेच्या बाबतीत गोंधळात पडला आहे असे म्हणायला हरकत नाही. वास्तविक प्रत्येक देशात बदलत्या परिस्थितीनुसार राष्ट्रापुढील समस्या सोडविणे हे नियोजनाचे प्रमुख उद्दिष्टच असते, नेमका हाच प्रमुख विचार या नवीन तंत्रामध्ये दिसून येतो. म्हणून रोलिंग प्लॅन म्हणजे "नियोजनात परिस्थिति सापेक्ष लवचीकपणा आणून ते वास्तवतेशी अधिक जुळते करून घेणे होय." असे आपल्याला म्हणता येईल.

## कार्यवाही

रोलिंग प्लॅनच्या बाबतीत आपल्या सरकारचा अंतिम आराखडा जरी प्रकाशित झालेला नसला तरी त्याचे स्वरूप साधारणपणे असे असेल की पाचवी पंचवार्षिक योजना एक वर्ष आधी संपवून १ एप्रिल १९७८ पासून नव्यानेच पंचवार्षिक योजना हाती घेतली जाईल. परंतु

ही पंचवार्षिक योजना आतापर्यंत पार पाडलेल्या पंचवार्षिक योजनांप्रमाणे असणार नाही. तर १ एप्रिल १९७९ रोजी वर्षभरातील नियोजनाचा आढावा घेऊन पुन्हा अग्रक्रम बदलले जातील. परन्तु १९७९ मधील योजनेची उद्दिष्टे आणि तिचे स्वरूप हे त्यापुढील पाच वर्षांसाठी असेल म्हणजेच यापुढील कोणतेही एक वर्ष कोणत्या तरी पंचवार्षिक योजनेत येणार आणि प्रत्येक पंचवार्षिक योजना अखंडपणे चालू राहणार म्हणजेच आता यापुढे आपल्या देशात सहावी किंवा सातवी पंचवार्षिक योजना असणार नाही.

काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते अशा प्रकारच्या रोलिंग प्लॅनला वार्षिक योजना (Annual Plan) दूरदर्शीपणा ठेवून स्वीकारलेली किंवा यथार्थ पंचवार्षिक योजना (Perspective Five year Plan) आणि दीर्घकालीन यथार्थ योजना (Long Term Perspective Plan) असेही म्हणता येईल. कारण अशा प्रकारची योजना वास्तवतेशी नेहमीच जुळवून घेणारी असल्यामुळे यथार्थ म्हणणे उचित ठरते. आणि अशा योजनेचा निश्चित स्वरूपाचा कायम स्वरूपी कालखंड ठरविता येत नसल्यामुळे 'तिला दीर्घकालीन यथार्थ योजना' असेही म्हणणे योग्य होईल. रोलिंग प्लॅन ही एक वास्तववादी, सहेतुक आणि व्यवहार्य संकल्पना असून ती भारतीय नियोजनात गतिशीलता आणि कौशल्य निर्माण करील.

"रोलिंग पिन" म्हणजे लाटणे हे सगळ्यांना माहीत आहे. पोळ्या करताना ज्याप्रमाणे पोळी सगळीकडे सारखी करता यावी आणि तिला चांगला आकार प्राप्त व्हावा यासाठी आपण लाटणे वापरतो त्याचप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रातील समस्यांचा जाणीवपूर्वक अभ्यास करता येऊन समतोल विकास प्रस्थापित करता यावा हीच प्रमुख भूमिका या संकल्पनेत अंतर्भूत आहे असे म्हणावयाला हरकत नाही.

## 'रोलिंग प्लॅन' नव्या तंत्राची उद्दिष्टे

रोलिंग प्लॅन किंवा सरकती योजना ह्या संकल्पनेचा अधिकृत तपशील जरी अजून कळलेला नसला, तरी सर्वसाधारणपणे या नवीन नियोजन तंत्राची काही ठळक उद्दिष्टे आपल्याला सांगता येतील.

(१) राष्ट्राचे आर्थिक प्रकृतिमान सुधारण्यासाठी उपलब्ध साधनसामग्रीचा पुरेपूर वापर करून त्यांचा लक्ष्यांशी (Targets) योग्य तो मेळ घालणे.

(२) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करून, राज्य सरकारांशी चर्चा करून अग्रक्रम निश्चित करणे.

(३) ग्रामीण विकासाच्या धोरणाशी सुसंगत धोरण आखून नियोजनाच्या अंमलबजावणीपूर्वी मुळीच वेळ न दवडता 'खेड्यांचा समूह' (a group of villages) हे युनिट मानणे. थोडक्यात अगदी खालपासून नियोजन (planning from below) स्वीकारणे.

(४) शेती आणि ग्रामीण उद्योगधंद्यांचा विकास करून रोजगारनिर्मिति करणे.

(५) राष्ट्रात समतोल विकास प्रस्थापित करून आर्थिक विषमता दूर करणे.

अशा प्रकारे आपल्याला सरकत्या योजनेची काही ठळक उद्दिष्टे थोडक्यात सांगता येतील.

## रोलिंग प्लॅनची आवश्यकता

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण नियोजनाद्वारे आपल्या राष्ट्रातील मूलभूत समस्या सोडवून जलद विकास घडवून आणण्यासाठी पंचवार्षिक योजना स्वीकारल्या. विकासाचे कार्यक्रम आखताना पाच वर्षांचा कालखंड प्रमाणभूत मानून लक्ष्ये (Targets) ठरवून त्याप्रमाणे ती गाठण्यासाठी कार्यक्रमांची आखणी केली. तसेच साधनसामग्रीची उभारणी करण्याचा खटाटोप केला. पण प्रत्येक वेळी नैसर्गिक अशा अडचणी येतच गेल्या. कधी अतिवर्षण, अवर्षण, कच्च्या मालाचा तुटवडा, विजेची टंचाई, कधी परकीय आक्रमण तर कधी परकीय चलनांची चणचण, काही वेळा निर्वासितांचा लोंढा यांसारख्या अनेक अडचणींमुळे पहिली पंचवार्षिक योजना काही प्रमाणात वगळता कोणतीच पंचवार्षिक योजना अपेक्षेप्रमाणे सफल होऊ शकली नाही. बऱ्याच वेळा आपले अग्रक्रम चुकल्यामुळेही समतोल विकास बाजूलाच राहिला. आपण आतापर्यंत आर्थिक नियोजनावरच जास्तीत जास्त भर दिला आणि वस्तुनिष्ठ नियोजनाच्या (Physical Planning) दृष्टीने कार्यक्रमांची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे उत्पादन आणि चलन-

पुरवठा यांत मेळ बसला नाही म्हणून महागाईने रुद्रावतार धारण केलेला दिसून येतो. खरे म्हणजे आपण पहिल्या पंचवार्षिक योजनेत लोकसंख्या-नियंत्रणालाच अग्रक्रम द्यायला हवा होता. पण तो न दिल्यामुळे आपण गेल्या तीस वर्षांत जो काही थोडा विकास केला तो या वाढत्या लोकसंख्येने खाऊन टाकला.

आतापर्यंत आपण सुरुवातीला पाच वर्षांची एक योजना आखली की आपली जबाबदारी संपली. मग नंतर ५ वर्षांनंतर नियोजनाच्या आखणीच्या दृष्टीने पावले उचलली जात; त्यामुळे मध्यंतरीच्या काळात उद्भवणाऱ्या आकस्मिक घटनांच्या परिणामांचा विचार नियोजनात केला जात नव्हता. म्हणून आतापर्यंतच्या योजना अव्यवहार्य ठरत होत्या असे काही अंशी म्हणायला हरकत नाही. आतापर्यंतच्या योजनांचे स्वरूप स्थिर अचल होते. त्यामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण आपल्याला करता येत नव्हते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात याचे प्रत्यंतर आपल्याला अधिक प्रकर्षाने दिसून आले. म्हणूनच तिसऱ्या पंचवार्षिक योजनेनंतर आपल्याला वार्षिक योजनांचा पाठपुरावा करावा लागला. त्यानंतर चौथी पंचवार्षिक योजना आपण कशी तरी पार पाडली. नंतरच्या काळात या सर्व घटनांमुळे आपल्या अर्थव्यवस्थेचे कंबरडे इतके मोडले होते की आपण बँडेज बांधून समाधान मानीत होतो. परंतु त्यामुळे मधली हाडे मात्र कुजू लागली. म्हणूनच ती हाडे मजबूत करण्यासाठी भारताचे पंतप्रधान श्रीयुत मोरारजी देसाई यांनी 'रोलिंग प्लॅन' हे टॉनिक द्यायचे ठरविले आहे.

खरे म्हणजे काळ कोणासाठी कधी थांबला आहे काय ? मग भारतीय अर्थव्यवस्थेसाठी तो कशाला थांबेल ? हल्लीच्या गतिशील (Dynamic) विलक्षण धावत्या काळाशी जमवून घ्यायचे असेल तर आपल्या नियोजनविषयक उद्दिष्टांची सारखी फेरतपासणी करीत राहणे आवश्यक आहे. तसेच बदलत्या परिस्थितीच्या अनुरोधाने भविष्यकालीन उद्दिष्टेही बदलत रहावीत आणि या नव्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठीच 'सरकती योजना' या तंत्राचा स्वीकार करणे अवश्य आहे.

मार्च १९७७ मध्ये केन्द्र सरकारात जनता पक्षाचे सरकार अधिकारारूढ झाल्यावर त्यांनी गांधीवादी अर्थशास्त्र प्रमाणभूत मानून भारतीय अर्थकारणाला नवी दिशा दाखविली आहे. त्यांनी स्वावलंबन, रोजगारवृद्धि, दारिद्र्यनिर्मूलन, अस्पृश्यतानिवारण, दारूबंदी इ. अनेक उद्दिष्टांना आपल्या अर्थकारणात प्राधान्य दिले आहे. म्हणून नव्या आर्थिक धोरणाला अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने भारताच्या पंतप्रधानांनी भारतीय नियोजनाला नवे स्वरूप दिले आहे.

## अवास्तव टीका

रोलिंग प्लॅन ह्या नव्या संकल्पनेबाबत अनेक क्षेत्रांतील नामवंत मंडळी उलटसुलट मते व्यक्त करीत आहेत. विरोधी पक्षाने (काँग्रेसने) याबाबत असे म्हटले आहे की जनता सरकारने या कल्पनेचा स्वीकार करून नेहरूंनी घातलेल्या नियोजन कल्पनेचा पायाच उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. परंतु त्यांनी असे मत मांडताना रोलिंग प्लॅन अव्यवहार्य आणि अदूरदर्शी कोणत्या बाबतीत आहे याचे स्पष्टीकरण मात्र दिलेले नाही. काहींच्या मते ही योजना स्वीकारून प्रगतीचे काटे उलटे फिरविण्याचाच हा मार्ग आहे. पण या टीकेत काही तथ्य दिसत नाही. भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी 'रोलिंग प्लॅन' स्वीकारणे म्हणजे सतरंजी गुंडाळण्याप्रमाणे नियोजन गुंडाळून ठेवण्याचाच हा प्रकार आहे असे म्हटले आहे. पण त्यांचा हा विचार त्यांनी राजकीय दृष्टिकोनातून मांडला असावा असे म्हणायला हरकत नाही. कारण नवीन नियोजनतंत्राचा स्वीकार करणे म्हणजे संपूर्ण नियोजनालाच 'तिलांजली' देणे असे कधी होत नाही.

या संकल्पनेवर जरी अनेक टीका करण्यात येत असल्या तरी भारतीय नियोजनात काहीतरी नावीन्य हवे ही जनतेची मागणी रास्त आहे. कारण गेल्या ३० वर्षांत आपल्या देशातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी पूर्वीचे नियोजनतंत्र बहुवंशी अपयशी ठरले आहे, म्हणूनच काही नामवंत अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ तसेच नियोजन मंडळाचे सदस्य, प्रा. राजकृष्ण आणि श्री. राजाध्यक्ष यांनी सुद्धा या नवीन दृष्टिकोनाचे समर्थन केले आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीत मागणी व पुरवठा, उत्पादन व उपभोग यांची छाननी करून उत्पादन कोठे वाढविण्याची किंवा कमी करण्याची आवश्यकता आहे हे पाहिले पाहिजे. त्या

संदर्भात निर्णय घेण्यासाठी एका वर्षातील उत्पादन आणि मागणीविषयीची आकडेवारी उपयुक्त ठरू शकेल. काही टीकाकार असे म्हणतात की या नवीन नियोजन-तंत्राचा स्वीकार केल्यामुळे ज्या उत्पादनक्षेत्राला दीर्घ-काळ लागतो (Long Gestation Period) अशी क्षेत्रे कदाचित बंदच पडतील. त्यामुळे देश अधिक परावलंबी होण्याची दाट शक्यता आहे. परंतु या संदर्भात नियोजन मंडळाचे सदस्य प्रा. राजकृष्ण यांनी सांगितले आहे की रोलिंग प्लॅनमध्ये निर्णय घेताना ज्या प्रकल्पांना दीर्घकाळ लागेल असे प्रकल्प पुढेही तसेच चालू राहतील. खऱ्या अर्थाने विचार केला तर नियोजनाचे हे तंत्र दूरदर्शीपणा ठेवूनच स्वीकारण्यात आलेले असल्यामुळे मोठ्या आणि अवजड उद्योगधंद्यांना ते मारक ठरणार नाही.

## भरभराटीला उपयुक्त

या संकल्पनेवर जरी अनेक टीका करण्यात येत असल्या तरी या संकल्पनेचा स्वीकार केल्यामुळे देशाचे आर्थिक चित्र बदलणार एवढे निश्चित. कारण वेळोवेळी बदलत जाणाऱ्या परिस्थितीचा विचार करून आता उद्दिष्टांना अग्रक्रम दिला जाणार आहे. या नियोजन पद्धतीचा दुसरा फायदा म्हणजे अंदाजपत्रक आणि नियोजन या दोहोंमध्ये साहचर्य असणार आहे. तसेच या तंत्रामुळे नियोजन मंडळाला नियोजन प्रकल्प आणि खर्च यावर योग्य ते नियंत्रण ठेवता येणार आहे. दर-वर्षाचे नियोजन स्वतंत्र रीत्या दूरदर्शीपणा ठेवून केले जाणार असल्यामुळे शेती उत्पादन, औद्योगिक उत्पादन आणि इतर क्षेत्रांतील बदल, परकीय मदत, अवास्तव भाववाढ इ. गोष्टींचा काळजीपूर्वक विचार करता येईल. त्याप्रमाणे आर्थिक वर्षातील उपलब्ध साधन-सामग्रीच्या आधारे उद्दिष्टांमध्ये (Targets) वास्तव-वादी दृष्टिकोनातून फेरफार घडवून आणता येतील. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील अवास्तव चलनवाढीचा दाब आपल्याला कमी करता येईल म्हणून त्या दृष्टीने नियोजनाचे हे नवीन तंत्र भारतीय अर्थव्यवस्थेच्या भरभराटीच्या दृष्टीने (Prosperity) उपयुक्त आहे असे म्हटले तर ते अनुचित ठरणार नाही.

'सरकती योजना' हे तंत्र स्वीकारल्यामुळे नियोजन मंडळाला नियोजनाचा आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने नेहमीच कार्यरत राहावे लागेल. त्यासाठी नियोजन प्रकल्प, उत्पादन, किंमती यांतील फेरबदल नियोजन मंडळाला नेहमीच लक्षात घ्यावे लागतील. म्हणजे या पद्धतीमुळे भारतीय नियोजनातील ताठरपणा (Rigidity) बऱ्याच प्रमाणात कमी करता येईल असे म्हणायला हरकत नाही.

## यशापयश

भारतातील सध्याचा काळ अनेक दृष्टींनी सर्वच क्षेत्रांतील क्रांतीसाठी उपयुक्त आहे. आज आपल्या देशात पूर्वी कधी नव्हे एवढ्या मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याचा आणि परकीय हुंडणावळीचा साठा उपलब्ध आहे. म्हणून हा काळ ही पद्धति स्वीकारायला योग्य आहे असे म्हणायला हरकत नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे एखादे नवीन तंत्र किंवा पद्धति स्वीकारल्यानंतर ते कितपत फायदेशीर ठरेल यासाठी काही काळ वाट पाहणे आवश्यक आहे. अर्थात् दरवर्षासाठी कार्यक्रमाची आखणी करायची म्हटल्यावर साधनांची उपलब्धता, वितरणपद्धति, वस्तूंच्या किंमती, मागणी इ. क्षेत्रांवर नियोजन मंडळाला बारकाईने लक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी सरकारी यंत्रणा अधिकाधिक कार्यक्षम असली पाहिजे.

त्याचप्रमाणे नियोजनाच्या तपशिलात बदल होत राहावा हे मान्य आहे. परंतु असे बदल करीत असताना नियोजनाची मूलभूत चौकट बदलता कामा नये. रोलिंग प्लॅन म्हणजे दरवर्षी उद्दिष्टांमध्ये बदल केलाच पाहिजे असे नसून बदल करण्याची आवश्यकता भासल्यास तशी संधि उपलब्ध आहे. एवढाच अर्थ या संदर्भात आपण घेतला पाहिजे.

नवीन नियोजन पद्धतीचे यश हे प्रामुख्याने नियोजनाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्याचबरोबर इतर आर्थिक प्रवृत्तीत बदल घडवून आणण्यासाठी आपण उपलब्ध साधनसामग्री आणि तंत्रपद्धति व तांत्रिक ज्ञान यांचा वापर कशा प्रकारे करतो यावर अवलंबून असेल. नियोजन म्हणजे आर्थिक धोरण आणि तात्कालीन व्यवहार यांत मेळ घालण्याचा यशस्वी प्रयत्न असतो. त्या दृष्टीने नियोजन मंडळाला हे कितपत जमते यावर त्याचे यश अवलंबून असणार हे निश्चित.

(पृ. २२ कॉ. २ वर)

# केंद्रीय अर्थसंकल्प

## १९७८-७९

लेखक : श्री. सिद्धार्थ गुप्त

इ. स. १९७८–७९ या नव्या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. या अंदाजपत्रकाचा संपूर्ण आवाका लक्षात घेतल्यास देशातील विद्यमान आर्थिक परिस्थिति, भावी प्रगतीसंबंधीची रूपरेषा या व इतर महत्त्वाच्या गोष्टी सर्वसामान्य नागरिकास समजून घेता येतील. कुटुंब प्रमुखाला अथवा गृहिणींना, कोणत्या गोष्टी या वर्षी महाग होतील किंवा स्वस्त होतील याचाही अंदाज घेऊन आपल्या घरच्या वार्षिक अंदाजपत्रकाची आखणी करण्यास उपयुक्त माहिती मिळू शकते. देशाच्या अर्थसंकल्पाकडे डोळे लावून बसणारे आणखीही असंख्य महाजन आहेत. त्यांत बडे कारखानदार, कंपन्या, बँका, लघु-उद्योजक, इतर उत्पादक आणि कारागीर, त्याचप्रमाणे घाऊक आणि किरकोळ व्यापारी इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होतो.

### करवाढीचा परिणाम

अंदाजपत्रक प्रसिद्ध झाले म्हणजे कोणत्या वस्तूंवर सरकारने नवे कर बसविले याची आतुरतेने माहिती मिळविण्यास उत्पादक आणि व्यापारी उत्सुक असतात. समजा, टीव्हीवर किंवा सिगरेट वा तंबाखूवर असलेले कर वाढल्यास, टीव्हीच्या उत्पादनाचा खर्च वाढतो आणि तो अखेरीस टीव्हीच्या ग्राहकाकडूनच वसूल करावा लागतो. घाऊक व्यापाऱ्यांनी बजेटपूर्व किंमतीत माल खरेदी केला असल्यास, बजेटनंतरच्या सुधारित चढ्या किंमतींना विकून त्यांना व्यापारी स्वरूपाचा नफा मिळू शकतो. कर वाढल्यास किंमत वाढवावी लागते आणि किंमती वाढल्यास त्याचा प्रतिकूल परिणाम मालाच्या विक्रीवरही सामान्यतः होत असतो. त्या दृष्टीने नवे कर वाढले म्हणजे एक प्रकारे उत्पादकांची चिंता देखील वाढत असते.

### जमाखर्चाचा अभ्यास

कंत्राटदार, ठेकेदार, कारखानदार, व्यापारी संस्था, शिक्षणसंस्था अशा सर्व प्रकारच्या संस्थांच्या चालकांना अंदाजपत्रकाचा एका वेगळ्या कारणाकरिता अभ्यास करावा लागतो. सरकार नव्या वर्षात कोणत्या बाबीवर किती खर्च करणार आहे, हे समजून घेणे आवश्यक असते. समजा, धरण आणि वीज-पुरवठा या कारणी, सरकार अधिक खर्च करणार असल्यास धरणाला लागणारी यंत्रसामुग्री, तसेच विजेचे ट्रान्समिशन टॉवर यांची मागणी वाढते. शिक्षणावरचा केंद्रीय खर्च वाढल्यास कॉलेजे, संशोधन संस्था इत्यादींना अधिक प्रमाणावर अनुदान मिळू शकते. कुटुंब कल्याणावर खर्च वाढविल्यास त्याला आवश्यक असलेली प्रतिबंधक साधने उत्पादन करणाऱ्या संस्थांना लाभ मिळतो.

अंदाजपत्रकाचा संबंध करांशी निकटचा आहे. नव्या अंदाजपत्रकात तूट असली म्हणजे इन्कमटॅक्स वा संपत्ति

कर वाढविला असल्यास, तसेच वस्तु-कर वाढविले असल्यास कर देणाऱ्यांवरील बोजा वाढत असतो. चार्टर्ड अकौंटंटना त्यांच्या व्यवसायाकरिता अर्थसंकल्पाचा चिकित्सक अभ्यास करून संबंधित व्यक्ति आणि कंपन्यांना मार्गदर्शन करावे लागते.

या सर्व प्रकारच्या नागरिकांनी आणि संस्थांनी अर्थसंकल्पाची 'नेमकी' माहिती करून घेण्याच्या उद्देशाने एकूण बजेटमधील जमा बाजू आणि खर्च बाजू प्रथम लक्षात घेतली पाहिजे.

## यंदाचे जमाखर्चाचे आकडे

मागील वर्षाच्या म्हणजे १९७७–७८ च्या बजेटमध्ये जमेच्या बाजूस एकूण १५,४८४ कोटी रुपये होते तर खर्चाच्या बाजूस अंदाजी १५,५६८ कोटी रुपये होते. संकल्पीय तूट फक्त ८४ कोटी रुपयांची होती. पण वर्षाच्या अखेरीस जो सुधारित अंदाज आहे, त्याप्रमाणे ही तूट ९७५ कोटी रुपयांपर्यंत वाढली.

चालू वर्षी म्हणजे १९७८–७९ या वर्षात जमेच्या बाजूस १७०२१ कोट रुपये असून खर्चाच्या बाजूस १८४१७ कोट रुपये अंदाजी आहेत. म्हणजे या वर्षीची सर्वसाधारण तूट १३९६ कोट रुपयांची असून त्यातील ३४६ कोट रुपयांची भरून निघण्याची अपेक्षा असल्यामुळे निव्वळ तूट १०५० कोट रुपयाची राहणार आहे. थोडक्यात म्हणजे चालू वर्षी केंद्रीय सरकारने सुमारे ३००० कोट रुपयांच्या रकमेची अधिक तरतूद केली असून त्याकरिता सुमारे १॥ हजार कोट रुपयांचा, कर इत्यादी मार्गांनी उत्पन्न वाढविण्याचा बोजा पत्करला आहे. मागील वर्षाचे बजेट तुटीचे नसल्यामुळे त्याचा सर्वसाधारण आर्थिक ताण सौम्य होता. मात्र या वर्षी सुमारे १००० कोट रुपयांचा तुटीचा संकल्प स्वीकारल्यामुळे कर, कर्ज आणि चलन यावरील ताण वाढेल हे उघड आहे.

| बजेटची जमा बाजू | कोटी रुपये | एकूण कर |
|---|---|---|
| उत्पादन कर (एक्साइज) | ४०३७ | |
| आयात निर्यात जकाती | १८६० | |
| कंपन्यावरील कर | १४५० | |
| आयकर | ३९९ | |
| इतर कर (संपत्ति इ.) | २८२ | ८०२८ |

| | | |
|---|---|---|
| कर्जवसुली | २३८६ | |
| कराव्यतिरिक्त उत्पन्न | २७५४ | |
| सरकारी कर्ज प्रॉ. फंड इ. | २३५८ | |
| परकीय कर्ज | ८३३ | |
| इतर जमा | १००८ | |
| तूट | १०५० | १०३८९ |

कर उत्पन्न ८,०२८ + कर्ज आणि इतर उत्पन्न १०,३८९ = १८,४१७ कोटी रु.

## ९० टक्के गरिबांवर भार

एकूण जमेपैकी ४४ टक्के वाटा करांचा असून कर्जवसुली, कर-व्यतिरिक्त उत्पन्न, कर्ज यांचे अनुक्रमे १३, १५ आणि १३ टक्के, असे वाटे आहेत. इन्कमटॅक्सचे उत्पन्न एकूण जमेच्या केवळ २ टक्केच आहे. कर उत्पन्नात सिंहाचा वाटा आहे. उत्पादन करांचा म्हणजेच वस्तूंवरील कराचा. देशातील गरीब मध्यमवर्गीयांची संख्या ९० टक्क्यांहून अधिक असल्यामुळे यांनाच नियोजन खर्चाचा भार उचलण्याकरिता सुमारे ४००० कोट रुपये वस्तूकर सोसून सरकारला द्यावे लागणार आहेत. शिवाय आयात–जकातींचा १८६० कोटी रुपयांचा भार वेगळा. या अप्रत्यक्ष करांनीच सर्वसामान्य माणूस रंजीस आला आहे. इन्कमटॅक्स आणि कंपनी टॅक्स वाढविण्यास वाव न राहिल्यामुळे नव्या बजेटमध्ये देखील केंद्रीय अबकारी करांचा बोजा वाढविणे नाईलाजाने भाग पडले आहे, असे दिसते. पण ते क्षम्य नाही.

## विकासासाठी अधिक खर्च

या जमेच्या बाजूचा विनियोग देशाच्या कल्याणासाठी तसेच विकासासाठी कशा प्रकारे होणार आहे हे करदात्याने जाणून घेतले पाहिजे.

| बजेटची खर्ची बाजू | कोटी रुपये | |
|---|---|---|
| शासकीय खर्च | | |
| संरक्षण | २९४६ | |
| व्याज-देणी | २०२८ | |
| राज्यांना अनुदाने | १०४९ | |
| इतर आवश्यक खर्च | १३५७ | ७३८० |
| विकास योजना खर्च | | |
| केंद्रीय योजना | ४५२० | |
| राज्यविकास योजना | २७६१ | |
| इतर विकास खर्च | ३७५६ | ११०३७ |

शासकीय खर्च ७३८० कोटी रु. +
विकास खर्च ११०३७ कोटी रु.
एकूण खर्च १८,४१७ कोटी रु.

खर्चाची बाजू लक्षात घेतल्यास ए६ टक्के रक्कम विकास कार्याकरिता आहे, ही मात्र अत्यंत समाधानाची आ९१ बाब असून, संरक्षण खर्चाची तसेच निम्न कीय खर्चाची योग्य त्या प्रमाणात का दिसते.

## योजना खर्च व उत्पादकांचे निर्णय

चालू वर्षी केंद्रीय नियोजनावर एकूण ४५२० कोट रुपये खर्ची पडणार असून राज्यांच्या विकासाकरिता २५४७ कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत. मागील वर्षापेक्षा या रक्कमा बऱ्याच वाढल्या आहेत. विशेषत: राज्याच्या वाट्याला या वर्षी अधिक धन मिळाले आहे. शिक्षणावर १०८ कोटी रुपये, वैज्ञानिक संशोधन १४५ कोटी रु. आरोग्य १४६ कोटी रु. व कुटुंब कल्याण ११२ कोटी रु. घरबांधणी ६३ कोटी रु. ग्रामीण पाणी पुरवठा ६० कोटी रु. शहर सुधारणा ४२ कोटी रु. आदिवासी हरिजन कल्याण २४ कोट रु. असे एकूण ७९४ कोटी रुपये सामाजिक सेवांकरता उपलब्ध होतील. सहकारी क्षेत्रास ८८ कोटी रुपये मिळाले असून कृषि क्षेत्रात एकूण ७८९ कोटी रुपये खर्ची टाकून त्यावर विशेष आणि योग्य भर देण्यात आला आहे.

## उद्योग क्षेत्रासाठी ९९० कोटी

खादी ग्रामोद्योगास ६५, हँडलूम २३, लघुउद्योग १८, इंजिनिअरिंग इंडस्ट्रिज ७६, पेट्रोल १३१, खते २३६, जहाज बांधणी २२, कोळसा २६०, लोखंड आणि पोलाद ५६३, लोहेतर धातू ५७, ग्राहकवस्तु १५२, अणुशक्ति ४५, असे एकूण उद्योग क्षेत्रास ९९० कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत. वीज निर्मितीकरता २०२, रेल्वे ३४३, पोस्ट २८, बंदरे ८४, नागरी विमान वाहतूक २०, रस्ते वाहतूक २० कोटी रुपये असे खर्चाचे वाटप झाले आहे.

बजेटमधील खर्चाचा विचार करता दुग्धव्यवसाय, मत्स्योद्योग, ग्रामीण विकास, ग्रामीण पाणीपुरवठा, वीज निर्मिति, पेट्रोल, कोळसा, पोलाद जहाज बांधणी या व्यवसायांना उपयुक्त असणारी साधनसामग्री तयार करणाऱ्यांना या वर्षी विशेष वाव आहे.

## करदात्यांना मार्गदर्शन

अंदाजपत्रकांत आयकर, कंपनीकर इत्यादि कर भरणाऱ्यांबाबतीत सौम्य धोरण स्वीकारले गेले आहे. कंपन्यांनी अधिक गुंतवणूक करावी, तसेच श्रीमंत वर्गाने बचत करून ती गुंतवावी या करिताही प्रेरणा अपेक्षित आहे. तथापि केंद्रीय उत्पादन कर, वीजकर, मूलभूत अबकारी करावरील जादा ५ टक्के अधिक कर पोस्ट दरात वाढ, कोळशावरील कर तसेच अनिर्देशित वस्तूंच्या अबकारी करात २ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत केलेली वाढ लक्षात घेता, या सर्वांचा बोजा उत्पादक आणि ग्राहकांवर वाढणार असून त्यामुळे वस्तु महागण्याची प्रवृत्ति सुरू होईल. आयात-निर्यात करातही वाढ झाल्यामुळे किंमती सौम्य होणे अशक्यच दिसते.

## काय महाग, काय स्वस्त होणार ?

दुधावरील तसेच दुग्ध पदार्थावरील कर सौम्य केल्यामुळे ते पदार्थ तसेच लहान कमी किंमतीचे टेलिव्हिजन आणि रेफ्रिजरेटर स्वस्त होतील. सोने थोडे स्वस्त होईल. सोन्याच्या किंमती फार भडकण्याची शक्यता कमी. आयकरांचे दर वाढविले नाहीत. कंपन्यांच्या करांचे दर बदलले नाहीत. कारखान्यांच्या मालकांनी त्यांच्या नोकरांना क्वार्टर्स बांधून देण्याकरिता उत्तेजन दिले आहे. जाहिरातीवरील उधळमाधळ कमी करावी या दृष्टीने निर्बंध घातल्यामुळे उत्पादन खर्च वाढणार नाहीत. साबण, डिटर्जंट पावडर, इत्यादि ६९ वस्तू तयार करणाऱ्या लघुउद्योजकांना सवलती दिल्यामुळे त्या वस्तू महागणार नाहीत. राज्य सरकारांनी सेल्स टॅक्स आणि ऑक्ट्रॉय कमी वा रद्द करावे असा प्रयत्न राहील. राज्यांनी जर हे मान्य केले तर वस्तूंच्या किंमती निश्चितपणे कमी होण्याचा संभव आहे (पण यातला 'जर' महत्त्वाचा आहे ! ) वृत्तपत्रे औषधे, पिकावरील औषधे इत्यादींवरील ड्युटी पार रद्द केल्यामुळे त्यांच्या किंमती आवाक्यात राहतील.

## वाढीव अबकारीचे परिणाम

या उलट विजेवरील आणि कोळशावरील कर वाढल्यामुळे उत्पादन खर्च प्रचंड प्रमाणावर आणि गुणाकार श्रेणीने वाढेल. पोस्ट, तार फोन इत्यादींचे दर वाढणार आहेत. त्यांचा बोजा वाढेलच. अबकारी

पादी क्र. ६८ मधील अनिर्देशित वस्तूंचे उत्पादनकर सरसकट वाढल्यामुळे अनेक वस्तूंच्या किंमती वाढतील. विशेषतः पेट्रोल, पेट्रोलचे पदार्थ, क्रूड, गॅस, वॅक्स, कोक, ग्रीस यांच्या किंमती वाढतील. कोळसा, लोखंड पोलाद स्टेनलेस स्टील, औद्योगिक वीज या महत्त्वाच्या बाबी महागल्यामुळे त्याचा परिणाम अवलंबून असलेल्या वस्तूंच्या किंमतीवर होईल. सेल्युलेज, नायलॉन, सिंथेटिक धाग्याचा वापर केलेले कापड मोठ्या मोटारीचे स्पेअर पार्टस, चहा, सिगार, चिरूट, बॅंडेड सिगरेट, वनस्पति टेलिव्हिजन चित्रपट इत्यादि वस्तू महाग होणार आहेत. घोड्यांच्या शर्यतीवर रु. २५०० पेक्षा जास्त बक्षीस मिळाल्यास ३४.५ टक्के कर द्यावा लागणार आहे.

## चालू वर्षाचे आर्थिक भविष्य

अर्थसंकल्प लक्षात घेता सर्वसाधारपणे खालील महत्वाची भाकिते करता येतील.

(१) विकासाचा वेग एकदम मंदावण्याची चिन्हे नाहीत.

(२) अनेक उद्योगांना त्यांचे उत्पादन, विक्री उलाढाल यात वाढ करण्यास वाव आहे.

(३) आयकर, कंपनीकर, प्रत्यक्षकर यांचा बोजा वाढविलेला नाही. त्यामुळे गुंतवणुकीस उत्साहवर्धक असे वातावरण राहील. नफ्याचे सर्वसाधारण प्रमाण वाढविता आले असते तर अधिक चांगले झाले असते.

(४) मालकत्ता कराची १ लाखापर्यंत मर्यादा उंचावल्याने मध्यम वर्गाला जाच नाही.

(५) सक्तीच्या ठेव योजनेची वर्गणी सौम्यपणे आणि योग्यपणे वाढविली आहे. त्याकरता तक्रार करण्याचे कारण नाही. देशातील बचत प्रमाण मात्र किंमतीच्या स्थिर पातळीवर अवलंबून असते. बचत प्रमाण कितपत वाढेल, शंका आहे.

(६) उत्पादनकर वाढल्यामुळे अप्रत्यक्ष करांचा फटका गरीब आणि सामान्यांना त्रासदायक होणार आहे. किंमत पातळी भाववाढीकडे झुकू लागेल यात शंका नाही.

(७) देशातील सध्याचे महत्वाचे प्रश्न चार :–

(१) औद्योगिक क्षेत्रात मागणी घटल्यामुळे मंदी आणि उत्पादन घसरणीला त्याचबरोबर बेकारी वाढलेली आहे. (२) किंमती पुन्हा वाढू लागल्या आहेत. (३) परदेशी चलनाचा साठा योग्यपणे गुंतवला न गेल्यास त्याचा विपरीत प्रभाव (४) अन्नधान्य उत्पादन आणि पुरवठा या प्रश्नांचा विचार करता हे बजेट समर्थपणे आणि योग्य दिशेने त्वरेने पावले उचलील, असे वाटत नाही. अर्थात बजेट म्हणजे काही सर्वस्व नव्हे. त्या करिता जनतेने आर्थिक आघाडीवर पूरक अशा सहकार्याचा कार्यक्रमही हाती घतला पाहिजे. * *

कर्जवसू
करावय

## (रोलिंग प्लॅन)

(पृ. १८ वरून)

## नियो\ सरक्रसतीची कामगिरी नको

भारत परव आपल्याला बऱ्याच वेळा असे दिसून येते की नियोजन इतर म्हणजे फुरसतीच्या वेळेतीलच कामगिरी आहे. कारण नियोजन मंडळाच्या बैठका या सुट्टीच्या दिवशीच होतात. चालू आर्थिक वर्षातील नियोजन मंडळाच्या दोन्ही बैठका जेव्हा इतर सरकारी कार्यालये बंद होती तेव्हाच झालेल्या दिसून येतात. वास्तविक नियोजन मंडळ म्हणजे राष्ट्राचा आधारस्तंभच. त्या दृष्टीने त्याच्या कार्यवाहीसाठी नियोजन मंडळाशी संबंधित असणाऱ्यांनी ही कामगिरी फुरसतीच्या वेळेतील कामगिरी असे समजू नये. तर त्यासाठी अधिकाधिक वेळ देणे आवश्यक आहे.

## नियोजनाचे तंत्र आणि अंमलबजावणी

नियोजनाचे तंत्र किंवा पद्धति ही एक स्वतंत्र संकल्पना असून त्याची अंमलबजावणी ही एक वेगळी बाब आहे. रोलिंग प्लॅन हे नियोजनाचे नवे तंत्र धोरण आखण्याच्या दृष्टीने खरोखरच फार उपयुक्त आहे. तसेच अंमलबजावणीच्या दृष्टीनेही फारसे तापदायक नाही. परंतु अंमलबजावणी ही एक स्वतंत्र बाब असल्यामुळे त्यासाठी संघटनेची आवश्यकता आहे. सरकारला जर ग्रामीण विकास आणि दारिद्र्य निर्मूलन या उद्दिष्टांना अग्रक्रम द्यावयाचा असेल तर ग्रामीण पातळीवर अशा संघटना उभारणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी ग्रामीण कल्याण आणि नेतृत्व यावर सरकारने अधिक भर दिला पाहिजे. पाश्चात्य राष्ट्रांत आपल्याबद्दल बऱ्याच वेळा असे म्हटले जाते की "Indian people are the best planners but poor administrators." म्हणजे आपण उत्कृष्ट नियोजनकार आहोत पण अंमलबजावणीच्या दृष्टीने फारच मागे आहोत. म्हणून आपण ह्या नवीन तंत्राचा स्वीकार केल्यानंतर त्याची अंमलबजावणी काटेकोरपणाने आणि चांगल्या प्रकारे झाली पाहिजे.

नियोजन म्हणजे आर्थिक शिस्त. ही शिस्त अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांत रुजविली गेली पाहिजे. नवीन तंत्राचा स्वीकार करताना, फेरबदल करीत असताना नियोजनात खंबीरपणा आणला पाहिजे आणि त्याची अंमलबजावणी देखील खंबीरपणे झाली पाहिजे. या नवीन तंत्राचा स्वीकार केल्यामुळे आपल्या आतापर्यंतच्या नियोजनातील उणिवा दूर करता येऊन राष्ट्रातील दारिद्र्य, बेकारी, भाववाढ यांसारख्या मूलभूत समस्या सोडविण्याच्या दृष्टीने आपल्याला वाटचाल करता येईल असे म्हणायला हरकत नाही. *

# सूची

## एप्रिल १९७७ ते मार्च १९७८ ह्या गेल्या वर्षात 'अर्थ' मध्ये प्रसिद्ध झालेल्या साहित्याची सूची.

### एप्रिल-मे १९७७

(तृतीय वर्ष वर्धापन विशेषांक)

(१) गांधीजींच्या अर्थशास्त्रीय विचाराचे मर्म – प्रा. देवदत्त दाभोळकर, कुलगुरु, पुणे विद्यापीठ यांची मुलाखत.

(२) श्री. वा. मा. भिडे – आशियाई बँकांच्या कार्यपद्धतीत सांस्कृतिक परिवर्तन.

(३) डॉ. बी. के. काळे गणित, संख्याशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७ – सेमिस्टर पद्धत (अमेरिकन आणि भारतीय)

(४) डॉ. राज निगम – उद्योग व्यवस्थापन, विसाव्या शतकाच्या अखेरीस भारताची आर्थिक परिस्थिति कशी असेल?

(५) प्रा. शरद कुलकर्णी – भारताच्या आर्थिक इतिहासावरील साहित्याची सटीप संदर्भ सूची.

(६) प्रा. रमेश पानसे – प्रमुख, अर्थशास्त्र विभाग श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई – लोक ठेवी.

(७) प्रा. स. अ. रानडे – नाणेबाजार व शेअरबाजार.

(८) कोशकार श्री. ग. रं. भिडे – आयुर्विमा ग्राहकांचे संघटन आवश्यक नाही कां?

(९) श्री. माधव जोशी – राष्ट्रीयीकृत बँका आणि अग्रक्रम विभाग.

(१०) प्रा. प्रकाश देशपांडे, पदार्थ विज्ञान विभाग, फर्ग्युसन कॉलेज, पुणे – वायुशक्तीचा उपयोग.

(११) अॅड. भा. वि. घाणेकर – १९४८ च्या अॅक्टमध्ये झालेले नवीन बदल.

### जून १९७७

(१) मुखपृष्ठ – 'घन वळले' मंगेश पाडगांवकर, 'थे घन आओ' सरस्वती कुमार दीपक कविता.

(२) संपादकीय टिपणे.

(३) प्रा. स. म. गोळवलकर – फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे – भारताची राज्यघटना आणि गांधीजींच्या सत्ताविकेंद्रीकरणाचा विचार.

(४) प्रा. अ. कृ. पोफळे, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, लासलगाव जि. नाशिक – रशियाची आर्थिक प्रगति.

(५) प्रा. स. अ. रानडे – मुंबई वायदेबाजार, सोने, चांदीबाजार आणि शेअरबाजार.

(६) एक्सपोर्ट क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशन – निर्यात पत – हमी महामंडळाची माहिती.

(७) राजस परचुरे – सूर्य शक्तीचा उत्पादन कार्यात उपयोग.

(८) विज्ञान वर्तमान – मंगळावरील जीवन – मंगळावरील मातीचे पृथक्करण उर्जेसाठी नवे संशोधन.

(९) तरुणांचे मनोगत – शिक्षित असून नोकरी-नसल्यास स्वतःचा उद्योग-धंदा करण्याची संधि (१) साहाय्य योजना (२) सुशिक्षितांनी सुरू करण्यासारख्या काही सोप्या सेवा व लघुउद्योगांची यादी. (३) सेवा उद्योगांची यादी.

### जुलै १९७७

(१) आलोक (टिपणे) – महागाईचे सावट, गुळाचा तुटवडा – भारतीय रुपयांची किमत, आजारी कारखान्यांचे धोरण, सातवे वित्तमहामंडळ, जागतिक बँकेचा अहवाल, बँकाजवळील पैसा, इसप गोळाची करामत, पीकपाणी औद्योगिक क्षेत्र – मागणी कमी, भावात घसरण इत्यादि, भाव खाली आणण्याचे राष्ट्रीय धोरण, आर्थिक धोरणातील विसंगतता, पीकपाणी, ग्रामीण व उपेक्षित भागात बँकांनी केलेली लक्षणीय कामगिरी, उच्चाधिकार समिति, फिल्म प्रिंटवरील उत्पादन करात १५०% वाढ. एंटराव्हायफॉर्मचा धोका.

(२) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी – प्रमुख संपादक विश्वकोश – मराठी विश्वकोश कार्य.

(३) श्री. प्रतापराव शिंदे—ग्रामीण कर्ज, लहान शेतकऱ्यांच्या कर्ज थकबाकीची समस्या.

(४) श्री. व्ही. जे. नखाते, युनायटेड वेस्टर्न बँक सातारा—शाखाधिकारी व त्याचे कार्य.

(५). रिझर्व्ह बँकेच्या अग्रिकल्चरल क्रेडिट विभागाचे माजी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ. सी. डी. दाते यांचा सत्कार.

(६) श्री. आय. जे. नायडू, सचिव ग्रामीण विकास विभाग, पाटबंधारे मंत्रालय, ग्रामीण विकासासाठी संस्थात्मक पतपुरवठा.

(७) वाचकांचा पत्रव्यवहार.

## ऑगस्ट १९७७

(१) आलोक—विदेशी चलन मिळविण्यात भारताला अपूर्व यश—सहावी पंचवार्षिक योजना, अन्नधान्य, भाजीपाला व डाळी, औद्योगिक क्षेत्र, बँकिंग क्षेत्र, नवे संचालक मंडळ, बृहन्महाराष्ट्र कॅनडात, परदेशात मद्यनिर्मिति व त्यासंबंधी निकटवर्तीयांचा अंदाज, संप टाळेबंदीमुळे ७॥ कोटी रुपयांचे नुकसान, सक्तीच्या ठेव योजनेमध्ये अनेक घोटाळे, शेअर्स गुंतवणुकीत टाटा-फिन्ले अग्रेसर आंतरराष्ट्रीय गहू मंडळाचा ७६—७७ चा उत्पादनसंबंधीचा अंदाज औद्योगिक अशांतीमुळे हानि.

(२) प्रा. शरद कुलकर्णी—अर्थसंवादाचे स्वागत

(३) प्रा. मीना कुलकर्णी प्रा.व. शि. कुलकर्णी—विकृत व बिनबुडाच्या परीक्षणाचा नमुना.

(४) प्रा. अ. कृ. पोफळे. अर्थसंकल्प १९७७—७८ स्वायत्त खेड्याकडे वाटचाल.

(५) प्रा. मधु दंडवते—रेल्वेमंत्री, भारत सरकार भारतीय रेल्वेच्या इंधनाची काटकसर

(६) उसांच्या चिपाडावर आधारित सुरू करण्याचे छोटे भाग कारखाने

## सप्टेंबर १९७७

### (सहकार विशेषांक)

(१) आलोक—सहकार महर्षींचा—परिचय

(२) कै. वामनराव वर्दे—शेतकऱ्यांच्या सहकारी कारखान्याचा श्रीगणेशा

(३) डॉ. आर. जी. काकडे—मी पाहिलेले विखे पाटील.

(४) श्री. राजा मंगळवेढेकर पुणे—श्रेष्ठ भूमिपुत्र

(५) श्री. [illegible] —प्रवरा काठचा कल्पवृक्ष

(६) खासदार श्री. आण्णासाहेब शिंदे—शेतकऱ्यांचा झुंझार नेता.

(७) श्री. शंकरराव मोहिते, अध्यक्ष—सहकारी साखर कारखानदार संघटना अकलूज—कर्मयोगी विखे पाटील.

(८) श्री. तात्यासाहेब कोरे, अध्यक्ष वारणा सहकारी साखर कारखाना. पदरची भाकरी—सहकाराची निर्लेप चाकरी.

(९) डॉ. वा. चु. श्रीमाळ, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक—पद्मश्री विखे पाटील यांचे नेतृत्वगुण

(१०) श्री. जाधवराव माळेगाव शुगर कारखाना सहकाराचे स्फूर्तिस्थान

(११) श्री. शंकरराव कोल्हे, अध्यक्ष—संजीवनी सहकारी साखर कारखाना, कोपरगाव—सहकार सांदिपनी.

## ऑक्टोबर-नोहेंबर १९७७

### दिवाळी अंक अर्थनीति विशेषांक

(१) संपादकीय

(२) प्रा. पी. आर. ब्रह्मानंद अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ दूरदृष्टीचे सुफलदायी नियोजन

(३) प्रा. पुरुषोत्तम नारायण माथूर—अर्थशास्त्र विभाग वेल्स विद्यापीठ (ब्रिटन)—भारतीय आर्थिक नीतीची समीक्षा

(४) प्रा. नी. वि. सोवनी अध्यक्ष—मराठी अर्थशास्त्र परिषद—आर्थिक धोरण

(५) डॉ. वि. म. दांडेकर, संचालक, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे—लोकशाही प्रक्रिया व आर्थिक क्षेत्र.

(६) श्री. त्रिलोकनाथ सिंह—चीफ अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर इंडिया सेक्युरिटी प्रेस, —नासिक, कामगारांच्या सहभागातून विधायक औद्योगिक संबंध निर्मिति.

(७) डॉ. श्रीराम अभ्यंकर. भास्कराचार्य प्रतिष्ठान, पुणे. गणित संशोधन आणि प्रचाराचे संकलित कार्य. —मुलाखत कु. उज्ज्वला जोशी.

(८) प्रा. दिनकर बोरीकर. औरंगाबाद. किमती स्थिर ठेवण्यासाठी चलन अतिवृद्धि रोखण्याचा उपाय.

(१०) डॉ. व... .व
राराष्ट्र पुणे-ग्रामीण व
...दार व बँका यांचे प्रश्न ...णां (थकबाकीवरील
...ाय)

(११) प्रा. भालबा केळकर नाट्यसंस्थांचे अर्थ-
...त्र नाट्यसृष्टीतील 'अर्था'चे नाटक.

## डिसेंबर १९७७

(१) संपादकीय.

(२) श्री. मिलिंद जोशी – सातवे अर्थमंडळ

(३) प्रा. नी. वि. सोहनी – अध्यक्षीय भाषण मराठी अर्थशास्त्र परिषद, अधिवेशन पहिले – मुंबई.

(४) डॉ. रवींद्र रा. दोशी, अर्जुननगर—सहकार आणि ग्रामीण विकास.

(५) प्रा. अ. कृ. पोफळे – लासलगाव. बेरोजगारी, गरिबी व गांधीमार्ग.

(६) श्री. व. द. नखाते – बँकेची प्रश्नोत्तर माध्यमाने ओळख.

(७) चहाचे लागवड क्षेत्र आणि उत्पादन व चहाचा निर्यात व्यापार यासंबंधी तक्ते.

## जानेवारी १९७८

मराठी अर्थशास्त्र परिषद प्रथम अधिवेशन विशेषांक

(१) संपादकीय.

(२) प्रा. स. द. देशपांडे — स्वागत भाषण

(३) पां. वा. गाडगीळ — इन्फ्लेशन अथवा अति पैसा वाढ.

(४) अर्थशास्त्र परिषद-पुढील वर्षाचे अधिवेशन

(५) प्रा. एस्. एन्. माने-महाराष्ट्राची ग्रामीण रोजगार हमीयोजना.

(६) प्रा. सिद्धार्थ चक्रवर्ती — चक्री योजनेची पहिली दिवाळी.

(७) पी जे. फर्नांडिस, सचिव, वित्तमंत्रालय, नवी दिल्ली—व्यवस्थापन आणि सरकार.

(८) राजेंद्र पटवर्धन – टेक्नोक्रास्ट.

(९) प्रा. प्रभाकर फरसोले – जयसिंगपूर. प्रेशर उद्योगाची ओळख.

# जाहिरात सूची

## एप्रिल मे ७७

म. पृ. २ बँक, ऑफ महाराष्ट्र.

पान नं. २८ कॉण्टिनेण्टल प्रकाशन.

म. पृ. २ बँक ऑफ महाराष्ट्र

## जुलै ७७

म. पृ. २ बँक ऑफ महाराष्ट्र

पा. नं २० दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि. म. पृ. १ शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली. म. पृ. २. किर्लोस्कर ऑईल इंजिन लि.

## ऑगस्ट ७७

म. पृ. २ बँक ऑफ महाराष्ट्र.

## सप्टेंबर ७७

म. पृ. २ दि सांगली बँक लि.
पान नं. ९ दि. महाराष्ट्र स्टेट को–ऑप बँक लि.
म. पृ. १ श्री. वारणा सहकारी साखर कारखाना लि. वारणानगर. म. पृ. २ बँक ऑफ महाराष्ट्र.

## ऑक्टोबर नोव्हेंबर

मु. पृ. २ डॉ. बेक अँण्ड कं. लि.
पान २ वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. पा. नं. ४महाराष्ट्र राज्य लॉटरी. पान नं. ६ दि कॉसमॉस को. ऑप. बँक लि. पान नं. ८ श्री. वारणा सहकारी साखर कारखाना लि. वारणानगर पान नं. १० सेंट्रल बँक ऑफ इंडिया. पान नं. १२ भिमा शुगर लि. पान नं. १४ महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ. पान नं. १६ मे. के. एस् निगडे मे. ए वन् इंजिनिअरिंग. पान नं. २८ कोल्हापूर केन. शुगर वर्क्स लि. पा. नं. ३४ दि. महाराष्ट्र स्टेट को ऑप बँक लि. पान. नं. ४० युनियन बँक ऑफ इंडिया, पान नं, ४२ डो रोना रोहित्रा प्रा, लि.; मे भारत ट्रान्स्फॉर्मर्स. पान नं. ४३ दि. सांगली बँक लि.; पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ.
पान नं. ४४ श्रीहरिहर एजन्सी. महाराष्ट्र लघुउद्योग विकास निगम. म. पृ. १ सिडको लि. म. पृ. २ बँक ऑफ महाराष्ट्र.

## डिसेंबर ७७

मु पृ. २ किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. पान नं २४ श्रीसुवर्ण सहकारी बँक लि. म. पृ. २ बँक ऑफ महाराष्ट्र

## जानेवारी ७८

पान नं. ४ दि सांगली बँक लि.; दि महाराष्ट्र स्टेट को ऑप. बँक लि. पान नं. ९ साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि. पान नं. ३ किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. म. पृ. २ बँक ऑफ महाराष्ट्र

---

सत्यं शिवं सुंदरम् प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे यांनी यशवंत मुद्रणालय, १८३५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले

Licence to Post without Pre . No. PNC 205

॥ श्री ॥

# ब्रिमा शुगर लि.,

(दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. च्या संपूर्ण मालकीची कंपनी)

## शुभ्र दाणेदार साखरेचे उत्पादक

रजिस्टर्ड आणि हेड ऑफिस
९८० सदाशिव पेठ, पुणे ३०.

: फॅक्टरी :

मु. श्रीपूर, व्हाया अकलूज, जि. सोलापूर.

फोन :
४४४९१ – पुणे
२३ व ४२ श्रीपूर

टेलेक्स :
३८८ पुणे

तार :
श्री
(पुणे व श्रीपूर)

X·2m,N35
L8
206783

ज. चं. आगाशे
चेअरमन